म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ...............
सं. क्र. 3330

# गाजलेल्या प्र...वना



वि.का. राजवाडे

...श. शेजवलकर

...सावरकर

...न.चिं. ...

प्र. ...

स.गं. मालशे

...नरहा कुरुंदकर

श्री. म. मा...

वा... शास्त्री खरे

पु.ल. देशपांडे

REFBK-0025922

संदर्भ
निबंध
३३३०
२५८२२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

23 AUG 1989
3 SEP 1989
9 SEP 1989
24 SEP 1989
18 OCT 1989
15 NOV 1989
19 NOV 1989
16 MAR 1991
5 JAN 1992

25 DEC 1991
6 DEC 1989
10 DEC 1989
31 DEC 1989
10 JAN 1990
10 JAN 1990
18 APR 1990
13 FEB 1991
16 FEB 1991
1991
17 APR 1993

(कृ.मा.पहा)
२०००-१२-८८

# गाजलेल्या प्रस्तावना



# गाजलेल्या प्रस्तावना

संपादक : वि. ग. कानिटकर
सहाय्यक : म. श्री. दीक्षित

REFBK-0025922

उन्मेष प्रकाशन, पुणे

३३३०
निबंध

# प्रास्ताविक

काही लक्षणीय व नावाजल्या गेलेल्या प्रस्तावनांचे प्रस्तुत पुस्तक हे एक संकलन आहे. अशा प्रकारचा हा पहिलाच संग्रह असावा. एक वाङमय प्रकार म्हणून प्रस्तावनांचा वेगळा विचार फारसा झालेला नाही. तेव्हा या अनुषंगाने काही विचार मांडावे व समाविष्ट केलेल्या प्रस्तावनांची आस्वाद-समीक्षा वाचकांपुढे ठेवावी हा या प्रास्ताविकाचा हेतू आहे.

ह्या संग्रहात अंतर्भूत केलेल्या प्रस्तावना याच केवळ गाजलेल्या प्रस्तावना नाहीत तर ह्याच तोलामोलाच्या व तितक्याच संस्मरणीय प्रस्तावना मराठी वाङमयात आणखीही आहेत; फार काय ह्या संग्रहात ज्या लेखकांचे लेखन आहे; त्यांच्याच इतर काही प्रस्तावना आज अभ्यासकास वाचाव्या लागतातच. उल्लेखच करावयाचा तर मराठी वाङमयाचा जो मानदंड आहे तो इतिहासाचार्य राजवाड्यांचा 'प्रस्तावना खंड ' याचा करावा लागेल. आचार्य अत्र्यांनी, वि. स. खांडेकरांनी, नरहर कुरुंदकरांनी, पु. ल. देशपांडे यांनी व अगोदरच्या पिढीतील श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि नरसिंह चिंतामण केळकर यांनी ज्या विविध प्रस्तावना लिहिल्या त्यातील काही अतिशय सरस व विचारप्रवर्तक आहेत. कै. वामन मल्हार जोशी यांनीही विचारांना चालना देणाऱ्या ज्या प्रस्तावना लिहिल्या त्यात मूळ प्रतिपादनात भर घालणारे व काही उणे असल्यास ते भरून काढणारे विचार ग्रंथकारांचा अवमान न करता मांडलेले आढळतात.

प्रस्तावना हा वाङमयप्रकार पर्वताइतका जुना नसला तरी प्राचीन आहे. वधूला जशी पाठराखीण असते, तशी पुस्तकाला, कधी खुद्द ते लिहिणाऱ्या लेखकाची, कधी अधिकारी व्यक्तींची, तर कधी एखाद्या रसिकाची प्रस्तावना असते. मुख्य हेतू पुस्तक लिहिण्याचे प्रयोजन व भूमिका वाचकाला कळावी. लेखक नवखा असेल तर त्याचे गुण कळावेत म्हणून एखाद्या अधिकाराने आणि अनुभवाने वडिलधाऱ्या वाङमय सेवकाची प्रस्तावना घेतलेली असते.

कधी पुस्तक खुद्द लेखकाचे नसते. ऐतिहासिक कागदपत्रांचे कष्टाने संशोधन करून, अभ्यास करून, टिपणे जोडून, प्रमाणे देऊन आवश्यक तर जुनी मते आणि सिद्धांत खोडून जे लेखन केलेले असते त्यालाही प्रस्तावनाच म्हटले जाते. प्रतिभासंपन्न आणि परखड इतिहास संशोधक विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांच्या

'ऐतिहासिक प्रस्तावना' व 'राधामाधवविलासचंपू'ची त्यांची प्रस्तावना ही अशी आहे. वासुदेवशास्त्री खरे यांच्याही प्रस्तावना, पटवर्धन दप्तर संपादित करताना लिहिलेल्या आहेत. प्रस्तावनेचा आणखी एक प्रकार म्हणजे वासुदेवशास्त्री खरे यांनी न. चिं. केळकर ह्यांच्या १९१८ साली मराठेशाहीच्या शतसांवत्सरिक श्राद्ध-प्रसंगी केळकरांनी लिहिलेल्या 'मराठे व इंग्रज' ह्या ग्रंथाला लिहिलेली प्रस्तावना. न. चिं. केळकर ह्यांचे पुस्तक वर्णनात्मक आहे. विषयातून निर्माण होणाऱ्या मूलभूत प्रश्नांकडे लेखक तितकेसे लक्ष देत नाही. त्यामुळे विवरणाचा किंवा विश्लेषणाचा भाग फार बेताचा. पण खरेशास्त्रींनी ही कसर भरून काढली आहे. खरेशास्त्र्यांची सुमारे १६ पानांची ही प्रस्तावना आज ७०-७१ वर्षांनंतरसुद्धा त्यातील मूलगामी विचारांमुळे चिरतरुण व टवटवीत वाटते. प्रस्तावनेच्या शेवटच्या परिच्छेदात मराठ्यांचे सगळे दोष अगदी कठोरपणे हा थोर इतिहाससंशोधक आणि विचारवंत मांडतो. इतिहास डिंडिमाचा इशारा काय आहे ते निःसंकोचपणे सांगतो. लोखंडाचे व मातीचे भांडे एकत्र आल्यावर मातीचे भांडे फुटणार हे उघड आहे हे खरेशास्त्री स्पष्टपणे लिहितात. काही दुर्गुणांनी स्वराज्य गेले व उद्या मिळाले तरी ते पुन्हा जाईल हा इशारा शेवटी देतात. या प्रस्तावनेत मांडलेले विचार आज स्वातंत्र्य मिळाल्यानंतर चाळीस वर्षे उलटून गेली तरी अचूक आणि सार्थ असणे हे खरेशास्त्र्यांच्या द्रष्टेपणाचे द्योतक आहे.

वासुदेवशास्त्री खरे हे तात्यासाहेब केळकरांचे गुरू होते व त्यांच्यापेक्षा वयाने मोठेही होते; पण याच्या अगदी नेमका उलट प्रकार रियासतकार नानासाहेब सरदेसाई व इतिहासकार शेजवलकर याचे संबंधात आहे. सरदेसाई हे वयाने, अधिकाराने व कीर्तीने मोठे. उलट शेजवलकर प्रस्तावना लिहितेवेळी तरुण व अपरिचित असे लेखक संशोधक होते. नानासाहेब पेशवे यांच्या मूल्यमापनाबद्दल दोघांत तीव्र मतभेद होते. रियासतकारांनी 'नानासाहेब पेशवे' हे चरित्र लिहिल्यावर त्याला शेजवलकरांचे प्रस्तावना मतभेद ठाऊक असूनही किंबहुना मतभेद असल्यामुळेच सरदेसाईंनी घेतली. ही प्रस्तावना भाषेमुळे, विचारांमुळे व पेशव्यांच्या–विशेषतः नानासाहेब पेशव्यांच्या राजकारणाची व धोरणांची जी चिरफाड शेजवलकरांनी केली आहे, त्यामुळे गाजली. शेजवलकर पुढे आले ते ह्या प्रस्तावनेमुळे! तसेच शेजवलकरांचे मराठ्यांच्या इतिहासाबद्दलचे व राजकारणाबद्दलचे सगळे वैचारिक अधिष्ठान ह्या प्रस्तावनेत आलेले आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. 'पानपत' असो, 'शिवचरित्रा'चा अपुरा आराखडा असो त्यात ह्या प्रस्तावनेपलीकडे नवी वैचारिक भर फारशी नाही. ही प्रस्तावना म्हणजे शेजवलकरांच्या सर्व ऐतिहासिक लेखनाचा पाया आहे.

'महाराष्ट्र टाईम्स'ला (१९ मे १९६३) शेजवलकरांनी मृत्युपूर्वी एक मुलाखत दिली होती. त्यात बुद्धिबळाचा डाव एकानेच दोन्ही बाजूने खेळावा, तशी

मी प्रस्तावनाही लिहिली व सरदेसायांच्या शैलीत चरित्रही लिहिले असे विधान केले होते. शेजवलकरांनी सांगितले आहे– ' खरी हकिगत सांगायला आता हरकत नाही. कर्नाटक प्रेससाठी सरदेसाई यांनी नानासाहेब पेशवे यांच्या जीवनावर एक पुस्तक लिहिण्याचे कबूल केले होते, पण त्यांना वेळ होत नव्हता. तेव्हा नानासाहेबांसंबंधी मजकूर असलेले रियासतीचे दोन भाग मला देऊन ते म्हणाले– ' त्यातील नानासाहेबांविषयीचा मजकूर संकलित करा, म्हणजे हे पुस्तक तयार होऊन जाईल.' मला त्यांची अनेक मते मान्य नव्हती. तसेच चरित्राबद्दलची ही कल्पनाही. पण मी त्यांनी दिलेली सामग्री वापरून आणि बंगाल गॅझेटचा उपयोग करून त्यास चरित्राचे रूप दिले. खुद्द सरदेसायांनी ते लिहिले आहे, असा आभास निर्माण करावयाचा होता; तोही मी केला. माझे मतभेद बोलून दाखवताच सरदेसायांनी माझी मते त्याच पुस्तकाला प्रस्तावना लिहून त्यात मांडण्यास मला सांगितले. हा त्यांच्या मनाचा मोठेपणा.'

शेजवलकरांचे हे म्हणणे स्वीकारताना नव्या रियासती– शककर्ता शिवाजी, उग्रप्रकृती संभाजी, शीतप्रकृती राजाराम वगैरे आपणच लिहिल्या असे एका प्रसिद्ध लेखक व संपादकांनी जाहीर विधान केले असताना रियासतकारांनी या संपादकांचे हे सर्व म्हणणे खोटे आहे हे कोर्टात जाऊन पुराव्यानिशी रीतसर सिद्ध करून घेतले हे ध्यानात घ्यायला हवे. सरदेसायांच्या निधनानंतर दिलेल्या मुलाखतीतील शेजवलकरांच्या विधानाबद्दल म्हणूनच काळजीपूर्वक विचार आवश्यक वाटतो.

ह्या संग्रहात नसलेली पण एक गाजलेली प्रस्तावना म्हणजे वामन मल्हार जोशी यांनी बा. सि. मर्ढेकर ह्यांच्या 'वाङ्मयीन महात्मता' या पुस्तकाला लिहिलेली. मर्ढेकरांनी आपले विचार अभिनव पण थोड्या दुर्बोध भाषेत मांडले आहेत; पण प्रस्तावनाकार आपल्या सुबोध व तत्त्ववेधी शैलीने ह्या निबंधातील केवळ मर्मच उलगडून दाखवत नाहीत तर त्यात नव्या विचारांची भर घालतात. कधी लेखक लिहिलेल्या पुस्तकाचा व आपल्या भूमिकेचा चांगला परिचय करून देतो. पण त्याला अधिक व्यासंगाची व मूलगामी विचारांची जोड मिळावी म्हणून दुसऱ्या विचारवंताची आवश्यकता वाटते. 'चतुर्भाणी बावन्नखणी' ह्या आनंद साधले यांच्या मूळ संस्कृतवरून केलेल्या भावानुवादाला खुद्द अनुवादकाची व प्रा. नरहर कुरुंदकर ह्यांची अशा दोन प्रस्तावना आहेत.

राजवाडे ह्यांच्यासारख्या इतिहास संशोधकाच्या हातात शहाजी महाराजांचा आश्रित जयराम पिंडये ह्यांचे 'राधामाधवविलासचंपू' हे काव्य पडते. जेमतेम ४०-५० पानांचे आणि काव्यदृष्टचा सामान्य असलेले हे काव्य राजवाड्यांना 'ऐतिहासिक' महत्त्वाचे वाटते. शहाजीच्या दरबाराचे, त्यातील प्रसंगांचे, भेटलेल्या व्यक्तींचे, शहाजी महाराजांचे व त्यांच्या नात्यातील अनेकांचे वर्णन व आठवणी ह्या काव्यात येतात. राजवाड्यांची विवेचनशक्ती जागृत होते काणि १७ व्या

शतकाच्या पूर्वार्धातील महाराष्ट्राची राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्टये सांगणारी २००–२५० पानांची प्रस्तावना तयार होते. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर हे आपल्या ज्ञानकोशाच्या खंडांना, आपली वैचारिक बैठक विशद करणारा 'प्रस्तावना खंड' हा ग्रंथ लिहितात, तर प्रा. श्री. म. माटे 'विज्ञानबोध' तयार करताना विज्ञानदृष्टीचा महिमा व आवश्यकता प्रतिपादन करणारी मोठी प्रस्तावना सादर करतात.

कवितासंग्रह, कथासंग्रह, लेखसंग्रह, कादंबऱ्या, नाटके अशा अनेक वाङमयप्रकारात समाविष्ट होणाऱ्या पुस्तकांना असलेल्या प्रस्तावना, ह्या त्यातील मौलिक तर कधी वादग्रस्त विधानांमुळेही प्रसिद्धी पावतात. न. चिं. केळकर, वि. स. खांडेकर, प्र. के. अत्रे, पु. ल. देशपांडे ह्यांचा लेखक तसेच प्रस्तावनालेखक म्हणूनही भरपूर लौकिक आहे. खांडेकरांच्या पुरस्कारात्मक प्रस्तावनांमुळे बा. भ. बोरकर व आजचे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज हे त्या काळचे दोन नवोदित कवी महाराष्ट्राला सुपरिचित झाले, कालांतराने कवी म्हणून त्यांचे श्रेष्ठत्व स्वयंप्रकाशी झाले. पण प्रस्तावनांतून खांडेकरांची गुणग्राहकता व रसिकता दिसते. तांबे हे मोठे कवी पण नोकरीनिमित्त दूर मध्यप्रदेशात राहिलेले. माधवराव पटवर्धनांनी त्यांचा कवितासंग्रह संपादित केला व व्यासंगपूर्ण प्रस्तावनेसह प्रसिद्ध केला. 'बी' कवींच्या काव्यसंग्रहाला अत्र्यांनी विस्तृत प्रस्तावना लिहिली. मात्र एखादेवेळी शुद्ध हेतूने लिहिलेल्या एखाद्या वाक्यामुळेही अनेक वर्षे खळबळ माजते. गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' नाटकातील पदे विठ्ठल सीताराम गुर्जर ह्यांची आहेत, प्रस्तावनाही त्यांचीच आहे. 'कै.–हाय' ह्या शब्दांनी सुरू होणाऱ्या ह्या प्रस्तावनेत, लेखकाचे हे नाटक स्वानुभवावरून लिहिले अशा अर्थाचे एक वाक्य येते. मग गडकरी दारू पीत की पीत नसत त्यावर वाद सुरू झाला! प्रस्तावनाकाराने असे विधान करणे हे कितपत योग्य हाही एक टीकेचा उपमुद्दा होता. परशुरामभाऊ कॉलेजचे लेलेशास्त्री ह्यांनी तर, 'प्यायचे आणि लिहायचे' अशी 'एकच प्याला' नाटकाची संभावना केली. उलट अत्र्यांनी गडकऱ्यांची एकंदर आयुष्यातील कमाई किती, संसाराला लागणारा खर्च किती ह्याचा हिशोब मांडून अधूनमधून कधीतरी गडकऱ्यांनी 'एकच प्याला' घेतला असावा आणि म्हणून गडकरी व्यसनासक्त नव्हते असा अभिप्राय दिला होता. अनुभवात अवलोकनाचाही भाग असतो ह्याचा अनेक टीकाकारांना विसर पडला होता. गुर्जरांची प्रस्तावना ही अशी भलत्याच कारणाने गाजली. त्यानंतर अनेक वर्षांनी प्रा. श्री. के. क्षीरसागर ह्यांनी 'एकच प्याला' नाटकाच्या नव्या आवृत्तीला प्रस्तावना लिहिली. ही जितकी व्यासंगपूर्ण तितकीच त्यातील विचारांमुळे मौलिक आहे. शोकांतिकेचे घटक कोणते असतात व त्यातील नायक आणि नायिका ह्यांची अंगभूत स्वभाववैशिष्टये ही त्यांच्या दुःखास कशी कारणीभूत होतात, तसेच कधी

प्रारब्धही कसे कारणीभूत होते, ह्याचे क्षीरसागर उत्तम प्रकारे विवेचन करतात.

एखादी छोटीशीच प्रस्तावना विशिष्ट क्षेत्रात क्रांती घडवते. सुंठणकर संपादित 'वासंती' ह्या शालोपयोगी कवितासंग्रहास आचार्य अत्र्यांची अशी प्रस्तावना आहे. अत्र्यांच्या, पुढे परिणत झालेल्या लेखनशैलीचे काही गुण ह्या प्रस्तावनेत आहेत. पण त्यापेक्षा ह्या प्रस्तावनेतील नव्या विचारांच्या वाऱ्यामुळे, शाळेत तोवर असणारी, व्यवहारोपयोगी, वेदांती व मुलांना डोईजड होणारी अन्वयार्थाने जखडलेली कविता अभ्यासाबाहेर गेली. मुलांना अनुरूप व त्यांच्यामध्ये काव्य-वाचनाची आवड निर्माण करणारे जिवंत नैसर्गिक काव्य, शाळांमधून शिकविण्यास प्रारंभ झाला.

स्वा. सावरकरांनी लिहिलेली मॅझिनीच्या चरित्राची प्रस्तावना ही विलक्षण ओजस्वी व पुढे झालेल्या देशभक्तांचे व क्रांतिकारकांचे जीवनस्तोत्र बनली. भाषा-शुद्धीच्या अनावर हव्यासामुळे कालांतराने सावरकरांच्या लेखनातील सौंदर्य काहीसे उणे होत गेले. पण मॅझिनीच्या प्रस्तावनेत या हव्यासाचा मागमूसही नाही. एकेक वाक्य, हिऱ्याप्रमाणे लखलखते, निखाऱ्याप्रमाणे धगधगते !

बर्नार्ड शॉसारख्या एखाद्या नाटककाराला विचारप्रक्षोभक व लोकप्रिय नाटके लिहूनही सगळा आशय व विचार नाटकातून आला असे वाटत नाही. त्यामुळे मूळ नाटकापेक्षाही मोठ्या प्रस्तावना लिहून तो आपले विचार वाचकाच्या मनावर बिंबवतो. आपल्याकडील मान्यवर मात्र या वाटेने अद्याप तरी गेलेले नाहीत.

काही प्रस्तावना ह्या कवीत वा लेखकात नसलेले गुण शोधून काढून त्याला चिकटविणाऱ्या असतात. प्राचीन मराठी आख्यानक वाङमयावर लिहिणाऱ्या विद्वान संपादकांचा व अशा प्रस्तावनांचा एक साचाच झाला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी व प्राध्यापकांसाठी ह्या प्रस्तावना असतात. नागेश, विठ्ठल, सामराज अशा तथाकथित पंडिती कथा-काव्यांना ह्या प्रस्तावना आहेत. कवी हा पंडित, बहुश्रुत व ज्ञानी कसा आहे, त्याच्यात थोर दर्जाची प्रतिभा कशी आहे, काव्यावरून राजकीय व सामाजिक स्थिती कशी कळते हे सांगताना प्रस्तावनेत पुराव्यादाखल जी उदाहरणे दिली जातात, ती फारच मनोरंजक असतात. संगीतातील रागांची ८–१०नावे आली, वेदांतातील ५–१० पारिभाषिक शब्द आले, शास्त्रांची,वाद्यांची, पक्वान्नांची व दागिन्यांची वर्णने आली की. तो आख्यानक कवी, ह्या सर्व विषयात पारंगत आहे असा सिद्धांत मांडण्यात येतो. पुरावा काय तर ह्या शब्दांच्या गवती काड्यांचा ! टेलिव्हिजन, रेडिओ, आणुबॉंब, टँकर, संगणक असे कितीतरी शब्द आपल्या तोंडात आहेत. ह्याचा अर्थ ह्या सर्व शास्त्रीय विषयात आपण पारंगत आहोत असा होत नाही.

संशोधनात्मक प्रस्तावनांचा आणखी एक प्रकार गेल्या ४०–५० वर्षात उदयास आला आहे, व आज तो प्रतिष्ठा पावला आहे. ह्या संशोधनाचा उगम अमेरिकेत

झाला. प्रियोळकर ह्यांच्या रघुनाथ पंडितांचे 'नलदमयंती आख्यान' व मुक्तेश्वरांचे 'महाभारत' ह्यांच्या प्रस्तावना यात हे तपशीलात्मक, कार्डपद्धतीचे संशोधन आढळेल. ह्या संशोधनात कष्ट असतात, अचूकपणा असतो योग्य प्रकारे वापरल्यास कल्पनाशक्तीचीही मदत होते. पण अनेक चांगल्या गोष्टींप्रमाणे ह्याचाही एक साचा बनला, व प्रस्तावनाकार एखादा सामान्य तपशील मोठे अवडंबर करून मांडू लागले. डॉ. स. गं. मालशे ह्यांनी आचार्य अत्रे ह्यांच्या 'झेंडूची फुले' ह्या विडंबनात्मक काव्यसंग्रहाचे केलेले संपादन, त्याला जोडलेल्या टीपा व पुरवण्या व लिहिलेली प्रस्तावना हे ह्या नव्या संशोधनप्रकाराचे चांगले उदाहरण आहे. त्यात विडंबन काव्यासंबंधी आलेले तात्त्विक विवेचन व त्याला अत्र्यांच्या अगोदर झालेल्या विडंबनात्मक कवितांची माहिती, ही सर्वसामान्य वाचकांना मनोरंजक व अभ्यासकांना उपयुक्त अशारीतीने आलेली दिसेल. पण ह्या प्रस्तावनेतील एक महत्त्वाचा भाग म्हणजे तपशीलात्मक संशोधन आले आहे तो होय. आता एखादी कविता दोन महिने अगोदर लिहिली की नंतर लिहिली ह्याला महत्त्व असले, तरी ते किती ह्याचा विचार करावा लागतो. काही क्रांतिकारक सत्य प्रथम बाहेर येणार असेल तर अशा सूचक तपशिलालाही महत्त्व असते.

प्रस्तावना हा वाङ्मयप्रकार सर्वसमावेशक आणि विविधतेने नटलेला आहे. प्रस्तावनेला वाङमयप्रकार म्हणण्याचे मुख्य कारण निबंधाप्रमाणे विचार हा ह्यात अग्रगण्य असतो. कवितेपेक्षा, ललित निबंधापेक्षा प्रस्तावना वस्तुनिष्ठ असते. अनेक प्रस्तावनांमधील विचार तर आपल्या विचारशक्तीला चालना देतातच पण त्याबरोबर त्या प्रस्तावनाकाराचे व्यक्तिमत्त्वही त्या लेखनातून आपल्याला काहीसे उलगडते-

वाङमयात घटितापेक्षा लेखकाला केंद्रबिंदू धरावे लागते. प्रस्तावनेत तर आणखी वेगळाच प्रकार असतो. एकतर पुस्तक लिहिणारा लेखक आणि प्रस्तावनाकार बहुतेकवेळा वेगळे असतात. पुस्तकाच्या विषयाचाही विचार करावा लागतो. ह्यामुळे प्रस्तावनांना वेगवेगळे रंग चढतात.

आचार्य प्र. के. अत्रे ह्यांनी 'अप्रकाशित गडकरी'ला लिहिलेली प्रस्तावना ह्या दृष्टीने पहावी. अत्र्यांनी आपल्या वाङ्मयीन गुरूंवर अनेक लेख लिहिले, आठवणी लिहिल्या, आणि राणे प्रकाशनाच्या 'समग्र गडकरी'ला एक विस्तृत प्रस्तावनाही लिहिली. पण 'अप्रकाशित गडकरी'चा विषयच अपूर्व आहे. एखादी कल्पना, विचार, कथानक, व्यक्तिविशेष सुचला, की गडकरी तो जवळच्या कागदावर टिपून ठेवीत व एका पेटीत टाकीत. एखादे चमकदार वाक्य सुचले, की त्याची रवानगी ह्या पेटीतच होत असे. काही नाटकांची, प्रवेशांची टिपणे, अर्धवट लिहिलेले प्रवेश, कविता, कथा, निबंध हे सर्व त्या पेटीत बंदिस्त होत असे. खाणीमधून काढलेल्या पण पैलू न पाडलेल्या हिऱ्याप्रमाणे ह्या सर्वांची अवस्था असे. त्यात कालांतराने स्थित्यंतरे होत जात व त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या नाटकात, काव्यात व विनोदी

लेखात या सर्व चीजा परिपूर्ण होऊन आपल्यापुढे येत असत. ह्या सगळ्यात गडकरी विचार कसा करीत, त्यांच्या अलौकिक कल्पकतेची घडण कशी होती, त्यांच्या काही दैवी गुणांचे व काही जन्मजात मर्यादांचे स्वरूप काय हे प्रश्न पुढे येतात. अप्रकाशित गडकरींचा अभ्यास केला की, याचा बराच उलगडा होतो. सॉमरसेट मॉम ह्या प्रसिद्ध कथाकाराचे ' लेखकाचे पुस्तक किंवा रोजनिशी' आहे. त्यात सुद्धा लेखकच आपल्या कलाकृतीची निर्मिती कशी होते ते दाखवतो. अत्र्यांनी आपल्या प्रस्तावनेत गडकऱ्यांच्या लेखनपद्धतीचा फार मार्मिक उहापोह केला आहे. एकतर ते गडकऱ्यांच्या सहवासात कॉलेजमध्ये असताना सुमारे चार वर्षे आले होते. त्यांच्या तोंडून अनेक गोष्टी त्यांनी ऐकल्या होत्या. गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर त्यांची काही टिपणेही अत्र्यांजवळ आली होती. गडकरी ह्या व्यक्तीचा व त्यांच्या समग्र वाङ्मयाचा अत्र्यांनी डोळसपणे व चिकित्सकपणे अभ्यास केला होता. पुस्तकाचा अगदी वेगळा विषय, त्याला कारणीभूत झालेला गडकऱ्यांच्यासारखा प्रतिभावंत लेखक, आणि तोडीसतोड असा अत्र्यांच्यासारखा मिळालेला प्रस्तावनाकार, ह्यामुळे ही प्रस्तावना आजही मराठी वाङ्मयात अपूर्वच म्हणावी लागेल.

प्रा. श्री. म. माटे हे ' उपेक्षितांचे अंतरंग ' व ' अस्पृश्यांचा प्रश्न ' ह्या दोन ग्रंथांमुळे व त्यांनी महारवस्तीत जाऊन केलेल्या शिक्षणप्रसारामुळे सक्रिय, सामाजिक विचारवंत म्हणून प्रसिद्ध आहेत. माटयांच्या ढंगदार व रंगदार शैलीमुळे व त्यात येणाऱ्या ग्रामीण प्रदेशातील व समाजाच्या विविध उच्चनीच स्तरातील ठसठशीत व अर्थवाहक शब्दांमुळे माटयांचे सर्व लेखन मराठी वाचकांच्या मनात झटकन मुरले. माटे वक्ते म्हणूनही विख्यात होते व हा वक्तृत्वाचा गुण त्यांच्या लेखनशैलीत ओतप्रोत दिसतो. माटे सुधारक होते तसेच काहीवेळा सनातनीही होते. पण त्यांच्या बहुरंगी व्यक्तिमत्वाला आणखी एक पदर होता– तो म्हणजे विज्ञाननिष्ठेचा ! भूतकाळात, भ्रामक समजुतीत, निरर्थक कृतीत आणि विजिगिषु वृत्तीला तसेच ऐहिक प्रगतीला मारक असलेल्या वेदांतात रुतलेला राष्ट्राचा गाडा जर वर निघायला व वेगाने प्रगतिपथावर दौड करावयास पाहिजे असेल तर पाश्चात्य राष्ट्रात प्रगत झालेल्या विज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे. विज्ञाननिष्ठा ही विचारात आणि आचारात पक्की बाणवली पाहिजे, ही माटयांची भूमिका होती. तशीच ती सावरकरांचीही होती. आणि ह्या दोघांच्याही अगोदर बुद्धिवादाचे प्रखर पुरस्कर्ते आगरकर ह्यांचीही होती. राहुकेतूमुळे चंद्राला वा सूर्याला लागलेले ग्रहण सुटेल पण ' आमच्या बुद्धीचे ग्रहण केव्हा सुटणार ?' हा आगरकरांचा लेख त्या दृष्टीने आजही महत्त्वाचा वाटतो. कारण विज्ञान जाणणारे अनेक विद्वान चंद्राला किंवा सूर्याला ग्रहण लागल्यास त्याचे शास्त्रीय कारण ठाऊक असूनही जुनाट धार्मिक विधी करत बसतात. व त्याला ते श्रद्धा समजतात. पण ती खरी अंधश्रद्धा असते ! अव्वल इंग्रजीपासून मराठीत शास्त्रीय पुस्तके झाली होती. नाही असे नाही. दीक्षितांचे

'ज्योतिर्विलास' हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. १०० वर्षे होऊन गेली तरी आजही हे पुस्तक मागासलेले किंवा जुनाट वाटत नाही. गणित, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, भूगर्भशास्त्र, वैद्यकशास्त्र, इत्यादी इंग्रजीतील अनेक विषयांवर मराठीत किंवा देशी भाषेत, येथील मुलांना शिकविण्यासाठी सरकारने पारितोषिके ठेवून अनेक विद्वानांकडून पुस्तके लिहून घेतली. पण त्याचे स्वरूप शालोपयोगी होते, अनुवादक होते. वैज्ञानिक दृष्टिकोन किंवा निष्ठा ह्याचा तो ध्यास नव्हता. माटयांच्या 'विज्ञानबोधाचे' महत्त्व ह्या दृष्टीने आहे. विज्ञानाचा पुरस्कार इतका हिरीरीने व निष्ठेने करणारे व त्यासाठी हाताखाली विद्यार्थी किंवा होतकरू लेखक घेऊन 'विज्ञानबोध' तयार करणारे माटे हे पहिलेच लेखक होत! एवढेच करून माटे थांबले नाहीत तर विज्ञानाकडे कोणत्या दृष्टीने बघावे, विज्ञाननिष्ठा म्हणजे काय? ती कमावण्यासाठी जुने काय सोडावे लागते व नवे काय स्वीकारावे लागते ह्या सर्वांचा उहापोह आपल्या प्रभावी शैलीने लिहिलेल्या 'प्रस्तावना खंडात' ते करतात. त्यासाठी विज्ञानाचा थोडक्यात इतिहास सांगतात. आपण हा 'विज्ञानबोध' का काढतो ह्याची मीमांसा माटे प्रस्तावनेत करतात. मूळ विज्ञानबोधापेक्षा ही 'प्रस्तावना' त्यातील विचारामुळे अधिक मोलाची वाटते. आजही विज्ञानावर अनेक पुस्तके लिहिली जातात, दरवर्षी परिषदा भरतात, परिसंवाद होतात पण माटयांनी 'प्रस्तावनेत' पुरस्कृत केलेला विज्ञाननिष्ठेचा दृष्टिकोन कितपत पचवला गेला आहे हा एक संशोधनाचा विषय ठरेल.

कै. हरिभाऊ मोटे हे एक दुर्लभ योजक प्रकाशक होते. हरिभाऊ मोटे यांनी प्रकाशित केलेले 'विश्रब्ध शारदेचे' दोन खंड वाचले की हे लक्षात येते. अनेकविध क्षेत्रातील वेगवेगळ्या काळातील लहानमोठ्या माणसांनी लिहिलेली पत्रे गोळा करणे, त्यासाठी भरपूर पायपीट करणे, मनधरणी करणे व प्रसंगी पैसाही वेचणे ही हरिभाऊ मोटयांची हौस किंवा त्यांचा छंद! पण तेवढयावर मोटे थांबले नाहीत. ह्या पत्रांचे वर्गीकरण, समीकरण व संपादन करण्यासाठी दि. के. बेडेकर, श. वि. गोखले, वसंत शांताराम देसाई आणि पु. ल. देशपांडे ह्यांना त्यांनी एकत्र आणले व त्यामधून हे दोन खंड प्रसिद्ध झाले. हरिभाऊ मोटे या उद्योगाकडे वळले याचे एकच कारण संभवते. महाराष्ट्र काय किंवा एकंदर आपला भारत देश काय ऐतिहासिक दृष्टी, चौकसपणा, पाहिलेल्या गोष्टींसंबंधी टिपून ठेवण्याची प्रवृत्ती ही फार बेताची, जवळजवळ नाही म्हटले तरी चालेल. इतिहासात झालेल्या व्यक्तींबद्दल आख्यायिका व भाकडकथा आणि चमत्कार भरपूर ऐकायला मिळतील पण इतिहासाचार्य राजवाडे ज्याला एक अस्सल चिटोरे किंवा पत्र म्हणतात, ते सहसा सापडणार नाही. महानुभाव पंथातील लोकांनी आपल्या गुरूबद्दल— चक्रधराबद्दल भरपूर लिहून ठेवले आहे. पण त्याचकाळी झालेल्या वारकरी संप्रदायातील ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई, पुढे एकनाथ आणि तुकाराम ह्यांच्याबद्दल पत्रांचा, टिपणाचा पुरावा

जवळजवळ मुळीच नाही. त्यामुळे थोर ऐतिहासिक स्त्रीपुरुषांची हस्ताक्षरे मिळणे महाकर्मकठीण ! कोणी चुकून पत्रे लिहून ठेवली तर त्यांचे ऐतिहासिक महत्त्व न कळल्याने त्यांचा रद्दी म्हणून अवमान करून नाश कसा करावा, त्यात सरदार, इनामदार, पाटील, कुलकर्णी, देशपांडे सगळे पारंगत ! इंग्रजांचे राज्य आले तरी हाच कित्ता चालू. त्यामुळे माहितीने भरलेली व मने मोकळी करणारी पत्रे लिहिणारा एखादा अपवाद म्हणूनच सापडायचा. बरे ज्याला हे पत्र मिळाले असेल तो त्याचे व लिहिणाऱ्या व्यक्तीचे महत्त्व न ओळखता ते फाडून टाकायचा ! अशा परिस्थितीत हरिभाऊ मोटचांनी दोन खंड भरतील इतकी पत्रे मिळवली, अधिकारी व्यक्तींना हाताशी धरून त्यांचे संपादन केले, प्रस्तावना लिहून घेतल्या हा चमत्कारच म्हटला पाहिजे. ' विश्रब्ध शारदेच्या ' दुसऱ्या खंडात महाराष्ट्रातील ' नाटच व संगीत ' ह्यावरची पत्रे संग्रहीत केली आहेत. त्यावरची टिपणे व परिचय हा वसंत शांताराम देसाई, रामदास भटकळ व श. वि. गोखले ह्यांनी करून दिला आहे. गोखले ह्यांचा विषय शास्त्र पण संगीताची आवड, व्यासंग व जाण त्यामुळे अगोदर संगीतावरचे फारसे लेखन केले नसतानाही मोटचांनी गोखल्यांच्यावर ही जबाबदारी टाकली. प्रस्तावना लिहिण्यासाठी मात्र ज्याचा नाटक, संगीत व साहित्याचा उत्तम अभ्यास आहे, नव्हे त्यात विपुल, वेधक व विचारप्रवर्तक लेखन केले आहे त्या पु. ल. देशपांडे ह्यांना पाचारण केले.

नाटच असो, संगीत असो, त्याचा आस्वाद घेणे, रसग्रहण करणे, हे करताना बेभान होणे हे महत्त्वाचे असते. शंकरराव मुजुमदारांच्या शाकुंतल नाटकाच्या प्रयोगासंबंधी लिहिलेल्या पत्रातील ' मजा आला ! ' हे उद्गार देऊन, पु. ल. देशपांडे प्रस्तावनेत सांगतात, ' अशा अनौपचारिक पत्रांमुळे एखाद्या प्रसिद्ध पुरुषाची जी सार्वजनिक प्रतिमा तयार झालेली असते त्यात अनोळखी अशी वेगळी भर पडते.' आपल्या भावनांचे प्रदर्शन न करणारे गोविंदराव टेंबे एका खाजगी पत्रात अलादियाखाँसाहेबांच्या स्मारकासंबंधी लिहिताना कसे हळुवार होतात हे प्रस्तावनाकार दाखवितात. आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसाला असामान्य माणसांच्या ह्या पत्रांमधून नकळत प्रकट होणाऱ्या सामान्य गोष्टी आकृष्ट करतात. कारण त्यामुळे एक जवळीक निर्माण होते. हा माणूस कितीही मोठा असला तरी आपल्यासारखाच आहे ही भावनाच फार सुखावह असते. टिळकांच्या ज्वलंत देशभक्तीपेक्षा, विद्वत्तेपेक्षा, व त्यागापेक्षा त्यांचे चहा पिणे व सुपारी खाणे हे तसे क्षुल्लक असून महत्त्वाचे वाटते. नट आणि संगीतकार दोघेही सहसा पत्र न लिहिणारेच ! पण एखादेवेळी महत्त्वाचे लिहून जातात. ते पुढे आपल्याला चटका लावते. पण त्यावेळी त्यांना हे कळणे शक्य नसते. सुंदराबाईचे बालगंधर्वासंबंधीचे व मोगुबाई कुर्डीकरांचे केसरबाईविषयीचे अशी दोन पत्रे ह्याची उत्तम उदाहरणे आहेत. सुंदराबाईच्या पत्रात बालगंधर्वासंबंधीचा अपार जिव्हाळा प्रगट होतो आणि मोगुबाईच्या पत्रात

अल्लादियाखाँसाहेबांची परंपरा केसरबाई चालवत आहेत पण त्यांची परंपरा पुढे कोण चालविणार ? म्हणून लिहिले आहे. म्हणजे केसरबाईंनी आपल्यामागे शिष्य किंवा शिष्या तयार केली नाही हे सूचित केले आहे. पु. ल. देशपांड्यांनी एकंदर मराठीतील पत्रलेखनाचा आणि त्यानंतर नाट्य व संगीत ह्यातील उपलब्ध झालेल्या पत्रांचा जो आढावा घेतला आहे तो केवळ 'मजा आला' ह्या स्वरूपाचा नसून त्यात त्यांचा अभ्यास व विवेचनक्षमता याचा विपुल प्रत्यय येतो.

प्रा. नरहर कुरुंदकर आपल्या प्रस्तावनेचा शेवट करताना लिहितात :

'ही प्रस्तावना विद्वानांच्यासाठी नाही, सर्वसामान्य जिज्ञासू रसिकांना पार्श्वभूमी कळावी यासाठी आहे. एक विचार असा येतो की हे विवेचन व्यर्थ आहे. भाण वाचून ज्यांना कळणार नाही त्यांना प्रस्तावना वाचून कळेल हे गृहीतच चुकले आहे.' प्रस्तावना ही सर्वसामान्य वाचकांसाठी आहे हे तर खरेच ! याचा अर्थ कुरुंदकरांना महत्त्वाचे मुद्दे समजावून सांगता येतात. विद्वत्ता प्रदर्शित करण्यासाठी ते मुद्दाम दुर्बोध लिहीत नाहीत, पण त्यांच्या प्रस्तावनेतील माहिती वाचली की, हे केवळ बहुश्रुतांचे लिखाण नाही, त्याच्यामागे व्यासंग आणि विद्वत्ता आहे हे लक्षात येते. भाण ह्या संस्कृत एकपात्री वाङमय प्रकाराचा त्यांनी जो आढावा घेतला आहे, त्यावरून कुरुंदकरांच्या चौफेर वाचनाची व विचारांची कल्पना येते. त्याबरोबरच वेश्यांसंबंधी संस्कृतमध्ये जे इतर ग्रंथ लिहिले गेले त्याचाही उल्लेख करून प्रस्तावनाकार परामर्ष घेतात आणि प्रत्येकाची वैशिष्ट्ये सांगतात.

दुसऱ्या शतकापासून मिळणारे 'भाण' वाङ्मयातील वेश्या जीवनाचे, विटांचे, त्या काळच्या राजांचे, सरदारांचे, श्रीमंत व्यापाऱ्यांचे व त्यांच्या नैतिक अवगुणांचे चित्रण करतात. जेव्हा समाजाचा पराक्रम, उद्यमशीलता, साधी राहणी व उच्च विचारसरणी संपते आणि एकंदर समाज दुबळा, व्यसनासक्त होतो तेव्हा काय घडते याचे चित्र अशा वाङ्मयात येते. भाणांचे वाङ्मयीन महत्त्व बेताचे पण सामाजिक व ऐतिहासिक महत्त्व अधिक आहे. तरीसुद्धा प्रा. कुरुंदकर म्हणतात त्याप्रमाणे वेश्याजीवनाचे वास्तव आणि भीषण चित्रण त्यात आले आहेच ! केवळ सुखासीनता आलेली नाही. वेश्याजीवनातील काटेकोर व्यवहार आणि हिशेबही त्यात येतो.

प्रा. कुरुंदकर भाणांचा विचार करताना नाट्यछटाकार दिवाकरांचा उल्लेख करतात. ब्राऊनिंगच्या 'मोनोलॉग्ज'–स्वगत भाषणांऐवजी दिवाकरांच्या वाचनात भाण आले असते तर त्यांच्या नाट्यछटांचे स्वरूप बदलले असते असे कुरुंदकरांना वाटते. नाट्यछटा फक्त दिवाकरांनी लिहिल्या. त्याचे अनुकरण करणारे अनेक लहान-मोठे लेखक फसले आणि आता तर हा वाङ्मयप्रकार पार लोपला आहे. कुरुंदकरांच्या मताशी मी सहमत नाही. भाणाप्रमाणेच नाट्यछटेत एकच पात्र बोलते तसेच दुसऱ्या व्यक्तींचे फक्त उल्लेख असतात हे खरे; पण नाट्यछटेत

नाट्याची अगदी छोटी छटा असते. अनेकदा त्यात विरोधाभासातून नाट्य निर्माण होते. नाट्यछटाकार दिवाकरांची प्रतिभा ही जातिवंत खरी, पण आवाका मर्यादित होता. प्रा. वासुदेवराव केळकर यांच्या सहवासामुळे त्यांचा शेक्सपियरचा अभ्यास गाढा होता, पण त्यांची प्रतिमा मात्र नाट्याच्या छटाच आत्मसात करू शकते. सर्व व्यक्तिमत्त्व सामावून घेते असे नाही. दिवाकरांच्या इतर नाटिका 'कारकून', 'अहो, मला वाचता येते' वाचल्या तरी दिवाकरांच्या प्रतिभेची जात व मर्यादा कळते. यामुळे कुरुंदकरांच्याइतका मी आशावादी नाही. भाण दिवाकरांनी वाचले असते तर नाट्यछटांचे रूप बदलले असते, असे मानता येत नाही.

कुरुंदकरांनी विट, राजाच्या, सरदाराच्या किंवा श्रीमंत व्यापाऱ्याच्या पदरी असणाऱ्या विदूषक ह्यांची कार्यपद्धती व स्वरूप ह्याबद्दल फार चांगले विवेचन केले आहे. आनंद साधले ह्यांनी कुरुंदकरांना प्रस्तावना लिहिण्यास सांगितले यामुळे भाणांच्या अनुषंगाने अनेक गोष्टी आपल्याला नव्याने कळतात.

नाटक, कथा, कादंबरी, कविता व निबंधाप्रमाणे प्रस्तावना हाही मराठी वाङ्मयातील संख्येने समृद्ध व गुणांनी संपन्न असा वाङ्मयप्रकार आहे. नाटक व व्याकरण जसे प्रयोगशरण असते त्याप्रमाणे प्रस्तावना ही पुस्तकशरण आहे. निबंध स्वतंत्रपणे लिहिता येतो. प्रस्तावनेला पुस्तकाचा आधार किंवा कारण लागते. प्रस्तावना ही फार पूर्वीपासून लिहिली जात होती असे दिसते.

प्रस्तावना ही फार प्राचीन आहे याचा एक पुरावा राधामाधवविलासचंपूत व त्याला असणाऱ्या राजवाड्यांच्या प्रस्तावनेत मिळतो.

राजवाडे प्रस्तावनेत लिहितात :

"ग्रंथारंभी शेषपुत्ररंग ह्या नावाच्या आलंकारिकाने एक लहानसा उपोद्घात वा प्रस्तावना लिहिली आहे. 'अलंकारशास्त्र पढून कवित्वशक्ती येत नसून मूळचीच प्रतिभा कवीच्या ठायी ईश्वरानुग्रहप्राप्त असावी लागते' असे विवेचन केले आहे." म्हणजे सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात शहाजीमहाराजांच्याकाळी प्रस्तावना व तीही एका काव्यग्रंथाला होती. ज्ञानदेव, भास्करभट्ट, नरेन्द्र इत्यादी १३ व्या शतकातील कवी; एकनाथ, मुक्तेश्वर, दासोपंत हे त्यापुढील कवी किंवा फादर स्टीफन्स हा ख्रिस्ती कवी आपण मराठीमध्ये अमुक प्रकारचे लेखन का करतो हा ग्रंथारंभ सांगताना जी भूमिका मांडतात, मराठी भाषेची केवळ तरफदारी नव्हे तर उत्साहाने व हिरीरीने पुरस्कार करतात, काही पूर्वसूरींचे ऋण मान्य करतात. हे सर्व वाचताना प्रस्तावना हा शब्द वापरला नाही तरी प्रस्तावनेची कित्येक वैशिष्ट्ये त्यात दिसतात.

कोणत्याही वाङ्मयप्रकाराचे एकच एक ठराविक रूप टिकत नाही. कारण प्रतिभावंत लेखक जुना साचा मोडतो व नवा निर्माण करतो. प्रस्तावनाही त्याला

अपवाद नाही. पण तरीही प्रस्तावनेची काही रचनात्मक अंगे सांगता येतील. प्रस्तावनेचा प्रारंभ परिचयाने होतो. राजवाड्यांचीच 'राधामाधवविलासचंपू'ची प्रस्तावना घेऊ. प्रारंभी राजवाडे– कवी जयराम पिंड्ये कोण, कुठला, बंगळूरला शहाजी महाराजांकडे का गेला, तिथे राजांची ओळख कशी करून घेतली ह्याचा परिचय करून देतात. दरबारचा, त्यातील व्यक्तींचा परिचय करून देतात. डॉ. मालशे 'झेंडूची फुले' संपादित करताना व प्रस्तावना लिहिताना पूर्वकालीन विडंबन काव्यांचा इतिहास वा परिचय करून देतात. एखाद्या व्यक्तीची दुसऱ्या अनोळखी माणसाशी जशी ओळख करून देण्यात येते, त्याप्रमाणेच पुस्तकातील विषय, आशय, लेखकाचा परिचय, त्याची परंपरा, त्याच्या लिहिण्याचे प्रयोजन हे सर्व प्रस्तावनाकार प्रारंभी सांगतो.

असा परिचय करून देताना, मागील काही गोष्टींचा उहापोह विशिष्ट प्रकारच्या प्रस्तावनांतून अटळ असतो. प्रस्तावनाकार प्रमाण देतो, उदाहरणें देतो. त्याशिवाय त्याचे विवेचन पटणे शक्य नसते. विशेषत: राजवाडे, खरेशास्त्री किंवा शेजवलकर जेव्हा ऐतिहासिक प्रस्तावना लिहितात त्यावेळी नुसते मत मांडावयाचे नसते तर दुसऱ्याचे प्रस्थापित मत खोडून काढायचे असते. नवा सिद्धांत हा खरा असला तरी त्याला पुरावा हा द्यावा लागतोच; तर्कालि: पटतील अशी विधाने करावी लागतात. खरेशास्त्र्यांच्या प्रस्तावनेतील लालित्याने, भाषेच्या डौलाने व त्यांच्या व्यक्तिमत्वाने आपण स्तिमित होतो. पण ह्या इतिहासडिंडिमाच्या आवाजाच्यामागे तर्कशास्त्र व कठोर आत्मपरीक्षण करणारी विचारसरणी आहे ह्याचा वाचकाला केव्हाही विसर पडत नाही. 'जशी शस्त्रे तशी संस्कृती' हा अभिनव पण तितकाच त्रिकालाबाधित सिद्धांत मांडताना राजवाड्यांच्या लोकविलक्षण प्रतिभेचे दर्शन घडते. थेट अश्मयुगापासून ते आजपर्यंतचे सर्व पुरावे राजवाडे पुढे मांडतात व आपला विचार कसा खरा आहे हे पटवितात.

विधानातील अचूकता साधण्याची एक शिस्त असते. ही शिस्त तर्कशुद्ध तशीच मानसिकही असते. त्यामधूनच लेखकाचे व्यक्तिमत्वही लेखनात परावर्तित झालेले दिसते, आणि त्यामधून शैलीचा जन्म होतो. जसा लेखक तशी त्याची शैली, असे आपण म्हणतो ते ह्या अर्थाने ! ह्या गाजलेल्या प्रस्तावनांत शैलीचे कित्येक प्रकार सापडतील. कोणताही लेखक हा निर्दोष वा परिपूर्ण नसतो. पण त्याच्या साहित्यात काही गुणांचा अत्युत्कट उत्कर्ष झालेला असतो हे नि:संशय. काही ठिकाणी एकांगीपणा, अतिआग्रहीपणा हेही दोष आढळतात. पण मुळात आवाकाच लहान असण्यापेक्षा, महान गुण व त्याबरोबर येणारे महान दोष स्वीकारार्ह वाटतात. राजवाडे व शेजवलकर ह्यांना आपण पत्करतो ते दोषांसकट, त्यांच्या काही दुर्मिळ गुणांमुळे ! तात्यासाहेब केळकर ह्यांच्या लेखनात बहुश्रुतता, सुसंस्कृतपणा, समतोल किंवा औचित्य हे गुण हात जोडून उभे असतात. पण कवी नागेश ज्याला 'आंगचे वारे'

म्हणतो, ते केळकरांच्यात नाही. शि. ल. करंदीकरांच्या सावरकर चरित्राला केळकरांनी लिहिलेली प्रस्तावना चांगली आहे. त्यात सावरकरांच्या ठायी कवी, क्रांतिकारक, व देशभक्त म्हणून असणारे अनेक गुण दाखविले आहेत. पण या लेखनात प्रतिभेचा दिव्य स्पर्श नाही. कोणतेही प्रमेय मांडायला तर्कशुद्ध बुद्धी लागते, त्याप्रमाणेच मौलिक विचार सुचायला व मांडायला काहीतरी 'जगावेगळे' लागते. मग त्या लेखकात अनेक दोषही असू शकतील. शेवटी अलौकिक व लौकिक ह्यांचे मूल्यमापन करताना 'निर्दोष' म्हणून चांगले असे म्हणता येत नाही. सावरकरांची मॅझिनीची प्रस्तावना आज थोडी जास्त भावनाविवश वाटेल, भाषेचा फुलोरा कदाचित थोडा कालबाह्य वाटेल पण प्रस्तावनेत सावरकरांनी प्रकट केलेल्या उत्कट भावना व ओजस्वी विचार आजही नित्यनूतन वाटतात, हा लेखक लाखातील एखादा आहे, हे पटते.

ललितलेखन करणाऱ्या लेखकाप्रमाणेच प्रस्तावनाकारालाही तपशील बघावा लागतो. त्यातून सूचक तपशीलाची निवड (Selection) ही प्रत्येक चांगल्या लेखनात असतेच ! काही विचार, काही भावना ह्या प्रासंगिक असतात. ह्या सर्व प्रासंगिकपणाच्या गलबल्यातून शाश्वत शोधणे हेच प्रतिभेचे कार्य आहे. ऐतिहासिक, वाङ्मयीन, राजकीय किंवा सांस्कृतिक विवेचन करताना तात्कालिक वादळे व वारे कोणते हे हेरणे शाश्वत प्रवृत्तीचा किंवा कालतत्त्वांचा (Time spirit) वेध घेणे या गोष्टी प्रस्तावनाकाराच्या लेखनात असतील तर त्या त्या प्रस्तावनांकडे वाचक पुनःपुनः वळल्याशिवाय रहात नाही. अशा प्रस्तावनांतील शाश्वततेचा अंश वाचकाला नेहमी जाणवतो. अशा काही प्रस्तावनांचे हे पहिलेच संग्रहीत रूप आहे हे लक्षात घेतले की या पुस्तकाचे वैशिष्टच ध्यानात येईल.

**—प्रा. डॉ. मनोहर माधव आळतेकर**

प्रस्तावनांच्या निवडीबद्दल सांगायचे तर निवड फारशी कठीण नव्हती. ज्या प्रस्तावनांचे अनन्यसाधारणत्व अनेक वर्षे प्रस्थापित झालेलेच आहे, त्या सर्वांचा यात समावेश होणे क्रमप्राप्त होते. परंतु सर्वच निवडलेल्या प्रस्तावनांचा समावेश पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे शक्य नसल्याने, कोणत्या प्रस्तावना गाळाव्या एवढाच विचार नाइलाजाने करावा लागला.

एक–दोन प्रस्तावनांचा आपवाद करून इतर सर्वच विस्तृत प्रस्तावनांचे संपादन करणे, अगत्याचे झाले. हे करीत असताना प्रस्तावनाकाराने प्रतिपादन केलेल्या आशयाला कोठेही धक्का लागणार नाही, अशी शक्य तेवढी काळजी घेतलेली आहे.

जो भाग कालबाह्य झाला आहे किंवा जो विषयाशी संबंधीत नसून, विषयांतर करून आलेला आहे, असा भागच कमी केला आहे. जास्तीत जास्त 'प्रस्तावनां'चा परामर्ष वाचकांना घेता यावा, यासाठी असे करणे भाग होते.

**—वि. ग. कानिटकर**

[stamp] मराठी ग्रंथ संग्रहालय ...

# राधामाधवविलासचंपू

## ( जयराम पिंड्येकृत )

3330
२५९२२२
निबंध ३०७०८८

प्रस्तावना

## विश्वनाथ काशिनाथ राजवाडे

[ कोणताही हक्क राखून ठेविला नाही ]

प्रकाशन १९२२ ]    चित्रशाळा छापखाना    [ प्रस्तावना पृष्ठे २०१

इतिहासाचार्य राजवाडे (१२-७-१८६३ ते ३१-१२-१९२६) हा महाराष्ट्राच्या विचारक्षेत्रात एक प्रथमश्रेणीतला कर्ता पुरुष होऊन गेला. ‘ मरावे परि कीर्तिरूपे उरावे ’ हे समर्थवचन या समर्थभक्ताने अक्षरशः सार्थ केले. प्रतिभा, बुद्धिमत्ता, चौफेर पांडित्य, राष्ट्रहितैषी प्रखर ध्येयवाद, स्वाभिमान, स्वार्थत्याग, लोकविलक्षण आचरण अशा अनेक गुणांच्या रसायनाने त्यांची मूर्ती घडविलेली होती. त्यांनी इतिहास-संशोधनाचा केवळ पायाच रचिला असे नव्हे, तर इतिहासमीमांसक आणि समाजचिंतक म्हणूनही आपली मुद्रा आधुनिक महाराष्ट्रावर उमटविली आहे. ‘ **राधामाधवविलासचंपू** ’ या ग्रंथाची त्यांची केवळ निम्मी प्रस्तावना वाचली तरी शिवपूर्वकालीन महाराष्ट्राच्या सर्वांगीण इतिहासासंबंधी आपणास कितीतरी नवी माहिती गवसते आणि शिव-चरित्राच्या अभ्यासाची खरीखुरी दिशा कळते.

१. प्रस्तुत ग्रंथ चिंचवड येथे विष्णुपंत रबडे यांच्या घरी तिसऱ्या मजल्यावरील पोथ्यांच्या व कागदपत्रांच्या अस्ताव्यस्त गळाठ्यात कुजत पडलेला आढळला. सहा महिन्यांपूर्वी रबडयांच्या घरी गेलो असता, शेकडो संस्कृत व मराठी पोथ्या तिसऱ्या मजल्यावरील कौलारू छपराखाली भिजून भाकरीप्रमाणे घट्ट झालेल्या व उंदरांच्या लेंडयांनी भरलेल्या पाहून, त्यातून पाचपन्नास लहान-मोठे ग्रंथ निवडून व झाडूनपुसून एकीकडे काढले, त्यात ही राधामाधवविलासचंपूची पोथी होती. मूलत: पोथीची एकंदर पाने ५६ होती. पैकी ७ वे पान गहाळ होऊन, सध्या ५५ पाने शाबूत आहेत. पहिल्या, दुसऱ्या व अठ्ठाविसाव्या पानावर छिद्रे पडून काही अक्षरे फाटून गेली आहेत. बाकी ग्रंथ इथून तेथून सुरक्षिताक्षर आहे. पोथीचा कागद जुना जुन्नरी असून तिची लांबी ९½ इंच व रुंदी ४ इंच भरेल. दर पृष्ठावर नऊपासून बारापर्यंत ओळी असून प्रत्येक ओळीत चाळीसपासून पंचेचाळीसपर्यंत अक्षरे आहेत. अक्षर अडीचशे वर्षांचे मराठी वळणाचे बाळबोध आहे. पोथी सबंध एका हाताने, एका शाईने व निदान तीन लहानमोठ्या टोकांच्या लेखण्यांनी लिहिलेली आहे. फक्त शेवटल्या पानांवरील समाप्तीच्या पाच श्रियांनंतर 'इदं पुस्तकं लक्ष्मणसूनोर्मनोहरारन्यपौराणिकस्य' ह्या वाक्याची शाई, वळण व टाक अशी तिन्ही निराळी आहेत. मनोहर लक्ष्मण पुराणिक याने हे वाक्य स्वत: लिहिलेले आहे व ते शेवटल्या पानाच्या खाली समासावर कोठेतरी एका बाजूस लिहिले आहे. पोथी मूळ लिहिली गेली त्याचवेळी हे वाक्य लिहिले गेले असते तर शेवटल्या ओळीनंतर ओळीला जोडून ओळीच्या संचाला विद्रुपता जेणे करून न येईल अशा तऱ्हेने सहज लिहिले गेले असते. परंतु, ज्या अर्थी संचाला विद्रुपता आली आहे व ज्या अर्थी हे स्वामित्व दर्शविणारे वाक्य ओळ सोडून कोठें तरी तिरके लिहिले आहे, त्या अर्थी उघडच होते की, मनोहर पुराणिकाच्या ताब्यात ही पोथी कालांतराने जेव्हा आली तेव्हा त्याने हे वाक्य आपल्या हाताने लिहून ठेविले. दुसऱ्या कोणीतरी लिहिलेली मूळ पोथी कोणत्या तरी कारणाने मनोहर पुराणिकाच्या ताब्यात आली, हे दर्शविणारा दुसरा एक पुरावा आहे. पोथीच्या पहिल्या पानाला जेथे छिद्र पडून अक्षरे गहाळ झाली आहेत, तेथे मनोहर पुराणिकाने सूडाच्या चौकोनी चकतीचे पानाच्या पाठीमागून काळजीपूर्वक ठिगळ चिकटविले आहे व पोथी जास्त न फाटेल अशी तरतूद केली आहे. अर्थात मनोहर पुराणिकाच्या हातात ही पोथी जेव्हा आली तेव्हाच ती जीर्ण होऊन छिद्रे पडलेली अशी आली हे स्पष्ट आहे. मनोहर पुराणिक हा साक्षेपी गृहस्थ होता, सबब हाती आलेल्या जीर्ण पोथीची डागडुजी करून व तीवर आपली दखल घालून त्याने ती आपल्या संग्रहास ठेवून दिली. कालांतराने पोथी पुराणिकाच्या घरून रबडयांच्या घरात जाऊन सध्या ती प्रस्तुत संपादकांच्या आश्रयास प्रकाशनार्थ आली. मनोहर पुराणिकाच्या दखलेतील अक्षराचे वळण त्याने स्वत: लिहिलेल्या इतर ग्रंथांतील वळणांशी जुळते.

२. मनोहर लक्ष्मण पुराणिक हा गृहस्थ मूळचा भीमेच्या काठच्या खेड ह्या गावचा रहाणारा. खेडाहून चिचवडास पहिले बाजीराव बल्लाळ यांच्या कारकीर्दीच्या सुमारास ह्याने स्थलांतर केले. हा यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण बराच व्युत्पन्न असून ह्याला प्राकृत व संस्कृत कविता करण्याचा चांगलाच नाद असे. रबडयांच्या घरात जो ग्रंथसमूह मला सापडला त्यांपैकी बहुतेक सर्व पोथ्या मनोहर पुराणिकाच्या आहेत. ह्या ग्रंथसमूहात वेद, इतिहास, पुराण, व्याकरण, न्याय, वेदांत, काव्य, नीती, इत्यादीविषयक संस्कृत ग्रंथ असून, ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, वामन, कृष्ण-याज्ञवल्की, वगैरे प्राकृत ग्रंथ आहेत. शिवाय, ह्याने स्वतः रचिलेली काही प्राकृत–अभंग, श्लोक, वगैरे–मराठी ग्रंथरचना आहे. हा आपल्याला मनकवी, मनोहर कवी असे अभंगांच्या किंवा श्लोकप्रबंधांच्या समाप्तीस वारंवार म्हणतो. कित्येक स्थली याने आपले गाव, नाव, माता–पितरे, गुरू, शक, महिना, मित्ती इत्यादी त्रोटक तपशीलही दिला आहे. त्यावरून दिसते की, हा व्युत्पन्न कवी बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव या दोन पेशव्यांच्या कारकीर्दीत चिंचावटग्रामी वास्तव्य करून होता. ह्याच्या संग्रहास असलेली राधामाधवविलासचंपूची प्रस्तुत पोथी, अर्थात, शक १६५० च्या पूर्वीची आहे. किती पूर्वीची असावी ह्या बाबीचा अंदाज पोथीच्या जीर्णत्वावरून व अक्षराच्या वळणावरून अदमासाने ताडता येतो. इ, क, ज, य, भ, वगैरे अक्षरांची मोडणी शिवकालीन दिसते. सबब, पोथी बहुशः शक १६०० च्या सुमाराची असावी. मूळ पोथीतील अक्षरे न लागल्यामुळे कोठे कोठे जागा रिकामी सोडली आहे व कोठे कोठे श्लोकांचे सबंद चरणच्या चरण खाल्ले आहेत किंवा अर्थ न लागल्यामुळे अंदाजाने काहीतरी अक्षरे एका पुढे एक लिहून वेळ मारून नेलेली आहे. त्यावरून असेही म्हणता येते की, ही शिवकालीन पोथी तीहून जुन्या अशा एका पोथीवरून नकललेली आहे. सगळ्यात अत्यंत जुनाट पहिली पोथी शहाजी-राजे भोसले यांची पहिली राजधानी जे बंगळूर शहर तेथे लिहिली गेली व तीवरून किंवा तिच्या प्रतीच्या प्रतीवरून सध्याची ही पोथी शिवकाली नकलली गेली. अर्थात ह्या चंपूच्या आणिक प्रती म्हैसूर, मद्रास व तंजावर या प्रांतात असण्याचा संभव आहे. त्या धुंडाळून मिळविणे ही बहुत कालांतराची बाब होणार. सबब ह्या एकाच पोथीवरून, प्रस्तुत प्रकाशन इतिहासज्ञानमात्रलब्धयर्थ आरंभिले आहे.

३. शहाजीराजे भोसले यांची मूळ राजधानी जे बंगळूर शहर तेथे ह्या राधा-माधवविलासचंपू ग्रंथाची मूळ पहिली प्रत लिहिली गेली या विधानाचा अर्थ असा होतो की, हा राधामाधवविलासचंपू ग्रंथ प्रथम बंगळूरप्रांती उदयास आला. स्वतः ग्रंथकारच म्हणतो की, शहाजी महाराजांनी हे काव्य श्रवण केले.

॥ द्वादशभाषाललित शाहनरेश्वराने आकर्णिले ॥

कोठे श्रवण केले; तर बंगळूरप्रांती श्रवण केले. इतर तैलंगणादिप्रांतात कशा-वरून श्रवण केले नाही ? तर कवी स्वतः दोन तीन ठिकाणी महाराष्ट्रदेशाहून

शहाजीमहाराजांसन्निध आल्याचा उल्लेख करतो.

॥ महाराष्ट्रदेशादागत्य प्राह ॥

॥ महाराष्ट्रदेशादागतो जयरामो नाम कवीश्वरः ॥

महाराष्ट्रदेशाहून शहाजीमहाराजासन्निध येणे म्हणजे बंगळूरप्रांती येणे हे सांगावयाला नको. कारण कर्नाटकात बंगळूरप्रांताखेरीज इतरत्र शाहाजी महाराजांचे वास्तव्य शेवटची पंधरा वर्षे नव्हते. ह्या विधानावरून हेही उघड झाले की, प्रस्तुत काव्य शहाजी महाराजांच्या शेवटल्या पंधरा वर्षांच्या अवधीत केव्हातरी निर्माण झाले. नक्की केव्हा निर्माण झाले तेही स्थूलमानाने अनुमानण्यास प्रस्तुत ग्रंथात पुरावा आहे. काव्यात खालील पद्य आले आहे.

जगदिश विरंचिकु पुछत है कहो शिष्टि रची रखे कोन कहां ।
कर जेरि कही जयराम विरंच्ये तिरिलोक जहां के तहां ॥
ससि वो रवि पूरब पश्चिम लो तुम सोय रहो सिरसिंधु महा ॥
अरु उत्तर दछन रछन को इत साहजु है उत साहिजहां ॥ १ ॥

परमेश्वर ब्रह्मदेवाला विचारतात की, तू सृष्टी रचिलीस तीत राखण कोण कोठे ठेविलेस ते सांग. तेव्हा ब्रह्मदेव सांगतो की, पूर्वेचा रक्षक रवी व पश्चिमेचा रक्षक चंद्र केला आहे; तसेच, उत्तर दिशेचा लोकपाल शहाजहान पातशाहा केला आहे व दक्षिणदेशचा रक्षक शाहजीमहाराज केले आहेत. पद्यातील शहाजहानाच्या उल्लेखावरून उघड आहे की, शहाजहानची राज्यच्युती होण्यापूर्वी म्हणजे शक १५८० पूर्वी ह्या काव्याची रचना झाली असली पाहिजे. तसेच ह्या पद्यात शहाजीमहाराजांना दक्षिणदेशाचा लोकपाल म्हणून गौरविले आहे. हा गौरव सार्थ व्हावयाचा म्हणजे तो शक १५७५ नंतर विजापुराहून शहाजीची सुटका होऊन कर्नाटकात त्याचा अंमल ठाकठीक झाल्यानंतरच्या काळात सार्थ होणे शक्य आहे. सबब, निश्चयाने म्हणता येते की, प्रस्तुत चंपूकाव्याची रचना शक १५७५ च्या नंतर व शक १५८० च्या पूर्वी जी तीन चार वर्षे गेली त्या अवधीत झाली आहे. कवीची व शहाजीमहाराजांची प्रथम भेट झाल्यापासून दोघांच्या ज्या अनेक बैठकी झाल्या व इतर दरबाऱ्यांबरोबर ज्या अनेक मुलाखती झाल्या त्या बैठकीत व मुलाखतीत जे जे उद्‌गार प्रस्तुत कवीच्या व इतर कवींच्या मुखातून निघाले त्यांचा संग्रह एकत्र करून कवीने हे काव्य गुंफिलेले आहे. हे काव्य गुंफून शक १५७५ त सुरू होऊन शक १५८० च्या सुमारास संपूर्ण झाले असावे असे विधान, विशेष शंका न बाळगिता करता येण्यासारखें दिसते.

४. काव्याच्या कर्त्याचे नाव जयराम, आडनाव पिंडये, गोत्र जामदग्निवत्स. प्रस्तुत चंपूंत कवी स्वतः ही माहिती सांगतो.

॥ जामदग्नि वत्सगोत्रसंभवः पिंडचोपनामको जयरामो नाम कविः ॥

सप्तशृंगीच्या समोरील मार्कंडयाच्या डोंगराखाली ह्या कवीचे गाव होते. गावाचे नाव कवीने दिले नाही. कवीच्या आईचे नाव गंगावा व बापाचे नाव गंभीरराव. मार्कंडेयपर्वतापासून अहिवंतपर्वतापर्यंत जे सात किल्ले आहेत त्यांचे अध्यक्षत्व म्हणजे किल्लेदारी या गंभीररावाकडे होती. अहमदनगरच्या बहिरीनिजामशाहाच्या राज्याचे पुनरुज्जीवन शहाजी आपल्या पूर्ववयात करीत असता ह्या गंभीररावाशी त्याचा सहजच परिचय झालेला होता.

।। मार्कंडेयाहिंवतादिसप्तपर्वताध्यक्षतां अविरतं वितन्यमानो
गंभरराय इत्यभिधाप्रसिद्धः स्वामिभि र्नयनपथं नीतः भविष्यति ।।

।। चंडीपर्वतपुरतो मार्कंडेयोस्ति पर्वतो विपुलः ।
तत्रोद्भवेन जयरामेण ।।

नाशिकप्रांतातील हे पिंड्यांचे घराणे भोसल्यांच्या ऐकून माहितीचे व परिचयाचे असल्यामुळे शहाजीराजांनी कर्नाटकात बंगळूरप्रांती राज्यस्थापना केल्यावर आश्रयार्थ हा मार्कंडेयपर्वतनिवासी जयरामकवी त्या प्रांती गेला. कर्नाटकातून भाट लोक रजपुतस्थानात जाण्यास परतत, त्यांच्या मुखांतून शहाजीचे औदार्य ऐकून जयरामाच्या हृदयात शहाजीराजांच्या दर्शनाची लालसा उत्पन्न झाली. नाना देशचे शेकडो पंडित व कवी शहाजीच्या दर्शनास जातात व परिपूर्णमनोरथ होऊन स्वदेशी सुखाने आयुःक्रमण करतात अशी कीर्ती सर्वत्र भरतखंडभर महाराजांची पसरली होती. त्या कीर्तीची प्रतीती पाहण्याची उत्कंठा ह्या सरस्वतीपुत्राच्या मनात अंकुरित होऊन, श्रीची आराधना करण्याचा संकल्प त्याने केला. जयरामकवी जातीचा बुद्धिमान् होता. तशात, त्याला सिद्धी प्राप्त झाली होती असेही तो म्हणतो. ज्योतिष्मती ऊर्फ कांगोणी म्हणून एक वनस्पती सह्याद्रीत सडकून सापडते. तिचा तैलकल्प सेवन केला असता, विशेषतः सूर्यपर्वी केला असता, ब्रह्मांडभ्रमणाचा आवाज ऐकू येऊ लागतो, असे महान् महान् भिषग्वर्यांचे सांगणे आहे. पृथ्वी व इतर गोल अवकाशात भिंगऱ्याप्रमाणे परिभ्रमण करीत असता जो महान ध्वनी उत्पन्न होत असतो तो सामान्य जनांच्या कानास गोचर होत नाही. तो ध्वनी ज्योतिष्मती-कल्पसेवनाने ऐकू येऊ लागतो. हा कल्प इतका तीव्र आहे की कोट्यवधी मनुष्यातून एखाद्यालाच सहन होतो. अशा अपवादक व्यक्तीच्या पंक्तीस बसण्याचा हक्क सांगणारा जयराम केवळ संस्कृत किंवा केवळ मराठी अशा एकाद्या भाषेतच रचना करणारा तुटपुंजा भाषाकोविद नव्हता, तर भरतखंडातील मुख्य मुख्य दोन चार नव्हत तर तब्बल बारा भाषांचा परामर्श घेणारा अनेकभाषाधुरंधर होता. त्याने हे प्रस्तुत चंपूकाव्य शहाजीमहाराजांच्या सांगण्यावरून त्यांच्या मनोरंजनाकरिता व कीर्तीचा पवाडा करण्याकरिता रचिले. नायकसमकालीनत्वामुळे पुराव्याच्या दृष्टीने प्रस्तुत काव्याचे महत्त्व सहजच विशेष समजले पाहिजे. कोणत्याही ऐति-

हासिक व्यक्तीसंबंधाने तत्समकालीन वर्णनपर लेख अनेक प्रकारचे असू शकतात; (१) ऐतिहासिक व्यक्तीच्या ओळखीच्या मनुष्याने त्या व्यक्तीविषयी त्याच्या संमतीशिवाय लिहिलेले लेख. (२) ऐतिहासिक व्यक्तीच्या ओळखीच्या व विश्वासाच्या मनुष्याने त्या व्यक्तीविषयी त्याच्या आज्ञेने व संमतीने लिहिलेले लेख. व (३) ऐतिहासिक व्यक्तींशी प्रत्यक्ष ओळख बिलकुल नसणाऱ्या मनुष्याने अर्थात् त्याच्या संमतीशिवाय लिहिलेले लेख. लेखक लेख लिहिण्यास सर्वथैव पात्र आहे अशी कल्पना केल्यास, वरील तीन प्रकारच्या लेखांपैकी पहिल्या प्रकारचे लेख विशेष निस्पृह निपजण्याचा संभव असतो. दुसऱ्या प्रकारचे लेख आश्रयदात्याच्या बरेच स्तुतिपर असण्याचा संभव असतो. व तिसऱ्या प्रकारचे लेख केवळ ऐकीव व कमजास्त अविश्वसनीय उतरण्याचा संभव असतो. तशात मालकाकडून द्रव्यादी मिळविण्याची इच्छा करणारा जर लेखक असेल, तर मिंधेपणामुळे त्याचे लेख स्तुतिपरतेकडे सहज झुकून सत्येतिहासाची हानी करणारे असतात. तसेच मान–सन्मान किंवा द्रव्यद्रविण इत्यादींची अपेक्षा करणारा नसूनही जर लेखक धन्याच्या, पुढाऱ्याच्या किंवा वीराच्या तेजाने दिपून गेलेला असेल तर त्याचे लेख प्रशंसैकपर होतात. उलट, वस्तुनायकाचा कोणत्याही कारणाने द्वेष, तिरस्कार किंवा अपमान करणारा लेखक असेल तर त्याच्या मनोविकारांची छटा त्याच्या लेखात उतरल्याशिवाय राहात नाही. ह्या दृष्टीने पाहाता प्रस्तुत कवी द्रव्यादींच्या अपेक्षेने आश्रयदात्याच्या इच्छेवरून त्याचे स्तुतिस्तोत्र गाण्यास मुद्दाम सज्ज होणाऱ्या भाडोत्री लेखकांच्या वर्गांत पडतो असे म्हटल्याशिवाय गत्यंतर नाही. तथापि अशा भाडोत्रीही लेखकांच्या लेखांतून ऐतिहासिक सत्य निवडून काढण्याच्या पद्धती आहेत. वर्ण्य व्यक्ती राष्ट्रीयदृष्टचा अतीच अती मोठी असेल व शौर्यौदार्यादिगुणगणमंडित असेल, तर द्रव्यार्थी भाडोत्री लेखकानेही केलेली निरर्गलशी दिसणारी प्रशंसासुद्धा मूळ गुणांची सर्वथैव मापक होण्याचा संभव असतो. प्रस्तुत कवीने केलेली शहाजीमहाराजांची वर्णना किंचित् व क्वचित् ह्या शेवटल्या मासल्याची भासण्याचा संभव आहे. शहाजी हा शिवाजीची पूर्वावृत्ती आहे आणि मोगलाई, निजामशाही, आदिलशाही व कुतुबशाही अशा पाचचार शाह्यांच्या वावटळींतून सनातनधर्माचे व स्वराज्याचे कर्नाटकात पुनरुज्जीवन करणारा वीराग्रणी व धोरणाग्रणी आहे. अशा असामान्य व्यक्तींचे वर्णन कोणी कितीही मिंधा असला किंवा निस्पृह असला तत्रापि प्रशंसेतर कसा करू शकेल ! फार तर प्रशंसेत कमी अधिक रागरंग चढेल किंवा घटेल इतकेच. जयराम हा बोलूनचालून कवी आहे. नीरस इतिहासकार नाही. तेव्हा उत्प्रेक्षा, उपमा, इत्यादी अलंकारांनी त्याची वाणी नटली असल्यास त्यात काही नवल नाही. परंतु अलंकार घालावयाचे तेही कवीने बाताबेतानेच घातले आहेत. जयरामाची मुख्य दृष्टी अलंकार करण्याकडे असूनही त्याने नायकाचे पराक्रम-वर्णन थोडेबहुत केले आहे. आणि येथेच इतिहासाभ्यासकांना खाद्य मिळ-

ण्यासारखे आहे; व अलंकाराचे अवगुंठन एकीकडे सारून ऐतिहासिक सत्य सापडण्याची खात्री आहे. ह्या इतिहासभाग निवडून काढण्याच्या आशेने प्रस्तुत काव्याचे प्रथम रूपवर्णन करतो आणि नंतर त्यात शहाजी राजे भोसले यांच्या संबंधाने जी जी ऐतिहासिक विधाने केली असतील त्या सर्वांचे यथाक्रम अवतरण व परीक्षण करतो.

५. दहा उल्लास आणि शेवटी एक परिशिष्ट मिळून प्रस्तुत चंपूचे एकंदर अकरा भाग आहेत. पैकी पहिल्या पाच उल्लासात राधाकृष्णाच्या विलासाचे संस्कृतभाषेत रीतसर वर्णन आहे. (१) जलक्रीडा (२) पुष्पशय्यारिरंसा, (३) नखशिखा, (४) षडर्तु व (५) चंद्रोदयसूर्यास्तमय. ह्या अन्वर्थक नावावरून पहिल्या पाच उल्लासांचे रूप काय असेल ते समजण्यासारखे आहे. ह्या पाच उल्लासात कवीने आपली ओजोमाधुर्यादिकाव्यपरिपोषणशक्ती दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि तो एकंदरीत बरा साधला आहे ग्रंथारंभी शेषपुत्र रंग या नावाच्या आलंकारिकाने एक लहानसा उपोद्घात ऊर्फ प्रस्तावना लिहिली आहे व अलंकार शास्त्रग्रंथ पढून कवित्वशक्ती येत नसून मूळचीच प्रतिमा कवीच्या ठायी ईश्वरानुग्रहप्राप्त असावी लागते असे विवेचन केले आहे, त्यात काव्यप्रकाश, चंद्रलोक, काव्यकल्पलता, काव्यादर्श इत्यादी अलंकारग्रंथांचा उल्लेख केला आहे. ह्या पाच उल्लासात संभोग, विप्रलंभ, स्त्रियांचे नखशिखांत वर्णन इत्यादी मनोन्मादक, बालिश व चावट वर्णने कवीने अपूर्ववर्णित रीतीने दिली आहेत. त्यात इतिहासभाग असलाच तर तो इतकाच आहे की, शहाजीकालीन समाजात कवित्व कशाला म्हणत ते समजण्यास एक साधन उत्पन्न होते. काव्यातील खरा इतिहासभाग सहाव्या उल्लासापासून लागतो. सहाव्या उल्लासापासून ग्रंथसमाप्तिपर्यंतच्या सबंध भागात म्हणजे ग्रंथाच्या दोनतृतीयांश भागात राधाकृष्णाचे नावही नाही. इतकेच नव्हे तर अस्पष्ट उल्लेखसुद्धा नाही. या दोनतृतीयांश भागात येथून तेथून शहाजीमहाराजांची प्रशंसा भरली आहे. तत्रापि, ह्या भागांची गणना कवी राधामाधवविलासचंपूत करतो. असे करण्यात कवीचा मतलब कदाचित असा असावा की, प्रामुख्याने ग्रंथ मनुष्यस्तुतिपर समजला न जाता ईशस्तुतिपर समजला जावा, व मनुष्यस्तुतिपर जो दोनतृतीयांश भाग आहे तोही शाहनृपनिरूप कृष्णाच्याच स्तुतिपर आहे असा समज व्हावा. नाविष्णुः पृथिवीपतिः अशी ग्रंथकाराची परंपरागत श्रद्धा होती. तेव्हा राधाकृष्णविलासाला व शहानरेशप्रशंसेला एकाच ग्रंथात कवीने संकलित केले हेही त्याच्या मते योग्यच झाले. सहाव्या उल्लासाचे राजदर्शनसमस्यापूरण असे नाव असून, सातव्याचे राजसभावर्णन, आठव्याचे राजरीतिवर्णन, नवव्याचे युवराज्यावाप्ती व दहाव्याचे राजनीतिवर्णन अशी नावे आहेत. सहाव्यापासून दहाव्या उल्लासापर्यंतचा सर्व ग्रंथ संस्कृत भाषेत आहे. परंतु शहाजीमहाराजांच्यासमोर व इतर राजपुरुषांच्यासमोर जयराम कवीने इतर भाषाकवींनी प्रसंगोपात्त संस्कृत व्यतिरिक्त इतर अकरा भाषांत जे कवित्व व समस्यापूरण केले ते संस्कृतसंदर्भात

अंतर्भाविणे सुयुक्त नव्हे अशा बुद्धीने स्वतंत्र परिशिष्टात संग्रहणे ग्रंथकर्त्यांस इष्ट वाटले. हे परिशिष्टखंड सर्व ग्रंथाचा एकतृतीयांश भाग आहे. म्हणजे राधाकृष्ण-वर्णनाचा एकतृतीयांश संस्कृत भाग, शहाजी राजवर्णनाचा एकतृतीयांश संस्कृत भाग आणि एकतृतीयांश प्राकृत भाग, असा एकंदर ग्रंथाचा विभाग आहे.

६. बंगळूरच्या शहाजी महाराज भोसल्यांच्या कर्णोपमदातृत्वावर देशोदेशीच्या अनेक विद्वानांचा योगक्षेम चालतो अशी वदंता चारणांच्या तोंडून ऐकून नाशिक-प्रांतीय जयरामकवींच्या मनात महाराजांची भेट घेण्याचा संकल्प आला. तद्नुरूप तुळजाभवानीचे व पांडुरंगाचे ध्यान करून कवी महाराष्ट्र देशातून कर्नाटकात शाह-राजाच्या राजधानीत येऊन ब्रह्मविद्यानिष्णात शिवराय गोस्वामी नावाच्या दर-बारातील विद्वानास भेटला व महाराजांची भेट घेण्याचा आपला मनोदय त्यास निवे-दन करता झाला. शिवरायाने ताबडतोब ती गोष्ट राजाच्या कानावर घातली. राजाने मान्यता दर्शवून शिवराय वेदान्ती यांना व कथाकल्पक वीरेश्वर वैद्य यांना कवीस सामोरे जाऊन दरबारात घेऊन येण्यास आज्ञा केली. स्वस्तिकार करून कवीने बारा नारळ राजापुढे ठेविले. बारा नारळ आमच्या पुढे का ठेविले म्हणून राजाने कौतुकाने विचारले असता कवीने उत्तर दिले की, संस्कृत, प्राकृत, गोपा-चलीय ऊर्फ ग्वालेरी ऊर्फ ब्रज (ग्वालेरच्या किल्ल्याला गोपाचल, गोपालगिरी पूर्वी म्हणत असत) गुर्जर, वक्तर, ढुंढार, पंजाब, हिंदुस्थान, बागुल, यावनी, दाक्षिणात्य-यावनी व कर्नाटक अशा बारा भाषांत काव्यरचना करीत असतो, हे दर्शविण्या-करिता बारा नारळ ठेविले. यावर राजाने आज्ञा केली की, तुमची काव्यरीती कशी काय आहे त्याचा मासला म्हणून काही काव्य रचिले असल्यास पढा. तेव्हा हा राधामाधवविलासचंपू कवीने चतुर गायकाकडून राजापुढ सुस्वर गावविला. त्याने राजा सुप्रसन्न झाला. आणि म्हणाला की, हे काव्य तर ठीक आहे, परंतु कवीच्या कवित्वशक्तीची परीक्षा समस्यापूरणात होत असते. सबब, पंडित हो ! कवीला आपण सर्वजण एकेक समस्या घालू व तो तिची पूर्तो कशी काय करतो ते पाहू— असे म्हणून शहाजीराजे यांनी 'शतचंद्रं नभस्तलं' हा संस्कृत चरण समस्यार्थ पढला. महाराजांच्या समस्येचे पुरण झाल्यावर (१) मल्हारभट पुरोहित, (२) नारोपंत दीक्षित, (३) नरहरी कवीश्वर, (४) विष्णु ज्योतिषी, (५) रघुनाथभट्ट चाऊर-कर, (६) विश्वनाथभट्ट ढोकेकर, (७) नीळकंठभट्ट पुराणिक, (८) प्रल्हाद सरस्वती, (९) वीरेश्वरभट्ट चतुर, (१०) अक्कय्याशास्त्री पल्लकचेरीकर, (११) तुकदेव पाठक, (१२) शेष पंडित, (१३) अनंत पंडित शेषे, (१४) संभाजीराजे भोसले युवराज, (१५) यळोजी महाले घंटाघोष ह्या पंधरा गृहस्थांनीही संस्कृत समस्या घातल्या. त्याचप्रमाणे दरबारातील अनेक प्राकृत भाषाकवींनीही समस्या घातल्या. त्या सर्वांचे समोचीतपूरण झालेले पाहून राजा फार खुष झाला व त्याने उद्गार काढिले की, आपली कीर्ती गाण्याला हा कवी योग्य आहे, सबब याला

आश्रय देऊन आपल्या दरबारी ठेवावा. नंतर रघुनाथपंत हणमंते यांना राजाने आज्ञा केली की, कविवराची यथायोग्य बरदास्त राखावी. पुढे कचेरी बरखास्त होऊन सायंतनविधिसमाप्तीनंतर कवीचे नाव, गाव वगैरे बारीक विचारपूस राजाने केली, तेव्हा दरबारातील मुत्सद्दी रघुनाथपंत, लक्ष्मणपंत व सखोपंत यांनी सांगितले की, हा गंभीरराव सप्तश्रृंगीकर यांचा मुलगा असून दत्तो नागनाथ यांचे व कवीचे गणगोत आहे. ते ऐकून राजा म्हणाला की, हा कोणी दूरचा नाही– आपलाच आहे. असे म्हणून राजाने कवीस निरोप दिला. ही हकीकत सहाव्या उल्लासात दिली आहे.

७. पहिल्या दिवशीची हकीकत देताना कोणत्या शहरी, कोणत्या वर्षी, महिन्यात पक्षात किंवा तिथीस ही मुलाखत झाली वगैरे कालस्थलनिर्देश कवीने केला नाही. काही अपवाद वर्ज्य केले असता, एथूनतेथून सबंध काव्यात कालस्थलाचा निर्देश बिलकूल नाही. हा दिक्कालानवछिन्न कवी आहे, इतिहासकार नाही हे लक्षात घेतले म्हणजे दोष देण्याला जागा रहात नाही. तत्रापी अंदाज असा आहे की, महाराजांची मुलाखत कवीने वसंतर्तूत म्हणजे कोणत्या तरी वर्षाच्या चैत्र-वैशाखात घेतली असावी. असो, दिली आहे तेवढीच माहिती अपूर्व मानून समाधान करून घेणे भाग आहे. दुसऱ्या दिवशी प्रात:काली कवी राजदर्शनास गेला, तेव्हा विश्वनाथभट्ट ढोकेकर प्रात:स्मरण करीत होते. ते करीत असताना अष्टौत्तरशे मंगले राजाच्या दर्शनार्थ आणिलेली सिद्ध होती. प्रात:स्मरण ऐकून राजाने मंगलाचे दर्शन, स्पर्शन व कीर्तन अनुभविले. नंतर एका ब्राह्मणाने तेलाने व तुपाने भरलेल्या सोन्यारुप्याच्या पराती आणिल्या. त्यात राजाने आपले मुख बिंब अवलोकन केले व सभामंडपात प्रवेश केला. सभामंडपाला नवगाजी असे नाव होते. ह्या नवगाजीत उजेडाचा लखलखाट असून वरील छत नेत्रांना थंडावा देणारे होते. मासे व कासवे यांची चित्रे ज्यावर काढिली आहेत असा रुजामा नवगजीत आंथरलेला असून त्यावर सर्व सेवकसमुदाय आधीच येऊन राजाची मार्गप्रतीक्षा करीत होता. अनेक मराठा क्षत्रियांच्या संमर्दाने ती नवगजी गजबजून गेली होती. अशा त्या नवगजीत ज्याच्या मस्तकावर आब्दागिऱ्यांनी चांदव्याची अब्दागिरी धरिली आहे व त्याच्या भोवती चवरीवाले चवऱ्या ढाळीत आहेत असा शहाजीमहाराज हातात तरवारीची मूठ लटकावीत धीरोदात्त गतीने प्रवेश करून, कवी, पंडित व सेनापती यांचे मुजरे घेत घेत सिंहाकृती स्तंभावर बसविलेल्या सिंहासनावर, सर्वांना आश्वासन देत विराजमान झाला. तोच, राजगुरू प्रभाकरभट्ट यांनी आपल्या पायाचे तीर्थ महा-राजांच्या अंगावर शिंपडलेले. तेव्हा राजाने उठून प्रभाकर भट्टांना आपल्या जवळ आणून सर्व पुरोहित कर्म त्यांच्या हस्ते करवून घेतले. हा समारंभ इकडे चालला असता, त्रिचनापल्लीच्या मल्लिनाथपंडितांचे वंशज राजाच्या स्वारीबरोबर छावण्या-तून राजदर्शनार्थ महिनाभर हिंडून कंटाळून गेलेले जयराम कवीला भेटले व जेणे-करून प्रभाकरभट्ट संतुष्ट होऊन राजदर्शन करवील असे एक पद्य रचून देण्याची

त्यांनी कवीला विनंती केली. त्यांच्या इच्छेप्रमाणे कवीने त्यांचे कार्य ताबडतोब करून दिले. येथे सातवा उल्लास संपला.

८. पुढे एके दिवशी कोण्या खिजमतगाराने तेल लाविलेली नागवी तरवार अवलोकनार्थ राजापुढे आणिली तिचे वर्णन कवीने मोठे हृदयंगम केले. तसेच, राजाच्या घोड्याचेही वर्णन असेच बहारीचे केले. तेव्हा खूष होऊन राजाने कवीस तो घोडा बक्षीस दिला व हुकूम केला की, तुम्ही या घोड्यावर बसून आमचेबरोबर स्वारीशिकारीस येत जावे. त्याप्रमाणे एक दिवस राजा स्वारीस निघाला, तेव्हा कवीने सैन्याचे वर्णन केले. इतक्यात शत्रू पश्चिम पर्वताच्या पलीकडे दूर पळून गेले अशी बातमी आली. मग लढाईचे कूच बंद करून राजाने शिकारीत व कवीच्या काव्यालापांत काही काळ घालविला. इतक्यात श्रावणी पौर्णिमा आली व छावणीत रक्षाबंधनोत्सव मोठ्या थाटाने झाला. उत्सवाच्या गौरवार्थ कवीने काही पद्ये म्हटली. त्यात एका पद्यात असे वर्णन केले की, राजा, मागे निजामशाहा व त्याचे भाऊबंद यांना आपण हाती धरलेत. त्या निजामशाहाचे छत्र राखडीच्या रूपाने आपल्या मनगटावर झळकत आहे. एकदा मलयाचलाच्या खोऱ्यातील पुंडपाळेगारांनी सैन्याचा रस्ता आडविला असे कळल्यावरून त्यांच्यावर शहाजीने फौज पाठविली. मारिलेल्या पुंडांची हजारो मुंडकी शिपायांनी शहाजी पुढे आणून रचिली. ती गावोगाव झाडांना टांगण्याचा राजाने हुकूम केला. त्यावर कवीने पद्य केले. त्याचा मतलब असा की, राजा, तुझ्या ह्या कृतीने ह्या प्रांतातील सर्वच झाडे नारळाची झाडे झाली ! येथे शहाजीराजाने तैमूरलंगाचा कित्ता उचलला व स्तुतिपाठक कवीने बीभत्स व हास्यरसाचा प्रांत कधी कधी किती सन्निकट असतो हे दाखविण्यात शेक्सपीयरवर ताण केली, असे कोण म्हणणार नाही ! काही महिन्यांनी दक्षिण कर्नाटकातील पुरंदर किल्ला सर केल्याची बातमी आली. तेव्हा कवीने पुरंदरच्या माथ्यावर आपले गडकरी स्थापणाऱ्या शहाजीची श्रेष्ठता पुरंदरपद प्राप्त करून घेऊ इच्छिणाऱ्या धर्मराजाहून वरचढ सहजच वर्णिली. यानंतर काही दिवसांनी विद्यानगर ऊर्फ विजयानगर ऊर्फ हंपी आणि कनकगिरी घेतल्याची खबर आली. त्यावरून कवीला जी काव्यस्फूर्ती झाली ती प्रस्तुत चंपूत नमूद आहे. एकदा शहाजीराजांच्या समोर आखाड्यात दोन मल्ल खड्गयुद्ध करता करता तरवारी फेकून देऊन आवेशाच्या भरात त्वेषाने एकमेकांना ठोसे लगावू लागले. त्याच सुमारास दुसऱ्या बाजूस सभेत चर्चा करता करता क्रोध चढून दोन पंडित एकमेकांना शिव्या देऊ लागले. हा चमत्कार पाहून राजाला हसू आले. त्यावर जयरामकवीने विदूषकाकडून अशी उक्ती काढविली की, परस्परास झोंबणारे भट व परस्परास शिव्या देणारे भट्ट यातून श्रेष्ठ कोण हे पाहू जाता निसंशय भट्टाहून भट उच्चारात ऱ्हस्व असूनही शहाणपणात अधिक दीर्घ आहेत यात संशय नाही. शहाजीराजांना गोवर्धनाचार्यकृत सुप्रसिद्ध आर्या फार आवडत. तेव्हा राजाच्या सांगण्यावरून

हुबेहुब गोवर्धनाच्या आर्येसारख्या आर्या जयरामकवीने रचून दाखविल्या व शाबासकी मिळविली. एकदा चंद्रावर कविता बनवा म्हणून राजाने कविवर्याला सांगितले असता त्याने अशी उत्प्रेक्षा केली की, एकाच लक्षणाने लक्षित असा जो चंद्र त्याची लोक निंदा करतात ते योग्यच आहे. परंतु बत्तीस लक्षणांनी युक्त जे आपण त्यांची लोक स्तुती करतात, हे विचित्र नव्हे काय ? येणेप्रमाणे काव्यशास्त्रविनोदाने धीमान शाहाजीमहाराजांचा फुरसतीचा काळ कसा जात असे ते कवीने आठव्या उल्लात वर्णिले आहे.

९. अशा तऱ्हेने राजानुग्रहातपात सुखोष्मा अनुभवीत असता, कवीची कीर्ती शिवराय गोस्वामी यांच्या द्वारा गंगाधरपंत या नामे करून युवराजाला नवीन अमात्य करून दिला होता, त्याच्या कानावर गेली. तेव्हा कवीस आपल्याकडे घेऊन येण्यास अमात्यांनी गोसावी यांस विनंती केली. भेटीच्या वेळी कवीने अमात्यांवर जो श्लोक केला त्याने अमात्य इतके खूष झाले की, त्यांनी तो श्लोक आपल्या मुद्रेच्या आसनावर कोरविला. पुढे काही दिवसांनी युवराज जे संभाजीराजे त्यांचा शेवट झाल्यानंतर युवराजपद एकोजीराजांना मिळाले. एकोजीराजाला संभाजीराजाप्रमाणेच संस्कृतप्राकृत कवींचा परामर्श घेण्यात हर्ष वाटे. ह्या एकोजीराजांनी मुद्दाम पाचारण करून कविमुखाने राधामाधवविलासचंपू ऐकिला व कवीचे चातुर्य पाहून एकोजनार्दनाप्रमाणे म्हणजे एकनाथस्वामींप्रमाणे पूर्णब्रह्मसाक्षात्कार झालेल्या जनार्दनपंडित नामक कोशाधिकाऱ्याला कवीस एक हजार वराया प्रतिवर्षी देण्याविषयी आज्ञा केली आणि यशवंतराव नामक मुत्सद्द्याला कवीची सर्वतोप्रकारे बरदास्त ठेविण्यास सांगितले. एवढा कथाभाग नवव्या उल्लासात कवीने आणिला आहे.

१०. एकोजीराजाला लोक सवाईमहाराज म्हणून प्रेमाने ओळखीत असत. सवाईमहाराजाबरोबर कवी श्रीशैलमल्लिकार्जुनाच्या यात्रेस किंवा मोहिमेस गेला होता श्रीशैलपर्वताचे वर्णन कवीने मोठे बहारीचे केले आहे. तदनंतर शहाजीमहाराजांच्या राखेचा पुत्र कोयाजीराजा याचा व कवीचा परिचय झाला. हा कोयाजीराजा नृत्य, गायन, संस्कृतप्राकृत, इत्यादी सर्व काही जाणणारा असून घोड्यावर बसणे, भालाबर्ची खेळणे, कुस्तीकवायत करणे इत्यादी कलानिपुण होता. कोयाजीने संस्कृत–प्राकृतांचा अभ्यास विश्वनाथ ज्योतिष्याजवळ केला असून, तो मल्लविद्या नरपकटसा नावाच्या प्रख्यात जेठीपाशी शिकत होता. काव्य, नाटक, आख्यायिका, इतिहास, संगीत, नाना देशभाषा इत्यादीच्या परिज्ञानात याने अत्यंत कौशल्य संपादिले होते. ह्या कोयाजीराजाला नेकीण नावाची एक मुलगी होती. तिच्या गायननर्तनाची तालीम प्रत्यही कवीश्वर घेत असत. कर्नाटकात गायननर्तन, हावभाव इत्यादी शिकविणारे कलावंत ब्राह्मण पूर्वीही प्रख्यात असत व सध्याही कोठे कोठे पाहाण्यात येतात. ह्या कवीश्वरांची व जयराम कवीची गाठ पडली असता, त्यांच्या कर्मासंबंधाने कवीने अशी स्तुती केली की, तुमचे हे काम साक्षात ब्रह्मदेवाच्याही बाप्पाने

होणार नाही, तुम्ही लाकडाच्या बाहुल्यांनाही नाचवू शकता, तेव्हा बोलत्या-चालत्या स्त्रियांना उत्तम नर्तकी बनवाल यात आश्चर्य आहे; एकदा काही प्राकृत कवींशी जयरामकवीची गाठ पडली असता, त्यांना उद्देशून तिरस्काराने कवीने खालील उद्गार काढिले. गहनारण्यात संस्कृतसिंहाची गर्जना ऐकून, प्राकृतमर्कटे भाषावृक्षांच्या क्षुद्रशाखात लपून बसली. ही निर्भत्सना ऐकून प्राकृत कवींना फार राग आला व त्यांच्यापैकी रघुनाथ व्यास वगैरे नामांकित कवींशी जयरामकवीचे अनेक सवालजबाब झाले, त्या सवालजबाबात जी बारा भाषात प्राकृत पद्ये कवीने रचिली ती त्रिमल्ल व वेंकट ह्या तात्कालीन प्रख्यात गायकांनी कोयाजीला गाऊन दाखविली. इतका कथाभाग नवव्या व दहाव्या अशा दोन उल्लासात आला आहे.

११. कोणी कोठचाही कवी आश्रयार्थ आला म्हणजे शहाजीराजे त्याला त्याच्या इच्छेप्रमाणे आपल्याजवळ आदराने ठेऊन घेत असत आणि तो जे ईश्वरविषयक किंवा राजविषयक किंवा मनोरंजनविषयक काव्य त्याच्या जन्मभाषेत करी ते ऐकण्यात फावला वेळ घालवून आपले मन रिझवीत असे. अकबर पातशहाला, विजापूरच्या आदिलशहांपैकी कित्येकांना, विजयानगरच्या बुक्कादि राजांना, भोजविक्रमादि मध्ययुगीन हिंदू राजांना, व भरतखंडातील सामान्य संस्थानिकांना, इतकेच नव्हे तर मुरारपंतांसारख्या मुत्सद्द्यांना व खेडेगावातील देशमुख-देशपांडे व पाटीलकुलकर्णी यांनादेखील शाहीर कवी वगैरे गुणी जनांचा व विद्वानांचा परामर्श घेण्याचा नाद असलेले संस्कृत प्राकृत ग्रंथातून व तवारिखातून नमूद आहे. आदिलशाहांच्या दरबारात फारसी व उर्दू कवी प्राय: मुसलमान असत. एखाददुसरे हिंदूंचे नाव सापडते; परंतु, भाषा साऱ्या कवींची फारसी किंवा उर्दू असे. मुसलमानी दरबारात मुसुलमानांची चहा व्हावी यात वावगे असे काहीच नाही. त्याचप्रमाणे शहाजी-महाराजांच्या दरबारात प्राय: हिंदू कवींचा बहुतेक भरणा असावा हे साहजिक आहे; अपवादाला अल्लीखान हे एक तेवढे नाव मुसुलमान कवींचे दिसते; परंतु भाषा केवळ मराठी नसून, फारसी, उर्दू, व्रज, गुजराथी, बागलाणी, पंजाबी, व कर्नाटकी अशा हिंदुस्थानांतील बहुतेक प्रमुख भाषा आहेत. पश्चिमेकडील सिंधी, पूर्वेकडील बंगला, व दक्षिणेकडील तेलगू, तामिल व मलायालम या पाच भाषा तेवढ्या नाहीत, तत्रापि सुलुनेरी, नडनेरी, तिरूमुरू, रठिमुरू, नोद्र, नीव्हैल, गुंड, इत्यादी तेलगू किंवा तामीळ शब्द या चंपूत आले आहेत. त्यावरून अस्पष्ट अनुमान होते की, तेलगू, तामील, मलयालम विद्वान व कवी शहाजीच्या दर्शनार्थ येत नसतील असे म्हणणे संकटप्राय होईल. सिंध व बंगाल हे प्रांत त्या काली फार मागासलेले असावेत व तेथील भाषा व लोक प्रौढत्वाप्रत पोहोचलेले नसावेत, सबब शहाजीच्या दरबारातील जयराम कवीच्या कक्षेत ह्या भाषा आल्या नाहीत. नाहीतर जयरामासारख्या अनेकभाषाकोविदाच्या झपाट्यात त्या आल्याशिवाय रहात्या ना. जयरामाला आपल्या अनेकभाषाज्ञातृत्वाचा इतका काही जबर अभिमान होता की,

त्याला सिंधी, बंगला, मलयालम, वगैरे भाषांचे ज्ञान जर असते तर त्याने ह्या चंपूत खचित प्रकट केलेच असते. कदाचित श्रोत्यांच्याही ग्राहकशक्तीने जयरामाच्या अनेकभाषाज्ञानाचा संकोच झाला असण्याचा संभव आहे. श्रोत्यांना सहज परिचित अशाच तेवढ्या भाषा जयरामाने योजिल्या असण्याचा संभव विशेष दिसतो. सध्या जशी इंग्रजी भाषा उच्च आणि मध्यम वर्गातील बहुतेक इसमांना कळते त्याचप्रमाणे शहाजीच्या अमदानीत फारसी व उर्दू या भाषा यवनांच्या रियासतीत कळत. करता जयरामाने फारसी व उर्दू ऊर्फ दाक्षिणात्य यावनी भाषा योजिल्या ते रास्तच आहे. कानडी देशावर राज्य करणाऱ्या शहाजीच्या दरबारात कानडी भाषा बहुतेक सर्वांनाच अवगत असे. गुजराथी वाण्यांचा व्याप त्याही काली सार्वत्रिक पडल्यामुळे, त्यांची उपेक्षा जयरामाला करणे शक्य नव्हते. बागलाण त्या काली महत्त्वाच्या देशात मोडत असे व तेथे बहुतेक स्वतंत्र हिंदू राजे राज्य करीत असत, करता बागलाणी भाषेला जयरामाने मान दिला,ढुंढार, बख्तर, व्रज, पंजाबी, ह्या भाषा बोलणारे हजारो लोक शहाजीच्या सैन्यात नोकरीवर असत. तेव्हा त्याही आर्य भाषा दरबारातील लोकांस व शहाजीराजास कळत. तात्पर्य, संस्कृत, प्राकृत म्हणजे मराठी, गोपाचलीय म्हणजे व्रज, गुर्जर, बख्तर, ढुंढार, पंजाबी, हिंदुस्थानी, बागलाणी, उर्दू, फारसी व कानडी या भाषा शहाजीच्या दरबारातील उच्च व मध्यम वर्गातील लोकांना उमगण्यास प्रयास पडत नसत. ह्याचा अर्थ असा की, शिवाजीच्या व शहाजीच्या राजवटीत भरतखंडाच्या मध्यवर्ती असा जो महाराष्ट्रदेश त्या देशातील महाराष्ट्र ब्राह्मणांना व क्षत्रियांना देशपरिस्थितीमुळे अनेक भाषांचे ज्ञान सहज होत असे,तत्कालीन जी क्षुल्लक व ग्राम्य अशी हजारो सनदापत्रे फारसी व फारसीमय मराठी भाषेत लिहिलेली उपलब्ध आहेत. ती क्षुद्र ग्रामलेखकांना व पाटलांना समजतात या बुद्धीनेच लिहिली गेली असली पाहिजेत. या बाबीसंबंधाने आता आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. वस्तुस्थितीच तशी होती. हा अनेकभाषाज्ञातृत्वाचा धागा फार प्राचीन आहे. ज्ञानेश्वराला संस्कृत, मराठी व बागलाणी; दासोपंताला संस्कृत, मराठी, फारसी, व उर्दू; एकनाथाला संस्कृत, मराठी, हिंदुस्थानी, व्रज व उर्दू; तुकारामाला संस्कृत, मराठी व बज, विठ्ठलाला मराठी व कानडी, अशा अनेक भाषा येत असत. राजकारणाशी ज्यांनी फारकत करून घेतली त्या भक्तशिरोमणीची जर ही कथा, तर राजकारणात सदैव पोहणाऱ्या दरबारी गृहस्थांची गोष्ट काय विचारावी; त्यांना अनेकभाषाकोविद होण्यावाचून गत्यंतरच नव्हते. हा प्रकार देशातही घडलेला आहे व सध्या घडत आहे. इंग्रज कवी मिल्टन याला जुनी इंग्रजी, इंग्रजी, ल्याटिन, ग्रीक व इटालियन आणि कदाचित फ्रेंच इतक्या भाषा अवगत होत्या. बेकनला इंग्रजी, ग्रीक व ल्याटिन या भाषा येत असत. आणि सध्या तर हजारो इंग्रजांना ग्रीक, ल्याटिन, फ्रेंच व जर्मन या भाषा व्यवहार सौकार्यार्थ शिकाव्या लागतात हाच प्रघात फ्रान्स व जर्मनी या देशात आहे. आणि हाच प्रघात शहाजीकालीन महा-

राष्ट्रीय दरबारी लोकात जारीने चालू होता. व तो सध्याच्या युरोपातल्याहूनही जास्त प्रमाणावर चालू होता असे म्हटल्यास अतिशयोक्ती होईलसे दिसत नाही. महाराष्ट्रातील लोकांचे हे अनेकभाषाकोविदत्व सध्याही दिसून येते. उच्च इंग्रजी शिक्षण ज्यांना मिळाले आहे त्यांपैकी बहुतेकांना मराठी, संस्कृत व इंग्रजी या तीन भाषा तर येतातच येतात, परंतु वैदिक, महाराष्ट्री, मागधी, शौरसेनी, पिशाच्च, पाली, ब्रज, पंजाबी, सिंधी, बंगाली, उर्दू, बागलाणी, कोकणी, फ्रेंच, व जर्मन, इत्यादी आणीक भाषा जाणणारेही एकेकटे लोक महाराष्ट्रात थोडे सापडतील असे नाही. सांगण्याचा मुद्दा एवढाच की, देशस्थितीमुळे व राज्यस्थितीमुळे महाराष्ट्रातील उच्च लोक अनेकभाषाविद सध्या बनलेले आहेत व पूर्वी बनलेले होते याचे प्रत्यंतर बारा भाषात लिहिणाऱ्या जयरामाने व ते लिहिणे समजणाऱ्या दरबाऱ्यासमवेत शहाजीराजे भोसले यांनी दिलेले लोकांच्या प्रत्ययास आणून देण्याचे काम प्रस्तुत लेखक करीत आहे.

१२. शहाजीराजांनी जयरामकवीला "शतचंद्रं नभस्तले" ही समस्या स्वतः घातली. राधामाधवविलास हा संस्कृत चंपू सहृदयतेने ऐकिला व बारा भाषेत लिहिलेली पद्ये सरसतेने श्रवण केली. तोच प्रकार शहाजीचा पुत्र व शिवाजीचा वडील भाऊ जो संभाजीराजे त्याने केला. तोच कित्ता शिवाजीराजाचा धाकटा भाऊ जो एकोजीराजा त्याने गिरविला. आणि ह्या तिघांचे अनुकरण शहाजीचा रक्षापुत्र जो कोयाजीराजा त्यानेही संपादिले. तेव्हा प्रश्न असा उभा रहातो की. शहाजीचा पुत्र, संभाजीचा धाकटा भाऊ, आणि एकोजी व कोयाजी यांचा ज्येष्ठ बंधू जो प्रतिभासंपन्न शिवाजीराजा तोच तेवढा अक्षरशत्रू कसा निपजावा व डफसरकारादि लेखकांनी काय म्हणून अपगायिला जावा? सर्व बखरी लिहितात की, शिवाजीराजा उच्चशिक्षित होता ते अप्रमाण धरून व शिवाजीचे जे शत्रू त्यांची साक्ष प्रमाण मानून सत्येतिहासाचे काम भागणार नाही. बखरकार शिवसमकालीन नव्हत म्हणून व शत्रूपक्षीय साक्षी कलुषित म्हणून त्यांचा पुरावा सध्या आपण बाजूस ठेवू आणि जयरामासारखा द्वादशभाषाप्रवीण शिवकालीन कवी काय म्हणतो ते पाहू. जयराम शिवाजीसंबंधाने खालील उद्‌गार काढितो :

"श्रीशाहराजात्मजतिलकस्य कलियुगसकलप्रबलयवन-
बलवनविदलनकरकलितकरवालोदितप्रतापदिनकरस्य
स्फुरद्गुणगणयुतपंडितमंडलीमंडितकविवरविरचितप्रबंध
सिंधुसमुभ्दूतशाश्वतनिष्कलंककीर्तिशीतकरस्य प्र-
चंडक्ष्मापतिमंडलविजयसमासादितवसुवसुंधरादिकप्रदानप्र-
मुदितयाचकजनस्तुतिवचनानंदिताष्टदिग्जननिवहस्य
श्रीशिवराजस्य"

ह्या उद्गारातील स्फुरद्गुण इत्यादि पद लक्ष्य आहे. ह्या पदात जयराम स्पष्ट सांगतो की, शिवरायाच्या ठायी अनेक गुणांचे वास्तव्य होते. त्याचा दरबार अनेक पंडितांनी सुशोभिलेला असे आणि त्यांची निष्कलंक कीर्ती कविवरांनी वर्णिलेली होती. प्रस्तुत चंपू शके १५७'१ पासून शके १५८० पर्यंतच्या कालात क्रमाक्रमानें रचिला जात होता. ह्या सुमारास शिवाजीचे वय तिशीच्या घरात येत चालले होते आणि त्याने अवरंगजेब, अदिलशाहा, बरीदशाहा, कुतुबशाह इत्यादि प्रबल, दुर्बल यवनांच्या ताब्यातील काही मुलूख काबीज केला होता किंवा लुटला होता तसेच अनेक मराठा सरदारास त्याने वठणीस आणिले होते. बापाप्रमाणे व आपल्या भावांप्रमाणे तो आपल्या दरबारात संस्कृत विद्वान् व प्राकृत कविवर बाळगीत असे व त्यांनी रचिलेले स्वतःच्या कीर्तीचे संस्कृतप्राकृत पवाडे तो सहृदयतेने ऐकत असे, म्हणजे त्यांनी रचिलेल्या संस्कृतप्राकृत पद्यांचा अर्थ कळण्याची पात्रता त्याच्या अंगी असे. जयरामाने केलेल्या शिवाजीच्या ह्या वर्णनावरून स्पष्टच झाले की, शिवाजीला त्याच्या बापाप्रमाणे व भावांप्रमाणे संस्कृतप्राकृत भाषा येत होत्या. तेव्हा शिवाजीच्या संस्कृतप्राकृतज्ञाना संबंधाने बखरीतून जी वर्णने उपलब्ध आहेत ती समकालीन पुराव्याने समर्थित झाल्यामुळे विश्वसनीय धरणे भाग आहे. ह्यावर अशी शंका आणिता येईल की, शिवाजीला संस्कृतप्राकृतभाषाज्ञान असू शकेल, परंतु हे ज्ञान अक्षरओळख असल्यावाचूनही असू शकण्याचा संभव आहे. ह्या शंकेचा अर्थ असा होतो की, शिवाजी विद्यासंपन्न होता, फक्त ती विद्या त्याने तैलबुद्धीच्या एखाद्या जन्मांधाप्रमाणे कर्णोपकर्णी मिळविलेली होती. स्वतः लिहून व वाचून ती त्याने कमाविलेली नव्हती. तात्पर्य, शंका संकुचित होता होता आता इतकी संकुचित झाली की, शिवाजीला बावन मातृका काढता व वाचता येत होत्या की, नव्हत्या एवढाच प्रश्न काय तो प्रत्यक्ष पुराव्याने सिद्ध करावयाचा राहिला. हा प्रत्यक्ष पुरावा पुढे येई तोपर्यंत शंकाखोर आपला संशय सोडणार नाहीत. परंतु हा शंकाखोरपणा शंकाखोरांना फार जाचक होण्याचा संभव आहे. शिवाजीचे साक्षात हस्ताक्षर स्वतःच्या डोळ्यांनी पाहिल्याशिवाय शिवाजीला लिहितावाचता येत होते असे म्हणण्यास संशयखोर तयार नाहीत. परंतु ही अपूर्व शंका काढणाऱ्यांना आम्हीं असा सवाल करतो की, शहाजी, संभाजी, एकोजी व कोयाजी यांची तरी हस्ताक्षरे शंकाखोरांनी प्रत्यक्ष पाहिली आहेत काय ? ही भोसलेमंडळी सोडून द्या. भास्कराचार्य, जगन्नाथपंडित, गागाभट्ट, एकनाथ, मुक्तेश्वर, इत्यादि पंडितवरांची तरी हस्ताक्षरे शंकाकारांनी पाहिली आहेत काय ? हे महाराष्ट्र पंडितही बाजूस ठेवू. सीझर, आलेक्झांडर, आदिलशाहा, आरिस्टॉटल, चॉसर, ह्यांची तरी हस्ताक्षरे शंकाखोरांनी पाहिली आहेत काय ? यापैकी कोणाचीही हस्ताक्षरे उपलब्ध नसता, ह्यांच्या साक्षरते-संबंधाने शंकाखोरांना संशय नाही. मग फक्त शिवाजीमहाराजांवरच त्यांची एवढी करडी नजर काय म्हणून ? ह्या शंकाखोरपणातील इंगित असे आहे की, ह्या

शंकेखोरांची मने फार ढिली आहेत. कोणी धूर्तानें वाटेल ती कंडी पिकवली की, ह्यांना संशय पडलाच. जे जे म्हणून खरेखोटे, बरेबुरे ह्यांच्या कानावर जाईल ते ते ह्यांच्या मनावर पारख न होता गाफिलपणाने तात्काल बिंबते. इंग्रजाचे राज्य पुढील वर्षी जाईल, स्वराज्य येत्या पावसाळ्यात सुरू होईल, आपण आर्य नसून खरे आर्य युरोपीयन लोक आहेत, वगैरे शेकडो अफवा हे लोक विनपारख ग्रहण करतात. त्यातलीच शिवाजीच्या साक्षरतेसंबंधाची भिकार अफवा आहे. पिकल्या-शिवाय विकत नाही, संशय ज्या अर्थी आला त्याअर्थी येथे काही तरी पाणी मुरत असणार, इत्यादि लौकिक म्हणीचा पगडा ढिल्या मनावर फार बसतो. तो पगडा जयरामासारख्या समकालीन कवीच्या प्रत्यक्ष पुराव्यावर विश्वास ठेवून त्यांनी आता झुगारून द्यावा व शिवाजी विद्यासंपन्न होता इतकेच नव्हे तर त्या तैल-बुद्धीच्या पुरुषाला बावन्न मातृकांचे यःकश्चित् ज्ञान होते हेही बिनसंशय मान्य करावे. कुळातील बाकीच्या सर्व पुरुषांना अक्षरज्ञान होते आणि शिवाजीलाच एकटयाला तेवढे नव्हते, हा प्रवादच मुळी बाष्कळ आहे. मूळ कंडी पिकविणाऱ्यांचा असा कुत्सित हेतू होता की, शिवाजीला अक्षरज्ञान नव्हते. असा प्रवाद फैलविला म्हणजे पुढे त्याला संस्कृतप्राकृतज्ञान नव्हते, प्रगल्भ विद्या नव्हती, इत्यादी दोष या थोर पुरुषावर सहजच लागू पडतील. परंतु जयरामकवीच्या समकालीन लेखाने ह्या कुत्सित कंड्यांना आता कायमची मूठमाती मिळाली आहे. सबब, ह्या वादाला रजा देऊन, एतदनुषांगिक दुसऱ्या एका प्रश्नाला जाता जाता सहज स्पर्श करू. साक्षरतेसंबंधाने विद्यासंपन्नत्वासंबंधाने आता काही एक शंका राहिली नसल्यामुळे सध्या अत्यंत साधा व सिधा असा एक प्रश्न संशोधकापुढे आहे की, शिवाजीचे हस्ताक्षर अद्याप इतकी तपे संशोधन करून, कसे सापडले नाही? या प्रश्नाला उत्तर असे आहे की, शिवाजीची शंभर सवाशेदेखील अस्सल पत्रे अद्याप सापडलेली नाहीत. सापडली आहेत त्या पैकी बहुतेक मामूल इनामासंबंधांची वगैरी दरबारी कारकुनांनी लिहिलेली आहेत. शिवाजीने स्वतः विनंती, आज्ञा-वगैरे निशाणी केलेले पत्र सापडावयाचे म्हणजे शहाजी, संभाजी, एकोजी, जिजा-बाई, रामदास, तुकाराम, इत्यादी जिवलगांना लिहिलेल्या पत्राखेरीज किंवा साम-राज नीळकंठ, पिंगळे, मालुसरे, पालकर, वगैरे प्रेमातल्या व विश्वासातल्या दरबाऱ्यांना स्वतः खासगी लिहिलेल्या पत्राखेरीज सापडणार नाही. त्यातल्या त्यात एक पत्र धुळे येथे रा. देव यांच्या संग्रहास आहे. त्याच्या समाप्तीस शिवाजीने आपली निशाणी घातली आहे असे मला व रा. देव यांना वाटत आहे. त्या पत्राचा देवांनी गाजावाजा मुद्दाम केला नाही. अशा हेतूने की, ते पत्र व निशाणी यांचे दर्शन घ्यावयाला कोणी हरीचा लाल येतो किंवा नाही व त्याच्या विश्वास्यता किंवा अविश्वास्यता या संबंधाने कोणी चिकित्सा करतो किंवा नाही. त्या पत्राचा फोटो देणे काही अवघड नव्हते परंतु वरील कारणाकरिता तो मुद्दाम दिला नाही.

खात्री आहे की, जसजसा शिवाजीचा खुद्द स्वतःचा पत्रव्यवहार मुबलक सापडत जाईल तसतशी शिवाजीच्या खुद्द निशाणीची पत्रे हटकून सापडतील. बाकी शिवाजी-बरोबर शहाजी, एंकोजी, संभाजी, राजाराम इत्यादींची हस्ताक्षरे अद्याप सापडावयाचीच आहेत. शहाजी, एकोजी, संभाजी आणि राजाराम यांच्या पत्रव्यवहाराच्या संशोधन संबंधाने एक बाब येथे पुन्हा सुचवून ठेवितो. ह्या राजांच्या कालच्या पत्रव्यवहाराची खाण पेशवाई पत्रव्यवहाराच्या खाणीखाली बुजून गेलेली आहे. म्हणजे तत्कालीन मुत्सद्द्यांची व लढवय्यांची घराणी पेशवाई मुत्सद्द्यांच्या व लढवय्यांच्या घराण्यापुढे फिकी व निस्तेज होऊन धुळीस मिळाली किंवा कोनाकोपऱ्यात दबली आहेत. त्यांना उजेडात आणण्याला पेशवाई दप्तरे शोधून काढण्यास जो खर्च लागला त्याहून कितीतरी पटीने जास्त खर्च लागेल.

१३. शहाजी, एकोजी, व संभाजी ह्यांनी घातलेल्या समस्यांचे वर्णन जयरामाने जसे केले तसे शिवाजीने घातलेल्या समस्याचे वर्णन त्याने का केले नाही अशी शंका काढिल्यास तिचे स्वल्पात परिहरण असे की, शक १५७५ पासून शक १५८० पर्यंतच्या कालात शिवाजी शहाजीच्या दरबारात कधीच नव्हता. शिवाजी संबंधाने जयरामाने केलेला दुसरा उल्लेख असा आहे :

टिकेचा धणी लेक ज्याचा शिवाजी। करी तो चहू पातशाहाशि वाजी ॥
तयाला रणा माजि हे एक माने। अरी जै गला घालुनी ये कमाने ॥ १३३ ॥

कवी म्हणतो की, शहाजीचा लेक व वारस जो शिवाजी तो शहाजीच्या ह्याती-नंतर राजत्वदर्शक जो तिलक ऊर्फ टिका त्याचा प्रथम हकदार आहे, शिवाजीने चारी पातशहांस लढाईच्या रणांगणावर फिरवून घोड्यासारखे जेर केले आहे, व शत्रुराजांच्या गळ्यात कमाना अडकवून त्याने त्यास नरम आणिले आहे. ह्याखेरीज तिसरा उल्लेख सबंद काव्यात शिवाजी संबंधाने नाही. वरील श्लोक शहाजीने ऐकिलेला होता, त्यावरून उघडच झाले की, शहाजीच्या कर्नाटकातील राज्याचा भूरितम भाग टिक्क्याचा धनी जो शिवाजी त्याला मिळावा अशी शहाजीची इच्छा होती. जयरामाने केलेले शिववर्णन यथार्थ होते, व ते शहाजीस मान्य होते हे सांगावयाला नकोच. शिवाजी व संभाजी यांची आई जी जिजाई तिजसंबंधाने जयराम लिहितो की,

जशी चंपकेशी खुले फुल्ल जाई। भली शोभली ज्यास जाया जिजाई ॥
जिचे कीर्तिचा चंबू जंबुद्विपाला। करी साउली माउलीसी मुलाला ॥ १३१ ॥

जिजाई ही शहाजीसारख्या धीर, उदार व पराक्रमी पुरुषाला चांगलीच साजण्यासारखी बायको होती, आणि ती केवळ नवऱ्याच्या कीर्तीवर विकत नसून, स्वतःच्या धीर व गंभीर वृत्तीने तिची कीर्ती त्या काली सर्व भरतखंडभर पसरली होती. इतकेच नव्हे तर तिच्या कीर्तीच्या चंबूखाली म्हणजे घुमटाखाली म्हणजे

घुमटाच्या सावलीखाली सर्व जंबुद्वीप म्हणजे जंबुद्वीपातील सज्जन लोक यवनांच्या जुलुमाला कंटाळून आश्रयार्थ येत असत, असे जयराम लिहितो. जिजाई ही कोणत्या तोलाची बाई होती ह्याचा अंधुक तर्क जयरामाच्या ह्या तत्समकालीन उक्तीवरून करता येतो. पुणे व सुपे प्रांताची व्यवस्था पहाणाऱ्या, शिवाजीच्या शिक्षणाकडे लक्ष देणाऱ्या, स्वत: गोरगरीबांचा समाचार घेणाऱ्या व गुणी सज्जनांना आश्रय देणाऱ्या ह्या बाईच्या कर्तबगारीचे तपशीलवार वर्णन न देता केवळ एक त्रोटक श्लोक करून कवी गप्प बसला हे पाहून कवीवर संशोधकांचा राग झाल्यास तो अयथार्थ होणार नाही.

१४. दरबारातील ज्या मुत्सद्द्यांची व कवींची नावे जयरामाने उल्लेखिली आहेत त्यांच्यापैकी आपल्या पूर्वओळखीची नावे कोणती व नवीनच प्रथम ओळख प्रस्तुत चंपूच्याद्वारा ज्यांची झाली ती नावे कोणती ते क्रमवार पाहू.

(१) शिवराय गोस्वामी : गोस्वामी म्हणजे गोसावी. गोसावी हे देशस्थ ब्राह्मणात आडनाव आहे. ह्या शिवराय किंवा शिवराव गोसाव्यासंबंधाने पूर्वमाहिती काही नाही. हा शहाजीच्या दरबारी आल्यागेल्याची धन्याला वर्दी व गाठ घालून देणारा दरबारी होता. तंजावरप्रांती गोसावी आडनावाचे एक घराणे मी पाहिले होते. ह्याने समस्या वगैरे काही प्रश्न केला नाही. त्यावरून दिसते की, हा केवळ वरिष्ठ दर्जाचा सभ्य मुत्सद्दी असावा.

(२) वीरेश्वर वैद्य : वैद्य हे देशस्थ ब्राह्मण आडनाव. चंपूत वैद्यै: असा अनेकवचनी प्रयोग शहाजीच्या तोंडी कवीने घातला आहे. त्यावरून दिसते की, शहाजीमहाराज आपल्या मुत्सद्द्यांशी आदराने, बहुवचनी बोलत असे. वीरेश्वर वैद्य हेही नाव नवीन परिचयाचे आहे. हा शहाजीमहाराजांचा भिषग्वर असावा.

(३) मल्लारी भट्ट पुरोहीत : मल्हारभट पुरोहिताने समस्या घातली होती. हा महाराजांचा पुरोहित ऊर्फ राजोपाध्या. हा परमबुद्धिवान होता असे कवी लिहितो. हे नाव राजोपाध्यांच्या पत्रव्यवहारात आले आहे.

(४) नारो पंडित दीक्षित : पंडित म्हणजे पंत. पंडित=पंडत=पंत. नारोपंत दीक्षित हे नाव सभासदी बखरीत आले आहे. सबंध नाव नारो त्रिमळ हणमंते, ऊर्फ नारायण त्र्यंबक हणमंते. यांनी किंवा यांच्या पूर्वजांनी यज्ञ केला होता म्हणून यांना दीक्षित हे नाव मिळाले, हे उघड आहे. हा शहाजीराजाजवळ कर्नाटकात कारभारी ऊर्फ मुत्सद्दी होता. याजकडे मुजुमदारी होती. लग्नोत्तर जिजाबाईच्या पाठराखणीस हणमंते जाधवरायांकडून शहाजीकडे आले. हणमंते हे आडनाव गावावरून पडले आहे. हे नाव पूर्वपरिचित आहे. ह्याला धीसचिवधुरंधर म्हणून जयरामाने विशेषण दिले आहे. समस्या करताना ह्याने मोठी जांभई देऊन अंग हलविले असे कवी लिहितो. हणमंत्यांचे घराणे गंगाप्रांतीय नगर, औरंगाबाद इकडील आहे.

गा...२

(५) नरहरि कवीश्वर : कवीश्वर हे देशस्थात आडनाव आहे. हे नाव पूर्वपरिचित नाही. हा महाराजांचा कवी असावा.

(६) विष्णु ज्योतिर्विद : म्हणजे विष्णु जोशी. ज्योतिषी=जोइसी–जोशी. हा राजाचा ज्योतिषी. हे नाव पूर्वपरिचित नाही.

(७) रघुनाथ भट्टचाऊरकर : चाऊरकर ऊर्फ चावरे हे देशस्थ आडनाव आहे चावऱ्यांचे कूळ सध्या नरिथडीला प्रसिद्ध आहे. नाव पूर्वपरिचित नाही. हे राजाचे पंडित.

(८) विश्वनाथ भट्ट ढोकेकर : देशस्थ ब्राह्मण. राजाच्या मर्जीप्रमाणे चालण्यात चतुर म्हणून जयराम यांचे वर्णन करतो. नाव पूर्वपरिचित नाही.

(९) नीळकंठ भट्ट श्रोत्रिय : श्रोत्रिय म्हणजे श्रोत्री हे देशस्थ आडनाव पुणे, सातारा, नगर या प्रांतांत आढळते. हा राजाचा श्रोत्रिय, राजापुढे भारतादि पुराण वाची. नाव पूर्वपरिचित नाही.

(१०) प्रल्हाद सरस्वती : सरस्वती हे देशस्थ आडनाव. हा दरबारी कवी होता. नाव पूर्वपरिचित नाही.

(११) वीरेश्वर भट्ट चतुर : हा राजाच्या पदरचा गायक. चतुर हे देशस्थ आडनाव. चतुर साबाजी या मुत्सद्द्याच्या जोडनावात हे आडनाव आढळते. साबाजीपंत ह्या निजामशाही मुत्सद्द्याचें आडनाव चतुर. साबाजीपंत हा देशस्थ ब्राह्मण; कायस्थ नव्हे. हे पंत या विशेषणावरून स्पष्ट आहे. हे नाव पूर्वपरिचित नाही,

(१२) अक्कय्यशास्त्री पल्लकचेरीकर : हा तत्कालीन प्रसिद्ध शास्त्री. नाव पूर्वपरिचित नाही. कर्नाटक ब्राह्मण.

(१३) तुकदेव : तुकदेव हे देशस्थात आडनाव आहे. हा पुराण सांगण्यात मोठा पटाईत असे. तुकदेवाचे घराणे वाई प्रांतात आहे.

(१४) शेष पंडित : शेषपंडित म्हणजे शेषोपंत. शेष हे व्यक्तिनाम ब्राह्मणात व ब्राह्मणेतरात आढळते. शेखोजी आंग्रे म्हणजे मूळ शेषोजी आंग्रे. शेषोपंतांचे आडनाव कवीने दिले नाही. नाव पूर्वपरिचित नाही. हा सर्वशास्त्रज्ञ होता म्हणून जयराम म्हणतो. जगन्नाथ हे शेषोपंतांचे आडनाव असावे. शिवाय हे पद क्लिष्टही आहे. शहाजहानकालीन जगन्नाथपंडिताची ही स्मृती हे पद करून देते. जगन्नाथ जसा शहाजहानाच्या दरबारी तसा शेष शहाजीच्या दरबारी.

(१५) अनंत शेष पंडित : हा काशीतील शेष उपनावाचा विद्वान पंडित पुणतांब्याहून शालिवाहनाच्या तेराव्या शतकात महाराष्ट्रात जेव्हा सर्वत्र यावनी माजली तेव्हा श्रीक्षेत्र पुण्यस्तंभ येथील पाच पट्टीच्या विद्वानांची घराणी आपली हजारो पोथ्यापुस्तके घेऊन श्रीक्षेत्र वाराणसी येथे देशत्याग करून गेलीं. त्यातले हे शेषांचे घराणे. ह्या शेष घराण्यातील वीरेश्वर शेषापाणी प्रसिद्ध कविवर जगन्नाथ पंडिताने पातंजलभाष्याचा अभ्यास केला असे जगन्नाथाने आपल्या रसगंगाधरात लिहिले आहे–

'शेषांकप्राप्तशेषामलभणिति रभूत् सर्वविद्याधरो यः' जगन्नाथ शहाजहान व शहाजी यांचा समकालीन होता, हे सर्वसिद्ध आहे. शहाजीराजांच्या आश्रयास आलेला अनंत शेष हा अलंकारशास्त्रज्ञ होता. हे नाव परिचितांपैकी आहे.

(१६) संभाजी राजे भोसले : हा शहाजी व जिजाई यांचा वडील पुत्र व शिवाजीचा ज्येष्ठ बंधू. नाव परिचित आहे. याचा विधियुक्त यौवराज्याभिषेक झाला होता, असे जयराम लिहितो.

(१७) यलोजी महाले घंटाघोष : यलोजीला दोन आडनावे होती, महाले व घंटाघोष. हा देशस्थ ब्राह्मण. योग, न्याय, मीमांसा, काव्य, नाटक, अलंकार इत्यादि शास्त्रात व कलात निष्णात असा हा विद्वान पंडित युवराज संभाजी राजे भोसले यांचा परमस्नेही होता, असे जयराम लिहितो. हे नाव पूर्वपरिचित नाही. ह्याच्या वर्णनात जयराम भानुविरचित रसमंजरीचा उल्लेख करतो. नायकभूषण म्हणून विशेषण यलोजीला कवी लावतो, त्यावरून कदाचित् पिढीजात धंद्याने हा सराफ असावा.

(१८) रघुनाथ पंडित : रघुनाथ नारायण हणमंते, नारोपंत हणमंत्याचा पुत्र. हा वयाने तरुण परंतु बुद्धीने पोक्त होता. काळचा लोखंडी बोरूची लेखणी कानावर ठेवून हा राजापुढे आला. हा हर हुन्नरकला जाणणारा होता. राजाच्या सांगण्यावरून जयरामाचा आदर याने केला. नाव पूर्वपरिचित आहे.

(१९) सखोपंडित : आडनाव दिले नाही. भांडागार, वागा, थट्टी, कलावंत यांच्यावरील अधिकारी असे. सेवकांना पगार वाटण्याचे काम याजकडे असे. सर्व लोकांशी मित्रत्वाने वागण्यात व मिठ्ठे बोलण्यात हा प्रवीण असे. राजाचा हा केवळ बहिश्चर प्राण असे. नाव पूर्वपरिचित नाही.

(२०–२१) रघुनाथपंत व लक्ष्मणपंत : दोन दरबारी मुत्सद्दी. यांना लोलिंबकर्मकरो ल्लंबौ असे विशेषण कवीने लाविले आहे. लोलिंबकर्म म्हणजे नर्मकर्म संपादण्यात राजाचे हे साह्यकारी होते. राणीवंशाची व्यवस्था पाहण्याचे काम याजकडे असावे. नावे पूर्वपरिचित नाहीत.

(२२) दत्तो नागनाथ : हा शहाजीराजांच्या दरबारचा कोणी सुप्रसिद्ध मुत्सद्दी असावा. ह्याचा व जयरामकवीचा काही शरीरसंबंध होता. नाव पूर्वपरिचित नाही.

(२३) विश्वनाथभट्ट मंगल पाठक–याजकडेस प्रातःस्मरण उच्च व मधुरस्वराने पढून राजाला उठविण्याचे काम असे. नाव पूर्वपरिचित नाही. विश्वनाथभट्ट ढोकेकराहून हा इसम निराळा असावा.

(२४) प्रभाकरभट्ट राजगुरू : हा राजाचा वर्षपुरोहित व राजगुरू. ह्याचे चरणतीर्थ राजा ग्रहण करीत असे. नाव पूर्वपरिचित नाही.

(२५) मल्लीनाथ वंशज : रघुवंशादि महाकाव्यांवर टीका करणारा मल्लीनाथ त्रिचनापल्लीचा राहणारा. त्याचे तीन-चार वंशज आश्रयार्थ राजाकडे आले असता,

त्यांची व राजाची गाठ प्रभाकरभट्ट राजगुरू यांच्याद्वारा जयरामाने घालून दिली. नावे कवीने दिली नाहीत.

(२६) भीमराव : भीमराव हा जासुदांचा मुख्य असे. नाव पूर्वपरिचित नाही.

(२७) अभेद गंधाधर : एकोजी राजा संभाजी राजाच्या मरणोत्तर युवराज झाला, त्याचा आमात्य. ह्याचे आडनाव अभद. अभद म्हणजे अभयद. अभयद म्हणजे अभयंकर, अभ्यंकर. हे आडनाव चितपावन दिसते. हा वेदव्युत्पन्न असून अग्निहोत्री असे. मनाचा दयाळू असून पापभीरू असे. ह्याची जयरामावर कृपादृष्टी असे.

(२८) एकोजीराजे भोसले : शहाजी व तुकाई यांचा पुत्र, संभाजी व शिवाजी यांचा कनिष्ठ सापत्न बंधू. संभाजीनंतर खरे पाहता शिवाजीला युवराजपद मिळावयाचे, परंतु शिवाजीने त्याकाली स्वतंत्र्य राज्यच कमाविण्याचा उपक्रम केल्यामुळे दूरवर्तित्त्वामुळे युवराजपद शहाजीने समीपवर्ती एकोजीराजास दिले. नाव एकोजी, एकराज असे दिले आहे, व्यंकोजी असे दिले नाही. खरे मूळचे नाव एकाजी, एकराज की, व्यंकोजी, व्यंकटेश ? कर्नाटकात हे व्यंकटश दैवत मोठे प्रख्यात आहे. त्या प्रांतात पुत्र झाला म्हणून व्यंकटेश, व्यंकोजी हे नाव शहाजीने आपल्या मुलास ठेविले असण्याचा संभव आहे. मूळ व्यंकटेश हा अपभ्रंश विकंकटेश ह्या संस्कृत शब्दाचा आहे. व्यंकटेश ह्या अपभ्रंश शब्दाचा अपभ्रंश वेंकट, वेंकू, एकू, एकोजी. उलटपक्षी, एक हेही शहाजीच्या मुलाचे पाळण्यातील नाव असू शकेल. एक शब्दापासून एकू, एकोजी. एकोजी व एंकोजी ह्या दोन शब्दांचा उच्चार बहुतेक सारखा असल्यामुळे कोठे, कोणी एकोजी असा उच्चार करीत व कोणी एंकोजी उच्चार करीत. एंकोजी उच्चार करणारे मूळ नाव व्यंकोजी समजत व एकोजी उच्चार करणारे एक समजत. ह्यातून खरे मूळ पाळण्यातील नाव कोणते त्याचा निर्णय मूळ पत्रिका वगैरे सापडल्याशिवाय करता येणे मुष्कील आहे. तथापि समकालीन जयराम ज्या अर्थी एकराज, एकोजी हे नाव देतो, त्याअर्थी तेच मूळचे नाव असावे; असा तात्पुरता निर्णय करणे वावगे नाही. सोमवंशीय पुरूरव्याच्या रयनामक पुत्राच्या पुत्राचे नाव एक असे होते. सिंह, शरभ ही जशी पुरातन भारतीय नावे तसेच एकही पुराण भारतीय व्यक्तिनाम आहे.

(२९) कृष्णभट्ट विदूषक : हा एकोजीराजाच्या पदरचा विदूषक ऊर्फ खुषमस्कऱ्या. विदूषक ऊर्फ खुषमस्कऱ्ये बाळगण्याचा परिपाठ आपल्या ह्या देशात फार प्राचीन आहे. पेशवे व पेशव्यांचे सरदार यांचेजवळ खुषमस्करे असत दक्षिणेतील काही सरदारांच्या येथील काही खुषमस्कऱ्ये मी पाहिलेले आहेत खुषमस्कऱ्या म्हटला म्हणजे तो वाकडयातिकडया अंगाचा व अवयवांचा, ठेंगू, औपरोधिक थट्टा करण्यात– परंतु खरा अर्थ धन्याच्या मनात भरवून देण्यात– निष्णात असा असे. एकोजीचा कृष्णभट ह्याच वर्गातील दिसतो. नाव पूर्वपरिचित नाही.

(३०) बघेल कवी : नाव दिलेले नाही.

(३१) जनार्दन पंडित : जनार्दन नारायण हणमंते. नारायण समर्थ म्हणून जयरामकवीने स्पष्ट म्हटलेच आहे. ह्याची चालचलणूक रुबाबदार असून हा शिव व विष्णू ह्या दैवतांचा उपासक होता. कर्नाटकात शैव व वैष्णव यांचे वेड व द्वैत फार सबब, दोघांचाही मिलाफ एकमेव अद्वितीय ब्रह्मांत म्हणजे भागवतधर्मात करणारा हा मुत्सद्दी तरुण युवराज जो एकोजी त्याच्या दरबारास साजेसाच होता. हे पूर्वपरिचित नाव आहे.

(३२) कमलाकर : हा यशवंतराव श्रीकरणाधीश याचा आश्रयदाता. ह्याचे उपकार यशवंतरावाने योग्यतेस चढल्यावर फेडिले. हे नाव आहे की आडनाव आहे न कळे.

(३३) यशवंतराव : हा एकोजीचा श्रीकरणाधीश. हा राज्यातील करवसुलीचा अधिकारी व विद्वान ब्राह्मणांचा कैवारी होता. नाव अपरिचित.

(३४) कोयाजीराजे भोसले : हा शहाजीचा रक्षापुत्र. याच्यावर एकोजीराजाची फार कृपादृष्टी असे. नाव पूर्वपरिचित नाही.

(३५) त्रिमल्लवेंकट नाईक : हे दोघे शहाजीच्या दरबारचे प्रख्यात कानडी गवई. नावे पूर्वपरिचित नाहीत.

ही पस्तीस नावे शहाजीमहाराजांच्या खास दरबारातील कारभाऱ्यांची, पंडितांची व कवींची झाली. ह्यापैकी बहुतेक सर्व संस्कृत व प्राकृत भाषा जाणणारे असून कित्येक तर पट्टीचे शास्त्रज्ञ व कलाज्ञ होते. शहाजी महाराजाने एकोजी राजाला जेव्हा युवराजपद दिले त्यावेळी त्याने त्याला कारभारीही पिढीजात मंडळींतून निवडून दिले. बखरीतून लिहिलेले असते की, बेंगळूराहून शिवाजीराजांची पुणे प्रांती रवानगी झाली तेव्हा त्याजबरोबर अमात्य वगैरे कारभारी नेमून दिले होते. त्या लिहिण्यात किती तथ्य आहे ते वरील प्रघातावरून स्पष्ट दिसते. राजपुत्रांना फार लहान वयापासून कारभारी नेमून देऊन, त्यांच्याकरवी त्यांना राजकीय व्यवहारशिक्षण भोसले मंडळी देत असत. एकोजीराजाला युवराज हा किताब असून शिवाय सवाई महाराज असाही अलकाब त्याच्या नावापुढे जोडीत. तेव्हा शिवाजी महाराजांना महाराज हे पद फार लहान वयात लावण्यात आलेले कागदोपत्री आढळल्यास त्याचे आश्चर्य वाटायला नको. महाराज ह्या किताबाखेरीज छत्रपती हा लौकिक किताब शिवाजी महाराजांना जनतेकडून फार लहानपणी मिळालेला आहे. शिवाजी हा दरिद्री, टाकून दिलेला, दरवडेखोर पोर होता, तेव्हा त्याला राजा, महाराजा व छत्रपती हे किताब अल्पवयात मिळणे अशक्य होते अशी कित्येक तुटपुंज्या माहितीच्या लेखकांची समजूत कशी झाली असावी तेही आता समजून येण्यास मार्ग होतो. राजा हा तर किताब सर्व अस्सल दक्षिणी मराठ्यांना वंशपरंपरेने हजारो वर्षे लागत आलेला आहे.

नाना प्रकारच्या समस्या व त्यांची जयरामकृत उत्तरे ऐकून शहाजी राजा कवीवर

बहुत खुष झाला. त्यामुळे जयरामाचे नाव दाही दिशांत दुमदुमू लागले. तेव्हा जयरामाने प्रतिप्रसन्न होऊन राजावर जे कवित्त केले त्यात म्हटले आहे की, ' हे राजा, तू जे जे देश जिकलेस किंवा पाहिलेस त्या त्या देशाची भाषा मी शिकलो आहे व तुझ्या आश्रयाला आलो आहे. संस्कृत एक, व मराठी, गोपाचलीय, गुर्जर, वक्तर, ढुंढार, पंजाबी, हिंदुस्थानी, बागलाणी, फारशी, उर्दू व कानडी, अशा अकरा मिळून बारा भाषा कवीला येत होत्या. ह्या बारा भाषा जेथे बोलत होत्या ते देश शहाजीने जिंकिले किंवा पाहिले, असे जयराम म्हणतो. पैकी, कानडी व मराठी ह्या दोन भाषा ज्या कर्नाटक व महाराष्ट्र देशात बोलत ते देश शहाजीने साक्षात् जिंकिले व पाहिले होते. संस्कृत पंडितांची भाषा, फारसी यवनांची भाषा व उर्दू लष्करातील भाषा शहाजीच्या नित्याच्या परिचयाच्या होत्या. तेव्हा त्यासंबंधाने जयरामाच्या विधानाला हरकत घेण्याचे कारण नाही. अहमदनगरच्या बहिरी निजामशाहीची गादी मोगलांच्या तडाक्यातून बचावीत असता, बागलाणी व गुजराथी भाषा जेथे बोलतात, त्या बागलाण व गुजराथ प्रांतात शहाजीला शिरावे लागले हे सुप्रसिद्ध आहे. एकूण सात भाषांचा हिशेब लागला. बाकी राहिल्या ब्रज, बख्तर, ढुंढार, पंजाबी व हिंदुस्थानी ह्या पाच भाषा व देश. हे देश शहाजीने कधी जिंकले किंवा निदान पाहिले ? मलिकंबराची पातशहा जहांगीर आणि शहाजादा शहाजहान याशी १५४० च्या सुमारास जी युद्धे झाली त्या युद्धात तरुण शहाजी वृद्ध मलिकंबराबरोबर मांडवगडापर्यंत गेला होता. मांडवगडच्या स्वारीत ब्रज, हिंदुस्थानी, बख्तर, व ढुंढार या भाषा जेथे बोलतात त्या मध्यहिंदुस्थानात शहाजी गेलेला होता. ह्या स्वारीत नेमाडी, रजपुतानी व मारवाडी ह्या भाषा शहाजीच्या कर्णपथावरून गेल्या असल्या पाहिजेत. आता राहिली फक्त पंजाबी. पंजाबात म्हणजे दिल्लीच्या पश्चिमेस व खुद्द दिल्लीस शहाजी केव्हा गेला असावा; जयरामाच्या लिहिण्यावर जर विश्वास ठेविला तर गृहीत धरावे लागते की, जेथे पंजाबी भाषा बोलतात त्या पंजाबात शहाजी गेला होता. मांडवगडच्या स्वारीत माळव्यात गेला असता, वाघेलखंड, मथुरा, दिल्ली, लाहोर, व काशी, ही स्थाने तरुण व उमद्या शहाजीने सरकारी तह, सल्ला, कुमक वगैरे कामानिमित्त पाहिली असावीत असे म्हणावे लागते, त्याशिवाय जयराम इतक्या निश्चयाने खुद्द शहाजीच्या तोंडासमोर असे विधान करणार नाही. निजामशहाच्या व शहाजीच्या लष्करात पंजाबपासून लखनौपर्यंतच्या व हरद्वारापासून इटार्शीपर्यंतच्या मुलखांतील हजारो उनाड हिंदू व मुसलमान लढवय्ये शिपाईगिरी करून असत. त्यांच्या पंजाबी, बख्तर, ढुंढार, उर्दू, हिंदुस्थानी, इत्यादी भाषांशी शहाजीचा परिचय झाला असेल या बाबी संबंधाने वाद नाही. स्वतःच्या लष्करात शहाजी ह्या भाषा सदोदित ऐकत होता. परंतु ह्या भाषा ज्या प्रांतात बोलल्या जात होत्या, त्या प्रांतात शहाजी कधी गेला असेल, हा वादाचा व संशयाचा प्रश्न आहे व शहाजी मलिकंबराच्या नर्मदेपलीकडील मांडवगडच्या

स्वारीच्या काळी त्या प्रांतांतून जाऊन आला असावा, अशी संशयनिवृत्ती होण्यासारखी आहे. मांडवगडाच्या स्वारीच्या वेळी शहाजी ऐन पंचविशीच्या भरात होता, आणि शारीरिक व मानसिक गुणांनी संपन्न असून, दहा पाच हजार लष्कराचा कप्तान होता. अशा पराक्रमी सरदाराच्या अवलोकनात जयराम म्हणतो ते देश त्या काली आले असण्याचा संभव आहे.

नारायणभट्ट गुरू : शहाजी जर आपल्या बाजूस मिळेल तर आपल्याला फार जोर येईल असे शहाजहान म्हणाला, या बाबीवर कवित्व करण्यास नारायणभट्टाने जयरामास सांगितले. तेव्हा जयरामाने खालील कोटी केली. भगवान् शेषशायी नारायणाने ब्रह्मदेवाला पृच्छा केली की, ब्रह्मदेवा ! त्रिभुवन सुखी आहे ना ? तेव्हा ब्रह्मदेवाने उत्तर केले की, नारायणा ! त्रिभुवन सुखी आहे, आपण क्षीरसिंधूत खुषाल पडून असावे. कारण त्रिभुवन चारी दिशांनी सुरक्षित आहे. पूर्वेस सूर्य व पश्चिमेस चंद्र खडा पहारा करीत आहेत. आणि उत्तरेस शहाजहान व दक्षिणेस शहाजी जय्यत राखण करीत आहेत. शक १५५० च्या सुमारास शहाजीचे प्रस्थ केवढे वाढले होते ते वरील उक्तीवरून स्पष्ट होते. इत शहाजू है, उत शाहजहां, इकडे शहाजी व तिकडे शहाजहान, अशी म्हण त्याकाली सर्व भारतखंडभर सर्वतोमुखी झाली होती, तीच जयरामाने काव्यात गोवून दिली. शक १५५६ च्या सुमारास शहाजीची चाळिशी उलटली, असे वर्णन जयराम पुढे एका कवित्तात करतो. एका लढाईत शहाजीने आपल्या तरवारेने समोर चालून आलेल्या हत्तीची सोंड उतरल्याचे वर्णनही जयरामाने दुसऱ्या कवित्तात केले आहे.

शेष व्यास काशीकर : यालाही शहाजीकडून वर्षासन असे. देव व शेष व्यास, वगैरे काशीकर विद्वानांचा व भोसल्यांचा संबंध केवळ शिवाजीच्या वेळी नव्याने घडून आला असे नव्हे. तर शहाजीमहाराजांपासूनच काशीकर विद्वानांचा बडेजाव भोसल्यांच्या दरबारी होत आला आहे. स्वदेशी व परदेशी हजारो विद्वानांना शहाजीकडून वर्षासने पोहोचत असत असे जयराम लिहितो. काशीकरांच्या वर्षासनांसंबंधी लिहिताना जयरामाने शहाजीची तुलना धर्म, शिबि, हरिश्चंद्र, पुरू, जनक, यांशी केली आहे.

बलिभद्र कवी : याला शहाजीने हत्ती दान दिला. याच्या समस्येस उत्तर देताना शहाजीच्या मीरजुमल्यावरील स्वारीचा विस्तृत उल्लेख जयरामाने केला आहे. मीर जुमला हा इराणी जवाहिऱ्या अबदुल्ला हुसेन कुतुबशहा याचा वजीर. संपत्तीबद्दल व मुत्सद्देगिरीबद्दल हा त्या काली सर्व हिंदुस्थानात महशूर होता. शक १५७४ त याने दक्षिण कर्नाटकावर तैलंगणातून म्हणजे गोवळकोंड्याहून स्वारी केली. कर्नाटक जिंकण्याची आदिलशहाप्रमाणेच कुतुबशहांनाही जरुरी व लगत्याचा मुलूख म्हणून सोय होती. आदिलशहाच्यावतीने म्हणून शहाजी कर्नाटकात गेला. मीर जुमला कर्नाटकात उतरल्यावर त्याच्याशी शहाजीचे खडाजंगी

युद्ध झाले. त्यात मीर जुमल्याची पराकाष्ठेची दुर्दशा शहाजीने उडवून दिली. कवी म्हणतो–जुमला लढे ही ना, आडकाठीही करी ना, खडा राहून भांडेही ना, असा अगदी जेरीस आला. पळता भुई त्याला थोडी झाली. शेवटी शहाजीने त्याला गुत्तीच्या किल्ल्यात वेढा देऊन कोंडिले. भयाने बरोबरचे सर्व सैन्य सोडून देऊन, गुत्तीच्या उंच किल्ल्यावर जुमला लपून बसला व नामोहरम होऊन अखेरीस तहास आला. मीर जुमल्यावरील ह्या स्वारीमुळे शहाजीचे नाव रूमशामपर्यंत प्रख्यात झाले. शहाजीच्या या बड्या स्वारीचे वर्णन मुसुलमान तवारिखकार देत नाहीत. इतकेच नव्हे तर उल्लेखसुद्धा करीत नाहीत. आदिलशाहाच्या किंवा निजामशाहाच्या अमुक अमुक मुसलमान सरदाराने अमक्या तारखेस अमुक केले, असा मजकूर लिहून शहाजीचे नाव दुय्यम किंवा तिय्यम म्हणून हे तवारिखकार अधूनमधून क्वचित् काढतात व शहाजी प्रबळ झाला म्हणूनही लगेच तक्रार करितात. ह्या लिहिण्याचा अर्थ उघड आहे मुसुलमानी पातशाहीत मराठा सरदार प्रबळ होऊन, लढाया जिंकून डोईजड झाल्याची हकीकत सहजच विकारवश होऊन हे तवारिखकार लिहीत नाहीत. कुतुबशाहाकडील सरदार मीर जुमला याशी शहाजीचे जे युद्ध झाले ते शके १५७४ त शहाजी विजापूरच्या कचाटयातून स्वतंत्र झाल्यावरचे असल्यामुळे मुसुलमान तवारिखकार त्याचा उल्लेख आदिलशाही तवारिखेत करीत नाहीत, हेही अनुल्लेखाचे कारण आहे. आदिलशाही बंधन ढिले करून शहाजी स्वतंत्रपणे कर्नाटकात राज्य कधी करू लागला, त्याचे विवेचन पुढे येणार आहे. मीर जुमल्यावरील स्वारीचे वर्णन हिंदी व मराठी अशा दोन्ही भाषात प्रस्तुत चंपूत आले आहे. मीर जुमला जवाहिऱ्या अत्यंत श्रीमान् असून पराकाष्ठेचा कवडीचुंबक होता, असे खालील पद्यावरून दिसते :

> गडांत मिर जुमला सकलिकी जही कोंडिला।
> उदंड रण मांडिला परि रुका न त्याणे दिला॥

शहाजीने जुमल्याला गडात कोंडून सडकून चोपला, पण त्याने कवडीही दिली नाही. शेवटी लाचार होऊन व भीतीने गांगरून जाऊन तो शहाजीला शरण आला. त्याला दिल्लीश्वराचा पुत्र जो अवरंगझेब त्याचे पाठबळ होते. परंतु, शहाजीपुढे त्याला मान वाकवावी लागली. पातशाहाजादा अवरंगझेब याच्यासारख्याचे पाठबळ असलेल्या कुबेरतुल्य मीर जुमल्याचा पराभव करून, शहाजीने दिगंत कीर्ती मिळविली आणि आदिलशाहांना लघुत्वाप्रत पोहोचविले.

सुखलाल : मीर जुमल्यावरील गुत्तीच्या स्वारीनंतर कवीने म्हणजे सुखलालाने विजयानगरच्या रायलूवरील स्वारीचा उल्लेख केला आहे ह्या स्वारीत शहाजीने जंतकलची लढाई मारिली व रायलूची सर्व फौज धुळीस मिळविली. तेव्हा विजयानगरच्या राजाने क्षत्रियत्वाची लाज सोडून पलायन केले. ही वार्ता ऐकून, कवी म्हणतो, शहाजीची ख्याती सर्व राजाहून श्रेष्ठ झाली आणि शहाजीच्या कथा

भरतखंडात सर्वतोमुखी झाल्या. गुणिजनांना तर शहाजी कर्ण किंवा भोज यांचा अवतार भासला व त्यांनी त्याला शिसोद्यांच्या कुळाचा अवतंस ही पदवी दिली. शिवाजीला पुढे क्षत्रियकुलावतंस म्हणजे भरतखंडातील सर्व क्षत्रियकुळाचा अवतंस ही पदवी विद्वानांनी दिली. तिच्या फार पूर्वी शहाजीला शिसोदेकुलावतंस ही पदवी कवीने दिलेली लक्षात ठेवण्यासारखी आहे. ह्या काली, कवी म्हणतो की, शहाजीची छाप गोवळकोंडा व श्रीरंगपट्टण या प्रांतांवर बेमालूम बसली व कर्नूळ वगैरे कर्नाटकातील बहुतेक प्रांत शहाजीच्या हाती आले. ह्या काली महंमद आदिलशाहाची सर्व भिस्त शहाजी महाराजांवर होती. शहाजीजवळ ह्या काली साठसत्तर हजार फौज असून अफजलखान महम्मदशाही हा आदिलशाही सरदार व शहाजहान हे त्याला वचकून असत. मोंगलाला सरहद्दीपलीकडे हाकून देऊन, सर्व दुश्मनांना जमीनदोस्त करून, व कर्नाटकातील सर्व जमीदार वठणीस आणून, शहाजीने महम्मदशाहाचे इतके प्रेम संपादिले की, तो सांवतराय ह्या मुत्सद्द्यापाशी वारंवार म्हणे की, मेरी बादशाही शहाजीने राखी है ! ! ! सांवतारावाच्या द्वारा शहाजी महमदशहाशी पत्रव्यवहार करीत असे. तसेच कोणाच्या हातून झाले नाही ते कर्नाटक जिंकण्याचे काम शहाजीने केले-असे उद्‌गार महंमदशहाने काढिले. येणेप्रमाणे सेतुबंधरामेश्वरापासून रूमशामपर्यंत शहाजीच्या पराक्रमाची राय पसरून गेली. यानंतर कवीने शहाजीच्या पिन्गोडा ऊर्फ पेन्‌कोंडा प्रांतावरील स्वारीचा उल्लेख केला आहे त्यात तो म्हणतो की, पिन्गोडा शहाजीमहाराजांनी खलास केला आणि त्याचे श्रेय दरबारी म्हणजे आदिलशाहाच्या दरबारी यखलासखानास मिळाले ! कितीही पराक्रमी पुरुष असो, तो जोपर्यन्त दुसऱ्याचा नोकर म्हणून मिरवतो, तोपर्यंत त्याच्या पराक्रमाचे सर्व श्रेय त्या दुसऱ्याच्या नावाला जाते. बापाची ही मानहानिकारक गुलामगिरी पाहून, शाहाजीचा मुलगा जो शिवाजी तो प्रथमपासूनच कोणाची ताबेदारी न करता स्वतंत्र बाण्याने वागू लागला. तालीकोटच्या लढाईनंतर विजयानगरचे राजे पिन्गोड्याच्या किल्ल्यात रहात असत. हा किल्ला कर्नाटकातील दुर्भेद्यातील दुर्भेद्य असा त्या काली मानला गेला होता. पिन्गोड्याच्या स्वारीनंतर तेलीचेरी प्रांतावर शहाजीने स्वारी केली म्हणून कवी वर्णन करतो.

जदुराय : हा कवी शहाजीसंबंधाने विनोदाने म्हणतो की, राजा ! तुझ्यासारख्याची पारख कोणाला नाही. तुझ्या हाती चामड्याचे दाम लाल होतात ! येथेच शहाजीमहाराजाचा उजवा नव्हे, डावा नव्हे तर, केवळ हातच असा जो संताजी राजा त्याचे वर्णन कवीने केले आहे. संताजी राजा हा शहाजीला नरसाबाईच्या पोटी झालेला पुत्र होय. नरसाबाई ही शहाजीची गौण स्त्री. सबब कवीने हिचे नाव जिजाई व तुकाई यांची नावे देताना दिले नाही. याच अनुषंगाने जयरामाने दरबारातील फाल्गुन मासच्या वसंतलीलेचे वर्णन केले आहे.

दुर्ग ठाकूर : दुर्ग ठाकूर हा शहाजीचा सलगीतला कवी दिसतो. राजा ह्याला दर महिना एक होन पगार देत असे. एकदा राजाने त्याला एक घोडा व पालखी बक्षीस दिली. ह्याच्या सांगण्यावरून राजाने जयरामाला सत्तावीस मराठी पद्यरत्ने गुंफण्याची आज्ञा केली व ती जयरामाने आनंदाने मान्य केली. ह्या मराठी पद्यात– (१) तरवारीच्या एका कचक्याने शहाजीने पर्वतप्राय हत्तीचे शीर कसे तोडले, (२) रणात भाल्याने शत्रूची बख्तरे शहाजी कशी फोडी, (३) शत्रूच्या स्त्रिया तुंगभद्रेच्या तीरी पर्णकुटी करून भिलडीची रकटी नेसून कशा लपत, (४) शहाजीने यवन जमीनदोस्त केले म्हणून कर्नाटकातील ब्राह्मण त्यास धन्यवाद कसा देत, (५) वैदिक विद्येचे संगोपन शहाजीच्या हस्ते कसे झाले, (६) शहाजी व शहाजहान यांनी हिंदुस्थानची व दक्षिणेची वाटणी कशी केली, (७) शहाजीने जयरामास सुलक्षणी घोडा बक्षीस कसा दिला, (८) कवी यदुराज आणि एक मुलगा ह्यांच्यात गमतीचा हास्यकारक संवाद कसा झाला, (९) युधिष्ठिर व शालिवाहन हे रेवा उल्लंघू शकले नाहीत, परंतु शहाजीने ती नदी कशी ओलांडली, (१०) लहान लहान बालकवी शहाजीपुढे पद्ये कशी म्हणत आणि शहाजी त्यांना कसा नावाजी वगैरे वर्णन आले असून जयरामाने नंतर बारा भाषांत पद्ये करून ती राजाला समर्पण केली. त्यातील मराठी पद्यांचा सारांश असा : तुझ्या दरबारात मोठमोठ्या कवीस आश्रय मिळतो, तेथे माझ्यासारख्या क्षुद्र कवीचे पोट भरल्यास त्यात आश्चर्य कसले ? असा प्रस्ताव करून जयराम खालील तपशील देतो. दक्षिण भूमी ही शहाजीची नवरी आहे. वलिपास नावाचा शिसोद्यांच्या कुळात एक राणा झाला. त्याच्या वंशात मालोजीराजे भोसले जन्मले. मालोजीने शंभुमहादेवावर तळे बांधून देव संतुष्ट केला. मालोजीची राणी उमाई हिचे पोटी राजा शहाजी जन्मला. शहाजीने आसमुद्र पृथ्वीचे पालन केले आहे. शहाजीच्या सैन्याचा तळ दीड दीड गाव लांब-रुंद पडे. शहाजी सदा युद्धकर्मात गुंतलेला असे. क्वचित रिकामा वेळ सापडल्यास त्यात तो पंडितांशी ब्रह्मचर्चा करी, कवींना समस्या घाली व भाटांची कवने आइके किंवा शाहिरांचे मराठी पोवाडे श्रवण करी, कधी शुकसारिकांच्या आलापाने मन रिझवी, कधी नाचबैठक पाही, कधी यज्ञयाग करवी, कधी कारभाऱ्याशी खलबत करी, कधी साधूसंतादी महानुभावास म्हणजे योग्यास दरबारी भेटीस आणी, कधी सत्पात्री दानधर्म करी व कधी आंधळ्या–दुबळ्यांचा समाचार घेई. भरतखंडात जी बारा ज्योतिर्लिंगे आहेत त्यांची त्रिकाळ पूजा शहाजीच्या खर्चाने चाले. त्याला सर्वतोप्रकारे शोभणारी अशी जिजाई नामे स्त्री आहे, तिची कीर्ती सर्व भरतखंडभर लोक गातात. राजाची दुसरी स्त्री आहे, ती रोज नित्यदाने देत असते. शहाजीचा पुत्र शिवाजी तर असा बिंडा निपजला आहे की, मोंगलादि चारी पातशहांना त्याने सतावून जेरीस आणिले आहे. शिवाजीचा धाकटा भाऊ जो एकोजीराजा तो इंद्राला जसा उपेंद्र तसा शिवाजीला शोभतो. असा शहाजी-

महाराजा हा केवळ जगन्नाथ आहे. लोक शहाजीचे दर्शन घेण्यास टपलेले असतात. शहाजीची बरोबरी राजा जनकालाही करता येणार नाही. देशोदेशींच्या बायका आपल्या नवऱ्यांना शहाजीची भेट घेण्यास जा आणि शहाजीराजा आपल्या मनात धरून घरी आपणास दाखवावयास आणा म्हणून नवऱ्यांना बजावतात. शहाजीराजाची नजर परधन आणि परस्त्री यांचा अपहार करण्याकडे नाही.

सुबुद्धिराव : ह्याला शहाजीने काही दिवस आपल्याजवळ ठेवून घेतले होते. हा उत्तर देशातील घाटमपूरचा राहणारा. ह्याने उत्तरदेशो भाषेत शहाजीराजे शिसोदे यांचे वर्णन असे केले आहे की, शहाजी महाराजाच्या दानशूरत्त्वापुढे इतर राज लज्जायमान झाले. हा कवी म्हणतो की, शहाजीमुळे सर्व हिंदूंची बूज राहिली व जसे श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलून धरून गोपींचे संरक्षण केले तसे शहाजीने आपल्या छत्रसिहासनधारणाने सर्व हिंदूंचे रक्षण केले. ह्या कवीच्या शब्दांचा वाच्यार्थ असा होतो की, शहाजी सिंहासनाधीश्वर व छत्रपती नावाने झाला नसला तरी कृतीने झाला होता.

ढुंढरी कवी : ह्याने ढुंढार भाषेत कवित्व केले. त्यातील मतलब असा. शहाजीच्या फौजेचे कूच झालेले पाहून कोणी विचारिले की, फौज कोठे चालली ? तेव्हा भाटाने उत्तर दिले की, राजगड–चितोडच्या दिशेने फौज जाणार, राजा शहाजी हा चितोडच्या राण्याचा भाऊबंद आहे, तरी भिऊ नका. पण भय न समावून अमेरच्या राजाने शहाजीला अगोदरच निरोप पाठवला की, मी घासदाणा देण्यास तयार आहे. याचा अर्थ एवढाच की, उत्तरेकडील रजपूत दक्षिणेकडील भोसल्यांना सहानुभूती दाखविण्यास तयार होते आणि भोसल्यांना ते आपले भाईबंद समजत असत.

हिंदुस्थानी अनामक कवी : याने हिंदुस्थानी भाषेत स्तुती गायली आहे. हा म्हणतो – बर्गी, बक्सर, ठठ्ठ, भक्कर, बागलाण, काबूल या देशातील सरदार शहाजीच्या दरबारात सेवा बजावीत असतात. कोणी हात जोडून उभे आहेत, कोणी पुढे धावत आहेत, कोणी पैजार झाडीत आहेत, कोणी पिकदाणी धरींत आहेत, कोणी राजाच्या डोक्यावर छत्र धरीत आहेत, कोणी पेचकश संभाळीत आहेत, कोणी शहाजीचे स्तुतिस्तोत्र गात आहेत आणि कोणी नुसतेच उभे आहेत. कवीचा सांगण्याचा मनोदय असा आहे की, शहाजीच्या दरबारात व सैन्यात काबूल, पंजाब, हिंदुस्थान, बागलाण, ठठ्ठा, भक्कर वगैरे प्रांतातील राजा हे उपपद धारण करणारे लोक नोकरीस असत व नाना प्रकारची पडतील ती कामे करण्यास राजी असत.

मोरिरनाभाट : याने बागलाणीत स्तुती केली आहे. त्यात तो म्हणतो की, शहाजी ज्याच्यापासून चाकरी घेतो त्याला नौबत देतो आणि ज्याची चाकरी घेत नाही त्याला नागवा करून सोडून देतो. तसेच कवी आणीक लिहितो की, शहाजीच्या सैन्याच्या कुचाच्या कर्ण्याचा धुधुःकार ऐकून बागलाणच्या राणीला काय

करावे ते सुचेनासे झाले, आणि ती आपल्या दादल्याला म्हणाली की, तू आपल्या दाढीमिश्या खोडून व डोळचात काजळ घालून बायकोचा वेश घे आणि शहाजीच्या गोटात बटकीसारखा डोईवर मडके घेऊन पाणी भर !

बर्गीकवी : नाव पूर्वपरिचित नाही. आदिलशाहीत एकटा शहाजी तेवढा मर्द गाजी आहे, अशी ह्या कवीने उक्ती काढिली आहे. मोगलांना भय पडले, रूमशामवाले शिपाई डरले, आणि प्राण घेऊन जो बचला त्यावर खुदाची मर्जी म्हणूनच शहाजीच्या हातून सुटला, असेही उद्गार कवीने काढिले आहेत.

बलदेव नरायन व अनंत नरायन : अपरिचित.

येथे प्राकृतकवींची नामावळी संपली. प्रत्येक कवी जयरामाला समस्या घाली व जयराम त्या त्या कवींच्या भाषेत समस्येची पूर्ती करी. पूर्तीत शहाजीचा कोणता तरी वास्तविक गुण किंवा पराक्रम काव्यभाषेने गायिलेला आहे. म्हणजे ह्या परिशिष्ट खंडातील सुमारे दोनशे पद्ये शहाजीच्या स्तुतिपर आहेत. शेवटी चंपूच्या समाप्तीस वर्णन आहे की, जयरामाने आपल्या मातापितरांस काशीवास घडावा म्हणून राजापाशी द्रव्य मागितले व ते शहाजीने त्यास खुष होऊन दिले. अखेरीस राजाच्या समोर अशी सुंदर पद्ये गाऊन माझ्यासारखे पालखीपदस्थ व्हावे म्हणून इतर कवींना उपदेश करून जयरामाने परिशिष्टखंडाची व चंपूची परिसमाप्ती केली आहे.

१६. पसतीस दरबारी मंडळी व पसतीस आगंतुक मंडळी मिळून एकंदर सुमारे सत्तर इसमांची नावे चंपूत दाखल आहेत. बालकवी वगैरे दोन चार क्षुल्लकांचा समावेश ह्या सत्तरांत अनुपयोगी म्हणून केला नाही. नाहीतर ही संख्या पाऊणशे पर्यंत सहज वाढती. इतकी गुणीमंडळी ज्याच्या दरबारी शक १५७५ पासून शक १५८० पर्यंतच्या पाच वर्षांत जयरामाने प्रत्यक्ष पाहिली त्या शहाजीमहाराजांचे ऐश्वर्य कोणत्या प्रतीचे होते त्याचा अंदाज कोणालाही करता येण्यासारखा आहे. प्रातरुत्थान, राजसभा व सैन्ययात्रा यांची जी वर्णने जयरामाने केली आहेत त्यावरून अंदाजाने नव्हे तर प्रत्यक्ष पुराव्याने सिद्ध करता येते की, त्या काली एखाद्या स्वतंत्र राजाप्रमाणे शहाजीचा सर्व थाट असे. शहाजीची दिनचर्या येणेप्रमाणे असे.

पहाटेस शेजघराजवळ बाळसंतोष, कुडबुडचे जोशी व शाहीरलोक भूपाळचा वगैरेंचे मधुरालाप काढून राजाला सुखशय्येवरून उठवीत. इतक्यात विश्वनाथभट्ट उच्चस्वराने प्रातःस्मरण संस्कृत भाषेत करीत. कित्येक ब्राह्मण पुण्याहवाचनाचे म्हणजे राजाला सुखाचा दिवस जावो, अशा अर्थाचे मंत्र म्हणत, कित्येक विप्र ॐकारपूर्वक वेदपठन करीत, कित्येक स्वस्तिसाम्राज्यादि मंत्रांनी आशीर्वाद देत व कित्येक अग्निहोत्री वषट्कारार्पणात गुंतत. मंत्रपठनाच्या, भूपाळचांच्या व प्रातःस्मरणांच्या ह्या घांदलीत राजा शेजेवरून उठून अंगणात येऊन आकाशाकडे पाहून अरुंधती, शची, देवसेना, व आकाशगंगा इत्यादि तारांगणांवर नजर फेकून आणि

शिव, विष्णु, स्कंद ऊर्फ खंडोबा, ब्रह्मदेव, लोकपाल, इंद्रादि देव, होमशालेतील अग्नी इत्यादींचे दर्शन घेऊन दिशावलोकन करी. ह्याच सुमारास जंगम शंख फुंकीत, गुरव शिंग वाजवीत व घडशी चौघडा सुरू करीत. ह्या मंगलध्वनीच्या निनादात तुफान ऐरावत, सवत्स गाय, पुत्रिणी ब्राह्मणी, वर्धमान मानुष म्हणजे विदुषक, ठेंगू ब्राह्मण व पाण्यातून नुकताच बाहेर निघालेला डुक्कर हे शुभचिन्हक प्राणी राजापुढून जात. नंतर वाड्याच्या समोरील पटांगणात हजार पाचशे घोडेस्वार किंवा पाईक कवाईत करीत. त्यांची परेड देहलीदरवाजाच्या बाहेर येऊन पाहून, रथ, पालख्या, शिबिका वगैरे वाहनांचे अवलोकन राजा करी. इतक्यात दरवेशी एखाददुसरा सिंहाचा बच्चा व थट्टीकामदार एखादा माजलेला पोळ राजापुढे नाचत बागडत आणीत. नंतर हंस, चाप, मत्स्य यांचे शुभशकून घेत घेत व दरवाजावरील तोरणाकडे पहात पहात वाड्यापाठीमागील अश्वत्थ, औदुंबर वगैरे शुभवृक्ष व पारिजातकादि पुष्पवृक्ष यांच्या छायेखालून राजा जाई. शेवटी दक्षिणावर्तशंखांतल्या तीर्थाचा नेत्रांना स्पर्श करून व वेळूच्या लंबायमान दांड्याच्या अग्रावर लटकत व फडफडत असलेल्या जरीपटक्याकडे सकौतुक दृष्टिक्षेप चढवून, राजा नाडीपरीक्षणार्थ आपला हात राजवैद्यापुढे करी. सवेच एक ब्राह्मण एका हातात तेलाने भरलेली रुप्याची परात व एका हातात तुपाने भरलेली सोन्याची परात राजापुढे आणी. त्यात मुखाचे प्रतिबिंब पाहून व अष्टोदश मंगलांचा शुभशकून घेऊन राजा स्नानोपहारादि सेवन केल्यावर सभामंडपात प्रवेश करी. सभामंडपाला ऊर्फ दरबाराला नवगजी असे नाव असे. त्या नवगजीत राजे, उपराजे, संस्थानिक, परराष्ट्रीय वकील व सरदार आधीच येऊन हेजर असत. पंडित, कवी, शास्त्री, वैदिक इत्यादि सरस्वतीपुत्रांचाही समुदाय राजदर्शनाची उत्कंठेने वाट पहात असे. नंतर भालदारांच्या ललकाऱ्यांत व जनसंमर्दातून वाट काढीत येणाऱ्या चोपदारांच्या ललकाऱ्यांत महाराज हातातील तरवारीचे अग्र जमिनीला टेकीत टेकीत (कारण शहाजीमहाराजांचे वय ह्या काली साठीच्यापुढे गेले होते) सभास्थानात गंभीर रुबाबाने प्रवेश करून सिंहासनारूढ होत. हा प्रातःकालीन कार्यक्रम झाला. भोजनोत्तर दोन प्रहरानंतरही कधीकधी स्वारीशिकार नसल्यास पंडित व कारभारी यांच्या सभेत बसून सायंकालपावेतो काजकारण, ब्रह्मचर्या, काव्यविनोद, दानधर्म, पंगुपरामर्श, न्यायमनसुबी, जेठीमल्लयुद्धे, इत्यादि लघू किंवा जड व्यवहारात महाराज गुंतलेले असत. सायंकर्म आटोपल्यावर उपहारोत्तर खलबतखान्यात शेलक्या मुत्सद्द्यांच्या समवेत गुप्त कारवाई चाले अशी ही शहाजीमहाराजांची दिनचर्या जयरामाने केवळ शब्दचित्राने रंगविलेली येथे वाक्यपटावर खुली करून दाखविली आहे तीवरून शहाजीच्या ऐश्वर्याची कल्पना वाचकांना करून घेता येईल. शौर्याने पृथापुत्र जो अर्जुन त्यासारखा, दातृत्वाने विक्रमादित्यासारखा व ज्ञातृत्वाने भोजराजासारखा शहाजी आपणास दिसतो, असे जयराम जे लिहितो त्यात किती तथ्य आहे ते शहाजीच्या आश्रित कवीमंड-

ळींच्या यादीवरून, देवशेषादि विद्वानांस त्याने करून दिलेल्या वर्षासनांवरून व शक १५७५ पासून १५८० पर्यंतच्या पाच वर्षांतील मीर जुमलादिकांवरील त्यांच्या स्वाऱ्यांवरून अंशत: समजून येण्यासारखे आहे. शक १५७५ त शहाजींचे वय साठीच्या घरात आलेले होते. साठपासून पासष्ठपर्यंतच्या पाच वर्षातीलच तेवढी प्रत्यक्ष पाहिलेली हकीकत जयरामाने दिली आहे. पूर्वीच्या साठ वर्षांची म्हणजे शक १५१६ पासून शक १५७५ पर्यंतची व पुढील शक १५८० पासून शक १५८५ पर्यंतची हकीकत त्याने दिलेली नाही. ह्या हकीकत न दिलेल्या काळातील शहाजीच्या कर्तबगारीचा, शौर्याचा, औदार्याचा व ज्ञातृत्वाचा तपशील दुसरे कोणी कवी किंवा बखरकार जेव्हा आपणास संशोधनांती उपलब्ध होतील तेव्हा कळेल. शहाजीच्या आश्रयाला नाना देशचे संस्कृत व प्राकृत कवी, पंडित, शास्त्री, मराठी शाहीर इत्यादि मंडळी असे म्हणून जयराम सांगतो. त्यावरून आशा उद्भवते की, शक १५१६ पासून शक १५७५ पर्यंतच्याही हकीकती पुढेमागे उपलब्ध व्हाव्या. जयरामाने आपल्या मनात शहाजीच्या वर्णनाचे एकंदर तीन भाग केले पहिला भाग-ज्ञातृत्वाचा, दुसरा भाग दातृत्वाचा व तिसरा भाग शौर्याचा. पैकी ज्ञातृत्वाचा व दातृत्वाचा तपशील येथपर्यंतच्या कविसमागमाच्या वर्णनात दिला आहे. कवींच्या समस्यांना उत्तरे देताना शहाजीच्या शक १५७५ पासून १५८० पर्यंतच्या पाच वर्षातील युद्धांचे उल्लेख जयरामाने आपल्या उत्तरात गोवून दिलेले आहेत. चंपूकाव्यातील हे पाच वर्षांचे युद्धोल्लेख व पूर्वीच्या साठ वर्षातील व पश्चात्च्या पाच वर्षांतील राजकीय व बौद्धिक हकीगती क्रमवार मांडल्याने या थोर पराक्रमी व राज्याक्रामक पुरुषाच्या सत्तर वर्षांतील कर्तबगारीचा अहवाल एका ठिकाणी जुळल्यासारखा होईल. व शिवाजीचा पूर्वावतार जो शहाजी त्याच्या कर्तबगारीवर शहाजीचा पश्चादवतार जो शिवाजी त्याने आपल्या कर्तबगारीची इमारत कशी उठवून दिली ते कळण्यास मार्ग होईल. हा अहवाल जुळविताना इतर अनुषंगिक बाबींचाही परामर्श घेणे सुयुक्त व विषयपोषक दिसल्यास त्याचाही समावेश केला जाईल.

१७. प्रथम ह्या पराक्रमी पुरुषाचे खरे नाव काय त्या बाबीची विचक्षणा करू. प्रस्तुत चंपूत शाह, षाह, साहे, साहिजू, साहजु, शाहे, शाहजी, साह, साहजी, साहज, शाहबा, शाहाजी, शहाराज, शहाजी, साहजी, शा, साहि इतके उच्चार ह्या पुरुषाच्या नावाचे आले आहेत. बखरीतून शहाजी, शाहाजी, शाहजी व तवारिखांतून शहाजी, शाहाजी व क्वचित् इतरत्र स्याहाजी असाही उच्चार आढळतो. पैकी मूळ खरा उच्चार कोणता ? ह्या पुरुषाचे मूळ नाव सिंह असावे. सिंह शब्दाला जित् शब्द जुडून सिंहजित्, सिंहजित् शब्दाचा अपभ्रंश सिंहजी, सिंहाजी सिंह उच्चाराचा अपभ्रंश सीहँ. त्यावरून सीहँजी. सीहँ असा अपभ्रष्ट उच्चार जुन्या मराठीत होतो. सीहाँजीचा अपभ्रंश स्याजी, स्याहाजी, श्याहाजी, शाहाजी, शहाजी, शाहाजी, साहाजी, इ. इ. साहाजीचा व्रज, उर्दू, वगरे अपभ्रंश साहजू, षाह, शाह इत्यादि.

मूळ नाव सिंह असावे ह्याला प्रमाण ह्या पुरुषाच्या धाकटचा भावाचे नाव. धाकटचा भावाचे नाव शरभोजी. शरभ हे नाव तंजावरातील भोसल्यांच्या नावात महशूर आहे. शरभजित् = शरभोजी = सरफोजी. एका भावाचे नाव सिंह व दुसऱ्याचे नाव शरभ. सिंहक आणि शरभ ही मनुष्यनामे संस्कृत वाङ्मयात प्रसिद्ध आहेत. जातिनाम्न: कन् (५–३–८१) या सूत्रात पाणिनी सिंहक: शरभक: ही नावे सांगतो. तात्पर्य मूळ नावे सिंहक शरभक अशी संस्कृत होती. नगरच्या शहासरीफ या फकिराच्या नावावरून शहाजी व सरफोजी ही नावे नवसाकरिता दिली ही मखलाशी नंतरची आहे. सिंह व शरभ या संस्कृत नावाच्या जवळजवळ शाह व सरिफ ही फारसी किंवा अरबी नावे उच्चारात असल्यामुळे मखलाशीला सौकर्य आले इतकेच. अहमदनगरच्या निजामशाही दरबारात वावरायचे असल्यामुळे, आपली नावे मुसलमान पीराच्या नावावरून पडली, असा बहाणाही एतन्नामधारकांकडून पातशाही मर्जी संपादण्याकरिता केला गेला असण्याचा संभव आहे. परंतु मूळ नावे संस्कृत होती हे बृहदीश्वराच्या देवालयातील शिलालेखातल्या शरभ या उच्चारावरून ताडता येते.

१८. नावाची विचक्षणा झाल्यावर कुलाची व वंशाची विचक्षणा विचारात सहजच घ्यावी लागते. जयराम शहाजीचे आडनाव उर्फ कुलनाम भोसले असे देऊन वंशनाम सिसोदिया असे देतो. तेव्हा शिवाजीच्या राज्यारोहणकाली सार्वभौम राजाला शोभेल अशी वंशावळ व कुळगोत मुद्दाम बनावट तयार केली गेली हा आक्षेप जयरामाच्या प्रत्यक्ष पुराव्यावरून लंगडा पडतो. शिवाजीच्या वेळीच नव्हे तर शहाजीच्या वेळी उत्तर हिंदुस्थानातील अनेक कवी व जयराम हा महाराष्ट्रकवी खुद्द शहाजी महाराजांच्या व पुरोहित, राजगुरु वगैरे अनेक संभावित पिढीजाद मुत्सद्द्यांच्यापुढे भोसल्यांचा संबंध शिसोद्यांच्या वंशाशी लावतात, यावरून निर्विवाद मान्य करणे भाग पडते की, भोसले हे शिसोदिया रजपुतांच्या वंशातील होत अशी परंपरागत कहाणी शहाजी राजाच्या दरबारी सर्वसंमत होती.ही कहाणी शहाजीच्या किंवा शिवाजीच्या दरबारीच तेवढी प्रचलित होती असे नव्हे, तर उत्तरेकडील रजपुतांनाही मान्य होती. सभासदी बखरीच्या तेहतिसाव्या पृष्ठावर जयसिंगाच्या तोंडचे शब्द सभासदाने दिले आहेत ते असे, 'तुम्ही शिसोदे रजपूत,आम्ही तुम्ही एकाचे एकच आहो,' म्हणजे भोसल्यांचे रजपूतत्व म्हणजे क्षत्रियत्व व शिसोदियावंशत्व त्या काळी म्हणजे शहाजीच्या काळी दक्षिणेतील व उत्तरेतील विद्वानांना व रजपुतांना मान्य होते असे झाले. हा शहाजीकालीन पुरावा अकृत्रिम असल्यामुळे विश्वसनीय धरणे प्राप्त आहे. जयराम भोसल्यांच्या मूळ पुरुषाचे नाव वलीपास असे देतो. हे नाव व ह्याच्यासारखेच दिलीप हे नाव एका वंशावळीत आले आहे. हर्यश्व, कृशाश्व, युवनाश्व इत्यादी अश्वान्त शब्दांच्या जोडीचा जो अवनीपाश्व शब्द त्यातील प्रारंभीचा अचा लोप होऊन, न चा ल होऊन व श्व चा स होऊन

ळींच्या यादीवरून, देवशेषादि विद्वानांस त्याने करून दिलेल्या वर्षासनांवरून व शक १५७५ पासून १५८० पर्यंतच्या पाच वर्षांतील मीर जुमलादिकांवरील त्यांच्या स्वाऱ्यांवरून अंशतः समजून येण्यासारखे आहे. शक १५७५ त शहाजींचे वय साठीच्या घरात आलेले होते. साठपासून पासष्ठपर्यंतच्या पाच वर्षांतीलच तेवढी प्रत्यक्ष पाहिलेली हकीकत जयरामाने दिली आहे. पूर्वीच्या साठ वर्षांची म्हणजे शक १५१६ पासून शक १५७५ पर्यंतची व पुढील शक १५८० पासून शक १५८५ पर्यंतची हकीकत त्याने दिलेली नाही. ह्या हकीकत न दिलेल्या काळातील शहाजीच्या कर्तबगारीचा, शौर्याचा, औदार्याचा व ज्ञातृत्वाचा तपशील दुसरे कोणी कवी किंवा बखरकार जेव्हा आपणास संशोधनांती उपलब्ध होतील तेव्हा कळेल. शहाजीच्या आश्रयाला नाना देशचे संस्कृत व प्राकृत कवी, पंडित, शास्त्री, मराठी शाहीर इत्यादि मंडळी असे म्हणून जयराम सांगतो. त्यावरून आशा उद्‌भवते की, शक १५१६ पासून शक १५७५ पर्यंतच्याही हकीकती पुढेमागे उपलब्ध व्हाव्या. जयरामाने आपल्या मनात शहाजीच्या वर्णनाचे एकंदर तीन भाग केले पहिला भाग-ज्ञातृत्वाचा, दुसरा भाग दातृत्वाचा व तिसरा भाग शौर्याचा. पैकी ज्ञातृत्वाचा व दातृत्वाचा तपशील येथपर्यंतच्या कविसमागमाच्या वर्णनात दिला आहे. कवींच्या समस्यांना उत्तरे देताना शहाजीच्या शक १५७५ पासून १५८० पर्यंतच्या पाच वर्षांतील युद्धांचे उल्लेख जयरामाने आपल्या उत्तरात गोवून दिलेले आहेत. चंपूकाव्यातील हे पाच वर्षांचे युद्धोल्लेख व पूर्वीच्या साठ वर्षांतील व पश्चात्च्या पाच वर्षांतील राजकीय व बौद्धिक हकीगती क्रमवार मांडल्याने या थोर पराक्रमी व राज्याक्रामक पुरुषाच्या सत्तर वर्षांतील कर्तबगारीचा अहवाल एका ठिकाणी जुळल्यासारखा होईल. व शिवाजीचा पूर्वावतार जो शहाजी त्याच्या कर्तबगारीवर शहाजीचा पश्चादवतार जो शिवाजी त्याने आपल्या कर्तबगारीची इमारत कशी उठवून दिली ते कळण्यास मार्ग होईल. हा अहवाल जुळविताना इतर अनुषंगिक बाबींचाही परामर्श घेणे सुयुक्त व विषयपोषक दिसल्यास त्याचाही समावेश केला जाईल.

१७. प्रथम ह्या पराक्रमी पुरुषाचे खरे नाव काय त्या बाबीची विचक्षणा करू. प्रस्तुत चंपूत शाह, षाह, साहे, साहिजू, साहजु, शाहे, शाहजी, साह, साहजी, साहज, शाहबा, शाहाजी, शहाराज, शहाजी, साहजी, शा, साहि इतके उच्चार ह्या पुरुषाच्या नावाचे आले आहेत. बखरीतून शहाजी, शाहाजी, शाहजी व तवारिखांतून शहाजी, शाहाजी व क्वचित् इतरत्र स्याहाजी असाही उच्चार आढळतो. पैकी मूळ खरा उच्चार कोणता ? ह्या पुरुषाचे मूळ नाव सिंह असावे. सिंह शब्दाला जित् शब्द जुडून सिंहजित्, सिंहजित् शब्दाचा अपभ्रंश सिंहजी, सिंहाजी सिंह उच्चाराचा अपभ्रंश सीहँ. त्यावरून सीहँजी. सीहँ असा अपभ्रष्ट उच्चार जुन्या मराठीत होतो. सीहाँजीचा अपभ्रंश स्याजी, स्याहाजी, श्याहाजी, शाहाजी, शहाजी, शाहाजी, साहाजी, इ. इ. साहाजीचा व्रज, उर्दू, वगैरे अपभ्रंश साहजू, षाह, शाह इत्यादि.

मूळ नाव सिंह असावे ह्याला प्रमाण ह्या पुरुषाच्या धाकटचा भावाचे नाव. धाकटचा भावाचे नाव शरभोजी. शरभ हे नाव तंजावरातील भोसल्यांच्या नावात महशूर आहे. शरभजित् = शरभोजी = सरफोजी. एका भावाचे नाव सिंह व दुसऱ्याचे नाव शरभ. सिंहक आणि शरभ ही मनुष्यनामे संस्कृत वाङ्मयात प्रसिद्ध आहेत. जातिनाम्नः कन् (५–३–८१) या सूत्रात पाणिनी सिंहकः शरभकः ही नावे सांगतो. तात्पर्य मूळ नावे सिंहक शरभक अशी संस्कृत होती. नरगच्या शहासरीफ या फकिराच्या नावावरून शहाजी व सरफोजी ही नावे नवसाकरिता दिली ही मखलाशी नंतरची आहे. सिंह व शरभ या संस्कृत नावाच्या जवळजवळ शाह व सरिफ ही फारसी किंवा अरबी नावे उच्चारात असल्यामुळे मखलाशीला सौकर्य आले इतकेच. अहमदनगरच्या निजामशाही दरबारात वावरायचे असल्यामुळे, आपली नावे मुसलमान पीराच्या नावावरून पडली, असा बहाणाही एतन्नामधारकांकडून पातशाही मर्जी संपादण्याकरिता केला गेला असण्याचा संभव आहे. परंतु मूळ नावे संस्कृत होती हे बृहदीश्वराच्या देवालयातील शिलालेखातल्या शरभ या उच्चारावरून ताडता येते.

१८. नावाची विचक्षणा झाल्यावर कुलाची व वंशाची विचक्षणा विचारात सहजच घ्यावी लागते. जयराम शहाजीचे आडनाव उर्फ कुलनाम भोसले असे देऊन वंशनाम सिसोदिया असे देतो. तेव्हा शिवाजीच्या राज्यारोहणकाली सार्वभौम राजाला शोभेल अशी वंशावळ व कुळगोत मुद्दाम बनावट तयार केली गेली हा आक्षेप जयरामाच्या प्रत्यक्ष पुराव्यावरून लंगडा पडतो. शिवाजीच्या वेळीच नव्हे तर शहाजीच्या वेळी उत्तर हिंदुस्थानातील अनेक कवी व जयराम हा महाराष्ट्रकवी खुद्द शहाजी महाराजांच्या व पुरोहित, राजगुरु वगैरे अनेक संभावित पिढीजाद मुत्सद्द्यांच्यापुढे भोसल्यांचा संबंध शिसोद्यांच्या वंशाशी लावतात, यावरून निर्विवाद मान्य करणे भाग पडते की, भोसले हे शिसोदिया रजपुतांच्या वंशातील होत अशी परंपरागत कहाणी शहाजी राजाच्या दरबारी सर्वसंमत होती. ही कहाणी शहाजीच्या किंवा शिवाजीच्या दरबारीच तेवढी प्रचलित होती असे नव्हे, तर उत्तरेकडील रजपुतांनाही मान्य होती. सभासदी बखरीच्या तेहतिसाव्या पृष्ठावर जयसिंगाच्या तोंडचे शब्द सभासदाने दिले आहेत ते असे, 'तुम्ही शिसोदे रजपूत, आम्ही तुम्ही एकाचे एकच आहो,' म्हणजे भोसल्यांचे रजपूतत्व म्हणजे क्षत्रियत्व व शिसोदियावंशत्व त्या काळी म्हणजे शहाजीच्या काळी दक्षिणेतील व उत्तरेतील विद्वानांना व रजपुतांना मान्य होते असे झाले. हा शहाजीकालीन पुरावा अकृत्रिम असल्यामुळे विश्वसनीय धरणे प्राप्त आहे. जयराम भोसल्यांच्या मूळ पुरुषाचे नाव वलीपास असे देतो. हे नाव व ह्याच्यासारखेच दिलीप हे नाव एका वंशावळीत आले आहे. हर्यश्व, कृशाश्व, युवनाश्व इत्यादी अश्वान्त शब्दांच्या जोडीचा जो अवनीपाश्व शब्द त्यातील प्रारंभीचा अचा लोप होऊन, न चा ल होऊन व श्व चा स होऊन

अवनीपाश्व = वनीपाश्व = वलीपास असा अपभ्रंश झालेला उघड दिसत आहे. अवनीपाश्व म्हणजे पृथ्वीपतीत श्रेष्ठ. ह्या अवनीपाश्व ऊर्फ वलीपास राजाच्या वंशात मालोजी झाला, व मालोजीपासून शहाजी झाला असे जयराम सांगतो. भोसल्यांच्या कुळाची जयरामाला ही अशी वंशावळ माहीत होती व ती त्याने शहाजीपुढे व दरबाऱ्यांपुढे गायिली असल्यामुळे त्या सर्वांना मान्य होती असे म्हणावे लागते. तात्पर्य, शहाजीचे उपनाव भोसले, वंश शिसोदे, वर्ण क्षत्रिय ऊर्फ रजपूत, गोत्र कुशिक, मूळ पुरुष वलीपास, अशी ग्वाही शहाजीसमकालीन प्रत्यक्ष साक्षीदार जो जयराम तो देतो. शिसोदे हे आडनाव मराठ्यात सध्या आहे. ह्या मूळ शिसोदे कुळातील उपकुळ भोसले. भोसले हा शब्द भोज या शब्दाला स्वार्थक ल प्रत्यय लागून जो भोजल शब्द झाला त्याचा अपभ्रंश आहे. भोजला = भोसला. भोसल असा शब्द जयराम योजितो. दोन चार हजार वर्षांपूर्वी दक्षिण पश्चिमेकडील राजांना भोज अशी संज्ञा असे. ह्या भोज नामक राजांच्या राज्याला भोज्यं म्हणून म्हणत. साम्राज्य भोज्यं इत्यादी मंत्रांत भोज्यं हा शब्द ह्याच अर्थाने योजिलेला आहे. पाणिनीच्या क्रौड्यादिगणात भोजः क्षत्रिये असा शब्द येतो ह्या भोजसंज्ञक राजांचे जे वंशज ते भोसले या नावाने पुढे महाराष्ट्रात प्रसिद्धीस आले. हे भोज ऊर्फ भोसले उपकुळ महाराष्ट्रात वसाहतकाली आलेले आहे. याला पुरावा असा की, न्हावी, महार, वगैरे शूद्रातिशूद्रांत भोसले हे आडनाव आढळते व ते नागपुरापासून तंजावर प्रांतापर्यंतच्या टापूत सर्व महाराष्ट्रात आढळते. शिवाजी व शहाजी ज्या भोसले उपकुळात जन्मले ते भोसले उपकुळ ऊर्फ उपनाम न्हावी, महार, इत्यादी शूद्रातिशूद्रांनी स्वीकारावयाचे म्हणजे ते दोन कालातून कोणत्यातरी एका कालात स्वीकारले गेले असले पाहिजे. (१) शक १३०० च्या सुमारास बखरी म्हणतात त्याप्रमाणे भोसले उदेपुराहून दक्षिणेत येऊन पाटस प्रांतात पाटीलक्या करू लागल्यानंतर त्यांचे उपनाव शूद्रातिशूद्रांत सर्व महाराष्ट्रभर पसरले, हा एक पक्ष. आणि (२) वसाहतकाली तीन हजार किंवा अडीच हजार वर्षांपूर्वी भोज ऊर्फ भोसले कुल इतर उत्तरदेशीय कुलांबरोबर महाराष्ट्रात उतरल्यावर त्यांचे उपनाव गायकवाड, काळे, इत्यादी इतर शेकडो मराठ्यांच्या उपनावांप्रमाणे शूद्रातिशूद्रांत पसरले. हा दुसरा पक्ष. पैकी शक १३०० नंतर भोसले महाराष्ट्रात उतरले हा पहिला पक्ष मान्य धरल्यास, शूद्रातिशूद्रांत सर्व महाराष्ट्रात त्यांचे उपनाम पसरल्याला अवकाश व संभव रहात नाही. का की, शक १३०० त महाराष्ट्रात शूद्रातिशूद्र अशा सर्व अठरापगड जाती स्थिर लखोटबंद बनून हजार पाचशे वर्षे लोटली होती शूद्रातिशूद्र जाती लखोटबंद बनल्यावर त्यांच्यात भोसल्यांचे नवीन उपनाव शिरणे अशक्य होते. सबब, दुसरा पक्ष जो भोसले वसाहतकाली अडीच तीन हजार वर्षांपूर्वी दंडकारण्यात उतरल्याचा तो तेवढा नूतन उपनाते शूद्रातिशूद्रांत शिरण्याला संभावक असल्यामुळे स्वीकार्य ठरतो. त्या पुरातनकाली अनार्य जातींचा समावेश वर्णव्यवस्थेत

शरीरसंबंधोदभ्वाने घडून येऊन, आर्यांची उपनामे शूद्रातिशूद्रांत सहजच स्वीकारली जात होती. करता, भोसल्यांचे कूळ महाराष्ट्रात वसाहतकाली इतर कुळांबरोबर आले व इतर कुळांप्रमाणे सर्व महाराष्ट्रभर पसरले, हे विधान विश्वासकक्षेत उतरण्यास योग्य ठरते. शिवाय, भोज ह्या संस्कृत शब्दाचा भोसला हा मराठी अपभ्रंश होण्याला शक १३०० पासूनचा पुढील अल्प काळ अपुरा पडतो. शक १३०० पूर्वी जर हे कूळ उत्तरेस होते तर शक १३०० च्या सुमारास त्या उत्तरेतील कुळाला भोसला हा मराठी शब्द लागणे अशक्य आहे. केवळ भोज या नावानेच ते कुल त्या काली उत्तरेस महशूर असले पाहिजे. परंतु रजपुतांत शक १३०० च्या सुमारास भोज ह्या उपनामाचे किंवा भोसले या उपनामाचे रजपुतांचे किंवा इतर कोणत्याही जातीचे कुळ नव्हते व सध्याही नाही. अर्थात, एकच पक्ष स्वीकारावा लागतो. तो हा की भोसल्यांचे कुळ भोज या नावाने वसाहतकाली अडीच तीन वर्षांपूर्वी महाराष्ट्रात उतरले व दंडकारण्यात उतरल्यावर भोज या नावाचा अपभ्रंश भोसला हे नाव घडण्यात आले आणि ते नाव घडत असता शूद्रातिशूद्रांत अनुलोमशरीरसंबंधाने पसरले. शहाजीच्या मातु:श्रींचे म्हणजे मालोजीच्या बायकोचे नाव उमाई म्हणून जयराम देतो. बृहदीश्वर शिलालेखांतही उमाई हेच नाव आले आहे. दीपाबाई हे माहेरचे व उमाई हे ह्या बाईचे सासरचे नाव असावे. भोसल्यांचे गोत्र कुशिक असे जयराम लिहितो.

१९. नाव, आडनाव, कुल, गोत्र, वंश, वर्ण, व मातृपितृनामे यांची शहानिशा झाल्यावर, शहाजीच्या कर्तबगारीच्या रूपरेषेची आखणी करण्यास लेखणी मोकळी होते. ही आखणी (१) बृहदीश्वराच्या देवालयातील शिलालेख, (२) शिवदिग्विजय, (३) शिवाजीप्रताप, (४) बसातिने सलातीन, व (५) सानेप्रकाशित शहाजीमहाराजांची कैफीयत, ह्या पाच ग्रंथांवरून व इतर काही टिपणांवरून व पत्रांवरून करतो. जो जो म्हणून प्रसंग शहाजीच्या चरित्राला उपकारक भासला त्या त्या प्रसंगाचा निर्देश जमल्यास शकवार, न जमल्यास मोघम, केला जाईल. वर दिलेल्या पाच साधनांतील शहाजी महाराजांची कैफियत हे प्रकरण बव्हंशाने बसातिने सलातीनाचा संक्षेप असल्यामुळे स्वतंत्र साधन म्हणून त्यास यद्यपी फारशी किंमत नाही, तत्रापी शहाजीसंबंधाने त्यात इतरत्र न आढळणारी माहिती दिली आहे. बसातिने सलातीन या फारशी ग्रंथाचा कर्ता शहाजीचे नाव कर्नाटकातील मोहिमांसंबंधाने तुरळक काढून तेही प्रामुख्याने न काढिता, मुसुलमान सेनापतीच्या अनुषंगाने मदतनीस म्हणून गौणत्वाने काढतो. परंतु मध्येच शहाजी फार शिरजोर झाला अशी तो नक्कार करतो. त्यावरून अनुमान करता येते की, ह्या कर्नाटकातील मोहिमांत शहाजीचे अंग प्रमुख होते. शहाजीच्या वरचढ कर्तृत्वाचे दिग्दर्शन शिवदिग्विजय व शिवप्रताप या मराठी बखरींवरून बरेच उठावदार घडते, परंतु ह्या

गा...३

दिग्दर्शनात व्यंग असे आहे की, शहाजीच्या चरित्रातील प्रसंग विजयकार किंवा प्रतापकार कालानुक्रमाने, शिस्तवार व कसोशीने न देता मागचे पुढे व पुढचे मागे असे धरसोडीने देतात आणि तेही देण्यात इतिहासलेखनकर्मानभिज्ञता स्थलोस्थली प्रकट करतात. बृहदीश्वरशिलालेखही ह्याच बखरीच्या वर्गात पडतो. हा शिलालेख मूलत: बखरच आहे, इतकेच की, ह्याला दगडावर कोरिला जाण्याचा मान मिळाला आहे. ह्या तिन्ही आधुनिक बखरीत परंपरागत कर्णोपकर्णी ऐकलेली व कागदपत्रांवरून काढिलेली जी माहिती दिली आहे तिला प्रत्यंतर पुरावा दुसऱ्या कोणत्याही मराठी बाह्य ग्रंथाचा नाही. परंतु लढाया वगैरे संबंधाने जी माहिती धरसोडीने दिली आहे तिला बसातिने सलातीनातील व इतर मुसलमानी तवारिखांतील पुराव्याचा पडताळा देऊन पारखिता येते. साधनांची ऐतिहासिक किंमत ही अशी आहे. त्यातून विश्वसनीय भाग निवडून काढून तो कालानुक्रमाने शिस्तवार मांडण्याचा उद्योग येथे करावयाचा आहे. पुढे कालांतराने समकालीन कागदपत्रांचा अस्सल पुरावा जेव्हा बाहेर येईल तेव्हा प्रस्तुतच्या मांडणीत फेरबदल, वाढ किंवा छाट करणे सहज भाग पडेल.

बाबाजी ऊर्फ बाबजी भोसले संभाजी भोसल्याचा मुलगा शक १४५५ त जन्मला. हिंगणी, बेरडी, देऊळगाव येथील पाटिलक्या कोण्या पुरुषाने मिळविल्या ते नमूद नाही. बरडजी, धापजी, संभाजी व बाबजी ही नावे मराठी दिसतात. रजपुती नाहीत. मुलाचा जन्मशक टिपणात मांडून ठेवल्याइतकी ऐपत संभाजीला आली होती; इतकेच या शकावरून अनुमान होते. बाबजी बहुश: पावसाळ्यात पाटीलकी व बाकीच्या ऋतूत शिपाईगिरी करून असावा.

मालोजी शक १४७२ त जन्मला. बाबजीचे वय त्या वेळी सतरा वर्षांचे होते. लग्न बालपणी व्हावयाचे म्हणजे बापाची किंचित घरची बरी स्थिती असावी. पाटस, फलटण, बारामती व सुपे हे प्रांत जवळ जवळ असल्यामुळे बाबजी भोसल्याने फलटणच्या निंबाळकरांशी सोईरीक करावी, हे साहजिक आहे. निंबाळकर मवाशी करून होते. तेव्हा त्यांच्याशी बरोबरीच्या नात्याने सोईरीक करणारा बाबजीही मवासपण करून असावा. नगरच्या व विजापूरच्या मुसुलमानी अंमलात त्या काली बहुतेक मराठे देशावर व कोकणात मवाशी करून असत. राज्ययंत्र असावे तितके सुयंत्र मुसुलमानी अंमलात तितपतच होते. तत्कालीन मराठ्यांच्या कुळकटांत मारामाऱ्या व दंगेधोपे यांचीच वर्णने आढळतात. मालोजी वयात आल्यावर मवासपणाची कवाईत बापापाशी व सासऱ्यापाशी सहजच शिकला. पुढे वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी तो शिलेदार झाला (शक १४९९). ह्या वेळी मूर्तिजा निजामशहा नगरास राज्य करीत होता. शक १४९९ पासून शक १५१० पर्यंतची अकरा वर्षे शिपाईगिरी व शिल्लेदारी करीत करीत शहाजी पाच-चार हजार घोड्यांचा मालक बनला. शक १५१० साली महंमद कुली कुतुबशहाची बहीण मलिकाजहान

इजशी इभ्राईम आदिलशहाचे लग्न होण्याचे ठरले, त्याच्या आड मूर्तिजा निजामशहा आला मूर्तिजा निजामशहा ह्या वेळी राज्यकारभार वजिरावर सोपवून आवश्याचा किल्ल्यावर ईश्वर चिंतन करीत रहात असे. तैनातीस मालोजी राजे भोसले यास ठेविले होते. मूर्तिजा निजामशहा इभ्राईम आदिलशहाच्या लग्नाच्या आड गेला, सबब विजापूरचा सरदार दिलावरखान आवश्याच्या किल्ल्यावर चाल करून आला. त्याला मालोजीराजाने मोठ्या सफाईने हटवून मूर्तिजा निजामशहाचा बचाव केला. आवश्याच्या लढाईत मालोजीने दाखविलेल्या ह्या कर्तबगारीचा उल्लेख बृहदीश्वरशिलालेखकर्त्याने केला आहे. त्यात आवश्याच्या लढाईचा उल्लेख करून, मालोजी राजे ह्यापूर्वी बहुत युद्धांत जय पावले होते, असे तो शिलालेखकार लिहितो. याचा अर्थ असा की, शक १४९९ पासून शक १५१० पर्यंतच्या काळातील अकराबारा वर्षांच्या अवधीत मालोजीने निजामशहाच्या वतीने अनेक मोहिमांत पराक्रम करून आवश्याच्या युद्धप्रसंगी तर त्याने निजामशहाचे प्राण वाचविले. आवश्याच्या लढाईनंतर मालोजीची साख इतकी वाढली की, पुढे शक १५१४ त इभ्राईम आदिलशहाला सोडून नगरास आलेल्या दिलावरखानाच्या सल्ल्यावरून बुऱ्हाण निजामशहाने जेव्हा मंगळवेढ्यापर्यंत आदिलशाही मुलुख जाळून पोळून उद्ध्वस्त केला तेव्हा त्याही मोहिमेत मालोजीने मोठा पराक्रम केला. ह्या पराक्रमाचा उल्लेख बृहदीश्वरशिलालेखकर्त्याने केला आहे. नंतर शक १५१५ त इभ्राईम आदिलशहाच्या इस्माएल नामक भावाने कोल्हापूर, बेळगाव, प्रांती बंड करून बुऱ्हाण निजामशहाची मदत मागितली. त्या मदतीच्या सैन्यात सामील होऊन मालोजी भोसल्याने आदिलशाही फौजेला बहुत त्रास दिला. ह्याच शक १५१५ साली मालोजीस भूमिगत द्रव्य सापडले. व जगदंबेचा साक्षात्कार होऊन राज्यप्राप्तीचा वर मिळाला. ऐतिहासिक दृष्ट्या या वराचा अर्थ असा दिसतो की, महाराष्ट्रराज्य स्थापन करावे, अशी महत्त्वाकांक्षा ह्या वेळी मालोजीच्या मनात अत्यंत अंधुक अशी उद्भवली. शक १५१६ त मालोजीला वयाच्या चव्वेचाळीसाव्या वर्षी शहाजीनामे पुत्र झाला. शक १५२० त मोगलांकडील म्हणजे अकब्बराकडील शीर खबाजा या सरदाराचा बीडच्या लढाईत बेइज्जत पराभव निजामशाही सरदारांनी केल्यावर त्या वर्षीच्या फाल्गुनातील रंगपंचमीचा उत्सव जाधवराव, भोसले, वगैरे सरदारांनी मोठ्या थाटाने साजरा केला. त्या उत्सवात चार वर्षाच्या शहाजीस आपली तीन वर्षाची मुलगी जिजाऊ जाधवरावाने दिली असे विनोदाने वाक्य उच्चारिले. त्या विनोदी भाषणाचा वाच्यार्थ घेऊन शहाजी जाधवरावांशी शरीरसंबंधाच्या गोष्टी बोलू लागला. ते म्हणणे अर्थातच जाधवरावाने मान्य केले नाही. त्यासरशी रागाच्या व अभिमानाच्या सपाट्यात मालोजीने शहाजीचे पहिले लग्न मोहित्यांची कन्या उमाबाई इजशी लाविले. (बृहदीश्वरशिलालेख). ईर्ष्या वाढून भोसले व जाधव यांच्यात द्वंद्वयुद्धें होऊ लागली. ह्या सुमारास निजामशाहाची व मोगलांची युद्धे नांदेड, बीड, वगैरे गंगथडप्रांतात चालू असून,

निजामशाहीचे ठाणे आवश्यास, जुन्नरास व परिंड्यास हलते होते. मोगलांशी जी ही युद्धे होत होती त्यात मालोजीने पराक्रम करून अंत:करणपूर्वक निजामशहाची व वरकरणी मलिकंबराची इतकी मेहेरनजर संपादिली की, शक १५२५ च्या चैत्रात पंचहजारी मनसब मिळवून तो जाधवरावांच्या बरोबरीचा तोलदार सरदार बनला. नंतर शहाच्या खास मध्यस्थीने शहाजीचा दुसरा विवाह जिजाबाईशी शक १५२५ च्या वैशाखात झाला. ह्या वेळी मालोजीचे वय त्रेपन्न वर्षांचे असून, शहाजी नऊ वर्षांचा व जिजाबाई आठ वर्षांची होती. पुढे मलिकंबराच्या कारकिर्दीत शक १५४१ पर्यंत अनेक मुलुखगिऱ्या करीत असता मालोजीला रणभूमीवर मृत्यूने गाठिले. मरण-समयी मालोजीचे वय सत्तरीच्या जवळजवळ आले होते. फौजेच्या खर्चाकरिता निजामशहाने मालोजीराजास जहागीर दिली ती बहुतेक निजामशाही, मोगलाई व आदिलशाही यांच्या सरहद्दीवरील असून, कित्येक परगणे देण्याचा हेतु स्पष्ट असा होता की, निजामशाहीची सरहद्द स्वहितार्थ तरी मालोजीने शाबूद ठेवावी. आणि मोगलांच्या प्रांतातील परगणे जहागीर देण्यात मतलब असा होता की, मालोजीने ते प्रांत कायमचे जिंकून घेऊन निजामशाहीस जोडावे. शक १५२५ च्या पूर्वीच कित्येक सालांत व शक १५२५ च्या नंतरच्या पुढील कित्येक सालांत मलिकंबराच्या देख-रेखीखाली मालोजीने मोगलांचे जे परगणे काबीज केले होते तेच परगणे त्याला शहाने जहागीर दिले. ह्या परगण्यात माळव्यातील काही मुलुख होता. देणाऱ्यांची दूरदृष्टी व घेणाऱ्याची हिम्मत सारखीच वाखाणण्यालायक आहे! मालोजीने शिखरशिंगणापूरच्या निर्जल डोंगरावर विस्तीर्ण सरोवर बांधून व वेरूळच्या घृष्णे-श्वराच्या देवालयाचा जिर्णोद्धार करून महाराष्ट्रात सर्वतोमुखी कीर्ती संपादन केली. शिवाजीच्या आज्याचा असा हा त्रोटक इतिहास आहे. मालोजीसंबंधाने अस्सल कागदपत्र देवगिरी, नगर, जुन्नर, इंदापूर, पारनेर, नाशिक, वगैरे त्याच्या जहा-गिरीच्या परगण्यांत धुंडाळले व उकरिले पाहिजेत. तसेच, त्याच्या मुत्सद्द्याची घराणी शोधून काढिली पाहिजेत. पुंडे व राजोपाध्ये ह्या घराण्याखेरीज इतर सबनीस, पेशवे, इत्यादि मालोजीच्या मुत्सद्द्यांची नावेही अद्याप प्रकाशात आली नाहीत. बृह-दीश्वरशिलालेखकार आवश्याची लढाई, दिलावरखान व इस्माईल यांच्या बंडातील मालोजीची कामगिरी, यांचा उल्लेख ज्या अर्थी करतो, त्या अर्थी सहजच अनुमान होते की, त्याला मालोजीची एखादी बखर किंवा टिपण उपलब्ध असावे.

२०. शक १५४१ त मालोजी युद्धात मरण पावला. त्यावेळी शहाजीचे वय पंच-वीस वर्षांचे असून मालोजीबरोबर शक १५२८ पासून त्याने बऱ्याच मुलुखगिऱ्या पाहिल्या होत्या. मालोजीच्या मृत्युनंतर मालोजीची सर्व जहागीर व सैन्य यांचे अधिपत्य दरबारी शिरस्त्याप्रमाणे वर्ष दीड वर्षाने शक १५४३ दुर्मतिसंवत्सरी (बृहदी-श्वरशिलालेख) शहाजीस प्राप्त झाले. तेथपासून शक १५८५ पर्यंतची जी ४२ वर्षे त्यांचा इतिहास येथे कालानुक्रमाने शकवार नमूद करावयाचा आहे. ह्या इतिहा-

साचे मुख्य भाग चार पडतात. (१) शक १५४३ पासून शक १५५० त फत्तेखानाच्या कैदेपर्यंतचा पहिला भाग. ह्या सात वर्षांत मलिकंबराचा हस्तक म्हणून काही काल व फत्तेखानाचा प्रतिस्पर्धी म्हणून काही काल शहाजीचा गेला. (२) नंतर १५४८ त मलिकंबराचा मुलगा फत्तेखान निजामशाहीचा कारभारी होऊन शक १५५० त कैद झाल्यापासून शक १५५८ त निजामशाहीचा अंत होईपर्यंतचा आठ वर्षांचा दुसरा भाग. ह्या अवधीत शहाजीचे प्राबल्य अतोनात वाढून त्याच्याच जोरावर निजामशाही काही वर्षे टिकून राहिली (३) शक १५५८ त शहाजी आदिलशाही सरदार झाल्यापासून शक १५७० त त्याला अटक होईपर्यंतच्या बारा वर्षांचा तिसरा भाग. ह्या कालांत शहाजीचा कर्नाटकात बस बसता बसता तो बहुतेक स्वतंत्र व मुखत्यार असा महाराजा बनत चालला. (४) शक १५७१ पासून शक १५८५ पर्यंतच्या पंधरा वर्षांचा चवथा भाग. ह्या अवकाशात कर्नाटकात स्थिरस्थावर करून शहाजी स्वतंत्र राजाप्रमाणे बहुतेक किंवा सर्वस्वी राहू लागला. व त्याचा सवाई व पराक्रमी पुत्र जो शिवाजी त्याने सह्याद्रिखंडांतील आनंदवनभुवनांत स्वतंत्र राज्याची स्थापना केली. ह्या चार भागांना शक १५१६ पासून शक १५४१ पर्यंतच्या पंचवीस वर्षांच्या पहिल्या उमेदवारीच्या भागांचा जोड दिला म्हणजे शहाजीच्या आयु:पटाचे एकंदर पाच भाग पडतात. ह्या पाच भागांतील ठळक ठळक प्रसंगांचे टिपण दिले म्हणजे शहाजीच्या चरित्राचा सांगाडा जुळला. पैकी १५१६ पासून १५४१ पर्यंतच्या उमेदवारीचा त्रोटक उल्लेख मालोजीच्या कर्तबगारीच्या टिपणात आला असल्या कारणाने, १५४१ च्या पुढील चरित्राचे टिपण भागश: खाली देतो.

२१. नुसते उघडेबोडके टिपण देण्यापूर्वी, तत्कालीन परिस्थितीचे स्थूल चित्र नजरेपुढे असणे जरूर आहे. अन्यथा शहाजीच्या तत्कालीन यवनचालींचा सुव्यवस्थित अर्थ लक्षात येण्यास अडचण पडून, मूर्तिजा, नगर साहेबीण, मीर मंजू, मलिकंबर, जाधवराव, फत्तेखान, महमद आदिलशाहा, साबाजी, मुरारपंत, रणदुल्लाखान, हमीदखान, खवासखान, मुस्तफाखान व शहाजी ह्या व्यक्ती एखाद्या सूत्राच्या तंत्राने रंगभूमीवर चालतात किंवा स्वैरगतीने काहीतरी बेतंत्र वर्तणूक करतात अशी विभाषा वाचकाच्या मनात उत्पन्न होईल. करता दक्षिणेतील, विशेषत: महाराष्ट्रातील, आणि त्यातल्या त्यात मुख्यत: निजामशाहीतील तत्कालीन राजकीय परिस्थितीचे ज्ञान असणे अत्यावश्यक आहे. त्या काली सध्यांच्याप्रमाणेच महाराष्ट्रात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अतिशूद्र असे पाच वर्ण असून मुसुलमान व रानटी अनार्य असे दोन हिंदुबाह्य लोकसमूह असत. पैकी कातकरी, कोळी, ठाकूर, भिल्ल, इत्यादि संपूर्ण किंवा अर्धवट रानटी अनार्य-ब्राह्मांना तत्कालीन राज्ययंत्राचा अर्थ कळण्याची ऐपत नसल्यामुळे, तत्कालीन राजकीय परिस्थितीच्या अवलोकनक्षेत्रातून त्यांना वगळावे लागते. हे रानटी अनार्य लोक शिपायगिरीही करण्याच्या लायकीचे नव्हते, आणि मुत्सद्देगिरीची आकांक्षा तर त्यांच्या मनो-

भूमीत अंकुरित होण्याचा यत्किंचित्ही संभव नव्हता. रामरावणादींच्या पुरातनकालापासून तो अद्यापपर्यंत हे वनचर वनचरस्थितीत आहेत. चांभार, धेड, महार, मांग इत्यादि अतिशूद्र यद्यपी वनचरस्थितीतून ग्रामचरस्थितीत आलेले होते, तत्रापी शिपायगिरी किंवा मुत्सद्देगिरी त्यांच्या स्वप्नसृष्टीतही उदय पावलेली नव्हती. गावातील गलिच्छ काबाडकष्टाचे, बिन–भानगडीचे धंदे करून व चोऱ्यामाऱ्या करून पोटभर भाकर मिळविण्यात ह्यांची सर्व रग जिरत असल्या कारणाने राज्ययंत्राचे अवयव होण्यास त्यांना अवकाश नव्हता. व्यापार व शेतकी ही जी मनुप्रणीत वैश्यवृत्ती ती ह्या काळी दुभंग होऊन व्यापारी व शेतकरी या दोन वर्गात वाटली गेली होती. निव्वळ व्यापारधंदा व शिल्पकला करणारे जे सोनार, शिपी, तांबट, इत्यादि कारुकर्मे त्यांच्या अनेक जाती बनून ते आपापल्या धंद्यांत निमग्न असून, त्यांना राज्ययंत्रात घालमेल करण्याची पिढीजाद सवय नव्हती व तसली नवीन सवय संपादन करण्याचा कलही त्यांनी अद्याप दाखविलेला नव्हता. वैश्यवृत्तीचा दुसरा भाग जो शेतकी, तो वैश्यांनी सोडून दिल्यामुळे शूद्रांच्या हाती सर्वस्वी जाऊन, कुणबी म्हणून एक वर्ग अस्तित्वात येऊन त्या काली शेकडो वर्षे लोटली होती. पाणिनिकालीन अनिरवसित शूद्र, प्रागार्यकालीन नागलोक, वैश्यवर्ण व क्षत्रियवर्ण ह्या चार लोकांचे पुरातनकाली शरीरसंबंध होऊन महाराष्ट्रातील कुणबी ऊर्फ कुलपती हा वर्ग निर्माण झालेला होता. ह्या वर्गातील लोक कधी मोलमजुरीची शूद्रकर्मे करून, कधी वाणिज्यादि वैश्यकर्म करून व कधी शिपायगिरीचे क्षात्रकर्म करून प्राय: कृषिकर्मादि वैश्यधर्मात गढलेले असत. हालयातीचे शूद्र आहो, वृत्तीने वाणी आहो व आपल्या पूर्वजांनी राबडीच जाधवाच्या अमदानीत लढायांत भाग घेतला होता, असे जे स्वत:च तुरतावे व त्याचा कुळकट म्हणतो, त्याची आणि वरील विधानाची एकवाक्यता येणेप्रमाणे इतिहाससिद्ध आहे. शहाजीकाली सैन्यातून सामान्य शिपायांचा जो हजारोंनी भरणा होत असे तो ह्या सुप्रज व बहुप्रज कुणबी ऊर्फ कुलपती यांच्यातून होई. ह्या सामान्य शिपायांना मुत्सद्देगिरी, राजकारण इत्यादि बडा व्यवहार करण्याची ऐपत नसे, परंतु मोसमात शेतकाम करून, बाकीच्या काळात शिपायगिरीवर पोट चालविण्याची धमक ह्या कुणबी लोकांत उद्भवली होती. जो जास्त पोटगी देईल त्याची शिपायगिरी करण्यास व त्याचा पाईक होण्यास हा वर्ग उत्सुक असे, मग तो धनी हिंदू असो की यवन असो, जुना असो की नवा असो, देव फोडणारा असो की, जोडणारा असो. शिपायगिरीची धामधूम करून लढाऊ राज्ययंत्राचा अंश होणारा असा हा कुणबी वर्ग त्या काली महाराष्ट्रात होता. कशाकरता लढावयाचे व कदाचित् लढून मरावयाचे तर केवळ पोटाकरिता, अशातला हा वर्ग होता. ह्या वर्गाच्या वरचा वर्ण म्हणजे क्षत्रिय जे मराठे त्यांचा. मराठ्यांत दोन धंदे करणारे लोक होते. देशमुख्या, पाटिलक्या, चौगुलक्या, मोकदम्या, पटवाऱ्या, मोकाश्या, वगैरे करणारा वृत्तिवंत मराठ्यांचा

पहिला वर्ग आणि केवळ शेतकीवर निर्वाह करणाऱ्या गरीब मराठ्यांचा दुसरा वर्ग. हा दुसरा वर्ग आपणाला मराठा कुणबी म्हणवी. शूद्र कुणबी निराळा आणि मराठा कुणबी, निराळा. शूद्र कुणबी फावल्या वेळात सामान्य पाइकी करी आणि मराठा कुणबी, पाटील, देशमुख इत्यादि लोक हवालदारपासून सरलष्करपर्यंतच्या लहान-मोठ्या हुद्देदाऱ्या करी. शूद्रांप्रमाणेच ह्यांनाही मुसुलमान किंवा हिंदु असा वाटेल तो धनी चाले. एक भाऊ पातशाही नोकर व एक भाऊ शिवशाही नोकर असली उदाहरणे महाराष्ट्राच्या इतिहासात शेकडो आहेत. तात्पर्य, शूद्राप्रमाणेच ह्या मराठे लोकांतही स्वराज्य व स्वराष्ट्र यांचा निःसीम अभिमान बाळगिणारे लोक शहाजी-काली फार विरळा असत. तात्पर्य एतत्कालीन मराठे केवळ आयुधोपजीवी गण बनले होते. स्वराष्ट्रसंरक्षक क्षत्रियत्वाचे वारे त्यांच्यातून लुप्त झाले होते. क्षत्रिय जे मराठे त्यांच्याप्रमाणेच ब्राह्मणांचीही दशा होती. मुसुलमान किंवा हिंदू अशा वाटेल त्या धन्याची सेवा करण्यात हे सारखेच राजी असत. मराठे व ब्राह्मण यांना यवनाची सेवा मनापासून आवडत असे, असा मात्र ह्या राजीपणाचा अर्थ केल्यास तो चूक होईल. अनन्यगतिक म्हणून हे लोक यवनसेवा पतकरीत. स्वतंत्र हिंदुराज्य स्थापण्याची शक्यता नसल्यामुळे, विजयानगरच्या राजघराण्याचा अस्त झाल्यावर, यवनसेवा केल्यावाचून ह्या लोकांना गत्यंतर राहिले नव्हते. स्वतंत्र हिंदुराज्य स्थापण्याची शक्यता ह्या मराठा किंवा ब्राह्मण लोकांत नसण्याचे कारण असे होते की, मराठा क्षत्रिय व ब्राह्मण यांची लोकसंख्या शूद्र कुणब्यांच्या लोकसंख्येहून फारच फार कमी होती. सामान्यतः हजार पाचशे वस्तीच्या गावात एखाददुसरे ब्राह्मणाचे घर व एखाददुसरे पाटलाचे घर असे, म्हणजे दहा पाच ब्राह्मणाची व दहा पाच मराठ्यांची माणसे असत. कित्येक दहादहा पाचपाच गावांचे गट असे असत की, त्या साऱ्यात मिळून एखादे ब्राह्मणाचे व दोन अडीच पाटलाची घरे असत. मिळून सर्व राष्ट्रात एका ब्राह्मणास दोन मराठे व पंचवीस कुणबी असे सरासरी प्रमाण पडे. ब्राह्मणात किंवा क्षत्रियात जो स्वराज्यविषयक किंवा स्वधर्मविषयक ईर्ष्या, आकांक्षा व अभिमान संभाव्य असे तो शूद्रात अद्याप जागृतही झाला नव्हता. निरवसितत्वातून अनिरवसितत्त्वात येऊन म्हणजे अस्पृश्यत्वातून स्पृश्यत्वात यऊन व वनचरत्वातून ग्रामचरत्वात नांदून पोटाकरिता कोणाची पाइकी करण्या-इतकीच महत्त्वाकांक्षा शूद्रात उद्भवली होती, हिंदुत्वाकरिता, स्वधर्माकरिता व स्वराज्याकरिता हिंदुपक्षाच्या वतीनेच तेवढा लढेन, असे स्पृहणीय पक्षपातित्व शूद्रवर्गात अद्याप जन्मले.नव्हते. त्यामुळे स्वतंत्र राज्याच्या उभारणीला मनुष्यबलाचा जो आत्मयज्ञपूर्वक निःस्वार्थी पाठिंबा लागतो तो ब्राह्मणक्षत्रियांना नव्हता. ब्राह्मण-क्षत्रियांना शूद्रांचे निःस्वार्थी मनुष्यबळ नव्हते इतकेच नव्हे, तर स्वार्थी किंवा द्रव्यार्थी मनुष्यबळही पैदा करण्याचे सामर्थ्य तत्कालीन ब्राह्मणक्षत्रियांपाशी नव्हते. ब्राह्मण तर बोलून चालून जातीचाच दरिद्री. तो द्रव्य देऊन मनुष्यबळ कसचा

पैदा करणार ? मराठ्यांचीही मुसुलमानी अमलाच्या प्रथम प्रहरात तीच दुर्दशा होती. दहा पाच हजार पाईक पोशील किंवा पाच चार हजार बारगीर बाळगील, अशा तोलाचा मराठा क्षत्रिय शक तेराशे पासून शक १५०० पर्यंत एकही नव्हता. म्हणजे ब्राह्मण, क्षत्रियापाशी त्या काली मनुष्यबलही नव्हते व द्रव्यबलही नव्हते. राहिले ज्ञानबल. ते त्या काली निवृत्तीच्या पाठीमागे लागले होते. निवृत्तीच्या नदीवर गोव्याघ्र व हिंदूमुसुलमान यांना सारखीच तृषा भागविता येत असे. तात्पर्य, स्वार्थी किंवा निःस्वार्थी मनुष्यबल, द्रव्यबल, व ज्ञानबल या तिन्ही बलांचा अभाव ब्राह्मणक्षत्रियांच्या ठायी त्या काली उत्कटत्वाने जाणवत असून, ते स्वतःच करू नये ती यवनाची सेवा पोटाची खाच भरण्याकरिता पतकरीत असत. असल्या हतभाग्यांना कोठला स्वधर्म व कोठले स्वराज्य ! इतकी तीनशे वर्षे ते जिवंत राहिले हेच नशीब !

२२. तत्कालीन हिंदूची व रानटी अनार्यांची परीक्षा झाल्यावर, आता मुसुलमानांची परीक्षा करू. त्या काली महाराष्ट्रात तीन प्रकारचे मुसुलमान असत. इराण, तुराण, अरबस्तान व अफगाणिस्तान यातून येणाऱ्या मुसुलमानांना अस्सल समजत. ह्या मुसुलमानांचा पहिला वर्ग. ह्या अस्सलांपासून शूद्रातिशूद्र स्त्रियांच्या ठायी झालेल्या लेकवळचा मुसुलमानांचा दुसरा वर्ग. आणि येथीलच खाटीक, हलालखोर तांबोळी, पटवेगार, मोमीन, रंगरेज, लोहार, बोहरी, इत्यादी बाटलेल्या जातींचा तिसरा वर्ग. वतने राखण्याकरिता कित्येक ब्राह्मण व मराठे बाटले तेही या तिसऱ्या वर्गातच पडतात. पैकी, या तिसऱ्या वर्गातील लोकांचा पेशा उदम्यांपैकी असल्यामुळे राजकीय विचारात त्यांची गणती करण्याची जरूर नाही. मुसुलमानी रिवाजात मूळच्या जाती नाहीत, तेव्हा येथील आर्यानार्य स्त्रियांच्या पोटून त्यांना जी संतती झाली ती ते लेकवळे किंवा यूरोपियन मानतात त्याप्रमाणे हाफक्यास्ट मानीत नाहीत, फुलक्यास्टच मानतात. लेकवळा हा शब्द येथे मिश्र विवाहोत्पन्न संतती एवढ्याच दृष्टीने योजिला आहे. हे लोक येथे स्थायिक होऊन कित्येक पिढ्या झालेल्या होत्या व ह्यांना दक्षिणी किंवा दखनी असे नामाभिधान पडले होते. इराण, तुराण, अरबस्तान, इकडून जे नवीन मुसुलमान येत त्यांना परदेशी ही संज्ञा असे. ह्या दक्षिणी व परदेशी मुसुलमानांतून निजामशाही व आदिलशाही राज्यात मुत्सद्दी व लष्करी अंमलदार मिळत, आणि ह्यांच्याच कर्तबगारीवर राज्याची स्थिरस्थावरता अवलंबून असे. निजामशाही व आदिलशाही रियासतीच्या प्रारंभीच्या पन्नास शंभर वर्षांत दक्षिणी, परदेशी असा भेद मुसुलमानात उद्भवला नव्हता. सर्वच मुसुलमान परदेशी होते. पुढे जी घराणी ह्या पेशात पिढ्यान्‌पिढ्या कायम होऊन राहिली त्यांना दखनी किंवा दक्षिणी अशी संज्ञा पडली. ह्या दक्षिणी मुसुलमानांचे येथे कायमचे हितसंबंध निर्माण झाले आणि त्यांच्या हितसंबंधांची व पातशाही हितसंबंधांची तेढ पडू लागली. ह्या तेढीला तोड म्हणून पातशाहा पर-

देशी नवीन मुसलमानांना आपल्या दरबारी सदा बोलवीत, कारण नवीन परदेश्यांत हितसंबंध उद्भवले नसल्यामुळे पातशाही हितसंबंधांशी परदेशी कायमचे दक्षिणी बनत तोपर्यंत काही काल त्यांच्या तेढीही उद्भवत नसत. दक्षिणी व परदेशी असे हे दोन पक्ष एकमेकांविरुद्ध चालवून शाहा आपल्या हाताखालील अंमलदारांना दाबात ठेवण्याचा प्रयत्न करीत. मनुष्यांना वागविण्याची नाजुक करामत ज्या सुलतानाला साधे त्याच्या हाती हा प्रयत्न फलप्रद होई. परंतु, एखादा सुलतान कमअक्कल किंवा दुर्बल किंवा पोरसवदा निपजला म्हणजे हे दोन्ही पक्ष उर्मट होऊन सुलतानाच्या कह्यात न वागता त्यांच्यावरच कुरघोडी करीत. अशा काली, एकच तोड शिल्लक राही. ती ही की, नवीन तिसरा एक पक्ष उभा करून पूर्वीच्या दोन पक्षांना दाबात ठेवायचे. शहाजी जेव्हा वडिलांच्या जहागिरीचा मालक होऊन निजामशाही दरबारात शक १५४३ त वावरू लागला, त्या वेळी त्या दरबारात हे दक्षिणी व परदेशी बंड ऐन रंगात येऊन अगदी पिकून गेले होते. ह्यावेळी निजामशाही तख्तावर मूर्तिजा, मूर्तजा किंवा मुर्तुजा हा नरम, चैनी, ऐदी व नाकर्ता सुलतान होता. मीर राजूचा सासूरवास दुःसह झाला म्हणजे, मलिकंबरची कास धरावी आणि मलिकंबरचा जाच असह्य झाला म्हणजे राजूची पायधरणी करावी अशी काही वर्षे मूर्तिजाने काढल्यावर, त्याने दक्षिणी व परदेशी यांच्या पीडेतून मुक्त होण्याकरता, तिसरा एक पक्ष निर्माण केला. तो पक्ष म्हणजे मराठ्यांचा पक्ष. आवश्यास व परिडचास असताना, मूर्तिजाने मालोजी भोसले यास जवळ केले होते. मालोजीचा मुलगा शहाजी याचे लग्न जाधवरावाच्या मुलीशी जुळवून देण्यात, मूर्तिजाचे बरेच अंग होते. ह्या कृत्याने मालोजी उपकारबद्ध झाला व जाधवरावाच्या बरोबरीचा तोलदार सरदारही बनला, आणि अशा तऱ्हेने तिसरा पक्ष उभारण्याच्या लायकीचा ठरला. परंतु ह्या तृतीय पक्षाचे पुढारपण गाजवीत असता मालोजी शक १५४१ त वारल्यावर, पक्षाध्यक्षत्व शिताफीने गाजविण्यास नाना प्रकारांनी लायक असा आणीक एक पुरुष मूर्तिजाला लाभला. तो कर्ता पुरुष म्हणजे तरुण, महत्त्वाकांक्षी व कर्तबगार शहाजी भोसला हा होय. शहाजीराजाचे जे गुणवर्णन जयराम कवीने केले आहे त्याचा अनुवाद शिवदिग्विजय व शिवप्रताप ह्या दोन्ही बखरीत सापडतो. शूर, गुणज्ञ, परेंगितज्ञ, जातीने मर्द, युद्धव्यूहकुशल, शहाची मर्जी संभाळून वागणारा परंतु स्वतःचा कुर्रा जाऊ न देणारा, असा गुणगणमंडित जो शहाजी भोसला त्यांच्या द्वारा राज्यात मराठ्यांचा तिसरा पक्ष उभारून दक्षिणी व परदेशी पक्षांना जरबेत ठेविण्याची व्यवस्था मूर्तिजाने केली. दरबारी एकातात व लोकांतात जाण्यायेण्याची शहाजीला सदर परवानगी असे. शहाच्या मर्जीचे एक मासलेवाईक उदाहरण बखरकार देतो. शक १५४५ त शहाजीला संभाजी हा प्रथम पुत्र झाला, तेव्हा शाहाने स्वतः मोठा समारंभ करून, शहाजीस वस्त्रे, भूषणे, अलंकार, परगणे व किल्ला बक्षीस दिला (शिवाजीप्रताप). शाहाच्या मर्जीचे दुसरे

उदाहरण बखरकार देतो तेही असेच मासलेवाईक आहे. मूर्तिजाचा जेव्हा अंत झाला तेव्हा त्याने दक्षिणी व परदेशी मुसुलमानांवर विश्वास न ठेविता मराठा जो शहाजीराजा त्याच्यावर आपल्या बायकापोरांना संभाळण्याचे काम निरोपाने सोपविले. मूर्तिजाच्या अंतकाळी शहाजी निजामशाहीत नव्हता, ही बाब लक्षात घेतली म्हणजे शहाजीने बुऱ्हाण शहाचा केवढा विश्वास संपादिला होता ह्या विधानाच्या सिध्यर्थ ह्याहून जास्त पुरावा देण्याची जरूर नाही.

२३. राजकीयदृष्टचा देशातील लोकस्थिती व दरबारातील पक्षस्थिती वर्णिल्यानंतर, रियासतीच्या भोवतालील राजकीय परिस्थिती सांगणे सोईस्कर होते. शहाजीच्या उमेदवारीच्या काळी, निजामशाहीच्या शेजाराला एकंदर चार शाहचा होत्या, उत्तरेस दिल्लीची प्रचंड व विस्तीर्ण मोगलाई, व दक्षिणेस विजापुरची आदिलशाही, बेदरची बरीदशाही व गोवळकोंडचाची कुतुबशाही. पैकी बेदरची बेरीदशाही मरणोन्मुख झाली असून कुतुबशाहीहून आदिलशाही व आदिलशाहीहून मोगलाई एकाहून एक बलिष्ठ होत्या. सर्वात मोगलाई अत्यंत बलिष्ठ असून, तिचा रोख दक्षिणेतील साऱ्या शाहचा खाऊन टाकण्याचा स्पष्ट व सर्वजनदृष्ट होता. दिल्लीच्या मोगलांनी निजामशाहीचे मोठमोठे लचके तोडिले असून राजू, मलिकंबर व मालोजी यांच्या कर्तबगारीने ती शाही काही काल जिवंत राहिली होती, आणि निजामशाही वारली तर बाकीच्या शाहचा निजामशाहीचे अनुकरण करतील असा रंग दिसत होता. तत्रापी निजामशाही व आदिलशाही यांच्या आपसात लढाया चालूच होत्या. भोवतालची राजकीय परिस्थिती ही असल्या प्रकारची होती.

२४. खुद्द निजामशाहीतील अंतस्थ राजकीय स्थिती पाहिली तर तीही वाखाणण्यासारखी नव्हती. मुख्य शहा जो मूर्तिजा ऊर्फ बुऱ्हाणशहा तो दुर्बल असून, मोगलांनी दिलेल्या पंचवीस वर्षाच्या माराने त्याची व त्याच्याबरोबर रियासतीची इज्जत उतरून गेलेली होती. मूर्तिजाच्या पहिल्या अमदानीत राजू व अंबर ह्या दोघा दक्षिणी व परदेशी पुढाऱ्यांनी राज्याचा पूर्व व पश्चिम भाग अनुक्रमे वाटून घेतला होता व मूर्तिजाला आवश्याच्या किल्ल्याभोवतील काही खेडी निर्वाहार्थ लावून दिली होती ! मूर्तिजाच्या उत्तर अमदानीत मलिकने राजूला जमीनदोस्त करून सर्व सत्ता आपल्या एकटचाच्या हातात एकवटविली होती, व शहाला तो कस्पटासमान लेखीत होता. शेवटी राजूचा घरचा काटा काढून टाकिल्यावर, मोगलांशी व आदिलशाहाशी झगडण्यात अंबर गुंतला होता. अशा आणीबाणीच्या वेळी शहाजीराजा भोसला तत्कालीन राजकीय आखाडचात उमेदीने व ताज्या दमाने अवतीर्ण झाला. शहाजी आपला वाली होईल व म्हाताऱ्या अंबराच्या प्राणघेण्या मगरमिठीतून आपणास सोडवील अश्या आशेने मूर्तिजाचे होते तेवढे वजन शहाजीच्या पाठीला होते. ह्या वजनाचा पूर्ण उपयोग करून घेऊन, निजामशाहीची मोडती इमारत शहाजीने काही काळ सावरून धरिली आणि इतकेही करून ती

कायमची मोडल्यावर, स्वतःचे सामर्थ्य वाढवून आदिलशाही व मोगलाई यांची हाडे खिळखिळी करण्याचा मार्ग आपला प्रतापी मुलगा जो शिवाजी त्याला मोकळा करून दिला.

२५. शहाजी आपल्या बापाच्या जहागिरीचा व सैन्याचा धनी शक १५४३ त झाला. म्हणजे मालोजी १५४१ त वारल्यावर वर्ष दीडवर्षाने झाला. ह्या वर्ष दीड वर्षाच्या अवधीत म्हणजे शक १५४२ त जहांगीराने घेतलेला सर्व निजामशाही प्रांत पुनः हस्तगत करण्याच्या इराद्याने मलिकंबराने मोगलाई सुभेदाराचे मुख्य ठाणे जे बऱ्हाणपूर त्यास वेढा दिला व गेलेला प्रांत पुनः परत मिळविला. ह्या बऱ्हाणपूरच्या स्वारीत शहाजीने बहुत पराक्रम केला. खुद्द सुभ्याच्या ठाण्याला वेढा मलिकंबराने दिलेला ऐकून, जहांगीर पातशाहा संतापाने आलस्यांतून व चैनबाजीतून खडबडून जागा झाला व त्याने आपला कर्तुत्ववान मुलगा जो शहाजहान त्याला मलिकंबरावर पाठविले. शहाजहान येणार ही बातमी मूर्तिजा निजामशहास कळताच त्याशी सामना करण्याची तयारी फर्माविण्याच्या इच्छेने मूर्तिजाने व मलिकंबराने रियासतीतील प्रमुख प्रमुख सरदारांस सदरेस बोलाविले. त्या सरदारांत सिंदखेडचे जाधवराव, शहाजीराजे, शरीफजीराजे, विठोजी राजांचे आठही लेक, जाधवरावांचे पुत्र दत्ताजीराजे, खंडागळे, इत्यादि मराठे मंडळी होती. भोसलेमंडळी व जाधव मंडळी यांच्यात कित्येक वर्षांचे वितुष्ट जगजाहीर होते. दरबार खलास झाल्यावर सरदार मंडळी आपापल्या लवाजम्यानिशी परत जाऊ लागली. त्या दाटणीत भोसल्यांकडील खंडागळें यांचा हत्ती बेफाम होऊन त्याने जाधवांकडील कित्येक पाईक चिरडिले. तेव्हा लखुजी जाधवाचा मुलगा दत्ताजी हा कावून हत्तीला मारावयास धावला. त्याच्या आड विठोजी भोसल्याचे आठी जण मुलगे पडले. मध्ये लुडबूडण्याचे कारण नाही म्हणून दत्ताजी जाधव ओरडला व त्याने भोसल्यांकडील बहुत लोक जखमी केले. त्या दंगलीत विठोजीचा लेक संभाजी याचा हात चालून दत्ताजीचे मुंडके उडाले. ही बातमी लखुजी जाधवरावांस कळली, त्यासरशी लखुजीने संभाजी भोसल्यावर चाल करून त्यास ठार केले. तेव्हा संभाजीच्या मदतीला शहाजीराजे भोसले धावून आले. पटचाचा हात लागून शहाजीराजेही जमिनीवर मूर्छित पडले. हे एकंदर वर्तमान मूर्तिजा निजामशहास कळले. मूर्तिजाचे शहाजीवर पुत्रवत् प्रेम असे, सबब, त्याने शहाजीचा कैवार घेऊन लखुजी जाधवास चार शहाणपणाच्या गोष्टी सांगितल्या. जाधवमंडळी मोगलाकडे फितूर असल्याची वदंता मूर्तिजास व अंबरास होतीच. करता, शहाजीचा पक्ष घेऊन जाधवांना उपदेश त्यांनी केला ते ठीकच झाले. तत्रापी, ह्या पक्षाभिमानाचा व्हावा तोच परिणाम झाला. भोसल्यांचे व जाधवांचे वैर दुणावले. इतकेच नव्हे तर, भोसल्यांचे कैवारी जे निजामशहा त्यांच्यावरही जाधवराव क्रोधाविष्ट झाले. ह्याच सुमारास म्हणजे शक १५४५ त जिजाबाईस चवथ्यानदा किंवा पाचव्यानदा गर्भार राहून पुत्र झाला, त्याचे नाव

आपल्या द्वंद्वयुद्धात मेलेल्या चुलतभावाच्या स्मरणार्थ शहाजीने संभाजी म्हणून ठेविले. बारश्याच्या दिवशी खुद्द मूर्तिजा बुऱ्हाणशहा येऊन मोठ्या समारंभाने ह्या मुलाचा नामकरणविधी झाला. त्या वेळी शहाने शहाजीस बढतीखातर काही जास्त जाहागीर दिली. शहाने केलेल्या ह्या आहेराने व आदराने, तर जाधवरावाच्या नाकाला मिरच्याच झोंबल्यासारख्या झाल्या व भोसले–जाधवांच्या यादवीला केवळ ऊत आला. या यादवीची कुणकुण हेर व वकील यांच्या द्वारा विजापूर दरबारात पोहोचली. शक १५४५ त विजापुरी इभ्राइम आदिलशहा राज्यावर होता. त्याने व त्याच्या मुत्सद्द्यांनी निजामशाहीतील ह्या यादवीचा फायदा घेतला. या जाधवरावाला त्यांनी निजामशाहीतून फोडला. निजामशाहीतील हे बडे धेंड आदिलशाहीत गेल्यावर, ह्याने इभ्रामशहास अशी सल्ला दिली की, दिल्लीचा मोगल निजामशहावर चाल करून आयताच येतो आहे, तेव्हा त्याच्याशी संगनमत करून शेफारलेल्या मलिकंबरास चिरडून टाकावा. ही सल्ला आदिलशाहाच्या पथ्यावर पडली; कारण मोगलांचा विध्वंस केल्यानंतर मलिकंबराने आदिलशहास तंबी देण्याचा उपक्रम आरंभिला होता. मोगलांनाही आदिलशहा आपल्या बाजूस यावासाच होता. का की मालिकंबर, शहाजी, लखुजी व इभ्रामशहा या चवकडीशी एकदम सामना करण्याची त्यांची छाती नव्हती. ह्या चवकडीच्या एकवटलेल्या सामर्थ्याचा अनुभव शक १५४२ त ब्रऱ्हाणपूरच्या वेढ्याच्या वेळी मोंगलाला चांगला आलेला होता. तेव्हा चौकडीतून आदिलशहा फुटलेला व निजामशाहीतून जाधवरावासारखे धेंड फितरलेले देखून, मलिकंबराला व शहाजीला हांहां म्हणता जिंकू अशा हावभरीने मोगल अहमदनगरावर चाल करून आला. निजामशहा, आदिलशहा व मोगल, ह्या तिन्ही पातशहाकडील सरदारांची नावे बृहदीश्वरशिलालेखात दिली आहेत (पृष्ठ १०।११). निजामशहाच्या बाजूला शहाजीराजे, शरफोजीराजे, मृत संभाजीराजे वगळून विठोजीराजाचे खेळोजीराजे, मालोजीराजे, मंबाजीराजे, नागोजीराजे, परसोजीराजे, मकाजीराजे, व त्र्यंबकजीराजे, असे सात लोक भोसलेमंडळीपैकी असून, सीहमीरखान, मुधाखान, फलसाखा हे काळ्या तोंडाचे हबशी शामळ सरदार होते. ह्या हबशी सरदारास बृहदीश्वरशिला-लेखकार ताम्रवक्त्र म्हणतो. ताम्रवक्त्र म्हणजे तांबड्या तोंडाचे तुरुक सरदार सारतखान, याकूतखान, पनसूरखान, सुरुपखान, जोहारखान, फत्तेखान व अहमदखान, हे होते. शिवाय कर्नाटकातील बल्लाळराजा व बेरडांचा नाईक सिंहराज हेही निजामशाही सैन्यात होते. ह्या खेरीज विठोजी, नागोजी, नेताजी, नरसिंहराजे, जगदेवराजाचे पुत्र सुंदरराजे इत्यादी दुसरे मराठे सरदार निजामशहाकडे असून ह्या सर्वांचे मुख्य सेनापत्य मलिकंबराकडे होते. दिल्लीच्या जंगी मोगली फौजेचे आधिपत्य लष्करखानाकडे होते. आदिलशाही सैन्यात लखुजी जाधवराव व उदारराम, विश्वनाथ, अचलोजी, बहादूरजी, दादाजी, राघोजी व जसवंतजी असे

त्याचे सात लोक असून, जाधवरावाच्या तैनातीतील जलाखान, खजीरखान, सुजाखान, जहानखान, शिकंदरखान, खलेलखान व हिसामदखान असे तुरुक सरदारही होते. खुद्द आदिलशाहाकडील मुस्तफाखान, काहमदखान, दिलावरखान, याकूतखान, अंबारखान, मुशेखान, फरादखान, सर्जाखान, जोहरखान, अंकुश- खान वगैरे सरदार हजर असून, घाटगेप्रभृती मराठे सरदार व धुंडीराजप्रभृती ब्राह्मण सरदार, तसेच रुस्तुमखान इत्यादी दुसरेही सरदार आदिलशहाच्या परिवारातले होते. आदिलशाही सैन्याचे अध्यक्षत्व, मुल्ला महमदखान ऊर्फ मुल्ला महमद लारी सरलष्कर याजकडे होते. या मुल्ला महमदला लोक प्रेमाने मुल्ला बाबा म्हणत. बृहदीश्वरशिलालेखात दिलेल्या नावांपैकी बुसातिनेसलातीनात अंकुशखान, फरादखान, अंबारखान, रुस्तुमराव, मुल्ला महमद, ही नावे आली आहेत. त्यावरून दिसते की, बुसातीनेसलातीनकारापेक्षा बृहदीश्वरशिलालेखकाराला ह्या लढाईतील सरदारांच्या नावनिशीचा तपशील जास्त उपलब्ध होता. कारण उघड आहे. शहाजी महाराजांचा या लढाईशी निकट संबंध असल्यामुळे, तंजावरच्या दप्तरखान्यात शक १७२५ तही ह्या लढाईची तपशिलवार टिपणे विद्यमान होती. ही तिन्ही सैन्ये शक १५४६ रक्ताक्षसंवत्सराच्या कार्तिकात अहमदनगराजवळील भातवडीच्या रानात एकमेकांशी भिडून मोठे तुंबल युद्ध झाले. त्यात आदिलशाही व मोगलाई सैन्याचा पुरा मोड झाला. ह्या लढाईत शहाजीराजे भोसले यांनी देवासुरयुद्धापरी युद्ध करून मोगलाच्या सैन्याचो दाणादाण करून दिली, असे शिलालेखकार लिहितो. मोगलाचा सुभेदार लष्करखान व आदिलशाही मुल्ला महमद अशी दोन्ही कटके मलिकंबराने एके ठायी बुडविली म्हणून जेधेशकावलीकार म्हणतो. आदिलशहाकडील व मोगलाकडील शेकडो सरदार शहाजीने पाडाव करून धरून आणिले. पैकी फरहादखान व रणदुल्लाखान हे आदिलशाही सरदार निजामशाहाच्या चाकरीस राहिले. तेव्हापासून शहाजीराजे व रणदुल्लाखान यांचा जो स्नेह जडला तो मरणान्त अकृत्रिम राहिला. भातवडीचे हे घनघोर युद्ध संपल्यावर आदिलशाही व मोगली सैन्यापैकी जे काही सैन्य पळून जात होते त्याला आदिलशाहाकडील जोहरखान नामक सरदाराने थोपवून धरून पाठलाग करणाऱ्या निजामशाही सैन्याला परत तोंड दिले. निजामशाही सैन्याचे पुढारपण शरफोजीराजाकडे होते. ते ह्या पाठलागात वीरस्वर्ग पावले. ही बातमी शहाजीराजास कळताच, ते व खेळोजीराजे ह्या दोघांनी आदिलशाही व मोगलाई अवशिष्ट सैन्याचा फडशा उडविला. शक १५४२ च्या बऱ्हाणपूरच्या स्वारीत व शक १५४० तील नर्मदापारच्या मांडवगडाच्या स्वारीत शहाजीने मलिकंबराच्या अध्यक्षत्वाखाली बरीच बहाद्दरी केली होती परंतु शक १५४६ तील या भातवडीच्या घोर संग्रामात शहाजीचे लढवय्येगिरीचे व पुढारपणाचे सर्व गुण ठळकपणे जगाच्या निदर्शनास आले. ह्या संग्रामात वृद्ध मलिकंबर हा ऐंशीच्या घरात गेलेला असून नावाला मात्र

सेनाध्यक्ष होता, बाकी लढाईची सर्व व्यूहरचना ऐन तिशीत असलेल्या तरुण शहाजीची होती. युद्धानंतर मूर्तिजाशहाच्या म्हणजे बुऱ्हाणनिजामशहाच्या दर्शनाला मंडळी गेली त्यात शिरस्त्याप्रमाणे यद्यपि मलिकंबराला दरबारी शिलशिल्याला अनुसरून अग्रेसर केले होते, तत्रापी निजामशहाने विशेष मर्यादा, विशेष बहुमान व विशेष आदर कर्त्या व आवडत्या शहाजीराजाचा केला (बृहदीश्वरशिलालेख). त्यामुळे ह्या प्रसंगानंतर वृद्ध मलिकंबर व तरुण शहाजी ह्यांच्यात द्वेष, मत्सर व वैमनस्य यांचा प्रवेश झाला. गेली पंधरा वीस वर्षे जाधवरावांनी मत्सर केला. आता त्याच्या जोडीला अंबरही जाऊन बसला.

२६. कार्तिकमार्गशीर्षात भातवडीच्या लढाईत नामोहरम झालेल्या आदिलशहाला जमीनदोस्त करण्याचा घाट मलिकंबराने घातला. त्याने आपले विजयी सैन्य थेट विजापूरच्या इलाख्यात नेऊन इब्राइम आदिलशहाने बसविलेले नवरसपूर जाळून-पोळून खाक केले व जाताना वेढा घालून सोलापूरचा भुईकोट काबीज केला. ही मोहीम १५४७ च्या चैत्रवैशाखापर्यंत चालून पावसाळ्यात सैन्य स्वस्थळास आले. सैन्याबरोबर शहाजी व खेळोजी वगैरे भोसलेमंडळीही राजधानीस परत आली. इकडे राजधानीत निराळीच मिसल बनून राहिली होती. मलिकंबराच्या बगल-बच्च्यांनी मूर्तिज्यांच्या मनात असे भरवून दिले की, भातवडीची लढाई, नवरस-पूरची जाळपोळ व सोलापूरचा वेढा विजयाने शेवटास नेण्यात शहाजीचा पराक्रम विशेष नसून, मुख्य कर्तबगारी खेळोजी भोसल्याची आहे. अर्थातच मूर्तिजाने शहा-जीला न गौरविता, खेळोजीचा आदर नवरसपूरच्या मोहिमेनंतर विशेष केला. खरी कामगिरी शहाजीची होती आणि तत्प्रीत्यर्थ दरबारी त्याचा आदर झाला पाहिजे होता. परंतु, तसा काहीएक प्रकार न होता, इतरांचाच जयजयकार झालेला पाहून शहाजी विमनस्क, खिन्न व अजुर्दा झाला. शहाजीला असे दिसले की, आज पंचवीस वर्षे ज्या मूर्तिजाची आपल्यावर मेहेरनजर असे व ज्याच्या कृपेच्या पाखरेखाली पराक्रम करण्याची आपण ईर्ष्या बाळगली तो मूर्तिजा आपल्यावर उलटला आहे. कर्त्या व चढत्या शहाजीच्या शत्रू मंडळीत आता घरचे भाऊ खेळोजी व राज्याचा धनी मूर्तिजा यांची गणना होऊ लागली. सासरा जाधवराव, वजीर मलिकंबर, धनी मूर्तिजा व चुलत भाऊ खेळोजी हे विरुद्ध झालेले पाहून शहाजीला सुरक्षित-तेचा मार्ग धुंडाळणे भाग पडले. खिन्न होऊन स्वस्थ बसता, तर शहाजी ह्या चौकडी-पुढे नष्ट झाला असता. ज्या पराक्रमाचे तेज सहन न होऊन निजामशाहीतील प्रमुख सूत्रधार शहाजीच्या विरुद्ध झाले तोच पराक्रम आदिलशाहीतील मुख्य कर्णधारांना आदरणीय व स्वीकरणीय वाटला आणि त्यांनी विजापुरी येण्याबद्दल शहाजीशी संविधान लाविले. ते संविधान प्रशस्त भासून शक १५४७ च्या पावसाळ्यानंतर शहाजी आदिलशाहीला स्वसैन्यासह जाऊन मिळाला. तेथे पुढे शक १५४८ क्षय-संवत्सरी शहाजीराजास त्याला साजेलशी मनसब व अक्कलकोट वगैरे जहागीर

मिळाली (साने पत्रे यादी वगैरे ४१०, शिवदिग्विजय इत्यादी.)

२७. शहाजी विमनस्क होऊन आदिलशाहीत जो जातो तो इकडे निजामशाहीत शक १५४७त त्याचवेळी जहांगीरचा मुलगा खुर्रम ऊर्फ शहाजहान आपल्या बापावर बंड करून मलिकंबराच्या आश्रयास आला. भातवडी, नवरसपूर व सोलापूर येथील लढायांमुळे मलिकंबराची इभ्रत सर्व हिंदुस्थानभर इतकी वाढली की, दिल्लीपतीच्या कर्तृत्ववान पुत्राला ही निजामशाही आश्रयणीय वाटली. खरा प्रकार शहाजहानला माहीत नव्हता. निजामशाहीची इभ्रत व थोरवी मूर्तिजा किंवा मलिकंबर ह्या खुळचा व म्हाताऱ्या इसमांवर अवलंबून नसून, ती पराक्रमी शहाजीवर अवलंबून आहे, हे त्यावेळी जगजाहीर झाले नव्हते, आदिलशाहीतील काही थोडचा जाणत्या लोकांच्या मात्र लक्षात येऊन चुकले होते. अशी जरी वस्तुस्थिती होती तत्रापि शहाजहानसारखा अव्वल दर्जाचा शाहजादा आश्रयास आल्याने, मलिकंबराचा बोलबाला अतिशय वाढला. जहांगिरावर लढाईत जय मिळविल्याचे श्रेय मलिकंबरास फुकटाफुकट लाभले. दिल्लीचा मोगल व विजापूरचा आदिलशहा यांचा हा असा पाणउतारा झाल्याने मलिकंबर केवळ वैभवाच्या शिखरास पोहोचला. ह्यावेळी त्याच्या वैभवात एक मात्र वैगुण्य राहिले. शहाजी भोसला आदिलशहास मिळाला. शहाजीच्या जोरावर तर आदिलशहाचा पाणउतारा मलिकंबराने केला. तत्रापी हे वैगुण्य शहाजहानाच्या आगमनाने थोडेबहुत भरून निघेल असा अंबराचा अंदाज होता. शहाजी विजापूरकरांस मिळाल्यावर, विजापूरच्या दरबाराने त्यास आपल्या पुणे व जुन्नर इकडील जहागिरीत राहून मलिकंबराला शह देण्याच्या कामगिरीवर नेमिले, आणि नवरसपूरच्या व भातवडीच्या लढाईतील अपमानाचा सूड उगविण्याची तयारी केली. शक १५४७च्या पावसाळयानंतर आदिलशहाशी तह करून शहाजी आपल्या सैन्यासह आपल्या जहागिरीच्या जुन्नरप्रांती राहिला व तेथून त्याने निजामशाही दरबारात कारवाई सुरू केली. मूर्तिजा निजामशहा, मलिकंबर व खेळोजी भोसले, ह्या तिघांतून फुटण्यासारखा माणूस मूर्तिजा आहे, हे शहाजी जाणून होता. भातवडीच्या व नवरसपूरच्या प्रकरणानंतर शहाजीच्या हाती सत्ता जाऊन तो मलिकंबराप्रमाणे किंवा राजूप्रमाणे आपल्यावर कुरघोडी करील, या भीतीने मूर्तिजाने खेळोजीचा फाजील बहुमान करून शहाजीला दुखविले होते, हेही शहाजी जाणून होता. तसेच शहाजी विमनस्क होऊन राज्यातून निघून गेल्यानंतर म्हाताऱ्या मलिकंबराच्या कचाटीत आपण बिनसूट सापडलो, हा मूर्तिजाचा अनुभव शहाजीच्या लक्षात होता. सबब, मूर्तिजाला त्रिकूटातून फोडण्यास सोईचे पडेल, असा शहाजीने कयास केला. मूर्तिजाची भाई जी बेगमसाहेब तिची मर्जी अद्याप शहाजीवरून उठली नव्हती. तिचा शब्द मूर्तिजा कुराणाप्रमाणे मानी. इतकेच नव्हे, तर कधी कधी राजपत्रांवर तिची निशाणी मथळयावर लिहिण्यात तो भूषण मानी. ह्या बेगमेला मूर्तिजा व दरबारी लोक मासाहेब म्हणत. मूर्तिजाचे सबंध नाव मूर्तिजा बुऱ्हान

शहा. कित्येक लेखक त्याला मुर्तिजा निजामशहा म्हणतात व कित्येक बखरकार व तवारिखकार त्याला बुऱ्हान निजामशहा म्हणतात. याचे एक पत्र पुण्याच्या इतिहास मंडळाच्या १८४० च्या संमेलनवृत्तात पोतदारांनी अशुद्ध छापिले आहे.त्याच्या मथळचावर डाव्या बाजूस बुऱ्हाण निजामशहा ही अक्षरे आहेत व उजव्या बाजूस मासाहेब ही अक्षरे आहेत. पत्र शक १५३६ तील म्हणजे शक १५४८ च्या बारा वर्षे पूर्वीचे आहे. १५३६ त बुऱ्हान शहा ऊर्फ मूर्तिजाशहा केवळ पोर होता. १५४८ यद्यपि तो प्रौढ वयास पोहोचला होता तत्रापि त्याची मनोरचना अर्धवटातल्यापैकी स्वभावाने व परिस्थितीने जी एकदा बनली ती मरेपर्यंत तशीच होती. मालोजी व शहाजी यांचा आश्रय करून आवसे, परिंडा, दौलताबाद व नगर इत्यादीं स्थली त्याने आजपर्यंत कालक्रमणा केलीं होती. फक्त भातवडीच्या लढाईनंतर धूर्तांच्या चिथावणीवरून शहाजीवरील त्याच्या भक्तीत काही काल व्यत्यास आला होता. शहाजी दूर गेल्यावर तो व्यत्यास मावळून, मलिकंबरी जाचाचे उग्र राज्य तेवढे त्याच्या उपभोगाचे विषय झाले व त्या जाचातून मुक्त होण्याची प्रबल इच्छा त्याच्या मनात उद्भवली. हा असा प्रकार होणार हे परेंगितज्ञ शहाजीराजा जाणून होता. त्याप्रमाणें मासाहेबाकडे सूत्र बांधून, मूर्तिजाचे मन शहाजीने आपल्याकडे पुन: वळवून घेतले व जमल्यास निजामशाहीत परत येण्याचे एक द्वार खुले करून ठेविले.

२८. शहाजी विजापूरकरांकडे १५४७ त गेलेला पाहून आदिलशहा व मोगल यांची कास धरलेला जाधवराव त्याच सुमारास निजामशाहीत मलिकंबराच्या कारवाईने पुन: परत आला. त्याकाली एका राज्यातून रुसून दुसऱ्या राज्यात जाण्याचे व तेथून प्रसंग पाहून परत येण्याचे कृत्य अनीतीचे व कमीपणाचे मानीत नसत. स्वत: मलिकंबराने वेळ पडेल त्याप्रमाणे आदिलशाही व मोगलाई यांचा आश्रय कितीदा तरी केला होता. खुर्रम, लोदी, रणदुल्लाखान, शिवाजीचा पुत्र संभाजी, औरंगझेबाचा पुत्र, अकबराचे पुत्र इत्यादी अनेक इसमांच्या धरसोडीची उदाहरणे जगजाहीर आहेत. जाधवराव निजामशाहीत आल्यावर, मलिकंबराने शहाजीराजाला वठणीस आणण्याची मनाजोगती कामगिरी त्याला सांगितली, आणि आपण स्वत: आदिलशहाने लुबाडलेला धारूर प्रांत काबीज करण्याच्या तयारीस लागला. आदिलशहा व शहाजी यांच्यावरील या दुतोंडी योजनेच्या विचारात व तयारीत असता, मलिकंबर शक १५४८ च्या वैशाखात वारला. मलिकंबराचा जावई जो विजापूरचा मुस्तफाखान त्याचे तर म्हणणे असे होते की, आपल्या श्वशुराला मूर्तिजाशहाने करणी वगैरे करून मारले (साने, पत्रे, यादी ४३८). आणि हे म्हणणे खरे नसेलच असे म्हणवत नाही. मलिकंबराने मूर्तिजाला गेली सव्वीस वर्षे इतके काही छळले होते की, त्याचा त्याने प्राण घेतला असल्यास तो देवाच्या घरी अपराधी ठरण्यास बरीच अडचण पडली असेल. मलिकंबराच्या मरणाने धारूरवरील स्वारी लांबणीवर

पडली. शहाजीवरची जाधवरावाची स्वारी १५४८ च्या पावसाळ्यानंतर सुरू होऊन जाधवरावाच्या रेट्यापुढे शहाजी माहुली, जुन्नर, पारनेर, करकंब, मंगळवेढे या रस्त्याने आदिलशाहीत शक १५४९ च्या चैत्राच्या सुमारास रेटला गेला. ह्या बाप-आजांच्या रेटारेटीनंतर शिवाजीराजे भोसले यांचा जन्म शिवनेरीस १५४९ च्या वैशाखात झाला, असे बहुतेक नव्याजुन्या इतिहासलेखकांचे म्हणणे आहे. जेधेशकावली व बृहदीश्वरशिलालेख शिवाजीचा जन्मकाल शक १५५१ फाल्गुन वद्य ३ देतात. दोहोंतून खरे साल कोणते ते ठरविण्याला निश्चित प्रमाण उपलब्ध आहे. त्यावरून शक १५४९ हे साल शिवजन्माचे धरणे योग्य दिसते. का की, शक १५५१ च्या चैत्रापासून आश्विनापर्यंत शहाजीवर जुन्नरमाहुली प्रांतात कोणीही स्वारी केली नाही व स्वारी करणारा म्हणून म्हटलेला जो लखुजी जाधवराव त्याचा खून मूर्तिजाने शक १५५१ च्या अश्विनी पूर्णिमेस केला होता.

२९. शहाजीराजे आदिलशाहीत निसटून गेल्यानंतर सहा महिन्यांनी शक १५४९ च्या आश्विनात इभ्राइम आदिलशहा वारला व त्याचा पंधरा वर्षांचा महमदशाहा हा मुलगा मसनदीवर बसला. मलिकंबराच्या मृत्यूनंतर, शक १५४८ पासून मलिकंबराचा पुत्र फत्तेखान याच्या हाती निजामशाही दौलतीची सूत्रे गेली. त्याने आपल्या बापाची आदिलशाहीवर स्वारी करण्याची मसलत पुढे चालवून, धारूरवर १५४९ च्या आश्विनात चाल केली. धारूरचा निजामशाही किल्ला इभ्राइम आदिलशहाने निजामशाहीच्या हलाखीत दाबला होता. तो सोडविणे भातवडीच्या व नवरसपूरच्या मोहिमेनंतर मलिकंबरास व त्याच्या मृत्यूनंतर फत्तेखानास इष्ट व सुलभ दिसले. परंतु फत्तेखानाचा हा अंदाज चुकला होता. ज्याच्या बळावर भातवडी व नवरसपूर येथील युद्धात निजामशहाला जय मिळाला तो सरदार म्हणजे शहाजी ह्यावेळी आदिलशहाला मिळाला होता. तेव्हा पारडे फिरून धारूरची ही मोहीम निजामशहाच्या अंगावर आली. प्रथम प्रथम निजामशहाला थोडाबहुत जय मिळाला, परंतु कंदरीकजोरी येथील खडाजंगी युद्धात निजामशहाकडील हमीदखान सरलष्कर ह्याचा शहाजीने पुरेपूर मोड केला आणि त्याला निजामशाही हद्दीत पिटाळून लाविले (१५४९ मार्गशीर्ष–पौष). ह्या अपयशाचे खापर हमीदखानाने फत्तेखानाच्या डोक्यावर फोडिले. फत्तेखान हा आपला मेव्हणा मुस्तफाखान याच्या द्वारा आदिलशहाला आतून सामील आहे असे मूर्तिजा निजामशहाच्या मनात हमीदखानाने भरविले त्यामुळे, संशयग्रस्त होऊन मूर्तिजाने फत्तेखानास कैद करून वजिरीवरून दूर केले (शक १५५०). कंदरीकजोरीच्या लढाईनंतर निजामशहाचा परंडा प्रांत काबीज करून, शहाजी आदिलशहाच्या आश्रयाने त्या प्रांतांवर सैन्यासुद्धा अंमल करू लागला. जाधवरावाच्या रेट्यामुळे जुन्नर, चाकण पुणे, इत्यादी प्रांतांतून शहाजीचे पश्चिम निजामशाहीतून उच्चाटण झाले खरे, परंतु त्याचा सवाई वचपा त्याने दक्षिण निजामशाहीतील परंडा प्रांत घेऊन भरून

काढिला. शक १५४३ त बापाच्या जहागिरीचे स्वामित्व मिळविल्यापासून शक १५५० त आदिलशहाच्या आश्रयाने परंडा प्रांतात दाखल होईपर्यंत जी सात वर्षे गेली त्यात शहाजीची बरीच स्थित्यंतरे झाली. प्रथम काही वर्षे मूर्तिजाची त्याच्यावर बहाल मर्जी होती. नंतर मलिकंबराच्या मत्सराने ती मर्जी खपा झाली. पुढे यागी होऊन तो जुन्नर–माहुली प्रांतात स्वतंत्र राहून आदिलशहाशी संबंध ठेवू लागला. आणि शेवटी निजामशाही जहागीर गमावून आदिलशाही सरदार म्हणून परंडा प्रांतात अंमल करू लागला. ह्या अवधीत श्वशुर जाधवराव व त्याचे मुलगे, चुलतभाऊ खेळोजी, वजिर मलिकंबर व फत्तेखान, धनी मूर्तिजा या सर्वांशी वाकडे पडून, जिवलग बायकोचाही वियोग सहन करणे त्याच्या कपाळी आले. परंतु, एका वस्तूचा मात्र वियोग, कितीही संकटे आली तत्रापि त्याने होऊ दिला नाही. ती वस्तू म्हणजे जन्माची प्राणप्रिय त्याची सेना. मनुष्यमात्र म्हटले म्हणजे त्याला काहीतरी त्याच्या दृष्टीने सर्वोत्तम असे व्यसन असते. कोणी दारूबाज, कोणी अफूबाज, कोणी इष्कबाज, कोणी गप्पाबाज, कोणी कविताबाज, कोणी ब्रह्मासक्त, कोणी काही, कोणी काही, असे प्रत्येक मनुष्याला काहीतरी जन्मसिद्ध व्यसन असते. तसे शहाजीला सेनेचे व्यसन होते. सर्व काही गमावील, प्रसंगी प्राणही गमावील, पण सैन्य म्हणून कधीही हातचे जाऊ देणार नाही. शहाजी आपल्या सैन्याची व सैनिकांची इतकी पराकाष्ठेची काळजी घेई की, संकटसमयी इतर सर्व उद्योगांना गौणत्व देऊन, सैन्याच्या जोपासनेला व मशागतीला तो अनन्य प्राधान्य देई. शहाजीचा जसा सैन्यावर लोभ त्याप्रमाणेच सैनिकांचा सेनाध्यक्षांवर लोभ असे. एतत्संबंधाने बखरकार ( शिवप्रताप पृष्ठ २४।२५ ) लिहितो की, अशा सरदाराच्या सेवेत देह गेला तरी बेहेत्तर अशी भावना सैनिकांची शहाजीविषयी असे. हाताखालील माणसांना भुरळ कशी पाडावी, त्यांची अंतःकरणे कशी आकर्षण करावी, न होते कार्य इरेने त्यांच्याकडून कसे करून घ्यावे ही कला शहाजीराजाच्या ठायी जन्मसिद्ध होती त्यामुळे सारे जग उलटले तरी त्याच्या सैनिकांनी शहाजीला कधीही अंतर दिले नाही जय होवो, प्रसंगी माघार घ्यावी लागो, सैन्याची श्रद्धा शहाजीराजाच्या ठाई अढळ असे. असे हे पाचसात हजार सैन्य घेऊन शहाजी परांडे प्रांतांत शक १५४९ च्या वैशाखापासून शक १५५१ च्या श्रावणापर्यंत सैन्याची मशागत करीत व परिस्थितीचे अवलोकन करीत, हालचालीस योग्य अशा संधीची वाट पहात होता.

३०. येथपर्यंत शहाजीचा संबंध निजामशाहीशी व आदिलशाहीशी तेवढा आलेला आपल्यास दिसला. एथून पुढे शहाजीचा संबंध दिल्लीच्या मोगलांशी पडत चालला. शक १५४८ त शहाजहान मलिकंबराच्या आश्रयास आला. तो जहांगीर पातशहाचा १५४९ च्या कार्तिकात मृत्यू होई तोपर्यंत महाबतखानासह दक्षिणेतच माशा मारीत रिकामा बसला होता. १५४९ च्या पौषात तो दिल्लीस गेला व

माघात राष्याभिषक झाला. किंचित स्थिरस्थावर झाल्यावर दक्षिणेच्या बंदोबस्ताचे विचार शहाजहानाच्या मनात येतो न येतो इतक्यात त्याच्याविरुद्ध खानजहान लोदी याने बंड पुकारले व दक्षिणेचा रस्ता शक १५५० च्या हिवाळ्यात धरला. लोदीने दक्षिणेचा आश्रय धरण्याचे कारण असे होते की, जहांगीरच्या रियासतीत त्याची नोकरी दक्षिणेतच विशेष झाली असून मलिकंबराशी व आदिलशाहीतील कारभाऱ्यांशी त्याचा स्नेहच नव्हे तर घरोबा जडला होता. दक्षिणेत असताना मोगलांच्या कचाटीतून निजामशाही प्रांत सोडविण्याच्या कामी मलिकंबराला त्याने अंतस्थ मदत करून निजामशाहीतील मुत्सद्द्यांना व लढवय्यांना ऋणी करून ठेविले होते. बंड करून दक्षिणेत येण्यात त्याचा मतलब असा होता की, दक्षिणेतील निजामशहा, आदिलशहा, व शहाजी या सर्वांना शहजहानाविरुद्ध उठवून खुद्द दिल्लीचे तख्त उलथून पाडावे. हा इरादा मनात धरून लोदी दक्षिणेत येतो तो दौलताबादेत एक लहानशी क्रांती होत असलेली त्याच्या दृष्टीस आली. आदिल-शहाशी मिळून फत्तेखानाने धारूरची मोहीम हुकवली व मोगलांशी मिळून निजाम-शाही बुडविण्याचा फत्तेखानाचा विचार आहे, असा संशय हमीदखानाच्या कान-गोष्टीवरून मूर्तिजा शहाच्या मनात येऊन, फत्तेखान नजरकैदेत पडलेला लोदीला दिसला. पुढे बऱ्हाणपुरच्या मोगल सुभदाराला फितूर होऊन लुखजी जाधवरावही मिळणार असा संशय मूर्तिजाला आला व त्या संशयाच्या भरात शक १५५१ च्या श्रावणी पूर्णिमेस लुखजीचा व त्याचा मुलगा अचलोजी याचा त्याने खून करविला. ह्या मूर्ख कृत्याचा परिणाम असा झाला की, लुखजीचा भाऊ उघडपणे मोगलास मिळाला. ह्याहूनही दुसरा अनिष्ट परिणाम असा झाला की, परंडाप्रांतांत रहाणारा लुखजीचा जावई जो शहाजीराजा त्याने निजामशहावर स्वारी करून पुणे व संगमनेर हे निजामशाहीतील पश्चिमेकडील प्रांत जप्त केले व स्वतंत्र राजाप्रमाणे तो नांदू लागला (शक १५५१ अश्विन). जाधवरावाचा व शहाजीचा यद्यपि बेबनाव होता. तत्रापि त्याचा खून झालेला शहाजीला व त्याची बायको जिजाबाई इला स्वस्थ बसून पहावेना. सासऱ्याचा खून म्हणून शहाजीने व बापाचा खून म्हणून जिजाबाईने सूड उगविण्याच्या इराद्याने निजामावर स्वारी केली. आदिल-शाही दरबारावर जाधवरावाच्या खुनाचा व शहाजीच्या स्वारीचा निराळाच परि-णाम झाला. शहाजी निजामशाही गारद करून आपणच एखादे स्वतंत्र राज्य स्थापील, अशी भीती आदिलशाही मुत्सद्द्यांना पडली. सबब, वेळीच काटा काढून टाकण्याच्या हेतूने त्यांनी शहाजीवर मुरार जगदेव यास पाठविले. अशा ह्या दंगलीत कोणाचा आश्रय करावा, ह्या विवंचनेने खानजाहान लोदी यास घेरले. मूर्तिजा तर बोलून चालून अर्धवट, खुनी व दुर्बल आणि आदिलशहाचे सूत्र मोगलां-कडे लागलेले तेव्हा शहाजीचा आश्रय करण्यावाचून अन्य गती लोदीस राहिली नाही. तो संगमनेरास शहाजीला येऊन मिळाला. शहाजीने १५५१ च्या आश्विना-

पासून १५५२ च्या वैशाखापर्यंत जुन्नर व संगमनेरपासून अहमदनगर व दौलताबादपर्यंतचा सर्व मुलूख व बालेघाटाजवळील सर्व प्रांत काबीज करून, बहुतेक सर्व निजामशाही आटोपिली. फक्त राजधानी व पूर्वेकडील प्रांत तेवढा मूर्तिजाच्या हाती राहिला. लोदीच्या साह्याने शहाजीचा हा आक्रम पाहून आदिलशहाचे व शहाजहानाचे धाबे दणाणले. शाहाजीने बहुतेक सारी निजामशाही हाताखाली घातली इतकेच नव्हे, तर भीमगड म्हणून एक मोडकळीस आलेला जुनाट किल्ला होता तो दुरुस्त करून व त्याचे नाव आपल्या नावावरून शाहगड असे ठेवून, त्या गडावर आपले मुख्य ठाणे केले. दक्षिणेत एक नवीन स्वतंत्र राज्य स्थापिले गेले असा ह्या कृत्याचा अर्थ झाला. तेव्हा शहाजहान स्वत: शक १५५१ च्या शेवटी बऱ्हाणपुरास आला, त्याचा व आदिलशहाचा लोदीला आश्रय न देण्याचा तह ठरला आणि आदिलशहाने लोदीला आश्रय देणाऱ्या शहाजीच्या पुणे प्रांतावर मुरार जगदेव यास पाठविले. शहाजहानाने आल्याबरोबर पहिली मसलत अशी केली की, शहाजीला लोदी पक्षातून फोडिले. दिल्लीपतीशी सामना करण्याची अद्याप आपली ऐपत नाही व शहागडास आपण उभारलेला डोलारा औट घटकाही टिकणार नाही, हे धूर्त शहाजी जाणून होता. करता शहाजहानाचे बोलणे मान्य करून, शहाजीने लोदीला निरोप दिला व आपण स्वत: दिल्लीश्वराचा मनसबदार बनून मिळविलेला प्रांत दाबून बसला. पातशाही मनसबदारी पतकरण्यात शहाजीचा एक हेतू असा होता की, आदिलशाही मुत्सद्यांच्या हातून आपणास इजा होऊ नये, व दुसरा हेतू असा होता की, आपल्या जहागिरीवर निजामाने हक्क सांगू नये. पातशाही पंचहजारी सरदारी पतकरण्याचा अर्थच असा होतो की, शहाजीच्या ताब्यातील मुलूख मोगलाईचा अंश झाला. लढाई केल्यावाचून निजामशाही प्रांत फुकटाफाकट मिळाला व एक उपद्व्यापी लढवय्या गप्प बसविता आला, अशी फुशारकी शहाजहानाला वाटली. पुढे मागे हा तह इष्ट वाटेल तेव्हा मोडता येईल असा अंतस्थ मनोदय शहाजी व शहाजहान या दोघांचाही होता. हा तह झाल्यावर आदिलशाही मुत्सद्दी शहाजीच्या वाटेस गेले नाहीत. मुरारपंताने आपला मोर्चा शहाजीवरून काढून, निजामशहाच्या कोकणप्रांताकडे वळविला आणि दळवी व मोरे या सरदारांस कोकणप्रांतातील निजामशाही अंमलदारास हुसकून देण्यास सांगितले. शहाजी संगमनेरादी प्रांत दाबून बसला व आदिलशहाने कोकणप्रांत गिळंकृत करण्याचा घाट घातला, तो इकडे शहाजहानाने धारूरपर्यंतचा निजामशाही प्रांत आक्रमिण्याचा विचार केला. असे तिन्ही बाजूंनी महामूर्ख मूर्तिजाच्या अंगाचे तीन हिंस्र श्वापदांनी तीन लचके तोडण्याची तयारी केली व काहींनी ती अंमलातही आणिली.

३१. दुर्बल मूर्तिजाच्या बोकांडीस ही मनुष्यकृत हानी शक १५५१ च्या अखेरीस बसल्यानंतर, शक १५५२ त दैवी हानीने त्याला पालथे पाडिले. शक १५५२ साली गोदातीरी अवर्षणाने भयंकर दुष्काळ पडला. एका हुनक्यास म्हणजे लहान होनास

दोन शेर दाणे झाले. करवसुली शक्य नसल्यामुळे मूर्तिजाची आधीच खंगावलेली तिजोरी पूर्णपणे शुष्क होऊन गेली. फौज परागंदा, कारभारी अजुर्दा व मुलूख उकीरडा बनून, मूर्तिजा हलाखीच्या अगदी शेवटच्या पायरीस पोहोचला. दुष्काळाने त्याचा एक मात्र फायदा झाला. शक १५५२ साली त्याच्या तिन्ही शत्रूंच्या हालचाली काही काल स्तब्ध राहिल्या. पंचभूतांच्या प्रकोपापुढे शत्रू-मित्र अश्या साऱ्यांच्याच नाड्या आखडल्या. शहाजहानाचे सबंध १५५२ साल दक्षिणेत फुकट गेले. आदिलशाही मुत्सद्दी निजामशाही मरू द्यावी, की तरू द्यावी हा विचार करीत बसले. शहाजी दुष्काळानंतरच्या बनावाला तोंड देण्याकरिता आपले हत्यार पारजवीत राहिला. आणि तिघांचा भक्ष्य जो मूर्तिजा तो दैवी आणि मानवी संकटांतून पार पडण्याचा मार्ग शोधू लागला. निजामशाहीची ही अशी हलाकी झालेली पाहून शहाजी व आदिलशाही मुत्सद्दी यांस दया आली. निजामशाही बुडाली असता मोगलांच्या व आपल्यामधील पाचर नाहीशी होऊन मोगलांशी प्रत्यक्ष गाठ पडणे बरे नव्हे, हे आदिलशाही मुत्सद्दी जाणून होते. सबब मूर्तिजाशी त्यांनी तह केला ( शक १५५२ मार्गशीर्ष ). मुरारपंताने सोलापूर, परंडा व कोकण हे निजामशाही प्रांत गेल्या दोन चार महिन्यात जिंकिले होते ते निजामशहाने आदिलशहास द्यावे, शहाजीने जिंकिलेला प्रांत शहाजीकडे ठेवावा, आदिलशहाने निजामशहास मोगलांविरुद्ध मदत करावी व फतेखानास बंधमुक्त करू नये इत्यादी कलमे ह्या तहात ठरले व निजामशाहीचे मरण किंचित् लांबणीवर ढकलले गेले. इतक्यात मोगलांचे सैन्य आपल्या हद्दीवर आले, अशी मूर्तिजास बातमी कळली. तिने घाबरून जाऊन, कुमकेस येत असलेल्या आदिलशहाच्या व शहाजीच्या सैन्याची वाट न पहाता मूर्तिजाने नुकत्याच केलेल्या तहाची कलमे मोडण्यास सुरुवात केली. वेडसर मूर्तिजाच्या डोक्यात अशी विचित्र कल्पना आली की, आपल्यावर ओढवलेल्या दैवी व मानवी आपत्ती आपला नवीन दिवाण जो तकरीबखान त्याच्या पायगुणामुळे आल्या. अर्थात् त्याला काढून टाकिले असता, सर्व काही सुरळीत चालेल, ह्या कल्पनेने तकरीबखानास रजा देऊन, आपला जुना दिवाण जो फत्तेखान त्याला त्याने बंधमुक्त केले व शक १५५२ च्या पौष वद्य एकादशीस पुनः वजीरीवर स्थापन केले. क्षणात तह मोडण्याची मूर्तिजाची ही कसरत पाहून आदिलशाही मुत्सद्दी थक्क झाले. ह्याच सुमारास मूर्तिजाने चतुर साबाजी आपल्या राणीशी लागू असावा अशा संशयावरून त्याचा वध केला (चांदोरकर–चतुर साबाजी–भा. इ. सं. १८३४ वृत्त); फतेखानाचे व आदिलशाही मुत्सद्द्यांचे वाकडे होते. सबब, प्रधानपदावर आल्याबरोबर, त्याने शहाजहानाशी सूत्र बांधिले आणि त्या सूत्रान्वये कारवाई आरंभिली. त्याने वेडा म्हणून मूर्तिजास प्रतिबंधात ठेविले; मूर्तिजाच्या विश्वासातील पंचवीस वजनदार सरदारांस एका दिवसात ठार केले; आणि साऱ्यांवर कळस म्हणून दोनचार महिन्यांनी म्हणजे शक १५५३ च्या (चैत्रवैशाखात)

खुद्द बुऱ्हाणशहाचा ऊर्फ मूर्तिजाचा प्राण घेतला (जेधेशकावली). मूर्तिजाला दैवी व मानवी आपत्तींतून कायमचे मुक्त केल्यावर, त्याच्या सात वर्षांच्या हुसेन नामक अर्भकास फतेखानाने मसनदीवर बसविले आणि नंतर स्थिरस्थावर झालीशी वाटून तो शहाजहानाशी उर्मटपणाने वागू लागला. शहाजहानाने तात्काल सैन्य पाठवून त्याला तेव्हाच नरम केले व आठ लाख रुपये नजर घेऊन व दरसाल खंडणी ठरवून निजामशहाला आपला मांडलिक बनविले ( १५५३ ज्येष्ठ–आषाढ)

३२. निजामशाही शहाजहान याच वेळी खालसा करता. परंतु शहाजी व आदिलशहा यांचा मामला अद्याप विल्हेस लागला नव्हता. खानजहान लोदीच्या बंडाच्या वावटळीत शहाजहानाने शहाजीला अकराहजारी मनसबदारीचे दान करून काही काल गप्प बसविले आणि आदिलशाही मुत्सद्द्यांच्या तोंडाला निजामशाही मुलखाच्या वाटणीचे मधाचे बोट लावून लोदीला ती बाजूही बंद केली. लोदीचे बंड निमाल्यावर, शहाजहानाने शेख मैजुद्दिन हा वकील निजामशाहीच्या वाटणीचे बोलणे करण्याकरिता विजापूरास पाठविला. काही महिने भवतिनभवती होऊन, आदिलशाही मुत्सद्दी शहाजहानाच्या मसलतीस राजी झाले, व संमतिपत्र देऊन मैजुद्दिनाची त्यांनी बहुमानपुरःसर शहाजहानाकडे रवानगी केली. दरम्यान मूर्तिज्याचा खून व फतेखानाची नेमणी वगैरे प्रकार होऊन, निजामशाही शहाजहानाच्या अंकित झाली. तेव्हा आदिलशाही मुत्सद्द्यांची पायरणी करून निजामशाही दौलतीची वाटणी करून वासलात लावण्याचे शहाजहानाच्या दृष्टीने काही कारणच राहिले नाही. उलट, निजामशहाचा धारूरप्रांत आदिलशहा दाबून बसला होता तो परत घेण्याकरिता शहाजहानाने अबदुल हसन व नसरतखान या सरदारांना खंदार व धारूर किल्ल्यांचा ताबा घेण्याच्या कामगिरीवर रवाना केले. मैजुद्दिन वकील याची रवानगी होण्याला व धारूरवर मोगली सैन्य चालून येण्याला एकच गाठ पडली. शहाजहानाच्या या कृतीचा आदिलशाही मुत्सद्द्यांना मोठा आचंबा वाटला आणि मोगलाने आपली क्रिया सोडली एतदर्थ प्रत्याघात म्हणून मैजुद्दिन वकिलाला त्यांनी अटकेत ठेविले. वकिलाच्या अटकेची वार्ता ऐकून शहाजहानाने पित्त खवळल्याचा बहाणा करून, आसदखानास खुद्द विज्यापुरावर स्वारी करण्याचा हुकूम केला. निजामशाही अंकित झाल्यावर व शहाजी मनसबदार बनल्यावर, आदिलशाहीचा आपण तेव्हाच फडशा पाडू, असा शहाजहानाचा मतलब होता. परंतु तो मतलब शहाजीने फिसकटून टाकिला. मनसबेवर लाथ मारून व तह धाब्यावर बसवून शहाजी आदिलशाही मुत्सद्द्यांस मिळाला. शहाजीचा व मुरार जगदेव आणि रणदुल्लाखान यांचा अलीकडे बरीच वर्षे भातवडीच्या लढाईपासून स्नेह जुळला होता. तेव्हा ह्या तिघांनी विजापुराजवळील रंगाऱ्याच्या हौदावर आसदखानाचा पुरा मोड करून त्याला आदिलशाही हद्दीच्या पलीकडे हरणदवडीने पिटाळून लाविले. व सरहद्दीवरील परंडयाच्या किल्ल्यात ठाणे दिले. आसदखानाची नामो-

हरमी श्रवण करून शहाजहानाने मोहबतखानाला दक्षिणचा सुभा देऊन विज्या-पुरकराची खोड मोडण्याचा हुकूम केला (शक १५५४ चैत्र).

३३. इकडे दौलताबादेस फत्तेखान आपल्या मताने आपली मजबुती शक १५५३ च्या ज्येष्ठापासून शक १५५४ च्या चैत्रापर्यंत करीत होता. फत्तेखान हा स्वभावाने मूर्तिजासारखाच अर्धवट, संशयी व महामूर्ख होता. त्याचे आपली मजबुती करण्याचे मार्ग विचित्र होते. दिलजमाईच्या ऐवजी दिलफूट करण्यात ह्याचा हातखंडा होता. शहाण्याची मानखंडना करून व शूरांची मने दुखवून, चतुर साबाजी, शिवाजीपंत व सखाराम मोकाशी यांच्यासारखे कदीम मुत्सद्दी आणि सिद्दी रैहान व याकूतखान यांच्यासारखे लढवय्ये फत्तेखानाने दूर केले. ह्यापैकी कित्येक केवळ अन्न बचावण्या-करिता मोगलाच्या हद्दीत गेले व कित्येकांनी आदिलशाहीशी संधान बांधले. मुत्सद्दी व लढवय्ये ह्यांचा काटा काढून टाकिल्यावर फत्तेखानाला आपण सुरक्षित व निर्भय झालो असे वाटले. परंतु वस्तुस्थिति त्याला वाटत होती त्याहून अगदी निराळी होती. राज्यातून बाहेर गेलेले सर्व लोक त्याचा नाश चिंतीत होते व राज्यात राहि-लेल्या लोकांचीही मनःस्थिती तीच होती. कोणावर केव्हा कशी बेतेल या फिकीरीत जो तो होता. हे असे घर निष्कंटक केल्यावर फत्तेखानाने राज्याबाहेर दृष्टी फेकली. तो त्याला असे दिसले की, उत्तरेकडून मोगल व दक्षिणेकडून शहाजी व आदिल-शाहा एकमेकांना गाठण्याकरिता सज्ज झाले आहेत. मोगलाने धारूर प्रांतावर बेशिस्त चाल केली म्हणून आदिलशहा क्रुद्ध झाला आणि वकिलांच्या पवित्र देहाला अटक केली म्हणून शहाजहान रागावला. परंतु ही केवळ निमित्तकारणे होती. आपला अंकित जो निजामशहा त्याचा धारूर प्रांत सोडवून त्याला मदत करावी हा शहाजहानाचा हेतू होता आणि आपला शेजारी जो निजामशहा त्याला मोगलाने गिळंकृत करू नये म्हणून मोगलांच्या विरुद्ध त्याला मदत करावी हा आदिलशहाचा हेतू होता. दोघेही निजामशहाला मदत करण्याकरिताच भूतदयेने तडफडत होते. परंतु लढाईची ही समवायिकारणे झाली. मुख्य उपादानकारण निजामशाही कोणी दाबावी हे होते. शहाजहान तर फत्तेखानाच्याद्वारा निजामशाही अंकित करून बसला होता. त्याच्या मांडीखालून तीं सोडवून आपल्या पंजाखाली तिला दाबावी एतदर्थ आदिलशाही मुत्सद्दी खटपट करीत होते व एकाएकी चाल करून जाण्यास कचरत होते. ही कचर ओळखून शहाजीराजाने आदिलशाही मुत्स-द्द्यांना मोगलांवर चाल करून जाण्यास प्रोत्साहन दिले व दौलताबाद गाठण्याची सल्ला दिली. नुसती सल्ला दिली इतकेच नव्हे तर आपण स्वतः फौजेसह साह्य करण्याला सिद्ध झाला. शहाजीसारख्या युद्धकुशल सरदाराचा पाठिंबा मिळ-ताच आदिलशाही मुत्सद्द्यांनी मुरारपंत आणि रणदुल्लाखान यांची शहाजीबरोबर दौलताबादेकडे रवानगी केली. ब्ऱ्हाणपुराहून जितकी दौलताबाद लांब तितकीच ती परंड्याहूनही आहे. तेव्हा दोन्ही सैन्यांची टक्कर देवगिरीच्या खडकावर अचूक

होण्याचा रंग फत्तेखानास दिसला. नको होते तेच संकट कपाळी आले. ह्यावेळी कोणता पक्ष धरावा याचा निश्चय संशयग्रस्त फत्तेखानाला झाला नाही. तो एकवेळ मोहबतखानाकडे मुरारपंत व शहाजी यांच्या कचाटीतून आपणास सोडवा म्हणून दीनवाणी पत्रे धाडी आणि एकवेळ किल्ल्यातील अन्न संपले म्हणून मुरारपंताकडे धान्याची भिक्षा मागे. दौलताबादेच्शा कोटात फत्तेखान, त्यांच्या शेजारी बाहेर मुरारपंत, शहाजी व रणदुल्ला आणि ह्या तिघांच्या पलीकडे मोहबतखान अशी स्थिती होती. मध्ये मुरारपंत व शहाजी पडल्यामुळे मोहबतखानाकडून फत्तेखानाला काहीच मदत होईना व मुरारपंत दाण्याचा एक कणही त्याला देईना. मुरारपंताने फत्तेखानाला अशी अट घातली की, फत्तेखानाने निमूटपणे किल्ला शहाजीच्या ताब्यात द्यावा व शहाजीला पूर्ववतप्रमाणे स्वस्थानापन्न करावे म्हणजे वाटेल तितके अन्न आपण फत्तेखानास पोहोचवू. अन्नान्नदशेस पोहोचलेल्या फत्तेखानास ही मसलत रुचून अटीचा पहिला हप्ता म्हणून त्याने मोहबतखानावर किल्ल्यातून तोफांचा मारा केला. बाहेरून मुरारपंत व शहाजी मोहबतखानावर तोफा डागीतच होते. ह्या मोक्यात मोहबतखान जायाच व्हायचा परंतु ह्याच सुमारास आदिलशाही फौजेत फूट उत्पन्न झाली. आदिलशाही अमीर लोकांनी मत्सराने मुरारपंताला साह्य करण्याचे तहकूब केले. त्यामुळे मुरारपंत व शहाजी यांस दौलताबादेपासून सोळा मैल मागे हटावे लागले. नंतर साहजिकच दौलताबादचा किल्ला मोहबतखानाच्या हाती पडला (शक १५५४, फाल्गुनअखेर). ह्या प्रसंगाचा काळ निरनिराळ्या लेखकांनी निरनिराळा दिला आहे. ग्रांट डफ शक १५५४ चा फाल्गुन देतो. जदुनाथ सरकार आपल्या औरंगझेबाच्या इतिहासाच्या पहिल्या खंडाच्या पस्तिसाव्या पानाच्या टीपेत अब्दुल हमीदच्या हवाल्याने शक १५५५ चा आषाढ देतात; आणि जेधेशकावलीकार शक १५५४ चा ज्येष्ठ देतो. पैकी जेधेशकावलीकाराने दिलेला काळ दौलताबादेवरील मोहिमेच्या प्रारंभाचा असून शेवटचा नाही. अब्दुल हमीद याने दिलेला काळ दौलताबाद पडण्याचा नसून ती पडल्यानंतर हुसेनच्या कबजातीचा काळ आहे. खुद्द दौलताबाद घेतल्याचा काळ नाही. ग्रांट डफने दिलेला काळ– १५५४ फाल्गुन, फेब्रुवारी १६३३–ग्राह्य व बरोबर दिसतो. दौलताबाद शक १५५४ च्या फाल्गुनात घेतल्यानंतर त्या किल्ल्याच्या संरक्षणार्थ खान दौरान याजला ठेवून आदिलशाही फौजेचा पाठलाग करण्यात मोहबतखानाने दोन महिने घालविले आणि आदिलशाही फौजेला इजा न करता १५५५ च्या मृगाच्या सुमारास पावसाळा लागण्यापूर्वी दौलताबादेस पुमरागमन केले. तेथे अब्दुल हमीद लिहितो त्याप्रमाणे १५५५ च्या आषाढात फत्तेखानाने हुसेन निजामशहाला मोगलांच्या कबज्यात दिले व आपण स्वत: त्यांच्या स्वाधीन झाला. हुसेन निजामशहा व फत्तेखान यास बरोबर घेऊन मोहबतखान दौलताबादेहून बऱ्हाणपुरास जाण्यास निघाला. तेव्हा शहाजी व मुरारपंत यांनी त्याला इतके पछाडले की, रोज दोन कोसही मजल त्याच्याने होईना.

तेव्हा मोहबतखान याने आदिलशाही फौजेला द्रव्य देऊन आपली व लष्करची कशी तरी मोकळीक केली व आपली सरहद्द एकदाची गाठली (साने– पत्रे, यादी वगैरे : लेखांक ४३८). ह्यावेळी शहाजीने मोहबतखानाला जी पीडा केली ती टळावी म्हणून मोहबतखानाने महालदारखानास वैजापुरास असलेला शहाजीचा कबिला पकडण्याच्या कामगिरीवर पाठविले. त्या कामगिरीत महालदारखानाने जिजाबाईस शिवाजीसुद्धा पकडिले असे कोणी म्हणतात व फक्त शहाजीच्या मुलीस पकडले असे कोणी म्हणतात. जाधवरावाच्या मध्यस्तीने शहाजीचा कबिला सिंहगडास सुरक्षित पोहोचता जहाला.

३४. हुसेनशाहा व फत्तेखान यांनी यद्यपी दौलतीचा शहाजहानास राजीनामा लिहून दिला. तत्रापि तेवढ्याने निजामशाहीचा कायमचा शेवट झाला नाही. हुसेनशहाची आजी आणि मूर्तिजा बुऱ्हाणशहाची आई जी मासाहेब ती व निजामशाही वंशातील काही राजन्यक अद्याप हयात होते. फत्तेखानाच्या हंगाम्यात ही मंडळी निसटून शहाजीच्या आश्रयाने कोकणप्रांती गेली होती. ह्यांना हाताशी धरून निजामशाहीची वहिवाट पुढे चालू करण्याची मसलत शहाजी, मुरारपंत आणि इतर आदिलशाही मुत्सद्दी यांनी केली. मोहबतखानाला बेदम सडकून सरहद्दीच्या बाहेर घालविल्यावर शहाजी, मुरारपंत व रणदुल्लाखान मोगलाच्या कबज्यातल्या निजामशाही प्रांतांतून अपरंपार लूट घेऊन दक्षिण दिशेस जाण्याकरिता मागे फिरले. दौलताबादेच्या भोवतालील मैदान मुलुख मोगलांच्या ताब्यात पडल्यामुळे बागलाणातून, नाशिक–त्र्यंबकावरून ते भीमगडास गेले. तेथे कोकणातुन दंडाराजपुरीहून मासाहेब आणि निजामशाही वंशातील दोन अल्पवयस्क शहाजादे आणून त्यापैकी मूर्तिजा नावाच्या मुलाला त्यांनी मसनदीवर बसविले आणि निजामशाही दौलत चालू केली. ह्या कृत्याला आदिलशहाची मान्यता होतीच. नंतर मुरारपंत जुन्नर, खेड व पावळ या रस्त्याने भीमेपार होण्याकरिता तुळापुरास शक १५५५ च्या भाद्रपदात आला. त्याला पोहोचविण्याकरिता शहाजीही तुळापुरापर्यंत त्याच्याशी पुढील मनसब्याचा; खल करीत आला. तेथे ज्या महापर्वणीचे मराठी बखरकार वर्णन करण्याची संधी बहुशः दवडीत नाहीत ती सूर्यग्रहणपर्वणी त्यांना अमावास्येस सोमवारी सकाळी अकरा घटकेस पडली. ह्या पर्वणीस मुरारपंताने सांग व साभरण गजदान, अश्वदान व गोशतदान केले आणि सुवर्णरजतादि चोवीस तुळादाने दिली. शिवाय सबंध तुळापूर गाव सोळा ब्राह्मणांना अग्रहार समर्पिला. अग्रहार देण्याची अशी अट आहे की, दात्याने देयांना सालंकृत घरे बांधून देऊन खेरीज झाली नसतील त्यांची लग्ने करून द्यावी. त्याप्रमाणे गोडनामक कारागिराकडून ब्राह्मणांना त्याने सोळा घरे बांधून दिली. याव्यतिरिक्त कालिदास नावाच्या कवीला, वररुचि नावाच्या विद्वानाला, त्रिमलभट नावाच्या स्वपुरोहिताला व रायाराय आडनावाच्या ब्राह्मणाला भूमिदाने दिली. हा सर्व कारभार आटोपण्याला तब्बल महिना-पंधरा दिवस लागले.

या सावकाशपणाचा व स्वस्थपणाचा अर्थ असा होतो की, शत्रूकडून इजा पोहोच-ण्याची धास्ती शहाजीला किंवा मुरारपंताला बिलकूल राहिली नव्हती. इतका मोहबतखानाला त्यांनी बेदम हबकला होता. मोहबतखानाची ही दुर्दशा शहाजहानाला कळून त्याने त्या नाकर्त्या आणि ढिल्या सरदारावर शहाजादा सुलतान शुजा याला मुख्याधिकारी नेमिले.

३५. तुळापुराहून मुरारपंत दौंडावरून परिंड्याकडे गेला व शहाजी आपण उभारलेल्या नवीन निजामशहाच्या राज्याची दागदुजी करण्यास लागला. खिळखिळी झालेल्या निजामशाहीची दागदुजी शहाजीला चार प्रकारांनी करणे जरूर पडले. (१) गेलेला प्रांत पुनः शत्रूच्या हातून मिळविणे (२) मिळविलेल्या प्रांताची आबादी करणे, (३) ठिकठिकाणी ठाणी धरून राहिलेल्या निजामशाही अभिमानी सरदारांची मिळवणी करणे, आणि (४) आदिलशहा व शहाजहान यांच्याशी सामदामादी व्यवहार सुरू करणे, ह्या चार कामगिऱ्या स्वतंत्र राज्याच्या पुनरुज्जीवनाची अंगे होती. पैकी १५५५ च्या आश्विनापासून १५५६ च्या ज्येष्ठापर्यंतच्या नऊ महिन्यात शहाजीने निजामशाही तळकोकण, जुन्नर, अहमदनगर, नाशिक, त्र्यंबक, पुणे, नीरथडी, इतका प्रांत म्हणजे दक्षिणेस नीरेपासून उत्तरेस चांदवडच्या डोंगरापर्यंतचा प्रांत आणि पूर्वेस अहमदनगरापासून पश्चिमेस समुद्रापर्यंन्तचा प्रांत अंमलाखाली आणिला आणि प्रांतातील सर्व किल्ले व लष्करी ठाणी मराठी व ब्राह्मण अंमलदार नेमून फौजबंद केली. हे काम करीत असता, शहाजीराजाच्या दौलतेची व शौर्याची आधिक्यता पाहून पश्चिम महाराष्ट्रातील शहाण्णव कुळीचे अनेक मऱ्हाटे राजे व सरदार त्याला येऊन मिळाले (बृहदीश्वरशिलालेख).शिवकाली मावळे मावळे म्हणून ज्यांची पुढे ख्याती झाली ते हेच कुलीन लोक होत, ओझी वाहणारे सामन्य शूद्र कुणबी नव्हत. फत्तेखानाच्या अंमलाला कंटाळून परागंदा झालेले जाधव वगैरे कदीम मराठेही शहाजीराजाने आपल्या दरबारी बोलविले. ह्याचवेळी शिवाजीपंत, सखाराम मोकाशी, चतुर इत्यादि निजामशाही कारकून व मुत्सद्दी ब्राह्मणमंडळींच्या करवी व अत्रे, हणमंते, उपाध्ये वगैरे आपल्या मुत्सद्द्यांच्या द्वारा रयतेची आबादी करवून फौजेच्या व सरकारच्या खर्चाचे बंधनिबंध शहाजीने घालून दिले. चतुर ह्या प्रसिद्ध चतुर साबाजीचा मुलगा. हा आपल्या बापाप्रमाणेच लेखनकला कुशल असे. चतुर साबाजी म्हणजे सामान्य कारभारी नव्हे. अकब्बराचा जसा तोडरमल्ल तसा निजामशाही राज्यातील प्रख्यात श्रीकरणाधिप होता. मलिकंबरी जमीनमोजणी जी म्हणतात ती ह्या चतुर साबाजीने केली. मुख्य वजीर म्हणून ती पाहणी व मोजणी मलिकंबराच्या नावावर मोडते इतकेच. फौजबंदी व जमीनमहसूल यांची व्यवस्था लावीत असता, सिद्दी रैहान सोलापुरी, श्रीनिवासराव जुन्नरास, सिद्दी साया सैफखान भिवंडीस, सिद्दी अंबर दंडाराजपुरीस, आणि असेच दुसरे किल्लेदार व जमीनदार आपापल्या परी पुंडाई करून त्या त्या

जागा बळकवण्याच्या उद्योगात होते. पैकी सिद्दी रैहान हा आदिलशाही नोकर बनल्यामुळे त्याची व्याध आयतीच टळली. ह्या मनुष्याने शहाजीवर एव्हापासून जो दात धरला त्याचा अनुभव शहाजीस पुढे कर्नाटकात आला. तत्रापि, प्रस्तुत प्रसंगी शहाजीस त्याचा उपयोग झाला. त्याने व मुरारपंताने शहाजीस मिळून सुमारे शक १५५५ च्या फाल्गुनात मोहबतखान व शुजा यांची परिंड्यास दाणादाण उडवून दिली व शहाजीवरील मोगलांचा शह उडवून दिला. त्यामुळे निजामशाही अंमल बसविण्याचे काम शहाजीस निर्धास्तपणे साधिता आले. भिवंडीच्या सैफखानास निजामशहास रुजू होण्याकरिता शहाजीने बोलाविले, परंतु ते बोलावण अमान्य करून सैफखान परभारे आदिलशाहीत निघून जाऊ लागला. तेव्हा पाठलाग करून शहाजीने त्याला बाभळगावच्या चकमकीत कैद केले व मुरारपंताच्या मध्यस्तीकरिता सोडून दिले. हा मनुष्य पुढे आदिलशाही चाकर झाला. जुन्नरच्या श्रीनिवासरावाला नरम आणण्यास शहाजीने निराळीच युक्ती लढविली. श्रीनिवासराव हा जातीचा मराठा होता व स्वतंत्र संस्थानिक बनावे अशी त्याची आकांक्षा होती. आपण मोगली सरदार आहो अशी वेळ पडल्यास तो बतावणीही करी. त्याच्याकडे आपला मुलगा संभाजी याजकरिता शहाजीने त्याच्या मुलीची मागणी केली आणि बोलणे करता करता त्याला गिरफ्तार केले. शिवाजीने चंद्रराव मोऱ्याशी आपल्या बापाची हीच युक्ती योजिली. श्रीनिवासराव दस्त झाल्याने जुन्नर, जीवधन वगैरे त्याच्या ताब्यातील सर्व किल्ले शहाजीच्या हाती पडले. तेव्हा त्याने लहानग्या मूर्तिजा निजामशहास भीमगडाहून उचलून निजामशाहाची अगदी जुनी राजधानी जे जुन्नर तेथे ठेविले. दंडाराजपुरीच्या शिद्याकडे शहाजीने कानाडोळा केला. तोफा वगैरे यूरोपियन लढाऊ सामान त्याच्या द्वारा शहाजी व आदिलशहा यांना मिळण्याची सोय असे. खेरीज पाण्यावरती अंमल बसविण्यास शहाजीजवळ अरमारही नव्हते. करता, शिद्दी अंबर याला दुखविण्याच्या भरीस शहाजी पडला नाही. ह्याच वेळी बागलाणच्या राजाने नाशिक चांदवडकडील काही निजामशाही किल्ले बळकाविले होते ते त्याने तंबी देऊन सोडविले. येणेप्रमाणे पुंडांची वासलात लावून, शहाजीने निजामशाहीचा जम पुनः बहुतेक पूर्ववत् बसवून दिला. दौलतीत खाशांपैकी सर्वांत वृद्ध व अनुभवी जी मासाहेब तिच्या सल्ल्याने सर्व कारभार चाले. मुत्सद्दी व सरदार यांचा रोज दरबार भरे. लहानग्या मूर्तिजाचे सर्व बालपण कोकणात अज्ञातवासात गेल्यामुळे, त्याला दरबाराचा रीतरिवाज माहीत नव्हता. बुढ्ढे बुढ्ढे ब्राह्मण मुत्सद्दी, अक्राळविक्राळ असे मिशाळ मराठे सरदार, काठीवाले भालदार व चौरीवाले चोपदार पाहून तो नजर मेली नसल्यामुळे, बिचके व दरबारात येण्याची टाळाटाळ करी. तेव्हा मासाहेबांच्या सल्ल्यावरून व आग्रहावरून शहाजीराजे त्या मुलास घेऊन तख्तावर बसू लागले. शहाजीच्या कर्तबगारीने निजामशाहीचे हे असे पुनरुज्जीवित ऐश्वर्य विलोकन करून शहाजहान पातशहाने तोंडात बोट घातले

आणि गेल्या दोन वर्षांतील मोहिमांचा उपद्व्याप व्यर्थ जाऊन दक्षिण जिंकण्याचा पुनः पहिला पाढा वाचावा लागणार म्हणून विषाद मानिला. पंचसहस्री, षट्सहस्री, बंडखोर आदिलशाहांचा साथीदार, असा वाढत वाढत शहाजी निजामशाहीचा मुख्य वजीरच नव्हे तर मुख्य चालक बनला. कदाचित् असाच वाढू दिल्यास तो निजामशाही ढोंगाच्या ऐवजी, स्वतःचेच स्वतंत्र हिंदू राज्य स्थापील, असा तर्क शहाजहानाने केला आणि इरादतखानाच्या हस्ते शहाजीशी सामनीती आरंभिली. शहाजीचा चुलतभाऊ मालोजी भोसले पातशाही चाकर झाला होता. त्याजकडून इरादतखानाने स्नेहाचे बोलणे शहाजीपाशी काढिले की, पातशहा आपणास थोरातल्याथोर अशा केवळ राजपुत्रास मिळणाऱ्या बावीसहजारी मनसबेची अपूर्व देणगी देण्याचे चाहतात, फक्त आपण इतकेच करावे की आदिलशाही जिंकण्यास पातशहास साह्य द्यावे आणि आदिलशाही जिंकल्यावर तीतील निमेनिम वाटणी घ्यावी. ह्या गुळचट बोलण्यातील रहस्य ओळखून शहाजीने सर्व हकिकत विजापूरचा मुख्य वजीर खवासखान यास कळविली (साने, पत्रे यादी ४३८). येणेप्रमाणे शक १५५६ चे बहुतेक सबंध साल शहाजीचे शांततेचे व वैभवाचे गेले. आपली सामनीती व भेदनीती फुकट गेलेली पाहून १५५६ च्या अखेरीस शहाजहानाने इरादतखानाकडून शहाजीवर दंडनीतीचा प्रयोग करून पाहिला. छप्पनसालाच्या अखेरीस इरादतखान शहाजीवर डोंगरी मुलखात चालून आला. परंतु शहाजीच्या हुलकावण्या मागे धावता धावता हैराण होऊन, धापा टाकीत तो दौलताबादेस हिरमुसलेला परत गेला. इरादतखानासारख्या लुंग्यासुंग्याना शहाजी दाद देत नाही हे पाहून, शहाजहान शक १५५७ च्या माघ अखेर जंगी सामान व सैन्य घेऊन स्वतः दौलताबादेस आला. त्याच्याबरोबर अठ्ठावन्न हजार सैन्य असून, त्याच्या जोरावर आदिलशहा व कुतुबशहा यांना तो मार देणार होता व शहाजीचा फन्ना उडविणार होता.

३६. शहाजीने नवीन निजामशाहीचा कारभार करून ह्या वेळी शक १५५५ च्या श्रावणापासून १५५७ च्या माघापर्यंत सुमारे ३२ महिने म्हणजे दोन वर्षे आठ महिने झाले होते. ह्या आवधीत घोडेस्वार व पायदळ मिळून त्याच्याजवळ दहा पंधरा हजार करोल फौज तयार होती. तिजोरी म्हणावी तशी भरलेली होती, आणि त्याचा व त्याच्या सैन्याचा उत्साह उमदा होता. परराष्ट्रात त्याची मुख्य मदार आदिलशहाच्या मदतीवर होती; आणि दोघांनी परस्परास मदत करण्याची अभिवचनेही दिली घेतली होती. मिळून शहाजहानाच्या प्रचंड शक्तीला तोंड देण्याची सामुग्री शहाजीने बरीच चांगली जुळवली होती. हुलकावणीचे पेच करून शहाजहानला आपण हैराण केल्याशिवाय राहणार नाही अशी शहाजीची खात्री होती. फक्त आदिलशहाने शेवटपर्यंत टिकाव धरला पाहिजे अशी त्याची अपेक्षा होती. ह्या अपेक्षेत एक व्यंग नुकतेच उद्भवले होते. शक १५५७ च्या मृगाच्या

सुमारास खवासखान व मुरारपंत यांना आदिलशहाने ठार करविले होते. हे दोघेही शहाजीचे पुरस्कर्ते असून त्यातल्या त्यात मुरारपंताचे शहाजीवर पुत्रवत् प्रेम व विश्वास होता. शहाजीला आजपर्यंत निजामशाही उभारण्याच्या कामी मुरारपंतांची मदत अंतःकरणपूर्वक झाली होती व तो जिवंत असता तर त्याहूनही जास्त होऊन बहुश: शहाजहानाचा, त्याच्या इतर सरदारांप्रमाणे, पराभव झाला असता. निदान शहाजहानाला शह बसता, कदाचित् सर्वच गोष्टींना निराळा रंग चढता. मागील रकान्यात सांगितलेच आहे की, शहाजहानने शहाजीपाशी इरादतखानाकडून आदिलशाहीच्या वाटणी संबंधाने बोलणे चालविले व ते सर्व शहाजीने खवासखानास कळविले. ह्या वेळी तरुण महमद आदिलशहाची व वृद्ध खवासखानाची चित्तशुद्धी नव्हती. करता, इरातखानाच्या बोलण्यातील भावार्थ लक्षात घेऊन, खवासखानाने व मुरारपंताने शहाजहानास असे कळविले की, आपण दक्षिणेत येऊन विजापुरातील अंदाधुंदी मोडून टाकण्याची इच्छा करीत असाल तर सबंध आदिलशाहीच आपल्या स्वाधीन करतो. खवासखानाचा हा निरोप जाताच शहाजहानाने दक्षिणेच्या मसलतीची सज्जता केली. हा सर्व प्रकार महमद आदिलशाहाला कळून, त्याने रणदुल्लाखानाच्या साह्याने खवासखान व मुरारपंत यांस ठार केले. हे पुरस्कर्ते गेल्यामुळे, आदिलशाही दरबारात शहाजीला पाठिंबा देणारा कोणी राहिला नाही. हे व्यंग सोडले, तर शहाजीची शत्रूला तोंड देण्याची तयारी करील होती. शहाजहान दक्षिणेत शक १५५७ च्या माघात उतरल्याबरोबर, शहाजीने प्रथम मासाहेब व मूर्तिजाशहा ह्यांची रवानगी घाटाखाली माहुलीच्या किल्ल्यावर केली, नंतर जाधवरावादी दुटप्पी मंडळीला इष्ट दिशेची वाट धरण्यास फुरसत दिली आणि स्वत: सरहद्दीवर शत्रूला तोंड देण्यास तयार राहिला.

३७. शहाजहानाने आपल्या प्रचंड सेनासमुद्राचे चार भाग केले पैकी, एक भाग कुतुबशहाला अडविण्याकरिता व एक भाग आदिलशहाच्या व शहाजीच्या मध्ये घालण्याकरिता पाठवून, दोन भाग शहाजीला जमीनदोस्त करण्याकडे त्याने योजिले. आड पडण्याच्या ऐवजी कुतुबशहा ताबडतोब शरण आला. कारण आदिलशहाच्या जुलमापासून मुक्त करणारा कोणीतरी प्रबल वाली त्याला हवाच होता. तेव्हा त्याच्यावर पाठविलेले सैन्य आदिलशहावर धाडिलेल्या सैन्याच्या मदतीला गेले. आदिलशहावर जे सैन्य पाठविले होते त्याचा मुख्य रोख आदिलशहाला चीत करण्याचा नसून शहाजीला दक्षिण दिशेने कोंडण्याचा होता. तात्पर्य, उत्तरेकडून, पूर्वेकडून व दक्षिणेकडून शहाजीचा कोंडमारा करण्याचा ह्या मोगली सैन्याच्या चारही तुकड्यांचा बेत होता. उघडच आहे, लढाईचा मुख्य विषय शहाजी होता. त्याला समूळ उखळून काढून, निजामशाहीचा सर्व मुलुख मोकळा करण्याकरिता शहाजहानने ही प्रचंड तयारी केली होती. शहाजहानाची अशी योजना होती की, होता होईल तो सर्व मोहीम फाल्गुनापासून ज्येष्ठापर्यंत, म्हणजे बरसात लागण्याच्या पूर्वी,

चार महिन्यात खलास व्हावी. शहाजी हे दोन्ही ओळखून होता. विजापुरकरांना व आपल्याला शहाजहान विभक्त करणार व बरसातीच्या आत सर्व मोहीम खलास करणार हे बीज ओळखून, शहाजीने प्रथम लढाईचे तोंड अंगावर उत्तरेकडून नगर, चांभारगोंदे, बारामती, नीरथड या दिशेने दक्षिणेकडे घेत घेत आदिलशाहीच्या कोल्हापूर, मिरज व रायबाग प्रांतापर्यंत नेले, आणि चांदवडच्या डोंगराजवळील सरहद्दीवरील किल्ले एकेक सोडीत सोडीत ज्येष्ठअखेर सुमारे पंचवीस किल्ले बरसात लागेतोपर्यंत आस्ते आस्ते विशेष हातघाईवर न येता सोडून दिले. इकडे आदिलशहाने शहापूरचे धरण फोडून, विजापुराभोवती वीसपंचवीस मैल पाणीच माणी करून देऊन, शत्रूला कुंठित केले. शहाजीचे अर्धे अधिक किल्ले व सबंध कोकणप्रांत दोन अडीच महिने लढूनही शहाजहानच्या हाती लागले नाहीत व पुढील दीड महिन्यात हाती लागतील अशी खात्रीही पटेना. आदिलशाही प्रांताच्या आश्रयाने हुलकावण्या दाखवीत दाखवीत शहाजीने शहाजहानाच्या सरदारांना दौड करावयाला लावून सडकून घुमविले व दमविले. तेव्हा शहाजहानाने तो सैतानी हुतूतू सोडून देऊन परत येण्यास आपल्या सरदारांस फर्माविले. व आपल्या सैन्याची अब्रू कशी तरी त्या वेळपुरती बचाविली, आणि शहाजीचा पाठराख्या जो आदिलशहा त्याला आपल्या बाजूला ओढून घेण्याच्या हेतूने त्याच्याशी तहाचे बोलणे लाविले. आदिलशहाच्या घरात सर्वत्र बजबजपुरी माजली असून, लढाईचे अवसान त्याच्या ठाई बेताचेच होते. शहाजीची पाठराखणी तो आपण होऊन बिलकूल करीत नव्हता, सहजगत्या आदिलशाही प्रांताच्या बाजूने शहाजी पाठ करून लढत होता, इतकाच अर्थ. सबब, शहाजी जाणे आणि लढाई जाणे, आपण ह्या दंगलीतून सुरक्षित निसटून जावे, म्हणून आदिलशहाने शहाजहानचे तहाचे बोलणे मान्य केले. त्यातून विशेष काही जखम न होता, निजामशाही प्रांतातील वाटणी आपल्याला शहाजहान देतो हे ऐकून तर, आदिलशहाच्या मान्यतेला उत्सुकतेचे कोंब फुटले. दोन्ही शहांमध्ये शक १५५७ च्या वैशाखात तह ठरला. त्यात प्रस्तुत प्रकरणाला मुद्द्याचे असे एकच कलम होते. ते हे की, शहाजी आपल्या ताब्यातील सर्व प्रांत आणि किल्ले मोगलांच्या हवाली करी तोपर्यन्त आदिलशहाने त्यास कोणत्याही प्रकारची मदत करू नये व आपल्या प्रांतात येऊ देऊ नये. ह्या प्रकरणी, दुर्बल आदिलशहाचे सामर्थ्य अजमाविण्यात शहाजहानाने दाखविलेल्या मूर्खपणाची इयत्ता जास्त किंवा शहाजहानाची घाबरपट्टी न ओळखणाऱ्या बालिश आदिलशहाच्या मंदबुद्धीची इयत्ता जास्त, या बाबीचा निर्णय करीत बसण्यात हाशील नाही. महमदशहा तह न करता लढाई चालवून लढाईत सैन्य गुंतवता, तर शहाजीने मोगलांच्या सैन्याला पिंगा घालावयाला लावून धुळीस मिळविले असते. आणि निजामशाही व आदिलशाही यांचा जवळ येत चाललेला मृत्यू टळला असता. ही दूरदृष्टी बालिश महमदशहाला व त्याच्या मुत्सद्द्यांना नसल्यामुळे, त्यांनी तहाची फुकट फळे चाखण्यात

सौख्य मानिले. आपल्या प्रांतात या किंवा नका येऊ, हे शहाजीला सांगण्याची प्राज्ञा महमदशहाची नव्हती व मोगली सैन्य तेथून परतल्यावर त्या प्रांती राहण्याची शहाजीलाही आवश्यकता नव्हती; सबब तहानंतर शहाजी उत्तरेकडे पुणे प्रांती, बरसात येत चाललेली पाहून शक १५५८ च्या वैशाखात निघून गेला व स्वतःच्या एकटयाच्या हिंमतीवर मोगलाला हात दाखविण्याच्या तयारीस लागला. बरसातीत मावळात, घाटमाथ्यावर व कोकणात लढणे प्राय: धोक्याचे असते. परंतु, शहाजी-सारखा शूर, युद्धकुशल. चलाख व मसलती माणूस बरसातीच्या चार नव्हे सहा महिन्यात काय काय नवीन व्यूह रचील याची भीती पडून, शहाजहानाने आपल्या सरदारांस लढाई पावसाळ्यातही जारीने चालविण्याचा हुकूम केला. आणि आपण स्वत: आग्र्यास शक १५५८ च्या आषाढात मोहीम खलास करता आली नाही म्हणून मनातल्या मनात विषाद मानीत चालता झाला. हुकमाप्रमाणे खानजमान १५५८च्या ज्येष्ठात नगराहून भर बरसातीच्या प्रारंभी जुन्नरास गेला व किल्ल्याला वेढा घालण्यास लोक ठेवून त्याने स्वत: पुण्याचा रस्ता धरला. मध्ये घोड, भीमा, इंद्रायणी, इत्यादी पावसाळ्यात पाण्याने फुगणाऱ्या नद्या आहेत. पैकी घोडनदीस पूर आल्यामुळे, तेथे त्याला महिनाभर चिखलात मुक्काम करावा लागला. नंतर श्रावणात लोहगावास आल्यावर तेथे त्याला कळले की, शहाजी सिंहगडाखाली सुखाने मुक्काम करून आहे व त्याच्या आपल्या मध्ये अनेक नद्या व नाले श्रावण-झडीने तुडुंब भरून गेले आहेत. अशा स्थितीत काय करावे हे त्याला सुचेना. शहा-जीच्या पाठीमागे धावत जाणें शक्य नव्हते व पावसात स्वस्थ भिजत रहाणें सह्य नव्हते. तेव्हा रणदुल्लाखान, आदिलशहाकडून त्याच्या मदतीस आलेला, काय करतो ते पाहाण्याकडे त्याचे डोळे लागले. रणदुल्लाच्या मध्यस्तीने शहाजी शरण थोडाच येतो! किल्ले निमूटपणे जमान— (मराठे न चा ल करून जमाल उच्चार करतात, बहुश: रात्री लावण्या म्हणून करमणूक करताना हमाल या शब्दाशी प्रास जुळवि-ण्याकरता) च्या हवाली करण्याचे सोडून, तो द्वाड मराठा सह्याद्री उतरून कुंभ्याच्या घाटाने कोकणात उतरला. कोकणात उतरला अशी बातमी जमानास लागते व जमान कोकणात जाण्याला रस्ता सुधारतो तो दुसरी बातमी आली की, शहाजी पुन: वरघाटी परत आला. बहुश: शहाजीकडील मुत्सद्द्यांनी जमानाला फसविण्या-करिता उठविलेली शहाजी गेल्याआल्याची ही केवळ हूल असावी. जमानने ती खरी मानून आपल्या रिपोर्टात पातशहाला कळविली व त्या रिपोर्टावरून दरबारी दफातकारांनी ती नमूद करून ठेविली. दंडाराजपुरीस शहाजी आश्रय मागण्यास गेला होता, ही तर निव्वळ गप्प दिसते. तेथें आश्रय कोणापाशी मागावयाचा? पातशाही शिद्द्यापाशी? शिवाय दंडाराजपुरीस लपून राहून, माहुलीत बसलेल्या मासाहेबाची व मूर्तिजाची काय वाट? तेव्हा ह्या सर्व गप्पा होत. खेरीज सह्याद्रीभोवती रंगण घालावयाला लावून, जमानला आपण दमवून घामाघूम करून

टाकू ही शहाजीला खात्री होती. सबब लपण्याचे किंवा पळून जाण्याचे त्याला कोणतेच समर्पक प्रयोजन नव्हते. जमानचा रोख कोणीकडे आहे, हे शहाजी जाणून होता. ज्याच्या नावावर व ज्याच्या जीवावर शहाजीने निजामशाहीचे छत्र पुन: उभारले तो मूर्तिजा निजामशहा जमानच्या कोकणातील सफरीचा विषय होता. करता, कुंभ्याच्या घाटाने कोकणात उतरून. जमान खोपवलीच्या रानातून पुढे येतो न येतो तो त्याला उजव्या बाजूस टाकून, पाल, जांबूळपाडा, खालापूर, कल्याण, ह्या रस्त्याने शहाजी मुरंजनास पोहोचला. शहाजी गोंधळला किंवा गडबडला बिलकुल नाही. उलट जमानचा डाव त्याने शिताफीने हुकविला. शहाजीच्या अगोदर जमान माहुलीला पोहोचता व मूर्तिजाला पकडता, तर शहाजीच्या सामर्थ्याची मुख्य अधिदेवताच शत्रूच्या हाती पडती व त्याला चुकूनही कोणी न पुसते. असली ढोबळ व अक्षम्य चुकी करणारा शहाजी नव्हता. जमानच्या दुप्पट वळण घेऊन, शहाजी जमानच्या नीमपट वेळात माहुलीस जाऊन पोहोचला, यात त्याचे व त्याच्या मावळी सैन्याचे गतिकौशल्य व्यक्त होते माहुलीत शिरल्यावर शहाजी जमानचा बाप होऊन बसला. जमानने किल्याच्या वाटा बंद केल्या. काही परिणाम होईना. उलट जमानला व जमानच्या लोकांना पावसात, चिखलात, व तापसराईत खितपत मात्र पडावे लागले. कोकणातली मुसळधार बरसात; त्यात माहुलीच्या रानातली किर्र झाडी, तीत उघडयात वेढा देऊन दुर्दैवी जमान बसला. पाखरांच्या पंखांवर पावसाळयात जेथें शेवाळ उगवते तेथे देसोर माणसाच्या अंगावर बुरशी चढल्यास नवल काय ? जमानचे ह्या मोहिमेत पराकाष्ठेचे हाल झाले. शहाजी मान वाकवील, असा रंग दिसेना. गेल्या ज्येष्ठात जुन्नरच्या किल्ल्याला वेढा घातला आणि आश्विन उगवला तरी पाच महिन्यात तो जमानच्या स्वाधीन झाला नाही. माहुलीच्या मानाने जुन्नरचा किल्ला म्हणजे केवळ मैदानी जागा.ती सर होण्याला जर अद्याप पत्ता नाही, तर माहुली चार वर्षातही सर होती तर दिल्लीच्या मोगलांचे दैव फळफळले असेच म्हणावे लागले असते.अशा संकटात जमान पडून त्याने मध्यस्तांच्या द्वारा शहाजीशी बोलणे लावले.महिना पंधरा दिवस लोटले, तत्रापि शहाजी त्याच्याकडे लक्षच देईना. शेवटी जमानने अखेरचा एक उपाय योजिला. त्याने किल्ल्यातील म्हाताऱ्या बेगमेला चाचपडून पाहिले. तो ते स्थळ नरम दिसले. ती जमानला मिळण्याला राजी झाली. हे असले राज्यही नको व ही सुळावरची पोळीही नको, असे तिला झाले होते. दुसऱ्या एका जुनाट बखरीतील किंवा टिपणातील कोठेतरी व कसातरी उतारा देणारा गचाळ शिवदिग्विजयकार (पृष्ठ ४९) बेगमेचे ह्या वेळचे मुद्द्याचे उद्‌गार देतो ते येथे जसेचे तसेच उतरण्यासारखे आहेत. ‘माहुलीस षण्मास शहा बेगमसुद्धा राहिले. युद्ध करता सहा मास गुदरले. शहाजीमुळे दौलतेचा बखेडा होतो. शहाजी आपला विचार पाहील. मी येते.’ बेगमेच्या जिवावरती तर शहाजीच्या साऱ्या उड्या. मूर्तिजा हे मूल तिच्या हातचे बाहुले. ती गेल्यावर तोही जाणारच. तेव्हा, तिला

जमानकडे जाऊ न देता, शहाजीने जमानला सांगून पाठविले की, आपण मूर्तिजा शहाला तुमच्या सुपूर्द करण्यास तयार आहो. हा निरोप ऐकून जमानला साक्षात अल्ला पावला असे झाले; गेले सहा महिने सोसलेल्या हालांचे ओझे हलके वाटले; आणि शहाजीला कोणतीही शर्त किंवा अट न घालता, त्याच्या इच्छेस येईल तिकडे जाऊ दिले. निजामशहा जमानच्या हातात गेल्यानंतर, निजामशाहीही त्याच्या बरोबर शहाजहानच्या हाती गेली. ती द्यावयाला शहाजीची गरजच उरली नाही. जमानने जर शहाजीला जिंकिले असते व किल्ला सर करून बेगमेला व मूर्तिजाला धरले असतें, म्हणजे जमानचा जर वरपक्ष असता, तर शहाजीला बिनशर्त तो बिलकुल जाऊ न देता. आपली फौज मोडून टाकावी, मोगली राज्यात किंवा मोगलांच्या अंकित किंवा मित्रत्वात असलेल्या राज्यात राहू नये, आपले दोन मुलगे व कबिला ओलीस ठेवावा, वगैरे कलमे, मध्यम पक्ष असता तरीही जमानने शहाजीकडून चोपून कबूल करून घेतली असती. येणेप्रमाणे वरपक्षही नसल्यामुळे व मध्यमपक्षही नसल्यामुळे आणि अधमपक्ष असल्यामुळे तसेच, शहाजीचा पक्षपाती रणदुल्लाखान हा मध्यस्थ असल्याकारणाने शहाजीला जमानने बिनशर्त जाऊ दिले. शिवाय, बिनशर्त सोडण्याला दुसरेही एक कारण होते. शहाजीचे सैन्य लढाई सुरू झाल्यापासून साक्षात् युद्धात बिलकुल जाया झाले नव्हते, जसेचे तसेच शाबूत राहिलेले होते; अद्याप जुन्नरसुद्धा सात किल्ले मोंगलाला दाद न देता शहाजीच्या सैन्याच्या ताब्यात होते; आणि पावसाळयात शेतावर गेलेले शिपाईगडी मोसमात शहाजी बोलवील तेव्हा येणारे होते. खेरीज, दादाजी कोंडदेवांसारख्या कारभाऱ्यापाशी फौजेच्या खर्चाकरिता शहाजीने मुबलक द्रव्य ठेविलेले प्रसिद्ध होते. ह्यामुळे शहाजीची कोणत्याच प्रकारे इज्जत घेण्याची जमानला सोय नव्हती. उलट माहुलीच्या रानात व माहुलीपासून पंचवीस मैलांच्या आत शहाजी जमानचीच इज्जत तसे मनात असते तर वाटेल तशी घेता. Evidently he got good terms म्हणून जदुनाथ सरकार आश्चर्य करतात. खरा प्रकार काय होता याची जर विचक्षणा त्यांनी केली असती तर, तर आपले आश्चर्य अनाठायी आहे, हे त्यांच्या लक्षात येते. The court-historian is discreetly silent about the details, असे दुसरे आश्चर्य जदुनाथ दर्शवितात. तेही वर दिलेल्या विवेचनाच्या मननाने शमण्यासारखे आहे. Details मध्ये खालील एक कलम असावे. ते असे की, जुन्नर वगैरे सात किल्ल्यातून व निजामशाही प्रांतातील इतर ठिकाणांहून आपले सैनिक व आपली चीजवस्तू व लढाऊ सरंजाम आपल्या सोईप्रमाणे शहाजीने बिनहरकत काढून न्यावा व माहुलीचा किल्ला व इतर किल्ले मोगलाच्या स्वाधीन न करता आदिलशाही सरदार रणदुल्लाखा याच्या स्वाधीन करावे. ही अट जमानने मान्य केली नसती, तर शहाजी माहुलीचा किल्ला मुळीच सोडता ना व जुन्नरादी किल्ले दोनचार वर्षे लढविल्यावाचून रहाता ना. किल्ला शहाजीने

आपखुषीने आपण होऊन सोडिला आणि निजामशहाला शहाजीने जमानच्या हवाली आपण होऊन केला. शत्रूच्या सक्तीने हे कृत्य शहाजीने केले नाही. सबब, किल्ला सोडून देण्याच्या शहाजीच्या ह्या कृत्याला capitulation म्हणणे युक्त नसून केवळ evacuation म्हणणे रास्त आहे. capitulation म्हणजे अनन्यगतिक होऊन शरणागत जाणे आणि evacuation म्हणजे केवळ आपखुषीने सोडून देणे. शहाजी शरणागत गेलेला नव्हता. ह्याला दुसरा एक पुरावा मोगली इतिहासकारांच्या लिहिण्यातच आहे. He was permitted to enter the Bijapur service, या कलमाचा अर्थ असा होता की शहाजी ससैन्य आदिलशहाचा मनसबदार बनला, म्हणजे शहाजीने आपले सैन्य आदिलशाहीत शिरताना बरोबर नेले. अन्यथा एकट्या शहाजीला आदिलशहाच काय, पण एखाद्या गावचा पाटीलही ओसरीवर जागा न देता. सशस्त्र सैन्य नेऊ देणे आणि त्या कृत्याला capitulation म्हणणे म्हणजे उजेडाला अंधार म्हणण्यासारखे आहे. तात्पर्य, जदुनाथ सरकारचे हे लिहिणे अवास्तव आहे. जदुनाथ सरकार यांना शहाजीच्या ह्या सबंध प्रकरणाचा अर्थच कळला नाही. दरबारी खुशमस्कऱ्या मुसुलमान लेखकांनी जे लिहून ठेविले त्याचा तारतम्याने उपयोग न करता,सरकारनी केवळ अनुकरण केले असल्यामुळे, त्यांचे शहाजी संबंधाने लिहिणे टाकाऊ निपजले आहे. शहाजीने हुलकावण्या दाखवून जे जमानाला पावसापाण्यातून वणवण करीत राबडत हिंडविले त्याला जदुनाथ hunting of Shahaji म्हणून म्हणतात. मोगलाला बरसातीत लढावयाला लावून, शहाजहानाच्या चार महिन्यात मोहीम संपविणाच्या योजनेचा शहाजीने चुथडा करून सोडिला. ही बाब ध्यानीं न येता, Shahajahan had nothing left to do म्हणून सरकार शेरा देतात तो तर केवळ हास्यास्पद दिसतो. हा शेरा लिहिताना, सर्व कामे व मोहिमा अर्धवट सोडून आग्र्यास आरामात बसण्यास सवकल्यामुळे त्यांची सर्व कामे बिघडत, ही औरंगझेबी टीका, जदुनाथांच्या लक्षात राहिली नाही. जदुनाथ शहाजीला शहा म्हणत नाहीत ह्याबद्दल मात्र त्यांची आम्ही पाठ थोपटतो. नाही तर शिवाजीला † शिवा व संभाजीला संभा म्हणण्यात त्यांनी जसे उमेट मुसुलमान लेखकांचे असभ्य अनुकरण केले तसे शहाजीच्या नावासंबंधानेही न्यास करता आले असते. बहुशः मुसुलमान लेखक शहाजीला शाह या एकेरी नावाने संबोधित नसावेत कारण, शाह या शब्दाचा फारसीत अर्थ राजा असा बहुमानार्थी होतो, लघुत्वदर्शक होत नाही. अन्यथा शिवाजीच्याप्रमाणेच शहाजीचीही व्यवस्था ते लाविल्याशिवाय रहाते ना व सरकार त्यांचे गुलामी अनुकरण केल्यावाचून थांबते ना

† शिवा व संभा अशी ऱ्हस्व नावे मुसलमान लेखक व पातशहा कुत्सित व हलकट बुद्धीने देत नसून, सहज परमार्थाने प्रामाणिक बुद्धीने देतात, अशी जदुनाथ सरकार यांची भोळी समजूत असलेली दिसते. परंतु ही त्यांची समजूत चुकीची

३८. माहुलीचा किल्ला शक १५५८ च्या कार्तिकात रणदुल्लाखानाला खाली करून दिल्यानंतर, शहाजी आपल्या जहागिरीच्या प्रिय अशा पुणे प्रांतात गेला व तेथे आपले दहापंधरा हजार सैन्य व लढाऊ सरंजाम आणून काही काल राहिला. शहाजहानाची पातशाही मनसबदारी करण्याची शहाजीला बिलकुल सोय नव्हती. कारण असला महत्त्वाकांक्षी व मसलती चाकर शहाजहानाला मानवण्यासारखा व पचण्यासारखा नव्हता. फक्त मामुली वहिवाट म्हणून व पातशाही मुत्सद्द्यांच्या कानाला गुदगुल्या व्हाव्यात म्हणून आपण पातशाही चाकर होण्यास खुषी आहोत असे शहाजीने माहुली खाली करून देताना बोलणे लाविले होते. परंतु, ते केवळ सामोपचारिक होते. शहाजी पातशहाकडे जात नव्हता व पातशहालाही शहाजी नको होता. असल्या नाकापेक्षा जड मोत्याची वेसण आपल्या नाकाला सुखासुखी कोण अडकवून घेतो? स्वतंत्र संस्थान पुणे प्रांती उभारण्याला हा कालही समोचीत नव्हता. नाही तर अडीच वर्षे स्वतंत्र राज्य चालविलेल्या शहाजीने तो उपक्रम अमलात आणल्याशिवाय ठेविला नसता. निजामशहाच्या नावावर अडीच वर्षे स्वतंत्र राज्य शहाजीला जसे चालविता आले तसे आपल्या स्वतःच्या नावावर ते तो चालवू जाता तर शहाजहान, आदिलशहा व कुतुबशहा असे सर्वच मुसलमान त्याला विरोध करते. निजामशहाचे नाव पुढे केल्यामुळे आदिलशहा व कुतुबशहा त्याला थोडेफार अनुकूल होते. तत्रापि शहाजहान प्रतिकूल होता. दिल्लीच्या यवनाला सगळ्याच शाह्या

---

आहे, हे कित्येक वर्षापूर्वी टीकेच्या ओघात आम्ही त्यांच्या नजरेस आणिले होते. तथापि अद्यापही ते आपला हट्ट अज्ञानाने सोडीत नाहीत. तेव्हा पुनः एकदा त्यांची कानउघाडणी करणे सत्येतिहासादरार्थ आम्हास उचित दिसते. थोर लोकांच्या नावाचे संक्षेप व ईषद्भिन्न बदल करून व शिव्या देऊन त्याज संबंधाने आपली तुच्छबुद्धी दर्शविण्याची काही मुसुलमान लेखकांना व शहांना खोड होती, या विधानाच्या पुष्ट्यर्थ कर्नल विल्कस यांच्या म्हैसूरच्या इतिहासाच्या प्रस्तावनेतील खालील मजकूर पुनः वाचण्याची सरकार यांस आम्ही शिफारस करतो. टिपू सुलतान याने झैनुलबुद्दिन शुस्तरी याजकडून सुलतानु तवारीख ही बखर लिहविली व त्यात स्वतः खालील कुत्सित संक्षेप घालण्यास लेखकास सांगितले. सोहराबजंग नावाचा निजामाचा मुत्सद्दी होता त्याचे नाव शोरीआब असे लिहिविले. सोहराबजंग म्हणजे रणवीर आणि शोरिआब म्हणजे खारट पाणी, मूत्र! तोहबरजंग या शब्दाबद्दल तेहबरजंग शब्द लिहिला. तोहबरजंग म्हणजे रणगाजी आणि तेहबरजंग म्हणजे रणपाजी! उत्ते नाईक म्हणून एक कानडी बेरडांचा सरदार होता. त्याची कुत्ते नाईक म्हणून टिपूने पांचकळ थट्टा केली! अप्पा बळवंत बद्दल अम्मा बळवंत लिहून पेशव्यांच्या एका आप्ताचा उपमर्द केला. अम्मा बळवंत म्हणजे बळवंतबाई अथवा बाळूबाई! मऱ्हाटा या शब्दाचा उच्चार टिपू मरवता करी. मरवता म्हणजे catamite असा Wilkes अर्थ देतो.

खावयाच्या होत्या. तो नवीन स्थापिल्या जाणाऱ्या हिंदुशाहीला तर मुळीच टिकू न देता. मोगल, आदिलशाहा व कुतुबशाहा या तिघांना धाब्यावर बसवून त्यांच्या नाकावर स्वतंत्र राज्य चालविण्याला देशातील जाणत्या व कर्त्या मराठा व ब्राह्मण मंडळींचा जो निःस्वार्थ पाठिंबा व सहकारिता लागते तिची जाणीव महाराष्ट्रात अद्याप व्हावी तितकी उत्पन्न झाली नव्हती शहाजीच्या यत्नाने ती नुकती कोठे पैदा होऊ लागली होती. स्वतंत्र राज्य आपल्यालाही चालविता येते, ही जाणीव ब्राह्मणांना व मराठ्यांना शहाजीच्या नेतृत्वाखाली जी अल्पस्वल्प आली ती पुढे उत्तरोत्तर वाढत जाऊन शिवाजीच्या उपयोगी पडली, सध्या शहाजीच्या उपयोगी पडण्याजोगी नव्हती. तेव्हा हा विचार शहाजीला तूर्त बाजूस ठेवावा लागला. कोणतेही हत्यार, आणि त्यातल्या त्यात सैन्यासारखे बोलते चालते जिवंत हत्यार रिकामे ठेविले असता धन्याला इजा करते आणि निकामी राहू दिले तर गंजून निरुपयोगी होते. करता बाळगलेले सैन्य कामगिरी मिळून जेथे गुंतले जाईल असे स्थल शोधून काढण्याचा मार्ग तेवढा शहाजीला खुला राहिला. एतदर्थ त्याने नारो त्रिमळ हणमंते मुजुमदार या आपल्या इतबारी मुत्सद्याला (शिवदिग्विजय पृष्ठ ५०) विजापुरास पाठविले. महमद आदिलशहाला शहाजीसारख्या सरदाराच्या मदतीचे अगत्य ह्या वेळी विशेषच भासत होते. आदिलशाही दरबार व लष्कर किती दुर्बल झाले होते ते गेल्या लढाईत निदर्शनास आलेच होते. स्वतःच्या प्रांताचेही

---

मद्रासच्या इंग्रजांना टिपू harmaphrodites म्हणजे हिजडे म्हणे. जनरल म्याक् लिऑड् यावर एक गीत रचून तीत त्या सेनापतीची तुलना टिपूने भागूबाईशी केली आहे ! ही शिव्या देण्याची व कुत्सित अपभ्रंश करण्याची खोड टिपूने त्याच्या पूर्वीच्या अवरंगझेबादी मंडळींकडून घेतली असे दिसते. अवरंगझेब शिवाजीला शिवा म्हणे. मतलब असा की, शिवा शब्द उच्चारिला म्हणजे त्याच्या निकटचा उच्चार चुवा लक्ष्यात यावा. चुवा म्हणजे उंदीर हा अपशब्द तर अवरंगझेब शिवाजीला नित्याच्या बोलण्यात लावीत असे. हीच संक्षेपाने तुच्छता दाखविण्याची दुष्ट व हलकट खोड आदिलशाही तवारीखकारांतही दिसून येते. आदिलशाही तवारीखकार मुरारपंत या नावाबद्दल मुरारी हे एकेरी नाव योजितात. मुरारपंत हा आदिलशाहीतील एक थोर कारभारी होता. त्याचा थोरपणा सहन न होऊन, हे मुसुलमान तवारीखकार त्याला मुरारी या तुच्छतादर्शक नावाने संबोधितात. बंगाल्यांना व मुसुलमानांना आपल्या बायका म्हणून एका इंग्रज अधिकाऱ्याने दहावीस वर्षांपूर्वी म्हटलेले वाचकांस स्मरत असेलच. ते म्हणणे जितके सभ्य व कानाला गोड, तितकेच वरील अपभ्रंश सभ्य व गोड होत. करता जदुनाथ सरकार यानी थोर इतिहासप्रसिद्ध मऱ्हाठ्यांच्या नावांचे मुसलमानांनी चिडखोरपणाने केलेले क्षुद्र संक्षेप आपल्या लिहिण्यात आणून आपले हसे करून घेऊ नये हे उत्तम !

संरक्षण त्यांच्या हातून होणे कठीण पडत असे. त्यात नवीन मिळालेल्या निजामशाही प्रांताची व्यवस्था लावण्याच्या ओझ्याची भर पडली. खेरीज कर्नाटकातील पुंड-पाळेगारांनी दक्षिणेकडील आदिलशाही प्रांतात कैक वर्षे दंगा चालविला होता. करता आदिलशहाला शहाजीसारख्या कर्त्या सरदाराची जरूर होती. प्रसंगी शहाजहानासारख्या सार्वभौमालाही तोंड देण्यास उत्सुक असा सरदार आपल्या बाजूस असणे आदिलशहाला इष्ट होते. अशा ह्या अनेक कारणांचा समवाय होऊन आदिलशाहाने शहाजीराजांस आपल्या दरबारी येण्याचे आमंत्रण पाठविले. बखरकार लिहितो की, शहाजीचा आदिलशहाने बहुत गौरव केला, शहराबाहेरील एका बागेत बैठक करून बरोबरीचे इराद्याने शहाजीची भेट घेतली, आणि पुणे वगैरे पूर्वीची निजामशाही जहागीर कायम करून, नवीन कनकगिरी वगैरे प्रांत सैन्याच्या खर्चास लावून दिले. विजापुरी सरदारीचा बंदोबस्त प्रमाथी संवत्सरी म्हणजे शक १५६१ त कायमचा कागदोपत्री झाला. शिवदिग्विजयकाराने शहाजी १५४८ त प्रथम विजापुरास गेल्याचा शकाचा आकडा आणि ह्या दुसऱ्या खेपेस विज्यापुरास सरदारी कायम मिळाल्याचा संवत्सर याची एका ठिकाणी गफलत केली आहे.

३९. शहाजीला ही आदिलशाही चाकरी मनापासून आवडत होती असे नाही. स्वतंत्र संस्थान पुनरुज्जीवित करून त्याची वजिरी मुखत्यारीने ज्याने नुकतीच केली, वजिरी करता करता स्वतःच राज्याधिकार बळकावून स्वतःच हिंदू राज्य स्थापिण्याची ज्याची ईर्ष्या, लहानगा मूर्तिजा दरबाराला भितो ह्या मिषाने तख्तावर त्यास घेऊन बसण्याचा परिपाठ पाडून दरबाऱ्यांच्या नजरेला हिंदू राजा तख्तावर बसलेला पाहण्याची सवय ज्याने लाविली, त्या मुत्सद्द्याला व सरदाराला दुसऱ्याच्या दरबारी चाकरी करण्यात भूषण वाटणे शक्य नव्हते. केवळ अपरिहार्य प्रसंग म्हणून आदिलशाही चाकरी शहाजीने पतकरिली. ज्या सैन्याच्या दराऱ्यावर माहुलीहून शरीराला व अभिमानाला दुखापत न होता, शहाजीला अब्रू कायम राखून निघता आले ते निवडक सैन्य घेऊन तो आदिलशाहीत गेला. जरूर नसल्यामुळे, पागा, हत्ती उंट, तोफखाना वगैरे जंगी सरंजाम जागजागी पुणे, चाकण, सुपे वगैरे आपल्या जहागिरीतील महाली ठेवून, फक्त घोडे व स्वार शहाजीच्या बरोबर होते (शिवदिग्विजय १२३). शहाजीच्या ह्या सरंजामाचा पुढे शिवाजीने उपयोग केला. बरोबर हणमंते, अत्रे, चतुर, उपाध्ये, पुरोहित, वगैरे कारकून म्हणजे कारभारी मंडळीही नेली. जहागिरीत पुण्यास दादाजी कोंडदेव, विसापुरास बिलाल हबशी, चाकणास फिरंगोजी नरसाळा, सुप्यास संभाजी मोहिता व पुरंधरास नीळकंठराव, ह्या विश्वासातील इसमांकडे तेथील सोपणूक करून, पागा वगैरेची जतणूक करण्यास सांगितले. ही मंडळी आदिलशाही सरकारच्या देण्याचा वेळच्या वेळी फडशा करून, जहागिरदाराचा पैसा दादाजीपंतांकडे शिल्लक ठेवी. हे द्रव्य शिवाजीस पुढे उपयोगी पडले. विजापुरास जाताना शहाजीने आपल्या कबिल्याची व्यवस्था दादाजी कोंडदेवाच्या

सल्ल्याने एणेप्रमाणे केली. शहाजीच्या कुटुंबातील खाशी माणसे ह्या वेळी म्हटली म्हणजे, वडील स्त्री जिजाबाई, धाकटी स्त्री तुकाबाई, रक्षास्त्री नरसाबाई व आणीक एक उपस्त्री, मिळून चार स्त्रिया; जिजाबाईचे पुत्र संभाजी, शिवाजी, व एक कन्या, तुकाबाईचा पुत्र एकोजी, नरसाबाईचा पुत्र संतूजी किंवा संताजी आणि निर्नामक दुसऱ्या उपस्त्रीचा पुत्र कोयाजी अशी कुटुंबातली एकंदर खाशी मंडळी दहा होती. पैकी, वडील पुत्र संभाजी, धाकटा पुत्र एंकोजी व रक्षापुत्र संतूजी व कोयाजी व त्यांच्या तीन भाया शहाजीबरोबर कायमच्या विजापुरास गेल्या. जिजाबाई व मधला मुलगा शिवाजी व त्याची बहीण, अशी तिघे जणे कधी विजापुरास व प्राय: पुण्यास जहागिरीवर दादाजीपंताच्या सहवासात जाऊन येऊन असत. जिजाबाईची त्यावेळी सुमार चाळिशीची उमर असून, ह्या पुढे तिला संतती झाली नाही. संभाजी, शिवाजी व एक मुलगी अशी तीनच अपत्ये तिची जगली होती. आणिक चार पाच अपत्ये तिला झाली होती म्हणून बृहदीश्वरशिलालेखकार लिहितो. ती सर्व लहानपणीच निवर्तली. शक १५२५ त लग्न झाल्यापासून शक १५५८ त शहाजी विजापुरास जाईतोपर्यंतच्या तेहतीस वर्षांत शिंदखेड, दौलताबाद, अहमदनगर, परंडा, भीमगड, संगमनेर, त्र्यंबक, वैजापूर, जुन्नर, पुणे, कोंडाणा व शेवटी माहुली, अशा अनेक स्थलींची ऐश्वर्ये, संकटे, पळापळी, धराधरी, लढाया, खून, छापे, द्वंद्वयुद्धे, इत्यादि भारततुल्य प्रसंग पाहून व सोहळे भोगून शहाजीच्या धोरणाचा तिला पूर्ण अभ्यास व अनुभव आला होता. एक लढण्याची कला सोडून दिली, तर बाकीच्या बहुतेक सर्व राजकीय कला शहाजीच्या इतक्याच तिच्या आंगवळणी पडल्या होत्या. अकब्बर, जहांगीर, शहाजहान, इभ्राइम आदिलशहा, महमद आदिलशहा, चांदबिबी, मलिकंबर फत्तेखान, लोदी, मोहबतखान, नूरजहान, आसदखान, खवासखान, मुस्तफाखान, मूर्तिजा निजामशहा, मासाहेब, बडी साहेबीण, मुरारपंत, चतुर साबाजी, ह्या मोगलाई, निजामशाही व आदिलशाही प्रसिद्ध व्यक्तींचे गुणदोष तिने प्रत्यक्ष पाहिले असून मालोजी, शहाजी, विठोजी, खेळोजी, लुखजी, अचलोजी, इत्यादी सासरमाहेरच्या मंडळींच्याही प्रकृत्या तिने अनुभविल्या होत्या. नवरा मोहिमेवर असताना त्याच्याबरोबर तिने लढाया पाहिल्या होत्या व बरोबर नसल्या वेळी प्रांताची न्यायमनसुबी केलेली होती. अशा ह्या कर्त्या व पोक्त बाईच्या हवाली पुण्याकडील जहागीर करून, दादाजी व सोनोपंत या वृद्ध मुत्सद्द्यांच्या सल्ल्याने शिवाजीचे व जहागीरीचे पालनपोषण करण्यास ह्या बाईस शहाजीने आपला प्रतिनिधी नेमिले व निर्धास्त अंत:करणाने विजापुरचा रस्ता धरिला. शिवाजीचे वय ह्या वेळी नऊ वर्षांचे असून, जिजाबाई व शहाजी यांच्याबरोबर दौलताबादेपासून माहुलीपर्यंतच्या स्थली त्या त्या काली तो होता.

४०. शक १५५९ साली चैत्रवैशाखात शहाजी विजापुरी दाखल झाला. ५९ च्या पावसाळ्यानंतर त्याची रवानगी रणदुल्लाखानाबरोबर कर्नाटकात म्हणजे

सध्याच्या म्हैसूरप्रांतात झाली. तेथील कित्येक पाळेगारांनी व राजांनी दक्षिणचा सुभा जो अठरा वर्षांचा औरंगझेब त्याच्याशी संविधान बांधून आदिलशहाच्या दपटश्यातून मुक्त होण्याची खटपट चालविली होती. त्यांना ताळचावर आणण्याकरिता आदिलशहास त्या प्रांती सैन्य पाठविणें इष्ट दिसले. रणदुल्लाखान हा वरिष्ठ सरदार, सबब लढण्याचा वगैरे सर्व भार शहाजीवर सहजच पडला. रायगिरी येथील राजा वीरभद्र याजकडून खंडणीचा पैसा थकला, करता त्याचा समाचार ह्या वर्षी व १५६० च्या आरंभी घेऊन रणदुल्ला व शहाजी विज्यापुरास परत आले. १५६१ प्रमाथी संवत्सरातील दुसऱ्या वर्षीच्या मोहिमेत शहाजीने बसवापट्टण सर केले. ह्या वर्षी मोहीम करून विश्रांतीस विजापुरास परत आल्यावर कनकगिरीच्या सनदा महमदशहाने खुष होऊन शहाजीस बहाल केल्या. १५६२ च्या साली शहाजी राजास नूतन अर्जानी झालेल्या कनकगिरीच्या जहागिरीतील गिराशांनी बंड केले. जवळच्याच एका तालुक्यात शहाजी मोहिमेवर होता. तो इतक्यात अफजलखान भटारी कनकगिरी प्रांतातून जात असता बंडखोर गिराश्यांची व अफजलखानाची गाठ पडली. बहुत कजाखीचे युद्ध झाले. त्यात भटाऱ्यांचा पराभव झाला. हे वृत्त कळताच ताबडतोब कनकगिरीवर चाल करून येऊन, शहाजीने कनकगिरीकरांचे पारिपत्य केले. शहाजीच्या ह्या साह्याचे भूषण न मानिता, अफजलखान दूषण मानू लागला. आणि तेव्हापासून शहाजीचा द्वेष करू लागला. ह्या मोहिमेत शहाजी असता वैशाख शुद्ध पंचमीस शिवाजीचे पहिले लग्न सईबाईशी पुण्यास दादाजीपंतांनी उरकून घेतले. ही वार्ता विजापुरी महमद आदिलशहास व बडे साहिबिणीस कळून, राजे मोहिमेहून परत आल्यावर, त्यांनी गैरहजेरीत मुलाचे लग्न असे गुपचुप का उरकून घेतले असा प्रश्न केला आणि राजास हुकूम केला की, मुलास आणून येथेच समारंभाने लग्न करावे. तेव्हा जिजाबाई व शिवाजी यांस विजापुरास आणून तेथे शिवाजीचे दुसरे लग्न पुतळाबाई ऊर्फ सोयराबाई इजशी, आदिलशहा स्वतः हजर राहून, आषाढात मोठ्या थाटाने लाविले. ह्या वेळी शक १५६२ त शिवाजीचे वय १३ वर्षांचे होते. मुजरा वगैरे न करण्याचा प्रकार जो झाला तो (शिवदिग्विजय १११,११२) ह्या वर्षाच्या पावसाळयानंतर दसऱ्याचा दरबार भरला असता झाला. त्रेसष्ठ, चौसष्ठ व पासष्ठ, या सालीही लखमेश्वर वगैरे प्रांतांवर स्वाऱ्या करून, बंकापूर, हरिहर, बसवापट्टण, तालीखेडा, वगैरे तालुके शहाजीने आस्ते आस्ते अमलाखाली आणिले. पाऊसकाळी शिरस्त्याप्रमाणे तो छावणीत विजापुरप्रांती येई. १५६६ साली शिरे व बंगळूर हे प्रांत घेऊन, म्हैसूरचा पूर्वेकडील प्रांत आदिलशहाच्या हुकमतीत आला. अलीकडे काही वर्षे रणदुल्लाखान प्रकृती नादुरुस्त म्हणून विजापुरी राही व शहाजी एकटाच मोहिमेचे काम संभाळी. शेवटी शके १५६५ त रणदुल्लाखान दुखण्याने वारला. सदुसष्ठ साली शहाजीने वीरभद्राकडून यल्लारी तालुका घेतला. अशा तऱ्हेने आठ वर्षांत शहाजीने विधुपूरचा राजा वीरभद्र,

श्रीरंगपट्टणचा राजा कंठीरव, कोंगदेशचा राजा कोंगनायक, कावेरीपट्टणचा राजा जगदेव, तंजापूरचा विजयराघव, चंदीचा वेंकटनायक, मधरेचा तिरुमल्ल नाईक, वालीगुंडापूरचा अरिकाल वेंकटनायक,विजयानगरचा रंगशायी नायक, इंसकूटपूरचा तन्नागोड नायक, इत्यादी लहानमोठे पाळेगार जिंकून त्यांजकडून खंडण्या घेतल्या (बृहदीश्वरशिलालेख). ह्या मुळे शहाजीराजांची कीर्ती व बोलबाला सर्वत्र विशेष झाला व कर्तबगारीच्या समांतर वास्तव्य करणारा जो मत्सर त्याचा पगडा आदिलशाही दरबारात उद्भवला. मलिकंबराच्या कारकीर्दीत मत्सराचा उदय होऊन शक १५५८ त निजामशाही शहाजीला सोडावी लागली. आणि तोच विकार शहाजहानच्या हृदयात शिरून शहाजीला शक १५५८ त पुनरुज्जीवित निजामशाहीस कायमचे मुकावे लागले. असलाच प्रकार शक १५६८ साली व्हावयाचा प्रसंग येऊन शहाजी वर देखरेख करण्याकरिता कर्नाटकची सुभेदारी मुस्तफाखान यास झाली. दहा वर्षांपूर्वी खवासखान व मुरारपंत यांचा शत्रु हा मुस्तफाखान होता आणि खवासखान आणि मुरारपंत यांचा आणि शहाजीराजाचा तर अत्यंत स्नेह असे. तेव्हापासून मुस्तफाखानाच्या मनात शहाजीसंबंधाने जो अढी बसली ती अद्यापपर्यंत कायम होती. मुरारपंत व खवासखान यांचे खून करण्याच्या कामी मुस्तफाखानाचे अंग होते. खवासखानाचा निकाल लागल्यावर वजिरी महमदशहाने मुस्तफाखानाला दिली. रणदुल्लाखान शहाजीचा स्नेही, सबब त्याचा तो पक्षपाती आहे असे मुस्तफाखान, अफजलखान वगैरे लोकांनी शहाच्या व बडेसाहेबिणीच्या मनात भरविले. सैन्य, तोफखाना, वगैरे सरंजाम शहाजी सदा उमद्या स्थितीत ठेवी, हेही ह्या ऐदी आदिलशाही लोकांना पहावेना. शहाजी एखाद्या प्रसंगी आपल्यावर उठेल, अशीही भीती महमदशहाच्या डोक्यात ह्या मत्सरी लोकांच्या चिथावणीने उद्भवली. बड्या साहिबिणीने तर मुलुखगिरी करून शहाजी विजापुरास आला म्हणजे शहाजीच्या तोंडावर त्याची निर्भत्सना करण्याचा उद्योग आरंभिला. तेव्हा अलीकडील दोन चार वर्षात शहाजीने विजापुरी बरसातीत छावणीस येण्याचेच टाळले. तो काही ना काहीतरी निमित्त काढून बंगळूरास बरसातीत राही. दोन तीनदा आदिलशहाने दरबारी येण्याविषयी शहाजीस निरोप पाठविले. परंतु ते न ऐकिले असा बहाणा शहाजी करी व बडेसाहिबिणीच्या दुरुस्त्या टाळण्याचा प्रयत्न करी (बृहदीश्वरशिलालेख), आणि स्त्रीनायकीत कोणता प्रसंग कोणत्या प्रसंगी गुजरेल या संशयाने बंगळूरासच गुजराण करी (शिवदिग्विजय ७२). शहाजीच्या ह्या धरसोडीच्या गैरहजेरीचा प्रारंभ सुमारे शक १५६४ त होऊन शक १५६८त तत्संबंधाने दरबारात विशेष चर्चा होऊ लागली. शहाजी विजापुरास न जाण्याला मुख्य कारण असे झाले की, शक १५६५ त रणदुल्लाखानाने मरणापूर्वी शहाजीस असा इशारा दिला होता की, तुम्हाला दरबारी शत्रू उत्पन्न झाले आहेत, तेव्हा या उपरी तुम्ही विजापुरी राहू नये, जहागिरीवर बंगरुळासच राहण करावे (शिवदिग्विजय १४७). ह्या सल्ल्या-

बरहुकूम शहाजी बहुश: बंगळूरास राही, कधी कोलारास राही व कधी बाळापुरास राही, परंतु विज्यापुरास छावणीस येईनासा झाला. दरबारी चुगल्याचहाडच्या व क्षुद्र वैमनस्ये यांची तिरस्कृती हे शहाजीच्या न येण्याचे एक कारण होतें. दुसरे कारण असे होते की, पातशाही छायेखाली खुरटत बसण्यापेक्षा, त्या छायेच्या बाहेर स्वतंत्र हवेत फोफावत जाणे शहाजीस मनापासून आवडे. शक १५६१ त बंगळूर काबीज करण्याच्या इरादयाने तेथील चारपाच लक्ष होनाचे उत्पन्न खुष होऊन आदिलशहाने शहाजीस सैन्याच्या खर्चाकरिता लावून दिले होते. शहाजीने कर्नाटकात जो मुलुख जिंकिला त्याच्या जमीनमहसुलाची व्यवस्था महाराष्ट्रातील ब्राह्मण कारकुनांच्या द्वारा त्याने इतकी चोख ठेविली की, रयत आबादान होऊन कर आनंदाने देत व आपल्यावर अधिकारी असावा तर शहाजी असावा अशी इच्छा दर्शवीत. उत्पन्नातील पातशाही वाटा शहाजी नियमाने विज्यापुरास पाठवी व तो वाटा शहाजीच्या अंमलात इतका मोठा झाला की, त्याच्या जीवावर आयत्या पिठावर रेघा ओढणाऱ्या महमद आदिलशहाचे सर्व विलास चालत. त्यामुळे महमदशहा शहाजीचा बराच मिंधा झालेला होता. शिवाय, मुसलमान सरदार पाठवून जे कर्नाटक बहुत वर्षे सर झाले नाही, ते शहाजीने पाच चार वर्षात जिंकून दिले, ही बाब महमदशहाला विसरता येत नसे. तत्रापि शहाजीसंबंधाने त्याचे वर्तन संशयी असे. कर्नाटकात शहाजीला तो प्राय: एकटा पाठवीत नसे. कोणीतरी मुसुलमान सरदार त्याच्या जोडीला प्रत्येक मोहिमेत असे. रणदुल्लाखान, आसदखान, रुस्तुमजमा, अहमदखान, मुस्तफाखान असा कोणीतरी खान शहाजीच्यावर देखरेखीला सदा पाठविला जाई. महमद आदिलशहाला अलीकडे दुसरा असा एक संशय येत चालला होता की कर्नाटकातील आदिलशाही राजांना आपल्याविरुद्ध चिथवून देण्याचे काम शहाजी करतो. तिसरा असाही एक संशय महमदशहाला अलीकडे येऊ लागला की पुणेप्रांती आपल्या शिवाजी नामक मुलाच्या करवी शहाजी बंडाळी उभारवितो. आणि हा संशय येण्याला थोडेबहुत गेल्या पाच चार वर्षात कारणही घडले होते. शक १५६२ त पुणे प्रांती शिवाजी, जिजाबाई व दादाजी कोंडदेव गेल्यानंतर, शिवाजीने पुण्याखालील बारा मावळे काबीज केली, राजगड किल्ला बांधिला, व तोरणा हाती घेतला. ह्या कृत्याची बातमी महमदशहाच्या कानी येत होती. ह्याच सुमारास शहाजीचेही विजापुरास येणे बंद झाले. तेव्हा रुबरू गाठ घेण्याकरिता शहाने शहाजीस दोन चार वेळा बोलावणे पाठविले. ते ह्या नाही त्या सबबीवर शहाजीने टाळले. सामान्य हुजऱ्याप्रमाणे मुसक्या बांधून शहाजीला धरून आणण्याची शहाची प्राज्ञा नव्हती. शहाजीजवळ इतके चांगले जय्यत सैन्य असे की, त्याच्याशी मगरुरी करणे बरेच धोक्याचे होते. सबब, विजयनगरचा राजा रायल ऊर्फ श्रीरंगशायी नायक या पुंड संस्थानिकावर स्वारी करण्याच्या मिषाने महमदशहाने मुस्तफाखानाची रवानगी शक १५६८ त कर्नाटकात केली व शहाजीवर नजर ठेविण्यास त्यास सांगितले.

शहाजी श्रीरंगशायी नायकास फूस देतो की काय वगैरे माहिती काढण्याचे काम मुस्तफाखानाकडे होते. मुस्तफाखानास मदत करण्याचा हुकूम शहाने शहाजीस व आसदखानास केला. शिद्दी रैहान गंडीकोटास वेढा घालून बसला होता. त्यासही मुस्तफाखानास जाऊन मिळण्यास महमदशहाने लिहिले. एणेप्रमाणे मुस्तफाखान शहाजी, आसदखान व शिद्दी रैहान असे चौघे आदिलशाही सरदार श्रीरंगशायी नायकावर बेदनूर प्रांती चालून गेले. बेदनूर प्रांती चाल करून जाण्याचे कारण असे की, विजयानगरच्या श्रीरंगनायकास त्याचा मांडलिक जो बेदनूरचा शिवाप्पा नायक त्याची मदत होती. शिवाप्पाचा बेदनूर प्रांत डोंगराळ असून तेथून त्याने व श्रीरंगशायी नायकाने आसमंतातील प्रांतात मोठा धुमाकूळ मांडिला. त्यांनी फौजही इतकी भारी जमा केली होती की, शहाजी किंवा मुस्तफाखान यांची खातरजमा ते बाळगीत नव्हते. आदिलशाही फौजेच्या व बेदनूरकराच्या फौजेंच्या कित्येक लहान-मोठ्या चकमकी झाल्या. त्यात बेदनूरकरचीच फत्ते होत गेली. शेवटी दोन्ही सैन्याची येल्लूर येथे गाठ पडून मोठे निकराचे युद्ध झाले. मुस्तफाखानाच्या उजव्या बाजूस शिद्दी रैहान आणि डावे बाजूस शहाजी व आसदखान होते. बेदनूरकराकडील सरदार दामलवाड याने चालून येऊन मध्यस्थानी असलेल्या मुस्तफाखानाचे खास लष्कर फोडून भग्न केले आणि शहाजी व असदखान यांच्या तुकडीवर हल्ला करून, आसदखानास जखमी केले. हा सर्व चमत्कार मुस्तफाखान एका टेकडावरून पहात होता, त्याच्यावर दामलवाड नंतर चाल करून गेला. तेव्हा शिद्दी रैहानाने दामलवाडाच्या पिछाडीवर हल्ला करून दामलवाडास ठार केले. दामलवाड ठार होताच बेदनूरकराच्या सैन्याने पळ काढला आणि आदिलशाही फौजेचा जय झाला. प्रथम लढाईचा सर्व भार शहाजी व आसदखान यांच्या तुकडीवर पडून त्यात आसदखान जखमी झाला खरा; परंतु दामलवाडाची सर्व शक्ती ह्या तुकडीशी झुंजण्यात खर्च झाल्यामुळे सिद्दी रैहानला दामलवाडावर जय मिळविता आला. अशी स्थिती असल्यामुळे शहाजी व आसदखान यांच्या पक्षातील लोक जय आपण मिळविला असे म्हणू लागले व सिद्दी रैहान तो मान आपला आहे असे प्रतिपादू लागला. कोणत्याही एका पक्षाची तरफदारी मुस्तफाखानाला करणे अशक्य होऊन, अखेरीस दोन्ही पक्ष नाखुष झाले. शिद्दी रैहानाचे व मुस्तफाखानाचे त्यामुळे वाकडे पडले. शहाजी व मुस्तफाखान यांच्यातही वैमनस्य पूर्वी होतेच ते जास्त दुणावले. मुस्तफाखानाला असा संशय आला की, शहाजीने ह्या एकंदर मोहिमेत अंगचोरपणा केला व बेदनूरकराचा जितका पक्का बंदोबस्त करावा तितका केला नाही. ह्या संशयाचा परिणाम असा झाला की, शहाजीवर बारीक नजर ठेविण्यास मुस्तफाखानाने आपल्या हाताखालील सरदारांस सांगितले. बेदनूरकरावरील ही मोहिम शक १५६८ च्या आश्विनात सुरू होऊन, सबंद १५६९ सालभर चालली.

४१. बेदनूरच्या मोहिमेनंतर मुस्तफाखान शक १५७० च्या चैत्रात चंदीकडे

निघून गेला व शहाजी बंगळूरास आपल्या जहागिरीत जाऊन राहिला. दोघांमध्ये इतके वैमनस्य वाढले की, शहाजी तेव्हापासून मुस्तफाखानाचा हुकूम मानीनासा होऊन मुखत्यारीने वागू लागला (बृहदीश्वरशिलालेख व साने, पत्रे यादी ४३८). शहाजी आपला म्हणजे अर्थात् आदिलशहाचा हुकूम मानीत नाही अशी तक्रार मुस्तफाखानाने महमदशहाकडे केली. त्यामुळे महमदशहाचेही मन दूषित झाले. शहाजी स्वतंत्र होऊन आपल्यावर उलटेल ही जी महमदशहाची फारा दिवसांची भीती ती खरी झाली असे त्याला वाटू लागले. ह्या भीतीला पुण्यात शिवाजीच्या अडुसष्ट व एकूणहत्तर सालातील उद्योगाने पुष्टीकरण मिळाले. ह्या दोन सालात शिवाजीने चाकणापासून शिरवळपर्यंतचा पुण्याच्या लगतचा दक्षिणोत्तर प्रांत आक्रमण केला व तेथील आदिलशाही कामदार हाकून दिले. शहाजीचा हत्ती, तोफा वगैरे जंगी सरंजाम पुणेप्रांती पडून राहिला होता त्याची शिवाजीने जुळवाजुळव करून पाच चार हजार मावळे सरदारांची फौज ठेवली व कांगोरी, तुंग, तिकोना, भोरप, कावरी, लोहगड, राजमाची, पुरंधर, सिंहगड, रायरेश्वराचा डोंगर इत्यादि घाटमाथ्यावरील किल्ले काबीज केले; इतकेच नव्हे तर कल्याणच्या मौलाना अहंमद यास लुटले. ह्या उद्योगाची वार्ता महमदशहाला हाकून दिलेल्या कामदारांकडून मुखजबानीने कळली. तेव्हा तर शहाच्या मनाची शहाजीच्या कपटाबद्दल खात्री होऊन चुकली. बापलेकांनी संगनमत करून आदिलशाही दडपण झुगारून देण्याचा इरादा खास धरिला, असा शहाच्या मनाचा निश्चय झाला. दोघाही बापलेकांना सैन्य पाठवून चिरडून टाकण्याचे सामर्थ्य आदिलशहाच्या ताकतीच्या बाहेरचे होते. जे काही सैन्य होते ते सर्व मुस्तफाखान व सिद्दी रैहान यांच्या हाताखाली चंदीकडे गुंतले होते व शहाजीशी सामना करण्याच्या तोलाचे नव्हते. काही सैन्य मोगलांच्या हद्दीवर किल्लोकिल्ली पसरलेले होते. ते तेथून हालविण्याची सोय नव्हती. करता शिवाजीवर पाठविण्याजोगे सैन्य महमदशहाजवळ नव्हते. अशी दुर्बल स्थिती असल्यामुळे महमदशहाला कपटयोजना करण्याखेरीज दुसरे गत्यंतर राहिले नाही. पोरगा फार दूर सांदीकोपऱ्याचा आश्रय करून असल्यामुळे, त्याच्याकडे काही काल दुर्लक्ष्य करून बापाचा प्रथम निकाल लाविण्याचे महमदशहाने बेत केला व त्याप्रमाणे मुस्तफाखानास शहाजीला कपटाने पकडण्याचा हुकूम केला. शक १५७०-च्या आगोटीस त्याचा मुक्काम चंदी प्रांतात पडला. बरोबर दिलावरखान, फरीदखान, बाळाजी हैबतराव, मसूदखान, अज्जमखान, सर्जाखान, रघोजीराव, यादुहखाना बाजीराव घोरपडे, अंबारखान, वेदाजी भास्कर ब्राह्मण, जोहारखान, कन्नोळराज, असे कर्नाटकात ठिकठिकाणी पसरलेले लहानमोठे हिंदुमुसुलमान सरदार शहाजीचा तमाशा पहाण्याकरिता व शक्तीने नाहीतर संख्येने शहाजीला दरडविण्याकरिता हजर होते. मुस्तफाने शहाजीला निरोप पाठविला की, पुढील सालाच्या मोहिमेच्या कार्याची आखणी व योजना ठरवावयाची आहे, तेव्हा आपल्यासारख्या धुरंधराची

सल्ला घेतल्यावाचून कोणतीही योजना मुक्रर करणे लायक नव्हे, सबब आपण सत्वर निघून आमच्या छावणीत यावे. या निरोपातील कपट शहाजी जाणत होता. तत्रापि पातशाही बोलाविण्याला मान दिला नाही असा आक्षेप न यावा एतदर्थ, शहाजीने मुस्तफाखानाचे आमंत्रण स्वीकारले. जाताना एक मात्र तजवीज करून ठेविली. ती ही की, बंगळूरचा किल्ला व तेथील फौज वडील पुत्र संभाजीराजा ह्याचा सुपुर्दीस देऊन, कमजास्त काही झाल्यास तयारीने असण्यास त्याला बजाविले. बरोबर खंडोजी, मानाजी माने, तानाजो, बंधूजी, भांडवलदार, दसोजी व मेघोजी हे सात इतबारी सरदार व तीन हजार घोडा घेऊन तो मुस्तफाच्या भेटीस गेला. मोठ्या आदबीने भेट देऊन, मुस्तफाने शहाजीस अमूक तजवीज व्हावयाची आहे, तमूक पत्र पातशहाकडून यावयाचे आहे, इत्यादि सबबीवर दहा पंधरा दिवस ठेऊन घेतले आणि एके दिवशी म्हणजे १५७०च्या श्रावण वद्य प्रतिपदेस,हिजरी सन१०५८ च्या रज्जबच्या १५ तारखेस पहाटेस आपल्या तंबूत शहाजी निजला असता आसदखान, यशवंतराव व बाजी घोरपडे यांनी त्या तंबूला वेढा दिला. जागा होऊन घोड्यावर बसून निसटून जाणार, इतक्यात बाजी घोरपड्याने पाय धरून शहाजीस गिरफदार केले. मेजवानीला बोलावून पाय धरून शहाजीस बाजी घोरपड्याने धरले, असेही बखरकार लिहितात. शहाजीच्या सरदारांची व घोरपडे वगैरेंची लढाई होऊन, बाजी घोरपड्याने शहाजीस वार करून पकडले, असे बृहदीश्वर-शिलालेखकार म्हणतो. पैकी खरा मजकूर कोणता ते निश्चित करण्याला विश्वसनीय साधन नाही. थोरामोठ्यांच्या चरित्रातील प्रसंग कर्णोपकर्णी जाऊन कसकसे सजविले जातात, हे मात्र ह्या हककतीच्या वैविध्यावरून उत्तम प्रकारे निदर्शनास येते. धन्याची ही बिनतोड दुरवस्था जेव्हा बरोबर आणिलेल्या सरदारांना व तीन हजार स्वारांना कळली, तेव्हा त्यांचे व मुस्ताफाखानाच्या सैन्याचे भांडण झाले. त्यात बरेच सामान मुस्तफाच्या हाती लागले. परंतु स्वार व सरदार बंगळूरकडे निसटून गेले. मुस्ताफाखानाने शहाजीची रवानगी विजापुरास केली आणि एका जुनाट शत्रूचा व यशस्वी वीराचा उच्छेद केला म्हणून आनंद मानिला. विज्यापुरास शहाजी नजरकैदेत होता.

४२. वडिलांचे हे वर्तमान बंगळुरास संभाजीराजास कळताच, त्याने आपला सर्व फौजफाटा व जंगी तोफखाना घेऊन मुस्तफाखानाच्या ताब्यातील तालुक्यास व ठाण्यास उपद्रव देण्यास सुरुवात केली. तो उपद्रव मुस्तफाखानास आटोपता आटपेना. एवढ्यानेच मुस्तफाखानाच्या मागील पीडा संपली असे नाही. चित्रकलचा नायक बिच्चकती भरमा नावाचा मोठा शूर संस्थानिक होता. त्याचा आणि आदिलशहाचा उभा दावा असे. त्याने उठावणी करण्यास हीच संधी साधिली. तो तीन हजार घोडेस्वारांचा मालक असे. तो इतका संपत्तिमान असे की, त्याच्या तरवारीचे म्यान सोन्याचे असे व त्याच्या स्वारांच्या तरवारींची

म्याने रुप्याची असत. ह्या तीन हजार स्वारांखेरीज त्याचे पायदळही जबरदस्त होते. चित्रकलच्या प्याद्यांची साऱ्या कर्नाटकात कजाख म्हणून ख्याती असे. भरम्याने आदिलशहाचा मुलूख लुटीत लुटीत खुद्द विजापूरची पेठ लुटली. संभाजी व भरमा यांच्या बंडाळीने कर्नाटकात दंग्यांची व धोप्यांची इतकी गर्दी झाली की, शहाजीला पकडल्याने गांधीलमाश्यांचे मोहोळ सुटल्याचा भास, नव्हे अनुभव महमदशहास आला ! म्हैसूर प्रांतांतील आदिलशाही अंमल बहुतेक उठल्यासारखा झाला. संभाजीप्रमाणेच शिवाजीनेही वडिलांच्या अपमानकारक बंधाची वार्ता ऐकताच आदिलशाही मुलखावर चाल केली. तिचा प्रतिकार करण्याकरिता, महमदशहाने बल्लाळ बेडर, फत्तेखान व मुसेखान हे तीन सरदार शिवाजीवर शक १५७० च्या आश्विनात रवाना केले. शिवाजी पुरंधर किल्ल्याच्या आश्रयाने होता. त्या किल्याचा जावता घेण्याचे काम फत्तेखान व मुसेखान यांनी घेऊन त्यांनी बल्लाळ बेडराकडे शिरवळचा भुईकोट सर करण्याची कामगिरी दिली. त्याप्रमाणे बेडराने येऊन शिरवळचे ठाणे काबीज केले. शिवाजीचा सरदार भिवराव शिरवळच्या आसपास होता. त्याने शिरवळच्या ठाण्याचे जसे रक्षण करावे तसे केले नाही. ते न आवडून, भिवरावास आल्या पावलाने परतून शिरवळचे ठाणे परत घेण्याचा शिवाजीने हुकूम केला. पुरंधराहून त्याच पावली दक्षिण दरवाज्याने निघून, तीन कोस पलीकडे असलेले शिरवळचे ठाणे भिवरावाने मोर्चे लावून परत काबीज केले. त्या वेळी जी कत्तल झाली तीत बल्लाळ बेडर मारिला गेला. इकडे फत्तेखान व मूसेखान यांनी पुरंधरावर हल्ला चढविला तो शिवाजीने परतवून लाविला तेव्हा इरेस चढून, फत्तेखान व मूसेखान हे पुनः संधी साधून किल्ल्याच्या दरवाजाला येऊन भिडले. ह्या ऐन बाणीच्या प्रसंगी शिवाजी काही निवडक लोकांसह किल्ल्याच्या बाहेर पडला व हल्ला करणाऱ्या शत्रूच्या लोकास त्याने स्वतः मारून कहाडून दिले. त्या खणाखणीत मुसेखानप्राणास मुकला व फत्तेखान जीव घेऊन पळाला. फत्तेखान व मूसेखान यांच्या दुर्दशेची वार्ता ऐकून, महमद आदिलशहाचे धाबेच दणाणले.

संभाजी व भरमा यांनी कर्नाटकात दंगल उडवून दिली आणि शिवाजीने पुणे प्रांतात धुडगूस घातला, त्यामुळे महमदशहा अतीच गांगरून गेला. इतक्यात त्याला अशी बातमी लागली की, शिवाजीने शहाजहानाशी संधान बांधिले आहे व त्याच्या साह्याने तो आदिलशाही मुलखावर स्वारी करणार आहे. ह्या वार्तेने तर महमदशहाच्या तोंडचे पाणीच पळाले. शहाजहानला महमदशहा अती भिई. महमदशहा आपणा स्वतःला शहाजहानाचा मांडलीक म्हणवी. त्याच्याशी दोन हात करण्याचे महमदशहाच्या स्वप्नीही नसे. काही थोडेसे औद्धत्य मनातल्या मनात तो शहाजहानाविषयी बाळगी, परंतु ते कर्नाटकातील बलिष्ठ सरदार जो शहाजी त्याच्या जोरावर. त्या शहाजीला तर महमदशहा दुखवून बसला. त्या अपमानाचा सूड घेण्याकरिता शहाजीच्या दोघा पराक्रमी पुत्रांनी दोन्हीकडून शस्त्रे उपशिली. इतक्यात शक

१५७० च्या मार्गशीर्षांत ज्याच्या बदसल्ल्याने महमदशहाने मूर्खपणाने शहाजीची इज्जत घेतली तो कपटी व बेवकूफ मुस्तफाखान एकाएकी मरण पावला. मरता मरता शहाजीवर चांगली नजर ठेवा, असे सांगून त्याने प्राण सोडिला ! मुस्तफाखान मेल्यावर आता आपल्याला कोणीहीं जबरदस्त वाली राहिला नाही हे पक्के ध्यानात उतरून व सर्व जग आपल्यावर उलटले आहे हे लक्षात घेऊन महमदशहा शहाजीराजाशी नरम गोष्टी करू लागला. तुमच्याकडे काहीही अपराध नाही, तुम्हाला धरण्याचा मी हुकूम दिला नव्हता, फक्त दरबारी एकदा येऊन जा म्हणून मुस्ताफाखानाला निरोप पोहोचविण्यास सांगितले होते, त्याने बेवकूफपणाने तुम्हाला अटक केली, आता दिल सफा करून तुम्ही आपल्या दोघा पुत्रांना आवरून धरा आणि आपल्या जहागिरीवर सुखरूप अंमल करा–अशी गोड, मऊ व नरम भाषा महमदशहा वापरू लागला. महमदशहाने शहाजीस शेवटी अशी विनंती केली की, राजे हो, कृपा करून (१) संभाजीला थोपवून धरा. (२) शिवाजीने जो आदिलशाही प्रांत घेतला असेल तो त्याजकडून आम्हाला परत आणून द्या आणि (३) चित्रकलच्या भरम्याला गप्प बसवा. पैकी पहिले व तिसरे कलम शहाजीने मान्य केले. दुसऱ्या कलमाचा मात्र जिम्मा घेण्याचे त्याने पत्करिले नाही. त्याने पूर्वी अनेकवेळा जे सांगितले होते तेच याहीवेळी सांगितले की, शिवाजी हा माझ्या कह्यात नाही व तो आपले ऐकेल किंवा न ऐकेल याची खात्री देता येत नाही. तरी पण, महमदशहाने शहाजीवर शिवाजीला वळणावर आणण्याची कामगिरी लादलीच. लवाजिमा देऊन महमदशहाने शहाजीची सुटका शक १५७१ च्या ज्येष्ठ शुद्ध पूर्णिमेस कोंडाण्यास म्हणजे सिंहगडास आणून केली. विजापूरच्या विज्यापुरास सुटका न करिता सिंहगडास आणून सुटका करण्यात हेतू दोन होते. शहाजीसारख्या प्रबळ व डोईजड सरदारालाही आपण शिक्षा कशी देऊ शकतो हे साऱ्या महाराष्ट्र देशास कळावे हा एक हेतू आणि बापलेकांच्या भेटीत शिवाजीला शहाजीची आतून फूस कितपत होती ते कळून यावे हा दुसरा हेतू. दोन्ही हेतू दुर्बल व खुळेपणाचे दर्शक होते हे सांगावयास नकोच. आदिलशाही सामर्थ्य किती आहे हे जाणते लोक जाणतच होते आणि बाप–लेकांच्या प्रत्यक्ष भेटीत शहाजीचा अंतरात्मा उघड नजरेस येईल ही आशा व्यर्थ होती. शहाजी मुस्तफाखानाला न जुमानता मुखत्यारीने वागू लागला. शहाजीला बंधमुक्त केल्यावर त्याच्या दोन्ही पुत्रांनी शस्त्रे उपशिली व शहाजहानाशी संविधान बांधिले. या उघड उघड कृत्यांनी शहाजीची मनोरचना कोणत्या प्रकारची आहे हे स्पष्ट कळण्यासारखे असून त्याबद्दल वाटाघाट व शोध करीत बसण्याचे कारणच नव्हते. शहाजी, संभाजी व शिवाजी यांना तेथल्या तेथे जमीनदोस्त करून टाकणे हाच राजकीयदृष्ट्या सीधा मार्ग होता, परंतु जमीनदोस्त करण्याचे सामर्थ्य आदिलशहाच्या ठायी बिलकूल नव्हते. सबब दुखविलेल्या शहाजीला शिवाजीशी शिष्टाई करण्यास महमदशहाने विनंती केली ! त्या विनंतीचा परिणाम जो व्हाव-

याचा तोच झाला. शहाजीने शिवाजीशी बोलण्यात दोन भाषा वापरिल्या. चार लोकांसमक्ष बोलताना आदिलशहाशी चाकर या नात्याने प्रामाणिकपणे वागावे म्हणून तो शिवाजीस उपदेश करी व एकांतात आदिलशहा आणि मोगल यांच्याशी वेळ पडल्यास कालदेशवर्तमान पाहून दोन हात करण्यास चुकू नये म्हणून स्वच्छ सल्ला देई (जेधेशकावली). ही असली शिष्टाई करून शहाजी विज्यापुरास शहाला भेटून बंगळूरप्रांती शक १५७१ च्या पावसाळ्यात परत गेला.

४३. येथे शहाजीच्या चरित्राचा तिसरा भाग संपला. शक १५६८ त शहाजी आदिलशाही मनसबदार बनल्यापासून तो शक १५७१ त बंधमुक्त होऊन बंगळूरात स्वस्थापन्न होई तावत्काळपर्यंतची जी बारा वर्षे गेली त्यात महमदशहाचा ढिलेपणा, आदिलशहाचा कमकुवतपणा, मुरारपंताचा खून, बड्या साहेबीणीची स्त्री–नायकी, मुस्तफाखानाचा कपटी स्वभाव, इत्यादि चमत्कार पहात पहात शहाजी शिरजोर बनून आदिलशहाला डोईजड झाला. ह्यावेळी शहाजीचे वय सुमारे ५५ असून त्याचे दोघे मलगे कर्तेसवर्ते झाले होते. पूर्वी निजामशाहीत असताना मलिकंबर, फत्तेखान आणि शहाजहान यांच्याशी शहाजीला एकट्याला झुंजावे लागले. आता आदिलशाहाशी झगडताना त्याला त्याच्या दोन कर्त्या पुत्रांचे अकृत्रिम साह्य मिळू लागले. त्यामुळे जो मामला त्याला निजामशाहीत साधिता आला नाही, तो त्याला आदिलशाहीत सिद्ध करता आला. शहाजी एथून पुढे बंगळूर प्रांतात बहुतेक स्वतंत्र राजा बनला आणि आदिलशाहाची त्याजवरील साहेबकी फक्त नाममात्र उरली. जयराम म्हणतो की, शहाजीराजासारखे प्रस्थ कर्नाटकात असल्यामुळे, आदिलशाही काही मोगलांच्या तडाख्यातून जिवंत राहिली. भीमेच्या दक्षिणेस ह्याकाली शहाजीराजाएवढा वजनदार आणि सामर्थ्यवान असा दुसरा पुरुष तत्कालीन शहांत, राजांत किंवा मुत्सद्द्यांत कोणीही नव्हता. भीमेच्या उत्तरेस किंवा जयराम म्हणतो त्याप्रमाणे नर्मदेच्या उत्तरेस शहाजहान व दक्षिणेस शहाजी भरतखंडाची राजकीय शांतता करीत होते. तात्पर्य शहाजी म्हणेल ती पूर्व दिशा, असा मन शक १५७१ त दक्षिणेत प्रवर्तित झाला आणि तो शहाजीच्या मृत्यूपर्यंत म्हणजे शक १५८५ पर्यंत चालला. त्यापुढे शिवाजीचा जगप्रसिद्ध मनू दक्षिणेत सुरू झाला.

४४. शक १५७१ त बंगळूरास गेल्यावर महमदशहास दिलेल्या वचनाप्रमाणे संभाजीला त्याने थोपवून धरले, आणि चित्रकलच्या भरम्यावर स्वारी केली. (१५७१). शहाजी राजा चित्रकलला जाऊन थडकला. तेव्हा भरमा माशाची शिकार करीत होता. शहाजी आला ही वार्ता कळताच तो स्वार झाला व आपल्या सैन्यानिशी शहाजीवर धावून गेला. त्या धडकीत शहाजीच्या हातून भरम्यास गती मिळाली भरम्याची सर्व बिरुदे आणि बाडबिछायत शहाजीने जप्त करून आदिलशहाकडे विज्यापूरास येऊन गुदरली. अदिलशहाने ती सर्व शहाजीस बक्षीस दिली तेव्हापासून तंजावरचे भोसले ती बिरुदे वापरू लागले भरम्यावरील ही स्वारी

संपल्यावर शहाजी राजाला महमदशाहाने विजापुरासच चार वर्षे मोठ्या इतमा-
माने ठेवून घेतले. अंतस्थ हेतू असा की, कर्नाटकात जाऊन सूड घेण्याच्या इराद्याने त्याने स्वतंत्र राज्याची स्थापना करू नये आणि आपला बाप ओलीस असल्याची जाणीव जागृत राहून शिवाजीने जास्त बंडाळी माजवू नये. खुद्द विजापुरासच शहाजी राहिल्यामुळे शिवाजीचा आणि शहाजीचा कोणताही व्यवहार घडल्यास तो उमगून येण्यास सुलभ पडावे हाही एक हेतू होताच. शेवटी ह्या चार वर्षांत महमदशाहाची पक्की खात्री झाली की, शहाजी व शिवाजी यांचा पत्रोपत्रीही संबंध नसून शिवाजी शहाजीच्या सल्ल्याने बिलकूल वागत नाही. तत्रापि शहाजी ओलीस पडल्यासारखा झाल्याने शिवाजीने ह्या चार वर्षात आदिलशाही मुलुखाला म्हणण्यासारखा स्पर्श केला नाही. येणेप्रमाणे शिवाजीचा थोडाबहुत बंदोबस्त झाला व पुण्याकडील पीडा शमल्यासारखी दिसली, तो शहाजीच्या गैरहजेरीचा फायदा घेऊस कर्नाटकातील पाळेगारांनी बंडाळी मांडल्याच्या खबरीवर खबरी येऊ लागल्या. लहानसहान मुसलमानी सरदार ठिकठिकाणी होते. त्यांच्या आपसातील वैमनस्यामुळे ही बंडाळी आटोक्यात येईना. इतक्यात कुतुबशहाचा मुख्य वझीर जो मीर जुमला तो आदिल-शाही प्रांतात शिरल्याची वार्ता आली. मीर जुमला म्हणजे त्याकाळचे एक बडे प्रकरण होते. हा जातीचा इराणी असून शक १५५२ च्या सुमारास दक्षिणेत आला. जवाहिऱ्याच्या धंद्यावर याने खूप संपत्ती मिळविता मिळविता युक्तिकौशल्याने हा कुतुबशहाचा मुख्यवजीर झाला. ह्याने कुतुबशाही हद्द गंडीकोट्टचा दुर्भेद्य किल्ला घेऊन अर्काटापर्यंत वाढविली. ह्याच्या तैनातीस पाचहजार घोडेस्वार व वीस हजार पायदळ असे. ह्या सैन्याच्या जोरावर त्याने पूर्वकर्नाटक जिंकले. इतकेच नव्हे तर जिंकलेल्या प्रांताचा हा बहुतेक स्वतंत्र नबाब झाला व आपला धनी जो कुतुबशहा त्याला धाब्यावर बसवू लागला. तात्पर्य, आदिलशाही राज्यात जी पदवी शहाजी राजाने कमाविली होती तीच पदवी मीर जुमल्याने कुतुबशाही राज्यात साधिली. तीनशे मैल लांब आणि पन्नास मैल रुंद इतक्या विस्तीर्ण प्रदेशावर ह्याचे राज्य पसरले असून त्याची हद्द शहाजीच्या बंगळूरच्या राज्याला येऊन भिडली. नंतर ती हद्द सरकत सरकत आदिलशाही प्रांतात घुसली. अर्थात् भांडण उपस्थित झाले. त्याला तोंड देण्यास त्याच्याहूनही सवाई असा खंदा सरदार पाठविणे जरूर; करता शहाजी राजाची रवानगी तिकडे झाली. आपल्या जहागिरीची तसनस होऊनये, म्हणून शहाजीला ह्या मोहिमेची सरदारी पत्करणे इष्टच होते. शिवाय कर्नाटकची हवालदारी कायमची पत्करल्यासारखी स्थिती शहाजीची गेली दहा वर्षे झालीच होती. कर्नाटकात कोणतीही मोहीम होवो; तीत प्रायः शहाजी शक १५५९ पासून असेच असे. शहाजीला पाठविण्यात महमदशहाचा अंतस्थ हेतू असा होता की, मीर जुमल्यासारख्या जबरदस्ताशी सामना करण्यात शहाजी प्राणसंकटी पडला किंवा पराभूत झाला तर आपल्या अस्तनीतील केवळ आगच विझली. शहाजी बंगळूर-

प्रांतात जाऊन पाहतो तो त्याच्या नजरेस असे आले की, बिदनूरच्या डोंगराळ मुलखातील शिवाप्पा नाईक, पेनगोंड्याचा राजा रायल, तसाच अल्लमगडचा नायक, वगैरे पाळेगार उठले असून, उपद्व्यापी व संपत्तीच्या मदाने धुंद झालेला मीर जुमला खुद्द बंगळूर प्रांताचा काही भाग बळकावून बसला आहे. तेव्हा सर्वांत विशेष प्रबळ असा जो मीर जुमला त्याचा समाचार शहाजीने प्रथम घेतला. जयराम लिहितो की शहाजीने मीर जुमल्याची इतकी पराकाष्ठेची दुर्दशा उडवून दिली की, थकून व रंजीस येऊन तो जवाहिऱ्या धड लढेही ना, धड आडकाठीही करीना किंवा धड खडा राहून भिडेही ना. एक पळण्याचा तेवढा धडा जुमला जेरीस येऊन गिरवीत बसला. शेवटी दे माय धरणी ठाय अशी हबेलंडी होऊन, जुमला शहाजीचे रट्टे खात खात गुत्तीच्या किल्ल्यात शिरला. तेव्हा शहाजीने वेढा देऊन चोहोबाजूंनी रस्ता बंद केला. शेवटी दाती तृण धरून जुमला एकदाचा शहाजी सांगेल तो तह करण्यास राजी झाला. ह्या युद्धात हत्ती, घोडे, तोफा, वगैरे जुमल्याचा सर्व जंगी सरंजाम शहाजीच्या हाती लागून शिवाय जडजवाहीर वगैरेही शहाजीस बरेच मिळाले. जुमला शहाजीस पेषकस म्हणजे खंडणी व लढाईचा खर्च देण्यास तयार झाला. ह्या युद्धाचा असा परिणाम झाला की, कुतुबशहा किंवा त्याचा कोणी सरदार यांनी पुनः कर्नाटकात तोंड दाखविले नाही की पुनः पाऊल म्हणून घातले नाही. पूर्वसमुद्रापर्यंत सारे कर्नाटक शहाजीच्या चरणी मिलिंदायमान झाले. मीर जुमला हिंदुस्थानातील व हिंदुस्थानाबाहेरील सर्व मोठमोठ्या दरबारात प्रसिद्ध असून, त्याचा धुव्वा शहाजीने उडविला ही बातमी जेव्हा शहरोशहरी व प्रांतोप्रांती पसरली तेव्हा शहाजीच्या सामर्थ्याची बडेजाव चोहीकडे झाली. जयराम लिहितो, ह्या पराक्रमाने शहाजीचे नाव सेतुबंधरामेश्वरापासून रूमशामपर्यंत ज्याच्या त्याच्या तोंडी निघू लागले. जुमल्यासारख्या तोलदार सरदाराची ही दुर्दशा उडालेली पाहून शहानशहा जो शहाजहान तोही दचकला, महमद आदिलशहा तर मनातल्या मनात खजील होऊन गेला. मीर जुमल्यावर जय मिळून आदिलशाहीचा दबदबा राहिला, या विचाराने यद्यपि त्यास आनंद झाला, तत्रापि शहाजीचा बोलबाला अंदाजाबाहेर झालेला पाहून तो अतिशय विषण्ण होऊन गेला. शहाजीने विजापुरचे नाव राखिले, शहाजीच्या पराक्रमाने आदिलशाहीचे रक्षण झाले, वगैरे गौरवाची भाषा तो वापरी, पण त्या भाषेत तथ्य केवढे थोरले भरले आहे हे मनात येऊन, त्याला शहाजीचे भय वाटे.

४५. शक १५७५ च्या कार्तिकमार्गशीर्षात जुमल्याची वाताहात केल्यावर शहाजीने कर्नाटकातील चिल्लर संस्थानिकांकडे लक्ष दिले. विजयनगरच्या रायलूने रामराव नावाचा वकील औरंगझेबाकडे मदतीकरिता पाठविला असून, त्याने प्रांतात स्वतः बहुत बंडाळी आरंभिली होती. त्याचा शहाजीने जंतकल येथे पराभव केला आणि पेनकोंडा, कर्नुळ, वेल्लोर, कपली, वगैरे पूर्वेकडील प्रांत काबीज केले.

संपल्यावर शहाजी राजाला महमदशाहाने विजापुरासच चार वर्षे मोठ्या इतमा-
माने ठेवून घेतले. अंतस्थ हेतू असा की, कर्नाटकात जाऊन सूड घेण्याच्या इराद्याने त्याने स्वतंत्र राज्याची स्थापना करू नये आणि आपला बाप ओलीस असल्याची जाणीव जागृत राहून शिवाजीने जास्त बंडाळी माजवू नये. खुद्द विजापुरासच शहाजी राहिल्यामुळे शिवाजीचा आणि शहाजीचा कोणताही व्यवहार घडल्यास तो उमगून येण्यास सुलभ पडावे हाही एक हेतू होताच. शेवटी ह्या चार वर्षांत महमदशाहाची पक्की खात्री झाली की, शहाजी व शिवाजी यांचा पत्रोपत्रीही संबंध नसून शिवाजी शहाजीच्या सल्ल्याने बिलकूल वागत नाही. तत्रापि शहाजी ओलीस पडल्यासारखा झाल्याने शिवाजीने ह्या चार वर्षात आदिलशाही मुलुखाला म्हणण्यासारखा स्पर्श केला नाही. येणेप्रमाणे शिवाजीचा थोडाबहुत बंदोबस्त झाला व पुण्याकडील पीडा शमल्यासारखी दिसली, तो शहाजीच्या गैरहजेरीचा फायदा घेऊस कर्नाटकातील पाळेगारांनी बंडाळी मांडल्याच्या खबरीवर खबरी येऊ लागल्या. लहानसहान मुसलमानी सरदार ठिकठिकाणी होते. त्यांच्या आपसातील वैमनस्यामुळे ही बंडाळी आटोक्यात येईना. इतक्यात कुतुबशहाचा मुख्य वझीर जो मीर जुमला तो आदिल-शाही प्रांतात शिरल्याची वार्ता आली. मीर जुमला म्हणजे त्याकाळचे एक बडे प्रकरण होते. हा जातीचा इराणी असून शक १५५२ च्या सुमारास दक्षिणेत आला. जवाहिऱ्याच्या धंद्यावर याने खूप संपत्ती मिळविता मिळविता युक्तिकौशल्याने हा कुतुबशहाचा मुख्यवजीर झाला. ह्याने कुतुबशाही हद्द गंडीकोट्टचा दुर्भेद्य किल्ला घेऊन अर्काटापर्यंत वाढविली. ह्याच्या तैनातीस पाचहजार घोडेस्वार व वीस हजार पायदळ असे. ह्या सैन्याच्या जोरावर त्याने पूर्वकर्नाटक जिंकले. इतकेच नव्हे तर जिंकलेल्या प्रांताचा हा बहुतेक स्वतंत्र नबाब झाला व आपला धनी जो कुतुबशहा त्याला धाब्यावर बसवू लागला. तात्पर्य, आदिलशाही राज्यात जी पदवी शहाजी राजाने कमाविली होती तीच पदवी मीर जुमल्याने कुतुबशाही राज्यात साधिली. तीनशे मैल लांब आणि पन्नास मैल रुंद इतक्या विस्तीर्ण प्रदेशावर ह्याचे राज्य पसरले असून त्याची हद्द शहाजीच्या बंगळूरच्या राज्याला येऊन भिडली. नंतर ती हद्द सरकत सरकत आदिलशाही प्रांतात घुसली. अर्थात् भांडण उपस्थित झाले. त्याला तोंड देण्यास त्याच्याहूनही सवाई असा खंदा सरदार पाठविणे जरूर; करता शहाजी राजाची रवानगी तिकडे झाली. आपल्या जहागिरीची तसनस होऊनये, म्हणून शहाजीला ह्या मोहिमेची सरदारी पत्करणे इष्टच होते. शिवाय कर्नाटकची हवालदारी कायमची पत्करल्यासारखी स्थिती शहाजीची गेली दहा वर्षे झालीच होती. कर्नाटकात कोणतीही मोहीम होवो; तीत प्राय: शहाजी शक १५५९ पासून असेच असे. शहाजीला पाठविण्यात महमदशहाचा अंतस्थ हेतू असा होता की, मीर जुमल्यासारख्या जबरदस्ताशी सामना करण्यात शहाजी प्राणसंकटी पडला किंवा पराभूत झाला तर आपल्या अस्तनीतील केवळ आगच विझली. शहाजी बंगळूर-

प्रांतात जाऊन पाहतो तो त्याच्या नजरेस असे आले की, बिदनूरच्या डोंगराळ मुलखातील शिवाप्पा नाईक, पेनगोंडचाचा राजा रायल, तसाच अल्लमगडचा नायक, वगैरे पाळेगार उठले असून, उपद्व्यापी व संपत्तीच्या मदाने धुंद झालेला मीर जुमला खुद्द बंगळूर प्रांताचा काही भाग बळकावून बसला आहे. तेव्हा सर्वात विशेष प्रबळ असा जो मीर जुमला त्याचा समाचार शहाजीने प्रथम घेतला. जयराम लिहितो की शहाजीने मीर जुमल्याची इतकी पराकाष्ठेची दुर्दशा उडवून दिली की, थकून व रंजीस येऊन तो जवाहिऱ्या धड लढेही ना, धड आडकाठीही करीना किंवा धड खडा राहून भिडेही ना. एक पळण्याचा तेवढा धडा जुमला जेरीस येऊन गिरवीत बसला. शेवटी दे माय धरणी ठाय अशी हबेलंडी होऊन, जुमला शहाजीचे रट्टे खात खात गुत्तीच्या किल्ल्यात शिरला. तेव्हा शहाजीने वेढा देऊन चोहोबाजूंनी रस्ता बंद केला. शेवटी दाती तृण धरून जुमला एकदाचा शहाजी सांगेल तो तह करण्यास राजी झाला. ह्या युद्धात हत्ती, घोडे, तोफा, वगैरे जुमल्याचा सर्व जंगी सरंजाम शहाजीच्या हाती लागून शिवाय जडजवाहीर वगैरेही शहाजीस बरेच मिळाले. जुमला शहाजीस पेषकस म्हणजे खंडणी व लढाईचा खर्च देण्यास तयार झाला. ह्या युद्धाचा असा परिणाम झाला की, कुतुबशहा किंवा त्याचा कोणी सरदार यांनी पुन: कर्नाटकात तोंड दाखविले नाही की पुन: पाऊल म्हणून घातले नाही. पूर्वसमुद्रापर्यंत सारे कर्नाटक शहाजीच्या चरणी मिलिंदायमान झाले. मीर जुमला हिंदुस्थानातील व हिंदुस्थानाबाहेरील सर्व मोठमोठ्या दरबारात प्रसिद्ध असून, त्याचा धुव्वा शहाजीने उडविला ही बातमी जेव्हा शहरोशहरी व प्रांतोप्रांती पसरली तेव्हा शहाजीच्या सामर्थ्याची बडेजाव चोहीकडे झाली. जयराम लिहितो, ह्या पराक्रमाने शहाजीचे नाव सेतुबंधरामेश्वरापासून रूमशामपर्यंत ज्याच्या त्याच्या तोंडी निघू लागले. जुमल्यासारख्या तोलदार सरदाराची ही दुर्दशा उडालेली पाहून शहानशहा जो शहाजहान तोही दचकला, महमद आदिलशहा तर मनातल्या मनात खजील होऊन गेला. मीर जुमल्यावर जय मिळून आदिलशाहीचा दबदबा राहिला, या विचाराने यद्यपि त्यास आनंद झाला, तत्रापि शहाजीचा बोलबाला अंदाजाबाहेर झालेला पाहून तो अतिशय विषण्ण होऊन गेला. शहाजीने विजापुरचे नाव राखिले, शहाजीच्या पराक्रमाने आदिलशाहीचे रक्षण झाले, वगैरे गौरवाची भाषा तो वापरी, पण त्या भाषेत तथ्य केवढे थोरले भरले आहे हे मनात येऊन, त्याला शहाजीचे भय वाटे.

४५. शक १५७५ च्या कार्तिकमार्गशीर्षात जुमल्याची वाताहात केल्यावर शहाजीने कर्नाटकातील चिल्लर संस्थानिकांकडे लक्ष दिले. विजयनगरच्या रायलूने रामराव नावाचा वकील औरंगझेबाकडे मदतीकरिता पाठविला असून, त्याने प्रांतात स्वत: बहुत बंडाळी आरंभिली होती. त्याचा शहाजीने जंतकल येथे पराभव केला आणि पेनकोंडा, कर्नुळ, वेल्लोर, कपली, वगैरे पूर्वेकडील प्रांत काबीज केले.

पेनकोंड्याच्या स्वारीत नबाब इखलासखान शहाजीच्या बरोबर होता. परंतु शहाजीच्या सूर्यप्रकाशापुढे त्याच्या दिवटीचे तेज फारसे पडले नाही. नंतर १५७६ च्या वैशाखज्येष्ठात अल्लमगड काबीज करून शहाजीने फिरंग्यांच्या गोवाप्रांतावर स्वारी केली. आणि तेलीचेरीपर्यंत दौड करून बहुतेक सर्व कर्नाटक आपल्या अमलाखाली पूर्ववत् आणिले. ह्या वेळी त्याच्याजवळ साठसत्तर हजार फौज होती असे जयराम लिहितो. एणेप्रमाणे कर्नाटक मोकळे केल्यावर शहाजी बहुतेक स्वतंत्र राजाप्रमाणे राहू लागला. त्याच्या दरबाराच्या थाटाचे वर्णन जयरामाने केलेले मागे दिलेच आहे. शहाजीचे प्रस्थ इतके बेसुमार वाढलेले पहाण्यास ह्या पुढे महमद आदिलशहा फार वर्षे जगला नाही अलीकडील दोन वर्षांत तो दुखण्याने अंथरुणावर पडूनच होता. शक १५७७ त शिवाजीने चंद्रराव मोऱ्याला मारून जावळी घेतली. प्रतापगडचा किल्ला बांधिला व पूर्वेकडील आदिलशाही प्रांतावर तो चालून येणार, अशा बातम्या उठल्या. ह्या खबरा येऊन थोडा काळ जातो न जातो तो शक १५७८ त शिवाजीने रायगड व सुपे काबीज केल्याचे वृत्त येऊन थडकले. इकडे कर्नाटकात शहाजीचा पुत्र संभाजी कनकगिरीच्या संस्थानिकाची बंडाळी मोडण्यास शक १५७७ त गेला. त्याच कामगिरीवर अफजलखानही जात होता. अफजलखानाचे व शहाज–संभाजीचे फारा दिवसांचे वाकडे होते. त्याने उचल खाऊन संभाजीचे व अफजलखानाचे कनकगिरीस भांडण झाले. त्यात गोळा लागून संभाजी मरण पावला. त्यामुळे सहजच शहाजीचा राग अफजलखानावर झाला. एणेप्रमाणे पुण्याकडील व बंगळुरकडील काळजी उत्पन्न करणाऱ्या बातम्या एकापाठीमागून एक ऐकून आधीच खंगून गेलेला महमदशहा जास्त थकून शक १५७८ च्या मार्गशीर्षात मरण पावला व इहलोकच्या शारीरिक व राजकीय यातनांचा वारसा आपल्या एकोणीस वर्षांच्या मुलास देता झाला. महमद आदिलशहाच्या कारकीर्दीत, आदिलशाही राज्याचा विस्तार पूर्वीच्या इतर शहांच्या कारकीर्दीतल्याहून दिसण्यात जास्त झालेला दिसतो. उत्तरेस भीमानदीपासून दक्षिणेस त्रावणकोर संस्थानापर्यंत आणि पूर्वेस पूर्वसमुद्रापासून पश्चिमेस पश्चिमसमुद्रापर्यंत जेवढा म्हणून मुलूख आहे तेवढा सर्व आदिलशाही अंमलाच्या नावाखाली शक १५७८ त होता. त्यामुळे वरवर पहाणाऱ्या लेखकाना ही कारकीर्द, विस्तार, शक्ती, ऐश्वर्य, या तीन बाबतींत अत्युच्च कोटीप्रत गेलेली भासते, (जदुनाथकृत औरंगझेबाचा इतिहास), परंतु हा केवळ भास आहे. वस्तुस्थिती अगदी निराळी होती. कारण तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील म्हैसूरप्रांत व कर्नाटक प्रांत शहाजीच्या अमलाखाली बहुतेक स्वतंत्र झाला होता. आणि कृष्णेच्या व भीमेच्या पश्चिमोत्तरीय सर्व प्रांत शिवाजीने सर्वस्वी आक्रमिलेला होता. हे दोन भाग वगळले– आणि ते वगळणे इतिहासदृष्टीने अवश्य आहे– तर बाकी जो प्रांत रहातो त्याचा विस्तार महमदशहाच्या पूर्वीच्या कारकिर्दीतील राज्यविस्ताराहून कमी होता, हे कबूल करणे भाग आहे. हा विस्तार कमी का झाला

ह्या प्रश्नाचे उत्तर कठीण नाही. शक्ती व सामर्थ्य कमी झाले म्हणून विस्तारही संकोच पावला. थडगी, मशिदी, घुमट व रंगमहाल यांत सर्व पैसा चूर होऊन, विजापूर शहरात थोडेसे ऐश्वर्य दिसे. परंतु ते त्या शहारापुरतेच होते. शहराबाहेर सर्व मराठा देश कंगाल व कलाहीन बनून गेला होता. तात्पर्य, महमदशहाच्या कारकीर्दीत आदिलशाहीचा विस्तार, सामर्थ्य व ऐश्वर्य ही उत्तरोतर संकोच पावत होती.

४६. अशी उतरती कळा आदिलशाहीला लागली असता, अल्ली हे भाबडे पोर मसनदीवर आले. त्याला खाऊन टाकण्याला चार नक्र टपून बसले होते. पहिला नक्र शिवाजी, दुसरा नक्र शहाजी, तिसरा नक्र औरंगझेब, व चौथा नक्र अमीरउमराव. ह्या चार नक्रांतून, पहिली कुरापत औरंगझेबाने काढिली. ही औलाद महमदशहाची नव्हे, असा आरोप बिचाऱ्या अल्लीवर औरंगने आणिला. अल्लीशहा औलाद असो, अफलाद असो की नक्कल असो, त्याच्यामुळे औरंगचे कोणते गोत्र बिघडत होते ते देव जाणे ! हा आरोप अल्लीच्या कारभाऱ्यांनी साहजिकच नाकबूल केला. एवढे कारण लढाई पुकारण्याला औरंगझेबासारख्या बीलझिबबला बस झाले. दुसरे सैतान शिवाजी. त्या कज्जेदलालाला हे भांडण निघालेले पाहून केवळ हर्षवायू झाला. नवरा मरो, नवरी चुलीत जावो, दोहीकडून अवदान मारण्यास सवकलेल्या ह्या बुभुक्षिताने दोन्हीकडून आपला डाव साधण्याचा बेत केला. अल्लीशहालाही मदत करण्याचे अभिवचन दिले व औरंगशहाचाही पक्ष उचलला. खबरदारी मात्र अशी ठेविली की, एकाची बातमी दुसऱ्यास न कळे. तिसरे बुढ्ढे मिया शहाजी. ह्या वृद्ध कपींनी, आपण कशातच नाही म्हणून कानावर हात ठेविले. आपले बंगळूर बरे की आपण बरे. शहाजी म्हणजे आज साठसत्तर हजार प्याद्यांचा व घोडयाचा मालक. तो जर अल्लीशहास मिळता, तर औरंगझेबासारख्या टारग्याची बिचाऱ्या अल्लीशहाला बडविण्याची काय माय व्याली होती ? पण ह्यावेळी कर्नाटक सुरक्षित ठेविले पाहिजे व तेथून आपल्याला हलता येत नाही, असा बहाणा ह्या म्हाताऱ्याने केला. आणि तेही खरेच. औरंगझेबाने कर्नाटकातील संस्थानिकांना चिथवून त्यांच्याकडून बंडाळी खरीच माजविली होती. चौथी भुते अल्लीशहाचे अमीरउमराव. ह्यांची तर सर्वांवर कडी. खाल्ल्याघरचे वासे जाळणारे हे शहाणे आपल्या धन्याशी हरामपणा करून, बाहेरच्या चोराला जाऊन मिळाले. अशी सारी वेताळसभा भाबडया अल्लीशहाच्या भोवती कोलिते घेऊन नाचू लागली असता, औरंगझेबाने बेदर शक १५७९ च्या आषाढ शुद्ध तृतीयेस एका खटक्यासरसे हांटले. नंतर कल्याणीही झपाटली. औरंगझेबाने ही बडी शिकार मारिली, तर शिवाजीने तर त्याच्याही वर ताण केली. औरंगझेबाला दिलेल्या वचनाला जागून, औरंगझेबाने बेदर घेण्याच्या अगोदर एक महिना म्हणजे १५७९ च्या वैषाखात आदिलशहाचे जुन्नर लुटून शिवाजी पहिला पंत झाला, आणि एवढयाने औरंगझेब कदाचित खुष

होणार नाही म्हणून त्याच वर्षाच्या आश्विन वद्य द्वादशीस कल्याणभिवंडी हबकून आदिलशाहीचा कोकणातील राज्यभार त्याने हलका केला. औरंगझेबाला दिलेले अभिवचन अक्षरश: पाळीत असता अल्लीशहाशी केलेला करार शिवाजी विसरला नाही. अल्ली आदिलशहाच्या मर्जीखातर शिवाजीने औरंगजेबाच्या अहमदनगर प्रांतातील गावे व खेडी लुटून, खुद्द अहमदनगरास नसीरीखानाशी ऊर्फ नौसिरखानाशी दोन हात करून ते शहर लुटिले. येणेप्रमाणे दोन्ही पक्षांना रिझविण्याच्या कामगिरीत शिवाजी गुंतला असताना शहाजीनेही ह्या नाटकाला रंग आणिला. जदुनाथ सरकारदेखील म्हणतात Shahaji Bhonsla disobeyed his new master and set up for himself. अल्ली आदिलशहा औरंगझेबाने व शिवाजीने असा नागविलेला पाहून, शहाजीनेही त्याच्या नाकाडावर ठोसा चढवून दिला. आणि कर्नाटकातील त्याच्या इस्टेटीचा ताबा घेतला. नाटक असेच काही वर्षे रंगत रहावे व त्यात आपल्याला मनाजोगती सोंगे घेता यावी, अशी शहाजी व शिवाजी यांची इच्छा होती. परंतु, दाराशुकोहची माशी शिंकून लढाई एकदम बंद झाली व तह झाला. त्याने शहाजी व शिवाजी यांना आपल्या बेतांना निराळे स्वरूप द्यावे लागले. तहाने बेदर, कल्याणी, परंडा, निजामशाही कोकण व वांगी महाल, इतक्या प्रांताला आदिलशाही मुकली. पैकी निजामशाही कोकण शिवाजी दाबून बसलाच होता. आता विजापूर प्रांतापासून म्हैसूरच्या उत्तरेकडील तुंगभद्रेपर्यंतचा प्रांत तेवढा आदिलशहाच्या ताब्यात मोंगलांचा मांडलिक म्हणून राहिला. तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील प्रांत शहाजीने कायमचा बळकाविला होताच. महम्मदशहा मेल्यानंतर फक्त एका वर्षात त्याच्या दिखाऊ ऐश्वर्याचे भांडवल फुटून, आदिलशाही दौर्बल्य अगदी उघडकीस आले.

४७. तह झाल्यावर औरंगजेब मसनद मिळविण्याकरिता जो एकदा नर्मदेच्या उत्तरेस गेला तो वीस पंचवीस वर्षे तिकडेच गुंतला. तहानंतर परिस्थिती बदलली म्हणून शिवाजीने आदिलशाहीचे लचके तोडण्याचा आपला नित्याचा उद्योग तसाच चालू ठेविला. आणि शहाजी सुखासमाधानाने कर्नाटकात राज्याराम करू लागला. शक १५८०त श्रीशैलमल्लिकार्जुनप्रांती शहाजीने एकोजीराजास मोहिमेवर पाठविले. एकोजीच्या अंगी संभाजीचे पाणी नव्हते. तो स्वभावाने किंचित् मृदू असून बराच संथ असे त्याने बापाच्या दराऱ्यावर तो प्रांत काबीज केला. जयरामकवी ह्या मोहिमेत एकोजीबरोबर होता ह्या वेळचे शहाजीचे वर्णन करताना जयराम लिहितो की, कधी डोंगराळ प्रांतातील संस्थानिकावर लहानसहान मोहिमा करण्यात, कधी अरण्यात शिकार खेळण्यात व कधी विद्वान लोकांशी व विश्वासातील मुत्सद्द्यांशी सुखसंकथा करण्यात त्याचा वेळ जाई. १५८० त शहाजीची उमर साठीच्या पलीकडे गेली असून, त्याच्या आयुष्याची इतिकर्तव्यता बहुतेक संपल्यासारखी झाली होती, स्वतंत्र राज्य करण्याचा फार दिवसांचा हेतू बहुतेक सफल

झाला होता, आणि हरिहरि म्हणत ईश्वरचिंतनात राहिलेले आयुष्य घालविण्याची सोय त्याने कमावून ठेविली होती. गेल्या साठ वर्षांतील आपल्यावर आलेले प्रसंग, आपण केलेल्या स्वाऱ्या व मोहिमा, आपण लढविलेल्या युक्त्या व डावपेच, तत्कालीन राजपुरुष, मुत्सद्दी व योद्धे इत्यादींच्या कर्तबगाऱ्या व गुणदोष वगैरेंची इत्थंभूत वर्णने करण्यात त्याला सौख्य वाटे. तत्रापि राज्यकारभाराकडे त्याचे दुर्लक्ष नसे. स्वारीशिकारीचा प्रसंग आल्यास, त्यावर तो स्वतः जाई. जन्मल्यापासून गेल्या साठ-बासष्ठ वर्षात त्याला फुरसत व विश्रांती अशी फक्त दोनदा सापडली. १५७१ त महमदशहाने विजापुरास ओलीस ठेवून घेतले तेव्हा बळजबरीची आणि आता येणारी ही आपखुषीची. शक १५८०, १५८१, व १५८२ ही तीन साले त्याची प्रायः स्वस्थतेची व आरामाची गेली. ह्या अवधीत शिवाजीने जें अद्भुत चमत्कार केले ते लक्ष लावून पाहण्यात तो गुंग असे. प्रसंगी सल्ला द्यावीशी वाटल्यास तो शिवाजीकडे आपल्या दरबारातील मुत्सद्दीही पाठवी. शक १५७५ त मोरो त्रिमळ पिंगळे यास त्या वर्षाच्या घडामोडीत कोणते धोरण ठेवावे ते सांगून त्याने पाठविले होते. असाच एक प्रसंग शक १५८३ त उद्‌भवला. त्या साली चैत्रात शहाजी आरणी, पोर्टो नोव्हो, वगैरे प्रांतावरील स्वारीत गुंतला होता. त्या वेळी त्याला अशी बातमी लागली की, औरंगझेब गृहकलहातून नुकताच मोकळा झाला आहे. व बंगालच्या सुभेदारीवर असलेला उपद्व्यापी मीर जुमला आदिलशाही व कुतुबशाही खालसा करण्याचा आग्रह त्याला करीत आहे. शक १५७९ त ही दोन राज्ये औरंगझेबाला खालसा करता आली नव्हती. त्याचे वरकरणी कारण मुसुलमान इतिहासकार असे देतात की, शहाजहान व दारा शुकोह औरंगझेबाच्या आड आले. परंतु खरे कारण असे होते की,आदिलशाहीला विशेष प्राणघातक धक्का बसण्याचा रंग दिसल्यास, साठ सत्तर हजार फौजेचा स्वस्थ बसलेला मालक जो शहाजी तो स्वसंरक्षणार्थ जागा होऊन त्याच्याशी झुंझ पडेल ही भीती वृद्ध व अनभवी शहाजहानास होती. ती भीती व तो संशय तरुण व सापेक्षतेने अल्पानुभवी औरंगझेबाला नसल्यामुळे औरंगझेब विजापूर व गोवळकोंडा खालसा करण्याच्या गोष्टी त्यावेळी बोलत होता. आता, चार पाच वर्षे लोटल्यानंतर, शहाजहान व दारा शुकोह यांचा अडथळाही नाहीसा झाल्यामुळे व शहाजीही औरंगझेब व मीर जुमला यांच्या मते वयातीत होऊन स्वास्थ्यप्रवण बनल्यामुळे, ही दोन संस्थाने गिळंकृत करण्याला फारशी अडचण पडू नये, अशी औरंगझेब व जुमला यांची समजूत होण्याचा संभव होता. औरंगझेबा संबंधाने १५८३ त आलेल्या ह्या संशयाचा इशारा अल्ली आदिलशहाला शहाजीने दिला व त्याला असेही कळविले की, शिवाजीशीही आपला स्नेह करून देता येईल. अल्लीशहाला ही पोक्त सल्ला पसंत पडून शिवाजी व आदिलशहा यांच्यामध्ये ह्यासाली गुप्त तह झाला. शिवाजीने ह्या पाच वर्षात, अफजल मारिला, रुस्तुमजमा व फाजलखान यास कोल्हापूरच्या

युद्धात पराजीत केले, पन्हाळा घेतला, शिद्दी जोहार खाकेत घातला, गदगलक्ष्मेश्वरापर्यंत खंडण्या वसूल केल्या, वासोटा पाडला, निजामपूर लुटले, दाभोळ व प्रभावळी कबजात आणिली, शृंगारपूर नागाविले व औरंगझेबाचा मामा जो शास्ताखान त्याचा हात तोडिला. असे हे चमत्कारावर चमत्कार करणाऱ्या वीरशिरोमणीचे साहाय्य औरंगझेब व मीर जुमला यांच्या स्वारीच्या भयास्तव अल्ली आदिलशहाला हवेच होते. ते शहाजीने मोठ्या युक्तीने मिळवून दिल्याबद्दल अल्ली आदिलशाहाने शहाजीचे आभार मानिले. शिवाजीला ह्या वेळी आदिलशहाशी वैर करणे सोईचे नव्हते. औरंगझेबाने करतलबखान, जामदारखान, नसीरीखान, हुषदारखान, अबदुल मुनीम व शेवटी शाहिस्तेखान, अशा अनेक खानांचे भुंगे शिवाजीवर सोडिले होते. त्यांचा परामर्श घेऊन शिवाय आदिलशाही सरदारांशी झगडत बसणे शिवाजीला जरा जड होऊन गेले होते. तेव्हा तोही ह्या तहाला राजी झाला व आपल्या वडिलांच्या उपकाराचे धन्यवाद गाऊ लागला. ह्या तहात विशेष लक्षात ठेवण्यासारखी बाब अशी की, अल्ली आदिलशहाने शिवाजीकडे चाकरीचा दावा मागण्याचे सोंग बिलकूल न करता बरोबरीचा स्वतंत्र राजा या नात्याने परस्पर कुमकेचा करार केला (शिवदिग्विजय २००). इमानभाष्य व उभयतांच्या जामिनी खातरजमापूर्वक झाल्या. दरसाल सात लक्ष होन रोकड आदिलशहाने शिवाजीस पेषकष द्यावी असेही ठरले. शिवाजीचा वकील शामजी नाईक पुंडे विजापूरदरबारी दोन्हीकडील कामाची विल्हेवाट लावू लागला. विजापूरकरांचा वकील शिजाजीच्या दरबारी नसावा, अशीही अट अल्लीशहाने मान्य केली. अल्लीशहा व शिवाजी या दोघांना त्यांच्या मर्जीप्रमाणे तह करून दिल्यानंतर, शहाजीला शिवाजीच्या राज्यात उघड माथ्याने जाण्यास सुलभ झाले. शक १५५९ त पुणे प्रांताला रामराम ठोकून कर्नाटकात आल्याला शहाजीला १५८३ त चोवीस वर्षे म्हणजे तब्बल दोन तपे होऊन गेली होती. त्याच्या मनात आपल्या जहागिरीचे व जिजाबाईचे व आपल्या नुकत्याच जन्मलेल्या नातवाचे व इष्टमित्रांचे व कुलस्वामी जो शिखरशिंगणापुरचा शंभुमहादेव त्याचे व कुळस्वामिनी जी तुळजापुरची भवानी तिचे दर्शन घ्यावे असा फार दिवसांचा हेतू होता. तो सफल होण्याला हा समय उत्तम आहे असे जाणून, आदिलशहाच्या अनुमतीने शहाजी पुणे प्रांताकडे जाण्यास निघाला. प्रथम तुळजापुरच्या भवानीचे दर्शन घेऊन, तीस वर्षांपूर्वी ज्या प्रदेशात त्याचा काही काल गेला त्या बेदर, आवसे, धारूर, बीड, परंडा वगैरे प्रांतावर तुळजापुरच्या टेकाडावरून नजर फेकून, तो पंढरपुरावरून शिखरशिंगणापुरास गेला. शिखर उतरून आपले संबंधी जे फलटणचे निंबाळकर त्यांना दर्शन देऊन, शहाजी शिवाजीच्या राज्यात शिरला. जेजुरीस भेटीचा बेत ठरला. शिवाजीस घटके घटकेची बातमी होतीच. त्याने शक १५७५ त शहाजीकडून शिवराजाच्या दरबारी आलेल्या मोरो त्रिमळ पिंगळे यास पुढे पाठविले व वडीलांस अत्यंत

समारंभाने वाजतगाजत खंडोबाच्या देवालयात आणून उतरिले. पितापुत्रांच्या भेटीस बारा आणि बारा चोवीस वर्षे होऊन गेलेली, सबब शास्त्रविधीने भेट घेणे प्राप्त झाले. शिवाजीराजे व सौभाग्यादिसंपन्न वज्रचुडेमंडित जिजाई आऊसाहेब व सईबाई व पुतळाबाई आदिकरून खाशी मंडळ संभाजी राजासह आधीच मंदिरात जाऊन शहाजीमहाराजांची मार्गप्रतीक्षा करीत बसली होती. महाराज येताच राजोपाध्ये यांणी श्रीची पूजा यथासांग करवून, सघृत अशा काशाच्या ताटात स्त्री, पुत्र, स्नुषा व पौत्र यांची मुखे शहाजी महाराजांकरवी एकावच्छेदे करून पहाविली. नंतर भेटी झाल्या. शेकडो लढयात हजारो जीवांचा संहार करण्याने ज्यांची अंत:करणे वज्राहूनही कठोर झालेली, त्या पितापुत्रांची मने मोहाने जिंकली जाऊन मेणाहूनही मऊ होऊन गेली. दोघांनाही एकमेकांच्या गतचरित्राची आठवण होऊन, परस्परांविषयी आदरबुद्धी वाटली. नंतर नूतन संपादित राज्यातील राजगड, तोरणा, सिंहगड, पुरंधर, प्रतापगड, विशाळगड, पन्हाळा, रांगणा, इत्यादि गड पहात पहात दोन महिन्यांनी पितापुत्र राजधानी जी रायगड तेथे गेले. रायगडास राजधानी करण्याचा सल्ला शिवाजीस शहाजीराजांनीच कर्नाटकातून मोरोपंत पिंगळयाच्या मुखे सांगून पाठविली होती. ती कुबल जागा तपासून, शहाजी परत पुण्यास आला. तेथील आपण बांधिलेल्या इमारती वगैरे जागांचे अवलोकन करून, तो पुन्हा जेजुरीस खंडोबाचे दर्शन घेऊन कर्नाटकात जाण्यास सिद्ध झाला. शिवाजीचे किल्ले, कोट, ठाणीं, जागा, राजधानी, अठरा कारखाने, शिबंदी, फौज, हत्ती, घोडे, तोफा, वगैरे जंगी सामान पाहून राजे परम संतुष्ट झाले आणि आपली तुळजा नावाची प्रासादिक तरवार त्यांनी शिवाजीस बहाल केली. शहाजी एकंदर सहा महिने शिवाजीच्या राज्यात राहून शक १५८३ च्या अखेर कर्नाटकप्रांतात जाण्यास निघाला. शिवाजी व जिजाबाई शहाजीस पोहोचविण्यास वारणेपर्यंत गेली. निरोप देताना शहाजीने शिवाजीची मन:पूर्वक स्तुती केली. आमच्या वंशात जन्म घेऊन तुम्ही बेचाळीस पिढया उद्धरिल्या, धर्मस्थापना करून वर्णाश्रम पुनरुज्जीवित केले, यवनक्रांत पृथ्वीचे क्लेश निवारण करून जगदंबेचा वर आमच्या प्रत्ययास आणून दिला, वगैरे कर्णमधुर शब्द उच्चारून, शहाजीने शिवाजीस शेवटचा आशीर्वाद दिला, आणि आदिलशहा, औरंगजेब इत्यादी यवनांशी ह्यापुढे कसे वर्तन ठेवावे त्याची वाटाघाट करून कर्नाटकचा रस्ता धरिला.

४८. ह्या दोन महापुरुषांच्या भेटीत काहीतरी व्युह रचिला जात असावा असा संशय औरंगझेबास आला. साठ सत्तर हजार फौजेचा धनी जो कावेबाज शहाजी व बापाहून कांकणभर जास्त पटाईत शिवाजी संगनमत करून कोणती कृती करतील व कोणती खेकटी नाचवतील, त्याचा अंदाज आपल्या परीने करून औरंगझेबाने शाहिस्तेखान व जयसिंग यांना शिवाजीवर पाठविले. कर्नाटकात बिदनूरच्या नायकाची उठावणी करून शहाजी जेणेकरून कर्नाटकाचा रस्ता धरील अशी योजना

केली. शहाजी कर्नाटकांत शक १५८३ च्या फाल्गुनात पोहोचला, नंतर १५८४च्या चैत्रात तो व अल्लीशहा मिळून बिदनूरवर चाल करून गेले. गदग, लखमेश्वर, सोंधा या बाजूने अल्लीशहा बिदनूरवर उतरला आणि दक्षिणेकडून शहाजीने चाल केली. बिदनूरकराच्या एका प्याद्यास शहाजीचे दहा प्यादे (शिवदिग्विजय २०६) असा विजोड पडल्यामुळ, बिदनूरकर दातीं तृण धरून दोन अडीच महिन्यात शरण आला. ही स्वारी १५८४ च्या ज्येष्ठ अखेर संपून त्या वर्षाचा व पुढील वर्षाचा असे दोन पावसाळे शहाजीने बगळूरास काढिले. १५८५ च्या आश्विनात बसवापट्टणाकडील काही पाळेगारांनी बखेडा मांडिला होता, तो मोडण्याकरिता शहाजी त्या प्रांती गेला आणि बंदोबस्त करीत करीत होदीगिरे या गावच्या रानात त्याने तळ दिला. तेथे हरणाची शिकार करीत असता घोड्याचा पाय भंडोळीत अडकून घोडा व राजे एकावच्छेदे पडले. त्यात डोक्याच्या कवटीस जखम होऊन, शहाजी राजे शक १५८५ च्या माघ शुद्ध षष्ठीस शनिवारी परलोकास गेले. शिवाजीने सुरत लुटिल्याची खबर त्यांनी नुकतीच ऐकिली होती. दुखण्याबहाण्याने कुजत न पडता, वीराला उचित असा मृत्यू ह्या पुरुषाला आला. कर्तव्य करीत असताना मृत्यू येणे ही ईश्वरी कृपा होय. मरण समयी शहाजीची उमर सत्तरीला पोहोचली होती. एकोजी जवळ नव्हता. सबब भडाग्नि दिला. डाकेने आल्यावर एकोजीने उत्तरक्रिया केली. तिकडे शिवाजीराजास निधनवार्ता पोहोचल्यावर त्यांनीही प्रीतिश्राद्धादि विधी यथासांग करून लक्षभोजने घातलो. होदीगिरे येथे राजाचे एक छोटेखानी वृंदावन एकोजीने बांधिले व शिवाजीने एक मोठी डौलदार छत्री शिखरशिंगणापुरास उभारली. शिखरशिंगणापुरास छत्रीची पूजा–अर्चा भोसल्यांचे कर्म्ये तेथे अद्याप करतात. शिखरशिंगणापुरावर भोसल्यांची फार भक्ती असे आणि भक्ती बसण्यासारखेच ते स्थान आहे. तेथून पूर्वेस नगरापासून सोलापुरापर्यंतचा सर्व बालेघाट दिसतो. दक्षिणेस मिरजपर्यंतचा टापू नेत्रकक्षेत येतो, पश्चिमेस पन्हाळ्यापासून रायरी सिंहगडपर्यंतचा डोंगराळ प्रदेश कनीनिकेवर प्रतिबिंबित होतो आणि उत्तरेस फलटण, बारामती, पाटस, खेड व जुन्नर ह्या तालुक्याचो मखमल पृथ्वीवर हंतरलेली दृष्टिपथात भरते. असे हे महाराष्ट्राच्या मध्यवर्ती ठिकाण राष्ट्राच्या पितरांचे शेवटचे विश्रांति स्थान होण्यास सर्वथैव लायक आहे.

४९. ह्या थोर पुरुषाचे एकंदर साद्यंत राजकीय चरित्र थोडक्यात हे असे आहे. त्यावरुन शहाजीचे मुख्य धोरण काय होते व इतिकर्तव्यता कोणती होती ते स्पष्ट होते. जयराम म्हणतो त्याप्रमाणे स्वराज्य स्थापून स्वधर्म व स्वदेश व स्वभाषा व स्वजन यांचे पालन, लालन व संरक्षण करावे, ह्यात तो आपल्या जीविताचे साफल्य मानी. आजपर्यंत अशीही समजून होती की, स्वराज्य, स्वधर्म, स्वभाषादि संरक्षण करण्याच्या कल्पनेचा प्रथमोदय शिवकाली झाला. आजपर्यंत अशी समजूत होती की, पाच्छाही नोकरी व चाकरी करून भाकरी मिळविण्यापलीकडे शहाजीची उडी

गेली नव्हती. आजपर्यंत अशी समजूत होती की, संस्कृतप्राकृत भाषांना प्रथमाश्रय शिवाजीने दिला. आजपर्यंत अशीही समजूत होती की, मराठे लोकांच्या अंगी माणुसकी प्रथम शिवाजीने आणिली. परंतु ह्या कल्पना जयरामाच्या प्रत्यक्ष साक्षीपुढे व वरील कालानुक्रमिक राजकीय चरित्रापुढे ह्यापुढे टिकणें शक्य नाही. स्वराज्यस्थापनेच्या कल्पना शहाजीच्या वेळीच अत्यंत अंधुकपणे व अल्पांशाने का होईना पण उदय पावत होत्या. शहाजीचा प्रगटपणे स्वतंत्र स्वराज्य स्थापण्याचा पहिला उद्योग शक १५५१ त लोदीच्या बंडाच्या वेळी झाला. परंतु, शहाजहानच्या व आदिलशहाच्या जोड प्रतिरोधापुढे तो उदद्योग फार काळ टिकला नाही. नंतर स्वराज्यस्थापनेचा दुसरा उदद्योग शक १५५५ त निजामशाही पुनरुज्जीवित करून तिची पेशवाई करता करता व विशेष वैपरीत्य भासू न देता राजकीय प्रसंगाच्या सहज ओघात राज्यासन स्वत: आक्रमविण्याचा होता, तोही शहाजहानच्या प्रबल विरोधामुळे व महमदशहाच्या नरमपणामुळे साधला नाही. नाहीतर, त्याचवेळी प्रछन्न स्वराज्यस्थापनेचा योग बहुतेक जुळून आला होता. राज्यस्थापनेचा हा दुसरा प्रछन्न वार हुकल्यावर, शहाजीने पुन: दहा वर्षे खटपट व जुळवाजुळव करून स्वराज्याची कर्नाटकात पुन: तिसऱ्यांदा रचना केली व ती त्या वेळी साधली. कारण त्या कामी शहाजहानासारख्या प्रबल शत्रूचा प्रतिबंधही नव्हता आणि शिवाजी व संभाजी यांच्या शस्त्रप्रहाराने आदिलशहा हतप्रभही झाला होता. परंतु ह्या कर्नाटकातल्या स्वराज्यात व भीमगडच्या स्वराज्यात महदन्तर होते. कर्नाटकातले शहाजीचे स्वराज्य म्हणजे परक्या कानडी लोकांवरचे परक्या मराठ्यांचे राज्य आणि भीमगडचे स्वराज्य म्हणजे मराठ्या लोकांवरचे म्हणजे स्वजनांवरचे मराठ्यांचे राज्य असे हे कर्नाटकातल्या स्वराज्यात व्यंग होते. परंतु परिस्थितीपुढें त्याला काही उपाय नव्हता. शहाजीच्या ह्या कानडी स्वराज्यात दुसरी एक अशी गोम होती की, आदिलशाहीपासून शहाजीचे स्वराज्य धक्काबुक्की होऊन तुटून विभक्त झालेले नव्हते; म्हटले तर स्वतंत्र, म्हटले तर परतंत्र अशा लिबलिबीत स्थितीत होते. परंतु, शहाजीला ज्या परिस्थितीतून रस्ता काढावयाचा होता त्या परिस्थितीतून ह्या हून श्रेष्ठ फल तत्काल मिळण्यासारखे नव्हते, आस्ते-आस्ते कालांतराने अलगज हातात आपण होऊन पडण्यापैकी होते. आणि तो प्रकार पुढे झालाही.परंतु राज्यक्रमणाचे हे दोन्ही प्रकार यद्यपी स्वल्पिष्ट घर्षणाचे असले तत्रापी परिणामी कर्त्याला गौणत्व आणून कधीकधी अडचण उत्पन्न करणारे असतात.दुर्बल राजाची पेशवाई किंवा सरलष्करकी करता करता, त्याला हळूच ढकलून देणाऱ्या स्वराज्यस्थापकावर कृतघ्नतेचा व स्वामीद्रोहाचा आरोप प्रतिपक्षी आणू शकतात व ते आरोप निमूटपणे ऐकून घ्यावे लागतात. मूळ धन्याचे मांडलिकत्व पतकरिता पतकरिता ते प्रसंगी झुगारून स्वराज्य स्थापण्याचा प्रकारही असाच स्वामिद्रोहाच्या आरोपास पात्र होतो. कर्नाटकातील स्वराज्यस्थापनेतील हे गौणत्व शहाजी जाणून

होता. करता. मिंधेपणाचा गंधही ज्या स्थापनेत आढळून येणार नाही असे स्वराज्य दादाजी कोंडदेव, जिजाबाई व शिवाजी यांच्या द्वारा शहाजीने चौथ्यांदा स्थापिण्याचा उद्योग बंगळूराहून पुणे प्रांती करविला. आदिलशाहीशी व मोगलाईशी फटकून वागून, हा उद्योग मुद्दाम जाणूनसवरून करण्यात आला. अशा करता की, ह्या उद्योगावर स्वामिद्रोहाचा किंवा कपटकूटाचा आरोप प्रतिपक्षांना आणण्याची बिलकुल सोय राहू नये. पुणे प्रातातील हे स्वराज्य स्वजनांचे स्वजनांवर असल्यामुळे ते टिकाऊ, भरीव व चिरंजीवी होऊन, मनमोहक व आदरणीय झाले. महाराष्ट्रातील ह्या चोथ्या स्वराज्यस्थापनेचे सर्व श्रेय शिवाजीच्या पदरात पडले हे खरे. परंतु, मूळ कल्पना व योजना शहाजीची असल्यामुळे, शहाजीलाही ह्या श्रेयाचा वाटेकरी करणे इतिहासास प्राप्त आहे. पिंगळे, अत्रे, दादाजी, पानसबळ, रोझेकर, जेधे, बांदल, हे सर्व मुत्सद्दी व सरदार शहाजीचे, जहागीर शहाजीची, तोफा हत्ती, घोडे वगैरे किल्लोकिल्ली व ठाणोठाणी साठविलेला जंगी सरंजाम शहाजीचा· त्यांच्या जोरावर शिवाजीने आपली इमारत मूळ रचिली. आकाशातून पडला आणि धावायला लागला अशातला काही प्रकार शिवाजीचा नव्हता. बापाच्या खांद्यावर उभा राहून शिवाजी पहिल्यान्दा उच्चासनस्थ झाला. निंबाळकर, मोहिते, जाधव, महाडीक, गायकवाड, इत्यादि थोर मराठा कुळांशी शहाजीचा पिढीजात शरीरसंबंध असल्यामुळे, शहाण्णव कुळातील नामांकित मराठ्यांचे सहाय्य शिवाजीस मिळाले. तात्पर्य, दरबारी मुत्सद्दी, लष्करी सरदार, लढाऊ सामान, शहाण्णव कुळींच्या जेधे आदिकरून मराठ्यांचें साहाय्य व शहाजीच्या नावाचा दरारा व दिमाख, ह्या देणग्या शहाजीकडून शिवाजीस मिळाल्या. शिवाय, अडचणीच्या प्रसंगी वेळोवेळी शहाजीची मदत शिवाजीस पोहोचत असे ती निराळीच. शक १५८३ तील शिवाजीचा आदिलशाहाशी तह शहाजीने आपण होऊन घडवून आणिला. ह्या सगळ्याचा मतितार्थ एवढाच की, स्वराज्यस्थापनेचा धागा शहाजीच्या अथपासून इतिपर्यंतच्या सबंध चरित्रांत शक १५५१ पासून शक १५८३ पर्यंत अनुस्यूत झालेला आढळतो. पहिला १५५१ तला स्वराज्यस्थापनेचा प्रगट प्रयत्न चार सहा महिन्यात आटोपला. शक १५५५ तील दुसरा प्रछन्न प्रयत्न शहाजहानाने हाणून पाडिला. शक १५७० तील कर्नाटकातील मांडलिकी राज्यस्थापनेचा तिसरा प्रयत्न बराच सफल झाला. परंतु शिवाजीच्या द्वारा सुरू केलेला शक १५६२ तील पुण्याकडील पूर्णपणे स्वतंत्र स्वराज्यस्थापनेचा चौथा प्रयत्न मात्र अंदाजाबाहेर फलद्रूप झाला.

५०. धोरण व इतिकर्तव्यता ह्यांचा खुलासा झाल्यानंतर व ज्या साधनांच्या चाकावर धोरण व इतिकर्तव्यता यांचा गाडा चालवणे शक्य होते व ज्या साधनांच्या अभावी मनातले थोर राजकीय विचार जागच्या जागी शुष्क होऊन जातात. त्या साधनांची निर्मिती व जोपासना शहाजीने कशी केली तेही शोधिणे क्रमप्राप्त

होते. एवढे मोठे हजारोंनी मोजता येण्यासारखे प्रबल सैन्य शहाजीने कोठून आणिले आणि त्याला रोजमुरा कोठून दिला हा साधनसंबंधक पहिला प्रश्न आणि दोनतीन वेळा स्वराज्यसाधनिकेत फसला असता खचून न जाता उत्तरोत्तर ज्या नव्या दमाने शहाजी कामास लागलेला दिसतो तो दम त्याला कोठून पैदा झाला हा दुसरा प्रश्न. हे प्रश्न सोडविताना प्रथम लक्षात धरिले पाहिजे की, शहाजी हा प्राधान्ये करून व्यवहारचतुर मुत्सद्दी होता, केवळ कल्पनातरंगावर वाहवत जाणारा शेखमहंमद नव्हता. त्याच्या आधी व त्याच्या काली राष्ट्र सुधारण्याचे प्रयत्न करणारे शेखमहंमद थोडेथोडके झाले नव्हते. कली मातला सबब समाजाला दैन्य आले व ते भोगिल्याखेरीज गत्यंतर नाही, असे रडगाणे गाऊन स्वस्थ बसणारे ऐदी किती तरी होते. विठोब्बा सर्व काही योग्य वेळी नीट करील, त्याला जनतेची काळजी आहे असे समाधान करून घेणारे भक्तिमार्गी तर असंख्य होते. मुसुलमानी पेहराव, मुसुलमानी चालिरीती, मुसुलमानी भाषा, मुसुलमानी धर्म स्वीकारून समाजाच्या यातना बंद करू पहाणारे कितीतरी हिंदू प्रांतोप्रांती पीर होऊन बसले होते. यवनावर रुसून त्यांच्याशी व्यवहार बंद करून त्यांचे मुखावलोकन न करणारी दासोपंतादि मंडळीही आपल्याकडून यवनांच्या पारिपत्याचे प्रयत्न करीतच होती. यवनसेवा करून जनतेचा परामर्ष घेऊ पहाणारे दामाजीपंतही अनेक होऊन गेले. यवनाविरुद्ध बंड करून स्वराज्य मिळविणारेही काही वेडे निपजले. मंत्रतंत्रांनी यवनांना स्तंभित करण्याचा कित्येकांचा खटाटोप होता. यज्ञयागाचा व देवदेवालयांचा जीर्णोद्धार करून धर्मसंरक्षण करण्यात कित्येकांनी सर्वस्व खर्चिले. गोरक्षण करून प्रजेत जोम उत्पन्न करू पहाणारे गोरखनाथीही देशात वावरत होते. कथाकीर्तने व रामायणभारते देशभाषेत बनवून देशातील लोकांच्या अंगी स्फुरण चढवू पहाणारे कीर्तनकार व ग्रंथकार तर त्याकाली शेकडोने मोजावे लागत. असे नाना प्रकारचे बरेबुरे उपाय जो तो आपापल्या परी करीतच होता. परंतु असले हे सर्व उपाय तीनशे वर्षे करूननही यवनांचे काडीमात्र कोणी नुकसान करू शकले नाही. तेव्हा जो तो समाधान असे करून घेई की, बी रुजत घातले आहे, ते योग्य वेळी रुजून त्याला फळे आल्याशिवाय राहणार नाहीत. ही भविष्यवादी विचारसरणी निरुत्तर करणारी असल्यामुळे, भविष्यकाळी तिची साफल्यता अनुभवास यावयाची असल्यामुळे, व भविष्यकाळाला अंत नसल्यामुळे ह्या आशेची निराशा तीनशे वर्षे निघून गेली तरीही कधीच झाली नाही. अशातला आशावादी शहाजी नव्हता. तो पक्के जाणत होता की यवनांचे राज्य हे निधर्मी अल्पसंख्यांकांचे राज्य आहे, ते हिंदच्या हत्याराहून श्रेष्ठतर हत्याराच्या जोरावर व जरबेवर चालले आहे, आणि ह्या परदेशी अल्पसंख्यांक राज्यकर्त्यांत आपसातील यादवीमुळे किंवा ऐषआरामोत्पन्न आलस्यामुळ दौर्बल्य निर्माण झाल्यासही त्यांच्याहून श्रेष्ठतर निदान त्यांच्या बरोबरीची हत्यारे, जित लोकांनी पैदा केल्याशिवाय, त्यांचा पाडाव

होणे अशक्य आहे. तो हेही आणीक स्वानुभावाने जाणत होता की, हिंदुस्थानात व महाराष्ट्रात अशा किती तरी लढाऊ जाती आहेत की, ज्या वाटेल त्या स्वधर्मी किंवा परधर्मी धन्याची लष्करी नोकरी करून केवळ भाकरीकरिताही स्वतःचा प्राण देण्यास व दुसऱ्याचा घेण्यास एका पायावर तयार आहेत. तो हेही पहात होता की, महाराष्ट्रातील एकाच गावातल्या व एकाच कुळातल्या व गोतांतल्या भाऊबंदांपैकी काही लोक मराठ्या सरदारांच्या लष्करी तैनातीत आहेत व काही मुसुलमान सरदारांच्या व बादशहाच्या लष्करी तैनातीत आहेत आणि त्यापैकी कोणीही धन्याच्या देशाची, राष्ट्राची, धर्माची, हेतूची किंवा कशाचीच विचारपूस, इष्टानिष्टता आवडनिवड किंवा श्रेष्ठकनिष्ठता पहात नाही. स्वतःचे भोसले कूळ पहावे तर, तो व त्याचा बाप हे निजामशाही नोकर होते. त्यांचे चुलतभाऊ मोगलाई नोकर होते व त्याचे कुळभाऊ आदिलशाही व बेरीदशाही सैन्यात होते. अशा स्थितीत स्वतःचा स्वतंत्र पक्ष, स्वतःची स्वतंत्र फौज व स्वतःची श्रेष्ठतर हत्यारे कशी निर्माण करावी ह्या तीन बाबींचा त्याने खल केला. पक्ष निर्माण करणे म्हणजे ज्यांचा पक्ष निर्माण करावयाचा त्यांच्यात कोणती तरी सामान्य आकांक्षा अस्तित्वात असली पाहिजे. धर्म, जाती, देव, देश ही चार स्थाने उत्तम पुरुषांच्या ठाई समान आकांक्षेचे विषय होऊ शकतात. परंतु त्या काली मराठ्यांच्या मनोरचनेत ह्या स्थानांना, बिलकुल म्हटले तरी चालेल, अवकाश नव्हता. अशा द्विपाद पशुतुल्य अधम लोकांत समानबंधनत्व फक्त एकच सापडण्याजोगे होते. ते हेच की, ह्या द्विपादांच्या पोटापाण्याची व्यवस्था करून त्यांना आपल्या हुकमतीत बैलांप्रमाणे किंवा गाढवांप्रमाणे राबविणे आणि मनाजोगी कामगिरी करून घेतल्यावर दोन ममतेचे शब्द बोलून पाठ थोपटणे. तात्पर्य, पोटाला भाकर देणारा धनी हा ह्या अधमसंस्कृतीच्या लोकांचा समान बंधनत्वाचा विषय होता. तो पाठीवर असला म्हणजे हे लढावयाचे, तो मेला किंवा पळाला तर पोटाच्या भीतीने हे पळावयाचे. लढाईत धनी मेला की हिंदुस्थानातील शिपुर्डी पळ का काढितात, याचे खरे बिंग न कळल्यामुळे, अनेक परकीय इतिहासकार या पळकुट्यांना भेकड म्हणतात, परंतु हे म्हणणे अवास्तव आहे. हिंदुस्थानातील शिपायांना मरणाचे भय इतके वाटत नाही, त्या पशूंना मुख्य भय पोटाचे. धनी मेल्यावर, पोटाला घालणारा मेला, म्हणून हे लोक पोटाला घालणारा दुसरा धनी पहाण्याकरिता जीव बचावून पळतात. अशी ही ह्यांच्या पलणाची मीमांसा आहे. शहाजी हे सर्व जाणून होता. शहाजीस ह्या लोकांना पदरी बाळगण्याची म्हणजे आपल्या फौजेत त्यांची भरती मनसबदार ह्या नात्याने राजरोस करण्याची मुभा होती. हे सैन्य जमवून स्वपक्ष निर्माण करण्याच्या कामी मनसबदारी त्याच्या आयती पथ्यावरच पडली. तो मनसबदार नसता व आपल्या पाटिलकीच्या गावी पाटील किंवा देशमुख म्हणून असता व फौज जमविल्याचा उद्योग करता, तर त्याची गणना बंडखोर पुंडांत झाली असती व त्याचे शासन ताबडतोब झाले असते. जुलमी

परकीय राजांचा नाश करावयाचा म्हटला म्हणजे त्यांची नोकरी करून व विश्वास संपादून योग्य समई त्यांस गचांडी देण्याचा मार्ग जित लोकांना सदा श्रेयस्कर, सुरक्षित व न्याय्य गणलेला आहे. तो मार्ग शहाजीच्या बापाने चोखाळून आपल्या मुलाला साफ करून ठेविला होता. तात्पर्य, निजामशाही मनसबदार असल्यामुळे त्याला फौज बिनबोभाट जमविता येणे सहज झाले होते. आणि ही फौज म्हणजेच शहाजीचा पक्ष बनला होता. साधनांपैकी पक्ष आणि फौज बापाच्या मृत्यूनंतर त्याच्या हुकमतीत आल्यावर शहाजीने आपल्या गोड वागणुकीने फौजेला आपली इतकी काही ममता लाविली की बखरकार लिहितात फौजेतील शिपायाला व अंमलदारांना असे वाटे की नोकरी करावी तर ती राजा शहाजीची करावी, शहाजी केवळ आपला मायबाप आहे. मायेने असा आपलेपणा फौजेत उत्पन्न केल्यावर शहाजीने पाहिले की, केवळ मायेनेच सर्व काम भागत नाही व माया पोटभर दाखविली म्हणजे शिपाई जास्त कर्तबगार होतो अशांतलाही अर्थ नव्हे. मायेने फार तर शिपाई इमानी बनेल. परंतु इमानाइतकीच कर्तबगारीची किंमत असल्यामुळे, आपल्या फौजेची कर्तबगारी व कार्यक्षमता जेणे करून वृद्धिंगत होतील ते साधन शहाजीने पैदा करण्याच्या योजना केल्या. ते तिसरे साधन म्हणजे श्रेष्ठतर हत्यारे.

५१. हत्यार चोख पाहिजे आणि ते प्रतिपक्षयांच्या हत्याराहून श्रेष्ठतर पाहिजे, ह्या बाबीची जाणीव शहाजीच्या ठाई स्वकालीन अनुभवाने अत्युत्कट बाणलेली होती. पूर्वेतिहासही त्याला तेच शिकवीत होता. कोणत्याही राष्ट्राच्या संस्कृतीचा श्रेष्ठ कनिष्ठपणा त्या राष्ट्राच्या हत्याराच्या स्वरूपावरून ओळखता येतो. फार काय सांगावे, हत्यार हे राष्ट्राच्या एकंदर संस्कृतीचे मापक आहे. जशी ज्या राष्ट्राची संस्कृती तसे त्या राष्ट्राचे हत्यार. पशुपक्ष्यांची हत्यारे म्हणजे नांग्या, दांत, नखे, खूर, सोंडा, शेपट्या, पिसे वगैरे त्यांचे अवयव होत. त्याहून उच्चतर कोटींतला वानर क्वचित धोंडे, फांद्या, वगैरे सहजोपलब्ध बाह्य साधनांचा उपयोग करू शकतो. त्याहून श्रेष्ठ जो अर्धवट रानटी माणूस, तो गारेच्या बोथट्या वगैरे ओबडधोबड दगडी हत्यारे घासून तयार करतो व प्रसंगी उपयोगी पडावी म्हणून संग्रही जमा करून ठेवितो आणि पशुपक्ष्यादींचा संहार करतो. त्याच्याहून श्रेष्ठ पायरीचा आर्य माणूस खाणी खणण्याचा व त्यातून तांबे, लोखंड वगैरे धातू काढण्याचा शोध लावितो व त्या धातूचे भाले, बरच्या, तिरांचे फाळ, सुऱ्या, वगैरे धारेची दूरवर फेकता येण्याजोगी हत्यारे बनवितो व केवळ आंगलट करून झोंबाझोंबी किंवा मारामारी करणाऱ्या अर्धरानटी समाजाला जिंकून गुलाम बनवितो. धनुर्धारी राम ह्या खनिकर्मकुशल आर्यांपैकी होता त तो आपल्या शेकडो लोखंडी बाणांनी एतद्देशज रानटी भिल्ल, गोंड, कातकरी, राक्षस, वगैरे लोकांचा नायनाट करी. व त्यांपैकी कित्येकांना क्षुद्र करून आपली काबाडकष्टाची कामे करवी. लोखंडी बाणांहूनही दूर पल्यांच्या हत्यारांचा म्हणजे दारूने उडणाऱ्या वेळूच्या कांडांचा शोध लावणाऱ्या आर्यांनी केवळ

लोखंडी तीराने लढणाऱ्या आर्यांचा पराभव करून आपले रसायनमिश्रणज्ञान जगाच्या अनुभवास आणिले. त्या पुढे मजल मारून लोखंडी नळचांत दारू भरून अर्ध्या पाव कोसावरून शत्रूचा पाडाव करणाऱ्या मुसुलमानांनी ख्रिस्ती, हिंदू वगैरे कनिष्ठ संस्कृतीच्या लोकांचा पराभव केला. पुढें युरोपियन लोकांनी नाना शास्त्रीय शोधांच्या द्वारा नेमके काम करणाऱ्या व दूरवर पल्यांच्या तोफा, बंदुका, वगैरे संगीन हत्यारांच्या जोरावर मुसुलमानांची युरोपातील स्पेन वगैरे देशांतून हकालपट्टी केली व पृथ्वीवरील अमेरिका, आफ्रिका व हिंदुस्थान हे देश जिंकिण्याची खात्रीपूर्वक हिंमत बांधिली. एवढी मोगलांची अफाट व प्रबळ सत्ता, परंतु पोर्तुगीज चाच्यांनी कितीदा तरी समुद्रावर त्यांची इज्जत घेतली. ह्याच काळी कुस्तुंतुनियाच्या तुर्कांनी व्हेनिशियन लोकांपासून श्रेष्ठ बंदुका व तोफा आणि दारूगोळा तयार करण्याची सर्वश्रेष्ठ कला अर्धीमुर्धी व उष्टीमाष्टी किंचित आपलीशी केली होती. त्या अर्धवट तुर्क कारागिरांना पदरी ठेवून, दिल्लीचा मोगल व दक्षिणेकडील शहा हत्यारे व दारुगोळा बनवून त्याच्या जोरावर देशातील अर्धवट सुधारलेल्या टाळकुटया हिंदूंना व परस्परांना भिवडवीत असत. हा सर्व चमत्कार शहाजी पहात होता. उत्तम कारागीर हत्यार कोठून पैदा होते व कोण आणून देते ह्याचा अनुभव जुन्नरच्या घाटाखालील कोकणात त्याला आला होता.दमण, दीव, वसई, गोवा, सुरत, तेलीचेरी इत्यादी स्थलींच्या टोपीवाल्यांकडून कारीगार हत्यारे पैदा करून निजामशाही, आदिलशाही व मोगलाई सैन्याहून शहाजी आपली फौज जास्त कर्तबगार ठेवू लागला. अशा तऱ्हेने पक्ष, सैन्य व हत्यार शहाजीने निर्माण केले आणि त्यांच्या जोरावर प्रगट स्वराज्य, प्रच्छन्न स्वराज्य, मांडलिकी स्वराज्य, व निर्भेळ स्वतंत्र स्वराज्य उत्तरोत्तर स्थापित असता, वेळोवेळी येणाऱ्या विपत्तीत दम न सोडता पूर्वीच्याहून जास्त हुरुपाने पुढील कर्तव्य तो बजावत राहिला सैन्य व हत्यार ह्याच्यावरील त्यांचा विश्वास मोठ्या विपत्तीतही कधी ओसरला नाही. शेवटी ह्या साधनांच्या जोरावर आपण विजयी होऊच होऊ अशी त्याची बालंबाल खात्री होती. व परिणामावरून पाहता ही खात्री साधार होती. शहाजीच्या अलौकिक निर्धाराची व दमाची ही अशी मीमांसा आहे.

५२. येथे एक आनुषंगिक प्रश्न असा निघतो की, टोपीवाल्यांकडून कारीगार बंदुका, तोफा व दारूगोळा जो शहाजी घेई तो त्याने महाराष्ट्रात त्याबरहुकूम बनविण्याची व्यवस्था का केली नाही ? अथवा शहाजीचा मुलगा शिवाजी त्याने तरी का केली नाही ? किंबहुना बाजीराव बल्लाळ, बाळाजी बाजीराव व नाना फडणवीस ह्या गृहस्थांनी का केली नाही ? उत्तम हत्यारांकरिता दुसऱ्याचे मिंधे रहाण्याची लज्जा यांना कशी वाटली नाही ? प्रश्नाला उत्तर एकच आहे व ते अगदी साधे आहे. ते हे की, उत्तम, रेखीव व नेमके हत्यार बनविण्याची कला पैदा होण्यास शास्त्रीय ज्ञानाची जी पूर्व तयारी राष्ट्रात व्हावी लागते ती त्या काली

महाराष्ट्रात नव्हती. शहाजीच्या हयातीत युरोपात डकार्ट, बेकन, इत्यादी विचारवंत सृष्टपदार्थसंशोधनकार्याचे वाली जारीने पंचभूतांचा शोध लावण्यास लोकांना प्रोत्साहित करीत होते. आणि आपल्या इकडे एकनाथ, तुकाराम, दासोपंत, निपटनिरंजन, इत्यादी संत पंचभूतांना मारून ब्रह्मसाक्षात्कारात राष्ट्राला नेऊन मुक्त करण्याच्या खटपटीत होते. अशांना स्क्रू, टाचणी, बंदूक, व तोफ यांचा विचार वमनप्राय वाटल्यास त्यात नवल कसचे ? थोडक्यात आगस्ट कोंट याच्या भाषेत, सांगावयाचे म्हणजे महाराष्ट्र त्या काली metaphysical अवस्थेत 'होते आणि positive अवस्थेत येण्यास त्याला अद्याप पाचशे वर्षे अवकाश होता. म्हणजे शक २००० च्या सुमारास महाराष्ट्र positive बनणार होते. अशा अवस्थेत आपल्याला बनविता येत नाहीत ती श्रेष्ठ हत्यारे दुसऱ्यांकडून विकत घेण्याखेरीज शहाजीला गत्यंतर नव्हते. सध्या महंमद, आफ्रिडी, चित्रळी, अफगाण, इराणी इत्यादी अर्धसुधारलेल्या लोकांची जी अवस्था आहे तीच आपली शहाजीच्या काली होती. उत्तम जर्मन, फ्रेंच किंवा रशियन बंदूक घेऊन जो आफ्रिडी माणूस चोऱ्या, दरवडे व हल्ले करतो, त्याहून शहाजीकालीन मराठा जास्त सुधारलेला होता हे खरे. परंतु शस्त्राकरिता तो युरोपियनांचा आफ्रिडीच्या इतकाच परावलंबी होता. ह्या परावलंबित्वाचा अर्थ शहाजीच्या काली कोणाच्या लक्षात कितपत आला असेल ते सांगण्यास साधन नाही. परंतु विष जे आहे ते जाणून खा की नेणून खा, आपला अंमल केल्याशिवाय जसे रहात नाही, तसेच ज्याचे हत्यार त्याचे राज्य हा नियम-कोणाला समजो की न समजो- आपले कार्य केल्याशिवाय रहात नाही. अर्थात, मूळ हत्यार तयार करणारे जे फिरंगी, फ्रेंच, डच किंवा इंग्रज वगैरे युरोपियन त्यांना राज्य कमावून देण्याकरिता नजाणतेपणे शहाजी जिवापाड मेहनत करीत होता असा अर्थ झाला. आणि हा अर्थ शहाजी व त्याचे ब्राह्मण मुत्सद्दी यांच्या लक्ष्यात यावा तसा नव्हे तर मुळीच आला नाही. ज्या दिवशी व्हास्कोने कालिकतच्या चामुरीच्या थोबाडीत मारिली तोच हिंदुस्थानचे साम्राज्य युरोपियनांच्या हातात जाऊ लागण्याचा पहिला दिवस होय. मूठभर फिरंगी लोकांनी एका हिंदू राजाला पहिले छुट कुंठीत करावे असे त्यांच्याजवळ कोणते बरे सामर्थ्य होते? काय त्यांना दहा तोंडे व वीस हात होते ? की ते इजार नेसत होते व बायबल पढत होते म्हणून ते इतके प्रबल झाले ? तर अनेक शोधांच्या साहाय्याने सिद्ध झालेली जी लांब पल्ल्याची कारीगार हत्यारे त्यात त्यांचे सामर्थ्य होते. ही हत्यारे म्हणजे युरोपीयन शास्त्रीय संस्कृतीचा केवल निष्कर्ष होत. ह्या हत्यारांच्या जोरावर एक युरोपीयन हजार हिंदूमुसलमानांना भारी होता. हा अर्थ शहाजीसारख्या धोरणी, दूरदर्शी, मतलबी व जागरूक सरदाराच्या लक्षात न यावा अशीच तत्कालीन महाराष्ट्रसमाजाची स्थिती होती. तेव्हा दोषाचा वाटा शहाजीप्रमाणेच तत्कालीन समाजावर पडतो, हे उघड आहे. सगळेच आंधळे, त्यात एकालाच सुळावर

चढविण्यात मतलब काय ? ह्या बाबीत शहाजीच्या पंक्तीस अकबर, शहाजहान, मीरजुमला व औरंगझेब असे सारेच बसतात तेव्हा हा तत्कालीन भारतवर्षीय संस्कृतीतलाच सर्वसाधारण दोष होय हे कबूल करावे आगतें.

५३. हा एक सर्वसामान्य दोष सोडला तर दुसरा कोणताही मूढ दोष शहाजीच्या चरित्रात दिसून येंत नाही. पक्ष, सैन्य, हत्यार ही तीन साधने जुळविण्यात शहाजीने जशी मेहनत घेतली तशीच मुख्य धनी जो बुऱ्हणशहा त्यांची मर्जी संपादण्यातही शहाजीने बहुत चातुर्य दाखविले. मलिकंबर, फतेखान, जाधवराव, इत्यादी साऱ्यांना मागे सारून बुऱ्हाण निजामशहाच्या गळचातील केवळ ताईत शहाजी झाला. त्यामुळे आपले राज्यस्थापनेच्या हेतूची सिद्धता करण्याचे त्याचे काम बरेच सुकर झाले. दुसऱ्याच्या मनात शिरून त्याला आपला करण्याची करामत शहाजीच्या-इतकी तत्कालीन ऐतिहासिक व्यक्तीत फारच थोडचांच्या ठाई आढळण्यात येते.

५४. शहाजीचे उत्तरचरित्र म्हणजे शक १५६२ पासून शक १५८५ पर्यंतच्या तेवीस वर्षांतील चरित्र शिवाजीच्या तत्कालीन चरित्राशी समांतर आहे आणि समांतर आहे इतकेच नव्हे तर शिवाजीच्या चरित्राचे प्रोत्साहक आहे. शहाजी, दादाजी कोंडदेव, हणमंते, पिंगळे, अत्रे, पानसंबळ, जिजाबाई, इत्यादींनी शिवाजीच्या चरित्राला स्वतंत्रस्वराज्योन्मुख वळण देण्याची शिस्त कशी बांधून दिली ते शहाजीच्या चरित्रातील उत्तरकालीन खटपटीवरून स्पष्टपणे नजरेस येते. तेव्हा आता असा प्रश्न येतो की, शहाजी वगैरेंनी जर शिवाजीचा स्वतंत्र स्वराज्य आक्रमिण्याचा मार्ग आखून ठेविलेला होता, तर रामदासाचा शिवाजीच्या चरित्रावर कोणता परिणाम घडला ? अथवा हाच प्रश्न दुसऱ्या तऱ्हेने असा विचारिता येतो की, महाराष्ट्र-राज्यसंस्थापनेत रामदासाचे कार्य काय ? ह्या प्रश्नाचे उत्तर देताना दुसरा एक प्रश्न विचारात घेतला असता, प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे काम साधे होते. दुसरा प्रश्न असा : रामदास झाला नसता, तर स्वराज्यसंस्थापनेच्या कार्यात काय व्यंग राहिले असते ? कारण रामदास झाला असता किंवा झाला नसता, तत्रापि शहाजीने योजिल्याप्रमाणे शिवाजीने स्वराज्य स्थापिलेच होते व स्थापिलेच असते. रामदासाच्या शिकवणीमुळे स्वराज्यसंस्थापनेच्या रूपात असा कोणता स्पृहणीय फरक वाद करणाऱ्या ब्राह्मकांना दिसून आला ? शिवाजीने व शिवोत्तर मराठचांनी रामदासाचें ऋण सदा मान्य करणे म्हणजे काय ? गोब्राह्मणप्रतिपाल, वैदिक संस्कृतीचे संगोपन, संस्कृत-प्राकृत भाषांचे संवर्धन, देवालयादींचे जीर्णोद्धार, वगैरे कृत्ये थोडीफार, परिस्थितीला संभाळून जीव हेजिब केली. रामदास नसतातरी, जास्त प्रमाणावर चालविली असती ह्यांत बिलकुल संशय नाही. सध्यादेखील शिवाजीचा मोठेपणा गाताना ह्याच कृत्यांचा प्रामुख्याने आपण उल्लेख करतो की नाही ? मग ह्याहून आणीक कोणते महत् कृत्य शिवाजीकडून रामदासाने करवून घेतले ? असा आक्षेप प्रस्तुत प्रकरणी घेता येतो. ह्या आक्षेपाला उत्तर असे आहे की, शहाजीला

ज करता आले नाही, असे एक कृत्य करण्याची सल्ला रामदासाने शिवाजीला दिली आणि तसली सल्ला रामदासापर्यंत दुसऱ्या कोणीही शहाजीला किंवा शिवाजीला दिली नाही. आजपर्यंत शहाजीच्या कारकीर्दीत काय होत असे की देशातील मराठ्यांची बहुतम संख्या यवनादींची सेवा करण्यात पाप मानावयाच्या ऐवजी प्राय: भूषणच मानीत असे तो देशघातक व राष्ट्रघातक ओघ बदलून, देशातील सर्व मराठा असेल नसेल तेवढा एका ठायी म्हणजे स्वराज्याच्या ठायी मेळवावा, ही उच्चतम राष्ट्रीकरणाची सल्ला रामदासाने शिवाजीस दिली. शहाजीच्या सैन्यात मराठा, पुरभय्या, पंजाबी, हिंदू, मुसुलमान, बेरड, वगैरे सर्व जातींचे लोक व सरदार असत व सर्व जातीचे लोक ठेविल्याशिवाय शहाजीला परिस्थितीमुळे गत्यंतरही नव्हते. शिवाजीला रामदासाने एकजात मराठे सरदार व शिपाई ठेवण्याचा सल्ला दिली. ती अशाकरिता दिली की स्वराज्य आपले आहे व तत्प्रीत्यर्थ जीव खर्ची घातला असता महाराष्ट्रधर्म टिकावयाचा आहे, अशी बुद्धी बाळगिण्यात प्रत्येक मराठ्याला अभिमान वाटावा. आजपर्यंत मोगलादींच्या सैन्यात मराठे असत, परंतु धनी मारला गेल्यास कशाकरिता लढावयाचे ते न समजून ते प्राय: सैरावैरा पलायन करून इतस्तत: पांगत असत. आज हा धनी तर उद्या तो, असा त्यांचा व्यवहार असे. तो व्यवहार सुटून सर्व मराठ्यांच्या ठायी कोणता तरी प्रबल सामान्यधर्म उत्पन्न व्हावा व धनी गेला, मेला किंवा पराभूत झाला, तत्रापी सामान्यधर्माच्या बचावाकरता मराठ्यांनी ज स्तच आवेशाने प्राण खर्ची घालावे, एतदर्थ रामदासांनी शिवाजीस ही बहुमोल सल्ला दिली. त्या चतुरस्र मुत्सद्द्याने व वीरपुरुषाने ती सर्वांशाने यद्यपि नव्हे तत्रापि बरीच अंमलात आणली. मराठा तेवढा मेळवावा आणि महाराष्ट्र धर्म राखावा व वाढवावा ह्या उपदेशाची देणगी रामदासांनी शिवाजीला आणि तत्कालीन मराठ्यांना दिली. म्हणजे महाराष्ट्रात रामदासांनी राष्ट्रीयत्व व राष्ट्रभावना म्हणून जी म्हणतात ती उत्पन्न केली. कल्पक रामदास व कर्ता शिवाजी ह्या महाराष्ट्र धर्माच्या ऊर्फ राष्ट्रभावनेच्या समान धर्मांचा मराठ्यात अवतार झाल्याने, शिवाजीच्या पश्चात् संभाजी व राजाराम यांच्या कारकीर्दीत धनी नसतानाही मराठी सरदारांनी औरंगझेबाला मट्टचास आणिले. ही राष्ट्रभावना जर नसती–आणि नाही अशी औरंझेबाची प्रथम कल्पना होती– तर शिवाजीच्या मृत्यूनंतर त्याने स्थापिलेले राज्य थोड्याच दिवसात लयास गेले असते. आता रामदासाला प्रथम कल्पक म्हटल्याने व शिवाजीला कर्ता म्हटल्याने असे समजावयाचे नाही की, महाराष्ट्रधर्माची म्हणजे समानराष्ट्रधर्माची जाणीव शिवाजीच्या ठायी मूलत: अगदीच नव्हती. शिवाजीच्या ठायी ही कल्पना अभावरूपाने म्हणजे यवनांच्या द्वेषरूपाने बाळपणापासूनच होती. इतकेच की तिला भावरूप अद्याप आले नव्हते. ते रामदासांनी उच्चस्वराने पुकारिल्यामुळे व त्याची सोपपात्तिक तत्त्व म्हणून मांडणी केल्यामुळे, भावरूपाने म्हणजे मराठ्यांची एक-

जूट करण्याच्या रूपाने शिवाजीच्या मनात उत्कटत्वाने वास करिते झाले. रामदास नसते, तर शिवाजीने हे राजकीय तत्व शोधून काढिले असते की नसते हा वाद घालण्यात काही हशील नाही. कदाचित काढिले असते व कदाचित् काढिले नसते. रामदास नसते आणि शिवाजीने ते स्वत: शोधून काढिले असते तर कल्प-कत्वाचा मान आम्ही शिवाजीस दिला असता. एकंदर विवेचनाचा मथितार्थ असा की, शहाजीच्या वेळी राष्ट्रधर्माची कल्पना उदय पावली नव्हती आणि शिवाजीच्या वेळी ती उदय पावली होती. रामदासांनी ती पुकारल्याबरोबर समानशीलत्वास्तव व हित गर्भत्वास्तव शिवाजीने तिचे तात्काल मंडन व ग्रहण केले. ते मंडन व ग्रहण शहाजीच्या स्वत:च्या हातून त्या काली होण्यासारखे नव्हते. शहाजीच्या वेळीही यवनद्वेष नव्हता असे नाही. परंतु त्या द्वेषाला भावरूप देणे म्हणजे केवळ मराठ्यांची तेवढी एकजूट करून त्यांच्या जोरावर स्वराज्य मिळविणे शहाजीला शक्य नव्हते. तीन प्रयत्न करता करता चवथ्या प्रयत्नात मुसुलमानांचे मांडलिकत्व तेवढे त्याला स्वत:ला साधता आले. अशा स्थितीत यवनांचा द्वेष प्रकटपणे करणे शहाणपणाचेही नव्हते व सोईचेही नव्हते. शहाजीच्या काली यवनांना बाद करण्याच्या गोष्टी शहाजीच्या दरबारात निघाल्याचे जयराम लिहितो.

राजा हो नृप शहाजी यवन करावे बाद ।
हेजिब विधिसि बोलिला ऐसा द्विजसंवाद ।। ९६ ।।

बाद करणे म्हणजे राज्यच्युत करणे असा मात्र अर्थ हा संवाद करणाऱ्या ब्राह्मणांच्या डोक्यात नव्हता. कारण, पुढील श्लोकात बाद करणे म्हणजे काय करणे तेही जयराम नमूद करतो.

व्यापिली हे अवनी यवनी मुण वैदिक वाक सिणोन निर्जेली ।
या वरि साहेबकीर्तिची मूर्ति च आपालि हे जीव हेजिब केली.
शाहजीराजे व बादशाह असि वृत्ति करू जगत्रयि विधिसंनिधि गेली ।। ९७ ।।

यवनांनी सर्व पृथ्वी म्हणजे भरतखंड व्यापिलेले पाहून, वेदविद्या त्रासून मूर्छित झाली. परंतु, शहाजीराजांच्या पराक्रमाने ती रावध झाली, आणि ब्रह्मदेवाकडून भरतखंडाच्या राज्यवृत्तीची वाटणी शहाजीराजे व शहाजहान पातशहा या दोघांत तिने करून देवविली. यवनाला नर्मदेच्या उत्तरेस वाटणी दिली आणि शहाजीराजे यास नर्मदेच्या दक्षिणेस वाटणी दिली. तात्पर्य, या श्लोकात बाद करणे म्हणजे वाटणी करून देणे असा अर्थ अभिप्रेत आहे, यवनांना उच्छिन्न करून त्यांची पातशाहीत आक्रमण करणे असा अभिप्राय नाही. शहाजीच्या काली ह्याहून जास्त भाषा सार्थ झाली नसती. परंतु रामदास व शिवाजी यांच्या काली, यवनांना उच्छिन्न करण्याची भाषा उत्कटत्वाने महाराष्ट्रात रामदासांनी वापरली आहे.

यवनांच्या पातशाहीला रामदास बहुता दिवसाचे बंड म्हणतात व कुत्ते मारून परते घालावे म्हणून निक्षून सांगतात. शहाजी व शिवाजी ह्यांच्या कालात राजकीय विचारात केवढा हा फरक ! बुडाला औरंग्या पापी दुष्ट चांडाळ घातकी, ही भाषा शहाजीकाली संभाव्यसुद्धा नव्हती, प्रकटपणे बोलणे तर दूरच राहिले.

५५. स्वतःच्या दरबारात यवनाची किंचित् कुचेष्टा झालेली शहाजीला खपत असे. बाहेर कागदोपत्री शहाजी आदिलशहाला आपला अधिराज म्हणून आदबीने संबोधी आणि घरी दरबारात त्याचे कवी शहाजीने आदिलशहाचे राज्य राखिले आहे म्हणून शहाजीची प्रौढी गात. बाहेर बोलावयाचे झाले म्हणजे शहाजहानाला शहानशहा म्हणून किताब लावावा आणि घरात बोलताना त्याच्याशी वाटणी करून बसलो आहो अशी बरोबरीची भाषा वापरावी, असा दुटप्पी प्रकार शहाजीचा असे. आणि हा सर्व प्रकार आदिलशाह, शहाजहान, वगैरे लोकांच्या कानावर त्यांचे अखबरनवीस घालीत असत. परिणाम असा होई की, शहाजी संबंधाने आदिलशहा किंवा शहाजहान यांच्या मनात सदा संशय वास करी. त्याच्यावर विश्वास कोणाचाच नसे. कामापुरता शहाजीला जवळ करावयाचा आणि काम संपले म्हणजे त्याला हाकून द्यावयाचा असा प्रकार शहाजीच्या चरित्रात कितीदा तरी घडला आहे. ह्या दुटप्पी वर्तनाने जी मानखंडना होई ती शहाजीच्या अंगवळणी पडलेली होती. स्वतःचा कार्यभाग कसा साधेल, इतकेच शहाजीचे पहाणे असे. त्यात मानखंडना होते की मानमंडना होते ह्याचा कीस करीत बसण्यास त्याला अवकाश नव्हता. परंतु, शिवाजीसारख्यांना ही धरसोड तज्जन्य मानहानी बिलकुल खपत नसे. एकदा एतत्संबंधाने वृद्ध सोनोपंत डबीर व तरुण शिवाजीराजे यांच्या मध्ये एक मोठा मनोरंजक संवाद झाला तो बृहदीश्वरशिलालेखकाराने दिलेला मनन करण्यासारखा आहे. शिवाजी म्हणतो–' वडील प्रथम निजामशहाच्या संगतीस होते. ते आदिलशहाच्या बोधनेवरून त्याकडे गेले. परतून निजामशहांनी बोलविताच त्यांजकडे आले. पुन: बिनसून आदिलशहाकडे गेले. अशा दोनतीन येरजारा झाल्या. वडील आपल्याकडून सर्वांची कामे निर्मळ मनाने करीत. परंतु, आज इकडे, उद्या तिकडे अशा करण्यांनी सर्वांस कपटी म्हणून भासू लागले. कार्य अडले म्हणजे वडिलांचा ते ते शहा बहुमानही करीत, परंतु मनात किंतू धरीत. खरे पाहिले तर, थोर मनुष्यांनी ज्याची एकदा संगती धरिली त्यांशी कदापि बिघडू नये. आणि कदाचित बिघाड झालाच तर पुन्हा त्याजपाशी परतून येऊ ही नीती आहे. ती न पाळल्यामुळे यवनांनी वडीलांशी कृत्रिम वर्तन केले. परंतु वडील शूर व निर्मळ म्हणून बचावले.' शिवाजीचा सिद्धान्त खरा होता यात संशय नाही. परंतु शाहाजीचा व्यवहार या सिद्धान्ताहूनही खरा होता, हे व्यवहारज्ञ स्वतःच्या अनुभवाने सांगू शकतील. अपवाद खरे असतात, म्हणूनच सिद्धान्तांना चिकटविलेले असतात ! स्थितीच अशी होती की, दुटप्पीपणाशिवाय शहाजहान, औरंगझेब,

मीरजुमला, महमदशहा, फत्तेखान, मुस्तफाखान, इत्यादि कपटनाटक्यांच्यामध्ये शहाजीचा सरळपणाने टिकाव लागला नसता.

५६. शहाजीच्या हयातीत हिंदुस्थानात एकंदर पाच स्वतंत्र मुसुलमानी राज्ये होती, (१) दिल्लीची मोगलाई, (२) दौलताबादची निजामशाही, (३) विजापूरची आदिलशाही, (४) गोवळकोंडयाची कुतुबशाही व (५) बेदरची क्षुद्र बेरीदशाही. ह्या पाच मुसुलमान शाह्यांनी तुंगभद्रेच्या तीरापासून हिमालयापर्यंतचा व आसामपासून इराणपर्यंतचा सर्व टापू आक्रमिला होता. तुंगभद्रेच्या दक्षिणेस कर्नाटकात काही क्षुद्र हिंदू पाळेगार तेवढे थोडेबहुत स्वतंत्र राहिले होते. त्यांचे स्वातंत्र्य निजामशहाने हरण करावे की आदिलशहाने हरण करावे की कुतुबशहाने हरण करावे की दिल्लीवाल्याने हरण करावे, एवढाच काय तो मत्सराचा प्रश्न घुटमळत राहिला होता. बाकीचे सर्व भरतखंड यवनांच्या कबज्यात जाऊन, हिंदुत्वाच्या हयातीचे माप भरत आले होते. सहाशे वर्षे झगडता झगडता इस्लामाच्या हातून आर्यसंस्कृतीचा पाडाव आणिक पाचपन्नास वर्षात परिपूर्ण झाला असता. ह्या पाच पातशाह्या अन्योन्य मत्सराने एकमेकांचे बल क्षीण न करत्या आणि स्नेहवृद्धीचे तह करून इस्लामी संस्कृतीचा विजय करणे हे एकच धोरण अक्षत पाळत्या, तर हिंदुसंस्कृती पृथ्वीतलावरून उच्छिन्न होऊन गतेतिहासाचा करुण विषय झाली असती. इस्लामी धर्माचा प्रसार करण्याची प्रतिज्ञा प्रत्येक पातशहा करी; परंतु ती दुसऱ्याच्या हातून सफल न होता आपल्या हातून व्हावी अशा अभिमानाने एक दक्षिणी शहा दुसऱ्या दक्षिणी शहाच्या उरावर बसे. दक्षिणी सर्व शहा शियापंथी पडल्यामुळे उत्तरेकडील सुनी मोगल त्यांना धर्मभ्रष्ट समजत व हिंदूंप्रमाणेच त्यांचाही उच्छेद करण्याचा पैगाम बांधीत. अशी दुफळी नव्हे, त्रिफळी नव्हे, पंचफळी मुसुलमान पातशाह्यांमध्ये होती तीही झाली, तत्रापिदेखील मुसुलमान पातशहा एका बाबीची खबरदारी घेते, तर हिंदूसंस्कृतीचा त्यांच्या हातून नायनाट झाला असता. पंचफळीमुळे फार झाले तर पाच शाह्यांतून कोणत्या तरी एका शाहीच्या हातात सर्व राज्यसत्ता जाती व त्या सार्वभौम यावनी राजसत्तेच्या द्वारा आर्यसंस्कृतीचा परिपूर्ण नाश होता. फक्त एका बाबीकडे त्यांनी बिलकुल दुर्लक्ष्य करता कामा नव्हते. ती बाब ही की, त्यांनी कोण ही हिंदुधर्मी लढवय्याला मनसबदारी किंवा सरदारी देऊन प्रबल बनू द्यावयाचे नव्हते. हे अनुभवसिद्ध सामान्य धोरण त्या काली मुसुलमान पातशहांना माहीत नव्हते असेही म्हणता येत नाही. शहाजहान व औरंगझेब यांच्या तर ते मुखोद्गत होते. दक्षिणेतील शहांनाही ते अवगत होते. परंतु कोणतेही धार्मिक, वैय्यापारिक किंवा राजकीय धोरण कितीही महत्त्वाचे असले तत्रापि ते स्वसंरक्षणाच्या व खासबचावाच्या धोरणापुढे फिके पडते. अकब्बराने जेव्हा निजामशहा घशाखाली उतरविण्याचा धाट घातला व निजामशाहीतील दक्षिणी व परदेशी मुसुलमानांचे दोन्ही पक्ष शहाच्या खांद्यावर कुरघोडी

करू लागले, तेव्हा निजामशहाने मालोजी भोसले या लढवय्याला मनसबदारी देऊन स्वसंरक्षणार्थ विश्वासूक असा मराठ्यांचा तिसरा पक्ष निर्माण केला. प्रथम मालोजीची मनसबदारी पंचहजारी अशी बेताचीच होती. परंतु धन्याचा विश्वास बसत बसत व लढाईच्या निमित्ताने वाढत वाढत, शहाजीच्या हाताखाली ती मनसबदारी एखाद्या शहाला शोभेल अशी तोलदार फौज बाळगणारी झाली. असल्या मनसबदारीला कह्यात ठेवणे मोठे जीवावरचे, नाजूक व संकटाचे काम असते. सुखविली तर ती आयतीच अलगज प्रेमाने उरावर बसत्ये आणि दुखविली तर रागावून प्राण घेत्ये. सनातनधर्मी प्रबल मनसबदार जो शहाजी त्याला मलिकंबर व मूर्तिजाशहा ह्यांनी ज्या दिवशी दुखविले त्या दिवशी हिंदुस्थानात सहाशे वर्षे बांधीत आणिलेल्या इस्लामच्या तटात पहिले भगदाड पडले आणि सनातन संस्कृतीवरील इस्लामच्या मगरमिठीतील पहिली गाठ मोकळी झाली. शहाजी संतापून निजामशाहीतून निघून गेल्यावर मलिकंबराला मूर्तिजाने ठार केले. मूर्तिजाला फत्तेखानाने मारिले व फत्तेखानाला शहाजहानने पकडिले. बेगमेने शहाजीचे साह्य घेताच निजामशाहीला पुन: जीव आला आणि तिने शहाजीला सोडताच निजामशाहीचा कायमचा अंत झाला. शहाजहानालाही ह्या वेळी शहाजीच्या प्राबल्याचा व करामतीचा अनुभव आला. शक १५५८ तील मोहीम पावसाळ्याच्या आत खलास करण्याचे शहाजहानाचे सर्व अंदाज शहाजीने हुकविले आणि शहाजी म्हणेल त्या अटीवर मोहीम कशीतरी शहाजहानास संपवावी लागली. ह्या पुढे शहाजीच्या वाटेस शहाजहान कधी गेला नाही. आदिलशाहीत गेल्यावर शहाजीने कर्नाटक कसे सर केले, शहाजीला अटक केल्यामुळे कर्नाटकात व पुणे प्रांतात कसा धुमाकूळ उडाला, सुटल्यावर औरंगझेबाचा हस्तक व कुतुबशहाचा प्रधान जो मीरजुमला त्याला शहाजीने कसा बेदम बडविला, बंगळूरास स्वराज्यस्थापन शहाजीने कसे केले आणि पुणे प्रांतात स्वतंत्र राज्य स्थापन शिवाजीकडून कसे करविले, वगैरे कथानक मागें सविस्तर वर्णिले आहेच. तात्पर्य, एक हिंदुधर्मी प्रबल मनसबदार बनू देण्याच्या एका चुकीचा हा सर्व परिणाम झाला. त्या एका चुकीने नुसती निजामशाहीच खाल्ली नाही, तर कुतुबशाही खाकेत मारिली, आदिलशाहीचे लचके तोडिले, बेरीदशाहीचा चकनाचूर होऊ दिला आणि शेंवटी दिल्लीची मोगलाई रसातळास पोहोचविली. औरंगझेबाने शिवाजीस निसटून जाऊ देण्याची एक चुकी केली तर त्याला सव्वीस वर्षे दक्षिणेंत वनवास भोगावा लागून शेवटी हताश मरावे लागले. शहाजीला मनसबदारी देण्याच्या एका चुकीने त्याहूनही घोर धक्का इस्लामाला बसला. इस्लामी राज्यसत्ता हिंदुस्थानातून कायमची बाद होण्याचा मार्ग खुला झाला. हिंदुस्थानाच्या तत्कालीन राजकारणात शहाजीच्या इतिकर्तव्यतेचे कार्य हे असल्या स्वरूपाचे म्हणजे यवनांची सत्ता खिळखिळी करून मोडण्याच्या पंथास लावण्याचे होते. थोडक्यात सांगावयाचे म्हटले तर शहाजी ह्या वेळी हिंदुत्वाचा विजयी वाली बनला होता.

५७. येथे असा आचंबा उद्भवण्यासारखा आहे की, इराणपासून आसामपर्यंत व पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंत ज्याची अमर्याद सत्ता त्या दिल्लीच्या मोगल पातशाहाला किंवा दक्षिणेतील शहांना शहाजी व शिवाजी यांना, अथवा व्यक्तिनामे टाकून बोलले तर, मराठ्यांना चिरडून टाकिता कसे आले नाही ? ह्या प्रश्नाला उत्तर द्यावयाचे म्हणजे तत्कालीन ऊर्फ तद्युगीन सार्वजनिक मानवी हालचालीकडे व संस्कृतिप्रवाहाकडे नजर फेंकिली पाहिजे. पहिली व सर्वांत मुख्य अशी एकच एक बाब एतत्संबंधक म्हटली म्हणजे ही की, ह्या काली इस्लामी विकृती म्हणून जिला म्हणता येईल तिचे पृथ्वीतलावरील कार्य संपून तिची शक १४०० पासून १५०० पर्यंतची शंभर वर्षे एका प्रचंड संस्कृतिप्रवाहाच्या रेटयापुढे सारखी पिछेहाट होत चालली होती. हा प्रचंड संस्कृतिप्रवाह म्हणजे ज्याला आधुनिक भौतिकशास्त्रीय संस्कृती म्हणतात तो. ह्या शास्त्रीय संस्कृतिप्रवाहाने एकट्या इस्लामी विकृतीलाच तेवढे क्षीण केले असे नाही. ह्या प्रवाहाने ख्रिस्ती विकृतीलाही दुर्बल करून सोडिले. ही संस्कृती कालांतराने हिंदू विकृतीला व बौद्धविकृतीलाही मुरगाळून टाकणार होती. अशा ह्या अजिंक्य व त्रिभुवनविजयी व कालत्रयव्यापक सनातन भौतिक शास्त्रीय संस्कृतीच्या धगधगीत तेजापुढे जुनाट मध्ययुगीन व रानटी इस्लामी विकृती शक १४०० पासून क्षय पावत शक १५५० च्या सुमारास अतिच क्षीण झाली. तिला पहिला धक्का स्पेनमध्ये बसला. दुसरा धक्का पोलंडमध्यें मिळाला. आणि तिसरी गचांडी अरबी समुद्रात, बंगाली समुद्रात व पासिफिक समुद्रात दिली गेली. मुस्लिम विकृतीला लत्ताप्रहार करणारी ही तीन राष्ट्रे म्हणजे स्पेन, पोलंड, व पोर्तुगाल ही होत. पहिल्या धक्क्याने इस्लामाची भूमध्यसमुद्रातून उचलबांगडी झाली. दुसऱ्या धक्क्याने इस्लामाला पश्चिम यूरप बंद झाले, आणि तिसऱ्या धक्क्याने आफ्रिकेच्या पूर्वेकडील सर्व समुद्रांना इस्लाम कायमचे मुकले. इस्लामला हे प्राणघेणें धक्के देणारी तिन्ही राष्ट्रे ख्रिस्ती विकृतीने पछाडिलेली होती. परंतु ती ख्रिस्ती होती म्हणून त्यांनी इस्लामाचा पराभव केला असे मात्र समजावयाचे नाही. त्यांच्या जयाचे मुख्य कारण त्याच्यात नव्या जोमाने उत्पन्न झालेली भौतिकशास्त्रीय संस्कृती होय. ही भौतिकशास्त्रीय संस्कृती त्यांच्यात उत्पन्न होण्याच्या अगोदर चारशे वर्षे यूरोपातील सर्व ख्रिस्ती राष्ट्रांनी पालस्टैन घेण्याकरिता इस्लामाशी झुंजण्यात जंगजंग पछाडले पण इस्लामाचे त्यांच्याने अणुमात्रही वाकडे झाले नाही. परंतु भौतिकशस्त्रीय संस्कृतीचा पाठिंबा मिळताच, आगीपुढे लोणी जसे वितळावे, तसा इस्लाम शास्त्रसंस्कृत युरोपच्या पुढे केवळ विरघळत गेला, आणि ख्रिस्ती राष्ट्रांच्या अन्योन्य मत्सराची थोडीफार थंडाई मिळून आस्ते आस्ते विरघळता विरघळता आता गेल्या दोन वर्षां पाठीमागे म्हणजे शक १८४० त केवळ नामशेष राहिला. हा सर्व प्रभाव भौतिकशास्त्रीय संस्कृतीचा होय. अरबी समुद्रात इस्लामला जो धक्का बसला त्याचा परिणाम असा झाला की, हबस. श्यामळ, अरबस्थान, इराणी आखात,

काठेवाड, गुजराथ व कोकण ह्या प्रदेशांच्या किनाऱ्याने हबशी, श्यामळ, अरबस्थानी, इराणी, मोगल, निजामशाही व आदिलशाही मुसुलमान व्यापाऱ्यांच्या हालचाली संपुष्टात आल्या. आणि हबस, श्यामळ, अरबस्थान व इराण ह्या देशांतून आदिलशहा व निजामशहा यांच्या सैन्यात व दरबारात लढाऊ व कारकुनी पेशाच्या मुसुलमान लोकांचा भरणा उत्तरोत्तर कमी होत गेला. त्यामुळे देशातील मराठा शिपायांचा व सरदारांचा व ब्राह्मणांचा पाठिंबा मिळविणे या दोन्ही शहांना अपरिहार्य झाले. युरोपियन भौतिक शास्त्रीय संस्कृतीच्या रेटयाचा दक्षिणी शहांवर हा असा परिणाम झाला. दिल्लीच्या मोगलांवरही अशीच छाप शस्त्रास्त्रसंपन्न पोर्तुगीज लोकांची बसली. प्राजक्ताचे झाड हलविले असता फुले जशी टपटपा गळून पडतात तशी गुजराथ, कोकण व बंगाल या देशांच्या किनाऱ्यावरील बंदरे पोर्तुगीज लोकांच्या शस्त्राच्या व अस्त्राच्या दणक्याने पटापट युरोपियनांच्या पदरात पडली. त्यामुळे दिल्लीच्या मोगलांचीही गुर्मी समुद्रावर जिरवणारे शेरास सवाईशेर कोणीतरी पृथ्वीच्या पाठीवर फिरंगी म्हणून लोक आहेत अशी हिंदुस्थानभर आख्या झाली व तितक्या पुरता मोगलांच्या इज्जतीस धक्का बसला. मोगल एक काफर तर फिरंगी सात काफर, असे हिंदुस्थानात लोकमत बनले. फिरंग्यांना जिंकिणे म्हणजे मोठे शतकृत्य करणे, असे हिंदुस्थानातील लोकांस वाटू लागले, शहाजीने फिरंग हातात धरली म्हणजे फिरंग्यांचा रंग जातो, अशी जी जयरामाने शहाजीची स्तुती केली आहे त्यातील मतलब असा आहे की, अजिंक्य फिरंग्यांनाही ज्याने जिंकिले तो शहाजी मोगलांची विशेष तमा बाळगीत नव्हता हे जाहीर व्हावे. ह्या सर्व तपशिलांचे तात्पर्य एवढेच की हिंदुस्थानातील व विशेषत: ज्यांना पोर्तुगीजांचा निकट शेजार होता त्या महाराष्ट्रातील लोकांच्या मनातून आदिलशहा, निजामशहा व मोंगल या तिघांच्या संबंधाने आदर व इज्जत उतरत्या कळेस लागली, हा युरोपीयन संसर्गाचा परिणाम झाला. इज्जत उतरण्याला दुसरीही आणीक कारणे वावरत होती. मोंगल पातशहा वंशाने तुराणी, विद्येने इराणी व धर्माने अरबी होते. मूळचे मध्यआशियातील मोगल लोक अर्धवट रानटी असून, शेजारास असलेले त्यांच्या देवधर्माहून श्रेष्ठ असे देवधर्म ते स्वीकारीत असत. पूर्वी कित्येक शक ऊर्फ मोंगल लोकांनी वासुदेवभक्ती घेतली होती, कित्येकांनी बौद्धमत अंगीकारिले होते, आणि सध्या ते महम्मदाच्या देवधर्माचे अनुयायी बनले होते, हिंदुस्थानात आल्यावर ख्रिस्ती, झरदुष्ट्री व वेदान्ती कल्पनांचा पगडा त्याच्या मनावर बसून, निर्भेळ इस्लाम मतापासून ते च्युत होत चालले होते. अकब्बर, जहांगीर, शहाजहान, ह्या मोंगल पातशहांनी अनेक हिंदू चाली उचललेल्या होत्या. हे सर्व प्रसिद्ध आहे. इभ्राईम आदिलशहाला ललितकलांचा इतका काही शोक असे की त्या पुढे तो मुस्लिमधर्म तुच्छ मानील, अशी काजीमुल्ला वगैरे धर्माचार्यांना भीती पडली. मोंगल लोकांचे देवधर्मविकार असे शिथिल होत असता, त्यांच्या इराणी विद्यासंस्कारातही बदल होत

गेले. फारसी भाषा मोंगल भाषेहून श्रेष्ठ पडल्यामुळे व मध्य आशियातील सर्व दरबारी व्यवहार फारसीत चालत असल्यामुळे ह्या अर्धरानटी मोंगल लोकांनी इराणची परकीय अशी फारसी भाषा स्वीकारिली व फारसीत लिहिणारे इराणी कारकून व मुत्सद्दी पदरी बाळगिले. ह्या इराण्यांहून हिंदू कारकून व मुत्सद्दी वरचढ असत. सबब सर्व दरबारी व्यवहार आस्ते आस्ते हिंदू कायस्थांच्या हाती गेला. देवधर्म व फारसी विद्या यांची अशी पायमल्ली होत असता मोंगलांची वंशशुद्धीही भेसळ होत गेली, रजपूत वगैरे हिंदू जातींशी शरीरसंबंध होऊन, शुद्ध मोंगलत्व उत्तरोत्तर बिघडत गेले व त्याबरोबर मोगल स्वभावही अपकृष्ट होत गेला. गनिमी काव्याने लढण्यात मूळ मोंगलांची व तुराण्यांची मोठी ख्याती. पण हिंदुस्थानात ती कीर्ती त्यांनी गमाविली. मराठ्यांच्या गनिमी पेचापुढे व हुलकावण्यांपुढे, हिंदुस्थानात सुखावलेले मोंगल कच खाऊ लागले. असा चोहोंकडून यूरोपात, समुद्रात, हिंदुस्थानांत, धर्मात, विद्येत व वंशात ऱ्हास होत गेल्यामुळे, शहाजी व शिवाजी ह्या मराठ्यांना चिरडून टाकण्याचे सामर्थ्य दक्षिणेतील किंवा उत्तरेतील मुसलमानांत राहिले नाही. शहाजीने मुसुलमानांची ही व्यंगे ओळखून तदनुसार आपली कारवाई चालविली व तीत त्याला यावे तसे यश आले. मुसुलमान पातशाह्या दिसण्यात खूप टब्बू दिसत, परंतु आतून रोगांनी पोकरल्या गेल्या होत्या, हे शहाजीस ओळखता आले, ह्यातच शहाजीचे मोठेपण दिसून येते. दिल्लीन्द्र म्हणजे केवळ अजिक्य, ही जी तत्कालीन सामान्य समजूत, तीत तथ्यांश कितपत आहे, हे शहाजीने व शिवाजीने व त्यांच्या ब्राह्मण मुत्सद्द्यांनी उत्तमोत्तम जोखिले होते.

५८. येथपर्यंत शहाजीच्या चरित्राचा जो त्रोटक तपशील दिला आणि त्याच्या धोरणाचे व इतिकर्तव्यतेचे जे अल्प विवेचन केले त्यात स्पष्टपणे आपल्या नजरेस आले की, स्वराज्य-मग ते स्वतंत्र असो, प्रच्छन्न असो, किंवा मांडलिकी असो, स्थापन करण्यात शहाजीची तारुण्यापासून वृद्धापकालापर्यंतची पंचेचाळीस वर्षे गेली, आणि शेवटी मांडलिकी स्वराज्य स्थापण्यास त्याला यश आले. हे मांडलिकत्व यद्यपी नावाचेच होते. तत्रापी ते मांडलिकत्व होते यात वाद नव्हता. आता शहाजी बड्या सैन्याचा धनी पडल्या कारणाने वरिष्ठ जो आदिलशहा तोच उलटा त्याला वचकून असे हे खरे. त्यामुळे शहाजीची आपल्या राज्यावरील सत्ता पूर्णपणे अनियंत्रित होती, असे म्हणणे वस्तुस्थितीपासून फारसे दूर नव्हते. शहाजीवर काय थोडासा वचक बसायचा तो त्याच्या मुत्सद्द्यांचा व वरिष्ठ मराठा सरदारांचा. ह्याखेरीज परदेशी कर्नाटकी प्रजेतून कोणाचाही दाब त्याच्यावर असणे शक्य नव्हते. मुत्सद्दी व सरदार ह्यांचे काम राजा बोलावील तेव्हा सल्लामसलत सांगण्याचे. अमुक केलेच पाहिजे आणि तमुक केले नच पाहिजे, असे सांगण्याचा हक्क ह्या सरदारांना किंवा मुत्सद्द्यांना मुळीच नव्हता. तात्पर्य, शहाजीचे कर्नाटकातील राज्य पूर्णपणे अनियंत्रित होते. तत्रापी जमीन महसुलाच्या व न्यायमनसुबीच्या पुणे प्रांता-

तील जुनाट पद्धती शहाजीने कर्नाटकात इतक्या नामी बसवून दिल्या की सर्व प्रजा-जन त्याचा दुवा गाऊ लागले. परंतु सर्वांत ज्या कृत्याने शहाजी कर्नाटकात अत्यंत प्रिय झाला ते हे की, तो राज्य करू लागल्यापासून मुसुलमानांच्या हातून देवालये छिन्नभिन्न होण्याची, बायकांवर जुलूम जबरदस्ती गुदरण्याची, शेटसावकारांपासून पैसा उकळला जाण्याची व शेतकऱ्यांचे सर्वस्व नागविण्याची पीडा कर्नाटकातून कायमची बाद झाली. आदिलशहा व कुतुबशहा किंवा मोंगल यांचे मुखावलोकनही घेण्याची कर्नाटकातील हिंदूंना व इतर जातींना इच्छा राहिली नाही. देशाला सुर-क्षितपणा आल्याकारणाने, शहाजीच्या कर्नाटकातील राज्यासंबंधाने भरतखंडा-तील सुज्ञ व कळकळीच्या विचारी, हिंदूंना सानंद अभिमान वाटू लागला. वैदिक, पंडित, शास्त्री, मल्ल, गायक, कवी, साधू, संत, शैव, वैष्णव, रामानुज असे गुणी-जन व भिन्नपंथीय लोक शहाजीच्या दर्शनास येऊ लागले. भाट, चारण इत्यादी बंदीजन देशोदेशी शहाजीची कवने व पवाडे गाऊन, एक नवीन हिंदूराज्य दक्षिणेत नुकतेच स्थापन झाले आहे, व ते स्थापन करणारा महाराज शहाजीराजा भोसला या नावाचा वीरपुरुष दक्षिणेत अवतरला आहे, अशी आख्या चोहोकडे पसरवीत. जयराम कवीने तर युधिष्ठिर, विक्रम व शालीवाहन हे शककर्ते शहाजीशी तुलण्याला योग्य नाहीत असा आपला अभिप्राय दिला आहे. शक १२०० पासून १५०० पर्यंतच्या तीनशे वर्षांत शहाजीएवढा थोर हिंदू राज्यकर्ता दुसरा कोणी झाला नाही, ही बाब लक्षात घेता, जयरामकवीची ही उक्ती सार्थ नव्हती असे कोण म्हणेल ? जयरामकवीच्या लिहिण्यातील एका शब्दाच्या चमत्कारिक उपयोगासंबंधाने किंचित टीका करणे येथे योग्य दिसते. शक हा तो टीकेय शब्द होय. युधिष्ठिर, विक्रम, व शालिवाहन यांना जयराम शक म्हणतो.

युधिष्ठिर विक्रम शालिवाहन शक ।
त्याहून महाराजा कीर्तिने अधिक ॥

ह्या ओव्यर्धात, तसेच

अवतार तू शाह, तुझा महिमा शक हो असके न सकेत करू ।

ह्या चरणात जयराम, युधिष्ठिर, विक्रम, व शालिवाहन यांना शक म्हणतो. येथे शक ह्या शब्दाचा अर्थ काय ? शक म्हणजे अहिंदू जे हुणादि शक लोक ते जय-रामाला विवक्षित नव्हते. हे सांगावयाला नकोच. मग हे तीन शककर्ते शक कसे ? असे दिसते की, शक् ऐश्वर्ये ‑या धातूला अ प्रत्यय लागून शक हा शब्द बनला आहे. शक पासून जसा शक्र शब्द कर्तृत्ववाचक निघतो तसाच शक् पासून शक शब्द जयरामाने कर्तृत्ववाचक बनविला. शक्र ह्याचा विशिष्ट अर्थ यद्यपी इंद्र असा आहे, तत्रापि सामान्य अर्थ ईश्वर, राजा, समर्थ अंमल गाजविणारा असा आहे. तोच अर्थ शक या शब्दाचा आहे. शक म्हणजे समर्थ, ऐश्वर्यवान व काल-प्रवर्तक राजा. ह्या अर्थाने युधिष्ठिर, विक्रम व शालिवाहन यांना जयराम शक हे

विशेषण लावितो ते ठीक दिसते. जयरामाचा हा जर अभिप्राय सर्वत्र संमत झाला, तर पुराणेतिहासातील एक गूढ कायमचे उकलले गेले असा अर्थ होईल. कालप्रवर्तक राजा ह्या अर्थाचा शक शब्द आणि अहिंदू अशा एका म्लेंच्छजातीचा वाचक शक शब्द उच्चारात सारखे असल्यामुळे, शालिवाहन शक ह्या सामाजिक शब्दाचा अर्थ करताना अनेक संशोधक बुचकळयात पडत आलेले आहेत शकनृपकाल, शककाल, शके, शाके, इत्यादी शब्दात म्लेंच्छ जे शकलोक त्यांच्या राजांचा काहीतरी संबंध असावा, असा साहजिक तर्क करून, कितीतरी पुराणेतिहाससंशोधकांनी शककालाचा प्रारंभ म्लेंच्छ जे शकलोक त्यांच्या एखादया राजाच्या राज्यारंभाशी जोडण्याचा खटाटोप केला आहे परंतु त्या सर्व खटाटोपात एक अशी गोम राही की, हिंदू लोक आपल्या धर्मकृत्यात अहिंदू अतएव धर्मबाह्य कालगणनेचा उपयोग कालत्रयीही करणार नाहीत. तोच जयराम कवीचा शक शब्दाचा अर्थ घेतला, म्हणजे सर्वच अडचणी दूर होतात. कालप्रवर्तक म्हणून शालिवाहनाला शक म्हणत व त्याने प्रचलित केलेल्या कालाला शालिवाहन शक् म्हणत. शक् धातूला अ प्रत्यय लागून क्रियार्थक शक शब्द बनतो. क्रियार्थक शक शब्दाचा अर्थ सत्ता, अधिकार, अंमल; आणि या अर्थाने शक हा शब्द मराठीत अदयाप सर्रास योजिला जातो. शिवाय, युधिष्ठिर शक, विक्रमशक, हे किंवा इत्यादि प्रयोग शक शब्दाचा सत्ता, अंमल हा अर्थ घेतला म्हणजे अदुष्ट ठरतात. व शकशब्द युधिष्ठिर, विक्रम, शिव, शिलाहार, इत्यादी नामांपुढे लागला असता त्यांत कोणतेही वैपरीत्य भासत नाही.

५९. शहाजीसंबंधाने शक या शब्दाची योजना जयरामकवीने जी केली आहे तीवरून एक अनुमान असे करता येते की, देशात काही तरी नवीन मनू सुरू होत आहे यवनांची सत्ता ऱ्हास पावत असून तिच्या जागी हिंदूंची सत्ता प्रचलित होत आहे व ह्या सत्तेचे रूप विक्रम किंवा शालिवाहन या शककर्त्यांच्या सत्तेसारखे भासत आहे, अशा कल्पना त्या काली कित्येक लोकांच्या मनात येऊ लागल्या होत्या. ही शककर्ती सत्ता अंमलाच्या रूपाने प्रगट होणार की काय याचा अंदाज साहजिकपणेच त्यावेळी कोणालाच करता येण्यासारखा नव्हता. शहाजी बनता बनता शककर्ता बनेल, अशीही अटकळ कित्येकांनी बांधिली असावी. परंतु, त्या अटकळीत फारसा जीव नव्हता, हे तीनशे वर्षांनंतर आता आपण सांगू शकतो. कारण शहाजीच्या इतिकर्तव्यतेचे साफल्य आपल्या डोळयासमोर अथपासून इतिपर्यंत समग्र मांडले गेले आहे, त्यावरून आपण निश्चयाने सांगू शकतो की, शहाजीची सत्ता शककर्त्यांच्या सत्तेपैकी नव्हती. ती मांडलिकी सत्ता होती म्हणून शककर्ती नव्हती, असा मात्र अर्थ नव्हे. शिरजोर मांडलिकी सत्ता वरच्या दुर्बल अधिराजाला पदच्युत करून स्वतः अधिसत्ता बनू शकते. परंतु त्या शिरजोर मांडलिकी सत्तेला राष्ट्र म्हणून ज्याला म्हणतात त्या शक्तीचे अधिष्ठान पूर्वसिद्ध असावे

लागते. ते अधिष्ठान शहाजीच्या मांडलिकी सत्तेला असावे तसे नव्हते. शहाजीची सत्ता वैयक्तिक होती. तो असे तोपर्यंत त्या सत्तेचा शिरजोरपणा गोचर होणार. तो गेला म्हणजे तिचा शिरजोरपणाही जाणार. अशा वैयक्तिक सत्तेच्या पायावर कालप्रवर्तकत्वाची इमारत उठू शकत नाही. शककर्तृत्वाच्या इमारतीला राष्ट्रत्वाचा भक्कम पायाच लागतो. शहाजीच्या काली महाराष्ट्रदेशातील मराठा समाज राष्ट्र या पदवीला पोहोचला नव्हता, फक्त लोक ही पदवी त्याने आक्रमण केली होती, आपल्या देशाचा सर्व कारभार आपण स्वतः करणार, ही भावना ज्या समाजातील बहुतम व्यक्तींच्या ठायी प्रादुर्भूत झाली व तत्प्रीत्यर्थ ज्या समाजातील लोक प्राणही खर्चिण्यास सिद्ध झाले तो समाज राष्ट्र या पदवीला पोहोचला म्हणजे राष्ट्र झाला. ही भावना समाजात जोपर्यंत उद्‌धृत झाली नाही तोपर्यंत समाजलोक ह्या पदवीतच असू शकतो. त्या लोकात एक देश, एक भाषा, एक आचारविचार, एक वंश, एक धर्म व एक कायदा इतकी सारी सामान्य बंधने यद्यपी विद्यमान असली आणि राजकीय कारभार स्वतः करण्याची म्हणजे राज्य करण्याची ऊर्फ स्वराज्य करण्याची उत्कट इच्छा नसली, तर त्या लोकांना राष्ट्र म्हणता येत नाही. शहाजीकाली महाराष्ट्रातील मराठ्या लोकांतही राजकीय भावना फारच थोड्या इसमांच्या ठायी उद्‌भवली होती. असेही म्हटले असता, अतिशयोक्त होणार नाही की राज्य करण्याची प्रबल इच्छा व तत्प्रीत्यर्थ प्राणही वेचण्याची तयारी फक्त एकट्या शहाजीच्या व त्याच्या काही ब्राह्मण मुत्सद्द्यांच्या ठायीच तेवढी त्या काली प्रज्वलीत झाली होती. म्हणून तर चार यवनी पातशहांशी चाळीस वर्षे झगडत झगडत शेवटी त्याने लंगडेपांगळे का होईना पण स्वराज्य पैदा करण्याचे वीरकृत्य स्वतः व्यक्ति-मात्रा पुर्ते मूर्त करून दाखविले. ह्या वीरवृत्तीचे मराठा समाजात अनुकरण होऊन शिवाजीच्या काली त्या समाजातील बहुतम लोकांनी स्वराज्य करण्याच्या प्रखर उत्कंठेने प्रेरित होऊन राष्ट्र ही उच्च पदवी प्राण खर्चून पैदा केली. त्या अद्‌भुत कथानकाचा प्रांत शककर्त्या श्रीशिवाजी महाराजांच्या कारकीर्दीतील पडल्यामुळे, तत्संबंधक विवेचनास प्रस्तुत स्थली जागा देणे न्याय्य होणार नाही.

६०. आता शेवटी दोन महत्त्वाच्या प्रश्नांचा उडत उडत उल्लेख करून, हा प्रास्ताविक लेख आटोपता घेऊ. पहिला प्रश्न तत्कालीन, संस्थानिकांचा. रामनगर, बागलाण, जव्हार, फलटण, जत, मुधोळ, सावंतवाडी, सोंधे, प्रभानवल्ली, शृंगारपुर, जावळी इत्यादी स्थलींचे लहानमोठे हिंदू व मराठा संस्थानिक महाराष्ट्रात शहाजी-काली विद्यमान असता, मुसुलमानी सत्ता उलथून पाडण्याचा किंवा खिळखिळी करण्याचा उद्योग त्यांच्यापैकी कोणीही का केला नाही? शहाजीसारख्या नवख्या मनसबदारावर ही प्रचंड कामगिरी कशी येऊन पडली? खरे पाहिले तर, सैन्य, पैसा, प्रजा, मुत्सद्दी, विचारवंत, लढवय्ये व पुढारी पैदा करण्याची किंवा होण्याची सोय शहाजीसारख्या उपटसुंभ मनसबदारापेक्षा ह्या पुरातन पिढीजाद संस्थानिकापाशी

जास्त असण्याची शक्यता होती. असे असून, देशाचे हे स्वभावसिद्ध नायक निर्माल्य-वत् निस्तेज व सुस्थ का राहिले ? जव्हार हे संस्थान सर्वस्वी रानटी कोळी लोकांनी वसलेले असल्यामुळे, त्यांच्या ठायी मराठ्यांची उच्चतर महत्त्वाकांक्षी राजकीय मनोरचना त्या काली प्रगट होणे शक्य किंवा संभाव्य नव्हते. सबब त्या रानटी संस्थानाला प्रस्तुत उल्लेखातून वगळणे रास्त आहे. बाकी राहिलेले सर्व संस्थानिक शहाजीप्रमाणेच उच्च मराठे होते. ते सुस्थ व स्वस्थ काय म्हणून राहिले ? फलटण, जत, मुधोळ, सावंतवाडी व जावली येथील संस्थानिक आदिल-शाही, निजामशाही किंवा मोगलाई मनसबदार बनून त्या मनसबदारीतच समाधान मानून शहाजीशी कधी विरोधाने व कधी उदासीनतेने वागत असत. सोंधे, प्रभान-वल्ली व शृंगारपूर ह्या डोंगराळ मुलखातील मराठा संस्थानिकांना मुसुलमानांचा स्पर्श फारच स्वल्प होत असल्यामुळे, ते आपापल्या कुहरात स्वस्थ झोपा घेत पड-लेले होते व बाहेरच्या जगात होत असलेल्या उलाढालींची वार्ता त्यांच्या गावीही नव्हती. निजामशाही व मोगलाई यांच्या सरहद्दीवर असलेली रामनगर व बागलाण ही क्षत्रिय संस्थाने, खरे पाहिले तर, त्यांच्या भोवती चाललेल्या गडबडीने खडबडून जागी व्हावयास पाहिजे होती. परंतु, तीही गलितावस्थेत रममाण होऊन निचिंत पडली होती. ह्या सार्वत्रिक निश्चेष्टपणाचे कारण काय ? महाराष्ट्रातील यच्च-यावत सर्व मऱ्हाटयांच्या व ब्राह्मणांच्या राजकीय निश्चेष्टपणाचे जे सार्वत्रिक कारण मागे सांगितले तेच ह्या संस्थानिकांच्या निश्चेष्टतेचे कारण होय. राष्ट्र होण्याची म्हणजे सर्व महाराष्ट्राचा राजकीय कारभार स्वतः पाहण्याची उत्कट व जिवंत भावना ह्या संस्थानिकांच्या ठायी उद्भूत झाली नव्हती. त्यामुळे होते त्या नीच स्थितीत समाधान मानून व वरिष्ठ मुसुलमानी अधिराजे करतील तो अपमान व सत्तासंकोच निमुटपणे सहन करून हे संस्थानिक कालक्रमणा करीत असत. ह्यांच्या निश्चेष्टतेचे हे एक कारण झाले. ह्या कारणाला राष्ट्रभावनाभाव म्हटले असता चालेल. निश्चेष्टतेचे दुसरे कारण, आहे ते गमाविण्याची भीती. मुसुलमानी अधिसत्तेविरुद्ध पैगाम बांधून हाती असलेले क्षुद्र संस्थानवैभव हातचे घालविण्यापेक्षा ते सभाळून रहाणे ह्या अल्पात्म्यांना पसंत पड. तिसरे कारण असे होते की, मुसुल-मानी अधिसत्तेपासून फार दूर अंतरावर हे संस्थानिक रहात, त्यामुळे त्या अधि-सत्तेत दुर्बलपणा कोठे व केव्हा उत्पन्न झाला किंवा होईल, याचा पत्ता ह्यांना नसे. चौथे कारण असे होते की, ह्यांचे सैन्य व फौजफाटा क्षुद्र असे. करोल सैन्य जय्यत तयार ठेविण्याची व उत्तरोत्तर वाढविण्याची करामत ह्या क्षुद्र व ऐदी संस्था-निकांनी कधीच दाखविली नाही. निश्चेष्टतेचे पाचवे कारण म्हटले म्हणजे कारी-गार हत्यार पैदा कश्याकरिता करावयाचे, कोठून करावयाचे व कोठच्या पैशाने करावयाचे, ही अक्कलच मुळी यांच्या हृदयभूमिकेत कधी उगवली नाही. साहावे कारण असे होते की जपजाप्य करणारी क्षुद्र भिक्षुके व पोटभरू भिकार खर्डेघाश्ये

ह्यांनी ह्या संस्थानिकांच्या दरबारचे मुत्सद्दीपण पटकाविलेले होते. ह्या भट-भिक्षुकांच्या व खर्डेघाश्यांच्या नेतृत्वाखाली इंद्रालाही निंद्रपद प्राप्त झाले असते, मग अडाणी व अर्धरानटी मराठा संस्थानिकांना नीचतम पदवी प्राप्त झाल्यास नवल ते कसचे ! ह्या अधम संस्थानिकांच्या अगदी उलट प्रकार शहाजीचा होता. (१) राष्ट्र होण्याची प्रबल इच्छा, (२) राज्य व राष्ट्र कमाविण्यात सर्वस्वाची आहुती देण्याची पूर्ण तयारी, (३) मुसुलमानी अधिसत्तेच्या केन्द्रस्थानी वसती पडल्यामुळे तेथील व्यंगे, मत्सर, विकार, बल, ऐश्वर्य, इत्यादींची खडा न् खडा माहिती, (४) करोल सैन्य, (५) कारीगार हत्यार, (६) चाणाक्ष व चतुर मुत्सद्दी जवळ करण्याची पुण्यबुद्धी, (७) ह्या सर्व साधनांचा योग्य वेळी योग्य उपयोग करण्याची अप्रतिहत अक्कल, (८) त्या अक्कलेला मूर्त स्वरूप आणण्यासाठी लागणारे शौर्य, (९) आणि मनुष्यमात्राला आपल्या कह्यात वागविण्याचं दुर्मिळ कसब, शहाजी राजाच्या ठायी जन्माने व कर्तबगारीने सिद्ध झाल्यामुळें, त्याच्या हातून जुनाट संस्थानिकांच्या स्वप्नातही नव्हते त्या स्वराज्यस्थापनेच्या महत्कृत्याचा पाया घातला गेला. जुने संस्थानिक व नवा शहाजी ह्यांच्यात हे असे जमीनअस्मानाचे अंतर होते.

६१. तत्कालीन नाकर्त्या संस्थानिकांचा परामर्ष घेतल्यानंतर, तत्कालीन मराठा समाजाच्या निकृष्ट स्थितीसंबंधाने चार शब्द सांगणे आवश्यक होते. गेल्या साठ कलमात कित्येक स्थली तत्कालीन मराठा समाजाला अधम, निकृष्ट, नाकर्ता, इ. विशेषणे लाविलेली पाहून जिज्ञासू विचारवंतांच्या मनात असा प्रश्न येतो की, मराठे हे जर पुरातन क्षत्रिय आहेत अशी समजूत आणि पुरातन क्षत्रिय जर सुसंस्कृत होते यात संशय नाही, तर शहाजीकालीन मराठे अधम, निकृष्ट, अज्ञ व राष्ट्रभावनाविहीन कोणत्या कारणानी बनले ! जनक, रामचंद्र, भीष्म, कृष्ण इत्यादी पुरातन क्षत्रिय आत्मा, नीती, राष्ट्र, धर्म इत्यादींचा खोल विचार व आचार करणारे असून त्यांचेच वंशज जर मराठा क्षत्रिय असतील तर इतके अनात्मवान् व अराष्ट्रक ऊर्फ अनीतिमान कसे बनले ! उत्कृष्ट अवस्थेपासून निकृष्ट अवस्थान्तराप्रत एकाच वंशातील समाजाचे सर्व बाजूंनी अधःपतन सहसा झालेले नाही, इतकेच नव्हे तर अशक्य आहे. भीष्म, कृष्ण, जनक, रामचंद्र हे क्षत्रिय वैदिक आर्ष भाषा बोलणारे असून त्यांचेच वंशज म्हणून समजले जाणारे शहाजीकालीन मराठे मराठी भाषा काय म्हणून बोलू लागले ? इंद्र, वायु, अग्नि इत्यादी देवांचे ऋग्मंत्रे करून स्तवन करणाऱ्या वेदकालीन भीष्मादी क्षत्रियांचे वंशच जर शहाजींकालीन मराठे होते म्हणून म्हणतात तर ते विठोबा, राम, कृष्ण, दत्त, इत्यादींच्या फलपुष्पादींनी गंधाक्षतादींनी मराठीत आरत्या कसे करू लागले ? रथावर आरोहून धनुष्याने लढणाऱ्या भीष्माचे शहाजीकालीन वंशज घोड्यावर बसून बंदूक व भाला ही हत्यारे काय कारणाने वापरू लागले ? वैराज्य, साम्राज्य, पारमेष्ठ्य, राज्य इत्यादी

राष्ट्रीकरणाचा रात्रंदिवस पाढा वाचणाऱ्या भीष्मादी क्षत्रियांचे शहाजीकालीन वंशज वैराज्य, साम्राज्य, महाराज्य इत्यादी महान् हव्यास सोडून सामान्य ' राष्ट्र ' ह्या कल्पनेलाही इतके पारखे कसे झाले ? इंद्राग्नीच्या छंदोभाषेतील कथा एकीकडेच राहोत, परंतु रामकृष्णादींच्या ऐतिहासिक कथा ह्या मराठ्यांच्या करता प्राकृत व अपभ्रष्ट जी मराठी नावाची शूद्रभाषा तीत शेकडो ग्रंथकारांकरवी शेकडो वेळा हजार पाचशे वर्षे सतत काय म्हणून लिहिल्या जाव्यात ? संस्कृत भाषेतील भारत, भागवत व रामायण ह्या मराठ्या लोकांना काय कारणाने समजत नाहीसे झाले ? इत्यादी एकासारखे एक महत्त्वाचे असे अनेक प्रश्न संशोधकाच्या पुढे, उत्तराची वाट पहात, दत्त म्हणून उभे रहातात.

६२. शहाजीकालीन मराठे म्हणजे कोण लोक आहेत व ते इतके निकुष्टावस्थ काय म्हणूत दिसतात, इत्यादी प्रश्नांची उत्तरे दिली. ह्या उत्तरदानात जी विवेचनसरणी अनुसरावी लागली व गर्भितार्थांची जी पुष्टी होऊ द्यावी लागली तिची स्मरणी नमूद करून ठेवितो –

(१) प्रथम ब्राह्मण ऊर्फ ब्रह्मन् हा एकच शुक्लभास्वरवर्णी वर्ण होता.

(२) त्याला रक्तलोहितवर्णी क्षत्र ऊर्फ क्षत्रिय लोक भेटून ब्रह्मक्षत्रनामक द्वैवर्ण्य बनले.

(३) पुढे पीतवर्ण विश् लोक समावून त्रैवर्ण्य उत्पन्न झाले.

(४) शेवटी उत्तरकुरूंत व उत्तरमद्रात कृष्णवर्ण शूद्रांचा समावेश होऊन जगप्रसिद्ध चातुर्वर्ण्य निर्माण झाले.

(५) मूळ एकाच शुक्लभास्वरवर्णी लोकांचे तांबडे, पिवळे व काळे असे भिन्न वर्ण होणे अशक्य आहे. पांढरे, तांबडे, पिवळ व काळे लोक जसजसे भेटले तसतसे क्रमशः मिळत जाऊन ऐकवर्ण्य, द्वैवर्ण्य, त्रैवर्ण्य व चातुर्वर्ण्य अशा चार रूपातून ही चातुर्वर्ण्यसंस्था क्रमशः उद्भवली.

(६) मूळारंभी पितृसावर्ण्याची पद्धत ब्रह्मन् लोकांत होती तीमुळे तांबडा, पिवळा व श्वेत वर्ण कालांतराने त्रैवर्णिकात सरमिसळ दिसू लागले. तांबडा व पिवळा हे रंग श्वेत रंगाला व इतरेतरांना विद्रूपता आणणारे नसल्यामुळे तत्संबंधाने, अगदीच नव्हे असे नव्हे, विशेष तिटकारा वाटला नाही. परंतु शौद्र जो काळा रंग त्याने श्वेतादि वर्णांना विद्रूपता येत असल्यामुळे तत्संबंधाने तिरस्कार वाटे. तशात शूद्र नाकाडोळ्यांनीही विद्रूप असत. त्या कारणाने शूद्र स्त्रीच्या पोटी ब्राह्मणादि त्रैवर्णिकांकडून जी ब्राह्मणादि प्रजा निपजे ती नाकाडोळ्यांनी शौद्र निपजे. काळा रंग आणि शौद्र अवयव विशेष तिटकारा आणीत. शूद्रांचा नुसताच काळा रंग असता तर तो खपला असता. नाग लोक वर्णाने काळेसावळे असत, परंतु चेहऱ्याने नीटस असत, तेव्हा ते त्रैवर्णिकांना खपत.

(७) दासकर्माकरिता त्रैवर्णिकांनी शूद्रांना घेऊन चातुर्वर्ण्यसंस्था स्थापिली.

नंतर शरीरसंबंध होऊ लागला. तो अतिशय वाढून बौद्धादि धर्मक्रांती, राज्यक्रांती व समाजक्रांती झाली.

(८) तेव्हा पितृसावर्ण्याची पद्धत बंद करून मातृसावर्ण्याची पद्धत व कायदा त्रैवर्णिकांनी पसार केला. त्यामुळे जाती अस्तित्वात आल्या. वर्ण हे कातडीच्या रंगावर बसविले होते. जातीचा रंगाशी काहीएक संबंध नाही. जाती ह्या जन्मावर बसविल्या गेल्या. गोरा ब्राह्मण व काळी शूद्रीण यांच्यापासून झालेला जो पारशव तो वर्णाने गोरा, काळा किंवा सावळा असला, तत्रापि जातीने म्हणजे ज्ञातीने म्हणजे जन्माने शूद्र समजला जाई. अशा तऱ्हेने मांगापासून ब्राह्मणापर्यंत सर्व जातीत गोरी, तांबडी, पिवळी, काळी, सावळी, विटकरी, उजळ, फेफटी, नाकेली, अशी सर्व प्रकारची माणसे दिसू लागली.त्याचप्रमाणे मनाने वेदनिष्ठ किंवा वेदभ्रष्ट, श्रद्धेने पितृभक्त किंवा पितृनिंदक, कर्माने यज्ञकर्ती किंवा यज्ञभंक्त्री, अशी तऱ्हेतऱ्हेची माणसे निपजून वैदिक संस्कृती दुभंग झाली.

(९) अशा काली माहाराष्ट्रिक राष्ट्रिक व वैराष्ट्रिक हे गणराज्य करणारे कनिष्ठ संस्कृतीचे क्षत्रिय दक्षिणेत वसाहती करण्यास निघाले.

(१०) तेथे त्यांच्याही पूर्वी हजारो वर्षे वस्ती करून राहिलेले आर्यभाष नागलोक त्यांना भेटले.

(११) त्यांच्या मिश्रणाने शालिवाहनाच्या पाचव्या शतकाच्या सुमारास मराठे लोक व मराठी भाषा उदयास आली.

(१२) ह्या मराठा लोकांची संस्कृती नाग व माहाराष्ट्रिक या दोघांच्या संस्कृतीचे मिश्रण होती व दोघांचे गुणदोष तीत उतरले होते.

(१३) स्वतःचे साम्राज्य हाकण्याची ऐपत व इच्छा नसल्या कारणाने मराठा लोकांवर उत्तरदेशीय चालुक्यादि क्षत्रिय सम्राटांनी शक १२४० पर्यंत राज्य केले.

(१४) नंतर मुसुलमान आले. त्यांनी शक १५५१ पर्यंत अंमल केला.

(१५) पुनः भोजक्षत्रिय जे शहाजीशिवाजी भोसले त्यांचे राज्य या लोकांवर यांच्याच व धर्माभिमानी व महाराष्ट्राभिमानी साहाय्याने झाले.

(१६) परंतु, महाराष्ट्रधर्म ह्या लोकांत परिपूर्ण न मुरल्यामुळे, पुढे चित्पावन ब्राह्मणांनी ह्या लोकांवर अंमल बसविला.

(१७) आता हे लोक भौतिक–व अध्यात्म-शास्त्रसंपन्न इंग्रजांच्या हुकमतीखाली रहात आहेत.

(१८) उच्च ब्राह्मण व उच्च क्षत्रिय यांनी तत्कालीन इष्टनिष्टापत्तीप्रमाणे वर्ण व जाति निर्माण करून जातींना विशिष्ट अनन्यसामान्य वृत्या लावून दिल्या. मराठा क्षत्रिय, मराठा कुणबी, शूद्र कुणबी व नागवंशो महार यांना साक्षर कर-

ण्याचा जारीने प्रयत्न न केल्यामुळे व ह्या लोकांची संख्या देशात बहुतम झाल्यामुळे व ह्या बुद्धिमान व कर्तबगार अशा उच्च ब्राह्मणांना व उच्च क्षत्रियांना ह्यांच्याबरोबर अधोगतीत रखडत बसण्याची यथायोग्य शिक्षा मिळाली आहे.

(१९) रंगाने, चेहऱ्याने, दिनचर्येने, व संस्कृतीने महाराष्ट्रातील ब्राह्मण, मराठे, कुणबी, महार व मांग इत्यादि आर्य व आर्यानार्य अशा सर्व जाति सावळया, नीटस व स्नानशील बनल्या असून, आता निषिद्ध खाद्यपेय वगळले असता बहुतेक एकजिनसी होण्याच्या मार्गाला लागल्या आहेत. वर्णाचे व जातीचे समाजरचनेत जे कार्य व्हावयाचे ते बरेच होऊन चुकले आहे. ह्याहून उच्चतर समाजरचनेचा काल ह्या पुढे उगवेल असा निश्चित अंदाज दिसतो.

(२०) चातुर्वर्ण्य व जाति अनादि नाहीत. चातुर्वर्ण्य उत्तरकुरूंत उत्पन्न झाले व बौद्धकालात त्याचे रूपान्तर जातिसंस्थेत झाले. सर्व जातींचा एकच सावळा रंग झाल्या कारणाने वर्णभेदाचे आता कारण उरले नाहीं, आणि बहुतेक सर्व जाती अन्योन्य वृत्तींचे उल्लंघन गेली हजार वर्षे करू लागल्यामुळे जातिभेदाचीही मातब्बरी, कातकरी, भिल्ल वगैरे वन्य लोक वगळले तर, वृत्तिदृष्टचा म्हणजे निर्वाहदृष्टचा राहिली नाही.

(२१) परंतु, पिढीजात म्हणजे पीठिकाजात वांशिक गुणांच्या दृष्टीने जातिसंस्था एकाएकी राभस्याने मोडणे इष्ट म्हणजे राष्ट्रहितपोषक होणार नाही. गुण पिढ्यानुपिढ्या संक्रमण होत होत उपजत होतात. असले अनेक उपजत गुण हिंदू जातींनी पिढीजात पैदा केलेले जातिमोटनाने फुकट दवडणे राष्ट्रहिताचे नाही. ह्या गुणांचे उपबृहण व्हावे एतन्निमित्त जातिसंस्था मुद्दाम राखली पाहिजे. जर्मन विचारकार निश् जातिसंस्थेचा कैवार एवढ्याच करता घेतो व जर्मनीत जातिसंस्था स्थापावी म्हणून कंठरवाने प्रतिपादितो. सध्या जातिसंस्थेत अवगुण माजले असतील ते वेणून काढून गुणाचे रोपटे जेणे करून फोफावेल तो उपाय योजिणे समाजशास्त्रसंमत व इतिहासशास्त्रसंमत होईल.

(२२) मराठा क्षत्रिय, मराठा कुणबी, शूद्र कुणबी व नागवंशी महार बहुप्रज पडल्या कारणाने, अल्पसंख्यांक ब्राह्मणांना व महाराष्ट्र क्षत्रियांना संस्कृत भाषा सोडून मराठ्यांची मराठी भाषा स्वीकारावी लागली. महाराष्ट्र क्षत्रियांनी राजकीय स्वामित्व मराठ्यांवर गाजविले, तर उलट मराठ्यांनी आपली भाषा या सम्राटांवर लादिली, तेव्हा नाग महाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांची उपेक्षा करून भागणार नाही असे महाराष्ट्र क्षत्रियांच्या व ब्राह्मणांच्या लक्षात आले. ते गुलाम झाले तर ब्राह्मणक्षत्रियांना गुलाम व्हावे लागे. त्यांच्यात साथीचे रोग' दुष्काळ व अज्ञान पसरले, तर ब्राह्मणक्षत्रियांनाही त्यांच्याबरोबर उपाशी मरावे लागे व आडमुठे बनावे लागे. ते अजाणपणे जी बाजू घेत ती बाजू विजयी होई.

त्यांनी मुसुलमानांची बाजू पोटाकरिता उचलली तेव्हा यावनी सत्ता देशात प्रचलित झाली. त्यांनी शहाजीची बाजू पोटाकरिता धरली तेव्हा यवनांचा पाडाव झाला. आणि शिवाजीची साथ जेव्हा त्यांनी महाराष्ट्रधर्माभिमानाने केली तेव्हा स्वतंत्र महाराष्ट्रराज्य उभारले गेले. त्यांनी चित्पावनांशी फारकत केली तेव्हा चित्पावनी साम्राज्य लंगडे झाले. तात्पर्य, महाराष्ट्रदेशाचे गुरुत्वमध्य उपरिनिर्दिष्ट चार जातींच्या ठायी आहे आणि ते म्हणतील ती, बहुत कालांतराने का होईना, पण पूर्वदिशा होते. करता, शहाजीशिवाजींनी ह्या जातीचे साहाय्य पैदा केले आणि मराठा तेवढा मेळवावा हा सिद्धान्त रामदासांनी उच्चस्वराने पुकारिला.

# मराठे व इंग्रज

## ( मराठेशाहीचे शतसांवत्सरिक वाङ्मयश्राद्ध )

लेखक

**नरसिंह चिंतामण केळकर**

उपोध्दात

**वासुदेव वामन खरे**

प्रथमावृत्ती १९१८ मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे मूळ प्रस्तावना

पाचवी आवृत्ती १९६३ मूल्य १० रु. पृष्ठे २४

इतिहास संशोधक, कवी, नाटककार, चरित्रकार इ. नात्यांनी कै. वासुदेवशास्त्री वामन खरे (५ ऑगस्ट १८५८ ते ११ जून १९२४) यांची बहुविध वाङ्मयनिर्मिती आहे. 'शिवसंभवा'सारखी पाचसहा ऐतिहासिक स्वरूपाची नाटके, ऐतिहासिक लेखसंग्रहाचे १४ खंड, यशवंतराव महाकाव्य, नाना फडणीसाचे चरित्र ही त्यांची पुस्तके जशी गाजली तशीच 'मराठे व इंग्रज' या केळकरकृत ग्रंथाला त्यांनी 'उपोध्दात' नामक लिहिलेली विस्तृत, चिकित्सात्मक व मराठेशाहीच्या ऱ्हासाची निर्भीड मीमांसा करणारी प्रस्तावनाही गाजली. ती जशीच्या तशी पुनर्मुद्रित करावी इतकी विचारप्रवर्तक आहे.

महाराष्ट्राचा नुसता इतिहास समजावून देणारी पुस्तके बऱ्याच लोकांनी लिहिली आहेत; परंतु त्याहूनही अधिक महत्त्वाचे काम सदर विषयावर सविस्तर, स्वतंत्र टीकाप्रबंध निर्माण करणे हे होय. असले बिकट काम रा. रा. नरसोपंततात्या केळकर या अधिकारी गृहस्थांनी हाती घेऊन पार पाडिले याबद्दल वाचकवर्ग त्यांचा ऋणी आहे. असल्या ग्रंथातून स्थल, काल व व्यक्ती यासंबंधाचे निर्देश क्वचित बिनचूक नसले तरी ती गोष्ट मुद्द्याची नसल्यामुळे त्या त्या ठिकाणच्या ऊहापोहाला वैगुण्य येत नाही. प्रत्येक स्थळी साधकबाधक प्रमाणे दाखवून ग्रंथकार आपले म्हणणे कित-पत सिद्ध करितो एवढेच मुख्यत्वे पहावयाचे असते. आणि तशा दृष्टीने पहाणाऱ्याला रा. रा. नरसोपंत केळकर यांनी प्रकरणश: केलेली चर्चा मुद्देसूद व समर्पक आहे हेच मान्य करावे लागेल. ग्रंथकाराच्या या चर्चेपासून निष्पन्न होणारा तात्पर्यार्थ, मराठ्यांचे राज्य इंग्रजांनी का व कसे घेतले, हाच होय. आताच्या काळात या विषयाचे महत्त्व निव्वळ ऐतिहासिक आहे हे उघडच आहे. तरी त्याच्या चिंतना-पासून ‘ पुढच्यास ठेच मागचा शहाणा ’ या न्यायाने आजमितीससुद्धा फारच बोध घेता येण्याजोगा आहे या विषयावर मी चार शब्द लिहावे अशी ग्रंथकाराची इच्छा दिसल्यामुळे उपोद्घाताच्या रूपाने तसे करीत आहे.

हे पुस्तक पाहिल्याबरोबर पहिली गोष्ट मनात येते ती हीच की, हे शतसांवत्स-रिक वाङ्मयश्राद्ध म्हणून जे केले आहे ते अंतरित श्राद्ध होय ! याची खरी तिथी (म्हणजे तारीख) ३१ डिसेम्बर सन १९०२ ही होय. कारण, मराठी साम्राज्याच्या स्वातंत्र्याचा लोप होऊन त्या तारखेस बरोबर शंभर वर्षे झाली ! सन १८०२ सालच्या शेवटच्या दिवसाने स्वराज्याच्या स्वातंत्र्याचा शेवट पाहिला ! सर्व स्वतंत्र मराठी राज्यास पूर्वीपासून ‘ शिवशाही ’ हे नाव चालत आले आहे. हा शब्द कसाही धेडगुजरी असला तरी तो व्यापक व अर्थपूर्ण आहे ! या शिवशाहीला हुकमतीत वागवून तिचे स्वस्तिक्षेम संभाळण्याचा ज्यांचा अधिकार त्या बाजीराव पेशव्याने सन १८०२ च्या डिसेंबर महिन्याच्या ३१ व्या तारखेस इंग्रजांशी वसईचा तह करून त्यांचा आश्रय व ताबेदारी संपादन केली ! शिवशाहीच्या स्वातंत्र्यसौभाग्याचा कुंकुमतिलक तिच्याच त्या नादान पोराने त्या तहाच्या चिटोऱ्याने पुसून टाकला !

सन १८१८ साली मराठी राज्य नष्ट झाले हे म्हणणे खरे नाही. कारण अजूनसुद्धा दोनअडीच कोटी रुपये उत्पन्नाचे मराठी राज्य आहेच ! परंतु त्या राज्याला आता कोणी शिवशाहीचा भाग म्हणत नसून तो ब्रिटिश साम्राज्याचा एक घटकावयव आहे असेच मानण्यात येते. पेशवाई बुडाल्यामुळे पुष्कळ श्रीमंत घराणी धुळीस मिळाली, हजारो लोकांचे अन्न गेले, ही गोष्ट वाईट झाली हे खरे; परंतु नागपूरचे राज्य खालसा झाले त्यापेक्षा पेशवाई नष्ट झाली या गोष्टीला अधिक किंमत देता येत नाही. बाजीराव जर इंग्रजांशी सरळपणाने वागता तर दुसऱ्या कित्येक मराठी संस्थानांप्रमाण त्यांचेही संस्थान कदाचित अद्यापिसुद्धा जिवंत

राहिले असते. परंतु शिवशाहीच्या दृष्टीने त्याची किंमत केव्हाहीं शून्यच ठरली असती !

शिवशाहीचे स्मरण १९०२ मध्ये होवो अगर १९१८ मध्ये होवो ते शतसांवत्सरिक असो, प्रतिवार्षिक असो अगर प्रत्यही होणारे असो; जेव्हा जेव्हा हे स्मरण महाराष्ट्रात जन्म पावलेल्या कोणाही मनुष्यास होते, तेव्हा तेव्हा तो आपल्या मनास खेदाने व आश्चर्याने असा प्रश्न करितो की, हे गतकालीन राज्यवैभव इतक्या अल्पावकाशात कसे नष्ट झाले ? मोठें मोठें विशाल बुद्धीचे मुत्सद्दी व महापराक्रमी सरदार शिवशाहीत हयात होते ते सर्वच अदूरदृष्टी होते की काय ? इंग्रजी हल्ल्यापासून स्वराज्याचा बचाव करण्याचा उपाय कोणीच कसा आगाऊ योजून ठेविला नाही ? परद्वीपाहून आलेल्या मूठभर इंग्रजांनी शिवशाही पादाक्रांत केली हे घडले तरी कसे ?

या प्रश्नांची उत्तरे आजपर्यंत अनेकांनी अनेक दिली आहेत ती सर्वच खरी आहेत असे नाही. काही तर अगदीच अप्रयोजक आहेत; पण बऱ्याच उत्तरांत सत्याचा थोडाबहुत अंश निर्विवाद आहे. असल्या त्या सर्व उत्तरांवर सविस्तर टीका या ग्रंथात आलीच आहे. तरी विषयाचे स्वरूप वाचकांच्या लक्षात अधिक स्पष्टपणे यावे म्हणून त्याची निराळ्या तऱ्हेने मांडणी केल्यास ती रा. केळकर यांच्या टीकेस अधिक पोषकच होईल.

मराठ्यांच्या कर्तबगारीमुळे महाराष्ट्र जरी एका काळी महत्तर राष्ट्र बनले होते, जरी हे मराठे लोक एका काळी सर्व हिंदुस्थानाला अजिंक्य भासत होते, तरी त्यांनासुद्धा इंग्रजांनी जिंकले, यावरून इंग्रजांच्या अंगी नसणारे काही विशेष राजकीय दुर्गुण मराठ्यांच्या अंगी जन्मसिद्ध असले पाहिजेत. काही विशेष गैरसोईच्या परिस्थितीने त्यांचे हातपाय जखडले गेले असले पाहिजेत. आणि अशा दुर्गुणांचा व परिस्थितीचा फायदा इंग्रजांस मिळाला असला पाहिजे हे स्पष्ट आहे. तर असे हे मराठ्यांचे दुर्गुण कोणते होते व त्यांच्या परिस्थितीत कोणत्या गैरसोई होत्या याचा आपण विचार करू

मराठ्यांमधला प्रमुख दुर्गुण म्हटला तर देशाभिमानाचा बहुतांशी अभाव हा होय. या सद्‌गुणाची पैदासच जर मुळी हिंदुस्थानात अत्यल्प होते, तर महाराष्ट्राच्या वाटणीस त्यातला कितीसा अंश यणार ! आम्ही लोक गरीब व भाबडे असल्याचे सर्व जगाला प्राचीन काळापासून माहीत आहे कोणीही परके लोक आम्हांवर स्वाऱ्या करोत आणि आमची राज्ये बळकावोत, आमच्या ग्रामसंस्था, धर्मसमजुती. रीति-रिवाज, वतनहक्क, यांत राज्यकर्ते जेथपर्यंत हात घालत नाहीत तेथपर्यंत ते लोक कोण आहेत, काय करितात, याची पंचाईत आम्ही करीत नाही ! धार्मिक बाबतीत परमतसहिष्णुता हा दुर्गुण आहे हे आम्हाला ठाऊक आहे; पण राजकीय बाबतीत परचक्रसहिष्णुता हा अमोलिक सद्‌गुण आहे हे आम्हाला ठाऊक नाही ! शिवाजीपासून

शाहूच्या कारकीर्दीस सुरुवात होईपर्यंत मराठे लोकांत देशाभिमानाचे वारे खेळत होते असे पुष्कळांस वाटते; पण त्या वृत्तीला देशाभिमान हे नाव देण्यापेक्षा राज्याभिमान हेच नाव देणे अधिक योग्य आहे ! कारण की, महाराजांच्या फौजेतले मराठे जर मुसलमानांशी एकनिष्ठेने लढत होते तर त्यांचेच आणखी जे भाऊबंद मुसलमानी फौजांत होते तेही तितक्याच एकनिष्ठेने महाराजांच्या फौजांशी लढत होते ! शाहूच्या कारकीर्दीत राज्याच्या दोन वाटण्या झाल्याबरोबर या राज्याभिमानाचेही दोन तुकडे झाले ! शाहूच्या मरणोत्तर मराठी राज्याचे आणखी तुकडे होऊन पेशवे, भोसले, गायकवाड, आंग्रे, प्रतिनिधी, सचिव, कोल्हापूरकर इत्यादि संस्थाने झाली, आणि त्याही संस्थानांतून शिंदे, होळकर, पटवर्धन, रास्ते इत्यादि आणखी सरंजाम निर्माण झाले; त्याबरोबर वर सांगितलेल्या राज्याभिमानाचेही आणखी बारीक बारीक तुकडे होत होत शेवटी तो अदृश्य झाला ! पेशवाईच्या काळात राज्याभिमान अस्तित्वात होता म्हणावे तर त्या राज्याचे शत्रु निजामअल्ली व हैदरअल्ली यांच्या पदरी हजारो मराठे शिलेदार व सरदार होते; आणि ते पेशव्यांशी लढताना त्यांचे नुकसान करण्यात बिलकुल कसूर करीत नव्हते ! पेशवाईबद्दल ब्राह्मणांना तरी अभिमान होता म्हणावे तर तेही पेशव्यांनी वैरभाव धरणाऱ्या जाट, रोहिले, रजपुत, इंग्रज, फेंच, इत्यादी लोकांच्या पदरी राहून पेशवाईचे अकल्याण करण्यास प्रवृत्त होतच होते ! ईस्ट इंडिया कंपनीची मुंबईखात्याची पायदळ पलटणे पेशवाईची रयत असलेल्या मराठ्यांचीच होती आणि यापैकी हजारो लोक इंग्रजांच्या वतीने समरांगणात पेशवाई फौजांशी लढताना मृत्यु पावले आहेत ! याच्या उलट इंग्रजांचा देशाभिमान कसा प्रखर व जागृत होता हे सुप्रसिद्धच आहे. एका इंग्रज डॉक्टराने बादशहाच्या मुलीला औषध देऊन बरे केले तेव्हा बादशहा खुषीने त्या डॉक्टराला लाख पन्नास हजार रुपये देता; परंतु डॉक्टराने दुसरे काही बक्षीस न घेता बादशहास अर्ज केला की, माझ्या देशच्या लोकांस तुमच्या राज्यात व्यापाराची सवलत द्या म्हणजे मला बक्षीस पोचले ! मीर जाफरच्या मृत्युपत्रामुळे क्लाइव्हला मिळालेल्या पैक्याचा विनियोग त्याने आपल्या देशच्या लष्करी अंमलदारांच्या उपयोगार्थ केला आणि खडर्याच्या लढाईनंतरचा तह ठरवितेवेळी निजामअल्लीने नाना फडणवीस यास तीस हजार रुपये उत्पन्नाचे गाव दिले ते त्याने स्वतःकरिता खुशाल ठेवून घेतले !

चारचौघांनी मिळून एखादी संस्था चालविण्याची अगर एखादा कारभार पार पाडण्याची आम्हाला सवय नाही; यामुळे तसले कार्य आमच्या अंगावर पडलेच तर ते एकचित्ताने चालवणे आमच्या हातून निभत नाही. मतभेद व तट पडून शेवटी तंटे होतात, पुष्कळ वेळा ते तंटे विकोपास जाऊन भलताच अनर्थ ओढवतो, हे आपण नेहमी पाहतो. जी गोष्ट हल्लीच्या व्यवहारात तीच पूर्वीच्या राज्यकारभारात घडून येत होती ! शिवाजी दिल्लीस गेला तेव्हा मोरोपंत पेशवे व अण्णाजी दत्तो सचिव यांजवर राज्याचा कुलअख्त्यार सोपवून गेला होता. पण त्या दोघात

मत्सर व द्वेष उत्पन्न झाल्यामुळे राज्यकारभार सुरळीतपणे चालेनासा झाला! शिवाजी लौकरच परत आल्यामुळे त्या दुहीचा त्या वेळी वाईट परिणाम झाला नाही, तरी पुढे तो संभाजीच्या कारकिर्दीत झालाच! राजारामाने संतजीस मुख्य व धनाजीस दुय्यम सेनापती नेमून त्यांवर सैन्याचा सर्व कारभार सोपविला असता त्या दोघात चुरस वाढून संताजी मारला गेला! शाहूच्या कारकीर्दीत सेनाकर्ते व सेनापती यांची एका मोहिमेवर रवानगी झाली असता भांडणे होऊन सेनाकर्त्यावर मोठाच संकटाचा प्रसंग ओढवला होता! प्रत्येक स्वारीतला पत्रव्यवहार पहा, हाताखालच्या सरदारांनी मुख्य सरदारांशी वाकून वागावे, कुचरपणा करावा, फंदफितुर करावा, असे कधी घडून आले नाही, असा प्रसंग फारच विरळा! बारभाईंच्या कारस्थानाचा कसा बोजवारा झाला! नाना, बापू, मोरोबा व चिंतो विठ्ठल कसे कसे भांडले, आणि शेवटच्या दोघांनी आपल्या सोबत्यांवर सूड उगवण्याच्या हट्टास पडून पेशवाई इंग्रजांच्या घरात घालण्याचा कसा घाट घातला होता हे प्रसिद्धच आहे. इंग्रज लोकांत असे तंटे होत नाहीतसे नाही; नेहमी होतात. परंतु समूहस्वरूपाने कामे करण्याचे त्यांच्या अंगवळणी पडले असल्यामुळे त्यांचे तंटे विकोपास जाऊन उद्दिष्ट कार्याचा घात होण्याचे भय नसते.

समूहस्वरूपाने आम्ही केलेलो कार्ये यशस्वी होत नसल्यामुळे आमचे राज्यतंत्र पाश्चात्त्यांप्रमाणें संस्थाप्रधान असू शकत नाही; तर ते व्यक्तिप्रधानच असावे लागते. म्हणजे बुद्धिमान, उत्साही, निग्रही अशा एखाद्या प्रबळ व्यक्तीने पुढे सरून मुख्याधिकारी व्हावे आणि इतरांनी त्याच्या प्रेरणेने कामे करावी हेच आमच्या प्रकृतीला मानवते. पण जेव्हा अशी एखादी प्रबळ व्यक्ती अधिकारारूढ होते तेव्हा आधी प्रथम ती व्यक्ती तो अधिकार आपल्या घराण्यात कायमचा राहील असाच बंदोबस्त करून टाकते! असे एका कुळातले अधिकारी एकामागून एक चांगले निपजले तर राज्यतंत्र उत्तमच चालते. पण तसे घडले नाही, एखादी व्यक्ती वाईट निघाली, तर ते एकदम कोसळते! शिवाजीने माणसे तयार केली, किल्ले बांधले, सेना व आरमार निर्माण केले, प्रत्येक खात्याच्या शिस्ती बांधून दिल्या, सर्व काही केले; पण मागून संभाजी गादीवर येताच मागची पंचवीस-तीस वर्षांची मेहनत मातीमोल झाली! बाळाजीपंत नानांपासून माधवरावांपर्यंत एकामागून एक चार पेशवे चांगले निर्माण झाले त्यामुळे पेशवाईचे राज्यतंत्र ठीक चालले. पण त्यामागून राघोबाची उत्सवमूर्ती पुढे येताच तंटे-भांडणांचा सुकाळ होऊन राज्यास कायमची उतरती कळा लागली! नाना फडणीस हे मराठ्यांतले अद्वितीय कारस्थानी पुरुष होते, महादजी शिंदे मराठ्यांतले अद्वितीय सेनानायक होते, हे खरे; पण ते मेल्यावर पुढे काय? पुढे सारा अंधार! त्याची अक्कल व त्याची करामत त्यांच्याबरोबरच गेली ती गेलीच!

ईस्ट इंडिया कंपनीसारख्या संस्थेत असा प्रकार कधी होऊ शकत नाही. तिचा

प्रमुख अधिकार आधी अयोग्य माणसाच्या हाती जातच नाही; आणि गेलाच तरी तो माणूस संस्थेच्या कायद्यांनी चोहोकडून जखडून गेला असल्यामुळे संभाजी अगर बाजीराव याप्रमाणे स्वच्छंदाने वागू शकत नाही. संस्थेच्या कारभारात कालमानाप्रमाणे नेहमी नवे जुने होत असते. त्यात नवा उत्साह, नव्या कल्पना, नवे मार्ग यांची भर पडत असते. त्यामुळे तिचा जोम व व्याप कायम राहून क्रियासातत्य अविछिन्न राहते. एकसत्ताक राज्य चांगले की अनेकसत्ताक राज्य चांगले, या वादाशी येथे काही कर्तव्य नाही. पेशवाईचे राज्यतंत्र अव्यवस्थित व व्यक्तिप्रधान होते, आणि ईस्ट इंडिया कंपनीचे राज्यतंत्र सुव्यस्थित व संस्थाप्रधान होते. पहिल्याचा उत्साह मावळत चालला होता. तर दुसऱ्याचा अधिकाधिक वर्धमान होत होता, एवढेच आम्हाला सांगावयाचे आहे.

आमच्या लोकांत ज्ञानार्जनाची हौस नाही, नवीन कल्पना बसवावी, नवीन शोध लावावे, हा हव्यास आम्हाला नाही. कोणी कल्पक अगर शोधक मनुष्य निघालाच तर पडेल तो पैका खर्च करून त्या मनुष्यास उत्तेजन देऊन त्याची कल्पना अगर शोध व्यवहारात आणावा याची जरूरीच आम्हाला भासत नाही ! दुसऱ्याचे नुसते अनुकरण करण्याची बुद्धी मात्र आम्हात आहे, एवढे खरे. तोफखान्याचीच गोष्ट घ्याना ! युरोपियन लोक तोफा मारण्यात पटाईत आहेत, तोफांच्या बळावर त्यांना फारच आश्चर्यकारक करामत करून दाखविता येते, हे युरोपियन आरमारे इकडे प्रथम आली तेव्हा आम्हाला कळले. याला प्रत्यंतर तोफेच्या मरामतीकरिता माणसे लागतात, त्यांना पेशवाईत दर्यावर्दी व खलाशी हीच नावे होती, आणि इंग्रजी फौजेतसुद्धा या कामावरच्या हिंदी लोकांस 'लॅस्कार' असेच म्हणत असत; असो. आम्ही गोरे लोकांच्या आरमारापासून तोफा विकत घेतल्या, काही येथे ओतविल्या, आणि दारूगोळासुद्धा त्यांच्याच सांगण्याप्रमाणे तयार करू लागलो. पण पुढे त्या बाबतीत उत्तरोत्तर आम्हांस सुधारणा करता यावी ती काहीएक आली नाही; त्यामुळे या कामात इंग्रजांची अगर फ्रेंचांची बरोबरी आम्हाला कधी करता आली नाही. ते हरहमेशा सुधारणा करत गेले आणि एकदा कधी फिरंग्यांनी सोळाव्या शतकात कित्ता घालून दिला तोच आम्ही वळवीत बसलो ! इंग्रजांनी विजयदुर्ग घेतला, मागून दहा वर्षांनी मालवण घेतले तरी आम्ही 'इंग्रजाने आगळीक करून मालवण घेतले. फारच शेफारला ! वाढते मोडतच आहे.' असे चरफडण्यापलीकडे अगर 'शिवलंका (शिवाजीने पाण्यात वसविलेले लंकेप्रमाणे असाध्य स्थळ ) होती. किल्ला निर्मिल्या तागायत दुसरियास साध्य झाला नव्हता.' म्हणून दुःखोद्गार काढण्यापलीकडे काय केले ? पुनः आणखी दहा वर्षांनी साष्टी घेतली, तरी आम्ही सावध झालोच नाही. व तोफांच्या बळावर आमच्या किल्ल्यांचे रक्षण कसे करावे हे आम्ही शिकलो नाही ! मग सिंहगड, पुरंदर, रायगड, वासोटा इत्यादि किल्ले इंग्रजांनी आम्हांपासून भराभर हिसकावून घेतले त्यात दोष कोणाचा ? बरे, तोफा

ओतणारे कारागीर अगर दारूगोळा तयार करणारे अगर चापाच्या बंदुका तयार करणारे कल्पक लोक आमच्यात नव्हते असेही नाही! पुण्याच्या तोफखान्यात पाहिजे तेवढाल्या तोफा व गरनाळा युरोपियन व देशी कारागीर ओतून देत असत. हे तर राहोच, पण मिरजेसारख्या किल्ल्यातसुद्धा लागतील तशा तोफा ओतून घेता येत असत आणि कुलपी व दुसऱ्या कित्येक प्रकारचे गोळे, एकसारख्या तास पाऊण तास जळणाऱ्या चंद्रज्योती आणि बाण व दारू तयार होत असे. पंचरसी तोफा ओतण्याची मजुरी तिच्या वजनावर दर शेरास शंभर रुपये याप्रमाणे आकारली जात असे, असे आम्ही जुने दप्तर चाळताना वाचल्याचे स्मरते. यापेक्षा इंग्रजी तोफा विकत घेतल्या तर त्या स्वस्त पडत त्यामुळे गरजू सरकारे आयत्या वेळी त्याच विकत घेत! झीज सोसून स्वदेशी माल घ्यावा व देशी कारागिरांस उत्तेजन द्यावे हे तत्त्व त्यावेळीसुद्धा पसंत नव्हतेच!!!

तोफखान्याची शिस्त अशी म्हणण्याजोगी पेशवाईत फारशी असल्याचे त्या वेळच्या लेखात दिसून येत नाही. पानशांनी कधी कुठे तलवार (अथवा खरे बोलायचे तर तोफ!)मारली होती त्याच लौकिकावर ते पेशवाईच्या अखेरीपर्यंत तोफखान्याचे दरोगे होते! त्यांच्या तोफांचा चांगुलपणा त्या तोफांनी पूर्वी कधीकाळी दाखविलेल्या करामतीवर मोजला जात असे! मग हल्लीची करामत कशीही असो. एखाद्या वेढ्यात मराठी तोफांचा किल्ल्यावर भयंकर भडिमार होण्याचे भय नव्हतेच! कारण दारूगोळ्याच्या खर्चावर दरोग्याची काकदृष्टी नेहमी फिरत असायची; शिवाय फार बार केले तर तोफा फुटतील अगर बिघडतील ही मोठीच पंचाईत होती! असल्या जुन्या तोफा आणि 'कृष्णमृत्तिके'ची टंचाई असल्यावर मग काय विचारावे? आमच्या फौजाचे मोर्चे एखाद्या किल्ल्यास बसले म्हणजे मोर्च्यात गोलंदाजांनी एकदा तोफेचा बार काढून पुनः बार भरून ठेवावा, मग चिलीम ओढावी, घटका दोन घटका गप्पागोष्टी कराव्या, इकडे तिकडे थोडे हिंडावे मग तोफेजवळ जाऊन भरलेला बार सोडावा आणि दुसरा भरून ठेवावा, पुनः चिलीम, गप्पा वगैरे प्रकार व्हावे! याप्रमाण सायंकाळपर्यंत दहापाच बार काढून तोफ तळावर आणून पोचती केली म्हणजे संपला रोजगार! या लिहिण्यात अतिशयोक्ती बिलकुल नाही. इंग्रज प्रेक्षकांनी जें लिहून ठेवले आहे त्याचाच उद्धार आम्ही येथे केला आहे व जुना पत्रव्यवहार आम्ही जो वाचिला आहे त्यावरून अशीच वहिवाट असल्याचे अनुमान निघते. सन १७७४ पासून १७८१ पर्यंत पेशवाई फौजांची इंग्रजांशी राहून राहून सहा वर्षे लढाई सुरू होती. तीत पानशांनी दहापाच वेळा तरी इंग्रजी फौजेवर तोफांचा म्हणण्याजोगा एलगार केला असल्यास फारच म्हणावयाचे! हरिपंततात्यांची तोफा मारण्याची शक्कल या युद्धात काही निराळीच होती. ते लांब पल्ल्याच्या फारच मोठ्या तोफा नेऊन त्यांचा मारा इंग्रजी फौजेवर दीडदोन कोसांवरून करीत! इतक्या लांबून हे काम करविण्याचा हेतू

एवढाच की, सुदैवाने टोपीवाल्याला एकदोन गोळे लागले तर त्याची शेपन्नास माणसे मरतील. तसे नाही झाले तरी निदान त्याचा हल्ला आल्यास आगाऊच तोफा काढून पिछाडीस पोचविता येतील !

कोणी म्हणेल की, तोफखान्याच्या कामातली हेळसांड तुम्ही वर्णन करिता ही निदान दौलतराव शिंद्याला तरी लागू नाही. कारण त्याचा तोफखाना इंग्रजांच्या बरोबरीचा होता हे खुद्द इंग्रजांनीच कबूल केले आहे. होय; हे म्हणणे खरे आहे. पण त्यावरून आमचे हिंदी लोक तोफा मारण्यात इंग्रजांच्या बरोबरीला आले होते असे मात्र सिद्ध होत नाही. कारण शिंद्याचा तोफखाना फ्रेंच व इंग्रज अंमलदारांनी तयार केलेला असून त्याची वहिवाटसुद्धा तेच लोक करीत होते; आणि असल्या परस्वाधीनपणामुळे अखेर शिंद्याचा फायदा न होता घातच झाला ! कारण, त्या परकी लोकांपैकी पुष्कळ असामी शिंद्यास आयते वेळी दगा देऊन इंग्रजाकडे निघून गेले ! खुद्द सर्व पलटणांवरचा मुख्य मुसा पिरू यानेच सर्वांआधी इंग्रजांशी सूत जुळवून विलायतचा रस्ता सुधारल्यावर त्याने घातलेले तोफा व बंदुका तयार करण्याचे कारखाने आयतेच दारूगोळ्यासह इंग्रजांच्या हाती अल्प श्रमाने लागावे, यात नवल हे काय ?

लढाईत तोफांचा घोडेस्वारापेक्षा पायदळाशी निकट संबंध असतो. कारण, शत्रूचा हल्ला आल्यास तोफांचा बचाव पायदळच करू शकते. हल्ला करणारे पायदळ कवाइती असेल तर बचाव करणारे पायदळही कवाइतीच पाहिजे हे अगदी खरे; तथापि हैदरअल्लीच्या कवायती पायदळाची कवाईत बेताबाताचीच असल्यामुळे माधवराव पेशव्यांच्या अखेरीपर्यंत पायदळ पलटणे तयार करण्याची आवश्यकता पुणे दरबारास भासली नाही, आणि केव्हाही झाले तरी अशी कायमची पुष्कळ पलटणे ठेवण्याची पेशवेसरकारास सोयही नव्हती ! याचे कारण बहुतेक पेशवाईराज्य सरजामात वाटले गेले असून ते सरंजाम घोडेस्वारांचे होते. काही मुलुख सरकारात होता त्याच्या उत्पन्नातून खर्चवेच भागवून शिवाय इंग्रजांच्या लढाईकरिता पलटणांची तरतूद करणे अशक्य होते. सरंजाम कमीजास्त करावे, स्वार कमी करून पायदळ वाढवावे, तर राजपत्री म्हणजे महाराजांनी दिलेल्या सरंजामात विनाकारण हात घालण्याचा अधिकार खुद्द पेशव्यास नव्हता, तो नानास कोठून असणार ? अशी स्थिती असल्यामुळे वसई, कल्याण वगैरे कोकणातल्या मुलुखाचा इंग्रजांपासून बचाव करण्यासाठी नानाने दहापंधरा हजार हंगामी पायदळ चारदोन वर्षे बाळगले होते ते अशिक्षितच होते. त्या पायदळात सिंधी, रोहिले, अरब, पुरभय्ये वगैरे सर्व परदेशी लोक होते !

घोडेस्वार हे पायदळास पूर्वीपासून तुच्छ मानीत आले आहेत. इंग्रजांशी सालबाईच्या तहापर्यंत ज्या लढाया झाल्या त्यात गनिमी काव्याने मराठ्यांचा बराच बचाव झाला. प्रत्येक एका इंग्रजास दहावीस मराठे असे प्रमाण पडत गेल्यामुळे

राघोबास पेशवाईवर स्थापण्याच्या कामी इंग्रजांचा कट चालला नाही. त्यावरून पायदळ पलटणे चाकरीस ठेवून त्यांची विद्या नवीन प्राप्त करून घेण्यापेक्षा आपली जुनी गनिमी पद्धतच फार चांगली असा नाना, पाटीलबावा, फडके, पटवर्धन इत्यादिकांचा ग्रह होऊन बसला; परंतु पुढे लौकरच टिपूशी लढण्याचा प्रसंग आला व त्याच्या कवायती फौजेची जय्यत तयारी मराठी मुत्सद्द्यांच्या व सरदारांच्या कानी येऊ लागली, तेव्हा त्यांचा तो ग्रह डळमळू लागला! पुढे सन १७७६ मध्ये टिपूवर मोगल व मराठी फौजा घेऊन हरिपंततात्या चालून गेले. त्या खेपेस टिपूने तोफांच्या भडिमाराने मराठी व मोगल फौजा हैराण केल्या, आणि छापे घालघालून त्यांची फार दुर्दशा केली! त्या सुमारास हिंदुस्थानात पाटील बावांनी डिबाईन या फ्रेंच सरदाराकडून सहजगत्या दोन पलटणे तयार करविली होती. आसपासच्या जमीनदारास दहशत बसविण्यापुरतीच ती तरतूद होती. दक्षिणेतून टिपूच्या लढाईची वर्तमाने जो जो शिंद्याच्या कानी लागली तो तो आलेल्या अपयशाचे परिमार्जन करण्याकरिता टिपूवर स्वारी करण्याची पाळी आपणावर कधी तरी येणार असे त्यांच्या मनात येऊ लागले. त्या वेळी दिल्लीच्या बादशहाचे राज्य त्याच्या वहिवाटीस असल्यामुळे असली कवाईत शिकलेली विदेशी फौज बादशहाचे नाव पुढे करून त्यास ठेवता येण्याजोगी होती व त्याप्रमाणे त्याने पुष्कळ पलटणे व त्यांना लागणारा तोफांचा सरंजाम दोनतीन वर्षात तयार करविला. सन १७९१ त महादजी शिंदा देशी आला तेव्हा श्रीरंगपट्टणच्या स्वारीत सामील होण्याची त्याची तयारी झाली होती; परंतु तो पुण्यास येतो तो टिपूशी तह होऊन फौजा परत फिरविल्याची वर्तमाने आली; त्यामुळे तो बेत तितकाच राहिला. कवाइती पलटणांच्या जोरावर इंग्रजांवर पगडा बसविण्याची शिंद्यास इच्छा झालीच नसेल असे म्हणवत नाही. पण ती पलटणे ठेवताना मूळ उद्देश निराळा होता एवढेच येथे सांगावयाचे आहे.

शिंद्यांच्या या नवीन कवाइती फौजेतले अंमलदार इंग्रज व फ्रेंच जातीचे असून त्यांनी ती फौज फारच चांगल्या तयारीला आणली होती. तथापी असली फौज ठेवण्यापासून इंग्रजांशी लढताना शिंद्यास फायदा व्हावयाचा तो झाला नाही. दौलतराव शिंदा म्हणे की, मी इंग्रजांशी माझी पलटणे लढवीन; आणि रघोजी भोसला म्हणे की, माझ्याजवळ पलटणे नाहीत, मी गनिमी तऱ्हेनेच लढणार! शिंद्याजवळ घोडेस्वार पुष्कळ होते, तेही भोसल्याप्रमाणेच बोलत होते; परंतु युद्धाचा बेत व त्याची तरतूद कोणीच केली नसल्यामुळे भोसल्याची गनिमी राहिली, शिंद्याच्या घोडदळाची बाजू विरघळली, आणि इंग्रजांचा सर्व मारा पलटणावरच येऊन पडला! आधीच काही पलटणे व सरदार आयत्या वेळी शिंद्यास सोडून इंग्रजास मिळाल्यामुळे लढाईच्या मसलतीची घडी विसकटली होती. त्यातून काय पलटणे राहिलीसाहिली तीही एखाद्या लढाईत एकत्र होण्याचा योग आला नाही!

थोड्या थोड्या पलटणाच्या आसई, अल्लीगड, लासवारी वगैरे ठिकाणी इंग्राजशी लढाया झाल्या त्यात त्या पलटणाचा मोड झाला.

शिंदे व भोसले यांस इंग्रजांशी लढण्याचा प्रसंग आला तेव्हा त्यांनी होळकरास सामील करून घेण्याविषयी यत्न करण्याची पराकष्ठा केली. तथापि त्या वेळी तो त्यास अनुकूल झाला नाही; लढाईचा तमाशा पहात स्वस्थ राहिला. पण पुढच्याच वर्षी इंग्रजांच्या लढाईची वाणी एकटचा होळकरावर येऊन बेतली तेव्हा तो संकटात पडला ! आपणास साहाय्य करण्याविषयी मराठी राज्यातल्या सर्व सरदारांस त्याने पत्रे पाठविली होती. अशा पत्रांपैकी परशुरामपंत प्रतिनिधीस त्याने जे पत्र पाठविले त्यात लिहिले आहे की, ' आजपर्यंत हिंदू राज्य सर्वत्रांनी एकदिल राहून चालविले. अलीकडे ज्याचे त्याचे दौलतीत गृहकलह होऊन राज्यास विपर्यास पडून हिंदुधर्म नाहीसा होण्यास मूळ झाले. याचे छेदन करण्यास सर्वत्र एकदिल झाले पाहिजे; तरच मूळाचे छेदन होऊन स्वधर्माचार पूर्ववत्प्रमाणे चालून हिंदूंची कायमी राहील. इकडील क्रम जो आरंभिला आहे हाच यावद्देह चालवावा असे मनात आहे. यात परमेश्वर अनुकूल होऊन जे घडवील ते खरे ! परंतु एकानेच असा प्रकार करून सर्वत्रांनी तमासे पाहून आपापली दौलत सांभाळून असावे, यातील परिणाम कसा हे मनी विचारून ज्यात हिंदुधर्माची कायमी व परिणामास नीट ते करावे ! याचा विचार तुम्हांसारख्यानी न केला तरी दुसरे कोण करितील ?' या पत्रातले विचार योग्य आहेत. पण ते आदल्याच वर्षी होळकरास सुचले असते व तो शिंदे-भोसल्यास मनापासून हातभार लावता तर किती चांगले झाले असते !

मराठ्यांनी परकी लोकांचा तोफखाना, परकी लोकांचे कवाइती अथवा आरबांसारखे अशिक्षित पायदळ, व बडे बडे परकी अंमलदार चाकरीस ठेवून त्यांच्या भरावर राज्याचा बचाव करण्याची आशा धरली ती कशी निष्फळ झाली याचे एवढा वेळपर्यंत विवेचन केले. हाच पैका ज्यांना ' मावळे ' अशी सामान्य संज्ञा होती त्या देशी पायदळावर खर्च करून व त्यावर देशी अंमलदार नेमून ते पायदळ उजगारीला आणिले गेले असते तर त्याचा काहीच उपयोग झाला नसता काय ? पण ते पडले देशी ! ते कोणाच्या नजरेत भरणार ? पठाण, अरब, रोहिले, रांगडे यांना पगार सातपासून दहा रुपयेपर्यंत आणि मावळ्यांना पगार तीन किंवा चार रुपये ! परदेशी लोकांनी आमच्या मोहिमा कराव्या आणि मावळ्यांनी आमची कोठी, देवघर आणि बायकापोरे सांभाळावी ! हेच मावळे इराण–दुराणातल्या काबूल–कंदाहारातल्या कडव्या धिप्पाड जवानांना शिवाजीच्या हयातीत काळाप्रमाणे भासले, आणि पेशवाईत तेवढे नादान ठरले, हे खरे की काय ? तसे म्हणावे तर हेच मावळे जगात उत्कृष्ट लढवय्ये म्हणून नाणावलेल्या इंग्रज व फ्रेंच वगैरे लोकांच्या खांद्यास खांदा भिडवून सांप्रतच्या महायुद्धात बरोबरीने लढतात,

आणि जर्मनांससुद्धा चीत करू शकतात, हेही निदर्शनास आलेच आहे ! योग्य उत्तेजन व शिक्षण मिळाल्यास येथपर्यंत याची पात्रता आहे हे पेशवाईत कोणास-देखील खरे वाटले नसते ! यावर इंग्रज अंमलदार म्हणतील की, हा महिमा मावळ्यांच्या मर्दुमीचाही नव्हे, अथवा त्यांच्या शिक्षणाचाही नव्हे. ते शिक्षण त्यांना आम्ही देतो, लढाईत आमच्या हुकमतीखाली त्यांचे सारे कामकाज होते, सबब या यशाचे मालक आम्ही आहो ! पण पलटणाची मुख्य अंमलदारी देशी लोकास मिळून ते लढाईत काय करू शकतात, हे पाहण्याची संधीच जर मुळी आम्हांला मिळत नाही, तर इंग्रज अंमलदार म्हणतात तेच खरे, असे आम्ही तरी का मानावे ?

First Maratha War या शब्दाचा अर्थ 'इंग्रजांचे मराठ्यांशी पहिले युद्ध' असा होता. परंतु हे इंग्रजांचे युद्ध सर्व मराठ्यांशी घडून आले, म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीचे सर्व मराठी साम्राज्याशी युद्ध झाले, असे मात्र मुळीच नाही ! पेशवाई म्हणजे 'शिवशाही' अथवा सर्व मराठी राज्य नव्हे, मात्र शिवशाहीचा तो एक मोठा भाग होय, हे आपण पुष्कळ वेळा विसरतो. सर्व मराठी साम्राज्यावर पेशव्यांची हुकमत चालावी असे शाहूने ठरवून दिले होते खरे, पण त्या हुकमतीने काही मर्यादा ठेवलेल्या होत्या. आणि त्या मर्यादांचे उल्लंघन पेशव्यांसही करिता येणे शक्य नव्हते. शाहू मरण पावला तेव्हा राज्यात पेशवे, भोसले, गायकवाड, आंग्रे, सावंत, प्रतिनिधी, सचिव, अक्कलकोटकर व आणखी कित्येक सरदार असून या सर्वांचे लहानमोठे पृथक् पृथक् सरंजाम होते, आपण मेल्यावर या सरदारांस कोणी शास्ता नाहीसा झाल्यामुळे हे सरकारचाकरी करणार नाहीत, राज्याची वाढ व उत्कर्ष होण्याचे बंद होईल, हे आपसांत भांडून राज्याचे वाटोळे करितील, असे मनांत आल्यावरून आपल्या मरणोत्तर सर्व राज्यावर देखरेख ठेवणारा कोणी अधिकारी नेमावा असा शाहूने विचार ठरविला. भोसले अथवा गायकवाड हे शाहूच्या जातीचे असल्यामुळे या दोघांपैकी कोणाच्या तरी गळ्यात हे काम अडकवून द्यावे असे त्याच्या मनात होते. पण आपल्याच्याने पेशव्यांशी स्पर्धा चालविणे होणार नाही, असे समजून ते दोघेही त्या वेळी तो मुख्याधिकार पतकरण्यास धजले नाहीत. मग शाहूने निरुपाय होऊनच राज्याची वडीलकी पेशव्यांच्या हवाली केली; आणि त्यांस सनद दिली की, तुम्ही सरकारी फौज व तिचे जेवढे म्हणून सरदार आहेत त्या सर्वांवर हुकमत चालवून राज्य संभाळावे व परमुलुखी स्वाऱ्या कराव्या. सरंजामदाराच्या अंतर्गत कारभारात तुम्ही हात घालू नये, व जेथपर्यंत ते राज्याची इमानाने चाकरी करीत आहेत तेथपर्यंत त्यांच्या त्यांच्या सरंजामाचे मुलुख बिनबोभाट त्यांजकडे चालवावे. माझा चुलत भाऊ संभाजी यास कोल्हापूरचे संस्थान निराळे तोडून दिले आहे ते त्यांजकडे स्वतंत्र तसेच राहू द्यावे. इनाम, वर्षासन, नेमणूक, वतन वगैरे जे जे म्हणून मी व माझ्या पूर्वजांनी दिलेले आहे ते ते सर्व

शिरस्त्याप्रमाणे ज्याचे त्याजकड चालवावे.

यावरून हे लक्षात येईल की, परचक्राचे निवारण करण्याकरिता व परमुलुखावर स्वारी करण्याकरिता गायकवाड व भोसले इत्यादि सरदारांच्या फौजा चाकरीस बोलावण्याचा पेशव्यांस अधिकार मिळाला होता, आणि जर ते त्याचा अधिकार न मानतील, परचक्रास मिलाफी होऊन बंड अथवा फंदफितूर करतील, तर त्यांचे शासन करून त्यांचे सरंजाम खालसा करण्याचा अधिकारही पेशव्यांच्या हाती आला होता. शाहूच्या सनदेप्रमाणे राज्यावर हुकमत चालविण्याचा हा अधिकार नानासाहेब व माधवराव यांनी आपल्या सामर्थ्याप्रमाणे चालविला. परंतु तोच अधिकार कारभारी या नात्याने नाना फडणवीस यास चालविण्याचा प्रसंग आला तेव्हा त्यांना कोणी जुमानीनासे झाले! आमचा राज्यकारभार व्यक्तिपुरता असल्याचे पूर्वी सांगितलेच आहे. ज्या त्या व्यक्तीचे कर्तृत्व ज्या त्या व्यक्तीपुरते! शाहूचा दरारा नानासाहेबात नव्हता. आणि नानासाहेबांचा माधवरावात नव्हता. मग माधवरावांचा दरारा नानासारख्या कारभाऱ्यात कोठून असणार?

इंग्रजांशी लढाई सुरू झाली तीत गायकवाडांनी त्यांशी निराळा तह करून आपला बचाव करून घेतला. आंग्रे व सावंत, उदासीनच होते. भोसले गोड बोलले तरी आतून इंग्रजांस अनुकूल होते. त्या वेळी त्यांनी पेशव्यांस काडीचीही मदत केली नाही. कोल्हापुरकर तर सांगूनसवरून विरुद्ध होते. सचिवांना नोकरीची माफीच होती. अक्कलकोटकर व प्रतिनिधी हे चाकरीवर धाकदपटशामुळे का होईना, पण हजर रहात; तरी त्यांची पथके लहान आणि अर्थात उपयोग थोडाच! ज्यांचे सरंजाम पेशव्यांनी उत्पन्न केले, असे सरदार विंचुरकर, राजेबहाद्दर, रास्ते, पटवर्धन, धायगुडे, बिनीवाले, इत्यादी होत. या सर्वांची मिळून पंधरापासून वीस हजारापर्यंत फौज होती. शिवाय हुजुरातीचे जुने मानकरी सरदार थोरात, घोरपडे, पाटणकर, दरेकर वगैरे होते; त्यांची किरकोळ पथके चाकरीवर होती. त्या साऱ्यांची संख्या पाचदहा हजार होईल. ही पेशव्यांची दक्षिणेतील फौज झाली. उत्तरेकडच्या फौजेत शिंदे व होळकर हेच मुख्य होत. त्यांत होळकरांचा सरंजाम साडेचौऱ्याहत्तर लक्षांचा आणि शिंद्यांचा साडेपासष्ट लक्षाचा. त्या दोघांची मिळून चाळीसपासून पंचेचाळीस हजारापर्यंत फौज होती. त्यातली निम्मी तिकडच्या मुलुखाच्या संरक्षणार्थ ठेवून बाकीची निम्मी बीसबेवीस हजार त्यांस दक्षिणेत आणता येण्याजोगी होती. शिवाय पेशवेसरकारच्या पागा पुण्याच्या आसपास असत ते तीनपासून चार हजारापर्यंत स्वार होते. ही पेशवेसरकारची खडी फौज झाली. एवढ्या फौजेच्या बळावर म्हटले तर पेशव्यांना त्या वेळची इंग्रजी फौज जेरीस आणणे कठीण नव्हते. पण नानाच्या कारकीर्दीत एवढ्या मोठ्या फौजेला इंग्रज आवरता आवरता पुरे वाट झाली! याचे कारण नानासाहेबांच्या वेळच्या वीस हजार स्वारांचा दम या वेळच्या पन्नास हजार फौजेत उरला नव्हता हेच होय.

आधी मुळी पुरंदरचा तह ठरेपर्यंत वर्ष दीड वर्षाच्या अवधीत शिंदे, होळकर यांनी स्वस्थ बसून मौज पहाण्याखेरीज काहीच केले नाही. ते पुणेदरबारशी फटकून होते इतकेच नव्हे तर राघोबास साधेल त्या तऱ्हेने मदत करण्यास तयार होते ! पुरंदरचा तह ठरल्यानंतर मात्र महादजी शिंद्याने पेशवाईच्या संरक्षणाचा जो बाणा धरला तो मरेपर्यंत सोडला नाही. वडगावच्या लढाईत, गुजराथच्या स्वारीत, माळव्यांतल्या लढायात त्याने फारच चांगली मर्दुमकी केली व इंग्रजांवर आपला दरारा बसविला. नानास त्यांची आर्जवे करावी लागत, लहर संभाळावी लागे, तो मागेल ते द्यावे लागे हे खरे; पण पण त्याने मन घालून सरकारचे काम केले हे काही खोटे नाही. होळकराकडे पहावे तर त्याने बोरघाटाखाली लढाई झाली, त्याखेरीज दुसरी काही नाव घेण्यासारखी कामगिरी केली नाही एवढेच नव्हे, तर मध्यंतरी मोरोबादादास मिळून पेशवाईवर मोठेच संकट आणण्याचा त्याने घाट घातला होता ! दक्षिणेच्या फौजेत पटवर्धनांची व हुजुरातवाल्यांची फौज बऱ्यापैकी होती व त्यांनी कामकाजही चांगले केले. बाकीचे सरंजामी होते, त्यांचे लक्ष टाकभाड्याचे काम करून कसे तरी दिवस काढण्याकडे होते, असेच म्हणावे लागते. दक्षिणेतल्या पुष्कळ पथकांत व होळकरांच्या फौजेत निकृष्ट प्रतीच्या स्वारांचा भरणा फार झाला असल्याचा बोभाटा झाला होता. सरकारचे लाचखाऊ कारकून असल्याही स्वारांची गणती घेत ! त्या गणतीचे वर्णन कोणी थट्टेखोराने असे केले आहे की, घोड्याचे चार आणि माणसांचे दोन असे सहा पाय दिसले की घाला त्याचे घोडेस्वारात नाव! गणतीच्या कारकुनाची मूठ दाबली म्हणजे घोडें दहा रुपयांचे असो की वीस रुपयांचे असो. स्वार म्हणवणारा लष्करचा भडभुंजा असो की भिस्ती असो, ते कशाला तो पहातो आहे ! घोडें म्हणजे घोडे आणि स्वार म्हणजे स्वार ! ! ! हे वर्णन थट्टेचे असले तरी खऱ्या वस्तुस्थितीहून फारसे भिन्न नव्हते ! फौजेची संख्या वाढविण्याखेरीज असल्या स्वाराचा दुसरा काहीच उपयोग नव्हता. छाती करून तरवार मारावी, इंग्रजांची पलटणे कापून काढावी, त्यांच्या तोफा घ्याव्या, त्यांची रसद बंद करावी, हा हुरूप एवढ्या मोठ्या फौजेत फारच थोड्या सरदारांच्या अंगी दिसून येत होता. ज्याला त्याला माझें घोडे, माणूस कसे बचावेल हीच काळजी !

मराठी फौजेंची ही स्थिती लक्षात आली म्हणजें इंग्रजाचे गतिस्वातंत्र्य कायम राहिले, ते दोनदा मराठ्यांच्या फौजेस न जुमानता पुण्यावर चालून आले, त्यांनी अनेक वेळा त्यावर हल्ले करून त्यास हुसकून लावले, त्यांची दहशत न बाळगता डभई, अहमदाबाद, वसई इत्यादि किल्ले घेतले, याचे काहीच आश्चर्य वाटत नाही ! वडगावच्या लढाईत इंग्रजांचा पराजय झाला. जनरल गॉडर्ड याचे लष्कर लुटून व त्याचे शिपाई मारून मराठ्यांनी त्यास हैराण केले, नापारच्या लढाईत त्यांनी इंग्रजांच्या पलटणात शिरून कत्तल केली, हे मराठ्यांचे पराक्रम त्यांच्या संख्येच्या व पूर्वीच्या लौकिकाच्या मानाने काहीच नव्हते !

माधवराव पेशव्यांचा अकाली मृत्यु पानपतच्या युद्धाप्रमाणेच मराठ्यांस घातक झाला असे इतिहासलेखक ग्रॅन्ट डफ म्हणतो. ते अगदी खरे आहे कारण की, तो पेशवा मरण पावल्यापासून राज्यात अव्यवस्था आणि लष्करी कारभारात ढिलाई व बेकैदी जी एकदा उत्पन्न झाली ती अखेरपर्यंत कधी नाहीशी झालीच नाही ! सवाई माधवराव प्रौढ वयाचा असता आणि तो माधवरावाप्रमाणे तरतरीत बुद्धीचा आणि हिय्याचा माणूस असता तर ही अस्वस्थता व बेकैदी मुळीच उत्पन्न झाली नसती. पण तो बाल्यावस्थेत आहे, त्याच्या घरात भाऊबंदकी सुरू झाली आहे, व इंग्रजां-सारखे परचक्र राज्याला ग्रासू पहात आहे, असे दृष्टीस पडताच चोहीकडे दंगे-खोरांनी उचल खाल्ली ! हे दंगेखोर म्हणजे कोणी भुरटे चोर नसून त्यापैकी काही संस्थानिक होते ! त्यांच्या पदरी हजार –पाचशे जमाव असून शिवाय कित्ये-कांच्या ताब्यात किल्ले व ठाणी होती. बारभाईंनी राघोबाचे उच्चाटन केल्यापासून सालबाईचा तह ठरेपर्यंत सात आठ वर्षे या संस्थानिकांनी व इतर दंगेखोर जातीच्या नाइकांनी सर्व राज्यात बेबंदशाही माजवून रयतेस त्राही त्राही करून सोडले ! कृष्णे-पलीकडे कोल्हापूर राजमंडळाचे दंगे, कित्तूर, शिरहट्टी, डंबळ येथील देसायांचे दंगे, पूर्वेकडे सुरापुरच्या बेरडांचा दंगा, सातारा प्रांती रामोश्यांचा दंगा, पुणे–जुन्नरकडे कोळ्यांचा दंगा, नाशिक व खानदेश प्रांती भिल्लांचा दंगा असे एक ना दोन किती सांगावे ! त्या दंग्याच्या कावटळीत पटवर्धन, रास्ते, धायगुडे विंचुकर, राजबहाद्दर होळकर या सर्वांच्या सरंजामाचे मुलूख सापडले होते व त्यामुळे त्यांची फार दुर्दशा झाली होती. मुलुखातून वसूल येईना, आणि फौज तर ठेवायला पाहिजे आणि तिचे पोट चालावयाला पाहिजे अशी स्थिती झाल्यामुळे सरंजामी सरदारांस काही सुचेनासे झाले. इंग्रजांशी लढताना जो तो सरंजामी आपापल्या ठिकाणी विचार करी की, या इंग्रजांच्या पलटणांवर मी हल्ला केला तर ती कापून काढीन अथवा हटून मागे येईन. ते कसेही होवो, पण या घटकेच्या खेळात माझी पाचशे घोडी पडली तर त्यांची वाट काय ? पाचशे घोड्यांचा पैका तीन लाख रुपये होतो. एका घटकेच्या जुगारात मी हे तीन लाख रुपये घालविले तर सरकार काही मला ते देत नाही. कारण, सरकारचीच मुळी अन्नान्नगत झाली आहे. ते मला काय देणार ? सरं-जामातून तर दंग्यांमुळे पैका येत नाही; मग हा पैका भरून निघायचा कसा ? उद्या शिलेदार आमची घोडी तरी द्या, नाही तर त्यांची किंमत तरी द्या, म्हणून दारात धरणे देऊन बसले तर प्राण देण्याची पाळी येईल ! याकरिता हिय्या करण्याच्या भरीस न पडता मागे मागे रहाण्यातच सुरक्षितपणा आहे ! ज्या दंग्याधोप्यांमुळे क्षात्रवृत्तीस काळिमा आणणारा हा प्रसंग या मानी सरंजामदारांवर ओढवला ते दंगेधोपे सरंजामी पद्धतीमुळेच उत्पन्न झाले होते !!!

शाहूने व पेशव्यांनी सरदारांस मोठमोठाले प्रांत व तालुके देण्याची वहिवाट सुरू केली त्यामुळे सरदारांचे सरकारी कामावरचे लक्ष उडून आपापल्या सरंजामा-

कडे वेधले गेले. ते मगरूर होऊन धन्यास उलटचा गोष्टी सांगू लागले आणि स्वतंत्र होण्याची संधी पाहू लागले. त्यामुळे राज्यातले ऐक्य नाहीसे होऊन राज्य बुडाले असे पुष्कळ लोक म्हणतात, ते सर्वांशी खरे नाही; तसेच सरंजामी पद्धत सुरू केल्याचा दोष एकटचा शाहूवर अथवा पेशव्यांवरही लादणे वाजवी नाही. मध्यवर्ती सत्ता खंबीर असली म्हणजे सरंजामी काय आणि इतलाखी काय, सर्वच नोकर नम्र व कर्तव्यतत्पर असतात. शिवाजीने आपल्या सरदारांस सरंजाम दिले नसले तरी देशमुखीसारखी वतने दिली होती; आणि त्या वतनांबद्दल सरदारांस लष्करी चाकरी करावी लागे. ही वतने म्हणजे लष्करी सरंजामच नव्हेत काय? त्यावेळी सर्व हिंदुस्थानात कमी जास्त मानाने ही सरंजाम देण्याची पद्धती प्रचलीत होती. गुजराथ, माळवा, बुंदेलखंड यातले संस्थानिक आपणास दिल्लीच्या बादशहाचे सरंजामदारच म्हणवीत होते. रोहिले, पठाण व शीख यांचे सरदार सर्व सरंजामीच होते. मग शाहूने अगर पेशव्यांनी रोख पैका देण्याची सोय नसल्यामुळे आपल्या सरदारांना सरंजाम तोडून दिले यात काय बिघडले?

सरंजामी पद्धत जारीने अंमलात आल्यामुळे तिच्यायोगाने परिणामी राज्यास बळकटी यावी ती न येता दुर्बळपणाच आला असे मीही म्हणतो. पण माझ्या म्हणण्याचा अर्थ मात्र निराळा आहे! अजमासे १७२०–२५ पासून १७६० पर्यंत मराठ्यांच्या परमुलुखी स्वाऱ्या होत होत्या. जो मुलुख ज्या सरदाराने काबीज करावा तोच मुलुख त्या सरदारास महाराजांनी सरंजाम करून द्यावा. पुन्हा त्या सरदाराने आणखी मुलुख घेतला तर तोही फौजेच्या खर्चाकरता महाराजांनी सरंजाम म्हणून नेमून द्यावा, असे होऊ लागले; तेव्हा शूर व उत्साही सरदारांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न होऊन परमुलुखावर स्वाऱ्या कराव्या, लढाया माराव्या, लुटीवर पोट भरावे आणि प्रदेश काबीज करवेल तो महाराजांकडून सरंजाम म्हणून मिळवून आपली सरदारी कायम करावी; आपले घराणे कीर्तिमंत व वैभवसंपन्न करावे, असे ज्या त्या सरदाराच्या मनात येऊ लागले. नंतर हजारो स्वारांच्या झुंडी गोळा करून हे सरदार यंदा माळवा, पुढच्या वर्षी गुजराथ, त्याच्या पुढच्या वर्षी दुसराच एखादा प्रांत, याप्रमाणे निरनिराळ्या प्रांतात मोहिमा करू लागले. शाहूमहाराजांनी आपल्या हयातीत जे हे मोहिमांचे सत्र सुरू करविले तेच पुढे नानासाहेब पेशव्यांनी चालू ठेविले. त्याचा परिणाम असा झाला की, दक्षिणेकडे म्हैसूर, अर्काट, त्रिचनापल्लीपर्यंत आणि उत्तरेस दिल्ली, पंजाब, आग्रा, अयोध्या, रोहिलखंडपर्यंत सर्व देशांतून मराठ्यांचा व्याप पसरला. पण मराठ्यांनी जर हे एवढे राज्य १७२० पासून १७६० पर्यंत मिळविले तर ते पुढच्या चाळीस वर्षात घालवूनही टाकले! ईस्ट इंडिया कंपनीने इ.स. १६०० पासून १८०० पर्यंत २०० वर्षात जेवढे राज्य मिळविले तेवढे राज्य मराठ्यांनी चाळीस वर्षात कमावले! मात्र मराठ्यांचे राज्य थोड्याच काळात नष्ट झाले आणि कंपनीचे राज्य अद्यापी कायम असून

उत्तरोत्तर त्याचा उत्कर्ष होत आहे. महापूर आला म्हणजे नदीचे पाणी आसपास चार-पाच कोस पसरते आणि मग ओसरता ओसरता अखेरीस उन्हाळच्यात पात्रात-सुद्धा पाण्याचा बिंदू रहात नाही, त्याप्रमाणे मराठी राज्याची स्थिती झाली!

सरंजाम मिळविण्यासाठी परमुलुख जिंकून राज्य वाढविण्याची सरदारांना हाव सुटली नसती, किंवा महाराज छत्रपतींनी तसे न करण्याविषयी त्यांस उत्तेजन देण्या-ऐवजी 'आहे तेच राज्य प्रथम चिरस्थायी करा, त्यातली बंडें मोडा, शिस्त बसवा, कायदेकानू चालू करा, हाच मुलुख भरभराटीस येऊ द्या, मग दुसऱ्या प्रांताला हात घाला,' अशी सक्त ताकीद दिली असती, तर राज्य इतके वाढले नसते हे खरे; परंतु त्याला बळकटी आली असती यात काही संशय नाही. जिकडे सूर लागेल तिकडे मोहीम करून भालेराई गाजवण्याच्या फंदात पडलेल्या मराठे सरदारांना लाहोरावर स्वारी करण्यास फावले, आणि बालेघाटाचा मुलुख – ज्याला साधु-संतांची जन्मभूमी व खरोखरीचे प्राचीन महाराष्ट्र म्हणता येईल तो पैठण, औरंगा-बाद, नांदेड, जालना, बीड वगैरे मुलूख –ताब्यात घेण्याची फुरसत मिळाली नाही. शांततेच्या काळात मराठ्यांचे राज्य सर्वत्र होते आणि अस्वस्थतेच्या काळात कुठेच नव्हते अशी दशा होण्याचे कारण कोणताही प्रांत मराठ्यांच्या ताब्यात पूर्ण-पणे आला नव्हता हेच होय.

पूर्वी मुसलमानी राज्यात हकदार व वतनदार लोकांचे मोठे प्राबल्य असे व वसुलाच्या कामात त्यांनी सरकारच्या आहारी पडण्याऐवजी सरकारच त्यांच्या आहारी पडलेले असे. हे देशमुख, देशपांडे, देसाई, सरदेशपांडे वगैरे प्रत्येक प्रांताचे मुलकी अधिकारी गाव, किल्ले व गढ्या बळकावून बसले होते व आपापल्या वत-नाचा वसूल सरकारास न विचारता परभारे करण्याची त्यास सवय लागली होती. कर्नाटकाच्या बाजूस मराठ्यांनी ज्या ज्या परगण्यात स्वाऱ्या केल्या त्या त्या पर-गण्यात असलेल्या बखेडेखोर, देसाई वगैरे लोकांची बंडे तशीच राहू दिली; आणि भिल्लाणात व गोंडवनात भिल्लांची व गोंडांची आणि बुंदेलखंडात बुंदेल्यांची संस्थाने निर्बंध राहू दिली, ती राज्यात नेहमी अस्वस्थता उत्पन्न होण्यास कारणी-भूत होत असत. तुंगभद्रेपलीकडे टिपूचे राज्य होते तेथेही पूर्वी असेच देसाई वगैरे प्रबळ पाळेगार होते. परंतु टिपूने त्यांचा बीमोड करून आपले सर्व राज्य निष्कंटक करून टाकले होते. त्यामुळे मराठे, मोगल व इंग्रज यांशी वर्षानुवर्ष त्याचे युद्धप्रसंग होत असताही त्याच्या राज्यात कधी दंगा झाला नाही! अशा निष्कंटक राज्याचा उपभोग मिळत असल्यामुळे टिपूच्या एकतंत्री, एकसूत्री राज्याचे सामर्थ्य इतके वाढले की, तो वर सांगितलेल्या तिघाही शत्रूंस म्हणजे मराठे, मोगल व इंग्रज यास आवरेनासा झाला.

मराठी राज्यात वारंवार दंगे व क्रांती होण्याचे आणखी एक कारण असे होते

की, त्या राज्यात राजकीय संबंधाच्या मिळकतीवर – मग ती मिळकत एखाद्या पाटलाची असो, वा सरदाराची असो – कोणाचा वारसा चालावा हे ठरलेले नव्हते ! फार काय सांगावे, पण खुद्द छत्रपतींचे सिंहासनसुद्धा या अशाश्वतीच्या संकटातून मुक्त नव्हते ! भावाभावात ज्याच्या मनगटाचा जोर चालेल त्याने वडिलार्जित उत्पन्न खाते अगर अधिकार भोगावा अशी त्यावेळची वहिवाट होती. सरकारातून योग्य माणसाची निवड प्रथम होई; परंतु जर मागून त्या माणसाच्या भावाने 'मी अधिक नजराणा देतो, मलाच तो अधिकार द्या,' असे म्हटले तर फायद्यावर नजर देऊन सरकार त्याचेही म्हणणे कबूल करायला कचरत नसे ! शाहू व ताराबाईचा पुत्र शिवाजी यात राज्याचा योग्य वारस कोण याबद्दल हल्ली आम्ही वाटेल तितका वाद करू, पण त्या काळची माणसे असली चर्चा कधीच करीत नव्हती ! ती म्हणत की, ताराऊचा मुलगा शिवाजी हा जसा थोरल्या शिवाजीचा नातू, तसाच शाहूदेखील थोरल्या शिवाजीचा नातूच आहे. दोघेही योग्य वारस आहेत. ज्याची सरशी होईल त्याला आम्ही मुजरा करू ! पेशव्यांच्या घरात नानासाहेब व भाऊसाहेब यांच्यामध्ये वाकडे आले तेव्हा कोल्हापूरच्या संभाजीने भाऊसाहेबास पेशवाईची वस्त्रे दिली. ती वस्त्रे देण्याचा संभाजीला आणि घेण्याचा भाऊसाहेबाला वाजवी हक्क नव्हता असे कोणीच मानले नाही ! भाऊसाहेबांच्या वर्तनाला आम्ही 'पेशवाईविरुद्ध बंड' असे नाव ठेवून तो भयंकर गुन्हा समजू; पण तसे त्यावेळी खुद्द नानासाहेब पेशव्यांनासुद्धा वाटले नाही ! सरदारीबद्दल भांडण लागले म्हणजे लोक एवढेच पहात की, वादीप्रतिवादी हे मूळ संपादकाचे योग्य वारस आहेत की नाहीत ? ते तसे असल्यास मग त्यांच्या भांडणात काही फायदा दिसल्याशिवाय आपणास पडण्याचे कारण नाही अशीच लोकांची समजूत होती ! गायकवाडांच्या घरात भांडण लागले व ते सरकारात आले म्हणून फत्तेसिंह व गोविंदराव यात एकमेकांवर चढ करून नजराणा भरावा लागला. भोसल्यांच्या घरात भांडणे लागली ती त्यांनी सरकारात आणली नाहीत म्हणून सरकारने त्यात लक्षही घातले नाही. सरकारचे म्हणणे की, भांडणारे चौघे भाऊ जानोजीचे पुत्र असल्यामुळे सर्वांचा हक्क सरदारीवर आहेच. तंट्याचा निकाल होऊन जो शेवटी सर्वमान्य ठरेल त्यालाच आम्ही सरदारीची वस्त्रे देऊ म्हणजे झाले ! सवाई माधवराव व राघोबादादा यांत भांडण लागले असता गायकवाड व भोसले वगैरे पेशवाईबाहेरचे सरदार त्या भांडणात पडले नाहीत याचे कारण हेच होय.

जातिद्वेषामुळे राज्य गेले असे जे म्हणतात ते कोणाच्या जातिद्वेषामुळे कोणचे राजकारण बिघडले हे काहीच सांगू शकत नाहीत. मराठ्यांच्या राज्यकारभारात भिन्न जातींच्या लोकांचे संबंध नेहमी एकत्र येत होते, त्या अर्थी खरे पाहिले तर या जात्यभिमानाचा परिणाम राजकारणावर नेहमी होत असला पाहिजे; पण तसा तो झाल्याचे इतिहासात कोठेही नमूद नाही. यावरून राज्यनाशाशी जातिभेदाचा

काहीएक संबंध नाही, व तो केव्हाही राजकारणाच्या आड येत नाही, असे सिद्ध होते. फार झाले तर इतिहासातल्या एकदोन गोष्टींचा जातिभेदाशी संबंध जोडता येईल. पैकी पहिलीतला पुरावा ऐकीव माहितीचा व संशयग्रस्त आहे. ती गोष्ट नारायणराव पेशव्यांच्या खुनासंबंधाची होय. नारायणरावाने प्रभूंचा छळ केला म्हणून त्यास प्रभूंनी गारद्यांकडून मारविले असे काही जुन्या प्रभू मित्रांच्या तोंडून मी ऐकले आहे. पण या गोष्टीला सदरहू मित्रांच्या सांगण्यापलीकडे काही पुरावा नाही. दुसरी गोष्ट मात्र अनुमानाने खरी धरता येण्याजोगी आहे. शाहूने मरते वेळी पेशव्यास मुख्याधिकाराची सनद दिली ती तुळाजी आंग्रे मानीनासा होऊन त्याने पेशव्यांशी बिघाड केला; तो आरमाराच्या व किल्लेकोटांच्या भरावर पेशव्यास कस्पटाप्रमाणे लेखीत असे; सबब पेशव्याने पाच चार वर्षे उद्योग करून अखेरीस मुंबईकर इंग्रजांच्या मदतीने त्यांचे राज्य घेतले व त्यास सहकुटुंब कारागृहात घातले. पण यात बहुतेक लोकांना माहीत नाही अशी गोष्ट ही आहे की, तुळाजी आंग्रे हा चित्तपावनांचा कट्टा द्वेष्टा असून तो त्याचा फार छळ करू लागला होता! तुळाजीची हद्द बाणकोटापासून विजयदुर्गापर्यंत होती व हा टापू तर चित्तपावनाचे माहेरघर होय! पेठे, फडके, परचुरे, रास्ते, भावे, देशमुख, घोरपडे, जोशी, बारामतीकर जोशी, सोलापूरकर जोशी, बर्वे, पटवर्धन, मेहेंदळे, भानू, लागू इत्यादि पेशवाईतील दरबारी व सरदारी लोकांची मूळ घराणी याच टापूतली आहेत. आपल्या अधिकारास न जुमानणाऱ्या प्रतिनिधीला आणि दमाजी गायकवाडाला पेशव्याने त्यांचे सरंजाम खालसा न करता सोडून दिले आणि तुळाजीचा मात्र समूळ उच्छेद केला, यावरून पेशव्यांच्या वर्तनाला जात्यभिमानाची काही तरी प्रेरणा असावी असे अनुमान करणे अन्यायाचे होणार नाही. हा चित्तपावनांचा द्वेष तुळाजीच्या मृत्यूबरोबरच शांत झाला. पेशवाईत पुढे कोणी तुळाजीचा संप्रदाय चालवणारा सत्पुरुष उत्पन्न झाला नाही. हल्लीच्या काळात मात्र कोणा देशीविदेशी लोकांच्या अंगात तुळाजीचा समंध संचारत असल्याचा केव्हा केव्हा भास होतो!

कोणत्या गुणांच्या अभावामुळे आम्ही इंग्रजांसारख्या युरोपियन राष्ट्रास कुंठीत करू शकलो नाही, असल्या राष्ट्राने टक्कर दिली असता ती सोसवण्याचे सामर्थ्य आमच्या राज्यात का राहिले नव्हते, याची मीमांसा एवढा वेळ करण्यात आली. तिच्याच अंगत्वाने कारस्थानाच्या बाबतीत इंग्रजास आम्हावर का यश मिळवता आले हे सांगणे ओघासच येते. मुंबई व सुरत या बंदराबाहेर इंग्रजांचा व्याप नव्हता तेव्हाच शिवाजीने त्यास तेथून का घालवून दिले नाही, हे आपले राज्य घेतील हे ओळखून हिंदी राजे-रजवाड्यांनी या परकी लोकास प्रथमपासून का जरबेत ठेवले नाही, इत्यादी प्रश्न उपस्थित करणारे लोक त्या वेळची वस्तुस्थिती लक्षात घेत नाहीत. त्या काळातल्या लोकांची ज्ञानमर्यादा सामान्यतः किती आकुं-

चित होती याचा विचार केला म्हणजे व्यापाराकरिता आपल्या देशात आलेल्या त्या गोऱ्या लोकांचे खरे स्वरूप ध्यानात न आल्याबद्दल कोणासही दोष देता येत नाही. गोरे लोक व्यापारासाठी वखार बांधायला जागा मागतात, रुमालाने हात बांधून नम्रतेने उभे राहतात, पायावर डोके ठेवतात, इतकेच त्या त्या हिंदी स्थानिक अंमलदारांच्या दृष्टीस पडले ते त्यांनी खरे मानले. या व्यापाऱ्यांना वखारीकरता जागा दिली तर हे स्वतःकरिता आमच्या मुलखाची भली मोठी वखार बनवून टाकतील, ज्या रुमालाने त्यांनी स्वतःचे हात बांधले आहेत त्याच रुमालाने ते आमच्या मुसक्या आवळतील, हे आज पायावर डोके ठेवतात पण उद्या आमच्या डोक्यावर पाय ठेवतील, असल्या विचित्र कल्पना ते स्थानिक अंमलदार किती धूर्त असले तरी त्यांच्या मनात कशा याव्या ?

व्यापाराचे निमित्त करून हेच इंग्रज युरोपखंडाच्या कोनाकोपऱ्यात कोठेही पाय ठेवते, तर हे कोण, कशाकरिता आले, ही चौकशी तत्काळ होऊन त्यांचे तेथून उच्चाटन झाले असते ! पण हिंदुस्थानच्या समुद्रकिनाऱ्यावर इंग्रज वगैरे युरोपियन लोक किल्ले बांधून राहिले होते तरी शेपन्नास वर्षे त्यांजकडे कोणी ढुंकून पाहिले नाही ! याचे कारण हिंदुस्थान हा अफाट देश, त्यात अठरापगड जात, शिवाय त्यातच मुसलमान, पारशी, ख्रिस्ती, ज्यू इत्यादि परधर्मी लोकांची खिचडी झालेली, शिवाय या देशात शेकडो राज्ये व हजारो संस्थाने ! अशा स्थितीत इंग्रज व फरेंच वगैरे अनोळखी लोक येथे येऊन राहिले तर ते खरोखर व्यापाराकरिता आले आहेत की कशाकरिता आले आहेत याची चौकशी कोण करणार ? कोणाचे झाले तरी चालू व्यवहारावर लक्ष असणार, इंग्रज स्वतःस व्यापारी म्हणवतात तर त्यांशी व्यापारच करावा ! अधिक पंचाईत करण्याचे काय कारण ? त्यांनी किल्ले बांधले म्हणून संशय घ्यावा तर कोणीही लुंगासुंगा पाळेगार गड्या, ठाणी बळकावून धटाईच्या गोष्टी सांगतच असतो; त्यातलेच हे ! असलेच विचार कोणाच्याही झाले तरी मनात येणार. त्यातून इकडच्या राजेरजवाड्यास या परकी लोकांशी स्नेहभावाने वागणेच अधिक फायदेशीर वाटत होते कारण, या परकी लोकांच्या व्यापारामुळे आपले जकातीचे उत्पन्न वाढते, लागेल तो परदेशी जिन्नस हे आणून देतात, आणि सर्वात मुख्य गोष्ट ही की, हे उत्तम गोलंदाज व उत्तम लढवय्ये असून शिवाय स्नेहाखातर तोफा व दारूगोळा विकीत असल्यामुळे संकटाच्या वेळी यांचा मोठाच उपयोग होण्याजोगा होता !

सन १७३७ त मराठ्यांनी पोर्तुगीज लोकांपासून साष्टी घेतली त्या दिवसापासून साष्टीवर मुंबईकर इंग्रजांचा डोळा होता. किल्लेदारास लाच देऊन अथवा अन्य काही युक्तीने निदान बळजबरीनेसुद्धा साष्टी घ्यावयाचीच असे ठरवून योग्य संधीची प्रतीक्षा करीत ते बसले होते. मध्यंतरी माधवराव व राघोबा यांच्या

कलहापासून आपल्याला या बाबतीत फायदा करून घेता येईल असे त्यास वाटत होते; परंतु ती त्यांची आशा निष्फळ झाली. शेवटी नारायणराव पेशव्याचा खून होऊन पेशवाईत तारांबळ उडालेली पहाताच मुंबईकर इंग्रजांनी साष्टीस वेढा घालून तो किल्ला काबीज केला !

अडचणीच्या वेळी मुंबईकर इंग्रजांनी पेशव्यास गाठले व आपला हेतू सिद्धीस नेला. यापेक्षा पेशवाई भरभराटीत असता अगर निदान माधवरावाच्या कारकोर्दीत जरी मराठ्यांचे व इंग्रजांचे युद्ध जुंपले असते, तरी ते मराठ्यांस अधिक श्रेयस्कर झाले असते. पण तसे घडून आले नाही हा इंग्रजांचा दैवयोगच समजला पाहिजे ! पानपतचे युद्ध जर झाले नसते, तर पेशव्यांची स्वारी बिहार व बंगाल याच प्रांतावर झाली असती. कारण, हिंदुस्थानात त्या दोहोखेरीज दुसरे प्रांत मोकळे राहिलेच नव्हते ! तसे झाले असते तर प्लासीच्या लढाईत क्लाइव्हने मिळविलेले यश व्यर्थ झाले असते आणि पुढच्या दहा वर्षात इंग्रजांनी त्या प्रांती जो फैलावा केला तो त्यास करता आला नसता ! हैदरअल्ली जर उपटसुंभाप्रमाण मध्येच नवीन शत्रू निर्माण झाला नसता, तर माधवरावाच्या स्वाऱ्या पूर्वीप्रमाणे अर्काट, त्रिचनापल्ली वगैरे मुलखावर चालू राहिल्या असत्या आणि अर्थातच मद्रासकर इंग्रजांना गाशा गुंडाळण्याचा प्रसंग आला असता ! सन १७६५ त मुंबईकरांनी मालवण घेतले व बंगालच्या इंग्रजांनी मल्हारराव होळकरावर छापा घालून त्याची नासाडी केली. त्या वेळी इंग्रज–मराठ्यांचे युद्ध होण्याचा योग होता. परंतु मल्हारराव मृत्यु पावल्यामुळे ते प्रकरण तेवढ्यावरच थांबले. सन १७५२ त मद्रासकर इंग्रजांनी निजामअल्लीस सामील करून प्रथम हैदरावर व मागून पेशव्यांवर स्वारी करण्याचा बेत केला होता. परंतु माधवरावाच्या हुशारीमुळे तो त्यांचा बेत तडीस गेला नाही. पुढे सन १७७२ त दुआबात मराठ्यांच्या आणि इंग्रजांच्या चकमकी झाल्या. परंतु त्याच वेळी माधवराव मृत्यु पावल्यामुळे ते युद्ध पुढे चालू राहण्याचे अर्थातच बंद पडले; आणि अडचणीच्या भलत्याच वेळी म्हणजे राघोबाचा पाठलाग करण्यात पेशव्यांच्या फौजा गुंतल्या असता, इंग्रजांशी युद्ध सुरू करण्याचा प्रसंग त्यास प्राप्त झाला ! तात्पर्य, या पहिल्या युद्धाची सुरुवात इंग्रजांनी आपल्या इच्छेप्रमाणे व सोईप्रमाणे केली; त्यात मराठ्यांची इच्छा अगर सोय कोणतीच नव्हती !

मराठ्यांशी पहिले युद्ध सुरू झाल्यानंतरच्या वर्ष-सहामहिन्यांच्या अवधीत इंग्रजांनी जे लेख लिहिले आहेत, त्यात मराठ्यांचे राज्य केवढे, त्यांची फौज किती, छत्रपती, पेशवे, भोसले, गायकवाड, शिंदे, होळकर यात तारतम्याने कोणाचे महत्त्व किती, त्यांचे परस्परसंबंध कोणते, त्यांची घरगुती भांडणे कशाबद्दलची, कोणास काय मिळाले असता तो आपणास अनुकूल होण्याचा संभव आहे, इत्यादी तप-

शीलवार माहिती बहुधा बिनचूक लिहिलेली आढळते. पण याचे आश्चर्य मानण्याचे काही कारण नाही ! कारण, यापूर्वी पुष्कळ दिवसापासून या हिंदुस्थान देशाचे राज्य हप्त्या हप्त्याने आमच्या पदरात पडणार आहे, अशी सुखस्वप्ने इंग्रजांस पडू लागली होती ! त्यातल्या कर्त्या माणसाचे चिंतन याच विषयावर नेहमी चाललेले होते. एक पुस्तक आम्ही पाहिलेले आहे. ते एका इंग्रजाने अठराव्या शतकात लिहिलेले आहे. त्याचा विषय हिंदुस्थानचे राज्य कसे घ्यावे हाच आहे ! अर्थात्च या विषयावर त्या काळात दुसरी पुष्कळ पुस्तके व निबंध टिपणे वगैरे लिहिलेली असतीलच. त्या वेळी या देशात मिशनऱ्यांचा फैलाव नव्हता. परंतु फिरस्ते व इंग्रज शेकडो होते. ते प्रत्येक प्रांतात फिरत. त्यांनी लिहून ठेवलेल्या प्रवासवर्णनात शहरे, किल्ले, मार्ग, लोकरिवाज, स्थानिक राजकारणे, सर्व काही बारीकसारीक माहिती आस्थेने लिहून ठेवलेली असे व ती कंपनी सरकारच्या उपयोगी पडे. काही तरी निमित्त काढून लष्करी अम्मलदार प्रवास करीत तेव्हा मिलिटरी खात्याच्या उपयोगाची माहिती गोळा करीत व मोठमोठ्या देशी राजांच्या दरबारातून जे इंग्रज वकील होते, ते राजकारणाची सर्व माहिती मुख्याधिकाऱ्याकडे लिहून पाठवीत. इंग्रज लोक शोधकबुद्धीचे आहेत व विद्यार्जनाचा त्यांचा हव्यास दांडगा आहे. वेद, शास्त्रे, स्मृती, पुराणे वगैरे ग्रंथांची सर्व माहिती त्यांनी हिंदुस्थानाचे अधिराज्य मिळवण्याआधीच गोळा केली होती ! पेशवाईच्या अखेरपर्यंत सर्व बाजूचे ज्ञान संपादन करण्याचा त्यांचा उद्योग एकसारखा सुरू होता. सन १८०३ साली नॉक्स या नावाचा इंग्रज म्हैसूराहून पुण्यास जात असता मिरजेस थोडा वेळ मुक्काम करून राहिला होता. पण तितक्याही धांदलीत त्याने मिरजेच्या जहागीरदारास पत्र लिहिले की ' तुम्हास जहागीर कधी, कोणी दिली, तिचे उत्पन्न किती, तुमच्या घराण्यातल्या लोकांनी पेशवे सरकारच्या कोणकोणत्या कामगिऱ्या केल्या, या सर्व गोष्टींची मेहेरबानीने तवारीख लिहून मला द्याल तर मी आभारी होईन !'

अशा तरतरीत चौकस स्वभावाच्या इंग्रज लोकांशी लढण्याची मराठ्यांवर पाळी आली; पण त्यांस या इंग्रज लोकांविषयी काहीच माहिती नव्हती ! या लोकांचा मूळ देश कोण, हे येथे कशाकरिता आले, यांची पहिली वसाहत कोठची, मागून कोणकोणत्या बंदरात त्यांनी वसाहती केल्या, यांचा स्वभाव, गुणदोष कोणचे, याची राज्यव्यवस्था आणि सैन्यव्यवस्था कशी, यांचे सैन्यबल व द्रव्यबल किती, इत्यादि मुद्द्यांची माहिती मराठी मुत्सद्द्यांनी आणि सरदारांनी अवश्य मिळवावयास पाहिजे होती. परंतु आमच्या आळसामुळे व हलगर्जीपणामुळे आमच्या राजकारणाचे हे अंग नेहमी लुळे पडे. एकट्या नानाने मात्र इंग्रजांविषयी काही सटरफटर माहिती गोळा केली होती व तो बातमी फार चांगली राखीत होता असे त्याच्या लेखांवरून दिसते. एरवी पहावे तो चोहोकडे गाढ निद्राच लागलेली होती ! हे इंग्रज लोक

किती आहेत व कोठून येतात हे ठाऊक नसल्यामुळे त्यांची दहशत मराठ्यांच्या मनावर उगीचच्या उगीच बसली होती ! इंग्रजांशी लढाई सुरू असता बातम्या येऊ लागल्या की, इंग्रज मुंबईकडून आले, त्यांचा गुजराथेत धुमाकूळ सुरू आहे, काही मद्रासेकडून जलमार्गाने येत आहेत, काही हैदराशी लढत आहेत, काही यमुना उतरून काल्पीवर चालून येत आहेत ! अशा चोहोकडच्या बातम्यांनी भांबावून गेलेला एक सरदार त्रासून लिहितो की, 'हे शिंदळीचे इंग्रज आहेत तरी किती ! जेथे तेथे तेच उद्भवतात हे काय आहे न कळे ! !' अशा बिकट परिस्थितीतसुद्धा नानाने इंग्रजांच्या कारस्थानावर ताण करून त्यास हातटेकीस आणले, तह करण्याविषयी त्यांनी मराठ्यांची आर्जवे करू लागावे अशी स्थिती उत्पन्न केली, याबद्दल त्याची वाहवा होत असते ती योग्यच आहे. सालबाईच्या तहात इंग्रजास साष्टीचा टापू मिळाला हा काही त्यांनी पाच-सात वर्षे मोठे नुकसान सोसून चालविलेल्या युद्धाचा योग्य मोबदला नव्हे !

सालबाईच्या तहानंतर पेशवाईच्या अखेरपर्यंत इंग्रज व मराठे यांचे राजकारणाचे सामने पुष्कळवेळा झाले आणि लढायाही पुष्कळ झाल्या. ह्यात जे वैगुण्य मराठ्यास नेहमी जाचत असे ते हेच की, त्यास इंग्रजांची काहीएक बातमी कळत नसे ! घरभेद्ये हे केव्हाही कोठेही झाले तरी असायचेच; पण पेशवाईत त्यांचा सुळसुळाट फारच झाला होता ! मराठी फौजांचे बेत व हालचाली इंग्रजास नेमक्या कळाव्या व त्यांची बातमी मात्र यास काहीच कळू नये, असे नेहमी होत असे ! इंग्रजांच्या जातीचा एकही घरभेद्या मराठ्यांस कधी भेटू नये हे केवढे आश्चर्य आहे !

इंग्रजांची राहणी व भाषा निराळी. त्यांचे रिवाज व शिस्त निराळी. ते कारणाशिवाय आम्हांशी बोलतसुद्धा नाहीत. मग आम्हाशी मिळूनमिसळून वागायचे दूरच राहिले ! त्यांच्या अंगी जात्यभिमानाचा ताठा असल्यामुळे हिंदी लोकांशी फटकून वागणेच त्यांना आवडते. त्यामुळे त्यांचे बेत, बातम्या सर्व काही त्यांचे त्यांच्यात राहते; बाहेर फुटत नाही. त्यांची कोणतीही बातमी मराठ्यांस न कळण्याचे मुख्य कारण हेच होय; पण याबरोबर त्यांच्यासंबंधाच्या खोट्या बातम्या पसरवण्यास हा इंग्रजांचा एकलकोंडेपणा कारण होतो हेही ध्यानात ठेवले पाहिजे ! शिंदे व भोसले यांचा पराजय झाला तरी यशवंतराव होळकरांच्या पराक्रमावर मराठ्यांचा फार विश्वास होता. त्यामुळे होळकरांचे व इंग्रजांचे युद्ध जुंपले तेव्हा होळकराची जागोजाग फत्ते झाल्याच्या बातम्या पुण्याच्या बाजारात नेहमी पसरत होत्या ! या बातम्यात अतिशयोक्ती व विसंगतपणा फार असे व उत्तर हिंदुस्थानातून पत्रे येत त्यात त्या लिहिलेल्या असत. खुद्द पुण्यातल्या पुण्यात ज्या बातम्या उठत त्यातल्याही काही काही फारच विचित्र असत ! उदाहरणार्थ, पुढील मासला पहा– 'होळकराने गोरे लोक धरले, त्यापैकी तीनशे लोक नाके कापून सोडून दिले. त्यातले दोनशे येथे पुण्यास आले. तेव्हा येथच्या इंग्रजांनी त्यास विलायतेस रवाना करण्याकरिता

मुंबईस पाठविले. हे नकटे विलायतेस जातील तर आपली इज्जत जाईल व आप-णास शिक्षा होईल या भयाने मुंबईवाल्यांनी त्या लोकास गलबतात घालून समुद्रात नेऊन बुडविले !'

असल्या बातम्यांवर विचारी माणसांचा विश्वास बसणे दुर्घट होते, पण सामान्य लोकांस मात्र त्या खऱ्या भासत असल्या पाहिजेत असे वाटते होळकराच्या लढाईत इंग्रज फार जेर झाले असून संकटात पडले आहेत, अशी बातमी पटवर्धनांचा वकील पुण्यास होता तो त्यास नेहमी लिहून पाठवी. एका पत्रात ' डाकेबरोबर सावकारी वर्तमान आले. अश्वदल (होळकर) याची प्रबलता जलशर (इंग्रज) पेचात आहे, ऐसे लिहिले आहे. शिंदे यांची पत्रे छ. ९ साबनाची आली त्यात वर्तमान लिहिले त्यात अतिबलवत्ता अश्वदळाची लिहिली आहे. लील (Lord Lake) साहेबाची पलटणे बुडविली; दहा-बारा पलटणे घेऊन यमुनापार लखनौकडे जात होता. त्या सभोवती घेरा पडला असे लिहिले आहे.' इतके लिहून सदरहू वकील इंग्रजाच्या घरी शोध घेऊन तेथील बातमी प्रत्यंतरादाखल लिहितो ती अशी : छ. १६ रमजानी इंग्रजांकडील डाक आली. जेवावयाला जात होते. इतकियात डाक येऊन दाखल जाहली. सबब तीन-चार असामी खुरशीवर बसोन डाकेचे तीन फर्द पाहिलेवर डोईची टोपी काढून भूमीवर आपटली. नेत्राश्रू पतन करू लागले. चौकीदार वगैरे होते त्यास दूर दूर केले. सारेजण जमा होऊन खुरशांवर बसोन कौशल होऊन नंतर एक इंग्रजाने एक अधिकारियास हाती धरून उठविले.' वकिलाने कोणा बुटलेरास शेपन्नास रुपये देऊन इंग्रजाच्या घरची म्हणून विकत घेतलेली ही बातमी आपल्या धन्यास लिहुन कळविली. तिने त्या धन्याचे कितपत समाधान झाले असेल हे जाणणे आम्ही वाचकांवरच सोपवितो !

आमचा पुणे–सातारा इंग्रजांनी का घेतला आणि त्यांचा मद्रास–कलकत्ता आम्ही का घेऊ शकलो नाही याचा संक्षेपाने येथपर्यंत विचार केला. ( देशाभिमानशून्यता, समूहरूपाने कार्य करण्याची नालायकी, स्वार्थसाधनाची बेसुमार हाव, आळस, हेळ-सांड, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याची संवय, इत्यादि दुर्गुण आमच्या समा-जाच्या अंगी जे खिळले आहेत तेच आमच्या राज्यनाशाला कारण झाले आहेत.) असल्या दुर्गुणांनी खिळखिळे झालेले कोणतेही पौरस्त्य राष्ट्र सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांशी विरोध प्राप्त झाला असता टिकाव धरू शकत नाही. हिंदुस्थान जर इंग्र-जांनी घेतले नसते तर फ्रेंचांनी घेतलेच असते. प्रवाहात पडलेली भांडी एकमेकांवर आदळली असता त्यातले कोणते फुटावयाचे, मातीचे की लोखंडाचे ठरलेलेच आहे ! हल्लीचा काळ असा आला आहे की, आम्ही पाश्चात्यांची बरोबरी तरी करावी, नाही तर त्यांचे मजूर तरी होऊन रहावे ! राजकारण, उद्योगधंदे, कलाकौशल्य, भौतिक शास्त्रांचा उपयोग, प्रत्येक गोष्टीत हीच स्थिती आहे. जर आम्हास पाश्चा-

त्यांची बरोबरी करण्याची हिंमत असेल तर या लेखात वर्णिलेले आमचे दुर्गुण आम्ही टाकले पाहिजेत. पूर्वी स्वराज्य होते ते याच दुर्गुणामुळे गेले हे समजून जर आम्ही सावध झालो नाही तर नवीन स्वराज्य मिळूनसुद्धा व्यर्थच आहे. हाच इतिहासडिंडिमाचा घोष प्रत्येकाच्या कानी घुमत राहिला पाहिजे !

मिरज,
ता. ८।३।१९१८.

**वासुदेव वामन खरे**

# नानासाहेब पेशवे

लेखक
**गोविंद सखाराम सरदेसाई**

प्रस्तावक
**त्र्यंबक शंकर शेजवलकर**

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन | भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई | मूळ प्रस्तावना |
| १ ऑगस्ट १९२६ | मूल्य १॥ व २ रु. | पृष्ठे ३६ |

इतिहास संशोधक, इतिहास मीमांसक आणि समाजचिंतक अशा त्रिविध नात्याने **कै. प्रा. त्र्यंबक शंकर शेजवलकर** (२५ मे १८९५ ते २८-११-१९६३) यांची ख्याती आहे. पेशव्यांच्या राजवटीची त्यांनी विशेषकरून अप्रिय पण पथ्यकर अशी धारदार मीमांसा केली आहे. पानिपत (इंग्रजी व मराठी), शेजवलकरांचे लेख, श्रीशिवचरित्र (अपुरे) इ. त्यांचे अभ्यसनीय ग्रंथ. रियासतकार सरदेसाई यांच्या 'नानासाहेब पेशवे' (१७२१ ते १७६१) या चरित्राला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना म्हणजे एक टीकाप्रबंधच म्हणावा लागेल. त्या प्रस्तावनेतील वेचक-खोचक, विचारप्रवर्तक असा हा महत्त्वाचा भाग.

ती रा. गोविंदरावनाना सरदेसाई यांच्यासारख्या विख्यात इतिहासकारांच्या ग्रंथास वास्तविक दुसऱ्या कोणा माणसाची प्रस्तावना जोडण्याचे कारण नाही. त्यातही ग्रंथकाराहून त्या त्या विषयात जास्त अधिकारी व सुप्रसिद्ध माणसाने ती लिहिली तर असो, पण हे गुण नसणाऱ्याने तर ती लिहूच नये. परंतु या माझ्या मताला विरोध एकाच गोष्टीचा व ती गोष्ट ग्रंथकाराची इच्छा. आणि या इच्छेचे कारण ग्रंथकारांचा व माझा मराठ्यांच्या इतिहासातील बऱ्याच मुद्द्यांवर होणारा मतभेद. ग्रंथकारांच्या मते हा मतभेद मी आपल्याजवळच राखून न ठेवता जगातही त्याचा प्रसार करावा ! त्यांच्या इच्छेस मान देणे हे माझे कर्तव्य असल्यानेच मी लेखणी हाती धरीत आहे.

ग्रंथातील गोष्टी व घडामोडी कालस्थलादी दृष्टचा तपासणे हा या ठिकाणी माझा हेतू नाही. असले काम संशोधकांच्या बैठकीत यथावकाश करता येईल. मराठ्यांच्या इतिहासातील अनेक घडामोडींची रूपरेषा ग्रंथकारांना प्रथमच एकट्याने ठरवावी लागल्यामुळे, त्यात तपासणी करण्यास बरीच जागा राहिली असणे हे अगदी साहजिक आहे. मराठ्यांच्या इतिहासाचे कार्य अजून अपूर्ण स्थितीत आहे व त्यात बरेच फेरबदल करावे लागतील. माझा हेतू ग्रंथकारांपेक्षा जरा जास्त उंचीवर चढून व जरा खोल बुडी मारून मराठ्यांच्या इतिहासाचा पट डोळ्यांसमोर आणणे व त्याचा ठाव घेणे हा आहे.

'ज्या राष्ट्रास भूतकाळ नाही त्यास भविष्यकाळही नाही,' अशी बहुतेक इतिहासकारांची समजूत आहे. त्यांच्या मताने मराठे, शीख, रजपूत वगैरे ज्या लोकांनी पूर्वी इतिहासात नाव गाजवले त्यांचाच भविष्यकाल उज्ज्वल होणे शक्य आहे. हिंदुस्थानबाहेर जाऊन युरोपकडे पाहावयाचे तर रोमन, ग्रीक, फ्रेंच वगैरे लोकांच्या वंशजांचाच भावी इतिहास बनणार आहे ! ही समजूत इतकी दृढ आहे की; जगाच्या इतिहासकारांपैकी बहुतेक हे सूत्र पुढे ठेवूनच आपला इतिहास लिहीत असतात. इतिहासाची सरणी याच सूत्रान्वये लावण्याची त्यांची रीत असते. फार काय, या सूत्राशी न जुळणाऱ्या बऱ्याच गोष्टी दडविण्याची व त्यास पोषक अशा गोष्टी निर्माण करण्याचीही त्यांची तयारी असते. गेल्या महायुद्धापूर्वीच्या काळात जर्मनीत या प्रवृत्तीचा अतिरेक झालेला पहावयास सापडतो. भूतकाळात केले काय ते आमच्या पूर्वजांनी व अर्थात, पुढेही करणार काय ते आम्हीच, अशी जर्मन लेखकांची गर्जना होती. याच कल्पनेने लिहिलेल्या इतिहासाचे प्राथमिक शाळांपासून अध्ययन जर्मन मुले करीत असत व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, या सत्यापलापाचे समर्थन करण्यात जर्मनीतील अनेक विद्वान भूषण मानीत व समाजातून ते उजळ माथ्याने फिरत. त्यांच्या सिद्धांतास धक्का दिला काय तो महायुद्धाच्या निकालाने ! आमच्या इकडेही असे इतिहासकार अविश्रुत नाहीत. पण राष्ट्राच्या सध्याच्या विप्लवात आपल्या सिद्धांताचे समर्थन करणे त्यास जड जाते एवढेच. एक संशोधक

माझ्याशी बोलताना म्हणाले, 'अहो, पेशव्यांबद्दल लिहिताना आपणास जरा जपूनच लिहिले पाहिजे, नाहीतर हे ब्राह्मणेतर आपल्याच वाक्यांचा अहेर आपणास करावयाचे व त्यांचा ब्राह्मणांविरुद्ध उपयोग करून घ्यावयाचे.' या गृहस्थांची इतिहासाबद्दलची कल्पना काय असावी याचे अनुमान करणे कठीण नाही. यांच्या मताने इतिहासाचा उपयोग शहाणपणा शिकण्याकडे करावयाचा नसून, वर्तमानपत्रांच्या एखाद्या चळवळीतील लेखांप्रमाणे लोकांस, दोषांबद्दल अंधकारात ठेवून एखाद्या मार्गास प्रवृत्त करण्याकडे करावयाचा असतो. शास्त्रीय वर्गीकरणाच्या परिभाषेत बोलावयाचे तर त्यांच्या मताने इतिहास हे शास्त्र नसून ती एक उपयुक्त कला आहे.

ज्यास भूतकाळ नाही त्यास भविष्यकाळ नाही, या सिद्धांताचा अर्थ जर, ज्यांच्या जवळ भूतकाली संपादन केलेल्या काही गोष्टी संग्रही आहेत त्यास भविष्यकाळ उज्ज्वल करण्यास सोपे जाणार आहे, एवढाच असला तर तो खराच आहे. जसे व्यक्तीच्या उदयाचा विचार कर्तव्य असता त्याचा आनुवंशिक पिंड आपण पाहतो तसे राष्ट्राचा पिंडही पाहणे गैर नव्हे. पितरांपासून उतरलेला पिंडच जर रोगग्रस्त असेल तर त्या व्यक्तीस पुरुषार्थ साधण्यास मुळातच अडचण येणार हे उघड आहे. परंतु हा सिद्धांत प्रतिपादणाऱ्यांचा उद्देश वेगळाच आशयाचा असतो. उदाहरणार्थ आज आमचे प्रभु जेव्हा आम्हांस सांगतात की, हिंदुस्थान स्वराज्यास अपात्र आहे, कारण पूर्वी कधी या देशाने स्वराज्य वहिवाटलेले नाही, तेव्हा त्यांची या सिद्धांताचा अर्थ लावण्याची रीत काय हे कोणास सांगावयास पाहिजे ? ते इतिहासातील काही गोष्टींचा उपयोग जित राष्ट्रास कामचेच खच्ची करण्याकडे करीत आहेत व ते इतिहासाकडे कला या दृष्टीने पाहतात हे उघड होते. इतिहासाचा तसाच उपयोग आज गोरी राष्ट्रे तदितरांविरुद्ध करीत आहेत. आम्हांस मात्र हा सिद्धांत अशुद्ध वाटतो. आमच्या दृष्टीने ऐतिहासिक भूतकाल नसणाऱ्या नीग्रोसारख्या लोकांसही भविष्यकाल आहे. तसे नसेल तर, जगातील काही धर्मपंथ ज्याप्रमाणे त्यांच्या बाहेर असलेले लोक कायमचेच मोक्षास आंचवलेले समजतात, त्यांचाच सिद्धांत खरा म्हणण्याची आपत्ती ओढवेल ! म्हणजे शंकराचार्यांच्या भाषेत ईश्वरावर 'वैषम्य-नैर्घृण्यप्रसंग' आला ! पण ज्या अर्थी ईश्वर हा आपण, काही लोकांबद्दल मत्सरग्रस्त व क्रौर्यप्रेरित समजत नाही; ज्या व्यक्ती इतिहासप्रसिद्ध सरदार घराण्यात न जन्मलेल्या, त्या पुढे सरदार होणारच नाहीत असे म्हणत नाही; किंवा गुजराथी वाणियात गांधी, अमेरिकेतील नीग्रोत ड्युबॉय अथवा मूठभर उंचीच्या जपान्यांत टोगो निपजत नाहीत असा आपला अनुभव नाही; त्या अर्थी हा सिद्धांतच अबाधित म्हणणारांचे म्हणणे अर्थातच फोल ठरते.

इतिहासाचा वास्तविक उपयोग शहाणपण शिकणे हा आहे. मागील चुका व दोष नेहमी डोळ्यासमोर वागवून, ते दोष आपल्यातून जावे, तशा चुका पुन्हा घडू नयेत, असा जर आपला प्रयत्न नसला, तर इतिहाससंशोधकांची खटपट व्यर्थ

मानावी लागेल. हे दोष नाहीसे करीत असता आपल्या भूतकाळाची काळजी करण्याचे आपणास कारण नाही. तो चांगला असला तर उत्तमच, नसला तरी, त्याचा भविष्यावर मोठासा परिणाम घडणार आहे असे नाही. व्यायामशाळेत प्रवेश करणाऱ्याने, आपले पूर्वज भीमसेन होते किंवा काय याचे संशोधन करावयास नको. मात्र जे आनुवंशिक दोष आपल्यात आले असतील, तेवढे नाहीसे करण्याची खटपट करावी म्हणजे झाले. पण त्याच्या ऐवजी जर तो, आपल्यात दोष आलेलेच नाहीत, आपले पूर्वजच भीमसेन होते, असा अभिमान धरून बसेल, तर तो स्वत: कधीच तालिमबाज होण्याचा संभव नाही हे उघड आहे.

प्रस्तुत ग्रंथकारांच्या ठिकाणी असला दुराभिमान नसल्यामुळे तत्संभव दोषही या ग्रंथात नाहीत. पूर्वजांबद्दल योग्य अभिमान व त्याबरोबर प्रगतिप्रियता, यांचे माफक मिश्रण त्यांच्यात झाले असल्याने, इतिहासलेखकास आवश्यक अशीच त्यांची मनोरचना आहे. अर्थातच आपला चरित्रनायक हा सर्व सद्‌गुणांचा पुतळा, अशा भावनेने हे चरित्र लिहिले गेलेले नाही. त्याच्यानंतर दुसरी एक गोष्ट चरित्रलेखकांस सांभाळावी लागते ती म्हणजे तरतमभावाची तीव्र जाणीव. नाही तर ज्याप्रमाणे काही वर्षांमागे एका नटचरित्रलेखकाने आपल्या नायकास शिवाजीमहाराज व नेपोलियन यांच्या मालिकेत गुंफले व 'श्वानं युवानं मघवानमाह' या सुभाषिताची सार्थता पटवून दिली, तसे व्हावयाचे. सरदेसायांच्या हातून अर्थातच असले हास्यास्पद कृत्य घडणार नाही हे काही सांगावयास नको. परंतु ज्या इतिहासकारांना लेखनासाठी संशोधनही करावे लागते, त्यांचे कार्यक्षेत्र आकुंचित राहते व त्यामुळे दृष्टीही काहीशी संकुचित होते. ज्याप्रमाणे एखाद्या खेड्यातच जन्म जाणाऱ्याला त्या गावातील खडानखडा ज्ञात होतो, परंतु तुलनात्मक दृष्टया पाहताना त्याकडून ग्रामकुठाराला नाना फडणीस नाव देण्याची चूक सहजगत्या होते, तसेच काहीसे संशोधकांचे होते. ज्या व्यक्तीचे इतिहास जुळविण्याची खटपट करण्यात त्यांचे दिवसांचे दिवस मोडतात त्यांच्याबद्दल साहजिकच त्यांस आदर उत्पन्न होतो. एखाद्या व्यक्तीचे विशिष्ट प्रकरणी वर्तनोद्देश समजण्यास अर्थातच त्यांची सूक्ष्म तपासणी फार उपयुक्त असते. पण नुसते मराठी वाङ्मय वाचून ज्याप्रमाणे हरिभाऊ आपटयांस काहीजण पहिल्या नंबरचे कादंबरीकार समजतात, परंतु त्यासच टॉलस्टाय, टर्चुर्गेनेव, डोस्टोवस्की, न्यूट हॅमसन, बाल्झॅक, ड्यूमा, झोला, डिकन्स प्रभृति प्रख्यात पाश्चात्य कादबरीकारांच्या कृती वाचण्यास मिळाल्या की, हरिभाऊंस पहिल्या वर्गात तरी घालावे की नाही याची शंका पडते, तीच गत आपला इतिहास सोडून जगाचा इतिहास पाहू जाता होते. वरवर पहाणाराला नानासाहेब पेशव्याची कर्तबगारी पाहून साहजिकच विल्यम पिटशी त्याची तुलना करण्याची कल्पना सुचते, पण जगाच्या इतिहासाचे विहंगमावलोकन करीत जाऊ लागले तर पिट व पेशवा हे एकाच तोलाचे की काय याची शंका वाटेल. जी गोष्ट नानासाहेब

पेशव्याची तीच नाना फडणिसाची. आपण या सर्वांस मुत्सद्दी समजतो. परंतु खरोखरी ते मुत्सद्दी होते किंवा काय याचा कयास कोणी काढीत नाही. 'नाना जिवंत असेपर्यंत पुण्याच्या कारभारात आपला हात शिरकणार नाही;' असे एखाद्या इंगजाचें शिफारसपत्र वाचून आपण नाना फडणीस म्हणजे मोठा मुत्सद्दी असे मानतो, परंतु खरा मुत्सद्दी कोणास म्हणावयाचे याचा विचार आपण करीत नाही.

मराठीतील मुत्सद्दी या फारशी शब्दाचा अर्थ केवळ दरबारी कारकून एवढाच मूळ आहे. पण सध्या आपण हा शब्द स्टेट्स्मन् या इंग्रजी शब्दाशी समानार्थाने योजतो. या इंग्रजी शब्दाचाही मूळ अर्थ केवळ दरबारी एवढाच. राज्याशी ज्यांचा लहान मोठ्या कामानिमित्त रोज संबंध ते सर्वच स्टेट्स्मेन्. राज्याची कामे अनेक प्रकारची असतात. ती करण्यासाठी अनेकांचा संबंध दरबाराशी येतो. पण या सर्वांसच जर मुत्सद्दी ही संज्ञा लावावयाची, तर आम्ही म्हणतो तशा पुरुषांस वेगळीच संज्ञा निर्माण करावी लागेल. आमच्या मते मराठशाहीत शिवाजीखेरीज अन्य मुत्सद्दीच झाला नाही व शिवाजीच्या मुत्सद्दीपणाबद्दलसुद्धा अस्सल पुरावा थोडकाच आहे, बऱ्याचशा गोष्टी अभिप्रेत घ्याव्या लागतात. ज्या पुरुषांचे लक्ष राज्यापुढे येणारे रोजचे प्रश्न सोडविणे एवढ्यातच गुरफटून गेलेले दिसते त्यास आमच्या मते मुत्सद्दी हा शब्द लावणे योग्य नाही. आजच्या राज्यपद्धतीत अशी कामे अधिकारवर्ग करीत असतो व त्यांच्या कृत्यांचे प्रेरक किंवा टीकाकार दुसरे लोकप्रतिनिधि, वर्तमानकार, वगैरे लोक असतात. या सर्वांस मुत्सद्दी म्हणावयाचे काय? पूर्वीच्या राज्यपद्धतीत राज्याची सूत्रे ज्यांच्या हातात असत त्यांस तत्संबंधी उत्पन्न होणाऱ्या अनेक भानगडींचे परिमार्जन करणे भागच होते. पण त्याच्या पलीकडे जाऊन, आपल्या देशाच्या किंवा राज्याच्या हितावर चिरंतन परिणाम होणारी अशी कोणती कामगिरी ते करीत होते? मराठ्यांचे राज्य वाढत जात होते व त्या वाढीच्या कार्यात त्यांचा हात होता, एवढ्यावरच त्यांस मुत्सद्दी म्हणावयाचे काय? आमच्या मते नाही. कारण मराठ्यांच्या राज्याची वर्धिष्णुता ही काही त्यांनी निर्माण केलेली चीज नव्हती. तिचा उगम व त्याबरोबरच श्रेय शिवाजीकडे जाईल. शिवाजीने निर्माण केलेल्या आयुधांचा उपयोग करण्यात ते तरबेज होते एवढेच त्यांच्याबद्दल म्हणता येईल. जर नाना फडणिसास मराठ्यांचे राज्य होते तेवढे तरी कायम राहील अशी व्यवस्था करिता आली असती, तरच त्यास मुत्सद्दी म्हणणे योग्य झाले असते. जर नानासाहेब पेशव्यास इंग्रजांसारख्या नूतन राष्ट्राचा ठाव लागू शकला नाही, तर त्याचे मुत्सद्दीपण ते कशात राहिले? आपल्या सभोवारच्या स्थळांच्या व काळाच्या पार ज्यांची दृष्टी पोहोचते, व त्या दूर दृष्टीने जें राज्यकारभार करितात, त्यासच मुत्सद्दी ही संज्ञा लावणे योग्य आहे. मराठशाहीत असा पुरुष झालेला दिसत नाही. कित्येक पुरुषांत शहाणपण होते असा भास कोठे कोठे होतो, पण त्यांच्यात कर्तबगारी नव्हती. कर्तबगार

माणसांपैकी मात्र कोणात ही दूरदृष्टी दिसत नाही. जर ती होती असे मानले, तर त्यांच्यात कर्तबगारी नव्हती असे म्हणणे भाग पडेल.

आपणास मराठशाहीतील इतर पुरुषांशी सध्या काही कर्तव्य नसून फक्त नानासाहेब पेशवाच प्रस्तुत आहे. सरदेसाई त्यास शिवाजीच्या खालोखाल पुरुष समजतात. त्याच्या अमदानीत मराठ्यांच्या राज्योत्कर्षाच्या भरतीची सीमा झाली हे उघडच आहे. तो शिवाजीप्रमाणे तलवारबहाद्दर नव्हता किंवा अस्त्रैणही नव्हता. म्हणजे राज्याच्या वाढीचे बहुतेक श्रेय त्याच्या सरदारांस द्यावे लागेल व समाजास आदर्शभूत होण्याजोगा तो नव्हता असेही ठरते. मराठशाहीतील दुसऱ्या अनेक पुरुषांप्रमाणे तो राज्यकारभारात निपुण होता, पण हे नैपुण्य म्हणजे मुत्सद्दीपणा मात्र नव्हे. मराठशाहीतील ज्या पुरुषास मुत्सद्दी म्हणतात ते वास्तविक हुषार राज्यकर्ते होत. त्याच्या मुत्सद्दीपणाची मीमांसा आता आपण करू.

जर एखाद्या पुरुषास मुत्सद्देगिरी दाखवण्यास योग्य समय पाहिजे होता असेल, तर तो नानासाहेबाच्या काळी होता. जगाच्या इतिहासात जे क्रांतीचे काळ काही शतकांनी एकदा येतात, अशा एका काळाच्या दरवाजावर तो उभा होता. अशी मुत्सद्देगिरी दाखविण्यास स्थळ पाहिज होत असेल, तर अठराव्या शतकाच्या मध्यातील हिंदुस्थानाखेरीज तसे अन्यत्र क्वचितच आढळते. साधने पाहिजे होती असतील, तर ती तशी नानासाहेबाजवळ नव्हती असे कोण म्हणेल? पण जेथे कर्त्याचाच अभाव तेथे अधिष्ठान व करणे काय करणार? बाकी 'दैवं चैवात्र पंचमम्' असे म्हणण्यास सर्वांसच मोकळीक आहे.

नानासाहेबाची कारकीर्द सन १७४० पासून १७६१ पर्यंतची. इंग्लंडात ज्यास औद्योगिक क्रांतीचा काळ म्हणतात, त्याची सुरुवात स्थूलमानानें १७६० पासून झाली. यानंतर अनेक शोध लागून जगास आधुनिक स्वरूप येण्यास सुरवात झाली. या पूर्वीच्या म्हणजे जुन्या काळात नानासाहेबाची अमदानी झाली. ज्या त्रिखंडात चाललेल्या युद्धातील जयाने इंग्लंड, फ्रान्सचा पराभव करून जगात पहिले राष्ट्र बनले, ते विख्यात 'सप्तवार्षिक युद्ध' सन १७५६ पासून १७६३ पर्यंत चालू होते. हिंदुस्थानात कर्तबगारी दाखवता दाखवता जगाच्या इतिहासास निराळे वळण देणे ही गोष्ट नानासाहेबास त्या वेळी शक्य होती. अशा तऱ्हेचे वळण, आंधळेपणाने नव्हे जाणून बुजून, चॅथॅम्सारखे मुत्सद्दी त्या वेळी इंग्लंडात बसून देत होते. जगाचा नकाशा पुढे घेऊन, या मार्गाने गेले की आपण जगज्जेतें होऊच होऊ, या आत्मविश्वासाने बुद्धिबळाचा डाव खेळत होते. त्यांचा तो डाव पूर्णपणे सिद्धीस गेला, हे आज आपण अनुभवीत आहो. नानासाहेबाची हिंदुपदपातशाही मात्र मध्येच कोठे जिरली व त्याच्या वंशजांचे स्वातंत्र्यसुद्धा राखले गेले नाही. असे का झाले याचे उत्तर नाही काय?

एखाद्या राष्ट्राचे भवितव्य एकाच माणसावर अवलंबून असते, ही विचारसरणी

आम्हास मान्य नाही. मुख्य पुरुष हा केवळ समाजस्थितिदर्शक असतो असे आमचे मत आहे. या दृष्टीने पाहता व्यक्तींची चरित्रेही आमच्या दृष्टीने काहीशी आभासात्मक असतात, त्यात पूर्ण सत्य दिसू शकत नाही. पण ज्यांना सरदेसायांप्रमाणे कार्लाइलची वीर पुरुषांची कल्पना मान्य आहे, ते जर राष्ट्रीय भरभराटीचे श्रेय एका पुरुषास देणार, तर त्या पुरुषाने राष्ट्रीय अध:पाताबद्दलही जबाबदार झाले पाहिजे हे ओघानेच आले. विचारसरणीतील हा भेद केवळ तात्विक नसून मूलभूत आहे. याच भेदावर राजकीय प्रगती आधी की सामाजिक प्रगती आधी हा प्रचलीत वाद उभारलेला आहे. नानासाहेबाच्या जागी आमच्यात त्या काळी चॅथॅम् का निर्माण झाला नाही, याचे उत्तर आमच्या मते हिंदी समाज हा इंग्रजी समाजाप्रमाणे नव्हता असे आहे. नानासाहेबाची बुद्धी चॅथॅम्इतकीच तीव्र होती असे धरले तरी, चॅथॅमच्या आज्ञा अंमलात आणण्याची जर हिंदी समाजाची पात्रता नव्हती तर नानासाहेब काय करणार ? पण तशी ती तीव्र असणे शक्य नाही, कारण आडातच नाही ते पोहोऱ्यात कोठून येणार ? समाजातच जे गुण नाहीत ते उत्कर्षाने व्यक्तीत कसे दिसतील ? जर ते दिसतील तर मात्र ती व्यक्ती लोकोत्तर दूरदृष्टीची, म्हणजेच मुत्सद्दी, असे आम्ही म्हणू. अशी व्यक्ती शिवाजीनंतर मराठशाहीत निपजली नाही हेच आमचे म्हणणे आहे.

मराठशाहीच्या इतिहासाचे एक मार्मिक अभ्यासू कै. खरेशास्त्री यांनी एके ठिकाणी असे उद्‌गार काढले आहेत की, 'पेशवाईच्या कृत्यांसंबंधी हल्लीच्या काळात चर्चा होते तेव्हा अमक्याने अमूक केले असते तर अमुक झाले असते असे पुष्कळ टीकाकार लिहीत व बोलत असतात. परंतु पेशवाईची घटना कशी होती, तिचे अधिकारी कोणत्या बंधनांनी बांधले गेले होते, हे माहीत नसल्यामुळे ही टीका बहुधा अप्रयोजकपणाची असते' शास्त्रीबोवांच्या मताप्रमाणे पेशव्यांच्या प्रत्येक सदिच्छेस व कृत्यास अनिराकरणीय अशी अडचण होती असे मानले, तर इतिहासाचे अध्ययनच करावयास नको. ऐतिहासिक टीका नेहमीच अमक्या वेळी अमक्याने असे असे करणे योग्य होते, ते त्याने केले किंवा नाही, या मुद्द्यावरच उभारलेली असणार. व आमच्या मते अशी इतिहासरचना असेल तरच त्याच्या अध्ययनाने फायदा होण्याचा संभव आहे. नुसते घडलेल्या हकीकतीचे समर्थनच ज्यात असेल तो खरा इतिहास नव्हे, ती 'कथा' होईल. म्हणून आम्ही त्या काळी पेशव्याने काय केले पाहिजे होते, काय करणे त्यास शक्य होते, ते त्याने का केले नाही व त्याचे काय परिणाम झाले ह्याचाच ऊहापोह करणार आहो.

नानासाहेबाच्या काळच्या मराठ्यांच्या सत्तेचा विचार करता शिवाजीचे राज्य ते किती ? टीचभर. परंतु राज्यरक्षणाच्या बाबतीत त्याची दृष्टी इतकी तीक्ष्ण, की त्यास, तो देशावर राबणारा होता तरी आरमाराची आवश्यकता पटली. त्याच्या आरमारात काही पोर्तुगीज किंवा त्यांनी शिकवलेले बाटचे गोलंदाजीच्या वगैरे

कामावर होते. त्याने पोर्तुगीजांच्या अनुकरणाने दारूखाना म्हणून एक वेगळाच कारखाना रायगडास उघडला. सारांश, त्यास पाश्चात्यांच्या नौकानयन ज्ञानाची पूर्ण जाणीव होती आणि म्हणून त्याने शक्य ती खटपट याप्रकरणी करून, शत्रूस दहशत वाटण्यासारखें आरमार उभारून ठेविले. आरमाराचे महत्त्व व पाश्चात्यांची या कलेतील पारंगतता याची केवढी छाप शिवकालीन प्रधानांवर होती हे पाहणे असेल त्याने अमात्यांच्या राजनीतीतील या विषयावरील स्वतंत्र प्रकरण वाचावे. ही शिवकालीन नाविक परंपरा आंग्र्यांच्या घरात उतरली. तुळाजी आंग्र्यांची मदत पाश्चात्यांनाही हवीशी वाटे. डुप्लेचा दुभाषी आनंदरंग पिले याने तुळाजीचे आरमार इंग्रज-फ्रेंचांच्या युद्धात तेलिचेरीस सात हजार सैन्यासह आले होते असे लिहिले आहे. अशा आरमारास पैशाचा भरपूर पुरवठा होता, तर शिद्दी, फिरंगी, इंग्रज, फ्रेंच यांची डाळ पश्चिम किनाऱ्यावर शिजली असती असे मुळीच वाटत नाही. पेशव्यांस असे आरमार स्वतः उभारता येणे, ते म्हणते तरी शक्य नव्हते. कारण ते किंवा त्यांचे विश्वासू सरदार दर्यावर्दी बनण्यासारखे नव्हते. आणि दुसरे, दर्यावर्दी नाविक लोकांची संख्या घोडदळाप्रमाणे वाटेल तितकी वाढविता येण्यासारखी नव्हती. समुद्र किनाऱ्यावरील गावातच असले लोक निपजावयाचे आणि तेही हिंदू धर्माच्या जातिभेदामुळे विशिष्ट जातीतून. आजही असे लोक पाहिजे असल्यास थोडेच मिळू शकतील. अशा परिस्थितीत ज्याच्या जागी आपणास दुसरा लायक इसम निर्माण करणे शक्य नाही, अशा आंग्र्यास आणि ते इंग्रजांची मदत घेऊन बुडविणे, याइतकी मुत्सद्देगिरीची वाण दाखविणारी दुसरी गोष्ट पेशव्यास करणे शक्य नव्हते. या घोडचुकीचा सरदेसाई प्रभृति सर्वांनीच जोराने निषेध केला आहे. पण त्याचे अपरिमार्जनीय दुष्परिणाम मात्र त्यांच्या मनावर ठसलेले दिसत नाहीत. राजवाडे या प्रकरणावर लिहिताना म्हणतात, 'एवढा चाणाक्ष नानासाहेब पेशवा, पण तो असा चकला.' आम्ही अशी अक्षम्य चूक करणारास चाणाक्ष म्हणावयास तयार नाही. अशी चूक पेशव्यांच्या हातून घडण्याचे कारण एकच, गाढ अज्ञान.

ज्या पाश्चात्य राष्ट्रांशी आपला संबंध येतो त्यांच्या आपआपसातील राजकारणाची पुरी, –उडती उडती नव्हे,– बित्तंबातमी नानासाहेबाने ठेविली असती तर त्याने इंग्रजांऐवजी फ्रेंचांसच जवळ केले असते. दुर्बलांसच मित्रांची जास्त आवश्यकता भासते आणि असे मित्र आपले शत्रू होण्याचा संभव नसतो. याकाळी युरोपात फ्रेंचांची स्थिती खालावलेली होती. त्यांच्यात पुष्कळ हुषार व्यक्ती पैशासाठी नोकरीस राहण्यासारख्या होत्या. अशा लोकांस इकडे आणवून त्यांच्याकडून युरोपियनांचे शास्त्रीय ज्ञान पेशव्यांस इकडे फैलावणे शक्य होते; पण ही कल्पनाच सुचेल तेव्हा ना ! मागासलेल्यांना पुढारलेल्यांशी संबंध आला असता आपले रक्षण करण्याच्या दोनच युक्त्या आहेत. एक तर त्यांस आपल्या घरात उतरावयासही न देणे किंवा

गा...१०

दुसरे त्यांच्यासारखे पुढारणे. पहिल्या पद्धतीने काही काल आपले स्वातंत्र्य राहू शकेल पण आपण कायमचेच मागासलेले राहण्याचा संभव फार आणि त्यामुळे परिणामी आपले स्वातंत्र्यही टिकवणे महादुष्कर जाते. दुसरी पद्धत स्वीकारताना अडचण अशी की, परकीय लोक आपली विद्या दुसऱ्यास शिकवीत नाहीत व दुसरा शिकून आपल्या तोडीचा होण्यापूर्वीच त्याची मान मुरगळतात. या सर्व संकटांतून आपल्या राष्ट्रास सुरक्षित पलीकडे नेऊन त्यास कायम निर्भय करणे हे खऱ्या मुत्सद्यांचे कार्य. असे मुत्सद्दी प्रथमच असे डोळ्यात तेल घालून असतील की, ते आपले राष्ट्र मागे पडूच देणार नाहीत. यदाकदाचित् पूर्वजांच्या चुकीने मागे राहिले तरी स्वत: त्याची प्रगती ते करवितील. पिटर दी ग्रेटच्या वेळी रशिया अगदी मागासलेला होता; पण त्या राजश्रींनी स्वत: सुतार बनून हॉलंडात प्रवेश केला व प्रजेस उदाहरण घालून दिले. त्यामुळे रशिया हे एक प्रबल राष्ट्र झाले. दुसरे मुत्सद्देगिरीचे बिनतोड उदाहरण जपानचे. हे एवढेच श्वेतेतर राष्ट्र पाश्चात्य गिधाडांच्या तडाख्यातून सुटून पुन: त्यांच्या जोडीला कसे येऊन बसले बरे ? त्याने वर सांगितलेल्या दोनही युक्त्यांचा यथाकाल अवलंब केला. ज्या काळी पाश्चात्यांनी आमच्या किनाऱ्यावर प्रवेश केला त्याच सुमारास जपानच्या किनाऱ्यावरही केला. पण या लोकांची परस्वहरणाची अजब चलाखी ओळखून वेळीच त्यांस आपल्या देशात पाऊल ठेवण्यासही बंदी जपानी लोकांनी केली. त्यामुळे धर्म, स्वातंत्र्य आणि पैसा ही तीनही त्यांनी रक्षिली; पण हे करण्यास त्यांच्यात अभेद्य एकी होती. या प्रकाराने जपान जगातील इतर देशांच्या सुधारणेस पारखे होऊन होते त्याच स्थितीत राहिले. अशा स्थितीत दोन शतके गेल्यावर सन १८६७ साली एका अमेरिकन कमांडरने जपानच्या किनाऱ्यावर येऊन लगट केली. यापूर्वीच चीनच्या किनाऱ्यावर इंग्रजांनी जबरीने प्रवेश केला होता तेव्हा आपल्या जुन्या आयुधांनी स्वातंत्र्य रक्षण होणे नाही हे अगदी ऐनवेळी ओळखून जपानने आधुनिक जगात प्रवेश केला. ताबडतोब राक्षसी जोराने कामास लागून युरोपियनांची चारशे वर्षांची सुधारणा त्यांनी अवघ्या पंचवीस वर्षात आत्मसात केली. या क्रांतीच्या काळात जर त्यांनी मूर्खपणाने कोणत्याही पाश्चात्य राष्ट्राशी कुरापत काढली असती तर त्यांच्या स्वातंत्र्याचा चुटकीसरशी होम झाला असता; पण या काळात त्यांनी इतक्या शिताफीने राजकारण चालविले की, कोणाशी तोंड लागू नये. दुर्बलाचा बलवानाने अपमान केला तरी त्याने स्वत: बलवान होईपर्यंत त्यास दम खावा लागतो, पण जर का मूर्खपणाने नुसता तालीमखान्यात प्रवेश करून हा दंड पिटू लागल, तर त्याचा नाश होईल, हे जपानी मुत्सद्यांनी इतके पुरेपूर ओळखले होते की, त्यांनी सर्वांशी 'सुसरीबाई तुझी पाठ मऊ' या तत्त्वावर घेतले होते. जपानी लोकांच्या या क्रांतिकालीन मुत्सद्देगिरीला जगाच्या इतिहासात तोड नाही कोणत्याही पाश्चात्य राष्ट्रानेही इतक्या अल्प कालात एवढी कर्तबगारी दाखविलेली नाही. या जपानी मुत्सद्यांच्या पासंगालाही पुरणारी हुषारी

दाखविणारा पेशवाईत कोणी निघाला नाही ही केवढ्या शरमेची गोष्ट आहे ?

नानासाहेबाच्या काली हिंदुस्थानात परक्यास दूर ठेवण्याचा मार्गच मोकळा नव्हता. असे करण्यास सर्व देशावर एकच अकुंठित सत्ता गाजविणारा प्रभू लागतो. खेरीज लोकांतही इतकी एकी व इतके देशप्रेम लागते की, कोणीही घरभेद्या न निघावा. हिंदुस्थान हा देश एवढा अफाट, इतक्या वेगवेगळ्या सत्ताधिशांनी व्यापलेला व इतक्या भिन्न भिन्न जातींनी भरलेला की, या सर्वच गोष्टी अशक्य होत्या. दुसरा मार्ग म्हणजे परक्यास मोकळीक ठेवून आपली सुधारणा करीत रहाणे आणि योग्य वेळी एकएकाचा काटा काढणे; हेच नानासाहेबास करणीय होते. ते त्याने केले किंवा करण्यांचा आटोकाट प्रयत्न केला कीं नाही, यावरच त्याची कसोटी लागणार आहे. त्यास यश आले किंवा नाही हा प्रश्न गौण आहे मुत्सद्देगिरीचे पहिले लक्षण म्हणजे कालज्ञान. आपण कोणत्या कालात आहो आणि त्या कालाचा विशेष काय हे ओळखून ज्याचा कार्यक्रम ठरतो त्यासच मुत्सद्दी होणे शक्य आहे. कार्लाइल हा आपल्या वीरपुरुषविवेचनात नेहमी Zeitgeist किंवा Time-spirit ऊर्फ कालात्मा असा एक शब्द नेहमी योजतो. हा आत्मा ज्यास ओळखता येतो त्यासच यशप्राप्ती होणे शक्य असते नानासाहेबास किंवा पेशवाईतील कोणासही या आत्म्याची ओळख पटली नाही. अठराव्या शतकात हिंदुस्थानात अराजक इतके बोकाळले होते की, नानासाहेबासच काय पण शिवाजीसारख्या पुरुषांनाही त्यास आटोक्यात आणणे दुरापास्त झाले असते. समाजात सर्वत्र एकमुखी सत्तेविरुद्ध एक प्रचंड लाटच जणू निर्माण झाली होती. छत्रपतीचे पेशव्याने ऐकू नये, पेशव्यांचे सरदारांनी ऐकू नये, त्यांस क्षुद्र पथक्यांनीही जुमानू नये अशी काही जनमनोरचना त्याकाळी बनली होती. प्रत्येकासच राजा होण्याची हाव सुटली तर राज्याची काय स्थिती होणार ? व्यक्तिस्वार्थ जर इतका बळावला तर कर्तव्यनिष्ठा कोठें राहणार ? आपण सर्व एक, आपले सर्वांचे हित एकच ही भावनाच जर समाजातून नष्ट झाली, तर चार लोकांनी एकमार्गाने कसे जावे ? पण अशीच काही स्थिती त्या काळी होती– दुर्दैवाने आमच्यात ती तशीच आजही कायम आहे– अशी कल्पना त्या काळचे अस्सल लेख वाचणाराची होते हे खास. हे कालमाहात्म्य त्या काळी ओळखून नानासाहेबाने शिवशाहीचा कार्यक्रम आखला पाहिजे होता.

शिवाजीने स्वतंत्र राज्य स्थापण्याचा प्रयत्न यशस्वी करून दाखविल्यापासून हिंदुस्थानात त्याचेच अनुकरण करून स्वतत्र सत्ताधीश होण्याचा पायंडा पडत गेला. शिवाजीच्या समकालीच छत्रसाल व राजसिंह यांनी औरंगझेबास न जुमानता जवळ जवळ स्वतंत्र होण्याचा पंथ काढला. त्यानंतर औरंगझेबाने विजापूर, गोवळकोंडे, महाराष्ट्र, येथील राज्ये जिंकिली त्यामुळे मध्यवर्ती सत्तेचा दरारा हिंदुस्थानच्या जास्तच भागांतून नष्ट झाला . कारण दक्षिणेत जुन्या सत्तांची वेसण मात्र नष्ट होऊन नव्या सत्तेची वेसण अडकण्यास कालावधीच मिळाला नाही. या अराजकी

काळात अनेक महत्त्वाकांक्षी व स्वाभिमानी मराठ्यांनी जोर मारून बराच मुलुख हाताखाली घातला. पण या नव्या मराठ्यांच्या राज्याचा विशेष हा असा होता की, ते मध्यवर्ती सत्तेच्या पगारी नोकरांनी कमावलेले शिवकालीन राज्य नसून, स्वतःच्या पराक्रमाने व हुषारीने अनेक व्यक्तींनी जिंकलेले राज्य होते. या अनेक व्यक्ती एक-एकट्या स्वतःच्या पायावर उभे राहण्यास दुर्बल होत्या. त्यामुळे त्यांस शिवछत्रपतीच्या नावाखाली एकत्र जमणे अवश्यच होते. या एकांड्या शिलेदारांस एकत्र राखण्याचा प्रयत्न रामचंद्रपंत अमात्यांसारख्या स्वाभिमानी लोकांनी केला. तरीही ते इतके दोन दगडीवर पाय ठेऊन असत की, प्रत्येकाचे मोगली अंमलदाराशी सूत असे. रामचंद्रपंताने शिवकालीन शिस्त गाजवण्याचा विचार केला असता तर हे सर्व मोगली जहागिरदार बनले असते. शिस्त सुटल्यामुळे नवीन घारे पडत चालले. प्रत्येक सरदार मुलुखगिरीवर निघण्याच्या आधीच जिंकावयाच्या मुलुखाची सनद छत्रपतीकडून करून घेई. छत्रपतीच्या दरबारचे प्रधान, हे निदान इतका तरी मान ठेवतात एवढेच समजत. शाहूच्या आगमनाने या प्रकारांत वाढच झाली. पेशव्यांनी जुन्या शिरजोर सरदारांस मोडण्याचा प्रयत्न केला, पण असे करण्यासाठी त्यास नवीन स्वतःचे सरदार निर्माण करावे लागले. तात्पर्य काय? एकसूत्रीपणास बाध यावयाचा तो आलाच. नानासाहेबास जयाप्पा शिंद्यासारख्या सरदारास जे चुचकारावे लागे व मल्हाररावाच्या मनस्वीपणापुढे मान वाकविण्याची पाळी येई, ती यामुळेच. मात्र असे पेशवे न करते तर मराठ्यांचे जे नाव गाजले तेही गाजले नसते. कारण मराठ्यांत एकांडेपणाचा दोष हा मूळभूतच आहे. आम्ही अजूनही पारशांसारख्या संहतीने जाणाऱ्या लोकांस कावळ्यांची उपमा देत असतो. पण अशा कावळ्यांसारख्या जुटीने वागणाऱ्या लोकांचीच कायमची भरभराट शक्य असते हे मात्र विसरतो. मराठ्यांच्या एकांडेपणास शौर्याची जोड असल्यामुळेच त्यांचे नाव काही काळ गाजले. मराठ्यांचा इतिहास शिवाजीपासून आरंभ करून बहुतेक या एकांड्यांनीच बनविलेला आहे. नानासाहेबाच्या अमदानीतसुद्धा जयाप्पा, दत्ताजी, मल्हारराव, दमाजी, रघूजी, जानोजी, प्रभृति मनस्वी एकांड्यांच्या एककल्ली पराक्रमानेच राज्याची थोडीफार भरभराट झाली.

अठराव्या शतकात पराक्रमी एकांड्यांची व्याप्ती मराठ्यांपुरतीच नसून हिंदुस्थानातील इतर जातींतही त्यांची उपज होत होती. पडत्या बादशाहीचे सफदरजंग, अलिवर्दीखान, निजामुल्मुक प्रभृति सुभेदार; रोहिले, शीख, जाट, बुंदेले प्रभृति जातीतील असंख्य सरदार; दक्षिणेतील सावनूर, कडपे, कर्नुळ, अर्काट, प्रभृति ठिकाणचे नबाब; व म्हैसूर, सोंधें, बिदनूर, त्रिचनापल्ली, चित्रदुर्ग प्रभृति असंख्य लहान मोठ्या संस्थानांचे स्थानिक राजे; हे सर्वच आपापल्या ठायी स्वतंत्र होण्याच्या विचाराने वागत असून, ज्या आपल्याहून प्रबळ सत्ताधिशाचे सैन्य प्रत्यक्ष आपल्या दारातच येऊन ठेपेल, त्यापुढे अगदी तात्पुरतीच मान वाकविण्याचा त्यांचा प्रघात

असे. सैन्य माघारे फिरले की हे पूर्ण स्वतंत्र. पेशव्यांच्या फौजा सालोसाल गेल्या तरच खंडणी जमा व्हावयाची. मराठ्यांस उत्तरेत काम पडले तर दक्षिणेतील खंडणी बंद, दक्षिणेत स्वारी गेली तर उत्तरेस मराठ्यांचा अंमल उठण्याची भीती. अशी सर्व देशाची स्थिती असताना ज्यास हिंदुपदपातशाही स्थापण्याची महत्वाकांक्षा, त्यांनी कोणत्या मार्गास लागावयाचे ? पण मार्ग ठरण्यापूर्वी महत्त्वाकांक्षा पुरी करण्यास मराठ्यांजवळ पुरेशी साधनसामग्री होती किंवा काय हे पाहिले पाहिजे.

हिंदुपदपातशाही म्हणजे हिंदूंच्या प्रदेशांत हिंदूंचे वर्चस्व असणे. अठराव्या शतकात हा हिंदुस्थान प्रदेश केवढा होता ? दहाव्या शतकापर्यंत काबूल कंदहारपर्यंत तो पसरलेला होता, परंतु मुसलमानांच्या लाटेने त्यास सिंधूच्या पलीकडे हांकून दिले होते. काबूल कंदहार हा प्रदेश वास्तविक लष्करीदृष्टया हिंदुस्थानावर स्वामित्व गाजविणाऱ्या सत्तेच्या ताब्यात असावयास पाहिजे, तरच हिंदुस्थानचे रक्षण शक्य होते. औरंगजेबापर्यंतच्या मोगल बादशहांचा अंमल या प्रदेशावर होता. तदनंतर-सुद्धा राघोबादादाच्या सन १७५८ च्या अटकेपर्यंतच्या भरारीतागाईत हा प्रदेश दिल्लीपतींच्या कक्षेतील अशी प्रचलित समजुत होती. इराणची व हिंदुस्थानची सरहद्द एकमेकांस भिडलेली असावी अशी पूर्वपरंपरा. त्यामुळेच राघोबाच्या पत्रांत अब्दाली हा या पातशाहीतील बंडखोर उपटसुंभ अशीच भावना आढळते. पण नानासाहेबाच्या काळी या सिंधुपार प्रदेशात हिंदूंची वसती अत्यल्प असून हिंदूपदपात-शाहीच्या कक्षेतून हा प्रदेश कायमचा सुटला होता. हा प्रदेश, आजच्या काश्मीरच्या राज्यापैकी खुद्द काश्मीर खोरे सोडून इतर प्रदेश, बलुचिस्थान, वगैरे हिंदुबाह्य प्रदेश वगळून; पण नेपाळ, सिंहलद्वीप, वगैरे हिंदूवसती असलेले प्रदेश जमेस धरता, हिंदुपदपातशाहीचे कार्यक्षेत्र उणे पुरे पंधरा लक्ष चौरस मैलांचे ठरते. बृहन्महारा-ष्ट्राचे क्षेत्रफळ एक लाख चौरस मैल. मराठ्यांनी सर्व हिंदुस्थानावर अधिराज्य गाजवावयाचे म्हणजे आपल्या पंधरापट मुलखावर सत्ता चालवावयाची. आधुनिक शोधांनी अंतर तोडण्यात शिकस्त केल्यामुळे ही गोष्ट सोपी झाली आहे. आज पुण्याहून पेशावर म्हणजे दोन दिवसाची वाट, त्या काळी ही वाट चालण्यास निदान महिना लागला असता. पुलांच्या अभावी अब्दाली व सदाशिवराव यमुनेच्या दोन तीरांवर महिनेच्या महिने अडकून राहिले. त्या काळी तारायंत्र असते तर पानिपता-हून पुण्यास तार जाऊन नानासाहेब केव्हाच साहाय्यास आला असता ! क्षेत्रफळाची बाब सोडली तर जेत्यांजवळ निदान जास्त मारक शस्त्रास्त्रे तरी पाहिजेत. मराठ्यां-जवळ तीही नव्हती. राहता राहिले शौर्य व युद्धकौशल्य. यावरच मराठ्यांचा जोर, पण याही बाबतीत त्यांस अब्दाली, पोर्तुगीज, हैदर, इंग्रज असे प्रसंगोपात वस्ताद भेटतच.

आता संख्याबलाकडे वळू. त्याकाळी हिंदुस्थानची लोकसंख्या अजमासे बारा कोटी-हून जास्त नसावी. महाराष्ट्राची आमच्या मते पन्नास साठ लाखाहून जास्त नव्हती.

हे आकडे तर्कावर रचलेले असले तरी त्यांस मुळीच आधार नाही असे नव्हे. पण हे आधार व त्यांची गोळाबेरीज करण्याचे हे स्थळ नव्हे. हिंदुस्थानच्या बारा कोटीत मुसलमानांची संख्या सुमारे दोन कोटी असावी. जर्मन लष्करी रीतीच्या मापाने पहाता लोकसंख्येचा दहावा हिस्सा लढाऊ लोकांची संख्या असते. म्हणजे त्याकाळी साहा लाख मराठे लढाईस योग्य ठरले असते असे होते. परंतु जर्मन गणतीत जातीची अडचण धरलेली नाही. हिंदुस्थानातील बऱ्याच जातींतून लष्करी शिपाई मिळणे कठीण होते. उदाहरणार्थ ब्राह्मण जात घेऊ. मराठ्यांत पुष्कळ ब्राह्मण सरदार होते. तरी मराठ्यांच्या लष्करात ब्राह्मण शिपायांचा फारसा भरणा होता असे दिसत नाही. लष्कराबरोबर असलेले हत्यारबंद कारकून वगळले तर केवळ शिपाई-पेशात ब्राह्मण थोडेच आढळले असते. उलटपक्षी अलाहाबाद, अयोध्येकडील अनेक ब्राह्मण जाती शिपाईपेशाच्या आहेत. आपण इकडे तत्प्रांतीय जे परदेशी भय्ये अशाच कामावर ठेवतो त्यातील बरेच ब्राह्मण असतात. सत्तावन सालच्या बंडात बंगाल्यांत पहिले बंड या परदेशी ब्राह्मण पलटणीत झाले. आजही त्यांचा शिपाईपेशा सुटलेला नाही. गेल्या महायुद्धात या ब्राह्मणांनी ४६ हजार लोक पुरवले असे युद्धा-नंतर त्यांची एक परिषद झाली तिच्या अध्यक्षांनी अभिमानाने सांगितले. त्याकाळी सुजाउदौल्याच्या सैन्यात या लोकांचा मोठा भरणा होता. असे लोक वगळले तर बंगाल, मद्रास, गुजराथ वगैरे प्रांतांतील ब्राह्मणात मात्र लढवय्ये मुळीच कोणी नव्हते. क्षत्रिय व शेतकरी वर्गात शिपायांचा भरणा जसा होत असे तसा वैश्य व शिल्पी लोकांत होत नसे. अस्पृश्य जातींसही लष्करी पेशात मज्जाव नसला तरी त्यांच्याशी बरोबरीने काम करण्यास इतर उच्चवर्णीय तयार नसल्यामुळे त्यांची भरती होत नसावी. त्यांचा उपयोग मजूर, भारवाहक, असा करीत असत. या सर्व अडचणींचा विचार करता त्याकाळी मराठ्यांस तीन लाखापेक्षा जास्त सैन्य महा-राष्ट्रीयांचे असे उभारणे कठीण होते असे म्हणता येईल. लोकसंख्येच्या वाढीने सैन्यातील कामास आलेल्या लोकांच्या जागी नवीन भरती वेळोवेळी होण्यासारखी होती. या तीन लाख सैन्याचे अधिपत्य एकाच एकसूत्री सत्तेकडे असते तरीसुद्धा त्याच्या बळावर सर्व हिंदुस्थान जिंकणे व त्यावर अव्याहत सत्ता चालविणे त्या-काळी मराठ्यांस शक्य होते असे वाटत नाही. पण तेही कधी घडले नाही. मरा-ठ्यांचे बरेच सैन्य निजामापाशी होते. पेशव्यांशी जुटीने न वागणाऱ्या लहान सत्ता-धिशांजवळही बरेच मराठ शिपाई नोकरीस असत. म्हणजे पेशव्याजवळ दोन लाखापेक्षा जास्त मराठ जमणे शक्य नव्हते व त्यांच्या बळावर हिंदुपदपातशाही स्थापण्याचा त्याचा विचार होता.

वरील विवेचनावरून केवळ मराठ्यांस सर्व हिंदुस्थानची रखवाली करणे शक्य नव्हते हे उघड झाले. म्हणूनच मराठ्यांस कानडी व मुसलमान शिपायांचे गाडदी सैन्य इब्राहिमखानाबरोबर ठेवणे भाग झाले. उत्तरेस शिंद्यांच्या फौजेत हिंदुस्थानी

शिपाई ठेवण्याचा प्रघात पडला. नारो शंकराजवळ अरब शिबंदी असे व पानिपतच्या वेळी तर गिलच्यांची एक रुसून आलेली तुकडी मराठ्यांनी नोकरीस ठेवली होती. अर्थात् त्यापासून होणारे तोटेही मराठ्यांच्या वाटणीस आले. आता मराठ्यांच्या सैन्यास कितीपट सैन्याशी झगडावे लागले असते याचा विचार करू.

सर्व हिंदुस्थान मराठ्यांविरुद्ध एकदम उठले असे धरले तर एक कोटीवर शिपायांशी त्यास झगडणे भाग आले असते. पण हे जास्तीत जास्त गणिती प्रमाण झाले. प्रत्यक्ष एवढ्या मोठ्या सैन्यास नोकरीस ठेवून त्याकडून काम घेणारे सत्ताधीश हिंदुस्थानात नव्हते हीच त्या वेळी मराठ्यांच्या फायद्याची गोष्ट होती. मात्र अनेक वेळी, विशेषतः स्वभूमीसाठी लढण्याचा प्रसंग येई तेव्हा, हे अमूर्त सैन्य मराठ्यांस जाचक होत असे हे, त्यांच्या बुंदेले, रजपूत वगैरेंशी झालेल्या झगड्यात दिसून येत असे. अशी परिस्थिती सोडून इतर सत्ताधिशांकडे पाहता त्यांच्या फौजेची बेरीज दाहा लाखांपेक्षा जास्त नव्हती. हे सैन्य अटकेपासून रामेश्वरापर्यंत पसरलेले असून ते एकत्र होण्याचा कधीच संभव नव्हता. पेशवा प्रसंगोपात एक लाखापर्यंत फौज एका वेळी समरांगणात आणू शके. तितकीही त्यास तोंड देण्यास कोणी आणू शकत नसे. पानपतच्या वेळी अब्दाली, रोहिले, सुजाउद्दौला असे एकत्र झाले, तेव्हाच मराठ्यांशी सामन्यास आले. पण या काळी मराठ्यांच्या तोट्याची अशी गोष्ट, हे सैन्य अनेक सत्ताधिशांच्या हाती होते हीच होती. एकाच्या हाती मोठे सैन्य नसणे ही जशी मराठ्यांस स्वारी करण्यास उत्तेजक गोष्ट, तशीच एकाच सत्ताधिशाचा एका दिशेस पराभव करून दुसरे संस्थानिक दबू शकत नसत ही गैरसोईची गोष्ट होती. वर ज्या कालात्म्याचे वर्णन केले त्याचा जोर अठराव्या शतकात एवढा मोठा होता की, पेशव्याने मोठ्या निजामाचा पराभव केला तरी कर्नाटकातील एखादा क्षुद्र देसाईसुद्धा त्यामुळे दहशत खात नसे. त्याच्यावर स्वतंत्र सैन्यासह वेगळी स्वारी करावी तेव्हाच त्याच्याकडून खंडणी वसूल व्हावयाचा संभव. कर्नाटकात स्वारी येऊन पुनः जर पेशवा एकाच जागी राहील, तरीही हे क्षुद्र सत्ताधीश भरणा करावयाचे नव्हत, प्रत्येकाच्या गावास वेढा बसेल तेव्हाच त्याकडून काही मिळण्याची आशा पेशव्याने धरावी ! आणि पेशव्याचे उत्पन्न तर असल्या खंडण्यांवर अवलंबून. ते न आले तर फौजेचे धरणे बसण्याची धास्ती. या सर्व परिस्थितीचा परिणाम असा होत असे की, पेशव्याची स्वारी बुंदेलखंडात गेली तर दक्षिणेत निजामाने पुनः जमवाजमव करून सामन्यास तयार व्हावे, पेशवा निजामावर आला तर रजपुतांनी उचल करावी. एवंच जेथे मराठ्यांचे सैन्य तेथे तेवढ त्यांचे राज्य, बाकीचा प्रदेश बहुतेक स्वतंत्र अशी स्थिती होती.

वरील विवेचनावरून अशी शंका निघणे शक्य आहे की, जिंकलेल्या प्रदेशात मराठ्यांनी कायम शिबंदी ठेवून व्यवस्थित अंमल का चालू केला नाही ? या प्रश्नास अनेक उत्तरे आहेत. एक तर मराठ्यांनी एखादे राज्य जिंकले याचा अर्थ

ते संपूर्ण त्यांच्या ताब्यात आले असा कधीच नव्हता, त्याचा अर्थ त्या संस्थानिकाचा मराठ्यांनी युद्धात पराभव केला एवढाच असे पण अशीही गोष्ट नेहमी घडत नसे. धूर्त संस्थानिक मराठ्यांची परिस्थिती पुरी ओळखीत असत. युद्ध करून आपले सैन्य जाया होण्यापूर्वीच ते शरण येऊन खंडणी ठरवीत व काही रकम रोख देत. त्यांस माहीत असे की, एकदा हे सैन्य माघारे फिरले की पुन: तीन वर्षे धास्ती नाही, ते दुसऱ्या दिशांस गुंतले जाणार, पुन: येईल तेव्हा पाहता येईल. या वागणुकीचा परिणाम, मराठ्यांवर प्रसंगोपात उलटू शकणारे सैन्य शाबूत अस्तित्वात राही, कायमचे नष्ट होत नसे. याच गोष्टीत पेशव्यांच्या राजनीतीचा लंगडेपणा निदर्शनास येतो. एकच दिशा रोखून तिकडील प्रदेश नि:शेष-शत्रू करण्याचे टाकून त्यांनी अनेक बाजूची राजकारणे एकदम हातात घेतली. हरिवंशातील,

**शत्रुशेषमृणशेषं शेषमग्नेश्च भूनृप ।।**
**पुनर्वर्धेत संभूय तस्माच्छेषं न शेषयेत् ।।**

ही शिवाजीने ओळखलेली राजनीति पेशव्यांनी अवलंबिली नाही. अशी नीती आचारावयास एक प्रकारचा करडेपणा लागतो तो शिवकालीन मराठ्यांत होता. तो पेशवाईत उरलेला दिसत नाही. जेतृपणा हा एक प्रकारे क्रूरपणाच आहे, त्या क्रूरपणाची भरपाई पुढे सम्यक् प्रजापालनाने करावयाची असते. जेतृपणाचा राजधर्म आचरताना ज्याचे मन व्यक्तिधर्मास विसरत नाही तो जेता होण्यासच अयोग्य होय. या दृष्टीने पहाता नानासाहेब पेशव्याची मोठी चूक, एक एक काटा पुरा काढून न टाकणे ही होय. त्याने कसे वागावयास पाहिजे होते याचा विचार आता करू.

बाजीरावाच्या मृत्यूपर्यंत मराठ्यांचा अंमल अर्धेउणे महाराष्ट्र, गुजरातचा दक्षिणभाग, माळवा, बुंदेलखंड, मध्यप्रांतातील बराच भाग इतक्या प्रदेशावर साधारणपणे बसला होता. साधारणपणे म्हणण्याचे कारण माळवा, बुंदेलखंड वगैरे ठिकाणी सुरळित अंमल चालू झाला नसून केवळ जुजबी खंडणी वसूल होत असे. सरदारांत तंटे होऊ नयेत म्हणून शाहूने वेगवेगळ्या सरदारांस अनेक दिशांस पाठविण्याचा प्रघात सुरू केला. त्याचा परिणाम असा झाला की बाजीराव फक्त उत्तरेस जाऊ लागला. दक्षिण बाजू ही फत्तेसिंग भोसले, प्रतिनिधी, बाबूजी नाईक, यांचे कार्यक्षेत्र म्हणून राखण्यात आली. या गोष्टीचा परिणाम मराठ्यांच्या राज्यास अत्यंत विघातक झाला. ज्या बाजूस अपराक्रमी सरदार जावे अशी योजना होती ती बाजू लंगडी राहिली. वास्तविक सर्व मराठ्यांच्या हितावर लक्ष ठेवणे व परराष्ट्रापुरती तरी एकमुखी सत्ता राखणे या दृष्टीने काम चालण्यास सर्वांवर एका हुषार माणसाची योजना झाली पाहिजे होती. स्वत: शाहू असे काम करण्याचा प्रयत्न करी, पण असल्या कामास तो जात्याच नालायक होता. बाजीरावाची मुख्य प्रधान या नात्याची हुकमत पाळण्यास कोणीच तयार नव्हता. बाजीरावाच्या वेळी

दिल्लीची बादशाही बरीच जोर धरून होती. वजीर कमरुद्दीनखान, निजामउलमुल्क सफदरजंग वगैरे हुषार गृहस्थ तिला टेकू देऊन होते. अशा वेळी बाजीरावाच्या स्वाऱ्या तिकडच्या प्रदेशात होण्यात काहीच फायदा नव्हता व तसा झालाही नाही. यावेळी हिंदुस्थानातील राजनीतीचे धोरण जुन्या वृक्षाच्या बळकट खोडावर घाव घालण्याचे नसून तिच्या फांद्यांवर हत्यार चालविण्याचे होते. बादशाही कमजोर झाली असली तरी तिची पाळेमुळे इतकी खोलवर गेलेली होती की, तिच्यावर प्रत्यक्ष उठणे म्हणजे गांधील माशीच्या पैकडीस हात लावण्यासारखे होते. सारी दक्षिण मोकळी पडलेली असताना नर्मदा ओलांडण्याचे मराठ्यांस काहीच प्रयोजन नव्हते. बाजीरावाची झडप कर्नाटकावर पडती तर अर्काट, सावनूर, कडपे, म्हैसूर वगैरे लहान संस्थाने जागच्या जागी विराम पावून, महंमदअली, चंदासाहेब, हैदर, व त्यांच्याचबरोबर इंग्रज, फ्रेंच वगैरेंची नावे पुढे येणेच अशक्य झाले असते. हा सर्व प्रदेश अनेक, आपआपसात भांडणाऱ्या, क्षुद्र संस्थानिकांच्या ताब्यात राहू दिला, ही मराठ्यांच्या दक्षिणेतील राजकारणातील मोठी चूक. यामुळेच धूर्त व युद्धशास्त्रात जास्त निष्णात अशा परकीय व्यापाऱ्यांस बोट शिरकावण्यास अवकाश मिळाला. बरे बाजीरावाच्या वेळी बाजू चुकली तर निदान नानासाहेबाने तरी ती सुधारावी की नाही? सन १७४०–४१ सालात शाहूने तंजावरच्या आपल्या भाईबंदाच्या मदतीस म्हणून का होईना, तिकडे रघूजी भोसले प्रभृतीस पाठवून मराठ्यांचा दरारा पुनश्च बसविला. हा सर्व प्रदेश शहाजी, शिवाजी, राजाराम याच्या काळी मराठ्यांच्या परिचयाचा झालेला असून तिकडील काही प्रदेशावर त्यांचे राज्यही होते. असा प्रदेश हाती आलेला असताना तेथील राज्य पक्के करण्याचे सोडून मराठ्यांस परत येण्याचे काहीच कारण नव्हते. पण आपसातील चुरशीमुळे रघूजीस वाटले की, नानासाहेब उत्तरेत गेला आहे तेव्हा आपला तिकडील मुलूख सुरक्षित नाही, त्यामुळे तो परत आला. यापुढे तरी नानासाहेबाने उत्तरेतून परत आल्यावर कर्नाटकाकडे लक्ष पुरवावे की नाही? पण नाही. तो रघूजीच्या पाठीवर बंगाल्यांत गेला व तेथे एकाच छत्रपतीचे दोन सरदार आपसात लढतात असे दृश्य उत्तरेतील मुसलमानांस दिसले! या कृत्याचा लष्करी दृष्ट्या झालेला तोटा बाजूस ठेवला तरी राजनीतीतील ही केवढी घोडचूक समजावयाची बरे! अतःपर उत्तरेतील राजेरजवाडे मनात पुरे समजले की, एका मराठा सरदाराविरुद्ध आपणास दुसऱ्याची मदत घेतली की झाले काम! रजपूत, जाट, वजीर, रोहिले यांनी या कानमंत्राचा पुढे कसा उपयोग करून घेतला हे इतिहासविदांस माहीत आहेच. अशा तऱ्हेची चूक नानासाहेबाच्या हातून घडते तेव्हा त्याच्या मुत्सद्देगिरीची काय तारीफ करावी! मराठ्यांच्या राजकीय नीतिमत्तेचे यापरते प्रदर्शन ते काय राहिले!

हे दोन प्रबल मराठे सरदार दूरच्या बंगाल प्रांतात गुंतले आहेत ही संधी धूर्त

निजामाने मात्र व्यर्थ दवडिली नाही. त्याने याच वेळी (सन १७४३) कर्नाटकात उतरून मराठ्यांचे दोन वर्षांचे कार्य चुटकीसरशी कोसळून टाकले. यावेळी त्यास शह देणे हे मराठ्यांच्या साम्राज्याच्या मुख्य प्रधानांचे कर्तव्य नव्हते? पण त्याच्या मनात कर्नाटक गेले, तर भोसल्यांचे व बाबूजींचे. दुर्बळांचा कनवाळू शाहू हे त्यांकडून काढून आपणास थोडेच देणार आहे? त्यापेक्षा निजामाशी गोडी ठेवून आपण (बाजीरावाने आधीच जिंकलेल्या) माळव्याच्या कोरड्या बादशाही सनदा आपल्या नावे मिळवणे हेच बरे. एवंच हा प्रदेश कायमचा मराठ्यांच्या कक्षेतून सुटला व याच प्रदेशात इंग्रज, फ्रेंच, हैदर वगैरे यथावकाश वाढीस लागले. मराठ्यांच्या हाताखालचा मुलुख गमावून हिंदूपदपातशाहीचे पाऊल पुढेच पडणार होते नव्हे!

मराठ्यांच्या राज्याचा कायमचा दुष्मन म्हणजे निजाम. एवढी पेशव्यांची अमदानी होऊन त्यांचे नावही राहिले नाही, पण निजाम आजसुद्धा कायमच आहे. पेशव्यांनी निजामाचा दहावीस वेळ पराभव केला असेल, पण सर्व मराठी बोलणारे लोकही कधी त्याच्या ताब्यांतून सुटले नाहीत, अजूनही ते त्याच्या राज्यात आहेत. असे का बरे? 'मराठा तितुका मेळवावा' हा शिवाजीस दिलेला गुरुमंत्र 'शिवाजी महाराजांच्या शिष्यांस' आठवला नाही काय? हिंदूधर्माभिमानी रजपूत राजांवर आपले पराक्रमी सरदार वर्षानुवर्ष गुंतवून ठेवणाऱ्या पेशव्यांस तितक्याच श्रमात निजामाचे समूळ उच्चाटण करता आले नसते काय? पण दुष्टांचे शेषही शिल्लक ठेवू नये ही साधी पुराणात सांगितलेली नीती पेशव्यांस समजलेली दिसत नाही. हिंदुपदपातशाही करू इच्छिणाऱ्या पेशव्यास रजपूत, जाट, बुंदेले, हे स्वधर्मीय परके वाटले. त्यांच्यावर ज्या चिडीने व आवेशाने मोहिमा झाल्या तशा निजामावर होत्या, तर कपाळास लावावयास त्याची रक्षासुद्धा उरली नसती! त्यास शिल्लक ठेवून दिल्लीच्या राजकारणात हात घालण्याची पेशव्यास काय आवश्यकता होती? निजामाच्या मदतीस कोणीही मुसलमान उत्तरेतून येत नव्हता. त्याचे राज्य बुडते तर दिल्लीच्या बादशाहीप्रमाणे लोकांस त्यांचे प्रेम थोडेच होते? त्या काळी या सर्व स्वतंत्र झालेल्या व दिल्लीपतीस न पुसणाऱ्या सुभेदारांस मोडणे हे एका दृष्टीने बंडखोरांचे पारिपत्यच भासण्यासारखे होते. निदान तसा राजकारणी पुकारा करण्यास पेशव्यास सवड होती. दक्षिणेत मुसलमानांची संख्या इतकी थोडी होती की, त्या सर्वांस हद्दपार करणेही त्या काळी शक्य झाले असते. पण हे सर्व करण्यास जो कडवा धर्माभिमान, जी करडी राजनीती, जो करारीपणा, चिकाटी व निश्चय, ही लागतात, ती कोठून आणावयाची?

प्रत्येक युगाचा कालात्मा जसा वेगळा, तसेच त्या कालात्म्यास प्रसन्न करून घेण्याची रीती वेगळी. ज्या आरोळीने सोळाव्या शतकात कार्य होते, त्याच आरोळीने अठराव्या शतकात होण्यासारखे नाही; किंवा सत्राव्या शतकात ज्या गर्जनेस

जनतेने हाक दिली, तिचा टाहो विसाव्यात उपयोगी पडण्यासारखा नाही. कालात्म्यास वश करू इच्छिणाऱ्या भक्तास विशिष्ट वेष परिधान करावा लागतो, नवा मंत्र जपावा लागतो, नवा शंखनाद करावा लागतो. सत्राव्या शतकात शिवाजीने धर्माची आरोळी ठोकून कार्यसाधना केली, त्या आरोळीच्या समर्थनार्थ प्रतापगडची भवानीही त्याच्या मुखे बोलू लागली, व त्या भवानीचे भक्तही शिवाजीच्या कार्यांत सामील झाले. शिवाजीला यशोलाभ होण्यास एकनाथ, तुकाराम, रामदास, अशा 'टाळकुटचा' भक्तांनी जे वातावरण निर्माण केले होते तेच उपयोगी पडले. तसे ते वातावरण नसते तर शिवाजीच्या अंगातील भवानीस पळून जाण्याची पाळी आली असती. अठराव्या शतकात अशा धर्मश्रद्धेच्या पूर बराच ओसरला होता, तरी प्रवाह चालू होता. कुशल कर्णधारास नाव हाकण्याइतके पाणी नदीत शिल्लक होते, नाव केवळच रुतली नसती. पण या कालाला अशा नव्या मंत्राची मात्र जोड पाहिजे होती की, ज्याच्या जपाने जे पिशाच कालदेवतेच्या मानगुटीस बसले होते ते अंतर्धान पावावे. शिवाजीच्या कार्यक्षेत्रास व काळास पुरण्यासारखा मंत्र 'मराठा तितुका मेळवावा' हा रामदासांनी सांगितला, पण या नव्या काळास लागू पडणारा मंत्र नानासाहेबास सापडला नाही. तो मंत्र विसाव्या शतकाप्रमाणे 'हिंदी तितुका मेळवावा' इतका विस्तृत नसता तरी 'हिंदू तितुका मेळवावा' एवढा विस्तृत पाहिजे होता खास. अशा मंत्राचा जप नानासाहेब करता तर कालदेवता त्यास निश्चित अनुकूल झाली असती. पंजाबात पिछाडी संभाळण्यास शीख, मध्ये हिंदुस्थान संभाळण्यास रजपूत, जाट, बुंदेले, व दक्षिणेस मराठे, असे ठासून उभे राहते तर हिंदुपदपातशाहीही झाली असती आणि मानगुटीस बसण्यासाठी आकाशात घिरटचा घालणारी परकी पाश्चात्य पिशाचेही अंतर्धान पावली असती. सत्राव्या शतकात शिवाजीला उत्तराभिमुख सैन्यरचना संग्रामासाठी करणे भाग होते, अठराव्यात ती दक्षिणाभिमुख करणे जरूर होते. पण हे सर्व कालात्मा जाणणाऱ्या कुशल सेनापतीसच कळण्यासारखे होते; पेशवा ते समजण्याइतका धूर्त नव्हता. म्हणूनच तो पिछाडीचे महत्व न ओळखता उत्तराभिमुख मुमूर्षु बादशाहीकडे तोंड करून उभा राहिला होता व त्याही स्थितीत योग्य मंत्राचा जप न केल्यामुळे पराभूत झाला.

जी चूक दिल्लीच्या राजकारणात झाली, तशाच स्वरूपाची चूक म्हैसूर प्रकरणी पेशव्याच्या हातून घडली. एकतर आधी शेजारचे निजामाचे मुसलमानी राज्य कायम ठेवून पूर्ण हिंदू म्हैसूरावर जाण्याचे पेशव्यास कारण नव्हते. जावयाचे तर ते पूर्ण ताब्यात घेण्याची तयारी पाहिजे होती. जिंकलेला मुलूख ताबडतोब ताब्यात घेऊन तेथे आपले राज्ययंत्र व्यवस्थित सुरू करणे हे मराठचांस ठाऊकच नव्हते. किंबहुना तशी त्यांची तयारीच नव्हती. सर्व हिंदुस्थानचा कारभार चालवण्यास भरपूर मराठी सैन्य जसे पुरण्यासारखे नव्हते, तसेच शांततेच्या काळात काम

चालवण्याइतके कारकून, कमाविसदार, सुभेदार वगैरे माणसेही महाराष्ट्रातून पुरली असती असे वाटत नाही. मराठ्यांचे मनुष्यबळच इतके नव्हते. त्यामुळे चौथाईच्या नुसत्या कबुलीवर मराठे माघारे जात. म्हैसूरच्या नंदिराजाचा पराभव करून पुनः मराठ्यांनी त्यास कायम ठेवल्याचा परिणाम असा झाला की, त्यास हैदराची मदत घ्यावी लागली; व अशा रीतीने अप्रत्यक्षपणे हैदराच्या उदयास पेशवा कारणीभूत झाला. अशाच मराठ्यांच्या अमुत्सद्देगिरीच्या वागणुकीने, निजामास फ्रेंचांची, महंमदअल्लीस इंग्रजांची, जंजिरेकरास मुंबईकरांची, अशी मदत घ्यावी लागून मराठ्यांच्या शत्रूंची संख्या वाढली व त्यांचा जोरही वाढला. शत्रूचे एकतर समूळ उच्चाटण करणे किंवा निदान इतरांची मदत त्यांस घेता येऊ नये अशी योजना करणे, ही नानासाहेबास करता आली नाहीत.

वर सांगितलेल्या सर्व चुकांपेक्षा मोठी चूक पेशव्याकडून बंगालप्रकरणी घडली व तीमुळे त्याच्या शहाणपणाचे योग्य माप घेता येते. या चुकीचे कडू फळ केवळ मराठ्यांच्याच वाटचास न येता, सर्व हिंदुस्थानास ते चाखावे लागत आहे. सन १७४३ च्या भांडणानंतर रघुजीने दक्षिण सोडून बंगाल हे आपले कार्यक्षेत्र केले व सालोसाल स्वाऱ्या करून त्या सुभ्याची चौथाई त्याने मिळविली व खेरीज ओढचा प्रांतही आपल्या राज्यास जोडला. चौथाईचा करार पाळावयाचा म्हणजे त्याप्रमाणे बंगालवर कोणी स्वारी केल्यास त्या प्रांताचे रक्षण करणे हे भोसल्यांचे कर्तव्य होते. करार बाजूस ठेवला तरी आपली चौथाई आपणांस पुढेही अव्याहत मिळण्यासाठी तरी तसे करणें मराठ्यांस इष्ट होते हे उघड आहे. सर्व हिंदुस्थानांत त्या काळी बंगालसारखा अव्याहत उत्पन्न देणारा प्रांत नव्हता. कारण या प्रदेशात दुष्काळाची बाधा क्वचित होते. गंगेच्या पुरांमुळे हा प्रदेश फार सुपीक झालेला होता. खेरीज हा प्रदेश हिंदुस्थानच्या एका टोकास असल्यामुळे बाहेरच्या स्वाऱ्यांचे त्यास फारसे भय नसे व लोकही गरीब असल्यामुळे अंतस्थ बंडेही फारशी होत नसत. जर हा सुभा पेशव्याने पुरा जिंकला असता, तर त्यास त्याच्या बाकीच्या सर्व राज्याइतके उत्पन्न झाले असते. अलिवर्दीखानाने जो चौथाईचा करार केला त्यात दुसरा कोणी मराठा सरदारही बंगालवर आल्यास रघूजीने रक्षणास आले पाहिजे अशी अट होती. शाहूनंतर मराठ्यांच्या राज्याचा सर्वाधिकार नानासाहेबाकडे आला तेव्हा राज्याचे सर्व करार पाळले जातील हे पाहणे व तशी व्यवस्था करणें हे त्याचे कर्तव्य झाले. पण हे कर्तव्य पाळण्याऐवजी बंगाल स्वतःच हाताखाली घालण्याचा त्याचा विचार होता असे त्याच्या जयापा शिंद्यास गेलेल्या आज्ञेवरून दिसते. सन १७५५ च्या आरंभी रघूजी भोसले वारला. त्याचे दोन मुलगे जानोजी व मुधोजी यांचे भांडण सुरू झाले. रघूजी जिवंत असेपर्यंत नागपुरच्या कारभारात पेशव्यास हात घालता येत नव्हता. तशी संधी यावेळी आली. पेशव्यांच्या अंगात मुत्सद्दीपण व राज्यहितैषा असती तर त्याने हे भांडण आपल्या जोरावर मोडून

दोघांसही मराठशाहीच्या उद्योगात सामील करून घेतले असते. पण तसे काहीच न करिता नानासाहेबाने दोघांसही आपणाजवळ माशा मारीत ठेवले. हिंदुस्थानची पूर्व बाजू सांभाळण्याचे काम भोसल्यांचे होते.त्यांनी नागपुरास राहून बंगाल्यावर पहारा ठवणे हेच त्यांचे मराठशाहीतील कार्य होते. सन १७५६–५७ ही वर्षे हिंदुस्थानच्या इतिहासात क्रांतीची होती. पेशव्याने इंग्रजांच्या मदतीने १७५६ च्या फेब्रुवारीत तुळाजीचा उच्छेद केला व इंग्रजांस आरबी समुद्र मोकळा करून दिला. स्वत: पेशवा या वेळी सावनूरच्या मोहिमेवर गेला होता. बरोबर भांडण तोडण्याच्या निमित्ताने भोसले बंधू त्याने दिवसगत लावून मुद्दाम घेतले होते. याचवेळी बंगाल्यात अलिवर्दिखान मरून त्याचा उनाड नातू सिराजउद्दौला सुभेदार झाला, मराठ्यांचे पाऊल त्या बाजूस पुढे सरकवण्यास ही अमूल्य संधी होती. मृत नबाबाच्या दुसऱ्या मुलींचे नवरे हेही वारस होते. दिल्लीचा बादशहा मराठे सांगतील त्यास सुभेदारीची वस्त्रे देता. अशा वेळी भोसल्यांच्या संगनमताने पेशव्याने बंगालच्या राजकारणात स्वत: लक्ष घातले पाहिजे होते. विजयदुर्ग पडल्याबरोबर इंग्रज किती शेर झाले होते हे, किल्ला पेशव्याच्या स्वाधीन करण्यात त्यांनी जी टाळाटाळी चालविली होती त्यावरून उघड कळून चुकले होते. यावेळी इंग्रज-फ्रेंचात सप्तवार्षिक युद्ध सुरू होऊन कलकत्तेकर इंग्रजांची सिराजने तळी उठवून दिली म्हणूनच इंग्रज जरा नरम येऊन त्यांनी विजयदुर्ग सोडले इतकेच. नाहीतर नानासाहेबास इंग्रजांचा कावा याच वेळी समजावयाचा. पेशव्यास मात्र या संधीचा मराठ्यांस फायदेशीर उपयोग करून घेणे सुचले नाही. किंबहुना कलकत्त्याच्या भांडणाची हकीकत तरी त्यास कळली होती किंवा कसे याचीही शंका वाटते. सर्व दिशांची ज्यास बातमीही राखता येत नाही त्याने हिंदुपदपातशाहीची महत्त्वाकांक्षा बाळगावी याचे मात्र आश्चर्य वाटते. परदेशात वकिलाती ठेवणे दूरच पण बंगालच्या नबाबाजवळसुद्धा पेशव्याचा वकील नव्हता. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. रघुनाथरावांची स्वारी कंगाल बनलेल्या दिल्लीवर गेली व नानासाहेब स्वत: श्रीरंगपट्टणावर गेला. मध्यंतरी इंग्रजांस मोकळे रान सापडून क्लाइवने भली मोठी शिकार केली. विजयदुर्गाहून तो मद्रासेस गेला व मद्रासेसही इंग्रजांवर कोणी नसल्याने त्यास, कलकत्तेकर इंग्रज हुगळीच्या तोंडावर हिवतापाने उपाशी मरत होते त्यांच्या मदतीस जाता आले. नबाबाच्या दरबारी यावेळी मराठ्यांचा मुळीच शह नसल्याने क्लाइवने सावकाश कारस्थाने रचून युद्धावाचून बंगाल घशात टाकला. याच तीन कोटीच्या सुभ्याची बारा लाख चौथाई मिळण्यासाठी, भोसल्यास दहा वर्षे सालोसाल स्वाऱ्या कराव्या लागल्या होत्या. एवंच ज्यात स्वारीचा खर्चही उभा होत नाही अशा अब्दालीवरील स्वाऱ्या कराव्या मराठ्यांनी, व केवळ बुद्धिबळावर व हिंमतीवर राज्य संपादावे इंग्रजांनी असा प्रकार झाला. आणि हा प्रकार होतो केव्हा ? काय रावबाजीच्या अंमलात ? नव्हे; पेशव्यांतील दिग्विजयी नानासाहेब, भाऊसाहेब, राघोभरारी यांच्या हया-

तीत व ते ज्या हिंदुस्थानात हिंदुपदपातशाही (की भटकुलबादशाही ?) स्थापण्याच्या महत्त्वाकांक्षेने कमर बांधून तयार होते तेव्हा. बरे हा प्रकार होता कोठे ? काय कानडात व मॉरिशस बेटात ? नव्हे, नव्हे, या भरतभूमीतच गंगासागरसंगमी !!

या प्रकरणाबद्दल नानासाहेबास वेळीच बातमी मिळाली नाही, किंवा मिळूनही त्याचे महत्व त्या वेळी लक्षात येण्यासारखे नव्हते असे मानले, तरी प्लासीनंतरसुद्धा चार वर्षे नानासाहेब जिवंत होता. इंग्रज-फ्रेंचाचे युद्ध रंगास चढले होते नानासाहेब यावेळी मोठी फौज घेऊन कर्नाटकात उतरता तर फरेंचांच्या साहाय्याने मद्रासचे उच्चाटण करता आले असते. मद्रास व मुंबई येथे दबाव पडता तर कलकत्तेकर इंग्रजांस काबूत आणणे जानोजी भोसल्यास अगदी सोपे होते.कारण मीरजाफरासही इंग्रज नको असून त्याने डच लोकांच्या मदतीने त्यांच्या ताब्यातून सुटण्याचा यत्न चालविला होता. जानोजीस त्याने चौथाईच्या कराराची पुन: कबुली दिली होती व त्याची मदतही मागितली होती. या प्रकरणी निजामाचीही मदत मिळण्यासारखी होती, कारण त्याचा उत्तर सरकार प्रांत कर्नल फोर्डने कलकत्त्याहून भोसल्याच्या ओढचा प्रांतांतून येऊन जिंकून घेतला होता. पेशव्याच्या शहामुळे बुसीला सलाबतजंगाच्या रक्षणास रहावे लागल्यामुळे त्यास फोर्डच्या विरुद्ध जाता आले नाही. जानोजी भोसल्यास, फोर्ड आपला मुलुख तुडवीत जात असता त्यास अडविता आले असते पण त्यानेही नानासाहेबाच्या चुरशीमुळे यावेळी इंग्रजांशी गोडीने घेतलेले दिसते. एरवी आपल्या चौथाईच्या क्षेत्रात दुसरे शिरले असता तो स्वस्थ का बसला होता याचा उलगडा होत नाही. बाकी त्याचे वर्तन कसेही असले, तरी या प्रकरणाकडे नानासाहेबाचे जे सर्वस्वी दुर्लक्ष झाले त्याचे समर्थन करता येत नाही. सर्व हिंदुस्थानात आपल्या संमतीशिवाय पानही हलू नये अशी व्यवस्था राखणे हे त्याचे काम होते. हिंदुपदपातशाही करणे हे त्याचे ध्येय होते, तर त्या हेतूच्या सिद्धयर्थ तरी त्याने इकडे लक्ष पुरवावयाचे होते. मुत्सद्देगिरीच्या दृष्टीनेही हिंदी रंगभूमीवर नवी पात्रे तरी न येतील अशी काळजी त्यास घेतली पाहिजे होती. यांपैकी एकही बाब ज्यास सांभाळिता आली नाही त्यास मुत्सद्दी म्हणणे धाष्टर्याचे आहे.

आमच्या या विवेचनाचा तात्त्विक उपयोग आता काहीच नाही हे उघड आहे, पण त्यामुळे वर दिलेली कार्यकारणपरंपरा मात्र खोटी पडत नाही. जर कोणा एका माणसाच्या हातात ही अनर्थपरंपरा मुळातच थांबविण्याचे होते असे मानले, तर ती व्यक्ती निश्चयाने नानासाहेब पेशवा होय असे इतिहास वाचणारास म्हणणे भाग आहे. न्यायाच्या कोर्टात हुषार वकील कदाचित् पेशव्यास या आरोपातून मुक्त करू शकतील, पण ते व्यक्तीवर किती जबाबदारी ठेवावयाची याच मुद्द्यावर. आम्ही वरील सर्व विवेचनात नीतिमत्तेचा मुळीच संबंध आणलेला नाही हे लक्षपूर्वक वाचणारांच्या ध्यानात आले असेलच. कृत्यांची नीतिमत्ता शोधीत बसण्याच्या

भानगडीत न पडता, त्यामुळे इष्ट हेतू सिद्धीस गेला की नाही एवढेच आम्ही पाहतो. नीतीच्या सूक्ष्म विचारात शिरल्यास महाभारत रचावे लागेल. सर्व हिंदुस्थानात हिंदुपदपातशाही स्थापन करणे व त्याचे परकीयांपासून रक्षण करणें ही दोन कर्तव्ये मराठ्यांनी आपल्या शिरावर घेतली होती. अशी पातशाही स्थापन करणे न्याय्य होते किंवा नाही हा प्रश्न वेगळा. ती स्थापन करण्याची खटपट करीत असताना जी बरी वाईट कृत्ये करावयास पाहिजे होती ती पेशव्याने खुशाल करावयाची होती. त्यांची नीतिमत्ता ठरवावयास आम्ही आलो नसतो. त्याने रामराजास राहू दिले अशा स्थितीत राहू देणे न्याय्य होते की काय? दाभाड्याची गुजराथ घेणे न्याय्य होते किंवा कसे? रजपुतांशी सरदारांनी आधी केलेला करार पाळणे योग्य होते किंवा नाही, असल्या प्रश्नांची चौकशी आम्ही करू इच्छित नाही. पण ही सर्व मुभा इष्ट हेतू साध्य होईल तर; जर तो होत नसेल तर त्याच्या सर्व कुळकथेची तपासणी करणे भाग येईल. कारण अपयशाचे कारण शोधताना ते कृत्याच्या अनीतिमत्तेमुळेच बुडालेले आढळणे शक्य आहे. एरवी क्लाइव्हने एक खोटा कागद करून बंगाल घेतला असला तर, नानासाहेबाने दोन खोटे कागद करून तो घ्यावयाचा होता असे आम्ही म्हणू. असा प्रयत्न करीत असतानासुद्धा, अकल्पनीय सृष्टीच्या आपातांनी किंवा एकटा नानासाहेब तेवढा प्रयत्न करीत असता, त्याच्या सांगण्यास न ऐकता बाकीचे सारे हिंदुस्थान इंग्रजांस जाऊन मिळाले म्हणून जर कार्य विफल होते तर वेगळी गोष्ट होईल. पण तसा पुरावा नाही तोपर्यंत, त्या मार्गाने जाणे हेच त्यास कळले नाही किंवा कळूनही त्याने प्रयत्न केला नाही असे समजून त्यावर दोष ठेवणे भाग आहे.

नीति–अनीतींचा विचार करावयाचा तर, आजच्या राष्ट्रीय हक्कांच्या मतांत, मराठ्यांस हिंदुस्थानातील इतर प्रांतांवर स्वाऱ्या करण्यास योग्य कारण होते असे म्हणता येणार नाही. रजपूत, जाट, बुंदेले, फार काय, मुसलमान नवाबाच्या अमलाखाली रहाणारे गरीब बंगाली, या परप्रांतीय हिंदूंचे मत मराठ्यांविषयी अनुकूल नव्हते हे स्पष्ट आहे. 'महाराष्ट्रपुराण' या बंगाली काव्यमय इतिहासाचा कर्ता गंगाराम याने, भास्कर रामाच्या स्वाऱ्यांचे जे वर्णन दिले आहे तें, मराठ्यांच्या लौकिकास भूषणास्पद नाही खास. टॉडने दिलेली रजपुतांवरील स्वाऱ्यांची हकीकतही त्याच मासल्याची आहे. आमच्या मते मराठ्यांस हिंदुस्थान काबीज करण्याचा नैतिक हक्क एकाच गोष्टीने मिळण्यासारखा होता. ती गोष्ट म्हणजे हिंदूंचे हिंदुस्थान यवनाक्रांत झाले होते ते मोकळे करण्याची धार्मिक इच्छा. शिवाजीने अशीच गोब्राह्मणप्रतिपालकाची भूमिका स्वीकारून कार्यास हात घातला. औरंगजेबाच्या कडव्या धर्माभिमानामुळे शिवाजीच्या कार्यास जोरच आला. तशीच परंपरा शिस्तीने व नीतीने चालती तर प्रांतोप्रांती मराठ्यांच्या स्वाऱ्यांस स्थानिक हिंदूंची मदत मिळणे शक्य झाले असते. पण त्यांच्या जागी, 'पुण्याची रक्षता' दूर करण्या-

साठी दक्षिण व उत्तर या दिशांचे 'सुवर्णनदीप्रवाह' आणण्याची कल्पना आल्याबरोबर मराठ्यांचा नैतिक अधःपात झाला व परप्रांतीय स्वधर्मीयसुद्धा त्यांचे शत्रू बनले. हिंदुस्थान मोकळे करीत असता मराठे नीतीने वागते तर त्यास मिळाला त्याहूनही जास्त पैका मिळाला असता. असे तत्कालीन कागदपत्र वाचून आमचे मत झाले आहे. मराठ्यांच्या स्वाऱ्यांनी, ते जिकडे जिकडे गेले त्या ठिकाणच्या समाजाची, आर्थिक घडी विसकटून जात असे. जर मुसलमानांचे राज्य जुलमी होते असे समजावयाचे तर, मराठ्यांचे राज्य त्यांच्या जागी झाल्यावर त्या प्रांताची जास्त भरभराट दिसली पाहिजे होती. तशी ती प्रत्ययास आलेली दिसत नाही. कोणत्याही ठिकाणी परकियांचे राज्य यशस्वी होण्यास त्या परकीयांबद्दल प्रथम अनुकूल वातावरण निर्माण करावे लागते. इंग्रजांनी गेल्या शतकाच्या आरंभी असेच अनुकूल वातावरण हिंदुस्थानात निर्माण केले होते. त्यामुळे त्यांच्या राज्याची घडी चांगली बसून त्यास भरपूर पीक काढता आले. अनुकूल मत निर्माण होण्यास तसेच शिस्तवार चोख वर्तन डोळ्यात तेल घालून राखावे लागते. तशीच त्याबद्दल चळवळसुद्धा करावी लागते. शिवाजीच्या काळी असे चळवळीचे काम रामदासासारख्यांनी केले. त्यामुळे शिवछत्रपतीच्या विभूतिमत्वाचा डांगोरा दिगंती ऐकू गेला. व त्यास साहाय्यक मिळू शकले, राज्यहिताची व संवर्धनाची ही बाजू पेशव्यांच्या डोक्यात शिरली नाही. रामदासासारखे चळवळचे प्रेरक प्रांतोप्रांती पुढे जाते व त्याबरोबरच पेशवे शिवाजीची करडी शिस्त ठेवून वागते, तर यवनाक्रांत हिंदुस्थान सहजच मोकळे होते. मराठे पंजाबात गेले तेव्हा तेथील शीखांची मदत त्यांस अनुकूल करून घेता आली असती. पण हे त्याऐवजी तेथील मुसलमानांचीच मदत घेताना आढळतात. तीच हकीकत रजपूत, जाट, बुंदेले यांशी वागताना घडली. बिजेसिंग, सुरजमल, सभासिंग वगैरे पराक्रमी हिंदुधर्माभिमानी वीरांचे शौर्य मराठ्यांशी लढून विफल झाले. त्याचा कोणासच उपयोग झाला नाही. जयापा, मल्हारराव, प्रभृति आपल्या सरदारांस कोणावर नेऊन सोडावयाचे याची योजना नानासाहेबाच्या मनात आली पाहिजे होती. ती येती तर हिंदूंची तीर्थे व यज्ञभूमी बळकावून बसलेला वजीर सलामत राहून, रजपूत कटून लढून मेले नसते. सारांश, हिंदुपदपातशाहीस पोषक अशी नीती मराठ्यांस सातत्याने राखता आली नाही. तशा कार्यास प्रेरक अशा चळवळीचा मार्ग त्यांनी अवलंबिला नाही व अठराव्या शतकातील अराजकी कालास योग्य असे संयुक्त-सत्तेचे धोरण त्यांनी स्वीकारिले नाही म्हणून त्यांना अपयश आले.

आमचे हे प्रवचन ऐकून कोणी श्रोते असे विचारतील की, काय हो, मग जर आमचे पूर्वज इतके नादान होते तर त्यांनी साम्राज्याचा जो एवढा डोलारा उभारिला तो काय नुसत्या जादूने ? त्याचे उत्तर असे की, आमच्यात काही गुण निश्चित होते. ते म्हणजे शौर्य, हिंमत, डोक्याची तरतरी व उद्योग, पण केवळ याच गुणांवर

राज्य कायम टिकू शकत नाही. शास्त्रज्ञानाशिवाय कोरडी डोक्याची तरतरी कितीशी पुरी पडेल. जर एखाद्या उद्योगी व शूर माणसाने आपणास दुसऱ्या गावास जावयास कोणत्या रस्त्याने गेले पाहिजे याचे ज्ञान करून घेतले नाही तर नुसत्या चालण्याच्या उद्योगाने बहिमतीने तो त्या गावास पोहोचेल काय? की गाव दूर राहून तो एखाद्या रानात शिरेल? आमचे म्हणणे इतकेच की, पेशव्यास नवीन काही कल्पना काढण्याचे श्रेय नाही. सर्व डोक्याचे काम शिवाजीने आखून ठेवले होते त्याच्या जोरावर पेशव्यांनी काही दिवस चालविले एवढीच त्यांची बहाद्दुरी. भालाईत शिलेदार गोळा करून राज्य संपादिता येते हा मार्ग दाखविण्याचे श्रेय शिवाजीस. पेशव्यांनी शिवाजीच्या चौपट असे शिलेदार जमविले असले तरी त्यात नवीन कल्पना किंवा हिंमत नाही. जे एक अजस्र यंत्र शिवाजीने चालू करून दिले त्याचा अंतस्थ जोरच एवढा की, ते काही काळ मूळच्या वेगावरच चालावे. त्यात नवीन वेग उत्पन्न होण्यास जो कोळसा वेळोवेळी पुरविला पाहिजे होता तोही पुरविणे पुढे कोणास शक्य झाले नाही. शिवाजीच्या राज्यापेक्षा पेशवाईवर जास्त संकटे होती असे नाही, पण अशाही काळात अनेक नवीन गोष्टींचा उपक्रम करण्यास शिवाजीस फुरसत झाली. नाही तर राज्यव्यवहार कोश करून व भूषण कवीस आश्रय देऊन शिवाजीचे राज्य वाढत होते अशातला भाग नाही, पण असल्या इष्ट हेतूस पोषक अशा सद्यःफलदायी नसणाऱ्या गोष्टी करण्यातही त्याचा हातखंडा होता. भूषण कवीच्या काव्याने कदाचित एखादा छत्रसाल आपल्यासारख्या कामात पडतो व भाषा हेही राष्ट्रसंवर्धनाचे एक अंग आहे हे शिवाजी समजत होता; पेशव्यांस ते उमजले नाही. ते उमजते तर पेशवाईतील ब्राह्मणभोजनांच्या खर्चात एखादा तरी ताजमहाल उठविण्याची वासना त्यास होती. अजूनही आमच्यात तिळातांदुळाचा संहार करणारी मीमांसामहाविद्यालयेच स्थापन होत आहेत. टाचण्या व सुया यांसारखे नित्योपयोगी पदार्थ करणारे कारखाने निघू शकत नाहीत, त्या अर्थी देशाचे नष्टचर्य संपले नाही हेच खरे. अशा लोकांचा उदय होणे कठीण आहे!

मराठ्यांच्या भराऱ्यांमुळे राष्ट्रावर झालेल्या एका नैतिक दुष्परिणामाचा विचार करून आता हे विवेचन संपवू. जॉन मोर्लेचे असे मत होते की, एकोणिसाव्या शतकात 'दुष्ट संदेशाचा' (evil epistles) प्रसार डार्विन व बिस्मार्क या दोन 'प्रेषित' पुरुषांनी केला. डार्विनच्या उत्क्रांतिवादाने असे ठरविले की, प्राण्याची उत्क्रांती ही केवळ आकस्मिक अज्ञात कारणांवर (accident, chance or luck) अवलंबून असते. त्याचा व्यक्तीच्या प्रयत्नांशी किंवा नैतिक गुणांशी संबंध नाही. उदाहरणार्थ, आपली मनुष्यजात ही वानरजातीपासून उत्क्रांती का पावली व सध्या अस्तित्वात असलेल्या वानर जातीची तशी उत्क्रांती न होता त्या त्याच स्थितीत का कायम राहिल्या, या गोष्टींस कारण नाही. या मोठ्या सिद्धांताचा

गा...११

उपयोग सर्वसाधारण गोष्टीत करू लागले म्हणजे अर्थातच नीतिमत्तेचा पायाच ढासळून पडतो. व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या प्रयत्नांवर व सद्‌गुणांवर जर त्यांची उन्नती अवलंबून नसेल तर कोणासच उद्योग करण्याची व इंद्रियदमनाची जरूर राहणार नाही. कारण उदयोग करूनही उन्नती होते असे थोडेच आहे! बिस्मार्कने राजकीय क्षेत्रात असे ठरविले की, कुटिल नीती, खोटे कागद करणे व पाशवी सामर्थ्य यांवरच राष्ट्राचा उदय होऊ शकतो; अर्थात नीतिमान, उद्योगी, चिमुकल्या व (युद्धदृष्टचा) दुर्बल राष्ट्रांची धडगत नाही. याप्रमाणे जर्मनीचा उदय झाला हे स्पष्टच होते. हिंदुस्थानच्या निराशाप्रधान व दैववादी लोकांवर मराठ्यांच्या अप्रतिहत स्वाऱ्यांनी असाच परिणाम झाला. आपण काय अपराध केला किंवा अमार्गाने गेलो म्हणून ही मराठ्यांची टोळधाड आपल्यावर आली असे त्यांनी समजायचे? एखादया कारागिराने किंवा शेतकऱ्याने आपल्या उदयोगाचे फल क्षणार्धात नष्ट होताना पाहून काय मानावयाचे? आपल्या उदयोगाचे फल आपल्यासच उपभोगावयास सापडेल असा विश्वास नाही तर उदयोग कोण करणार? पाशवी शक्तीशिवाय असा कोणता गुण त्यांस मराठ्यांच्या अंगी दिसत होता? अर्थात सगळीकडे निराशा, दैववाद, मायावाद, अंधश्रद्धा यांचेच साम्राज्य पसरले व या स्थितीत आपले सुव्यवस्थित राज्य स्थापणे इंग्रजांस सोपे झाले. अशा वातावरणाचा राष्ट्रावर असा परिणाम होतो की, ' तुरूत दान, महापुण्य ' ही दृष्टी बोकाळते. दीर्घकाळ सतत उद्योग, राष्ट्राचा भावी उदयकाल होण्यासाठी, आज दृश्य फायदा नसताना करणे, हे कोणासच सुचत नाही. आज खिशात पैसा आहे. खुशाल खावेप्यावे, सिनेमाला जावे, कोणाला ठाऊक आपला जीव मारून पैसा देशकार्याकडे लावून तरी स्वराज्य मिळते आहेसे! सर्व दैवाधीन! काही उद्योग करणे तोही सद्यःफलदायी करावा. परसात मेथीची भाजी पेरावी. पंधरा दिवसांत होते. अक्रोडाचे झाड लावून चाळीस वर्षे वाट कोणी पहावी? आणि मध्येच झाड कीड लागून मेले तर, वाऱ्याने मोडले तर, कोणी लाकूड तोडून नेले तर, वांझच निपजले तर, कडू निघाले तर, आपण जगलो तर, जमीन आपल्या ताब्यात राहिली तर, अशा किती तरी ' तरी ' मध्ये राहातात. शंभर वर्षे वाचू या विचाराने वागावे कोणी? त्यापेक्षा दहाव्या वर्षी लग्न, सत्राव्या वर्षी मूल, तिसाव्या वर्षी नातवंड, चाळिसाव्या वर्षी अक्रोडाला फळ येण्यापूर्वीच पूर्वजांच्या मार्गे जावे. अशा विचारसरणीने कोणत्याही राष्ट्राचा उदय होत नसतो एवढे मात्र खरे. अशा राष्ट्राने नेहमी मेथीची भाजीच खात रहावे; त्यांच्या वाट्यास अक्रोड कधी येणे नाही.

नानासाहेबांच्या चरित्रातील बहुतेक बाबींचे विवेचन येथवर केले. त्यावरून असे दिसून आले की, त्या पुरुषाच्या अंगी पहिल्या प्रतीचा असा गुण नव्हता. मराठेशाहीत शिवाजीच्या खालोखाल त्याचा अनुक्रम लागतो किंवा न लागतो हा प्रश्न गौण आहे. ज्या वर्गात भास्कराचार्यासारखा एखादा बृहस्पती असतो, त्या वर्गात

दुसऱ्या कोणातरी मुलाचा दुसरा नंबर लागतच असतो. पण त्यावरून त्यास पहिल्या व दुसऱ्या नंबरचे विद्यार्थी ठरवणे योग्य नाही. हजारो शाळांतून एखादा भास्कराचार्य असतो, बाकी पहिले व दुसरे नंबर कोणाचे तरी लावतातच. वास्तविक शिवाजी व नानासाहेब हे वेगळ्या जातीचेच पुरुष समजावयाचे. हजारो तारकांची बेरीज करून एक तमोनाशक चंद्र तयार होत नाही किंवा हजारो परप्रकाशित चंद्रांचा गोळा करून एक सूर्य होत नाही. नानासाहेब हा असा एक चंद्र होता. पण त्याचे सर्व गुण त्यास मिळालेल्या पदावर अवलंबून होते. तसे पद न मिळते तर हैदर, रणजीतसिंग किंवा क्लाइव यांप्रमाणे शिपाईगिरीची नोकरी पत्करून उदय करून घेण्यासारखा तो पुरुष नव्हता. त्याचा– ' सरदारीने काम करावे, जातिनिशी वाया जाऊ नये ' हा युद्धशास्त्रदृष्टचा फार उपयुक्त नियम होता. पण जातीनिशी काम न करणारा कोणीही माणूस काळोखातून उजेडात येत नाही हे तेवढेच खरे आहे. आपल्या कार्यास अनुकूल वातावरण नसूनही ते निर्माण करणे, समाजाच्या पुढे दृष्टी पोहोचणे, जगाचे विस्तृत ज्ञान असणे, ज्ञानाचा उपयोग करून घेण्याची तयारी ठेवणे वगैरे वगैरे महापुरुषास आवश्यक गुणांपैकी एकही त्याजवळ नव्हता. हिंदुस्थानच्या राजकीय पटाचेही त्यास आकलन झाले नाही. आधी कोठले काम हाती घ्यावे, मग कोठले घ्यावे, हेही त्यास कळले नाही. इंग्रज प्रभृतींची पारख त्यास होऊ शकली नाही. हिंदूपदपातशाहीस पोषक काय याचा विचार त्यास शिवला नाही. राष्ट्राच्या उन्नतीस आवश्यक काय हे त्याने पाहिले नाही. अशा सर्व गोष्टींचा विचार करता त्याच्याबद्दल वर प्रदर्शित केलेले मत फारसे चुकले नसावे असे वाटते.

आमचे पुराण संपले. यातील सर्वच मते कोणास पसंत पडावी अशी आमची अपेक्षा नाही. आपण जर भरमसाट आपल्या पूर्वजांस मूर्ख ठरवीत गेलो तर त्यांचा इतिहास वाचील कोण अशी सकारण शंका पुष्कळांस येते. आमचे त्यावर म्हणणे असे की, दोष झाकून लिहिलेल्या इतिहासाच्या वाचनाचा उपयोग नाही. आम्ही इतिहास ही करमणूक समजत नसून उपयुक्त व आवश्यक असे एक शास्त्र समजतो. नाटके, कादंबऱ्या, काव्ये वगैरे करमणुकीचे दुसरे मार्ग मोकळे आहेत. तेव्हा केवळ करमणुकीसाठी व वडिलांच्या कीर्तीवर मिशांस पीळ देणाऱ्यांकरता इतिहास नाही. असे वाचक गळले तरी त्यापासून राष्ट्राचे कोणते अहित होणार आहे ? आमच्या या लेखनाने वाचकांच्या विचारांना चलन देण्याचे कार्य घडले तरी पुष्कळ असे आम्ही समजू व तसे झाल्यास त्याबद्दल त्यांनी ग्रंथकार सरदेसाई यांचे आभार मानावे; कारण त्यांच्या इच्छेखेरीज आमच्या हातून काही लिहिले जाण्याचा मुळीच संभव नव्हता.

त्र्यंबक शंकर शेजवलकर

# जोसेफ मॅझिनी

## आत्मचरित्र नि राजकारण

भाषांतर

**विनायक दामोदर सावरकर**

प्रथमावृत्ती १९०७ व्हीनस बुक स्टॉल, पुणे ३० मूळ प्रस्तावना
द्वि. आवृत्ती १९४६ मूल्य ५ रु. २६ पृष्ठे

सशस्त्र क्रांतिकारकांचे मुकुटमणी, अंदमानी कारावास भोगणारे त्यागी देशभक्त, हिंदुत्वाचे बुद्धिवादी कैवारी, ओजस्वी कवी, तेजस्वी निबंध-प्रबंधकार, प्रभावी वक्ते इ. अनेक पैलू असणारा स्वातंत्र्यवीर **बॅ. विनायक दामोदर सावरकर** ( २८ मे १८८३ ते २६ फे. १९६६ ) हा भारतीय कीर्तीचा महापुरुष होता. ऐन तारुण्यात इंग्लंडात राहून त्याने फ्रेंच, रशियन, इटालियन राज्यक्रांत्यांचा अभ्यास केला. त्या अभ्यासातून प्रेरणा घेऊन 'जोसेफ मॅझिनी : आत्मचरित्र आणि राजकारण' हा भाषांतरीत ग्रंथ त्यांनी लिहिला. पण मूळ ग्रंथापेक्षा त्याला सावरकरांनी लिहिलेली स्फूर्तिशाली, दाहक, सशस्त्र क्रांतीचे तत्त्वज्ञान सांगणारी, नव्हे तिला उद्युक्त करणारी प्रस्तावनाच विशेष गाजली. त्या प्रस्तावनेतील ही पहिली १९ पृष्ठे पुरेशी बोलकी आहेत. ( + शेवटचे एक वाक्य )

शास्त्रांची प्रमेये ही कालदेशांनी मर्यादित नसतात. भूमितीचे सिद्धांत हे ग्रीसमध्ये जितके सत्य आहेत तितकेच ते हिंदुस्थानातही आहेत व ते युक्लिडच्या काळी जितके यथार्थ होते तितकेच आजही आहेत. मानवी जातीचे विस्तृत क्षेत्र व कालाची अनंतता ध्यानात घेऊन त्यांच्या अनुरोधाने बसविलेले जे सिद्धान्त असतात ते सर्व काली व सर्व मनुष्यांना सारखेच लागू आहेत. असले सर्वसाधारण सिद्धान्त पठन करणे व त्यांचा आपल्या स्वतःचे उन्नतीसाठी उपयोग करणे हे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक मनुष्य मागच्या इतिहासाचा व अनुभवाचा फायदा न घेता मनुष्यजातीने आरंभी केलेल्या चुका पुन्हा करू लागल्यास मानवी उत्क्रांती खुंटली असेच म्हणावे लागेल. मनुष्य जातीने जे प्रश्न सोडवून ठेविले आहेत ते पुन्हा सोडविण्यात काल व्यर्थ घालविण्यापेक्षा त्या प्रश्नांची कालदेशांनी अमर्यादित अशी उत्तरे जी अनेक तत्त्ववेत्त्यांनी सिद्धांतरूपाने ग्रथित केलेली आहेत, ती समजावून घेऊन ज्या प्रश्नांची उत्तरे मनुष्यजातीला अजून मिळाली नाहीत ते प्रश्न सोडविण्यात तो काल घालविणे हेच श्रेयस्कर आहे. मानवी उत्क्रांती सुलभ करण्यासाठी तत्त्ववेत्त्यांनी जगाचा आजपर्यंतचा अनुभव व्यर्थ न जाऊ देता त्याचे सूक्ष्म परीक्षण करून सर्वव्यापी तत्त्वे सिद्ध केलेली आहेत. ज्योतिषशास्त्र, भूमितीशास्त्र, रसायनशास्त्र वगैरे शास्त्रांची आज जी रूपे दिसत आहेत ती मनुष्यांच्या निरनिराळ्या अनुभवावरून सर्वमान्य ठरलेली तत्त्वे संग्रहित केल्यानेच शक्य झालेली आहेत. त्या शास्त्रातील ती सर्वव्यापी तत्त्वे सर्व देशांना व सर्व काली लागू होणारी असल्याने त्यांचा फायदा मुद्दाम करून न घेता पुन्हा 'पहिले पाढे पढ पंचावन' करीत बसणे हा मूर्खपणाचा कळस आहे. ही गोष्ट जशी ज्योतिषशास्त्र, भूमितीशास्त्र व रसायनशास्त्र वगैरेंना लागू आहे, तशीच ती राजकारणशास्त्रालाही लागू आहे. राजकारणशास्त्राची उत्क्रांती मनुष्याच्या प्रगमनाबरोबरच होत आलेली आहे. राजकारणशास्त्रातही इतर शास्त्रसत्यांप्रमाणेच काही तत्त्वे कालदेशाने अमर्यादित अशा महत् सत्यांच्या योग्यतेला पावलेली आहेत. त्या सत्याचे ज्ञान असणे, मनुष्यजातीच्या आजपर्यंतच्या अनुभवाचा फायदा घेणे, भूतकालाच्या यष्टीचा भविष्यन्मार्गगमनास आधार घेणे व 'इतिहासप्रदिपेन मोहावरणघातिना लोकगर्भ-गृहं कृत्स्नं यथावत्' संप्रकाशित करण्यास तत्पर होणे हे अत्यंत श्रेयस्कर आहे. इतर राष्ट्रांनी अनेक शतके त्रास सोसून व अनेक देहांचे बळी देऊन जी महत् तत्त्वे शोधून काढली आहेत त्यांचा उपयोग न करून घेता जर एखादा देश अज्ञानात जाणूनबुजून चाचपडत राहत असेल तर ह्या राष्ट्रीय आंधळेपणाबद्दल त्यास परिणामी भयंकर पश्चात्ताप झाल्याशिवाय राहणार नाही. आग लागली असता त्यावर पाणी ओतावे हे सर्वमान्य तत्त्व मुद्दाम फेटाळून त्या आगीवर घृताचा वर्षाव करून ती विझते की नाही म्हणून धिमेपणाने प्रयत्न करणाऱ्या पढतमूर्खाला त्या आगीच्या डोंबात दग्ध होण्याशिवाय दुसरे काय बक्षिस मिळणार आहे ? अशी स्थिती माझ्या प्रिय आर्यभूमीची होऊ

नये म्हणून माझ्या तरुण देशबंधूंनी राजकारणातील अंतिम सत्ये व महत् सिद्धांत शिकावे अशी माझी उत्कट इच्छा आहे. ही सत्ये शिकण्यास राजकारणशास्त्रात ज्यांनी अग्रेसरत्व मिळविले आहे त्यांच्या उपदेशामृताच्या प्राशनाशिवाय दुसरा उत्तम मार्ग नाही; व राजकारणशास्त्रात ज्यांनी अग्रेसरत्व मिळविले आहे, अशा तत्त्ववेत्त्यांमध्ये महाभाग मॅझिनीशिवाय तरुण राष्ट्रभक्तांना उत्साहक, दिव्य, प्रेमळ व उदात्त अशा राष्ट्रमंत्रांची दीक्षा देण्यास कोणता गुरू सापडणार आहे ?

'नाही, नाही, राष्ट्रे कधीही मरत नाहीत. परमेश्वर गांजलेल्यांचा कैवारी आहे. त्याने मनुष्याला स्वातंत्र्यात राहण्यासाठी उत्पन्न केले आहे. तुम्ही मनात आणा की तुमचा देश स्वतंत्र झालाच !' याहून अधिक उत्साहक असा दुसरा कोणचा राष्ट्र-मंत्र आहे ? 'एकदा मनुष्याने असा निश्चय केला की मी स्वातत्र्य, स्वदेश व मानव्य यावर भक्ती करितो की मग त्याने स्वातंत्र्यासाठी, स्वदेशासाठी व मानव्या-साठी लढलेच पाहिजे, अखंड लढले पाहिजे, सर्व आयुष्यभर लढले पाहिजे, शक्य त्या त्या शस्त्राने लढले पाहिजे, तिरस्कारापासून तो मरणापर्यंत सर्व संकटे तुच्छ मानिली पाहिजेत, द्वेषाला व नींदेला तोंड दिले पाहिजे, दुसऱ्या कोणच्याही फलाची आकांक्षा न करिता फक्त कर्तव्य म्हणून त्याने तत्पर झाले पाहिजे !' याहून अधिक दिव्य असा दुसरा कोणचा राष्ट्रमंत्र आहे ? 'प्रीती करा, तरुणहो, प्रीती करा, मनुष्याला परमेश्वराकडे नेणारी प्रीती ही सोपानपरंपरा आहे. कुटुंबावर प्रीती करा, स्वदेशावर प्रीती करा. तरुण हो, मनुष्य जातीवर प्रीती करा !' याहून अधिक प्रेमळ असा दुसरा कोणचा राष्ट्रमंत्र आहे ? व 'नुसती इटली स्वतंत्र होऊन काय उपयोग ! आपण स्वतंत्र होताच दुसऱ्यांना स्वतंत्र केले पाहिजे.' याहून अधिक उदात्त असा दुसरा कोणचा राष्ट्रमंत्र आहे ? अशा या राष्ट्रीय मंत्राचा मंत्रद्रष्टा जो इटलीचा स्वातंत्र्यदाता देशभक्त मॅझिनी त्याचे आत्मचरित्र व काही राजकीय लेख यांचे भाषांतर या ठिकाणी केले जात आहे. या लेखांनी दोन कोटी लोकांना चैतन्य आले. या लेखांचे पाणी ग्यॅरिबाल्डीच्या तरवारीवर झळकत होते. या लेखांनी युरोपची सिंहासने उलथीच्या पालथी केलेली आहेत. या लेखांनी इटली देश स्वतंत्र झाला आहे. व सर्व परतंत्र देशांना स्वातंत्र्य देण्याचे सामर्थ्य या लेखां-मध्ये भरलेले आहे ! मॅझिनीने ही तत्त्वे केवळ इटलीकरिताच सांगितलेली नाहीत. इटली निमित्तमात्र असून ही राजकारणशास्त्रातील महत्सत्ये त्या महात्म्याने सर्व मनुष्यजातीसाठी प्रकट केलेली आहेत. हा स्वातंत्र्यसुधेचा मेवा सर्व संतप्त भूमिकांकडे वळला आहे, चातकांनो, ही संधी साधून आपापल्या तृषा भागवून घेणे हे आता तुमच्या हाती आहे !

यापेक्षा मॅझिनीचे लेखांची प्रस्तावना मी पामर जास्त ती काय लिहिणार ? तथापि या पुस्तकात त्याचे निवडक लेख तुटक रीतीने भाषांतर केलेले असल्याने मॅझिनीच्या सर्व मतांची बरोबर साखळी जुळविणे हे जरा अवघड जाणार आहे.

एतदर्थ या महात्म्याच्या राजकीय मतांची दिग्दर्शना होईल तितकी त्याच्याच वाक्यात गुंफून संक्षिप्त साररूपाने तयार केली असता ती समजण्याला सुलभ पडेल अशा आशेने मी तसे करण्याचा प्रयत्न करीत आहे.

जगामध्ये आजपर्यंत जेवढ्या राज्यक्रांत्या झाल्या त्या सर्वांहून इटलीच्या राज्यक्रांतीत उदात्त वृत्तीचा कळस झालेला आहे. स्वदेशाभिमानाची ज्योत इतकी प्रज्वलीत झालेली होती, प्रत्येक देशभक्त व्यक्तिविषयक सुखाबद्दल इतका उदासीन होता, स्वदेशासाठी सर्वस्व वाहण्याची इतकी चढाओढ सुरू होती, परक्या सत्तेकडून हे चैतन्य दाबून टाकण्यासाठी इतके भयंकर जुलूम करण्यात येत होते, त्या जुलुमात देशभक्तांचे तांडे चिरडले जात असताही प्रत्येक वर्षी लोकक्षोभाची उसळी इतकी विलक्षण व निधड्या छातीची होत होती व अखेर साठ वर्षांवर लढून लढून देशवीरांनी इतक्या चिकाटीने यश मिळविले की, या सर्व महत्कृत्यांनी व महनीय नरमण्यांनी अलंकृत अशी दुसरी राज्यक्रांती आजपर्यंत झालेली नाही, असे इतिहासास कबूल करावे लागते. या इटलीच्या राज्यक्रांतीत सद्‌गुणांचा जो इतका उत्कर्ष झाला याचे मुख्य कारण हे आहे की, ती राज्यक्रांती ही व्यक्तीसाठी, लोभासाठी किंवा त्वेषासाठी झालेली नसून तिचा पाया अत्यंत उन्नत अशा महत्तत्त्वांवर रचलेला होता. 'मोठाल्या क्रांत्या ह्या तरवारीपेक्षा तत्त्वांनीच घडवून आणलेल्या असतात.' तरवारीशिवाय तत्त्वांचा जय होत नाही ही दुःखाची गोष्ट आहे व म्हणून इटलीने तरवार उपसली. परंतु ' त्या तरवारीचे अग्रभागी जर सत्याचे अधिष्ठान नसते तर त्या तरवारीला तिने स्पर्शही केला नसता.' ज्या तत्त्वांवर या पवित्र स्वातंत्र्ययुद्धाचा पाया रचला होता ती तत्त्वे प्रथमतः मॅझिनीने इटलीस शिकविली. इटलीच्यासाठी लढलेल्या देशभक्तांमध्ये मॅझिनीच्या 'तरुण इटलीत' ज्यांनी शिक्षण घेतले नव्हते असे लोक फारच थोडे होते. ह्या तत्त्वविचारात व इतर राजकारणपटु कारस्थान्यांच्या उपदेशात एक महत्त्वाचा भेद आहे. मॅझिनीचे राजकारण हे केवळ ऐहिक व स्वार्थप्रवृत्तीचे नव्हते. तसे असते तर त्या राजकारणाने प्रवृत्त झालेल्या देशवीरांचे अंतःकरणात इतक्या उदात्त वृत्तीचा उदय झाला नसता. मॅझिनीचे राजकारण हे प्रवृत्ती व निवृत्ती ह्यांचे एकीकरण होते. त्याच्या राजकारणाची इमारत ही नीतीच्या पायावर उभारलेली होती. हे सिद्ध केल्याने त्यावेळपर्यंत राजकारणाची थोर पुरुषांकडून जी अवहेलना होत असे ती नष्ट झाली. राजकारण हे स्वार्थाचे व अप्पलपोटेपणाचे शास्त्र आहे व यात जो बळी तो कानपिळी या पशुवृत्तीचाच अंमल आहे अशी सर्वत्र समजूत असल्याने या राजकारणाचा साधुपुरुषांना तिटकारा येणे साहजिक होते. दुसऱ्याच्या देशावर घाला घालणे, त्याचे स्वातंत्र्य लुबाडून घेणे, हे जर राजकारण असेल–तोपर्यंत व अजूनही ते बहुतेक राष्ट्रांकडून तसेच आहे असे मानण्यात येते–तर मग त्या राजकारणात व नरकात भेद कोठे राहिला ? मॅझिनीने राजकारणास या नरकगामी कल्पनेपासून मुक्त

केले. राजकारण हे परमेश्वरी कर्तव्य आहे असे त्याने स्पष्ट रीतीने सिद्ध केले. प्रवृत्ती व निवृत्ती ही दोन परस्परविरोधी तत्त्वे नसून ती एकाच मार्गाच्या दोन भिन्न भागांची नावे आहेत असे त्याने प्रतिपादन केले.

'नाही, स्वर्ग व पृथ्वी यांच्यामध्ये विरोध आहे किंवा ती भिन्न आहेत हे सत्य नाही. नाही, स्वर्गात सत्य व न्याय्यांचे ईश्वरी राज्य चालावे व पृथ्वीवर असत्य व अन्याय्य यांचा अंमल चालावा हे खरे नाही. पृथ्वी ही स्वर्गाची शिडी आहे.' राजकारणाला स्वार्थपरायणतेचे हिडिस स्वरूप देणाऱ्या लोकांची चुकी अशा रीतीने उघडकीस आणून मग मॅझिनीने फाजिल धर्माभिमान्यांचा समाचार घेतला आहे. धर्माने राजकारणात लक्ष घालणे अवश्य आहे इतकेच नव्हे तर ते त्याचे कर्तव्य आहे. राजकारण म्हणजे समाजाची, स्वदेशाची व स्वराष्ट्राची दास्यमोचना व संवर्धना होय. तिकडे दुर्लक्ष करणे म्हणजे मनुष्यजातीवर आलेले भयंकर संकट निमूटपणे पहाण्याचे अक्षम्य पातक करणे होय. धर्माची खरी व्याख्या म्हणजे मनुष्यमात्राचे धारण करणे ही होय. मनुष्यमात्र दास्यपंकात किंवा अनीतीत पिचत असता आपण तेवढे स्वतःस मुक्त करून घेऊ ही समजूत ढोंगीपणाची आहे. भूतदयेशिवाय स्वतःच्या मुक्तीला दुसरा मार्ग नाही 'तुमची जेव्हा चौकशी होईल तेव्हा परमेश्वर तुम्हाला असे विचारणार नाही की, 'तुम्ही स्वतःच्या कल्याणासाठी काय केलेत?' तर तो तुम्हाला असेच विचारणार आहे की, 'तुम्ही भूतमात्रांच्या कल्याणाकरिता काय केले आहे? मी जे स्वदेशबंधू तुम्हाला दिले त्यांच्या कल्याणाकरिता काय केले आहे?' हे भूतमात्राचे अंतिम कल्याण करण्यासाठी, त्यांची ज्ञानाने व पावित्र्याने आत्मोन्नति होण्यासाठी व त्यांना सत्कृत्ये करण्यास सामर्थ्य येण्यासाठी पहिली अत्यंत अवश्यक गोष्ट म्हटली म्हणजे त्यांचे दास्यविमोचन करणे–त्यास स्वातंत्र्य मिळवून देणे–ही होय. जोपर्यंत एखाद्या व्यक्तीला तुरुंगात बांधून टाकिले आहे तोपर्यन्त, तिच्या हातून सत्कृत्ये घडणे व प्रगमन होणे हे जितके अशक्य आहे तितकेच जोपर्यंत एखादा देश राजकीय पारतंत्र्यात खिळून टाकलेला आहे तोपर्यंत त्याच्या हातून मानवी प्रगमनाला मदत होणे हे अशक्य आहे. अशा स्थितीत, 'आपण सर्वजण एकमेकांच्या मुक्ततेबद्दल जबाबदार आहोत. जर आपण आपल्या इतर मानवी बंधूस परवशतेत व अज्ञानात तसेच पडू देऊ, तर परमेश्वराचा द्रोह केल्याचे महत्पाप आपल्या माथी बसेल. स्वतःची उन्नती व मुक्तता करण्याचा एकच मार्ग आहे, व तो सर्वांना मुक्ती मिळेल असा प्रयत्न करणे हा होय.' आपण ज्या देशात जन्मलो व ज्या देशाचे अन्न खाल्ले त्याचे कर्ज फेडल्याशिवाय आपणास स्वर्गाची दारे खुली होणार नाहीत. हे व्यक्तिविषयक मोक्षासाठी धडपडणाऱ्या ढोंगी साधूस किंवा भ्रमिष्ट धर्माभिमान्यास कळले पाहिजे.

'भूतांची दया हे भांडवल संता। आपुल्या ममता नाही देही ।।
तुका म्हणे सुख पराचिया सुखे। अमृत हे मुखे स्रवतसे ।। '

हे खरे धर्मरहस्य होय. व म्हणून धर्माभिमान्यांस व धर्मोपदेशकांस मॅझिनी विचारतो, 'अहो धर्माधिकारी हो, तुमचाही जन्म या भूमीतच झाला नाही काय? तुम्हालाही या भूमिनेच पोसले नाही काय? हिच्याच दुधावर तुम्ही वाढला नाही काय? मग ती जुलुमाखाली चिरडत असता तुम्ही स्वस्थ बसून स्वर्गात कसे चढाल? तुम्हाला देश नाही काय? तुम्हांला भूतदया नाही काय? तुमच्या या कृतघ्नतेने तुम्ही पापी ठरत आहा. धर्म हा आता तुमच्या छावणीत नसून तो आमच्या छावणीत आलेला आहे. बायबलमध्ये स्वातंत्र्य पवित्र मानले नाही काय? व तुमचा देश पारतंत्र्याने अपवित्र झालेला नाही काय? मग सर्वत्र स्वातंत्र्य नांदावे, मनुष्यातील द्वेषभाव नष्ट व्हावा, धर्माचा खरा जयजयकार व्हावा, अशी जर तुमची खरी इच्छा असेल तर तुम्ही आम्हास मिळा.' अशा रीतीने धर्म हा राजकारणाचा विरोधी नाही हे मॅझिनींने आपल्या अधिकारयुक्त वाणीने प्रतिपादन केले. तो स्वतःच एक ठिकाणी म्हणतो की, 'राजकारणाला आम्ही धर्माच्या उच्चतेप्रत नेले.' जे कारस्थानपटू धर्माचा व नीतीचा धिक्कार करून राजकारणाला धर्म नाही म्हणून म्हणत होते व जे धर्मपटू राजकीय स्थितीकडे दुर्लक्ष करून धर्माला राजकारण नाही म्हणून म्हणत होते त्या दोन्ही पक्षांचे अपराध व दोष उघडकीस आणून, 'आयुष्यात भिन्नता नाही, आयुष्य एकरूप आहे. परमेश्वराच्या आज्ञा परस्परविरोधी नाहीत. परमेश्वरी आज्ञा एकच आहे व ती सर्वांना सारखी लागू आहे.' अशा पवित्र व उदात्त तत्त्वाचा मॅझिनीने उच्चार केला. राज्यक्रांतिकारक पुढाऱ्यांत नीती व धर्म यांच्या पावित्र्यातून ज्याला राज्यक्रांतीची स्फूर्ती मिळाली आहे असा महात्मा मॅझिनीशिवाय अन्यत्र सापडणे हे यूरोपच्या इतिहासात दुर्लभ आहे. हे मॅझिनीचे विशिष्ट कर्तृत्व आहे. त्याच्या उपदेशाने प्रवृत्त झालेल्या तत्कालीन इटालियन देशवीरांच्या आयुष्यात जो उदात्तपणा आणि जे पावनत्व दिसून येते ते सर्व वरील नीतितत्त्वाचे फल आहे. स्वार्थासाठी नव्हे तर परमेश्वरी कर्तव्य म्हणून स्वदेश स्वतंत्र करण्यास जे देशवीर तयार होतात त्यांच्या तरवारीपुढे ऑस्ट्रियाच काय, पण गर्वाने मदांध झालेला वाटेल तो देश चळचळ कापू लागेल. जर सर्व लोकांची मने राजकारण व धर्म हे एकरूपच आहेत अशा पूत निष्ठेने उद्युक्त होतील तर या जगात पारतंत्र्याचे नावदेखील उरणार नाही. **राजकारणाला धर्म आहे व धर्माला राजकारण आहे**, हे महत् सत्य, हे कालदेशाबाधित सत्य, हे परमेश्वरी सत्य ओळखून 'जर माझ्या प्रिय देशभूमीचे दोन कोटी लोक आता स्वातंत्र्य मिळवावयाचेच' असे म्हणून उठले तर त्यांना एक ऑस्ट्रिया तर काय पण असे तीन ऑस्ट्रिया एकत्र झाले तरी त्यांचा उच्छेद करून आपले स्वातंत्र्य परत मिळविता येईल!' दोन कोटी देशबंधूंवरच त्या महात्म्याची

ही केवढी उडी ! मग जर त्या देशाची लोकसंख्या याहून दहा पाच पट असती व त्याचा शत्रू जर ऑस्ट्रिया एवढाच असता तर त्याने स्वदेशस्वातंत्र्य मिळवावयास एक क्षणही लागू दिला नसता ! मर्दाची गोष्ट अशीच आहे. धर्म व स्वराज्य या तत्त्वद्वयाची एकरूपता मॅझिनीचे शब्दात ऐकिल्यावर कोणाही महाराष्ट्रीयाला महाराष्ट्राच्या मॅझिनीची आठवण झाल्यावाचून राहणार नाही. सत्पुरुष हे परमेश्वराच्या अंशाने संभूत झालेले असल्याने त्यांचे आत्मे हे भिन्न नसतात व म्हणूनच त्यांचे विचारही परस्परांशी विसंगत होत नाहीत. निरनिराळ्या देशातील त्यांची नावे तेवढी वेगळी, बाकी तत्त्व एकच. इटलीमध्ये जन्मलेल्या रामदासांना मॅझिनी म्हणतात व हिंदुस्थानात जन्मलेल्या मॅझिनीला रामदास म्हणतात. बाकी दोघेही एकच तत्त्व सांगतात की, राजकारण धार्मिक असेल तरच पवित्र आहे व धर्म राजकीय असेल तरच तो पवित्र आहे. 'अमका मनुष्य धार्मिक आहे असे मला कळताच मी पहिला प्रश्न हा विचारीन की, त्याने लोकांच्या मुक्ततेसाठी काय केले आहे व काय सोसले आहे ? अमका 'मनुष्य' आहे असे कळताच मी पहिला प्रश्न हा विचारीन की तो गुलाम आहे काय ? कारण जो गुलामगिरीत स्वस्थ रहातो तो मनुष्य नसून ती नुसती जड माती आहे !'

राजकारणाला स्वार्थलंपटतेच्या तावडीतून सोडवून त्याला ईश्वरी कर्तव्याचे उच्च स्वरूप दिल्यानंतर मग अर्थातच त्या कर्तव्यासाठी प्रत्येक मनुष्याने कशा रीतीने उद्योग करावा हे सांगणे प्राप्त होते. मॅझिनीची कर्तव्यमीमांसा फारच उदात्त तत्त्वांवर रचलेली आहे, परंतु येथे मी त्या महात्म्याच्या राजकीय मतांचीच साखळी देण्याचा प्रयत्न करीत असल्याने त्या मीमांसेचे यथास्थित विवेचन करणे शक्य नाही. मॅझिनीच्या 'मानवी कर्तव्ये' या नावाच्या अत्यंत चटकदार निबंधाचे भाषांतर करण्याचा हेतू आहे. तो जर सफल झाला तर ही कर्तव्यमीमांसा केवळ मराठी वाचकांना मॅझिनीचे शब्दातूनच वाचावयास मिळेल. येथे इतके सांगितले म्हणजे पुरे आहे की, जे कर्तव्य म्हणून ठरत असेल ते मनुष्याने वाटेल ते संकट आले तरी पार पाडलेच पाहिजे, असे मॅझिनीचे मत आहे. '**कर्तव्यासाठी कर्तव्य करा.** कर्तव्याच्या तत्त्वाने आत्मार्पणाचे सामर्थ्य येते. ह्या उदात्त कल्पनेने आत्मा परमेश्वराच्या रूपात लीन होतो. या कर्तव्यनिष्ठेने मनुष्याच्या अंगात विलक्षण चैतन्य येते. मनुष्य अचाट कर्मे करू शकतो. या कर्तव्याच्या फलाशाविरहित निष्ठेने देशवीरांच्या फाशीचे खांब हे स्वर्गाकडे नेणारे जिने होतात.' आयुष्य हे सुखलंपटतेत न घालविता ते कर्तव्यलंपटतेत घालवावे. '**आयुष्य हे चैन नसून आयुष्य हे कर्तव्य आहे.**' राजकारणातील अगदी प्रथम आधारभूत कर्तव्य म्हटले म्हणजे स्वदेश-स्वातंत्र्य हे होय. मनुष्यजाती, स्वदेश, कुटुंब व व्यक्ती अशा पायरीने मनुष्यांची कर्तव्यतारतम्यता आहे. या परंपरेच्या वाटचाला जी राजकीय कर्तव्ये आली आहेत त्यामध्ये स्वदेशस्वातंत्र्य हे प्रधान कर्तव्य आहेच आहे, परंतु

राजकीय कर्तव्यासाठीच केवळ नव्हे तर इतर सर्व कर्तव्य मनुष्याकडून यथास्थित रीतीने पार पाडण्यास स्वदेशस्वातंत्र्य आधी मिळविले पाहिजे. व्यक्तीची किंवा कुटुंबांची कर्तव्ये जर त्यांच्या स्वदेशपारतंत्र्यात असतील तर कधीही यथास्थित चालावयाची नाहीत. लोकांत असत्य व दारिद्र्य माजून तो देश भ्याड व कमकुवत होतो त्या देशाला ज्ञान देणे अशक्य होते. 'जेथे शिकण्यास दारिद्र्याने वेळ मिळत नाही. तेथे नुसत्या शाळा उघडून काय होणार ?' या राजकीय पारतंत्र्याने देशातील व्यक्ती व कुटुंब यांचीच वाढ खुंटते असे नाही, तर मनुष्य जातीची वाढही तितक्या प्रमाणाने खुरटत जाते. प्रत्येक देशाला मनुष्य जातीच्या उत्क्रांतीत भर टाकण्यासाठी एक विशिष्ट कामगिरी सांगितलेली असते. परंतु पारतंत्र्यामुळे तो देशच अस्तित्वात आहे असे म्हणता येत नसल्याने त्याच्या वाटचाला आलेले कर्तव्य त्या देशाकडून घडणे अशक्य होते व म्हणून तितक्या मानाने मनुष्य जातीची उन्नती अडकून राहते. सर्व देशाची उन्नती म्हणजे मानव्याची उन्नती. परंतु जोवर पारतंत्र्याने काही देश नीचतेला खिळून टाकलेले आहेत तोवर मानव्य उन्नतीला जाणार कसे ? **म्हणून व्यक्तीच्या, कुटुंबाच्या, समाजाच्या आणि मनुष्य जातीच्या सर्व प्रकारच्या उन्नतीचे मुख्य साधन जे राजकीय स्वातंत्र्य ते संपादन व संरक्षण करणे हे प्रथम कर्तव्य होय.** ही परमेश्वराची आज्ञा होय– ही धर्माची आज्ञा होय.

परंतु हे राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचे कर्तव्य पार पाडण्यास मार्ग कोणचा योजावा ? त्या वेळेस इटलीची स्थिती अशी होती की, तिचे स्वामित्व ऑस्ट्रियाकडे गेलेले आहे. पंचाहत्तर हजार ऑस्ट्रियन शिपाई इटलीवर राज्य करीत आहेत. पारतंत्र्याचे दुःख, दारिद्र्य व अज्ञानादिक परिणाम घडून आलेले आहेत. व्हेनिस आणि मिलन वगैरे व्यापारात पूर्वी अत्यंत नाणावलेल्या प्रांतातील लोकांस खावयाला मिळत नाही. शिक्षण परक्यांच्या हाती, व्यापार परक्यांच्या हाती, जीवन परक्यांच्या हाती, स्वातंत्र्य परक्यांचे हाती. इटली हा गुलामांचा बाजार बनला होता. तेथे जी काही थोडीबहुत नेटिव संस्थाने होती ती ऑस्ट्रियाच्या ताटाखालची मांजरे बनली होती. 'इटलीचे नाव पुसून गेले होते. इटलीचे निशाण फाटून गेले होते.' 'ज्या रोमने दोन वेळा सर्व जगाचे पुढारीपण स्वीकारले होते ते रोम मेले आहे ! इटली हा एक भला थोरला तुरुंग बनला आहे आणि त्यावर ऑस्ट्रियन शिपायांचा पहारा बसलेला आहे' इटलीत शांतता आहे, 'परंतु ती शांतता जिवंत मनुष्याची नसून ती मेलेल्यांची शांतता आहे !' या अत्यंत अपमानकारक स्थितीतून स्वदेश वर कसा आणावा ? स्वातंत्र्य परत कसे मिळवावे ? मॅझिनी जन्मला त्याच वेळेस इटलीच्या लोकांनी एक प्रश्न सोडविला होता की, स्वदेशाची उन्नती ही भिक्षांदेहीने किंवा परक्यांच्या मदतीने केव्हाही होणार नाही. 'तुम्हाला भिक्षा मागून स्वातंत्र्य मिळेल अशी आशा आहे काय ? नाही, नाही. या भिक्षांदेहीने स्वातंत्र्य मिळणार नाही.' त्यांच्यापुढे जे काम होते ते उंच व धिप्पाड मनुष्यांचे होते. व

ते काम करण्यासाठी ते जमिनीवर सपशेल पसरले. 'त्यांनी प्रत्येक मुख्य प्रधानाच्या थापांनी भुलून जावे. त्यांनी भिकार सवलतीत संतुष्ट रहावे व त्यांनी प्रचंड. लोकशक्तीवर विश्वास ठेवण्याचे सोडून देऊन परक्यांच्या दारांशी जोगवा मागण्याचा उपक्रम करावा.' परंतु या उपक्रमाचा उपसंहार लवकरच झाला. इटलीचे धूर्त पुढारी या परक्यांच्या थापाथापीला फार दिवस भुलले नाहीत. त्यांच्या तेव्हाच ध्यानात आले की, आस्ट्रियाने जे आपणास जिंकिले आहे ते आपल्या अर्जांच्या चिटोऱ्यांनी आपणास मुक्त करण्याकरिता नव्हे. राष्ट्रांच्या इतिहासात बहुशः आढळून येणारे हे भिक्षांदेहीचे व्यसन इटलीस लागले होते, पण ते ताबडतोब सुटले. शंभर शंभर वर्षे परक्यांच्या दारी लाथा बसत असता व हजारो वेळा विश्वासभंग झाला असताही पुन्हा एकदा कटोरा घेऊन भिक्षा मागण्याइतका इटली देश राजनिष्ठ झालेला नव्हता. त्याच वेळेस, पोलंड, स्पेन वगैरे देशात राज्यक्रांतीची लाट उसळली होती. तीमुळेही इटलीतील लोकांत आत्मनिष्ठा उत्पन्न झाली. परंतु अशा भयंकर राज्यक्रांत्या आजूबाजूस चालत असताही त्यांच्याकडे पाहून ज्यांना आपल्या गुलामगिरीची व भिक्षांदेहीची शरम वाटत नाही, असे देश या भूमीवर काय थोडे आहेत! पण इटली इतकी मंदट झालेली नव्हती. ती खडबडून जागी झाली. या जागृतीचा परिणाम चहूकडे दिसू लागला. स्वदेशाची प्रीती ही वाङमयात प्रथम प्रादुर्भूत झाली. नंतर इटलीमध्ये स्वदेशी चळवळ सुरू झाली. मिलनमध्ये तर या स्वदेशी चळवळीचा कळसच झाला होता. प्रत्येक उदात्त व धाडसी कृत्यात तरुणवर्ग जसा सदोदित आघाडीवर असतो तसाच तो इटलीच्या राज्यक्रांतीतही होता. मिलनमध्ये ऑस्ट्रियाच्या तंबाखूवर विद्यार्थ्यांनी कडक बहिष्कार टाकला. रस्त्यारस्त्यातून विद्यार्थ्यांनी नाकेबंदी केली आणि कोणी ऑस्ट्रियाची विडी ओढताना पाहिला की; त्याला हाणमार करून देण्याचा सपाटा चालविला. या स्वदेशी चळवळीस लवकरच पूर्ण राजकीय स्वरूप प्राप्त झाले. अमेरिकेतही स्वातंत्र्ययुद्धाच्या आधी अशीच स्वदेशी चळवळ उत्पन्न झाली होती. काय विलक्षण प्रकार आहे ! इतिहासाची पुनरावृत्ती होते ती अशी. इतिहासात स्वदेशी चळवळीचे पर्यवसान राज्यक्रांतीत व स्वातंत्र्यप्राप्तीत झाल्याची ही उदाहरणे काही आकस्मिक रीतीने घडून आलेली नाहीत. ते काही अपघात नाहीत. त्यांच्या या विलक्षण साम्याचे विवरण करता येणे शक्य आहे. स्वदेशी चळवळ म्हणजे 'दुसऱ्याच्या लुटारूपणास आळा घालून आपल्या हक्कांचा बचाव करणे होय. आपले हक्क काय आहेत हे सामान्य लोकांस एकदम कळत नाही, म्हणून प्रथमतः त्यांच्या ग्राहकशक्तीला इतकेच कळते की, परक्यांच्या व्यापाराने आपण बुडत आहोत; म्हणून ते त्या व्यापारावर बहिष्कार घालण्यास तयार होतात. इतकी त्यांची तयारी झाली की अर्थातच परके लोक आपल्या व्यापाराच्या संरक्षणार्थ जुलमी उपाय योजू लागतात. हा जुलूम सुरू झाला की, प्रथमतः व्यापारावरच बहिष्कार घालणारे लोक अनायासेच सत्य मार्गाला लागतात. त्यांना कळू

लागते की, निर्जीव परदेशी कापडावर किंवा तंबाखूवर अगर चहावर बहिष्कार घालून काही उपयोग नाही. या निर्जीव वस्तूंवर राग काढण्यात काय अर्थ आहे ? खरा राग या निर्जीव वस्तूंना ज्या सजीव वस्तूंचा आधार आहे त्यांच्यावरच उगविला पाहिजे. परक्या मालाला नव्हे तर परक्यांनाच बहिष्कार घातला पाहिजे. तंबाखूलाच नव्हे तर या ऑस्ट्रियन लोकांना व चहालाच नव्हे, तर या इंग्रज लोकांनाच आपल्या देशातून हुसकून दिले पाहिजे. अशा विचारपरंपरेने इटालियन आणि अमेरिकन लोकांमध्ये स्वदेशी चळवळीचे स्वातंत्र्ययुद्धात रूपांतर झाले. मॅझिनीचे आधी जे देशभक्त होऊन गेले, त्यांनी इटलीचे राजकारण या स्थितीत आणून ठेविलेले होते. चहुकडे परक्या सत्तेबद्दल असंतोष माजला होता. आपली दुःखे भिक्षावृत्तीने कमी होणार नाहीत ही बहुतेकांची खात्री झालेली होती व स्वदेशी चळवळीसारख्या आत्मनिष्ठेच्या चळवळींचा प्रादुर्भाव झालेला होता. इतकेच नव्हे, तर काही काही पुढाऱ्यांना स्वातंत्र्याची लालसाही उत्पन्न झाली होती. परंतु ही स्वातंत्र्याची लालसा सर्व लोकांना कशी कळवावी ? परक्यांना इटलीतून घालवून दिल्याशिवाय इटली देश कधीही वर यावयाचा नाही हे लोकांना कसे शिकवावे ? वर्तमानपत्रे व उघड सभा असंतोष उत्पन्न करीत होत्या. परंतु या असंतोषाला कृत्याचे स्वरूप देणे आवश्यक होते. कारण ऑस्ट्रियाला हुसकून द्या असे उघड रीतीने कोणालाच सांगता येईना व लाक्षणिक भाषेत सांगितले असता ते सामान्य जनांना कळेना. याहीपेक्षा मोठी अडचण म्हणजे ही असे की, नुसते ऑस्ट्रियाला हुसका इतकेच म्हणून कार्य भागत नाही तर त्या राष्ट्रकृत्यासाठी काय उपाय योजावे याचे शिक्षण व याची सामुग्रीही जमविली पाहिजे होती. स्वातंत्र्य मिळवा इतकेच म्हणून स्वस्थ बसावयाचे नव्हते तर त्या स्वातंत्र्ययुद्धाची तयारी करणेही अवश्य होते. ही दोन कृत्ये कशी पार पाडावी ? परक्यांच्या जुलुमाखाली, 'इटलीला पार्लमेंट नाही, व्यासपीठ नाही, मुद्रणस्वातंत्र्य नाही, वाक्स्वातंत्र्य नाही, सभास्वातंत्र्य नाही, ज्यामुळे आमच्या मनात स्फुरण पावत असलेले सत्य स्पष्ट रीतीने बोलता येईल असे एकही साधन नाही !' अशी स्थिती झालेली असताना इटलीमध्ये स्वातंत्र्यप्रेमाची लालसा व स्वातंत्र्ययुद्धाची तयारी ही कशी करावीत ? हा प्रश्न सोडविण्याचा कारबोनारी वगैरे एक-दोन गुप्त मंडळ्यांनी प्रयत्न केला, तथापि त्यात यश आले नाही. त्याची कारणे सांगत बसण्याचे हे स्थल नाही. या सर्व स्थितीचा विचार करून आणि इटलीच्या पूर्वीच्या इतिहासाचे नीट पुन्हा अध्ययन करून, 'माझी अशी खात्री झाली आहे की, या जुन्या यंत्रांना वितळवून नवीन यंत्र बनविल्याशिवाय इटालीचा भाग्योदय व्हावयाचा नाही ' या नवीन यंत्राचे साहित्य तरुण लोक होत. जुन्या विचारांनी ज्यांची मने जखडली गेली नाहीत, ज्यांचे आत्मे हे गुलामगिरीच्या विटाळाने भ्रष्ट झालेले नाहीत व ज्यांच्या अंगात ध्येयासाठी वाटेल ते संकट सोसण्याची धमक आहे, असे तरुण

लोक आता पुढे आले पाहिजेत. नवीन परिस्थितीला नवीन माणसे पाहिजेत.' दोन कोटी लोकांनी मनात आणले तर त्यांना या जगात काय करणे अशक्य आहे ! 'माझ्या इटलीची लोकसंख्या दोन कोटी आहे ! या दोन कोटी लोकांच्या मनात आल्यावर त्यांना परक्यांचे पंच्याहत्तर हजार शिपुर्डे दाबून ठेवणार आहेत ? दोन कोटी लोक व त्यांचे बाजूला परमेश्वर !' अशा स्थितीत परक्यांचा निःपात इटली एका निमिषमात्रात करून टाकील. '**आजपर्यंत तिला स्वतंत्र होता आले नाही याचे कारण तिच्यात स्वशक्ती नव्हती हे नव्हे तर तिला स्वशक्तिज्ञान नव्हते !**' हा आत्मविश्वास उत्पन्न करण्याचे पहिले काम होते नि हे काम पूर्ण होताच इटलीला स्वातंत्र्याची तळमळ व ते आपण आपल्या करामतीने मिळवावयाचे ही निष्ठा आली की, तिला रणात उडी टाकावयास सशक्तता आणण्याचे दुसरे काम होते. इटलीमध्ये प्रथम मनःप्रवर्तन करावयाचे व त्याबरोबर शरीर-प्रवर्तन करावयाचे. इटलीचे मन स्वतंत्र व समर्थ करावयाचे आणि इटलीचे शरीर स्वतंत्र व सशस्त्र करावयाचे.

परंतु ही कृत्ये उघडरीतीने घडवून आणणे अशक्य होते हे वर सांगितलेच आहे. कोणत्याही परतंत्र राष्ट्राची ह्या पायरीपर्यंत मजल आली की, त्याच्यापुढे हाच महत्त्वाचा प्रश्न येऊन पडतो. स्वातंत्र्य पाहिजे ही अस्पष्ट इच्छा उत्पन्न झालेली असते. पण बहुजनसमाजाला ती स्पष्टपणे कशी कळवावी ? भिक्षा मागून काहीही प्राप्ती होणार नाही व शेवटी शक्तिदेवीचीच उपासना करावी लागणार, हे त्यास अंधुक रीतीने कळू लागते. पण राष्ट्राला सशक्त व सशस्त्र कसे करावे हे मात्र त्यास सांगता येत नाही. 'अशा स्थितीत '**गुप्त मंडळ्या**'शिवाय परवशतेतून सुटण्याचा दुसरा उपाय नाही. जेव्हा सत्यप्रतिपादनाची बंदी झालेली असते, जेव्हा पवित्र कार्यालाही आरंभ करण्याची चोरी झालेली असते, जेव्हा स्वदेश हा एक भला थोरला तुरुंग बनलेला असतो, तेव्हा त्या तुरुंगातून सुटून स्वतंत्र्याचे पवित्र वातावरणात श्वासोच्छ्वास करण्याचा ईश्वरी हक्क शाबित करण्यासाठी आम्हा कैद्यांना गुप्त कट हा एकच मार्ग आहे. आम्ही गुप्त मंडळ्या करू, गुप्त कट करू, वेळ येताच त्या तुरुंगाच्या खिडक्या उघडून टाकू, त्यांच्या गजाचे तुकडे उडवू, त्यांच्या दरवाज्यांना लाथेसरशी फोडून टाकू व त्या तुरुंगवाल्यांच्या छातीवर नाचत नाचत आम्ही मोकळ्या हवेत येऊ–आम्ही स्वतंत्र होऊ !' जेथे सत्यप्रतिपादनाची अधम सत्तेने बंदी केलेली नाही तेथे गुप्त मंडळ्या व गुप्त कट हा गुन्हा होय. '**परंतु जेथे सत्य प्रतिपादनाची अधमांच्या जुलुमाने बंदी झालेली आहे तेथे गुप्त मंडळ्या ह्या पवित्रतम आहेत. नव्हे, नव्हे, सत्य प्रतिपादनाचा तो एकच मार्ग आहे.**' या गुप्त मंडळ्यांचा आधार युरोपमधल्या बहुतेक स्वातंत्र्योन्मुख राष्ट्रांनी घेतलेला आहे. या गुप्त मंडळ्यांच्या योगाने बहुजन समाजाला स्वातंत्र्याचे शिक्षण फार सोप्या रीतीने देता येते. वर्तमानपत्रातून उघड लिहून किंवा सार्वजनिक भाषणे करून

परक्यांना हुसकून देण्याचा प्रयत्न करणे अशक्य असते व तरुण लोक व सामान्य वर्ग यांची ग्राहकशक्ती फार सूक्ष्म नसल्याने त्यांना वर्तमानपत्रे किंवा सार्वजनिक भाषणे यांच्यातील लपलेला अर्थ ग्रहण करता येत नाही. परंतु गुप्त मंडळ्यांचा पहिला फायदा असा आहे की, गुप्त सभा भरवून त्यात स्वातंत्र्याचे शिक्षण स्पष्ट व उत्तम रीतीने देता येते, ते लोकांस ताबडतोब कळते व परकीय सरकारास दाबणे अशक्य होते. मॅझिनी म्हणतो, 'या मार्गाने तुम्ही तरुणांस जें सत्य तें स्पष्ट रीतीने सांगा. त्यापासून काही लपवून ठेवू नका. त्यांना निर्जीव यंत्राप्रमाणे न वागविता त्यांना जिवंत व चैतन्ययुक्त मनुष्याप्रमाणे आदराने वागवा म्हणजे त्यांच्यात काय तेज आहे ते तुम्हास कळून येईल.' गुप्त मंडळ्यांचा प्रसार परकी सरकारास दाबणे अगदी अशक्य होते इतकेच नाही, तर एखादी दुसरी गुप्त मंडळी उघडकीस आणली असता त्यापासून त्याचा तोटाच होतो. गुप्त मंडळीचा स्फोट हा ज्वालामुखीच्या स्फोटासारखा आहे. तो दबून असतो तोपर्यंतच परकियांचे जीवन सुरक्षित असते. परंतु तो स्फोट होताच त्यातील तप्त रसाने परवश लोकां-वर चैतन्याची जंगी लाट पसरते. जेथे नसतात तेथे गुप्त मंडळ्या उत्पन्न होतात-व विशेषत: परक्यांचे धैर्य छिन्नभिन्न होऊन जाते. पाय ठेवावा तेथे भुयार आहे की काय अशी त्यांना भीती पडून त्यांची गती कुंठित होते व कोठे फटाका उडाला की, त्यांना बॉम्बशेल आल्याचा भास होतो. त्यांच्या अधिकारी वर्गास जिवाच्या आशेने नोकऱ्या सोडाव्या लागतात. अशा रीतीने सर्वत्र भीती उत्पन्न होते आणि भीक नको पण कुत्रा आटप अशी परक्यांची त्रेधा उडते. सारांश, दुसरा फायदा असा आहे की, फार थोड्या शक्तीने गुप्त मंडळ्यांना परकी सरकारास गांगरून सोडता येते. मॅझिनी म्हणतो, 'ते शंभर होते, पण त्यांनी यूरोपची सिंहासने साम्राज्ये, आज्ञापत्रके, तुरुंग, फाशी वगैरे सर्व राक्षसांना थरथर कापविले होते.' तिसरा फायदा म्हणजे, लढाईची तयारी करता येते. हे काम उघड रीतीने करणे अगदी अशक्य होते. ते अशक्य कार्य मॅझिनीने आपल्या गुप्त कटांनी शक्य करून दाखविले. याशिवाय एक केंद्र उत्पन्न होते. संघशक्तीने सर्व बेत पार पाडता येतात व सर्व लोकांना एक मार्ग, एक दिशा एक उद्दिष्ट देता येते. अशा अनेक फायद्यांचा विचार करून मॅझिनीने **'तरुण इटली'** स्थापन केली. या 'तरुण इटली' च्या उपदेशानेच इटलीला स्वातंत्र्य मिळाले व इटलीचे ऐक्य झाले. इटलीच्या स्वातं-त्र्यार्थ झगडलेल्या अनंत देशवीरांचे शिक्षण 'तरुण इटली'त झालेले होते. 'तरुण इटली' ने माझ्या देशातील भिन्न पंथ मोडून टाकून स्वदेश एक केला. त्यापूर्वी इटलीच्या ऐक्याला लोक हसत होते. इटलीचे राष्ट्रैक्य मनोराज्य आहे, असे सर्व पुढारी म्हणत होते. परंतु 'तरुण इटली'ने माझ्या देशात नवीन युगाला प्रारंभ केला.' तरुण इटलीने हे युगांतर करण्याचे कार्य कसे सिद्धीस नेले याची फोड करण्या-करिता तिच्यातील श्रमविभागाचे निरनिराळे विवेचन केले पाहिजे. 'तरुण इट-

लीचे साह्य मिळविण्यासाठी ती दुहेरी कार्यक्रमाची योजना करीत आहे. शिक्षण व युद्ध–शिक्षण युद्धाला मदत करील व युद्ध शिक्षणाला मदत करील' अशा दुहेरी कार्यक्रमाचे वर्गश: विवरण केले म्हणजे मॅझिनीने आपले अचाट कर्म कसे सिद्धीस नेले व नेवविले हे स्पष्ट होईल.

प्रथमत: मॅझिनीने इटलीला कोणचे शिक्षण दिले हे पाहिले असता या महात्म्याचे विचार किती प्रगल्भ व पवित्र होते, हे सहज दिसून येते. पूर्वी सांगण्यात आलेच आहे की, मॅझिनीचे सर्व राजकारण नीतीच्या पायावर उभारलेले होते. **'आपल्यापुढे जे कार्य आहे ते लहानसहान कार्य नाही. आपण देवाने जे कार्य केले तेच करीत आहोत. आपण लोकनिर्मिती करीत आहोत! आपण स्वराष्ट्र उत्पन्न करीत आहोत.'** याहून दिव्यतर कर्तव्य ते कोणचे असणार? 'परमेश्वराने अगदी स्पष्ट अशा आज्ञेने सांगितले आहे की, इटली हा एक स्वतंत्र देश आहे. समुद्राच्या व पर्वताच्या रेखा आपल्या दिव्य करांगुलीने आखून देवाने इटली देश इटालियनांस दिलेला आहे.' तेव्हा इटालियन लोकांचे पहिले कर्तव्य म्हणजे ह्या ईश्वरी आज्ञेप्रमाणे इटली स्वतंत्र करणे हे होय. 'तरुण बंधू हो, स्वदेश हे परमेश्वराने आपणास दिलेले घर आहे. या घरात राहून त्याच्या आश्रयाखाली तुम्ही वाढावे व वाढत वाढत अखेर मनुष्यजातीसह अंतिम स्वरूपाला जावे अशी त्याची इच्छा आहे.' हे निसर्गनिर्मित गृह इटालियनांना वाढण्याकरिता आश्रय म्हणून दिलेले असून परक्यांनी एक तुरुंग बनवून ठेवला आहे. म्हणून इटलीच्या पुत्रांचे पहिले कर्तव्य म्हणजे स्वदेश स्वतंत्र करणे हे होय. मॅझिनीने आपल्या गुप्त संस्थेतून पहिले शिक्षण या तत्त्वाचे दिले. 'प्रथम स्वातंत्र्य मिळविले पाहिजे. दास्यमुक्तता झाली पाहिजे. इतर सर्व प्रश्न मागाहून सुटतील. आल्प्सकडे धावा! चला! ऑस्ट्रियाशी लढाई!' अशा स्पष्ट रीतीने इटालियन तरुणांत स्वातंत्र्याचे चैतन्य उत्पन्न झाल्यामुळे मॅझिनीचे पूर्वी जी भिकारडी मते प्रचलित होती त्यांचा एकदम नाश झाला. अमका कर माफ झाला पाहिजे व तमका हक्क मिळाला पाहिजे असे म्हणणारा पंथ निर्माल्यवत् झाला. कारण सर्वांची अशी खात्री झाली की, 'आपणास अनेक हक्क नको असून एकच हक्क पाहिजे आहे व तो हक्क म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य–दास्यमुक्तता–हा होय.' **व हे स्वातंत्र्य ते फायद्याचे आहे म्हणूनच नव्हे, तर ते मर्दांचे कर्तव्य आहे म्हणून मिळविले पाहिजे.** 'इटलीमध्ये भाकर स्वस्त आहे किंवा महाग आहे हा मुख्य प्रश्न नाही. त्या भाकरीवर गुलामगिरीचा शिक्का आहे की नाही हा मुख्य प्रश्न आहे.' मग आस्ट्रियाने अनंत हक्क जरी दिले असते तरी इटलीचे लोक स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय राहतेना. मॅझिनीने स्वातंत्र्याला कर्तव्याचे स्वरूप दिल्याने ऑस्ट्रिया एकदम हातवीर्य झाला. त्या वेळेपर्यंत जरा जास्त कमी चळवळ झाली की लहान-लहान हक्क देऊन ऑस्ट्रिया खुबीने चळवळी मारून टाकीत असे. परंतु आता, 'हक्कांचा प्रश्न नसून हक्काचा आहे,' शिवाय आपण

स्वातंत्र्यसंपादनात एक अत्यंत पवित्र कर्तव्य करीत आहोत अशी तरुणांची भावना झाल्याने त्यांच्या उदात्त वृत्ती जाग्या झाल्या. तुरुंगात देशवीर राष्ट्रगीते गाऊ लागले व फाशीवर 'जो स्वदेशासाठी मरतो तो चिरंजीव होतो.' या महामंत्राचा जयघोष करू लागले. 'तरुणांना कर्तव्यबुद्धीने उद्दीपित करा, ध्येयाची भक्ती शिकवा, म्हणजे त्यांच्या अंगात काय सामर्थ्य आहे हे तुम्हाला कळेल.' असे तो महात्मा उगीच म्हणत नसे. इटलीत १८३१ पासून तो १८७० पर्यंत दरसाल कोठेना कोठे तरी एक बंड होतच असे. इतकी चिकाटी धरून स्वदेशभक्तांनी अखेर विजय संपादन केला. बंडामध्ये बायकांनी जे पराक्रम केले ते इतर निर्जीव देशातील पुरुषांनादेखील लाज आणतील! रोममध्ये १८४८ साली फरेंच लोकांशी लढाई चालली असता, 'ग्यारीबाल्डी सैन्यात उडी टाकून बेहोष लढत होता. इतक्यात त्यास सीनेटचे बोलावणे आल्यामुळे तो तिकडे गेला. त्याला पहाताच सीनेटने टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. ग्यारीबाल्डीला प्रथम त्या जयनादाचे कारण कळेना. इतक्यात त्याने स्वतःकडे पाहिले तो रक्ताच्या धारा नखानखातून गळत आहेत, शस्त्रांनी व निसटत्या लागलेल्या गोळ्यांनी कपड्यांची जाळी झाली आहेत व हातातली तरवार वार करता करता इतकी वाकली आहे की म्यानात ती अर्धीदेखील शिरत नाही!' अशा त्या तरवारीला अनंत प्रणाम असोत! जोपर्यंत अशी एक तरी तरवार जगात कायम आहे तोपर्यंत परतंत्र देशांनी स्वतंत्र होण्याची आशा धरण्यास हरकत नाही! मिलनमध्ये बंड सुरू करण्याचे आधी पुढारी म्हणू लागले, 'तुम्ही उठू नका, तुमच्याजवळ शस्त्रे नाहीत.' दुसऱ्या दिवशी लोक म्हणाले, 'उठा, दगड घ्या, सुऱ्या घ्या, काठ्या घ्या व उठा! म्हणजे आता शस्त्रे चालत येतील.' ते उठले व ऑस्ट्रियनांवर छापा घालून त्यांची शस्त्रें लुटून आणली! गुप्त मंडळ्यांची जमवाजमव इतकी उत्तम असे की, बायकापोरातसुद्धा त्यांची तत्त्वे शिकविली गेली होती. मिलनमध्ये व व्हेनिसमध्ये राज्यक्रांतीची नौबत धडधडताच, 'बायका रस्त्यात सज्ज होऊन उभ्या राहिल्या. एक म्हातारा लंगडत लंगडत गवताचा भारा घेऊन सरकारी ठाण्यात गेला व त्या भाऱ्यास आग लावून देऊन ते ठाणे भस्म करून परत आला! तरुण लोक पुस्तके टाकून बाहेर पडले, तरुण स्त्रिया फंडासाठी रस्तोरस्ती भिक्षा मागू लागल्या, स्वयंपाकी लोक आपल्या सोधण्यासुद्धा रस्त्यात उड्या घेऊ लागले व ऑस्ट्रियन शिपाई शहरात शिरू पहाताच त्यांच्यावर टेबले, कौले, सुऱ्या, खांब, दगड, तापलेल्या सळ्या, कढणारे तेल यांचा वर्षाव होऊ लागला!' अशा कृतनिश्चयाने इटली लढली! अनंत अपजय आले तरी ती लढली. कारण, 'प्रत्येक अपजय ही जयाची एक पायरी आहे.' अशी त्यांना 'तरुण इटली'ने दीक्षा दिली होती. १८२० साली पराजय झाला. १८३१ साली पराजय झाला; तथापि मॅझिनी म्हणाला, 'फिरून प्रयत्न करा. यश

गा...१२

किंवा अपयश हा विचार नसून कर्तव्यतेचा विचार असला पाहिजे. तुमच्या पक्षास परमेश्वर आहे. तुम्हास अंती जय मिळालाच पाहिजे.' इटलीने या महर्षीच्या उपदेशाप्रमाणे फिरून प्रयत्न केला व इटली स्वार्थत्याग, शौर्य, तेज, तत्त्व–निष्ठा आदिकरून सदगुणांनी युक्त आहे असे पाहून १८५९ सालापासून त्यांच्या श्रमाला परमेश्वरही फले देऊ लागला. ही स्वातंत्र्याची गोड फळे चाखावयास मिळण्यासाठी इटलीला जी किंमत द्यावी लागली ती 'तरुण इटली'च्या खजिन्यातून दिली गेली. अशा रीतीने मॅझिनीने स्वातंत्र्याचे शिक्षण इटलीच्या तरुणांस दिले. परंतु नुसते स्वातंत्र्यप्राप्तीचे कार्य म्हणजे काही अंतिम कार्य नव्हे. कारण 'जोपर्यंत लढाई सुरू आहे तोपर्यंत लोक एकत्र राहतील, परंतु ती बंद होताच इटलीदेशातील निरनिराळ्या प्रांतात यादवी माजू लागेल.' म्हणून मॅझिनीचे दुसरे तत्त्व म्हणजे '**राष्ट्रैक्य**' हे होय. इटलीचे भिन्न भिन्न प्रांतात पूर्वीपासून इतकी यादवी माजलेली होती की, ते निरनिराळे देशच झालेले होते. लहान लहान संस्थाने ही एकमेकांशी अखंड लढाया करीत होती. शहरे एकमेकांशी भांडत होती. अशा स्थितीत इटली देशाचे मिळविलेले स्वातंत्र्य कायम राहण्यास त्याचे राष्ट्रैक्य होणे अवश्यक होते. संयुक्त संस्थानपद्धती ठेवून भागले नसते. कारण निरनिराळी संस्थाने ठेवली की प्रांतिक अभिमानाला आरंभ होतो व त्या राष्ट्रात एकरूपता नाहीशी होऊन ते राष्ट्र परक्यांच्या पाशात लवकरच पडते. म्हणून मॅझिनीचे आग्रहाचे सांगणे असे की, इटलीने प्रांतिक अभिमान सोडून देऊन सर्व राष्ट्र एकीकृत झाले पाहिजे. ही गोष्ट मॅझिनीपूर्वी कोणासच समजली नव्हती. इतकेच नव्हे तर ह्या मताबद्दल मॅझिनीला सर्वजण प्रथम प्रथम हसत होते. परंतु तिकडे लक्ष न देता या भविष्यवाद्याने 'तरुण इटली'च्या द्वारे 'इटलीचे राष्ट्रैक्य झालेच पाहिजे, कारण ऐक्याशिवाय देशत्व नाही. ऐक्याशिवाय शक्ती नाही. इटलीच्या भोवती बलवंतांची राष्ट्रे पसरलेली असल्याने स्वातंत्र्य कायम रहावे अशी इच्छा असेल तर इटलीने एक राष्ट्र झाले पाहिजे.' असा उपदेश दिला. 'जेव्हा एखादा प्रांत युद्धाला आरंभ करील तेव्हा तेव्हा ते युद्ध इटलीच्या नावाने केले जाईल व त्या युद्धाचे निशाण हे इटलीचे एकराष्ट्रीय निशाण असेल.' सर्व इटलीमध्ये जे मनोराज्य म्हणून समजले जात होते, ते इटलीचे राष्ट्रैक्य या महात्म्याच्या दिव्य दृष्टीस सॅव्हीनाचे तुरुंगातून दिसले. त्याने आपल्या देशबांधवांस ती गोष्ट कळविली, ज्यांचा त्याच्यावर विश्वास बसला ते त्याच्या मागे गेले व अखेर खडतर मार्गांचे आक्रमण करता करता ते मनोराज्य खरे झालेले पहाण्याची धन्यता त्यांना मिळाली! अशा रीतीने प्रथम दास्यमुक्तता व मग राष्ट्रैक्य ही दोन तत्त्वे सांगितली. परंतु, 'आपले काम नुसते नाशकारक नाही. तर आपणास नाश केल्यानंतर त्या नाशातूनच सृष्टी उत्पन्न केली पाहिजे:' ही सृष्टी उत्पन्न करावयाला इटलीच्या सुदैवाने योग्यतम असाच सृष्टिकर्ता मिळाला होता यात शंका नाही. राष्ट्र स्वतंत्र झाले व त्यातील निरनिराळे प्रांतिक भेद मोडून

व द्वेष नाहीसे करून ते एक झाले म्हणजे मग तेथे ते स्वातंत्र्य व ती एकराष्ट्रीयता कायम राहण्यास अंतर्गत स्वतंत्रता मिळाली पाहिजे. ' जुलुम म्हटला की, तो त्याज्य आहे. मग तो परक्यांचा असो किंवा स्वकीयांचा असो. तो धार्मिक असो किंवा राजकीय असो. ' म्हणून राष्ट्रामध्ये व्यक्तिस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य व मत-स्वातंत्र्य ही अवश्य असली पाहिजेत. परंतु जेथें राजसत्ता आहे तेथे असमता उत्पन्न होतेच होते. मनुष्यात सद्‌गुण व योग्यता या योगानी जेवढे भेद झाले असतील तेवढेच भेद न्याय्य व उन्नतिमूलक आहेत, बाकी सर्व प्रकारची असमता ही अत्यंत गर्हणीय होय. व म्हणून राजसत्ता ही गर्हणीय आहे. मॅझिनीचे सर्व राजकारण जसे नीतिमत्तेला धरून होते तसेच त्याचे **लोकसत्तावादित्वही** नीतिच्या भक्कम पाया-वर उभारलेले होते. शिवाय इटलीसारख्या देशाला कायमपणा देणारी लोकसत्ते-शिवाय दुसरी राज्यपद्धती शक्य नव्हती. मॅझिनी स्वतः राष्ट्राच्या बहुमताला विरुद्ध नव्हता. ' राष्ट्रीय आज्ञेचा मी बंदा आहे. परंतु माझी अशी खात्री आहे की, **लोकसत्तेशिवाय दुसऱ्या सर्व राज्यपद्धती अन्यायमूलक व अनीतिमान आहेत.** ' इटलीमध्ये अनंत प्रांत, अनंत संस्थाने व अनंत दुरभिमान सुरू असल्याने त्या सर्वांना सारखे हक्क दिल्याशिवाय त्यांची एकी फार दिवस टिकणार नाही अशी त्याची पक्की समजूत असे. एका संस्थानाला राजा केले की, इतर संस्थाने त्याच्या ताब्यात जाऊ इच्छिणार नाहीत. एका प्रांताचा अंमल कबूल केला की, इतर प्रांतातील लोक आपली सत्ता त्याच्या हाती देणार नाहीत. अशा स्थितीत खरी खरी राज्यपद्धती म्हणजे लोकसत्ता हीच होय. लोकसत्ता स्थापिली म्हणजे कोणा-लाही विशिष्टाधिकार दिल्यासारखे किंवा पक्षपात केल्यासारखे होणार नाही. जी व्यक्ती खाजगी व सार्वजनिक वर्तणुकीने योग्यतम असेल ती सर्वानुमताने अधिकृत केली जाईल. ' शिवाय मनुष्यजातीच्या उत्क्रांतीप्रमाणे पाहिले असता लोकांचे युग आले आहे. देव व लोक ही तत्त्वे आता सुटली आहेत. राजाचा किंवा पोपचा जुलूम यापुढे चालणार नाही. यूरोपमध्ये सर्वत्र लोकसत्तेकडे प्रवृत्ती होत आहे. ' म्हणून इटलीनेही लोकसत्तेचीच योजना करावी असा मॅझिनीचा अत्याग्रह होता. ' तुम्ही राजसत्ता नेमाल तर काही दिवस शांतता राहील. परंतु कायमची शांतता राहणार नाही. पहिली राज्यक्रांती संपताच दुसरी सुरू होईल; ' अशा अर्थी त्याने वारंवार सूचना द्याव्या. व त्या भविष्याचे सत्यत्व लोकांच्या निदर्शनास आपल्या आयुष्यात आले नाही तथापि भावी कालात ते आल्याशिवाय, राहणार नाही अशी त्याची पक्की भावना होती. व एतदर्थ ' तरुण इटली 'त लोकसत्तेचे तत्त्व अंगीकृत केलेले होते. अशा रीतीने **दास्यमुक्तता राष्ट्रैक्य-समता-व लोकसत्ता** ह्या तत्त्वच-तुष्टयाचे शिक्षण ' तरुण इटली 'त दिले जाई. ही तत्त्वे इटलीच्या अंतःकरणावर मॅझिनीने कोरून ठेविली आहेत. त्यांचा बहुतेक जय झालेलाच आहे व जो थोडा राहिला आहे तोही भविष्यत्काली होणारच होणार यात कोणालाही शंका नाही.

परमेश्वराचे घरी प्रत्येक देशाकरिता एकएक मॅझिनी ठेवला असेल तर कोणालाच इटलीचा हेवा करण्याचे कारण नाही !

विनायक दामोदर सावरकर

लंडन, इंडिया हाऊस
ता. २८ सप्टेंबर १९०६

# अप्रकाशित गडकरी

संपादन आणि प्रस्तावना

**प्रल्हाद केशव अत्रे**


प्रथमावृत्ती
२३-१-१९६२

ह. वि. मोटे प्रकाशन
मूल्य ८ रु.

मूळ प्रस्तावना
पृष्ठे ५०


नाटककार गडकरी यांचे शिष्य आचार्य **प्र. के. अत्रे** ( १३-८-१८९८ ते १३-६-१९६९ ) यांनी ' अप्रकाशित गडकरी ' या पुस्तकाला दीर्घ, सखोल, सर्वस्पर्शी आणि भक्तिभावपूर्ण प्रस्तावना लिहून एकप्रकारे आपल्या शिष्यत्वाची सार्थकताच वाचकांना पटविली आहे. गडकऱ्यां-सारख्या श्रेष्ठ नाटककार कवीचे अप्रकाशित वाङ्मयतुषार, त्या तुषारांचा अत्र्यांनी प्रस्तावनेत गुंफिलेला सुंदर गोफ आणि कै. हरिभाऊ मोटयां-सारखा ग्रंथाला लाभलेला जाणकार संपादक असा त्रिवेणी संगम क्वचित येतो. गडकऱ्यांच्या विविध वाङ्मयकृतींच्या निर्मितीचा वेध घेण्याच्या दृष्टीने अत्र्यांची ' झपूर्झा ' नामक प्रस्तावना दर्पणासारखी उपयोगी पडणारी आहे. ही प्रस्तावना म्हणजे एकप्रकारे गडकऱ्यांच्या वाङ्मयीन जीवावर अत्र्यांनी नव्याने टाकलेला प्रकाशझोतच.

गडकऱ्यांचे कर्तृत्व जसे अलौकिक, तसे त्यांचे व्यक्तिमत्वही लोकविलक्षण म्हणून अवघ्या चौतीस वर्षांच्या आयुष्यात एवढा दिग्विजय मिळवून ते गेले. त्यांना जाऊन आता बेचाळीस वर्षे झाली. तरीदेखील अजून त्यांची कीर्ती पहिल्याइतकीच प्रफुल्लित आणि टवटवीत आहे. त्यांच्या वाङ्मयाबद्दल आणि जीवनाबद्दल विचार करताना डोळे अद्याप दिपतात. किंबहुना, त्यांच्या अवसानानंतर जशी जशी जास्त वर्षे लोटताहेत, तसतसे त्यांच्याबद्दल आकर्षण जास्त जास्त वाढत चालले आहे. महाराष्ट्राने त्यांच्या गुणांचे जेवढे कोडकौतुक केले तेवढे कोणत्याही मराठी लेखकाचे केलेले नाही. त्यांच्या काव्याने, नाटचाने आणि विनोदाने महाराष्ट्राला अक्षरशः वेड लावले. त्यांच्या देदीप्यमान भाषेने आणि वैशिष्टचपूर्ण शैलीने शारदेच्या अंगावर नवे नवे अलंकार चढवले आणि मराठी साहित्यात नवे युग सुरू केले. विष्णुशास्त्री चिपळुणकरांनी मराठी भाषेला सामर्थ्य दिले, तर गडकऱ्यांनी मराठी भाषेला सौंदर्य दिले.

गेल्या चाळीस वर्षांत गडकऱ्यांच्या वाङमयावर अनुकूल आणि प्रतिकूल इतके लिहून झाले आहे की, आता त्यांच्या वाङ्मयीन गुणदोषांबद्दल फारसे काही लिहिण्यासारखे उरलेले आहे असे वाटत नाही. गडकऱ्यांनी जे जे लिहिले आहे ते जसे प्रसिद्ध झालेले आहे तसे त्यांच्याबद्दल ज्यांना ज्यांना काही लिहिता येण्यासारखे होते, ते त्यांनीही लिहून टाकले आहे. अशा परिस्थितीत 'अप्रकाशित गडकरी' ह्या मथळचाने प्रसिद्ध होत असलेले हे पुस्तक बघून गडकरीभक्तांना आश्चर्याचा धक्का बसल्यावाचून राहणार नाही. डोळे रुंदावून आणि भुवया उंचावून ते विचारतील की, 'अप्रकाशित गडकरी' ही काय भानगड आहे? आता गडकऱ्यांचे काय प्रकाशात येण्याचे राहिले आहे? तथापी, पुस्तकाचा केवळ मथळा वाचून चकित झालेले वाचक प्रत्यक्ष पुस्तक वाचून तर अक्षरशः थक्क होतील ह्याविषयी आमच्या मनात बिलकूल शंका नाही. कारण, मराठी भाषेतच काय पण कोणत्याही भाषेत अशा तऱ्हेचे पुस्तक प्रसिद्ध झाले असेल असे आम्हाला वाटत नाही.

'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकात गडकऱ्यांचे वाङमय असे फार थोडे आहे. पण ते वाङ्मय ज्यातून अंकुरले आहे, त्या तेजस्वी बीजांचे काही नमुने ह्यात पहायला मिळतील. त्यांचे अमर वाङ्मय ज्या प्रतिभेच्या खाणीतून जन्माला आले, तिच्या तेजस्वी अंतर्भागाचे ज्वलंत दर्शन या पुस्तकात घडेल. इतकेच नव्हे तर त्या खाणीतून बाहेर न पडलेली अशी स्फुट विचारांची आणि कल्पनेची नवनवोन्मेषशाली रत्ने या पुस्तकात इतस्ततः विखुरलेली आढळतील. एखादा रत्नकार किंवा सुवर्णकार आपल्या कलागृहात अलंकार घडवीत असताना रत्नाचे वा सुवर्णाचे कण जसे आजूबाजूला उडतात, त्याप्रमाणे गडकऱ्यांच्या अमर वाङ्मयाची निर्मिती होत असताना त्यांच्या प्रतिभेतून विचाराचे वा कल्पनेचे जे जे स्फुलिंग उडाले, ते ते या ठिकाणी एकत्रित केलेले पाहावयास मिळतील. सारांश, गडकऱ्यांसारख्या एका

प्रतिभाशाली लेखकाच्या अंतर्मनाचे प्रथमच दर्शन घडविणारे हे एक अभूतपूर्व पुस्तक आहे.

कोणतीही कलाकृती लेखकाच्या प्रतिभतून पूर्ण स्वरूपात जन्माला आली म्हणजेच ती जगाला पाहावयास मिळते. पण प्रतिभेच्या गर्भाशयात त्या त्या कलाकृतींचा संभव कसा झाला, तिचा परिपोष आणि विकास प्रतिक्षणी अन् प्रतिदिनी कसा होत गेला, वेळोवेळी तिच्यावर कोणकोणते संस्कार झाले, तिचे संवर्धन करण्यासाठी कलावंताने कोणती साधना केली, या सर्व वैचारिक प्रक्रिया आणि अवस्था काही जगाच्या दृष्टीसमोर येत नाहीत. वस्तुत:, या गोष्टी कवींनी आणि लेखकांनी जगाला समजावून सांगायला हव्यात. पण पुष्कळदा त्यांना स्वत:लाच आपल्याला काय होते आणि कसे होते हे समजत नाही. म्हणून आपले मानसशास्त्रीय अज्ञान झाकण्यासाठी त्यांनी आपल्या लेखनप्रेरणेभोवती दिव्यत्वाचे एक वलय निर्माण करून ठेवले आहे.

**'ही नि:श्वसिते,**<br>
**कोण सोडते,**<br>
**विचारुनी भिऊनी त्याला**<br>
**पुढे करा मग कर अपुला !'**

आपले काव्य ही परमेश्वरी नि:श्वसिते आहेत हे लक्षात घेऊनच हिंमत असल्यास त्याजवर टीका करा, असे एका कवीने आपल्या टीकाकारांना धमकावले आहे.

प्रतिभाशाली लेखकांच्या आणि कवींच्या जीवनात स्फूर्तीला फार मोठे स्थान आहे यात शंका नाही. पण स्फूर्ती हा परमेश्वरी चमत्कार नसून ती भावनात्मक तल्लीनतेची एक अत्यंत सूक्ष्मतरल अवस्था आहे. विशिष्ट वेळी किंवा विशिष्ट स्थळी कवीला बाह्य जगाचा आणि आपल्या अस्तित्वाचा विसर पडतो आणि त्याच्या अंत:करणात अकस्मात अननुभूत उर्मी उचंबळते आणि त्या क्षणी एखाद्या नवीन विचाराचा साक्षात्कार त्याच्या मनाला होतो किंवा एखादी नवी कल्पना विद्युल्लतेसारखी त्याच्या अंतश्चक्षूंसमोरून चमकून जाते. त्यातूनच महान कलाकृतींचा जन्म होतो. वाङ्मयाप्रमाणे विज्ञानालाही हा नियम लागू आहे. सौंदर्याच्या दर्शनाने आणि संगीताच्या श्रवणाने सुखी अंत:करणदेखील हुरहुरू लागते.

**रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान्**<br>
**पर्युत्सुकीभवति यत्सुखिनोऽपि जन्तु:**

हा अमर सिद्धांत कालिदासाने ज्या अवस्थेत शोधून काढला, त्याच अवस्थेत न्यूटनला झाडावरून पडणाऱ्या एका फळातच सबंध विश्वाचे नियंत्रण करणाऱ्या गुरुत्वाकर्षणाच्या नियमाचा साक्षात्कार झाला.

या गूढ आणि स्वसंवेद्य मानसिक अवस्थेचे वर्णन जास्तीत जास्त समर्पक स्वरूपात करण्याचा पहिला प्रयत्न केशवसुतांनी 'झपूर्झा' या कवितेत केला आहे.

**ज्ञाताच्या कुंपणावरून**
**धीरत्व धरून**
**उड्डाण करून**
**चिद्धनचपला ही जाते**
**नाचत तेथे चकचकते;**
**अंधुक आकृति तिस दिसती**
**त्या गातात़ी**
**निगूढ गीती**
**त्या गीतींचे ध्वनि निघती**
**झपूर्झा गडे झपूर्झा**

ह्या 'झपुर्झा' अवस्थेत भासमान होणाऱ्या अंधुक आकृती वेळोवेळी जी गूढ गीते गातात, त्यांचा ध्वनी आणि अर्थ शब्दात जेव्हा प्रकट होतो तेव्हाच कलाकृती निर्माण होते. पण हे काम काही सोपे नाही. त्यासाठी महान तपश्चर्या करावी लागते. लेखन ही एक रसायनशाळा आहे. मूळ कल्पनेमध्ये वाचन, अवलोकन आणि चिंतनादि रसायने मिसळून अनुभवाच्या मुशीमध्ये त्यांना जेव्हा चांगले आटवावे, तेव्हा त्यातून चिरंतन कलाकृती प्रकट होते. पण हे करताना लेखकाला केवढे कष्ट करावे लागतात, ते 'जावे त्याच्या वंशा तेव्हाची कळे !

लेखकाच्या अंतर्मनात प्रवेश करण्याचा योग वाचकांना क्वचितच प्राप्त होतो. उलट कोणी तसा प्रवेश करू नये ह्याची ते काळजी घेत असतात. जणू काही आपल्या कलेचे रहस्य दुसऱ्यांना कळेल ह्याची त्यांना भीती वाटत असते. आभाळातून विमान उडत असलेले किंवा समुद्रावरून जहाज चाललेले पाहताना आपणाला केवढी मौज वाटते ? मग हे विमान उडते कसे आणि हे जहाज चालते कसे हे पाहण्याची साहजिकच आपल्या मनामध्ये जिज्ञासा उत्पन्न होते. आणि त्या जिज्ञासेचे समाधान होण्याची त्या त्या वाहनामध्ये सोय असते. विमानाच्या नि जहाजाच्या यंत्रगृहात आपण डोकावून पाहिले की, यंत्रसृष्टीतला तो अद्‌भुत चमत्कार बघून आपण हतबुद्ध होतो. आणि मग विमानाबद्दल आणि जहाजाबद्दल वाटणारा आपला आदर शतपटीने वृद्धिंगत होतो. महान लेखकांच्या अंतर्मनात जर डोकावून बघण्याची आपणाला संधी मिळाली तर आपली तशी अवस्था होईल. 'अप्रकाशित गडकरी' ह्या पुस्तकात असा पुष्कळसा भाग आहे की, ज्यावरून गडकऱ्यांच्या निर्भेळ प्रतिभासाधनाची वाचकांना कल्पना येईल आणि त्यांच्या वाङ्मयाकडे पाहण्याची

त्यांना एक नवीन दृष्टी प्राप्त होईल.

चालताना, बघताना, बोलताना, वाचताना, विश्रांती घेताना, विचार करताना कोणतीही कल्पना वा विचार डोक्यात चमकून गेला की, तो गडकऱ्यांनी ताबडतोब कागदाच्या कपटयावर, वहीवर, डायरीवर किंवा पुस्तकाच्या पाठकोऱ्या भागावर टिपून ' बंदिस्त ' केला नाही असे कधी व्हावयाचे नाही. अशा उत्स्फूर्त आणि स्फुट कल्पनांच्या टिपणकागदांच्या राशीच्या राशी त्यांनी आपल्या दप्तरात जपून ठेवलेल्या असावयाच्या. गडकऱ्यांच्या वाङमयनिर्मितीचा हाच कच्चा माल होय. त्यापैकी एकेक विचार आणि एकेक कल्पना निवडून काढून त्यांचा ते इतका भव्य आणि मनोज्ञ विस्तार करीत की, तो पाहून आपण थक्क होऊन जातो आणि अचंबा करीत राहतो की, एकाहीपेक्षा एक चमत्कृतिपूर्ण कल्पनांचे विश्व गडकरी निर्माण तरी कसे करू शकले ?

यांत्रिक जगात ज्याप्रमाणे एखाद्या यंत्राचे सर्व बारीकसारीक घटक आधी तयार केले जातात आणि मग ते एकत्र भराभर जोडून पूर्णावस्थेत ते यंत्र तयार करण्यात येते, तशा तऱ्हेने गडकरी आपली कलाकृती तयार करीत असत. एखादे नाटक लिहिण्याचा त्यांनी निर्धार केला म्हणजे ते नाटक संपूर्णपणे त्यांच्या डोक्यात शिजल्याखेरीज आणि त्याचे सर्व आराखडे आणि नकाशे ( Blue Prints ) कागदावर काढून तयार झाल्याखेरीज, ते प्रत्यक्ष लेखनास आरंभ करीत नसत. त्या नाटकातले अनेक संवाद, त्यामधल्या कोटया, सुभाषिते, टाळयांची काही वाक्ये ही सर्व त्यांनी आधीच कागदावर नोंदून ठेवलेली असत. त्यामुळे प्रत्यक्ष नाटयलेखनाला ते वाटेल त्या अंकापासून सुरुवात करीत असत. उदाहरणार्थ, ' राजसंन्यास ' नाटकाच्या शेवटच्या अंकाचा पाचवा प्रवेश त्यांनी २३ जून १९१६ ला पहिल्याने लिहिला आणि त्याच अंकातले पहिले चार प्रवेश त्यांनी ८ नि १० सप्टेंबर रोजी लिहिले, तर पहिल्या अंकामधला पहिला प्रवेश त्यांनी ५ नोव्हेंबरला लिहिला. असे हे गडकऱ्यांचे विक्षिप्त त्रांगडे असे. शेवटचा अंक पहिल्याने लिहावयाचा आणि पहिला अंक शेवटून लिहावयाचा असला ' आधी कळस मग पाया रे ' छापाचा चमत्कार केवळ मराठी वाङ्मयातच नव्हे तर आमच्या माहितीप्रमाणे जगाच्या वाङ्मयात फक्त गडकरीच करू शकले. इतरांची ती हिंमत झाली नाही, याचे कारण ' झपूर्झा ' अवस्थेत झालेले सर्व भास आणि साक्षात्कार हातात बेडया घातलेल्या कैद्याप्रमाणे शब्दांच्या मूर्त रूपात आपल्या डोळयांसमोर उभे केल्यावाचून त्यांनी प्रत्यक्ष निर्मितीच्या कार्याला कधी हातच घातला नाही. इतर लेखकांना लिहिता लिहिता कल्पना आणि विचार सुचतात, तर गडकऱ्यांना कल्पना आणि विचार अगोदर सुचल्यावाचून मुळी लिहिताच येत नसे.

' राजसंन्यास ' नाटकाच्या पुस्तकात प्रारंभी सात पानांची टिपणे दिलेली आहेत. ती ह्या पुस्तकाच्या परिशिष्टात समाविष्ट करण्यात आलेली आहेत. ती

वाचल्यानंतर एखादा पूल किंवा इमारत बांधण्यापूर्वी स्थापत्यशास्त्रज्ञ ज्याप्रमाणे शेकडो आराखडे करतो, त्याप्रमाणे नाटकातील कथानकाची बांधणी करताना, त्यांतील पात्रांच्या स्वभावाचे प्राकृतिक भेदाभेद आणि त्यामधील निरनिराळ्या घटनांचा कार्यकारणभाव निश्चित करताना गडकरी किती सूक्ष्म तऱ्हेने निरनिराळ्या योजना आखीत असत ते समजून येईल. आपल्या 'झेलम या संकलित कादंबरीचे त्यांनी असेच जे आराखडे लिहिले होते ते ह्या पुस्तकात पहावयाला मिळतील. यावरून लेखनशास्त्राचा गडकऱ्यांनी किती पायाशुद्ध अभ्यास केला होता हे दिसून येते. ज्या काळात गडकरी वावरत होते त्या काळात इतक्या तात्त्विक अन् शास्त्रीय दृष्टीने आणि तंत्राने लेखन करणारे लेखक जवळजवळ नव्हतेच असे म्हणावयाला हरकत नाही.

नाट्यलेखनाची ही शास्त्रीय दृष्टी त्यांना मोल्टन ह्या सुप्रसिद्ध नाट्यटीका-काराच्या ग्रंथावरून आलेली असावी. मोल्टन त्यांनी अतिशय काळजीपूर्वक वाच-लेला होता. (पान ६१).आणि त्यामुळे नाट्यरचनेचे मूलभूत सिद्धांत त्यांना चांगलेच अवगत होते. मोल्टनने घालून दिलेल्या नाट्यपरीक्षणाच्या अनुमानपद्धती (Inductive Method) चाही त्यांनी अभ्यास केलेला होता, असे शेक्सपीअरचे 'मर्चंट ऑफ व्हेनिस' शेरिडनचे 'रायव्हल्स' आणि बेन जॉन्सनचे 'एव्हरी मॅन इन हिज ह्यूमर' ह्या तीन नाटकांचे त्यांनी जे तपशीलवार विश्लेषण केलेले आहे (पान ८१ ते ८६) त्यावरून कळून येते.

पाश्चात्य नाटकांचे त्यांनी जे परीशीलन केले होते, त्याचा परिणाम त्यांच्या नाट्यलेखनावर होणे अगदी अपरिहार्य होते. अर्थात, त्यांनी कोणत्याही परकीय नाटकांचे भाषांतर वा वाङ्मयचौर्य केले नाही. त्यांच्याजवळ स्वतंत्र कल्पनांचे एवढे प्रचंड भांडार भरले होते की, दुसऱ्यापासून उसनवारी करण्याची त्यांना जरुरीच काय होती? नवीन नवीन प्रेरणा मिळाव्यात आणि कल्पना सुचाव्यात हा त्यांच्या वाचनाचा मुख्य उद्देश असे. उदाहरणार्थ, मॉरिस मेटरलिंक ह्या सुप्रसिद्ध नाटककाराच्या 'मोना व्हॅना' ह्या नाटकाचा गडकऱ्यांच्या मनावर फार परिणाम झाला होता. देशाचे स्वातंत्र्य का पातिव्रत्य अशी एक विलक्षण समस्या त्या नाटका-मधे उपस्थित करण्यात आली आहे. ह्या समस्येत भारतीय परिस्थितीला अनुसरून गडकऱ्यांनी 'पातिव्रत्य की प्राण' असा बदल करून त्यावर एक नाटक लिहिण्याचे योजिले होते. पण, ते काम त्यांच्या हातून पार पडले नाही. तथापि, ती कल्पना त्यांच्या डोक्यातून अजिबात गेली नाही. 'पुण्यप्रभावा'त ती निराळ्या रूपाने प्रगट झाली. मोना व्हॅनाची समस्या वेगळे रूप घेऊन भूपालच्या तोंडून बाहेर आली. 'पत्नीचे पातिव्रत्य आणि स्वतःचे प्राण ह्या दोहोंपैकी कोणाचा त्याग करू?' परभाषेतील उत्तमोत्तम नाट्यकृती वाचून गडकरी त्यातून कशी प्रेरणा घेत त्याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. इब्सेनच्या 'वॉरियर्स ऑफ हेलिगोलँड' या नाटकातल्या

नायिकेवरून त्यांना ' राजसंन्यास ' मधल्या तुळशीची कल्पना सुचली.

शेक्सपीअरच्या ' टेमिंग ऑफ दि श्रू ' ह्या नाटकाचे ' त्राटिका ' हे जे मराठी भाषांतर प्रा. केळकर ह्यांनी केलेले आहे, त्याची दाट छाया गडकऱ्यांच्या 'भावबंधन' या नाटकावर पडलेली आहे. त्या दृष्टीने त्राटिका आणि लतिका किंवा प्रतापराव आणि घनश्याम ह्यांच्या स्वभावाची तुलना करून पाहण्यासारखी आहे. त्याशिवाय त्राटिकेचे वडील जे धनाजीराव त्यांच्या घरात त्यांच्या मुलीची प्रेमयाचना करण्यास रंभाजी हा ' विद्याधर शास्त्री पुराणिका 'चे सोंग घेऊन शिरतो, तर राणोजी हा ' बुमय्या रायलू ' या मद्रासी गवयाचे सोंग घेऊन राहतो. ही विनोदी घटना गडकऱ्यांनी ' भावबंधना 'त अगदी सही सही घेतलेली आहे. लतिकेचे वडील जे धनेश्वर त्यांच्या घरात लतिकेचा प्रियकर प्रभाकर हा ' महामहोपाध्याय गिरसप्पा ' या कानडी पंडिताचे सोंग घेऊन शिरतो, तर धनेश्वराचे कागदपत्र चोरण्यासाठी महेश्वर हा ' कामण्णा ' या कानडी गवयाचे सोंग घेऊन राहतो.

' एकच प्याला ' हे नाटक गडकऱ्यांना शेक्सपीअरच्या ऑथेल्लोवरून सुचले असे जर मी सांगितले तर कोणी त्याजवर विश्वास ठेवील काय ? पण ती खरी गोष्ट आहे. ऑथेल्लो म्हणजें सुधाकर, डेस्डिमोना म्हणजे सिंधू, आयागो म्हणजे तळीराम आणि एमिलीया म्हणजे गीता अशी पात्रे डोळ्यासमोर कल्पून आणि संशयाचे रूपांतर मद्यपानात करून 'ऑथेल्लो'चो आणि ' एकच प्याला 'ची जर तुलना केली तर त्या दोन्ही नाटकामधले साम्य लक्षात येईल. एवढच नव्हे, तर ' एकच प्याला' नाटकातील एकच प्याल्याचा जो मूलभूत सिद्धांत आहे, तो आणि ' एकच प्याला ' हे नावदेखील गडकऱ्यांना 'ऑथेल्लो ' वरूनच सुचलेले आहे हे अगदी उघड आहे.

तुर्की आरमाराचा ऑथेल्लोने पराभव केल्यानंतर त्या विजयाच्या आनंदाने त्याच्या छावणीतले सारे सैनिक आधीच बेहोश होतात आणि मग त्या बेहोषीत मद्याची भर पडल्यानंतर त्यांनी त्या रात्री काय जल्लोष केला असेल ह्याची कल्पनाही करता येणार नाही. ऑथेल्लोचा दुय्यम सहाय्यक कॅशिओ म्हणून होता. त्याला दारू फार चढे. म्हणून त्याने त्या रात्री फक्त ' एकच प्याला ' (one cup only) घेतला होता. पण त्याला दारू पाजून बेहोष करण्याच्या उद्देशाने त्या नाटकातला खलपुरुष आयागो त्याला फक्त ' एकच प्याला ' आणखीं पिण्याचा आग्रह करतो.

सारांश, माणसाची पिण्याची जी ठराविक मर्यादा असते, तिच्यात आणखी ' एकच प्याल्या 'ची भर पडली तर तो पशु होतो, ही जी शेक्सपीअरची कल्पन आहे, ती गडकऱ्यांनी सुधाकराच्या तोंडून चौथ्या अंकात वदविली आहे ' या संशयावस्थेच्या शेवटच्या दिवसांत तर हे प्रमाण वाढत वाढत इतक्या नाजुक मर्यादेवर येऊन ठेपलेले असते की ती बैठक संपल्यानंतर एकच प्याला अधिक घेतला तर तो अतिरेकाचा झाल्यावाचून राहू नये. संमोहावस्था जाऊन उन्मादावस्था पहि-

त्यानं सुरू करणारा असा हा एकच प्याला. बरळणं, तोल सोडणं, ताल सोडणं, कुठं तरी पडणं, काही तरी करणं, या गोष्टी अतिरेकामुळे त्याच्याकडून घडू लागतात.'

'एकच प्याला' चे मूळ कथानक जरी गडकऱ्यांना हरि नारायण आपटे ह्यांच्या 'अल्प चुकीचा घोर परिणाम' ह्या दीर्घकथेवरून सुचलेले असले आणि त्यातील मूळ सिद्धांत आणि पात्रचौकट, जरी त्यांनी शेक्सपीअरवरून घेतलेली असली, एवढंच नव्हे, तर वैद्य आणि डॉक्टरने रोग्याला एकाच वेळी तपासण्याची विनोदी घटना-त्यांनी मोलियरच्या 'लामूर मेदेसिन (प्रेम हाच खरा वैदच)' या नाटकातून (अंक २, प्रवेश ४) घेतलेली असली तरी 'एकच प्याला' नाटक हे केवळ गडकऱ्यांच्या अलौकिक आणि देदीप्यमान प्रतिभेचा स्वतंत्र विलास होय ह्यात काय शंका ? जगातील उत्तमोत्तम वाङ्मयाच्या आस्वादाचा उन्माद गडकऱ्यांना कित्येकदा जरी अनावर झाला असला तरी त्यांची प्रतिभा स्वतःच्या पंखाच्या सामर्थ्यावर कल्पनेच्या स्वर्गीय वातावरणात उड्डाण करीत असे हे विसरता कामा नये. गडकऱ्यांच्या जीवनाची आणि लेखनाची ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेऊन,आता या पुस्तकात प्रथमच प्रसिद्ध होत असलेल्या त्यांच्या स्फुट आणि अस्फुट कल्पनांचा विचार करू या.

ह्या पुस्तकातले प्रारंभीचे संपूर्ण गदय नि पदय लेखांचे दोन भाग गडकऱ्यांच्या, प्राथमिक लेखनाची वाचकांना थोडीशी तरी कल्पना यावी या दृष्टीने दिलेले आहेत. त्यातील दोन प्रकरणे तर पुनर्मुद्रित आहेत. 'याला साहस कोण म्हणणार नाही ?' या कथेचे नायक 'हरिहर' म्हणजे स्वतः राम गणेश गडकरी होत हे ओळखणे काही कठीण नाही. बालपणी गडकऱ्यांनी जे काही उडाणटप्पू वाचन-किंवा उपवाचन केले त्याची जंत्री त्यांनी या लेखनात दिली आहे. गडकऱ्यांची प्रेमकाव्यें वाचून काही टीकाकारांनी गडकरी हे स्वतः कोणा तरी 'सुंदरी'च्या प्रेमात पडले असले पाहिजेत असा निष्कर्ष काढलेला आहे. त्याला या लेखात गडकऱ्यांनी जणू काही आगाऊच उत्तर देऊन ठेवलेले आहे.

हरिहरचे वर्णन करताना ते म्हणतात, 'प्रणयिनीवाचून तो प्रणयी झाला होता, विरहावाचून तो विरहव्यथा अनुभवीत होता. जग त्याला उदास भासत होते. प्रेम-शून्य जीविताला तो कंटाळला होता.' यावरून 'प्रणयवेडा' होण्यासाठी कवीला हमखास प्रणयिनीच लागते ही जी टीकाकारांची कल्पना आहे ती किती वेडगळ आहे हे दिसून येते.

'झेलम' कादंबरीमधील पात्रे, प्रकरणे आणि कल्पना ह्यांची टिपणे वाचून वाटते, ती कादंबरी जर गडकऱ्यांनी पूर्ण केली असती तर ती एक काही तरी विलक्षणच मौज झाली असती. ही कादंबरी कोठल्या तरी वास्तववादी घटनेवर आधारलेली असावी असे वाटते. आणि तिच्यातील कित्येक पात्रे गडकऱ्यांच्या परिचयातील काही व्यक्तींवर आधारलेली असावीत असे दिसते. उदाहरणार्थ, महर्षि धोंडो केशव

कर्वे ह्यांचे द्वितीय चिरंजीव डॉ. शंकरराव कर्वे, जे आफ्रिकेत गेली चाळीस वर्षे वास्तव्य करून आहेत, त्यांच्यावरून ह्या कादंबरीतल्या 'शानु' ह्या पात्राची कल्पना गडकऱ्यांना सुचली होती, अशी त्यांनी आपल्या स्मरणटिपणात नोंद करून ठेवलेली आढळते (पान ३५).

गडकऱ्यांनी ज्यावेळी 'प्रेमसंन्यास' हे नाटक लिहिले, त्याचवेळी 'तोड-ही-माळ' ह्या नाटकाचे कथानक त्यांच्या डोक्यात घोळत होते. मिश्रविवाहाच्या समस्येवर हे दु:खपर्यवसायी नाटक आधारलेले होते.त्या नाटकाचा नायक श्यामल व नायिका तरु. त्याशिवाय त्यामध्ये कौस्तुभ-कांता, मणि-मुकुल, सावित्री-वैकुंठ या प्रेमिकांच्या इतर जोडया होत्याच. प्रत्येक अंकाच्या शेवटी एकेका प्रेमिकाच्या जोडीचा विवाह मोडतो आणि त्यामुळे त्यांच्या विवाहाची माळ तुटते, म्हणून त्या नाटकाचे नाव 'तोड-ही-माळ' असे ठेवण्यात आले होते. श्यामल आणि कौस्तुभ हे दोघेही फर्ग्युसन कॉलेजचे विद्यार्थी असतात. घरच्या गरिबीमुळे श्यामल कॉलेज सोडतो. कौस्तुभ इंग्लंडला जाऊन आय्. सी. एस्. होतो आणि न्यायाधीश होतो. श्यामलचे प्रेम तरु नावाच्या एका सुंदर मुलीवर असते. पण दोघेही भिन्न जातीचे असल्यामुळे त्यांचा विवाह होऊ शकत नाही. तरूचे लग्न तिच्या जातीतल्या एका व्यसनी माणसाशी होते. हा माणूस एके दिवशी तरूला मारझोड करीत असता तिच्या साहाय्यासाठी श्यामल तिच्या घरात शिरतो. त्या गडबडीत तरूचा पती मारला जातो आणि खुनाचा आरोप श्यामलवर येतो. आणि तो खटला त्याच्या कॉलेजमधला पूर्वीचा सहाध्यायी जो कौस्तुभ ह्याच्या कोर्टात येतो. कथानकाचा एवढाच भाग आठवणीत आहे. सदर कथानक सर हॉल केनच्या एका सुप्रसिद्ध कादंबरीवर जरी आधारलेले होते, तरी त्यात गडकऱ्यांच्या जीवनातील अनेक घटना आणि खरीखुरी पात्रे येणार होती. एवढेच नव्हे, तर स्वत: गडकरी आपले स्वत:चे एक पात्र ह्या नाटकात घालणार होते. त्या संबंधीचे पुढील उल्लेख पान ६९ वर आहेत.

'ह्या ठिकाणी गडकरी ही व्यक्ती S. B. M. (म्हणजे किर्लोस्कर नाटक मंडळीचे सुप्रसिद्ध व्यवस्थापक शंकर बापूजी मुजुमदार) वगैरेसह कौस्तुभाच्या घरी आणणे. गडकरी & कौस्तुभ Versus कैलास, गडकरी वगैरेंचा प्रवेश. प्रेमसंन्यासाचे उत्तर. कैलास angry गडकरी's taunts S. B. M. मेहेंदळे (सद्रू), कोल्हटकर, रविवारचे नाटक वगैरे. इथेच पडदा पडतो. अंतोबा हे पात्र आणणे.' ह्या त्रोटक टिपणावरून शंकर बापूजी किंवा स्वत: गडकरी आणि मेहेंदळे, कोल्हटकर (चिंतामण) आणि अंतोबा हे त्यांचे मित्र कोणत्या संदर्भात ह्या नाटकात येणार होते याचा बोध होत नाही; पण त्या नाटकातील हा बहुधा विनोदाचा मालमसाला असावा. कारण, 'प्रेम-विश्वविद्यालया'ची अद्‌भुत कल्पना काढणारे जे विनोदी पात्र कैलास, त्याचा ह्या सर्व मंडळींशी संबंध येतो.

'तोड-ही-माळ'च्या पहिल्या प्रवेशाचा जो अत्यंत त्रोटक भाग उपलब्ध आहे,

यात 'चार चंद्रां'ची कल्पना पराकाष्ठेची काव्यात्मक आहे. तथापि त्या नाटकाची 'अर्पण-पत्रिका' आणि 'मंगलाचरण' हे मात्र गडकऱ्यांच्या प्रतिभेचे दोन अत्यंत तेजस्वी उन्मेष आहेत असे म्हटले पाहिजे. त्यातील शब्दाशब्दांवर गडकऱ्यांच्या वैशिष्टयपूर्ण शैलीचा शिक्का आहे.

गडकऱ्यांच्या उर्वरित अपूर्ण आणि त्रोटक कविता ज्या या संग्रहात प्रकाशित केल्या आहेत त्यात सर्वांना परिचित असलेल्या 'गोविंदाग्रजां'च्या काव्यात्म शैलीचे आल्हाददायक दर्शन निश्चितपणे होते. एवढेच नव्हे, तर त्यातल्या कित्येक काव्य-पंक्तींमधून गडकऱ्यांच्या अंतःकरणात दडलेल्या कसल्या तरी व्यथेची जाणीव होऊन मन क्षणमात्र व्याकूळ झाल्यावाचून रहात नाही. या ठिकाणी गडकऱ्यांनी आपल्या आयुष्यात लिहिलेल्या एका शेवटल्या कवितेचा उल्लेख करणे मला अपरिहार्य वाटते. कारण, ती कविता आणि ज्या प्रसंगी ती लिहिली गेली तो प्रसंग आता मला एकटयालाच माहीत आहे.

गडकऱ्यांनी आपली पहिली पत्नी सीताबाई ही तरुणपणीच टाकून दिली होती. कोणी म्हणत, ती त्यांना सोडून गेली होती. त्यानंतर मरणापूर्वी एक वर्ष आधी त्यांनी रमा नावाच्या एका तरुण मुलीशी लग्न केले होते. उभयतांच्या वयात सोळा सत्रा वर्षांचे अंतर होते. वस्तुतः, या विवाहाच्या वेळेपासूनच गडकऱ्यांची प्रकृती ढासळू लागली होती. म्हणून हा विवाह केवळ नाममात्रच होता आणि त्यापासून त्या दोघांपैकी कोणाला कसलेच सुख लाभले नाही. उभयतांची एकान्तात जेव्हा पहिल्याने भेट झाली त्याचवेळी या विवाहाच्या वैफल्याची गडकऱ्यांना पूर्ण कल्पना येऊन चुकली. त्या निराश आणि व्याकुळ मनःस्थितीत गडकऱ्यांनी जी कविता लिहिली होती, ती त्यांच्या मृत्यूनंतर जेव्हा मी 'वाग्वैजयंती' चे हस्तलिखित तयार करीत होतो, तेव्हा अचानक माझ्या हातात आली. ती कविता आता मला काही स्मरत नाही. पण तिच्या शेवटी अनुष्टुभाच्या ज्या दोन ओळी होत्या, तेवढचा मात्र या क्षणापर्यंत मी माझ्या स्मरण-संपुटात जपून ठेवलेल्या आहेत, त्या अशा :

**'गोविंदाग्रज' धाडी ही पहिली भेट संभ्रमे**
**पहिला आणि शेवटला संपला स्पर्श हा × ×**

दुसऱ्या ओळीतल्या शेवटच्या दोन फुल्या 'रमे' या पत्नीच्या नावाच्या संबोधनात्मक रूपाबद्दल आहेत. ह्या कवितेत गडकऱ्यांच्या चरित्रामधल्या एका अत्यंत खाजगी आणि दुःखद घटनेचा उल्लेख असल्याने त्यांचे धाकटे बंधू मंजुबाळ ह्यांनी ती कविता त्याचवेळी फाडून टाकली.

या संग्रहातील 'स्मरणार्थ टिपण' हे प्रकरण सर्वात जास्त महत्त्वाचे आहे. 'अपूर्णा'वस्थेत गडकऱ्यांना भासमान झालेल्या अनेक कल्पना आणि सुचलेले विचार ते ताबडतोब कागदावर कसे टिपून ठेवीत त्याचे वर्णन यापूर्वीच केलेले आहे. गड-

कऱ्यांनी आपल्या नाटकात किंवा इतर लेखात न वापरलेल्या कितीतरी तेजस्वी कल्पना, कोटया आणि सुभाषिते ह्यांची ह्या 'टिपणात' अगदी रेलचेल उडालेली आहे

नुसत्या कोटयाच बघा. (१) तोंडास तोंड दिले तर दामदुपटीने परत मिळते — एका तोंडाची दोन तोंडे होतात. (२) लग्नाच्या शृंखला तोडण्याचा प्रयत्न केला तर खडखडाट जास्त होतो. (३) बाळपणात खेळाचे प्रेम असते. तरुणपणात प्रेमाचे खेळ असतात. (४) माझे प्राण घेशील तर मरेपर्यंत तुझे उपकार विसरणार नाही. (५) मारवाडी लोक कनक आणि कांता दोन्हीही झाकून ठेवतात. (६) पुस्तकांची 'पाने' चाळली पण 'फळ' नाही. (७) या मारामारीत त्याचा हात होता. अन् माझेही अंग होते. (८) विडा खायचा नाही असा विडा उचलला. (९) भुताचे पाय उलटे तर माणसाचे डोके उलटे. (१०) पूर्वी आईबाप मुलाची लग्ने करीत. हल्ली मुलांचे आईबापच लग्ने करतात. (११) गाडी चालू होताच आम्ही स्थिर झालो. (१२) वरात आल्यापासून सुनेला नावे ठेवू लागतात. (१३) मराठीतील बहुतेक पत्रे मुलांकरता आहेत. मोठयांसाठी नाहीत. (१४) देवाभोवती फेऱ्या घालण्याने दैवाच्या फेऱ्यातून चुकता येत नाही. (१५) हृदयात शिरण्यापूर्वी डोळयात भरावे लागते.

आता ही 'सुभाषितां'ची सुवासिक पखरण पहा. (१) बिघडलेल्या दुधापेक्षा चांगले ताकच बरे. (२) अस्वलाच्या गुदगुल्यांनी हसू येत नाही. (३) पूर्वजांच्या स्तुतिपेक्षा समकालीनांची निंदा कानाला गोड वाटते. (४) सत्य, सौंदर्य आणि बुद्धी यांचा त्रिवेणी संगम हे आयुष्याचे स्वर्गसुख आहे. (५) घडयाळाचे काटे सरकवून लोटून काळाला पुढं लोटता येत नाही. (६) कवीची वाग्गंगा महापुरातसुद्धा गढूळ होत नाही. (७) स्वतःच्या गुणाविष्करणापेक्षा दुसऱ्याच्या दुर्गुणांवरच पोट भरणारे कंगाल फार सापडतात. (८) पैसा, मत्सर आणि मार हे सत्याचे बाहेर येण्याचे मार्ग आहेत. (९) महात्म्यांचे मरण हे जीवन्मृतांना नवजीवन देते. (१०) सुंदर स्त्रियांना सौंदर्याचा काय उपयोग ?

चमत्कृतिजनक काव्यमय कल्पना किंवा उत्प्रेक्षा निर्माण करून वाचकांना थक्क करून टाकण्याच्या बाबतीत गडकऱ्यांचा हातखंडा असे. त्याचेही काही नमुने ह्या 'टिपणा'त सापडतील. (१) एरवी हिमालय शोभादायक असला तरी उन्हाळयात तो जगकल्याणकारकच असतो. ज्याप्रमाणे सीताहरणाने संतापलेल्या श्रीरामाने जगाचे हित केले. (२) हृदयाच्या धडधडत्या भाषेत एकच शब्द आहे म्हणूनच आपले विचार प्रियजनांना कळत नाहीत. गडगडणाऱ्या मेघाची स्वर्गीय भाषाही एकच शब्दाची असल्यामुळे देवाचे संदेश आमच्या बहुभाष मनुष्यवस्तीला कळत नाहीत. (३) पतीचा आधार सोडताच स्त्रिया पतितदशेला पोहोचतात. वेली वृक्षाला सोडताच मातीस मिळतात. विजेची अधोगती तिला पाताळात नेऊन सोडते. (४) कधी लव्हाळयाने नदीच्या चंचल पाणभुईवर मी स्वैर रेघोटया काढीत होतो,

त्या रेषांचे क्षणमात्र जीवित,परंतु त्यांची स्मृती मात्र जखमांप्रमाणे किंवा दुर्दैवाच्या रेषांप्रमाणे अक्षय रूपाने अजून हृदयावर वठल्या आहेत. निराश संस्मृतीत सुखाच्या स्मृती चिरंजीव रूपाने रहातात. (५) कुलीन, गंभीरवृत्ती आणि वृद्धवयाचा काळ-पुरुष प्रणयी जनांच्या सुखमय एकांताचे वेळी लज्जाशील वृत्तीने वेगाने पावले टाकून निघून जातो. तोच दुःखी जनांचे समाधानपर सांत्वन करण्यासाठी तिष्ठत राहून सोबत करतो. (६) फळाची आशा धरावयाची झाल्यास फुलाची आशा सोडावी लागते. तरुणीच्या स्तनावर हात ठेवायचा झाल्यास, मातेच्या स्तनावरचा हात काढावा लागतो. (७) भविष्य आपल्या हाती आहे अशी खरी गोष्ट असली तरी त्याच्यासाठी ज्योतिषापुढे हात पसरणे नामर्दपणाचे आहे. (८) आईच्या अश्रूत भिजत असता हसणाऱ्या मुलाइतकी आनंददायक वस्तू एखादीच असेल.

गडकऱ्यांच्या विनोदी कल्पनासुद्धा तितक्याच चमत्कृतिजनक आहेत : (१) ठेंगण्या पर्वताच्या माथ्यावर हिरवटपणा असतो. पण गगनात उंच भराऱ्या मारणाऱ्या हिमालयासारख्याचे डोके शुभ्र असल्यास नवल नाही. (२) इंग्रज स्त्रीला कुंकू नाही म्हणून काही कोणी तिला विधवा म्हणत नाहीत. (३) खानावळीतले तूप धन्याची खरी सेवा करते. कारण ते फारसा भात खपू देत नाही. (४) त्याचे डोळे इतके तांबडे लाल दिसू लागले की, पतंगसुद्धा दिव्याला सोडून झेपाऊ लागले. (५) काही लोक इतक्या हलक्या प्रकृतीचे भासतात की दुसऱ्याच्या पोटात समाधानाने चार घास गेले तरी त्यांच्या पोटात दुखू लागते, (६) नारळात पाणी असते हे आपटल्यावाचून समजत नाही. त्याप्रमाणे डोळ्यात काय पाणी असते ते थप्पड दिल्यावाचून कळत नाही. (७) मार व शिव्या खाण्यास दुसऱ्याची तोंडे व हात लागतात.

गडकऱ्यांनी आपल्या टिपणात संकल्पित 'विनोदी' लेखांची आणि कल्पनांची जी नोंद करून ठेवलेली आहे, ती वाचल्यानंतर हे त्यांचे सर्व संकल्प जर खरोखर पूर्ण झाले असते तर मराठी भाषेतील विनोदी साहित्यात केवढी भर पडली असती ह्याची कल्पना आल्यावाचून रहात नाही. 'कंजूष' मनुष्याबद्दल आणि 'बाजारगप्प' या विषयावर त्यांना विनोदी लेख लिहावयाचे होते. 'फर्ग्युसन कॉलेज' च्या मासिकात 'आदाम व ईव्ह' ह्यांचे चरित्र लिहिण्याचा त्याचा विचार होता. ते चरित्र अर्थातच विलक्षण हास्यकारक झाले असते हे सांगावयास नकोच. 'दारू आणि भांग' ह्यांवर एखादा तुलनात्मक विनोदी लेख लिहिण्याचा त्यांचा विचार असावा. त्यातल्या काही हास्यकारक मुद्द्यांची त्यांनी नोंद करून ठेवलेली आहे. दारूमुळे मनुष्य आपल्या जीवावर उदार होतो, तर भांगेमुळे मनुष्य स्वतःबद्दलच चिंता करू लागतो. दारूच्या नशेत शृंगार, वीर आणि करूण हे रस प्रधान असतात तर भांगेच्या अंमलात हास्य, अद्भुत आणि शांत रसांचा जोर असतो. अर्थात, दोन्हीही नशेचा शेवट अखेरीस शांत रसातच होतो. दारू पिणारा माणूस दुसऱ्या-

गा...१३



३३३० निषेध २९८२२ ३०५८८

बद्दल बोलत असतो. तर भांग ही अध्यात्मिक विचाराला अनुकुल असते. सारांश, भांग ही आर्यसंस्कृतिपर आणि दारू ही पाश्चात्य विचाराच्या वळणाची असा गडकरी शेवटी निष्कर्ष काढणार होते.

त्या खेरीज आपल्या नाटकांसाठी निरनिराळ्या स्वभावांच्या किंवा खोडींच्या पात्रांची त्यांनी नोंद करून ठेवली होती. बोलत असताना एकेक शब्द तोडून बोलणारी अन् मधूनमधून 'काय समजला ?' 'काय', 'ध्यानात आले काय ?' असे विचारणारी आणि आपल्या वाक्याच्या शेवटी 'हं' किंवा 'हं हं' असे चमत्कारिक स्वरात बोलणारी किंवा दुसऱ्याच्या भाषणाच्या शेवटच्या शब्दाची पुनरावृत्ती करणारी माणसे गडकऱ्यांना कुठं तरी भेटली असली पाहिजेतच. त्यांचा नमुना त्यांना कुठंतरी रंगवायचा होता. 'जीव गेला तरी मरायचा नाही' अशा वृत्तीचे एक पात्र एखादी गोष्ट स्पष्ट करीत असताना अधिकच घोटाळा करणारे दुसरे एक पात्र आणि क्षुल्लक गोष्टीला फार महत्त्व देणारे तिसरे एक पात्र त्यांना चितारावयाचे होते.

नाटकातल्या गोष्टी स्वतःच्या अंगाला चिकटविणारे बाळाभाऊ हे पात्र त्यांनी 'वेड्याच्या बाजारात' रंगविलेले आहेच; पण कादंबऱ्यांमधल्या गोष्टी स्वतःच्या आयुष्याला चिकटविणारे एक पात्र त्यांना चितारावयाचे होते. विड्याची पाने खरेदी करताना दुकानदाराला दिलेल्या पैशाची पावती घेणारे आणि टांगेवाल्याशी भाडे ठरविताना तो करार कोर्टात जाऊन रजिस्टर करून घेणारे एक 'कायदेबाज' पात्र रंगवण्याचा त्यांचा विचार होता, 'लेखकाचे वळसे' या मथळ्याखाली 'सांगावयास नकोच' असे म्हणून सांगितलेल्या गोष्टींचा ते संग्रह करणार होते. याखेरीज त्यांच्या या टिपणातल्या काही नोंदी अत्यंत त्रोटक असल्या तरी त्या वाचून आपणाला हसू कोसळते. मग त्यांचा विनोदी लेखात अधिक विस्तार झाला असता तर आपल्या हसून हसून मुरकुंड्या वळल्या असत्या हे काय सांगावयास हवे ?

उदाहरणार्थ उंटाला शिंगे न देण्याचे कारण. ढेकूण मारण्याची युक्ती. एका बाईच्या कपाळावर कुंकू लावताच नायटा होणे. अनुस्वारावरून लग्न मोडणे. (शत्रू चालून आले तरी ते भांडण चालूच ठेवणे), देवी आलेल्या बाईने फोटो काढण्यासाठी फोटोग्राफरकडे जाणे. द्रौपदीने 'नाव' घेताना समुच्चयवाचक नाम उच्चारणे. परीक्षेच्या वेळी परसाकडे लागल्यास काय करणे ? म्हशीसारखी बायको मिळाल्यामुळे एका मित्राने कडबा भेट पाठविणे. मिशा नसलेल्या मुलांसाठी मिशा असलेल्या मुली शोधणे. इ. ह्या एकापेक्षाही एक विचित्र आणि अद्‌भुत कल्पना पाहिल्या म्हणजे गडकऱ्यांच्या डोक्यात रोजच्या रोज किती वेगवेगळ्या विचारांचे मंथन चालत असले पाहिजे याची कल्पना येते.

आपल्या विनोदाचा मालमसाला आपल्या दैनंदिन अनुभवातून ते गोळा करीत असत. त्यासाठी लागणारी भेदक अवलोकनशक्ती त्यांच्याजवळ होती. गोव्यात

पुष्कळ लोक जाऊन आले असतील. पण 'गोव्यात दिवसा पोर्तुगीजांचा अंमल असतो आणि रात्री दारूचा अंमल असतो' किंवा 'म्हापशात संध्याकाळी सर्वच लोक माधवराव रानड्यांप्रमाणे जडवाणीने बोलतात' असल्या विनोदी चिजा गोव्यामधून फक्त गडकरीच घेऊन आले. त्यांना भेटावयाला येणाऱ्या निरनिराळ्या लोकांच्या बोलण्याच्या आणि अंगविक्षेपाच्या सर्व खोडी ते अत्यंत बारकाईने लक्षात ठेवीत. 'डोळे मिचकावणे, कोपरखळी देणे, मधेच थुंकणे, रस्त्यात बोलताना जोडा काढून ठेवणे, दुसऱ्याला खुलविण्यासाठी खाली पाहून हात चोळीत स्तुतिपर बोलणे, मधेच हा: हा: करीत स्तुती करणे, अहंमन्यासारखे अडखळत, विसरत बोलणे, बोलत असताना ऐकणाऱ्याच्या छातीवर टिचक्या मारणे,' असे अनेक प्रकार त्यांनी या टिपणात नोंदून ठेवले आहेत.

गडी किती प्रकारचे असतात ह्याचेदेखील त्यांनी अवलोकन करून ठेवलेले आहे. बिछाना घालून निजणारा गडी, शालजोडी पांघरून निजणारा गडी, धन्याचे कपडे घालून जाणारा गडी. हे गड्याचे विचित्र नमुने त्यांना बहुधा 'किर्लोस्कर नाटक मंडळी'त पाहावयास मिळालेले असतील. गडकऱ्यांच्या 'स्मरणार्थ टिपणा'त आणखी पुष्कळच गमती आहेत. पण सर्वांचाच साकल्याने विचार करण्याची आवश्यकता नाही. गडकऱ्यांच्या दैनंदिन चिंतनाचा आणि मनाचा आलेख ह्या विविध टिपणातील स्फुट आणि त्रुटित नोंदींवरून वाचकांच्या डोळ्यांपुढे अगदी स्पष्टपणे उभा राहील आणि त्यावरून गडकऱ्यांच्या सृजनशील अंतरंगामधल्या घडामोडींचे त्यांना यथार्थ आकलन होईल अशी आमची खात्री आहे.

आता गडकऱ्यांच्या 'रोजनिशी'चा विचार करू. १९१६ सालातील १३ मे पासून तो २१ सप्टेंबरपर्यंतचा चार महिन्याच्या काळातील नोंदी तिच्यात सापडतील. गडकरी नियमितपणे रोजनिशा ठेवीत असत असे मला वाटत नाही. ह्याच कालखंडामधे तीनचार महिने त्यांनी रोजनिशी का ठेविली हे कळत नाही. यावेळी गडकऱ्यांचा मुक्काम मुंबईत होता. तेथे किर्लोस्कर मंडळीत त्यांच्या 'पुण्यप्रभाव' नाटकाच्या तालमी चालू होत्या. आणि हिराबाई पेडणेकर ह्यांच्याकडून चाली घेऊन ते पदे रचित होते. हिराबाई पेडणेकर ह्यांची थोडीशी माहिती देणे येथे जरूर आहे. त्या गोमंतकीय असून सुस्वरूप आणि उत्तम गाणाऱ्या होत्या. त्यांचे शिक्षण जरी फारसे झाले नसले तरी त्या सुसंस्कृत होत्या, त्यांनी लिहिलेले 'दामिनी' हे नाटक केशवराव भोसले यांच्या 'ललितकलादर्श'नाटक मंडळीने रंगभूमीवर आणले होते. किर्लोस्कर मंडळीसाठीही त्यांनी एक नाटक लिहिले होते. पण ते रंगभूमीवर येऊ शकले नाही. त्या वेळचे सुप्रसिद्ध नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, नरसिंह चिंतामण केळकर, आणि राम गणेश गडकरी ह्यांचे त्यांच्याकडे पुष्कळ जाणंयेणं असे.

ह्या कालखंडात गडकऱ्यांची प्रकृती ज्वरामुळे फारच बिघडली होती. १०३ ते

१०४ डिग्रीपर्यंत त्यांना ताप येत होता. त्यामुळे देवी येतात की काय असा संशयसुद्धा त्यांना आलेला होता. पण तो खोटा ठरला. अशा आजारी स्थितीतसुद्धा पदे रचण्याचे त्यांचे काम चालूच होते. गडकऱ्यांच्या आर्थिक हलाखीचे चित्र ह्या रोजनिशीतल्या नोंदीवरून चांगलेच डोळ्यापुढे उभे राहते. 'पुण्यप्रभावा'च्या संगीत प्रयोगाच्या परवानगीबद्दल किर्लोस्कर मंडळींशी जरी त्यांचा रु. १०००।–– चा करारनामा झाला असला किंवा त्यांच्या गद्याची मोनापली 'महाराष्ट्र नाटक मंडळी'ने रु. ७४० ला घेतली तरी त्यांच्या हातात ज्या रीतीने ह्या कंपन्यांकडून पैसे पडत होते ती पाहिली म्हणजे गडकऱ्यांची कीव वाटते. साडेसातशाचा कागद झाल्यानंतर 'महाराष्ट्र मंडळी' ने गडकऱ्यांना निदान रु. २०० आणि रु. ५० असे अडीचशे रुपये दिले. पण किर्लोस्कर नाटक मंडळीच्या शंकरराव मुजुमदारांनी एक हजाराचा करारनामा करून कुठं आज दहा, उद्या पाच, परवा पाच, तेरवा दोन अन् आणखी एकदा तेरा असे चार महिन्यात अवघे पस्तीस रुपयेच त्यांच्या हातावर टिकविले. यामुळं गडकऱ्यांना एका रुपयापासून उसनवारी करावी लागे. 'मामाकडून नावे एक रुपया घेतला' अन 'वामनचा एक रुपया दिला' ह्या नोंदी काय सांगतात ?

श्री. मामा वरेरकर ह्यांच्याकडून गडकऱ्यांनी १ मे १९१४ ला रु. १२० चार रुपये शेकडा व्याजाने प्रॉमिसरी नोटवर कर्ज काढले होते. (त्या प्रॉमिसरी नोटेचा फोटो या पुस्तकात दिलेला आहे.) त्या कर्जाच्या फेडीच्या पोटी २६ जून रोजी गडकरी ह्यांनी त्यांना रु. ३५ दिलेले आहेत. घरखर्चासाठी आपले बंधू मंजुवाळ ह्यांना त्यांनी चाळीस रुपये पाठविले आणि घरमालक भाऊसाहेब सिन्नरकर ह्यांना तीन महिन्यांचे थकलेले घरभाडे रु. ७५ तारेने धाडले. या चार महिन्यांचा एकंदर जमाखर्च करता गडकऱ्यांच्या जवळ अदमासे शंभर रुपये शिल्लक राहतात. म्हणजे महिन्याचे पंचवीस रुपये स्वतःच्या औषधासाठी, फळासाठी आणि इतर खर्चासाठी त्यांना राहू शकतात. यावरून गडकऱ्यांच्या एकंदर ओढगस्तीच्या जीवनाची कल्पना येऊ शकेल.

या रोजनिशीमध्ये निरनिराळ्या नावांचा जो उल्लेख आहे त्यावरून गडकऱ्यांच्या आप्तांच्या नि मित्रांच्या गोतावळ्याचे स्वरूप ध्यानी येईल. गं. भा. मातोश्री, श्री. कृ. कोल्हटकर आणि वि. सी. गुर्जर ह्यांच्याबद्दल त्यांना किती आदर वाटत होता त्याची त्यावरून कल्पना येईल. 'मंजु' हा त्यांचा धाकटा भाऊ शंकर गणेश आणि 'बन्या' म्हणजे श्री. नरहर गणेश कमतनूरकर. 'पांडू' बापट हा त्यांचा आश्रित मुलगा होता.

गडकऱ्यांची उपलब्ध झालेली काही पत्रे शेवटच्या प्रकरणात संग्रहित केलेली आहेत, त्यावरून त्यांच्या चरित्रातल्या काही गोष्टींवर आणि स्नेहसंबंधावर प्रकाश पडतो.

१० नोव्हेंबर १९०८ साली गडकऱ्यांनी नटश्रेष्ठ गणपतराव बोडस ह्यांना खामगावहून जे पत्र लिहिले आहे त्यावेळी ते तेवीस वर्षांचे होते. तथापि, त्या वयातही

ते किती लहरी होते आणि त्यांची विनोदबुद्धी किती तल्लख होती, हे दिसून येते. किर्लोस्कर कंपनीत ते तत्पूर्वी सतत तीन वर्षे मुलांचे शिक्षक होते. पण कंपनीचे मॅनेजर शंकर बापूजी मुजुमदार ह्यांच्याशी एक दिवस त्यांची कोणत्या तरी कारणावरून कुरबुर होताच आपला तीन वर्षांचा कंपनीबरोबरचा संबंध ताडकन तोडून ते जे निघाले ते वऱ्हाडातल्या बाळापूर नावाच्या एका कुग्रामात जाऊन तेथल्या एका शाळेत त्यांनी मास्तरकी पत्करली. किर्लोस्कर कंपनीत तीन वर्षे अत्यंत सुखाने काढल्यानंतर कंपनी सोडताना त्यांच्या अंतःकरणाला किती यातना झाल्या त्याचे वर्णन त्यांनी त्या पत्रात जे केलेले आहे की, 'घरून निघाल्यापासून कल्याणपर्यंत मी सारखा अक्षरशः रडत होतो व हल्लीही दोन दिवस मधूनमधून तोच उपक्रम चालू आहे' ते अत्यंत हृदयद्रावक आहे. तथापि, तशाही परिस्थितीत त्यांची विनोदबुद्धी शाबुत आहे हे पाहून नवल वाटते.

ते लिहितात, 'सदासर्वदा कोट्या करीत बसणारा मी सध्या या दोन दिवसातच एक चांगला पोक्त व विचारी म्हातारा झालो आहे. बाळापूर एक दृष्टमणी म्हणविण्याजोगे गाव आहे. लोकवस्ती, राहणी, सोयी वगैरे बाबतीत ते वनवासाला खात्रीने मागे हटवील. लो. टिळकांना सहा वर्षे काळेपाण्यावर पाठविण्याच्या भानगडीत सरकार का पडले हे कळत नाही. बाळापूरच्या शाळेत त्यांना मास्तरकी करायला लावून त्यांची खोड सहज मोडता आली असती.' हा विनोद करता करता आपण किर्लोस्कर कंपनी सोडून आता बाळापूरला येणे म्हणजे काळ्यापाण्याच्या शिक्षेचाच अनुभव घेण्यासारखे आहे असे जे त्यांनी मार्मिकपणे सुचविले आहे त्यावरून त्या कंपनीवर त्यांचे केवढे अपरंपार प्रेम होते हे दिसून येते.

बाळापूरची त्यांची मास्तरकी दोन आठवड्यांच्या आतच संपुष्टात आली असावी असे दिसते. कारण, त्यानंतर पंधरा दिवसांनी नटश्रेष्ठ बोडसांनी जे दुसरे पत्र नागपुराहून लिहिले आहे त्यात 'अजून मी नोकरीचे ठरविले नाही. चारपाच ठिकाणी प्रयत्न करीत आहे... आज एक शिकवणी आली आहे. मॅट्रिकमधील एका मुलास तासभर शिकवायचे आहे,' असे लिहिले आहे. किर्लोस्कर कंपनी जरी गडकऱ्यांनी सोडली होती तरी त्यांचे मन कंपनीच्या वातावरणात कसे घुटमळत होते, ते ह्या पत्रावरून चांगलेच दिसून येते. कंपनीमधले आपले प्रियमित्र पांडोबा (क्षीरसागर) आणि राजाराम (कडू) ह्यांच्या आठवणींचे त्यांना राहून राहून उमाळे येत होते.

त्यावेळचे एक सुप्रसिद्ध लेखक आप्पाजी विष्णु कुळकर्णी हे किर्लोस्कर कंपनीसाठी एक नाटक लिहीत होते. खेरीज श्रीमती हिराबाई पेडणेकर ह्यांचे 'दामिनी' नाटक बसवण्याचा कंपनी विचार करीत होती. स्वतः गडकरीही त्याचवेळी प्रल्हाद चरित्रावर 'गर्वनिर्वाण' हे नाटक लिहीत होते, किर्लोस्कर कंपनी सोडल्यानंतरही त्यांचे नाट्यलेखन चालूच होते. त्यासंबंधी त्या पत्रात ते लिहितात की, 'काही

अनिवार्य कारणामुळे संविधानकात बराच फेरफार करून तीन अंकांचे पाच अंक करावे लागले. सध्या रोज नाटकच लिहीत असतो. थोडा उशीर लागला तरी हरकत नाही. परंतु, त्यात फारसे दोष राहू नयेत अशी माझी इच्छा आहे. बहुतेककरून डिसेंबर दहा तारखेच्या सुमारास मी नाटक पाठवून देईन किंवा स्वत: घेऊन येईन. आटोपशीर प्रवेश कसे लिहावेत हेच अजून कळत नाही, त्यामुळे अतिशय त्रास होतो.' किर्लोस्कर मंडळीतून गडकरी एखादा झटका आल्याप्रमाणे अचानकपणे निघून गेले म्हणून शंकरराव मुजुमदार त्यांच्यावर खूपच चिडलेले होते. त्याचाही उल्लेख ह्या पत्रात आहे, 'ती. रा. रा. शंकररावजी आमच्यावर बरेच रागावल्यासारखे दिसतात.' तथापि, शंकररावांच्या रागाला भीक घालण्याइतके गडकरी काही भेदरट नव्हते. उलट, १९ जून १९०९ रोजी त्यानी शंकररावांना जे पत्र लिहिले आहे, त्यात गडकऱ्यांनी त्यांना चांगलेच चिमटे घेतले आहेत.

असे दिसते की, गडकरी कंपनीतून निघून गेल्यानंतर त्यांच्या तेथे राहिलेल्या सामानाची शंकररावांनी परस्पर विल्हेवाट लावली असावी. त्यामुळे चिडून जाऊन गडकऱ्यांनी शंकररावांना त्या पत्रात अगदी सुरुवातीलाच टोमणा मारला आहे की 'तुम्ही माझे सामान फेकून दिले, तशा माझ्या नाटकाच्या वह्या फेकून दिल्या असत्या म्हणजे तुम्ही सुटला असता अन् मीही मोकळा झालो असतो.' एवढेच लिहून गडकरी थांबले नाहीत तर शंकररावांना चिडवण्यासाठी आपल्या नाटकाच्या वह्या मागून आणण्यासाठी 'चि. बाबूस' (बाबूराव देशपांडे वारककर) ह्यांना त्यांच्याकडे मुद्दाम पाठविले. तसे करतानासुद्धा शंकररावांना चिमटा काढण्यास ते विसरले नाहीत– 'पुन्हा पुन्हा माझ्या अप्रत्यक्ष दर्शनाने आपणास राग येणार हे खास; तथापि तोडून टाकलेले पालीचे शेपूट काही काळ हालत असते या निसर्गनियमाकडे लक्ष देऊन आपण माझ्या पुरस्सरतेची एकवार क्षमा करालच अशी आशा आहे.'

गडकऱ्यांच्या आणि मुजुमदारांच्या 'भांडणा'चे हे नाटक जवळजवळ दीडवर्ष चालले होते. त्याला मी 'नाटक' म्हणतो एवढ्यासाठी की, दोघांनाही एकमेकांबद्दल विलक्षण ओढ वाटत होती. पण बाहेरून पडते घेण्याची मात्र त्यांच्यापैकी कोणाचीही तयारी नव्हती. १९१० च्या मार्च महिन्यात नाटकाची पदे करण्याच्या निमित्ताने गडकरी पुन्हा काही दिवस किर्लोस्कर कंपनीत येऊन राहिले होते. तरीदेखील 'कंपनी सोडण्याचा आपला निर्धार कायमचा आहे, त्यात काही बदल होणार नाही!' अशा धमक्या ते शंकररावांना देतच होते, तथापि शंकररावांबद्दल त्यांच्या मनातली अढी हळूहळू विरघळत चालली होती असे दिसते. कारण, शंकररावांना लिहिलेल्या पहिल्या पत्राच्या खाली त्यांनी 'आपला' असे लिहिले होते. पण त्यानंतर पुढे लिहिलेल्या पत्रात 'आपला कृपाभिलाषी' असा मायना त्यांनी बदललेला आहे.

'गर्वनिर्वाण' नाटकामधले नवीन लिहावयाचे असे काही राहिले नाही असे

जरी गडकऱ्यांनी त्या पत्रात लिहिले असले तरी ' गर्वनिर्वाण ' ह्या नाटकाचे पहिले तीनच अंक त्यांनी लिहून पूर्ण केले होते. तथापि, त्या नाटकाचे मूळ हस्तलिखित शंकरराव मुजुमदारांचे सामान सोलापुराहून पुण्याला येत असता आगगाडीतून गहाळ झाले, त्यात गायब झाले. तेव्हा केवळ स्मरण सामर्थ्याच्या आधारावर गडकऱ्यांनी ते पुन्हा पहिल्यापासून लिहून काढले असे म्हणतात.

तथापि, ' प्रेमसंन्यास ' नाटक जेव्हा रंगभूमीवर आले आणि गडकऱ्यांचा सर्वत्र बोलबाला होऊ लागला तेव्हा शंकररावांचा त्यांच्याबद्दलचा राग अजिबात नाहीसा झाला. त्यांनी गडकऱ्यांना अगत्यपूर्वक पत्र लिहून त्यांचे अभिनंदन केले आणि ' प्रेमसंन्यास ' नाटकात कोणकोणत्या सुधारणा कराव्यात ते आपलेपणाने सुचविले. ह्याच सुमारास किर्लोस्कर कंपनीचे मालक आणि नामवंत गायक नट श्री. नानासाहेब जोगळेकर मरण पावले आणि त्यानंतर शंकरराव मुजुमदारांचा समावेश कंपनीच्या मालकांमध्ये करण्यात आला. बळवंतराव पेठे कंपनीचे 'सेक्रेटरी' झाले. नवीन नवीन नटांचा कंपनीत भरणा करण्यात आला. ह्या सर्व गोष्टींबद्दल गडकऱ्यांनी शंकररावांना तपशीलवार पत्र लिहून त्यात त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. शंकररावांच्या नि गडकऱ्यांच्या लोभात हे जे दीड वर्षपर्यंत वितुष्ट आले होते, ते ' प्रेमसंन्यास ' नाटकानंतर वितळले.

पुढे काही दिवसांनी किर्लोस्कर मंडळींवर एक गंडांतर आले. बालगंधर्व, बोडस आणि टेंबे ही मंडळी फुटून बाहेर पडली आणि त्यांनी ' गंधर्व मंडळी ' स्थापन केली. त्याबरोबर किर्लोस्कर कंपनीबद्दलच्या जुन्या प्रेमाचा गडकऱ्यांना जबरदस्त झटका आला. ते शंकररावांना म्हणाले, ' तुम्ही काही काळजी करू नका. मी माझ्या लेखणीच्या सामर्थ्यावर किर्लोस्कर मंडळीचा डोलारा कोसळू देत नाही. आणि गंधर्व मंडळीला अशी अद्दल घडवतो की, नाक घाशीत ते लोक तुमच्याकडे येतील ! ' लागलेच किर्लोस्कर मंडळीत येऊन गडकऱ्यांनी आपले ठाण मांडले आणि ' पुण्यप्रभाव ' नाटक लिहावयास ताबडतोब प्रारंभ केला. त्या नाटकाच्या पोटी शंकररावांनी त्यांना रु. १२० विसारसुद्धा देऊन टाकला.

शंकररावांचे नि गडकऱ्यांचे संबंध ह्या काळात किती आत्मीयत्वाचे असले पाहिजेत हे सांगण्याची आवश्यकता नाही. तथापि अशाही परिस्थितीत कंपनीचा मुक्काम गोव्याला असताना एक दिवस काहीतरी कारणावरून त्या दोघांचा खटका उडाला. त्याबरोबर मालवणला जाऊन मामा वरेरकरांकडून ' प्रामिसरी नोट ' वर एकशेवीस रुपये कर्ज गडकऱ्यांनी काढले आणि शंकररावांच्या तोंडावर ती रक्कम फेकून अन अर्ध्यामुर्ध्या लिहिलेल्या ' पुण्यप्रभावा 'च्या वह्या काखोटीला मारून त्यांनी किर्लोस्कर कंपनीमधून पुन्हा एकदा जो पळ काढला ते थेट पुणे गाठले.

त्यानंतर ते नाटक कोणाला द्यायचे हा प्रश्न दत्त म्हणून उभा राहिला. त्याचा

परिणाम असा झाला की, १ मे १९१४ ला ते नाटक पुढे लिहावयाचे काम गडकऱ्यांनी जे थांबवले, त्याला जवळजवळ एक वर्षभर त्यांनी मुळी हातच लावला नाही. ते नाटक 'गंधर्व मडळी' ने बसविण्याचे जेव्हा मान्य केले, तेव्हा मग पंधरा सालच्या मे महिन्यात नाटकाचा अपूर्ण भाग लिहावयास त्यांनी हाती घेतला.

पांडु बापटाला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, 'इतके दिवस नाटक लिहिण्यासंबंधी जो तंटाबखेडा चालला होता, तो काल रोजी साफ मिटून नाटक लिहावयाचे ठरले. मी वह्या नेण्यासाठी उद्यापरवा येईन. तूर्त येथेच लिहावयास सुरुवात केली आहे. नाटकाचे काही निश्चित न ठरल्यामुळे आतापर्यंत मी फार फिकीरीत होतो.' विठ्ठल सिताराम गुर्जरांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, 'पुण्यप्रभाव नाटक दोनतीन महिन्याखाली लिहून झाले आहे. नाटक वाटाघाटी होऊन अखेर गंधर्व नाटक मंडळीस देण्याचे ठरविले आहे. पदे अजून झाली नाहीत. नाटक बाहेर पडण्यास पाच सहा महिने लागतीलसे वाटते.'

पण एवढे सगळे 'रामायण' घडून अखेर शेवटी 'पुण्यप्रभाव' हे नाटक 'किर्लोस्कर नाटक मंडळी' च्याच रंगभूमीवर १ जुलै १९१६ रोजी मुंबई येथे आले. कोणत्या वेळी गडकऱ्यांची काय लहर फिरेल ह्याचा शंकररावांना पुरता अनुभव असल्याने त्यांनी नाटकाच्या प्रयोगाची 'मोनॉपली' न घेता एक हजार रुपयांना नुसती परवानगी घेतली. प्रारंभीचे 'पुण्यप्रभावा' चे प्रयोग जे अत्यंत सामान्य वठले आणि नाटक सपशेल पडते आहे की काय अशी भीती निर्माण झाली त्यालाही कारण गडकऱ्यांचाच हा चमत्कारिक स्वभाव. कारण, कोणत्याही वेळी गडकरी नाटकाच्या वह्या काखोटीला मारून धूम ठोकतील ह्याचा नेम नसल्याने, नाटक बसवण्याच्या कामी नटवर्गाचे मुळी लक्षच नव्हते.

नाटककार म्हणून गडकऱ्यांची कीर्ती सुप्रतिष्ठित झाल्यानंतर, त्यांचा मूळचा लहरी स्वभाव जास्तच एककल्ली आणि हेकट बनला. नाटक कंपनीच्या बिऱ्हाडी त्यांचा मुक्काम असला म्हणजे जणु काही त्यांच्या अंगात तिस्मारखानाचा संचार होत असे. एकदा उशीरा चहा आला म्हणून चिडून जाऊन त्यांनी किर्लोस्कर नाटक गृहाच्या तिसऱ्या मजल्यावरून चहाची किटली आणि कपबशी खाली भिरकाऊन दिली होती. त्यांच्या अंगी वसत असलेल्या अलौकिक गुणांची नाटक कंपनीच्या मालकांना जाणीव असल्यामुळेच त्यांनीच त्यांना शेवटपर्यंत सांभाळून घेतले होते. ५ ऑगस्ट १९१६ रोजी रात्री 'रिपन थिएटरा'त 'तो' प्रकार घडला तरी त्याबद्दल शंकररावांनी एक चकार शब्ददेखील तोंडून काढला नाही. उलट तो 'अपराध' त्यांनी पोटात घातला. म्हणूनच कृतज्ञतेच्या भावनेने भारावून जाऊन गडकऱ्यांनी आपल्या रोजनिशीत दुसऱ्या दिवशी नोंद केलेली आहे. 'Mr. S. B. Mujumdar proved to be more than a father.'

गडकऱ्यांनी आपले पहिले नाटक 'प्रेमसंन्यास' हे आपले नाट्यगुरू श्रीपाद कृष्ण

ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर यांना अर्पण केल्यापासून उभयतांचा एकमेकांशी जो पत्रव्यवहार सुरू झाला तो अगदी अखेरपर्यंत चालू होता. या पत्रव्यवहाराचे वैशिष्टय हे की शिष्यापेक्षा गुरूलाच त्याच्याविषयी अधिक आदर आणि अगत्य वाटत होते. १० नोव्हेंबर १९१२ चे तात्यांचे पहिले पत्र पाहा. गुरूने शिष्याला 'साष्टांग नमस्कार' घालून त्यांच्या प्रकृतीची आणि विद्यालयीन प्रगतीची इतक्या आस्थेवाईकपणे चौकशी केली आहे की, जणू काही गडकऱ्यांच्या कुटुंबामधले अगदी जिव्हाळ्याचे ते आप्त होते, 'परीक्षा व आरोग्य यांपैकी एकच जर साध्य असेल तर आरोग्यच इष्ट आहे' हा तात्यांचा सुभाषितवजा उपदेश अत्यंत हृद्य आहे.

गडकऱ्यांनी आपल्या नाटकातील काही वाक्यांची काटछाट करण्याबाबत तात्यांना विनंती केली असता त्यांनी जे उत्तर दिले आहे ते मोठे मार्मिक आहे. 'कर्त्याने दुसरीकडून छाटाछाट करण्यापेक्षा स्वतःच करणे पुष्कळ बरे. मला स्वतःच्या नाटकातील एक वाक्य काढणे जिवावर जाते. आपल्या नाटकातील अश्लील परंतु चटकदार वाक्ये काढणे तर फार कठीण जाईल. परहत्येपेक्षा आत्महत्या शतपटीने पुरवते.' 'प्रेमसंन्यास' नाटकात काही वाक्ये 'अश्लील आणि चटकदार' असल्याचा तात्यांनी आपल्या पत्रात उल्लेख केलेला पाहून आश्चर्य वाटते. कारण, गडकऱ्यांवर अश्लीलतेचा आरोप केवळ कधीमधी त्यांच्या विरोधकांनीच केलेला होता. अश्लील म्हणजे वाजवीपेक्षा अधिक शृंगारिक असा अर्थ कदाचित तात्यांच्या मनात त्या वेळी अभिप्रेत असावा. कारण, तसली 'अश्लिलता' तात्यांच्या नाटकातही आढळून येते.

'प्रेमसंन्यास' नाटकाचे हस्तलिखित वाचून तात्यांनी त्यामध्ये ज्या सुधारणा सुचविल्या त्या अत्यंत मार्मिक आहेत. अर्थात या सुधारणा कथानकातील काही प्रसंगांना अनुलक्षून आहेत. ह्या सुधारणा अंमलात आणल्यावर मग आपण त्यात भाषिक छाटाछाट काय करावयाची ते सुचवू असे तात्यांनी आपल्या पत्रात त्यांना कळविले. पण गुरूनी केलेल्या या सर्व सूचना शिष्याने शिक्यावर टांगून ठेवल्या. उलट त्यानंतर दोन वर्षांनी तात्यांनी आपले 'वधूपरीक्षा' नाटक जेव्हा गडकऱ्यांकडे अभिप्रायाला पाठविले, तेव्हा शिष्याने आपल्या गुरूची थोडक्याच शब्दात अशी काही टर उडविली आहे की त्याच्या धाष्टर्याचे नवल वाटते.

शिष्योत्तम लिहितात की, 'पुस्तकाचे बहिरंग इतके सुंदर साधले आहे की प्रथम हे एखादे इंग्रजी पुस्तक आहे असा भास होतो. आजवर आपल्या नाटकातील इंग्रजी वळणाविचारांची वाक्ये वाचतानाच काय तो असा ग्रह होत असे. वधूपरीक्षेच्या बाबतीत बहिरंगापासूनच या ग्रहाचा जन्म होतो.' ह्या नाटकाच्या प्रस्तावनेत आभाराच्या यादीत आपले नाव तात्यांनी घातलेले पाहून गडकऱ्यांनी त्यांना जो कोटीबाज टोमणा मारला आहे तोही वाचण्यासारखा आहे. 'प्रस्तुत पुस्तकात मी आपणास कोणते साहाय्य केले ते मला माझ्या पूर्वसंचिताइतकेच अज्ञात आहे. या

आपल्या विनोदपूर्ण चमत्कारापुढं नाटकातील सारे चमत्कार नित्यव्यवसायाइतकेच साधे वाटल्यावाचून राहणार नाहीत.'

स्वत: गडकऱ्यांनी ' पुण्यप्रभावा 'च्या प्रस्तावनेत ज्या मित्रांचे आभार मानले आहेत त्यांनाही अशाच अर्थाचा प्रश्न गडकऱ्यांना विचारता आला असता. पण तेवढा कोटीबाजपणा त्यांच्याजवळ कोठून असणार? कोल्हटकरांनी जेव्हा ' सहचारिणी ' नाटक लिहिले तेव्हा गडकऱ्यांनी त्यांची अशीच थट्टा केलेली मला आठवते. गडकरी तात्यांना म्हणाले, ' तात्या, प्रेमसंन्यास नाटक जेव्हा मी तुमच्या पायांवर अर्पण केले, तेव्हा त्या नाटकातले माझे दोषही मी तुमच्या पायांवर अर्पण केले. असे असता ते सारे दोष तुमच्या पायांपासून डोक्यापर्यंत वर कसे चढत गेले काही कळत नाही!' आपल्या गुरूंची गडकरी अशी पुष्कळ वेळा निर्दय थट्टा करीत असत. पण तिचा जन्म अनादराच्या पोटी होत नव्हता, कोटीबाजपणाचा त्यांना एवढा अनावर हव्यास होता की, त्या ओघात कोण खर्ची पडते आहे ह्याचा सारासार विचार करण्याचे त्यांना भान राहत नसे.

तथापि, गडकऱ्यांच्या कोटीबाज मस्करीला तितकेच प्रत्युत्तर देण्याचे सामर्थ्य असूनही कोल्हटकरांनी तसा प्रयत्न कधी केलेला नाही. ' वधूपरीक्षा ' नाटकाची गडकऱ्यांनी आपल्या पत्रात एवढी टर उडवली, पण कोल्हटकरांनी त्याला अवघ्या एकाच वाक्यात उत्तर दिले. ' आपणास त्या पुस्तकाचे बाह्यांगच का होईना आवडल्याचे वाचून आनंद झाला.' ह्या विनीत वाक्यातला गर्भित टोमणा गडकऱ्यांच्या प्रकट मस्करीपेक्षाही जास्त खोचक आहे, तो जाणत्यांच्याच लक्षात येईल.

' प्रेमसंन्यास ' नाटकाप्रमाणे ' पुण्यप्रभावा 'चे ही हस्तलिखित गडकऱ्यांनी तात्यांकडे अभिप्रायासाठी पाठविले होते. पण त्या नाटकात कोणताही फेरफार आपण करणार नाही असे अगाऊच गडकऱ्यांनी त्यांना बजावून सांगितले होते. त्यावर तात्यांनी त्यांना मोठ्या अजीजीने विचारले की, ' एकदोन अश्लील वाक्यें काढण्यास काही हरकत आहे का? तीसुद्धा राहू देण्याविषयी आपला आग्रह असला तर ती ठेवणे भाग आहे.' गडकऱ्यांविषयी तात्यांना वाटणारी ही आस्था मनाला चटका लावणारी आहे. तथापि त्याची जाणीव गडकऱ्यांनी आपल्या गुरूला लिहिलेल्या एखादया पत्रातही प्रकट केलेली मात्र दिसत नाही.

गडकऱ्यांविषयी कोल्हटकरांना किती आदर वाटत होता त्याचे दुसरे एक उदाहरण म्हणजे आपल्या ' वीरतनय ' आणि ' मूकनायक ' नाटकाच्या नवीन आवृत्यांना त्यांनी गडकऱ्यांचे प्रास्ताविक निबंध आणि अर्थबोधक टीपा जोडावयाचे ठरविले होते, तथापि गडकऱ्यांचा आळशी स्वभाव त्यांना माहीत असल्याने आणि कबूल केलेले काम त्यांच्याकडून वेळेवर मिळणार नाही याची खात्री असल्याने, त्यांनी त्यावर अशी तोड काढली की, ' मतिविकार ' नाटक हे ' मूकनायक ' अन् ' वीरतनय ' यांच्यामागून काही कालावधीनंतर प्रसिद्ध होणार असल्याने त्याच

नाटकाला गडकऱ्यांच्या टीपा आणि निबंध जोडलेले अधिक सोयीस्कर. त्याबाबत गडकऱ्यांना लिहिताना ते म्हणतात, 'मतिविकार नाटक आपले सर्वात आवडते असल्यामुळे ही योजना आपणास आवडेल असे वाटते. शिवाय ते नाटक लोकप्रिय नसल्यामुळे ते अन्यथा खपेल त्यापेक्षा आपल्या निबंधाच्या योगाने अधिक खपेलही.' आपल्या लाडक्या आणि अवखळ पोराच्या चापटचा हसत हसत सहन करून एखादा प्रेमळ पिता वात्सल्याने त्याला जसे आपल्या डोक्यावर उचलून घेतो, त्या जातीचे तात्यांचे हे सौजन्य वाटते.

तात्यांचे गडकऱ्यांवर विलक्षण प्रेम होते ह्यात काही शंका नाही. त्यांच्या प्रकृतीची चौकशी आपल्या प्रत्येक पत्रातून अगत्याने त्यांनी केली नाही असे कधीच झाले नाही. गडकऱ्यांचे पत्र आले की त्यांना अतिशय आनंद होत असे. तथापि; 'नादुरुस्त प्रकृती असताना आपण पत्र लिहिण्याचे श्रम घेऊ नयेत, तिकडून येणाऱ्या मंडळींकडून मी आपले कुशल जाणून घेईन.' असे तात्यांनी त्यांना बजावून सांगितले होते. गडकऱ्यांनी आपली प्रकृती प्रथम सांभाळावी, नंतर महाविद्यालयातील आपले शिक्षण पूर्ण करून पदवीधर व्हावे, मग तेवढ्यासाठी काही दिवस लेखन-व्यवसाय त्यांनी बंद ठेवला तरी चालेल, असे तात्यांना अगदी मनापासून वाटे.

१९०८ साली गडकरी किर्लोस्कर कंपनी सोडून जेव्हा बाळापूरला पळाले, तेव्हा तेथून ते तडक खामगावला कोल्हटकरांच्याकडे गेले; गडकऱ्यांच्या त्यावेळच्या मानसिक अवस्थेत जर तात्यांनी त्यांना धीर देऊन ताळ्यावर आणले नसते, तर गडकरी कोठल्या कोठे वाहवत गेले असते. तेव्हापासून गडकऱ्यांनी अधून मधून आपल्याकडे येऊन राहावे अशी तात्यांना उत्कट इच्छा होती. गडकरी त्यांना 'आज येतो, उद्या येतो' अशी आश्वासने देत. पण त्यांच्या लहरी स्वभावामुळे त्या आश्वासनांची पूर्ती कधीच होत नसे. म्हणून कित्येकदा कोल्हटकर आपल्या पत्राच्या दोन प्रती करून त्यातील एक प्रत पुण्याच्या पत्त्यावर अन् दुसरी प्रत नाटक मंडळीच्या पत्त्यावर पाठवीत असत. त्याचा उल्लेख एका पत्रात तात्यांनी केला आहे. 'पुण्याहून निघण्याचे आपले बेत पुष्कळदा सिद्धीस जात नाहीत, असा अनुभव असल्यामुळे या पत्राची एक नक्कल आपल्या पुण्याच्या पत्त्यावर पाठवीत आहे.'

१९१८ साली प्रकृती ठीक नसतानाही गडकऱ्यांनी 'भावबंधन' नाटक लिहून पूर्ण केले, एवढेच नव्हे तर ते सुंदर वठले ही बातमी ऐकून तात्यांना अतिशय आनंद झाला. त्यांनी गडकऱ्यांना ताबडतोब लिहिले, 'अशी आणखी कितीतरी नाटके आपल्या लेखणीतून बाहेर पडण्याची अपेक्षा आपल्या स्नेह्यांस व मराठी भाषेच्या अभिमान्यांस आहे. स्वतःकरता नाही तर निदान त्यांजकरिता तरी आपल्या प्रकृतीस जपणे आपले कर्तव्य आहे. ते आपण पार पाडावे अशी माझी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे.'

वस्तुतः, कोल्हटकरांचे 'सहचारिणी' नाटक वाचून गडकऱ्यांनी त्यांची टर उड-

वली आणि विनोदी नाटक कसे लिहावयाचे ते मी दाखवितो असा पैजेचा विडा उचलून त्यांनी जे 'भावबंधन' नाटक लिहिले, त्या नाटकाची प्रशंसा ते वाचण्यापूर्वी कोल्हटकरांनी करावी यावरून गडकऱ्यांवर त्यांची किती अनन्यसाधारण भक्ती होती ते दिसून येते.

कोल्हटकरांबद्दल गडकऱ्यांच्या मनात अतीव आदर असूनही त्यांची मस्करी करण्याचा मोह गडकऱ्यांना कधी आवरता आला नाही याचे आश्चर्य वाटते. 'तात्या, ती तलवार एक तुमची बाकी विळे कोणते' असे पराकाष्ठेचे गौरवोद्गार ज्या गडकऱ्यांनी तात्यांच्याबद्दल काढले त्याच गडकऱ्यांनी तात्यांना पुढे धमकी दिली की 'तुमची नाटके चुटकीसरशी मी बुधवारची नाटके करून टाकीन.'

कोल्हटकरांच्या नंतर विठ्ठल सीताराम गुर्जर ह्यांच्याशी गडकऱ्यांचा घनिष्ठ परिचय होता. कथाकार आणि कादंबरीकार म्हणून त्या काळात गुर्जरांनी फार मोठा नावलौकिक मिळविला होता. खेरीज, गडकऱ्यांच्या स्फुट कविता आणि विनोदी लेख ज्या 'मासिक मनोरंजन' मध्ये त्यावेळी प्रसिद्ध होत होते, त्याचे गुर्जर हे कार्यकारी संपादक होते. त्यामुळे गडकऱ्यांचा नि गुर्जरांचा एकसारखा संबंध यायचा. त्याचेच पर्यवसान त्यांच्या दाट मैत्रीत झाले. गडकरी त्यांना आपल्या वडीलबंधूंसारखे मानीत. गडकऱ्यांचा ज्योतिषावर विश्वास असे. त्याची गुर्जर थट्टा करीत.

त्याबाबत गडकऱ्यांची रोजनिशीत २० जुलै १९१६ ची नोंद आहे. 'गुर्जर माझ्या सुपरस्टिशनला हसतात. अण्णा (म्हणजे गुर्जर) सरळ आहेत. बंधुप्रेमामुळे त्यांना अधिकार हा आहेच. त्यातून वडीलबंधूसारखे. मीच वेडा ठरणे बरे.' 'पुण्यप्रभाव'वर 'इंदुप्रकाशा'त पु. रा. लेल्यांनी झोड उठवली ती वाचून 'अण्णा रागावले, अण्णांच्या समाधानासाठी आता जगानेच मला बरे म्हणायला हवे' अशी नोंद गडकऱ्यांनी आपल्या २२ जुलै १९१६ च्या रोजनिशीत केलेली आढळते. यावरून गुर्जरांना गडकरी किती मानीत असत ते दिसून येते.

गडकऱ्यांच्या इतर पत्रव्यवहारात विशेष महत्त्वाच्या गोष्टी आढळत नाहीत. आतापर्यंत कोणाला माहीत नसलेली अशी एखादी महत्त्वाची किंवा मनोरंजक गोष्ट सापडते. वामन मल्हार जोशांच्या 'रागिणी' कादंबरीला 'प्रस्तावना लिहिण्याचे त्यांनी कबूल केले होते. पण आपल्या जन्मसिद्ध आळसामुळे आपले वचन ते पाळू शकले नाहीत. भास्करराव जाधवांच्या आग्रहावरून देवासच्या तुकोजीराव महाराजांना 'प्रेमसंन्यास' नाटकाचे पुस्तक पाठवून त्यांच्याकडून आर्थिक साहाय्य मिळविण्यासाठी त्यांनी महाराजांचे अत्यंत लाजिरवाणे लांगूलचालन करण्याचा एकदा प्रयत्न केला होता. अर्थात, त्यातून निष्पन्न काहीच झाले नाही.

१९१२ च्या मॅट्रिक परीक्षेत चिंतामणराव देशमुख पहिले आले. त्यावेळी त्यांचे काव्यात्मक 'अभिनंदनपर वर्धापन' जसे गडकऱ्यांनी केले, तसे त्यांना एक इंग्रजीत

पत्र पाठवून त्यांची भेट घेण्याची त्यांनी इच्छा प्रदर्शित केली. पण ही भेट काही होऊ शकली नसावी. गडकऱ्यांच्या ' तोड–ही–माळ ' या नाटकात ' कैलास ' व ' वैकुंठ ' ही दोन विनोदी पात्रे होती. तीच नावे आजचे सुप्रसिद्ध साहित्यिक भाऊसाहेब खांडेकर (त्यावेळी नुसतेच 'भाऊ खांडेकर') ह्यांनी आपल्या एका नाटकात वापरली. तेव्हा गडकऱ्यांचे शिष्य कमतनूरकर ह्यांनी ती नावे त्यांना बदलण्यास सांगितले. पण ती त्यांची विनंती खांडेकरांच्या रानडे नामक एका मित्राने साफ धुडकावून लावली. गडकऱ्यांच्या पत्रव्यवहारातले हे एक लहानसे विनोदी प्रकरण आहे. ते वाचून कोणाचाही गैरसमज होण्याऐवजी करमणूकच होईल. ' ‡

गडकऱ्यांची प्रकृती चौदा सालापासूनच बिघडावयाला सुरुवात झाली होती. पण ती कधी चांगली असे, तर कधी ती एकदम बिघडे. पंधरा सालच्या एप्रिल महिन्यात त्यांची प्रकृती ' फारच चांगली ' होती. पण जुलै आणि ऑगस्ट महिन्यात ते ' फारच आजारी ' होते. तथापि, तशाही परिस्थितीत त्यांनी ' पुण्यप्रभाव ' नाटक लिहून पुरे केले. परंतु ते नाटक रंगभूमीवर यावयास आणखी एक वर्ष लागले. तत्पूर्वी दोन महिने आधी ते ज्वराने अंथरुणाला खिळून होते. सोळा सालच्या मे महिन्यात त्यांच्या तापाचे प्रमाण इतके वाढले होते की, आपल्याला ' देवीचा आजार ' तर होत नाही ना अशी शंकासुद्धा त्यांच्या मनात आली. सतरा साल हे एकच वर्ष असे होते की, ज्यामध्ये गडकऱ्यांची प्रकृती सबंध वर्षभर उत्तम होती. ह्याच वर्षात त्यांनी द्वितीय विवाह केला आणि ' एकच प्याला ' हे नाटक लिहुन पूर्ण केले

अठरा सालच्या एप्रिल महिन्यापासून त्यांना ताप यावयाला प्रारंभ झाला. त्यांच्या दातांना 'पायोरिया' रोग झाला होता. दात काढून टाका म्हणून डॉक्टरांनी त्यांना सांगितले. पण 'बुद्धी ही दातावर अवलंबून असते ' असे कोठेतरी त्यांनी वाचले होते. तेव्हा ते डॉक्टरांना म्हणाले की, ' मी बुद्धिजीवी माणूस आहे. तुम्ही माझे दात काढून टाकले की मी मेलोच ! ' ह्या त्यांच्या दुराग्रहामुळे त्यांनी आपले दात काढून टाकावयास नकार दिला. त्यामुळे त्यांचा ताप दिवसेंदिवस वाढू लागला.

---

‡ ह्या बाबतीत गडकऱ्यांचे त्यावेळचे शिष्य डॉ. शं. कृ. देवभक्त आणि श्री. न. ग. कमतनूरकर ह्यांच्याकडे चौकशी करता श्री. खांडेकर ह्यांनी गडकऱ्यांशी त्यांची मैत्री असल्याच्या काळात ' रमणी–रत्न ' नावाचे एक कोल्हटकरी तंत्राचे नाटक लिहिले होते आणि कैलास नि वैकुंठ ही पात्रे त्यात होती, ही गोष्ट खरी आहे असे समजते. पण त्यामुळे कमतनूरकर–खांडेकर ह्यांच्यामध्ये जर काही गैरसमज झाला असेल, तर तो अपरिपक्व विद्यार्थी अवस्थेमधला होता. आणि म्हणून अत्यंत प्रासंगिक स्वरूपाचा होता. गडकऱ्यांशी त्याचा काही संबंध नाही.

नारायण हरि आपटे कादंबरीकार ह्यांनी त्यांना हवा बदलण्यास सातारा येथे या म्हणून विनंती केली. महाराष्ट्र नाटक मंडळीचे मालक त्र्यंबक सीताराम कारखानीस यांनी सोलापुरच्या मोकळचा हवेत या असा आग्रह केला. पण गडकऱ्यांनी कोणाचे काही ऐकले नाही.

एवढचात ९ मे १९१८ रोजी खानदेशात भादली स्टेशनवर गडकऱ्यांचे आवडते स्नेही बालकवी त्र्यंबक बापूजी ठोमरे हे आगगाडीखाली सापडून मरण पावले. ही बातमी गडकऱ्यांच्या पुण्यातल्या घरी जाऊन मीच स्वत: सांगितली. गडकरी त्यावेळी अंथरुणावर पडून होते. ठोमऱ्यांच्या अपघाती मृत्यूचा त्यांना जबरदस्त धक्का बसला. 'आता काही मी फार दिवसांचा सोबती नाही' असे निराशेचे उद्गार त्या प्रसंगी त्यांच्या तोंडून निघाले. तथापि, तशाही अवस्थेत त्यांचे 'भावबंधन'चे लेखन चालूच होते. अठराच्या जूनमध्ये 'भावबंधन'चे तीन अंक पूर्ण करून त्यांनी चौथा अंक लिहावयाला प्रारंभ केला होता. जुलै महिन्यात ते 'एकच प्याल्या'ची पदे करावयाला मुंबईला 'गंधर्व नाटक मंडळी'च्या मुक्कामी जाऊन राहिले. त्यांचा ताप काही दिवस थांबे आणि पुन्हा काही दिवसांनी सुरू होई. तेवढचात इन्फ्लुएंझाची साथ सुरू झाली. 'गंधर्व मंडळी' बंद पडली. तेव्हा ते बोरिवलीला 'बळवंत मंडळी'च्या मुक्कामी जाऊन राहिले. ह्या काळात त्यांचा आजार अधिकच वाढत चालला.

काही दिवस ते पुण्याला असत, तर काही दिवस ते मुंबईमधल्या प्रसिद्ध डॉक्टराना आपली प्रकृती दाखविण्यासाठी जात. गडकऱ्यांची प्रकृती दिवसेंदिवस बिघडत चालल्याच्या बातम्या हळुहळू चहुकडे पसरत चालल्या. २२ किंवा २३ सप्टेंबर १९१८ या दिवशी गडकरी पुण्याहून मुंबईला गेले. त्या दिवशी मुंबईच्या 'इंदुप्रकाश'चा बातमीदार गडकऱ्यांच्या प्रकृतीची चौकशी करायला '१३६ कसबा' या त्यांच्या घरी आला. गडकऱ्यांच्या जिन्याचे दार बंद होते म्हणून त्याने तळमजल्यावरील मारवाडचाच्या दुकानातल्या एका माणसाला विचारले, 'गडकरी कुठे आहेत?' तेव्हा तो माणूस म्हणाला, 'ते गेले!' बातमीदार क्षणमात्र हतबुद्ध होऊन त्या माणसाकडे बघतच राहिला. 'गेले' म्हणजे त्याला वाटले, 'वारले.' दीर्घ नि:श्वास टाकून तो तसाच मागल्या पावली परतला आणि गडकऱ्यांच्या मृत्यूची बातमी त्याने मुंबईला पाठवून दिली.

ती २५ सप्टेंबर १९१८ च्या 'इंदुप्रकाशा'त दुसऱ्या पानाच्या आठव्या स्तंभाच्या तळाशीं चौदा ओळींमध्ये छापून आली आहे ती अशी :

## शोचनीय मृत्यु

मनोरंजन वगैरे मासिकातून आपल्या दिव्य प्रतिभापूर्ण काव्याच्या ललकाऱ्या मारणारे महाराष्ट्रातील नामांकित कविचंडोल आणि प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव

वगैरे उत्कृष्ट नाटकांनी महाराष्ट्र उन्नत करणारे नाटयकवी 'गोविंदाग्रज' उर्फ श्री. राम गणेश गडकरी यांना पुणे येथे इन्फ्लुएंझा तापाने देवाज्ञा झाल्याची शोककारक बातमी आली आहे. यांनी महाराष्ट्र सारस्वतात पटकावलेली जागा भरून येणे फार दुरापास्त दिसते.ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो यापलीकडे मर्त्य मानवांनी अधिक काय म्हणावे ?

'इंदुप्रकाश'ने पुढे 'मृत्यु–चूक' या मथळयाखाली ह्या बातमीची जेंव्हा दुरुस्ती केली, तेंव्हा अनेकांनी गडकऱ्यांना पत्र लिहून आनंद व्यक्त केला. 'आपला मृत्यु-लेख आपणच वाचण्याचा मान पितामह दादाभाई नौरोजींनंतर आपणाला मिळाला याबद्दल महाडचे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. गोविंद गोपाळ टिपणीस ह्यांनी गड-कऱ्यांचे अभिनंदन केले. 'अशुभ वार्तेने आयुष्य वाढते हा लौकिक समज आपल्या बाबतीत खरा ठरो' अशी कोल्हटकरांनी इच्छा व्यक्त केली, तर नागपूरचे कविवर्य आनंदराव टकाडे ह्यांनी आपला आनंद आठ कडव्यांच्या काव्यात व्यक्त केला.

पण एवढे होऊनही गडकऱ्यांच्या प्रकृतीला काही आराम पडला नाही. अठरा सालच्या नोव्हेंबरपासून त्यांनी अंथरुणच धरले. एक दिवस मी त्यांना भेटावयाला गेलो होतो, पण त्यांच्या बंधूंनी मला काही वर जाऊन दिले नाही. त्यांना क्षयाची बाधा झाली असल्याचे डॉक्टरांनी निदान केले. त्यांच्या पायावर सूज चढू लागली होती. नाताळात त्यांना भेटण्यास कोल्हटकर पुण्याला आले, तेंव्हा गडकऱ्यांनी आपल्या वाङमयीन संसाराची निरवानिरव चालविलेली होती. गडकऱ्यांचे थोरले बंधु विनायक गणेश ऊर्फ बाबुलभाई हे नागपूरजवळ असलेल्या सावनेर- ह्या गावी वकिली करीत असत. ते गडकऱ्यांना घेऊन जाण्यास मुद्दाम पुण्यास आले. अठरा साल संपण्यापूर्वी एक दोन दिवस आधी बाबुलभाई गडकऱ्यांना त्यांच्या घरच्या सर्व मंडळींसह पुण्याहून घेऊन सावनेरला गेले.

सावनेर येथे २३ जानेवारी १९१९ रोजी रात्री दहा वाजता 'भावबंधन' नाट-काचा शेवटचा प्रवेश लिहून झाल्यावर थोडयावेळाने त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. गुज-रातेत जन्म, महाराष्ट्रात जीवन आणि विदर्भात अवसान अशी गडकऱ्यांच्या आयुष्याची त्रिस्थळी यात्रा वयाच्या चौतिसाव्या वर्षी पूर्ण झाली.

गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर तात्यासाहेब कोल्हटकर यांनी बाबुलभाईंना सांत्वनपर पत्र लिहिले ते वाचताना काळजाला घरे पडतात. 'मी त्यांना बंधुतुल्य मानीत होतो. यामुळे मला त्यांच्या निधनाने फार मोठी हानी झाल्यासारखी वाटत आहे व आपण पंगु झालो आहोत अशी भावना वाटत आहे. त्यांच्या मातुश्रींचा त्यांच्यावर जीव की प्राण होता. त्यांस त्यांचा चिरविरह कसा सोसवेल ते कळत नाही.आपल्या दुःखात सारे महाराष्ट्र सामील आहे या विचाराने आपणास आपल्या मनाचे समा-धान करता येण्यासारखे आहे. परंतु माझ्या स्वतःच्याच मनाचे समाधान होत नसता मी तो विचार आपणापुढे मांडणे निव्वळ थट्टा होणार आहे.'

त्या पत्राच्या शेवटी ' महाराष्ट्रातील अत्यंत प्रतिभावान कवी, नाटककार व लेखक नाहीसा झाला. त्याचा देह जरी नष्ट झाला आहे, तरी ते कीर्तिरूपाने नेहमी अवशिष्टच राहतील ' हे गडकऱ्यांच्या लोकोत्तर कार्याचे कोल्हटकरांनी जे मूल्य-मापन केले होते, ते किती अचूक होते याचा पडताळा बेचाळीस वर्षांनंतर आज आपण आपल्या मनाशी करून पाहावा.

व्यक्तिरूपाने गडकरी आपल्यामधून निघून गेले आहेत. या पुस्तकात त्यांच्या वाङ्मयीन तपस्येचे आणि व्यक्तिगत जीवनाचे जे काही अवशेष इतक्या वर्षांनी प्रसिद्ध करण्यात येत आहेत त्याची पार्श्वभूमी आजच्या मराठी वाचकांना नीट कळावी म्हणून प्रस्तावनेदाखल एवढा विस्तार करावा लागला. गडकरी हे एककल्ली होते, लहरी होते, विक्षिप्त होते, व्यसनी होते, गुरुजनांची किंवा वडिलधाऱ्यांची मर्यादा न राखणारे होते, आळशी होते असे अनेक अपसमज त्यांच्या रोजनिशी-मधील आणि पत्रव्यवहारातील काही मजकुरावरून कित्येकांचा होण्याचा संभव आहे.

तथापि, ह्या प्रस्तावनेच्या अगदी प्रारंभापासून गडकऱ्यांच्या जीवनाचे जे एक मध्यवर्ती सूत्र आम्ही सांगितले आहे, ते लक्षात घेतल्यावाचून गडकऱ्यांच्या व्यक्ति-गत जीवनामधील निरनिराळ्या विसंगतींचा उमज होणार नाही. गडकरी हे देहाने मुळी जगतच नव्हते. आपल्या व्यक्तिमत्वाचे त्यांना भानच उरले नव्हते. अष्टौ-प्रहर, रात्रंदिन, चोवीस तास ते त्या ' झपूर्झा ' स्थितीत तल्लीन झालेले असत. त्यामुळे व्यवहारी जगाची अवधाने त्यांना कधी सांभाळताच आली नाहीत. त्यांच्या ' मुरली ' गीतात त्यांनी राधाकृष्णाच्या पूर्णैक्याचे जे वर्णन केले होते की

**उरले न शीत वा उष्ण**
**काही न शुभ्र वा कृष्ण**

ते त्यांना स्वतःलाच जास्त लागू पडते.

**त्या नादरसाचे प्याले**
**मनि ' गोविंदाग्रज ' प्याले**
**शाहीर मुरलीचे बनले**
**मग गानिं वाजविती मुरली !**

विश्वामधले जे असंख्य नाद त्यांच्या जीवनात घुमत होते, त्यांच्या संगीत रसाचे एकच नव्हे असंख्य प्याले झोकून त्यांना वाङ्मयनंदाची जी धुंदी चढली होती तिच्या नादात आजन्म आपल्या प्रतिभेची ' मुरली ' वाजवीत ते बसले होते.

त्यांच्या चिंतनात, विचारात आणि लेखनात अपवित्र आणि अमंगल असे काहीही नव्हते. भारतीय संस्कृतीच्या विशुद्ध, अभिजात आणि उर्जस्वल परंपरेवर त्यांच्या आत्म्याचे पोषण झाले होते, ह्याचे अनेक पुरावे त्यांच्या वाङ्मयात जागो-जाग आढळतील.

'पुण्यप्रभावा'त जेव्हा वृंदावन दीनाराच्या पोटात कट्यार खुपसू लागतो त्यावेळी वसुंधरा 'शिवलीलामृता'तील अकराव्या रुद्राध्यायाचा पाठ जेव्हा म्हणू लागते :

**'अश्वशाळा गजशाळा संपूर्ण**
**सर्व संपत्तीसहित गृहदान**
**महानंदेनें स्नान करून**
**भस्म अंगी चर्चिले**

तेव्हा भारतीय संस्कृतीचे केवढे भव्य आणि उदात्त चित्र डोळ्यांपुढे उभे राहते!

म्हाताऱ्या धनेश्वराशी लग्न करण्याची आपल्या मुलीला परवानगी देताना अश्रुपूर्ण नेत्रांनी आणि रक्तबंबाळ काळजाने जेव्हा धुंडिराज तिला आशीर्वाद देतो, 'बेटा मालती, अष्टपुत्रा सौभाग्यवती भव. जा. म्हाताऱ्या धनेश्वराशी लग्न कर' नाही तर एखाद्या प्रेताशी लग्न लाव, तुझा संसार सुखाने साजरा होईल—

**शास्त्राभ्यास नको, श्रुती पढु नको,**
**तीर्थास जाऊ नको,**
**योगाभ्यास नको, व्रते मख नको,**
**तीव्रे तपे ती नको,**
**काळाचे भय मानसी धरु नको,**
**दुष्टांसि शंकू नको,**
**ज्याचीया स्मरणे पतीत तरती**
**तो शंभु सोडू नको !'**

तेव्हा भारतीय जीवनामधले सारे ओज आणि पावित्र्य आपल्या डोळ्यांपुढे प्रकट होते आणि डोळ्यांतुन अश्रूंच्या गंगा-यमुना वाहू लागतात.

'राजसंन्यास' मध्ये साबाजी जेव्हा म्हणतो की, 'ज्ञानोबाची मराठी वाणी — शिवबाची मराठी करणी — दिगंत उजळून दोघांनी ऐन मराठी हाकेने भूमंडळ गाजविले !' तेव्हा महाराष्ट्राचा सारा देदीप्यमान इतिहास एखाद्या विद्युल्लतेसारखा आपल्या डोळ्यांपुढे चमकून जातो.

काशीची गंगा आणि रामेश्वराचा सागर एकत्र आणून शिवछत्रपतींनी ज्याप्रमाणे रायगडावर 'गंगासागर' तलाव तयार केला, त्याप्रमाणे भारतीय संस्कृतीचे पावित्र्य आणि मराठी भाषेचे सौंदर्य एकत्र आणून गडकऱ्यांनी आपला 'साहित्य सागर' महाराष्ट्रात निर्माण केला.

एवढे सांगूनही गडकऱ्यांबद्दल मनात रेंगाळत असलेले ज्यांचे निरनिराळे गैरसमज दूर होणार नाहीत, त्यांच्या चरणांवर 'गोविंदाग्रजां'नीच आपल्या हाताने 'फूल ना फुलाची पाकळी' यापूर्वी वाहून ठेवलेली आहे.

शहाजहानाआधी मेली
खयालिखुशाली ती त्याची,
खडा तेवढा ताजमहालच
भूषा जी या जगताची
चुकल्या तरुणा, वेश्याक्रीडन
आज तुझे स्मरणात नसे.
कालिदासकृत श्रीशाकुंतल
सरस्वतीच्या कंठि वसे !
दूषण वगळुनि भूषणमात्रे
प्रभुपूजन करि काळ असे
तुम्ही आम्ही कष्टी होणे
हा कुठला मग न्याय असे ?

प्रल्हाद केशव अत्रे

# विज्ञानबोधाची प्रस्तावना

लेखक

**श्रीपाद महादेव माटे, एम. ए.**

| | | |
|---|---|---|
| मूळ लेखन १९३३ | मॉडर्न बुक डेपो, पुणे २ | मूळ प्रस्तावना |
| स्वतंत्र प्रकाशन १९४७ | मूल्य ३–५० | पृष्ठे २०० |

नामवंत अध्यापक, प्राध्यापक, सामाजिकदृष्टीचे क्रियाशील शैलीदार लेखक आणि विज्ञाननिष्ठ विचारवंत अशा विविध नात्यांनी **कै. प्रा. श्री. म. तथा बापूसाहेब माटे** (२१–८–१८८३ ते २५–१२–१९५७) महशूर आहेत. विज्ञानबोध नामक एक प्रचंड प्रकल्प त्यांनी अनेकांच्या साहाय्याने हाती घेतलेला होता. त्या प्रकल्पास 'तरुण विद्यार्थ्यांची मने चवकस, चिकित्सक आणि ज्ञानलालस बनविण्याचे कामी उपयुक्त' ठरणारी प्रदीर्घ प्रस्तावना त्यांनी लिहिली होती. तीमधील सुमारे ११६ पृष्ठांचा हा विचारोन्मुख करणारा भाग.

बृहन्महाराष्ट्रातील शिक्षितांनी आधिभौतिक शास्त्रांचा अभ्यास जोराने सुरू करावयास हवा, हे मत आम्हास आग्रहाने प्रतिपादावयाचे आहे. त्यासाठी प्रस्तावनेचा एवढा विस्तार केला आहे. आमची भूमिका शास्त्रवेत्त्याची नाही, तर बृहन्महाराष्ट्रातील शिक्षितांनी आधिभौतिक शास्त्रांचा अभ्यास जोराने करावयास हवा, या मताच्या प्रतिपादकाची आहे; व हे प्रतिपादन जितक्या विविध अंगांनी करावयास हवे असे वाटले, तितक्या अंगांनी येथे केले आहे.

### घरचे वारेच बदलले पाहिजे

जगताची जी प्रगती चालली आहे ती मुख्यतः शास्त्रांच्या अभ्यासाने चालली आहे. गेल्या शेपन्नास वर्षांत व मुख्यतः पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर आधिभौतिक शास्त्रांचा अभ्यास, नवे शोध, नव्या क्लृप्ती, इतक्या भराभर पुढे येत आहेत की, त्यांच्याशी ज्या लोकांचा परिचय नाही, ते लोक विद्वान् म्हणजे विद्या शिकलेले असूनसुद्धा मागासलेले राहतील यात काहीच शंका नाही. शास्त्रज्ञाने ही पूर्वी आकस्मिक कारणाने व सहजगत्या झालेली दिसून येतात; पण आताच्या या नव्या युगमानात शास्त्रांच्या अभ्यासाचे मार्ग कायम झाले आहेत. उत्तरोत्तर नवीन नवीन काय शोधावयाचे हे सानुक्रम ठरत चालले आहे, वस्तूंच्या गुणधर्मांचे संशोधन विशेष प्रकारच्या पद्धतीने होऊ लागले आहे; व नवी नवी ज्ञाने, नवे नवे शोध व त्यास अनुसरून नव्या नव्या योजनाही झपाट्याने अवतरत आहेत. सुखसोयींची पैदास तर जास्त जास्त होऊ लागली आहे, हे शहाण्यापासून अडाण्यापर्यंत सर्व लोकांना कळते; कारण प्रत्यही त्या सोयींचा उपभोग ते घेतात. पण हे सर्व कसे घडून येत आहे, हे कोण करतो, आपण या बाबतीत कोठच्या कोठे मागे रेंगाळत आहो याची कल्पना त्यांना नाही. आपण दरवेळी म्हणतो की, पाश्चात्य राष्ट्रे पुढे जात आहेत. पण पुढे जात आहेत, म्हणजे काय होत आहे याचे ज्ञान सामान्य वाचकाला बिलकूल असत नाही. त्यांचा ऐहिक उत्कर्ष, उद्योगधंदे, कलाकुसर, श्रीमंती, युद्धाची साधने यांविषयी त्याला जे बाजारात दिसते किंवा तो जे पुस्तकात किंवा वर्तमानपत्रात वाचतो त्याने तो केवळ भांबावून जातो इतकेच; व 'हे गोरे लोक फारच पुढे गेले आहेत' एवढे आश्चर्याचे उद्‌गार आपल्या मनाशी पुन्हा एकदा काढून आपल्या नित्याच्या व्यवसायात तो मग्न होतो. त्यास कळावयास हवे की, गोरे लोक जे इतके पुढे गेले आहेत ते केवळ यदृच्छेने गेलेले नाहीत. त्यांनी आपल्या वैभवाचे व श्रीमंतीचे जे बांधकाम केले आहे ते आधिभौतिक शास्त्रांच्या अभ्यासाच्या बळावर केलेले आहे. आपली राज्ये गेली आणि त्यांची आली, असे जेथे जेथे झाले तेथे तेथे आपल्या पराभवाची मीमांसा करताना इतिहासकारांनी व साध्या निरीक्षकांनी आपल्या सामाजिक व मानसिक कमकुवतपणास दोष दिला आहे. या कमकुवतपणाने आपल्या पराभवाचे काम सोपे झाले

असे म्हणण्यात थोडेबहुत तथ्य असेल; पण इतिहासातील उत्पातांच्या परीक्षणा-वरून असे दिसते की, ज्यांचे मारक शास्त्रांचे ज्ञान मोठे तो इतरांहुन वरचढ ठरतो. एकमेकांना नखांनी ओरबाडण्यापासून तो तहत दुसऱ्याच्या अंगावर विषारी धूर सोडून त्याला लांबूनच मारण्यापर्यंत जे मारक प्रयोग गेल्या कित्येक सहस्र वर्षांत झाले, त्या प्रत्येकाने निरनिराळ्या लोकांची भाग्ये उदयास आणिली आहेत व त्यांच्या शत्रूची लयास नेली आहेत. बाबराने गंगेच्या एका काठावरून दुसऱ्या काठावर सबंध दिवसात आपल्या तोफेचे बारा गोळे मारले याचेच मोठे कौतुक झाले, व शत्रूंनी दहशत खाल्ली, आणि मुसलमानांचे भाग्य उदयास आले. पश्चिम इराणातील रानटी घोड्यांवर आरुढ झालेले स्वार तैग्रिस व युफ्रेटिस यांच्या सुपीक खोऱ्यात जी वैभवसंपन्न राष्ट्रे होती त्यांच्यावर येऊन कोसळल्याबरोबर घोड्यांचा उपयोग माहीत नसलेल्या तेथील बलिष्ठ पायदळांनीसुद्धा त्यांची मोठीच भीती खाल्ली व ती राष्ट्रे लयाला गेली. बंदुकीच्या दारूचा प्रभाव तर सर्वांनाच माहीत आहे. एखादा नेभळा माणूससुद्धा तिच्या बळावर बलिष्ठांना सहज मारू लागला. इंग्रजांच्या थोड्याशा फौजेने देशी फौजांची मोठमोठी पलटणे गारद केल्याचे आपण वाचले म्हणजे आश्चर्य वाटते व गैरसावध वाचक असे भलतेच अनुमान काढतो की, इंग्रज आपल्यापेक्षा जास्त चांगला लढवय्या होता व आपण भित्रे होतो. हे त्याचे अनुमान चुकीचे आहे. इंग्रजांच्या हातातील हत्यार आपल्या शिपायांच्या हातातील हत्यारापेक्षा अधिक पल्लेदार व दुरूनच अधिक शीघ्रपरिणामी होते, हे खरे आहे. शिवाजीराजाच्या अंगी धैर्य, शौर्य इत्यादि भरपूर होते व त्याची अक्कल-हुशारीही मोठी होती. पण त्याला बंदुकीची दारू गोव्याकडल्या युरोपियन लोकां-कडून आणवावी लागत होती हे पाहिले म्हणजे आमच्या मराठेशाहीचे मरण कशात आहे हे तेव्हाच कल्पकांना सहज उमगण्यासारखे होते असे वाटते. वैभवसंपादनाच्या कामी पुष्कळच गोष्टी खर्ची पडाव्या लागतात; पण त्यात मारक यंत्रांचा उपयोग ही फार मोठी गोष्ट होय.

पण आज युरोपियन लोक केवळ मारक यंत्रांच्या उपयोगात पुढे सरसावले आहेत असे नव्हे; प्रसंगी ते त्यांचा उपयोग करतात इतकेच. ज्या शास्त्रज्ञानाच्या बळावर त्यांनी ही मारक यंत्रे बनविली त्याच ज्ञानाच्या बळावर त्यांनी आपले संसार व एकंदर मानवी जीवित जास्त सुखाचे केले आहे. केवळ परमेश्वरावर हवाला न ठेवता सृष्टिव्यापाराची कारणे शोधून काढून त्याच्या बळावर त्यांनी मृत्यूचे प्रमाण कमी केले आहे, रोगांची पिछेहाट केली आहे, खाद्यपदार्थांची समृद्धी केली आहे, गरीब लोकांना जे खाणे किंवा लेणे पूर्वी कधी स्वप्नातही मिळत नव्हते ते त्यांनी मुबलक करून दिले आहे. वेळ, पैसा, श्रम या तिहींचीही बचत करणारी अशी प्रवासाची साधने काढून सर्व जगातील लोकांचे परस्परांचे संबंध अधिकाधिक निगडित करून टाकले आहेत. त्यामुळे अमेरिकेत सोन्याच्या भावाला

काही धक्का बसला की, त्याचा हादरा हिंदुस्थानला पोचतो. भूमीचा विजय त्यांनी केलाच. गेल्या काही शतकात समुद्राचाही करून दाखविला. आता हवेचा विजय करण्याचे कामी त्यांचे यत्न चालू आहेत. आपण त्यांचे शेजारी म्हणून व सूर्य उगवणे बंद करण्यासाठी म्हातारीचा कोंबडा झाकण्याचा इलाज चालण्यासारखा नाही म्हणून, आपल्याला ही ज्ञाने सुखसोयींच्या रूपाने तरी मिळत आहेत. पण या ज्ञानाचे जिवंत झरे आपल्याच भूमीत उत्पन्न व्हावयास हवेत. आज जो काही शास्त्रांचा अभ्यास येथे चालत असेल तो एवढ्यापुरताच आहे की, तिकडल्या शास्त्रज्ञांनी जे शोध लावले असतील किंवा शास्त्रांविषयी त्यांनी जे काय लिहिले असेल ते समजून घ्यावयाचे व समजल्याने तृप्त व्हावयाचे. त्याचे जे काही शिक्षण चालते ते एवढ्यापुरतेच की, हे जे आपल्याला समजलेले आहे ते विद्यार्थ्यांना सांगावयाचे. एवढे मात्र म्हटलेच पाहिजे की, काही दोनतीन ठिकाणी ज्याला संशोधन कार्य म्हणता येईल असे चालू आहे. हे जे अल्परूपाने चालले आहे ते अनेक ठिकाणी व मोठ्या प्रमाणाने चालविणे आपल्या माणसांनाही शक्य आहे. पण ती जी आपली सनातन तक्रार की, 'स्वराज्य नाही' ती या ठिकाणीही लागू आहे. तथापि आपला प्रस्तुतचा विचार याच्या थोडासा पुढे आहे. एकंदर जनसमूहाला शास्त्रांच्या अभ्यासाची आवड उत्पन्न करणे व अशा रीतीने लोकांच्या कल्पकतेला व बुद्धीच्या स्वतंत्र स्फुरणाला जागा करून देणे हे प्रस्तुतचे युगमान लक्षात घेता, अत्यंत जरुरीचे आहे. केवळ आपल्या सुखसोयी वाढविण्यासाठी म्हणूनच नव्हे तर इतर लोकांच्याशी बुद्धिदृष्टचा आपण बरोबरीचे आहो हे सिद्ध करण्यासाठी ते लोक ज्या क्षेत्रात कामे करीत असतील तेथील कामे करावयासच आपल्या बुद्धिमंतांनी झटले पाहिजे. त्यांच्या देशात सध्या शास्त्रज्ञानाचा फार महिमा आहे. मग आपणासही तेच करावयास हवे. आपण काव्य कितीही चांगले केले व त्यांच्याकडे तसा कोणी कवी नसला तर थोडीबहुत फुशारकी मारावयास हरकत नाही; परंतु आपले मोठेपण त्यांना जर खरोखरीच पटवून द्यावयाचे असेल तर ते ज्या कामात आहेत, त्या कामात पडून त्यांच्याशी बरोबरी करणे हेच अत्यंत जरूर आहे. त्यांच्या कवींपेक्षा एक श्रेष्ठ कवी हिंदुस्थानात उत्पन्न होण्यापेक्षा त्यांच्या सर्व शास्त्रज्ञांना जी कल्पना सुचली नाही किंवा अडली आहे तीच आपल्या येथील एखाद्या शास्त्रज्ञाला सुचली किंवा त्याने ती उकलून दाखविली व अशा रीतीने जगताच्या ज्ञानसंग्रहात त्याने काही नवी भर घातली तर आपल्या देशाच्या बुद्धिमत्त्वाचा प्रत्यय त्या राष्ट्रांना अधिक जलदीने येईल असे वाटते. मग या नव्या शोधाचे जे कोणते सुख-सोयीरूपाचे फायदे असतात ते सर्व जगात पसरल्याने आपल्या देशाची थोरवी जी वाढेल ती निराळीच. हे जर घडून यावयास हवे असेल तर विद्या शिकलेल्या व येथून पुढे शिकणाऱ्या सर्व लोकांना शास्त्राभ्यासाची महती पटवून देऊन ती शास्त्रे कसकशी निघाली, त्यांचे विस्तार कसे

झाले, शुद्ध भौतिकशास्त्रविचार आणि धर्मकल्पना यांचे झगडे आजवर कसे चालत आले आहेत, त्यामुळे धर्मकल्पनांची पिछेहाटच झाली असे नव्हे तर धर्मकल्पनांची रूपे कशी अधिकाधिक शुद्ध होत चाललेली आहेत हे त्यास वेळोवेळी कळविले पाहिजे. युरोपियन लोकही गेल्या दीड शतकापूर्वीपर्यंत कसे आपल्या इतकेच मागासलेले होते; पण येता येता त्यांच्या शास्त्रज्ञानाला व म्हणून वैभवाला चोहोकडून कशी गरगरून भरती आली आहे, फार पूर्वीच्या काळी आपल्याकडे शास्त्रांचा अभ्यास कसा चालत असे, काही लोकांच्या मते तरी प्राचीनकाळी हिंदुस्थानदेश हा अनेक शास्त्रज्ञानांचे कसे उगमस्थान बनला होता हे त्यास सांगितले पाहिजे. केवळ काव्य–नाटकावर सुशिक्षित मनाचा जो गुजारा होतो त्याच्याऐवजी, किंवा निदान त्याच्या जोडीला, शास्त्रज्ञानाचा खुराक अभ्यासू मनाला पोचविला पाहिजे. प्रत्यही घरी येणाऱ्या वाङ्मयाच्या द्वाराच हे काम व्हावयास हवे. घरातील वडीलमाणसाचे बोलणे, चर्चा करणे, बाजारातून वस्तू विकत आणणे, या कामातसुद्धा शास्त्रज्ञानाची आवड दिसू लागावयास हवी, म्हणजे मुलांबाळांत ती आपोआप उतरेल. घरचे वारेच बदलले पाहिजे. हे बदलावयास सुशिक्षितांनी सुशिक्षित रहावयास तत्पर राहिले पाहिजे. कॉलेजचे शिक्षण संपताना जे काही थोडेबहुत भौतिक शास्त्रांचे ज्ञान असते त्यात कालानुक्रमाने भर पडत जाणे हे होतच नाही. त्या त्या ज्ञानाच्या परगण्यात काय नवीन घडून येत आहे याची अनुक्रमवार दखलगिरी आमच्या सुशिक्षितांना नाही; म्हणजे असे की, सुशिक्षित हे सुशिक्षित रहात नाहीत. हे बंद व्हावयास हवे.

## महापुरुषांच्या नावांचे खुंट

इंग्रजांचे राज्य इकडे झाल्यापासून आपल्या वाङ्मयात व बोलण्याचालण्यात 'ख्रिस्तीशकापूर्वी' हा शब्दप्रयोग भारीच रूढ झाला आहे. येशू ख्रिस्ताचा जन्म हा ख्रिस्ती लोकांना नव्या कालमापनाला आरंभाचा म्हणून मानावयास योग्य वाटावा हे स्वाभाविक आहे. पण इंग्रजांचे राज्य येथे झाल्यामुळे आपण त्यांचे हे कालमानही त्यांच्या अंमलाबरोबरच पत्करिले आहे. आपणही 'शालिवाहन शके' असे म्हणतच होतो. पण शालिवाहनाच्या पूर्वीचे काही उल्लेख व्हावयाचे असल्यास त्या कालाचे मापन माणसे कसे करीत होती हे वाङ्मयावरून तरी ध्यानात येत नाही. शालिवाहनाचा शक जसा आपल्या तोंडी, तसा तिकडे ख्रिस्ताचा शक त्यांच्या तोंडी. कालदृष्टचा या दोहोत फारसा फरक नसल्यामुळे सुदीर्घ कालाविषयी बोलताना शालिवाहनाचा शक मनात धरला काय किंवा इसवी सन धरला काय, दोन्ही सारखेच आहेत. पण या सोयीबरोबरच दुसरीही एक गोष्ट कारण नसताना मनात ठसून राहिली आहे; ती ही की, हा जो येशूचा सन, तेथून काय ती सर्व तऱ्हेच्या ज्ञानाची गंगा सुरू झाली, तेथपासूनचा काळ म्हणजे अलीकडचा, व त्याच्या आधीचा म्हणजे फार पूर्वीचा असे आपल्या मनात उगाचच येते. म्हणून विचार करताना हे

जे महापुरुषांच्या नावाने चालू झालेले कालमापन ते सोडून देऊन, काळाची अगदी फार भूतकाळातील जी मिती माहीत असेल तेथपर्यंतची एक सलग लांबण ध्यानात आणावयास हवी; म्हणजे विचाराला मन थोडे मोकळे होते. शकपूर्व किंवा ख्रिस्त-पूर्व जे काही होते ते तदुत्तरकालीन गोष्टीपासून शालिवाहनाच्या किंवा ख्रिस्ताच्या नावामुळे तुटून निघाले आहे असे जे आपल्या मनात येते ते तेथून खरवडून टाका-वयास हवे. हा विचार मनात बिंबवून घेऊन भूतकाळात प्रवेश केला म्हणजे ज्ञानाच्या दृष्टीने सातत्याने वाहणारी अशी काळाची एकच एक नदी वहात आहे असे वाटू लागते. काल मोजण्यासाठी हे जे मोठाल्या पुरुषांच्या नावांचे खुंट मधे मधे उभे केलेले दिसतात, त्यांच्याऐवजी ज्या एका एका कल्पनेचा अंमल त्या त्या युगमाना-वर चाललेला असेल त्या कल्पनायुगाची इतकी वर्षे झाली असे म्हणण्याचा जर प्रघात पडला असता तर फार बरे झाले असते. कारण त्यावरून कोणत्या कल्पना एका मानवी जीवितावर अंमल चालवीत आल्या व त्या किती वर्षे टिकल्या हे त्यातून आपोआप निघाले असते. पण या कल्पनांच्या व्यापाचे निदर्शक असे काल-मापन झालेच नाही. तर राजे लोकांच्या किंवा पराकाष्ठा धर्मसंस्थापकांच्या नावाने ते होत आले आहे. त्यामुळे त्या त्या राजांची किंवा धर्मसंस्थापकांची नावे जरी कायम राहिली असे झाले, तरी त्या नावांवरून त्यांनी सुरू केलेले युगमान जसेच्या तसे टिकून राहिले असे मात्र मुळीच म्हणता यावयाचे नाही. सध्याचा शक शालि-वाहनाचा आहे असे म्हणण्यात काहीच मतलब नाही; कारण परकीय टोळयांच्या स्वाऱ्या मारून काढून शालिवाहनाने हिंदुस्थानचा मध्यदेश कायमचा सोडविला, याबद्दल शकाच्या रूपाने त्याची आठवण माणसांनी ठेवून त्याचे जे उतराई व्हावयाचे ते केव्हाच संपून गेले व जी अरिष्टे त्याने मारून काढली तसली अनेक अरिष्टे केवळ मध्य किंवा दक्षिण देशावरच काय, पण सर्व हिंदुस्थानावर कोसळली व त्याबरोबर नवेच युगमान चालू झाले. ख्रिस्ताच्या धर्मासंबंधाने असेच म्हणता येईल. त्याच्या तत्त्वाचा अप्रतिहत व रोजच्या जीवनात प्रत्ययास येईल असा सतत चाललेला अंमल केव्हाच मागे पडला आहे. पण कालमापन मात्र त्याच्याच नावाने चालू आहे. याच्याऐवजी त्या त्या काळातील तत्त्ववेत्त्यांनी कोणत्या कल्पनेचे युगमान कोणते हे सानुक्रम ठरविले असते व त्याच्या मुदती दिल्या असत्या तर एका मागे एक मनुष्ययोनीला प्राप्त झालेल्या कल्पना कोणत्या व त्या किती किती वर्षे टिकल्या याचे ज्ञान आपल्याला उत्तम झाले असते.पण हे कालमापन जरी विचार व्यापास अनुसरून आजवर झाले नाही तरी ते इतिहासाच्या अवलोकनावरून स्थूल-मानाने करता येते.

## प्रभावी कल्पना युगमापक धरावी

चिनी राजवटीसंबंधाने लिहिताना एका इतिहासकाराने म्हटले आहे की, ख्रिस्त-पूर्व ६०० ते ५०० हा काळ पृथ्वीवरील सर्व देशात अतिशय महत्त्वाचा होऊन गेला. नाईल, युफ्रेटिस, गंगा व ओहिओ यांच्या काठांवर ज्या लोकांनी साम्राज्ये

विस्तारली होती त्या लोकांनी जुने विचार टाकून देऊन नवे विचार पत्करावयास या काळात सुरुवात केली आणि त्यांच्या मताप्रमाणे या घडामोडीत विशेष हे की, हा बदल या सर्व लोकांत स्वतंत्रपणे झाला, म्हणजे सध्या ज्याप्रमाणे अमेरिकेत किंवा युरोपात एखादी गोष्ट उद्‌भवते व ज्ञानप्रसाराची साधने मुबलक व सुलभ असल्यामुळे ती जशी अत्यंत जलदीने सर्व पृथ्वीवर पसरते तसे त्या वेळी होण्यासारखे नव्हते. तरी हा फरक सर्व पृथ्वीवर पडला असे दिसून येते. या काळापासून पुढे पाचसहा शतके माणसांची मने हळूहळू धर्मविचाराकडे जोराने वळली व त्या त्या धर्ममताच्या संस्थापकांनी व विशेषत: प्रसारकांनी ज्या कोणत्या बऱ्याबाईट गोष्टी लोकांच्या मनावर आरूढ केल्या त्यांचा अंमल सुमारे दीडदोन हजार वर्षेपर्यंत अबाधित राहिला व पुढे जेव्हा त्याच्याविरुद्ध बंडे होऊ लागली तेव्हा त्यांची पाळेमुळे लोकांच्या मनात किती खोलवर गेली आहेत, याचे ज्ञान सर्वांना झाले; आणि सरसकट जनसमूहाच्या मनाची स्वतंत्र विचार करण्याची शक्ती, व आपल्याला सुचले नाही तरी दुसऱ्याने सांगितलेले सत्य पत्करण्याला लागणारी मनाची उभारी ही कशी साफ नष्ट झाली होती हे चांगले दिसून आले. आता ख्रिस्तपूर्व पाचसहा शतकात सर्व पृथ्वीभर एवढी धार्मिक मताची लाट का उद्‌भवली हे पहावयास हवे. पण इतिहासकार काही निश्चित स्वरूपाचे बोलावयास नाकबूल आहेत असे दिसते कारण याच्याही आधीच्या काळी झालेल्या घडामोडींची श्रद्धेय अशी सामग्री त्यांना फारशी कोठे सापडत नाही.

असे जरी असले तरी एक गोष्ट निश्चित दिसून येते की, याच्या आधीच्या काळात वर उल्लेखिलेल्या नद्यांच्या तीरांवर मोठाली साम्राज्ये प्रस्थापित झालेली होती. या ठिकाणी साम्राज्य शब्दाने सध्या आपल्या मनात जी कल्पना उत्पन्न होते तीच उत्पन्न व्हावी असे नाही. साम्राज्ये म्हटली तरी ती, सध्याचे इंग्रजी साम्राज्य लोकसंख्येच्या दृष्टीने जसे समृद्ध आहे तशी होती असे म्हणता येत नाही. कदाचित त्यांच्या ताब्यात विस्तृत प्रदेश असतील. पण या प्रदेशात माणसांची संख्या मात्र सध्याइतकी विपुल होती असे नाही. साम्राज्ये प्रस्थापिल्यानंतर कलाकौशल्ये व व्यापार याकडे या साम्राज्यवाल्यांनी नि:संशयच लक्ष दिले व लहानशाच का होईना पण साम्राज्याचे आपले संसार सांभाळून, टिकून राहण्याचा त्यांनी यत्न केला आणि साम्राज्य टिकावयास ज्या प्रकारची नैतिक ज्ञाने असावयास हवी असतात ती उत्पन्न केली. पण या साम्राज्यवाल्यांनी जरी काही काही प्रदेशांचे कायमचे कबजे घेतले तरी पृथ्वीच्या इतर भागात असंस्कृत किंवा अर्धसंस्कृत अशा मोठमोठ्या टोळ्या किंवा जमाती असत व मानवी जीवितात ज्यांचे बसे अजून बसावयाचे होते, त्या मनाने अत्यंत अस्थिर होत्या. ज्या सर्वथा असंस्कृत म्हणजे रानटी होत्या त्या केवळ निर्वाहाच्या साधनासाठी जलदीची स्थलांतरे करीत; कायमची घरे स्थापण्यासाठी स्थलांतर करणे हा त्यांचा मुख्य हेतू नव्हता. पण ज्या निदान अर्धसंस्कृत

होत्या त्यांचा हेतू मात्र कोठेतरी चांगल्याशा ठिकाणी घर करून रहावे हाच होता. जे कोणी संस्कृत लोक कायमच्या वसाहती करून राहिले होते, ज्यांनी साम्राज्ये विस्तारली होती व कलाकौशल्य आणि व्यापार यांची वृद्धी केली होती, त्यांच्याशी या जमातींनी सारखी हुज्जत घातली व शांतताकाळातील व्यवसायात गुंतून गेल्यामुळे जर त्यांचा शिपाईबाणा नष्ट झाला असला तर त्यांची साम्राज्ये उद्ध्वस्त करून टाकून तेथे आपला पाय रोवण्याचा सपाटा त्यांनी चालविला होता. अर्धसंस्कृत असल्याचा त्यांना पूर्ण फायदा मिळत असे. संस्कृतीची लज्जत काय आहे हे कळल्यामुळे इतरांच्या सफळ संस्कृतीवर धाड घालण्याची ईर्षा त्यांना उत्पन्न होई व संस्कृतीच्या चिरकालीन उपभोगामुळे जो एक मृदुपणा माणसांना प्राप्त होतो तो त्यांना झालेला नसे. चवताळून जाण्याची त्यांची हिरवट वृत्ती तशीच शिल्लक राहिलेली असे. या दोन गुणांच्या भांडवलावर या अर्धसंस्कृत लोकांनी सर्व पृथ्वीवर धिंगाणा माजविला होता. मधून कोठे सुविचार उत्पन्न व्हावा, माणसांनी नवीन गोष्ट बोलावी असे होई. पण नवी गोष्ट किंवा ज्ञान कायम ठेवल्याची व पसरविण्याची साधने उपलब्ध नसल्याने ती तेथल्या तेथेच जिरून जात. सर्व लोकांच्या मनाचा कबजा घेण्याला व अशा रीतीने त्यांच्या विचाराला नवे वळण लावण्याला त्यांना वावच मिळत नसे. संपत्ती जमा करणे, खाणे, पिणे, भोगणे, आपल्याला न मिळेल तर दुसऱ्याचे अपहरण करणे आणि हे साधावे म्हणून आपापल्या टोळ्यात शिस्तीची काही एक कैची उत्पन्न करणे या गोष्टीची आवश्यकता व म्हणून तयारी त्या त्या जमातींच्या प्रत्येक माणसाच्या अंगी भिनलेली असे. ही वृत्ती सर्व लोकांच्या ध्यानीमनी खेळत असल्यामुळे तिचाच प्रकर्ष सर्वत्र झालेला होता. जणू काही पृथ्वीची वाटणी अजून व्हावयाची होती. एखाद्या जत्रेच्या भंडाऱ्यात जसे जेवावयास जावयाचे असले म्हणजे आपल्यासाठी आणि आपल्या सोयऱ्यांसाठी मोठमोठाली धोतरे पसरून जागा धरतात, आपल्यापेक्षा कोणी एखादा निर्बळ किंवा फाजील संभावित तेथे असला तर त्याला ज्याप्रमाणे एखाद्या प्रहाराने किंवा वाईट शब्दाने हुसकून लावतात, तसाच प्रकार पूर्वी चाललेला होता. शक, शबर, मंगोल, तार्तार, हूण, गॉल, जर्मन, कोसॅक, अशांसारखी जी अनेक नावे आपल्याला इतिहासात भेटतात, ती आता सांगितलेल्या अर्धसंस्कृत जमातीचीच होत. हे धर्मविचारांचे नवे युगमान चालू होण्याच्या आधी यांची खूपच धुमश्चक्री चालू असे. युगमान चालू झाल्यानंतर सुद्धा जेथे ते इतके प्रभावी झाले नाही तेथे यांनी चालविलेल्या आदावती आणि उलाढाली इतिहासात नमूद आहेत. याचा अर्थ असा की, वर जी काही एक निरनिराळ्या जमातींची बसाबस चालली होती असे म्हटले आहे, तीच या धर्मयुगाच्या आधीच्या कालाचे खरे लक्षण होय. साम्राज्ये होती असे वर म्हटलेच आहे; पण या साम्राज्याचे व्याप व मर्यादा फार कोत्या होत्या. अशा या साम्राज्यातून काही नवीन उत्पन्न होई पण आताच वर्णन केलेली मानववंशखंडाची पृथ्वीवर

चाललेली जी धावपळ ती या नव्या कल्पनांच्या प्रसाराला अत्यंत विघातक होती, आणि म्हणून त्या कधीही बळावू शकल्या नाहीत. आपल्याला पुष्कळदा आश्चर्य वाटते की, या काळाच्या पुढे दोनतीन हजार वर्षांनी जी कल्पना निघाली असे इतिहास आपल्याला सांगतो, ती एखादी कल्पना इतक्या जुन्या काळीही होती, तर मग तिचा प्रसार का झाला नाही ? याचे उत्तर अगदी सोपे आहे. ते हे की, ही कल्पना रुजावयास व पसरावयास अनुकूलता नव्हती; व ही अनुकूलता का नव्हती याचे उत्तर असे की, मानववंशखंडाची भूपृष्ठावर बसाबस चालू असल्यामुळे युगमानाचा विचार ' धावपळ ' हाच होता.

## जमातींची भ्रमंती

ही अर्धसंस्कृत जमातींची हालचाल कशी चालू होती याची कल्पना यावी म्हणून काहींची नोंद येथे करतो. ज्यांनी साम्राज्ये स्थापिली होती त्यांच्या साम्राज्यवर्धनासाठी झालेल्या स्वाऱ्या यात दिलेल्या नाहीत. मोठमोठाल्या जमातींची दंगल कशी चाले हे मात्र यावरून स्पष्ट दिसून येईल. ख्रिस्तपूर्व ३००० इराणात सुमेरियन्स, सिथियन्स व द्रविडियन्स या लोकांच्या वसाहती झाल्या; २५००–१५६५ या काळी सेमेटिक जमाती ईजिप्तमध्ये आल्या; २२८३ सु. चिनी लोकांचे पूर्वेकडे प्रयाण झाले व सिंधूच्या खोऱ्यात आर्यांची वसाहत झाली; २०००–१७५० आर्य, मेद व पार्थियन यांची इराणात वसाहत झाली; १६५० पॅलेस्ताईनमधून जेकबने इजिप्तमध्ये देशांतर केले; १५३५ पहिला फिनिशियाचा राजा अहमिश याने आशियावर स्वारी केली; १५०० हिंदुस्थानचे मूळ रहिवासी दास बनले व आर्यांचा गंगेच्या खोऱ्यात प्रवेश झाला; १४९० ईजिप्तमधून ज्यू लोकांचे देशांतर झाले; १३०० जोशूआ याने कॅनन येथे वसाहत केली, ११२४ फिनिशियन लोक स्पेनला निघून गेले; १२ व्या शतकात उत्तरेकडील लढाऊ लोकांनी थेसिलेतील प्रजेस हाकून देऊन तेथे वस्ती केली; ११०९–१०५० चिनी लोक कांबोजात पसरले; ११०४ क्रीट, ऱ्होडस व एशियामायनर येथे डोरियन लोकांच्या वसाहती झाल्या; १०५०–५०० मंगोलियन जातींनी पश्चिम चीनपठारावरून येऊन तिबेटचा कबजा घेतला; १०००–३२० आर्यांनी सर्व हिंदुस्थान जिंकले; ८०० – ६४० सिरिनियन्स यांनी मध्य व उत्तर अरबस्तान काबीज केले; ६२५ फिनिशियनांवर शकांची स्वारी झाली; ५८६ नेबुचदनेझार याने ज्यू लोकांस बाबिलोनकडे पिटाळत नेले; ५०० हूण व हामिष्क यांनी कार्थेजकडे आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर वसाहत केली; ४०० सु. गॉल लोकांची इटलीवर स्वारी झाली; ३९० गॉल लोकांनी रोम घेतले व जाळले., २६२–२४६ हिंदुस्थानाच्या सरहद्दीवर इंडोबॅक्ट्रियन व पार्थियन लोकांच्या स्वाऱ्या झाल्या., १५९ इ. स. पु. २ किंवा १ ले शतक यांत मंगोल लोकांच्या बॅक्ट्रिया वगैरे प्रांतांवर स्वाऱ्या झाल्या., १२५ सिथिअन लोकांची पंजाबवर स्वारी झाली.

## या उलाढालीतही ज्ञानाचे रजकण

यावरून दिसून येईल की, जमातींची भ्रमंती चाललेली होती.

वर 'खिरस्तपूर्व' या शब्दाचा उल्लेख आलेला आहे व म्हटले आहे की, कोणत्या का कारणाने होईना पण सर्व ज्ञानाचा उगम जसा काही त्याच्या अलीकडील आहे असा काही एक भ्रम आपल्याला झालेला असतो. वास्तविक हे साफ खोटे आहे. खिरस्ती शक सुरू झाल्यापासून पुढे जवळजवळ दीड हजार वर्षे माणसे पहिल्याइतकीच अडाणी होती व कोणी त्यास शहाणे करू म्हटले तर त्याचे न ऐकण्याचा निर्बुद्धपणाही त्याचे अंगी होता. गेल्या तीन चारशे वर्षातच ज्याला 'ज्ञान' म्हणजे 'विज्ञान' म्हणता येईल त्याचा अंमल चालू झाला आहे., व नवे 'शास्त्रयुग' चालू आहे असे म्हणावयास हरकत नाही. तथापि काही स्थिर झालेल्या साम्राज्यांच्या संस्कृतीत, सध्यासुद्धा ज्या ज्ञानाचे आपल्याला कौतुक वाटेल, ती ज्ञाने निर्माण झाली होती; ती कोणती हे पाहणे बरेच मनोरंजक आहे. खिरस्तीशकापासून आपण भूतकाळात उरफाटा प्रवास करावयाचा ठरवावे व वाटेने काय काय गोष्टी भेटतात त्या पहाव्या म्हणजे या करमणुकीच्या जोडीला माहितीचाही लाभ होईल. इ. स. पूर्व ४६ साली सीझरने पंचांगाच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले; ४८ साली चिनी राजाने चिताऱ्याकडून राजघराण्यातील माणसांची चित्रे काढून घेतली; ५५ साली सीझरने ऱ्हाईन नदीवर पूल बांधला; इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात चीन देशात कागद तयार झाला. २१४ त लुटारूंना बाहेर ठेवण्यासाठी चिनी लोकांनी आपल्या प्रचंड भिंतीचे काम चालू केले; २४३ त अशोकाने हिंसाबंदीचा कायदा पुकारला; २८७ त ग्रीक देशात आर्किमिडीज याने पाण्याच्या उद्धरणशक्तीचा शोध लावला, तरफ शोधून काढली व द्रवपदार्थांच्या घनतेचा शोध लावला. तिसऱ्या शतकात मगधदेशच्या सैन्यात दोन लक्ष पायदळ, तीनशे हत्ती व दहा हजार घोडे होते, ३०६ त मिरवणुकीमध्ये शोभेसाठी मोठमोठे काचेचे आरसे नेले होते, ३२६ त रोम शहरी असे ठरले की, कोणत्याही ऋणकोच्या हातात बेड्या घालू नयेत; ॲरिस्टॉटल याला पृथ्वी गोल आहे हे माहीत होते, ४०३ साली रोमन सत्ताधिकाऱ्यांनी अविवाहितांवर कर बसविला, ४०६ साली जखमी झालेल्या शिपायांस सोडवून न आणल्याबद्दल विजयी सेनापतीला ठपका देऊन लोकांनी त्यास फाशी दिले, ४३० साली सार्वजनिक पैशाचा दुरुपयोग केल्याचा आरोप ठेवून ग्रीस देशातील पेरिक्लिस याजवर खटला करण्यात आला. ४६० मध्ये डिमॉक्रेटिसने परमाणुवाद चालू केला, ४८४ त इश्चिलस याला शोकपर्यवसायी नाटक लिहिल्याबद्दल पहिले बक्षीस देण्यात आले, ५२७ त होमरच्या कवितांचा संग्रह झाला, ५८२ च्या थोडे अलीकडे पृथ्वी गोल आहे हे लोकांनी ओळखले होते, ५८५ त ग्रीक ज्योतिष्यांनी मे २५ या तारखेचे सूर्यग्रहण आधी वर्तविले होते.

वरील उल्लेखांवरून ध्यानात येईल की, ज्ञान, संस्कृती, राज्यघटना, मनुष्यत्वाचे

उन्नत विचार यांचे स्फुल्लिंग मधून मधून कोठे कोठे सारखे उठत असत. परंतु त्यांचे तेज पसरू शकले नाही, ही गोष्ट खरी. आणि याचे मुख्य कारण म्हणजे वर जी मनुष्ययोनीची दंगल म्हणून सांगितली तीच होय. आणखीही याच्यामागे जाऊन पाहण्यासारखे आहे. इ. स. पूर्व ६११ त नकाशा ही वस्तू ग्रीक लोकांनी बनविली. सातव्या शतकात निनवी शहरी विटांवर लिहिलेल्या पुस्तकांची एक ग्रंथशाळा होती. नवव्या शतकात फिनिशियन लोक वर्णमाला वापरीत, ९३७ साली सालोमनने कर-वसुलीची पद्धत घातली, १००० च्या सुमारास फिनिशियन लोक सिंधूतून जलपर्य-टन करून सोने व चंदन आपल्या देशी नेत असत, चांद्रमानाचा सौरमानाशी मेळ बसविण्यासाठी दर तीन वर्षांनी एक अधिक महिना धरावा हे हिंदू लोकांनी ठर-विले, ११२० त चिनी लोक बुद्धिबळे खेळू लागले, पण ते आपण होऊनच असे सांगतात की, त्यांच्याही आधी एक हजार वर्षे हा खेळ हिंदू लोकांना माहीत होता. १५०० च्याही आधी ग्रहणे छायेमुळे लागतात हे हिंदू लोकांना माहीत झाले होते, १६०० त काचेची भांडी ईजिप्त देशात तयार झाली, १७०० त धातूंच्या नाण्याचे चलन चीन देशात होते, २२०० त चिनी पंडितांनी सूर्यग्रहण आगाऊ वर्तविले होते, २४०० त चीन देशात वजनेमापे सुरू झाली होती, २७००त चीन देशात रेशीम कातण्याचा व विणण्याचा शोध लागला, ४९०० त ईजिप्तचे मनोरे उभे राहिले, ५००० त ग्रहांना गती आहे, हे माहीत झाले होते, ६००० त लेखनकला, राजमुद्रा, शिल्पाची मुद्रा, मंत्रिमुद्रा, खाजगी कारभाऱ्याची मुद्रा, कालव्यावरील अधि-काऱ्याची मुद्रा, उत्सवचालकांची मुद्रा या ईजिप्त देशात चालू होत्या. याच्याही पूर्वी कित्येक सहस्र वर्षे हिंदुस्थानात लोक लोखंडी फाळांनी जमीन नांगरीत, सोने व इतर धातू खणून काढीत, कुऱ्हाडीला धार देत, सुईने पडदे शिवीत, व पोलादी वज्र अंगात घालीत.

## युगमानाची नवी नावे

वरील सर्व कल्पनांची बेरीज केली म्हणजे येशू खिस्ताच्या पूर्वी कित्येक हजार वर्षेपर्यंत ज्ञानाच्या शाखोपशाखांच्या कल्पना व मनुष्यत्वाचे उन्नत विचार उत्पन्न झालेले होतेच असे दिसेल. खिस्ती शकापासूनच अलीकडे ज्ञानाची भरभराट सुरू झाली असे नव्हे, म्हणून वर उल्लेखिलेले, कालमापनासाठी मोठ्या माणसांच्या नावाचे उभे केलेले खुंट उपटून टाकले म्हणजे ज्याला प्राचीन काल म्हणतात, त्याचे पाणी आधुनिक काळात मिळाल्यासारखे होते, व तत्कालीन लोकांचा आपल्याशी संबंध प्रस्थापित होतो. हे झाल्यावर मग अनेक सहस्र वर्षांवर अंमल चालविणाऱ्या कल्पना कोणत्या त्या ध्यानात येऊन विस्तृत युगमानाचे लक्षण ठरविता येते. याप्रमाणे पहाता गेल्या तीन-चारशे वर्षांपासून भौतिक शास्त्रांचे युगमान चालू झाले आहे, असे म्हणावयास हरकत नाही. त्याच्या आधीची २००० वर्षे म्हणजे ' धर्मकल्पनांचे

युगमान ' होय. व त्याच्या आधीचे कित्येक सहस्र वर्षांचे युगमान हे ' कलहाचे युग-मान ' असे म्हणावयास हरकत नाही.

## कलहापुढे शांती आली

या कलह–युगमानात काही थोडी साम्राज्ये स्थिर झाली होती. व त्यातील लोकांमध्ये विद्या, कला, कौशल्ये व व्यापार यांची अभिवृद्धीही झालेली होती. वर नमूद केलेल्या बाबी या अभिवृद्धीच्याच द्योतक होत. पण ही साम्राज्ये फार वर्षे टिकून राहणे कठिण होते. जी राहिली त्यांच्यात वरील द्योतक गोष्टी पुष्कळच वाढीस लागल्या होत्या. रोमन साम्राज्य, ग्रीक लोकांची राज्ये, इराणातील म्हणजे आर्याणातील आर्यवंशीय लोकांची साम्राज्ये, व हिंदुस्थानातील हिंदुराज्ये ही पुष्क-ळच वर्षे टिकली, व ज्या मानाने ती टिकली त्या मानाने मनुष्ययोनीला अगदी रानटी अवस्थेतून बाहेर काढून तिला संस्कृतीच्या हमरस्त्यावर आणून सोडण्याचे पहिले मोठे व अनेक हजार वर्षांवर पसरून राहिलेले असे काम त्यांनी केले., व हे करीत असताना शुद्ध ज्ञानाचे म्हणजे आधिभौतिक ज्ञानाचे संपादनही त्यांनी बरेच केले. पण जीवित हे हिंस्र कल्पनांनी युक्त बनविले तरच तरणोपाय आहे असे ठरून गेले होते. कारण शेकडो वंशखंडांनी आपल्या हिंस्र प्रवृत्तींच्या जोरावरच दंगल चालविलेली होती. म्हणून असा अंदाज करता येतो की, याच काळात शांतता, अहिंसा माणसांना परलोकी कोणी जाब विचारणारा आहे की नाही हे लक्षात घेऊन त्याची इहलोकीची जबाबदारी काय आहे इत्यादि विचार करणे हे सुरू झाले. जर वरील वर्णकलह किंवा वंशखंडकलह हे सर्व पृथ्वीवर चालू होते, तर ज्यांच्या मनाची मशागत आगाऊ बरीच झालेली होती, त्यांच्यात तरी वरील शांतताधर्माचा विचार परिस्फुट व्हावा हे ओघानेच येते. हाच प्रकार सर्व पृथ्वीभर झाला. धर्मकल्पनांचा मनु सुरू झाला. आपल्याला कोणी जाब विचारणारा आहे, त्या जाबाची तयारी येथे करणे प्राप्त आहे. केवळ एकमेकांच्या माना कापण्यात खरे पुरुषार्थसाधन नाही हा विचार बळावत चालला. चीन देश, हिंदुस्थान, हिंदुस्थानच्या द्वारा ग्रीकदेशा-पर्यंतचा मुलुख, व वर सिरिया देश इकडे या कल्पना जोराने प्रसृत झाल्या, व धामधुमीत गुंतलेले लोकही काही काळ थांबून या नवीन आकर्षक विचाराकडे लक्ष देऊन स्थिर झाले. त्यांनी आपले अभिनिवेश टाकले व मानवी मनाला सहज अशी जी हिंसा आणि अपहरणबुद्धी ही जरी कायम राहिली तरी हा जो शांततेचा व आत्मावरोपाचा नवोदित विचार त्याची छाप सर्वत्र बसली.

माणसाने फार हावभरी होऊ नये, काहीतरी संयम ठेवावा, एवढे विशाल विश्व उत्पन्न करणारा जो आहे तो त्याचा व आपलाही नियंता आहे, त्याच्यापुढे केव्हा ना केव्हा जबाब देण्याची वेळ येणार आहे आणि म्हणून आपण उन्मत्त होता कामा

नये, हा विचार प्रचाररूपाने प्रबळ झाला हे बरेच झाले. साम्राज्ये स्थापलेल्या लोकांत धर्म, पूजा, भक्ती, दान हे प्रकार चालू होतेच व या त्रावतीतील त्यांच्या कल्पनाही सूक्ष्म होत चाललेल्या होत्या. पण आश्चर्याची गोष्ट ही की,इतर दृष्टींनी या लोकांची नैतिक प्रगती होत होती तरी माणसाचे जीवित अगदी क्षुद्र मोलानेच जात होते. एवढे रोमन लोक, की सध्याच्या युरोपिय संस्कृतीच्या उगमस्थानी ज्यांची गणना, ते प्रजासत्ताक राज्ये चालवीत असता, घटस्फोटाचे कायदे पास करीत असता, मताच्या अधिकारासाठी झगडा करीत असता, देवतांना प्रत्यक्ष मनुष्यप्राण्याचा बळी देण्याची चाल त्यांच्यात सरसहा चालू होती ! हिंदुस्थानात तत्त्वज्ञानाचे उगम झालेले होतेच. पण परमेश्वरी पूजनासाठी पशूचे बलिदान ही आवश्यक बाब होती. ज्यांच्या जीविताला कायमचे स्थिरपण प्राप्त झाले होते, व म्हणून संस्कृतिवर्धनाला ज्यांना पुरेशी संधी प्राप्त झाली होती, त्यांची इतपतच स्थिती होती. मग जे कोणी अर्धसंस्कृत होते, त्यांच्यात कोणत्या चाली असतील हे सहज ओळखता येण्यासारखे आहे. अत्यंत उग्र, हिंस्र, अक्राळ विक्राळ, पशूंचे व माणसांचे बळी मागणारे, असलेच या लोकांचे देव होते, व त्यांना संतुष्ट करण्याला लागणारा जो मनाचा क्रूरपणा तो या लोकांच्या अंगी विपुल होता. वर जी बसाबस चालली होती म्हणून म्हटले आहे, ती चालू असता त्यांना उपयोगी पडणारे मनोधर्म म्हणजे शांती, क्षमा, दया हे खचितच नव्हते. हत्या, जाळपोळ, लूट, मारामारी ही शांती' क्षमा, दया यांनी कधीही करता येत नाहीत, ज्यांची साम्राज्ये होती, तेही साम्राज्य विस्ताराच्या कामी याच प्रखर गुणांचा अवलंब करीत असत. पण एकीकडे जरी विस्ताराच्या हावेमुळे या गुणांचा उपयोग त्यांच्यातही चालू होता, तरी स्वास्थ्य लाभल्याने ज्याप्रमाणे कलाकौशल्य व व्यापार याकडे त्यांनी लक्ष पुरविले, त्याप्रमाणे तत्त्वज्ञान, थोडेबहुत सृष्ट पदार्थांचे ज्ञान, मानवी मनाचे भूतदयेसारखे कोमल विचार हेही त्यांच्या मनात बळावत चाललेले होते. पण वर म्हटलेच आहे की, एकंदर पृथ्वीवर या लोकांची संख्या फारच थोडी होती. स्वतः एकमेकास कळवंडणारे, एकमेकास मारणारे व या स्थिर झालेल्या लोकांवर तुटून पडून त्यांना नागवू पाहणारे असे प्रचंड लोकसमुह पृथ्वीवर वावरत होते. अर्थात् त्यांच्या आजवरच्या या मनोव्यापाराची त्यांना स्वतःला आणि स्थिर झालेल्या लोकांना, थोडीबहुत तरी शिसारी यावी हे, त्यांच्या जीविताची नेहमीची उठकळा संपून थोडीतरी स्थिरता प्राप्त झाल्यावर ओघानेच प्राप्त झाले. हे झाल्यावर धर्मयुगाचा उदय झपाट्याने झाला. हिंदुस्थानात बुद्ध, इराणात आरदेसर, चिनात कॉन्फ्यूशियस्, ग्रीस देशात पायथॅगोरस आणि ॲरिस्टॉटल, सिरियात योहान्न, बॅप्टिस्ट, व शेवटी यशू ख्रिस्त हे महापुरुष उदयास आले. हे सर्व एकाच शतकात व अमुक एका अनुक्रमाने आले असे नव्हे. पण मागे जे म्हटले आहे की, ख्रि. पू. ५ शतकात धर्मकल्पनेचा प्रसार अवघ्या पृथ्वीवर जोराने झाला, त्यांची ही स्पष्ट खूण आहे.

## समाजाची स्थिरस्थावर हा प्रबल विचार

या धर्मसंस्थापकांनीं जे धर्म म्हणून शिकविले त्यांची ज्ञाने तपासून पहाता असे दिसेल की, समाजबंधनाला लागणारे नियम व बऱ्याचशा परमार्थकल्पना त्यांनी समाजाला शिकविल्या. या लोकांना समाजाच्या आजपर्यंतच्या स्थित्यंतरांची ज्ञाने निःसंशयच होती; व म्हणून तो स्थिर करण्यासाठी, म्हणजेच त्याची धारणा करण्यासाठी, यांना काय सांगावयास हवे हे ओळखण्याची कुवतही त्यांच्या अंगी होती. याच्या जोडीला त्यांनी परमार्थाच्या ज्या कल्पना सांगितल्या त्यांची आणि या सामाजिक नियमनांची त्यांनी सांगड घालून दिली. वास्तविक पाहता हिंदुस्थानात समाजाचे नियम व परमार्थाची ज्ञाने बुद्धाच्या पूर्वी कित्येक शतके निर्माण झालेली होती व त्या ज्ञानाच्या बळावर सर्व तऱ्हेची ऐश्वर्ये उत्पन्न करून त्रिवर्ण हिंदूंनी मोठाली साम्राज्ये विस्तारून आपल्या द्वारा मनुष्ययोनीची पुष्कळच प्रगती केली होती. इतकेच नव्हे तर ज्याला आधुनिक कल्पनेप्रमाणे आधिभौतिक ज्ञान असे म्हणता येईल, तेही त्यांनी पुष्कळच पैदा केले होते. पण इतिहासातील दुवे चांगलेसे जुळलेले नसल्यामुळ बुद्धाच्या आधी हिंदुस्थानात कोणते उत्पात झाले, व त्याच्या तत्त्वज्ञानाच्या स्वीकारास लोकांची मनोभूमी कोणत्या कारणाने तयार झाली होती हे चांगलेसे कळत नाही. केवळ यज्ञात पशुहिंसा होत असे हे अल्प कारण एवढी थोरली सामाजिक उलथापालथ होण्याला पुरेसे होईल असे दिसत नाही. ते कसेही असो; बुद्धाने विचाराची नवी राजवट सुरू केली यात काहीच शंका नाही. त्याने घातलेल्या या नव्या विचारपरंपरेचा अंमल कितपत चालू झाला, हेही भक्कम पुराव्याअभावी नीट सांगता येत नाही. त्याने वर्णव्यवस्थेचा उच्छेद केला व ब्राह्मणवर्चस्वाचे बंड मोडले असे आपण वाचतो, हे जर खरे असेल तर तत्कालीन भारतीय समाजात फारच मोठी क्रांती त्याने घडवून आणिली यात काही शंका नाही. त्याने वर्णकल्पना घालविली असली तरी जातिभेद त्याच्याने मोडवला नाही, किंबहुना त्यास तो मोडावयाचा नव्हता अशीही कुणकुण इतिहासतज्ज्ञांत चालू असते. या सर्व बाबी अनिश्चित म्हणून सोडून दिल्या तरी एक विचार निश्चित आणि सुसंबद्ध असा शिल्लक उरतो हा की, समाजरचनेसंबंधाने त्याने काही कल्पना निश्चित केल्या व त्यांचा अंमल भारतवर्षात कित्येक शतके चालू राहिला. आपला मुख्य मुद्दा हा आहे की, हे जे धर्मकल्पनांचे नवीन युग चालू झाले होते त्याच्या प्रवर्तकांनी 'धर्म' शब्दाने ओळखिल्या जाणाऱ्या परमार्थ विषयाचाच केवळ पुरस्कार केला नाही, समाजरचनेच्या व्यवस्थांचाही पुरस्कार केला. तिकडे येशू ख्रिस्तानेही हेच केले. तो परमेश्वराविषयी पुष्कळच बोलला. पण त्याचे आज्ञा-दशक पाहता त्याने सामाजिक तत्त्वज्ञान त्यात पुष्कळच ठेविले हे स्पष्टच दिसते. ज्या जुन्या जरतुष्ट्र धर्माचे आरदेसर याने पुनरुज्जीवन केले त्या धर्मातील सामाजिक तत्त्वज्ञानाचाही अर्थातच त्याने पुन्हा पुरस्कार केला. हीच गोष्ट बाकीच्या

गा...१५

लोकांनाही लागू आहे. हे जे या नवीन युगमानाचे प्रबल पुरस्कर्ते म्हणून सांगितले त्यांच्यासारखेच पण सामर्थ्याने थोडे लहान असे शेकडो प्रतिपादक समाजात झाले. या सर्वांचे मिळून एकच कार्य होते आणि ते हे की, जिकडे तिकडे स्थिरस्थावर करावी, मागे वर्णिलेली जमातींची उलथापालथ आणि दंगल थांबवावी, अर्ध-संस्कृतांना पूर्णसंस्कृत करून माणसात आणून सोडावे आणि अशा रीतीने संसाराला काही कायमपणा प्राप्त झाल्यामुळे उत्तरोत्तर पायगोवा उत्पन्न होऊन भराभर स्थलांतरे करण्याची जी मूळची गूढस्थ बुद्धी ती साफ नाहीशी व्हावी, हे सर्व चार-दोन दिवसांचे किंबहुना चारदोन शतकांचेसुद्धा काम नव्हते. हजारो वर्षे हजारो माणसे या कामात होती. येथून तेथून पृथ्वीवरील सर्व समाज हे काही एकरूप, एकजातीय, अथवा एकवर्णीय असे मुळीच नव्हते; पण या सर्वांना या नव्या युग-मानात स्थिरस्थावर व्हावयास हवे हा विचार निःसंशयच पटला होता. कारण या काळाच्या आधी माणसाच्या जातीला जे जमातीचे किंवा टोळ्यांचे रूप होते व त्यांच्या अंगी जो बेफिकीर उपरेपणा होता तो उत्तरोत्तर नष्ट होऊन त्यांना संभा-वित समाजाचे रूप प्राप्त व्हावयास हवे होते. माणसांनी एकमेकांना फार दिवस ठार मारलेले असावे व आपल्या क्रूरपणाचे शिसारी येण्याइतपत प्रदर्शन केले असावे, म्हणून बुद्धाचा अहिंसेचा विचार सामान्य जनसमुहालासुद्धा पटला असावा. ख्रिस्ताने तर धडधडीतच सांगितले की, 'दुसऱ्याने जर आपला दात पाडला तर आपण त्याचा दात पाडावा व त्याने जर आपला डोळा फोडिला तर आपण त्याचा डोळा फोडावा असे तुम्हाला आजवर सांगण्यात आलेले आहे. पण मी तुम्हाला असे सांगतो की, हे सर्व तुम्ही सोडून द्या. दुसऱ्याने जर तुमच्या एका गालात मारली तर त्यास म्हणावे, 'माझ्या दुसऱ्या गालात मार.' एखाद्याने जर तुमचे उपरणे हिसकवून नेले तर त्याला म्हणावे, 'ही माझी पैरणही घेऊन जा.' तुमच्या डोक्यावर वेठ देऊन जर तुम्हाला एखाद्याने चार मैल पळवीत नेले तर त्याला म्हणावे, 'मी आणखी चार मैल यावयास हवे काय ?' कसलाही जंतू आपल्या हातून मरता उपयोगाचा नाही, येथपर्यंत पोचलेली हिंदुस्थानातील सूक्ष्म अहिंसेची कल्पना आणि आताच वर्णन केलेली ख्रिस्ताची अप्रतिकाराची कल्पना या समाजात का उद्भवल्या अस-तील, याचे विवेचन आपल्या मनाशी करणे खरोखर फार जरुरीचे आहे. या ज्ञानाची उपयुक्तता ओसरून गेल्यावर ती उपहास्य बनलेली असणे किंवा निदान अदबीच्या बुद्धीने त्यांचा बोज त्यांच्याकडे कायम ठेवून, जगतातील व्यवहाराला जी हिंसा व जो प्रतिकार योग्य व अवश्य आहे तो आपल्या संसारात मिसळून घेतलेला असणे हे अगदी शक्य व बरोबर आहे. पण ही त्याची उपयुक्तता ओसर-ण्याच्या आधी त्यांचा पूर्ण अंमल चालू होता; व जर चालू होता तर तो लोकांच्या मनाने एवढ्या हव्यासाने का पत्करला हे सामाजिक दृष्ट्या पाहता, वर जी मानव वंशखंडांच्या स्थिरस्थावरपणाची कल्पना सांगितली आहे तीच मनापुढे हटकून उभी

राहते. हिंसेचा अप्रतिबद्ध असा जोर समाजात कित्येक शतके निरंकुशपणे चालू असल्याशिवाय हा अहिंसेचा गोड आणि मनाला सुखप्रद वाटणारा संदेश माणसांनी खरोखरच पत्करला नसला पाहिजे. तात्पर्य इतकेच की, हे जे धर्मकल्पनांचे युग चालू झाले असे म्हटले आहे त्यात समाजाची स्थिरस्थावर हा एक विचार अत्यंत प्रबल होता.

## महापुरुषांच्या मागून श्रेष्ठ पुरुष

बुद्ध, ख्रिस्त इ. जी नावे मागे आली आहेत ती काही ठळक व्यक्तींचीच होत. पण यांनी एकदा विचाराला कायमची कलाटणी दिल्यानंतर त्यांच्या संदेशातील बीजभूत कल्पना आपलीशी करून, त्यांनी सुरू केलेले काम, आपल्या मगदुराप्रमाणे जनसमूहात फैलावून देण्याचा उद्योग अनेक लोकांनी केला. लहान लहान गुरू, त्यांचे शेकडो शिष्य, त्यांनी स्थापन केलेले मठाधिकारी, भोवताली पाठविलेले प्रचारक, गुरूने सांगितलेल्या संहितेचा अर्थ करणारे पढीक, संत, महंत, बाबा, अशी अनेक तऱ्हेची मंडळी मागून आलेल्या आणि पुढे चालू राहणाऱ्या या उद्योगात सामील झाली. हे सर्व लोक फार मोठ्या बौद्धिक ऐपतीचे किंवा मूळ मंत्र समाजाला देणाऱ्या महापुरुषांच्या तोलाचे होते असे नाही. पण आजच्या दृष्टीने त्यांच्या प्रतिपादनात दिसून येणारा जो भोळाभाव, दुराग्रह, तो तेव्हाच्या चालू झालेल्या विचार–प्रणाली-प्रमाणे एक अस्तिपक्षी विचार होता. मोठाले युगमानाचे आरंभक असे महापुरुष जरी थोडे झाले, तरी त्यांचा संदेश हा तोंडातोंडी सर्वत्र जाहीर झालेला होता. पण हे जे महापुरुष म्हटले ते काही वर्ण, जात, वंश, प्रदेश, अशांसारख्या कारणांनी वलयांकित झालेले जे हजारो लोकसमूह होते त्या सर्वांची मने सर्व बाजूंनी आपल्या कबजात घेऊ शकले असतील असे नाही. त्या त्या कोंडाळ्यात आपले प्रभुत्व गाजविणारे महापुरुष नव्हे, पण श्रेष्ठ पुरुष, आजच्याप्रमाणे तेव्हासुद्धा निःसंशय होते. त्यांनी हे महापुरुषांचे मंत्र आपल्या मनबुद्धीच्या सामर्थ्याप्रमाणे जसेजसे वळवून घ्यावयास हवे होते तसे घेऊन त्यांची मुरवण समाजामध्ये केली. पण हे सर्व होत असता दुसऱ्या एका अत्यंत प्रबल विचाराची बाधा या सर्व युगमानाला वाटली.

## कृतज्ञतेतून भोळेपण निघाले

महापुरुषांना नव्या संदेशाचे जे स्फुरण झाले त्या स्फुरणाची बीजे अथवा प्रत्यक्ष प्रतिपादन चालू व्हावयाच्या आधी त्यांच्या मनात जी प्रचंड चलबिचल चालू होती तिचे अणुरेणु कशाचे बनले होते हे पहाता असे दिसून येते की, अर्धसंस्कृत जमातींनी सर्वत्र जो धिंगाणा माजविला होता व सामाजिक अस्वस्थता पसरवून दिलेली होती ती नाहीशी करून तेथे स्थिरस्थावर करणे जरूर आहे, हा विचार त्यांच्या मनात उत्पन्न झाला होता हे खरे. पण तो तरी मानवजातीच्या हालाच्या निरीक्षणानेच उत्पन्न झाला होता असे नव्हे. या जमातींनी आजवर ज्या देवतांचे पूजन चालविले

होते व आपल्याला परापहरणाने प्राप्त झालेल्या वस्तू ज्याच्यामुळे प्राप्त झाल्या आहेत असे त्यास वाटे, त्या देवतांचे अधिष्ठान लोकांच्या मनातून कायमचे निखळवून टाकल्या शिवाय, हे समाज संभावित मार्गावर यावयाचे नाहीत हा जो गूढस्थ विचार त्यांना पटला होता त्यांचीही मदत त्यांच्या स्फुरणाला झाली होती. या देवतांची अक्राळविक्राळ रुपे व हिंस्रपणा ही खरोखर निंद्य आहेत, व त्यांना पुजणारे व वंदणारे लोक निंद्य आचाराचेच राहतील अशी त्यांची खात्री होती. आणि म्हणून परमेश्वराचे जें कारुणिक, गंभीर, शांत व मंगलमय रुप ते त्यांनी लोकांना दाखवून दिले. रक्ताचें बळी मागणारा, आपल्यासारख्याच माणसांचे भक्ष्य हवे असे म्हणणारा, सर्व नाजूक कल्पनांचा विध्वंस करणारा असा देव असेल तरी कसा, असे त्यांनी लोकांना पटवून दिले. समाजाची स्थिरस्थावर होऊन सुखाने संसार करू लागलेल्या लोकांना आपल्या शास्त्याचे हे अभिनवरूप फार जलदीने पटले असले पाहिजे. हिंस्र उद्योग करणाऱ्या लोकांचा देव हिंस्र असावा आणि शांत उद्योग करणाऱ्या लोकांना शांत देव आवडावा हे स्वाभाविक होते. पण हे देवदर्शन त्यांना या महापुरुषांनी करून दिले होते. अर्थात त्यासंबंधी जनसमूहाची कल्पना अत्यंत आदरबुद्धीची व्हावी हे सहज होते. आपल्याला जे कळत नव्हते, आपल्या मनातही कधी येत नव्हते, व एखाद्या हलक्यासलक्याने सांगितले म्हणून भावत नव्हते, ते आपल्याला याने पटवून दिले व अशा रीतीने आपली चित्तप्रवृत्ती उदात्त करून ठेवली हे पाहून, त्याच्यासंबंधी काही अवास्तवपणाची म्हणजे हा माणूस अतिमानुषीय आहे अशी कल्पना लोकांनी करावी हेही त्यांच्या मागोमाग आपोआपच येते. म्हणून त्याने जे काही सांगितले असेल ते सर्व खरे, त्यांत अमुक बरोबर आणि तमुक चूक असे मानणे केवळ धाष्टर्याचे आहे ही कल्पना समाजात बद्धमूल झाली. आपल्याला वंद्य असलेल्या महापुरुषांचे सत्व पहावे किंवा त्यांच्या ज्ञानाचे मोजमाप करावयास आपण सिद्ध व्हावे हे उर्मटपणाचे असे माणसांना वाटते. अर्थात या महापुरुषांचे सर्व म्हणणे ऐनजिनसी, सगळेच्या सगळे, जनसमूहाने अगदी बिनटिक असे पत्करले. याला काहीतरी दैवी स्फुरण असल्याशिवाय, इतर लक्षावधी माणसांना जे पूर्वी कधी सुचले नाही, ते याला कसे सुचले हाही विचार त्यांच्या मनात स्थिर झाला असावा. याप्रमाणे त्याच्या बोलण्याला निरंकुशता प्राप्त झाली. पण यामुळे मोठेंच नुकसान झाले.

## साध्या बोलण्याला सिद्धांताचे रुप

वास्तविक पहाता इतर लोकांच्याहून त्यांचे निराळेपण जे होते ते हे की, त्यांना वर सांगितलेले गंभीर स्फुरण झालेले होते व इतरांना झालेले नव्हते. अर्थात ते तेवढे स्फुरण सोडले म्हणजें बाकीच्या गोष्टीत तेव्हाच्या इतर समाजाइतकेच ते अज्ञ होते. अर्थात इतर अज्ञ लोक इतर विषयांविषयी जे काही बोलले असते तेच तेही बोललेले आहेत. आता इतर लोकांचे बोलणे हे उत्तरोत्तर मनुष्ययोनीला प्राप्त झालेल्या

ज्ञानाशी तोलले असता पुष्कळदा साफ चुकीचे होते असे दिसून येते. तसेच या महापुरुषांचेही इतरांसारखे जे बोलणे होते तेही चुकीचेच ठरते. पण सामान्य लोकांच्या बोलण्याला 'चुकीचे' म्हणण्याला जसे लोक धजावतात तसे या महापुरुषांच्या बोलण्याला 'चुकीचे' म्हणण्यास लोक धजावले नाहीत, कारण की, त्यांचे नवे बोलणे त्यांना शिरसावंद्य होते, व त्यांना दैवी स्फुरण झालेले आहे असा भाव त्यांच्या मनात उदित झाला होता. वास्तविक पाहता खुद्द महापुरुषांचाही या विधानांच्या संबंधाने आग्रह असेल असे नाही. व प्रसंगविशेषी तर ते केवळ अलंकारिकच भाषा बोलून गेले असतील. पण त्यांचा प्रत्येक शब्द प्रमाण मानणारांना हे काव्यही उमगले नाही. त्यांनी ते ते शब्द केवळ परमार्थानेच मानिले. यामुळे या मगरमिठीतून सुटण्यास माणसांना भारीच वेळ लागला. याचे अगदी साधे उदाहरण म्हणजे, पृथ्वी-गोल आहे हे साधे प्रमेय पत्करण्यास युरोपातल्या माणसांनी दाखविलेली अत्यंत चिकट नाखुषी हे होय. शोधकांनी, प्रयोग करणाऱ्यांनी व गणित करणारांनी हरतऱ्हेने सांगितले की, पृथ्वी गोल आहे. पण लोक म्हणत की तुमचेच चूक असले पाहिजे. कारण धर्मग्रंथांत म्हटले आहे की, पृथ्वी ही सतरंजीसारखी अंथरली आहे व डोक्यावरचे आकाश हे वर तंबूसारखे उभे केले आहे ! आता धर्मग्रंथात ज्याने हे शब्द लिहिले त्याला मुद्दाम आवर्जून हे विधान करावयाचे होते, असे मुळीच नाही; तेव्हाचा चालू असलेला समज प्रतिपादक बोलून गेला इतकेच. पण त्याच्या इतर थोर प्रतिपादनामुळे त्याला दैवी स्फुरण झालेले आहे असा समज करून घेतलेला समाज त्यांचे हे आगंतुक बोलणेसुद्धा, त्याने मुद्दाम केलेल्या प्रतिपादनाच्या तोडीचे मानू लागला ! त्याने सांगितले की, पृथ्वी ही देवाची पाय ठेवावयाची अडणी आहे, वास्तविक बोलणाराने हा केवळ अलंकार केला. देव स्वर्गात आहे व त्याचे रूप जर अत्यंत भव्य आहे, तर पृथ्वी त्याच्या पायाखालची छोटी पायरी म्हणून समजावी हे काव्याला शोभण्यासारखे आहे. पण दैवी स्फुरण झालेल्या मूळ प्रतिपादकाला माणसांनी मनुष्यत्वाचे साधे गुण व बोलण्याच्या कामातली साधी आवडनिवड ही उरूच दिली नाहीत. त्याची प्रत्येक गोष्ट वाच्यार्थाने केवळ सिद्धांतवत् मानावयाची असेच त्यांनी ठरविले. व मग वरील मनोरंजक वर्णनातील काव्य नाहीसे होऊन पृथ्वी ही खरोखरच परमेश्वराच्या पायातळीची पायरी बनली. म्हणजे असे झाले की, जो दैवी पुरुष ठरला त्याची चूकसुद्धा बरोबरच ठरली. आता जो पुरुष दैवी नव्हे त्याचे युक्त बोलणेसुद्धा दैवी पुरुषाच्या बोलण्याशी विसंवादी असल्याने कसे चुकीचे ठरले ते पहा. भास्कराचार्याने आधुनिक युरोपियन शास्त्रज्ञाच्या कित्येक शतके आधी हे सिद्ध केले की, पृथ्वी आपल्या आंसाभोवती आठ प्रहरास एक प्रदक्षिणा करते म्हणजे तिला दैनंदिन गती आहे. वास्तविक पाहता हे बोलणे वेदवाक्याइतके खरे होते. पण लोकांनी जुनी दैवी पुरुषांची माहिती पत्करली असल्यामुळे त्यांनी त्यांचे ज्ञान धुत्कारून लाविले ! तिकडे युरोपात गॅलिलिओ याने पिसा येथील

मनोऱ्यावर चढून पृथ्वीची ओढ पदार्थांना कशी असते, हे प्रत्यक्ष प्रयोग करून दाखविले. पण ज्या ॲरिस्टॉटलला दैवीपण प्राप्त झाले होते त्याचे बोलणे या सिद्धांताशी विरोधी असल्यामुळे गॅलिलिओने करून दिलेले प्रत्यक्षाचे ज्ञानसुद्धा लोकांनी साफ अवमानिले !

ज्या गोष्टी आपणास ठाम कळालेल्या आहेत त्याविषयीच फक्त बोलावे, असे धोरण या महापुरुषांनी ठेवलेले दिसत नाही. मागील अर्धसंस्कृत युगमानातील विपरीत आंदोलने पाहून त्यांच्या मनात जो काही निषेधाचा कढ आला होता, व मग त्यांना ज्या काही विधायक कल्पना सुचल्या होत्या तेवढ्याच जर ते बोलले असते, तर फार बरे झाले असते. पण प्रतिपादनाच्या अनुरोधाने ते अशा काही गोष्टी बोलून गेले की, ज्या त्यांच्या आवाक्याच्या बाहेरच्या होत्या. वर लिहिलेले मोठे गंभीर स्फुरण जरी त्याच्या बुद्धीला झालेले होते तरी त्यांची बुद्धी सर्वंकष व सर्वगामी होती असे मुळीच नाही. पण यामुळे असे झाले की, त्यांच्या मुख्य प्रतिपाद्य विषयाबरोबर ज्या इतर गोष्टी ते सांगून गेले त्यांनाही सिद्धांताचेच रूप आले व कदाचित त्यांनी अपेक्षिले नसतानाही त्यांची आनुषंगिक विधानेसुद्धा मुख्य प्रतिपाद्याच्या तोलाची होऊन बसली. यामुळे फारच मोठे नुकसान झाले आहे.

### भावनेच्या पोटीही तत्त्वज्ञान येते

समाजाचे मन हे बहुधा सर्व तत्त्वज्ञानाचे उगमस्थान आहे. त्याच्यावर परिस्थितीस अनुसरून जे जे संस्कार होतील, आघात होतील, त्याला पीडा होईल, किंवा सुख उत्पन्न होईल, त्याप्रमाणे निरनिराळे विचार तरंगासारखे त्याच्यावर उठतात. याच विचारांचे काही एक तत्त्वज्ञान बनते. दुःख, प्रेम, असूया अशांसारख्या मनोविकारांच्या संबंधाने जे काही तत्त्वज्ञानवजा लिहिलेले असते ते सर्व त्या त्या प्रसंगी मनाने दिलेल्या जबाबावर रचलेले असते. पण याहीपेक्षा पुढे जाऊन असे म्हणता येईल की, ज्या विचारांना आत्मशोधाच्या कसोटीचा दर्जा प्राप्त झाला आहे ती ज्ञानेसुद्धा मनाच्या काही चलबिचलीतून उत्पन्न झालेली आहेत. आत्म्याचे संक्रमण हे हळूहळू माणसाच्या बुद्धीला कसे सुचत गेले त्याची कल्पना, वेलीतल्या जीवनरसासंबंधाचे वेदांत जे वर्णन आहे त्यावरून आली असे लिहिलेले आपण वाचतो. पण याला मानसिक चलबिचलींची दुसरीही एक उपपत्ती जोडता येण्यासारखी आहे. धडधाकट माणसाला जर काही आकस्मिक कारणामुळे तत्काळ मृत्यू आला तर तो मनुष्य नष्ट झाला असे मानावयास मन तयारच होत नाही असा प्रेमी माणसांचा अनुभव आहे. हा जर आता होता, तर हा एकदम नाहीसा झाला हे म्हणणे पटण्यासारखे नसते. तो येथे नसला तरी कोठे तरी असला पाहिजे, कारण तो एवढ्या तडाख्याने नाहीसा होणे असंभाव्य आहे असे मनातून वाटत असते. या वाटण्यातूनच, ज्या लोकांना तत्त्वज्ञानाची कसलीही ओळख नाही, त्यांना आत्म्याच्या संक्रमणाची कल्पना प्राप्त होते. महाराष्ट्रातील एका वयोवृद्ध ज्ञानशील

गृहस्थाने २६–२७ व्या वर्षी दिवंगत झालेल्या आपल्या हुषार व प्रेमळ मुलाची पत्रे प्रसिद्ध करताना म्हटले आहे की, मुलगा वारला असावा हे आम्हाला पटतच नाही. या गृहस्थाची विवेकबुद्धी जागृत आहे व म्हणून पुनर्जन्मावर आपला विश्वास नसत नाही, असे त्यांनी लगोलग सांगून टाकले आहे. पण प्रस्तुत मुद्द्यांचा ऊहापोह करताना त्यांचे जे पहिले उद्गार की, मुलगा वारला आहे हे पटतच नाही, त्याला फार महत्त्व आहे. हाच सूक्ष्म विचार ज्या मनाला प्रेमाचा दसपट कढ त्या मनात वागत असला तर त्याला, 'माझा सखा मेलेला नाहीच' असे निश्चित रूप येणे अगदी स्वाभाविक आहे; व एका माणसाची मनःस्थिती सोडून सर्व समाजचे समाज जर अशा काही विरहाच्या आपत्तीत सापडले असे मानिले तर त्यांच्या सामुदायिक मनाला हा विचार इतका जोराने ग्रस्त करील की, शेवटी त्याचे तत्वज्ञान बनेल व ते म्हणतील की, आत्म्याचे संक्रमण होत असते. मागे राहिलेली प्रियकरी दुःखाच्या आवेशात आपल्या पतीस उद्देशून आक्रंदून म्हणते, 'प्रियकरा, तुम्ही पुढे गेलात काय ? पण मीही तुमच्या मागोमाग येते पहा.' या तिच्या उद्गारात केवळ नाट्य किंवा भ्रांती हीच जर आपल्याला दिसली तर आपले मनोव्यापारांचे परीक्षण अजून अपुरे आहे असे म्हणावे लागेल. तिच्या या मानसिक कढातून तिच्यापुरते तरी हे ज्ञान उत्पन्न होते की, आपला प्रियकर खरोखरीच दुसरीकडे कोठे गेला आहे. मानव्याच्या सामुदायिक मनाचा हाच व्यापार मनात आणून पहावा; म्हणजे आत्म्याच्या संक्रमणाविषयी ज्ञाने उद्भवण्याचे एक कारण तरी आपल्याला निःसंशय कळले असे वाटेल. संक्रमण खरे की खोटे, हे या ठिकाणी सांगितलेले नाही; तर त्याची कल्पना कशी उद्भवली असावी व त्याचे तत्त्वज्ञान कसे बनले असावे याचे अनुमान केले आहे व ते तरी अशासाठी की, मनाच्या जाबातून सर्व तत्त्वज्ञाने निघतात हे सिद्ध व्हावे.

## क्षणभंगुरातून जडाचा तिरस्कार

यावरून असे वाटते की, समाजात उत्पन्न झालेली तत्त्वज्ञाने, अनुशासने किंवा नियमने यांचे मूलारंभ जर शोधावयाचे असतील तर त्यांच्या लगत आधीच्या काळातील मानवी मनाच्या चलबिचलींचा शोध घेतला पाहिजे. हे जे धार्मिक युग म्हणून वर सांगितलेले आहे त्यातच जगताच्या व विशेषतः मानवी जीविताच्या नश्वरतेचा विचार अत्यंत ठळकपणे आलेला दिसतो. मानवी जीवित क्षणभंगुर आहे, आज आहे उद्या नाही, जगत् म्हणजे सर्व भ्रम आहे, जीवित असार आहे व ती केवळ माया आहे, संसार हा ढगाच्या पडलेल्या छायेप्रमाणे आहे, यात शाश्वत असे काही नाही या विचारांची दाट पेरणी प्रस्तुतच्याच कालात सर्वत्र झाली. याला दोन निरनिराळ्या दिशांनी एकत्र येऊन ठेपलेले अनुभव कारण झाले असावे असे वाटते. मानवी जीवित अत्यंत अस्थिर आहे, हे महापुरुषांनी प्रत्यक्षच पाहिलेले होते. कारण

कलहयुगाचा अनुभव त्यांनी मनाने तरी घेतला होता. जे आज मनात आणावे, कल्पावे व स्थिर करण्याच्या मागे लागावे, ते अनेक कारणांनी हस्तगत होऊ नये' किंबहुना ज्या जीविताच्या अवकाशात ते व्हावयाचे ते जीवितच नष्ट व्हावे; इतकी अनिश्चितता सामाजिक जीवनाच्या पोटी वावरत होती; अर्थात ही क्षणभंगुरता या लोकांच्या मनाला चांगलीच दंश करून राहिली होती. बरे शांतता प्राप्त होऊन संथपणे मानवी जीविताकडे पहावे तर त्याचा अनिश्चितपणा बुद्धिमंताला पटण्यासारखाच होता. म्हणजे काय की, एकीकडे सामाजिक अनिश्चितपणामुळे व दुसरीकडे माणसांच्या जीवनाला जे वस्तुगत क्षणभंगुरत्व आहे ते बुद्धिदृष्टचा प्रतीत झाल्यामुळे हा भंगुरतेचा विचार या लोकोत्तर व्यक्तींनी चांगलाच उगाळून मांडला. एक गोष्ट मात्र लक्षात ठेवावयास हवी की, ते एका तोंडाने समाजाला स्थैर्य देणारी ज्ञाने बोलत होते व दुसऱ्या तोंडाने क्षणभंगुरता सांगत होते. [पण हेतू इतकाच की; जर तू क्षणभंगुर आहेस तर समाजात नीट तऱ्हेने वाग, भले म्हणून घे, ज्याने तुला निर्मिले त्याच्या अनुशासनांना धुडकावून देऊ नकोस असे माणसाला पटवावे.] पण चमत्कार असा झाला की, हे क्षणभंगुरत्व आणि जगताचे छायारूप हेच पुढल्या तत्त्ववेत्त्यांनी इतके घोटले की, त्याच्या जाणिवेने जी संसारावर भक्ती उत्पन्न व्हावी ती तर दूरच राहिली, व त्याच्या चिंतनामुळे संसारही खोटा, जगत्‌ही खोटे, हे सर्व बुडबुड्यासारखे आहे, यात गुंतून राहणे चूक आहे, आणि म्हणून संसारकर्दमात राबत असतानासुद्धा मनाने उदासीन असावयास शिकले पाहिजे, अशा प्रकारची ज्ञाने समाजात स्थिर झाली. यालाच असे फळ आले की, जे काही परमार्थविचाराचे असेल तेच खरे किंवा परमार्थातील अधिकाऱ्यांनी इहलोकाविषयी जे सांगितले तेच खरे. परमार्थासारखा ठेवा दूर टाकून देऊन जे केवळ जडाचा विचार करीत बसले ते मूढ होत आणि त्यांची ज्ञाने टाकाऊ होत, असा विचार समाजाच्या मनात भक्कम झाला. म्हणजे असे झाले की, **आधिभौतिक कल्पनांचा विचार हा अत्यंत गौण ठरला;** तो देहाचा विचार आहे असे त्याचे अवहेलनेचे रूप होऊ लागले. आत्म्याचा विचार करणारा तोच काय तो भला आणि देहाचा म्हणजे जडाचा विचार करणारा तो क्षुद्र मनाचा, या विचाराला पंडितांच्या दरबारी संभावितपणाचा मान प्राप्त झाला.

## मनाला आलेली मरगळ

पूर्वी जेव्हा नाईल, युफ्रेटिस, गंगा, इत्यादी नद्यांच्या तीरी साम्राज्ये झाली होती व त्यांतील बुद्धिमान लोकांना जरूर तेवढे स्वास्थ्य लाभले होते तेव्हा मनुष्ययोनी केवळ आत्म्याचा विचार करू लागली. ही पीडा सर्व पृथ्वीला बाधली. केवळ हिंदुस्थानातच नव्हे तर हिंदुस्थानापासून पश्चिमेकडे जाता जाता थेट रोमपर्यंत याच विचारांचा सुकाळ झाला आणि जिला शुद्ध आधिभौतिक शास्त्रामधील एक स्वतंत्र

नवीन कल्पना असे नाव देता येईल, अशी कल्पना दीडदोन हजार वर्षांच्या अवकाशात उत्पन्नच झाली नाही; व जर कोठे एखादा स्फुल्लिंग दिसला तर तो मातीखाली दडपून टाकण्याची तत्परता मात्र सर्वांनी दाखविली. असो, याचे विवेचन पुढे येणारच आहे. आमच्या हिंदुस्थान देशातही आत्मविचार इतका चेकाळला की, माणसांना देहाचा म्हणजे प्रपंचाचा विसरच पडला. व मग हे आत्मवादाचे तत्त्वज्ञान पसरता पसरता ब्रह्मज्ञान निघाले आणि त्यावरच मोठमोठाल्या तत्त्वज्ञान्यांची बुद्धी कित्येक शतके घिरट्या घेत राहिली. त्यांनी उत्पन्न केलेल्या तत्त्वज्ञानराशीत सबंध राष्ट्राचे मन गुदमरून गेले; फार काय सांगावे, ते अजूनही गुदमरलेलेच आहे. आपण म्हणतो की, शिक्षणाचा प्रसार झाला आहे, पण आताच सांगितलेल्या तत्त्वज्ञानाची पकड शिक्षितांच्या मनावरसुद्धा इतकी जबरदस्त आहे की, भौतिकज्ञानाचे प्रेम त्यांना अजून उत्पन्नच होत नाही. शिवाय ज्यांना सुशिक्षित म्हणता येईल अशा लोकांची संख्या केवळ अत्यल्प आहे. बाकीचा सर्व समाज 'उलट सुलट प्राण्या का गोते खासी, भरला पूर मायेचा लोंढा वाहुनिया जासी', 'लाळाचिये उडी पडेल बा जेव्हा, सोडविना तेव्हा मायबाप' इत्यादी तत्त्वज्ञानातच अजून पिचत पडला आहे !

## प्रस्तुतचे प्रतिपाद्य

वरील विवेचनावरून ध्यानात येईल की, समाजाच्या बांधणीचा जो क्रम त्यातूनच अवतार, गुरू, भोळेपण, क्षणभंगुरतेची सतत जाणीव, जडाचा तिरस्कार ही सर्व निघाली. त्यांची तत्त्वज्ञाने बनली व आपली मने त्यांच्या तावडीत कायमची सापडली. आत्मा, ब्रह्म, माया यांचे चिंतन श्रेष्ठ ठरले. पूर्वजांनी संपादिलेली सृष्टीज्ञाने आपण अवहेलू लागलो व सामर्थ्यांनी व सौंदर्यांनी गडगंज भरलेल्या वस्तुजाताला क्षुद्र लेखू लागलो. शेवटी मनाला मरगळ आली. म्हणून जड–सूक्ष्म, ब्रह्म–माया, क्षणभंगुरता, संसाराचे मिथ्यत्व यांचे विवेचन करून आपल्याला जडाच्या अभ्यासाला निःशंकपणे प्रवृत्त होता येते हे पहावयाचे आहे.

वस्तुजाताला 'जड' 'जड' म्हणून अवहेलणे बरोबर नाही. कारण सर्व काही जडच आहे–ज्याला ज्याला अस्तित्व आहे म्हणजे जे जे आहे ते ते जडच आहे. जड व सूक्ष्म शब्द आपण आपल्या ऐंद्रिय शक्तीच्या अपेक्षेने वापरतो. जे आपल्या इंद्रियांना प्रतीत होत नाही, जे दिसत नाही, जे ऐकू येत नाही, ज्याचा वास येत नाही, जे स्पर्शिता येत नाही, जे रुचिविषय बनविता येत नाही ते आपण सूक्ष्म शब्दाने ओळखतो. पण एवढ्याने, म्हणजे ती ती वस्तू गोचर होत नाही, म्हणून ती जड नव्हे असे म्हणता येत नाही. ती गोचर बनण्याइतपत आपल्या इंद्रियांच्या शक्ती वाढलेल्या नाहीत, त्या पुरेशा पल्लेदार व सूक्ष्माग्र झालेल्या नाहीत, इतकेच काय ते. नुसत्या डोळ्यांनी आपल्याला जे दिसत नव्हते ते आता दुर्बिणीने दिसू

लागले आहे. लक्षावधी मैल अंतरावर, विश्वकोशाच्या निर्मळ अंबरात दूर कोठे तरी लटकून राहिलेला आपला शांत प्रभेचा सुंदर चन्द्र आज हजारो वर्षे आपली स्वरूपसंपत्तीच माणसांना दाखवीत आला होता ना ? त्याच्या त्या सौंदर्याने मोहित होऊनच कवींनी आपल्या सुंदरीचे मुख त्याच्याशी तोलिले ना ? पण हे चंद्राला आजवर का साधले ? तर उत्तर इतकेच की, आम्हा माणसांच्या डोळ्यांची शक्ती अगदी अल्प होती. त्याला हा नजरबंदीचा खेळ यामुळे साधला. आता माणसांनी दुर्बिण शोधून काढली आहे. तिच्या बळावर लक्षावधी कोसांच्या त्याच्या स्थानावरून त्याला अलीकडे ओढीत ओढीत केवळ पंचवीस कोसांवर आणता येते व त्याचे रूपडे खरोखरीच कसले आहे, हे पहाता येते. आपल्या पायापासून पंचवीस कोसावर असलेला डोंगर जसा आपल्या साध्या डोळ्यांनी दिसतो, तसा दुर्बिणीच्या साह्याने लक्षावधी कोसावर असलेला चंद्र दिसतो. इतका नजीक तो येतो आणि मग त्याचे ते खडबडीत, खड्डे पडलेले व टेंगळे उठलेले पृष्ठ पाहिले म्हणजे आपल्या दृष्टीची शक्ती किती वाढली आहे हे पाहून विस्मय वाटतो. 'दुरून डोंगर साजरे' असे आपण डोंगराविषयी थोडचा अवहेलनेने म्हणतो. पण त्याचे साजरेपण खरोखरीचे नाही हे, ठरवावयास म्हण रचणारांना त्याच्याजवळ जाऊन त्याचे उग्र रूप पहावे लागले होते. पण चंद्रसुद्धा दुरूनच साजरा हे जे आता माणसांनी ठरविले आहे ते ठरवावयास त्यांना जागचे हालावे लागले नाही. तर डोळ्याच्या पुढे आणखी एक डोळा जोडून त्यांनी त्याचे वास्तविक रूप घरातूनच पाहिले, व सांगितले की चंद्रही दुरूनच साजरा आहे. याच दुर्बिणीच्या साह्याने पाहिल्यामुळे, म्हणजे त्या दूरदर्शिका व सूक्ष्मदर्शिका असल्यामुळे दूरचे पदार्थ जवळ करून पहाणे व केवळ कणरूप पदार्थ ठळक व ढोबळ करून पहाणे हे त्यास साधले आहे. म्हणजे असे झाले की, पर्यायाने इंद्रियांची शक्ती वाढली. हे जसे एका इंद्रियाचे तसेच सर्वांचे यापुढे होणे पूर्णपणे शक्य आहे. जे रूपरसगंध इत्यादि आपल्याला आज प्रतीत होत नाहीत ते इतउत्तरकाळात होणे अगदी शक्य आहे. दूरदर्शिका व सूक्ष्मदर्शिका या पर्यायाने नेत्रांची शक्तीच वाढवितात.

हीच गती वाढत चालली तर फुलांतून बाहेर पडणारे जे सुगंध ते डोळ्यांनी दिसू लागतील व कदाचित् त्यांच्या रंगावरूनही त्यांच्या बरेवाईटपणाच्या कल्पना, वास घेण्याच्या आधीच माणसांना करता येतील. माणसांचे हवेत आलेले उच्छ्वास स्पष्ट दिसू लागतील आणि त्यांच्या रंगावरून माणसाचे प्रकृतिमान ठरविण्यास डॉक्टर लोकांना एक नवे साधन उपलब्ध होईल. चित्ताची कालवाकालव झाल्यामुळे त्यावर उठणाऱ्या रागलोभाच्या वाफा, की ज्या आज आम्हास चोरून ठेविता येतात किंवा दाखवावयास हव्या असून शब्द लटके पडल्यामुळे दाखविता येत नाहीत, त्या स्पष्ट दिसू लागतील. आज नुसत्या 'एक्स रे' ने पिंडगत अस्थी पहाता येऊ लागल्यामुळे डॉक्टरांना केवढा आनंद झाला आहे! पण सर्व शरीर

जणू काही पारदर्शक अशा काचेचेच केल्यासारखे अंतर्बाह्य स्वच्छ दिसावे अशी योजना झाली म्हणजे सर्व गूढ दोषांचा आविष्कार सहजच होईल, आणि रोग-निवारणाचे काम डॉक्टरांना किती तरी सोपे जाईल. पर्यायाने दृष्टीची शक्तीच यंत्रसाह्याने वाढली म्हणजे हे सारे शक्य कोटीत येईल.

याच विचाराच्या प्रणालीने पुढे गेलो तर आज अंतरिक्ष जे आपल्याला अगदी मोकळे दिसते ते किती तरी निरनिराळ्या सूक्ष्म वस्तूंचे संचार–सरोवर आहे असे दिसू लागेल. कल्पना दिसावयास धाष्ट्र्याची दिसेल; पण जी करावयास तर्काची अडचण वाटत नाही ती ही की, जे जे आहे असा निश्चय आहे किंवा आग्रह आहे ते ते जडच आहे. आणि म्हणून आत्म्याला जर अस्तित्व असेल तर तो कालान्तराने गोचर ठरण्यास काहीच हरकत पडू नये. जे आत्म्याचे तेच परमात्म्याचे. त्याची रूपे कशीही असोत; ती कोणत्याही इंद्रियाला गोचर होवोत; पण गोचर झाली पाहिजेत इतके म्हणावयास हरकत नाही. ती भावगम्य का बुद्धिगम्य हा विषय स्वतंत्र आहे. ती कशानेही गम्य असोत. प्रस्तुतचे अनुमान इतकेच की, 'गम्य' शब्दाने अस्तित्व दर्शविले जाते व जे आहे ते, मानव्य अत्यंत प्रगल्भ झाल्यावर तरी गोचरतेत उतरले पाहिजे. 'मला कळले' 'मला ज्ञान झाले' या शब्दप्रयोगांनी योगी लोक जर काही 'आहे' ते कळले व त्याचे ज्ञान झाले' असे म्हणत असतील तर ते असणारे, केवळ मनबुद्धीना गम्य न राहता, निदान त्यांना तरी गोचर होण्यासारखे आहे; म्हणजे ती वस्तू आहे. केवळ मनाला किंवा बुद्धीला अस्तित्वाचा दाखला पटला असे म्हणून भागविलेले नव्हे तर 'साक्षात्कार' शब्दाच्या धात्वर्थाप्रमाणे प्रत्यक्ष अक्ष–विषय बनणे, म्हणजे कोणत्या तरी एका गोचरतेत उतरणे असा प्रकार व्हावयास हवा. योग्याचे म्हणणे बरोबर आहे असे असले तरच हे अनुमान आहे. कोलंबसाला ज्याप्रमाणे क्षितिजावरचा ढग जमिनीसारखा दिसला किंवा दूरदर्शिकेतील काचगत दोषामुळे एखादे वेळी शास्त्रशोधकाला जसे भलतेच दिसावे व तेच खरे वाटावे त्याचप्रमाण योग्याचे होते की काय हे ठरविण्याचा प्रस्तुतचा मुद्दा नाही. जर त्यांचे म्हणणे खरे आहे असे असले किंवा ठरले तर त्यांना जे काही कळले ते जर 'आहे' तर ते गोचर व्हावयास हरकत असू नये इतकेच म्हणावयाचे आहे. गोचरतेत उतरले पाहिजे हाही शेवटचा मुद्दा नाही. ते जर आहे तर ते जडच आहे व जडच आहे तर प्रगल्भ मानव्याला गोचरच असले पाहिजे असा मुद्दा आहे. म्हणजे सूक्ष्म असे काही नाही. पण ही विचारप्रणाली पुढे जाते.

वस्तू जरी आज किंवा हजारो वर्षे गोचर झाली नाही असे मानले तरी ती आहे, याचाच अर्थ ती आकलनाचा विषय होऊ शकते. हे आकलन आमच्या आजच्या इंद्रियांनी होवो किंवा एकाद्या नव्या फुटणाऱ्या इंद्रियाने होवो किंवा ज्या मनाला सहावे इंद्रियच मानिले आहे त्या मनाच्या द्वारा होवो. ती वस्तू आहे इतके पतकरण्यास हरकत नसली म्हणजे आत्मा व परमात्मा यांच्या जडरूपासंबंधी शंका राहू

नये. आत्मा व परमात्मा यांना जड म्हटल्याने त्यांचे वैभव कमी होते असे मानण्याची जरुरी नाही. वैभव कमी होतच नाही. पण त्यांचे अस्तित्व मान्य करावयास जी कबुली हवी तीच देऊन त्यांच्या वैभवाला कायमपणा मात्र आणण्यासारखे होते. जो जो त्यांच्या अस्तित्वाचा आग्रह तत्त्ववेत्ते, योगी, व कार्यकारणवादी हे जास्त जास्त धरतील तो तो त्यांच्या जडत्वाविषयी शंका कमी होऊ लागेल. मन सोडून बाकीच्या इंद्रियांना गोचर झाली म्हणजेच एखादी वस्तू जड झाली असे नाही. ती मनाने गोचर झाली म्हणजे मनाला तिचा 'साक्षात्कार' झाला तरी पुरे आहे. प्रथमपरिच्छेदात गोचरत्वावर म्हणजे सध्याच्या इंद्रियांचा विषय होण्यावर जो जोर दिला आहे तो शास्त्रांनी सूक्ष्मत्वाच्या मर्यादा कशा संकुचित होत चालल्या आहेत व उत्तरोत्तर जड असे काहीच कसे उरणार नाही, हे सांगावयापुरता आहे. प्रत्यक्ष आत्मा व परमात्मा हीच जोडी फार झाले तर 'सूक्ष्म' कोटीत तत्त्ववेत्त्यांच्या कल्पनेप्रमाणे तरी निदान राहील. पण तिलाही तिच्या 'अस्तित्वाच्या' मुद्द्यावर जड कोटीतच घालता येण्यासारखे आहे एवढेच येथे सांगावयाचे आहे.

अस्तित्व मानिले म्हणजे ही विचारप्रणाली पतकरण्यास हरकत असू नये. केवळ ज्ञानमात्र जे त्याचे तरी अस्तित्व बुद्धीच्या किंवा इंद्रियरूप दूरदर्शिकेने प्रतीत होत असले म्हणजे ते 'अस्ति' रूप म्हणून सर्वंकष अशा जडकोटीत येण्यास हरकत नाही. म्हणून जड शब्दाने जी मनात अवहेलनाबुद्धी उत्पन्न होते ती होऊ देणे बरोबर नाही. व सूक्ष्म शब्दाने जी काही एक विशेष पावित्र्याची कल्पना येते तीही येण्याची जरुरी नाही. कारण, आरंभी म्हटल्याप्रमाणे जड व सूक्ष्म या कल्पना इंद्रियशक्तीच्या सापेक्षतेने बनविल्या आहेत. त्याच शक्ती अत्यंत प्रगल्भ झाल्या व त्यांना भाव किंवा ज्ञान ही रूपे प्राप्त झाली म्हणजे त्यांच्याद्वारा, जे आत्यंतिक सूक्ष्म म्हणून मानिले आहे तेही जडकोटीत आणण्यास काहीच हरकत नाही. किंबहुना सूक्ष्मकोटीच नाही. अर्थातच जडत्वाविषयीची क्षुद्रपणाची, अवहेलनेची किंवा अपवित्रतेची कल्पना काढून टाकावयास हवी असे वाटू लागते. आब्रह्मस्तंबपर्यंत वस्तूंतील स्तंभापासून ब्रह्मापर्यंत वर चढत जाता जाता, सर्व वस्तू या वस्तू आहेत म्हणजे अस्तित्वरूप आहेत हे पतकरिले म्हणजे त्या सर्व जड शब्दानेच संबोध्य आहेत असे मानावयास हरकत उरणार नाही. फरक करावयाचा तो कोणते किती जड आहे इतकाच काय तो. स्तंब हे आताच्या आपल्या दृष्टीने अत्यंत जड व ब्रह्म हे अत्यंत कमी जड. वास्तविक पहाता हे प्रमाण उरफाटे करावयास हवे. स्तंब हे अत्यंत कमी जड आहे आणि स्तंबासारखे परार्धकोटी सूर्यचंद्र ज्या मूळ वस्तूला उत्पन्न करता येतात ती जडत्वाच्या पितृस्थानी असलेली खरी जड वस्तू होय असेसुद्धा म्हणावयास हरकत नाही. पण, ही गोष्ट ध्यानात घ्यावयास हवी की, या ठिकाणी, जड शब्दाने स्तंबापासून तो ब्रह्मापर्यंत सर्व अस्तिरूप जे जे, ते ते अभिप्रेत आहे व

दूरदर्शिका, सूक्ष्मदर्शिका इत्यादीकांपासून तो भाव आणि ज्ञान इत्यादीकांपर्यंतची साधने हीही अभिप्रेत आहेत.

## ब्रह्म आणि माया

आता वर लिहिल्याप्रमाणे ब्रह्म, माया, यांचा विचार करावयास हवा. तो करताना आधिभौतिक त्यात कसे येते हे दिसेल. 'ब्रह्म सत्य जगन् मिथ्या' या वेदांत सार–वाक्याच्या आश्रयाने आपण यापुढचे बोलणे केले पाहिजे. ज्यात ब्रह्माचे अस्तित्व पतकरले आहे असे तीन स्वतंत्र पक्ष आपल्या मनात उद्भवतात, ते असे– ब्रह्महो आहे व जगत्‌ही आहे. ही दोन्ही अस्तित्वरूप अर्थात खरी आहेत, हा एक पक्ष. दुसरा असा की, ब्रह्म हेच शाश्वत सत्य असून जे जगत् आपल्याला सध्या दिसते ते ऐनजिनसी केवळ आभासरूप म्हणजे असत्य आहे; तिसरा असा की, ब्रह्म हेच शाश्वत सत्य आहे व जगत् हे आकारवैशिष्टचापुरते खोटे असून त्याचे मूळचे कणरूप खरे आहे; या तीनही पक्षात ब्रह्म हे कायमचे धरलेले आहे. चवथा पक्ष असा की, ब्रह्म मानण्याची जरुरी नाही. जगत् आहे व ते खरे आहे. कारण संवेदनाच तशी आहे. शेवटी पाचवा पक्ष म्हणून असा सहज सांगता येईल की, जो ब्रह्महो नाही म्हणतो, व विश्वही असत्यच मानतो. हा पक्ष पहिल्या पक्षाचे बरोबर दुसरे टोक होय. वास्तविक पहाता या सर्व मनाने कल्पावयाच्या गोष्टी आहेत. यापैकी प्रत्येक सूत्राचे रूप बारकाईने विवेचिता येण्यासारखे असून आजवर त्या त्या रूपाचा पक्षपात घेऊन उठलेले शेकडो जाणते लोक झालेले आहेत. या सूत्रांची निदान स्थूल तरी पहाणी करणे सोयीचे होईल. 'ब्रह्म सत्यं जगन् मिथ्या' या सूत्राच्या अंमलात दुसरा व तिसरा असे दोन पक्ष वागतील. कारण त्यात ब्रह्म हेच शाश्वत सत्य धरलेले आहे व जगत् हे स्वप्न म्हणून किंवा विघटनक्षम म्हणून असत्य आहे असे मानिले आहे. म्हणजे काहींच्या मते जग केवळ आभासमय म्हणजे स्वप्नरूप आहे. जे जे आपल्या इंद्रियांना दिसते, ते मुळात नाहीच; ते असत्य आहे; म्हणजे एकरूपाचे असून दुसऱ्या रूपाचे दिसते असे नव्हे; तर स्वप्नातील वस्तूंना ज्याप्रमाणे अस्तित्वच नाही तसे जगताला अस्तित्वच नाही असे तें मानतात. राजाला स्वप्न पडले की, हातात खापर घेऊन आपण भीक मागत आहो. ते स्वप्न पडत असताना राजाला अत्यंत दुःख होत असते. पण जागा झाल्यावर म्हणजे त्याचे कायमचे रूप त्याला प्राप्त झाल्यावर स्वप्नाचे असत्यपण त्याला कळून येतें. हे स्वप्न जसे असत्य, तसे या मताप्रमाणे जगत् हे असत्य आहे. म्हशींने चिखलात पाय दिला; तेथे जो लहानसा खळगा पडला, त्यात सूर्याचे प्रतिबिंब पडले. आता हे आपले तेथले प्रतिबिंब खरेच आहे असे मानून स्वतःला हीनावस्था प्राप्त झाली आहे असे सूर्याने कधी मानिले आहे काय? प्रतिबिंब हा केवळ आभास आहे; तसेच हे जगत् खोटे आहे असत्य आहे म्हणजे हा आभास मौजेसाठी उत्पन्न करणारे

जे ब्रह्म ते फक्त सत् म्हणजे असणारे आणि बाकी सर्व असत्, म्हणज आहेसे वाटत असले तरी मुळीच नसणारे, असे आहे. दुसरे जे कोणी ब्रह्म सत्य पण जग मिथ्या हा न्याय मानितात त्यांचे जगाच्या मिथ्यत्वाविषयीचे मत आताच सांगितलेल्या मताहून निराळे आहे. त्यांच्यामते जगत् असत्य म्हणजे विघटनक्षम आहे. विश्वाची जी घटना आज आहे ती अशीच पूर्वी होती किंवा पुढे राहील असे मुळीच नाही. सूर्य, चंद्र, पृथ्वी, तारे हे सर्व फुटून तुटून केवळ कणरूप होऊन जातील, व कदाचित् कोणच्यातरी निराळ्या आकृतींचे निराळे चंद्र, सूर्य इत्यादी बनत राहील किंवा राहणारही नाहीत. म्हणजे असे की, विश्वकोशात कणराशी हा राहील पण त्याला आज प्राप्त झालेले आकार, त्याची आजची रूपे किंवा तेजे राहतील असे नाही. काहीएक कणपुंज विशिष्ट रूपाने व परिणतीने बनतो, व काही कालानंतर छिन्नविछिन्न होऊन पुन्हा कणरूपाप्रत प्राप्त होतो. पण मुळात कण नाहीत, आहेत असे जे वाटते तेच भासमय आहे, असे मात्र हे मत नव्हे. ते तसले मत वर सांगितले आहे. या दोन मतात स्पष्ट फरक हा की, पहिले ब्रह्म मानते व इतर काहीही मानीत नाही. व दुसरे ब्रह्म मानते पण हा विश्वकोश उत्पन्न करावयास लागणारी जी मूळची सामग्री तिचे मूळरूप सत्य आहे असे मानते. कुंभार खरा व घट तयार करावयास लागणारी जी मूळ माती तीही खरी; घट मात्र नाशवंत आहेत असे हे मत आहे. पण, वरचे मत मात्र असे की, कुंभार तेवढा खरा आणि ही जी विश्वाची सर्व रचना आहे हा केवळ आभास. ब्रह्म खरे हे दुसऱ्या व तिसऱ्या पक्षालाही लागू आहे. पण, जग खरे म्हणजे काय याचा बोध होणे मात्र कठीण आहे. ते खरे म्हणजे दुसऱ्या पक्षातल्याप्रमाणे स्वप्नवत नव्हे, येथपर्यंत बरोबर आहे. पण खरे म्हणजे बदलणारे नव्हे किंवा नाशवंत नव्हे, असे जर हे मत मानीत असले तर ते विशेष विचारार्ह आहे असे वाटत नाही. विनाश आणि विघटना, संहारणी आणि उभारणी ही मानलीच पाहिजेत. कारण ती न मानणे हे घडत असलेल्या गोष्टींशी विसंवादी आहे. तेव्हा जगत् खरे आहे, याचा अर्थ ते स्वप्न नव्हे इतकेच; पण विघटनक्षमही नव्हे असे मात्र नव्हे. असा या मताचा अर्थ धरला म्हणजे पहिल्या पक्षात व तिसऱ्यात काहीच फरक नाही. जे कोणी जगत् खरे आहे असे म्हणतात, पण खरे म्हणजे काय तर स्वप्नवत् नव्हे येथपर्यंत येतात, तथापी विघटनक्षम आहे की नाही आणि म्हणून असत्य आहे की नाही, या विचारापर्यंत मजल नेत नाहीत ते या मताचे अभिमानी होत. जगत् आहे या रूपात खरे आहे असा आग्रह धरणे हे विचारशक्तीस सोडून आहे. म्हणून या मताचा विचार करण्याचे कारण नाही.

## भौतिकात चालू असलेले मत

चवथे मत ब्रह्म मानीत नाही पण जगत् मात्र मानते; व जगत् विघटनक्षम

आहे असेही मानते. आजकालच्या भौतिकशास्त्रात हे मत रूढ आहे. त्यांच्या मते हा दिसणारा विश्वकोश कोठून व कसा निपजला हे आपल्याला मुळीच माहीत नाही. हा उत्पन्न करावयास कोणी कर्ता असावयास हवा असेही नाही. हे सर्व वस्तुजात विकसते, बदलते म्हणजेच रूपांतर करते व कदाचित् कणरूपाप्रतही जाते. याचे वयोमान इतके सुदीर्घ आहे व याचे विकसन व रूपांतर ही इतकी सूक्ष्म व इतक्या खोल नियमनांनी अंकित आहेत की, हे सर्व आपोआपच होत आहे असे मानावयास हरकत नाही. लक्षावधी वर्षांवर ज्या नियमाचे व्यापार पसरून चालतात व जो अंमल वस्तुजात बिनचूक आणि बिनतक्रार पाळते ते नियम इतके सुदीर्घ व कायम असे पाहिल्यानंतर आमच्या आजच्या जीवितात चलबिचल करणारा दुसरा कोणी सर्वस्थ असा कर्ता मानावयाची जरूर आहे असे नाहीं. जे नियम माहीत होत आहेत व ज्यांच्या कैचीप्रमाणे आमचे जीवित लक्षावधी वर्षे वागत आहे त्या नियमांच्या मागे मनाने जाववतसुद्धा नाही. कारण नियमांचा आशय घेऊन मागे जाता येत नाही, म्हणून सर्व वस्तुजाताच्या कोटयावधी किंवा अब्जावधी वर्षांच्या जीविताच्या मागे जाऊन तेथे आदिकारण काय असेल याची कल्पना करीत बसणे म्हणजे मनाचा नसता हळवेपणा दाखविण्यासारखे आहे. एवढया सुदीर्घ नियमनांच्या मागे कोणी असावयास हवा असा आग्रह तरी कशाला धरावा ? जेव्हा आधिभौतिक शास्त्राचा उदयच नव्हता व विश्वरचनेतील नियमावली ध्यानात आल्या नव्हत्या व त्यांचे जवळ जवळ अनंतत्व प्रतीत झाले नव्हते, त्यावेळी कोणातरी कर्त्याला शरण जावे व निदान तो आहे असे मानावे हे स्वाभाविक होते. पण ही नियमने माहीत झाल्यानंतर व त्या नियमांना ज्यांनी जन्म दिला ती नियमने अजूनही माहीत व्हावयाची राहिली असताना, व शिवाय याच नियमनांचा अंमल आमच्या जीविताच्या घटनेवर कायम आहे हे माहीत असताना इतर कोणा कर्त्याच्या अस्तित्वाची कल्पना करणे, तर केवळ करमणूक म्हणून करावी. कारण त्या कल्पिलेल्या कर्त्याचा व आपला कित्येक कोटी वर्षांतसुद्धा संबंध आला नसेल. हे मत धरल्यामुळे या पक्षाचे अभिमानी असे स्वच्छ म्हणतात की, वस्तुजात आहे, ते वाढत बदलत आहे. यापलीकडे काही एक म्हणता येण्यासारखे नाही. खुद्द आपणही ही जी काही सृष्टीची वाढ चाललेली असते त्या वाढीतीलच एक अंश आहो; आणि म्हणून सृष्टीला वगळून आपले स्वतंत्र अस्तित्व कल्पिता येत नाही. अगदी समुद्रतळाच्या केवळ उद्भीजरूप असलेल्या कसल्यातरी शेवाळयांतून जिला काही विशेष प्रकारची आकृती आहे अशी वनस्पती उत्पन्न झाली, त्याच वनस्पतीचे रूपांतर होता होता समुद्राच्या तळाशी वागणारे खेकडे किंवा तत्सम प्राणी हे उत्पन्न झाले, त्यांचेच कालांतराने मासे बनले; कालांतराने त्यांच्याच मगरी झाल्या, या काही वेळ पाण्यात राहू लागल्या व काही वेळ समुद्रकाठच्या उन्हात राहू लागल्या, कालांतराने यांनी पुढले पाय उचलले व त्या ढुंगणावर टेकून बसू लागल्या, यालाच आम्ही बेडूक

म्हणू लागलो. कालांतराने यांनी मागले पाय उचलले व यांचीच चिखलात लोळ-णारी डुकरे झाली. अशाच प्राणिविशेषांतून पुढे जाता जाता वानर उत्पन्न झाला. कालांतराने त्याचा गुरुत्वमध्य खाली सरकून तो उभा राहू लागला; आजपर्यंत वास घेऊनच त्याचा संसार सुरू असे; आता तो झाडाच्या टोकावर जाऊन बसू लागला व लांबचे हेरू लागला; त्यामुळे त्याची दृष्टी पल्लेदार बनू लागली. हे होत असताना इंद्रियातील संस्कारांनी त्याचा मेंदूही प्रगल्भ होऊ लागला, त्याच्या भावना बळा-वल्या, तो खाद्य, पेये शोधू लागला, त्याला अर्थकल्पना प्राप्त झाली, त्याने आपले संघ बनविले. या पद्धतीने समुद्रतळाच्या शेवाळचांतून, दर रूपांतरला कित्येक दश-सहस्र वर्षांची मुदत घेऊन हा आजकालचा मनुष्यप्राणी कित्येक लाख वर्षांतून उत्क्रांत होता होता बुद्धी, भावना इत्यादींनी अन्वित झालेला असा बनून राहिला. हा केवळ तर्क नव्हे, शेवाळयांपासून माणसापर्यंत हे जे सुदीर्घ असे विकसन चालले आहे ते पडताळून पाहता येते. या सर्व उद्भिज्जांच्या व प्राण्यांच्या शरीराचे सूक्ष्म निरीक्षण केले असता हे विकसन काही विशेष प्रकारच्या नियमान्वये चाललेले आहे हे स्पष्ट दिसते. ती नियमने नष्ट करणे, बदलणे किंवा त्यात नवी भर घालणे हे त्या नियमनांनी उत्पन्न केलेले जे आपण त्या आपल्या हाती नाही. ही नियमने आप-ल्याला जसे वागवतील, बनवतील, तसे आपण वागले, बनले पाहिजे. ज्या वेळी आपण म्हणतो की, मनुष्य सृष्टीवर ताबा चालवीत आहे, त्यावेळी त्याचा अर्थ इतकाच आहे की ढोबळ दिसणारे जे सृष्टीचे व्यापार त्यांची नियमने कोणती हे आपण शोधून काढतो व त्यांच्या बळावर आपले बळ वाढवितो. असे असल्यामुळे यात स्वतंत्र 'कर्ता' असा कोठे येतो? यंत्रांतून निपज मिळालेल्या वस्तूंना ज्याप्रमाणे यंत्राची नियमनेच लागू, तसे आपणा माणसांनासुद्धा ज्या सृष्टिनियमनांनी आपला बनाव केला, तीच नियमने लागू. आपण दुसऱ्या कोणास शरण जावयाचे? ज्याला शरण जावयाचे म्हणता त्याला हुडकावयाचे तर जडसृष्टीचे आपण अवयव नव्हो म्हणजेच तदुत्पन्न आपण नव्हो अशी कल्पना करावी तेव्हाच हे संभवते. पण आपले रूप काय आहे व आपण कसे झालो हे आताच पाहिले. शिवाय ज्याला शरण जावयाचे म्हणता तो किती कोटी वर्षांच्या मागे दडी देऊन बसला आहे हे कल्पनेनेसुद्धा ओळखवत नाही. आणि म्हणून ज्या सृष्टिनियमनांचा अंमल आमच्या-वर अत्यंत अविरत व गय न करता असा चालू आहे, ती पाहणे, त्याचे अधिराज्य मानणे एवढेच काय ते आम्हास करता येण्यासारखे आहे. तो जो दूरस्थ 'कर्ता' 'कर्ता' म्हणून म्हणतात तो या नियमातून काही अचानक अशी सोडवणूक करी-तच नाही. मग त्याच्याकडे जा कशाला? किंबहुना तो आहे असे मानण्याची तरी जरुरी काय आहे?' 'या एवढ्या वस्तुजाताला कोणी कर्ता हवा, म्हणून तो तसा आहे असे म्हणणे भाग आहे' असे जर म्हणत असाल तर त्या कर्त्याला तरी कोणी केले असा पुढचा प्रश्न येतो. यावर तुम्ही म्हणता की, 'तो कर्ता मूळचाच आहे.'

यावर प्रत्युत्तर इतकेच की, 'तो कर्ता मूळचाच आहे असे मानावयाच्या ऐवजी आम्ही ही सृष्टीच मूळची आहे असे मानतो.' म्हणजे असे झाले की, या मताचे लोक सृष्टी मानतात, पण ब्रह्म म्हणून जे काय ते मानीत नाहीत.

पाचव्या पंथाचे लोक हे ब्रह्मही मानीत नाहीत आणि जगत्‌ही मानीत नाहीत. वरील मतात ब्रह्म न मानण्याचे कारण आलेलेच आहे. जगत् न मानण्याचे त्यांचे कारणही असेच थोडक्यात आहे. ते म्हणतात की, सृष्टी आहे हे खरे, नियमने आहेत हेही खरे, पण हे जे सूर्य, चंद्र, पृथ्वी, तारे आपणास दिसतात, हे आधिभौतिक शास्त्रज्ञांच्या मतानेसुद्धा शेवटी विघटनक्षम म्हणजे नाशवंतच आहेत ना? त्यांचा कणराशीच होणार आहे ना? हा कणराशी तरी तुमच्या ब्रह्मानेच केला ना? आणि ब्रह्म कोणी केले, आणि त्या कर्त्याचा कर्ता आणि पुन्हा त्या कर्त्याचा कर्ता कोणी केला हे काहीच कळत नाही. अर्थात् नाशवंत जगत् कालावसानी नाहीच व ब्रह्म हे तर्कसिद्ध नाही; म्हणजे शेवटी काही नाही! अशा प्रकारे 'ब्रह्म सत्यं जगन् मिथ्या' या वाक्याच्या आश्रयाने जड व सूक्ष्म यांचा विचार करताना वरील विवेचन उद्‌भवले. म्हणून परत वळून जडसूक्ष्माकडे पुन्हा लक्ष दिले पाहिजे.

## त्याचे तोच जाणे

ब्रह्मवेत्त्यांनी अथवा आम्ही ब्रह्मवेत्ते आहो व सर्व वस्तुजात केवळ आभासमय आहे असे म्हणणारांनी आजवर काय साधिले आहे हे पहाण्यासारखे आहे. माहीत असलेल्या विद्यमान किंवा प्राचीन ब्रह्मवेत्त्याने शेवटी काय साधिले म्हणून पाहिले, तर असे दिसून येईल की त्याच्या आत्म्याला स्वतःची ओळख नीट पटली, मायाजालातून मुक्त होऊन तो आपल्या मूळच्या ब्रह्मस्वरूपास पोहोचला, हे किंवा अशासारखे काही घडून आले व म्हणून ब्रह्मवेत्त्याला कायमचा आनंद प्राप्त झाला. आता ब्रह्मवेत्त्याचे हे म्हणणे त्याचा अनादर न करताना, केवळ जिज्ञासाविषय म्हणून विचारात घ्यावयास हवे. जे काय झाले असे ब्रह्मविदाचे म्हणणे आहे, ते त्याने कसे घडवून आणले व ते घडल्यानंतर त्याला कसले समाधान उत्पन्न झाले याची माहिती आपल्याला नाही. ही सर्व गोष्ट केवळ त्याच्या स्वानुभवाची आहे. त्याचे मार्ग आपण चोखाळलेले नाहीत, म्हणून त्याविषयी बोलता येत नाही व ध्येयप्राप्ती झाल्यानंतर त्याला काय वाटले हे सह-अनुभूती नसल्यामुळे आपल्याला सांगता येत नाही. ते त्याचे तोच जाणे. ते कसे असते ते सांग असे म्हणणेही बरोबर नाही. कारण साखर गोड कशी असते किंवा झोप लागत असताना कसे सुख उत्पन्न होते हे विवरून कसे सांगता येईल? ज्याने साखर खाल्ली आहे किंवा झोप घेतली आहे त्याचे सुख जर अनुभवायचे असेल तर ती आपण खाल्ली पाहिजे व ती घेतली पाहिजे. पण त्या स्वानुभवापर्यंत तरी कसे पोचावयाचे? उत्तर हे की, ज्या मार्गाने जावयाचे असे तो म्हणतो, त्या मार्गाने जावे तेव्हा. आपण या मार्गात पडलेले नाही, तर मग या मुद्द्यावर त्याच्याशी मतभेद व्यक्त करून वाद माज-

विता येण्यासारखा नाही. परिश्रम केल्याचा व यशःप्राप्ती करून घेतल्याचा गौरव आपण त्यास पोचता केलाच पाहिजे. पण या प्रकरणी अनेक खोल शंका मनात डोकावतात.

## काही खोल शंका

या ब्रह्मविदांना जे ' कळले कळले ' म्हणून वाटते किंवा काही साक्षात्कार झाला असे वाटते ती त्यांची स्वतःचीं फसवणूक तर नव्हे ना ? मानसिक सामर्थ्यविकसनाच्या कामी थोडे पुढे गेल्यामुळे सामान्य लोकांच्यापेक्षा त्यांना काही निराळा प्रत्यय आला व त्यालाच ते शेवटचे ज्ञान असे समजू लागले नाहीत ना ? या तपस्व्यांना शेवटच्या ज्ञानाची उंची किती असावयास हवी याची कल्पना झाली होती ना ? त्यांच्या ऐहिक ज्ञानाच्या भांडवलाकडे पाहिले म्हणजे त्यांना आपल्या भव्य प्राप्तव्याची कल्पना तरी कशी असेल, असे जे वाटते ते खरे नसेल ना ? ज्याचे चिंतन करावे तेच कालांतराने दिसलेसे वाटू लागावे असे तर होत नाही ना ? मनात जे नेहमीच वसे ते या समाधिरूप स्वप्नात दिसे असे तर झाले नाही ना ? साक्षात्कार झाला, सर्व काही कळले याचा अर्थ विश्वाचा प्रश्न उलगडला असाच धरावयाचा ना ? का केवळ ऐहिक ज्ञानाच्या वरचे म्हणजे परस्परविरोधी असे जे इहलोकीचे तत्त्वविचार आहेत, त्यांचा समन्वय करणारे असे एखादे गंभीर तत्त्वज्ञान त्यांना प्राप्त झाले इतकेच समजावयाचे ? शेकडो स्थूल सृष्टिव्यापारांच्या मागे ज्याप्रमाणे एक काही पार्थिव तत्त्व उभे असते व त्याची ओळख झाली असता सृष्टीव्यापाराचे नानात्व जाऊन हे तत्त्वरूप एकत्व दिसू लागल्यामुळे भौतिक तत्त्वज्ञाला आनंद वाटावा त्याप्रमाणे, परस्परांशी सारखा विरोध करणारी जी मनोव्यापारातील तत्त्वे दिसतात त्या सर्वांना उत्पन्न करणारे एक मातृ–तत्त्व त्यांच्या मागे उभे आहे व ते या तपस्व्यांना माहीत झाल्यामुळे त्यांना असा अलौकिक आनंद होतो काय ? पण या सर्व शंका या एकाच विचारावर आधारलेल्या आहेत की, ब्रह्मविदाची आत्मवंचना झाली आहे की काय ? येथे दोन पक्ष कल्पिले पाहिजेत.

## वैचारिक सचोटी

काही चिंतन करणारे फसतही असतील व कशाला तरी खरे ज्ञान समजून ' कळले कळले, ' म्हणून समाधान पावत असतील व अशांची संख्याही खूपच मोठी असेल. पण त्यांच्यातील काही लोक मात्र एवढे विलक्षण बुद्धिमान् व वैचारिक सचोटी संभाळणारे असतात की, त्यांनासुद्धा आत्मवंचनेचा बोध होत नसेल; किंवा ते कोणत्या तरी मधल्या एखाद्या टप्प्याला शेवटचे ज्ञान म्हणत असतील असे म्हणण्याचे साहस करवत नाही. शंकराचार्यांसारखा बुद्धिमंतांचा महान् अग्रणी किंवा डोळस श्रद्धाळूंचा तुकारामासारखा थोर संत असले लोक केवळ मनोविक-

मनातील आपल्याहून पुढच्या एखाद्या टप्प्याला किंवा समन्वय करणाऱ्या एखाद्या ज्ञानाला ब्रह्मज्ञान समजत असतील असे म्हणावे तरी कसे? जो मोठमोठाल्या शेकडो बुद्धिमान् वावदूकांना गुंडाळून पुढे निघून गेला व 'अग्नि गार आहे असे श्रुतिशताने जरी सांगितले तरी मी ते खरे मानणार नाही; कारण प्रत्यक्ष ज्ञान त्याच्या उलट आहे' असा मतस्वातंत्र्याचा आग्रह धरणारा शंकराचार्यांसारखा तपस्वी, लोकांची किंवा आपली वंचना काय म्हणून करील? तसेच जो प्रथम प्रथम आपल्याला आपल्यासारखाच अगदी शुद्ध संसारी माणूस दिसतो, ज्याला परमार्थाचे काहीसे अस्वास्थ्य उत्पन्न झाले आहे असे पुढे दिसू लागते, या अस्वास्थ्याच्या काळात आपल्या मनालासुद्धा परिचित असलेले विचार जो बोलत आहे हे स्पष्ट दिसते, ढोंगी साधूंच्या ब्रह्मज्ञानावर जो कडाकड कोरडे ओढतो, 'घरोघरी अवघे झाले ब्रह्मज्ञान' असे म्हणून मामूल ब्रह्मज्ञान्यांची जो सूक्ष्म थट्टा करतो, ब्रह्मज्ञानाला पोचावयासाठी ज्या मार्गाचे अवलंबन करावे लागते त्या मार्गात सर्वस्व दग्ध करून जो हौसेने उतरतो, अमुक एका मर्यादेच्या पलीकडे गेल्यावर मात्र ज्याचे बोलणे आता आपल्या ओळखीचे नाही असे आपल्याला वाटू लागते व शेवटी जो 'मला माझे भातुके मिळाले' 'मीच मला व्यालो' व 'याच जन्मी याच डोळां' जे काय पहावयाचे ते पाहिले व मिळविले असे समाधानाचे 'ढेकर' देत बोलतो, त्याच्याविषयी आत्मवंचनेचा किंवा परवंचनेचा उद्‌गार काढणे हे वाईट धाडस आहे, असे वाटते. लुच्चे लोक हे संभावितांची बतावणी करतात, त्यांच्यासारखी भाषा बोलतात व पुढे प्रत्ययास येते की हे लुच्चे आहेत. पण हे असे घडते म्हणून संभावितांनी जी भाषा बोलावयास हवी तीच बोलली पाहिजे. खरोखरीच्या संभावितांना लुच्च्या लोकांची प्रलपिते दाखवून जर आम्ही हिणवू लागलो तर ते असे विचारतील की, 'आम्ही कसे बोलावे म्हणजे आम्ही प्रामाणिक आहो हे तुम्हास पटेल? शेक्सपिअरच्या 'Angels' ना जी अडचण उत्पन्न झाली आहे, तीच या संभावितांना आपण उत्पन्न करून ठेवतो. नरकदूत हे देवदूतांची रूपे घेऊन लोकांस फसवितात म्हणून खुद्द देवदुतांनी आपली रूपे टाकावयाची की काय? आपण जसे आहो तसेच त्यास दिसलो पाहिजे. तेच येथे लागू आहे. खरोखरीच्या ब्रह्मज्ञान्याची भाषा आत्मवंचित किंवा दांभिक बोलू लागले तर तेवढ्याने मूळचे खरोखरीचे तत्त्वज्ञानी आत्मवंचित किंवा दांभिक कसे ठरतील? याही पुढे जाऊन त्यांच्या अंगाने असे म्हणावेसे वाटते की, 'तुम्ही शंकाखोर लोक शंका घेताघेता ब्रह्मज्ञानप्राप्ती शक्यच नाही असे सुचविता की काय? तसे जर सुचवीत नसाल तर हजारो आत्मवंचित किंवा दांभिक सोडले तरी काही प्रामाणिक ब्रह्मविदांच्या अस्तित्वाची शक्यता तुम्हास मान्य करावीच लागेल. जर ब्रह्मज्ञान होणं अशक्यच आहे असे तुम्ही म्हणत असाल, तर तुम्ही मुलखानिराळे, म्हणजे ज्या मुलखातले तुम्ही बोलू नये त्या मुलखातले बोलत आहा. तेथे तुम्ही या म्हणून म्हटले तर तुम्ही येत

नाही. तेथची जी शारीरिक व मानसिक दगदग आहे ती तुम्हास सोसवत नाही, जे शारीरिक आणि मानसिक त्याग आहेत ते तुम्हास करवत नाहीत व असे असूनसुद्धा जे केवळ आमचे अनुभव ते तुम्हास बुद्धीने आकलिता यावे असा आग्रह धरता यास काय म्हणावे ? हे जर साधते तर तुमच्याइतपतच जे आम्हीही बुद्धिमान आहो त्या आम्ही या उठाठेवी का केल्या असत्या ? 'शंका' हे जे सर्व ज्ञानांचे उगमस्थान ते आम्ही मारले आहे असे तुम्ही समजता ते चूक आहे. ती सर्व ज्ञानाची प्रसविका जर आम्ही मुळातच मारली असती तर आम्हाला हा मानसिक प्रवास इतका लांबविण्याची जरूरच नव्हती. ती कायम ठेवल्यामुळे, नवीन नवीन, पूर्वी प्रसुप्त पण आता स्पष्ट झालेल्या अशा तत्त्वाप्रत पोहोचत पोहोचत असे आम्ही पुढे गेलेले आहो.' आता या त्यांच्या बोलण्यावर अप्रामाणिकपणाची शंका घेणे हे शंका घेण्याच्या पद्धतीलासुद्धा अमान्य होईल. म्हणून हे सर्व मान्य आहे असे म्हणावयास काहीच हरकत नाही. पण आपला मुद्दा पुढें आहे.

## भलतेच ओझे त्यांनी घेऊ नये

ब्रह्मविदांच्या समाधानाचे व तज्जन्य उद्‌गारांचे जर पृथक्करण केले तर असे दिसते की, त्यांना आनंदकोटीत प्रवेश करता आला आहे. 'समजले आहे, समजले आहे' याचा अर्थ असा की, या आनंदकोटीत प्रविष्ट होण्याला जो परस्पर-विरोधी तत्त्वराशींचा समन्वय व्हावयास हवा तो त्यांस करता आला आहे व अशा रीतीने त्यांना कायमचे सुख लाभलेले आहे. Final beatitude अथवा Blessedness म्हणजे शेवटचे आनंदसुख ते भोगीत आहेत, एवढाच त्याचा अर्थ धरावयाचा ! – 'विश्वाचा प्रश्न उलगडला' असाही त्यांच्या ब्रह्मज्ञानाचा अर्थ असला तर मात्र ते आपल्या डोक्यावर भलतीच जबाबदारी घेत आहेत असे म्हणावयास हवे. त्यांना निरवधी आनंद झाला तर आमची कसलीही हरकत नाही. जोपर्यंत तो केवळ अनुभवज्ञेय आहे असे त्यांचे म्हणणे आहे व जोपर्यंत आपण अनुभवाकडे जाणारा मार्ग पतकरण्यास प्रवृत्त नाही तोपर्यंत त्यांच्याशी या मुद्द्यावर वाद घालण्याचे काहीच कारण नाही. पण जर विश्वाचा प्रश्न उलगडला असा हक्क ते सांगत असतील तर मात्र ब्रह्मविदांना गैरसोयीच्या अशा पुष्कळच बाबी आपल्याला विचारता येण्यासारख्या आहेत. कोणा एखाद्याला फारच आनंद झाला व तो त्यात डुंबत राहिला व तसे इतर कोणाला सहसा घडत नाही असे असले तर आम्हा संसारी माणसांना त्याचे काय होय ? एखाद्या गुहेत बसून शेकडो वर्षे तप करून परस्पर तिकडच्या तिकडे एखाद्याला ब्रह्मप्राप्ती झाली असली, तपस्येच्या बळावर तो आतल्या आतच अंतराळात लोंबत राहिला असला व शेवटी त्याच्या आत्म्याला स्वतःचीच ओळख पटली असली तर त्याचे भलेबुरे आम्हास काही एक नाही. कोणी एक गृहस्थ होता की, जो आम्हास माहीतही नव्हता, त्याला त्याच्या स्वतःच्या मता-

प्रमाणे ब्रह्मज्ञान झाले व तो आनंदकोटीत प्रवेश करता झाला, हे ऐकीव वर्तमान इतर चार गोष्टींप्रमाणे आमच्या मनाला कसलीही उपाधी उत्पन्न करू शकत नाही. पण जर का असे झाले की, ' आम्हाला ब्रह्मज्ञान झाले; या प्रकारचा आनंद, अहो संसारी लोक हो, तुम्हीही उत्पन्न करून घ्या व या मायाजाळातून मुक्त व्हा.' असे कोणी आम्हास सांगू लागला तर मग तो आमच्याशी बोलणे– चालणे करण्यास प्रवृत्त झाला असा त्याचा अर्थ आहे. आमचे काही अहित होत आहे ते न होता काही हित व्हावे अशी ज्याला काळजी आहे असा कोणी माणूस आपल्यापुढे आपुलकीच्या भावनेने उभा आहे व सदुपदेश करून आम्हाला चुकीच्या मार्गावरून सन्मार्गाकडे नेण्याची इच्छा बाळगीत आहे असे त्यामुळे वाटू लागणे स्वाभाविक आहे. पण मग अशा माणसाने आमच्याशी आमच्या पद्धतीनेच बोलावयास शिकले पाहिजे व ज्या मार्गांनी आम्हास दुरुस्त करून आपल्याकडे वळवून घेत येण्यासारखे आहे, त्याच मार्गांचा अवलंब त्याने केला पाहिजे. म्हणजे असे कीं, विचारपद्धतीत त्याचे व आमचे नाते जडावे. ' तू माझे ऐक ' असे त्याने उंचावरून आम्हास न बजाविता ' तुला काय म्हणावयाचे आहे ते मी ऐकतो; व जमल्यास त्याचे उत्तर देतो ' असे त्याने आमच्या भूमिकेवर येऊन म्हणावे. तसेच हा उपदेश करणारासंबंधाने आमच्या ज्या काही कसोटचा असतील त्या लागू करून घेण्यास त्याने भिता कामा नये. किंबहुना त्याने यत्किंचितही अंगचोरी करू नये. प्रत्युत्तराने त्याने आम्हास कुंठित करू नयें; तर आमचा बुद्धिनिश्चय करून द्यावा. आम्हास त्याने अडवू नये; तर आम्ही प्रामाणिक जिज्ञासू म्हणून आम्हास पटवून द्यावे. हे ब्रह्मज्ञानी आमची अपेक्षा करतात म्हणून तर वरील आमचे बोलणे संभवते. आम्हा संसारी लोकांच्या संबंधाने ते जर उदासीन राहिले असते तर आमचेही लक्ष त्यांच्याकडे गेले नसते. पण, ते आम्हासंबंधाने उदासीन तर नाहीतच नाहीत; तर उलट आम्हाला सदुपदेश करण्याचा आग्रह धरीत आहेत असे दिसते. या आग्रहाचे रुप सार्वत्रिक प्रतिपादन एवढेच आहे असे नाही; तर त्यासाठी मठस्थापना करणे, शिष्यशाखा मिळविणे, स्वतः भोक्तृत्वापासून अलिप्त राहून का होईना, पण लोकसंग्रहाचा पसारा मांडणे, ग्रंथनिष्पत्ती करणे हे सर्व प्रकार हे ब्रह्मज्ञानी लोक आजवर करीत आलेले आहेत. हे सर्व आमच्या कल्याणासाठी असते हे खरेच आहे. याचा अर्थ असा की, हे ज्ञानी लोक आमची अपेक्षा बाळगतात. जर अपेक्षा बाळगतात तर वरच्यासारखे बोलणे ओघानेच येते. ते आमचे बोलणे मोकळ्या मनाने ऐकून त्याचा परिहार त्यांनी केला म्हणजे बोलणें संपले व त्यांच्या सदुपदेशाप्रमाणे वागण्याला आमची मनोभूमिका तयार झाली असे म्हणावयास हरकत नाही.

## ब्रह्मवेत्यांचे एकमेकांशीं जमत का नाही ?

ज्या ज्या लोकांनी आजवर ब्रह्मज्ञान संपादिले आहे, अशी कीर्ती किंवा असा बोभाटा आम्हाला इतिहासातून ऐकावयास येतो, किंवा अशा प्रकारच्या ज्ञानावर

हक्क सांगणारे सध्या जे कोणी आहेत असे ऐकिवात आहे, त्यांची संख्या बरीच मोठी आहे. यांपैकी जे कोणी केवळ ब्रह्मवेत्ते ही कीर्ती स्थापून निघून गेले, त्यांच्याविषयी काहीच बोलता येत नाही. कारण त्यांचे आमच्या हाताशी असे काहीच नाही. जर कोणी म्हटले की, ते ब्रह्मवेत्ते होते तर ते होते एवढीच माहिती आम्हास कळली असे होईल. व जर कोणी म्हणाले की, ते ब्रह्मवेत्ते नव्हते तर तें नव्हते एवढेंच काय ते आम्हास कळले असे होईल. म्हणून या लोकांची संख्या सोडून दिली पाहिजे. आता जे उर्वरित राहिले त्यांचे काही तरी आपल्या हाताशी आहे असे दिसते. यांच्यासंबंधाने लोकांनी धरलेला आग्रह नव्हे, तर यांचा यांनीच धरलेला आग्रह असा की, आपल्याला ब्रह्मज्ञान झाले. अर्थात ही त्यांची जबानी आपण पत्करली पाहिजे. पण त्यांनी आपल्या ब्रह्मज्ञानाचे जे रूप सांगितले आहे तें ऐकून घेतले व त्या सर्वांच्या ज्ञानाचीं परस्परांशी तुलना केली म्हणजे विस्मय वाटू लागतो. हिंदुस्थानातील मोठमोठाले आचार्य व विरागी साधुसंत, तसेच पृथ्वीवरील निरनिराळ्या देशात येशू ख्रिस्त, महंमद अशांसारखे जे कोणी धर्मसंस्थापक झाले व आपल्याकडील संतांसारखे जे अनेक संत–महंत झाले त्यांच्या या ब्रह्मज्ञानाच्या बाबतीतील जबान्या फारच विस्मयकारक आहेत. देवाचे रूप हे जर काही एक प्रकारचे मानले व जर या सर्वांचे असे म्हणणें आहे की ते आम्हाला माहीत झाले, तर या सर्वांची तद्विषयक ज्ञाने परस्परांशी मिळती असावयास नकोत काय ? त्या ज्ञानाला पोहोचावयाचे जे मार्ग आहेत ते कदाचित भिन्न भिन्न असू शकतील. कारण एका ठिकाणास पोहोचावयास अनेक मार्ग असतात असे आमचेही ऐहिक ज्ञान आहे पण हे मार्गांचे निरनिराळेपण मान्य केले तरी त्यांचे जे शेवटचे परमज्ञान ते मात्र एकरूप असावयास पाहिजे अशी अपेक्षा आम्ही बाळगणे चूक आहे असे आम्हास वाटत नाही. एखाद्या किल्ल्यावर पोहोचावयाची वाट कोणची असा वाद आरंभी असू शकेल. व आपल्याशिवाय इतरांनी चुकीचा मार्ग पत्करिला आहे असे निरनिराळ्या दिशांनी वर चढणारांपैकी प्रत्येकास वाटेल. पण एकदा वर चढून गेल्यानंतर जर त्याला असे दिसू लागले की, इतर मार्गांनी येणारेही तेथेच येऊन पोहोचत आहेत तर ह्या मार्गासंबंधीचा वाद जवळचा, लांबचा, कमी संकटाचा, जांस्त संकटाचा, या रूपाने जरी शिल्लक राहिला तरी ते सर्व इच्छित स्थळी नेणारे आहेत एवढी कबुली प्रत्यकास द्यावी लागेल. व वर पोहोचल्यानंतर सर्वांना एका वस्तूचे एकरूपच दर्शन होईल; म्हणजे ती वस्तू कशी आहे याचे ज्ञान सर्वांना सारखेच होईल. पण वर सांगितलेले जे मोठमोठाले आचार्य, संत, महंत व भगमत्‌भक्त त्यांचे ब्रह्मस्वरूपवर्णन एकमेकांशी जमत म्हणून नाही. एकाने सांगावे की, ते केवळ ज्ञानमात्र आहे. आत्मा हा त्यातूनच उत्पन्न झालेला; पण कित्येक युगेपर्यंत जणू जन्मभूमीशी द्रोह करणारा बनून, भटक्या मारीत मारीत शेवटी स्वतःची स्वतःला ओळख पटल्यानंतर तो ब्रह्मरूपाकडे परत जातो व समुद्राच्या पाण्यात जसे मीठ तसा त्या ब्रह्मरूपात विरून जातो,

व हे ब्रह्मरूप म्हणजे केवळ ज्ञानमात्र आहे. दुसऱ्याने सांगावे की, हे ब्रह्म ज्ञानमात्र आहे व आत्मा निजरूप ओळखून गिरक्या खाऊन परत आल्यावर जरी स्वतःही तंतोतंत त्याच रूपाचा असला तरी मूळ ब्रह्मापासून तो दूर उभा राहातो. वरच्याप्रमाणे त्यातच विरून जात नाही. बाकी ब्रह्म हे ज्ञानरूपच. तिसरे कोणी म्हणणार की, आत्मा व ब्रह्म हे स्पष्ट निराळे आहेत व त्यांच्यात सेव्यसेवक भाव आहे. म्हणजे येथे ब्रह्माचे रूप बदलले. कोणी सैतान हा स्वतंत्र मानिला व देवाशी त्याचे वैर आहे असे कथन केले; म्हणजे ब्रह्माचे रूप बदलले. कोणी हा सैतान मानावयाच्या ऐवजी मायाच मानिली; व ती ब्रह्मानेच उत्पन्न केली असे त्यांनी मानिले. म्हणजे ब्रह्माकडे कर्तृत्व आले. अशा रीतीने त्याचे रूप बदलले. कोणी देवाला स्वर्गाचा राजा मानिले व त्याने मृत्पिंडाचा मनुष्यप्राणी बनविला असे सांगितले व याहीपुढे जाऊन मी त्या स्वर्गातील राजाचा मुलगा आहे असे नातेसुद्धा सांगितले. कोणी नाते सांगितले नाही तरी मला त्यानेच येथे धाडिले आहे म्हणजे मी त्याचा प्रेषित आहे अशी गर्जना केली. कोणी असे सांगितले की शेवटी काहीच नाही, चौऱ्यांशी लक्ष योनींतून व तापत्रयांतून भ्रमण करता करता शेवटी पुरेशी आत्मिक उन्नती झाली म्हणजे आत्म्याचा सर्वनाश होतो, निर्वाण होते; ब्रह्म मानण्याची जरुरी नाही.

## साक्षात्काराची भूमिका घेतली !

आता हे सर्व लोक धर्मसंस्थापक, पंथसंस्थापक व ब्रह्मज्ञानी म्हणून प्रसिद्ध आहेत. म्हणजे ब्रह्मज्ञानी म्हणून लोकांनी त्यांना गौरविले असे नव्हे; तर त्यांनी स्वतःच असे लोकांना सांगितले व म्हणूनही ठेविले की, आम्ही ब्रह्मज्ञानी आहो. वरील किल्ल्याचा दाखला मनाशी आणून असे विचारावेसे वाटते की, जर हे सर्व ब्रह्मज्ञानी, तर यांची ब्रह्मस्वरूपवर्णने जमत कशी नाहीत ? ज्यांनी ब्रह्माची जरुरी मानिली नाही त्यांनासुद्धा ब्रह्म 'नाही' हे माहीत झाले होते म्हणजे ब्रह्मस्वरूपाचा त्यांचा शोध झाला होता व त्यांना कळले होते की, ब्रह्म नाही असे म्हणावयास हवे. अशा ब्रह्म नसण्यापासून तो ते आहे, पण केवळ ज्ञानमात्र आहे येथपर्यंत ब्रह्मविदांच्या माहितीचे आंदोलन चालू आहे. या दोन टोकांच्या मध्ये वर सांगितलेली हरतऱ्हेची वर्णने येऊन बसतात. आता ब्रह्म ही जर एक वस्तू असली तर या सर्वांची तत्स्वरूपवर्णने इतकी भिन्न भिन्न यावी याचा विस्मय वाटतो. म्हणून आम्हा संसारी लोकांना ज्या कोणा ब्रह्मवेत्त्यांच्या मनात संसारातून बाहेर काढावयाचे असेल त्यांनी अगोदर आपापसात बोलून पाहावे व सर्वांना काही सामान्य व परस्परांस पटेल असे निष्पन्न होते का ते ठरवावे. पण त्यांच्या वाङ्मयावरून पहाता हे त्यांच्याने उरकेल असे दिसत नाही. प्रत्येकाचा आग्रह असा की, दुसरा चूक आहे व या आग्रहाचे त्याचे प्रतिपादन चालू असता वाङ्मयात भांडणारे लोक ज्याप्रमाणे शिवीगाळ करतात, तसेच हे ब्रह्मवेत्तेही दुसऱ्याविषयी अभद्र भाषा बोलतात. शिवाय

प्रत्येकाचा आग्रह आपल्याला साक्षात्कार झाला असाच आहे. ज्याने ब्रह्म निर्गुण कल्पिले होते त्याला ते निर्गुण आहे असा साक्षात्कार झाला. ज्याने त्याला थोडीशी तरी उपाधी आहे असे मानले त्याला ते तसे आहे असा साक्षात्कार झाला, ज्याने ते स्पष्टपणे सगुण व सकलगुणमंडित असे मानिले त्याला ब्रह्म तसे आहे असा साक्षात्कार झाला. ज्याला आपण त्याचे पुत्रच आहोत असे वाटले, त्याने त्याला मानवी रूप दिले व सरोवराच्या पाण्यात आपले रूप पाहून त्याप्रमाणे त्याने माणूस घडविला असे स्वच्छ मानिले; अर्थात त्याला तसा साक्षात्कार झाला. दुसऱ्या कोणाला प्रत्यक्ष देवदूत परमेश्वराचे अनुशासन जीवर लिहिले आहे अशी कागदाची गुंडाळी घेऊन आपल्यापुढे उभा आहे, असा साक्षात्कार झाला. कोणाला शंख, चक्र, गदा, पद्म असे ध्यान पैलतीरावर आलेले दिसले. असे कोणास काही, कोणास काही, पण ज्यांचा एकमेकाला पत्ता नाही असे हरतऱ्हेचे साक्षात्कार होऊन गेलें. अशा या परस्परविरोधी निदान परस्परविसदृश, साक्षात्कारांच्या भांडवलावर आज कित्येक हजार वर्षे ब्रह्मवेत्यांनी मनुष्ययोनी झुलत ठेवलेली आहे. नुसती झुलत ठेवली असती तरीही चालले असते. कारण या झुलत राहणारांना तरी झुलत राहावयास हवेच असते; पण हे जे केवळ कल्पित ज्ञान त्याच्या योगाने एवढे अभिनिवेश पेटले की, परस्परांच्या संसाराची, राष्ट्राची, वाङ्मयाची; व संस्कृतीचीही होळी करावयास माणसे या योगाने प्रवृत्त होत आली आहेत. जसे आधुनिक शास्त्रांचा अभ्यास करणारे स्वतंत्रपणें प्रयोग करीत असले तरी आपली उत्तरे काय आहेत, हे एकत्र येऊन पाहतात, तुलना करतात, चूक किंवा बरोबर याची शहानिशा करतात, पुढील मार्गाच्या दिशा कायम करतात, तसे या ब्रह्मवेत्यांनी करावयास नको होते काय ? दुसऱ्याचे आपल्याहून निराळे आहे, व दुसरा आपल्याइतकाच प्रामाणिक, म्हणजे प्रमाणांनी सिद्ध केलेल्या गोष्टी बोलणारा आहे, असे ओळखल्यानंतर येथे दोन ज्ञानांच्या तुलनेला जागा उत्पन्न झाली. म्हणून त्या दोघांच्या संनिकर्षाने एक कोणचे तरी ज्ञान चुकीचे ठरावे किंवा त्या दोहोंच्या मिलाफातून अधिक उन्नत असे नवे ज्ञान उत्पन्न व्हावे असा योग आता आला आहे, असे या ब्रह्मवेत्यांस वाटावयास नको होते काय ? पण त्यांनी शुद्ध तत्त्ववेत्त्यांची भूमिका सोडून साक्षात्कारवाद्याची भूमिका घतली व त्यामुळे तत्त्वसंशोधन दूर राहून अहंकार मात्र बळावले. ही तत्त्वसंशोधनाची भूमिका जर सर्व चोखंदळ माणसांनी अप्रतिहत चालू ठेवली असती तर कदाचित सहिष्णुता वाढीस लागून माणसाचे जीवित आजपर्यंत धर्माच्या बाबतीत जे हालाविपत्तीत गेले ते गेले नसते.

## साक्षात्कार बाधले

कोणी जर असे म्हणाले नसतें की, मला साक्षात्कार झाला, मला देव दिसला, त्याने मला असे बोलावयास सांगितले आहे, तर मग माणसांनीं या प्रतिपादकांच्या

म्हणण्याकडे केवळ तत्त्वचर्चेचा विषय म्हणून पाहिले असते; आणि जगताचे हाल खरोखर वाचले असते, वेळेची बचत झाली असती, आणि ज्या सृष्ट पदार्थांच्या अभ्यासाकडे माणसाच्या जातीचे मन प्रारंभी स्वाभाविकपणेच वळलेले होते तेथेच ते गुंतून राहिले असते व आज मानवी जीवित जितके उन्नत दिसते आहे त्याच्या दसपट ते दिसले असते. पण आधिभौतिक शास्त्रांच्या अभ्यासात ज्या साक्षात्कारावर म्हणजे प्रत्यक्ष प्रयोगावर सर्व भिस्त अवलंबून असते, तसलाच साक्षात्कार आपल्याला झाला असे जो तो सांगत उठला. पण शास्त्राचा साक्षात्कार हा सर्व लोकांना अनुभविता येतो व हा पारमार्थिक साक्षात्कार एका माणसाला मिळालेले एकानेच अनुभवावयाचे असे भांडवल ठरले, हा फरक माणसांनी लक्षात घेतला नाही. यामुळे सर्व गुंता झाला. व जे कोणी आपले मत मानीनात त्यांना भाजून काढावे, सुळावर खोचावे, त्याला मारले असता आपले बाप स्वर्गाला जातील असे मानून केवळ निरपराध अशा प्राण्यांची सरसहा कत्तल करावी, धर्माधिकारी हा इतरांप्रमाणे चुकीस पात्र आहे असे म्हटल्याबद्दल म्हणणाराची जीभ काढून टाकावी अशासारखे घोर आणि अनन्वित प्रकार जगताच्या इतिहासात हजारोंनी झाले. रोगराई व माणसाची ऐहिक हिताहिते यांनी मनुष्ययोनीचे हाल व हत्या ही पुरेशी होत नव्हती म्हणून त्यांच्या जोडीला हे पारमार्थिक छळाचे व हत्येचे कांड धर्मांनी सुरू केले. येथे वर उल्लेखिलेल्या ब्रह्मवेत्त्यांना असे विचारावेसे वाटते की, ज्या आग्रहातून हे सर्व उत्पन्न झाले तो आग्रह बरोबर होता का? केवळ तत्त्वज्ञान म्हणून आपण आपले ज्ञान सांगावयास नको होते काय? साक्षात्कार हा माणसांना कब्जात घेण्यासाठीच पुढे आणला होतात ना? जर परमेश्वरी स्वरूप मूळचे एकच तर आपणा सर्वांचे साक्षात्कार असे निरनिराळे का येतात, असे आपण कधी आपणास व एकमेकांस विचारले होते काय? याचे सरळ उत्तर असे आहे की त्यांनी हे कधीही केलेले नाही.

### शिष्यांचे ज्ञान

वर म्हटलेच आहे की, ज्याच्यापासून आपण काही शिकावयाचे त्याला प्रतिप्रश्नरूप असे काही बोलावेसे वाटले तर त्यात शिकणाराच्या पदरी दोष येतो असे नाही. मनात उपस्थित झालेल्या शंका तशाच दाबून ठेवून उगाच एखादे घोंगडे गळ्यात घ्यावे हे अगदी अप्रशस्त आहे. जिज्ञासूंचे वरील म्हणणे ऐकून ब्रह्मवेत्त्यांना थोडे कळमळल्यासारखे होईल हे खरे; पण जिज्ञासूच्या बोलण्यात विचारार्ह असा पुष्कळच भाग आहे हे त्यास कबूल करावे लागेल. जिज्ञासू हा, ब्रह्मवेत्त्यांना हवा आहे तितका बुद्धिमान नाही असे वाटल्यास त्यांनी म्हणावे; पण वेड्या प्रश्नांची का होईनात, उत्तरे देण्यास मात्र चुकू नये. वरील प्रश्न वेडेपणाचे नाहीतच. त्या त्या ब्रह्मवेत्त्याचा लेखी आग्रह जर शिल्लक नसता तर ब्रह्मवेत्तेपणाची कीर्ती मागे

ठेवून त्यांना सुखाने जाता आले असते. पण त्यांनी आपले म्हणणे विशद करून मांडिले आहे, वाद घातले आहेत व लोकांनी हे पत्करावे असा आग्रह धरिला आहे, म्हणून हे बोलणे प्राप्त होते. हे तर मोठमोठाले जे ब्रह्मवेत्ते त्यांजविषयी झाले. मग त्यांच्या शिष्यशाखेत जे 'गादीवरचे' म्हणून वावरत असतात त्या बिचाऱ्यांची काय अवस्था असेल हे कोणासही ओळखता येते. यात एक मात्र सोडवणूक असते. प्रत्येक कालात ठिकठिकाणी ब्रह्मचिंतन करणारे अनेक सत्पुरुष असतात व त्यांच्याभोवती भक्तगणांचा मोठाच मेळा असतो. त्यांच्यातील क्वचित कोणीकोणी आपल्याला तत्त्वज्ञान झाल्याचे ठासून सांगतात; पण बहुतेक सर्वजण 'आम्ही त्या मार्गातील आहो' असे सांगतात. जे स्वतः केवळ मार्गात आहेत, त्यांनी शिष्यशाखा बनविणे व मठादींचा थाटमाट करणे फारच चमत्कारिक दिसते. अजून आपले आपल्यालाच जर माहीत झाले नाही तर या शिष्यशाखेला काय सांगावयाचे असा प्रश्न आपल्या मनाशी त्यांनी करावयास हवा.

## मी कापडीच आहे

'पण मला अजून प्राप्त झाले नाही.' या वाक्यातही 'मला प्राप्त झाले' या वाक्याइतकाच गौरव भरलेला आहे. प्रत्यक्ष शंकर हासुद्धा अजून ब्रह्मशोधाच्या मार्गावरील 'कापडी' आहे, असे आपण पुराणात वाचतोच. अर्थात् आपण त्या मार्गात आहो हाही गौरवच आहे. प्रत्यक्ष ज्ञान झाले अशी ज्यांची भूमिका, त्यांचे जर परस्परांशी यत्किंचितही जमत नाही,तर जे केवळ मार्गातच आहेत त्यांचे परस्परांशी कितीसे जमत असेल हे स्पष्टच आहे. किल्ल्याच्या वर जाण्याचे म्हणून जे मार्ग वर सांगितले त्या संबंधीचे भांडण खुद्द ब्रह्मविदांनीही केलेलेच आहे. आणि जोरजोराने असे प्रतिपादिले आहे की, आम्ही म्हणतो तोच मार्ग खरा आणि दुसऱ्याचा खोटा. ज्यांना किल्ल्यावर पोचल्यानंतर परस्परांची माहिती व्हावी अशी आपली अपेक्षा, त्यांचेच जेथे मार्गासंबंधाचे एवढे भांडण, तेथे केवळ शब्दरूपाने मार्गातच लोंबत राहिलेल्या या अल्प-मुमुक्षूंचे परस्परांशी केवढे तंडण चालत असेल, हे कळावयास त्यांच्या मार्गांची थोडीशी माहितीच असावयास हवी. डॉक्टर, शाळामास्तर, गवई अशांसारखे लोक हे आपल्या धंद्यातल्या इतरांविषयी मनोमन काय बोलतात, हे आपणा सर्वांना माहीत आहे; तोच प्रकार या होतकरू ब्रह्मवेत्त्यांचाही असतो. कोणाही दोन मठांचे व पीठांचे कधी जमावयाचे नाही आणि सगळेच शेवटच्या ज्ञानासंबंधाने खरोखरी खंक असावयाचे इतकाच प्रकार आहे; पण या सर्वांचे अभिमानाचे बळ एवढे मोठे असते की, 'आपण' हा मध्य कल्पून जेवढी मोठी त्रिज्या त्यांना धरता येईल तेवढी धरून ते भले मोठे शिष्यवलय तयार करतात आणि इतर ऐहिक बाबींमध्ये जसे, तसे याही बाबतीत इतरांशी मोठे संगर चालू ठेवतात. या सर्वांना एकत्वाची कल्पना यावी म्हणून काही स्वतंत्र आचारकांड निर्मितात;

गंध कसे लावावे, धोतर कसे नेसावे, आचमने कशी घ्यावी, पुंड्र किती असावेत जानवी किती घालावी, नमस्कार कसे करावे, ते करताना तोंडाने काय म्हणावे, जेवावयास बसताना कोणता गजर करावा, तप्तमुद्रा किती माराव्या, याने जानवे घातले तर त्याने तुळशीची माळ घालावी अशासारखे शेकडो बारीक बारीक निर्बंध ते शिष्यशाखेत कायम करतात आणि होता होता हे अभिमान इतके प्रबळ होतात की, माणसे एकमेकांपासून फाटून निघतात. एखाद्याने अमका वेद पढला व दुसऱ्या एखाद्याने दुसरा कोणचा तरी पढला तर जो जो वेद पढत असेल तो त्याला येईल इतकेच काय ते; व लोक काय म्हणतील की, याला हा वेद येत आहे, पण तेवढ्या-मुळे तो वेद पढणारांचा स्वतंत्र गट बनावयास हवा व लग्नव्यवहाराच्या मर्यादाही असल्या गोष्टींनी पडाव्या हे जसे विस्मयकारक आहे तसेच द्वैती, अद्वैती इत्यादि मुद्द्यांवर समाजाची शकले पडावी हे खरोखर आपले दुर्भाग्य होय. पंथ काढणारांनी आपली परमार्थविषयक भूमिका जर खरोखर केवळ परमार्थविषयक आहे, तिचा ऐहिक जीविताशी कसलाही संबंध नाही, ती भूमिका केवळ तत्त्वसंशोधनापुरती आहे, तिच्यात साक्षात्काराचा भाग नाही, आम्हाला दैवी स्फुरण झालेले नाही असे मन उंच करून स्वच्छ सांगून ठेवले असते व उत्तरोत्तर त्यांच्या विचारपंथात जे दाखल होत आले त्यांच्यापुढे या प्रतिज्ञारूप विचारांची जर सारखी उजळणी होत राहिली असती तर समाजच्या समाज इतके छिन्नविछिन्न होण्याचे कारण नव्हते. असो. आम्हाला ब्रह्मज्ञान झाले आहे व वरती साक्षात्कारही झाला आहे असे त्यांनी आग्रहाने सांगितल्यामुळे हे संकट उद्भवले असे वाटते. म्हणून ब्रह्मविदांनी आम्हास संसारातून मुक्त करण्याची तयारी दाखवावी हे जरी यथायोग्य असले तरी 'तुला बरे करतो' असे म्हणणारा वैद्य, हा वैद्य आहे की वैदू आहे, खरोखरी काही पढला आहे की काय याची चौकशी ज्याप्रमाणे रोगी करणार त्याप्रमाणेच आम्ही संसारी लोक या उपदेशोत्सुक ब्रह्मवेत्त्यांच्या अधिकाराविषयी चर्चा करूच करू. तिच्यात अवहेलना नाही; केवळ जिज्ञासा आहे. असो.

## ब्रह्मविदांनी जाच करू नये

ब्रह्म सत्य या वाक्यांशाला आम्ही कोठेच दंश केलेला नाही. पण त्याचे ज्ञान आम्हाला आहे असे जे ब्रह्मविदांचे म्हणणे त्याचे मात्र अल्प परीक्षण केले. तसेच आमचे समाधान न झाल्यामुळे 'जगन् मिथ्या' या वाक्याचा जगत् केवळ भासरूप आहे हा अर्थ पत्करण्यास आमची अनिच्छा दर्शविली. आता जगत् मिथ्या याचा आभासरूप हा अर्थ सोडल्यावर 'ते विघटनक्षम आहे' हा जो आधिभौतिक शास्त्रज्ञांस मान्य असलेला अर्थ तो पत्करावयास काहीच हरकत नाही. जगत् हे विघटनक्षम असेल व म्हणून कदाचित् त्याला असत् शब्द लावता येईल; पण ही विघटनक्षमता आम्हास काही बाधा करू शकत नाही. चंद्र, सूर्य, पृथ्वी, तारे हे जेव्हा केव्हा एकमेकांवर

आदळणार असतील किंवा बसल्या जागीच झिजून जाणार असतील तेव्हा ते खुशाल जावोत; हे एखादे वेळी घडून येणे शक्य आहे. पण शास्त्रज्ञ म्हणतात त्याप्रमाणे पाहाता याला कोटयवधी वर्षांचा अवकाश आहे, तोपर्यंत तत्त्ववेत्त्यांना मान्य असणाऱ्या ब्रह्माने उत्पन्न केलेल्या या सृष्टीवर आम्हास सुखाने उभे राहावयास तत्त्ववेत्त्यांनी हरकत करू नये. त्याचे बळ काय आहे हे आम्ही मागेच पाहिले आहे. येथे जोपर्यंत राहता येईल तोपर्यंत मनुष्ययोनी राहील आणि आदिकारण ज्या दिवशी सर्वच गाशा गुन्डाळील त्या दिवशी सगळ्याबरोबर तिचाही काय निकाल लागावयाचा असेल तो लागेल. त्यासाठी आत्ता चुळबूळ करण्याची आम्हास काही एक जरूरी नाही. पृथ्वी पुढे केव्हाशी एकदा आपली गोलाकृती टाकून भोवऱ्याच्या आकाराची होणार आहे आणि पृष्ठ सुरकुतणार आहे, असे कोठेसे वाचल्याबरोबर एखाद्या तरतूदप्रिय माणसाने जशी आत्ताच आवरासावर करावयास लागावे किंवा सूर्य पुढे निवत जाऊन उष्णता कमी मिळू लागणार आहे असे कोठेसे ऐकल्याबरोबर आज सर्पण थोडे कमी जाळावयास हवे असे काटकसरी माणसाने मानावे अशी आमची स्थिती आम्हास करून घ्यावयाची नाही. यदृच्छेने जे फरक पडत जातील त्यांच्याशी आपले जीवित, 'सुख व अस्तित्व' या दृष्टीने जितके जुळवून घ्यावयास हवे तितके आम्ही घेत राहू. सृष्ट पदार्थांचे परीक्षण करून त्यांची नियमने शोधून काढू आणि या प्रयत्नात असताना पदार्थांचे नवे नवे गुणधर्म कळल्यामुळे मनुष्ययोनीच्या सुखात भर घालीत जाऊ. अशा प्रकारे सध्या माहीत आहे यापेक्षा सूक्ष्म अशा नियमकोशापर्यंत आम्ही पोहोचलो म्हणजे त्या कोशाचे परीक्षण होता होता सूक्ष्मतर नियमने माणसांच्या हाती लागतील व अशारीतीने काही विशेष प्रकारच्या पद्धतीने एक-दोन माणसे नव्हेत, तर सर्व मानव्य मूळ कारणाच्या नजीक नजीक जात राहील. हे फार दूरचे आहे; तथापि तर्कसिद्ध आहे. शेवटी काय म्हणून विचाराल तर आज सांगता येत नाही, हे त्याला सरळ उत्तर आहे. पण आज वरील प्रवृत्ती बाळगल्यामुळे आमच्या पायाखालची भूमी तुम्ही देऊ केलेल्या आधारापेक्षा जास्त स्थिर आहे असे आम्हास वाटते.

### थोडी ब्रह्मजिज्ञासा

वर म्हटले आहे की, ब्रह्म सत्य या वाक्यार्थाला आम्ही कोठेच दंश केला नाही. याचा उलगडा करावयास हवा. सत् असे ब्रह्म काय आहे या गोष्टीचा पत्यक्ष असा प्रत्यय मागील ब्रह्मविदांप्रमाणे आम्हा कोणाही संसारी माणसाला नाही. पण तसे आदिकारण असावे असे बुद्धीला वाटते. आणि कदाचित्, परंपरा वा दूरान्वये त्याची हुकमत या वस्तुजातावर चालत असावी असेही वाटते. जर सृष्टीला कर्ता असला तर मग त्याचा कर्ता कोण, पुढे त्याचा कर्ता कोण ही जी अनावस्था उत्पन्न होते ती आम्ही ओळखतो. पण तेवढ्यामुळे या सृष्टीला कोणी उत्पादक असावा हे जे अनुमान ते तर्काला सोडून आहे असे ठरत नाही. मागे एके ठिकाणी ब्रह्म नाही पण जगत्

आहे असे म्हणणाऱ्यांचा पक्ष सांगितला आहे. ते असे म्हणतात की, अशा उत्पादकांच्या अस्तित्त्वाची जरुरी मानणें आवश्यक नाही. कारण त्याचा उत्पादक कोण व पुढे त्या उत्पादकाचा उत्पादक कोण हे सांगता येत नाही; पण या कामी शास्त्रवेत्ते हे आपणच उत्पन्न केलेली विचारप्रणाली मोडून टाकतात असे होते. ते जेव्हा संशोधन करतात तेव्हा परिणामरूप वस्तूवरून कारणरूप वस्तूपर्यंत जाण्याची त्यांची सारखी खटपट चालू असते. म्हणजे असे की, जे काही आपल्याला दिसत आहे, त्याच्या मागे काही कारणे असली पाहिजेत हा न्याय बुद्धीने पकडून ते या कामात वागतात. आता आदिकारण काही असावे असे कोणी म्हटल्याबरोबर ते तट्कन मोहरा फिरवितात व विचारतात की, उत्पादक हवा आहे कशास ? हे वस्तुजात मूळचेच आहे असे मानावे. या ठिकाणी शास्त्रसंशोधक आपल्याच विचारपद्धतीवर घाव घालतात असे दिसते. वस्तू ज्या रूपात सध्या दिसतात त्या तशा खरोखरी नाहीत म्हणजे हेच यांचे स्वयंभू आणि मूळचे रूप नाही असे मनात ठेवूनच शास्त्रज्ञ त्यांच्या मागल्यामागल्या रूपाकडे व कारणपरंपरेकडे जातो. Research या शब्दाचाच अर्थ बघा. शोधत शोधत मागे जाणे, वस्तूंच्या अंतरंगात शिरणे म्हणजे त्यांची मूलतत्त्वे कोणती आहेत हे पाहणे हा तर शास्त्रज्ञांच्या मनाचा मुख्य धर्म होय. पण या मूलधर्माचा तरी स्पष्ट अर्थ हाच आहे की, याच्या मागे काही तरी असले पाहिजे अशी मनाची तळमळ असते. आस्तिक्यबुद्धी बाळगणारा अगदी ढोबळ मानाने संशोधकाची हीच भूमिका घेतो. म्हणून त्याला वाटते की, मागे काही तरी असावे; पण त्याने जो असे म्हणावे तो संशोधक म्हणतात की, 'त्याची काही जरुरी नाही. आगाऊ संशोधित अशी जी प्रास्ताविक रूपे सापडतील ती स्वयंभूच आहेत असे म्हणावे.' त्यावर अस्तिपक्षवादी म्हणतो, 'मग तुम्ही येथपर्यंत तरी कशाला आलात ? पदार्थांचे गुणधर्म शोधून त्यांच्या बळावर मानवी जीवित सुखाचे करावे हा काही शुद्ध संशोधनबुद्धीचा हेतू खास नाही. तो हेतू वस्तूंचा उलगडा करणे हा आहे. जर तो तसा आहे तर मग मागे चलावे; म्हणजे कारणे शोधावी. पण अमुक एका मर्यादेपर्यंत आल्यावर तुम्ही म्हणता की, 'येथे थांबा... हे सगळे स्वयंभूच आहे.' मी एवढेच म्हणतो की, हे जे तुमचे शेवटचे, ते स्वयंभू नाही तर पर–भू आहे व म्हणून तो पर = आदि पुरुष शोधावयाचे काम चालू ठेवावे. तुम्ही मला कोठे अडविणार ते मी ओळखतो. मी ज्याला आदिपुरुष म्हणतो त्यास तरी कोणी केले व मग त्यास कोणी केले हे मी सांगितले तर तुम्ही मला विचारणार, 'त्याला तरी कोणी केले ?' पण एवढ्याने माझे मूळचे म्हणणे तर्करहित ठरत नाही. ज्या पद्धतीने तुम्ही या कामात वागता त्या पद्धतीवरच माझा तर्क मी बसविला आहे. तुम्ही व मी दोघेही वाटले तर येथे थांबू; कारण की, त्याचा बाप कोण, त्याचा बाप कोण ? अशा तऱ्हेची अनवस्था उत्पन्न होत आहे. पण या अनवस्थेच्या निबिडात आपण पुढे गोंधळणार असल्यामुळे एखादी वस्तू

केवळ स्वयंभूच असते असली तर्कशून्य गोष्ट मला पत्करावयास लावू नका.' या आस्तिकाच्या बोलण्यावर 'जगत् स्वयंभूच मानावे' असे म्हणणाऱ्या स्थूल तत्त्व-ज्ञान्याला जसे बोलता येणार नाही, तसेच कार्यकारणमीमांसेची विचारप्रणाली पत्करून जो शास्त्रज्ञ अमूक एका पल्ल्यापर्यंत खोल गेला आहे व तेथे गेल्यावर मात्र 'हे मूळचेच आहे असे म्हणावे' असा आग्रह धरू पाहतो त्यालाही युक्तिसिद्ध असे काही बोलता येणार नाही.

ज्यावेळी हा अस्तिबुद्धी धरणारा 'यांच्यामागे काही तरी असलेच पाहिजे.' ही शुद्ध तर्काची बुद्धी सोडून 'तें काय आहे ते माहीत झाले आहे, त्याचे रूप अमुक आहे' असे अस्तिपक्षी बोलू लागेल त्यावेळी मात्र तो शास्त्रशोधकाच्या चापात सापडेल. 'याच्या मागे काही असलेच पाहिजे.' ही भूमिका तर्कसिद्ध अस्तित्वाची आहे व 'जे काही मागे आहे ते अमुक प्रकारचे आहे, अमुक गुणाचे आहे.' ही अस्तिबुद्धी मात्र तर्कसिद्ध नाही. असा या दोन अस्तिबुद्धींत फरक आहे. म्हणून 'ब्रह्म सत्य' या वाक्यार्थाला आम्ही कोठेच दंश केलेला नाही असे जें मागे आम्ही म्हटले आहे ते कायमच आहे. 'आम्हाला त्याचा बोध होत नाही. ते आमच्या कळण्याच्या कक्षेत येत नाही' हे मान्यच केले पाहिजे. पण त्याच्या असण्याची शक्यता मात्र आम्हाला तर्कबाह्य वाटत नाही. बुद्धाने असे कारण मानिलेच नाही किंबहुना याचा वाद चालू झाला म्हणजे तो गप्प बसत असे, असे म्हणतात. पण गप्प बसणें हे सोईस्कर असले तरी 'बोलाच' म्हणून सांगितल्यानंतर बोलणे भागच होते व मग मात्र त्याच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे या आदिकारणाला स्थान उरत नसे. जैनांनीही 'जगत् स्वयंभूच आहे' असे मानिले आहे. बौद्धांनीही तसेच मानिले आहे. पण 'कोणीतरी हवा- हवा' ही मनुष्ययोनीची भूक एवढी प्रखर की, बुद्ध किंवा जिन अथवा इतर तीर्थंकर यांच्या अनुयायांनी त्यांनाच देव बनविले. हे त्यांचे करणे चूक झाले असे कोणी म्हणेल; पण त्यावरून एवढीच गोष्ट सिद्ध होते की, मनुष्ययोनीचा सामुदायिक आग्रह अस्तिपक्षाकडे आहे. हे ओळखूनच व कोणच्याही उपाधीचा संपर्क न लागेल असे आदितत्त्वाचे रूप शंकराचार्यांनी कल्पिले. 'ब्रह्म असे आहे का ? नाही.' 'असे आहे का ? नाही,' 'तसे आहे का ? नाही;' अशा नकारांनी सर्व गुणरूप उपाधी त्यांनी धुऊन टाकल्या. कर्तेपण व जाणतेपण हेही नाहीसे करून टाकले. त्याबरोबरच 'अहं-'तत्त्व गळाले. शेवटी उरता उरता केवळ ज्ञानमात्र वस्तू उरली.

ही ज्ञानमात्र वस्तू वर्णावयास लागले तर आचार्यांच्या कल्पनेला धक्का बसेल. कारण वर्णन म्हटले की गुणधर्म आलेच; कारण त्याच्या योगाने मूळचे केवळ चित्-स्वरूप खालावले असा त्याचा अर्थ होय. अंतिम आदितत्त्वाची कल्पना किती शुद्ध स्वरूपाची बनविता येणे शक्य आहे हेच जणू काही त्यांनी पाहिलेले आहे. याच्याहून अधिक निरंजन असे काही नाही. जर का याच्यापलीकडे कोणी पाऊल टाकील तर तो नास्तिक्याच्या दरीत उतरला असे त्याने समजावे. पण काहीतरी

आदितत्त्वरूप असावयास हवे ही जी मानवी मनाची तर्कप्रखर भूक तिचा अत्यंत सोज्ज्वल असा उपशम या चिन्मात्रकल्पनेने आचार्यांनी केला आहे. हे रूप इतके निरंजन झाले की, शेवटी आचार्यांना ‘ प्रच्छन्नबुद्ध ’ म्हणजे ‘ ज्याला परमतत्त्व नाही असे म्हणावयाचे आहे असा माणूस ’ अशी शिवी मिळाली. अस्तिबुद्धी कायम ठेवून आदितत्त्वाचे रूप याच्याइतके निर्मल असे कोणासही कल्पिता आलेले नाही. नास्तिक्यही चुकविले व सगुणोपासनेत जी तार्किक संकटे उद्‌भवावयाची तीही चुकविली; व अशा रीतीने तर्काची केवळ कड लावून दोनही संभाळली, हेच शंकराचार्यांचे मोठे बुद्धिवैभव होय. अर्थात सामान्य लोकांनी जसा बुद्धावरच सूड उगविला आणि त्यालाच देव बनविले, तसेच काही या ज्ञानाचेही लोकांच्या मर्जीस अनुसरून होणे अपरिहार्यच होते. ब्रह्मांतून ईश्वर निघाला आणि ईश्वरातून अवतार निघाले. लोकांना जवळचा वाटावयास आपल्यासारखा कोणीतरी हवा असतो. म्हणून लोकांनी या मूळच्या परमशुद्ध कल्पनेचे मानुषीकरण केले. त्यामुळे मग देव जवळचा वाटू लागला व ज्याला जशी शक्ती असेल तसा तो अवतारापाशी थांबतो, किंवा सत्ताधीश कर्तृत्ववान अशा ईश्वरापाशी पोहोचतो किंवा त्याच्याहीवर चिन्मात्रब्रह्मस्वरूपाशी जाऊन पोहोचतो. पण हा उपरोक्त आपला मुद्दा नव्हे. अस्तिबुद्धी आपला हक्क तर्करीत्या कसा सांगते व तो तिला बजावू देणे अत्यंत कुशाग्र बुद्धीच्या माणसांनासुद्धा कसे शक्य वाटते व कितपत साधते हे सांगण्यासाठी हा आचार्यांचा दाखला घेतला आहे. म्हणून ‘ अस्तिबुद्धी बाळगावयास हरकत नाही. कारण ती तर्कसिद्ध आहे ’ एवढा एक मुद्दा भौतिकशास्त्रज्ञाने आम्हास सोडला म्हणजे मग भौतिकशास्त्राचा महिमा केवढा अघटित आहे हे मोकळेपणाने गावयास मन उत्सुकच होते व सगळ्या जगाला लाथाडून, त्याचा तिरस्कार करून, त्याला जड म्हणून, संसारग्रस्त प्राण्याकडे गय करण्याच्या बुद्धीने पाहून जो कोणी ब्रह्मवेत्ता गिरिकंदरात नाक धरून बसलेला असतो त्याच्या व शास्त्रज्ञाच्या थोरवीची तुलना करण्यास मन उद्युक्त होते.

## आचार्यांचा खरा अर्थ

‘ जगन्मिथ्या ’ या वाक्यार्थाचा जो अर्थ आम्हाला खुद्द आचार्यांनी सांगितलेला आहे तोच आम्हाला सांगा. ‘ ज्याला ब्रह्मज्ञान झाले त्याला ते झाल्यानंतर मग हे जगत् खोटे आहे; आधी नाही. ’ असा तो अर्थ आहेसे कोणी म्हणतात, यात तरी ‘ खोटे ’ याचा अर्थ तरी हाच की, शेवटचे परमसत्य माहीत झाल्यानंतर त्याच्या खालोखाल असलेली इतर सत्ये ही सर्वथा उपेक्षणीय म्हणजे असत्य होत. हे तत्त्व आम्हास कोणी सांगितले तर आमची त्याला ना नाही. अंतीम सत्याच्या संबंधाने वर विवेचन आलेले आहे, व त्याच्या अस्तित्वाविषयी अस्तिवाद्यांनी केलेले तर्कसिद्ध अनुमान वर दाखविलेलेच आहे. त्याच्या व शास्त्रज्ञाच्या भूमिकेत काहीच

फरक उरणार नाही, इतकेच काय, पण वर सांगितलेला जो आचार्यांचा अर्थ तोच जर आम्हाला कळला तर आचार्यांच्या व शास्त्रज्ञांच्या भूमिकेतही फरक उरणार नाही. आचार्य ज्याप्रमाणे या स्थूल सत्यातून विचार करता करता अंतिम सत्यात प्रवेश करणार व म्हणून मग हे स्थूल सत्य असत्य म्हणजे उपेक्षणीय मानणार, त्याप्रमाणेच शास्त्रज्ञही करतो असे म्हणावयास हरकत नाही. हे दिसत आहे, हे काही कायमचे नव्हे, हे उत्पन्न करणारे मागे काही तरी असावयास हवे, याच मनाच्या रुखरुखीने आचार्य मागे शोधीत गेले असावे व आमचा नवा शास्त्रज्ञही बरोबर याच रुखरुखीने मागे शोधीत जातो, म्हणजे Research करतो. आचार्य जो जो पुढे पुढे जातात तो तो ज्यातून त्यांनी रिघाव केला त्यापेक्षा अधिक उन्नत वस्तू त्यांना जशी दिसू लागते, तशीच गोष्ट शास्त्रविदांच्या बाबतीतही घडते· नानाप्रकारच्या वस्तुसमूहांतून आत शिरून तो सूक्ष्म न्याय उघडकीस आणतो व मग तेही ढोबळच आहेत असे मानून सूक्ष्मतर न्यायाची जिज्ञासा ठेवून आणखी पुढे जातो. म्हणजे काय की दोघांचीही विचारांची प्रणाली एकच आहे. फरक इतकाच की, एक केवळ मानसिक पद्धतीने पुढे जातो व दुसरा 'मानसिक' या शब्दाशी तोलली असता जिला 'जड' हे नाव देता येईल अशा 'जड' म्हणजे Material म्हणजे वास्तवपद्धतीने पुढे सरकतो. हे वास्तवज्ञान तो वस्तुसंशोधनाने बाहेर काढतो व वरील तत्त्ववेत्ते मानसिक व्यापारांच्या शोधनाने पुढे जातात इतकेच काय ते. शास्त्रशोधकालासुद्धा पुढे पुढे गेल्यावर ज्ञानाच्या दृष्टीने ज्या जडवास्तवातून तो पुढे गेला ते उपेक्षणीयच होय; कारण अधिक उन्नत तत्त्व त्याच्या हाती लागत जाते. अशा प्रकारे तत्ववेत्ते व शास्त्रसंशोधक यांचे वैरच उरत नाही, व मग एकाने दुसऱ्याचा अधिक्षेप करण्यासही जागा उरत नाही. फरक राहील हे खरे; पण तो इतकाच की, एकाचे मनोविश्लेषण व दुसऱ्याचे वस्तुविश्लेषण. यात पूर्वोक्ताला जर काही आढ्यता बाळगावयाची असेल तर उत्तरोक्ताला ती हिरावून घेण्यासारखी असते; कारण वास्तवाची हुकमत जशी त्याच्या मनोविश्लेषणावर चालत नाही तशीच त्याच्या मनोविश्लेषणाची हुकमत याच्या वास्तव-विश्लेषणावर चालू शकत नाही, व मग संगनमताने इतकेच ठरेल की, अंतिम सत्याच्या या दोन पद्धती आहेत. तुम्ही आपल्या मार्गाने जा व आम्ही आपल्या मार्गाने जातो. इतकी ऋजुता जर प्रतिपादकांच्या मनात राहिली तर पुष्कळच गुंता सुटेल.

वरील सर्व विवेचनावरून असे ध्यानात येईल की, 'ब्रह्म सत्यं जगन् मिथ्या' यापैकी 'ब्रह्म सत्य' या वाक्यार्थाला आपण कोठेही दंश केलेला नाही; कारण तो शुद्ध तर्कबुद्धीने करता येत नाही. 'जगन्मिथ्या' या वाक्यार्थाला जो इतरांकडून अज्ञानाने दंश झाला होता तो कसा अनाठायी व विकृत आहे हेही आपण पाहिले. वस्तु-ज्ञान व मनोविज्ञान यात फरक नाही हेही पाहिले व शेवटी अज्ञानाने

'जगन्मिथ्या' याचा अर्थ जो बसविला आहे तोच खरा आहे असा जर आग्रह असला तर तो मानावयास आम्ही तयार नाही हे सकारण सांगितले आहे. हे पत्करले म्हणजे आरंभी सांगितलेले जे अनेक पक्षोपपक्ष त्यांच्या जास्त परीक्षणाची काहीच जरुरी उरत नाही.

## ब्रह्मविदांना दुसरा प्रश्न

सर्व ब्रह्मविदांचे बोलणे एकमेकांशी मिळते असते तर फारच मोठा कार्यभाग झाला असता. ते असे मिळते असावे अशी सामान्य संसारी माणसांची अपेक्षा आहे. पण ते मिळते का असत नाही हा प्रश्न वर विचारला आहे. याच्या जोडीला दुसराही एक विचार मांडावासा वाटतो. ज्यांना ब्रह्मज्ञान झाले त्यांना बसल्या जागी एक कसलासा आनंद झाला एवढाच 'ब्रह्मज्ञान' शब्दाचा अर्थ असेल तर आम्हाला त्याचे फारसे सुखदुःख नाही हे मागे सांगितलेच आहे. पण जर का त्याचा अर्थ असा असला की, आपल्याला विश्वाचे कोडे उलगडले तर मात्र एक लेख्य विचार लिहावासाच वाटतो. जड म्हणून ज्याची अवहेलना होते अशा या जीवनात ज्ञानाची उपासना करणारे शेकडो लोक आजवर झाले आहेत. हे ज्ञान सृष्टपदार्थांचे होय. मनुष्ययोनीच्या बालपणातसुद्धा तिला पुष्कळ कोडी येऊन पडली. सूर्याचे सकाळी उगवणे आणि संध्याकाळी मावळणे, तो गेल्यानंतर तारकांनी लपतछपत येणे, चंद्राने आपल्या तोंडावर हात ठेवून ते, केव्हा थोडे, केव्हा फार दाखविणे व झाकून घेणे, कसलीही पूर्व सूचना न देता रात्रीच्या वेळी एखाद्या ताडमाड दैत्याप्रमाणे धूमकेतूने आकाशात पसरणे हे सर्व काय आहे, ही जिज्ञासा मनुष्ययोनीला प्रथम झाली. तेथपासून तो तहत् आतापर्यंत सृष्टिव्यापाराचे परीक्षण करून ते कोणत्या सूक्ष्म नियमनांनी अंकित आहेत, हे पाहण्याचे काम मनुष्ययोनीने चालूच ठेवले आहे. मध्यंतरी हजार दीड हजार वर्षांचा मोठा थोरला खंड पडलेला दिसतो. पण त्याचे कारण तरी इतकेच की सृष्टपदार्थांच्या परीक्षणावरची माणसांची भक्ती उडाली व साक्षात्काराच्या अभिनिवेशाने जे कोणी परलोकचा संदेश घेऊन आले, व आत्मा, अनात्मा इत्यादींचा शब्दच्छल करू लागले, म्हणजे ते शब्द ऐकणाराचा छळ करू लागले, त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या विवरणाचे श्रवण करण्यात व मग तदुत्पन्न जो अभिनिवेश त्याला वश होऊन एकमेकांच्या माना कापण्यात हा सर्व वेळ गेला. हे सर्व केवळ हिंदुस्थानातच घडून आले असे कोणी समजू नये. ग्रीक तत्त्ववेत्त्यांनी व संशोधकांनी सृष्टीज्ञानाच्या पीठिका घातल्याही होत्या व 'माझ्या हाती जर एक मोठी थोरली तरफ मिळाली तर मी हा पृथ्वीचा गोलक सगळाच्या सगळा उचलून दाखवीन' असे आर्किमेडिस हा गर्जून म्हणाला होता. सृष्टिज्ञानाच्या अभ्यासाची ही फारच मोठी जाणीव त्याला झाली होती व तदनुसार अभ्यासूंच्या अभ्यासाच्या दिशा कोणत्या असाव्यात ते त्याने या

गर्जनेने सांगूनही टाकले होते. मोठमोठाले बिलोरी आरसे तयार करून त्यावर सूर्यकिरणे उतरवून घेऊन, ती परावृत्त करून, त्याने शत्रूंच्या जहाजावरील फौजा प्रत्यक्ष जाळून मारल्या होत्या. हे पहात असताना भौतिक ज्ञानाचा महिमा काय आहे हे माणसाला खरोखरीच पटले असेल. वस्तूला पुढे ढकलण्याचा वाफेचा जो धर्म तो प्रत्यक्ष वाफेचे यंत्र ज्या काळी झाले त्याच्या आधी दीड हजार वर्षे लोकांना उमगला होता, याची सोदाहरण नोंद इतिहासात आहे. पण हे सगळे तेथेच राहिले व ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगणारे मोठमोठाले लोक तिकडे अवतरले व त्यांनी सुरू केलेल्या विचारप्रवाहापुढे नुकतीच सुरू झालेली अल्पस्वल्प भौतिक ज्ञाने सफा वाहून गेली. हेच सगळीकडे झाले. आता नवीन युगमान चालू होऊन आत्मानात्मविचार हा झपाट्याने मागे पडत चालला आहे. व भोवतालीचे वस्तुजात दिसते त्याच्याकडे न्याहाळून पाहण्याची माणसाची जुनी बुद्धी पुन्हा ताज्या हुरुपाने उभी राहिली आहे. लोकांनी मोठ मोठी शोधालये बांधली आहेत, वेधशाळा बांधल्या आहेत, साधनसामग्री निर्मिली आहे, केवळ अनाग्रह असे तत्त्वसंशोधन करण्याच्या शाळा घातल्या आहेत, नवीन निघालेल्या ज्ञानाने जर जुने बाधित होते असे दिसू लागले तर पहिल्यापेक्षा जास्त सत्य असे ज्ञान आता आपणास होणार म्हणून जुने गेल्याबद्दल खंती न मानता नवीनाचा हर्षाने स्वीकार करावा, अशी विचारांची प्रणाली घातली आहे ; व अशा रीतीने हेतू, साधने व बुद्धी यांचा उत्तम समन्वय करून हे जे वस्तुजात उत्पन्न झालेले आहे, त्याच्या मागे, मागे, काय आहे हे शोधावयाचे काम चालू केले आहे. हे करीत असता पदार्थांचे जे नवीन गुणधर्म माहीत होतात त्यांचा योग्य तो उपयोग करून घेऊन माणसाचे जीवित ते सुखाचे करीत आहेत. मूळ हेतू वस्तुजाताच्या मागे मागे काय आहे, हे शोधावे व अनेकावरून थोड्यापर्यंत पोचावे व शेवटी कदाचित् एका पर्यंत पोचावे म्हणजेच नानात्वात एकत्व कोठे आहे की काय हे पहावे असा उद्योग त्यांनी चालविलेला आहे. या त्यांच्या कामात बुद्धी, चातुर्य, प्रतिभा, धारणा, बौद्धीक तरलपणा, कष्टसहिष्णुता, निर्लोभपणा, संसारविरक्ती अशांसारख्या अनेक उत्तमोत्तम गुणांचा वापर होत असतो. अर्थात् तपस्व्यांच्या अंगी लागणारे जे गुण ते यांच्याही अंगी असतात. या गुणांच्या बळावर अहोरात्र श्रम करून एक लहानसा नव्या ज्ञानाचा कण जरी प्राप्त झाला तरी श्रमाचे सार्थक झाल्याचा आनंद त्यांना होतो. सगळा जन्मच्या जन्म अशा व्यवसायात घालविताना त्यांना अपयशे पत्करावीच लागतात. हा त्यांचा उद्योग पाहिला व त्यांच्या अडचणी लक्षात आल्या, म्हणजे तेथे ब्रह्मवेत्यांची आठवण होऊ लागते.

## आमची खात्री पटविण्याचा सोपा मार्ग

असे वाटते की, जर या ब्रह्मविदांना अंतिमज्ञान झाले आहे व अशा रीतीने

विश्वाचा प्रश्न सुटला आहे तर त्यांना या अधिभौतिक शास्त्रज्ञांच्या अडचणी सहज सोडविता याव्या. ज्याची बुद्धी सर्व वस्तुजाताच्या बुडाशी असलेल्या सूक्ष्म चित्कलेपर्यंत झेपावत गेली त्यांना या जडाचे ज्ञान होणे हे किती सोपे व सहजानुसार आहे बरे ? अवघ्या अंतराळातील निरनिराळ्या लोकांतून म्हणजे सूर्यलोक इत्यादिकांतून भ्रमण करीत जाणारी त्यांची बुद्धी वाटेत लागणाऱ्या नक्षत्रताऱ्यांशी ओळख केल्यावाचून जाईल तरी काय ? अर्थात हे जर त्यांना सर्व परिचित होत असेल, –कारण विश्वाचे कोडे उलगडणे याचा अर्थ आम्ही विश्व काय आहे हे समजणे असाच समजतो–तर या प्रश्नांची उत्तरे देणे त्यांस मुळीच जड पडू नये. शास्त्रसंशोधकांना इतक्या ज्या अडचणी येऊन पडतात त्याचा परिहार करणे ब्रह्मविदांना अगदीच सोपे जावे; कारण त्यांना विश्व काय आहे हे कळलेले आहे. विश्वरूपाशी त्यांची ओळख झाली आहे, हे त्यांचे म्हणणे आम्हाला पटवून देण्यास हा त्यांच्या दृष्टीने अतिशय सोपा असा मार्ग आहे. जे माहीत आहे ते सांगावयाचे एवढेच काय ते. या एका सत्कृत्याने त्यांना आमची अशी खात्री पटवून देता येईल की, त्यांच्या मार्गाने गेले असता हे कोडे खरोखरीच उकलते. त्यांना स्वत: ते ज्ञान झालेले नाही असे ते म्हणाले, तर मग विश्वाचे कोडे उलगडले या शब्दप्रयोगाचे त्यांचे व आमचे अर्थ अगदी निराळे आहेत असे ठरेल. सध्या शास्त्रज्ञ ज्या प्रयोगात गुंतले असतील, ज्या वस्तूंची निरीक्षणे ते करीत असतील, त्या वस्तूवरच ब्रह्मविदांनी आपली मने लावावी व त्यांना काय माहीत झाले आहे ते त्यांनी कागदावर लिहून ठेवावे. इकडे संशोधकाचे काम चालूच राहील. कालांतराने त्यांना लागलेले शोध हे ब्रह्मविदांच्या कागदात लिहिलेल्या मजकुराशी शेकडा ५० ठिकाणी जरी जमू लागले तरीसुद्धा ‘ब्रह्मविदांनी जगत् जिंकले,’ अशी कबुली आम्ही देऊ व शेवटच्या ज्ञानमंदिराला लक्षावधी लोकांनी सुखाने जावे, असा मोठा हमरस्ता त्यांनी केल्याचे श्रेय त्यांना प्राप्त होईल.

## तुमचे इकडे लक्षच नाही ?

त्यांची अडचण आम्ही ओळखतो. ते म्हणतात ‘आमचे इकडे लक्षच नाही !’ पण लक्ष दिले असता वस्तुजाताचे उकलन करता येईल की नाही ही खरी पृच्छा आहे. आम्ही त्यांच्या ठिकाणी जो सद्भाव बाळगितो, व आम्हालासुद्धा सर्व प्रकारच्या विवंचनेतून मुक्त होण्याची जी इच्छा आहे, त्यांच्या बळावर आम्ही त्यांना आमची विनंती मान्य करावयास लावू असा आम्हाला बळकट भरंवसा आहे. ही एक अगदी साधी कसोटी आहे. पण तिच्यामुळे आमचे समाधान होणार आहे. त्यांना सर्व स्थूल जगत असत असल्यामुळे कशाचीच पर्वा नाही. पण आम्हाला जर याने समाधान उत्पन्न होत असले तर ब्रह्मज्ञ हो, आपण हे एवढे करण्याचे का पतकरू नये ? जगत हे असत खरे, पण सताचे ज्ञान झाल्यानंतरसुद्धा आपण त्यात राहताच ना ? निर्मम-

त्यानेच का होईनात पण आपले सर्व व्यवहार तेथें चालतात ना ? आपल्या प्रतीत झालेली ज्ञाने या असत जगातील आम्हा लोकांच्या उद्धारासाठी आपण प्रतिपादिता ना ? स्वतःचा प्रपंच नसला तरी, पंथाचा प्रपंच आपण थाटता ना ? तसेच आपणापैकी कित्येक जगत हे असत् आहे हे पटले असतानासुद्धा, अलिप्त राहूनच, संसाराची सर्व कामे करतात ना ? 'इंद्रिये करीत आपुलाले व्यापार' या सूत्रान्वयेच का होईना पण आपल्याला उपभोगकल्पना सुटली नाही ना ? हे सर्व लावून बोलण्यासाठी किंवा हिणविण्यासाठी विचारलेले नाही तर या असत् जगामध्ये, ते असत् आहे हे माहीत झाल्यानंतरसुद्धा, कोणत्या ना कोणत्या कारणासाठी आपण थोडा बहुत तरी व्यवहार करता याचे स्मरण आपल्याला द्यावें यासाठी विचारलेले आहे. जर आपण थोडेंबहुत का होईना, व अलिप्त राहूनच का होईना, जगातल्या व्यवहारात उतरता, तर शास्त्र शोधकांच्या मार्गातील अडचण काढण्यासाठी आपण थोडेसे या असत् जगात उतरलात तर काय बरे वाईट होईल ? आपण होऊन आपले लक्ष तिकडे न जावे हे रास्तच आहे. कारण असत् हे अणुरूप असले काय किंवा डोंगराएवढे असले काय ? आपल्याला सगळें सारखेंच आहे. म्हणून आम्हाला महत्त्वाच्या वाटणाऱ्या या प्रश्नांकडे आपले लक्ष जाऊ नये हे स्वाभाविक आहे. तथापि आम्ही विनंती केल्यावर थोडाबहुत तसा आचार करावयास हरकत असू नये. कारण आम्हाला आपणाकडें वळवून घेण्याला हा एक फार चांगला उपाय आहे.

## यात अद्‌भुत केल्याचा दोष नाही

'जे स्वाभाविक होत असेल ते तसेच होऊ देत रहावे; त्यात आपले मोठेपण वाढविण्यासाठी काही अद्‌भुतासारखे करून दाखवू नये' असा विचार आपण मनाशी आणण्याचेही कारण नाही. कारण शास्त्रशोधकाला जे अडले आहे ते एकदम उकलून दाखविणे यात अद्‌भुत असे काही नाही. शास्त्रशोधक ते लवकरच उलगडून दाखविणारच आहे. शिवाय जे मोठमोठाले ब्रह्मज्ञानी, योगी व महंत झाले त्यांनी अद्‌भुत गोष्टी केलेल्या नाहीत असे नाही. परकायाप्रवेश करणे, रेड्याकडून वेद बोलविणे, मेलेली माणसे उठविणे, काशीत गुप्त होऊन सह्याद्रीत निघणे, पाण्यावर घोंगडी टाकून नदीवरून परतीराला जाणे, पाण्याने भरलेल्या पिंपातील पाण्याचे मद्य करणे, लहानशा भाकरीच्या तुकड्यावर दशसहस्रांना भोजन घालणे अशासारखे अद्‌भुत चमत्कार ब्रह्मविदांनी केलेले आहेत ना ? मग जे शोध थोड्याच दिवसांत लागावयाचे आहेत त्यांचे काही वर्षांपुरते आगाऊ ज्ञान कागदावर लिहून ठेवावयास आपली काहीच हरकत असू नये.

## हे शक्य नसावे !

पण शंका येते ती ही की हे शक्य नसावे. त्या त्या ब्रह्मविदाच्या कालापर्यंत संसारी लोकांनी झगडून जी ज्ञाने संपादिली होती त्यापलीकडचे वस्तुजाताचे काही

ज्ञान ब्रह्मविदांना होते असे वाटत नाही. ते जर असते तर त्याचा काही ना काही प्रत्यय त्यांच्या वाङमयावरून आला असता, दाखले देताना कोठेतरी अशा या ज्ञानातून काही दाखले आपल्या तत्त्वप्रतिपादनाच्या भरात ब्रह्मवेत्यांनी उचलले असते. एखाद्या ब्राह्मणाच्या सुंदर यज्ञोपविताचे वर्णन करताना शनीच्या भोवतालच्या कड्याची उपमा यांना सुचावयास काहीच हरकत नव्हती. पण हे शनीचे कडे याना माहीत नसावे असे वाटते. 'दृक्प्रत्यय हा दरवेळी बरोबरच नसतो.' हे प्रतिपादताना दृष्टीला स्तब्ध दिसणारी पृथ्वी वास्तविक नेहमी फिरतच आसते, हे उदाहरणच सुचावयास काहीच हरकत नव्हती. आता कोणी असे म्हणतात की, वाचकांना ज्या गोष्टी माहीत नाहीत त्या उपमानासाठी किंवा दाखल्यासाठी घेतल्याने प्रतिपाद्य वस्तू स्पष्ट कशी होईल ? पण हाही मुद्दा टिकावयाचा नाही. कारण आपल्या जुन्या वाङमयात हटयोगाच्या गैर माहितीमुळे शरीरातील नाड्यांसंबंधाचे वाचकांना अपरिचित असलेले दाखले अनेक ठिकाणी दिले आहेत. मग ते अपरिचित असलेले दाखले जर प्रतिपादनात चालतात तर आताच सांगितलेले का चालू नयेत ? याचे कारण इतकेच दिसते की, हे दाखले माहीत नव्हते, सूर्य, चंद्र व पृथ्वी ही एकमेकांच्या आड आल्याने जसा त्यातला एखादा दिसेनासा होतो किंवा दुसऱ्याच्या सावलीत सापडल्यामुळे अदृश्य होतो पण लोक मात्र त्याला केवळ भ्रमरूपाने राहु-केतूंनी केलेला सूर्यचंद्राचा ग्रास असे समजात, त्याप्रमाणेच अमुक एक गोष्ट आहे असा ग्रहणाचा दाखला घेऊन त्यांनी आपले प्रतिपाद्य का खुलविले नाही ? उत्तर इतकेच दिसते की, ते त्यांना माहीत नव्हते.

## भवानी तलवार

ब्रह्मविदांचीच काय, पण ज्या देवता आपण कल्पिल्या त्यांच्या ज्ञानाची मर्यादासुद्धा, त्या त्या वेळेपर्यंत माणसांनी मिळविलेल्या ज्ञानाच्या पलीकडे जात नाही असे म्हणावे लागते. शिवाजीराजाला भवानी प्रसन्न झाली आणि तिने त्याला काय दिले ते पहा ! तिने त्याला एक चांगलीशी तरवार दिली इतकेच. आपल्या लाडक्या शिवाजीच्या हातून जर भवानीच्या मनात मोठाली कारणे घडवून आणावयाची होती, तर शिवाजीच्या काळापासून निदान पुढे शंभर वर्षांनी जी उत्कृष्ट प्रकारची तोफ किंवा बंदूक निघाली तीच तिने त्याला का दिली नाही ? आपल्याला हे माहीत आहे की, चालू काळातील मारक शस्त्रापेक्षा थोडेसेच अधिक मारक शस्त्र जर एका पक्षाच्या हाती आले तर तो तेवढ्या साधनाधिक्याच्या बळावर जगत् जिंकू शकतो. म्हणून या प्रसन्न झालेल्या भवानीने प्रिय शिवाजीच्या हाती तेव्हा सर्वत्र चालू असलेल्या मारक शस्त्रांपेक्षा थोडेसे जास्त मारक शस्त्र जर दिले असते तर या पराक्रमी पुरुषाने सगळे जग जिंकिले असते. पण भवानी तसे कोठून करणार ? माणसांनी तिच्या हाती जे शस्त्र द्यावे तेच ती भक्ताला देणार ! त्या-

वेळचे जे कोणते मारक शस्त्र होते ते तिने त्याला दिले ! ती पुढे कोठे जाणार ? हे जसे, तसेच ब्रह्मविदांचे आहे. त्यांच्या काळापर्यंत वस्तुजाताची ज्ञाने जेथवर आली असतील त्यांच्या पलीकडे ते जाणार कसे ? याला आणखी एक चांगला दाखला आहे. ख्रिस्ती पुराणात विश्वनिर्मितीची कथा आहे. देवाने तेज उत्पन्न केले, पृथ्वी केली, पाणी केले, होता होता मानवप्राणी अथवा पुरुष केला, स्त्री केली, नंदनवनात त्यांना वसाहतीला जागा दिली, काय खावे, काय न खावे याचे निर्बंध घालून दिले. एकदा सहज असे झाले की, स्वर्गातील देवदूत या मानवाच्या समाचारास आला. बोलण्यावरून बोलणे निघता निघता मानवाने पृच्छा केली, 'हे आकाशातून उडत जाणाऱ्या देवदूता, डोक्यावर दिसणाऱ्या या सर्व आकाशस्थ गोलकांची तुला इकडे-तिकडे फिरताना माहिती झालेलीच असली पाहिजे; त्यांतली तू मला काही सांगशील काय ?' होकार भरून देवदूताने पृच्छकाच्या समाधानास सुरुवात केली. ही देवदूताने दिलेली माहिती कोठवर आली आहे, हे पाहण्यासारखे आहे. ज्या कवीने या दोघांचा संवाद गायिला आहे त्या कवीच्या कालापर्यंत खगोलाचे जेवढे ज्ञान माणसांना प्राप्त झालेले होते तेवढेच काय ते देवदूताला सांगता आले ! ती मर्यादा येताच देवदूत थबकला व त्याने बोलणे वळविले. स्पष्टच आहे की, कवीला जर पुढील माहिती नाही तर देवदूताला कोठून कळणार ? आणि म्हणूनच आमच्य शोधकांनी वस्तुजातासंबंधीची जी ज्ञाने संपादिली नाहीत ती आमच्या ब्रह्म-विदांना तरी कोठून येणार ? ब्रह्मवेत्ते जो जो गप्प बसतात तो तो अशा शंका बळावत जातात. म्हणून या सर्व कुशंकांचे निरसन करण्यास ब्रह्मविदांनी पुढे यावे व असतात प्रविष्ट केल्याची खंती न मानता भावी शोधांनी उपलब्ध होणारी काही माहिती आज आगाऊ सांगून ठेवावी. एवढी कसोटी आम्ही संसारी लोक लावू इच्छितो.

## ब्रह्मवेत्त्यांचे धाडस

एखादे वेळी ब्रह्मवेत्ते लोक हाही हिय्या बाळगतात, म्हणून असले प्रश्न विचारावयास धैर्य वाटते. ब्रह्मविद्यापंथातील (Theosophy) एका मोठ्या अधिकारी माणसाने चंद्रलोकावर दोन दोन, तीन तीन सफरी केल्याचे मागे वर्तमानपत्रात लिहून आले होते. ते जर खरे असले तर 'ब्रह्मविदांनी शास्त्रशोधकांच्या मदतीला यावे' या विनंतीत गैर असे काहीच नाही. त्यांच्यापैकी कोणी कोणी एखाद्या आकाशस्थ ग्रहावर आपल्यासारख्याच म्युनिसिपालिटचा व लोकलबोर्डे आहेत, फक्त ती आपल्यापेक्षा जास्त आकारमानाची आहेत, असे प्रसिद्ध केल्याचे स्मरते. आता या सफर करणारांनी आम्हाला हवा आहे त्यापेक्षाही बारीक तपशील सांगितला हे खरे आहे. व त्यावरून त्या ग्रहांशी त्यांची फारच दाट ओळख आहे हे दिसून येते. पण आमचा जो प्रस्तुत मुद्दा चालू आहे त्याचा विचार करता यात एक मोठेच वैगुण्य आहे. ते म्हणतात त्याप्रमाणे तेथे धर्मशाळा व म्युनिसिपालिटचा आहेत की

नाही हे पडताळून पहावयास आम्हास काहीच साधन नाही. आमच्या दुर्बिणीची शक्ती अजून इतकी वाढलेली नाही की तिच्या योगाने कोटयावधी योजनांवर असलेल्या ग्रहावरील धर्मशाळा येथून दिसाव्या. म्हणून आमच्या संशोधकाचे जे संशोधन चालू असेल, तेवढयापुरतीच माहिती त्यांनी सांगावी, म्हणजे तिचा पडताळा लवकरच पाहता येईल. ब्रह्मविदांना अशा प्रकारची माहिती असावयास हवी तरच 'ब्रह्मज्ञान' झाल्याचे त्यांचे म्हणणे खरे मानता येईल, असे ब्रह्मविद्यापंथांतील, बुद्धीचे देवस्थान ज्याचे जागृत आहे अशा एका गृहस्थांनी पुणे येथील वसंतव्याख्यानमालेत सांगितल्याचे आठवते. आपण साईनाथ महाराजांपाशी काही दिवस राहिलो असता त्या महाराजांच्या तोंडून 'सब् जानता है' 'सब् जानता है' असे उद्‌गार नेहमी बाहेर पडताना ऐकत असू असे ते म्हणाले व उद्‌गारले की 'जर महाराजांना सर्व कळते तर The law of diminishing returns हा अर्थशास्त्रातील नियमसुद्धा त्यांना माहीत असला पाहिजे.' वरील एका चांगल्या सुशिक्षिताचे उद्‌गार केवळ यासाठीच दिलेले आहेत की, ब्रह्मविदांसंबंधीची सुशिक्षितांच्या मनात काय अपेक्षा आहे हे वाचकांस कळावे. असो. तात्पर्य हे की, ब्रह्मविदांच्या ब्रह्मस्वरूपाच्या वेगवेगळ्या जबान्या पाहिल्या, त्यांची ब्रह्मस्वरूपवर्णने परस्परांशी मिळत नाहीत हेही पाहिले, त्यांचे साक्षात्काराचे आग्रह पाहिले व शेवटी शास्त्रज्ञांच्या मदतीला येण्याबद्दलची त्यांची अनिच्छा पाहिली म्हणजे 'हे सर्व जगत् खोटे आहे, म्हणजे मुळात नसून उगाच असल्यासारखे भासत आहे.' या त्यांच्या म्हणण्याकडे लक्ष देण्याचे कारण आहे असे वाटत नाही.

### ऋण कोणाच्या धर्माचे

आपण असे मानीत आलो आहो की, धर्माने आपल्या जीविताची घडी बसवून दिलेली आहे. या मानण्यात फारशी चूक नाही. पण ज्या धर्माने ही घडी बसवून दिली तो हा पारमार्थिक धर्म नव्हे. माणसांनी जे जे शिकावयास हवे व आचरावयास हवे ते ते सर्व परमार्थविचाराच्या संगतीतच सांगून ठेवण्याची पूर्वीची वहिवाट असे. या सर्वाला मिळून धर्म हे नाव आपण आजवर देत आलो आहो. यापैकी परमार्थासंबंधीचे विवेचन आतापर्यंत पुष्कळच झाले आहे. पण आपली जी घडी बसवून दिलेली आहे ती या परमार्थाने नव्हे. हे पारमार्थिक ज्ञान बाजूस ठेवून माणसांना जी शुद्ध सामाजिक ज्ञाने हस्तगत करता आली ती त्यांनी जपून ठेविली व ती समाजाच्या हिताची असल्यामुळे त्यांना धर्माचे स्वरूप प्राप्त झाले. ही ज्ञाने त्यांनी परमार्थातून आणली नाहीत, तर शतकानुशतके आणि पिढयानुपिढया त्यांचे जे अनुभव साचत आलेले होते, त्यांच्या परीक्षेवरून त्यांनी काढली. अनुभव हा त्या ज्ञानाचे उगमस्थान झाला. आता अशा रीतीने ज्ञानसंपादन करणे हीही ज्ञानार्जनाची शास्त्रीय पद्धतीच होय. जेवढया समाजापुरता हा अनुभव त्यांनी संपादिला होता,

तेवढ्या समाजापुरती त्यांची ज्ञाने सिद्ध व उपयोगी झाली. दुसऱ्या समाजाशी सन्निकर्ष आला, तेव्हा नवे अनुभव येऊ लागले व या दोघांच्याही सामुदायिक जीवनाचा जो अनुभव आला त्यावर त्यांनी नवी ज्ञाने रचली. त्या वेळी लोक म्हणाले, जुन्या चाली मोडल्या; आता नवीन चाली आल्या. नव्या चालीत जर समाजाचे हित होते तर समाजाने त्या घ्याव्या हे युक्त आहे. अशा प्रकारे हे अनुभवजन्य ज्ञान साचत साचत चालले. ही ज्ञानसंपादनाची शास्त्रीय पद्धतीच होय यानेच आपल्या जीविताची घडी बसवून दिलेली आहे. पण यात परमार्थाचा मात्र काही एक संबंध नाही. हवामानास अनुसरून काही नियम करावे लागले; स्त्रीपुरुषांच्या लोकसंख्येच्या प्रमाणावरून काही नियम करावे लागले, स्त्रीजातीचे सामुदायिक मन व पुरुषजातीचे सामुदायिक मन यांचे कित्येक वर्षांवर पसरलेले जे चलनवलन असेल ते लक्षात घेऊन काही नियम करावे लागले; धनोत्पादनाची साधने जशी विपुल किंवा अल्प असतील तसे सोईस्कर नियम करावे लागले; वंशकल्पना मनात बाळगून इतरांच्याशी कंठाव्या लागणाऱ्या सामुदायिक जीवितासाठी काही खोल नियम करावे लागले; जेथे समाजरक्षणाची आवश्यकता नसेल किंवा असली तर अत्यल्प असेल तेथील व्यक्तींच्या आचरणास निराळे नियम केले; जेथे सामुदायिक जीवितरक्षणाची आवश्यकता फार मोठी तेथें व्यक्तीसाठी निराळेच नियम केले; अशा प्रकारे सर्व परिस्थितीच्या अवलोकनाने जे असावयास हवे असे सूक्ष्म अभ्यास करणाऱ्या लोकांच्या मनात अनुभवाने उतरले होते, त्यालाच त्यांनी नियमांची रूपे दिली. या नियमांच्या पालनाने आपले हित होत आले असे भावी पिढ्यांना दिसू लागले. मग या मूळच्या अवलोकन करणारांना लोक द्रष्टे म्हणू लागले. पण द्रष्टें हा शब्द पुढील पुढील माणसे काही भोळ्या अर्थाने वापरू लागतात, तरी त्यांना द्रष्टेपण कसे आले होते हे वरील विवेचनावरून ध्यानात येण्यासारखे आहे. त्यात अतिमानुषत्वाचा काहीएक भाग नाही. शुद्ध अवलोकन, चिंतन, आणि योजना एवढेच काय ते त्यात आहे.

## पार्थिव नियमनांचे पालन हाच धर्म

आता हे जे द्रष्ट्यांचे नियम ते परमार्थविचाराच्या संगतीत धर्मग्रंथात अंतर्भुत झाले व परमार्थविचारात ज्याप्रमाणें ‘उगाच खोलात जावयाचे नाही, आहे ते मानावयाचे’ हा विचार नाइलाजाने रूढ झाला, तसाच, इलाज असतानासुद्धा, केवळ संगतीदोषाने तो या नियमांच्या बाबतीतही रूढ झाला. या नियमांनासुद्धा अढळपद का आले याची आणखी दोन कारणे आहेत. एक असें की, एकेकदा नियम होऊन बसल्यानंतर माणसे आपापल्या व्यवसायात मग्न होतात, व जर करता या नियमांनी हित होत आहे असे ठाम झाले आहे तर आता पुन्हा त्यांना डिवचीत बसण्याची जरुरी नाही असे समाजाला वाटू लागते; व नियमबांधणीच्या काळजी-

तून मुक्त होऊन समाज आपल्या संसाराच्या व्यवहारात गर्क होतो. यामुळे या नियमांना कोणी दरडाविनासे होते. दुसरे एक कारण असे आहे की, त्या द्रष्टयांनी नियमरचनेसाठी जरी ऐहिक कारणे तपासली असली तरी सामान्य जनसमूहाचा कमकुवतपणा लक्षात घेऊन त्या नियमांच्या परिपालनाची तजवीज त्यांनी परमार्थाचा आश्रय घेऊन केलेली असते. म्हणजे नियम सिद्ध केले ते पार्थिव परिस्थिती अवलोकून केले व त्यांच्या सातत्याची जी तजवीज केली ती मात्र परमार्थाचा आश्रय घेऊन केली, असे झाले. अमुक एक जर समाजबंधने पाळली तर तुम्ही स्वर्गाला जाल असे स्वच्छ सांगितले. अर्थात परमार्थाची भूक सर्वांनाच असल्यामुळे व परमार्थाचा धाकही सर्वांनाच असल्यामुळे समाजाने हे आमिष आनंदाने गिळले, व पारमार्थिक शिक्षेच्या भीतीतून आपली सोडवणूक करून घेतली. पण यात एक गोम राहिली. व तीच या बाबतीत आपल्याला खरी उद्‌बोधक होय. मूळ नियम जे रचले गेले ते पार्थिवाच्या अवलोकनावरून रचले गेले; पण त्यांचा संबंध मात्र परमार्थाशी जुळविण्यात आला. यामुळे याचा अर्थ असा झाला की, पार्थिव नियमांचे परिपालन हाच स्वर्गाचा मार्ग होय. यापुढे जाऊन असे म्हणता येते की, ज्या नियमांच्या परिपालनाला स्वर्ग हे पारितोषिक मिळते, त्या नियमांची बांधणी पार्थिवाचे अवलोकन करूनच करता येते. म्हणजे पार्थिवाचे अवलोकन हा आपला शेवटला आश्रय ठरला. आधुनिक शास्त्र तरी हेच म्हणत आहे की, पार्थिवाचे अवलोकन करा. व त्यास अनुसरून केलेल्या नियमांचे प्रतिपालन करा. मग स्वर्गाचे निराळे चिंतन नको. पण या उत्तरोक्त विचारसरणीला आपण नास्तिक म्हणावयाची सवय करून घेतली आहे. ती वाईट आहे म्हणून टाकली पाहिजे. श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले की, 'तू आपला समाजधर्म पाळ. तू क्षत्रिय आहेस. काही काल भलत्याच कल्पनेला वश होऊन तो मी पाळीत नाही असे जरी तू म्हणालास तरी तुझी पिंडप्रकृतीच तुला या हत्येच्या कामात नियोजित करील. हा तुझा समाजधर्म पाळलास तर तू स्वर्गाला जाशील.' श्रीकृष्णाच्या या लहानशा प्रतिपादनखंडात आपले दोनही मुद्दे मोठ्या गंमतीने एकत्र आलेले आहेत. अर्जुनाने जर ही हत्येची तयारी दाखविली व त्याप्रमाणे वर्तन केले, म्हणजे त्याने जर आपला समाजधर्म पाळला तर श्रीकृष्णाच्या मते त्याला स्वर्गवास घडावा असे होते. एवढा समाजनियमपालनाचा महिमा आहे. आता हा समाजनियम तरी त्याच्या अनिच्छेनेसुद्धा त्याच्याकडून कसा पाळला जाईल, याचे उत्तर श्रीकृष्णाने असे दिले की, 'ती तुझी प्रकृती आहे.' क्षत्रियाच्या या पिंडप्रकृतीवरच हा क्षत्रियाचा समाजधर्म रचलेला होता, व ही पिंडप्रकृती शुद्ध पार्थिव आहे. या पार्थिवाच्या अवलोकनाने समाजधर्म बनतात, व या समाजधर्माच्या प्रतिपालनाने स्वर्ग मिळावयाचा असे आहे. म्हणजे परमार्थसाधन हे शुद्ध पार्थिवाच्या अवलोकनाने साधते असे स्पष्ट झाले. म्हणून परमार्थापासून थेट जडापर्यंत उतरत येणारा हा अंतःसंबंध पाहिला म्हणजे जडाची

लाज वाटावयाची जरुरी नाही, असे दिसून येईल. असे झाले म्हणजे भौतिक शास्त्र्याशी कसलाच वाद उरत नाही. व तो नास्तिकही राहत नाही; श्रीकृष्णाने प्रतिपादिलेले या पार्थिव तत्त्वज्ञानाइतके शुद्ध पार्थिव (Material) तत्त्वज्ञान कोणी प्रतिपादिले असेल असे वाटत नाही. असा हा आमचा मूळचा धर्म पार्थिव आहे. श्रीकृष्णाने तो स्वतः आचरिला व इतरांकडून आचरून दाखविला. अशा या धर्माच्या पोटात जेव्हा माया ढवळू लागली व जगत् मिथ्या याचा कदाचित् आचार्यांनाही न सुचलेला 'मिथ्या म्हणजे स्वप्नवत्' असा कुभांडखोर अर्थ भोरी बांधून बसला तेव्हा समाजाचे पचन बिघडले आणि त्याच्या रक्ताचा सळसळाट मोकळेपणाने चालेना. याच आगंतुक तत्वज्ञानाचे यजमानाच्या घरात बिऱ्हाड थाटले आणि घरातील सर्व माणसांत फितुरी पसरवून यजमानच खोटा असा भ्रम उत्पन्न केला. अशा प्रकारे एका अत्यंत शुद्ध व बलिष्ठ अशा तत्त्वज्ञानाची वाताहात होऊन तेथे निर्बल, आत्मघातकी, मने उदास करणारे, माणसांना अंगचोरपणा शिकविणारे, बायकामुले खोटी आहेत असे सांगणारे शुष्क तत्वज्ञान आपला मांड मांडून बसले, तर आता या आगंतुकाला घरातून हकलले पाहिजे. कारण या वाळवीने आमच्या समाजाचे व म्हणून राष्ट्राचे खांबचे खांब पोखरून पोकळ केले आहेत. हे ज्ञान हाकलल्यानंतर प्राचीन तत्त्ववेत्त्यांनी जिंदगी म्हणून ठेवलेले जे पार्थिव त्याचे आपण खरे वारस आहो असे आपल्या ध्यानात येईल; व पार्थिव अवलोकनावर श्रद्धा बसली म्हणजे भौतिकशास्त्रावरही श्रद्धा बसेल.

## संसार करावा ही मनाची उर्मी

आम्हाला करावासा वाटतो म्हणूनच आम्ही संसार करणार असा आमचा हट्ट आहे. का करू नये याचे जर तत्त्वज्ञान होऊ शकते तर का करावा याचेही तत्त्वज्ञान होण्यासारखे आहे. व तेच या पहिल्या वाक्यात सांगितले आहे. संसार मिथ्या आहे असे सांगून काय होणार ? तो आहे हे जर आम्हास दिसते व हरतऱ्हेच्या आपत्ती असतानासुद्धा तो करण्यात गोडी वाटते तर तो करण्यात काहीही गैर नाही; इतकेच नव्हे तर तो करावयासच हवा असेच ठरते. आमच्या मनाच्या ऊर्मी अशा आहेत की, प्रपंचात रहावे; त्यात प्रविष्ट होताना आम्हाला सुख वाटते व त्यातून कालमर्यादा आम्हास जेव्हा ओढून नेते त्यावेळी आम्हास दुःख होते. आईबाप, बहीणभाऊ, बायकामुले ही आम्हास अत्यंत प्रियकर वाटतात व आम्हीही त्यांना फार आवडतो. अशा मेळात राहू नये असे कसे म्हणावे ? यातून उठून जावे असे तर नव्हेच नव्हे; पण यातच जास्त रमावे असे मात्र वाटण्यासारखे आहे. 'दुःख पर्वताएवढे' जरी असले तरी ते खणून काढण्याची हिंमत आम्ही बाळगीत आहो. मनोव्यापार कसे मर्यादित करावे व जडवस्तुव्यापार कसे हुकमतीत आणावे हे आम्ही पहात आहो. हे पाहणे जसजसे पुढे सरकत आहे तसतशी आमची दुःखश्रेणी

घटत चालली आहे असे आम्हास वाटते. मानव्याचा सुदीर्घ संसार ही एक भव्य प्रयोगशालाच आहे. रागलोभाचे झटके व त्यांचे मर्यादेत राहून होणारे व्यापार हे तपासून पाहून आम्हास कळू लागले आहे की, या व्यापारांना जर काही एका कक्षेत वागू दिले, त्यांना जर वात होऊ दिला नाही तर त्यातून अनेक सुखे पाझरत राहतात. तसेच सृष्टिव्यापाराचेही परीक्षण करून आम्ही असे ठरविले आहे की, भौतिक दुःखे की, जी पूर्वी एवढी 'आ' वासून उभी होती त्यांचा आता निचरा होऊ लागला आहे व म्हणून दोनही अंगांनी चांगली योजकता दाखविल्याने आमची दुःखे उत्तरोत्तर कमी होत चालली आहेत. जेव्हा दुःखे मनस्वी होती तेव्हासुद्धा जर माणसांनी संसाराचा हट्ट धरला तर आता त्या दुःखांना ओसर पडू लागला असता आम्ही संसाराचा हट्ट सोडावा काय ? केवळ चार मेंढया जवळ बाळगून, कमरेला पाला बांधून, एखादे धार लावलेले हाडूक हातात घेऊन, ज्या वाणीला शब्द उमटले नव्हते अशी वार्ता तोंडाने वदत, माणसे भूतलावर भ्रमंती करीत होती, त्या वेळीसुद्धा जर जगत राहण्यात त्यांनी आनंद मानिला, तर आता मनाच्या अभ्यासाने व वस्तूंच्या अभ्यासाने जे दुःखशमनाचे मार्ग निघू लागले आहेत व ज्यांचा अंमल हळूहळू सार्वत्रिक होऊ लागला त्या त्या दिवसात प्रपंचातून निघावयाचे कोणी कोणास काय म्हणून सांगावे ? व ते एकाने सांगितले तर दुसऱ्याने काय म्हणून ऐकावे ?

## संसार सुखाचा होत चालला आहे

पोटच्या मुली आपल्या हाताने खड्डा खणून त्यात जिवंतपणे पुरण्याची पद्धती माणसात होती ना ? पोटी मुलगी आली तर मोठा घात झाला असे मानून तिचा निःपात करण्याचे काम शूर लोकसुद्धा करीत हे इतिहासावरून दिसते ना ? परमेश्वराचे समाधान करण्यासाठी व त्याला प्रसन्न करून घेण्यासाठी आपल्यासारखेच मानवप्राणी स्थंडिलावर कापले जात असत ना ? कोवळी कोवळी मुले ही वाळकासारखी खाऊन टाकण्याची प्रवृत्ती पूर्वी जारी होती हे आपणास माहीत आहे ना ? आपल्यामागे स्त्रीच्या हातून भलतीच चूक होऊ नये म्हणून तिच्या गोप्य देहाला कुलुपे अडकविण्याची चाल समाजात होती ना ? एकाने सगळे सोपस्कार करून घ्यावे व अलंकार घालावे आणि चालवत नाही म्हणून चार बुभुक्षितांच्या खांद्यावर बसून त्यातून मिरवीत जाण्याची चाल अजून आहे ना ? आपले कारखाने स्वतःच्या देहाला दगदग न पडता चालावे व त्यातून निष्पन्न होणारी सुखे मात्र आपल्याला भोगावयास सापडावी यासाठी निग्रोंना त्यांच्या बायकापोरातून ओरबाडून नेल्याचे इतिहासात आपण वाचता ना ? तू 'स्पर्शयोग्यही नाहीस' असे पुन्हा पुन्हा बजावून अस्पृष्टाच्या माणुसकीचाच अवमान करण्याची पीठिका पूर्वी पडली हे आपणास माहीत आहे ना ? पण त्याबरोबरच आता हेही

माहीत आहे की, महंमदाने गारीत पडणाऱ्या मुलीचे जीवित बापाच्या क्रौर्यातून मुक्त केले; स्त्रीच्या जीविताविषयीची अधिक उदात्त भावना रूढ होऊन रजपुतातील वध्य मुली या वधातून मुक्त झाल्या आहेत, आता कोणी परमेश्वराची पूजा माणसाच्या रक्ताचा अभिषेक करून करीत नाही, लहान पोराचे जीवित नदीकाठच्या वाळकापेक्षा निःसंशय जास्त रक्ष्य बनले आहे; स्त्रीच्या स्वाभिमानाची कल्पना ध्यानात आल्यामुळे व विश्वासाने विश्वास वाढतो हे पटल्यामुळे स्त्रीदेहाचो विटंबना आता कोणी करीत नाही; पालख्या व रिक्षे हे झपाट्याने कमी होत चालले आहेत; कारण ते वाहणारांचा स्वाभिमान बळावत चालला आहे व वाहून घेणारांना असे वाटू लागले आहे की, ज्याच्या पाठीवर आपण बसतो त्याच्या मानव्याचा आपण अपमान करतो; ज्याची बायकामुलातून ताटातूट केली त्या निग्रोना गुलामगिरीतून सोडविण्यासाठी खुद्द इंग्लंडातच स्वातंत्र्याचे कैवारी निघाले; जेथे अस्पृष्टांची अशी अवगणना होत आली तेथे त्यांच्या उद्धाराचे काम झपाट्याने चालू आहे. हे सर्व अशासाठी सांगितले की, मानवप्राणी आपले मन सुधारीत आहे; ते रानटी असताना त्याने केलेले जे अपराध त्यांनी त्याला ओशाळगत उत्पन्न होत आहे. अर्थात् जगातील सामुदायिक दुःख उत्तरोत्तर जितके कमी करता येईल तितके कमी करण्याची माणसाने ईर्ष्या धरली आहे. याच्या जोडीला शास्त्रशोधाने उत्पन्न केलेल्या सुखसोयी लक्षात घेतल्या म्हणजे तर संसारी माणसाने आपलीच पाठ थोपटावी अशी गत झाली आहे. जी जमीन तुडविण्यास वर्ष वर्ष लागावे व जे काम आरंभिताना माणूस मेल्यासारखी रडारड व्हावी ते काम आता किती सोपे झाले आहे पहा. दोन दिवसात काशीला जावे आणि वाटल्यास बुचकळी मारून पुन्हा दोन दिवसात परत यावे! ज्या हरिद्वारास पोचावयाचे म्हणजे दांडग्या व अकाळविकाळ अशा सृष्टीची मनधरणी करीत पुढे चालावयाचे तेच काम आता एका दिवसात उरकणार हे पाहून तरी माणसे जास्त सुखी होत चालली असे मानणे भाग नाही का? शेकडा पन्नास माणसांची तोंडे देवीनी गजबजून जावी व ती विद्रूप व्हावी, हे एक लहानसा तोडगा बाळपणीच करून माणसाला चुकविता येत आहे व त्यामुळे त्याच्या शरीराची रोषनाई वाढली आहे हे बरे झाले नाही काय? सांगण्याचा मुद्दा इतकाच की, दुःखावर हळूहळू विजय मिळविण्याचे जोराचे काम माणसाने चालविले आहे. ते लक्षात घेता व त्याच्या जोडीला वर सांगितलेले जे मानसिक फरक पडत आहेत ते मनात आणिले म्हणजे आमचे संसार उत्तरोत्तर सुखाचे होत जातील, व तेही आमच्या स्वतःच्या बळावर, अशी स्थिती असता या संसारातून उठून जाण्याची शिफारस आता आम्ही का ऐकावी?

### षड्रिपु हे मित्र आहेत

'उठून जा' म्हटल्याने कोणी जात नाही हे तर खरेच आहे. पण 'उठून जा'

म्हणणाराच्या म्हणण्याला जो काही एक तत्त्वज्ञानाचा गौरव आहे तोही त्याला राहू न देणे हे या परिच्छेदाचे प्रतिपाद्य आहे. एकदा संसाराला मन विटावयास हवे असे ठरविल्यामुळे काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे सहा रिपू आहेत, असेही तत्त्ववेत्त्यांनी सांगवयास सुरुवात केली. ज्या अत्यंत उदात्त अशा विकारांवर आमचे जीवित सर्वस्वी अवलंबून त्यांना 'रिपू' म्हणून शिवी दिली आणि या रिपूंच्या कबजात तुम्ही जात आहा असे माणसांना सांगून त्यांना लाजविण्याचा घाट घातला. पण आता आम्ही लाजावयाचे बंद करणार आहो. प्रत्यक्ष व्यवहारात तत्त्वज्ञानाचा बोज त्याच्याकडे ठेवून या विकारांच्या कह्यात आम्ही वागत आलो आहोच; पण त्या तत्त्वज्ञानाचा बोजसुद्धा आम्हास उरू द्यावयाचा नाही. संसाराकडे पाहण्याच्या दृष्टीतच आम्हाला पायाभूत फरक घडवून आणावयाचे आहेत. ज्यांना तुम्ही 'रिपू, रिपू' म्हणून म्हणता ते रिपू नव्हत; ते आमचे मित्र आहेत आणि त्यांच्या संगतीत आम्हास सुख उत्पन्न होते असे आम्हास वाटते. त्या त्या विकारांचा अतिरेक झाला म्हणजे ते रिपू बनतात. योग्य मर्यादेत असताना ते परममित्र असतात व त्यावरच आमचा संसार पोसतो. जे अन्न आम्ही खातो तेसुद्धा जर आहाराबाहेर खाल्ले तर ते शत्रू बनल्यावाचून कधीही रहावयाचे नाही. पण जर का ते आहारात असले तर आमच्या शरीराचा पोष उत्तम रीतीने करते. असेच वरील विकारांचे आहे. 'काम' हा शत्रू मानणे याच्यासारखी दुसरी चूक त्रिभुवनात नाही. अतिरेकाने नाश होतो, बुद्धीभ्रष्ट होते, स्मृती विकल होते, हे सर्व खरे आहे, पण योग्य मर्यादेच्या आत सर्व विश्वाला आपल्या गोडीत सुख उत्पन्न करणारा इतका चांगला विकार दुसरा कोणताही नाही. फार काय सांगावे? ब्रह्माने हे विश्व जरी खेळ म्हणून उत्पन्न केले असले तरी त्या खेळातील प्रसरणाचे आदिसूत्र म्हणून त्याला हा 'काम' उत्पन्न करावा लागला. याची जी अत्यंत सूक्ष्म अशी छाया 'प्रेम' नावाने वावरते ती अंगावर पडली असता थंडीतल्या कोवळ्या उन्हाप्रमाणे मधुर लागते आणि तिचा अनुभव घेत पुष्कळ वेळ बसावे असे वाटू लागते. या कोवळ्या उन्हाच्या बळावर कसलेही साहस आचरावयास माणसे आजवर प्रवृत्त झालेली आहेत. मग या 'कामा'स शत्रू कसे मानिता येईल ? 'क्रोधा'ने तरी आपले काय वाईट केले आहे ? त्याला बेफाम सोडता कामा नये, इतकेच काय ते. पण बेफाम सुटलेल्या इतर मनोविकारांना जर फटकारा मारून मर्यादेत आणावयाचे असेल तर 'क्रोधा'चा उपयोग केवढा तरी आहे. 'लोभा'ने संसार सिद्ध केला आहे. 'खाईन खाईन', 'भोगीन भोगीन' असे वाटत असल्यामुळे माणसे केवढ्या प्रचंड उद्योगांना हात घालीत आली आहेत ! त्यांची महत्त्वाकांक्षा याचमुळे बळावली आहे. हा इतरांचे मनोगत लक्षात न घेता बेफामपणे पुढे गेला तर मात्र धन्यावरच उलटेल व शिकारीसाठी जवळ बाळगलेला चित्ता जसा रक्ताच्या लोभाने धन्यावरच उलटावा तसा हा उलटेल यात काहीच शंका नाही. 'मोहा'ने तर अरुचकर व बीभत्स वस्तूकडेसुद्धा

पाहण्याला निराळ्या काचा प्राप्त झाल्यामुळे,त्यांच्यातील खरे गुण ओळखण्याला मदत होते. हा मोहाचा गुण जर अंगी नसता तर कवींना वस्तुजाताचे सामुदायिक सौंदर्य जे वर्णिता येते ते कधीही आले नसते. अर्थात् हा जर अतिरेकास गेला व माणसे बेताल अथवा बेतोल झाली, म्हणजे जर त्यांनी यांच्या गायनातील संवाद बिघडविला अथवा ते एका अंगालाच झुकू दिले तर मोह हा घात करील यात शंकाच नाही.चंद्राची आवड धरणाऱ्या एका चिनी कवीने जलविहार करीत असताना उसळत असलेल्या लाटेतील चंद्रबिंबाला आलिंगन देण्याचा मोह धरल्यामुळे जसा त्याचा नाश झाला तसा अतिमोहित माणसाचा नाश होईल हे खरेच आहे. 'मद' हा वैभवाच्या स्थैर्याला उपयोगी पडतो आणि फार बळावला तर त्याच वभवाचा नाश करतो. 'मत्सरा'ला शिवी दिली नाही असा प्राय: कोणीही तत्त्ववेत्ता नसेल. लपतछपत वागणाऱ्या या गूढस्थ विकाराची भीती सर्वांनीच बाळगलेली आहे. पण म्हणतात तितका तो दुष्ट नाही. त्याच्या सौम्य व मर्यादित स्वरूपात तो आपल्या संसाराचा रक्षिता आहे. आपल्या संसाराच्या निरुंद मार्गावरून चालत असताना स्त्री-पुरुषांचा झोक जाण्याचा संभव फार असतो. त्याप्रसंगी त्यांना थोडेसे दरडावून त्यांचा तोल सावरून धरण्यास 'मत्सरा' इतका उपयोगी मित्र दुसरा कोणीही नाही. परस्परांविषयीचा अविश्वास भाबडेपणाने बोलून दाखविण्याइतका कायम व प्रबल नसतो, पण सूक्ष्मरूपाने तो त्या ठिकाणी असतो आणि त्यामुळेच पती पत्नीला व पत्नी पतीला मार्गावर ठेवण्याचे काम सूक्ष्म मत्सराच्या लपतछपत केलेल्या दर्शनाने घडवून आणितात; पुरुष हा रात्री घराच्या बाहेर फार राहू लागला तर त्याला आडवळणाने का होईना, पण जी स्त्री जाब विचारी ना, ती स्त्रीच नव्हे; आणि दुसरीकडे कोठे आपल्या संगतीच्या बाहेर, कोणच्या साध्या निमित्ताने का होईना पण स्त्री जर फिरकणार असली, तर कोणतेही संभावितपणाचे मिष पुढे करून पुरुष जर त्यात अधूनमधून मोडता घालीना तर तो पुरुषच नव्हे. अर्थात् हेच काम अनिवार झाले तर एकमेक विश्वास योग्य असतानासुद्धा संसाराची वाताहत होईल हे सांगणेच नको.

या प्रतिपादनावरून ध्यानात येईल की, ज्या षड्विकारांना रिपू रिपू म्हणून संबोधिलेले आहे ते आम्हा संसारी माणसांचे रिपू नव्हेतच आणि म्हणून आम्हाला त्यांची भीती बसण्याचे काहीच कारण नाही. ज्या कोणाला तप आचारावयाचे असेल, रानावनात जाऊन बसावयाचे असेल, ज्यांच्या एकाग्रतेच्या मार्गात हे विकार विघ्न आणीत असतील त्यांना हे रिपूसारखे वाटावेत हे स्वाभाविक आहे. पण संसाराला लाथ मारू इच्छिणाऱ्यांना ते त्यांच्या मूल व बालबोध स्वरूपातसुद्धा जरी रिपू असले तरी आम्हा संसारी लोकांना त्या स्वरूपात ते तसे नाहीत. फक्त ते अनावर झाले, उपयुक्ततेच्या मर्यादा ओलांडून पलीकडे गेले व आमच्या विवेकाची ते आता फरपट काढणार असे दिसू लागले म्हणजे मात्र ते आमचे शत्रू बनतात हे खरे. पण या बाबतीत धर्माचे प्रतिपादक हे आम्हाला उपकारकच ठरत आले आहेत

हे त्यांनी ध्यानात आणावे. उग्र वासनांचा उपशम करावा व हे जे विकार म्हणून सांगितले त्यांना नेहमी कह्यात ठेवावे असे आम्हास धर्मानेच शिकविले आहे. म्हणून ज्यांना ज्यांना या उपदेशाप्रमाणेच वागण्याचे साधले आहे त्यांचे त्यांचे संसार सुखाचेच झाले आहेत आणि म्हणून धर्माचे हे ऋण ते मान्यच करतील. पण धर्माच्या तत्त्वज्ञानराशीत यांना जे वैरी म्हटलेले आहे व नित्याच्या जीवितातसुद्धा आपण त्यांच्याकडे वहिमी दृष्टीने पाहिले पाहिजे अशी जी काही कल्पना होते तेवढी असू नये असा मात्र जोराचा आग्रह आहे.

## चुकीचे कार्यकारण-भाव

माणसाने कार्यकारण-भाव कल्पून कित्येक युगे झाली असली पाहिजेत. किंबहुना अगदी पहिला तर्क त्याने जो केला तो, कार्याला कारण असावे हाच होय. जी वस्तू दिसेल ती आहे तशी पत्करणे हे पशूचे लक्षण आहे. तिच्या मागे जाऊन तिची काही उपपत्ती पहाणे हे तर्काचे स्फुरण माणसालाच शक्य झाले. झाड दिसले तर झाड दिसले एवढ्यावरच त्याची बुद्धी थांबली नाही. इंद्रियाचा केवळ व्यापार होऊन 'झाड आहे' एवढेच ज्ञान त्याला होऊन थांबले नाही. हे कसे बरे झाले असावे, हे कोठून आले, हे कशाचे असेल, असे प्रश्न तो आपल्या मनाशी आपोआपच करू लागला. आकाशात सूर्य पाहिला; पण सूर्य नुसता दिसला, डोळे दिपले किंवा अंगाला ऊन लागले, एवढ्यावरच त्याचे ज्ञान संपले नाही. तर हे एवढे चकचकणारे काय असावे, हे कोठून येते, हे कोठे जाते असे काही तरी त्याच्या मनाशी घुटमळू लागले; म्हणजे वस्तूचे शब्दार्थाप्रमाणे तोंडदेखले ज्ञान त्याला पुरेसे वाटले नाही. त्या वस्तूच्या मागे काय आहे असे त्याने आपल्या मनास विचारले. या त्याच्या सवयीतच सर्व ज्ञानाचे उगमस्थान आहे असे म्हणावयास हरकत नाही. हे जे 'का' म्हणून विचारणे तेच जर संभवले नसते तर पशूपेक्षा माणसाची जात काही निराळी झाली असती असे म्हणवत नाही. फार काय सांगावे, माणसामाणसातसुद्धा या 'का'च्या बळावरच फरक पडलेले असतात. जी माणसे दर वेळी 'का' 'कसे' असे विचारतात ती ज्ञानाने पुढे सरकतात; आणि जी माणसे पुढे येईल ती गोष्ट पदर पुढे करून पत्करतात ती अगदी अप्रबुद्ध राहतात. यावरून पुढे जाऊन पाहता असे दिसून येते की जे लोकसमाज प्रश्न विचारावयास विन्मुख म्हणजे बिनचौकस, ते ऐदी, खुजे, दुर्मुखलेले व दरिद्री राहतात; आणि जे आपल्याच मनोबुद्धीच्या दारावर 'का' 'कसे' अशा हाका जोरजोराने मारीत असतात, ते उद्योगी, पूर्ण विकसित, उल्हसित आणि वैभवसंपन्न असे होतात. पण यात एक सूक्ष्म भेद आहे. माणसाला कारण विचारण्याची खोड आरंभालाच लागली होती; पण कारण विचारल्यानंतर आपल्यालाच समर्पक उत्तरे देण्याची बुद्धीची कुवत त्याला किती युगांनी प्राप्त झाली हे सांगवत नाही. त्याने कारणे विचारली व आपणाकडून जबाबही घेतले. पण हे जबाब त्याची जिज्ञासा कशी संतोषवू शकले हे ध्यानात येत

नाही. काही तरी कारण हवे हा त्याचा आग्रह फारच चांगला होता. पण स्वतःकडून मिळालेले जबाब त्याला कसे काय पसंत पडले याचे नवल वाटते. म्हणजे असे की, ज्या कार्याचे त्याला कारण हवे होते ते कारण त्याने आपल्या मनाने सांगितल्यानंतर त्या कारणातून ते कार्य कसे निष्पन्न होते हे विवंचून पाहण्याचे काम त्याने केलेच नाही अथवा ते विवंचून पाहावयास हवे हा विचार त्याला सुचला नाही, कारण ते चूक असेल अशी शंकाच त्याला आली नाही. आपल्याला प्रतीत झालेला कार्यकारणभाव हा बिनचूक आहे हा त्याचा भ्रम कित्येक युगे तगून राहिला होता. वास्तविक पाहता ही एक तऱ्हेची निशा म्हणजे रात्रच होय. मनुष्य-योनीचे पृथ्वीवरील निरनिराळ्या प्रदेशात जे प्राचीन इतिहास आहेत ते पाहिले म्हणजे वास्तवज्ञानाची इच्छा असूनसुद्धा माणसांनी कारणरूपाचे स्वतःच दिलेले जबाब कसे भ्रमरूप असत व त्याच भ्रमांना खरे ज्ञान मानून माणसे कशी जगत राहिली होती हे चांगले दिसून येते. अर्थात् या युगात प्रगतीचे नावच घ्यावयास नको हे उघड आहे. सूर्याला ग्रहण लागले, माणूस मेले अशांसारखे प्रकार पाहिले म्हणजे या भ्रमाचे ज्ञान आपल्यालाही चांगले होते. सूर्याचे ग्रहण जावे म्हणून रानटी माणसांनी ढोलकी वाजवावी आणि आरडाओरडा करावा यात काही थोडे तात्पर्य आहे; कारण 'ज्या दुष्ट प्राण्याने सूर्याचा ग्रास केला होता' त्याला भिवबून लावण्यास याचा काही उपयोग होईल अशी त्याची कल्पना झाली. आपण वरील प्रकार केले नाहीत, पण गोमुखीत हात घालून बसलो. भावना ही की, सूर्य–चंद्रांचा ग्रास करणारे ते जे राहू–केतू ते पळून जावेत. या आपल्या करण्यात आणि वरील रानटी माणसांच्या करण्यात थोडा फरक आहे. आपण जपाने 'परमेश्वर' नावाची एक निराळी वस्तू वश करून घ्यावी व तिच्याद्वारा राहु-केतूंना पळवावे असे मानून चाललो. पण हे जे वरचे रानटी लोक त्यांच्या मताने आपण वाजविलेल्या ढोल-ग्यांनी सूर्याचा ग्रास करणारे राक्षस भिऊन पळून जातील. आता यातही काही चूक नाही. इतर कोणी हिंस्र पशुपक्षी त्यांनी आपल्या ढोलग्यांनी व आरडाओरड्याने पळवून लाविलेले असतील; व म्हणून तेच तर्कज्ञान त्यांनी या सूर्याच्या शत्रूच्या बाबतीतही चालवून पाहिले असे म्हणता येईल; पण माहितगारांनी जी एक चम-त्कारिक हकीकत दिली आहे ती पाहून मात्र वरीलसारखी काही उपपत्ती बसविता येत नाही; आणि मग त्या रानटी लोकांनी कार्यकारणभाव कसा तरी जुळवून स्वतःलाच कशी भ्रांती उत्पन्न करून घेतली हे ध्यानात येते. ग्रहण लागले म्हणजे ते काही पालापाचोळा जमा करीत, त्यात काही पोवळी घालीत, आपल्या मुलाच्या केसाच्या दोन बटा आणि मागे केव्हा तरी इकडे-तिकडे मरून पडलेल्या पणजोबाचे दाभाड या वस्तूही त्याच्यावर ठेवीत व मग हा सर्व सरंजाम पेटवून देऊन म्हणत की, 'तुला पुन्हा पहिल्यासारखे उन्ह यावे आणि तू आकाशातले सगळे ढग खाऊन टाकावेस म्हणून आम्ही हे सर्व पदार्थ पेटवून दिले आहेत.' आता या ठिकाणी पण-

जोवाचे दाढवण किंवा पोरांच्या केसाच्या बटा या जाळल्यामुळे सूर्याला उन्ह प्राप्त होईल ही कल्पना या रानटांनी कशी बसविली आणि ती त्यांना बरोबर कशी वाटली हे ध्यानात येत नाही. असो. हाच प्रकार सहस्रावधी वर्षे जगतावर चालत राहिला होता आणि अजूनही बहुतेक सर्व देशात अज्ञानग्रस्त लोकांत चालू आहे. कोणत्या तरी दोन गोष्टींचा परस्परांशी कार्यकारणभाव जोडणे हे माणसाच्या मनाचे मोठेच दुखणे आहे.

## नीती व सृष्टीव्यापार

अलेक्झांडर व चोर ही गोष्ट पुष्कळांना माहीत असेल. अलेक्झांडर याने एक मोठा भयंकर डाकू पकडून आणिला होता. वास्तविक हा केवळ डाकू होता असे नव्हे. अलेक्झांडरचा अंमल पत्करावयास नाकबूल असलेल्या एका फिरस्त्या टोळीचा तो नायक होता. तो आपल्या दृष्टीने सावच होता. पण अलेक्झांडरच्या मुलुखात त्याने उच्छाद मांडल्यामुळे अलेक्झांडरने त्याला दरोडेखोर ठरविले होते. त्याच्या मुसक्या बांधून व त्याला समोर बसवून अलेक्झांडर त्याची काही विचारपूस करीत होता. इतक्यात तिकडून दोन संभावित गृहस्थ आले; व आपल्या पुराणात धर्माकडे आलेल्या दोन ब्राह्मणांची जी हकीकत आहे तीच त्यांनी अलेक्झांडर यास सांगितली. एकजण म्हणाला, 'याच्याकडून मी त्याचे घर विकत घेतले. पायासाठी खणू लागलो, तो मोहरांचा हंडा सापडला. आता घर विकत घेताना मी हंडा काही विकत घेतलेला नाही. म्हणून मी हा मोहरांचा हंडा परत देत आहे, पण तो परत घेत नाही.' यावर तो दुसरा म्हणाला, 'मी ज्यावेळी घर विकले त्या वेळी त्यात जे काही होते ते सर्व विकले. तर आता मी हा हंडा कसा बरे परत घ्यावा?' हा वाद ऐकून अलेक्झांडर स्मित करून त्यांजकडे पाहू लागला व तो डाकू अलेक्झांडरकडे पाहू लागला. थोडे घोटाळल्यानंतर अलेक्झांडरने हुकूम केला की, तो मोहरांचा हंडा सरकारी खजिन्यात आणून ओतावा! हा त्याचा हुकूम ऐकून डाकू विस्मित झाला. व थोड्या बेफिकिरीने अलेक्झांडर यास उद्देशून म्हणाला, 'अहो, मला दरोडेखोर म्हणणारे तुम्ही अलेक्झांडरसाहेब, तुमची नीती अशीच आहे काय?' अलेक्झांडर म्हणाला, 'होय, अशीच आहे.' कोणत्या तरी दोन वस्तूंचा कार्यकारणभाव जोडणारा डाकू म्हणाला, 'तर मग तुमच्या देशावर सूर्य प्रकाशतो काय? तेथे हंगामावर पाऊस पडतो काय?' अलेक्झांडरने पुढे उत्तर काय केले हे नोंदून ठेवावयाचे इतिहासकार अर्थातच विसरलेले आहेत. पण आपल्या प्रस्तुत मुद्द्याचे विवेचन चालू असता या डाकूचे प्रश्न मात्र खरे विचारप्रक्षोभक ठरतील यात काहीच शंका नाही. त्याला वाटले की, जर अलेक्झांडर एवढा उपट्या तर सूर्याने आपले तेज त्याच्या देशावर का पसरवावे? अर्थातच तो पसरवीत नसला पाहिजे. म्हणजे असे की, यःकश्चित् मानव प्राण्याची, डाकूच्या मताने वाटत असलेली, जी

लबाडी तिच्याकडे पाहून सूर्य आपले व्यापार चालवितो किंवा बंद ठेवतो असे त्याने आपले मत बनविले होते. येथे वर सांगितलेला 'भ्रम' दिसून येतो हे उघड आहे. महा नीच लोकांच्या देशावर उत्तम बरसात असावी आणि अत्यंत सद्‌गुणी माणसांच्या देशात भुकेने जीव जावा असे प्रकार वाटल तितके होतात. याचे ज्ञान त्या डाकूला झालेले नव्हते. अशा प्रकारच्या भ्रमाने इतिहास खच्चून भरलेला आहे.

## नीतीचे नियमन सृष्टीवर कसे चालेल ?

मनुष्यकृत जी नीती किंवा अनीती असेल तिचे नियमन सृष्टीच्या व्यापारावरसुद्धा चालू शकले पाहिजे अशी ही अपेक्षा आहे. पण वास्तविक गोष्ट अशी आहे की, नीती आपल्या मार्गाने जात असते आणि सृष्टीचे नियम आपल्या मार्गाने जात असतात. रामाने सीतादेवीला रावणाच्या बंदीतून मुक्त केले पण ती कित्येक महिने रावणाच्या बागेत असल्यामुळे रामाला तिचा देह अपवित्र झाला असावा अशी रुखरूख लागून राहिली. त्याच्या मनातील हा किंतू जावा म्हणून सीतेने दिव्य केले. ती प्रत्यक्ष आगीच्या खाईत उतरली व दुसऱ्या टोकानें बाहेर पडली व पतिव्रतेने जर आव्हान दिले तर अग्नी आपला व्यापार तिजवर चालवू शकत नाही असे सिद्ध केले. ही अद्‌भुत कथा शुद्ध सत्य म्हणून मानावी असे वाटत नाही. सीतेबद्दलचा जो परमपूज्य भाव त्याची ऊर्मी येऊन असे वाटते की, खरोखर असे झाले असले तर फारच चांगले आहे; पण माणसाने आपल्या समाजाच्या सोईसाठी केलेल्या नीतीच्या कल्पना की, ज्या वेळोवेळी देशपरत्वे व परिस्थितीनुरूप बदलतात असे दिसते, त्यांची हुकमत, मनुष्ययोनी जन्माला येण्याच्या आधी आणि मनुष्ययोनी नष्ट झाल्यानंतरही पदार्थांचे जे गुणधर्म होते व राहणार आहेत, त्यावर चालते असे मानणे हे तर्कबुद्धीला पत्करता येत नाही. सीतादेवीने क्षमा करावी. या ठिकाणी एक बारीक विचार मनात येतो. 'माझा देह नीतिदृष्टया पवित्र आहे आणि म्हणूनच त्याला अग्नी जाळू शकणार नाही' असा जर सीतेचा आग्रह असला तर तो लिहिलेल्या कारणास्तव खचितच टिकण्यासारखा नाही. पण पातिव्रत्याच्या उग्र जाणीवेने तिने प्रथम आपल्या मनावर व मग त्याच्याद्वारा देहावर काही विशेष प्रकारची हुकमत उत्पन्न केली असली तर तो देह ज्वलनक्षम न राहू देणे हे शक्य होते की काय, याचा तलास मनाच्या शक्तीचे संवर्धन करून जे कोणी काही अद्‌भुत करून दाखवितात, त्यांनी लाविला पाहिजे. म्हणजे अग्नीची ज्वलनशक्ती तिने नष्ट केली असे नव्हे, त्याचा धर्म त्याच्या अंगी तसाच राहिला होता. पण हिच्या स्वतःच्या देहाची ज्वलनक्षमता तिने आपल्या मनोनिग्रहाने नष्ट केली की काय, असा एक बारीक प्रश्न उद्‌भवतो. मनाच्या शक्ती वाढवून काय काय साधता येते, हे पाहिले म्हणजे प्रस्तुत मुद्दा चांगलाच चिंत्य आहे असे ठरते. पण पुराणात जे लिहिले आहे व जे सर्वसामान्यपणे लोकांना माहीत आहे ते हे की, सीता पतिव्रता असल्यामुळे तिचे

आव्हान अग्नीला पत्करिता आले नाही. अर्थात सृष्टिनियमांच्या आपल्या ज्ञानावरून पाहता ही गोष्ट सर्वथा अश्रद्धेय आहे. पतिव्रतेचा देह अग्नीच्याने दग्ध करवत नाही, असे बोजड बोलणे भोळेपणामुळे शक्य होते. हे जर खरे असते तर ज्या अनेक पतिव्रता स्त्रिया आजवर सती गेल्या त्यांनी चितेवर आरोहण करताच ती चिता विझावयास हवी होती. पण पतिव्रतेने स्वतःस जाळून घेतले ही तर मुख्य गोष्ट आपण मानतो व तीबद्दल तिची स्तुती करतो. तेव्हा पतिव्रतेच्या देहाला अग्नीचा स्पर्श दाहक असत नाही हे खरे नव्हे. 'माझा देह तू कसा जाळतोस तो जाळ' अशा आव्हानाने सीतेने अग्निप्रवेश केला व 'आम्हाला तू जाळच' अशा विनंतीरूप आग्रहाने सती जाणाऱ्या पतिव्रतांनी चितेत प्रवेश केला. असा या दोन भूमिकांत फरक आहे. व म्हणून मनःसामर्थ्याच्या विकसनासंबंधाने वर लिहिले आहे.

## धर्माचा पराभव पत्करण्यास नाखुषी

याचा अर्थ असा की, भलतेच कार्यकारणभाव पत्करणे हे माणसाने आजवर पुष्कळदा केले आहे. पण खरी आश्चर्याची गोष्ट ही आहे की, हा भ्रम ध्यानात आल्यानंतरसुद्धा मागे एकदा कल्पिलेला कार्यकारणभाव सोडून देण्यास माणसे तयार होत नाहीत. जी गोष्ट जशी असेल असे आजवर वाटत आले व त्याप्रमाणे काही धार्मिक कल्पना बनविल्या, ती गोष्ट तशी नाही असे दिसून आल्यानंतर रचलेला धर्म आपोआप गळून पडतो, हे माणसांनी झटाझट पत्करावयास हवे. सोमनाथाची मूर्ती महंमदाने फोडली. ती त्याने फोडावयाच्या आधी माणसांचा असा बळकट समज होता की, हे जागृत स्थान आहे, व म्हणून या देवतेच्या अंगाला हात लावण्याची कोणाचीही प्राज्ञा नाही. पण महंमदाने अत्याचार केल्यानंतर जागृत स्थानसुद्धा भ्रष्ट होते; इतकेच काय, त्याचे हजार तुकडे होऊन जातात हे माणसांना स्पष्ट दिसून आले. हे दिसून आल्यावर 'जागृत स्थानाला हात लावण्याची कोणाची प्राज्ञा नसते,' हे भोळे मत त्यांनी अगदी टाकून द्यावयास हवे होते. पण तसे झाले नाही. जागृत म्हणून कल्पिलेली गोष्ट व प्रहाराचा आघात या गोष्टी एकत्र आल्यानंतर दुसरीचा पहिलीवर काहीच परिणाम होऊ शकत नाही हा आपला केवळ भ्रम होता हे लोकांनी उमजावयास हवे होते. 'दैवतेवर जी निरतिशय श्रद्धा तिचेच नाव दैवत जागृत असणे हे होय व ती जर असली तर माणसांच्या हातून अद्भुत पराक्रम होऊन तिचे रक्षण होते.' असा मुद्दा येथे कोणी आणू नये. कारण तो प्रस्तुतात केवळ आगंतुक होय. कल्पिलेल्या जागृत स्थानाला कोणाची बाधा होऊ शकत नाही हे मत चूक आहे, असे दाखविणे एवढेच येथले प्रस्तुत आहे. त्या दैवताच्या अभिमानाने माणसे मध्ये पडली व त्यांनी महापराक्रम केले तर काय होईल हा येथला मुद्दा नाही. असो. ख्रिस्ती पुराणात सांगितले आहे की, पॅलेस्टाईन देशात पूर्वी सोडम आणि गोमोरा अशी दोन नगरे होती. ती महा-

पातक्यांनी भरलेली होती. देव त्यांच्यावर रागावला. त्याने वरून आगीचे लोळ त्यांच्यावर धाडिले व ती शहरे उलथीपालथी करून नष्ट करून टाकली, त्या ठिकाणी जे खड्डे पडले तेथे आता मृत समुद्र आहे. तेव्हाचे लोक असे समजले हे-सुद्धा नवलच आहे. कारण या शहरासारखी दुसरी अनेक पातकी शहरे आहेत हे त्यांना खास माहीत होते; पण त्यांची गोष्ट सोडून दिली तरी तेव्हापासून पुढे पातक्यांना परमेश्वर अशा रीतीने दंड करतो हे मत चालूच रहात आले आहे. काही लोकांनी पातक केले व ते सहन न होऊन इतर लोकांनी त्यांना शासन केले तर हा माणसामाणसातील नीति-अनीती यांचा पक्षपात कसा करावा याबद्दलचा झगडा होय, असेच कोणास वाटेल. माणसांच्या द्वारा येथे बद्नीती करणारांना परमेश्वराने शिक्षा दिली हा मुद्दा वर सांगितल्याप्रमाणे आगंतुक आहे. अनीतिमान् लोकांना, इतर कोणाला मध्ये न घालता परमेश्वर जाळपोळ, धरणीकंप अशां-सारख्या शिक्षा करतो की काय, हा मुद्दा आहे व शेकडो पातकी शहरे आणि माणसे बद्नीतीची असूनसुद्धा ती खुशाल मौजमजा मारीत असतात हे पाहिल्यावर तरी हे परमेश्वरी शिक्षेचे ज्ञान आता सोडून देण्याची वेळ आली, असे माणसांनी मानावयास हवे. पण वरील गूढस्थ कल्पना अजूनसुद्धा महाबुद्धिमानांच्या मनात कायम आहे. बिहार देशात धरणीकंप झाला; महात्मा गांधींना विचारले, ‘ हे का झाले असावे ?’ महात्माजींनी सांगितले, ‘ आपण अस्पृश्यता पाळतो म्हणून परमेश्वराने आपणास हे शासन केले. ’ हा गंभीर विचार ऐकल्याबरोबर कित्येकांच्या अंगावर सात्त्विक शहारे आले असतील. पण महात्माजींचे हे गांभीर्याचे स्फुरण व श्रोत्यांचे हे सात्त्विक शहारे ही दोनही वृथा आहेत. वास्तविक अस्पृश्यता ही मद्रासकडे फार आहे व म्हणून हा परमेश्वरी शिक्षेचा जोर तिकडे जास्त असावयास हवा होता. अस्पृश्यांची सावलीही आपल्या अंगावर पडू न देणारे जे तिकडील समाज त्यांची घरे गडप व्हावयास हवी होती. बिहारातसुद्धा, अस्पृश्यता न मानणारे जे मुसलमान त्यांची घरे तशीच उभी राहून हिंदूंची मात्र खचावयास हवी होती. परमेश्वराला आपल्या कामात काही शिस्त ठेवणे बरोबर वाटत असले तर असे व्हावयास हवे होते. पण यातले काहीच न होता; ज्या बिचाऱ्या प्रदेशात अस्पृश्यता फार कमी, असे आकड्यावरून सहज दाखविता येते त्या प्रदेशात यापैकी शिक्षेचा धुमाकूळ फारच मोठा असे झाले आहे. असो. सांगावयाचा मुद्दा हा की, घडून येत असलेल्या गोष्टींची सार्ष्टिक कारणे कोणची, इकडे लक्ष न देता झालेल्या उत्पाताचा माणसाच्या नीति-अनीतीशी संबंध पोहोचविण्याची प्राचीन काळची माणसाची गूढस्थ ऊर्मी अजून शिल्लकच आहे.

## ‘ हीण ’ जळून जात आहे.

वास्तविक पहाता धर्मबुद्धी जर अधिक अधिक शुद्ध व म्हणून उन्नत करावयाची

असेल, तर आजवर चालत आलेल्या ज्या धार्मिक कल्पना उद्ध्वस्त आहेत असे दिसेल त्या टाकावयास माणसांनी उद्युक्त असावयास हवे. पण अशा काही कल्पना उद्ध्वस्त झाल्या म्हणजे धर्माचा पराभव झाल्याचे महद्दुःख माणसांना होते व तो बुडेल अशी भीती वाटते. त्यांनी ध्यानात ठेवावयास हवे की, शुद्ध अनुभवांनी व तर्कांनी ज्या धर्मसमजुती त्याज्य ठरल्या त्या मुळातच कमकुवत होत्या. त्या बुडाल्या म्हणून धर्मबुद्धी बुडावयाची काहीच जरूरी नाही. उलट त्यांनी असे मानावयास हवे की, धर्मबुद्धी ही या वजावाटी होऊन अधिक अधिक उन्नत होत चाललेली आहे, व म्हणून हीणकस गेल्याचा जसा सोनार कधी राग किंवा दुःख मानीत नाही, तसेच माणसांनीही धर्मकल्पनांतील ' हीण ' हे भौतिक ज्ञानाच्या तदुत्पन्न तर्काच्या अग्नीत दग्ध झाले तर त्याचा विषाद मानता कामा नये. मूळ धर्मकल्पना ही, विश्वाचे खोल गंभीर, विस्तृत, सनातन असे रूप मनाला पटवून घेऊन त्याचा कर्ता कोण या मार्गावर आपण आणून ठेवलेली असली तर तिने घाबरण्याचे कसलेही कारण नाही. शुद्ध धर्मबुद्धी असे जे वर अनेकदा म्हटले आहे तिचा अर्थ हा होय. तो पत्करल्यानंतर त्याच्या खालच्या प्रदेशात जी काही पडझड होत असेल तिची बाधा आपल्या मनाला होण्याची आवश्यकता नाही. पुष्कळदा असे होते की मनुष्ययोनीच्या बालपणात व या प्रस्तावखंडाच्या आरंभी विस्ताराने सांगितलेली लोकसमूहाची जी स्थिरस्थावर त्या वेळी, आपापल्या रक्षणासाठी समाजाच्या बांधणीसाठी जे न्याय आपण उत्पन्न केले व ज्यांचा धर्मकक्षेतच अंतर्भाव केला ते न्याय, नवीन शास्त्रांच्या ज्ञानाप्रमाणे व मानव्याची जी उलाढाल चालली आहे तीस अनुसरून जर लटपटू लागले तर आपल्याला दुःख होते. पण अशा वेळी मनात हे आणावयास हवे की, समाजाच्या धारणेसाठी आपणच केलेले यमनियम हे निराळे आहेत व वर सांगितलेली जी शुद्ध धर्मबुद्धी ती निराळी; पण याच यमनियमांना आपण शाश्वत धर्मतत्त्वाचा गौरव देऊन बसलो; व उत्तरोत्तर त्यांची अशाश्वता पटू लागल्यावर आपण घाबरे होऊ लागलो. असो. धर्मसंस्थापकांचे तेव्हा काही चुकले असे वाटत नाही. ज्ञानाला शाखोपशाखा फुटल्या नव्हत्या; त्यांच्या पिढ्या तुटल्या नव्हत्या, त्यांचे वर्गीकरण झालेले नव्हते, त्यामुळे मूळच्या संस्थापकांनी त्या काळच्या मानवी हिताच्या दृष्टीने जे जे काही कल्पिले व ठरविले त्या सर्वांचा मिळून एकच कंद आहे असे मानण्याची चाल पडली. पण उत्तरोत्तर ज्ञानात शाखाभेद कसे उत्पन्न झाले आहेत, किंबहुना ज्ञानाची नवीन बीजेच मनोबुद्धीच्या क्षेत्रात, धुमारे फुटून कशी वर येत आहेत हे आज कित्येक वर्षे पहिल्यावर तरी माणसांनी पूर्वी मानलेल्या काही कल्पना उद्ध्वस्त झाल्या, याचे दुःख मानावयाचे सोडून दिले पाहिजे. जे खरोखर कळले होते त्याच्या शेजारी, जे खरोखर कळलेले नव्हते, ते आणून बसविलेले आहे असे धर्मग्रंथांच्या वाचनाने दिसून येते. हे जे न कळलेले होते ते उद्ध्वस्त होत आहे. पण त्या त्या काळच्या लोकांना सुखोत्पत्ती करून

दिल्यामुळे ज्याचा एवढा गौरव झाला त्या धर्माने आपणाकडेच सर्व ज्ञानाचा मक्ता घेतल्यासारखे केले व आता माणसांना नवे नवे कळू लागल्यामुळे धर्मपुरुष अत्यंत कष्टी आणि व्यथित होऊन बसल्यासारखा दिसत आहे. पण यास काय करावे ? ग्रहणे राहुकेतूंच्या ग्रासामुळेच लागतात असेच आम्ही अजून समजावे काय ? व समजलो तर आमच्या भास्कराचार्यांने एवढ्या भूतकाळात लावलेला जो ग्रहणांच्या कारणाचा शोध तो आम्ही मानू नये, असे हा धर्मपुरुष आम्हास म्हणेल काय ? कोठेतरी भुईतून ऊन पाण्याचे फवारे उडू लागले तर गंगा बाहेर आली असेच आम्ही म्हणत रहावे असा सल्ला धर्मपुरुष आम्हास अजूनही देईल काय ? खरोखर हे धर्मपुरुषाचे दुःख वृथा आहे. त्याने ओळखावे की, ज्ञान या शब्दाने संबोधिले जाणारे जे जे ते सर्व भूतकाळात झाले, हा आग्रह खोटा म्हणजे चूक आहे.

## धर्माची चूक

धर्माची मूळ चूक ही आहे की, तो आपणास परिपूर्ण मानतो. आपण जे म्हटले आहे व आपण त्या म्हणण्याची जी फोड केली आहे तिला अनुसरून सर्वांनी वागले पाहिजे, ते ते म्हणणे मानिले पाहिजे अशी त्याची अपेक्षा आहे; इतकेच नव्हे तर साधल्यास सक्तीसुद्धा आहे. मनुष्ययोनी सध्याच्या मानाने ज्या वेळेस केवळ अप्रबुद्ध होती, त्यावेळी तिच्यातील तेव्हा समजल्या जाणाऱ्या शहाण्यांनी जे लिहिले आहे ते सृष्ट पदार्थांचे व त्यांच्या नियमनांचे इतके विस्तृत ज्ञान झाल्यानंतरसुद्धा लोकांनी खरे मानावे, अशी धार्मीकांची अपेक्षा असते. पण हे कसे बरे साधावे ? या समजुतीत एक गूढस्थ खातरजमा आहे; ती अशी की, 'ज्ञान पूर्वी एकदा होऊन गेले, नियमकोश तयार झाले, येथून पुढे जे कोणी जन्मतील ते या ज्ञानापेक्षा अधिक सूक्ष्म किंवा अधिक बलवत्तर असे ज्ञान प्रसवू शकणार नाहीत.' ही खातरजमा किंवा हा बुद्धिनिश्चय माणसांनी का पत्करला ? याचे उत्तर इतकेच की, ती ती ज्ञाने त्या वेळच्या मोठ्या लोकांनी जेव्हा सांगितली तेव्हा ते आग्रहाने असे म्हणाले की, सर्व सत्तामान् अशा परमेश्वराचे हे शब्द आहेत, तोच आमच्या मुखावाटे आपले मनोगत बोलत आहे. हे देवाचे नाव या लोकांच्या उद्गाराशी कायमचे जखडले असल्यामुळे त्या उद्गारांतील तारतम्याची चिकित्सा करावयास माणसे धजेनाशी झाली. या विश्वचक्राला कोणीतरी कर्ता असावयास हवा ही भूक माणसांच्या मनाला अनादिकालापासून आहे. आपल्यापेक्षा अल्पस्वल्प कोणते तरी मोठेपण ज्याच्या अंगी जास्त आहे, अशा कोणत्याही माणसाबद्दल आपल्याला आजसुद्धा आदरभाव वाटतो. आपल्या व त्याच्या शहाणपणात व पदवीत जर फारच तफावत असली तर त्याच्यासंबंधाने आपल्या मनात केवळ आदरबुद्धीच नव्हे तर पूज्यभावही उत्पन्न होतो. हेच अंतर जर दुणावत गेले व त्या थोर माणसाच्या अंगी काही प्रचंड सामर्थ्य असून आपल्या सुखदुःखाची काळजी वाहाण्यास

तो सर्वस्वत्यागाने तयार आहे असे जर दिसून आले तर या पूज्यभावाला भक्तिभावाचे रूप येते. या माणसाने न कळत आपल्या ठिकाणीच फसून किंवा जाणूनबुजून आत्मवंचना करून, 'हे सामर्थ्य मला देवाने दिले आहे, फार काय तोच माझ्या द्वारा बोलत आहे.' असे जर का सांगावयास सुरुवात केली तर त्याचे विभूतिमत्त्व किंबहुना त्याचा अवतारीपणा मान्य होणे फारसे जड नसते. ज्ञानप्रसाराच्या या काळातसुद्धा सश्रद्ध आणि भाविक मनावर खोल मतलबी लोक कशा प्रकारचे संस्कार करतात किंवा स्वतःच्याच ठिकाणी फसून आपल्या गुणांकड सूक्ष्मदर्शिकेतून पाहून त्याच्या भव्यपणाची प्रतीती कशी उपभोगितात व आपण खरोखरीच कोणी दैवीसंपद् लाभलेले महान् पुरुष आहो अशी कल्पना कशी करून घेतात, हे आपणास प्रत्यक्ष पहावयास सापडते. मग ज्या दिवसात ज्ञान निपजलेच नव्हते, भूक व भोग एवढ्याच वासना भागविण्याची शक्ती असली तर थोरवी वाटत होती, आकाशातील निरनिराळ्या गोलकांकडे पाहून अचंबा वाटावा किंवा त्यांची सौंदर्ये अवलोकून केवळ उल्हसित व्हावे एवढेच वैचारीक भांडवल ज्या दिवसात माणसाच्या हाती होते, त्या दिवसात जर अशा या जळमाणसांच्या समाजात एखादा कोणी ताडमाड उंच गृहस्थ उत्पन्न झाला व तो त्यांच्या मानाने अत्यंत प्रगल्भ ज्ञाने बोलू लागला, तर 'आपण खरोखरीच कोणी परलोकातून प्राप्त झालेले देवपुरुष आहोत,' अशी त्याची स्वतःची कल्पना होणे व त्याचे बोलणे ऐकल्यानंतर हा खरोखरीच असा कोणी अवतारी आहे असे सामान्य लोकांना वाटणे अगदी स्वाभाविक होते. असा मोठा कोणी निपजावा ही माणसाची चिरंतन भूक आहे; व उभयतांतील अंतर लक्षात घेऊन आपण खरोखरीच तसे कोणी आहो असे त्यास वाटू लागावे हे ओघानेच येते; कारण मूळचा तो त्यांच्यातील होता. अशा माणसाने देवाचे नाव आपल्या उच्छ्वसिताशी एकदा निगडित करून टाकले म्हणजे भोळ्या भावावर सही-शिक्का होऊन हा धार्मिक दस्तऐवज कायम झाला असे होई.

## आत्मवंचित दैवी पुरुष

देव किती मोठा असावयास हवा याची कल्पना सृष्टी किती मोठी आहे या ओळखीवर फार अवलंबून आहे. ज्यांची सृष्टीशी ओळख फारच कमी त्यांची देवाची कल्पना त्या त्या मानानेच संकुचित असावयाची; व म्हणून तसला तो संकुचित देव त्यांच्यापुढे उभ्या असलेल्या श्रेष्ठ मनुष्याच्या द्वारा बोलत आहे असे मानावयास त्यांना काहीच हरकत वाटली नसावी. धर्मप्रसारक हा ठक असावा लागतो असे मुळीच नाही. ही भोळसटे बरी हातात सापडली आहेत, आता आपला महिमा वाढवून घ्यावयास हरकत नाही अशा मसलतीनेच त्याची बुद्धी भारलेली हवी असे नाही; आपण खरोखरीच दैवी आहोत असे त्यास स्वाभाविकपणे वाटले

म्हणजे पुरेसे आहे. माणसांना थोडे कळते व देवाला फार कळते हे त्याच्यासकट सर्वांनाच कबूल होते; आता जर मला सर्वांच्याहून जास्त कळत आहे तर देवच माझ्या द्वारा बोलत आहे असे त्यास वाटू लागणे अगदी स्वाभाविक आहे. याचा अर्थ असा की, कोणी कोणास न फसविता दैवी उद्गाराचा प्रवाद चालू होणे हे सर्वथा शक्य आहे. या उभय-प्रवृत्तींचा फायदा घेऊन कोणी खोल व मतलबी लोक आपल्याकडे हे दैवी ज्ञान बळेच ओढून घेत असतील व आपला बडेजाव माजवीत असतील; असेही झालेले असणे शक्य आहे. पण, वैद्यांच्या संमेलनात ज्याप्रमाणे वैदू हे सापडावयाचेच त्याप्रमाणे वरील मेळ्यात कोणी स्वार्थसाधु असावयाचेच. पण, इतिहासावरून असे दिसते की, त्या त्या काळच्या लोकांच्यापेक्षा जास्त असे काही एक ज्ञान नसता जे कोणी केवळ लफंगेगिरीवरच आपला महिमा वाढविण्याचे उद्योगास लागले त्यांची तसल्या अडाणी युगातसुद्धा फटफजिती झालेली आहे. अडाणी माणसेसुद्धा एखाद्याचे मोठेपण त्याच्या केवळ ज्ञानवर्चस्वाने मोजत असतील असे नाही. वर सांगितलेला जो अवतारी पुरुष त्याच्या अंगी काही इतर गुणांची अमुक एका प्रमाणाच्या वर वसती आहे की नाही याकडेही जनतेचे लक्ष असते. आता मतलबासाठीसुद्धा स्वार्थत्याग, धैर्य, मायाळूपणा, इत्यादींची जोराची बतावणी माणसाला साधत नाही. त्याला लोकांच्या हिताची जर खरोखरीच कळकळ असेल तरच त्याच्या हातून या गोष्टी होतात. यांच्या अभावी पारमार्थिक वजनदारीचा मतलब साधण्याची इच्छा असूनसुद्धा तो साधणे वर सांगितलेल्या वैदूवजा अवतारी पुरुषांना साधले नसेल. येशूख्रिस्त, कृष्ण, इत्यादीकांचे तोतये झाल्याच्या कथा याच कारणामुळे संभवल्या असल्या पाहिजेत. अर्थात असे दगलबाज लोक मागे पडले म्हणजे केवळ भोळेपणाने आपल्याला देवच मानणारे लोक समाजाच्या पूजास्थानी कायम व्हावे व त्यांचा शब्द हा त्यांनीच सांगितल्यावरून देवाचा शब्द आहे असे लोकांनी मानू लागावे हे ओघानेच येते. या त्यांच्या शब्दापासूनच दैवीपण दूर ओढून काढता येत नाही; आणि म्हणून त्या उद्गारात काही वैगुण्य जरी दिसू लागले तरी 'आपलेच काही चुकत असेल. हे दैवी शब्द कसे चुकतील' असा आपल्याकडे लघुत्व घेण्याचा, व त्या उद्गाराकडे दैवी गौरव पोचविण्याचा प्रकार माणसांनी केला.

## ओघानेच आले

माणसांना देव हवा होता व अशा रीतीने तो त्यांना मिळाला; कारण ज्या माणसांच्या द्वारा त्यांनी त्यांचे अस्तित्व ओळखले तो त्यांच्याहून खरोखरीच श्रेष्ठ होता. एकदा या माणसांच्या वचनांना परमेश्वरी अधिकार मिळाल्यानंतर त्यांची हुकमत चालू व्हावी यात काहीच नवल नाही. जे एकदा चांगले म्हणून ठरले ते माणसांनी मानू नये, तर काय करावे? आज शहाणपणाचे म्हणून ठरलेले नियम

माणसे उद्या जर धुडकावून लावू लागली किंवा त्यांच्याविषयी शंका घेऊ लागली तर शहाणपणाला स्थैर्य कधी प्राप्तच होणार नाही; व त्याला स्थैर्य प्राप्त झाल्यामुळे जे माणसाचे काही हित व्हावयाचे ते कधी होणारच नाही. म्हणून, नियम तयार झाल्यानंतर त्या नियमांचा अंमल माणसे बिनतक्रार पाळू लागतात, हे एकदरीने आपल्या हिताचेच आहे. जो शहाणपणा म्हणून पत्करला तो ज्यांचा त्यांनीच उद्ध्वस्त करावयाचा ठरविले तर आपण पूर्वी अक्कलहुशारीने वागलो नव्हतो असा शेरा ते आपल्याच वर्तणुकीवर मारून घेतात असा त्याचा अर्थ होईल म्हणून, व कदाचित स्वाभिमान म्हणूनसुद्धा, या नियमांना हात लावण्यास माणसे नाकबूल होतात; व दुसरा कोणी हात लावू लागला तर त्याच्या अंगावर चवताळून जातात शहाणपण टिकून रहावे ह्या दृष्टीने पहाता सृष्टीची ही योजना चांगलीच आहे असे म्हणावे लागते. पण हीच योजना थोडी पुढेही सरकते. जे बापाने चांगले म्हणून म्हटले होते ते लेकाने एकदम कसे फेकून द्यावे ? कारण सर्वसाधारणपणे बाप हा लेकापेक्षा शहाणा असतो. यातच अभिमान भरीला येतो व लेकाला विशेष जरी काही कळले नाही तरी तो म्हणतो, 'ते वडील एवढे होऊन गेले, ते काय गाढव होते ?' याप्रमाणे त्या अळून बसलेल्या शहाणपणाचा असाच पाठपुरावा समाजात होत रहातो. मग काही पिढ्या गेल्यावर जर कोणी कुरकुरू लागले तर लोक म्हणतात की, समाजाच्या धारणेला कारणीभूत झालेला हा जो एवढा नियमकोश तो मूर्खपणाचा कसा बरे म्हणता येईल ? समाज इतके दिवस त्याच्याच आधाराने चालला ना ? म्हणजे त्या शहाणपणाला तत्त्वज्ञानाचा बोजही आपोआप येत जातो. दरम्यान दुसरी एक गोष्ट घडून येत असते. हे नियम संभाळून ठेवणे व त्यांचे अर्थ सांगणे हे काम ज्यांच्याकडे येते त्यांचे ते निर्वाहाचे साधन होऊन बसते; व म्हणून त्या नियमांना जर कोणी दंश करू लागेल तर त्याच्याविरुद्ध हाकाटी करणे हा त्यांचा धंदाच बनतो. ते ह्या नवीनांना पाखंडी म्हणतात. असली अभद्र विशेषणे आणि तीही मान्यांच्या तोंडून आपल्या डोक्यावर आदळत आहेत असे पाहिले म्हणजे, नियमनांतील वैगुण्ये ज्यांना थोडी थोडी प्रतीत झालेली असतात ते म्हणतात 'मरानात. आम्हाला दिसले ते तुम्हाला सांगितले. पसंत नसले तर टाकून द्या.' अशा रीतीने त्यांनी पाय काढला म्हणजे मूळच्या शहाणपणाच्या प्रतिपालकांना विजय मिळविल्याचे स्फुरण येते व शहाणपणाचे बळ वाढत जाते. लोक एकमेकांत म्हणतात, 'पहा, ते स्वतःला मोठे शहाणे म्हणविणारे काही उलटसुलट करावयास निघाले होते, पण प्रतिपालकांचे दर्शन होताच त्यांनी पळ काढला. मूळचे शहाणपण खरें असल्याशिवाय असे कधी होईल काय ?' इकडे आसन स्थिर झालेले प्रतिपालक नवीन योजना कल्पित असतात व जुन्या काळासाठी रचलेले आपले शहाणपण हे नव्या काळाशी विसंवादी नाही हे ठरविण्यासाठी शहाणपणाच्या सूत्रांचे मूळचे शब्द कायम ठेवून त्यांचे अर्थ मात्र निराळे करतात, व मग भोळें लोक एक-

मेकांस म्हणतात, 'आचार्यांनी खरा अर्थ काय सांगितला तो ऐकलात ना !' म्हणजे पुनः मूळचे शहाणपण कायमच ! बरे, आचार्याआचार्यांत वाद नसतो असे मुळीच नाही. हे जे नव्या अर्थाची स्तुती करणारे त्यांना जुन्या अर्थाची ओढ खाणारे आचार्य आहेत हे माहीतच असते; पण आपल्याला जुन्या पीठिकेतून उठवून न लावता नव्या जीविताशी आपला तंतु जुळवून देणारा कोणी निघाला आहे एवढ्यावर ते संतुष्ट असतात. हे असे सारखे चाललेले असते. शेवटी ज्या वेळेस नियमनांतील वैगुण्याची बाधा समाजाला सहन होईनाशी होते व नियमनांतील शब्द नव्या अर्थाच्या प्रसूतीला संमती देत नाहीत, त्यावेळी यापूर्वी एकदा अळून बसलेल्या शहाणपणाला उठकळ येते, व मग माणसे म्हणतात की, 'क्रांति झाली !' ज्या वेळेस क्रांती होते, त्या वेळेस ढोबळ जीवितात अचानक उलथापालथ होते, एवढाच त्या शब्दाचा अर्थ आहे; पण सूक्ष्म व वैचारिक जीवितात क्रांती ही प्रगतीचा वेष घेऊन तसूतसूने पुढे सरतच असते. हे सगळे व्हावयास कित्येक शतके लागतात. हा क्रांतीचे शब्द बोलणारा आपल्यालाही दैवी स्फुरण झाल्याचेच सांगू लागतो व मग जुनी कोळिष्टके झाडून टाकण्याचे वेळी कोणी त्याला असे विचारीत नाही की, जी कोळिष्टके आम्ही आता झाडून टाकीत आहो ती पूर्वी एकदा देवाची स्फुरणे म्हणूनचना प्राप्त झाली होती ?

## ज्ञान पुढे आहे, मागे नाही

याप्रमाणे एका काळातून दुसरा काळ निघतो व वास्तविक थोडीच ऐपत असताना इतक्या सुदीर्घकाळपर्यंत त्या मूळच्या शहाणपणाला मोठे गौरवाचे जीवित लाभते. त्या त्या समाजात व सांप्रदायात अशी कित्येक माणसे पुढे पुढे निपजतात की, जी त्या मूळच्या अवताऱ्याहून निःसंशय श्रेष्ठ होती. साकल्येकरून पहाता प्रत्येक पिढी मागल्या पिढीपेक्षा शहाणी होत जाते; पण आपणा सर्वांचा आग्रह असा आहे की मागल्या पिढ्या शहाण्या होत्या. ज्ञानभांडार मागे आहे ही आपली कल्पना असते. त्यातील काही किडुकमिडुक घ्यावे व ते मोडून त्याच्यावर आजचा गुजारा करावा असे माणसाला वाटत आले आहे. वसिष्ठ, नामदेव यांची पिढी, याच आपल्या प्रवृत्तीमुळे, आपल्याला अजून आपल्यापेक्षा शहाणी होती असे वाटते. पण खरे तसे नाही. साकल्येकरून आताच्या पिढ्या पूर्वकालीन पिढ्यांपेक्षा अधिक शहाण्या आहेत. त्यांनी नवीन ज्ञाने पैदा केली आहेत, सृष्टीची नियमने अधिक शोधिली आहेत, माणसाचे जीवित अधिक सुखी केले आहे व तत्त्वसंशोधनाच्या व ज्ञानप्राप्तीच्या नव्या दिशा कायम केल्या आहेत. म्हणून ज्यांना ज्ञान हवे त्यांनी आपली तोंडे भविष्यकालाकडे वळवावी हे युक्त आहे. पूर्वीच्या ज्या ज्या लोकांचे जे जे शहाणपण असेल ते हिशोबाने पत्करावे; रुपये चांगले वाजवून घ्यावे; जे बद्द असतील किंवा गुळगुळीत असतील ते टाकून द्यावेत. उतरलेल्यापुरते पूर्वजांचे

ऋण खचितच मानावे; पण पूर्वज हे ज्ञानी व आपण केवळ त्या ज्ञानाचा बटवडे करणारे ही भूमिका साफ खोटी म्हणून माणसांनी टाकून द्यावी; व जो जो ज्ञानगंगा जोराने वाहात राहील, तिला नव्या नद्या येऊन मिळतील, तिचे पात्र रुंदावत जाईल, आणि तिच्या काठी मानव्याच्या भरभराटीची शेते अमूप पिकतील तो तो ज्ञानाच्या सीमा विस्तृततर होत जातील असे मानावे. पुढल्या पुढल्या पिढ्या आपल्यापेक्षा जास्त शहाण्या होणाऱ्या आहेत हे त्यांनी समजून रहावे व ज्या भविष्यत् काली सर्व आधिभौतिक शास्त्रांची अत्यंत प्रबल ज्ञाने प्रस्फुरित होऊन मानव्याची दृष्टीच बदलवून टाकतील त्या काळी आपल्याला जन्म झाला असता तर बरे झाले असते असे आपल्याला वाटावे. ज्ञानाची प्रगती होत असल्यामुळे आपल्याला स्पष्ट दिसेल की, सर्व शहाणपणाचा कबजा मी आपल्याकडे घेतला आहे, असे जे धर्म म्हणतो ते बरोबर नाही.

## अवतारांनी काय केले ?

दुसरे असे की, आमच्या धर्मातील जे थोर अवतारी पुरुष ते प्रपंचातच राहिलेले होते. प्रपंचाची कर्तव्ये यथास्थित बजावून, म्हणजे त्याला मान्यता देऊन त्यांनी उच्चतर कामाला हात घातले. त्यांचेच अनुकरण साध्या संसारी माणसाने केले तर त्यात काही गैर नाही; इतकेच नव्हे, तर ते तसेच असावयास हवे. ज्या वेळेस आपण असे म्हणतो की, अमक्या तमक्या थोर पुरुषाने संसारावर लाथ मारली आणि दुसऱ्यासाठी स्वतःचे बलिदान केले त्या वेळी आपण न कळत संसाराची किंमत वाढवीत असतो हे आपल्या ध्यानात येत नाही. परहितासाठी त्यांनी काय कमी मानिले ? तर स्वतःचा संसार कमी मानिला हे त्याचे उत्तर होय; मग परहितार्थ जीव धोक्यात घातला याला महत्त्व कशाने प्राप्त झाले ? तर स्वतःचा संसार टाकिला म्हणून. म्हणजे स्वतःचा संसार हा एवढ्या तोलाचा समजला पाहिजे की, जो टाकल्यामुळे परसेवेचा महिमा लक्षात आला ! म्हणजे असे झाले की,संसार ही वस्तु फारच महत्त्वाची आहे. एखाद्या माणसाच्या स्वार्थत्यागाची कसोटी कोणती? तर त्याने आपल्या संसारावर पाणी सोडले ही. मग संसार ही फारच महत्त्वाची वस्तू झाली, असा याचा अर्थ होय. एखाद्या देशचे लोक आपल्या देशावर चाल करून आलेल्या लोकांशी जर अगदी जीव तोडून लढत असले तर त्या प्रसंगाचे अगदी खरे वर्णन करता करता वर्णनकार असे म्हणतात की, ‘They were fighting for their homes and hearths !’ आणि हे वर्णन अक्षरशः खरे आहे. Homes आणि Hearths म्हणजेच संसार. या संसारासाठी ते लढत होते असा ह्या वर्णनाचा अर्थ आहे ! तात्पर्य काय की, संसाराचा महिमा केवळ अवहेलनेच्या भाषेने कायमचा कमी होण्यासारखा नाही.

## ब्रह्मज्ञ व शास्त्रज्ञ

ब्रह्मविदांच्या कर्तबगारीविषयी मागे उल्लेख आलेलेच आहेत. त्यांचे म्हणणे काय आहे हे कळणे दुरापास्त असते. शिष्यमंडळींना जे काय वाटते ते इतकेच की, हा थोर पुरुष आहे. मोठा तपस्वी आहे. याची बरोबरी आपल्याला होणे नाही. आपल्याला इतकेच करता येण्यासारखे आहे की, याच्या मुखातून जी काय चार अक्षरे निघतील ती आदरबुद्धीने ऐकावी, तो जे काय चार मणी ओढावयास सांगेल तेवढे ओढावे व वर्षांतून एकदा सद्गुरूचरणी हजिरी देण्यास यावे. हा तपस्वी विश्वाचे कोडे उलगडण्यासाठी कोणत्या तऱ्हेचे बौद्धिक यत्न करीत आहे हे ह्या भक्ताला कळणे कधीही शक्य नसते; आणि तो तसे यत्न खरोखरीच करीत आहे की काय, याचा उलगडा करून घेणे शिष्याला साधणे शक्य नसते. यदाकदाचित उलगडा झालाच तर तो झाला आहे हे त्याच्याच जबानीवरून मानावयाचे असते; व झाल्यासारखे जे काय झाले असेल ते फक्त त्याच्या पुरतेच असते असेही तोच म्हणतो. यामुळे या ब्रह्मविदांच्या आत्मशोधाचा व विश्वशोधाचा आम्हा पामरांना कसलाही उपयोग नाही. याच्या उलट शास्त्रज्ञांची गोष्ट असते. विश्वाचा उलगडा हे जरी त्याचे फार दूरचे ध्येय असले, तरी त्या ध्येयसिद्धीच्या सुदीर्घ मार्गावरील एक लहानसा तुकडा त्याने शोधासाठी आखून घेतलेला असतो. तो काय आहे हे कळवून घ्यावयाचे म्हटले तर कोणासही तो कळण्यासारखा असतो. त्याची साधने उघड व हिशोबी अशी असतात आणि थोड्याशा सरावाने ती कोणालाही हाताळता येतात. आखून घेतलेला मार्ग पुरा झाला म्हणजे त्यात जर यश मिळाले तर त्या यशाचा मक्ता ब्रह्मविदांप्रमाणे ज्याचा त्याला नसतो; तर त्यांचे ज्ञान जाणू इच्छिणाऱ्या सर्वांना होते, व त्याचे फायदे भोगू इच्छिणाऱ्या सर्वांना मिळतात. तपस्वी हा आपल्या मानसिक प्रगतीबरोबर, व दंडनाने देह जसजसा शुष्क होत जाईल तसा तसा अंतराळातसुद्धा लोंबत राहील; व त्याच्याकडे पाहणारे लोक स्तंभित होतील; पण अचंब्याशिवाय त्यांच्या वाटणीला दुसरे काहीही यावयाचे नाही. उलट शास्त्रसंशोधक हा अंतराळात उड्डाण करण्याच्या खुब्या शोधून काढण्यासाठी अहोरात्र कष्ट करील व त्या निघाल्यानंतर सर्व मनुष्ययोनीसुद्धा आकाशात उड्डाण करील; व ही उड्डाणे हवेत तरंगणाऱ्या या योग्याच्या कसरतीपेक्षा माणसाला शतपट जास्त उपयोगाची व सुखाची ठरतील. ब्रह्मज्ञानी हा आपला महिमा वाढवून त्याबरोबर जगाचे व संसाराचे रूप हिडीस आहे असे दाखवितो. शास्त्रज्ञ हा आधी हिडीस असलेले जग कसे सुखाचे बनविता येईल हे सिद्ध करून देत असतो. संसारी लोक जो प्रपंच करतात त्या प्रपंचातील खुमारी हे ब्रह्मज्ञानी लोक घालवू पाहतात. त्यांचे संसाराच्या नाशिवंतपणाचे उद्‌गार ऐकून आपण काहीतरी चुकत आहो, जे करू नये ते करीत आहो, देह आपल्या ताब्यात नाही, नाहीतर हे आपण

केव्हाच केले नसते अशा तऱ्हेच्या चोरट्या व अंगचोरीच्या पद्धतीने संसार करतात. उलट, शास्त्र हे, संसार मन लावून करण्यासारखा आहे हे, त्यातील वैगुण्याचा परिहार करून दाखविते.

## संशोधक हा भक्तच आहे

अशा या संसारात आम्ही असलो तरी आम्हास लाज किंवा खंती मानावयाची जरुरी नाही. कारण येथेही आम्ही ब्रह्म सोडले आहे असे नाही. आमच्यापैकी जे शास्त्रशोधक आहेत त्यांचे हे काम अविरत चालू आहे. क्रियेवरून ते कर्त्याच्या कल्पना बांधण्याच्या कामात गर्क असतात. एखाद्या वस्तूकडे पाहून तिच्यातील कसब ओळखून जशी तिच्या कर्त्याविषयीची आपली कल्पना अधिक स्पष्ट होते तशीच हे विश्व बारकाईने पाहून व शोधून त्याच्या कर्त्याविषयीची आमची कल्पना अधिकतर उदात्त होत जाईल असे वाटते. नुसतेच त्याच्या दारात धरणे धरून बसणे याला परमार्थविचारात काय किंमत असेल ती असो, पण ही विधात्याची करणी किती विविध रूपाची आहे, किती खोल आणि विस्तृत आहे, हिच्यात रूपांतरणाची शक्ती कशी आहे, नवे येणे आणि जुने गळणे हे कसे घडून येते, खोल खाणीत कोळसा कसा तयार होतो, आणि आकाशात तारे कसे तुटतात हे सर्व आपल्या मनाच्या अवकाशात एकदमच गुंडाळून घेऊन जे कोणी यांच्या कर्त्याविषयीची कल्पना बनवितात ते वरील भाबड्या धरणे धरणारांपेक्षा अधिक डोळस आहेत असे मानावयास हरकत नाही. खुद्द परमेश्वरसुद्धा जर खरोखरीच सर्व गोष्टी चाणाक्षपणाने पहात असेल तर त्यालासुद्धा हे सर्वांगीण अवलोकन करणाराचे कौतुक वाटेल. व मी जी याला बुद्धी दिलेली आहे तिचा हा खरोखरीच सदुपयोग करीत आहे असेही तो म्हणेल. एखाद्या किल्ल्यावर बळकट ठाणे धरून बसलेला किल्लेदार पायथ्यापर्यंतचे व भोवतालचे सगळे रान अनेक प्रकारच्या संरक्षक उपायांनी गजबजून सोडितो. अशा या किल्लेदाराला जर गाठावयाचे असले तर भाबडेपणाने आर्जव करून किंवा त्रागा करून चालण्यासारखे नाही. त्याने पेरून ठेवलेली जी हरतऱ्हेची संरक्षक साधने ती काय आहेत, हे बारकाईने पाहून जो कोणी एक एक गढी किंवा एक एक मोर्चा क्रमाक्रमाने व यथानियम आक्रमित जातो तोच शेवटी केव्हातरी वर जाऊ शकेल व त्याच्यासंबंधीच किल्लेदाराच्या मनात खरे कौतुक उत्पन्न होईल. हा अलंकार वजा घातला असता इतकेच निघते की, आदिकारणाचे शेवटचे स्वरूप समजावून घेण्यास ज्या पार्थिव संशोधनाची जरुरी आहे तेच चालू ठेवणे जरूर आहे.

## केवळ 'कोऽहं' चालूच आहे

पारमार्थिक तत्त्वज्ञानातून खरोखर काय निष्पन्न झाले आहे व जगतात त्याच्या योगाने काय फरक पडला आहे हे पारमार्थिकांना तरी सांगता येईल काय, याची

शंकाच आहे. अगदी जगाच्या आरंभी, अथवा आदिकारण बघावयास हवे हे स्फुरण ज्या दिवशी मानवी बुद्धीला झाले त्या दिवशी, माणसाने “कोऽहम्” अशी जी आरोळी ठोकली तीच आरोळी अजून तत्त्ववेत्त्यांच्या मनाच्या दरीत प्रतिध्वनि उमटवीत चाललेली आहे. पूर्वीचे तत्त्वज्ञानी हे जे जिज्ञासागर्भ वाक्य गर्जले तेच वाक्य आजचा परमार्थीही गर्जत आहे आणि जर कोणाला काही माहीत झाले असले तर त्याचा उपयोग केवळ त्याच्यापुरताच झाला असेल. प्राप्त झालेले ज्ञान परत येऊन कोणी जगताला सांगितलेले ऐकिवात नाही. म्हणजे असे की, दर जिज्ञासूचा प्रयत्न नवा ! असे लक्षावधी जिज्ञासू जरी झाले तरी त्यातल्या एकाचा उपयोग दुसऱ्याला कधीही व्हावयाचा नसतो. प्रत्येकाला प्राप्य ज्ञानावर स्वतंत्र विजय मिळावयाचा असतो. भोवती जे कोणी जमा झाले असतील त्यांना आश्चर्याच्या सुखाशिवाय कसलीही किफायत नाही. उलट वस्तुसंशोधकांची गोष्ट पहा. तो जे काही नवीन विजय मिळवील ते इतर कोणीही निराळे यत्न न करता माहीत करून घ्यावेत व तेथून पुढे वास्तवाच्या अज्ञात परगण्यात बुद्धी चालवावी. म्हणजे फौजा जशा मुलूख हस्तगत करीत जातात तसे हे अज्ञात वास्तव हस्तगत होत जाते. नव्या येणाऱ्या फौजांना जिंकलेला मुलूखच जिंकावा लागत नाही. कारण त्याला जवळजवळ हमरस्त्याचे रुप प्राप्त झालेले असते व तो त्यांच्या मालकीचा झालेला असतो. जे रान जिंकावयाचे राहिले असेल यावरच ते हल्ला चढवितात. यामुळे दर शतकात आणि प्रत्येक वर्षी अज्ञात वास्तव्याचे परगणेच्या परगणे शास्त्रसंशोधक हस्तगत करीत चालले आहेत व क्लृप्तिबाज लोकांना त्या कामात शिरावयाचे नाही त्यांच्यापुढे ‘याचा काही उपयोग होतो का पहा’ असे म्हणून फेकून देतात. या लुटीत जे काय सापडते त्याच्या बळावर सर्व मनुष्यजात दिवसेंदिवस गबर होत चाललेली आहे. पण तिकडे परमार्थ्याकडे पाहावे तो एकदा त्याने जी आरोळी ठोकली आहे त्याच्यापुढे त्याची गती नाही, आणि झाली असल्यास आम्हा सांसारिकांना तो त्याची वर्दी लागू देत नाही, किंवा त्याला वर्दी लाविता येत नाही. अर्थात् प्रगतीच्या दृष्टीने त्याच्या संगतीत वागणारे जगत् खंकच राहते. यावरून पाहावे की, आधिभौतिक शास्त्रांचा अवलंब हा सुयुक्त आहे की नाही, व परमार्थविचारांची चट माणसाने कितपत बाळगावी.

## संसार खोटा म्हणण्याचं बंद करा

ब्रह्मवेत्त्याने हे खोटे आहे, हे खोटे आहे, हे सांगण्याचे थोडे बंद केले तर संसारात जी नसती अरुची उत्पन्न होते ती व्हावयाची वाचेल. संसाराचा उपभोग भित्रेपणाने कमी होतो; उलट शास्त्रवेत्त्याने त्यांची सांसारिक दुःखे कमी करण्याचे जर यत्न केले तर संसार अधिक सुखावह होतो व अशा रीतीने प्रापंचिकांची संसाराची लज्जत वाढू लागते. ‘हा सगळा मायाजाल आहे, ही बायकापोरे आपली कोणी

नव्हत, प्राण्या, उलटसुलट गोते का खात आहेस; पूर भरलेला आहे; तिकडून मायेचा लोंढा येत आहे. त्याबरोबर वाहून जाशील !' अशा प्रकारचे उद्‌गार आज शतकानुशतके ऐकून आम्हाला खरोखरच कंटाळा आला आहे. हे ऐकून ऐकून आमची मने कमकुवत बनली आहेत. जे खोटे आहे त्याच्या संरक्षणासाठी मनुष्य दंड ठोकून उभा रहावयाचा नाही म्हणून आता विनंती अशी आहे की, आम्हाला जरा संसाराकडे आपलेपणाच्या भावनेने पाहू द्या. त्यावर आमचा लोभ जडू द्या. आम्ही संसारासक्त आहो असा आमचा बोभाटा होऊ द्या. आपले प्रपंच यशस्वी व्हावे म्हणून हे लोक बुद्धीची व श्रमाची शर्थ करतात, अशी आमच्या नावाची कीर्ती सर्वत्र होऊ द्या. हे लोक बायकापोरे आपलीच मानतात व त्यांच्याकडे कोणी वाकड्या दृष्टीने पाहिले तर त्याला हे खाऊ का गिळू करतात असा आमचा लौकिक सर्वत्र पसरू द्या. बायकापोरे खोटी, ती आमची कोणी नव्हत या तुमच्या प्रतिपादनामुळे स्त्रियांच्या मनात स्वत:संबंधी क्षुद्रभाव व आम्हासंबंधी सूक्ष्म अविश्वासही वाढीस लागतात. त्याच्याऐवजी त्या ज्या सीता, द्रौपदी यांच्यासारख्या मोठमोठ्या स्त्रिया मागे होऊन गेल्या, त्यांच्याच कोटीत आपण जन्माला आलो आहो, राणा प्रतापसिंह आणि शिवाजी राजा यांना ज्या स्त्रीजातीने जन्म दिले त्याच जातीच्या आम्ही आहोत आणि म्हणून आमचे लोकवैभव वाढविण्याची पुरुषांच्या बरोबरीची, संयुक्त जबाबदारी आहे अशी जाणीव त्यांना उत्पन्न होऊन स्वत:ची खरोखर उंची किती आहे हे त्यांस कळू द्या. ज्याच्या पदराशी गाठ बसली तो माझा गुरू, देव, सर्व काही आहे व ज्याच्याशी ही पडलेली गाठ मरणालासुद्धा तोडिता येत नाही हे सिद्ध करण्यासाठी मी स्वत:च्या देहाचा होम करून घेण्याससुद्धा राजी असते, त्या या पुरुषाला मी म्हणजे कोणी एक गळ्यातील धोंड आहे, केवळ एक पैशाची मालकीण आहे, आणि त्याच्या पारमार्थिक उन्नतीच्या आड येणारी वाटमारी कैदाशीण आहे ही जी बुद्धिमान स्त्रीच्या मनाला लागणारी रुखरुख ती अत:पर नष्ट होऊ द्या. तिला असेच माहीत होऊ द्या की, कसल्याही अवघड प्रसंगी मी हाक मारली असता माझे रक्षण करणे हाच माझे पुरुष स्वत:चा धर्म मानितात; ते बायकापोरे खोटी मानीत नाहीत. आजवर पुरुष प्रपंचांतून पळून गेले असे नाही. पण प्रतिपादिलेल्या तत्त्वज्ञानाप्रमाणे पाहता त्यांनी पळावयास हवे होते; पण त्यांनी पळता येत नाही म्हणून तत्त्वच्युतीचा व आत्मारोपाचा घुटका गिळून ते चुळबुळत नाइलाजाने प्रपंच करीत आहेत. हे सर्व आता रद्द होऊ द्या. जे कोणचे तुम्हाला ज्ञान झाले आहे, त्याची मारक वाफ आमच्यापर्यंत येऊ देऊ नका. आम्हाला आता प्रपंचावर श्रद्धा ठेवू द्या. ब्रह्मज्ञानावर ती बहुत दिवस ठेविली; आता मन थोडे इकडे वळवून सर्वांच्या मनाच्या मिलाफाने आम्हाला मोकळेपणाने वागू द्या. अनुदार बुद्धीची वडील माणसे घरात वागत असली तर नवराबायकोला ज्याप्रमाणे मनमोकळेपणाने वागता येत नाही व आठही प्रहर जे भिन्न भिन्न रस संसारातून उत्पन्न

व्हावयाचे त्यांची उघडपणे चव घेता येत नाही, तसे आम्हाला आजवर झालेले आहे ते अतःपर नको.

## ‘युरोपियनांची मातब्बरी कशाला सांगता ?’

आधुनिक शास्त्र म्हटले की, माणसाला अविश्वास वाटू लागतो व आपल्या जुन्या धर्मसमजुतीवर हा काहीएक विचित्र घाला येत आहे अशी त्याची समजूत होते. पण त्याने ध्यानात घ्यावयास हवे की, एक शुद्ध परमार्थरूप धर्म जर सोडला तर बाकीचे बहुतेक सर्व धार्मिक यमनियम हे सर्व पार्थिव वस्तूंच्या अवलोकनानेच वर्तविलेले होते. भौतिकशास्त्रही दुसरे काही करीत नाही. ते पार्थिवांचेच अवलोकन करते व नियम बनविते. हे शास्त्राचे अवलोकन पुरते झालेले असावयास हवे. त्यात चूक राहिलेली असता कामा नये. समाजाच्या स्थैर्याला आणि वाढीला त्याने बन-विलेले नियम खरोखरीच उपकारक असले पाहिजेत. नित्य नवीन होणाऱ्या शोधाला ताबडतोब नियमाचे रूप देता कामा नये. शास्त्राने आज केलेले शोध थोड्याशा वर्षांनी चुकीचे ठरण्याचा संभव असतो आणि म्हणून हे सर्व विचार ध्यानात घेऊन शास्त्रज्ञांनी नियम बनविण्याची घाई करता उपयोगाचे नाही, असे जर कोणी म्हटले तर ते सर्वथा बरोबर आहे. काळजी इतकीच घेतली पाहिजे की, समाजा-तल्या खऱ्या विचारवंतांचे व शास्त्रज्ञांचे नेहमी संगनमत व सामरस्य ठेवावयाची तरतूद समाजाने करावी. बहुमताने ठरवावयाचा हा विषय होऊ नये; कारण समाजातल्या शहाण्या लोकांनी सांगावे आणि सामान्य लोकांनी ऐकावे व तदनुसार वागावे हाच समाजहिताचा खरा मार्ग होय. आपले अभिमानच आपल्याला कसे अडतात ते पहा. युरोपियन राष्ट्रे शास्त्रशोधात पुढे गेलेली आहेत, ज्ञानसंवर्धन हे त्यांच्या हाती जाऊन बसले आहे आणि बाकीच्या जगताने केवळ त्यांच्याकडे पाहून व ते काढतील ती ज्ञाने दत्तक घेऊन आपले संसार चालवावयाचे असतात असे कोणी म्हटले तर आपल्याला त्यातील गूढस्थ सूचनेचा दंश होतो; व आपण उर-फाटून म्हणतो की, ‘दर वेळी त्यांचेच स्तवन कशाला करता ? पूर्वी एके काळी आम्हीही जगताच्या आघाडीला होतो; ज्या वेळी हे लोक अंगाला रंग लावून हिंडत होते त्या वेळी आम्ही ज्ञान व वैभव यांच्या शिखरास पोचलेले होतो व भौतिक शास्त्रज्ञानेही आम्ही हस्तगत केली होती. म्हणून आम्हाला युरोपियनांची एवढी मातब्बरी सांगू नका.’ हे उद्गार ऐकून खरोखरीच समाधान होते. कारण त्यांच्या योगाने आपला प्रस्तुतचा मुद्दा चांगला सिद्ध होतो. तुम्हाला ज्ञाने होती ना ? भौतिकशास्त्रे तुम्ही अभ्यासिली होती ना ? त्यांच्या बळावर तुम्ही वैभवाची वाढ केली ना ? तुम्ही संसारात चांगले लक्ष घातले होते ना ? मग आता तरी तोच आग्रह आहे. पूर्वी जर शास्त्रांचा अभ्यास होता तर तो काही करमणुकीसाठी नव्हता हे स्पष्टच आहे. त्या अभ्यासाने जे काही प्रमेय निघत असेल ते अवलंबि-

ण्यास समाज कचरत नव्हता हाच त्याचा अर्थ आहे.

## दोन पोटविचार

ज्या दिवशी ज्ञान एकीकडे आणि समाज एकीकडे असे होऊ लागले असेल त्या दिवसापासून आपल्याला अवनतीची कळा आली आहे. यात दोन विचार आहेत. परमार्थाचा महिमा इतका वाढला की, शास्त्रज्ञान धडधडीत झाले असून ते जनसंमर्दात पसरविण्याची बुद्धी होईना; व दुसरे असे की, जी पार्थिवाने ठरणारी गोष्ट ती दैवी बळाने होत आहे असे म्हणण्यापर्यंत पाळी आली. म्हणजे सामान्य लोकांनी असे केले असे नव्हे. तर ज्यांना ती ती ज्ञाने खरी झाली होतीं ते स्वतःच इतक्या मिथ्या ज्ञानाचा पाश गळ्याभोवती घेऊन बसले की, त्यांना धडधडीत दिसत असलेली गोष्ट मुखावाटे वदवेना. ग्रहण कसे लागते हे आमच्या इकडील ज्योतिषांना पूर्ण कळलेले होते. आज इंग्रजी शाळेत गेल्यावर इंग्रजी पुस्तकांतून ते शिकण्याची आम्हाला खरोखरीच आवश्यकता नव्हती. पण ग्रहण जसे दूर तसे प्राप्त झालेले ज्ञानसुद्धा दूरच राहिले. ज्या भास्कराचार्यांनी ग्रहणाची कल्पना बरोबर ओळखली त्यांना हे आपल्याला झालेले सत्यज्ञान समाजात पसरवून द्यावे व माणसांना अज्ञानातून मुक्त करून विश्वाच्या खऱ्या कल्पनेकडे चालीस लावावे हा आग्रह उत्पन्न होईना. कोणी म्हणतात की, ब्राह्मणांनी समाजाला अज्ञानात ठेवले. हे चुकीचे आहे. कारण या ब्राह्मणाने आपल्या सजातीय ब्राह्मणांना तरी हे कोठे सांगितले ? त्याच्या बुद्धीला प्रतीत झाले व ते त्याने ग्रंथात लिहून ठेवले एवढेच काय ते झाले. ज्या मार्मिक पाथरवटाने पाषाणातील चुंबकपणाचा गुण लक्षात घेऊन त्याप्रमाणे गाभाऱ्याला आतून लावावयाच्या पाषाणाची योजना केली व मग मध्ये केवळ अंतराळात विष्णूची मूर्ती अधांतरी ठेवून दिली त्याने हा प्रकार खरोखर काय आहे हे जर लोकांस सांगितले असते तर तात्काळ भोळसटपणा नष्ट झाला असता आणि जड वस्तूंच्या गुणधर्मांचे अध्ययन करण्याकडे माणसाची प्रवृत्ती झाली असती. पण भास्कराचार्यांनी ग्रहण कसे लागते याचे ज्ञान फैलावून दिले नाही व या पाथरवटाला जे पाषाणाचे धर्म कळले होते त्यांचा पुकारा त्याने जगतात केला नाही. लोक अगोदरच अद्भुताला भुकेलेले. त्यात त्यांनी विष्णूचे हे सगुण ध्यान अंतराळी लोंबत असलेले पाहिल्यावर त्यांना पूज्यभावाचा केवढा हुंदका अला असेल याची सहज कल्पना होते. आपल्या देशात रसायनाचा शोध फार वर्षांपूर्वी लागलेला आहे, आणि आपले वैद्यक जर असे पाहिले तर दिसून येईल की, युरोपात अगदी अलीकडे अलीकडे वाढलेला रसायनाचा वैद्यकीय महिमा भारतवर्षात फारच प्राचीन काळी झालेला होता. ही ज्ञाने ज्यांना झाली होती त्यांना अमुक एका कुंडीत स्नान केले असता त्वचेचे रोग बरे का होतात हे उमगणे फारसे कठीण नव्हते. भुईच्या पोटातून ठराविक कालानंतर जे ऊन पाण्याचे झरे बाहेर पडतात, त्यांच्या केवळ

दर्शनासाठी लोक त्या ठिकाणी जात नाहीत, तर तेथे स्नान करावयास जातात व बरे होतात हे पाहिल्यावर त्या पाण्याचा काही गुण आहे की काय, असा वहीम एकाही चतुर वैद्याच्या मनात आला नसेल असे वाटत नाही. पण इतरांबरोबर तोही वैद्य, गंगा आली म्हणून पाया पडावयास तेथे धूम ठोकीत जाऊ लागला. जे खरे ज्ञान माहीत झाले ते मोठ्याने ओरडून सर्वांना सांगणे यालाही एक मनाचा आवेश हवा असतो. पण तो या निर्दिष्ट लोकांनी दाखविला नाही, ही गोष्ट खरी आहे. यांनी दाखविला नाही इतके होताच, जेथे तेथे परमार्थ पाहणारे आणि 'हा त्याचा महिमा आहे' असे भोळसटपणाने म्हणून मूळच्या मूर्खाव्यात आणखी मूर्ख-पणाची भर घालणारे असे संत उभे रहावयाचेच. तसेच देवाचा आश्रय करून पोट भरणारे जे इतरांसारखे भोळे भटभिक्षुक त्यांच्या चरितार्थाचा प्रश्न आला. त्यांना देवाच्या अस्तित्वाची ही आणखी एक साक्ष सापडल्यानंतर ते तिचा अव्हेर कशाला करतील ? यांनी या सृष्टीचमत्काराचे स्तोमच माजविले. हे असे सारखे चालतच राहिले.

म्हणजे परत मुद्द्याकडे वळून असे म्हणावयास हवे की, हा जो मध्यंतरीचा भोळ-सटपणाचा प्रकार हा जर वगळला तर पूर्वी शुद्ध शास्त्रीय ज्ञाने येथे खरोखरच उद्भवली होती व म्हणून 'आम्हाला युरोपियनांची मातब्बरी सांगू नका' हे जे देशाभिमानी माणसाचे बोलणे ते बरोबर आहे असे म्हणावयास हवे. पण त्यातले खरे मर्म मात्र हे होय की, काही कालपर्यंत भौतिक ज्ञानाची उपासना आपल्या पूर्वजांनी केली व पुढे ब्रह्मज्ञानाची भारीच चट लागल्यामुळे ही ज्ञाने पोथ्या-पुस्त-कात तशीच पडून राहिली आणि भोळ्या कल्पनांच्या जुन्या बाजारातील गोंगाट दीडदोन हजार वर्षे चालत राहिला. आपला देश फार मोठा आहे, पण त्याचे मोठे-पण केव्हा उपकारक असते व केव्हा मारक ठरते ! ज्ञानाची आणि सद्गुणाची पिके आली, तर एवढ्या अवाढव्य देशाचे वैभव केवढे होईल किंवा मागे झाले असले पाहिजे हे सहज समजते. पण जर का एकदा अज्ञानाची आणि मोठेपणाची कुंद आणि रोगट हवा सगळीकडे पसरली तर हा एवढा खंडतुल्य देश या आपत्तीत पिचत राहावयाचा हे ओघानेच येते. त्यामुळे आपत्तीतून झटकन बाहेर पडता येत नाही. ज्या या मधल्याकाळात ही आत्मानात्मविचाराची झळ आपल्या समाजाला लागली, जवळजवळ त्याच काळात पृथ्वीवरील इतर देशातही आगाऊ सिद्ध झालेल्या शास्त्रज्ञानाची महती साफ मागे पडून आत्मानात्म्याचे भांडणच सर्व जगभर पसरून राहिले व मानवयोनीचे मोठमोठाले प्रचंड तट पडून या आत्मानात्म्याच्या मुद्द्यावर ते परस्परांच्या संहाराला प्रवृत्त झाले. त्यांच्या व आपल्या या संकटात फरक एव-ढाच आहे की, त्यांच्यातील काही राष्ट्रांना या अज्ञानातून आपल्या आधी जागृती आली व ती सुमारे तीनशे वर्षे आपल्या आधी आली. यापेक्षा त्यांच्यात व आप-ल्यात फरक नाही. पण ही जागृती आल्याबरोबर त्यांचे चलनवलन इतक्या जोराने

चालू झाले की, भौतिक शास्त्रांचा अभ्यास हा त्यांच्यातील बुद्धिमान लोकांचा जवळजवळ धर्मच होऊन बसला आहे. धर्मात सांगितलेल्या गोष्टी जर या शोधांशी विसंवादी असल्या तर शोध रद्द न होता धार्मिक कल्पना रद्द होत गेल्या व अशा रीतीने शास्त्रज्ञानाला धर्माचे स्थान मिळू लागले. आपल्याकडेही हे व्हावयास हवे. धार्मिक तत्त्वज्ञानातील ज्या गोष्टी नवीन शोधांशी संगर करूनसुद्धा टिकून राहतील त्याच खरोखर टिकून राहतील. बाकीच्यांचा लय झालाच पाहिजे व तो आपण निर्भयपणे पत्करला पाहिजे. अशी एक ईर्ष्या आपण बाळगली पाहिजे की, आमचे आम्हास ठरवावयाचा काही अधिकार नाही काय ? पूर्वी माणसे शहाणी असतीलही पण आम्ही स्वत: काय निर्बुद्ध असे जन्मास आलो आहो ? जेथपर्यंत पूर्वीची ज्ञाने अप्रतिहत म्हणजे पुढून बसलेल्या माराने विव्हल न होता उभी राहतील तोपर्यंतच ती राहू देणे बरोबर आहे. ती विव्हल होत आहेत असे पाहताच त्यांचे युगमान संपले असे गर्जून म्हणावयास कसलीही भीती बाळगण्याचे कारण नाही. दारूचा बाण जसा अमुक एका सीमेपर्यंत सोसाटत जातो, तसे काही एक प्रकारचे ज्ञान अमुक एका पल्ल्यावर आपल्या स्वयंभू मगदुराच्या बळावर पसरत राहील. पण तेथून पुढे त्याचे बळ संपले आहे असे दिसताच पुन्हा पुन्हा त्या विझलेल्या ज्ञानाच्या आश्रयाला जाऊ पाहणे हे अत्यंत घातक आहे. पूर्वीचे लोक जसे आपल्या काळाचे मालक तसे आम्ही आमच्या काळाचे मालक आहो, असे मानणे हा काही उमटपणा नव्हे, तर शुद्ध निष्ठेचा जोर आहे.

## निराळी बंधने हवी इतकेच

जे जे शास्त्रसिद्ध नियम येतील ते घेण्यास बिचकता कामा नये. त्यांनी समाजाचे आजवरचे ठराविक पाये ढासळत आहेत असे दिसेल; पण तेव्हाही न गांगरता हे लक्षात आणिले पाहिजे की, एक नियमकोश जाऊन त्या ठिकाणी दुसरा नियमकोश येऊ इच्छितो, इतकेच; एक बंधनसमूह नष्ट होऊन तेथे अराजक माजते असे नव्हे. ‘मला हा धर्म नको’ या वाक्यात ‘धर्म’ शब्दावर जोर नाही, ‘हा’ या दर्शक सर्वनामावर जोर आहे. ‘हा नको’ तर दुसरा कोणता तरी हवा आहे असा त्याचा अर्थ आहे. तो दुसरा जो असेल तो तपासून घ्यावा. आपल्या पृष्ठावर समाजाला तोलून धरण्याची त्याला शक्ती आहे, की नाही, हे समाजाने पहावे व तसे सामर्थ्य त्याच्या अंगी आहे असे पाहताच त्याच्या पाठीवर पाऊल टाकण्यास समाजाने बिलकूल कचरू नये. जे कोणी बंधनच नको असे म्हणत असतील त्यांच्याशी हुज्जत घालावी हे बरोबर आहे, पण केवळ ज्ञानाच्या गतीबरोबर कोणी बंधनांतरे करावी असे म्हटले तर त्यात बिचकण्यासारखे काही नाही. पूर्वी जे समाज व आपण एकत्र रहात नव्हतो ते आता आपल्या शेजाराला आलेले आहेत, ज्या धर्मांची आपल्याला माहिती नव्हती त्यांच्याशी सहविचारांची किंवा घासाघाशीची वेळ आली आहे.

लोकसंख्येचे व धनोत्पादक धंद्यांचे जे प्रश्न पूर्वी उत्पन्न झालेले नव्हते ते आता होत आहेत. मानवप्राण्याची किमान किंमत किती हे ठरविण्याच्या काठीची उंची बदलली आहे. स्त्रियांचे महत्त्वमापन करण्याचे गणितही बदलले आहे. जी समाजविषयक तत्त्वे, स्त्रीपुरुषसंबंधाची तत्त्वे, स्वातंत्र्यमतवाद, आर्थिक स्वातंत्र्य, इत्यादि सर्व पृथ्वीवर घुमत आहेत, ती आपल्या घरात येऊ देणार नाही असे कोणी म्हणेल तर तो आत्मघाती ठरेल. इतर मनुष्ययोनीहून आपण कोणी मूलतःच निराळे आहो असे समजण्याचे कारण नाही. नवमतवाद हे आपल्या प्रादेशिक, धार्मिक इत्यादी स्थितीविशेषांनी संस्कारित करूनच, पण ते घेतले पाहिजेत. या योगाने ठराविक चाकोरीच्या बाहेर पडण्याचे प्रसंग येतील. पण गुरू जसे एका खुंटाला बांधून वाटेल तेवढे लांब दावे गळयास लावून रानचरणीला सोडतात तसे समाज हे वाटेल तेवढे स्वातंत्र्य देऊन आपापली सुखे वाढवावयासाठी मोकळे सोडावयाचे असले तरी काही एक ठाशीव यमनियमांचा धर्मखुंट म्हणून ठेवावयास हवाच. व हे यमनियम शुद्ध भौतिकशास्त्र विचारांनी ठरविलेले असावे. या भौतिकशास्त्रात, ज्यांना सूक्ष्म विषय म्हणण्याची चाल आहे, पण जी वास्तविक जडातच येतात असे मागे आम्ही विवेचिले आहे, ती शास्त्रेही अंतर्भूत होतात. त्यांनी सिद्ध केलेली जी नियमने ती पत्करणे व त्यावर समाजाची धारणा करणे हाच आपला श्रेष्ठ धर्म होय. म्हणून अशा या शास्त्रांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. नाहीतर पुढारलेली राष्ट्रे या शास्त्रशोधाच्या आश्रयाने बलिष्ठ होत राहणार व आपण बळून गेलेल्या कल्पनांतूनच आपल्याला पोषण मिळते असे समजून स्थिर राहणार.

## शोध बिचारे उदासीनच आहेत

येथे आणखी एका कल्पनेचा निरास करावयास हवा. यंत्रांनी सगळा घात केला आहे असे म्हणण्याची परिपाठी थोरामोठ्यांनी घातली आहे; व ती त्यांनी सुरू केलेली पाहताच जे मूळातच नवीन ज्ञानाला विन्मुख होते त्यांना चांगलेच फावले, व ते म्हणू लागले की, ‘ आम्ही तरी हेच म्हणत होतो. हे एवढे थोर गृहस्थ आहेत. यांचेही असेच मत आहे की, यंत्रांनी नाश केला.’ या दोघांचा हा मनोमिलाफ फारच उद्वेगजनक आहे. तो मोडून टाकला पाहिजे. ‘ यंत्राने नाश केला ’ या वाक्याचे जनकवाक्य असे आहे की, ‘ शास्त्राने नाश केला. ’ या दोहोत फरक केला पाहिजे. प्रथम जनकवाक्याचे परीक्षण करावयास हवे. युद्धकाळात माणसांनी एकमेकांना मारण्यासाठी ज्या अनेक क्लृप्त्या काढल्या त्या पाहून अंगावर शहारे येणे हे स्वाभाविक होते, पण ह्या अनेक क्लृप्त्या निघाल्या याला शास्त्राचा काही इलाज नाही. जे शास्त्राचे नवे शोध लागतात ते बिचारे आपण होऊन काहीच करीत नाहीत. ते तेथे असतात इतकेच काय ते. त्यांचा उपयोग कोणी कसा करून घ्यावा हे त्यांच्या हाती नाही. त्यांना काय मने आहेत ? या शोधांचा उपयोग दुष्ट कामाला

करून घेणारे लोक स्वत: दुष्ट आहेत; त्याला शोधांनी काय करावे ? सद्बुद्धीच्या माणसांनी त्याचा उपयोग करावयाचे म्हटले तर त्यांचा चांगल्या कार्यात उपयोग होईल. शोधांना स्वत:ला यातले बरेवाईट काहीच कळत नाही. म्हणून हक्सले म्हणाला, ' शास्त्रशोध हे Ethically neutral आहेत. वाईट माणसे त्यांचा वाईटा-कडे उपयोग करून घेतात. म्हणून त्यांच्यावर हत्यार धरणे चुकीचे आहे. आपण असे करू लागलो तर आपणाला पृथ्वीवर काहीही शिल्लक ठेवता येणार नाही. कारण वाईट लोक आपला हेतू साधण्यासाठी कोणच्याही साधनाचा उपयोग करून घेतात. शास्त्राचे शोध नव्हते तेव्हा विद्यमान असलेल्या साधनांचा उपयोग वाईट माणसांनी वाईटाकडे केला की नाही ? मग त्या साधनांवर आपण तेव्हा का रागा-वलो नाही ? अश्राप माणसांच्या तोंडून आपल्याला हवा आहे तो कबुली जबाब काढण्यासाठी प्रत्यक्ष मिष्टान्नाचा उपयोगसुद्धा, पोलीस करतात असे आपण ऐकिले आहे ना ? मग वरील तर्कपद्धतीने आपल्याला अन्नच वाईट ठरविले पाहिजे. पण असे कधी कोणी केले आहे काय ? आपला उपयोग भुकेलेल्यांची भूक शमविण्या-साठी होत आहे, का एखाद्या मानीव गुन्हेगाराचे डोके फिरविण्यासाठी केला जात आहे हे त्या अन्नाला काय बरे माहीत ? हे जसे आहे तसेच असणार. वस्तू वाईट किंवा चांगली अशी मूलत: काहीच नाही. आपण तिचा काय उपयोग करतो यावर सर्व अवलंबून आहे. शास्त्रीय शोध वाईट असे म्हणताना मनुष्ययोनी आपल्यावरच दुष्टपणाचा शेरा मारून घेते एवढाच या गोष्टीचा अर्थ आहे. दुसरें असे की, शास्त्रे वाईट म्हणताना शास्त्रांचा चांगला उपयोग किती झाला आहे याकडे आपण काना-डोळा करतो. वैरभावाचे पिसे अंगात भरले म्हणजे माणसांनी शास्त्रांचा वाईट उप-योग केला आहे हे खरे, पण सुदैवाने माणसांच्या अंगात हे पिसे एखादे वेळी येते व थोडा वेळ टिकते. त्यावेळी जे काय हातात असेल तेच आपण एकमेकांना फेकून मारतो. लूथर लिहीत बसला असताना त्याला एक नरकदूत समोर दिसू लागला ! लूथर हा मोठाच धर्ममार्तंड होता; त्या सैतानाकडे पाहताच तो इतका रागावला की, त्याने टेबलावरची दौत उचलून त्या सैतानाला भिरकावून मारली. येथे दौतीचा नेहमीचा उपयोग इतका चांगला आहे तरी त्यावेळी लूथरने अंगात आल्यासारखे करून तिचेच हत्यार बनविले. हीच गोष्ट सर्व साधनांची आहे. म्हणून ध्यानात ठेवा-वयास हवे की, मनुष्ययोनीच्या हे जे अंगात येते ते जर सोडून दिले तर एरवी हे शास्त्रशोध आपल्याला उपकारकच ठरले आहेत.आपल्या तोंडावरच्या देवी शास्त्राने गेल्या ना ? मलेरियाचा जंतू शास्त्राने कायमचा मारिला आहे ना ? पनामा कॅनॉल बांधण्याचे काम ज्या पीतज्वराने फ्रेंच शिल्पज्ञांना टाकावयास लाविले तोच पीतज्वर शास्त्राच्या बळावर मारून टाकून अमेरिकन लोकांनी पनामा कॅनॉल बांधिला; इतकेच नव्हे तर ते आरोग्य हवेचे ठिकाण बनविले हे खरे आहे ना ? विकलांग कापून काढावयाच्या वेळी माणसाला नुसते दाबून धरूनच डॉक्टर आपल्या हत्या-



३३३० नोंद २५९२२ ३०।५।८०

राने, रोग्याच्या किंचाळण्याकडे लक्ष न देता, लाकडाचा ओंडा कापावा त्याप्रमाणे कापीत असे; पण शास्त्राने भुलीच्या वाफा काढून रोग्याला सुखी केले आहे ना ? अर्धरात्री उभे राहून दलदलीच्या जमिनीत धान्य पेरावयाची सोय करून शास्त्रांनी गरीब शेतकऱ्यांना हालातून सोडविले आहे ना ? भौतिक शास्त्रांनी आपले नेहमीचे जीवित इतके सुखी केले असता आपणच एखादे वेळी अंगात आल्यासारखे वागू लागलो, म्हणून त्यांना दोष देणे हे प्रशस्त आहे काय ? सर्व युयुत्सु राष्ट्रांनी मिळून जर असे ठरविले की, शास्त्रशोधाचा अमूक एक उपयोग करून घ्यावयाचा नाही, तर तसे घडून येईल. शास्त्र बिचारे उदासीनच आहे.

## पुढल्याला मागचा नावे ठेवितो

दुसराही एक विचार लक्षात घ्यावयास हवा. पुढल्या पुढल्या मारक यंत्राला मागले मागले लोक नावे ठेवितात, असे दिसते. बंदुकीच्या गोळीची एक जात अशी आहे की, ती अंगात घुसताना अर्थातच त्वचेला मोठेच रंध्र करते; पण आत गेल्यावर स्थिर होण्याच्या बेताला जोराने फुटते व मग तिचे झालेले शेकडो बारीक बारीक तुकडे मांसात घुसतात. ही गोळी जेव्हा निघाली तेव्हा तिचे मारक रूप पाहून लढवय्यांना आनंद झाला. पण ती ज्यापाशी नव्हती ते उद्वेगाने म्हणाले, 'हे फार वाईट आहे !' जणू काही यांच्यापाशी जी साधी गोळी होती ती कमी प्राणघातक होती ! ही वरची ठिकरी गोळी वापरणारांना जेव्हा विषारी वाफेची धुरी रणांगणावर मिळाली, तेव्हा ते म्हणाले, 'हे फार वाईट आहे !' जणू काही लोकांच्या अंगात घुसून, फुटून त्यांच्या देहाच्या चिंध्या करणारी यांची गोळी कमी घातक होती ! बंदुकीची गोळी जेव्हा प्रथम उडाली असेल तेव्हा तलवारीने एक-मेकांच्या माना कापण्यात सराईत झालेले शूर म्हणाले असतील, 'धर्मयुद्ध नव्हे हे !' जणू काही तलवारीने मानवी देहाची जी कापाकाप चालत असे ती क्लेश-दायक नसे ! एकदा मारावयाचे असे म्हटल्यावर कसे मारावयाचे व मरण हेसुद्धा योद्ध्याला कमी भीतिप्रद करावयाचे की काय हा प्रश्न असतो. जर का शिपायांना हे कळले की, मरणातही क्लेश बिलकुल नाहीत तर सध्या थोडी वचकत अस-लेली माणसे फारच चेकाळतील. त्यांनासुद्धा अशी दहशत हवीच की युद्ध म्हणजे नुसते मरण नाही, तर क्लेश आणि मरण असे आहे. असे झाले तर युद्धतत्परता थोडी तरी कमी होईल. हाही एक विचार ध्यानात घेण्यासारखा आहे. पण हा सोडून दिला तरी दुसऱ्याचा निःपात करावयाची साधने कोणतीही असोत, आपण एकमेकांस मारावयाचे की नाही हा काय तो प्रश्न असतो. मागल्या माणसांनी ठिकरी गोळी उडविली नाही किंवा विषारी वाफांची धूरी शत्रूंना दिली नाही, याचे कारण ती माणसे मोठी भूतदयान्वित होती हे नव्हे तर त्यांना ही साधने माहीत नव्हती हे आहे. त्यांना जी मारक यंत्रे बनविता आली होती त्याचा उपयोग चालूच

होता. रामाने जेव्हा अत्यंत प्रखर असे धनुर्युद्ध चालू केले तेव्हा ते नखांनी ओर-बाडावयास शिकलेले राक्षस 'धर्मयुद्ध नव्हे हे!' असेच ओरडले असतील. उत्तरोत्तर फरक इतकाच पडत गेला की, माणसांना अक्कल जास्त जास्त येत चालली व त्या अकलेचा उपयोग त्यांनी इतर कामात जसा केला तसा या मारक साधने तयार करण्याच्याही कामी केला. हा उपयोग त्यांनी केला हा काही त्यांना माहीत झालेल्या शास्त्रांचा दोष नव्हे. त्यांच्या भावनेचा व वासनेचा आहे. त्यांना वाटल्यास दोष द्यावा.

## घडी विसकटणे म्हणजे काय

शास्त्राने म्हणजे शास्त्रनिर्मिती यंत्राने समाजाची जुनी घडी विसकटविली हे आक्षेपकाने म्हणणेही टिकण्यासारखे नाही. घडी बिघडविली एवढे खरे आहे; पण त्यामुळे माणसाच्या जातीचे नुकसान झाले हा त्यातून निघणारा ध्वनी मात्र न्याय्य नाही. काही नवे आले म्हणजे जुनी घडी विसकटणारच; पण जुनी घडी विसकटली याचा अर्थ नीट न्याहाळून पाहिला पाहिजे. चालावयास सोप्या व अधिक काम देणाऱ्या प्रत्येक नव्या नव्या साधनाच्या निष्पत्तीमुळे समाजाची घडी बिघडली असल्याची तक्रार समाजाने केली असेल. समाजाची घडी याचा अगदी मूळातील अर्थ श्रमावर उपजीविका करणाऱ्या लोकांचे जे धनोत्पादनाचे मार्ग असतात, ते विसकटतात असा आहे. हे मार्ग विसकटले म्हणजे त्यावर अवलंबून असलेली राहणी बदलू लागते. ही राहणी बदलणे अनेक तऱ्हांनी संकटाचे वाटते. आज ज्या मार्गाने आपण पैसा मिळवीत असतो तो सोडावा लागून दुसरा पतकरावा लागला, पण राहणी मात्र तशीच राहिली, तर माणसे इतकीशी नाखूष होणार नाहीत. आज जी माणसे, वैद्यक्रियेवर पैसा मिळवितात किंवा दागिने करून आपले चालवितात, त्यांच्या धंद्याची जर अदलाबदल झाली तर ते धंदे बदलून दुसरे घेताना अभ्यासविषयक जो काय त्रास होईल तो व धंदा बदल झाल्यामुळे आद्यात काय फरक पडेल तो. या आद्यातील फरकामुळे राहणीची तबा थोडी बदलेल, व एवढा थोडाच जरी फरक असला तरी घडी विसकटली असे लोक म्हणणारच. ब्राह्मण लोक कोकणात शेतीच करीत असत; नारळी, पोफळी लावीत असत. वृद्ध लोकांच्या लहानपणाच्या आठवणी अजूनही हेच सांगतात. मग दीडशे दोनशे वर्षांपूर्वी हेच व्यवसाय किती जारी असतील याची कल्पना सहज होते. मराठी राज्य झाल्यावर त्यांनी तो व्यवसाय सोडला आणि कारकुनी आणि शिपाईगिरी पत्करली. आता येथे पूर्वीचे मार्ग विसकटले, हे खरेच आहे, पण 'घडी विसकटली' अशी तेव्हाही माणसांनी तक्रार केली की काय हे माहीत नाही. पण राजकारणात जसजसे फरक पडत जातात, तसतसे आपल्या जीवितात आपण होऊन फरक पाडून घेणारे समाज पुष्कळच असतात. ही गोष्ट त्यांनी आपण होऊन केलेली असल्या-

मुळ त्यांना तक्रारीला काहीच जागा नसते. पण जर का हे फरक त्यांच्या अनिच्छेने आलेले असले तर मात्र त्यांची तक्रार फारच मोठी असावयाची हे खरेच आहे. ज्या लोकांचा शिपाईपणाचाच धंदा होता त्यांना जेव्हा धनोत्पादनाचा हा नित्याचा व्यवसाय आपल्या हातातून निसटत आहे, हे दिसले तेव्हा त्यांनी मोठीच तक्रार केली असेल. मराठी राज्यात ज्या भंडारी व कोळी लोकांनी मराठी आरमाराचे काम सांभळिले होते, ते जेव्हा इंग्रजी अमदानीबरोबर आपल्या पिढ्यानुपिढ्यांच्या धंद्यातून उठले व उपरे झाले, तेव्हा घडी विसकटल्याची त्यांनी मोठीच तक्रार केली असावी हे अगदी स्वाभाविक आहे. त्यांना धनोत्पादनाचा मार्ग उरला नाही; इतकेच नव्हे, तर आपल्या पूर्वीच्या संवयीप्रमाणे समुद्रावर काही वहिवाट करावी व पोट भरावे असे त्यांनी मनात आणिले तर इंग्रज सरकार त्यांना चांचे म्हणू लागले व हे चोऱ्या करतात असा आरोप त्यांच्यावर ठेवून त्यांस शिक्षा करू लागले. या ठिकाणी घडी बदलली या शब्दांना पुष्कळच अर्थ आहे. श्रमसाहस करून व अशा रीतीने आपली उपयुक्तता समाजाला पटवून देऊन हे लोक संभावितपणाने कालक्रमण करीत होते. पण, राज्यपद्धती अथवा राज्याची मालकी बदलल्याबरोबर याच लोकांची नावे चोरट्यांच्या यादीत दाखल व्हावी, हा घडी बदलल्याचा केवढा दाखला आहे पहा. मराठी राज्यात पूर्वी जवळजवळ दरघरी घोडे असे. भिमथडीची तट्टे महाराष्ट्रात सर्वत्र असत. त्यांच्या पाठीवर घालण्यासाठी खोगरे करण्याचा धंदा जिनगर लोक करीत. नव्या राजवटीबरोबर सरकारने येथील लष्करी बाणा मोडावा म्हणून व आपल्या मागची धाकधुक कमी व्हावी म्हणून लटक्याच औदार्याने सरंजामी सरदारांना कळविले की तुमची उत्पन्ने तुमच्याकडे चालू राहतील; पण ते उत्पन्न खाता म्हणून जी सैन्य तुम्हाला बाळगावी लागत ती बाळगण्याची आता जरुरी नाही. सरदारांची ही घडी थोडीशी बिघडलीच. पण बिघडली हे त्यांच्या पथ्यावरच पडले. पण हे भोवले कोणाला ते पहा. फौजा घरी बसल्या, म्हणजे शिपाईबाणा बाळगणारे हजारो मर्द लोक घरी माशा मारीत बसू लागले, किंवा शेतीवर निघून गेले. या समाजाची ही घडी बदललीच; व त्याचे दुःख त्यांना किती झाले असेल हे ओळखता येते. पण हे लोण आणखी खोलात जावयाचे होते. स्वार घरी बसले, तर त्यांना घोडी नकोशी झाली असतील हे उघडच आहे, घोडी जर नकोत तर त्यांच्या पाठीवरची खोगरेही नकोत हे उघडच झाले. आणि खोगरे नकोत तर ती करणारे जिनगरही नकोत. म्हणजे जिनगरांची घडी विसकटली. भंडाऱ्यांनी हातचा धंदा हिसकला गेला तरी, त्याचीच थोडी वहिवाट कायम ठेवल्याबरोबर त्यांना चोरट्यांची दशा आली. तसाच काही सामाजिक तऱ्हेचा फरक जिनगरांच्या जीवितात पडला. त्यांना असे वाटले की, करीत असू तसली खोगरे आता करू नयेत. पण आधुनिक कालातील सरकारी घोडेस्वारांना जसली हवी तसली करावीत. पण मग त्यात कातडी घालणे आवश्यक

झाले. ती जिनगर घालू लागल्याबरोबर लोक म्हणू लागले, 'तुम्ही चामड्याचा धंदा करता, तुम्हाला विटाळ आला.' ही घडी किती बिघडली हे पहा. किल्ले सांभाळणे व गावातील चोरचिलटांवर नजर ठेवणे, हे रामोशाचे संभावित काम होते. पण सरकारचे किल्ल्यावरचे ठाणे निघाल्यानंतर व सरकारी पोलिसांचा गस्त चालू झाल्याबरोबर रामोशांचा धंदाच गेला. पण आंगच्या शिपाईबाण्यास अनुसरून मारामाऱ्या करून ते पोट भरू लागताच सरकारने त्यांचे नाव गुन्हेगार जातीत घातले. सावाचा चोर असा होतो. चोराचे साव झाल्याची उदाहरणे सहज ध्यानात येण्यासारखी आहेत. अशा रीतीने धनोत्पादनाचे मार्ग बदलल्यामुळे घडी साफ बदलते. ती कोणाला मानवते व कोणाला भोवते इतकेच.

ही प्रस्तावना केवळ प्रस्तुत ग्रंथाचीच नाही; तर 'विज्ञानबोध' नावाचे जे वार्षिक आम्ही सुरू करीत आहोत त्या वार्षिकाची आहे. या ग्रंथात जे शास्त्रीय लेख आलेले आहेत त्यांना प्रस्तावना लिहिण्याची जरूरच नाही. व तो आमचा अधिकारही नाही. आमचा सामाजिक दर्जा बुद्धिदृष्ट्या जर वाढावयास हवा असला तर आम्हाला ही शास्त्रीय ज्ञाने हस्तगत केली पाहिजेत. व आमच्या बंधविमोचनास जे शस्त्रागार देशभक्त लोक बनवीत आहेत त्यात या शास्त्रज्ञानाच्या शस्त्राची भर पडावी एवढाच आमचा हेतू आहे. ही शास्त्रीय ज्ञानाची आवड उत्पन्न होण्यास आमच्या मनास कित्येक शतके चिकटून राहिलेली ब्रह्ममायेची आणि जडसूक्ष्माची किल्मिषे झाडून टाकावयास हवीत; म्हणून प्रस्तावनाखंडाच्या पहिल्या कित्येक परिच्छेदांत त्यांचा सविस्तर विचार केला आहे. या परिच्छेदांत प्रदर्शित केलेले पुष्कळ विचार व पत्करलेले चढाईचे धोरण पुष्कळांना आवडणार नाही; पण त्यांनी त्याचा शांतपणे विचार करावा. आमची वैराग्याची झापड आणि इहलोकीच्या जिण्याबद्दलची उदासीनता ही आम्हास फेकूनच द्यावयास हवीत. अत्यंत सूक्ष्म अशा तात्त्विक विचारांच्या त्यांच्या मुळ्या आमच्या सामाजिक मनोभूमीत खूपच खोलवर गेल्या आहेत. हे सर्व काटेरे तेथून उपटून काढताना मनाला पुष्कळ क्लेश होतील हे उघड आहे; पण ते करावयास हवे म्हणूनच केले आहे. हे असले निबिड तेथे माजावयाच्या आधी आमच्या पराक्रमी आणि ज्ञानलालसपूर्वजांनी आपापले संसार ज्याप्रमाणे निर्भयपणे, ईर्ष्येने, लटके पारमार्थिक भय न बाळगता केले व सर्व तऱ्हेचे पुरुषार्थ साधिले तसे आम्ही करावयास हवे.

वर दिलेले सर्व परिच्छेद हे सुटे आहेत. प्रत्येक परिच्छेदाचा स्वतंत्र विचार आहे. अर्थातच सर्वांच्या वाचनाने साकल्येवरून 'शास्त्रांच्या अभ्यासाची जरूरी फारच आहे.' हा विचार वाचकांच्या मनात स्थिर होईल असा भरवसा आहे.

□

# सावरकर–चरित्र

( कथन )

लेखक

**शिवराम लक्ष्मण करंदीकर**

प्रस्तावना

**न. चिं. केळकर**


| प्रथमावृत्ती | प्रमुख विक्रेते | मूळ प्रस्तावना |
|---|---|---|
| २८ मे १९४३ | मॉडर्न बुक डेपो प्रकाशन | पृष्ठे २८ |

पुनर्मुद्रण २८ मे १९४७ मूल्य १० रुपये


स्वा. वीर सावरकर यांचे पहिले साधार, विस्तृत आणि प्रेरक विवेचक असे चरित्र सुप्रसिद्ध हिंदुत्वनिष्ठ पत्रकार आमदार **कै. शि. ल. करंदीकर** यांनी ११४३ साली सावरकरांच्या षष्ठ्यब्दी समारंभप्रसंगी लिहिले. हा समारंभ **कै. न. चिं. केळकर** यांच्या अध्यक्षतेने पुणे येथे साजरा झाला. इतकेच नव्हे तर करंदीकर चरित्रही केळकरांच्या रसग्रहणात्मक, मार्मिक, संयत प्रस्तावनेसह प्रकाशित झाले. चरित्रविषय सावरकर आणि प्रस्तावनाकार रसिकाग्रणी केळकर असा योग साधल्यामुळे, आणि चरित्रावर काही काळ परकी शासनाने बंदी आणल्यामुळे, चरित्राची प्रथमावृत्ती वेगाने खपली. सावरकरांच्या व्यक्तिमत्वाच्या नि कर्तृत्वाच्या चमकदार पैलूंचे केळकरी प्रस्तावनेत जे हृद्य सर्वांगीण दर्शन घडते, त्याचे हे संक्षेपरूप.

काव्यप्रतिभा व देशभक्ती यांचा संगम घडलेली कितीतरी सुंदर स्थळे सावरकर वाङ्मयात दाखविता येतील. मग ते गद्य असो वा पद्य असो· पण तुमच्या मते उत्कृष्ट असे त्यातले एक स्थळ निवडून द्या असे जर कोणी मला म्हटले तर, सावरकरांनी ब्रिस्टल तुरुंगातून आपल्या स्नेह्यांना पाठविलेल्या 'शेवटचा रामराम' या उद्गारांची शिफारस मी करीन.

'मित्रांनो, ईश्वराने आपल्यापैकी प्रत्येकाची भूमिका ठरवून टाकली आहे. आपण प्रत्येकाने आपली भूमिका वठवावी यासाठी आपली तातातूट होत आहे. ईश्वराने नेमून दिलेली भूमिका वठवीत असताना प्रसंगी जळत्या खडकांना बांधून कोंडून पडावे लागेल. प्रसंगी कीर्तीच्या उसळणाऱ्या लाटांच्या शिखरांवर स्वार होता येईल. कधी आपण लोकांना दिसू, तर कधी अदृश्य राहू. कधी आपण अवनत होऊ तर तर क्वचित उन्नत होऊ ! जगन्नियंत्याने कोणत्याही परिस्थितीत ठेवले तरी ती परिस्थिती सर्वोत्तम आहे असे मानून आपण असे समजले पाहिजे की, आपले जीवितकार्य एकाकी पार पाडणे हेच आपल्या वाट्याचे कार्य आहे.

'एकाद्या उदात्त पौर्वात्य नाटकात भरतवाक्याच्या वेळी नाटकांत मेलेली व न मेलेली सर्व पात्रे एकत्र जमतात. आपण सगळे इतिहासाच्या अफाट रंगमंदिरातील असंख्य नटच आहोत. आपल्या कृतीची प्रशंसा करणारे मानवजातिरूपी प्रेक्षक टाळ्या वाजविण्यासाठी आपल्यासमोर बसलेले आहेत. हे प्रेक्षक कृतज्ञ व आनंदी बनून जोरजोराने टाळ्या वाजवतील तेव्हा त्या टाळ्यांचा गरजणारा आवाज दऱ्याखोऱ्यांपर्यंत जाऊन दुमदुमेल !

'प्रेमळ मित्रांनो, तो क्षण येईपर्यंत रामराम !'

'माझा देहपात होऊन माझ्या अस्थी आणि रक्षा कोठे पडतील याचा नेम नाही. अंदमानाचे वातावरण आधीच निर्जन व भेसूर आहे. तेथे वाहणाऱ्या नदीनाल्यांचा उदासवाणा आवाज तेथील मूळच्या निर्जनपणाला अधिकच भेसूर बनवीत असतो. कदाचित माझ्या अस्थी नि रक्षा त्या उदास नदीनाल्याच्या जवळ पडून रहातील किंवा असेही घडेल की, मध्यरात्री आपला नियत खेळ आकाशात खेळणाऱ्या तारकांचे प्रतिबिंब पोटात सामावून घेणाऱ्या गंगामातेच्या स्फटिकशुद्ध प्रवाहाच्या शेजारी कोठेतरी माझ्या अस्थी नि रक्षा पडून रहातील ! त्या कोठेही पडलेल्या असोत ! श्रीरामाने आपल्या आवडत्या लोकांचा पक्ष विजयधवल ठरविला आहे. दुष्टांना माघार घ्यावी लागली आहे, आणि त्यांचा पाय जेथून पुढे पडला तेथवर त्यांना मागे हटविण्यात आले आहे. आपला हा भारतवर्ष वैभवात उभा आहे, मानव जातीचे मार्गदर्शन करणारा दीपस्तंभ म्हणून यापुढे तो तेजस्वितेने तळपत राहील असा पुकारा झाला, आणि 'हौतात्म्य गाजविणाऱ्या विचारवीरांनो नि कृतिवीरांनो,

तुम्ही ज्या संग्रामात लढलात आणि पडलात तो संग्राम यशस्वी झाला, उठा ! अशी घोषणा झाली की, त्यावेळी, त्या पडून राहिलेल्या अस्थी आणि ती घडून राहिलेली रक्षा यांच्यांत फिरून तेज आणि चैतन्य सळसळू लागेल.

'तोवर प्रिय मित्रांनो रामराम !'

राजश्री विनायकराव सावरकर यांना येत्या २८ मे रोजी साठ वर्षे पुरी होऊन एकसष्टावे वर्ष लागणार, या गोष्टीला अनुलक्षून त्यांचे अभिनंदन होणे अत्यंत अवश्य आहे. त्या अभिनंदनाचे प्रकारही अनेक होतील. पण त्यांचा चरित्रग्रंथ लिहून प्रकाशित करणे हा जो सर्वांत अत्यंत उपयुक्त प्रकार, तो रा. शिवरामपंत करंदीकर यांनी स्वीकारला व यशस्वी रीतीने पार पाडला, याकरिता मी आधी रा. करंदीकर यांचेच अभिनंदन करितो.

सावरकरांच्या एकसष्टाव्या वाढदिवसाकरता त्यांचे चरित्रच लिहून छापून त्यांच्या मित्रांना व चाहत्यांना सादर करावयाचे, या योजनेबद्दल करंदीकरांचे अभिनंदन-करिताना हे लक्षात घेतले पाहिजे की, हे चरित्र–लेखनाचे काम इतर चरित्रलेखना-इतके साधे सोपे नव्हते. कालक्रमवार लावून टाचून ठेवलेली चरित्रसाधनरूप कागदपत्रांची बाडेंची बाडे तयार व स्वाधीन असता शेवटी ती फुकट गेली, नाश पावली, आणि चरित्र–लेखन तसेच राहिले, अशा घडलेल्या काही गोष्टी आपणाला माहीत आहेतच ना ! म्हणून सावरकरांच्या चरित्राची साधने अत्यंत दुर्मिळ असता ती मिळवून, असे मोठ, साधार, सुसंगत, चरित्र निश्चित अवधीत वाचकांच्या हाती देण्याचे काम करंदीकर यांनी केले, ते किती जिकीरीचे, परिश्रमाचे झाले असले पाहिजे याची कल्पना कोणाही माहितगार तज्ज्ञ माणसाला येईल ! या साधनांपैकी काही स्वतः सावरकरांनी लिहून ठेवलेल्या किंवा प्रसिद्ध केलेल्या लेखां-चीच आहेत हे खरे. तथापि त्यातली कोणती जप्त, कोणती खुली याची माहिती मिळविणे व ती वाचून त्यातील सत्त्वसार कणाकणाने घेऊन त्यांची जुळणी करणे, हे काम मोठे कष्टप्रद झाले असले पाहिजे. सावरकर हे स्वतः लोकांच्या डोळ्यापुढे मूर्तिमंत जिवंत असल्यामुळे त्यांनी किंवा त्यांच्यासंबंधी लिहिलेले कोण-तेही लेखन जप्त करणे हे निष्फळ म्हणून हास्यास्पद ठरतेच. शिवाय इतर सर्व राष्ट्रांच्या चळवळींचे इतिहास उपलब्ध इतकेच नव्हे तर ग्रंथालयांतून आदरपूर्वक नांदत मिरवीत असता सावरकरांचे अद्भुत चरित्रपर वाङमय मात्र नष्ट करणे याला, इंग्रजांना समजणारे Vandalism हेच नाव मी लावीन ! पण कोंबडा झाकून दाबून ठेवला म्हणून उजाडायचे रहात नाही, हेही सरकारने खूप समजून रहावे !

पदके व चलनी नाणी यातील भेद सांभाळायला नको काय ? कोणाही मोठ्या माणसाचे मोठेपण, देशभक्ताची देशभक्ती, या गोष्टी त्याच्या चरित्राच्या व प्रत्यक्ष कृतींच्या वर्णनावरूनच लोकांना खऱ्या अनुमानिता येऊ शकतात. तेच खरे मोठेपण व तीच खरी देशभक्ती.

गणितशास्त्रात प्रत्यक्ष उदाहरणे आकड्यांनी सोडवावी तेव्हाच उपपत्ती खरी ठरते. माणसाला देव, भगवान, महात्मा इत्यादी विशेषणेही वाटल्यास लावावी. डोळे मिटून शब्द हाताळणाराचा हात कोण धरणार ? पण ती विशेषणे कोणत्या कारणांनी खरी ठरतात हे त्याला विवेचक रीतीने सांगता आले तरच त्या विशेषणांचे खरे स्वारस्य !

सावरकरांचे चरित्र लिहिताना रा. करंदीकर यांनी अशीच भूमिका स्वीकारली आहे हे पाहून मला बरे वाटले. ते प्रथमच पृष्ठ ३ वर लिहितात – 'अतिमानुषत्वाचे आवरण घालून चरित्र लिहिण्याची प्रवृत्ती मला आवडत नाही अवतारकल्पना मूळ कोणत्याही कारणाने निघालेली असो, त्या कल्पनेवर विसंबून राहण्यास सवकलेल्या हिंदुसमाजाने स्वत:चे अपरिमित नुकसान करून घेतले आहे. आम्ही आपल्या नेभळेपणाने, स्वार्थीपणाने, विवेकभ्रष्टतेने धर्माची ग्लानी होऊ द्यावी, अधर्माचे अभ्युत्थान होऊ द्यावे ! आणि आमचा आम्ही आत्मघात करून घेतल्यावर परमेश्वराने अवतार घेऊन आम्हाला सावरून धरावे! ही जी श्रमविभागणी आम्ही केली आहे ती आमच्या नाकर्तेपणावर पांघरूण घालणारी व परमेश्वराच्या पदरी मूर्खपणा बांधणारी आहे. यासाठी 'अवतारी' पुरुषाच्याही चरित्राचे चित्रण 'मानवी' प्रमाणात व स्वरूपात करावयास पाहिजे. आपल्या डोळ्यांसमोर वावरणाऱ्या कोणाही व्यक्तीच्या चरित्राचे 'देवीकरण' करण्याला मी तयार नाही. स्वत: सावरकर ज्या बुद्धिवादाचे उपासक आहेत त्या बुद्धिवादाची वंचना करायची नसेल तर, सावरकरांच्या अद्‌भुत व असामान्य चरित्राचे मानवी स्वरूप कायम ठेवणेच अवश्य आहे.'

पण 'देवीकरण' न केले तरी सावरकरांचे चरित्र 'असाधारण, असामान्य, अलौकिक, लोकविलक्षण, अद्‌भुत' ही विशेषणे त्याला यौगिक अर्थाने लावण्याला अनेक दृष्टींनी योग्य आहे. सावरकरांना 'देशभक्त', 'स्वातंत्र्यवीर' ही विशेषणे जपून लावली तर खचित शोभण्यासारखी आहेत. मला स्वत:लाही ती मान्य आहेत. पण ती आडनावासारखी उठल्या सुटल्या लावणे मात्र मला पसंत नाही. एखाद्याने प्रसंगविशेषी शालजोडी किंवा जरीकाठी वस्त्र वापरले तरच त्याची शोभा किंवा त्याचे महत्त्व. पण रोज वापरून त्याचा बोळा केला तर ते महावस्त्र नव्हे. मीही या प्रस्तावनेत, सावरकरांच्या चरित्रातल्या काही गोष्टींचा प्रथम उल्लेख करून त्या लोकांना पटवू शकलो, तरच मी त्यांना लावलेली उज्ज्वल विशेषणे सार्थ ठरतील. म्हणून मी ती विशेषणे या प्रस्तावनेच्या शेवटापर्यंत राखून ठेवतो !

सामान्य गोष्टींच्या संबंधात सावरकरांचे बालपण, तरुणपण, प्रौढपण ही सर्व इतर चार लोकांसारखीच ठरतात. कारण सावरकर झाले तरी मनुष्यस्वभावाच्या पुष्कळ गोष्टीत सामान्यच आहेत. पण मनुष्याचे सामान्यत्व किंवा असामान्यत्व हे अशा गोष्टींवरून न ठरविता, काही इतर विशेष गोष्टींवरूनच ठरवावे लागते.

अशा गोष्टी थोड्या असतात पण त्याच महत्त्वाच्या असतात आणि सावरकरांत अशा असामान्य गोष्टी कोणच्या याचे थोडेसे विवेचन करू.

सावरकरांचे वक्तृत्व, लेखन व काव्य ही सर्वच असामान्य कोटीतील आहेत. बॅ. सावरकर यांच्या लेखनाला व वक्तृत्वाला, माझ्या आठवणीप्रमाणे आज सुमारे चाळीस-बेचाळीस वर्षांपूर्वी प्रारंभ झाला. प्रथम त्यांचे व्याख्यान मी सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यात ऐकले. तेव्हाच हा वक्ता जन्मसिद्ध आहे अशी माझी खात्री झाली. कै. शिवरामपंत परांजपे यांच्याप्रमाणे बॅ. सावरकर यांच्या लेखन-वक्तृत्वाचा मूळ झरा अत्यंत तीक्ष्ण अशा देशाभिमानात असूनही, या गुरुशिष्यांच्या लेखनशैलीत व भाषणशैलीत जमीनअस्मानाचे अंतर होते. कल्पनाशक्ती दोघांचीही पल्लेदार परंतु शिवरामपंतांच्या लेखनकलेत घातुक नाजुकपणा होता, त्याऐवजी या त्यांच्या शिष्याच्या लेखणीत व वाणीत कठोर निर्भयता व गावठी आडदांडपणा आढळून येई. शिवरामपंत कोरलेल्या नखांनी रेशमी चिमटे घेत. सावरकर प्रतिपक्षावर हातापेक्षा आपल्या कराळ दातांचाच उपयोग अधिक करीत. वाचक व श्रोते यांना आपण हसविले असे पाहून आपला प्रयत्न यशस्वी झाला असे कै. शिवरामपंत यांना मनात वाटे. उलट आपल्या भाषणात किंवा लेखात चुकून नर्म विनोद येऊन त्यामुळें लोक हसले, असे दिसल्यास, 'तुम्ही हसता काय ? हसण्याची तुम्हाला लाज वाटली पाहिजे ! आणि या तुमच्या थिल्लरपणाला मी कारणीभूत झालो असेन तर मीच अधम चांडाळ होय.' असे म्हणून सावरकरांनी मनातल्या मनात स्वतःच्या तोंडात मारून घेतली असती. शिवरामपंतांच्या कलेचा हेतू आपल्या शत्रूविषयी द्वेष उत्पन्न करण्याचा मुख्यत: असे; तर सावरकरांचा हेतू त्याच्याविषयी जळजळीत राग उत्पन्न करण्याचा असे. शिवरामपंत केव्हाही संपूर्ण समर्पक व व्याकरणशुद्ध अशीच वाक्ये बोलत, पण त्यात स्पष्टोक्तीचा मात्र सर्वस्वी अभाव असे. एक वेळ मानवी पतिव्रतेचा उरोज क्वचित् उघडा पडलेला दिसेल, परंतु शिवरामपंतांची राक्षसी विषकन्या कोणाला स्तनपान देऊन मारावयाला आली असली तरी, त्या मर्याद-शीलेचा पदर विदारण केल्याशिवाय त्याचे तोंड त्या विषारी 'बोंथी' ला लागणे शक्यच नव्हते ! उलट सावरकरांचे लिहिणे बोलणे असल्या अगोचर पडदपोषींचे कधीही नव्हते. त्यांच्या कलेच्या रथाच्या निशाणावर 'या आणि पहा' ही अक्षरे नसून 'येतो आणि दाखवितोच' अशी अक्षरे असावयाची ! शिवरामपंतांच्या अव-गुंठित छद्मी व बहाणेदार लेखनवक्तृत्वाने कितीतरी भोळ्या मनांची फसवणूक होऊन त्यांच्या वाच्यार्थांच्या भूलभुलाईत ती कोलमडून जाऊन हास्यास्पद ठरली असतील ! पण सावरकरांचे लिहिणे बोलणे भोळ्या गोळ्याच्याही मनात आवेशाचा संचार करून, त्याला पक्केपणा आणणारे असे. शिवरामपंतांचे हे गुण व दोष त्यांना अखेरपर्यंत साधले होते व चिकटून राहिले होते. सभापंडित सावरकरांचेही गुणदोष पसतीस-सदतीस वर्षांपूर्वी मी पाहिले ते आजही तसेच प्रतीत होतात.

बाळपणीच झालेली काव्यस्फूर्ती व काव्यशक्ती या गोष्टी सावरकरांमध्ये असामान्य कोटीपैकी होत्या असे खचित म्हणता येईल. त्यांच्या इतक्या अल्प वयात कविता करणारी, विशेषत: त्यांनी केल्या तशा प्रकारची कविता करणारी मुले किती आढळतील ? त्यांची प्रतिभा मुखर होऊ लागण्याच्या वेळी ते १२ – १४ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नसावे. आणि त्यांनी आपली प्रतिभा अनुकरणाने मिळविली असे म्हणावे तर त्या वयात त्यांनी कोणाच्या कितीशा कविता वाचल्या असतील ? शिवाय या कवितांमध्ये महाराष्ट्र भक्तीची जी चमक दिसून येते ती तरी त्यांना दुसऱ्यापासून अनुकरणाने मिळालेली नव्हती हे खचित.

सावरकरांची मनोरचना पाहिली तर तीत कवित्व व स्वातंत्र्यवादी देशभक्ती यांची सरमिसळ पूर्णपणे झाली आहे. त्यांच्या देशभक्तीच्या भावनेला चटकन् काव्याचे स्वरूप येते, व त्यांच्या काव्यात स्वातंत्र्याची आवड कोठे ना कोठे चमकल्याशिवाय राहात नाही. संकटमय अशा जीवनातही त्यांनी किती व कशी काव्यरचना केली हे पाहून कौतुक वाटते. रा. मायदेव यांच्या प्रसिद्ध होणाऱ्या ' सावरकर-काव्यसंग्रहा ' त त्यांच्या काव्यबुद्धीचे स्वरूप वाचकांना पाहावयास मिळेलच. पण त्यांना या कामी आलेल्या अडचणींची कल्पना मात्र ती काव्ये वाचून येण्यासारखी नाही. शिवाय या अडचणींमुळे त्यांचे सर्व काव्य उपलब्धही नाही. तुरुंगवासात लेखनसाहित्य किती मिळणार ? शिवाय त्या साहित्याने लिहिलेल्या कवितांचे काही विषयही असे राजकीय स्वरूपाचे की, त्या कविता तुरुंगाबाहेर पडण्यास प्रतिबंधच व्हावयाचा ! म्हणून काही काही कविता त्यांना आपल्या आपण पाठ करून संग्रही ठेवाव्या लागल्या, व काही तुरुंगातील इतर कैद्यांकडून पाठ करवून त्यांच्याबरोबर बाहेर धाडाव्या लागल्या ! लेखनसाहित्य भरपूर मिळते, व कविता करण्याला सुचणारे विषय कमी राजकीय स्वरूपाचे असते, तर सावरकरांचे हातून एकाददुसरे ' महाकाव्य ' खचित निर्माण झाले असते. 'लेखण्या मोडून साहित्यिकांनी तरवारी हाती घ्याव्या ' अशा तऱ्हेच्या एकांगी दिसणाऱ्या त्यांच्या उद्‌गारांचे खरे मर्म न समजल्यामुळे त्यांच्यावर कित्येकांनी आक्षेप घेतले आहेत. पण ते निव्वळ वावदुकी ठरतात. सावरकरांनी साहित्यिकांना केलेला हा प्रसिद्ध उपदेश केवळ नैमित्तिक स्वरूपाचा होता, नित्याचा नव्हता. स्वतंत्र जीवनाच्या काळी देशभक्तीच्या प्रसारात जिने सहाय्य केले, व पारतंत्र्यातही जिने जीवाला समाधान मिळवून दिले त्या लेखणीवर बहिष्कार घालण्याइतके ते कृतघ्न नाहीत हे कोणासही सहज समजण्यासारखे आहे. माझ्या समजुतीप्रमाणे, वरील उपदेश करताना, सावरकरांच्या डोळ्यापुढे काही ठळक अशी ' वीर-कवी 'ची किंवा ' कवि-वीरां'ची उदाहरणे असावी. अशी उदाहरणे युरोपच्या इतिहासात अनेक दाखविता येतील. ग्रीक इतिहासात अनेक नाटककार कवी असेच झाले. गेल्या महायुद्धात युरोपात अशीच काही उदाहरणे घडली. एकच उदाहरण सांगावयाचे तर इटालियन कवी डी. आननझिओ

याचे असे की, नित्य स्वरूपात तो राष्ट्रीय शाहीर असता, व्हर्सायच्या तहात इटलीला फ्यूमचे बंदर दिले नाही तेव्हा त्याने, पूर्वीच्या गॅरीबाल्डीसारखी, हाती तरवार धरून स्वयंसेवकांचे पथक उभारून, त्या बंदरावर हल्ला करून ते हस्तगत केले! आजच्या युद्धात सैन्यामध्ये शिरणाऱ्या हिंदी तरुणांची स्थिती अशी भूषणास्पद नाही हे खरे. तथापि लेखणी टाकून तरवार घेण्याच्या उपदेशाचे मर्म उघडच होते. लेखणीतून वीररस स्रवविणे हे तरवारीने रक्तपात करण्यासारखेच आहे.नांगर व तरवार ही त्यातील पोलादामुळे परिवर्तनशील असतात. वावदूक आक्षेपकांनी येवढे तरी ध्यानात ठेवावे की, सावरकरांचा हा उपदेश 'परोपदेशे पांडित्यं' असा नव्हता व नाही. त्यांनी काव्यलीलेप्रमाणे शस्त्रलीलाही रंगविली आहे! म्हणून प्रसंगविशेषी एक सोडून केवळ दुसरे करावे असा उपदेश करण्याचा हक्क त्यांना सहजच प्राप्त होतो.

उत्कट देशभक्ती आणि स्वातंत्र्याच्या ध्येयाची निर्भय घोषणा करण्याचे धैर्य हा सावकरांच्या अल्पवयातलाच गुणविशेष ठरतो. तो त्यांच्या कॉलेजातील जीवनापासूनच दिसून येतो. पण कॉलेज सोडल्यानंतर विलायतेला जाण्याच्या उद्योगापासून त्यांच्यात, व त्यांच्या वयाच्या आणि त्यांच्याप्रमाणे विलायतेला जाणाऱ्या तरुणांत, खरा फरक दिसून येतो. विलायतेला जाऊन आय. सी. एस. ची परीक्षा पास होण्याचे ध्येय डोळ्यांपुढे ठेवणाऱ्या, बुद्धिमान तरुणांच्या, दोन पिढ्या त्यांच्यापूर्वी होऊन गेल्या होत्या. आपण विलायतेला गेलो तर आय. सी. एस. परीक्षेची तयारी करण्याला लागणारी तीव्र बुद्धिमत्ता आपल्यामध्ये नाही असे सावरकरांनी कधीही कबूल केले नसते. आणि तें ध्येयच डोळ्यांपुढे असते तर त्यांनी अवश्य ते द्रव्यसहाय्य मिळविण्याची यशस्वी खटपट केली असती. पण, त्यांना सिव्हिल सर्व्हंट होण्याकरिता विलायतेला जावयाचे नव्हते. किंवा बॅरिस्टरीची परीक्षा देण्याकरिताही जावयाचे नव्हते. तर तिकडे जाऊन हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मतप्रसाराचा एक नवा अड्डा किंवा आखाडा हिंदी तरुणांमध्ये निर्माण करावयाचा होता!

सावरकरांसंबंधाने बोलावयाचे तर, ते आय्. सी. एस्. परीक्षेचे उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून विलायतेला गेले नाहीत एवढेच त्यांचे वैशिष्टय नसून, बॅरिस्टर होण्याकरिता गेले. तेही पण बॅरिस्टर होणे हेच मुख्य उद्दिष्ट मनात न धरता गेले हाच त्यांचा विशेष होय. विलायतेच्या स्वतंत्र वातावरणाचा फायदा घेऊन, म्हणजे तेथे जीभ सैल सोडण्यात धोका नसतो या गोष्टीचा फायदा घेऊन, अद्वातद्वा बोलणारे तरुण विद्यार्थी विलायतेत किती तरी भेटतात! परंतु त्यांच्यात व सावरकरांत पुष्कळच तफावत होती. विलायतेत जीभ सैल सोडणाऱ्या पुष्कळ विद्यार्थ्यांचे मुख्य उद्दिष्ट परीक्षा पास होऊन द्रव्यप्राप्तीची तयारी करून परत येणे हे असते. इतर विलायती चैनीबरोबर ते उच्छृंखलपणे बोलण्याचीही चैन करून घेतात इतकेच काय ते! परंतु सावरकरांची गोष्ट वेगळी होती. ते इकडून गेले तेच मुळी अशा

एका धनिकाने दिलेली शिष्यवृत्ती घेऊन गेले की, जो स्वतःच यापूर्वी विलायतेत हिंदी स्वातंत्र्यवादाचा उघड पुरस्कार करू लागला होता ! हे धनिक देशभक्त म्हणजे पंडित शामजी कृष्णवर्मा होत. त्यांनी विलायतेत स्वातंत्र्यवादी तरुणांचे केन्द्र निर्मिण्याचा उपक्रम केला होता, व याविषयी त्यांनी इकडे टिळकांना जी माहिती पुरविली तिचा सुगावा लागूनच सावरकर ही शिष्यवृत्ती घेऊन विलायतेस गेले. या शिष्यवृत्तीचे नावच 'शिवाजी शिष्यवृत्ती' असे होते !

१९०५ साली शामजींनी 'इंडियन होमरूल सोसायटी' ही संस्था काढली होती. आणि त्या सोसायटीच्या काही सभासदांच्या राहण्याजेवण्याच्या व्यवस्थेसाठी 'इंडिया हाऊस' नावाचे बोर्डिंग काढले होते. पण या 'परतंत्र' संस्थेत प्रवेश केल्यावर, स्वतःचे असे जे उद्योग सावरकरांनी केले तेच त्यांचे खरे वैशिष्टय दाखवितात. कारण विलायतेस जाणाऱ्या तरुणांच्या वृत्तीचा ओघ देशकार्याकडे वळविणे ही गोष्ट सोपी नव्हती, पण त्याच गोष्टीत त्यांनी आपले लक्ष घातले. या अवधीत सावरकरांनी विलायतेत काय पाहिले व काय केले याची चांगली कल्पना येण्याला त्यांची 'लंडनची वातमीपत्रे' हा ग्रंथ फार उपयोगी पडेल. त्यांनी स्वतः केलेल्या गोष्टींप्रमाणेच इतरांनी केलेल्याही कोणत्या गोष्टीत सहकारिता केली यावरून त्यांना ध्यास कोणता लागला होता हे कळून येते. विलायतेस जाण्यापूर्वी त्यांनी स्वातंत्र्याच्या ध्येयाचा उच्चार केला होता. परदेशी कपडयांच्या होळ्या केल्या होत्या. गुप्त मंडळ्या स्थापल्या होत्या. स्वातंत्र्याचे पोवाडे रचले होते. अर्थात हिंदुस्थानच्या कोंदट राजकीय हवेतून निघून ते विलायतच्या मोकळ्या हवेत गेल्यावर, आणि तेथे अनेक देशांच्या स्वातंत्र्यवादी लोकांचा सहवास त्यांना घडल्यावर, त्यांनी ती पूर्वपरंपरा नुसती चालविली इतकेच नव्हे तर अधिक पुष्ट व सुदृढ केली यात आश्चर्य नाही.

साम्राज्यसत्तेला प्रतिकार करणे या कल्पनेला स्वातंत्र्यवादी राजकारणातली साक्षरता म्हटले तर, गांधींच्या अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या 'ओनाम्या'पासून सुरुवात करून सशस्त्र बंडाच्या प्रतिकाराच्या 'क्ष ज्ञ' या अक्षरांपर्यंत सर्व साक्षरता सावरकर तोंडाने शिकले व त्यांनी हातांनी गिरविली.

सावरकरचरित्र जो वाचील त्याच्या एक गोष्ट लक्षात येईल की, सावरकरांची राजकीय मते आज चाळीस वर्षांच्या दीर्घ काळात स्थिर आहेत. दुसऱ्या बाजूचे म्हणजे अशांच्या चंचलपणाचे, उदाहरण द्यावयाचे तर ते लाला हरदयाळ यांचे देता येईल. दोघेही देशभक्त, स्वार्थत्यागी, साहसी. तथापि दोघांच्या मनोधारणेत किती फरक ! सावरकरांविषयी बोलावयाचे तर असे म्हणता येईल की, त्यांची अंतिम ध्येये अढळ होतीच; पण ती पदरात पाडून घेताना, बाजारी व्यवहाराप्रमाणे आणाभर अरतापरता करून मध्यम क्रम स्वीकारण्याचीही तयारी त्यांना पसंत होती. तसेच राष्ट्रस्वातंत्र्यार्थ शस्त्रप्रतिकाराच्या अंतिम मार्गाचे समर्थन ते केव्हाही

साखरख्याच आग्रहाने करीत असले तरी, 'निष्कारण' व्यक्तिवध त्यांना केव्हाच मान्य नव्हता. अंदमानात बारीसाहेबांशी बोलताना ते म्हणाले 'इंग्रजांच्या कित्येक गुणांचा मी चाहता आहे... मी हत्येचा पक्षपाती आहे हे तुम्हाला कोणी सांगितले.'

गेल्या महायुद्धाच्या वेळी (१४ सप्टेंबर १९१४) सावरकरांनी अंदमानाहून हिंदुस्थान सरकारला एक आवेदनपत्र धाडले. त्यात ते म्हणतात– 'हिंदुस्थानास स्वतंत्र राष्ट्राच्या पदवीस पोचविणे हे आमचे ध्येय होते व आहेही. तथापि या ध्येयाच्या सिद्धीसाठी रक्तपाताचा, सशस्त्र प्रतिकाराचा मार्गच काय तो अवलंबन करावयाचा अशी काही आम्ही शपथ घेतलेली नाही. इतकेच नव्हे तर इतर कोणताही उपाय जर सफल होण्याचा संभव असता तर आम्ही सशस्त्र प्रतिकाराचा अवलंब केलाच नसता! जी गोष्ट साधनांची तीच साध्याची... उभ्या मानवजातीचे राजकीय सात्त्विक एकीकरण हेच ज्यांचे अंतिम ध्येय आहे त्या आम्हास त्या ध्येयाच्या सिद्धीसाठी तदनुकूल असलेल्या सर्व संस्था त्या ध्येयाकडे जाणाऱ्या मार्गावरील टप्पे म्हणून ग्राह्यच वाटतात... आज ज्यास ब्रिटिश साम्राज्य म्हटले जात आहे त्यात अंतर्भुत असणाऱ्या हिंदुस्थानादी देशास जर स्वत्वप्रकृतीप्रमाण आणि तत्तत्परिस्थितीप्रमाण स्वातंत्र्य उपभोगू देण्यात येईल, तर, आम्ही त्या साम्राज्याशी एकनिष्ठ राहणे हेच आमचे कर्तव्य समजू. अशा रीतीने आयर्लंडपासून हिंदुस्थानपर्यंत सर्व देशांस एकसूत्रीपणात गोवण्याचे कार्य करणारे ते साम्राज्य 'ब्रिटिश साम्राज्य' हे नावदेखील त्याज्यच मानील– इतर नाव प्राप्त होईतो त्यास 'आर्य साम्राज्य' असे पाहिजे तर म्हणावे.

'ह्या साम्राज्याच्या प्रस्तुत चालकांच्या अंगात जर तसे सात्त्विक साहस करणारे धैर्य असेल तर तदंतर्गत असलेल्या हिंदुस्थानच्या विस्तृत आणि प्रमुख राष्ट्रास तरी त्यांनी ते स्वातंत्र्य उपभोगिता येईल असे अधिकार त्वरित देऊन टाकले पाहिजेत. युद्धाच्या धांदलीत इतर काही करता न आले तरी औपनिवेशिक स्वायत्तता (Colonial self Government) जर हिंदुस्थानास देण्यात येईल आणि वरिष्ठ विधीमंडळात हिंदी प्रतिनिधींचे निरपवाद बहुमत स्थापित करण्यात येईल तर आम्ही आमच्या मताचे क्रांतिकारक आपला पूर्वीचा सशस्त्र प्रतिकाराचा मार्ग स्थगित करून या युद्धात इंग्लंडचा पक्ष मनःपूर्वक एकनिष्ठेने अवलंबितील.

'आमचे हे विधान मनःपूर्वक आहे की नाही हे सिद्ध करून दाखविण्याची संधी आम्हास देण्यासाठी आणि इंग्लंड खरोखरच हिंदुस्थानच्या दास्यशृंखला तोडण्यास इच्छित आहे याविषयी हिंदी लोकांच्या मनात विश्वास उत्पन्न करण्यासाठी सरकारने प्रथमतः आम्हा राजबंदिवानांसही त्वरित मुक्त केले पाहिजे. आम्ही असे वचन देतो की, जर आम्हास यावेळी मुक्त करण्यात येईल तर आम्ही हिंदुस्थानवर स्वारी करून येण्याची शक्य ती खटपट करणाऱ्या अफगाणतुर्कादित आशियातील विदेशी मुसलमानी टोळधाडीपासून, स्वदेशाचे संरक्षण करण्यासाठी सैन्यात भरती

होऊन हिंदुस्थानच्या सीमासमरावर किंवा इतर तदनुषंगिक अशा कोणत्याही रण-क्षेत्रात जाण्यास कचरणार नाही.'

अंदमानाच्या बंदिवासातून सुटका करून घेण्याकरता सरकारला लालूच दाखवावी म्हणून हे नेमस्तपणाचे धोरण सावरकरांनी स्वीकारले होते, असे म्हणणाराला उत्तर हेच की, आज ते पूर्ण स्वतंत्र असताही आजच्या महायुद्धात वरील धोरणच त्यांनी स्वीकारले आहे आणि सैन्यभरतीचा उपदेश हिंदी तरुणांना ते करीत आहेत. त्या काली सावरकर सैन्यभरतीला तयार होते ते शत्रुपक्षात मुसलमान (तुर्कअफगाण) होते म्हणून त्यांच्याशी असणाऱ्या वैरबुद्धीने, असेही कोणाला म्हणता येणार नाही. कारण आज शत्रुपक्षात सरहद्दीपलीकडची मुसलमान राष्ट्रे नाहीत असे असता ते सैन्यभरतीचा तोच उपदेश करीत आहेत. तसेच त्या उपदेशाचे कारण ते आज इंग्रजांचे विशेष मित्र आहेत असे नव्हे, तर युद्धाच्या निमित्ताने आपल्या हिंदी तरुण देशबांधवांना युद्धकर्माचा, क्षात्रकर्माचा, परिचय होण्याची ती एक संधी आहे, व पुढे कधी काळी प्रसंग गाठी पडलाच तर या परिचयाचा उपयोग होईल, म्हणून. मला वाटते १९२९ सालपर्यंत राष्ट्रीय सभेने जे ध्येय, सामोपचारार्थ म्हणून सरकारशी स्वीकारले होते तेच आजही स्वीकारण्यास सावरकर तयार होतील. कारण कर्जफेडीला हप्तेबंदी होऊ शकते, व कर्जफेडीची सर्व रक्कम ऋणको पदरात रोख घेऊन आला असता त्याला थोडी सूटदेखील मिळू शकते हे सावरकर जाणतात. मात्र 'हे माझ्या परम प्रिय मित्रा व्हॉइसराया, मी बंड करण्यास निघालो आहे' असल्या लोचट मित्र–शत्रुत्वाच्या हास्यास्पद मिश्रणाचे प्रदर्शन त्यांनी कधी केले नसते.

सावरकरांच्या तरुणपणच्या उद्योगासंबंधाने बोलायचे तर, अनुभवी जगाने मानलेला असा एक सिद्धांत त्यांनाही लागू पडतो तो हा की, माणसाच्या जातिवंत प्रवृत्तीला कोंब फुटावयाचा तो वयाच्या पहिल्या पंचविशीतच फुटतो. 'मिशा व मते एकदमच फुटतात' असे सुभाषित गडकरी यांनी रचलेले प्रसिद्ध आहे. या मतांमध्ये सुविचारी, कुविचारी, अविचारी असे तीनही प्रकार असतातच. म्हणून या पंचविशीला गद्धे पंचविशी असे एक 'प्रेमळ विनोदी' नाव मिळाले आहे. कारण गाढवपणा हा केवळ असत् प्रवृत्तीतच असतो असे नाही तर आपल्या सत्प्रवृत्तीचा अविचारी अतिरेक झाल्यास तोही 'गाढवपणा'च ठरतो की! आणि तो शब्द प्रांजलपणाने स्वतःला लावून घेणारे उमदे लोकही आढळतात! पण गैरसमज करणारा हा कटू निंदात्मक शब्द वर्ज्य ठरवून मी 'गद्धेपंचविशी' ऐवजी 'दिव्य पंचविशी' असा नवा शब्द बनवू इच्छितो. असला म्हणजे चांगल्या प्रकारचा बेछूटपणा दिव्य पंचविशीत करणारे व केलेले देशभक्त प्रत्येक तेजस्वी राष्ट्रात होऊन गेले आहेत. आणि सावरकर हे त्यातच एक जमा धरावे लागतात. मला तर वाटते की, आपल्या पहिल्या पंचविशीत सावरकरांनी विलायतेतल्या मुक्कामात देश-

भक्तीच्या जितक्या गोष्टी केल्या तितक्या करणाऱ्या हिंदी तरुणांची उदाहरणे फारच थोडी सापडतील आणि हेच सावरकरांचे असामान्यत्व असे म्हणता येईल. सावरकर विलायतेला गेले तेव्हा ते अवघे बावीस वर्षांचे होते. आणि ते कैदेत कायमचे पडले तेव्हा सत्तावीस वर्षांचे होते. या वयात विलायतेला जाणारे हिंदी तरुण सामान्यतः कसे असतात, कसे वागतात, याची कल्पना करता येईलच. मोहनदास गांधी यांनी आत्मचरित्रात ('माझे सत्याचे प्रयोग' या पुस्तकात) असे लिहिले आहे की, 'मला विलायतेत गेल्यावर प्रारंभी इंग्रजी पद्धतीचे नृत्य-गायन इत्यादी विषयाचे पाठ घेणे शिष्टाचारपालनाच्या दृष्टीने अवश्य वाटले.' पशुपति अय्यर यांसारख्या तरुणांना विलायतेत गेल्यावर 'आपण हिंदू जन्मलो ही चूक केली' असे वाटू लागले. (पृ. १९२). काही तरुणांनी हेरगिरीची सरकारी सेवा करून पैसे मिळविले. खाण्यापिण्याची चैन करणे हे तर सांगायलाच नको. चांगले उदाहरण घेतले तरी 'आपला अभ्यास बरा की आपण बरे यापलीकडे काही नाही!' पण विलायतेस प्रथम निघतानाच देशभक्तीप्रेरित ध्येय मनात धरून निघणारे, शिवाय विलायतेत भेटणाऱ्या समवयस्क तरुणांना देशभक्तीच्या मार्गाकडे वळविण्याची आकांक्षा व उमेद धरून निघणारे, आणि प्रत्यक्ष विलायतेत गेल्यावर त्याकरिताच सर्व प्रकारचे उद्योग करणारे हिंदी तरुण किती सापडतील! सावरकरांनी वेळात वेळ काढून, अभ्यास करून, बॅरिस्टरीची परीक्षा तर दिलीच, पण ते कार्य जसे काही गौण व देशभक्ती-संघटनाचे कार्य हेच मुख्य असे मनात धरून ते वागले हे उघडच दिसते.

१९०५ ते १९०९ सालच्या पुढे परवापर्यंत त्यांचे सर्व आयुष्य कारागृहात गेले किंवा कारागृहाबाहेर पण वस्तुतः सरकारी बंदीत बंधनात गेले, यामुळे स्वतंत्रपणे राजकीय अशी कोणतीच चळवळ सावरकरांना करता आली नाही. आणि त्यांची बंधमुक्तता झाल्यावर ते काँग्रेसला किंवा एकाद्या क्रांतिकारक संघाला न मिळता टिळकांच्या प्रतिसहकारी राष्ट्रीय पक्षाला मिळाले, व हिंदुत्वरक्षणासाठी हिंदुमहासभेचे पुढारीपण त्यांनी हाती घेतले. यावरून सावरकरांना आज तरी कशा प्रकारचा विधायक मतप्रसार करावयाचा आहे हे उघड दिसून येते. मात्र १९०५ ते १९०९ या काळात आपण जे केले त्याबद्दल त्यांना पश्चात्ताप तर वाटत नाहीच, इतकेच काय पण त्या वेळच्या ज्या कित्येक गोष्टी प्रसिद्ध झाल्या नव्हत्या त्याही ते आज प्रकट सभांतून उघडपणे सांगतात. व त्या वेळच्या धोरणाबद्दल यथार्थ अभिमानही बाळगतात. तथापि, काही काही गोष्टी मनुष्याच्या आयुष्यात एकेकदाच घडून येतात; त्या तो सतत करू शकत नाही व इच्छितही नाही. तथापि एखाद्या नामांकित मनुष्यासंबंधाने ज्याला केवळ गत गोष्टी किंवा निव्वळ इतिहास याहून अधिक म्हणता येणार नाही अशा हकीगती स्मरणात असतात, म्हणून त्याचे चरित्र लिहिण्याचा प्रसंग आला असता त्या अवश्य लिहाव्या लागतात. 'मी आपल्या

हाताने पार्लमेन्टवर बाँब फेकण्याला निघालो होतो' असे सेनापती बापटांनी पुण्यात एका सभेत सांगितल्याचे पुष्कळांनी ऐकले असेल. आणि त्यांच्या त्यावेळच्या धोरणाला राजकीय गुन्ह्याचे जे स्वरूप असेल त्याबद्दल त्यांनी प्रायश्चित्तही भोगले आहे. पण राजकीय गुन्ह्याचे स्वरूपच असे असते की शिक्षा भोगल्याने त्याची निष्कृती होते. त्या अशा अपराधांचा डाग अपराध्याच्या अंगाला कायमचा चिकटवून ठेवू असे स्वतः सरकारलाही म्हणता येत नाही ! म्हणूनच सावरकरांना बंधमुक्त करणारे मुंबईचे मंत्रिमंडळ (ना. कूपर–जमनादास मेथा), व त्या मंत्रिमंडळाने बंधमुक्त केलेले सावरकर, हे गोखले हॉलमध्ये भरलेल्या बंधमुक्ततेनंतरच्या पहिल्याच सभेत मांडीला मांडी लावून बसलेले लोकांना दिसले! पण अशी अनेक उदाहरणे जगाच्या इतर इतिहासातील दाखविता येतात. सावरकरांनी पिस्तुले इकडे रवाना केली असतील किंवा पिस्तुल चालविणाऱ्या धिंग्राचे उघड समर्थन केले असेल. पण स्वतः त्यांनी कोणावरही पिस्तुल चालविले नाही. आज इंग्रज साम्राज्याच्या सैन्यात फील्ड मार्शल व युद्ध मंडळाचे एक सभासद असणारे जनरल स्मटस् हे बोअर युद्धात (१९००चा सुमार– सावरकरांआधी पाच सात वर्षे) हातात बंदूक घेऊन इंग्रजांविरुद्ध लढत होते व त्यांनी बंदुकीने कैक इंग्रज सैनिकांचा प्रत्यक्ष वध केला असेल. आयर्लंडचा इतिहास घेतला तर असे दाखले किती तरी सापडतील. ज्या आयरिश हातांनी पिस्तुल झाडले त्याच हातांशी इंग्रज मुख्य प्रधानाने हस्तांदोलन करून मैत्रीचा तह ठरविला असेही घडले आहे. ज्याला फाशीची शिक्षा झाली पण अमलात आणायची राहिली असा एक डी व्हॅलेरा आज आयरिश रिपब्लिकचा अध्यक्ष आहे. दुसरा असाच एक सर चार्ल्स गॅव्हन डफी हा साम्राज्यांतर्गत ऑस्ट्रेलियन वसाहतीचा मुख्य प्रधान झाला. तात्पर्य, गत व वर्तमान यांमध्ये अवश्य तो भेद करणे हेच शहाणपणाचे लक्षण होय. आणि सावरकर चरित्रातील एक दोन पूर्व प्रकरणांकडे लोकांप्रमाणे सरकारनेही इतिहास या नात्यानेच पाहिले पाहिजे. मी तर असे म्हणू शकेन की, न्यायमूर्ती रौलेट यांनी लिहिलेल्या सेडिशन (राजद्रोह) कमिटीच्या रिपोर्टाची एक प्रकारची पुरवणीच या सावरकर चरित्राला मानता येईल. राजद्रोही, अर्थात देशभक्त, हिंदी लोकांनी तळमळीने काय काय तीव्र स्वरूपाच्या चळवळी केल्या हे तपशीलवार नमूद करण्यात रौलेट रिपोर्टाचा जितका सत्यनिर्देशक उद्देश मानता येईल तितकाच, सावरकर-चरित्रातली ती ती प्रकरणे तपशीलवार लिहिण्यात करंदीकर यांचाही मानला पाहिजे. झाले ते काल होऊन गेले, वेळ पडेल तर उद्याही कदाचित होईल, पण आज तरी खास नाही, असाच अशा लिखाणाचा अन्वयार्थ लावावा लागतो. म्हणून मी म्हणतो की, करंदीकरकृत सावरकर–चरित्र ग्रंथ हा इतिहास ग्रंथांत जमा आहे. मतप्रचारक ग्रंथांत तो जमा नाही.

'करंदीकरकृत सावरकर–चरित्र' हा ग्रंथ केवळ इतिहासवजा आहे. तो कोण-

त्याही रीतीने मतप्रचारक, मतप्रसारक ग्रंथ मानता येत नाही. इतिहास म्हणजे केवळ पूर्वी एक वेळ होऊन गेलेल्या गोष्टी. सावरकरानी १९०५ पासून १९०९ पर्यंत केलेल्या अनेकांगी राजकीय चळवळींची माहिती या ग्रंथात दिली आहे हे खरे. पण त्या वेळची सर्वच मते स्वत: सावरकरही आज जनतेत पसरवीत नाहीत किंवा पसरवू इच्छित नाहीत. सुदैवाने आज सावरकर विद्यमान असून, ते कोणती विशेष मते मान्य करितात किंवा कोणत्या विशेष मतांचा प्रसार करू इच्छितात, हे जगाच्या वेशीर टांगण्याइतके प्रगट व प्रसिद्ध आहे. आज सावरकर गुप्त मंडळ्या बनवीत नाहीत. युरोपातून हिंदुस्थानात शस्त्रास्त्रे ( पिस्तुले ) आणवीत नाहीत. कोणाच्याही वैयक्तिक वधाचे समर्थन करीत नाहीत. सैन्यात इंग्रज सरकाराविरुद्ध फितवाफितवी किंवा बंडाची उठावणी करीत नाहीत. उलट, आज इंग्रजांचे अधिराज्य असता, ते तूर्त क्षणापुरते मान्य करून जर्मनी व जपान या इंग्रजांच्या शत्रूविरुद्ध लढण्याकरिता, इंग्रज मुख्याधिकारी असलेल्या लष्करात शिरण्याविषयी ते हिंदी तरुणांना उपदेश करीत आहेत. वरिष्ठ लष्करी अधिकाराच्या जागा द्याल तरच सैन्यभरतीला सहाय्य करू अशी, म्हणजे पूर्वीच्या महायुद्धाच्या वेळी टिळकांनी घातली तशी अटही ते घालीत नाहीत ! व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळात हिंदुत्वनिष्ठ का होईनात पण हिंदी सभासद बसावे, आणि राज्यकारभाराचा गाडा हाकण्यास त्यांनी सहाय्य करावे, असा विधायक शांततावादी प्रयत्न ते करितात. असहकारितेची चळवळ युद्धकाली करून सरकारला युद्धप्रयत्नात अडथळा करणे गैर आहे या मताचे ते निदान आज आहेत. किंबहुना कॉंग्रेसने उभारलेल्या चळवळीचा ते प्रसिद्धपणे निषेध करितात. हिंदुस्थानात न्यायाच्या पद्धतीवर सर्व वर्गांना योग्य ते स्थान राहून लोकशाही मिळविण्याच्या कामी इंग्रज साम्राज्यशाहीचे सहाय्य मिळाले तर स्वीकारण्याला ते तयार आहेत. या सर्व गोष्टींवरून १९०५ ते १९०९ या कालावधीतले सावरकर कालमानाप्रमाणे वेगळे होते, आज ते तसे नाहीत, मात्र उद्या या देशात राजकीय घटनापरिस्थिती काय होईल हे आज नक्की कोणालाही सांगता येत नाही, आणि स्वत: सावरकरांनाही त्याचा कयास आज बांधता येत नाही, यामुळे भविष्यकाळी सावरकर कोणते धोरण व साधनमार्ग स्वीकारतील, याविषयी सर्वस्वी मतस्वातंत्र्य राखून ठेवूनच आज योग्य ते, ते करीत आहेत इतकेच म्हणता येईल.

हे आजचे त्यांचे चरित्र सामान्य वाटले तरी बॅरिस्टरीची परीक्षा उत्तीर्ण होण्यापर्यंतचा काळ ही सावरकरांची विद्यार्थीदशा म्हणता येईल व या अवधीत त्यांनी ज्या गोष्टी केल्या त्या मात्र असामान्य होत. त्या अशा आहेत :

देशभक्तिभावनेने कवित्व केले. शिक्षकाविरुद्ध स्वाभिमान प्रकट केला. स्वदेशीचा उपदेश केला. बहिष्कारप्रदर्शनार्थ परदेशी कापडाच्या होळ्या केल्या. स्वातंत्र्याच्या ध्येयाचा उघड पुरस्कार केला. कायद्याची भीती मनात बाळगली नाही. बरोबरीच्या

विद्यार्थ्यांना आपल्याच दिशेने विचार करावयास लावून त्यांना आपले अनुयायी व सांप्रदायी बनविले. ज्यांची स्वातंत्र्यवादी मते आधीच कळून आली होती अशांची शिष्यवृत्ती मिळविण्याची खटपट केली. विलायतेत गेल्यावर उघडपणे त्यांचाच आश्रय व संगत केली. विलायती लोकांपुढे वक्तृत्वपूर्ण व्याख्याने देऊन स्वातंत्र्यवाद प्रतिपादिला. आपले राहते ठिकाण हे जहाल स्वरुपाच्या उद्योगांचे केन्द्र बनविले. युरोपच्या इतिहासातील राज्यक्रांतिकारक चळवळींचा अभ्यास केला व पुरस्कारार्थ लेख लिहिले. मॅझिनीचे चरित्र लिहून अंतिम स्वरूपाचा राष्ट्र-स्वातंत्र्यवाद प्रतिपादिला. हिंदुस्थानातील १८५७ सालच्या बंडाचा नवा अर्थ करून सांगितला व त्यावरील माहिती मिळवून मराठी व इंग्रजी ग्रंथ लिहिले. विलायती छापखानेवाले छापण्यास धजेनात असे लेख व ग्रंथ युरोपातील इतर देशांत छापविले. आक्षिप्त ठरलेले व जप्त झालेले वाङमय अनेक युक्तिप्रयुक्तीने विलायतेत व हिंदुस्थानात प्रसृत केले. प्रत्यक्ष खुनी मनुष्यांशी जाहीर रीतीने सहानुभूती प्रकट केली. सहज विकत मिळणारी हत्यारे कधीकाळी उपयोगी पडतील, पण आज निदान त्यांचा परिचय असावा, अशा हेतूने पॅरिसमध्ये मिळविलेली पिस्तुले गुप्त रीतीने हिंदुस्थानात आपल्या स्नेह्यासवंगड्यांकरिता पाठविण्यात धाडसी वृत्ती-प्रमाणे बुद्धिचातुर्यही दाखविले. शेवटी सरकारचे धरणे आले व खटला झाला तेव्हा किंचितही भीती दर्शविली नाही. खेद दाखविला नाही. पश्चात्ताप प्रकट केला नाही. अशा संकटांकडे राष्ट्रीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने समाधानी वृत्तीने कसे पाहता येते हे तरुणांना शिकविले. तुरुंगवासातील हालअपेष्टा सोसण्याची तयारी दाखविली. जिवावर उदार होऊन कातडी सोलली जाण्याचा धोका पत्करून मार्सेलिस बंदरात जहाजाच्या बारीकशा भोकातून समुद्रात उडी टाकली; आणि आपल्या संकटांतून युरोपच्या राजकारणात आंतरराष्ट्रीय कायदेशीर हक्कांचे वादळ कसे उठविता येईल याविषयी कल्पना चालवून कायदा व राजकारण या विषयातील प्रौढ बुद्धिमत्ता प्रकट केली. तात्पर्य, वयाच्या विशी-सत्ताविशीत असे देशभक्ति-प्रेरित उद्योग आजवर किती हिंदी तरुणांनी केल्याचे दाखविता येईल? आणि विशेष गोष्ट ही की, या सर्व उद्योगांत सावरकर हे इतरांचे अनुयायी नसून पुढारी-पणाने वावरत होते, त्यांच्या संगतीत आलेली इतर प्रांतांतील तरुण मुले त्यांचे पुढारीपण मान्य करीत होती आणि त्यांच्यासंबंधी नुसती आदरबुद्धी नव्हे तर प्रेमाचा जिव्हाळा प्रकट करीत होती असेच दिसून येते. जॅक्सनचा खून न होता सावरकर हिंदुस्थानात सुखरूप परत येते, व त्यांना बॅरिस्टरी-वकिली करण्याची परवानगी मिळती, तर त्यांचे पुढील चरित्र काय झाले असते असा प्रश्न एकाद्याला सहज सुचणारा आहे. पण त्याची उत्तरे अनेक होतील व त्यांना केवळ मनाच्या कल्पना याखेरीज अधिक महत्त्व देता येत नाही. परंतु मला वाटते की, हिंदुस्थानात आल्यावर प्रथम धोका उत्पन्न झाला असता, म्हणून लोकमान्य टिळकांचे उदाहरण

डोळ्यापुढे ठेवून मर्यादा सांभाळीत प्रगतीपर मार्ग कसा काढावा या मार्गाचे संशोधन त्यांनी करून पाहिले असते, पण ते त्यांना न साधता त्यांच्यावर राजद्रोहाचे खटले होऊन पं. जवाहरलालप्रमाणे त्यांना वारंवार तुरुंगात जावे लागले असते. तथापि आज प्रत्यक्ष बंड करण्याची कल्पना किती अव्यवहार्य आहे हे लक्षात आल्याने, त्यांनी बोलण्यात शिवरामपंत परांजप्यांची भाषा व प्रत्यक्ष कृतीत टिळकांचे मुत्सद्दीपणाचे धोरण यांचा मेळ चातुर्याने घातला असता. कारण आज तीव्र भावना बोलून दाखवितानाही ते असे सयुक्तिक बोलतात की, थंड डोक्याच्या नामदार शास्त्री यांच्यासारख्या चिकित्सकालाही त्यात आक्षेपाची काडीही शिरकविता येत नाही.

प्रस्तुत सावरकर-चरित्र मतप्रसाराचा ग्रंथ नाही, तर केवळ इतिहास आहे हे वर दर्शविले आहेच. आणि हा ग्रंथ इतिहासाच्या दृष्टीने वाचणाराच्या मनात, तो बहुश्रुत असेल तर, जगाचा इतिहास त्याच्या डोळ्यांपुढे उभा राहिल्याशिवाय राहणार नाही. तो हेच सांगेल की, ज्या ज्या देशात पूर्वी परकीय अधिकाऱ्यांविरुद्ध बंडे झाली, किंवा स्वदेशीच पण एकतंत्री राजसत्ता नाहीशा होऊन राज्यक्रांत्या झाल्या, त्यातील देशभक्तवृत्तीच्या तरुणांनी सावरकरांसारखेच उद्योग केले. त्यातले काही स्वदेशातच राहून करता आले ते केले व काही हद्दपार झालेल्या स्थितीत परदेशीही केले. खुद्द लंडन किंवा न्यूयॉर्क घेतले तर, त्या शहरी अशा निर्वासित तरुण देशभक्तांनी इंग्रज व अमेरिकन सहानुभूतीच्या पंखाखाली राहून स्वदेशस्वातंत्र्याचे उद्योग कसे केले हे पाहिले म्हणजे सावरकरांनी जगाचीच एक रीत अनुसरली, पण स्वदेशातील इतर तरुणांच्या दृष्टीने मात्र असामान्य व अद्भुत असेच काही केले, असे म्हणावे लागते. मित्रराष्ट्रांनी परस्परांच्या बंडखोरांना आश्रय द्यावा की देऊ नये या प्रश्नाचे उत्तर आंतरराष्ट्रीय कायदा जो देतो, त्याच्याविरुद्ध उत्तर मनुष्यस्वभाव देतो. या स्वभावाला अनुसरून लंडन शहराने पूर्वकाळी इतर सर्व देशांच्या बंडखोरांना निवारा व आश्रय दिला. आणि या गोष्टीचा इंग्रज व अमेरिकन लोक मोठा अभिमानही बाळगतात. लंडनने मॅझिनी, गॅरिबाल्डी, लुई कोसूथ, ब्लँक अशा परदेशी बंडवाल्यांनाच काय पण पळपुट्या अशा राजांनाही आश्रय दिला आणि त्या मानसिक औदार्याचे भूषण मानले! न्यूयॉर्क शहरात एकाच वेळी निर्वासित देशभक्त गॅरिबाल्डी हा मेणबत्त्या करीत होता; लेड्र रॉलिन हा बंदरावर हमाली करी; लुई ब्लँक हा नृत्याचे धडे देई; फेलिक्स पिअॅट हा नाटकाचे पडदे उचलून उदरनिर्वाह करी; ला मार्टिन हा भिक्षा मागे. एक फ्रेंच तरुण रस्त्यातून भाजी विकी आणि एका जर्मन देशभक्ताने शेव्हिंग सलून-न्हाव्याचे दुकान काढले होते. पण लंडन हे मुंबईप्रमाणे ब्रिटिश साम्राज्यातच असल्यामुळे तेथे सावरकर, पंडित शामजी, कामाबाई अशांना थारा-निवारा कसा मिळणार? म्हणून त्यांना तो पॅरिसमध्ये फ्रेंच लोकांकडून मिळवावा लागला, आणि अशी

कल्पना करता येते की, हिंदुस्थानला परत येणे अशक्य झाल्यामुळे कदाचित् सावरकर हेही पॅरिसमध्ये राहून क्रांतिकारक उद्योग करीत जन्म घालविते! कारण, स्वदेशी परत येऊन फासावर लटकणे किंवा जन्मभर तुरुंगवास पत्करणे यापेक्षा देशकार्यार्थ खुषीची हद्दपारी स्वीकारलेली काय वाईट? असे तारतम्य पटणे शक्य आहे. मला आठवते की, मी मध्यवर्ती विधिमंडळात असता अशा काही निर्वासितांतर्फे होममेंबरकडे खासगी विचारणा केली, व म्हणालो की, 'या लोकांना जर स्वदेशी परत यावयाचे आहे तर त्यांना पासपोर्ट मिळण्याला सरकारने हरकत का घ्यावी? ते इकडे आल्यावर त्यांच्या तशा चळवळींना सहजच मर्यादा व बंधन पडेल.' पण होममेंबर गंभीर स्वराने मला म्हणाले, 'केळकर, तुम्ही या भानगडीत न पडाल तर बरे! कारण तुम्ही ज्यांना पासपोर्ट मिळावे असे इच्छिता त्यातले काही सरकारचे मोठे गुन्हेगार असून, ते हिंदुस्थानात आले तर त्यांना जन्मभर तुरुंगवास किंवा फाशीची शिक्षा भोगावी लागेल. मग ते आज आहेत तेथेच ठीक आहेत की!' यावर मी त्यांना प्रथम हद्दपार झालेल्या पण शेवटी परत स्वदेशी येण्यास सापडलेल्या काही युरोपियन तरुण देशभक्तांची उदाहरणे सांगितली. त्यावर ते म्हणाले, 'होय. असेही घडू शकते, पण येथे ती वेळ अजून यावयाची आहे.' आणि स्वत: सावरकरांच्या उदाहरणाने हे आता दिसलेच की! सर्व जन्म बंदीवासात जाईल, व कदाचित तुरुंगातच मृत्यू येईल अशी निराशाजनक मन:स्थिती असताही, सावरकर हे सर्व तऱ्हेचे बंदिवास भोगून निभावून परत आले, मोकळे झाले, व आज उघड व उजळ माथ्याने देशातील एका प्रमुख पक्षाचे पुढारी म्हणून ते विधायक राजकारण करीत आहेत! आजचे सावरकर डोळ्यांपुढे दिसणाऱ्या एखाद्या अजाण मनुष्याला सावरकरांचे पूर्वचरित्र सांगितले तर त्याचा कदाचित विश्वासही बसणार नाही. परंतु आज सामान्य दिसणाऱ्या सावरकरांनी, असामान्य हा शेरा लिहावा लागण्यासारख्याच गोष्टी, पूर्वचरित्रात केल्या आहेत. आणि म्हणूनच कोणी एकाद्या प्रसंगी विवेकबुद्धीने त्यांना 'देशभक्त' व 'स्वातंत्र्यवीर' हे विशेषण लावले तर ते मात्र सार्थ व समर्थनीय होईल, असे मी निश्चयाने म्हणतो.

सावरकरांच्या एकसष्टाव्या वाढदिवसाचे एक दोन समारंभ पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणी होतील व ते हजारो लोक पाहतील. पण करंदीकरांनी लिहिलेले हे सावरकर-चरित्र जो वाचील त्याला, त्याच्या नुसत्या वाचनानेच, आपण त्या तशा एखाद्या समारंभातील आनंदापेक्षा अधिक आनंद सेवन करीत आहो, असे वाटल्याशिवाय राहणार नाही. कारण मी प्रारंभी सांगितल्याप्रमाणे, पानामागून पान वाचताना, सावरकरांचे वैशिष्टच काय हे त्याला या पुस्तकामुळे साधार प्रतीत होत जाईल. काही विशिष्ट प्रकारची मान्यता पावलेल्या लोकांच्या एकसष्टीचा समारंभ करून ती मान्यता व्यक्त करणे व त्यांना आयुरारोग्य चिंतणे ही गोष्ट आता नित्यक्रमाची होऊन बसलेली आहे व ती सर्वथा योग्यही आहे. कारण आप-

णाला कोण किती, कसे, कशाकरिता मान देतात हे म्हातारपणी मनुष्याला कळणे हे समाधान देणारेच आहे ! तथापि इतर अनेक एकसष्टी व सावरकरांची एकसष्टी यांत फार मोठा फरक आहे असे मी तरी मानतो. कारण सावरकरांना वयाच्या एकसष्टाव्या वर्षापर्यंत आयुष्य लाभणे ही गोष्ट त्यांची त्यांना, व त्यांचे चरित्र माहीत असणाऱ्या इतरांना, केवळ कल्पनातीत होय असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. हे जे आयुष्य त्यांना लाभले ते मृत्यूला चुकवून, फसवून, बगल देऊन लाभले असे नसून, मृत्यूला सामोरे होऊन, धडक देऊन, झुंज घेऊन, मागे हटवून मिळविलेले आहे. अकल्पित रीतीने मृत्यूचा घाला पडणे हे निराळे. आणि आपल्या जाणत्या कृत्यांचा परिणाम म्हणून तो येण्याचा संभव दिसत असता, आपण अंगीकारलेले देशसेवेचे व्रत न सोडता, वज्रमुष्टीच्या खेळातल्याप्रमाणे, मृत्यूशी हात करीत राहणे व त्यावर विजय मिळविणे हे निराळे.

१९०५ पासून १९२० पर्यंत सावरकर व मृत्यू हे केव्हाही समोरासमोर ठाकून उभे नव्हते असे झाले नाही. इंग्लंडात, मार्सेलिसच्या बंदरात, अंदमानाच्या कारागृहात त्या दोघांचा डोळा एकमेकांवर भिडून राहिलेला होता. लो. टिळक हे एरवी तापट असता तुरुंगातील त्यांची वागणूक नेहमी शिस्त व कायदा सांभाळणारी शांतताप्रधान, व केवळ स्थितप्रज्ञासारखी होती असे सांगत. यामुळे आकस्मिक रीतीने त्यांना मृत्यू येईल अशी भीती त्यांच्या मित्रांना कधी वाटली नाही. शिवाय १९०८ ते १९१४ या अवधीत तरी टिळकांचे बंदिवासी जीवन अंदमानातील बंदिवासी जीवनासारखे सश्रम व भयंकर नव्हते. लोक आपल्या ठिकाणी टिळकांच्या तुरुंगवासाची वर्षे मोजीत होते, पण ती गणना निश्चित संपणार व टिळक परत येणार असा एक प्रकारचा विश्वास जनतेला धीरावीत होता. दुर्दैवाने सावरकरांच्या वाट्याला त्याहीपेक्षा खडतर तपश्चर्या आली खरी. आधी विलायतेतल्या उच्छृंखल चळवळीतही कदाचित त्यांना मृत्यू यावयाचा. मार्सेलिसच्या बंदरात पोहत असता सावरकरांवर झाडल्या गेलेल्या गोळ्या हे तितके अपमृत्यूच नव्हते काय ? आणि अंदमानातील बंदिवासाची रोमांचकारक व दुःखद कहाणी वाचीत असता तर सावरकर हे दुःसह शरीरकष्टाने–आजाराने, सरकारी पहारेवाल्या पठाणांच्या किंवा गोऱ्या बारी साहेबाच्या चाबकाच्या आघातांनी कसे मरण पावले नाहीत याचेच आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही, एवढेच काय, पण मृत्यूने दुर्लक्ष केले असता, स्वतःच आत्महत्या करण्याचे विचार सावरकरांच्या मनात एक दोनदा येऊन गेले होते असे तेच लिहितात. बरे शिक्षेची मुदत तरी किती ! अनेक अपराधांची संकलित शिक्षा म्हणून पन्नास वर्षांचे काळेपाणी, म्हणजे ती पुरी भोगण्याला सावरकरांना एक जन्मही पुरावयाचा नाही ! बंदिवासातील त्यांची वागणूकही नमते न घेणारी पूर्ण स्वाभिमानी ! उत्तरास प्रत्युत्तर देऊन आत्मसमर्थन करण्याला ते तयार; सोबत्या बंदिवानांची कड घेण्याला व त्याकरिता पहारेवाल्यांशी भांडण्याला

ते तयार; संप करण्या-करविण्याला ते तयार; काटेरी पिंजऱ्यातला पक्षी पिंजऱ्याला धडक देणाऱ्या स्वभावाचा भेटला तर त्याचे अंग नित्य किती रक्तबंबाळ होऊ शकेल याची कल्पना तुम्हाआम्हाला करिता येतेच की नाही ! तात्पर्य या सर्व प्रतिकूल गोष्टी लक्षात घेतल्या तर सावरकरांना साठ वर्षे कशी पुरी करता आली याचे नवल वाटल्याशिवाय राहत नाही.

१९३२ साली माझ्या एकसष्टीचा समारंभ झाला त्याला टाईपरायटरवरील घंटेची उपमा मी दिली होती. ती माझ्या जीवनक्रमाला योग्य अशीच होती. कारण स्वतंत्र जीवन भोगीत असता, मी शक्य तितके नित्य नियम, स्वकर्म व्यवस्थितपणे करीत होतो. टाईपरायटरवरच्या ओळीच्या टोकांपर्यंत सरळ बिनधोक पोचलो होतो. म्हणून जीवनाच्या टाईपरायटरवरील माझ्या उद्योगी श्रमशोशिक पण सुखी व आनंदी जीवनाशी सुरेल असाच ध्वनी तिजवरील घंटा काढीत आहे, फार तर पुढील थोड्या आयुष्याविषयी सावधगिरीची सूचना देत आहे, अशी उपमा मला सुचली. पण सावरकरांच्या एकसष्टीच्या समारंभाला मला निराळीच उपमा सुचते ती अशी :

'परकीय सत्तेचा पाडाव करण्याच्या मोहिमेवर अनेक तरुण समानशील देशभक्त अरण्यातून वाट चालत निघाले आहेत. त्यातील काही सत्त्वस्थ व्यक्ती नाकासमोर पाहून मार्ग आक्रमीत आहेत. काही बाजूच्या झाडांवर फळे फुले दिसतात त्यांच्या लोभाने थांबताहेत, व ती काढून घेतल्यावर फुलांचा सुगंध घेत घेत व फळे खात खात, मात्र किंचित गती वाढवून, पुढे गेलेल्यांना जाऊन मिळत आहेत. काहीजण अधिक परोपकारी, ते हातातील छडीकाठीने वाटेवरील काटेरी झाडे-झुडपे झोडीत मागून येणारांना सुखाची वाट करून देत आहेत. पण त्यातला एक सैनिक शिकारीचा शौकीन असल्यामुळे स्वच्छंदी वृत्तीने एका गुहेच्या तोंडात शिरला. तो दिवसभर अदृश्यच झाला. इतरांनीही तो वाट चुकला असे समजून त्याची आशा सोडली. पण सर्व दिवसभर या गुहेतून वाट चालत असता संध्याकाळच्या सुमाराला त्या गुहेच्या तोंडातून येणारा प्रकाश त्याला दिसला, आणि बाजूने चालत जाणाऱ्या त्याच्या सोबत्यांची चाहूलही त्याला लागली. तेव्हा तो धीट तरुण खोल गंभीर अशा गुहेतून गर्जून हाक मारून मोठ्याने शीळ घालून 'मला वाट सापडली रे गड्यांनो ! मी आलो !' असे त्यांना कळवीत आहे.'

सावरकरांच्या एकसष्टीच्या समारंभात ते जे भाषण करतील ते या खोल अंधाऱ्या गुहेतून घुमवून मारलेल्या हाकेसारखे त्यांच्या सहकाऱ्यांना आनंददायक ठरेल ! सावरकर हे माझ्यासारखे लोकांच्या डोळ्यासमोर बसून कर्तव्यनिष्ठेने टाईपरायटरवर लिहीत नव्हते तर अंधाऱ्या गुहेतून मार्ग आक्रमण करीत होते. म्हणून बाहेर पडले ते जखमी घायाळ रक्ताचे ओघळ जाणारे, पण आनंदी व पूर्वीसारखेच तडफदार, असे लोकांना दिसत आहेत. दोन जन्मांनी भोगून न संपणाऱ्या

काळचा पाण्यातून वाचून आलेले म्हणून सावरकरांच्या जन्माला साठ दुणे एकशे वीस वर्षे झाली असा चुकीचा हिशोब कोणाला सुचेल, पण १९०९ ते १९२१ ही बारा वर्षे वजा घालता त्यांचे आयुष्य आज अठ्ठेचाळीस वर्षेच आहे. आजचे समारंभ ही फक्त पुढची वानगी आहे. त्यांची खरी एकसष्टी आपण १९५५साली करू–असा हिशेब हाच माझ्या मते अधिक बरोबर ठरेल. ती पुढची खरी एकसष्टी करण्या–स्वीकारण्याइतके तरी दीर्घायुष्य आयुरारोग्य सावरकरांना लाभावे अशी प्रार्थनारूप मागणी आपणाला ईश्वरापाशी हक्काने करता येईल ! आणि ती करून मी ही प्रस्तावना संपवितो.

पुणे, दिनांक १ मे, १९४३.

**न. चिं. केळकर**

# झेंडूची फुले

## (केशवकुमार)

संपादक

**स. गं. मालशे**

आवृत्ती १ ली १९२५   ग. पां. परचुरे प्रकाशनमंदिर   मूळ प्रस्तावना
आवृत्ती ८ वी १९७२   मूल्य १२–५०   पृष्ठे सुमारे ७०

आचार्य प्र. के. अत्रे यांच्या प्रचंड कर्तृत्वाला अनेक पैलू होते. शिक्षक, कवी, नाटककार, पत्रकार, चरित्र–आत्मचरित्रकार, मुलुखमैदानी वक्ता इ. प्रभावी भूमिकांमुळे त्यांचे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ४०-४५ वर्षे दुमदुमत राहिले. या सर्व भूमिकांच्या यशाचे रहस्य अत्रे यांच्या अफाट विनोदशक्तीत आहे. ‘ झेंडूची फुले ’ नामक अत्रे यांचा विडंबनात्मक कवितासंग्रह म्हणजे त्यांच्या विनोदशक्तीचा पहिला आगळा, खळबळकारक आविष्कार. वाङ्मयीन, सामाजिक नि राजकीय क्षेत्रातील विचित्र प्रवृत्ती नि कृतींचे विडंबन करणाऱ्या ‘ झेंडूच्या फुलां ’चा उग्र खमंग सुवास आजही आस्वाद्य वाटतो. या लोकप्रिय ‘ फुलां ’ची आठवी आवृत्ती विनोदबुद्धी असणारे व्यासंगी, रसिक प्राध्यापक **स. गं. मालशे** यांच्या रसग्रहणात्मक दीर्घ प्रस्तावनेसह प्रथमच प्रकाशित झाली. ग्रंथविषयाला साजेशा त्यांच्या प्रस्तावनेतील महत्त्वाचा भाग अभ्यासकांना नित्य उपयोगी पडेल.

## विडंबनाचे व्याकरण

अनुकरण किंवा नक्कल करणे ही माणसाची जन्मजात प्रवृत्ती आहे. मुलाला थोडे फार कळू लागताच त्याच्या ठायी या प्रवृत्तीची लक्षणे दिसायला लागतात. मल बऱ्याच गोष्टी अनुकरणानेच शिकत असते. कधी मोठ्या मंडळींनी शिकविल्यामुळे तर कधी स्वयंस्फूर्तीनेही त्याची अनुकरणप्रवृत्ती वाढीस लागत असते. पक्षी आवाज कसे करतात, हम्मा कशी हंबरते, आजोबा कसे चालतात, बाबा कसे ओरडतात, आई डोळे कशी वटारते, भटजी मंत्र कसे बडबडतात, यांसारख्या गोष्टी मुले वयाच्या तिसऱ्या वा चौथ्या वर्षापासून हुबेहूब करून दाखवू लागतात. विडंबनाचे मूळ या जन्मजात मानवी प्रवृत्तीत शोधता येण्यासारखे आहे.

कोणत्याही काळच्या शालेय जीवनात त्या त्या पिढीच्या तोंडी कोणती ना कोणती विडंबनगीते खेळत असताना आढळून येतील. 'जय देव जय देव जय लक्षुमिकाकू । तुमचा मुलगा ओढतो गांजातंबाकू' हे आरतीचे विडंबन बहुतेकांच्या परिचयाचे असेल. आचार्य अत्र्यांनी 'टेल फादरला । गणपती थ्रोनावरी सिटला' हे 'बघुनि सुभद्रेला' या सौभद्रातील पदाच्या धर्तीवर रचलेले आपल्या काळचे उदाहरण दिलेले आहे. आमच्या वेळी म. गांधींची असहकारितेची चळवळ ऐन भरात होती. प्रभातफेऱ्या, सायंफेऱ्या यांचा धूमधडाका चालू होता. वीर सावरकरांच्या 'धन्य शिवाजी तो रणगाजी, धन्यचि तानाजी' या सिंहगडाच्या पोवाड्याच्या 'धन्य गांधीजी तो रणगाजी, धन्यचि नेहरूजी' यासारख्या गंभीर नकला लोकांच्या मुखी होत्या. त्यांच्या धर्तीवर 'धन्य बुवाजी करतो ताजी बटाट्याचि भाजी' हे कडवे आम्हा मुलांत प्रचलित झाले होते. वर निर्देशिलेली आरती काय, किर्लोस्करी पद काय किंवा सावरकरी पोवाडा काय, त्यांच्या चाली सर्वतोमुखी होत्या. त्यांनी जनमानसात घर केलेले होते. अशा चालींची अतिपरिचयात अवज्ञा चालू होते. त्यांच्या सारणीत हास्यास्पद आशय बसवावेसे वाटू लागते. अती झाल्याचे हसू येते आणि नक्कल करण्याचा मोह होतो.

काही वेळा मूळ कृतीतला भडकपणाही नकलेला प्रेरणा देतो. अंतर परिचयात जादा डोळ्यात भरणारी गोष्ट आपल्या तारतम्याला धक्का देते. कारण आपण ठरविलेल्या यत्तेशी ती विसंगत असते. अशा वेळी तिची थट्टा करावीशी वाटते. थट्टेचा सहज सुचणारा मार्ग म्हणजे वेडावून दाखविणे. वेडावणे म्हटले की, त्यात थोडीफार अतिशयोक्ती आलीच. वेडावण्यात मूळ लकबी वाढवलेल्या, ताणलेल्या असतात. 'नकल्या आणि गांवढेकर' म्हणून एक जुनी गोष्ट आहे. नकल्याने काढलेल्या डुकराच्या आवाजाची लोक वाहवा करतात, पण गांवढेकराने घोंगडीत लपवून आणलेल्या अस्सल डुकराच्या आवाजाला प्रतिसाद देत नाहीत, असा तिचा आशय आहे. यातले मर्म हेच की मूळ लकबींना वेगळ्या पातळीवर नेऊन गडदपणा आणल्याखेरीज त्यात गंमत येत नाही.

वेडावण्यामुळे एकीकडे जशी गंमत वाटते, तसेच आणखीही महत्त्वाचे कार्य साधते. वेडावणे ही सक्रिय टीका असते. ती दोषदिग्दर्शनही बिनतोडपणे करते. वेडावण्यामुळे मूळ व्यक्तीला आपल्यातील अतिरेकाची जाणीव होते. वाङ्मयीन क्षेत्रालाही हाच न्याय लागू होतो. तिथेही अति झाले की हसू येते नि नक्कल करण्याची उबळ येते. तेच विडंबन. म्हणजे विडंबन हे वाङ्मयीन वेडावणेच म्हणा ना. त्यातले अनुकरण विनोदाच्या पातळीवरचे असते, ते बुद्धिनिष्ठ असते. चोखंदळ वाचकालाच ते आस्वाद्य होते. ज्याचे विडंबन केले तो साहित्यिक खिलाडू वृत्तीचा असेल, तर त्यालाही गंमत वाटते व तो आपले दोष सुधारतो. असे रंजन करता करता डोळ्यात अंजन घालण्याची किमया विडंबनकलेत असते.

विडंबनाचे शब्द कानी पडताच मूळ कृतीची स्मृती ताबडतोब मनात जागृत होणे ही त्याच्या यशस्वितेची प्राथमिक कसोटी होय. अर्थात त्यासाठी वर दर्शविल्याप्रमाणे मूळ कृतीही सर्वप्रसिद्ध असावी लागते. केशवकुमारांची 'परिटा, येशिल कधि परतून ?' ही ओळ ऐकली की, रे. टिळकांची 'पांखरा, येशिल का परतून ?' ही ओळ आठवते. शां. शं. रेग्यांचा 'एक विडी आहे माझ्या खोल खिशात दडून' हा चरण ऐकला की 'एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून' हा मंगेश पाडगावकरांचा चरण जरूर आठवतो. मूळ कविता आणि तिची अनुकृती यांतल्या ओळी समांतर रीतीने समोरासमोर उभ्या राहतात व तुलनेतून त्यांच्या आशयातली विसंगती जाणवून हसू येते.

विडंबनाचे रोपटे असे परोपजीवी आहे. दुसऱ्या कोणत्या तरी मूळ कवितेवर वा कृतीवर कलम केल्यावाचून ते जीव धरीत नाही. तेव्हा विडंबन हा एक बिनभांडवली सोपा धंदा आहे, अशी कित्येकांची समजूत असते. पण ही अधिक्षेपी समजूत मुळीच बरोबर नाही. विडंबन हा बुद्धिनिष्ठ, चोखंदळ रसिकांना आस्वाद्य होणारा उच्च दर्जाचा विनोदविलास आहे. विनोदी लेखनाची मदार प्राधान्याने व्यंगचित्रणावर (satire वर) असते आणि कोणत्याही व्यंगचित्रणात विडंबनाचा स्रोत अंतर्हित असतोच. कोल्हटकरांची रीत हीच आहे. ते आपल्या सुदामा या मानसपुत्राला जेव्हा मुद्दाम वेड पांघरून सनातन्याचे सोंग घ्यायला लावतात, तेव्हा त्याला सनातनी वृत्ती अंतर्बाह्य स्वीकारून ती भूमिका हुबेहूब वठवावी लागत असते. खाडिलकर जेव्हा आपल्या 'भाऊबंदकी' नाटकात पेशव्यांच्या उच्च स्तरावरील भाऊबंदकीशी समांतर अशी भटाभिक्षुकांची आणि त्यांच्या कजाग बायकांची नीच स्तरावरील भाऊबंदकी उभी करतात, तेव्हा तिच्याही मागे प्रच्छन्न विडंबन वृत्तीच असते. अव्वल दर्जाच्या विनोदकाराची सर्व गुणवैशिष्ट्ये विडंबनकारात असावीच लागतात. उत्कृष्ट विडंबन हे केवळ बाह्य अभिव्यक्तीचेच विडंबन नसते' ते आशयाचेही विडंबन असते. उत्तम विडंबनात वृत्त, शैली, लकबी यांपासून तो आशयाच्या सूक्ष्म वैशिष्ट्यांपर्यंत सर्व गोष्टींचे अनुकरण असते. मूळ कवितेचा अति-

गंभीर आशय आणि अनुकृतीचा क्षुद्र आशय यांतील मूलभूत विसंगती विडंबनकाराला चित्रित करावी लागते. शब्दकळा, नाद, चाल यांच्या संदर्भात मूळ कृतीच्या शैलीचा आणलेला आव आणि अनुकृतीतील फुसका आशय यातील विरोधातून तो हास्यनिर्मिती करीत असतो. हे सारे नेमके साधण्यासाठी त्याला प्रचलित साहित्यातील प्रवृत्ति-प्रवाहांचा जवळून परिचय असावा लागतो. अन्यथा मूळ कृतीत तारतम्य तुटल्याने अतिरेकीपणा कोठे आलेला आहे, याची त्याला अचूक पारख करता येणार नाही. म्हणजेच त्याचा कान तयार असायला हवा नि साहित्यदृष्टी चांगलीच चोखंदळ हवी. आविष्कारपद्धतीचा थेट अनुकार करणे भाषाप्रभुत्वावाचून साधत नाही व आशयाचा नेमका वेध घेऊन त्याचा मर्मभेद करणे हे मूळ कर्त्याच्या समग्र व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास असल्यावाचून जमत नाही. काही नेहमीचे दाखले देऊन हे अधिक स्पष्ट करता येईल. नाटकातली वेड्याची भूमिका कोणी वेडा वठवू शकणार नाही, तिथे वेडेपणाचा प्रतिभाय (Illusion) निर्माण करणारा शहाणाच हवा. विडंबनकार मूळ कृतीचा प्रतिभासच उभा करीत असतो. बावळटाची नक्कल बावळटाला साधत नसते, तिथेही नकलाकार बेरकीच असावा लागतो. वरवर पाहिले तर सर्कशीतला विदूषक वेड्यावाकड्या उड्या मारून हसवतो आहे असे वाटते; पण ती आपली विदूषकी वठविण्यासाठी तो चांगलाच कसरतपटू असावा लागतो. इंग्रजीत Set a thief to catch a thief, असा वाक्प्रचार आहे. कारण चोराच्या वाटा चोराला माहीत असतात. तद्वतच मूळ कर्त्याच्या वाटा विडंबनकाराला नेमक्या माहीत असाव्या लागतात.

'कवी थोडे, कवडे फार' हा प्रकार कोठल्याही काळी खराच असतो. संकेतांचे दास्य स्वीकारणारे किंवा चलनी फॅशनला बळी पडणारे पद्यकारच काव्यक्षेत्रात अधिक दिसतात. त्यामुळे बांडगूळवजा निरर्थक संकेतांची भरमसाठ वाढ होऊन मूळचा काव्यवृक्ष वठण्यासारखी परिस्थिती निर्माण होते. अशा रीतीने संकेतातिरेक झाला की विडंबनकाराला खाद्य मिळते. साहित्यक्षेत्रातील प्रथितयश लेखक फाजील आत्मविश्वासामुळे किंवा दुर्लक्ष, घाई वा निष्काळजीपणा यांमुळे दोषास्पद बनतात, तर नवशिके अतिउत्साहीपणे नव्याचे भाट बनतात. साहित्यातले सनातनी मानकरी भूतकाळात भ्रमण करीत असतात, तर नवे शिलेदार भविष्याच्या भुलभुलाईने वावड्या उडवीत हवेत तरंगत असतात. या प्रतिगामी आणि पुरोगामी प्रवृत्तींना योग्यगामी वास्तवाची जाण विडंबनकार आणतो. जुन्यातल्या यांत्रिकतेची आणि नव्यातल्या विचित्रपणाची थट्टा, त्यांच्यापैकीच पण किंचित् तटस्थपणे पाहू शकणारा विडंबनकार करू लागतो आणि कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ होतो. साध्या समीक्षात्मक टीकेपेक्षा विडंबनात्मक टीका अधिक प्रभावी आणि प्रखर असते. ज्याचे दात त्याच्याच घशात घालणे किंवा ज्याची बोटे त्याच्याच डोळ्यात घालण्यासारखी ती असते. ती झोंबते कारण ती परोक्ष वर्णनात्मक नसून प्रत्यक्ष

प्रत्ययात्मक असते. ती विषयाला बाहेरून भिडत नाही. विषयच टीकारूप बनून तिथे अवतरत असतो. विडंबित विषयाचे दोष नेमके हेरणे, हे सूक्ष्म बुद्धिमत्तेचे काम आहे, तर ते व्याजगांभीर्याने साकार करणे हे तरल कल्पकतेचे काम आहे. व्याजगांभीर्याच्या पोटात श्लेष, कोटया, टोमणे, रेशमी चिमटे, कोपरखळया, शालजोडीतले असे नाना प्रकार दडलेले असतात. या साऱ्या गोष्टींच्या आस्वादासाठी रसिकाच्या ठिकाणी एक प्रकारचे दर्शनतारतम्य (Perspective) असावे लागते. विनोदाची तरलता आणि भावतरलतेची विनोदी बाजू, योग्य संदर्भात पाहण्याचे बुद्धिचापल्य त्याच्यापाशी असावे लागते. विडंबन ही अवश्यमेव थट्टा असते, याचे भान न बाळगल्यास त्याचा आस्वाद ही केवळ अशक्य गोष्ट आहे. सारांश विडंबनकार आणि त्याचा वाचक हे दोघेही समंजस आणि अभिरुचिसंपन्न कल्पक आणि बुद्धिमान असावे लागतात. एच. इ. बेटस् याने आधुनिक इंग्रजी कथेच्या संदर्भात एक गमतीचे पण मार्मिक विधान केले आहे. त्याचा आशय असा : आधुनिक लघुकथा ही चुंबनासारखी आहे, तिला वाचक, लेखक या उभयतांच्या सहकाराची गरज असते. विडंबनाची गोष्ट तशीच आहे. पूर्वतयारीशिवाय विडंबनातील ग्यानबाच्या मेखा, खाचाखोचा, धक्केचपेटे सर्वांशाने कळत नसतात. विडंबनाची सर्वच्या सर्व लज्जत वाङ्मयीन प्रवृत्तींशी परिचय असणाऱ्या मंडळीलाच चाखता येते.

## मराठी विडंबनाचा मागोवा

मराठी विडंबनाच्या क्षेत्रातील केशवकुमार अर्थात प्र. के. अत्रे यांचे यश केवळ अजोड आहे. विडंबनाला स्वतंत्र साहित्य प्रकाराचा दर्जा त्यांच्यामुळेच प्राप्त झाला. त्यांच्या आधी मराठीत तुरळक विडंबनात्मक लेखन झालेले आढळते. कै. पांगारकर म्हणत की, ज्याला विडंबन काव्ये म्हणतात, त्याची वीस तरी उदाहरणे एकनाथांच्या काव्यात मिळतील. एकनाथांच्या भारुडांतील विडंबनाच्या छटा अनुकरणाच्या पातळीवर अवश्य दिसतात. 'अर्जदास्त' सारखे त्यांचे गद्य-भारुड विडंबनाची प्राथमिक अट पाळणारे आहे. त्यावरून सरकारदरबारी अर्ज कसा करत असतील, त्याची कल्पना येते. तरीसुद्धा हास्ययुक्त दोषदर्शन हा विडंबनाचा ठळक हेतू तेथे नाही. भारुडादी लेखनाचे पर्यवसान हास्यात होत नसून वेदान्तमंडणात म्हणजे गांभीर्यात होते. तेव्हा विडंबनाचा मागोवा घेताना आधुनिक काळाचा विचार करणेच श्रेयस्कर. मराठीतले पहिले विडंबन म्हणजे 'संगीत हजामत' (१८८९) हे म. रा. तेलंगांचे पुस्तक. त्यात किर्लोस्करांच्या शाकुंतल–सौभद्रातल्या पदांची विडंबने आहेत. 'पांडुनृपति जनक जया' या पदाची 'खंडुनापित जनक जया' ही त्यांनी केलेली नक्कल सर्वपरिचित होती. मु. ग पाटील यांचे 'कुलकर्णीलीलामृत' ( १९१३ ) हे त्यानंतरचे ठळक विडंबनकाव्य. या

काव्याच्या हेतूविषयी सडकून आक्षेप घेणाऱ्या न. चिं. केळकरांनाही 'श्रीधर कवीच्या काव्यग्रंथाचे विकृतानुकरण (Parody) या नात्याने हा ग्रंथ चांगलाच साधला आहे... सदरहू ग्रंथ सरस विनोदी काव्य आहे... ही अचिकित्सक मराठी वाचकाची फसगंमत करणारी पोथी आहे ...' अशा आशयाचा साहित्यदृष्टचा अनुकूल अभिप्राय व्यक्त करावा लागला आहे. (समग्र केळकर वाङ्मय खं. ४, पृ. ३५६) याच कवीने 'पांडवप्रतापा'च्या धर्तीवर 'शेटजीप्रताप' (१९२४) म्हणून विडंबनात्मक ओवीबद्ध ग्रंथ केलेला आहे, पण त्याचा विशेष बोलबाला झालेला नाही. 'मेथाजीची मसलत' व 'पदवीचा पाडवा' (१९१७) ही गं. ना. मोगरे यांची प्रदीर्घ उपहासकाव्ये विडंबनात गणता येतील; कारण त्यात मोरोपंती आर्या-वृत्ताचा थाट सही सही वठविलेला आहे. कै. कृ. प्र. खाडिलकरांच्या 'विद्याहरण' व 'मानापमान' नाटकातील पदे लोकांच्या जिव्हाग्री खेळून त्यांना जबरदस्त लोकप्रियता प्राप्त झाली होती. पण त्या पदांतील शब्दरचनेचा अप्रयोजकपणा व तानबाजीचा अतिरेक कै. माधवराव जोश्यांना खुपून त्यांच्या थट्टेखोरपणाला जाग आली. त्यांनी आपल्या 'विनोद' (१९१६) या नाटकात खाडिलकरी पदांची विडंबनेच पदे म्हणून घातली आहेत. 'माता दिसली समरी विहरत' या सुप्रसिद्ध पदाचे 'माता बसली स्वगृहि रखडत । घाशित ताट-तव्यासि-पळ्यांसि' हे त्यांचे विडंबन उत्कृष्ट उतरले आहे. संस्कृत मेघदूतापासून प्रेरणा घेऊन मराठी कवींनी काक-मूषकादींना दूत बनवून काव्ये रचली आहेत. वर उल्लेखिलेले 'बल्लवदूत' (१९२४) हे त्यातले उजवे. यानंतर मराठी साहित्यक्षेत्रात अभूतपूर्व खळबळ उडवून देणारी 'झेंडूची फुले' उमलली व महाराष्ट्रात विडंबनगीताचे पीकच आले. पण त्यात दाण्यापेक्षा तणच उदंड होते. 'उपहासिनी' (१९३६) या प्रातिनिधिक विनोदी संग्रहात त्यातली काही उल्लेखनीय विडंबने पाहावयास सापडतात. अनंत काणेकरांची 'प्रेम आणि पतन', 'बेगमेच्या विरहगीतास शिवाजीचे उत्तर' आणि उपाध्यांची वीरविडंबक 'चालचलाऊ भगवद्गीता' ही खास उल्लेखनीय. 'धुवां-धार'कर्ते बाबुलनाथ व 'बांडगूळ'कर्ते चिं. ग. दीक्षित यांचीही काही विडंबने लक्षात राहतात. नवकाव्याच्या जमान्यातले नाव घेण्यासारखे विडंबक कवी म्हणजे शां. शं. रेगे. वसंत बापट, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, पु. शि. रेगे या प्रथितयश कवींच्या कवितांची अनुक्रमे 'फुंकर', 'तेच ते', 'विडी' व 'मिशा' ही त्यांची विडंबने बरीच यशस्वी उतरलेली आहेत. पण नवलेखकांना दहशत वाटावी, असा दरारा केशवकुमारांनंतर कोणी निर्माण केला असेल, तर पु. ल. देशपांडे यांनी. 'आणखी एक रस', 'महानुभाव वाङमय', 'अंगुस्तान विद्यापीठ' 'त्याचे व्यवच्छेदक लक्षण' यांसारख्या त्यांच्या लेखनात गद्यशैलीची अचूक अनु-करणे असून विक्षिप्तपणात जमा होणारे नावीन्य, समीक्षेचा पढिकपणा आणि साहित्यक्षेत्रातील एकूण सांकेतिकता यांचा मार्मिक उपहास केलेला आहे. केशव-

कुमारांनंतर इथेच विडंबनाच्या निजश्रेयाची खूण पटते व मग मन मागे ओढ घेते आणि पुन्हा डोळे ठरतात ते 'झेंडूच्या फुलां'वर !

आचार्य अत्र्यांच्या आठवणी वा आत्मचरित्र वाचले, तर ते जातिवंत नकल्ये होते याविषयी शंका राहात नाही. वयाच्या नवव्या वर्षी तिरळ्या स्वयंपाकिणीवर 'सीताबाई, वर्णू किती तव गुण । डोळा काणा, नाक वाकडे बधिर असति तव कर्ण' अशी कविता केली होती. (कऱ्हेचे पाणी, खंड १, पृ., ४०) पुढे माधवराव जोश्यांच्या धर्तीवर 'मला मदन भासे हा मोही मना' या सुप्रसिद्ध पदाचे 'मला मटन ताजे । आणा आधी । अंडी तरी येतील कधी ?' असे त्यांनी विडंबन केल्याचे नमूद आहे (तत्रैव पृ २८३). काही गुण सोन्याचा आणि काही सोनाराचा, म्हण-तात. अत्र्यांच्या ठिकाणी विडंबनकला जन्मजात असली, तरी ती सत्कारणी लागावी असे वाङ्मयीन वातावरण यांच्या ऐन तारुण्यात त्यांना उपलब्ध झाले, हा एक सुयोगच.

## पार्श्वभूमी

त्याचे असे झाले : १९२० सालाच्या सुमारास काव्याकाशातले गोविंदाग्रज–बालकवींसारखे तेजस्वी तारे निखळून पडले. काही काळ अंधारल्यागत झाले. त्यातून काही रवि–किरण एकमेका साह्य करीत काव्याचा सुपंथ धरून पुढे सरसा-वले. मग काव्यक्षेत्रात सामुदायिक शेतीसारखा प्रयोग सुरू झाला. मराठीत खंड-काव्ये नाहीत ? लिहा खंडकाव्ये. गझला नाहीत ? लिहा गझला. सुनीतें नाहीत ? खरडा सुनीते. विलापिका नाहीत ? काढा गळे ! पुन्हा यांच्यातलेच टीकाकार या प्रयोगाची प्रशंसा करून पत–पुरवठा करीत होते. असा मोठा विचित्र फड सजला! पण हे खुद्द आ. अत्र्यांनीच नेटके लिहून ठेवले आहे, ते त्यांच्याच शब्दात देणे बरे : '...काव्यात क्रांती घडवून आणण्यासाठी महाराष्ट्रात परस्पर–प्रशंसा–संघ स्थापन झाले. तेव्हा त्यांचे ते नियम, ती ध्येये, त्या मंडळाच्या साप्ताहिक बैठका, तो नावि-न्याचा व वैशिष्टयाचा पोकळ अभिनिवेश, ते एका विषयावर अनेकांनी काव्य करणे, ते क्षुल्लक गोष्टीसाठीसुद्धा एकमेकांनी एकमेकांवर सकाळसंध्याकाळ स्तुतीचा वर्षाव करणे, तसेच कोणी आपण समोर असताना केशवसुतांना कवी म्हणणेच रास्त नव्हे, असे म्हणावे, तर कोणी गोविंदाग्रज केवळ बुद्धीवर जगले– त्यांना हृदय नव्हते असा निर्वाळा द्यावा; कोणी नव्या काव्यप्रकाराच्या खाणी खोदाव्या तर कोणी छंदाच्या आणि शब्दाच्या टांकसाळी घालाव्या; एक ना दोन अशी निर निराळी सोंगे घेऊन ही कविमंडळी वाङ्मयात धुमाकूळ घालू लागली. म्हणूनच मला विडंबनाचे हत्यार उचलावे लागले.' (उपहासिनी, 'प्रस्तावना,' पृ. १०–११.)

नामनिर्देश टाळून सांगितलेल्या या परिस्थितीवर थोडा वस्तुस्थितिनिदर्शक प्रकाश टाकणे अवश्य आहे. त्या काळी महाराष्ट्रात काव्याविषयी एक प्रकारची

आस्था निर्माण झालेली होती. काव्यचर्चा होत होत्या. नव्या काव्यवाहनांविषयी साधकबाधक लेख प्रसिद्ध होत होते. कवींच्या नावाने मंडळे स्थापन होत होती. श्री. महाराष्ट्र शारदामंदिर यासारखी संस्था पुण्यात साहित्यिक कार्य करीत होती. तीत नवीजुनी कविमंडळी एकत्र आली होती. अत्रेही तिच्या कार्यात दुरून सहभागी झालेले दिसतात. या शारदामंदिरातील सदस्यांपैकी काहींनी 'सन टी क्लब' या नावाने एकत्र जमण्यास प्रारंभ केला व त्याचेच रूपांतर 'रविकिरणमंडळा'त झाले (१९२१). या मंडळात माधव जूलियन (मा. त्रि. पटवर्धन), यशवंत (य. दि. पेंढरकर), गिरीश (शं. के. कानेटकर), श्री. बा. रानडे, सौ. मनोरमा रानडे, द. ल. गोखले, ग. त्र्यं. माडखोलकर, व नाट्यछटाकार दिवाकर (गर्गे) अशी मंडळी होती. पुढे दिवाकरांनी मंडळ सोडले. त्यात वि. द. घाटे यांची भर पडली. हे मंडळ काव्यविषयक नव्या कल्पना बाळगणारे असून त्याचे प्रवक्ते माधव जूलियन हे होते. त्यांच्या दृष्टिकोनाचा परिणाम यशवंत–गिरीशांवरही बराच झाला असल्याचे दिसून येते. रविकिरणमंडळात माधव ज्यूलियन हे रवी व बाकीचे किरण होते अशी थट्टेखोर कोटी अत्रे करीत असत. रविकिरणमंडळातील सदस्यांच्या कविता आणि काव्यविषयक लेखन नवयुग, महाराष्ट्र साहित्य, विविधज्ञानविस्तार यात येत होते. शिवाय मंडळसदस्य माडखोलकर यांच्या संपादकत्वाखाली दैनिक ज्ञानप्रकाशाची 'काव्यशास्त्रविनोद' ही साप्ताहिक पुरवणी निघू लागली. या पुरवणीत मंडळाच्या सदस्यांचे लेखन प्रामुख्याने प्रसिद्ध होऊ लागले. माधव जूलियन यांच्या काव्यात हास्यास्पदतेचा अंश बराच होता. नाविन्याच्या नावाखाली त्यात फारशी, ऊर्दू आणि गावठी मराठी शब्दांची बेंगरूळ भेसळ केलेली असे. पण याबरोबर केशवसुत आणि गोविंदाग्रज या अत्र्यांच्या काव्यदैवतांचे, रविकिरणी तसेच अनंततनयादी शारदामंदिरी टीकाकारांनी अवमूल्यन चालविले होते. केशवसुतांच्या एकांड्या वर्तनाविषयी आणि 'देवाचे लाडके', 'सृष्टी आंदण मिळालेले' असा कवींचा बडेजाव माजवण्याविषयी त्यांना दोष देणारे लेख लिहिले जात होते. गोविंदाग्रजांच्या चारित्र्याचा पंचनामा मांडला जात होता. प्रा. श्री. नी चापेकर, द. अ. आपटे ऊर्फ अनंततनय. वि. वा. भिडे, बा. अ. भिडे, लक्ष्मणशास्त्री लेले, लक्ष्मणराव पांगारकर ही मंडळी काव्यविषयक जुन्या कल्पना उराशी बाळगून केशवसुत–गोविंदाग्रजांच्या संप्रदायाला नावे ठेवीत होती. माधव जूलियनांच्या नेतृत्वाखाली रविकिरणमंडळाने केशवसुतांपेक्षा आपण कोणी वेगळे आहोत, अशी भाषा चालविली होती.

एकीकडे संस्कृतप्रचुर जडजंबाल शब्दालंकार घेऊन सोवळी मंडळी सिद्ध; तर दुसरीकडे फार्शी फॅशनचे जडजवाहीर घेऊन ओवळी मंडळी सज्ज ! काव्यदेवतेची ही विचित्र कुचंबणा पाहून अत्र्यांची जन्मजात विनोदबुद्धी जागृत झाली आणि आपल्या काव्यदैवतांच्या अवमूल्यनाच्या चिडीतून त्यांची टीकाबुद्धी उफाळून

आलो. या दोहोंचा जोड जमून जी अजोड साहित्यकृती पैदा झाली, तीच 'झेंडूची फुले'!

## पठाणक्लबात जन्म !

ही एवंगुणविशिष्ट 'झेंडूची फुले' पठाणक्लबात जन्म पावली. शं. कृ. देवभक्तांच्या पुण्याच्या जागेत काही गडकरीभक्त जमत. तोच पठाणक्लब. या क्लबाची हकीगत 'अशीच एकाची गोष्ट' (१९७१) या वसंत शांताराम देसाईंच्या आत्मचरित्रात दिलेली आहे. तिचा सारांश असा : ना. वि. कुलकर्णी यांच्या महाराष्ट्र कुटुंबमालेत मामा वरेरकरांची 'चिमणी' नावाची छोटी कादंबरी प्रसिद्ध झाली. मामा वरेरकर हेही गडकऱ्यांचे खवट टीकाकार, तेव्हा त्यांच्या 'चिमणी'वरून या मंडळींना 'कावळा' हे पुस्तकाचे नाव सुचले. 'महाराष्ट्र कुटुंबमाले'वरून 'महाराष्ट्र फकीर-माला' आणि क्लबातल्या लेखकांच्या नावातील अक्षरांवरून 'गोस्वामी मानव प्रकाशम्' ग्रंथकारनाम तयार झाले. ग्रंथकारनामाची फोड अशी गोस्वामी (गोविंदराव टेंबे), मा (मामा म्हणजे स. बा. हुदलीकर), न (न. ग. कमतनूरकर), व (व. शां. देसाई), प्र (प्र. के. अत्रे), का (पु. श्री. काळे) आणि शम् (शं. कृ. देवभक्त). या फकीरमालेचा पहिला मणी 'कावळा' गोकुळअष्टमीच्या मुहूर्तावर (३०-८-१९२६) प्रसिद्ध झाला. त्यात वरेरकरांवर रूपकात्मक टीका होती. त्यानंतर 'मास्तर' व 'पांचजन्याङ्क' अशी आणखी दोन पुष्पे निघाली. 'झेंडूची फुले मी १९२२ च्या महिन्यात लिहिली' असे विधान करून पठाणक्लबातील त्यांच्या प्रसवकाळची माहिती खुद्द अत्र्यांनी सांगितली आहे : रविकिरण मंडळाचा पहिला चिमुकला संग्रह प्रसिद्ध झाल्यावर 'त्यांतल्या प्रत्येक कवितेचे अंगविक्षेपासह सामुदायिक वाचन करून तिच्यातल्या बारीक सारीक दोषांचा आम्ही साग्रसंगीत पंचनामा करू लागलो. ह्या उपक्रमाचा माझ्यावर असा परिणाम झाला की एके दिवशी मला स्फूर्तीचा जबरदस्त झटका आला आणि मी विडंबनकाव्याच्या ओळीच्या ओळी एकामागून एक बडबडू लागलो. (कऱ्हेचे पाणी खं. १, पृ. २८०-२८४). अत्र्यांच्या या हकीगतीतील काव्यरचनेच्या १९२२ या वर्षाबाबत काहीतरी घोटाळा दिसतो. कारण रविकिरणमंडळाचे पहिले चिमुकले पुस्तक 'किरण' ९ सप्टेंबर १९२३ रोजी प्रसिद्ध झाले होते. म्हणजे अत्रे जो मे महिना म्हणतात, तो १९२३ सालचा असावा. यशवंत आणि गिरीश यांचा छोटेखानी कवितासंग्रह 'महाराष्ट्र वीणाझंकार' नावाने वीणा मंडळातर्फे बावीस साली प्रसिद्ध झाला होता. तो येथे अभिप्रेत आहे, असे म्हणावे तर या कविद्वयाने लिहिलेल्या व अत्र्यांनी विडंबित केलेल्या 'स्थानभ्रष्ट फुलास' या सुनीतयुग्माचा दिनांक २३ ऑगस्ट १९२२ हा आहे. म्हणजे बावीस सालचा मे महिना बाद ठरतो. शिवाय 'झेंडूच्या फुलां'चे प्रमुख लक्ष्य जे माधव जूलियन त्यांची कविता 'वीणाझंकार'मध्ये

नव्हती. याशिवाय 'झेंडूच्या फुलां'च्या सहाव्या आवृत्तीला जोडलेल्या 'मी विडंबनकार कसा झालो?' या लेखात असे विधान केले आहे: 'बावीसच्या मे महिन्यात मी झेंडूची फुले लिहिली खरी पण त्याचे हस्तलिखित जवळजवळ चार वर्षे माझ्याजवळ पडून होते. त्यामधल्या कविता प्रसिद्ध करण्याचे किंवा कोणाला वाचून दाखविण्याचे धैर्यच मला होईना.' (परिशिष्ट ३ रे, पृ. १५५) यावरून 'महाराष्ट्र साहित्य', 'काव्यरत्नावली' आदी नियतकालिकांतून मूळ कविता प्रसिद्ध होत होत्या, तसतशी त्यांची विडंबने केशवकुमारांनी केलेली असावी. माधव ज्यूलियनांची जी गझले विडंबित केली आहेत, त्यातली बहुतेक त्यांच्या 'गज्जलांजली' या 'गझल' वृत्तप्रकाराची चर्चा करणाऱ्या लेखात आलेली आहेत. (महाराष्ट्र साहित्य, पु. ४ अं १, ७, ८-९ (१९२२).) यावरून एकाएकी स्फूर्तीचा झटका आला व ही विडंबने लिहिली गेली, हे म्हणणेही अरतेपरते करूनच स्वीकारावे लागते. काहीही असले तरी बालकवी वा गोविंदाग्रज व्हायच्या उमेदीने १९१५ ते १९२० पर्यंत केशवकुमार 'देवा'च्या आळंदीच्या रोखाने प्रवास करीत होते, ते वीस सालच्या सुमारास 'चोरा'च्या आळंदीला येऊन पोहोचले, हा योगायोग मराठी साहित्याला आणि त्यांनाही उपकारकच ठरला. मराठी साहित्याचे नवे दालन अपूर्वाईने नटले. केशवकुमारांची गांभीर्याची 'गीतगंगा' लोकप्रियतेच्या दृष्टीने लुप्तच आहे; पण 'झेंडूची फुले' मात्र अजूनही खूप लोकप्रिय आहेत. अत्र्यांनी अनेक प्रकारचे लेखन यशस्वी रीतीने केलेले असले तरी विडंबनगीतांतच त्यांचा खराखुरा विक्रम आहे.

'झेंडूच्या फुलां'चा डोळ्यात भरणारा विशेष म्हणजे त्यातील विडंबनाची सर्वंकषता. अनेक स्तरांवरील विसंगती त्यात चित्रित झालेल्या आहेत. त्यात नुसत्या कवितांचेच विकृतानुकरण नाही. प्रारंभीच्या अर्पणपत्रिकेपासून तो शेवटच्या प्रश्नपत्रिकेपर्यंत, प्रास्ताविक एकच वाक्याच्या छपाईच्या निमुळतेपणापासून तो झेंडू पुस्तक फार्मसीच्या जाहिरातीपर्यंत, पुस्तकाच्या व कवितांच्या शीर्षकापासून तो पदटीपांपर्यंत सर्व गोष्टी लगामी लावून विडंबनाची प्रतिसृष्टी उभी केली आहे. कवितांच्या गाभ्याकडे वळल्यास त्यातही कधी कविप्रवृत्तींची तर कधी सामाजिक अपप्रवृत्तींचीही थट्टा केलेली आढळून येईल. कवितेची चाल, शब्दकळा वा खास लकबी अशा बाह्यांगांपुरतेच हे अनुकरण मर्यादित नसून कवींच्या अंतरंगाचे आणि मन:प्रवृत्तीचे विडंबनही यशस्वीपणे केलेले आहे. एकेका कवितेत अनेक स्तरांवर विडंबनाच्या छटा खेळविलेल्या असल्यामुळे, चारदोन अपवादभूत कविता वगळल्यास, निदान विनोदी स्तरावर तरी या विडंबनगीतांचे रसिकाला आकर्षण वाटत राहते व राहील.

केशवकुमारांनी पहिल्या आवृत्तीतील काही बारकाव्याच्या गोष्टी पुढील आवृत्त्यांमधून गाळलेल्या आहेत. त्यातल्या काही कवितेला नेटकेपणा येण्यासाठी, काही

अतिरेकी थट्टा झाल्याच्या जाणिवेपोटी, तर काही भिडस्तपणामुळेही गाळल्या गेल्या असतील; परंतु त्या कानाडोळा करण्याजोग्या नाहीत. मूळ कविता आणि तिचे कर्ते याविषयीच्या केशवकुमारांच्या ताज्या व तावडतोबीच्या प्रतिक्रिया कळ-ण्याच्या दृष्टीने त्या उपयुक्त आहेत. शिवाय गाळलेल्या गोष्टींपैकी काहींना तरी स्वतःची अशी अंतभूत गंमत आहे. केशवकुमारांच्या महत्त्वाच्या आठ विडंबन-कवि-तांचे मूळ आणि कूळ यांवर या गोष्टींमुळे प्रकाश पडतो. तेव्हा मूळ कविता आणि त्यांची झालेली परिष्करणे व विडंबनकवितांचे पहिले स्वरूप आणि त्यात झालेले फेरफार यांचा तुलनात्मक अभ्यास खचित्‌च उद्‌बोधक ठरणारा आहे. असा तुलना-त्मक अभ्यास पुढे मांडून त्यातून केशवकुमारांच्या सर्वस्पर्शी विडंबनकौशल्याचे रहस्य उलगडण्याचा शक्यतेवढा प्रयत्न आता करावयाचा आहे.

**आम्ही कोण ?** : केशवसुतांच्या कवितेचे हे उत्कृष्ट अनुकरण आहे. ही केशव-कुमारांची प्रसिद्ध झालेली पाहिली विडंबनकविता[१] विडंबनाचे लक्ष्य केशवसुत नाहीत. सुनीताची धाटणी, शार्दूलविक्रीडित वृत्त, 'आम्हाला वगळा' ह्या कल-टणीतील शब्द व एकंदर आव्हानात्मक सूर यांचे मात्र सहीसही अनुकरण साधले आहे. केशवसुतांच्या कवितेचा उदात्त आशय आणि विडंबनातला क्षुद्र आशय यांमधील विरोधातले अंतर जाणवून दुसऱ्याची क्षुद्रता अधिक गडद होऊन मनावर ठसते. लटपटच्या कवींची आत्मप्रौढी, प्रसिद्धिलोलुपता, काव्यगायनाचे अनावर वेड, कळप करून स्वतःच्या लोकांचा उदोउदो करून विरोधकांवर सामुदायिकपणे टीका करणे, वाङ्मयचौर्य, मत्सरीपणा या गोष्टींवर विडंबनाचा खरा कटाक्ष आहे. विडं-बित कवींना जॉ. थॉमसन हे दुसऱ्या आवृत्तीपासून गाळलेले आहे. शेवटची कलाट-णीची द्विपदी १ ल्या आवृत्तीत अशी होती :

आम्हाला वगळा–गतप्रभ झणी होतील ना मंडळे ?
आम्हाला वगळा–उडून सगळे जातील ना कावळे ?

१. यापूर्वी काही विनोदी कविता केशवकुमारांनी लिहिलेल्या असाव्या. शं. कृ. देवभक्त म्हणतात. '...आमच्या 'पठाणक्लब'च्या बैठकीला सुरुवात झाली. बन्याबापूंना (कमतनूरकर) उद्देशून ते म्हणाले, 'अहो, बन्याबापू, हल्ली पुण्यात ढेकूण आणि कवी किती पिसाळले आहेत याची कल्पना नाही तुम्हाला ? ढेकणांवर काहीतरी उपाय करता येईल; पण कवी कधीच काबूत यायचे नाहीत.' असे म्हणून त्यांनी 'भयंकर' कविता म्हणून दाखविल्या, 'गंजिफ्रॉक नि शर्ट घालुनि अहा ! होतो कसा बैसलो–' असा एका कवि-तेचा आरंभ होता. दुसऱ्या कवितेच्या आरंभाची ओळ होती, 'दीनोद्धार अकबरशहा गायींचा अर्ज असे हा.' तिसरी होती 'कलकत्याला गाय बोलली मुझको मत मारो....' ('माझ्या पहाण्यातील 'बाबुराव', आचार्य अत्रे : विविधदर्शन, मुंबई, १९५८, पृ. १२५)

त्याऐवजी दुसऱ्या आवृत्तीत ती अशी आहे :

आम्हाला वगळा--गतप्रभ झणी होतील साप्ताहिके !
आम्हाला वगळा-खलास सगळी होतील ना मासिके !

पहिल्या आवृत्तीत कविता संपविताना 'कावळे उडवून लावले' होते, त्याने काहीच साधले नव्हते; उलट थोडा रसभंगच होत होता. दुसऱ्या आवृत्तीतील बदलामुळे आशयाची शीग वाढवणे हा जो कलाटणीच्या द्विपदीचा उद्देश तो उत्तम साधला आहे. पहिल्या आवृत्तीत काव्यप्रकारनाम 'सुतक' असे होते व त्यावर पहिल्या दोन आवृत्त्यांतून असलेली टीप तिसरीपासून गाळली आहे. ती टीप अशी :

'झेंडू पुस्तक फार्मसीचे अध्यक्ष मौलाना अल्लाउद्दीन खिलजी यांनी इंग्रजीतील, 'सॉनेट' या काव्यप्रकारास 'सुतक' हा समानध्वन्यर्थवाचक शब्द सुचविलेला आहे. 'फार्मसी'तील साप्ताहिक मजलशीत यावर 'पानपतच्या लढाया' होऊन शेवटी मशारनिल्हे शब्द मुकर करण्यात आलेल्या असून त्याची पुढील तीन रूपे ठरविण्यात आली आहेत. सुतक-सपिंडी हे १४ ओळींचे, सुतक-सगोत्री हे १० ओळींचे व सुतक-सप्रवरी हे ३ ओळींचे असावे. याविषयी विस्तृत माहिती मौलानासाहेब लवकरच पुस्तकरूपाने प्रसिद्ध करणार आहेत.'

'सॉनेट' ह्या इंग्रजीवरून आलेल्या काव्यप्रकाराच्या नामकरणासंबंधी त्याकाळी रणे माजली होती. चतुर्दशिका, चतुर्दशिनी, चतुर्दशपदी, स्वनीत, स्वनितक, सुनीतक सुरगीत, गीतक, सुनीत यांसारखे कित्येक प्रतिशब्द पुढे आले होते. 'सुनीता'ची थट्टा करण्यात केशवकुमारांबरोबर इतर कवींनीही भाग घेतलेला दिसतो.[१] अनंततनयादींनी सुनीतावरच सुनीते रचली. 'स्वनीत की सुनीत' आणि 'सॉनेट' अशी त्यांची दोन सुनीते आढळतात. पहिल्यात त्यांनी सुनीतला वैकल्पिक मान्यता दिली होती ती अशी :

सुनीत अभिधा तुझी प्रिय जया सुराज्यी रवी।
स्वराज्य रुचते जया स्वनित नाम त्यां तोषवो
(हृदयतरंग, पु. ३, ९४-९५)

तर त्यांनी 'सॉनेट' या सुनीतात-

सॉनेटा, तू असुभग जरी चित्रकाव्यापरी रे
सन्मानी मी तरि तुज गड्या एक अतिथ्य-भावे
(हृदयतरंग, पु. ३, पृ. ९४)

---

१. 'पांचजन्याङ्का'त 'कुक्कुटबांधव' नामक कवीने 'मी बोम्म मारू कसा' या मथळ्याचे एक सुनीत लिहून त्याचे वृत्त 'शुनीत' असे दिले आहे. हे 'कुक्कुट माधव' म्हणजे स. अ. शुक्ल अर्थात् कवी कुमुदबान्धव होत, असे श्री. रं. न. होनप ऊर्फ कवी बगाराम यांनी सांगितले.

असे त्याचे स्वागत केवळ आतिथ्य-भावनेतून केले. सुनीताचे काव्यवाहन शार्दूल-विक्रीडित असावे, मंदाक्रांता असावे की एकादे जातिवृत्त असावे, यावरही वाद होता. सुनीताचे नाव, त्याचे वृत्त, त्याचे चौदा चरणांचे बंधन, त्याचे अष्टकषट्क व द्वादशपद द्विपद असे खंड, त्याचा आशय कानांनी ऐकायचा की डोळ्यांनी पाहायचा येथपर्यंत साऱ्याच गोष्टींबाबत मतभेद होते. प्रा. श्री. नी. चापेकर, ना. म. भिडे, ज. बा. पाटणकर, रा. प्र. सवनीस, माधवराव पटवर्धन, श्री. बा. रानडे प्रभृती अतिरथीमहारथी आखाड्यात उतरले होते. ' सुतक ' वरील टीपेत ' पानपतच्या लढाया ' म्हटल्या आहेत त्या याच. पुढे रविकिरणमंडळाचा पक्ष जोरदार ठरून ' सुनीत ' हे नावच कायम झाले. या सर्व रणधुमाळीची हकीगत ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या ' दोन तपे ' मध्ये (१९४५, पृ. २३४-२३६) ना. म. भिडे यांच्या ' काव्यदीपिका ' या लेखसंग्रहात (१९६५, पृ. १३१-१५२) व ' मराठी सुनीत ' या सुनीतसंग्रहाच्या प्रस्तावनेत (संपा. कुलकर्णी व बुद्धिसागर १९५१, पृ. १९-३३) विस्ताराने वाचावयास मिळते. 'संशयरत्नमाला' म्हणून गिरीशांचे मोरोपंती धर्तीचे पण विनोदाच्या अंगाने जाणारे, त्या काळातले एक दीर्घ काव्य आहे. त्यात 'झेंडूच्या फुलां 'चा खास लक्षणीय उल्लेख असून लगोलग या वादाच्या हटेतंडीचे वर्णन आलेले आहे. ते वर्णन असे :

की झेंडूची फुले कुणि भेट तुम्हा पाठवी कवी थोर,
स्तुतिकौमुदी-वर्षावी काय विसरला तुम्ही कविचकोर ?
किंवा लिहुनि ' सुनीते ' ठेवियली लेखणी तुम्ही खाली ?
वाद करायासाठी काठी किंवा करामधे आली ?
परि जाहले सुनीत-स्वनितक-वादात कैक हैराण
या गाजवा हुशारी, करुनी वाङ्मय पुरेचि वैराण.
होउनि रणसंग्रामे आली विद्वन्मुखावरी लाली
तरि जग उद्धराया वेळ असे सर्वथैव ही आली.

(शलाका, १९२५, पृ. ४०)

खुद्द रविकिरणमंडळातल्या गिरीशांसारख्या सुनीताच्या पुरस्कर्त्या, संयमशील व जबाबदार कवीने केलेले हे वर्णन वाचल्यावर केशवकुमारांनी या वादाची केलेली थट्टा सकारण नव्हती किंवा तीत फाजील अतिशयोक्ती होती, असे खचितच म्हणता येणार नाही. ' सॉनेट 'चा बाप्तिस्मा ही जणू साहित्यविश्वातली जीवनमरणाची समस्या असल्यासारखी ही हमरीतुमरी चाललेली होती. स्वनीत, स्वनितक, गीतक यासारखे जे तऱ्हेतऱ्हेचे शब्द पुढे येत होते, त्यांना एका झटक्यात सूर्याची पिले दाख-

विण्याचे कार्य 'सुतक' या तीन अक्षरी शब्दात केशवकुमारांनी साधले आहे.[१] माधवराव पटवर्धनांनी 'महाराष्ट्र साहित्या'तील लेखात गज्जलादी काव्यप्रकारांची लक्षणे सांगताना 'वितस्ता', 'तुंगभद्रा', 'द्विगणी' (पृ. ३१३) अशी देऊन त्यात पुढे 'षड्गणी, अष्टगणी' यासारखी जी छंदःशास्त्रीय भाषा सिद्ध केली, तिच्याशी समांतर अशी 'सुतक' या धर्मशास्त्रीय कल्पनेशी सुसंगत होणारी 'सुतक–सपिंडी, सुतक–सप्रवरी' ही परिभाषा व वृत्तनोंदपद्धती केशवकुमारांनी खास सिद्ध केली.

अशा रीतीने काव्यप्रकारनाम, तळटीप, प्रश्नावलीतील पाचवा प्रश्न या आनुषंगिक गोष्टींशी तत्कालीन विशिष्ट वादाचे वा व्यक्तींचे धागेदोरे लावता आले, तरी 'आम्ही कोण ?' या विडंबनकवितेचा सामूहिक रोख विशिष्ट कवींविरुद्ध नसून सामान्य कविव्रवाच्या लटपटीखटपटींविरुद्ध आहे. येथे व्यक्तीऐवजी प्रामुख्याने प्रवृत्ती विडंबित झालेली आहे.[२] सत्कवींचे महिम्नस्तोत्र गाणारे मानघन केशवसुतांचे आशयघन शब्द आणि या शब्दजुळाऱ्यांचे पोकळ शब्द यांचा सन्मुखविन्यास (Juxtaposition) झाल्याने टीकेचा धारदारपणा वाढलेला आहे.

**मोहोरममधील मर्दुमकी :** सनातनी राष्ट्रीयत्वाच्या चलतीच्या काळात ऐति-

---

१. येथे एक किरकोळ विसंगती सांगण्यासारखी आहे. 'झेंडूच्या फुलां'च्या २ऱ्या म्ह. ३० सालच्या आवृत्तीला प्रथम प्रश्नावली जोडण्यात आली. तीत पाचवा प्रश्न असा आहे : 'सुतक हे काय प्रकरण आहे ? वाटेल त्या विषयावर दोन मिनिटात एखादे सुतक बनवून दाखवा, मात्र ते लिहीत असताना सुतकी चेहेरा करू नका.' माझ्या संग्रही 'झेंडूच्या फुलां'ची तृतीयावृत्ती होती. तीत 'आम्ही कोण ?' या शीर्षकाखाली 'सुतक' हा शब्द नव्हता की त्यावरची टीपही नव्हती. त्यामुळे प्रश्नावलीत 'सुतक'वरील प्रश्नाचे प्रयोजन काय, हा प्रश्न कित्येक वर्षे मला सतावून राहिला होता. काही वर्षांपूर्वी प्रा. अनंत काणेकर यांच्याकडे 'झेंडूच्या फुलां'ची २५ सालाची १ ली आवृत्ती पाहावयास मिळताच 'सुतका'चे हे गौडबंगाल उलगडले.

२. 'आम्ही कोण ?' याही कवितेचा रोख रविकिरणमंडळावर होता, असे आज झटकन् लक्षात येत नाही. पण पठाणवलबापैकी एक फकीर शं. कृ. देवभक्त म्हणतात, 'ज्ञानप्रकाश' दैनिकाच्या 'काव्यशास्त्रविनोद' या सदरात जेव्हा ही कविता प्रथम प्रसिद्ध झाली तेव्हा रविकिरणमंडळाच्या सभासदांत बरीच खळबळ उडाल्याची बातमी बाबुरावांच्या (केशवकुमारांच्या) कानावर आली. तेव्हा 'गोळी लागली रे लागली' अशी खात्री होऊन एका मागून एक विडंबनात्मक कविता प्रसिद्ध करायला त्यांनी सुरुवात केली.' ('माझ्या पहाण्यातले 'बाबुराव',' आचार्य अत्रे विविधदर्शन, मुंबई १९५८, पृष्ठ १२५.)

हासिक हुतात्म्यांवर विलापिका रचण्याची साथच येऊन गेली होती. विलापिकांचे जथाबंद कारखानदार म्हणजे दु. आ. तिवारी, त्यांच्या विलापिकांची चालही ठरलेली होती : उद्धवा शांतवन कर जा ! राजकीय क्षितिजावर म. गांधींचा उदय झाल्यापासून हिंदुमुस्लिम ऐक्याचे कृत्रिम गोडवे गाण्याची चढाओढ सुरू झाली होती. 'काफीर आम्ही आल्लास मानू, मुस्लिम आम्ही रामास वानू... सर्वत्र होवो राष्ट्रीय सङ्कर, वंदे तमीशं ! अल्लाहु अक्बर !' (उषा, पृ. ४६–४७) अशी आगाऊ बांग माधव जूलियनांचा 'नव्या मनूतला हिंदी फकीर' देऊ लागला होता. हे उसने अवसान केशवकुमारांच्या चोखंदळ दृष्टीला खुपले असणार. 'मंगल' मोहोरमच्या सणात हुसेन आणि हसन यांच्या स्मृतीने विमनस्क होऊन रेवड्या फेकल्यामुळे हातात बेड्या पडलेल्या एका (वेड्या) पीराचे चित्र तिवारींच्या कंठाळी चाली बसवून, केशवकुमारांनी त्या उबवलेल्या वातावरणाची चांगलीच रेवडी उडविली आहे. 'वाटले काय हृदया अन् ते सांगु कसे मी भगवन्' हा 'तुझा मी तूही हो माझी' या माधव जूलियनांच्या कवितेतील 'उन्हाळे पावसाळे अन् हिवाळे लोटले भगवन्' या चरणाचा प्रतिध्वनी आहे. 'त्या इब्राहिमा जैसा तो याकुब झ्याला नाही' ह्यात वडाची साल पिंपळाला जोडून टीपांचा प्रपंच करून आपल्या ज्ञानाचे प्रदर्शन करणारांची थट्टा केली आहे. 'निराशेतील समाधान' (मधुमाधव, पृ. ४९) या माधव जूलियनांच्या कवितेतील 'अल्लाने त्या निम्रूदाच्या भव्य अग्निकुंडी निर्मिली बाग थंडगार । अदाह्य इब्राहीम मधोमध, मलकांच्या झुंडी' इत्यादी चरणांची ही थट्टा दिसते. प्रा. म. वा. धोंड यांनी 'झेंडूच्या फुलां' वर दिलेल्या व्याख्यानात (१७–१९ मार्च १९७२) 'मोहोरमची मर्दुमकी' ही माधव जूलियनांच्या 'चंबळेच्या तीरावर' (काव्यरत्नावली, व. ३२ अं. ११, नोव्हें. १९२४, पृ. २८६–२९२) या कवितेचे विडंबन असल्याचे म्हटले होते. त्या कवितेच्या प्रास्ताविकात 'मोहोरम आणि दसरा' एकाच दिवशी आल्याचा उल्लेख आहे, तद्वत प्रस्तुत कवितेत मोहोरमचा दिवस रविवार आल्यामुळे हकनाक सुटी बुडून जिव्हारी शल्य शिरल्याचा उल्लेख येतो, तसेच कोटा येथील चंबळेच्या तीरावरचा तो दसऱ्याचा समारंभ पाहताना कवीला वर्तमानकालीन दुःस्थितीची जशी खंत वाटते, त्याप्रमाणे येथे 'राष्ट्राच्या यशाला डाग' लागल्याची खंत उबळ आल्यासारखी व्यक्त झालेली आहे. पण या पलीकडे माधव जूलियनांच्या 'चंबळेच्या तीरावर' या कवितेशी या विडंबनगीताचे साम्य नाही.[१] तिवारीछाप संग्राम-

१. 'पांचजन्यांक्का 'मध्ये 'होलिका–संमेलन' म्हणून एक लेख आहे. त्यात 'सम्राट हा सणांचा । शिम्गा–महात्म्य ऐका' या ओळींनी सुरू होणारे एक गझल आहे. त्यात 'ही वंद्य रूढि बाला । परकीय देति धक्का । खर्चू नकाच टक्का । जागा स्वधर्म हक्का' असे चरण आहेत. शेवट 'व्हा शूर

गीतांचे सूर मात्र सतत जाणवत राहतात. हिंदुमुस्लिम ऐक्याच्या कृत्रिम उत्साहाची थट्टा करताना भाषा अगदी उचित म्हणजे फार्सीमिश्रित ठेवली आहे. उदा. 'आनंद काही तो और। क्या कहुं मैं तुमकू यार। जिव झाला कत्तल ठार। अंगात पीर संचरला। हैदोस दुलाबे धूला.' 'वाटले काय हृदया अन्। ते सांगु कसे मी भगवन्' हे मुस्लिमाच्या तोंडी घातलेले 'हिंदू' उद्गार, 'अवरंगजेबरायाला' हा अप्रयोजक लडिवाळपणा किंवा 'वर्णिल ना कविचा बाप' यासारखे रासवट चरण वीरविडंबनाची (Mock-heroic) खुलावट वाढवितात. कुठचे तरी आडरानातले उल्लेख कवितेत आणून त्यावरील टीपांत ज्ञानाचे प्रदर्शन मांडण्याच्या लकबीची टिंगल, कुराणाचा आधार तपशीलवार दिल्याचा बहाणा करून चांगली साधली आहे. पहिल्या आवृत्तीतले 'कबडचापीर' हे कवीचे नाव आणि 'शेख सल्ल्याचा दर्गा, पुणे शहर' हा कवीचा पत्ता पुढील आवृत्त्यांतून गाळला आहे. पाचव्या कडव्यातील शेवटच्या चरणात 'नामर्द देश हा बनला' यानंतर पहिल्या २ आवृत्त्यांना 'या अल्ला, या बिसमिल्ला!' असा चरणार्ध होता, तो तिसरीपासून 'क्या हुवा असे या अल्ला' असा बदललेला आहे. एकंदरीत ही कविता 'वीरविडंबना'चा एक उत्कृष्ट नमुना आहे, यात संशय नाही.

**सखे बोल – बोल** : या विडंबनकवितेची प्रेरणा दोन कवितात शोधता येते. १ल्या आवृत्तीत 'सवाई जननी जनकज' असे विडंबित कविनाम आहे. 'जननीजनकज' नावाने एक कवी[२] त्या काळी कविता करीत. या कवितेचे निमित्त होण्याजोगी त्यांची कविता म्हणजे 'रुष्ट सुंदरीस' (काव्यरत्नावली, व. २९, अं. १० (ऑक्टोबर १९२१), पृ. २३९–२४०). 'मी मीन तू स्वर्नदी' यासारख्या माधव ज्यूलियनी शब्दांत रुष्ट झालेल्या प्रियेची समजूत काढण्याचा प्रसंग तीत आहे. कवितेचा शेवट 'सेवू ओष्ठ सुधा? – कळी उमलली आता न काही कमी' असा आहे. प्रसंगात साम्य असले, तरी केशवकुमारांचा अधिक कटाक्ष द. अ. आपटे अर्थात अनंततनय यांच्या 'विनोदलहरी'तील 'वीररस' या कवितेवर आहे. (हृदयतरंग, पु. २, पृ. १३०) अनंततनयांनी (आपल्या मते) हास्यकारक कविता म्हणून

---

सव्यसाची। निःशंक शंख ठोका।' असा आहे. ह्या गझलातील 'टक्का', 'धक्का', इ. शब्द मा. जूलियनी आहेत. पण कवितेच्या कर्त्याची मात्र कल्पना करता येत नाही. (पांचजन्यांक, पृ. ३०)

२. हे कवी बेळगावकडचे असून त्यांचा १०–१२ कवितांचा संग्रह प्रसिद्ध झाला असल्याची माहिती उपरिनिर्दिष्ट व्याख्यानमालेत प्रा. धोंड यांनी सांगितली होती. कऱ्हाडचे पु. पां. गोखले हे जननीजनकज नावाने कविता करत असत, असेही एक वृद्ध म्हणाले. 'जननीजनकज'– एक की अनेक?' ह्या आ. अत्र्यांच्या थट्टेखोर सवालाची येथे आठवण व्हावी.

या लहरी लिहिल्या आहेत, त्यांच्या ' नवरसमंजरी 'तसुद्धा ' हास्यरसा'वर कविता आहे. पण उत्कंठा वाढवून ' ओम फस ' करण्याचे विनोदाचे खास तंत्र असते, ते त्यांना अवगत नसल्यामुळे त्यांच्या या कविता हास्यकारक होण्याऐवजी हास्यास्पद होऊन विडंबनविषय झाल्या. सखीच्या डोळ्यांतील आसवे पाहून तिचा वल्लभ तिला आवेशाने विचारतो, ' कोणी तुला छळियले सखि बोल बोल ' त्यावर सखी उत्तरते, ' लागोनि नाथ विडिचा आपुल्याच धूर। चाले मदीय नयनी अजि अश्रुपूर. हा चुटका गंमत म्हणून मुळात वाईट नव्हता. पण अनंततनयाचे निवेदनकौशल्य उणे पडल्याने तो सपक उतरलेला आहे. पहिल्या आवृत्तीत या विडंबनकवितेचा शेवट असा होता :

' ...व्हा दूर—चावटपणा भलताच काय ?
अ-स्प-र्श मी ! ' कडकडे शिरि वीज ! ! हाय ! ! !

द्वितीयावृत्तीत ' अ-स्प-र्श ' ऐवजी ' स्पर्शू नका ' असा बदल केलेला आहे. त्या काळच्या कमी शिकलेल्या गृहिणीच्या तोंडी ' अस्पर्श ' या प्रौढ शब्दाऐवजी ' स्पर्शू नका ' हा खणखणीत नकारादेश अधिक शोभणारा असल्याने हा बदल केलेला असावा. द्वितीयावृत्तीत या प्रसंगाचे चित्ररेखाटनही दिलेले होते. ओढून ताणून आणलेल्या विनोदाच्या अवसानाची हास्यास्पदता उघड करणारी अशी ही ग्राम्य विडंबनकविता आहे.

**रस्त्यावर पडलेले विडीचे थोटूक** : एकाच विषयावर अनेकांच्या कविता असण्यात काही गैर आहे असे नाही. मृत्यू, आई यांसारख्या विषयांवर तशा त्या आढळतातही; परंतु विषय आगाऊ ठरवून त्यावर दोघांनी किंवा अनेकांनी मुद्दाम कविता रचणे यात कृत्रिम चंद्रबळ आहे. रविकिरणमंडळातील कवींनी ही टूम काढली होती. ' स्थानभ्रष्ट फुलास ' या विषयावर दोन चतुर्दशके किंवा सुनीते गिरीश आणि यशवंत यांनी एकाच दिवशी रचलेली आहेत.या कविद्वयांच्या 'विणाझंकार' संग्रहात ती एकरंगी, एकशिंगी पद्धतीने समोरासमोर छापलेली असून दोहोंच्याखाली २३ ऑगस्ट १९२२ ही एकच तारीख आहे.[१] ' स्थानभ्रष्ट फुलास ' पाहून गिरीशांच्या कवितेतील नायकाला हळहळ वाटते, पण जनाची व मनाची ओशाळगत वाटून तो ते न उचलताच त्याला डावलून पुढे जातो. यशवंतांचा नायक ते उचलून घेतो; पण ज्या केशकलापातून ते पडले तेथे पुन्हा स्थानापन्न करण्याचे

---

१. या ' महाराष्ट्र वीणाझंकार ' पुस्तकाचे एक निनावी परीक्षण त्या काळी आले होते. त्यात २३ ऑगस्टला ' मधुगौरिवृंद फिरता शृंगारिली वीथिका ' हे होणे असंभाव्य; तसेच ऑगस्टात, विलसली शोभा वसंती नवी — राने मोहरली ' हा देखावाही अशक्य, असे आक्षेप घेतलेले होते. ( महाराष्ट्र साहित्य, व. ४ अं ५ (नोव्हेंबर १९२२), पृ. १८६).

भाग्य (धैर्य ?) नाही, म्हणून हळहळ व्यक्त करतो. केशवकुमारांनी हा वृत्तिभेद विडीचे थोटूक उचलून टोपीत खोचणे आणि तात्काळ शिलगावणे या कृतीतून दर्शवून या एकूण कृत्रिमतेवर चांगलाच उतारा दिला आहे. भगवंत भांबुर्डे व जॉ. थॉमसन; सॅन्टाक्रूझ ही विडंबित कविनामे दुसऱ्या आवृत्तीपासून गाळली आहेत. सुनीतयुग्माला प्रारंभी जे प्रास्ताविक जोडले आहे त्यात ' ती (दोन्ही सुनीते) शुद्ध शास्त्रीय पद्धतीची व स्वदेशी वनस्पतीची आहेत याबद्दल सुनीतपंथी शाहिरांकडून शेरा मिळालेला आहे,' अशी 'झेंडू फार्मसी 'च्या व्यापाराशी सुसंगत ठरणारी शिफारस केलेली आहे. तीमधील 'शाहिरांचा ... शेरा' हा उल्लेख खोचक आहे. माडखोलकरांनी 'दोन चतुर्दशिका' नामक लेख लिहून या सुनीतद्वयाची जी प्रशंसा केली होती, तिचाही या शिफारशीने मर्मभेद केलेला आहे. शेवटी वाचकांना विनंती करताना 'दाढीला हात लावून ' हे जे शब्द होते, त्यात 'दाढीला (असल्यास) हात लावून ' अशी सुधारणा दुसऱ्या आवृत्तीपासून करण्यात आलेली आहे.

**कषाय-पेय-पात्रपतित-मक्षिके-प्रत** : चहाच्या कपात पडून मेलेल्या माशीला उद्देशून लिहिलेली ही विलापिका आहे. ती ' पुण्यातील एका वृद्ध व विद्वान परंतु क्लिष्टरचनाकुशल कविशार्दूलाची थट्टा ' असल्याचे लेलेशास्त्र्यांनी दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. हे कविशार्दूल म्हणजे ' राघवीय परीवाह ' कर्ते विद्याधर वामन भिडे. हे अत्र्यांचे शिक्षक होते. त्यांच्या अनुकरणाने आपणही प्रथम संस्कृतप्रचुर, क्लिष्ट कविता रचीत असू, असे अत्र्यांनी सांगितले आहे ( कऱ्हेचे पाणी, खं. १, पृ. ७६) तेव्हा चांगल्या घटविलेल्या हातांनी हे विडंबन लिहिलेले असल्याने, ते यशस्वी झालेले आहे हे सांगायलाच नको. वि. वा. भिडे हे संस्कृतप्रचुर रचना करीत आणि तळटीपांत ती स्पष्ट करीत. लेलेशास्त्र्यांचीही तीच तऱ्हा होती. येथे वि. वा. भिडे यांचे दोन श्लोक वानगी म्हणून उद्धृत करण्याजोगे आहेत.

बाहुदन्डबलातिरेकपराजितोन्मदराजक ।
शातकुम्भनगप्रदानविधिप्रमोदितयाचक ॥
यातुधानविमर्दने कृततापसाध्वररक्षण ।
मेदिनीपति तो प्रजाजनरञ्जनाहितलक्षण ॥

('सौमितेयसमुद्धार', १-३)

शोणचर्चितांग फुल्लकिंशुकद्रुमांपरी ।
रामलक्ष्मण क्षतांग लोळले महीवरी ॥
कोमलांग हे कुमार घोर मायिकच्छले ।
प्राप्तमोह लुप्तचेष्ट नष्टभान जाहले

('राघवीय परीवाह,' १९-७६)

'सौमित्रेयसमुद्धार', व 'राघवीयपरीवाह' या आपल्या काव्यनामांसंबंधीही भिडचांना आधी लांब खुलासा करावा लागला आहे. एखाद्या फलंदाजाने पहिल्या फटक्यालाच चेंडू सफाईने सीमापार करावा, तद्वत केशवकुमारांनी कवितेचे शीर्षक लांबलचक योजून पहिल्या झटक्यातच विडंबनाला पहारीने तोंड फोडले आहे. 'हा हन्त हन्त...' हे सुप्रसिद्ध वचन उद्धृत केल्यानंतर या कवितेचे पहिल्या आवृत्तीतले पहिले तीन चरण असे होते :

अयि नरांग–मल–स्वेदज भक्षिके,
लोक–शारिर–स्वास्थ्य–रक्षिके !
रक्तपरीक्षित–हारि तक्षिके

दुसऱ्या आवृत्तीत शब्दांना भिडचांच्या २ ऱ्या श्लोकाप्रमाणे सानुनासिकता अधिक आणून ते रोचक केले आहेत :

अयि नरांग–मल–शोणित-भक्षिके
जनु–विनाशक–जंतु–सुरक्षिके !
असु–परीक्षित–हारक तक्षिके ;

या समासघटित चरणत्रयाच्या पांडित्यावर चपखल बसलेली 'क्या हुवा अफसोस' ची तुर्की टोपी मात्र पहिल्यापासूनची आहे. 'आम्हि असू परि तू नसशील' या चरणातील ऱ्हस्वीकरणाच्या समर्थनार्थ जी तळटीप दिलेली आहे, तीमध्ये पहिल्या आवृत्तीत 'प्रो. लेलेशास्त्री यांचा तिलकांजळी' असा स्पष्ट उलगडा करणारा संदर्भ दिलेला होता, तो पुढील आवृत्त्यांमधून नाही. हा संदर्भ गाळण्याची काही कारणे संभवतात. बहुधा केशवकुमारांच्या विडंबनाचा परिणाम म्हणून लेलेशास्त्र्यांनी तो सदोष चरण पुढे बदललेला आहे. 'तिलकांजली'च्या १ ल्या १० ऑगस्ट १९२० च्या आवृत्तीत तो 'स्वराज्य अणि त्यासवे अम्हि गमावला मोहरा' असा होता, तर १९२१ साली निघालेल्या दुसऱ्या आवृत्तीत तो 'स्वराज्यसहित स्वतां दुरधिगम्य होशी मला' असा बदललेला आहे.[1] 'झेंडूच्या फुलां'च्या द्वितीयावृत्तीला खुद्द लेलेशास्त्र्यांचीच प्रशंसापर प्रस्तावना जोडलेली आहे, हेही टीपेतील उल्लेख गाळण्याचे कारण असू शकेल.

रघुनाथपंडिताचे हंसबंधन आणि येथले मक्षिकापतन यात केशवकुमारांनी मजेदार साम्याभास निर्माण केला आहे. माशीच्या मैत्रिणी तिला संकटात सोडून दूर गेल्याबद्दल गुजराथी गहिवर व्यक्त करत करत त्यांनी 'संकटी जगि कुणा न कुणी असे' असा 'कठिन समय येता' च्या धर्तीवर अर्थान्तरन्यास काढला आहे. रघुनाथ-

---

१. ही शक्यता गृहीत धरल्यास 'कषाय–पेय...' ही कविता १९२० ते २१ च्या दरम्यान लिहिली गेली व ती लेलेशास्त्र्यांच्या वाचनात आली, असे मानावे लागेल.

पंडिताचा ' कल कल कल हंमे ' हा श्लोक चिरपरिचित आहे. तत्कालीन विलापिका म्हटली की ह्या घाटणीचा श्लोक तीत आला नाही, असे होत नसे. माशीच्या अंतिम स्थितीचे बारकाव्याचे वर्णन करताना त्या श्लोकातील स्वभावोक्ती केशव-कुमारांनी कशी बहारीने लगामी लावली आहे, पहा :

फड फड फड पंखा हालवी ती तराया
तडफड बहु केली, जाहले कष्ट वायां,
मिटवुनि इवलेसे पाय, ती शांत झाली
आह, तडक आणी खालती खोल गेली !

भिडे, लेले, अनंततनय, श्री. नी. चापेकर या जुन्या पठडीतल्या कविमंडळीची एक खास लकब होती. ती म्हणजे क्षुल्लक गोष्टीतून अर्थान्तरन्यासांचे डोस पाजायचे. माशीच्या दुःस्थितीचे वर्णन करता करता ' नर जसा बुडतो भवडोही–' किंवा ' या अशा व्यसनात विलायती । अडकता फळ दारुण शेवटी !' यांसारखी बोधवचने काढून त्या लकबीची सुरेख थट्टा केली आहे. कौन्सिलातील सभासदांचे ' माशा मारीत बसणे ', नव्या नेत्यांच्या राजकारणात ' माशी शिंकणे ', यासारखे खोचक उल्लेख करताना माशीशी संबद्ध असे मराठी वाक्प्रचार मार्मिकपणे कारणी लावले आहेत. ' 'उपाहारगृहा'तील एका मात्रेचा फराळ ' हे तल्लख कोटिबाजपणाचे दुर्मिळ उदाहरण आहे. विलापिकांमधून ऊठसूट ' अहह, अरेरे ' सारख्या उद्‌गारवाचकांची रेलचेल असे. येथे ' अहह, अरे–अरे, अयाई ' यांच्याबरोबर ' हाय ' ' अफसोस ' यांचीही वर्णी लावून त्या लकबीची भेदक टर उडविली आहे. या विलापिकांचा शेवट हटकुन अनुष्टुपाने होत असे. या संकेताची थट्टा–

टाकुनी लांब सुस्कारा, उमाळा दाबुनी उरी
चहा तो शांतचित्ताने प्राशिला वरचे वरी.

या अनुष्टुपाने करून हे विलापिका विडंबन सुफळ संपूर्ण केले आहे.

या विडंबनात व त्यातील तळटीपांत तत्कालीन पुणेरी जीवनाशी निगडित असे अनेक उल्लेख येतात. उदा. गल्लीबोळांचा गलिच्छपणा, माशा घोंघावणारे ' मथुराभुवन 'उपहारगृह' अशा अशुद्ध पाट्या, तपासणी करणारा कोणी दत्तुभट नामक महात्मा,[१]

---

१. यासंबंधी म. म. द. वा. पोतदार यांनी सांगितलेली माहिती अशी : सुमारे १९१२ साली इतिहासाचार्य राजवाडे यांनी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत व्याख्यान देऊन नागरिकांच्या हक्क-संरक्षणासाठी निरनिराळी मंडळ स्थापावी, अशी कल्पना मांडली. तदनुसार पुण्यात एक ' आरोग्यमंडळ ' निघाले होते. त्याचे कार्यवाह दत्तात्रय हरी भट हे वकील गृहस्थ होते. ते दर रविवारी शहरात फिरून आरोग्यदृष्टचा पाहाणी करीत. त्यांच्या पाहाणीची प्रतिवृत्ते ' ज्ञानप्रकाशा 'त प्रसिद्ध होत असत.

गुळखोबरे हातावर ठेवणारी कोणी 'यमी'[२] यांतले काही उल्लेख खास समकालीन पुणेकरांच्याच ध्यानात आले तर येतील. तरीसुद्धा क्षुद्र विषयावरील व्याजगांभीर्याचा मुखवटा कोठेही उघडा पडत नसल्याने हे विलापिका विडंबन संपूर्ण यशस्वी ठरलेले आहे.

पण या कवितेवरील डॉ. माधवराव पटवर्धनांचा अभिप्राय काहीसा प्रतिकूल आहे. ते म्हणतात, '...पहिल्याच श्लोकात पहिल्या तीन ओळीतच विडंबन समाप्त होते; मग पुढे ते विडंबन केशवकुमारांना झेपेना की काय कोण जाणे ? एकंदरीने ही कविता स्वतंत्र विनोदीच मानावी लागते.' (काव्यविहार, पुणे १९४७,पृ.१६५) माधवरावांचे हे मत म्हणजे अर्धसत्य आहे. स्वतंत्र विनोदी कविता म्हणून ती आस्वाद्य होते, हे खरेच आहे. वि. वा. भिडे यांचा खाजगी उमाळा व त्याला पाट (परीवाह) फोडणारी संस्कृतप्रचुर रचना ही तात्कालिक निमित्त असून सामूहिकदृष्टचा ही कविता म्हणजे तत्कालीन कंठाळी विलापिकांचे विडंबन आहे, हे त्यांनी ध्यानात घेतलेले नाही. भिडे-शैली विडंबन हा एक स्तर, विलापिका–विडंबन हा दुसरा स्तर आणि स्वतंत्र विनोदी कविता हा तिसरा व्यापक स्तर असे तीन स्तर या कवितेला आहेत. माधवरावांनी दुसरा स्तर दुर्लक्षिला आहे.

**श्यामले** : केशवकुमारांच्या विडंबनपटुत्वाचा एक उत्कृष्ट नमुना अशी ही कविता. एखाद्या पंचाक्षऱ्याने स्वतःला तात्पुरते झपाटून घेऊन एखाद्या झपाटलेल्या झाडाचे भूत उतरवावे, तसा प्रकार इथे झालेला आहे. विरोधी भक्तीच्या पातळीवर केशवकुमार प्रथम माधव जूलियनांकडे आकर्षिले गेले. त्यांनी म्हटले आहे, '...तिच्या (माधव जूलियनांच्या कवितेच्या) विक्षिप्त शब्दभूषेमुळे आणि तऱ्हेवाईक छपाईमुळे ती विशेष हास्यास्पद वाटत होती, 'वन्दे त्वमेकम् अल्लाहु अक्बर्' हा डोक्यावर पगडी आणि कमरेला लुंगी नेसलेल्या त्यांच्या त्या वेळच्या काव्याचा, एकच विक्षिप्त नमुना माझ्या म्हणण्याची सत्यता पटवून द्यावयास पुरेसा आहे.' ('मी विडंबनकार कसा झालो ?' परिशिष्ट ३, पृ. १४७ पहा.) झटकन डोळ्यावर याव्यात अशा बटबटीत लकबी माधव जूलियनांच्या प्रारंभीच्या कवितेत कित्येक होत्या, यात संशय नाही. पण केशवकुमार केवळ बाह्यांगावरच थबकले नाहीत. त्यांच्या व्यक्तित्त्वाच्या अंतरंगाशी जाऊन भिडले, होता होता माधव जूलियन झाले नि त्या तशा अवस्थेतच बहुधा हे विडंबन अवतरले. मा. जूलियनांच्या कवितेच्या बाह्यांगी आणि अंतरंगी लकबी विडंबनकाराच्या कल्पक विनोदबुद्धीत घोळून जे अद्‌भुत रसायन तयार झाले, तेच हे विडंबनगीत !

केवळ बाह्य शब्दकळा तुलनात्मक रीतीने पाहिली, तर या एका विडंबनगीतात

---

२. ही शाळूकराच्या बोळातल्या एका उपाहारगृहातली मुलगी होती, अशी माहिती वाईचे डॉ. प्र. शं. मराठे यांनी सांगितली.

मा. जूलियनांच्या पंचवीसतीस तरी कवितांतले खास शब्दप्रयोग लगामी लावलेले दिसून येतील. परंतु शब्दकळेबरोबर गझलाचा घाट, त्याची लय आणि त्याचा आशय यांचा विचार केल्यास 'श्यामले–' किंवा 'महाराष्ट्र साहित्य, पु. ४ अं. १ मधील नमुन्याचे दहावे गझल आणि 'सद्गुणसुंदरी' ( उषा पृ. ४३/४४ ) किंवा 'महाराष्ट्र साहित्या'च्या त्याच अंकातील नमुन्याचे पंधरावे गझल, या दोन कवितांचे यात प्रामुख्याने विडंबन केलेले दिसून येईल. त्याचप्रमाणे 'राजकन्येस जोहार' (मधुमाधव, पृ. ६६) व 'सानुली' (किंवा म. साहित्य, ग. क्र. १६) या गझलांच्या अपरिष्कृत संहितेतील विशेषांचे पडसादही त्यात उमटलेले दिसतील.

'झेंडूच्या फुलां'च्या १ ल्या आवृत्तीतील या विडंबनगीताची संहिता आणि पुढील आवृत्त्यांतील संहिता यांत काही फरक आढळून येतो. तो फरक असा :

| १ ली आवृत्ती | नंतरच्या आवृत्त्या |
|---|---|
| ...मी तो फकीर वटोदरी ! | मी तो फकीर कलन्दरी ! |
| मी गच्छचे रण निर्दळी | मैदान मी थरपार्करी |
| | ...पॅटीस तू, कटलेट मी |
| | ऑम्लेट मी, तू सागुती |
| | कान्देबटाटे–भात मी ! |
| | मुर्गी बिऱ्यानी तू तरी. |
| ...घे भाकरी, घे खापरी | ....ताम्बुल घे, आम्बील घे, |
| बासुन्दि आणि शिरापुरी | घे भाकरी, घे खापरी ! |
| परि शाङ्करी करुणा करी | किती थाम्बु मी ? म्हण 'होय' ना |
| थाम्बीव ही फसवेगिरी | खचली उमेद बरे उरी, |
| बन्दा तुला मुजरा करी | झिडकारुनी मजला परी |
| सोडून दे जादूगिरी ! | मत्प्रीतिचा न 'खिमा' करी ! |

पहिल्या आवृत्तीत विडंबनकर्त्याचे नाव 'मौलाना अल्लाउद्दीन खिलजी' असे दिलेले होते, ते पुढील आवृत्त्यांतून गाळले आहे. 'इस्तंबुलीं अबीर मी' हा पहिल्या दोन आवृत्त्यांतून आढळणारा पाठ 'इस्तंबुलीय अबीर मी' असा तिसऱ्या आवृत्तीपासून, वृत्तसुखार्थ सुधारला आहे. पॅटीस–सागुती–बिऱ्यानी इ. अभक्ष्यभक्षण विशेष व त्यांवरील 'सोराबजी' संबंधीची टीप द्वितीयावृत्तीपासूनची भर आहे. ही भर पडण्याचे कारण असे दिसते की, १९२६ साली प्रसिद्ध झालेल्या मा. ज्यूलियनांच्या 'विरहतरंगा'च्या प्रथमावृत्तीत अभक्ष्यभक्षणाचा उल्लेख आला होता. उदा. – तात्या फार उदार ते न कवटे वा स्पर्शती सागुती। गोडी तू नव लाविता संवय ती लागे मला मागुती (तरंग २२ श्लो. १५२). किंवा असेही असेल की, मा. जूलियनांच्या नायकाला ही जशी अभक्ष्यभक्षणाची गोडी लागली, तद्वतच 'झेंडूच्या

फुलां'च्या दुसऱ्या आवृत्तीच्या काळापर्यंत (१९३०) विडंबनकाराचीही या अभक्ष्य-विशेषांशी उत्तम जानपछान झाली असावी. कारणे काहीही असोत, पहिल्या आवृत्तीतील सोवळया 'बासुन्दी आणि शिरापुरी 'पेक्षा मुर्गीबिऱ्यानी हे अभक्ष्य पदार्थ विडंबनाच्या फार्शी अंगाला बाळसेदार बनविण्यास कारणीभूत झाले आहेत. पूर्वीचे 'कच्छचे रण' भारतीय होते; फार्शी वाटत नव्हते. त्यापेक्षा 'थरपार्करी मैदान' सिंधपलीकडे आहे. शिवाय ते विस्तृत आणि जगात कोरडे म्हणून प्रसिद्ध आहे. त्यामुळे त्याच्या उल्लेखाने नादमयतेबरोबर फारशीमयता आणि अर्थघनताही वाढली आहे. 'किती थाम्बु मी। म्हण 'होय' ना' या बदललेल्या चरणांनी भावनेची आर्तता वाढलेली असून शिवाय ते 'मज आपला म्हण की आता। तुजवाचुनी दुनिया सुनी' (सहधर्मिणीस', मधुमाधव, पृ. ६९) या चरणांचे स्मरण करून देणारे आहेत. पहिल्या दोन आवृत्त्यांमधील वृत्तविषयक नोंद 'तुङभद्रा, मिथुनराशी, मध्यनाडी, राक्षसगणी' अशी होती. तीमधील 'मध्यनाडी' हा असभ्य शब्द पुढील आवृत्त्यांतून गाळलेला आहे. १ ल्या आवृत्तीतील 'वटोदरी' (बडोद्याचा) हा वैयक्तिक संदर्भसूचक शब्द काढून टाकून त्याच्या जागी 'कलन्दरी' असा फार्शी बाजाला साजणारा शब्द योजण्यात आलेला आहे. 'तू मद्रदेशीय श्यामला' हे मा. जूलियनांचे वरदा नायडू प्रकरण सुचविणारे शब्द मात्र पहिल्या आवृत्तीपासून कायम ठेविलेले आहेत. 'शाङ्करी' या शब्दाचा संबंध मा. जूलियनांच्या प्रेयसीशी जोडल्याचा तर्क करावासा वाटतो, परंतु 'शाङ्करी करुणाकरी' हे बहुधा 'जय शंकरा। करुणाकरा 'सारख्या एखाद्या जुन्या नांदीच्या पदाचे प्रतिध्वनी असावेत.

केशवकुमारांच्या विडंबनकलेची चातुरी अधिक चांगल्या रीतीने स्पष्ट व्हावी म्हणून 'श्यामले–' या विडंबनातील पाठ आणि मा. जूलियनांच्या काव्यातील तत्सम पाठ समोरासमोर मांडण्याचा येथे प्रयत्न केला आहे :

| केशवकुमार | मा. जूलियन |
|---|---|
| १. अल्ला घरीची तू परी | १. बेहस्तांतिल परी ('कौमार्यस्मित') |
| २. मी तो फकीर वटोदरी | २. बनलो फकीर कबीर मी ('सद्गुणसुंदरी') |
| ३. तू भूमि पिकाळ गुर्जरी | ३. गुजराथेच्या सुपीक उंची तप्त जमीनीवरी ('वाग्यत मोहिनी') |
| ४. बैडोल वक्र त्रिकोण मी | ४. तेढा कुरूप मी... ('पुजारी', गज्जलांजली, पृ. ९०) |
| ५. तू लम्बवर्तुळ गे परी | ५. तव लंबवर्तुळ चेहरा ('सद्गुणसुंदरी') |
| ६. तू वाढली कितीही जरी।<br>मज वाटसी पण छोकरी,<br>जरि मूल हे कमरेवरी। | ६. जरि यौवनी शिरलीस चंचल पाउली<br>तरि लाडके मज तू सदैवच तान्हुली<br>बघुनी तुला म्हणतो विमोहुनि सानुली |

| केशवकुमार | मा. जुलियन |
|---|---|
| तरि तू मला छकुल्यापरी ।<br>गांभीर्य आणि वयस्कता ।<br>जरि ही तुझ्या मुखड्यावरी,<br>स्मरते मला तव सानुली !<br>मूर्ती मनोहर पर्करी ! | (महाराष्ट्रसाहित्य, 'गज्जल क्र. १६')<br>'नवतीत बालिशता जरा–' ('सद्‌गुणसुंदरी |
| ७. लव हांसरी, लव लाजरी | ७. लव हांसरी; लव लाजरी<br>('सद्‌गुणसुंदरी') |
| ८. चिनि मातिची जणुं बाहुली | ८. प्रिय तू मला जशी या नव्या मम शैशवी<br>नव्हती तुला कधी शैशवी तशि बाहुली<br>(म. साहित्य, 'गजल १६') |
| ९. मऊ शुभ्र सफेत नि पांढरी | ९. सित कान्ति किंचित आरुणी<br>('सद्‌गुणसुंदरी') |
| १०. तू दोन इंच जरी दुरी,<br>फर्लाङ्ग भाससि गे परी | १०. किती मैल अंतर राहिले अपुल्यात<br>यौवनमञ्जरी ('सद्‌गुणसुंदरी') |
| ११. चल श्यामले, म्हणुनी घरी<br>बसुं खेटुनी जवळी तरी । | ११. बसू, हसू, रुसू... जवळ ये<br>बेहस्तांतिल परी ('कौमार्यस्मित') |
| १२. घे भाकरी, घे खापरी | १२. दे भाकरी, दे खापरी<br>(म. साहित्य, 'गज्जल क्र. १०') |
| १३. बन्दा तुला मुजरा करी | १३. बन्दा तुझी सेवा करी<br>(म. साहित्य, 'गज्जल १०') |

विडंबनगीताचे तोंडच किती झकास फुटले आहे ! 'तु छोकरी नहि सुन्दरी' या सलामीच्या चरणातच, अर्थाला मुरडण्यासाठी 'नहि' शब्द योजण्याची मा. जूलियनांची जी तऱ्हेवाईक लबक होती, तिचे झकास विडंबन झाले आहे. या पहिल्या फटक्याचा परिणामही झालेला दिसेल. त्यांच्या 'सद्‌गुणसुंदरी'त असे–

नजरेत जादुगिरी पुरी, अनुरागवर्धक माधुरी
नहि मत्त मादक आसुरी, नहि तीक्ष्ण मारक खज्जरी.

'नहि'युक्त चरण होते. पुढे 'गजलांजली'त ह्या कवितेचे शीर्षक 'मानस-सुन्दरी' असे दिलेले असून प्रस्तुत चरणातील 'नहि'च्या जागी 'नच' असा फरक केलेला आहे.

मा. जूलियनांच्या 'श्यामले–' मध्ये 'दे भाकरी, दे खापरी !' असा देकार आहे, तर विडंबनात 'घे भाकरी, घे खापरी !' असा घेकार आहे. तसेच अशा

देऊ नको तू चुम्बने, देऊ नको आलिङ्गने
देऊ नको तूं दर्शने, प्रीती तरी मी नावरी
हे मंजुले, हे स्वाकुले, हे हृत्प्रभे, हे दुर्लभे,
हे कामिनी, हे मानिनी, येऊ नको तू पज्जरी.

रीतीची पदपुनरावृत्ती आणि एकारान्ताचे बाहुल्य पहिलीत आहे. विडंबनात हीच लय पकडून 'गाडगे, माडगे, वाडगे' यांसारख्या हास्यास्पद एकारान्तांची गर्दी उडवून दिलेली आहे. माधव जूलियनी गझलांचा प्रतिभास निर्माण करण्याच्या दृष्टीने विडंबनामधील आणखी एक गोष्ट साहाय्यभूत होते. काबुली हिंग, कंदाहरी आक्रोड, सहाऱ्यातील खर्जुरी, इस्तंबुलीय अबीर, थरपार्करी मैदान यांच्या निमित्ताने मुसलमानी मुलखात मुशाफिरी होऊन विडंबनाच्या फारशी वातावरणाला गडदपणा येतो. माधव जूलियनांच्या गझलांतून आढळणारी आणखी एक खास लकब अशी की, त्यातला नायक वा प्रियकर स्वत:कडे ऊनोक्तीने अतिशय कमीपणा घेत असतो व प्रेयसीला अत्युक्तीने हरभऱ्याच्या झाडावर चढवीत असतो. त्यातून 'मी अमुक, तर तू तमुक' अशी विरोधगुणन्यासी वर्णने त्यांच्या कवितेत वारंवार भेटतात. उदा. :

मी भक्त भिकारी, तर राणी कमला तूं
चुम्बू मजला दे तरि घोळकिनारी ('रानकिशोरी')
कुठे भणङ्ग खुळा मी, कुठे रमा ललिता !
अमोल कौस्तुभ तू, मी भिकार काचमणी. ('अगोट')
असे ना हीन मी प्राणी ? न पर्वा, तू महाराणी. ('तुझा मी, तूही हो माझी')
जुई तू, मी न परी मोगरा । न मी कुणी विख्यात मोहरा. ('कौमार्य-स्मित')
मोर कुठे तो, कुठे पारवा
व्याध कुठे तो, कुठे काजवा ('राजकन्येस जोहार')
कुठे मी काजवा या भूतलीचा । कुठे तारा स्थिरे जी अन्तराली
कुठे कोपीत मी माझ्या तृणाच्या । कुठे तू तुझ्या ऐने महाली.
कुठे एकादशी माझी सदाची । कुठें रात्री तुझी गाजे दिवाळी ('हेमन्त')

या 'मी–तू' विषयक कल्पनांच्या विडंबनात केशवकुमारांनी 'बेसूर राठ सुनीत मी । कविता चतुर्दश तू खरी' अशी निरर्थकतेमुळेच साभिप्राय झालेली गंमतीची कल्पना लढविली आहे. मा. जूलियनांच्या रचनेतसुद्धा अशा अचेतनावरील तरल कल्पना आढळून येतात :

पुसेल कोण मला ? ख्याल भावमन्थर मी ।
हळूच हृत्सुमनी नाच परी तू ठुमरी ('ठुमरी')
देवी, व्यंजन मी स्वराविण तुझ्या होऊ कसा अक्षर ।
(तुटलेले दुवे, '१० वे सुनीत')

'विरहतरंगा 'तही 'मी-तू 'ची वर्णने येतात. उदा. 'तू माझी ध्रुवतारका '... इ. (तरंग १३ श्लोक ९३). विडंबनातील 'काळा कडा मी फत्तरी ' याचे नाते 'हा ताशीव कडा उभा ' ('शेवटल्या भेटीस ', मधुमाधव, पृ. ६७) या चरणापेक्षा 'मी राङ्गडा फत्तर ' (विरहतरंग, त. २९, श्लो. २०४) या चरणाशी जुळते. तसेच 'आषाढीचा अंधार मी ' या ओळीशी 'आषाढामधल्या प्रदोषसमयी ' (विरहतरंग, त. २०, श्लो. १२९) हा चरण जमतो. 'विरहतरंगा 'चे प्रकाशन व्हायला विलंब लागल्याची वस्तुस्थिती ध्यानात घेतल्यास प्रस्तुत विडंबनरचनेपूर्वी 'विरहतरंगा 'चे हस्तलिखित पुण्याच्या कविवर्तुळात प्रसृत झालेले असावे, असा तर्क करता येतो. माधव जूलियनी टांकसाळीतल्या शब्दप्रयोगांचा या विडंबनात किती मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यात आलेला आहे, हे पुढील तुलनेवरून दिसून येईल.

| केशवकुमार | मा. जुलियन |
|---|---|
| ताशिव | ताशीव (कडा– 'शेवटल्या भेटीस ') चोपीव (लुगडे), दाबीव (हिर्वळी) |
| पिकाळ | तपाळ ('दोन विभूती ' –हा शब्द व्युत्पत्तीसह टीपेत दिलेलाच आहे)., लवाळ (दृष्टी), छायाळ. |
| कुद्रती | कुद्रती (कुद्रती रूप लावण्य– 'मराठी मायबोली ') |
| फाल्गुनी | फाल्गुनी (फाल्गुनी ये तुझ्या डोळ्यात शांती-- म. साहित्य, 'ग. क्र. ६ ') |
| लक्तरी | लक्तर ( हिच्या लक्तरांची असे लाज आम्हा– 'मराठी मायबोली ' ) |
| काश्मिरी | काश्मिर (तुझ्या काश्मीर हो उत्फुल्ल गाली– 'हेमंत ') |
| कावरी बावरी | कावरे बावरे ('भाविक हुर्हूर ') |
| अल्लाहु अक्बर | 'अल्लाहु अक्बर ' |
| गाडगे–माडगे | भांडगी... दांडगी (म. साहित्य, 'ग. क्र. ६ ') |

येथवर आलेल्या तुलनात्मक विवेचनावरून हे ध्यानात येऊन चुकलेच असेल की या विडंबनगीतात मा. जूलियनांच्या शब्दकळेचे वा बहिरंगाचेच नव्हे, तर अंतरंगाचे आणि प्रेमविषयक कल्पनांचेही विडंबन साधलेले आहे.

श्री. विठ्ठलराव घाटे यांनी माधवराव पटवर्धनांच्या प्रेमविषयक कल्पनेचे अतिशय मार्मिक विश्लेषण आपल्या आत्मचरित्रात केले आहे. (दिवस असे होते, मुंबई १९६१, पृ. ३५५–३६१) त्यात त्यांनी माधव जूलियनांच्या जीवनातील व काव्यातील प्रेमकल्पनेचा तऱ्हेवाईकपणा थोडक्यात पण उत्तम रीतीने स्पष्ट केला आहे. त्यांच्या विवेचनाचा आशय असा : माधरावांची प्रेमविषयक कल्पना इंद्रियसापेक्ष

नव्हती. वयात आलेली तरुणी त्यांना बालिका वाटे. बालिकांच्या अर्धोन्नत उरोजां-कडे ते वत्सल भावनेने पाहात. काव्यात पुलाच्या वळणावर दिसणारी हाडामासाची तरुणी त्यांना हवी होती. तरीपण त्यांच्या प्रीतीला भक्तीचे रूप होते. प्रियाराधना ही त्यांची नैष्ठिक पूजा होती. इराणी कवितांचा अनुवाद करता करता त्यांच्या प्रीतिकल्पनेत शरणागतीची भावना आलेली होती. प्रेयसीला दुरून पुजायचे असे अशरीरी प्रेम त्यांना अभिप्रेत होते. बडोद्यातील वास्तव्यातल्या माताभगिनींच्या भूमिकांच्या मानाने ' वरदे 'ला माधवराव ' स्नेही ' समजत, ही अभिनंदनीय प्रगती होती. ' श्यामले– ' ह्या माधव जूलियनांच्या कवितेतील चरण उद्धृत करून घाटयांनी पुढे म्हटले आहे, ' ...प्राचीन काळापासून संभोगप्रधान प्रीतीचा वारसा आला होता. साहजिकच माधवरावांच्या या तऱ्हेवाईक प्रेमगीतांची ' झेंडूच्या फुलां 'त टवाळकी झाली.' (पृ. ३५६)

माधव जूलियन यांच्या प्रेमविषयक कल्पनेचा हा तऱ्हेवाईकपणा त्यांच्या कविते-तील उदाहरणे घेतल्याने अधिक स्पष्ट व्हावा. ' गज्जलांजली 'च्या ' आत्मनिवे-दना 'त त्यांनी म्हटले आहे, ' कुंभ इराणी घाटाचे मी घडिले.' त्यांचे हे म्हणणे खरेच आहे. अभिव्यक्तीच नव्हे; तर त्यांच्या प्रेमकवितेचा आशयही फारशीमय बन-लेला होता. त्यांच्या प्रेमगीतांचा नायक प्रेयसी दुष्प्राप्य असल्याने तिला दुरून पुज-णारा. पण 'निराशेतही समाधान' मानणारा असतो. 'हट्टी प्रेम 'मध्ये 'दीपपतंगा'ची कल्पनाही त्यांनी मांडली आहे. तो विरहाने अणू अणू जळतो, पण त्यातच त्याला समाधान आहे. त्यांची नायिका उत्फुल्ल मिजाशीत पदन्यास करते व त्यावेळी तिच्या मार्गात कितीतरी बिचारे आषक तरुण लोळण घेतात. कधी नायकाच्या ' अज्ञ, भीरू गावठी ' मनाला ' प्रेमशास्त्राचे धडे ' तिने शिकविलेले असतात. प्रिय-कर भणंग भिकारी, बंदा दास, भोळा-खुळा असतो; प्रेयसी उंचावर असते. ती आयने महालात असताना प्रियकर उन्हात तिष्ठत असतो. तिच्यापुढे रत्नामोल्याचे नजराणे येत असतात. हा तिच्या भिंतीवर पडलेल्या सावलीच्या दर्शनातही समा-धान मानतो. तिची निरामय दृष्टी त्याला दुरून आश्रय सुचविते. चोल्याप्रमाणे तिच्या पायरीची धूळ भाळी लावण्यात तो धन्यता मानतो. ती जणू महाराणी असते व तिच्या वस्त्राचा किनारी घोळ चुंबिता आला, तरी तो ते भाग्याचे समजतो. ती अधिकारी असते, तिने काहीही केले, तरी तिला माफ असते. वृक्षवल्लीचा दाखलाही मा. जूलियनांनी असा उलटा दिला आहे : ' वल्लरी वृक्षास आलिंगूनी शृंगारी तशी । सावरी त्यास, मला का त्वां नये गे सावरू ?' (म. साहित्य, ग. क्र. ९) माधव जूलियनांच्या कवितेतील नायिका कर्तीकरविती असते. ती देवता, महाराणी, राजकन्या, अधिकारी, मालक अशी कोणीतरी असते तर नायकाची भूमिका भक्त, बंदी, दास वा सेवकाची असते. ' अर्जी ' करणे हे त्याचे काम; मंजुरी तिच्या हाती. या भावनेतूनच ' तू ' बद्दल ' स्वर्गीय ' वर्णने निष्पन्न झाली आणि ' मी ' कडे

भुईवर लोळण घेणारा कमीपणा आला. ही टोकाची अतिरेकी वृत्ती केशवकुमारांच्या विडंबक प्रतिभेला खाद्य पुरवती झाली. असे उत्तेजक खाद्य मिळताच ते कल्पकतापूर्ण अतिशयोक्तीच्या घोड्यावर स्वार झाले. हैदोस-अल्लाहु अक्बर, अरबी समुद्र–रसनिर्झरी, कन्दाहरी अक्रोड–सहाऱ्यातील खर्जुरी, माजुम–याकुती, अबीर–कस्तुरी, घोंगडे–मखमूल या फार्शी बाजाच्या उपमानांच्या जोडीला त्यांनी हिंग–मिरी, पिठ्यातला बेवडा–व्हिस्कीतली माधुरी, काडेचिराईत–खडीसाखर, कांदे–बटाटे भात–मुर्गीबिऱ्यानी अशी विक्षिप्त उपमाने मांडून या 'मी–तू' पणाची पुरती बोळवण करून टाकली !

माधव जूलियनांच्या काही प्रेमविषयक गझलांचे मूळ त्यांच्या जीवनात शोधता येते. तारुण्यात त्यांना ज्या बाल–तरुण स्त्रियांचे आकर्षण वाटले, त्यांच्याविषयीच्या त्यांच्या भावना कशा लोकविलक्षण होत्या, हे श्री. घाटयांच्या विवेचनावरून दिसून आलेच आहे. ते अशा स्त्रियांपैकी कुणास आई, कुणास बहीण, तर कुणास मैत्रीण मानीत. स्त्रीपुरुषांमधील मैत्री कामुकताविरहित असण्यावर त्यांचा कटाक्ष दिसतो. त्यांच्या नायकाला स्त्रीपुरुषात कामुक नाते असावे, ही गोष्टच उफराटी वाटते व असले मत कानीही पडणार नाही, अशा दूरच्या ठिकाणी चल, असे तो आपल्या राणीला–प्रेयसीला म्हणतो. ('तेथे चल राणी'). त्यांच्या प्रारंभीच्या गझलांत काही 'कौमारगीते' आहेत, तर काही यौवनगीते आहेत. त्यांच्या कौमारगीतांतून निरागस भावाभिव्यक्तीसाठी योजलेल्या भाषेला आशुकमाशुकाचा वास येतो, तर उलट यौवनगीतातील उब्दकळेतून व्यक्त झालेली भावाभिव्यक्ती निरागसतेकडे झुकणारी असते. बालिकेचे लाघव त्यांच्या नायकाला 'माशूक' वाटते ('हास बालिके'), तर नजरेत 'अनुरागवर्धक माधुरी' असणाऱ्या यौवनमंजरीच्या 'नवनीत...बालिशता' दिसते ('सद्‌गुणसुंदरी'), बेहस्तांतील परीला 'बसू, हसू, रुसू' कुजबुजू, जिवींच्या गुजा । श्रमू अन्योन्यासाठी, उडू; बागडू परी । जवळ ये' असे म्हणत असताही तो तिला 'धाकुटी बहीण तू, अन् मी भाऊ तुझा' असेच मानीत असतो ('कौमार्यस्मित'). यौवनात चंचल पावलांनी फिरणारी तरुणी त्याला 'सदैवच तान्हुली' वाटते. तो तिला 'सोनुली' संबोधितो. त्याच्या 'नव्या शैशवी', ती त्याला 'बाहुली'सारखी प्रिय वाटते (महाराष्ट्र साहित्य, ग. क्र. १६) प्रेमभावनेची ही विक्षिप्त अभिव्यक्ती विडंबनकाराचे भक्ष्य व्हावी, हे साहजिकच. यामुळेच केशवकुमारांच्या कवितेत 'छोकरी', 'बाल चिचुन्दरी', 'सानुले', 'छकुले', 'चिनीमातीची बाहुली' हे शब्दप्रयोग आले आणि

जरि मूल या कमरेवरी । तरि तू मला छकुल्यापरी
गांभीर्य आणि वयस्कता । जरि ही तुझ्या मुखड्यावरी
स्मरते मला तव सानुली । मूर्ती मनोहर पर्करी

सिद्ध झाले.

या विडंबनगीताच्या नायकाने 'श्यामले'ला फिरून (पुन्हा) तो 'निर्दोष' आणि 'छुपा' पापा देशील का?' असा विनवणीवजा प्रश्न केला आहे. या प्रश्नाचा अन्वयार्थ माधव जूलियनांच्या चरित्रात आणि प्रारंभीच्या कवनात लागण्यासारखा आहे. त्यांच्या बडोद्याच्या मैत्रिणीने त्यांच्यावर विविध नात्यांचे जे प्रयोग केले, त्यांची साधार हकीगत त्यांच्या चरित्रात वाचावयास मिळते (पहा– गं. दे. खानोलकर, माधव जूलियन, दु. आ. मुंबई १९६८, पृ. ५४–५८). या नात्यांपैकी शेवटचे नाते 'आई' आणि 'मूल' असे होते. श्री. विठ्ठलराव घाटे यांची साक्ष अशीच आहे. ते म्हणतात, 'तारुण्याच्या सीमारेषेवर प्रणयभावनांचा किंचित् थरथरता स्पर्श झाला तेव्हा बडोद्यास प्रेयसीला (माधवरावांनी) माता मानली आणि माता म्हणून तिची पूजा बांधली (दिवस असे होते, पृ. ३५४) याच काळातल्या एका पूर्ण उपलब्ध न झालेल्या कवितेत 'मम मटामट गोड मुके कधी। जननी! घेशील? होई अधीर मी!' असे चरण आढळतात. आई–मूल या नात्याच्या काळातील अशाच एका प्रसंगाला अनुलक्षून मा. जूलियनांची एक कविता आहे. तिच्या रचनेचा दिनांक २६ ऑगस्ट १९१४ हा आहे. 'आठवणारे पहिले चुंबन' या मथळ्याखाली ती प्रसिद्ध झालेली आहे (मधुमाधव, पृ. ४१–४२). विडंबनात 'निर्दोष, छुपा पापा' उल्लेखिला आहे, त्याचा संदर्भ या कवितेशी लावता येईल. या 'चुंबना'चा निर्देश 'पापा' या वात्सल्ययुक्त शब्दाने करण्यात व त्याला 'निर्दोष' आणि 'छुपा' ही अन्वर्थक विशेषणे लावण्यात विडंबनकाराच्या बेरकीपणाबरोबरच त्याच्या मार्मिकपणाचाही प्रत्यय पटल्यावाचून राहात नाही.

असे विडंबनकौशल्याचे अनेकानेक बारकावे या कवितेत आढळतात. अपरिचित फार्शी शब्दांची व कानकोपऱ्यातल्या गांवढळ मराठी शब्दांची योजना, गझलाचा ताल आणि तोल, वृत्तविषयक तपशीलवार नोंदी, परसवर्णी लेखनाची व मुद्रणाची तऱ्हा, 'नहि', 'अन्' सारखे शब्द या बाह्य परिवेशातल्या लकबीच नव्हेत, तर मा. जूलियनांच्या कवितेतले फार्शी वातावरण आणि 'दे हाता या शरणागता' छापाची प्रेमकल्पना हा अंतर्गत गाभाही या गीतात विडंबित झालेला दिसतो. एखाद्या कलाइडोस्कोप–यंत्रात घडावे, तद्वत या गीताच्या ओळी ओळीत विडंबन-चातुर्याच्या विविध पैलूंचे आरस्पानी दर्शन घडते.

पण त्याबरोबरच केशवकुमारांच्या जन्मजात, अचपळ विनोदबुद्धीचा जो स्वतंत्र आणि विमुक्त विलास पाहायला मिळतो, तोसुद्धा तितकाच आकर्षक आहे. हे विडंबनगीत माधव जूलियन आणि त्यांचे कवित्व नजरेआड करूनही आस्वाद्य होते. ते विडंबनविषयाशी जितके बद्ध आहे, तितकेच ते मुक्त आहे. नाही तर 'साष्टांग नमस्कार'सारख्या 'दृश्य आणि श्राव्य' काव्यात त्याचा अंतर्भाव होऊ शकला

नसता. रंगभूमीच्या बहुसंख्य प्रेक्षकांना हे गीत म्हटले जात असताना ते माधव जूलियनांचे विडंबन आहे, याची फारशी कल्पना नसते. आपल्यासमोर एक प्रेमवेडा कवी उभा आहे व तो आपल्या प्रेयसीवर बेफाट स्तुतिसुमनांचा वर्षाव करीत असताना विचित्र कल्पनांची उधळपट्टी करतो आहे, हाच भाव त्यांच्या मनात असतो. हे गीत योग्य ठसक्यात रंगमंचावर म्हटले गेले तर विनोदाचा नायगारा फुटावा तसे प्रेक्षक हास्याच्या महापुरात वाहून जातात. 'मी–तू पणा'च्या बोळवणीतल्या बहारदार चरणाचा पूर्वार्ध आणि उत्तरार्ध यांची लयदृष्टचा तुलना करण्यासारखी आहे. त्यातले काही चरण असे :

आषाढिचा अंधार मी । तूं फाल्गुनी मधुशर्वरी
मी तो पिठ्यातिल बेवडा । व्हिस्कीतली तूं माधुरी
काडेचिराइत मी कडू । तूं बालिका खडिसाखरी
बेडौल वक्र त्रिकोण मी । तूं लंबवर्तुळ गे परी.

आतल्या पूर्वार्धाची प्रत्यंचा खूप चढवावी आणि उत्तरार्धात ती अलगद व आकस्मिकपणे ढिली सोडावी. परिणामी हास्यस्फोट हटकून ठेवलेलाच. गाडगे, माडगे, वाडगे, बाल चिचुन्दरी, गुल्‌दरी, गुलचमन्, कटलेट, मुर्गी, बिर्यानी, खिमा इत्यादी शब्दप्रयोगाभोवती मुळातच हास्यवलय आहे. त्यात ते स्वर हेलावत, योग्य आविर्भावाने प्रेक्षकांत संक्रात झाले, तर त्यांची मौज दुणावते. माधुरी, मधुशर्वरी, गर्जरी यांच्याबरोबर यमकापेक्षेच्या नात्याने चिचुन्दरी, गुल्‌दरी, सिल्व्हरी आणि पर्करी हे शब्द जेव्हा ठसक्यात उच्चारले जातात, तेव्हा तर विसंगतीची गंमत आणखी वाढते. विरोधी कल्पनांच्या ताणल्या–ढिल्या लयीच्या हेलकाव्यानंतर 'घे गाडगे, घे माडगे। घे गुलचमन्, घे वाडगे ।। ताम्बूल घे, आम्बील घे । घे भाकरी, घ खापरी' हा दौडणाऱ्या द्रुतलयीतला घेकार-घोषा येतो, नंतर 'किती थांबु मी ? । म्हण 'होय' ना' अशी विलंबित नि व्याकुळ अजीजी येते आणि अखेर 'मत्प्रीतिचा न 'खिमा' करी' यातील 'खिमा' शब्दासरशी हास्यफोट होऊन गीत संपते. या गीतात असे लयीचे नाट्य ओतप्रोत भरलेले आहे, विक्षिप्त आणि विरोधी कल्पनांची खैरात आहे, अतिशयोक्तीचे गडद रंग आहेत. त्यामुळे ते हास्योत्पादक नाटकात सहज सामावून गेले. कारण माधव जूलियनांच्या विडंबनाबाहेर त्याला एक भरघोस असा स्तर आहे. आणि त्या स्तरावर एक स्वतंत्र विनोदी कविता म्हणून ते आस्वाद्य होते.

**पाय घसरला तर** : झेंडूच्या फुलांच्या १ ल्या आवृत्तीत कविनाम 'यशवंत येरवडे' – सूचक 'भगवंत भांबुर्डे' असे दिले आहे. पण ते फसवे आहे. ही कविता यशवंतांच्या कवितेचे विडंबन नसून गिरीशकृत 'पाय घसरला तर'–(वीणाझंकार, १९२२, पृ. ३४–४३) या दीर्घ कवितेचे विडंबन आहे. एक भाऊ विधवा बहिणी-

बरोबर प्रतापगडसारख्या किल्ल्याचा कडा चढून जात असतो. अवघड टोकावरून चालताना तो एकदम भलताच कातर प्रश्न बहिणीला विचारतो : 'पाय घसरला तर–? ' विधवा ताई उद्गारते, 'पाय घसरला तर आपल्या जिवाचे सोने होईल. कारण हिंदू विधवेला भवितव्यच नसते.' त्यावर भाऊ 'आपणास ताई कोण ?' म्हणून विचारतो. ताई म्हणते, 'विधवांच्या उद्धाराच्या ध्येयाने यापुढे तू आपलं जीवन आणि काव्य व्यतीत कर.' यानंतर दोघे एकमेकांना मिठ्या मारून रडतात. भक्तिरसाचा एवढा पूर येतो की तो अंबर भेदून जातो ! अति हळव्या भावनांचे अस्थानी प्रदर्शन करणारी ही कविता आहे. शिवाय निमित्तविषय आणि कवितेचा आशय यातही भलताच दूरान्वय आहे, त्यामुळे केशवकुमारांच्या विडंबनबुद्धीला भक्ष्य मिळाले. त्यांनी तो प्रश्न व्यावहारिक पातळीवर आणून वहिनीकडून राजकारणी पण उनाड भावजींना रोखठोक उत्तर देवविले आहे : 'पाय घसरला तर–' बाजारात, वाटेत, समाजात, राजकारणात निराळे काहीच व्हायचे नाही; 'छीः–थू' होईल ! कवितेखाली मिती दिली असून पुढे 'टिळक पंचांगाच्या आधारे' अशी तिला पुस्ती जोडली आहे. हे माडखोलकरांचे विडंबन दिसते. कारण ते आपल्या कवितांखाली आवर्जून मिती देत असत. (किरण, १९२३, पृ. १७, २५, २६) 'चुंबित' शब्दावरील 'याचा अर्थ फक्त 'मुकाट्याने' असाच करावा,' ही मिस्किल टीप १ ल्या आवृत्तीत नव्हती. गिरीशांच्या मूळ कवितेतील काही चरण असे आहेत

> ये हळू जपूनच बाई । काठाची बघ ही खाई । बाजूला.
> ....हा सोसाट्याचा वारा
> विक्राळ भयंकर सारा । हा कडा
> पाहसी ? तोल–
> असा जाईल । असा जाईल.
> घसरल्यावरी होईल । काय गे ?

केशवकुमारकृत विडंबन मूळ चालीचे बहुतांशी अनुकरण केलेले आहे. त्यात समकालीन राजकारणाचे पडसादही उमटविले आहेत :

> विसरलात ' मारुनि मरणे '
> आणलेत ' घुसुनी रुसणे । बायकी
> नादान । उघड होऊन ' कौन्सिलातून । मिरविण्या बघता
> तरि होऊनि ' छीः थू ' लाथा । मिळती ना ।।

वहिनीने कानउघाडणी करताच भाऊजींचा कंठ दाटून डोळ्यात आसवेही येतात; 'पण रुमाल नव्हता जवळी '– काय करणार ? एकंदर सर्व गोंगाटातून 'घसरला पाय तर छीः थू ' हे शब्द ( शनिवारवाड्याच्या ) फुटक्या बुरजामधून घुमतात :

चिवड्याचे गाणे गरम
क्षणमात्रच पडले नरम । तेधवां
तुम्ही जरी । जुन्या बाजारी । जाल कधी तरी । ऐकाल,
‘ घसरला पाय तर ‘ छीः थू ’ होईल.’

केशवकुमारांचा हा मिस्किल शेवट मूळ कवितेतील हळव्या गहिवराचा फुगा अलगद फोडणारा आहे.

**नवरसमंजरी** : या विडंबन-खंडकाव्याची कल्पना ‘नवरसमंजरी’ ( हृदयतरंग पु. २, पृ. १११–१२१) या अनंततनयांच्या काव्यावरून सुचलेली आहे. मात्र त्याचा कटाक्ष खास अनंततनयांवर नाही. अनंततनयांनी ‘ वत्सला ’ सह दहा रसांवर रचना केली आहे; केशवकुमारांनी ‘ भयानक ’ वगळून व ‘ वत्सल ’ धरून नऊ रसांवर विडंबनकविता लिहिल्या आहेत, त्यातील प्रसंगवर्णनात विविध रसांच्या आविर्भावांचा बाह्य देखावा असला, तरी सर्व रसांचे पर्यवसान हास्यातच होते. वास्तविक अनंततनयांनी रसप्रकरणासाठी निवडलेल्या प्रसंगात औचित्याचा भंग झालेला आहे. काही काही प्रसंग तर महा विचित्र आणि बालिश आहेत. ‘ भयानका ’साठी ना. गोखल्यांची माफी तर ‘ करुणा ’साठी टिळक-आगरकरांची अंतिम भेट त्यांनी राबविली आहे. धन्वंतरीच्या कौशल्यामुळे एका रुग्णालयात गोदूताईचा गोविंदराव बनल्याची बातमी त्यांनी ‘अद्‌भुता’साठी वेठीस धरली आहे. त्यांचा हास्यरस तर बीभत्सावर कडी करणारा आहे. आईच्या मृत्यूनंतर ‘ मला आपल्या आईच्या जागी माना ’ असे म्हणणाऱ्या आयाबायांपैकी एकजणही बायकोच्या मृत्यूनंतर ‘ मला आपल्या बायकोच्या जागी माना ’ असे म्हणण्यास सरसावत नाही, या चुटक्यावर त्यांच्या हास्यरसाची उभारणी झालेली आहे. विषय असे चमत्कारिक आणि अनंततनयाची निवेदनशैलीही सुमारच. अशा स्थितीत त्यांच्या ‘ मंजरी ’ ची क्रमशः हजेरी घेण्याचा मोह केशवकुमारांना कसा झाला नाही, याचेच आश्चर्य वाटते ! तेव्हा विडंबनात अनंततनयाचे अनुकरण अक्षरशः नाममात्रच आहे. केशवकुमारांचा कटाक्ष रसागणिक भिन्न भिन्न कवींवर आणि कविप्रवृत्तींवरच आहे.

**शृंगाररस** : एक शाहीर महाराणीपुढे काव्यगायनाची लांबण लावतो, राणी कंटाळते व वैतागून वेणीतला गजरा खाली टाकते, कवी तो कृपाप्रसाद समजतो व उचलून सेवाभावाने तिच्या हाती देतो असा प्रसंग येथे दोन श्लोकात वर्णिलेला आहे. १९२१ साली न. चिं. केळकरांच्या अध्यक्षतेखाली बडोद्यास साहित्यसंमेलन झाले, त्या वेळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी (२७–११–२१) झालेल्या काव्यगायनात यशवंत कवींची ‘ रक्ताचे अर्घ्य ’ ही कविता विशेष गाजली होती. त्यांना बडोद्याच्या महाराणीसमोर ती कविता पुन्हा सायंकाळी म्हणावयाचा खास आग्रह

झाला होता.[1] 'स्वातंत्र्य लक्ष्मीस मुजरा' ( यशोधन, ३ आ., ११३३, पृ. ५६) ही यशवंतांची कविता या प्रसंगाला उद्देशूनच रचलेली असावी. कवितेखाली स्थल-कालाचा निर्देश 'बडोदे, ३०-११-२१' असा आहे. महाराष्ट्राच्या महालक्ष्मीस कवीने शाहिरी मुजरा केलेला असून तिच्या वेणीतला गजरा खाली पडल्यास तो आपण भावी यशाचा कौल मानू, असाच त्याचा भाव त्या कवितेत व्यक्त झालेला आहे. संस्थानाकडे आणि विशेषत: बडोदे संस्थानाकडे स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणून पाहण्याची तत्कालीन प्रवृत्तीही या कवितेत प्रतिबिंबित झालेली आहे. ह्या सर्व भावातिवशतेत लघळ प्रेमवेडेपणाच्या छटा मिसळून केशवकुमारांनी यशवंतांच्या कवितेचे व तीत व्यक्त झालेल्या वृत्तीचे विडंबन केले आहे. 'दऱ्याखोऱ्यातला आला कवी हा खास दर्बारा' या मूळ कवितेतील ओळींची खूण केशवकुमारांच्या 'काव्याचे नीजबाड घेऊनि दऱ्याखोऱ्यातला शाहिर' या पहिल्याच ओळीत पटते. 'किमर्थ नकळे !' एवढेच शब्द कंसात घालण्यातली खुबी तल्लख विनोदबुद्धीची द्योतक आहे.

**वीररस** : हे एक नेटके सुनीत आहे. पहिल्या आवृत्तीतील 'जो तो सिंहच आपणास म्हणुनी' चरणार्धात २ ऱ्या आवृत्तीपासून 'जो तो सिंहच आपणा म्हणवुनी' असा किरकोळ पण अन्वर्थक बदल करण्यात आलेला आहे. मृगराज मृत होताच कोल्हे स्वत:ला शूर समजून त्याच्या मृतदेहाची विटंबना सुरू करतात, ही नीतिकथा त्यात गोवली आहे. केशवसुत-गोविंदाग्रजासारखे कविप्रवर लुप्त झाल्यावर टीकाखोरांनी त्यांच्या कवितेचे जे शवच्छेदन सुरू केले, त्यात या कवितेचे उगमस्थान दिसते. यदाकदाचित ते तसे नसले, तरी हतप्रभ झालेल्या थोर व्यक्तीची खिली करू पाहणाऱ्या क्षुद्र भेकडांचे वीरविडंबन म्हणूनही हे अन्योक्तिरूप सुनीत परिणामकारक वाटते. कलाटणीच्या द्विपदीतील व्याजोक्ती किती जालीम उतरली आहे, पाहा :

> दारोदार बघून वीर असले संतोष होतो जरी,
> नाही भेकड मात्र कोणी उरला हे शल्य डांचे उरी !

**करुणरस** : दिंडी वृत्तात रचलेल्या या विडंबनकवितेत प्रथम शाहीर, मग टीकाकार, नंतर स्तंभलेखक व अंती संन्याशी बनलेल्या एका बहुरूपी 'येरू'चे मर्मभेदक व्यक्तिचित्रण आहे. पहिल्या आवृत्तीतील मूळ संहितेत पुढे काही गाळागाळ करण्यात आलेली आहे. कवितेचा रोख ग. त्र्यं माडखोलकरांवर आहे. 'येरू'च्या लेखनातील स्थित्यंतरे आणि माडखोलकरांच्या तत्कालीन जीवनातील खांदेपालट यात सारखेपणा आहे. 'जहालांचा तिखट भुरका' व 'मवाळांचा आळणी दूधभात' हे उल्लेख माडखोलकर केसरीसंस्था सोडून भारत-सेवक-समाजात गेले, त्याच्याशी

---

१. दहावे मराठी साहित्यसंमेलन याचा अहवाल, प्रका. भ. ब. पाळेकर, बडोदे, १९२३, पृ. २७ व २१.

जुळतात. 'काळ घालवितो 'काव्यविनोदात' या चरणात माडखोलकर 'ज्ञानप्रकाशा'चे 'काव्यशास्त्रविनोद' सदर चालवीत, त्याचा निर्देश झालेला आहे. 'जे जे काही मनात आले। पूर्ण तुवा ते सर्वही केले।' ('मागणे' किरण, पृ. २६) या माडखोलकरांच्या ओळींचे स्पष्ट प्रतिबिंब विडंबनातील 'मनी आले ते होई सर्व पूर्ण!' या चरणात पडलेले आहे. पहिल्या आवृत्तीतील खाजगी वाटणारे, विशेषतः पितृनिधनाच्या संदर्भातल्या २ श्लोकांत आलेले हृदयशून्य उल्लेख पुढील आवृत्त्यांतून गाळले आहेत. आधीच्या संहितेत केलेल्या बदलाची कल्पना खालील कोष्टकावरून येईल :

१ ली आवृत्ती

मोठमोठ्यांच्या बसूनि कच्छपात
बने मुत्सद्दी चार आठवड्यांत.
घरी भेटाया थोर थोर येती,
तदा येरूला पडे एक खंती !
बाप तापाने तापुनी फणाणा
पडे शय्येवर मृत्युच्या उताणा !
होई तेणे येरूला आडकाठी,
म्हणे 'याची बांधीन कधी ताटी !'

काळ आला तांतडा धांवुनी तो;
(पितृभक्ताला देव मदत देतो !)
पडे दुःखाचे वज्र वर तुटून
येरू मुत्सद्दी डगमगे मुळी न ! १०

मिळे निश्चिती त्याचिया मनाला,
जोर आला मग राजकारणाला;
तोच मागुनि दुर्दैव हाणि लाथ,
शिरे येरूच्या बत्तिशी घशात ! ११

– पुढील आवृत्त्या

मोठमोठ्यांच्या बसुनि कच्छपात,
बने मुत्सद्दी चार आठवड्यात !
लिहू लागे गंभीर 'लेखमाला'
'तीन खंडी' जाहला 'बोलबाला'!

'जाहिराती, 'संस्कार', 'वृत्त',
'पोचा'—
हातखंडा लिहिण्यात होय त्याचा !
'स्फुटा' वरती जो टाकणार हात—
तोच मागुनि दुर्दैव हाणि लाथ !

3330
निबंध २५९२२ ३०।७।८८

तसेच 'देशभक्तीच्या आखाड्यात वीर' यातील 'आख्याड्यात' ऐवजी 'अखाड्यात' अशी किरकोळ दुरुस्ती वृत्तसुखार्थ केलेली आहे.

कवितेतला काही भाग गाळल्याने विशेष फेर पडलेला नाही, कारण एकूण तिखटातले थोडे तिखट काढले तरी उरते ते तिखटच असते ! या कवितेचे स्वरूप नुसते विडंबनात्मक नाही; ते तीव्र कुत्सात्मक आहे, विडंबित व्यक्तीची संपूर्ण यशोहानी व्हावी, असा तिच्यामागे हेतू आहे. मात्र याचाही उगम गुरुप्रेमातच होता. 'आधुनिक कविपंचक' (पुणे १९२१) या आपल्या ग्रंथात माडखोलकरांनी गोविंदाग्रजांच्या काही कवितांवर जे आक्षेप घेतले होते, ते केशवकुमारांसारख्या गडक-

त्यांच्या परम भक्ताला मानवण्याजोगे नव्हते. 'हाति बाळाच्या लागतां कुऱ्हाड ! जिते राहिल का एक तरी झाड ?' हा सणसणीत टोला त्यातूनच दिला गेला आहे. 'अरुण' कवितेचा नकलीपणा वस्तुनिष्ठ दृष्टीने न दर्शविता माडखोलकरांनी छद्मीपणे म्हटले होते, 'ब्राह्म मुहुर्तावर भूपाळी आळविण्याचा प्रसंग गोविंदाग्रजांवर बहुधा सगळ्या हयातीत आला नसावा; मग प्रभातशोभेचे वर्णन साधणार कसे ?' (पृ. ११९) कवितेतील 'अमुक लोळतसे बिछान्यात भारी !' या चरणाचा रोख माडखोलकरांच्या या टीकेवरच आहे.[1] माडखोलकरांच्या वर उल्लेखिलेल्या 'मागणे' या कवितेत देवाला उद्देशून 'परि मन अजुनिहि शांत न झाले' असे म्हटले आहे. त्याचेच पडसाद घुमवीत केशवकुमारांनी 'करुणरसा' चा शेवट वरवर प्रासादिक भासणाऱ्या अनुष्टुपात पुढीलप्रमाणे केलेला आहे :

देवा तो विश्वसंसार राहू द्या राहिली तरी,
परी कारुण्यमूर्तीला द्याच या मोक्ष लौकरी !

उपरोधाचा गाळीव अर्कच जणू या अंतीच्या द्विपदीत आहे.[2]

**हास्यरस :** खूप मोठा आव आणून व इतरांची उत्सुकता पराकोटीला नेऊन शेवटी साहित्यसागराच्या तळातून एक 'तुटके सुनीत' वर घेऊन येणाऱ्या शाहीर–पाणबुड्याचे नाट्यपूर्ण चित्रण यात केलेले आहे. दुसऱ्या श्लोकातील शेवटच्या चरणातले 'राही' हे क्रियापद पुढे २ ऱ्या आवृत्तीपासून 'राहे' असे केलेले आहे. हा बदल शैलीची समता राखण्यासाठी केलेला दिसतो.

सुनीतासारख्या छोट्या आवाक्याच्या काव्यप्रकाराला काव्यलेखनाची बहादुरी

---

१. या संदर्भात आ. अत्र्यांनी माडखोलकरांना एके ठिकाणी प्रतिप्रश्नात्मक उत्तर दिले आहे. : 'मी एका व्याख्यानांत त्यांना (माडखोलकरांना) उलट असा प्रश्न केला की 'गडकरी उशिरा उठत हे तुम्हाला काय माहीत ? तुम्हाला काय त्यांचे अंथरूण गुंडाळायच्या कामावर कोणी नेमले होते ?' –संपूर्ण गडकरी– 'प्रस्तावना' पुणे १९६७, पृ. १४१.

२. माडखोलकरांनी या कवितेत केलेली निर्दय कुचाळी त्या काळच्या गडकरीभक्तांना फार रोचक वाटली होती. असे श्री. कृ. रा. परांजपे हे केशवकुमारांचे सहाध्यायी सांगतात. माडखोलकरांदी रविकिरण संप्रदायी मंडळी स्वतःला आगरकरपंथी कट्टर सुधारक म्हणवीत.असत. पितृनिधनामुळे माडखोलकरांनी संन्याशाप्रमाणे क्षौरादी धर्मविधी करावे लागून तत्त्वच्युती पत्करावी लागली होती. त्यामुळे 'भली खोड मोडली' या जातीचे दुष्ट समाधान गडकरी भक्तांना झाले होते. केशवकुमारांच्या 'करुणरसा'त तेंच मुखर झालेले होते.

मानणाऱ्या (बहुधा रविकिरणी) संप्रदायाची यात थट्टा केलेली आहे. रत्ना-कराच्या तळाशी कोणाला काय मिळाले, हे सांगण्याच्या ओघात 'दैवे लाभत 'वैजयंति' ही कुणा' असा उल्लेख करून कवीने आपल्या गुरूचा गोविंदाग्रजांचा गौरव साधून घेतला आहे. 'संपे संशयकाल मूठ उघडे भांडार सारे फुटे' हा प्रासादिक चरण शैलीच्या दृष्टीने लक्षवेधक आहे. त्यात 'विरू लागले संशयजाल ! संपत ये विरहाचा काल', 'स्वर्गीचे भांडार उघडले', 'फुटले भांडार', 'कुणी उघळली मूठ' हे बालकवींच्या 'अरूण', 'फुलराणी', 'संध्यारजनी' यांसारख्या कवितांतील शब्दप्रयोग एकरस होऊन गेलेले दिसतील. नाट्यपूर्ण निवेदनाने आशयाची शीग वाढवीत नेऊन अखेर 'ओम् फस्' करण्याचे विनोद–तंत्र केशवकुमारांना किती अचूक साधलेले होते, ते या कवितेवरुन दिसून येते :

मेलेले मुडदेही ताठ उठले तात्काळ गर्तेतुनी
दातांच्या कवटचा 'सुनीत' वदुनी हासावया लागल्या !

हे शेवटचे चरण, रासवट शब्दांनी हास्योत्पादक प्रसंगाचे मूर्तिमंत चित्र रेखाटण्यात केशवकुमारांचा किती हातखंडा होता ह्याचा पुरेपूर प्रत्यय पटवतात.

**वत्सलरस** : या विडंबनात ८ दिंड्या आहेत, त्यांतून दोन संतकवींच्या[१] भेटीचे मासलेवाईक वर्णन करण्यात आले आहे. प्रथम सलगीने सुरू झालेल्या या भेटीचे पर्यवसान अखेर एकमेकांच्या उरांवर बसण्यात होते. उभय संतकवींच्या बाळलीलांचे तपशील विलक्षण खुलावटीने वर्णन केलेले आहेत. होता होता 'नको वर्णन ते ! करा कल्पनाच !' असा हास्यस्फोटक धक्का देऊन कवीने वात्सल्याची भरती आवरली आहे.

**बीभत्सरस** : एका कवीची प्रथम पत्नी दुर्दैवाने मरण पावते. शोकावेगात तो 'तिच्या नावाची घेउनिया-माळ । क्रमिन आता मी कसाबसा काळ !' असे ठरवून

---

१. प्रा. म. वा. धोंड यांनी उपरिनिर्दिष्ट व्याख्यानमालेत ही संतकवींची जोडी म्हणजे ह. भ. प. पांगारकर व नरहरशास्त्री खरशीकर यांची असावी असे सांगितले. लेलेशास्त्र्यांनी २ ऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत 'वत्सलरसाच्या डोहात डुंबून शुंडाग्रांनी बाललीला करणारे वृद्ध–तरुण वाङमयमातंग' असा उल्लेख केलेला आहे. 'वृद्ध तरुण' याचा अर्थ 'वृद्ध असूनही तरुण' असा घेतल्यास वरची जोडी जमेल असे वाटते; पण जोडीतला 'एक वृद्ध व एक तरुण' असा अर्थ केल्यास वरील जोडी जमेलसे वाटत नाही. खरशीकर-शास्त्री हे काव्यरचना करण्यासाठी प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांना यांपैकी एक मानता येणार नाही, असा अभिप्राय म. म. पोतदारांनी व्यक्त केला. ही जोडी पांगारकर व गोविंदसुत (चिचाळकर) अशी असू शकेल, असे एका जाणकारांनी सांगितले.

पुनर्लग्न न करण्याची प्रतिज्ञा करतो. पण लग्नाचा मोसम येताच लटपटतो. अखेर मृतपत्नीच्या स्वप्नदृष्टांतातील तथाकथित आज्ञेनुसार तो लग्नाची पुनरावृत्ती करतो. अशा ' भीष्म ' कवीचे उपहासपूर्ण शब्दचित्र यात रेखाटले आहे. ७ व्या कवितेतील ' दुजा आहे का असा जगी जेठी ' हा १ ल्या आवृत्तीतला चरण ' समाजाची नच त्यास लाज खोटी ! ' असा दुसऱ्या आवृत्तीपासून बदलण्यात आलेला आहे.

लेलेशास्त्र्यांच्या प्रस्तावनेत सदर कवीचे ' प्रियागुणस्मरणीबहाद्दर ' असे छद्मी वर्णन आहे. विदर्भातले एके काळी गाजलेले कवी प्रा. ना. के. बेहेरे यांचे ' स्मरणी ' (पुणे, १९१५) हे प्रथम पत्नीच्या निधनावरील काव्य आहे. त्याला रे. टिळकांची प्रस्तावना आहे. प्रथम पत्नीच्या निधनानंतर थोडयाच दिवसांत, ' स्मरणी ' त व्यक्त झालेल्या भावना बाजूस राहून, प्रा. बेहेरे यांचे पुनर्लग्न घडून आले. बेहेरे यांची ' स्मरणी ' ही काव्यकृती आणि पुनर्लग्नाची प्रत्यक्ष कृती यावरच केशवकुमारांचा कटाक्ष आहे. प्रा. बेहेरे यांना गोविंदाग्रजसंप्रदायाच्या लोकप्रियतेचे वैषम्य वाटत असे.[१] तसेच काही काळ ते ' केशवसुत ' (वडिलांचे नाव ' केशव ' असल्याने) या नावाने कविता करीत असत.[२] आपल्या उभय काव्यदैवतांशी अशी धृष्ट सलगी करणाऱ्या बेहेऱ्यांवर केशवकुमारांचा राग होता. या कवितेच्या रूपाने त्यांनी त्याला वाट करून दिलेली दिसते. इतर अनेक कवितांप्रमाणे याही कवितेंचा शेवट महा मिस्किल आहे. तो असा :

> दिसो कोणा 'बीभत्सरस' हि यांत,
> प्रेमगंगा परि असे आंत गुप्त !

**रौद्ररस :** यात कवींचे छायाचित्र घेण्याचा प्रसंग आहे. त्या वेळी अग्रमान कोणाचा यावर लठ्ठालठ्ठी सुरू होते; सारे शाहीर ' पद्य ' सोडून ' गद्या ' वर व मग ' गद्य ' सोडून ' गुद्द्या 'वर कसे येतात, याचे खुमासदार वर्णन यात आहे. एकीकडे वृत्तपत्रीय प्रसिद्धीबद्दलचा आशाळभूतपणा आणि दुसरीकडे स्वतःला व्यास, वाल्मिकी, कालिदास म्हणवून घेणारा अहंकार या कविप्रवृत्तीचे दर्शन त्यात विदारक रीतीने घडते. ' एका सरस्वतीभवनातील अध्यक्षपदासंबंधी जी रणे ' माजली होती, त्याचा उल्लेख लेलेशास्त्र्यांनी केलेला आहे. त्यातल्या एकूण सुरावरून श्री महाराष्ट्र शारदामंदिरातील अनंततनयादी कविमंडळींची थट्टाच या कवितेतही अभिप्रेत दिसते.

---

१. ना. के. बेहेरे, मोत्यांची माळ– ' भूमिका ', मुंबई १९३०, पृ. २९

२. ' कवि व कवितादेवी ' ही प्रा. बेहेऱ्यांची कविता ' केशवसुत ' या नावाने (काव्यरत्नावली व. २९ अं. ६ (जून १९२१) प्रसिद्ध झालेली होती. तर पुढे दोनच महिन्यानी त्यांची ' आशेची निराशा ' ही कविता ' ना. के. बेहेरे ' या नावाने प्रसिद्ध झालेली आहे. (काव्यरत्नावली व. २९ अं. ८ (ऑगस्ट १९२१).

**अद्भुतरस** : यात अनेक कविप्रवृत्तींचा उपहास साधलेला आहे. निरक्षर पत्नीला कवयित्री बनविणे, काव्यगायनाच्या संधीसाठी टपून बसणे, ' सुनीत ' सारख्या शब्दावर रणे माजविणे, इतरांच्या शिष्यत्वाला ' नक्कल ' ठरवून स्वत: मात्र ' अहो रुपम् अहो ध्वनि: ' चा पाठपुरावा करणे, विश्वबंधुत्वाचा शाब्दिक आव आणून पाया• पलीकडे न पाहण्याइतके संकुचित राहणे या कविप्रवृत्ती अद्भुत नव्हेत काय, असा केशवकुमारांचा रोकडा सवाल आहे.

कारकुनीचा छाप कपाळी ! ... तरि दास्याची करी टवाळी

या कडव्यातील ' कारकुनीचा ' हा शब्द तिसऱ्या आवृत्तीपासून ' गुलामगिरीचा असा बदलला आहे. त्या शब्दाचा रोख यशवंतांवर असावा. ते कारकून होते पण ' दास्या 'चा निषेध करणाऱ्या त्यांच्या ' गुलामाचे गाऱ्हाणे ' आणि इतर शाहिरी कविता त्या काळी गाजल्या होत्या. पहिल्या आवृत्त्यांमधील ' कारकुनी 'चा उल्लेख अनंततनयांना उद्देशून असावा.

**शांतरस** : बुद्धीचे ' अरबी ' समुद्र, स्फूर्तीच्या गिरण्या, शाहिरांची कंपूशाही, काव्याची साप्ताहिकी पैदास, बेचव सु (शु) नीतांचे भुंकणे यासारख्या गोष्टी बंद झाल्या तरच वाङ्मयविश्वात ' शांतरस ' येईल असा निर्वाळा या कवितेत देण्यात आलेला आहे. ' बुद्धी 'बरोबर ' अरबी समुद्र ' आणि ' स्फूर्ती 'बरोबर ' गिरण्या ' या विरोधी कल्पनासूचक शब्दांच्या सन्मुखविन्यासामुळे या वर्णनाला खुमारी आलेली आहे. ' सुनीता 'तील ' सु ' पुढे कंसात ' शु ' घालून त्याला भुंकण्याच्या क्रियेशी जोडण्यात केशवकुमारांच्या चपळ कोटिबाजपणाची चुणूक दिसते. ' काव्याची साप्ताहिकी पैदास ' हा उल्लेख ' ज्ञानप्रकाशा 'च्या साप्ताहिक पुरवणीला उद्देशून केलेला दिसतो.

**कवि आणि चोर** : महाराष्ट्र–साहित्य-संमेलनाचे १२ वे अधिवेशन श्री. कृ. कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली १९२७ साली पुण्यात भरले होते. अत्रे म्हणतात, ' त्या संमेलनाच्या निमित्ताने काहीतरी गंमत करावी म्हणून ' कवि आणि चोर ' नावाचे एक लहानसे खंडकाव्य मी लिहिले. ते माझे मित्र ' विजय प्रेस 'चे मालक आणि ' रत्नाकर ' मासिकाचे चालक श्री. सखाराम ऊर्फ आप्पासाहेब गोखले यांनी छापून प्रसिद्ध केले. हे खंडकाव्य मी माझ्या स्वत:च्या नावाने प्रसिद्ध न करता बाबूराव भाऊराव कोढितकर[१] या टोपणनावाने प्रसिद्ध केले.' (कऱ्हेचे पाणी खंड १, पृ. ३३२). त्यानंतर १९३० सालच्या ' झेंडूच्या फुलां 'च्या २ ऱ्या आवृत्तीत ते समाविष्ट झाले. द्वितीयावृत्तीच्या प्रस्तावनेत लेलेशास्त्र्यांनी केलेल्या ' ....दुसरा कोणी एक मुंबईत एका बँकेवर डल्ला मारून नाव बदलून दूरच्या एका गावी ग्रंथ-

१. ' बाबूराव ' प्र. के. अत्र्यांना आणि ' भाऊराव ' त्यांच्या वडिलांना म्हणत, तर अत्रेघराणे मूळचे ' कोढित 'चे म्हणून आडनाव ' कोढितकर '.

कर्तृत्वाच्या आसनावर अधिष्ठित होऊ लागतो तोच त्यास चतुर्भुज होण्याचा प्रसंग येतो ' इ. उल्लेखावरून या खंडकाव्याचा उगम तत्कालीन सत्यघटनेत दिसतो. तो तसा असो वा नसो, कवींच्या वाङ्मयचौर्यावर मर्मभेदक प्रहार करणारे हे खंडकाव्य सरस वठले आहे यात शंका नाही.

या खंडकाव्याचा कथाभाग असा आहे: एका काळोख्या रात्री कवी आपल्या काव्यसमाधीत दंग असताना चोरी करण्याच्या मिषाने एक चोर तिथे येतो. त्याला आपला धाकटा बंधू मानून कवी उभयतांमधला समानधर्म त्याला असा पटवून देतो :

'सोनियाचे दागिने चोरसी तू
कल्पनांचे शिणगार मी परंतू !
हिऱ्यामोत्यांवर सदा तुझा डोळा,
शब्दमौक्तिक मी सदा करित गोळा !

दोघांच्या चौर्यकर्माच्या पर्यवसानात कसे वैधर्म्य आहे, हेही कवी त्याला सांगतो. काव्यकीर्तीचा सवंग रस्ता दाखवून तो रामदासांच्या खड्या तात्त्विक ठेक्यात त्याला उपदेश करतो,

'धन्य ते चौर्य जाणावे अब्रू जे जगि वाढवी,
धिक् धिक् चौर्य मित्रा, जें नावलौकिक घालवी !'

पण चोराला काही तो उपदेश रुचत नाही, तो स्वतःच्या मार्गाने जाऊन कैदेत खितपत पडतो. तिथे कवीचे न ऐकल्याबद्दल त्याला पश्चात्ताप होतो. कैदेतून सुटल्यावर 'त्राहि मां नरकात् घोरात् सद्गुरो ! –' असे म्हणून तो कवीला शरण जातो. कवी त्या 'शर्विलकाच्या मस्तकी हस्त' ठेवून तोंड भरून आशीर्वाद देतो. त्यानंतर चोराची आणि खण्डकाव्याची सुखान्तिका केशवकुमारांनी अशी केली आहे :

पुढे कवनलेखनी कुशल चोर तो जाहला,
स्वतंत्र–कृतिचा कवी म्हणुनि मान्यता पावला !
'चतुर्भुज' न जाहला फिरुनि त्यापुढे तो जरी,
करी कवननिर्मिती करचतुष्टये तो तरी !

केशवकुमारांनी खंडकाव्यातील पद्धतीनुसार पण हास्यानुकूल होईल असा वृत्तपालट केलेला आहे. 'चतुर्भुज होणे' 'करचतुष्टये' काव्य निर्मिती करणे, चोराने चोरपावली येणे व चोरून आत पाहणे, त्याच्या मनात चांदणे असणे यासारखे भाषेचे खेळही अनेक आहेत. आख्यानकाव्याचा आभास निर्माण करणारे 'पां', 'बारे', 'अगा', असे शब्द आहेत. 'लेखकू', 'दुजे किम्' 'कीर्ति–झेंडा' यासारखे विचित्र म्हणून हास्योत्पादक शब्दप्रयोगही कित्येक आहेत. श्रीधरमहिपतीच्या ओवीचा आणि पंडितकवींच्या श्लोकांचा ढंग हुबेहूब साधलेला आहे. रामदासी रचना तर

केशवकुमारांच्या अंगीच लागलेली आहे. ' धन्य ते गायनी कळा ' व ' यत्न तो देव जाणावा ' यांच्या सळमिसळीतून ' धन्य ते चौर्य जाणावे–' इ. अनुष्टुप बनविला आहे, तर महत्त्वनिर्देशात्मक (emphasis साठी) रामदासी पुनरुक्तीचे पडसाद पुढील ओव्यांतून साभिप्राय उमटविले आहेत :

...भय न धरावे कवीने । लाज न धरावी कवीने
तरीच तयाते विमाने । नेतील स्वर्गी ।
धन्य कवी, धन्य चोर । धन्य डाकू दरोडेखोर,
काव्य सर्वांना आधार । हस्तकौशल्य दावाया ।

असे जुन्या कवीचे अनुकार या खंडकाव्यात अनेकानेक आढळले, तरी त्या कवींवर केशवकुमारांचा कटाक्ष नाही, त्यांचा कटाक्ष कवींच्या चौर्यप्रवृत्तीवर आहे.

या खंडकाव्याला जे ' एकच वाक्य ' म्हणून प्रास्ताविक जोडले आहे, त्याचा, कटाक्ष मात्र समकालीनांवर आहे. त्या प्रास्ताविकाचे लेखक विद्वद्वर्य ' जडजंबाल म्हणजे प्रा. श्री. नी. चापेकर. ते संस्कृतप्रचुर घाऊक प्रस्तावनाकार होते आणि प्रस्तावनांचा शेवट ते हटकून ज्ञानेश्वरांच्या पसायदानाने करीत. प्रास्ताविक ' एकच वाक्य !' (१०० शब्दांचे !) हे ' हृदयतरंग पु. २ ' या अनंततनयांच्या कवितासंग्रहाला ' तटस्थाचे विचारतरंग ' म्हणून चापेकरांनी जी ४९ पानी प्रदीर्घ व अवडंबरयुक्त प्रस्तावना लिहिली आहे, तिचे चपखल विडंबन आहे. या प्रस्तावनेचा चापेकरी शेवट कसा होता, ते पाहिल्यास हे स्पष्ट होते. तो शेवट असा आहे :

' शेवटी, श्री परमेश्वरकृपेने कविमित्र रा. ' अनंत–तनय ' यांचा काव्य–व्यासंग दीर्घकालपर्यंत अखंड चालू राहो व त्यांच्या विशुद्ध काव्यप्रतिभामय ' हृदय ' सागरातील अनेक सुखद शीतल ' तरंग ' महाराष्ट्रवाचकांचे मनोविनोदन व मनःशिक्षणरूपी मंगल व मानास्पद कार्य सदा नवोत्साहाने करीत राहोत अशी मनःपूर्वक इच्छा प्रदर्शित करून, सत्कविमुकुटमणी श्रीज्ञानेश्वरांच्या मंगलमय पसायदानाच्या सुप्रसिद्ध व सदा तेजस्वी उक्तीच्या सिद्धिदायक अवतरणाने ही प्रस्तावना पुरी करितो.

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो
जो जे वांच्छील तो ते लाहो । प्राणिजात.'

प्रस्तावनांचे शेवट पसायदानाने करण्याचा संकेत सार्वत्रिक असला, तरी चापेकरांचा तो खास विशेष होता.[1] ' एकच 'वाक्या ' त पसायदानाची अशी टिंगल

१. स्वतःच्या ' सुवर्णचंपक ' (१९२८) या कविता संग्रहाला जोडलेल्या ' भावोद्गारा 'त, तसेच पद्यमणिमाला (१९२६) व गद्यमणिमाला (१९२६) या संपादित पुस्तकांच्या प्रस्तावनांत चापेकरांनी अंती ' पसायदान ' मागितलेले आहे.

केल्यामुळे चापेकर भडकले. अत्र्यांनी आठवण सांगितली आहे :– 'एका व्याख्यानात ते (चापेकर) अतिशय संतापून म्हणाले की, प्रत्येक वेळी मी शेवटी ज्ञानोबांचे 'पसायदान' आणतो म्हणून हा अत्रे माझी थट्टा करतो. मग 'पसायदान' म्हणायसे सोडून मी काय 'गॉड सेव्ह दि किंग' म्हणू, म्हणजे या अत्र्याचा आत्मा संतुष्ट होईल' ('मी विडंबनकार कसा झालो.' परिशिष्ट ३, पृ. १५८) 'एकच वाक्यात' 'बिंदुस्त्रावी' हा टीकाक्षेत्रात गाजलेला शब्द योजलेला आहे. तो शब्दही चापेकरीच आहे. 'तटस्थाचे विचारतरंग' या प्रस्तावनेतच त्यांनी 'अल्प स्वल्प रचना करणारे होतकरू कवी, की ज्यांना त्यांच्या रचनेच्या तुटपुंजेपणामुळे, बिंदुस्त्रावी कवी असे नाव देणे अगदीच अस्थानी होणार नाही असे कवी' असे स्पष्टीकरण करून योजला आहे. (पृ. ४०). तेथेच कविशैलीविषयी लिहिताना 'रचनेची पुष्टी' भरीवपणा व सकस बांधेसूदपणा' नसेल तर कविता 'एखाद्या अशक्त व फिकट सौंदर्यवती स्त्रीसारखी क्षीणशक्ती व अनुकंपार्ह होते' असे चापेकरांनी म्हटले आहे. 'सुश्लिष्टशब्दावगुंठीत मौक्तिकप्रवाळमिश्रित सुवर्णगुटिकेसमान', 'पथ्यकारक', 'क्षीणशक्ति' यांसारख्या 'जडजंबालां'च्या शब्दप्रयोगांचे मूळही यातच शोधता येते.

'कवी आणि चोर' या शीर्षकानंतर जे 'ब्रह्मवाक्य' दिले आहे त्यात गडकरीछाप अर्थशून्य अनुप्रास साधण्याच्या लकबीची थट्टा केली आहे. या ब्रह्मवाक्यावरील टीप २ऱ्या आवृत्तीत अशी होती : 'सदरहू ब्रह्मवाक्याचा पुढील काव्याशी कोठल्याही प्रकारचा संबंध नाही हे सांगावयास पाहिजे काय?' ती तिसऱ्या आवृत्तीपासून बदलली आहे. ती अशी : 'सदरहू ब्रह्मवाक्याचा सुसंगत अर्थ लावून देणारास– पण वाचकांना बक्षिसाची लालूच दाखविणे बरे नाही.' श्लोक ७ मधील 'तेथले दृश्य' ऐवजी 'आतले दृश्य' व श्लोक ९ मधील 'उघडले ग्रंथ' ऐवजीं 'त्याचिया ग्रंथ' असे किरकोळ फरकही झालेले आहेत, पण ते नगण्यच होत.

या खंडकाव्यातील आख्यान जसे सर्वसामान्य विनोदी पातळीवर रोचक वाटते, तसा प्रस्तावनेचा भाग नाही. तो वाङ्मयीन प्रवृत्तीवर भर देणारा आहे. तरीसुद्धा चापेकरलक्षी विडंबनापलीकडे या प्रास्ताविकालाही एक सर्वसामान्य पदर आहे. 'चार शब्द' म्हणून ऐसपैस शब्दबंबाळ प्रस्तावना खरडणाऱ्या, ऊठसूट संतवचने वेठीस धरणाऱ्या पढिक पंडितांचा उपहास म्हणूनही तो आस्वादिता येतो.

**कादरखां** : या विडंबनगीताचा उपहासविषय 'संग्रामगिता'चा साचेबंदपणा हा आहे. 'मोहोरमधील मर्दुमकी'त वीर–विडंबन होते; यात कारुण्य–विडंबन आहे. कोणत्या तरी वीराच्या मृत्यूचे अंगावर शहारे आणणारे वर्णन करायचे, त्याच्या निधनाने झालेला हाहाःकार कथन करायचा आणि 'यापुढे अमूक कोण करील? तमूक कोण करील?' असा विलाप करीत त्याच्या पराक्रमांचे वर्णन करायचे, हे अशा ऐतिहासिक विषयांवरील विलापिकांचे ठरलेले तंत्र होते. केशवकुमारांनी, धारातीर्थी देह ठेवणाऱ्या ऐतिहासिक वीराऐवजी हिंदुमुसलमानांच्या

दंग्यात चुकून गारद झालेला पठाण नायक बनविला आणि आपल्या कवितेचा विषय वेगळ्या पातळीवर नेला "हा कोण इथे पडलेला ? 'कादरखां काबुलवाला ।" हे पालुपद उच्चारताच 'हा कोण इथे पडलेला । गोकलखां लढनेवाला' ह्या माधव कवीच्या 'गोकलखां' कवितेच्या ध्रुवपदाचे ध्वनी ताबडतोब उमटतात.[१]

'धिप्पाड देह हा आडवा । पसरला सहा अन् फूट !' अशा धेडगुजरी पण हास्यस्फोटक शब्दात त्या धूडाचे वर्णन सुरू होते. त्याच्या मृत्यूने उडालेल्या हाहाःकारात 'तो शरबत पीतां पीतां । दचकेल मधेच अमीर !' असा नाट्यपूर्ण चटकदार चरण येतो. अचेतनांनाही पाझर फोडायचे नि शोकाकुलतेच्या उदात्ततेची सीमा गाठायची, असा शाहिरी संकेत ठरलेला होता; केशवकुमारांनी त्याचे केलेले विडंबन म्हणजे हास्यानुकूल कल्पकतेचा अप्रतिम नमुनाच आहे :

'ते हेरतचे अक्रोड
ते बदामपिस्ते गोड–
रडरडुनी होती रोड
अल्‌बुखार अंबुनि गेला ।'

या तथाकथित वीरमरणामुळे केवढे बहुमोल नुकसान होणार होते, हे सांगताना उभी केलेली 'तो हिंग काबुली आता । विकणार यापुढे कोण ?' अशी प्रश्नालंकारांची फलटण हीसुद्धा शाहिरी सांकेतिकतेचीच थट्टा आहे. त्यातील 'यापुढे कोरून कलिंगडे कोण खाईल व सुरमा घालून नयनांचा नूर कोण सजवील ?' इ. प्रश्नांतून जे शब्दचित्र उभे राहते, त्यावरून केशवकुमारांची निरीक्षणशक्ती कशी सूक्ष्म होती हे दिसून येते. हा व्याजविलाप चालू असताना पंचनाम्यासाठी डगलेवाले नगररक्षक येतात. तेव्हा कवी इशारा देतो,

जा, पळा, –पंचनाम्याला
तो आला डगलेवाला,–
अडकाविल की साक्षीला,
मग म्हणाल 'पुरता भंवला । कादरखां काबुलवाला ?'

अशा रीतीने व्यवहाराची टाचणी लावून नाटकी कारुण्याचा फुगा फोडला आहे.

---

१. येथे एक गोष्ट नमूद करण्याजोगी आहे. अनंततनयांनीही 'उद्धव' या चालीवरच 'गोकल्‌का बापू है ये'। शब्द आजि कर्णी घुमती' या चरणाने प्रारंभ होणारी 'गोकल्‌का बापू है' या शीर्षकाची कविता रचलेली आहे. तसेच 'रावबाजींचे राज्यदान !' या एकाच शीर्षकाच्या अनंततनय आणि माधव यांच्या ऐतिहासिक विषयावरच्या कविता आहेत. (पहा :– हृदयतरंग पु. २, शक १८४२ (१९२०), पृ. ७७–८४, कवि माधव यांची कविता, १९३५, पृ. १७०–१७६),

त्या काळी शोकाकुलतेची शीग गाठणारी व महाराष्ट्राच्या जिव्हाग्री खेळणारी अती गाजलेली कविता म्हणजे गोविंदाग्रजांची 'राजहंस.' केशवकुमारांच्या मनात तर तिने कायमचेच घर केले असेल, हे सांगायला नको. अर्थात तिचेही पडसाद या विडंबनात उमटलेले आहेत. विशेषत: कडव्यातील 'करू नका गलबला अगदी। झोपला असे हा वीर ! जन्मात असा पहिल्याने। पहुडला शांत गंभीर !' या ओळी वाचताच 'करू नका गलबला अगदी। लागली झोप बाळाला।। आधीच झोप त्या नाही।' इ. चरणांचे शब्द आणि सूर कानात निनादू लागतात. सारांश, संग्राम-गीतांच्या विरोधी भक्तिपोटी जन्म पावलेल्या विडंबनाच्या विलापवळशांना पीळ भरता भरता त्यात गुरुभक्तीचे धागेही नकळत गुंफले गेले आहेत, यात शंका नाही.

**मम बाबाची ती आवा** : ही कविता प्रा. श्री. नी. चापेकर यांच्या 'सुवर्णचंपक' (पुणे १९२८) या कवितासंग्रहातील 'आधुनिक कवींचा आरसा' या कवितेला प्रत्युत्तर म्हणून लिहिली गेली. तिचा कटाक्ष चापेकर आणि त्यांचे कवित्व यांवर आहे. ही कविता 'झेंडूच्या फुलां'च्या आजवरच्या आवृत्त्यांतून समाविष्ट झालेली नव्हती. 'पठाणक्लब'मार्फत 'पांचजन्याङ्क' (एप्रिल १९२९) म्हणून जो विशेषांक निघाला होता,[1] त्यात 'कवि तोच' हे कविनाम देऊन ती प्रथम प्रसिद्ध करण्यात आलेली होती. 'कवि तोच' म्हणजे केशवकुमारच. केशवकुमार आणि चापेकर यांची जुगलबंदी जुनीच होती. 'एकच वाक्य' 'कवि आणि चोर' या खंडकाव्याला जोडलेल्या प्रास्ताविकाविषयी वर लिहिलेच आहे. हे खंडकाव्य पुण्यास भरलेल्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाच्या निमित्ताने रचले गेले होते व त्या संमेलनात झालेल्या काव्यगायनाच्या कार्यक्रमात केशवकुमारांनी भाग घेतला होता. (म. साहित्य-संमेलन १२ वे अधिवेशन समग्र अहवाल, पुणे १९२७, पृ. २९). ज्या कवींचे आपण विडंबन केले, त्यांचे पुढे आपल्याशी चांगले संबंध प्रस्थापित झाले असे सांगून आचार्य अत्र्यांनी म्हटले आहे, '...मला मुळीच क्षमा केली नाही, असे एकच कवी होते. ते म्हणजे प्रा. श्री. नी. चापेकर...... चापेकरांना प्रत्येक शब्दामागे 'सत्' आणि 'सु'चे टोपण घालण्याचे विलक्षण वेड होते. त्याचे 'सदंगि माझ्या सत्कोट। सत्पगडीचा वर थाट' असे विडंबन केल्यामुळे ते माझ्यावर फारच भडकले ! एकदा तर चापेकरांची मी फारच गंमत केली. पुण्याच्या 'नगर वाचन-मंदिरा'त एका कोजागिरीच्या रात्री 'मराठी काव्य' या विषयावर माझे व्याख्यान होते. अध्यक्षस्थानी स्वत: प्राध्यापक चापेकरच होते. कारण तेच वाचनमंदिराचे अध्यक्ष होते. मी माझ्या व्याख्यानात मराठी भाषेमधील निरनिराळ्या भिकार काव्यांचे नमुने सांगून श्रोत्यांमध्ये भयंकर हशा पिकवला. ते नमुने कोणाचे ते मी

---

१. अधिक माहितीसाठी पहा : –स. गं. मालशे, 'पाचजन्याङ्', साहित्यसहकार ऑगस्ट १९६९, पृ. ३४, ३७.

श्रोत्यांना मुळी सांगितलेच नाही. अध्यक्षीय खुर्चीवर प्रा. चापेकर भयंकर चेहरा करून बसले होते आणि मनातल्या मनात मजवर दातओठ खात होते. कारण मी माझ्या व्याख्यानात श्रोत्यांना सांगत असलेले भिकार कवितेचे बहुतेक सर्व नमुने त्यांच्याच काव्यामधले होते! पुढे शेवटी शेवटी तर चापेकर माझ्यावर इतके चिडले की, 'एकावली' नावाच्या एका काव्यात त्यांनी मला 'डुक्कर' अशी शिवी हासडली!' ('मी विडंबनकार कसा झालो?', परिशिष्ट ३ पृ. १५८ पहा.) ही शिवी म्हणजे चापेकरांची 'नरसूकर' ही कविता. तीत तत्कालीन अत्र्यांचे कुत्सित वर्णन आहे. कविता अशी :

काळा क्रूर कभिन्न देह सुचवी चित्तांतली कृष्णता।
ताडाच्या सम शुष्क, उंचि तशी ती उद्दाम उन्मत्तता॥
भूतांच्या दशनांपरी विकटशी निस्तेज दंतावली।
भासे हा नररूप सूकर खरा, याची नको सावली॥

(एकावली, पुणे १९३३)

'मम बावाची ती आवा' या कवितेचा कर्ता 'कवि तोच' म्हणजे केशवकुमारच! याचे कारण 'सदंगि माझ्या सत्कोट' इ. 'सत्'ची जी थट्टा या आठवणीत सांगितली आहे, ती याच कवितेत आहे. चापेकरांच्या 'आधुनिक कवींचा आरसा' या कवितेत आधुनिक कवींना दूषणे लावली आहेत. त्यात संस्कृत शब्दांचा दुस्वास आणि गावंढळ शब्दांचा हव्यास, असे एक आहे. चापेकरांनी ते पुढील शब्दात मांडले आहे :

प्राकृत–कविजन–तिटकारा। हाच आमचा डांगोरा
'माता' शब्द न मज ठावा। 'मम बावाची ती आवा'
संस्कृत भाषेचा हेवा। दावि 'खरा न रुचे मेवा'॥

चापेकरांच्या चालीचे अनुकरण आणि ध्रुवपदासाठी त्यांचाच एक चरण उचलून केशवकुमारांनी चापेकरांना अगदी चारीमुंडे चीत करून टाकले आहे. 'सुवर्ण-चंपका'ची पाकळी न् पाकळी खिळखिळी केली आहे! प्रारंभीस 'वाचकांस विज्ञप्ती' आहे, तीत 'सद्वाचक' शब्द येतो, तो विडंबित झालेला आहे. चापेकरांच्या गद्य–पद्य–लेखनात 'सत्' व 'सु'चा सुळसुळाट असे. 'दिवाळी' या केवळ चार चरणी कवितेत 'सद्वृत्त', 'सद्रंग' 'सत्कृति' आणि तत्सम 'सस्नेह' असे चार शब्द येतात. या लकबीची थट्टा केशवकुमारांनी अशी लीलया केली आहे :

सद्वाचक हो, सत्कवि मी। सद्भावच मम सत्कवनी
सत्सुंदर मम सद्भाषा। सन्मानसि मम सद्आशा
सदंगि माझ्या सत्कोट। सत्पगडीचा वर थाट

शिवाय 'सन्नारी' हा शब्द योजून त्याची टीपेत फोड दिली आहे आणि

सद्‌आशे 'वरील टीप देऊन 'सत्‌'चे अगदी सद्विडंबन घडवून आणले आहे. चापेकरांच्या कवितेतील कित्येक चरणांना मुरड घालून ते त्यांच्यावरच उलटवले आहेत. कवितासंग्रहाच्या प्रस्तावनारूप 'भावोद्‌गारां'ना ओकायला लावले आहे. 'कशास वृत्ते ही सकल। वाटोळ्याहुनी आम्ही गोल' हे चरण 'वाटोळ्याहुनि आम्ही गोल। नर्मदीय जडजंबाल' असे, चापेकरांचे 'जडजंबाल' हे विडंबित नाव चतुराईने योजून हास्यास्पद ठरविले आहेत.

'मम बावाची ती आवा' कवितेच्या ४ थ्या स्तबकातील अनेक निर्देशांचा संदर्भ 'सुवर्णचंपक' हा चापेकरांचा संग्रह चाळल्यास सहज लागतो. त्या संग्रहात होळी, दिवाळी, मकरसंक्रमण या सणांवर कविता आहेत. केशवकुमारांनी निर्देशिल्याप्रमाणे ईश, शारदा, गणेश यांना 'वंदने' आहेत. 'मनाची आर्तता' या नावाचे 'आर्तिपंचक' आहे. 'स्वनितक षट्‌क' म्हणून सहा सुनीतांचा एक गटच आहे. 'भिल्ल युवा' नावाची कविता आहे, 'नाटचाची आंबट सारे। कढविन- मज येते सारे' यातली 'आंबट सारे' म्हलजे 'हॅम्लेट नाटकाचे सार' व 'ऑथेल्लो नाटकाचे सार' या चापेकरांच्या कविता. 'द्वेषाग्नीचा मनि वणवा' व 'कन्नडकूपि जसे पाणी' हे चरण जसेच्या तसे उचलून वेगळ्या संदर्भात उभे केले आहेत. 'बिंदुस्रावी', 'अनुस्यूत', 'व्युत्पन्न', इ० श्रीकृष्ण टांकसाळीतल्या खास शब्दांचाही 'फन्ना' उडविला आहे. शेवटच्या स्तबकात शिळ्या रांजणातल्या 'पसाय' पाण्यासह चापेकरांच्या अर्थहीन 'प्रस्तावनां'चा छद्मी उल्लेख केला आहे. 'वक्ता मी टेंपरवारी। प्राध्यापकता मिरवि तरी!' यामध्ये चापेकर डेक्कन कॉलेजात प्राध्यापकी करीत होते, त्याचा निर्देश आहे. 'हीच रहस्योद्‌ग्राहकता' हा संदर्भ रा. प्र. कानिटकरांनी उल्लेखिलेल्या प्रा. चापेकरांच्या 'रहस्योद्‌ग्राहक पद्धती'वरील व्याख्यानांशी जोडता येतो. ('कविपरिचय', सुवर्णचंपक, पृ. ६).

एकंदरीत ही कविता चापेकरांच्या मूळ कवितेशी आणि त्यांच्या 'सुवर्णचंपक' या काव्यसंग्रहाशी बरीच बद्ध आहे. त्यामुळे अतिशयोक्तीचा खळाळत जाणारा विलास जसा केशवकुमारांच्या अन्य विडंबनात आढळतो, त्याचा येथे अभाव आहे. सद्विडंबनासारखे स्थळ हा अपवाद. हे सद्विडंबन, 'कुत्रे अहो'सारखे संबोधन, 'शिळ्या रांजणी। 'पसाय'-पाणी'सारखा 'जडजंबाला'ला लगावलेला सज्जड टोला हीच काय ती इथे विनोददृष्टचा जमेची बाजू आहे. 'कुठल्या वक्त्री तिज बाहू?' या चरणातल्या हास्याला ग्राम्यतेचा वास आहे. चापेकर ही व्यक्ती, तिची विशिष्ट कविता व कवितासंग्रह, तत्कालीन साहित्यविश्वातील तिचे लब्धप्रतिष्ठित स्थान यांची नीट कल्पना असल्याखेरीज या कवितेतल्या खाचाखोचा उलगडणाऱ्या नाहीत तेव्हा मा विडंबनाचे यश मर्यादित स्वरूपाचे आहे, असेच म्हटले पाहिजे.

**चाफा** : ही व्यक्तिविडंबनात्मक कविता आहे. तीत बी कवींच्या सुप्रसिद्ध 'चाफा'

कवितेच्या चालीचे, पालुपदाचे व शब्दकळेचे यशस्वी अनुकरण असले तरी 'त्या थोर कवितेची कोणत्याही तऱ्हेने बदनामी करण्याचा प्रस्तुत कवितेत प्रयत्न केलेला नाही,' हा केशवकुमारांचा निर्वाळा पूर्णपणे खरा आहे. त्याचबरोबर ''चाफा' या कवितेला तिच्या नावावरून विडंबित व्यक्तीचा बोध न होता तर कुणीही हाती न धरता' (काव्यविहार, पृ० १६४) हा माधवराव पटवर्धनांचा अभिप्राय कठोर वाटला, तरी बहुतांशी खरा आहे. 'चाफा' या शीर्षकावरून व 'फांशी अंगी चंदन-उटी। लावी हळदलेप लल्लाटी । आणि कांति पीत गोमटी' या वर्णनावरून श्री. नी. चापेकर डोळ्यांसमोर उभे राहावे असा केशवकुमारांचा प्रयत्न दिसतो. मात्र या प्रयत्नाचे यश समकालीनांपुरतेच मर्यादित राहते. कारण श्री. नी. चापेकरांचे साहित्यक्षेत्रातले माहात्म्य आज जवळ जवळ पुसले गेलेले आहे. 'चाफा' कवितेचे वृत्तानुकरण सफाईदार साधले आहे हे मात्र मान्यच केले पाहिजे.

**प्रेमाचे अद्वैत** : ह्या विडंबनात सायकलवरून डबल सीट प्रवास करणाऱ्या प्रियकर–प्रेयसींना पोलिस आपल्या कायद्यानुसार हटकतो, त्यावर प्रीतीच्या अद्वैती-कायद्यान्वये 'शरीरे दोन असली तरी आमची मने एक आहेत' असे उत्तर प्रेमवीर देतो. पोलिसाला ते काही पटत नाही, त्याला चिरीमिरी पटते आणि त्यांची सुटका होते– अशी खास पुणेरी लघुत्तमकथा गोविलेली आहे. 'प्रेमाचे अद्वैत' या नावाचे श्री. विठ्ठलराव घाटयांचे एक सुनीत आहे, पण ते येथे लक्ष्य नाही. येथे माधव ज्युलियनांच्या कवित्वातील आशय व अभिव्यक्ती यावरच कटाक्ष आहे. श्री. विठ्ठलराव घाटयांनी 'सायकलीवरून लकडी पुलाशी जाणारी (माधवरावांशी) तोंडदेखला डाव खेळली' (दिवस असे होते, पृ. ३६१) असेही म्हटले आहे. तेव्हा याही कवितेचा संदर्भ माधव ज्युलियनांच्या जीवनाशी जोडता येईल असे वाटते.

मा. ज्युलियनांच्या शब्दांचे आणि वर्णनांचे विडंबन केल्याच्या खुणा यात जागोजाग आढळतात. लैला-मजनू, बटाऊ-मोहना या इष्काच्या मुशाफिरांचा उल्लेख फारशी वातावरणाला पोषक आहे. गर्दीची तमा न धरता पायचाकीवरून जाणारी तरुणी त्यांच्या कवितेत भेटते. उदा. 'पायगाडीवर बसून सरळ ताट । चतुर गर्दीतून काढण्यात वाट ॥ ('रागिणी–विधवा', स्वप्नरंजन पृ. ६८). 'जनानी पायचाकी' हा उल्लेख 'पडे घाटावरी तिची जनानी पायचाकी' ('अधिष्ठात्री', गज्जलांजलि, पृ. १३) असा येतो. 'चकड्यांत', 'भुर्गुरता', 'कवटाळुनी', 'पर्वानगी' अशी निभृत स्वरांना गाळून उच्चारानुसारी लेखनपद्धत, 'सोसाटती' हा नामधातू, 'अन्'चा उठवळ प्रयोग, 'मांव्सल'सारखे नासिक्य-लेखन, इ. मा. जूलियनी लकबी येथे आढळतात. 'पायचाकी', 'धूरचाक्या', 'चामचंच्ची' असे भाषा शुद्धीच्या चळवळीनुसार आलेले शब्द योजलेले दिसतात. मा. जूलियनी टांकसाळीतील अनेक नाणी इथे चलनी केलेली आहेत. उदा :

| | | |
|---|---|---|
| केशवकुमार | माधव जुलियन | |
| धूरकाम्या | केव्हा त्या वड-ओगद्यातून पळे ती धूरचाकी नवी — (विरहतरंग, श्लो. १०५) | |
| रुस्तुमी | हूशार धूर्त रुस्तुमी ('कमाल')<br>दाखवा ही रुस्तुमी ('भ्रांत तुम्हां—')<br>धन्य रुस्तुमी ('कुणी काय बांधिले') | |
| बेडरी | बेडर, निष्पाप, मनोवेधक—('कुमारी पिरीजा') | |
| कंदील | मज कन्दील परन्तु अन्धुक ('श्यामा–रजनी') | |

'भुर्भूरतां वायुमाजी बटा' यासारख्या वर्णनाची 'अलकाशी तव वायु खेळतां' ('श्यामारजनी'), 'कुरळी तुझी बट ये पुढे निटिलावरी' ('सानुली'), 'केस कुरळ लोचनी तव बहार' ('रागिणी विधवा') 'पुढले आंखुड केस थोडके कुरळे क्रीडातुर। तरङ्गति वाऱ्यावर भुरभुर' ('कौमार्यस्मित') अशी बरीच स्थळे मा. जूलियनांच्या कवितांतून येतात.

मा. जूलियनांच्या प्रेमगीतातला नायक प्राय: भीरु, बुजरा, स्वत: पुढे पाऊल न टाकणारा असतो, तर नायिका धीट, वर्चस्व गाजवणारी, पुरोगामी वृत्तीची असते. या कवितेतही नायिकाच कर्तीकरविती आहे. तीच पायचाकी चालवीत असून नायक तिच्या आधाराने 'पिन्'वर खडा आहे. तेथून तिच्या केसाचा 'कामीनिया' तो मध्यमवर्गीय चोरट्या वृत्तीने हुंगीत व चाखीत आहे. उतारावर ती वेगाने 'पावले' मारते तेव्हा तो भयाने किंचाळतो. 'हटा बाजूला' ह्या पादचाऱ्यांना उद्देशून तिने केलेल्या दरडावणीला तो भाग्यवंतांना लाभलेला कृपाप्रसाद समजतो. बेडर प्रेयसी आणि भावुक प्रियकर अशी ही जोडी माधव जुलियनांच्या प्रेमकल्पनेचे विडंबन करण्यासाठी चित्रित झालेली आहे.

ही कविता प्रथम 'यशवंत' मासिकात (जानेवारी १९३०) सटीप प्रसिद्ध झालेली होती. दुसऱ्या आवृत्तीपूर्वी (दसरा १९३० पूर्वी) तिजी रचना झालेली असूनही ती त्या आवृत्तीत अंतर्भूत झालेली नव्हती, तिसरीत टीपा गाळून तिचा अंतर्भाव झाला. कवितेच्या ५ व्या स्तबकातील 'मवाली' शब्द, मासिकातील संहितेत 'मवाळी' असा होता व त्यावर 'हे मुंबईच्या टांकसाळीतले नाणे आहे' अशी टीप होती. आणखी काही गमतीच्या टीपा अशा :

पावले : पेडले

रुस्तुमी : या शब्दाचा अर्थ अद्यापि आम्हाला कळत नाही.

बटा : या ठिकाणी 'जटा' हाही पाठ एका जटापाठी मित्राने सुचविला आहे.

हुकम्डर : करड्या लष्करी सवालाची गावठी दुर्दशा.

ही एक हास्यकथा आहे आणि तिचे निवेदन सराईतपणे झालेले आहे. नागर–गावठी, संस्कृत–फारशी अशी शब्दांची खिचडी अवश्य तेवढीच आहे. 'जनानी पाय चाकी', 'हुकम्डर', 'रुस्तुमी चकर्डे', 'वायुमाजी बटांचे भुर्भुरणे', 'हटा बाजूला असे आज्ञापिणे', 'बेडरी धैर्य', 'चामचंचीतले काहीसे' या शब्द-संहती उच्चारा-सरशीच हास्यवलय निर्माण करतात. 'जमाखर्च–जमादार' ही चरणांच्या आरं-भीची अचपळ कोटी आणि गावठी 'कंदीला'शी दिव्य 'स्थण्डिला'चे चरणांच्या शेवटी यमक साधून जोडलेले अवखळ नाते यात विसंगतविन्यासाचीच गंमत आहे. 'किंचाळलो'सारख्या काही शब्दात जरूर तो अतिस्वर (overtone) आहे. पण 'श्यामले'प्रमाणे कल्पनांची आणि अतिस्वरांची आतषबाजी नाही. 'पुढे पातलि पोलिसी आकृती!' ही रेखीव पर्यायोक्ती किंवा 'तयाच्या करि ठेविले काहीसे!' ही इंगित जेवढ्यास तेवढे व्यक्त करणारी गुढोक्ती अशा सहज साधलेल्या गमती–गमतींनी कथा पुढे सरकत जाते. त्यामुळे विडंबन आणि स्वतंत्र विनोद या दोन्ही दृष्टींनी ही कविता सर्वोत्कृष्ट ठरते.

**प्रेमाचा गुलकंद** : ही एक पद्यबद्ध हास्यकथा आहे. आशय असा : प्रेयसीचे मौन ही मूकसंमती समजून एक प्रेमवीर तिला रोज गुलाबांची भेट देतो. सात महिने लोटतात. धीर करून तो विचारतो, 'गुलाब फुकट गेले का?' 'हा काय वृथा आळ!' असे म्हणून ती त्याच्यापुढे गुलकंदाची बरणी आणून ठेवते. त्याला मूर्च्छाच यायची, पण 'एवढा भुर्दंड भरला, तर निदान गुलकंद कशाला सोडा', असा व्यावहारिक विचार सुचून तो सावरतो, गुलकंदाच्या औषधावर कसाबसा जगतो! बिग, भोंड, 'खपणे', तारांगण दिसणे असे गमतीचे शब्दप्रयोग, 'आळ वृथा हा!' सारखा संवादातला कांगावा, गोंडस विशेषणे प्रत्यक्ष न सांगता कंसाचा केलेला खुबीदार पर्यायी उपयोग, कवीने शेवटी केलेले बिलंदर निवेदन आणि धक्कान्ति-केचा विस्मयपूर्ण ढंग यामुळे या काव्यकथेला विशेष रंगत आलेली आहे.

ही काव्यकथाही मा. जूलियनांच्या 'गोड निराशा', (स्वप्नरंजन, पृ. २९) या कवितेचे विडंबन असल्याचे प्रा. धोंड यांनी उपर्युक्त व्याख्यानात सांगितले. केळे-शास्त्र्यांनीही या कवितेला 'कवींच्या अधम भावना व रचना यांचा समाचार' घेणाऱ्यांपैकी गणलेली दिसते. परंतु ह्या कवितेत मा. जूलियनांच्या कवितेच्या चालीचे, शब्दकळेचे वा लकबींचे खास विकृतानुकरण केलेले दिसत नाही. प्रेमभंग आणि गुलाबाची फुले एवढ्यापुरतीच दृष्टी केन्द्रित केल्यास तिच्या कक्षेत इतर कवींच्या कृतीही येतील. तसेच पाहिले तर मा. जूलियनांच्या वरील कवितेपेक्षा 'निर्यमक सुनीत' (काव्यविचार, पृ. ५१ किंवा तुटलेले दुवे, सु. क्र. ३) या कवि-तेशी तिचे नाते अधिक जुळलेसे वाटते. या सुनीताची अंतीची द्विपदी अशी आहे : 'तो पेटीमधी मरगळी अजुनिही निर्माल्य आहे बरे। ही आहेत फुले तुझीच तुजला वाटेल का हे खरे?' 'आळ वृथा हा की' सारख्या संवादात या द्विपदीचे पडसाद

असावेत, असा भास होतो. पण तो भासच. या कवितेवरून मा. जूलियनांच्या कवित्वाची आठवण होण्याऐवजी गोविंदाग्रज–बालकवींच्या कवित्वाची आठवण होते. 'चंद्रकांत' वृत्ताचा बाज आणि भाषेचा साज गोविंदाग्रजपद्धतीचा आहे. 'गुलाब कसले ? प्रेमपत्रिका', 'फुलता नजराणा' 'नवतरणे', 'प्रेमतपश्चर्या' हे भाषेचे प्रयोग त्याच पद्धतीचे आहेत. एकंदरीत प्रेमवेडेपणाची सहजपणे रेवडी उडविणारी विडंबननिरपेक्ष कविता म्हणूनच तिच्याकडे पाहणे अधिक बरे.

**सारंगीवाला** : 'शलाका' (१९२५) या रविकिरण मंडळाच्या कवितासंग्रहात यशवंत आणि गिरीश यांच्या याच शीर्षकाच्या व एकाच वृत्तातल्या कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. यशवंतांच्या कवितेवर १८–१–२४. तर गिरीशांच्या कवितेवर १३–१–२४ अशी तारीख आहे. बहुधा तेव्हाच लिहिलेली व 'उषा' (९ मे १९२४) या संग्रहात प्रसिद्ध झालेली त्याच चालीवरची मा. जूलियनांची 'कौमुदी, विषाद आणि संगीत' या नावाची सारंगीवाल्यासंबंधीचीच कविता आहे. सारंगीवाल्याच्या सुरावटीने झालेल्या भावुक मनःस्थितीचे संस्कारचित्र तिघांच्याही कवितांमधून रेखाटलेले आहे. या त्रयीच्या भावुकतेवर व्यावहारिक पातळीवरचा, रोखठोक उतारा म्हणून केशवकुमारांनी 'सारंगीवाला' ही आपली प्रत्युत्तरात्मक कविता रचलेली दिसते. 'मनमोहन ! वाजवुनी सारंगी' या गिरीशांच्या कवितेशी तिचे सूर अधिक संवादी आहेत. पण पुढे केशवकुमार व गिरीश यांच्या प्रत्यक्ष व्यवहाराच्या पातळीवरील सुरात सुसंवादित्व आल्यामुळे बहुधा तिसऱ्या आवृत्तीपासून केशवकुमारांचा 'सारंगीवाला' 'झेंडूच्या फुलां'तून उठून 'गीतगंगे'च्या काठावर जाऊन बसला होता. या आवृत्तीत पुन्हा तो 'झेंडूच्या फुलां'च्या बागेत परत आलेला आहे.

**एक काव्यप्रकार** : वा. ना. देशपांडेलिखित 'नंदनवन मुकल्यावर' (आराधना, पुणे १९५६, पृ. ७१–७२) या लवंगलता छंदातील संवादात्मक, प्रयोगशील काव्यनाटचाचे हे सरस विडंबन आहे. तिथे आदाम व ईव्ह या आदिम जोडप्याला 'तम केव्हा सरे ?' असा तात्त्विक प्रश्न पडलेला असतो. इथे धोंडो व गुंडो या दोघा कारकुनांना 'काम केव्हा सरे ?' हा व्यावहारिक प्रश्न पडलेला आहे. हास्यास्पद पातळीवर मूळ कृतीचे प्रतिध्वनी उमटविण्याच्या कसोटीला हे विडंबन पुरेपूर उतरते. 'उपहासिनी' (पृ. ६९) या काव्यसंग्रहातून हे विडंबित काव्यनाटच या आवृत्तीत घेण्यात आले आहे.

**अरुण** : रंगीबेरंगी, लौकिक–अलौकिक, सरस-निरस उत्प्रेक्षांची माळका असे या कवितेचे स्वरूप आहे. 'अरुण' म्हणजे शंकराच्या चिलमीतून खाली आलेला लाल निखारा किंवा सुरतेची बेसुरत करणारी पुणेरी जोडेपट्टी, अशा प्रकारच्या उत्प्रेक्षांचा तीत मीनाबाजार मांडलेला आहे. उत्प्रेक्षांच्या आतषबाजीने कल्पनांचा असा खेळ मांडणे म्हणजे खरी कविता नव्हे, हे सुचविण्याचा यात रोख दिसतो आणि

तो 'बालकवीं'च्या 'अरुणा'पेक्षा केशवकुमारांच्या गुरूच्या–गोविंदाग्रजांच्या 'अरुणा'लाच अधिक लागू होणारा आहे. या कवितेत पुणेरी जोड्यांप्रमाणे, शारदामंदिरातील चहापान, पुण्याच्या सभेत होणारी देशभक्तांच्या पगड्यांची वावडी, घोरपडे यांचे दुकान[1] असे खास पुणेरी उल्लेख येतात. गडकऱ्यांच्या निधनानंतर 'एकच प्याला' नाटक प्रसिद्ध झाले. त्याला वि. सी. गुर्जर यांची 'ठिगळ' म्हणून प्रस्तावना जोडलेली आहे. तिचा प्रारंभ 'कै. –हाय!' असा उद्गारवाचक आहे. त्याची थट्टा 'बच्चा–इ–साकू'वरील टीपेत केलेली दिसते.

**कानगुजला** : माधव मनोहर यांनी रचलेल्या याच शीर्षकाच्या कवितेचे हे विडंबन आहे. या विडंबनकाव्यावर केशवकुमारांची टीप : 'ते आपले जवळीं नि कानगुजले–माधवी (नाशिक)'. १९३० साली नाशिकच्या वाङ्मय–विहारमंडळाने नाशिककर कवींचा 'माधवी' नावाचा एक प्रातिनिधिक संग्रह प्रसिद्ध केला होता, त्यात 'मनोहर माधव' या नावावर ही मूळ कविता प्रसिद्ध झालेली होती. कविता संग्रहाच्या शेवटी दिलेल्या कविपरिचयात 'मनोहर माधव हे एक तरुण होतकरू कवि आहेत' एवढीच कवीची ओळख दिलेली होती. त्या काळी माधव मनोहरादी जे तरुण कवी होते, त्यांच्यावर माधव जूलियनांचा जबरदस्त पगडा होता. 'कानगुजला' हा शब्द माधव जूलियनी टांकसाळीत घडलेलाच आहे.[2] माधव मनोहरांच्या कवितेचा आशय असा : काहीशा आगाऊपणे एकदम हात दाबून सलगीने कानगुजणाऱ्या लोचट प्रेमवीराला एक तरुणी पहिल्या तीन प्रसंगी दाद देत नाही, शेवटी तो पुष्पगुच्छ घेऊन आल्यावरही ती 'आहे तुच्छही पुष्पगुच्छ!' असे उत्तर देतें. प्रेमवीर संतापून निघून गेल्यावर मात्र ती (बहुधा मनाशी) म्हणते,

ये राही लगटून खेटुनि उभा, आलिंगुनी चुंबुनी
ये काही कर तू गडे! परि आता ये प्रेमला धावुनी

मूळ कवितेत ६ + ६ + ६ + २ अशी स्तबके आहेत; विडंबित प्रतिकृती ४ + ४ + ४ + २ असे नेटके सुनीत आहे. प्रिया आणि प्रेमवीर यांऐवजी तीत लेखक आणि त्याची पत्नी यांच्यातले समांतर प्रसंग आहेत. पहिल्या तीन 'कानगुजण्या'बरोबर लेखकपत्नी, वाढत्या श्रेणीने, आपल्या प्रतिक्रिया एखाद्या कैदाशिणीसारख्या व्यक्त

---

१. पुण्याच्या सोमवार पेठेतील हौदानजीक माधवराव हणमंतराव घोरपडे यांचे कापडाचे दुकान होते व त्यांचा नाटकमंडळ्यांशी घनिष्ट संबंध असे, ही गोष्ट येथे लक्ष्य आहे.

२. पहा :– "तो स्नेही 'बघ इंदु'कानगुजला 'ती रे! पहाशी कुठे" (विरहतरंग, आ. १ ली, १९२६, १२–७९) व 'वेडा जीव निसर्गभक्त असला घ्यावा कसा मंदिरी। कोणा कानगुजेल काय? न कळे कैसा करी यत्न हा' (तुटलेले दुवे, १९३८, सुनीत १८)

करते. त्यात लेखकाची सभासंमेलने, नाटके, लेखन वाचून दाखविणे आणि संसाराकडे दुर्लक्ष करणे, यांची खरमरीत आणि सक्रिय उद्धारगत होते.

शेवटच्या कानगुजण्याचे पर्यवसान मात्र असे होते :

तो आला जवळी नि कानगुजला देऊन काहीतरी
तो आलिंगुनि ती म्हणे, 'करविल्या केव्हा कुड्या या तरी ?'

लेखकपत्नीचा चढलेला पारा असा व्यावहारिक पातळीवर खाली उतरवून केशवकुमारांनी मूळ कवीच्या भावविवश इच्छापूर्तीवर रामबाण मात्रा दिली आहे. आज माधव मनोहर हे कवीपेक्षा टीकाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांची मूळ कविता आज कोणी वाचील असे वाटत नाही. तरी पण तिचे हे विडंबन केवळ विनोदी सुनीत म्हणून वाचले तरी मोठे फक्कड वाटते.

**कवि आणि कारकून :** 'दिवा आणि तारा' या केशवसुतांच्या संवादात्मक सुनीतसदृश कवितेचे या सुनीतात बाह्यानुकरण आहे. 'कवि आणि चोर' या खंडकाव्यातल्याप्रमाणे येथे 'कवि आणि कारकून' यांच्यात बंधुत्व कल्पिले आहे. कारकुनी विश्व आणि काव्यविश्व यांच्यातील साम्य हास्योत्पादक रीतीने मांडून कवीच्या दारिद्र्याचे वर्म शेवटच्या द्विपदीत उघड केले आहे, ते असे :

'मित्रा, हे सगळे खरे,' कवि वदे, 'तुझ्याप्रमाणे पण —
माझ्या मूर्खपणास ना दरमहा देई कुणी वेतन !'

**पत्रे लिहिली पण.. ? :** यात प्रेमवेड्या वृत्तीचे सुंदर विडंबन आहे. ते गोविंदाग्रजांच्या 'फुले वेचिली पण... ?' ह्या सुनीताच्या बाह्यानुकरणाने साधलेले आहे. गोविंदाग्रजांचा प्रश्न व्याकुळ करणारा, तर येथला हास्योत्पादक आहे. गालिचे पाहायला जमलेल्या 'गोड गर्दी'त एक होतकरू कवी शिरतो. तेथल्या कोणा तरुणीचे त्याला जबरदस्त आकर्षण वाटते. पण ती विद्युल्लतेप्रमाणे सटकते ती कायमचीच ! मग तिला उद्देशून तो कविता लिहितो, 'व्यक्तिस्तंभा'तून (Personal Column) जाहिराती देतो. पत्रेही खूप लिहितो. पण त्याच्यापुढे यक्षप्रश्न असतो :—

पत्रे आजवरी तुला खरडली त्याची पहा बंडले–
येथे बांधुनि ठेविलीत ! –पण ती धाडू कुठे प्रेमले ?

**'कवीची विरामचिन्हे' :** हे गोविंदाग्रजांच्या सुप्रसिद्ध 'विरामचिन्हे' या कवितेचे नीटस बाह्यानुकरण आहे. कवींच्या अपप्रवृत्तीवरच त्याचा रोख आहे. बायकोच्या नावावर कविता पाठविल्यामुळे ती मासिकात हटकून छापून येते, यावर या कवितेत 'अर्धविराम' होतो. हा स्त्रीनाममहिम्याचा प्रयोग मराठी साहित्यविश्वात अधून मधून यशस्वी झाल्याचा पडताळा अद्यापही येतो, त्यामुळे ही अर्धविरामाची खूण चांगलीच पटते. आपल्या कवितांची नोटेशनचिन्हासह छपाई

करण्याच्या पद्धतीचेही यात सुरेख विडंबन साधलेले आहे. बडोद्याच्या 'प्रो. मौलाबक्षांची चिन्हे' हा टीपेतील उल्लेख विडंबनकाराच्या चौफेर निरीक्षणाची साक्ष पटविणारा आहे.

## रोगट कविप्रवृत्ती

कविप्रवृत्तींचा खरपूस समाचार घेणारी केशवकुमारांची विडंबने 'झेंडूच्या फुलां'च्या पूर्वार्धात अनेक आहेत. 'सांग कसे बसले?' हे गोविंदाग्रजांच्या 'सांग कसे बसलो?' या कवितेचे विडंबन आहे 'कुठे जासी?' हे केशवसुतांच्या 'कोठे जातोस?' या मथळ्याच्या कवितेचे बाह्यानुकरण आहे. 'स–' मध्ये मासिक मनोरंजनात प्रसिद्ध होणाऱ्या कवितांच्या निकृष्टपणावर सरळ टोला हाणलेला आहे. 'फूल, कवि, बाला आणि मासिक' यात कवींच्या प्रेमवेडेपणाचा उपहास असून कंसांच्या गमतीदार उपयोगामुळे त्याची रंगत दुणावली आहे. 'त्याचे काव्यलेखन' ही कविता केशवकुमारांच्या 'हास्यरसा'चे स्मरण करून देणारी आहे. दोहोंतील नाट्यपूर्ण वातावरण निर्माण करण्याचे तंत्र एकाच साच्याचे आहे: 'बसल्या बैठकीत काव्याची दसकडी उडवतो' म्हणून प्रतिज्ञा करून कडेकोट तयारीनिशी एक कवी आपल्या अभ्यासिकेत शिरतो. मंडळींची उत्सुकता शिगोशीग वाढत असते. पण अखेर अपेक्षातिरेकाने उंचावलेली मस्तके खाली येतात आणि रुंदावलेली मुखे पाहण्यालायक होतात. खोलीत कवीचे काव्याराधन चालू नसते; निद्राराधनानंतरचे घोरणे सुरू झालेले असते! या कवितेत 'बऽऽरे' असा अवग्रहयुक्त शब्द असून त्यावर 'या आवग्रहाबद्दल कोणी ताना घेण्याचा प्रयत्न करू नये' अशी सोज्वळ टीप दिलेली आहे. 'मैत्रीचा मृत्यू' (किरण, पृ. २१) या मा. जूलियनांच्या सुनीतात 'मित्राऽऽकृती' हा वृथा अवग्रहयुक्त शब्द आहे, त्यावरच याचा रोख दिसतो. 'कवि आणि कवडा' ह्या चुटक्यात कवींच्या वाङ्मयचौर्यावर कटाक्ष आहे. 'डा' प्रत्ययावरील टीप विद्वज्जड टीपापद्धतीची रेवडी उडवणारी आहे. कवींचा प्रेमवेडेपणा, आढ्यता, कंपूशाही, क्षुद्र तंटे, प्रसिद्धीची हाव, काव्यगायनाची हौस, स्फूर्तीचे थोतांड, वाङ्मयचौर्य यांसारख्या वाङ्मयक्षेत्रातील रोगट प्रवृत्तींची टर उडविण्यावरच केशवकुमारांच्या पहिल्या कालखंडातील कवितांचा विशेष भर आहे.

पाहुणे, परिटास, मनाचे श्लोक ही वेगळ्या पातळीवरची विडंबने आहेत. त्यातून मूळ कवितांचा वा कविवृत्तीचा उपहास अभिप्रेत नाही. विडंबनाचा बाह्यसाचा आदरणीय कवींचा घेतला आहे आणि त्यात वेगळा आशय घालून स्वतंत्र विनोदाचा आविष्कार साधलेला आहे.

**पाहुणे :** 'दंवाचे थेंब' या केशवसुतांच्या कवितेचे हे यशस्वी बाह्यानुकरण आहे. मूळ कवितेतील बालकाला 'दंवबिंदू' विषयी कुतूहल वाटते, येथे 'पाहुणे' या

अजब प्राण्यांबद्दल कुतूहल असते. केशवसुतांची अभिव्यक्तीची तऱ्हा रासवट आहे. ओजस्वी भावनांचा आविष्कार तिला जसा जमतो, तसा निरागस नाजुक भावनांचा जमत नाही. ते अशा वेळी खडबडीत शब्दांनी, उद्गारवाचकांच्या अतिरेकी वापराने कसाबसा मार्ग काढताना दिसतात. 'दंवाचे थेंब' मधील बालमनाच्या कुतूहलाची केशवसुती अभिव्यक्ती बेंगरूळच आहे. केशवकुमारांना केशवसुतांविषयी कमालीचा आदरभाव वाटत असला, तरी त्यावर मात करून त्यांचा थट्टेखोरपणा जागा व्हावा, इतकी ती विचित्र आहे. 'आईला बाळचा वदला ! कुतुकाने उत्सुकलेला' या चरणांवरूनही त्याचा प्रत्यय यावा. केशवकुमारांनी मूळ कवितेची केवळ चालच उचललेली नाही, तर आता दिलेला चरण, 'देवा, रे, मग ती स्फुंदे !' सारख्या ओळीच्या ओळी, अनेक शब्दप्रयोग जसेच्या तसे योजलेले आहेत. तेव्हा केशवसुतांच्या अभिव्यक्तिच्या चमत्कारिक लकबांचे विडंबन येथे अभिप्रेत नसले, तरी ते नकळत झालेले आहे, यात शंकाच नाही. येथे केशवसुती भावविवशतेशी विरोधी असा आशय केशवसुती साच्यात बसविलेला आहे. बाळचाची कुतूहलपूर्ती करताना केलेले पुढील वर्णन फारच बहारदार आहे :

'बाबांच्या पेटीतुन गे ।. पळविती विडचांचे जुडगे...
...'हं, हळू बोल–'तनयाते । वर करुनी बोट वदे ते–
'कावळे, गिधाडे, घारी ।बाळा रे, जेथुनि येती,
खोकला ताप ही दुखणी । आपणांस येती जिथुनी;
तेथुनीच आले येथे । हे छळावया आम्हांते ।'

**मनाचे श्लोक :** या कवितेत रामदासी श्लोकांच्या साच्यातून सामाजिक अवगुणांचा उत्कृष्ट उपहास साधलेला आहे. रामदासांचा 'सदा' हा लाडका शब्द येथे वारंवार भेटतो, 'मना सज्जना' सारखी संबोधने भेटतात व त्यांच्याच जोडीने 'मना सद्गृहस्था,' 'अरे 'मन्न' सारखी स्वनिर्मित संबोधनेही येतात. 'सदा श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावे' हा सबंध चरणच येथे मुळातून उचलून आणलेला आहे व त्याच्या जोडीने 'कधी ना तरी सोडिजे शांतवृत्ती,' 'मना, नीटपंथे कधीही न जावे,' 'स्वतांचे न काही जगी बाळगावे,' विचारी मना, त्वां न खर्चीत जावे' हे, अस्सल रामदासीं वाटावे असे, अर्थान्तरन्यास योजलेले आहेत. भाषेच्या जुन्या घाटणीत मध्येच 'स्वयंटाक' सारखा भाषाशुद्धीच्या टांकसाळीतला शब्द घुसविला आहे. गांभीर्याचा फुगा मधूनच फुटावा आणि रामदासी खड्या बोलांचे प्रतिध्वनी ओळीओळीतून उमटत रहावे, अशी ही खुबीदार योजना आहे. व्याजगांभीर्याची रंगत सतत कायम राखण्यात या कवितेचे मर्म साठवलेले आहे.

**परिटास :** 'पाखरा येशील कधी परतून ?' या रे. टिळकांच्या अतिप्रसिद्ध भावगीताचे बाह्यानुकरण करून परिटाच्या धंद्यातील कसब यात अतिशय खुमास-

दार रीतीने वर्णन केले आहे. सर्वसामान्यांच्या अनुभवातला आशय, चित्रमयी, ठसठशीत कल्पनाशक्ती आणि अल्पाक्षरी, नीटस अभिव्यक्ती यांचा संगम या कवितेत झालेला आहे. रे. टिळकांच्या मूळ कवितेतील चटका लावणारी व्याकुळता आणि विडंबनातली हास्यकारक अत्युक्ती यातील विरोधामुळे या विडंबनाला वेगळीच खुलावट लाभते.

'झेंडूच्या फुलां'च्या पहिल्या भागातील 'वधुवरांना काव्यमय अहेर' ही कविता प्रासंगिक आहे. विनोदाच्या दृष्टीनेही ती उजवी नाही. 'सिनेमा नटाप्रत' आणि 'अहा, तिजला चुंबिले असे याने!' ह्या कवितांकडे पुढील भागातील 'द्विभाषिक राज्याची गाणी' किंवा चारोळ्या यांच्याप्रमाणे विनोदार्थी रचना म्हणूनच पाहिले पाहिजे. त्यात कोणी व्यक्ती विडंबित झालेल्या असल्यास त्याची खूण आता पटण्यासारखी नाही.

'झेंडूच्या फुलां'च्या पहिल्या आवृत्तीमधील विडंबनांची कक्षा काहीशी संकुचित होती. तिचा रोख कविवर्गापुरताच होता. द्वितीयावृत्तीत जी भर पडली तीमधील टीकेचा कटाक्ष विशिष्ट कवींपेक्षा सर्वसामान्य कविप्रवृत्तींवर आणि काव्यदोषांवर अधिक होता. या आवृत्तीमधील 'पाहुण्यां'चे थेर, व 'मनाचे श्लोकां'मधील सामाजिक विकृती किंवा तिसऱ्या आवृत्तीतील 'परिटा'ची करामत कमीअधिक प्रमाणात सर्वसामान्य माणसाच्या परिचयातली होती. विषयांची ही विविधता आणि व्यापकता पुढे थोडीफार चालू राहिली. थोडीफार म्हणण्याचे कारण शेवटी राजकारणाच्या आखाड्यात त्यांना पुन्हा निराळ्या संदर्भात एकारलेपणा आलेला दिसेल.

'बायको सासरी आल्यानंतर–' ही 'परिटास' प्रमाणेच रे. टिळकांच्या 'पाखरास–'च्या चालीवर रचलेली असून तीत रे. टिळकांच्या कवित्वावर कटाक्ष नाही. दोन महिन्यांच्या माहेरवासानंतर बायको परत आल्यानंतरचे एक मध्यम वर्गीय तरुणाचे उल्लू मनोरथ तीत चित्रीत केलेले आहेत. शेवटचे मनोरथ व्रात्य पण वास्तव आहे :

> टाकिन आता सर्व घराचा रंगमहाल करून
> तात्यामाई (आई–वडील) घेतील दिवसा मग डोळे झाकून.

'एका पावासाठी–' व 'मोडीसाठी धाव' यात सर्वसामान्य माणसाची साध्यासुध्या गोष्टींच्या अभावी होणारी कुचंबणा जुन्या भक्तिगीतांच्या सारणीतून व्यक्त झाली आहे. युद्धजन्य रेशनिंगच्या काळात पावाची कमालीची टंचाई झाल्यावर 'धाव घालि विठू आता' यासारख्या सुप्रसिद्ध अभंगाच्या धर्तीवरा 'धाव पाव देवा आता । देइ एक पाव' असा धावा करून 'पाहिजे तरी सरकारा । तूच लोणि लाव' असेही साकडे देवाला घातले आहे! खुर्दामोड दुर्मिळ होताच 'संतपदाची

जोड ' या अमृतरायांच्या लोकप्रिय पदाची चाल उचलून ' दे रे हरि, दोन आण्याची मोड। मोडीसाठी भटकुनी आले तळपायाला फोड !' असे गाऱ्हाणे मांडीत मोडीच्या तुटवड्यामुळे देवाचेच कसे नुकसान होत आहे, ते गंमतीने दाखविले आहे :

मोडीवाचुनी ' धर्म ' थांबला भिकारि झाले रोड
दिडकि कशी तुज देऊ देवा, प्रश्न पडे बिनतोड

दरम्यान अत्रे यांच्या जीवनाचे क्षेत्र बदलले, तसा त्यांच्या विडंबनाचा तोंडवळाच पार बदलला.

## राजकीय विडंबनगीते

यानंतरची विडंबने, ' नवकाव्य ', ' चारोळ्या ' यासारखे विनोदी चुटके वगळल्यास, एकजात राजकीय आशयांची आहेत. काँग्रेसचे नेते–विशेषत: महाराष्ट्रीय काँग्रेसनेते आणि काँग्रेसच्या राज्यात चाललेले लोकांचे हाल हेच या विडंबनाचे विषय आहेत. नेहरूप्रतिवृत्तापासून म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळापासून भाषावार प्रांतरचनेचे आश्वासन जनतेला मिळाले होते. स्वातंत्र्योत्तर काळात बहुतेक प्रांतांची तशी पुनर्रचना झाली. पण महाराष्ट्रीय जनतेची मागणी मात्र मान्य होईना. त्यातून संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन उद्‌भवले. आचार्य अत्रे या आंदोलनाशी एकरूप झाले. महाराष्ट्रीय काँग्रेसनेते प्रथम या आंदोलनात सहभागी होते. पण राज्यपुनर्रचनामंडळाने संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्यावर आणि केन्द्रिय नेत्यांनी दमदाटी केल्यावर मराठी काँग्रेस–नेत्यांची भूमिका बदलली. प. नेहरूप्रभृती नेत्यांपुढे त्यांनी नांगी टाकली. पूर्वीचे बोलणे फोल झाले आणि डोलणे वाया गेले. ह्या प्रक्षोभक विसंगतीमुळे आचार्य अत्र्यांमधील विडंबनकाराला पुन्हा आव्हान मिळाले. आचार्यांनी या काँग्रेसनेत्यांच्या कृती आणि उक्ती त्यांच्यावरच उलटवण्यासाठी विडंबनाचे शस्त्र पुन्हा उपसले.

' झेंडूच्या फुलां 'च्या पूर्वार्धातील कवितांचे विश्व साहित्यिक आहे; उत्तरार्धातील कवितांचे विश्व राजकीय आहे. शिवाय सं. महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या काळात आचार्य अत्रे हाणतेमारते पत्रकार आणि जनतेचे नेते बनलेले होते, पहिल्या काळातले एक बुजरे, तरुण साहित्यिक राहिलेले नव्हते. पूर्वीच्या साहित्यिक थट्टेपेक्षा वेगळी अशी भल्याभल्यांस बट्टा लावणारी थट्टा आता सुरू झाली. पूर्वीची अवगुंठित, खोचक, गूढोक्तीची अभिव्यक्ती आता कमी झाली. ' केशवकुमार ' ही टोपणनावाची पडदपोषी त्यांनी टाकली आणि आता ते ' आचार्य अत्रे ' या नावाने सरळ सरळ मैदानात खडे झाले. पूर्वीचा त्यांचा पिंड कलावंताचा होता, आता ते प्रचारकाच्या अभिनिवेशाने भारले गेलेले होते. प्रतिपक्षीयांची यशोहानी करून त्यांची प्रतिमा जनमानसातून सफाचट करणे, हा आताच्या विडंबनगीतांचा उद्देश होता. आता जनतेच्या काळजाला सरळ सरळ जाऊन भिडायचे होते. अंतिम हेतू काहीसा

गंभीरच होता. म्हणून या गीतातली शब्दकळा शापवाणीसारखी परखड आहे.

आचार्यांच्या अंगी व्यंगचित्रकारासारखी रूपविडंबनाची कला जन्मजात होती. कुणाचा मळका पंचा, कुणाचे दाढीचे खुंट, कुणाचे अनेक फ्लॅट्स, कोणाचे नाव, कोणाच्या थापा, कोणाचा कोकाकोला, कोणाची शमीवरची शस्त्रे, कोणाचे खोटे अश्रू, कोणाचे संतप्त उदगार त्यांनी वेठीस धरले आणि हास्यास्पद शब्दचित्रे रेखाटून त्यांची पुरी भंबेरी उडविली.

या विडंबनांचे उद्दिष्ट वेगळे असल्याने त्यांचे बाह्यांग वेगळे झाले. इथे चिरपरिचित चालींचा आश्रय घेण्यात आला. ओव्या, अभंग, आरत्या, भूपाळ्या, पाळणे, विडा, भक्तिपर पदे, लावण्या मराठी संस्कृतीत मुरलेल्या आहेत. त्यांची परंपरा शतकांची आहे. क्रमिक पुस्तकांतील कविता लोकांच्या पाठांतरात असतात, तसेच ध्वनिमुद्रिकांनी लोकप्रिय केलेली गाणी त्यांच्या मुखी खेळत असतात. 'शारदे' सारख्या नाटकातील पदे लोकजीवनात मिसळून गेलेली असतात. प्रभातफेऱ्यांनी लोकप्रिय झालेल्या गझलांचा ठेका जनता लगोलग पकडते. अशाच तऱ्हेच्या चाली अत्र्यांनी राजकीय विडंबनगीतासाठी उचलल्या. त्यांचे तोंड फुटताच तावडतोब हसू फुटते. कधी विरोधी आशय मनात येऊन, तर कधी किंचित शाब्दिक बदल केलेला असल्याने हे काम झटकन साधते. 'बाळा, जो जो रे। कुलभुषणा ।। दशरथनंदना', या पाळण्याच्या 'बाळाच्या गो गो रे। स्मितवदना । खेरकुलोत्पन्ना रे।' ह्या विडंबनात किंवा 'आई, थोर तुझे उपकार' या जुन्या कवितेच्या 'मंत्र्या, थोर तुझे उपकार' ह्या विडंबनात याचा प्रत्यय पटेल.

मुळाचा प्रतिभास निर्माण करण्यात अत्रे येथेही चांगलेच यशस्वी झालेले आहेत. आरतीचा आभास सहीसही वठवणारे हे चरण—

जोडुनि हात पुढे शर्मा मिशाळ
वामांगी शोभतसे नलिनी गोपाळ ('सदोबांची आरती')

ही भुपाळीची तऱ्हा—

विजार लांडी, हाती कांकण, शिरी निळा फेटा।
चला, उठा, त्या प्रतापसिंहा कडकडुनी भेटा ।। ('घनश्याम बंदरा सदोबा')

अभंगाचा हा अनुकार—

वरी मोरारजी । धरीतसे छत्री
भोवताली कुत्री । कॉंग्रेसची ।।
अध्यक्ष ढेबर । चालला मागून
चाली चापलीन । कॉंग्रेसचा. ('सुंदर ते ध्यान')

'काकाष्टका'तला हा प्रसाद—

आनंदीच्या वियोगाने । केल्या आळंदीच्या गोष्टी

महिन्याच्या आत एका । परि चतुर्भुज झाला ('काकाष्टक')

संतकाव्याच्या शब्दकळेचा हा प्रत्यय–

देह जावो अथवा राहो,
मंत्रिपदी तुमचा भावो
कोणी फोडो किती टाहो
म्हणो तुम्हा जोडेखाऊ ! ('आरती भाऊसाहेब हिऱ्यांची')

तांब्यांच्या चरणाचा हा नेमका पडसाद–

मतमोजणि फिरफिरूनी । त्यांत होति फार चुका । ('मंत्री हा जुलिम गडे')

'बाळ गंगाधर खेरां'चा हा खास 'आत्रेय' किस्सा–

अर्धेलि आईची । बाळपणी । चोरिलीस ना त्वां रे ?
अर्धे टिळकांचे । लुबाडिले । नांवहि त्वां बाळा, रे !' ('बाळा गो गो रे')

'आनंदी आनंद गडे' या चालीवरच्या विडंबनातील हे मार्मिक निरीक्षण–

नऊ महिन्यांच्या 'गर्भवती' । दारुबाटल्या प्रसवती ।। (हातभट्टीचे गाणे)

'पारव्या'च्या निमित्ताने शंकरराव देवांची शोभा करताना दिलेली ही उपमा–

'दिसे तोंड कळाहीन । जसा काही 'सुका मेवा' ।। ('पारव्याचे गाणे')

किंवा ही बोचक पर्यायोक्ती–

भाषण ऐकायाला श्रोता नाहि सभेत चुकून,
उभे लोक बाहेर स्वागता 'अनवाणी' होऊन ('चव्हाणांना पुणेकरांचा निरोप')

या सर्वांतून अत्र्यांच्या लेखणीचा बहुरूपीपणा दिसून येतो.

पं. जवाहरलाल नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाविषयी अत्र्यांना मनोमनी आदर होता, हे खचित ! त्यांच्यावर तीन गमतीदार विडंबनगीते आहेत. त्यांचे संतप्त चित्र दोहोंमध्ये येते. पण तेथेही त्यांची टवाळी वा कुचाळी केलेली नाही. नेहरूंनी चंद्रावरून तांदूळ आणण्याची घोषणा केली होती, त्यावर गिरीशांच्या लोकप्रिय चालीवर अत्र्यांनी एक विडंबन रचले आहे, त्याचा शेवट असा आहे :

तांदुळांची शुभ्र वृष्टी
झडकरी करि, ही विनंती
ना तरी नेहरू करतील स्वारी तुजवरी धरून त्रिशूळ ! ('हे चिमण्या चंद्रा')

तसेच हे बालसुलभ वृत्तीने रेखाटलेले निरागस चित्र पहा :

नेहरूकाका घाबरला, घाबरला
दडून मोटारित बसला
इतका का हो रागावतो ?
लाल टमाटो हा दिसतो

नको रे बाबा
चिडका बिब्बा
नेहरूकाका हा हट्टी
ह्याची अमुची फू गट्टी ! ('वाह्वा, वाह्वा, नेहरु हा ')

पण अशी मौज या राजकीय कवितांत अपवादभूत. इथली व्याजोक्तीपर्यायोक्तीसुद्धा जळजळीत आणि विदारकच आहे. उदा.–

मोरया, तुझी गोळि चांगली
वर्मि लागुनी, घेतसे बळी
वृद्ध आणखी, बालके स्त्रिया
यावरी न तो, करितसे दया ! ('मोरया, तुझे नाव चांगले ')

'हातात घ्या काळे निशाण ', 'होळीवर पोळी ', 'अहमदाबाद ! अहमदाबाद ' ह्यांना 'विडंबनगीते ' म्हणण्यापेक्षा 'विभंजनगीते ' किंवा 'विटंबनगीते ' म्हणणे बरे, त्यातली अभिव्यक्ती संतप्त भूमिकेतून झालेली आहे. 'कोयनेची योजना ' डावलली जाते की काय, अशी जी भीती निर्माण झाली होती. तिचे प्रतिध्वनी 'लाविन सुरुंग मी कोयनेला !' ('मोरारजी–विलाप ') व 'पैशावाचुनि अडे कोयना !' ('नवी मोटार ') असे उमटले आहेत. अत्र्यांचा डाव्या पक्षांकडे झुकणारा कल 'शमिवरती चढला 'भाई '' ('शमिवरची शस्त्रे–'), 'परी नाही कोणा 'पिटी ' (pity)। शिरजोर पक्ष डावा ' ('पारण्याचे गाणे ') या उल्लेखांवरून दिसून येतो. मंत्र्यांच्या मोटारी आणि लोकांची हलाकी यांचे उपहासपूर्ण विरोधी चित्रण यात सारखे पुनरुक्त झालेले दिसेल.

श्रेष्ठ दर्जाची शोकांतिका अतिरिक्त मानवी भावनांचे विवेचन करून माणसाला समतोल मिळवून देते, असे मत ॲरिस्टॉटलने मांडलेले आहे. सुखात्मिका किंवा विनोद हेच कार्य करतो, असे मांडता येईल. विसंगतिदर्शनाबरोबर चिडणे ही एक प्रतिक्रिया झाली. पण तिच्याकडे पाहून आलेल्या चिडीचे रूपांतर हास्यविनोदात करणे ही पर्यायी प्रतिक्रिया होय. अत्र्यांसारख्या विडंबनकाराने हे कार्य मराठी रसिकांसाठी सतत पन्नास वर्षे केले. त्यांनी तरुणपणी केशवसुत–गोविंदाग्रजांच्या परंपरेचा अभिमान बाळगून वाङ्मयीन विपक्षियांना अस्वली गुदगुल्या केल्या आणि उत्तर कालात संयुक्त महाराष्ट्राचा कैपक्ष घेऊन राजकीय प्रतिस्पर्ध्यांना त्राही भगवान केले. तारुण्यात त्यांनी जी वाङ्मयीन विडंबने लिहिली व पुढे जी राजकीय विडंबने लिहिली त्यांच्या स्वरूपात फरक असला, तरी त्या दोन्हीप्रकाराच्या मागचे व्यक्तित्त्व एकच आहे, त्यामागची भूमिका एकच आहे, ती म्हणजे अन्यायाची चीड. त्यांनी स्वार्थपरतेने, स्वतःचा बोलबाला व्हावा म्हणून इतर कवींची विडंबने केली नाहीत. आपल्या गुरूंच्या अवमूल्यनाने त्यांना खरा राग आला होता. त्यासाठी

प्रथम त्यांनी विडंबनकाव्ये लिहिली नि परिणामी मराठी कवितेची प्रकृती निकोप राखली. उत्तरायुष्यात तीन कोटी मराठी लोकांच्या फसवणुकीला वाचा फोडण्याचे ऐतिहासिक कार्य केले. परिणामी राजकारणातला एक घोर अन्याय दूर होण्यास हातभार लागला.

आपल्या लेखणीच्या लीलांनी दुखावल्या गेलेल्यांना पुन्हा जोडून घेण्याचा अत्रे यांचा नेहमी प्रयत्न असे. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न संपल्यावर त्यांचे काँग्रेसनेत्यां-बरोबरचे वैयक्तिक संबंध पुन्हा सुधारले होते. 'झेंडुच्या फुलां'च्या दुसऱ्या आवृत्तीचे परीक्षण करताना माधवराव पटवर्धनांनी त्यांचे गुणानुवाद गायिले असले तरी त्यांची मने अखेरपर्यंत कलुषित राहिली असावी असे वाटते. प्रा. चापेकरांच्या बाब-तीतली आपली अतिरेकाची चूक त्यांनी स्वतःच मान्य केलेली आहे ( परिशिष्ट ३, पृ० १५८) कै. अनंततनय यांची वाङ्मयीन टर त्यांनी खूपच केली. पण पुढे त्यांच्याविषयीचे त्यांचे ग्रह पालटले होते. 'एका कविमित्रास' (गीतगंगा, मुंबई १९३५, पृ० १८) ही त्यांची कविता अनंततनयांना उद्देशून लिहिलेली आहे. कारण तशी टीप पुस्तकात शेवटी दिलेली आहे या कवितेत त्यांनी अनंततनयांच्या काव्या-विषयी आदरभावच व्यक्त केलेला आहे. ते अनेक वाद खेळले. अत्रे-माटे वाद, अत्रे-फडके वाद, अत्रे-वरेरकर वाद, अत्रे-भावे वाद फार गाजलेले आहेत; पण कै. प्रा. माटे यांचे व त्यांचे संबंध पुढे सुधारले. प्रा. फडके यांच्याबरोबरचे दुराव-लेले संबंध त्यांनी पुन्हा जुळवून घेतले. पु. भा. भावे यांच्याशी त्यांचे सामरस्य कधीच झालेले नसावे पण त्यांच्यातल्या वादाचे मूळ जे वीर सावरकर यांच्याशी अत्र्यांचे सामंजस्य पुन्हा प्रस्थापित झालेले होते. अत्र्यांचा स्वभावच बोलघेवडा नि भलतुकडा होता. दीर्घद्वेष यांच्या प्रकृतीतच नव्हता. त्यांच्याशी थोडा परिचय होताच ते चिरपरिचितासारखे वाटत. कारण प्रौढत्वी शैशव जपणारे ते एक 'आनंदयात्री' होते. 'झेंडूच्या फुलां'च्या या अभ्यासाच्या निमित्ताने त्यांच्या खेळकर नि खोडकर व्यक्तित्वाचा परोक्ष सहवास जवळ जवळ वर्षभर लाभला आणि वेळ खरोखरच सत्कारणी लागला.

आचार्य अत्र्यांनी 'मी कसा झालो?', 'कऱ्हेचे पाणी– खं. १' या आपल्या आत्मपर ग्रंथांतून आणि 'उपहासिनी'च्या प्रस्तावनेमधून आपल्या विडंबनाचे रहस्य चांगलेच स्पष्ट केलेले आहे, मग हे नमनाला घडाभर तेल कशाला असा प्रश्न कोणालाही पडेल. परंतु एक तर लेखक आपल्या लेखनाविषयीच्या सर्वच गोष्टी उघड करील असे नाही. शिवाय असे आत्मपर लेखन म्हणजे मूल्यमापन नसते; शेवटी तो एका व्यक्तीचा दृष्टिकोण असतो. थोर लेखनाला जी व्यामिश्रता असते, त्यामुळे त्याचा अन्वयार्थ दर पिढीला बदलत असतो. अनेक स्तरी आणि अनेक पदरी रंग असणाऱ्या विडंबनासारख्या आत्रेय लेखनाबाबत हा न्याय अधिकच यथार्थ ठरतो.

आचार्य अत्र्यांनी लिहिलेली बहुतेक विडंबनगीते 'झेंडूच्या फुलां'च्या या आवृत्तीत एकत्र केलेली आहेत. त्यात दोन जातींची फुले आहेत, वाङ्मयीन आणि राजकीय असे त्यांचे भिन्न रंग आहेत. ही भिन्न रंगाची फुले अत्र्यांच्या जीवनातील दोन भिन्न पण अत्यंत महत्त्वाच्या कालखंडांचे प्रतिनिधित्त्व करतात. कारण हे दोन्ही कालखंड झगडयाचे होते-अत्र्यांच्या दृष्टीने मनस्वी झगडयाचे होते. पहिल्यातला झगडा वाङ्मयीन होता. त्यात आपल्या काव्यदैवतावर होणारे आघात परतवावयाचे होते त्यासाठी त्यांनी आपल्या विनोदबुद्धीच्या साऱ्या शक्ती पणाला लावून प्रच्छन्न टीकेचा– विडंबनाचा गनिमी कावा वापरून लढत दिली. दुसऱ्या कालखंडात अत्रे केवळ कवी राहिले नव्हते, कृतिकवी बनले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयाच्या रूपाने त्यांना जणू आपल्या जीवनसार्थक्याची समच सापडली होती. हा लढा राजकीय मैदानातला समोरासमोरचा होता. इथे ते नेते नि पत्रकार होते. तेव्हा त्यांनी जनतेच्या दुःखाला वाचा फोडून काळजाला हात घालणारे तेजस्वी गद्यलेखन केले. प्रतिपक्षीयांच्या शब्दातला आणि वर्तनातला दुटप्पीपणा दर्शविण्यासाठी ते झणझणीत अग्रलेख लिहीतच होते. त्यांची मुलुखमैदानी व्याख्याने चालूच होती. विडंबनगीतांचा उपयोग आनुषंगिक तोंडीलावण्यासारखा होता. ते काही एकमेव शस्त्र नव्हते. लोकांच्या तोंडी बसलेल्या चालींचा आभास निर्माण केला की, या विडंबनाचे काम भागण्यासारखे होते. म्हणून त्यांच्या विडंबनकौशल्याचा बहुरंगी, बहुढंगी, बहुरूपी आणि अनेक पदरी विलास पाहायचा असेल तर त्यांच्या पहिल्या कालखंडातील वाङ्मयीन विडंबनांकडेच वळावे लागते.

केशवकुमारांनी 'रसिकांना चेतवणी' देताना, माझ्या फुलांचे काहीही करा; रागाने चुरगाळलीत तरी हरकत नाही, पण 'तळीचे खोबरे' खायला मात्र विसरू नका असे म्हटले आहे. हे 'तळीचे खोबरे' म्हणजे जन्मजात विनोदबुद्धीचा विलास. विनोदबुद्धीच्या विलासामुळेच 'झेंडूची फुले' एकमेवाद्वितीय ठरलेली आहेत. विडंबनाची निमित्तें कालांतराने विसरली जातात, ती आस्वाद्य राहात नाहीत; पण हे 'तळीचे खोबरे'– विनोदबुद्धी– त्याला स्वतंत्र मूल्य प्राप्त करून देते. यातल्या पहिल्या कालखंडातील विडंबनगीतांचा विस्तारपूर्वक विचार करून त्यांना हे मूल्य कसे भरघोसपणे लाभलेले आहे, हे यथाशक्तो दाखविण्यासाठीच हा प्रदीर्घ प्रस्तावनेचा प्रपंच केलेला आहे– या प्रपंचाचे मूल्य रसिकांनी ठरवावयाचे आहे.

**स. गं. मालशे**

मुंबई, दि. ४ ऑगस्ट १९७२

# विश्रब्ध शारदा

(खंड दुसरा)

मराठी रंगभूमी
महाराष्ट्रातील संगीत

संपादक

**ह. वि. मोटे**

विभाग संपादक
**व. शां. देसाई** (रंगभूमी)
**वा. ह. देशपांडे** (संगीत)

पत्रपरिचय व टीपा
**व. शां. देसाई, रामदास भटकळ, श. वि. गोखले**

प्रस्तावना

**पु. ल. देशपांडे**

प्रथमावृत्ती १ मे १९७५ — प्रकाशक : ह. वि. मोटे (दादर) — मूल्य : ४० रुपये — मूळ प्रस्तावना पृष्ठे २२

कै. हरिभाऊ मोटे हे एक साहित्यिक–प्रकाशक होते. त्यांचे प्रत्येक प्रकाशन साहित्य आणि समाजेतिहास या दोन्ही दृष्टीने महत्त्वाचे मानले जाते. '**विश्रब्ध शारदा**' नामक प्रसिद्ध व्यक्तींच्या पत्रांचे दोन प्रचंड संग्रह प्रकाशित करुन त्यांनी रसिक, बहुश्रुत, डोळस अभ्यासकांवर मोठे उपकार केले आहेत. 'शारदे'च्या पहिल्या खंडात मुख्यत: राजकीय, सामाजिक इ. क्षेत्रांतील व्यक्तींची परिचयात्मक सटीप पत्रे आहेत तर दुसऱ्या खंडातील पत्रे नाट्य आणि संगीत या क्षेत्रात चमकलेल्या स्त्रीपुरुषांची आहेत. या पत्रांचे वाचनचिंतन करून श्री. पु. ल. **देशपांडे** यांनी जी रसोद्ग्राही ढंगदार प्रस्तावना लिहिली आहे त्यामुळे ती पत्रे निश्चितच अधिक बोलकी झाली आहेत. पु. लं. ची समग्र रसिली प्रस्तावना म्हणजे रंगभूमी आणि संगीत परंपरेच्या चढउतारांची नेटकी आलोचना आहे.

१ मे १९७२ रोजी 'विश्रब्ध शारदा' ह्या नावाने एक पत्रसंग्रह प्रसिद्ध झाला. महाराष्ट्राच्या आणि पर्यायाने भारताच्या सामाजिक, वैचारिक, राजकीय, धार्मिक आदि क्षेत्रात ज्यांनी १८१७ ते १९४७ ह्या कालखंडात विशेष कामगिरी बजावली अशा व्यक्तींच्या खाजगी पत्रांचा हा संग्रह हरिभाऊ मोटे यांनी प्रसिद्ध केला. मराठी ग्रंथनिर्मितीच्या इतिहासात एक चमत्कार म्हणावा अशी ही घटना होती. निरनिराळ्या लोकांची पत्रे मिळवून जपून ठेवण्याच्या हरिभाऊंच्या छंदातून ह्या संग्रहाची निर्मिती झाली. 'छंद' हा 'हौस' ह्याचाच समानार्थी शब्द म्हणायला हरकत नाही, पत्रसंग्रहच कशाला ? ग्रंथप्रकाशन हीच मुळी हरिभाऊंची हौस आहे. ह्या असल्या हौसेमुळे त्यांनी ग्रंथप्रेमी समाजावर किती उपकार करून ठेवले आहेत याचे प्रत्यंतर विश्रब्ध शारदेच्या पहिल्या खंडाचे महाराष्ट्रात जे अपूर्व स्वागत झाले त्यावरून आले.

सार्वजनिक जीवनातल्या माणसांची एक सार्वजनिक प्रतिमा तयार होत असते. ते थोर कार्य आणि कार्यसिद्धीसाठी झटणारा माणूस ह्या दोघानाही एक प्रकारची महात्मता चिकटत असते. प्रेम, आदर इत्यादी चांगल्या हेतूंच्या पोटी त्यांच्या चाहत्यांनी निर्माण केलेल्या प्रतिमेनुसार आचरण करायची त्या सार्वजनिक माणसांवर नकळत सक्ती होत असते. ऐतिहासिक काळातल्या वीरपुरुषांची नाटक-कादंबऱ्यांतून घडवलेली दर्शने किंवा खरे लिहायचे तर प्रदर्शने असल्या बटबटीत प्रतिमाच उभ्या करण्याच्या कार्याला मदत करीत असतात. लोकांच्या मनात हे असे नाना कारणांनी थोरांचे जे मानसचित्र उभे राहिलेले असते त्या तोंडावळ्याशीं नाटकाचा किंवा कादंबरीचा तोंडावळा जमला की, वाचकप्रेक्षकांची पसंती लाभते. ह्यात कुणाची फार मोठी चूक असते असे नाही. सामान्य माणूस असल्या थोर माणसाच्या बाबतीत कृतज्ञतेच्या भावनेने दबलेला असतो. त्याच्या त्यागाने दिपलेला असतो; किंबहुना अशा लोकांच्या खाजगी जीवनात आपण डोकावणे ही आपली योग्यता नाही अशीही भावना असते. पण त्याचबरोबर असल्या असामान्य माणसाचे सामान्यपण एखादेवेळी एक निराळी जवळीकही साधून जाते. टिळक सुपारी खात होते ही गोष्ट त्याला आवडते. इतिहासाचार्य राजवाडे बिडी ओढायचे याची मला मौज वाटली होती. अशा गोष्टींमुळे माणसे विभूती होण्याच्या आपत्तीतून वाचतात. असले हे लोभसवाणे सामान्यपण पहाण्याची खाजगी पत्रे ही सुंदर सोय आहे. 'विश्रब्ध शारदे'च्या पहिल्या खंडात अशा कितीतरी थोर व्यक्तींचे सामान्यपण पहायला मिळते. इंग्रजसरकारविरुद्ध तडकावून लिहिणारे एवढे मोठे विष्णुशास्त्री चिपळूणकर. मराठी भाषेचे शिवाजी. पण छापखान्यात अडीअडचणीला उपयोगी पडावेत म्हणून ठेवलेल्या सातशे रुपयांची वाच्यता '...सासुरवाडीच्या मंडळीत होऊ नये' असे खाजगी पत्रातून लिहिताना सापडले की माणूस आपल्यातला वाटतो. काही गोष्टी पोलिसाइतक्याच सासुरवाडीच्या मंडळींकडूनही त्यांना गुप्त ठेवाव्या

लागत हा कौटुंबिक उल्लेख त्या देशभक्तांच्या चित्रात आणखी एक रंग भरून जातो. त्या खंडातली डॉ. आनंदीबाई जोशी यांची पत्रे वाचताना 'माझ्या आईने-देखील घोड्याच्या चाबुकाखेरीज दुसऱ्या कशाचा उपयोग मजवर केला नाही.' हे वाक्य मनाचा ठाव घेऊन जाते. लक्ष्मीबाई टिळकांच्या पत्रात 'दत्तू, बेबी, ठोमरे बरे आहेत' ह्या शेवटच्या ओळीत दत्तू, बेबी, यांच्यासारखीच लक्ष्मीबाई ही बालकवी ठोमऱ्यांची 'आई' होती हे दिसायला लागते. रे. टिळकांनी लक्ष्मीबाईंना पाठवलेल्या एका पत्रात ख्रिस्तायनाच्या 'पाठवलेल्या प्रत्येक अध्यायावर तुमचे म्हणणे काय आहे ते कळवावे' असे लिहिले आहे. त्यातून रे. टिळकांसारख्या विद्वान आणि प्रतिभावान नवऱ्याला त्या अडाणी (?) बायकोच्या मताची दखल घेण्याची जरुरी कशी वाटत होती हे उमगते. पतिपत्नी–संबंधातला एक निराळाच पैलू दिसतो.

ही खाजगी पत्रे सहजपणाने लिहिल्या गेलेल्या वाक्यातून अकल्पितपणाने एखाद्या व्यक्तीच्या स्वभावावर प्रकाश टाकून जातात. स्नेहबंधनातले जे धागे सहसा दिसले नसते ते दाखवतात. सार्वजनिक मंचावर दडले किंवा दडवले गेलेले रागलोभ नकळत प्रकट होतात. समाजसुधारक, राजकारणी अशांचे जे काहीसे द्विपरिणामात्मक चित्र आपल्यापुढे असते त्याला असल्या खाजगी पत्रांतून तिसरे परिमाण लाभते.

पहिल्या खंडात ह्या विषयाचे विवरण दि. के. बेडेकरांनी इतक्या चांगल्या रीतीने केले आहे की, ती प्रस्तावना त्या अपूर्व संग्रहाइतकीच अपूर्व ठरली आहे. दुसऱ्या खंडाच्या प्रकाशनाच्या वेळी त्यांची आठवण अधिक तीव्रतेने होते आहे. हा खंड नाट्य आणि संगीत कलांशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी लिहिलेल्या पत्रांचाच असला तरी ह्याही खंडाला प्रस्तावना लिहिण्याचा अधिकार त्यांचाच होता. बेडे-करांच्या पांडित्याने त्यांच्यातल्या रसिकतेवर मात केली नव्हती. ते उत्तम विवेचक होते, कारण ते उत्तम आस्वादक होते. राजकीय चळवळीच्या क्षेत्रात राहूनही नाना प्रकारच्या कलांच्या विकासांशी त्यांचा दृढ संबंध राहिला होता. किंबहुना त्यांच्य स्वभावातली ऋजुता ह्या कलासक्तीतून आली असावी. त्याबरोबर 'समाज' ह्या शब्दाची व्याप्ती केवढी मोठी आहे याची जाणीवही त्यांना राजकीय क्षेत्रांत कार्या करतानाच लाभली होती. आणि म्हणूनच त्या संग्रहातल्या पत्रांतून महाराष्ट्राच्या एकाद्या ऐतिहासिक महत्त्वाच्या कालखंडाचे दर्शन घडते असे म्हणताना 'कुठल्या महाराष्ट्राचे ?' हा प्रश्न त्यांना पडल्याशिवाय राहिला नाही. ते म्हणतात, 'ह्या पत्रव्यवहाराचे दर्शनक्षेत्र किती संकोचलेले आहे ?... जंगलातली वारली, भिल्ल, व गोंड तर सोडाच पण १८८५ च्या दुष्काळात देशोधडीला लागलेली आणि प्लेग, इन्फ्ल्युएन्झा, कॉलरा, ह्यांच्या साथीतून लाखोंनी मेलेली व वाचलेली माणसे ह्या पत्रव्यवहाराच्या झरोक्यातून दिसतात कुठे ?'

जीवनाच्या विविध क्षेत्रांत पराक्रम गाजवणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या पत्रांत जर ही उपेक्षा तर नाट्य आणि गायन ह्या मर्यादित क्षेत्रांत राहिलेल्या माणसांच्या पत्रांतून

अधिक व्यापक अनुभूतींची किंवा समाजातल्या निरनिराळ्या थरांतल्या कलात्मक, आविष्कारांसंबंधीच्या चिंतनाची अपेक्षा करणेही शक्य नाही. भारतीय समाजातल्या उच्चनीचतेसंबंधीच्या चमत्कारिक कल्पनांचा विचार केल्यावर गाणेबजावणे करणाऱ्यांचा आणि नटनाटक्यांचा समाज हाही एक उपेक्षित समाजच म्हणायला हवा. ह्या क्षेत्रात असलेल्या लोकांची गणना पूर्वीपासून छंदीफंदी ह्याच सदरात होत आलेली आहे. तशी ही माणसे रंजन करण्याच्या त्यांच्या गुणामुळे समाजाची लाडकी असतात. पण प्रतिष्ठितांच्या पंगतीत कलावंतांचे पान आडवेच मांडले जायचे. इंग्रजी राज्य आल्यानंतर त्या समाजात कलावंतांची होत असलेली बूज आणि मानमान्यता पाहून आपल्याकडेही असे झाले पाहिजे असे तत्कालीन समाजधुरिणांना वाटायला लागले. नाहीतर गायनकलेचा देवाच्या आराधनेशी संबंध जुळलेला असला तरच उजळमाथ्याने गायन ऐकायचे. गाण्याच्या आनंदासाठी गाणे ऐकायला जाणे हे प्रतिष्ठितांच्या कल्पनेत न बसणारे होते. गाणेबजावणे करणाऱ्यांच्या गल्ल्या वेगळ्या –तिथे जायचे झाले तरी चोरून. त्यामुळे कलावंत आणि कसबी मंडळी उपेक्षितच राहिली. आणि उपेक्षितांच्यात एकूणच जी बेफिकीरी येते ती त्यांच्यातही आली.

ग्रामोफोन, रेडियो ( आणि आता टेलिव्हिजन ) आल्यानंतर मात्र आपल्या देशातली ही परिस्थिती खूपच पालटली. वर्तमानपत्रांना जसा रकाने भरण्यासाठी रोजच्या रोज भरपूर मजकूर लागत असतो तसाच रेडियो आणि टेलिव्हिजनला नाना प्रकारच्या कार्यक्रमांचा भरणा लागत असतो. ह्या यंत्रांची सांस्कृतिक भूक बकासुरी आहे. त्यामुळे घाऊक प्रसाराची ही आधुनिक यंत्रे एकदा राबवायला सुरुवात झाली की तासन्तास गिरणीत पीठ दळून काढल्यासारखी कार्यक्रम दळून काढण्याची सक्ती होते. शेकडो गाणी हवीत. शेकडो नाटके. घाऊक उत्पादन हे इतर कुठल्याही यंत्राचे वैशिष्टच याही यंत्रांना लागू पडते. साहजिकच असल्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे उत्पादन करणाऱ्यांची संख्याही वाढायला लागते. संख्या आणि गुणवत्ता ह्यांचे प्रमाण बहुधा व्यस्तच असते. हे जरी खरे असले तरी कलावंतांच्या कर्तबगारीला ही नवी क्षेत्रे निर्माण झाली आहेत हे नाकारता येणार नाही. आपल्या देशात रेडियो आणि टेलिव्हिजन सरकारी आहे. त्यामुळे तिथे जाऊन गाण्याला प्रतिष्ठाही आहे. आपली मुलगी गाते हे सांगण्यापेक्षा रेडियोत गाते किंवा टी. व्ही.वर कार्यक्रम आहे, हे सांगायला प्रतिष्ठित पालकांना अधिक बरे वाटते. त्याशिवाय लोकप्रियतेची शर्यत जिंकली तर चित्रपटाच्या मैदानातही भरमसाठ पैसे मिळवण्याची शक्यता असल्यामुळे त्याही क्षेत्रात शिरण्याची अहमहमिका आहे. शिवाय वर्तमानपत्रांतून प्रसिद्धी, राष्ट्रीय पातळीवरून मानसन्मान, सांस्कृतिक संमेलनात मानाची स्थाने अशी निरनिराळ्या प्रकारची प्रतिष्ठेची संधी मिळू लागल्याने आता सामाजिक उपेक्षेची भीती वाटत नाही. एकेकाळची सामाजिक आणि धार्मिक आचारांची बंधनेही आता सैल झाली आहेत. पण तरीही व्यावसायिक नाटक मंड-

ीत जाणे किंवा गायन हाच व्यवसाय म्हणून स्वीकारणे हे डॉक्टर किंवा इंजिनियर किंवा चार्टर्ड अकौंटंट वगैरे होण्याइतक्या सहजतेने अजूनही मान्य होत नाही याचे मुख्य कारण म्हणजे ह्या क्षेत्रातली आर्थिक अस्थिरता.

कला हा व्यवसाय म्हणून स्वीकारताना बदलत्या लोकाभिरुचीचा विचार माणसाला अस्वस्थ करीत असतो. कलावंत नित्यनूतनाच्या शोधात असो किंवा नसो, कलेचा आस्वाद घेणाऱ्या सर्वसामान्य श्रोत्याला किंवा प्रेक्षकाला मात्र सतत काहीतरी निराळे हवे. कलेतले सनातन सौंदर्य पाहण्याची दृष्टी असणारी माणसे फार थोडी. त्यांची दाद कलावंतांना खरी धन्यता देते हे खरे. पण असल्या मूठभर रसिकांची दाद कलावंताला आर्थिक भयापासून मुक्त करू शकत नाही. कलावंताचे कलंदर आयुष्य दुरून पाहणाराला अतिशय आकर्षक वाटते. ‘सच्च्या कलावंताने एकवेळ मरावे पण कलेशी प्रतारणा करू नये’ हेदेखील आपणच ठरवत असतो. पुष्कळदा तसला तो भणंगपणा ज्या कलावंताला लोकप्रियतेसाठी योग्य ती तडजोड करता न आल्यामुळे काहीश्या सक्तीनेच स्वीकारावा लागतो. हे अनिच्छेने सती जाण्यासारखेच असते. गायन, नृत्य, अभिनय ह्यांसारख्या लोकांसमोर करून दाखवण्याच्या कलांवर उपजीविका करणारांपुढे वाढते वय हा आणखी एक सतत भेडसावणारा प्रश्न असतो. अमकातमका कलावंत आता ‘संपला’ हेही समीक्षक मंडळी मोठ्या चवीने जाहीर करीत असतात. ‘संपत’ नसतो फक्त समीक्षक. वृद्ध वकिलाकडे अशिलांची गर्दी अधिक असते; वृद्ध नटाकडे कोण जाणार? पैसे मोजून कलेचा आनंद विकत घेण्यासाठी येणाऱ्या प्रेक्षकांच्या दृष्टीने त्यात काही चूक नाही. दुर्दैव हेच असते की त्या वृद्ध नटांचे तारुण्य इतर पेन्शनीत निघालेल्या वृद्धांसारखे गेलेले नसते. प्रसिद्धीचा झगमगाट त्याने भोगलेला असतो. माणसाने प्रसन्नपणाने निवृत्त व्हावे हे सर्व काही ठीक आहे. पण ज्याच्या जीवनात आपण शेकडो रसिकांपुढे गात आहोत, अभिनयकौशल्याने हजारो प्रेक्षकांना गुंग करीत आहोत हाच प्रसन्नतेचा सर्वांत मोठा अनुभव आहे त्याला ही सक्तीची निवृत्ती असह्य होते त्याची दुनिया ही आपण, आपले गायन, आपले श्रोते, आपले नाटक, आपले प्रेक्षक एवढ्यातच सीमित झालेली असते. ही माणसे तशी एकमार्गी असतात. आमच्या रंगभूमीवरचे नटनटी किंवा गायकगायिका आपल्या दुनियेतच मस्त. आताशा कुठे चार पदवीधर आणि इतर काही विषयात रस असणारी माणसे ह्या क्षेत्रात पूर्ण नसली तरी अर्धव्यावसायिक म्हणून आली. पाचपंचवीस वर्षांपूर्वी अशी परिस्थिती नव्हती.

दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला होता. त्या काळातली माझी एक आठवण आहे. माझ्या परिचयाचे एक गायक होते. संगीताची साधना ह्याखेरीज इतर काही माहिती नसलेले. रागतालाची फोड करताना त्यांची विचक्षण बुद्धी पाहून माणसाने चकित व्हावे. हे बुवा मला एकदा म्हणाले, ‘का हो? ही हिटलर हिटलर ही काय

भानगड आहे ?'– आमच्या बहुतेक 'बुवां'ची आणि 'बायां'ची हीच अवस्था. तेवढा कलेचा प्रांत सोडला की ही माणसे मुकी. गाण्याबजावण्याच्या कथा निघाल्या की बोलणे ऐकत रहावे. एरवी संपूर्णपणाने उदासीन. आग्र्याच्या कॉन्फरन्समध्ये जाऊन गाऊन येतील, पण तिथला ताजमहाल पहाण्याची तसदी घेतीलच याची खात्री नाही. त्यातून शालेय शिक्षणदेखील बेताचेच. त्यामुळे आपण शिकलेले नाही हा एक न्यूनगंड. असल्या वृत्तीची माणसे खाजगी पत्रांतून स्वतःचे मनोगत व्यक्त करतील ही कल्पनाच करणे अयोग्य आहे. त्यातल्या त्यात गायक गायिकांत निदान आपली गायकी, घराणे ह्यासंबंधी काही अभिमान-दुरभिमान तरी असायचा. तो डिवचला गेला तर एखादे पत्र लिहिण्याचे कष्ट उठवतील. पण व्यावसायिक नाटक मंडळ्यातले नट आपण काम करीत असलेल्या नाटकासंबंधी, त्यात आपल्याला मिळालेल्या भूमिकेसंबंधी, तालमीच्या पद्धतीसंबंधी चार ओळींचे पत्र पाठवून काही कळवतील तर शपथ. जुन्या नाटक कंपन्यांतल्या बिऱ्हाडातली कळाहीनता बघवत नसे.

'विश्रब्ध शारदे'च्या ह्या खंडात नाट्यक्षेत्रातल्या मंडळींच्या पत्रांतून न कळत त्यावेळच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर जो प्रकाश पडतो तो सामाजिक इतिहासाच्या अभ्यासकाला महत्त्वाचा वाटावा असा आहे. आधुनिक मराठी नाटकाची सुरुवात विष्णुदास भाव्यांच्या नाटकापासून झाली असे आपण मानतो. हा केवळ एक सोयीसाठी स्वीकारलेलाच टप्पा आहे असे नाही. ह्याच सुमाराला एक नवे समाजपरिवर्तन सुरू झाले होते. इंग्रजी राज्यात शहरांची वाढ झपाट्याने व्हायला लागली होती. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर मुंबईची औद्योगिक वाढ झपाट्याने व्हायला लागली होती. खेड्यातली माणसे आता खेडी सोडून मुंबईला गिरण्या-कारखान्यांच्या दिशेने धावत होती. इंग्रजाने राज्यकारभाराची पद्धत बदलली त्यामुळे कचेऱ्या आल्या. नवी न्यायालये आली. इंग्रजी, पारशी, गुजराती वगैरे व्यापाऱ्यांच्या नव्या पेढ्या आल्या. दलाली करणारांकडे नवी कारकूनभरती व्हायला लागली. बँका आल्या. मजूरदारीला आणि कारकूनदारीला नवा वाव मिळाला. कामाचा दाम नियमितपणाने हातात पडायला लागला. दरमहा एका तारखेला पगार घेणारा कारकूनवर्ग तयार झाला त्या वर्गात एक खालचा मध्यम वर्ग, मधला आणि वरचा मध्यम वर्ग असे त्या मासिक पगाराच्या आकड्याबरहुकूम वर्ग तयार झाले. मजूरवर्गाचे आपल्या खेड्याशी नाते तुटले. मध्यम वर्गाने इंग्रजी भाषा शिकून आपली एक आंग्लभारतीय संस्कृती घडवायला सुरुवात केली. इंग्रज राज्यकर्त्यांच्या भाषेशी सलगी केल्यामुळे आणि त्यांच्या कारभाराची यंत्रे सुरळीत चालू ठेवण्याच्या सहकार्यामुळे या वर्गाला प्रतिष्ठा मिळाली. शिक्षणाच्या अभावी शहरातला मजूर मात्र मनाने खेडवळच राहिला. एकाच खेड्यातून आलेल्या कारकून आणि मजूर-वर्गात आता एक अदृश्य अशी सांस्कृतिक भिंत उभी राहिली.

एकेकाळी ग्रामीण वातावरणात सारा समाज एकाच पद्धतीच्या सांस्कृतिक कार्य-क्रमाचा आस्वाद घ्यायचा. देवळातल्या वार्षिक जत्रेतली ललिते आणि भावणीचे नाच गावातले सगळे लोक एकत्र बसून पहात. जातिधर्मांच्या रूढ कल्पनांमुळे गावचे ब्राह्मण, वैश्यवाणी वगैरे महाजन जरा पुढे बसतील. अस्पृश्य मानलेल्या समाजातील माणसे जरा मागे. पण जी हरिकथा असेल, दशावताऱ्यांचा खेळ असेल तो साऱ्या समाजापुढे. हे सांस्कृतिक संस्कार सगळ्यांनी एकसंधपणाने घेतले. विदग्ध अभिरुची नव्हती असे नाही. पण ती असणाऱ्यांचा फार मोठा वर्गच्या वर्ग तयार झाला तो शहरात. ह्या आंग्लशिक्षित वर्गानेच कलाविषयक प्रतिष्ठेच्या निराळ्या कल्पनांचे बीजारोपण केले.

याला आणखी एक कारण होते. शहरात नाना प्रकारच्या उद्योगधंद्यांतून नोकरी मिळायची संधी सुरू झाल्यामुळे खेड्यातली बलुतेदारी समाजरचना कोलमडून पडली. कुटुंबाचा चरितार्थ चालो किंवा न चालो, बापाची वृत्ती किंवा पेशा मुलाने चालवायचा ही परंपरा. यंत्रसंस्कृतीने ह्या वृत्ति-परंपरेचा कणाच मोडला. आता व्यवसायपरत्वे श्रेष्ठकनिष्ठत्व ह्या कल्पनेलाच धक्का बसला. एकेकाळी कोष्ट्याच्या मुलाखेरीज इतर जातीतला मुलगा कापड विणतो ही कल्पनाच मान्य झाली नसती. आता गावचा शाण्णवकुळी मराठा पाटलाचा मुलगा गिरणीत यंत्रमाग चालवायला लागला आणि भिक्षुकाच्या चिरंजीवाने मुंबई मुन्सिपाल्टीच्या संडास-सफाई विभागात कारकुनाची नोकरी धरली. 'सॅनिटरी डिपार्टमेन्ट' ह्या इंग्रजी नावाने त्या खात्याला नव्या सभ्यतेची झिलई लाभली होती. जीवनाचे सारे संदर्भच बदलत होते. ह्या नव्या परिवर्तनाचे वर्णन 'गावगाडा'कर्ते श्री. अत्रे यांनी 'वतनदारी कडून वेतनदारीकडे' ह्या चपखल शब्दात केले आहे.

नाटक गाण्याच्या क्षेत्रातही पूर्वी वतनदारीच होती. करमणूक करण्याचा व्यवसाय हा कुटुंबांत किंवा ठराविक जातीतूनच चालत यायचा. गावकऱ्यांनी ह्या मंडळींच्या उदरपोषणासाठी झोळीत सुगीच्या काळात चार दाणे टाकायचे. देवळातल्या सेवेकऱ्यात गवईबुवा, भावणी, देवदासी वगैरे नटनर्तनकुशल मंडळी ठराविक उत्पन्नावर गुजराण करायची. चार ठिकाणच्या लोकांनी एकत्र येऊन एखाद्या व्यापारी संस्थेसारखी नाटकाची कंपनी काढायची कल्पना नव्हती. ती इंग्रजी नाटककंपन्या मुंबईतल्या 'थेटरा'त येऊन खेळ करायला लागल्यावर सुचली. आपल्या देशात इंग्रजी राज्याची घडी नीट बसवण्यापूर्वीच्या काळात करमणुकीच्या कार्यक्रमाला 'तिकीट' नावाची वस्तू नव्हती. गावकऱ्यांनी उत्सवाचे प्रसंगी स्वतः हौसेने एखादे ललित घालावे किंवा फिरस्त्या कसबी हुन्नर मंडळींच्या अन्नोदकाची सोय करून जत्रेत त्यांना नाचायला गायला लावावे, संस्थानिकांनी थोडाफार आश्रय द्यावा. एरवी नाटक, ललित, भारूड सगळे काही उघड्यावर आणि फुकट. गाणे एकतर देवळात किंवा श्रीमंतांच्या वाड्यावर. अव्वल इंग्रजीत साहेबाने लंडनच्या

पिकॅडली विभागात आहेत तशी प्ले हाऊस, रिपन थेटर, व्हिक्टोरिया थेटर वगैरे बंदिस्त थेटरे उठवली. चौपाटीजवळ इंग्रजी पद्धतीचे 'आपेरा हाऊस' उभे राहिले. त्यात इंग्लिश कंपन्या येऊन खेळ करू लागल्या. इंग्रजी जाणणारा हिंदी मध्यम आणि उच्च वर्गीय समाज ती नाटके पाहू लागला. पारशी लोकांनी पाश्चात्य रीति रिवाज आधी उचलले. त्यांनी इंग्रजी रंगभूमीच्या ढंगाची पारशी रंगभूमीही उभी केली. ह्याच काळात विष्णुदास भाव्यांनी त्या ढंगाच्या नाटक कंपनीची जुळवाजुळव सुरू केली.

ह्या खंडातील पहिले पत्र डॉ. भाऊ दाजी लाड यांचे आहे. डॉ. भाऊ दाजी म्हणजे मुंबईचे सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवन घडवणाऱ्या आद्य पुरुषांपैकी एक. असा हा थोर पुरुष १८५३ ते १८६२ ह्या कालखंडात विष्णुदास भाव्यांची नाटकमंडळी मुंबईत चार वेळा मुक्काम टाकून असताना त्यांच्या नाटकाची तिकिटविक्री करायला बसतो आणि एखाद्या पगारी कारकुनासारखा विष्णुदासांना खर्चाचा तपशील देऊन पावती पाठवतो. इंग्रज नटमंडळीप्रमाणे आपल्याही नटांना सामाजिक प्रतिष्ठा लाभली पाहिजे ह्या विचाराचे हे द्योतक आहे. इंग्रजी नाटक कंपन्यांतली शिस्त, सभ्यता, त्यांना गवर्नर-बालिष्टर वगैरे उच्च वर्गीयांकडून मिळणारी मानाची वागणूक दिसत होती. कलावंत ही एक गावगन्ना खळ्याखळ्यावरून किंवा उत्सवांसारख्या नैमित्तिक प्रसंगी हाजेरी लावणारी भटकी जमात न राहता तिचा संसार प्रतिष्ठितपणाने व्हायला हवा याची जाणीव ह्या समाजधुरीणांना झाली होती. विष्णुदासांचे करारपत्र हे देखील कलेच्या क्षेत्रातील ती रुटूखुटू चालू ठेवलेली वतनदारी घालवून वेतनदारीच्या पायावर नाट्यव्यवसाय उभा करण्याची धडपड दाखवते. विष्णुदासांचे हे चार आणेचे स्टांपावर केलेले करारपत्र (२।१०) तसे खाजगी पत्र नसले तरी अनेक दृष्टींनी फार महत्त्वाचे आहे. श्री गजानन प्रसन्न असलेल्या सांगली संस्थानात १८५२–५३ साली 'फसली सन' चालू होता. करारपत्रात मात्र '१७८३ दुर्मती नाम संवत्सरातील माघ शुद्ध द्वितीयेचा उल्लेख आहे.' करारात कोण्या सीताराम बिन बाळंभट पुरोहिताला विष्णुदासांनी 'रामायणातील गाणे वगैरे शिकविण्यास' घेतल्याचे दिसते. म्हणजे नाटकातला अभिनय हा 'वगैरे'त व्हायचा. गाणे महत्त्वाचे. पण हे कथेकरी गाणे नव्हे. नाटकी गाणे. हा करार मात्र एकतर्फी वाटतो. कारण त्याचे स्वरूप मालकाशी नोकराने केलेल्या कराराचे नसून गुरूने शिष्याशी केलेल्या करारासारखे आहे. आणि त्यामुळे वेतनाचा स्पष्ट उल्लेख नाही. हा करार चांगला दहा वर्षे पाळावयाचा आहे. त्या आधी गेल्यास, 'मला शिकवलेल्या मेहनतीबद्दल शंभर रुपये सुर्ती देईन' एवढेच नव्हे तर पुढेही 'शिकवले कामावर मिळकत करू लागल्यास मिळकतीतील अष्टमांश रक्कम तुम्हास देईन' ही कबुली करून घेतली होती. असले एकतर्फी करार कधीच पाळले जात नसतात.

ही सगळी मुले सांगली भागातल्या भिक्षुकांची होती हे आडनावावरून समजते. बहुतेक मुले कोकणस्थ ब्राह्मणांची. त्यामुळे गोरीगोमटी आणि निर्दोष वाणी हा उपजत गुण असलेली. नाटकात गेल्यामुळे वैदिकी–भिक्षुकी वगैरे परंपरागत वृत्ती सुटलेली. कौतुकाला लालचावलेली. घरापासून सतत दूर भटकण्याची पोरवयातच संधी लाभल्यामुळे स्वच्छंदीही. विष्णुदासांना विपुल लोकाश्रय मिळू लागताच गुरुजी आपल्या जिवावर पैसे मिळवताहेत आणि आपल्याला करारात जखडून राबवताहेत अशी भावना त्या पोरांच्यात निर्माण होणे कठीण नव्हते. पोरांनी करार धाब्यावर बसवून स्वतंत्रपणाने विष्णुदासांनीच शिकवलेले खेळ करायला सुरुवात केली.

भिक्षुकांची ही मुले वेदशाळेत जावीत तशी नाटकात काम करण्याची विद्या 'शिकण्यास' जात होती. नाटकमंडळी हे नाटक शिकण्याचे फिरते गुरुकुल होते. जुन्या आश्रमातल्या शिष्याप्रमाणे इतर कामांचा भारही ह्या पोरांनीच उचलायचा. सामानाचे बोजे डोक्यावरून वाहण्यापासून ते उष्टी काढणे, 'सेण लावणे' ही सारी कामे नटवर्गानेच करायची. ही पद्धत भारतातल्या लोकनाट्याच्या मंडळीत अजूनही कुठे कुठे आढळते. नव्याने चित्रपट सुरू झाले त्यावेळी दादासाहेब फाळक्यांच्या कंपनीतल्या नटांना अभिनयाप्रमाणे कंपनीत स्वैपाकही करावा लागे. पण असली अंगमेहनतीची प्रापंचिक कामे कमीपणाची मानली जात नव्हती. 'सभ्य गृहस्थांनी बोजे उचलायचे नसतात' हे प्रतिष्ठितपणाचे सूत्र इंग्रजांनी आणले. तेव्हा आजचे निकष लावून विष्णुदास भावे किंवा आळतेकर नाटकमंडळीतल्या नटांना गुलामासारखे राबवले जात असे अशी कल्पना करून घ्यायचे कारण नाही.

अशी ही नवी शिस्त आणण्याच्या प्रयत्नात १८८० च्या सुमाराला नावारूपाला आलेली इचलकरंजीकर नाटक मंडळी अधिक यशस्वी झालेली दिसते. तिचे ठरावपत्र (६।१४) पहाण्यासारखे आहे. ह्या मंडळीतल्या नटांनी आपल्यातून चक्क सातजणांचे कारभारी मंडळच निवडले होते. मंडळीची नाटकेच नव्हे तर वागणूकही फार चांगली असावी असे १८८० साली बडोद्याच्या शिष्ट समाजाने त्यांना दिलेल्या मानपत्रावरून दिसते. कुठल्याही एका नटाच्या लहरीवर न राहता अशी सहकारी तत्त्वावर चांगली चाळीस वर्षे व्यवसाय करणारी महाराष्ट्रातली इचलकरंजीकर नाटक मंडळी ही बहुधा पहिली (आणि शेवटची) नाटकमंडळी दिसते.

नाट्यविभागात छापलेली ही काही पत्रे तशी खाजगी पत्रे म्हणता येणार नाहीत. पण ह्या संग्रहात ती आली हे फार चांगले झाले. नाट्यव्यवसायाला काहीतरी शिस्त आणण्याचे, प्रतिष्ठा मिळवून देण्याचे पहिले प्रयत्न कसे होते हे त्यातून दिसते. अण्णासाहेब किर्लोस्करांसारखा सरकारी नोकरीतला माणूस नाटककंपनी काढायचे धैर्य दाखवतो या मागे विष्णुदास भाव्यांची नाटकमंडळी, आळतेकर मंडळी, इचलकरंजीकर नाटकमंडळी ह्यांनी केलेले प्रयत्न आणि त्यांना लाभत गेलेली प्रतिष्ठा आहे हे विसरून चालणार नाही. पण इंग्रजी नाटक कंपन्यांनी या

काळातल्या नाटकवाल्यापुढे जो आदर्श उभा केला तेही ऋण मानायला हवे. नाटक-धंद्यात जी व्यावसायिक परिभाषा आली ती सगळी इंग्रजीच आहे. कारण पूर्वीच्या रंगभूमीवर विंग्ज नव्हत्याच. फूटलाइट, ड्रापचा कव्हरचा पडदा, मेकप, ग्रीनरूम,सीन, सेटिंग, स्टेज, आर्केस्ट्रा, पिट, वन्समोअर असे कितीतरी शब्द इंग्लिश नाटक-वाल्याकडून आपण उचलले आणि आता ते मराठी होऊन गेले. इंग्रजी शब्दाला सहजपणाने मराठी प्रत्यय लावायला सुरवात झाली की तो मराठी झाला म्हणावे. त्याप्रमाणे विंगचे अनेक वचन 'विंगा' किंवा माणूस 'पिटात' बसतो म्हटल्यावर ते शब्द परकी राहात नसतात. किंबहुना सुरवातीला हे इंग्रजी शब्द वापरण्यामागे प्रतिष्ठेचा भागही असला पाहिजे. हँडबिलात जरी 'गंधर्व नाटक मंडळी' असले तरी बोलण्यात 'गंधर्व कंपनी'च असायचे. छोटे नट मास्टर अमूक किंवा मास्टर तमूक. इतके कशाला ? अळतेकर नाटक मंडळीच्या नटांनी अर्ज केला आहे तो, 'आळते नाटकाचे अध्वर्यु म्यानिजर' यांना. भिक्षुक संस्कृतीतल्या पोरांच्या हातून 'अध्वर्यु' शब्द लिहून गेला तरी 'म्यानिजर' म्हटल्यावर त्या अध्वर्युचा अधिक गौरव. जेत्यांच्या संस्कृतीचे मोठेपण कसे हळूहळू जितांच्या मनात झिरपत जात असते पहा. शहरी आणि ग्रामीण असे संस्कृतीचे इंग्रजी राजवटीत हे असे दोन तट झाल्यामुळे नवसुशिक्षितांचे नाटक आणि गावढ्यांचे खेळ–तमाशे अशी ताटातूटही इथूनच सुरू झाली. पाश्चात्य रंगभूमीवर प्रत्यक्षात दिसणाऱ्या पडद्यावरच्या देखाव्यामुळे भारतीय नाटकाचे 'द थिएटर ऑफ इमॅजिनेशन्'–प्रेक्षकांच्या कल्पना-शक्तीवर विश्वास असलेली रंगभूमी हे स्वरूप पालटून गेले

एक पायाशुद्ध व्यवसाय म्हणून रंगभूमीचा आता नवा अवतार घडत होता. पण शेवटी नाटक कंपनी ही वस्तूंची विक्री करून नफा काढणारी व्यापारी कंपनी होता कामा नये. 'गल्ला' एवढाच उद्देश राहू नये. त्याचप्रमाणे एखादे नाटक चालले तर त्या धुंदीत राहूनही चालणार नाही. जुन्या नाटकाच्या पुण्याईवर नवे नाटक तग धरत नसते–हे इशारे देणे आपले कर्तव्य आहे. असे त्यावेळच्या विद्वान रसिकांना वाटत होते. महादेव चिमणाजी आपट्यांनी अण्णासाहेब किर्लोस्करांना लिहिलेल्या पत्रातून (१०।२२) असा इशारा दिला आहे. विद्‌वज्जनांचा स्नेह हे मराठी नाट्यसृष्टीला सुरुवातीपासून लाभलेले वरदान आहे. लोकमान्य टिळकां-सारख्यांच्या साहचर्यामुळे ह्या मंडळींना एक धाकही होता हे खरे असले तरी शेवटी लोकांच्या आवडीनिवडीवर अवलंबून असलेल्या कलेचा व्यवसाय करताना ओढाताण होतच होती व्यवसाय म्हटला की नफ्यातोट्याचे हिशेब आले. नाट्य-क्षेत्रातल्या लोकांची ह्या संग्रहातली पत्रे पाहताना मला एक गोष्ट फार जाणवली· ह्यातली बहुतेक पत्रे नट-नाटककार ह्यांच्या आर्थिक व्यवहारासंबंधीचीच आहेत. आपल्या कलाजीवनासंबंधी किंवा एखाद्या भूमिकेसंबंधी पत्रातून कधी कुणाला काही लिहिलेले आढळत नाही. त्याला अनेक कारणे आहेत. पहिल्यापासून आपल्या नाटक

कंपन्या एकखांबी तंबूसारख्या. लोकप्रिय नटाने किंवा फार तर त्याच्या तोडीच्या आणखी एकदोन नटांनी कंपनीचे मालक व्हायचे; बाकीचे नोकर. त्या नोकरनटांना कंपनीच्या नाटकाच्या निवडीबाबतच्या, त्यांच्या प्रयोगासंबंधीच्या कुठल्याच बाबतीत ही मालक मंडळी विश्वासात घेत नसत. गंधर्व कंपनीत आयुष्य घालवलेले कै. माधवराव वालावलकर हे नट मला एकदा म्हणाले होते की, 'एक रुपयाचे तिकिट काढून येणारा आमचा प्रेक्षक तो रुपायाच्या रुपाया नारायणराव बालगंधर्वांना पाहण्यासाठी खर्चत होता. आम्ही त्यातल्या एका पैशाचे धनी नाही हे आम्ही पुरेपूर जाणत होतो.' ज्याला 'सपोर्टिंग कास्ट' म्हणतात अशा दुय्यम नटांचे ह्या संग्रहात एकही पत्र नाही. ह्या संग्रहातली मोठ्या नटांची पत्रे वाचताना आयुष्यभर दुय्यम-तिय्यम भूमिका करीत राहिलेल्या अनेक नटांची नावे माझ्या डोळ्यापुढून गेली. कितीतरी उत्तम ऑर्गन वाजवणारे लोक, तबलजी हे आधी पत्र लिहायचे नाहीत; आणि खुशालीची पत्रे जपून कोण ठेवणार? बालगंधर्वांच्या भजनाच्या धुंदीची आठवण करताना त्या भजनात दमदार लयीने रंग भरणाऱ्या पांडोबा बोंद्रे ह्या मृदुंगियाचे स्वदस्तुरचे पत्र राखून ठेवावे असे कुणाला वाटणार? त्यांनीदेखील राखून ठेवण्यासारखे पत्र लिहिलेही नसेल. नारायणराव बालगंधर्वांच्या सिंधुबरोबर गीता, भामिनीबरोबर कुसुम किंवा सौभद्रात रुक्मिणी होऊन उभे राहणारे सदुभाऊ रानडे स्त्रीपार्टी नटांचा जमाना संपल्यावर परिस्थितीपरत्वे रंगमंचावरून निवृत्त झाले. पुण्यात लुगड्याचे दुकान चालवीत असत. रंगभूमीचा निरोप घेताना त्यांनी एखाद्या स्नेह्याला किंवा आप्तस्वकीयाला पत्र लिहिलेही असेल; पण ते जपून कोण ठेवणार? बहुतेकांनी आपली सुखदुःखे आपल्यापाशीच ठेवली. कारण स्वतःच्या भावना लिहून व्यक्त करायला आपण कंपनीत येणाऱ्या त्या थोर नाटककारांसारखे किंवा मालकांच्या बैठकीत बसणाऱ्या वकील-डॉक्टरांसारखे शिकलेले थोडेच आहोत, हा भयंकर न्यूनगंड! ह्या नटांना कंपनीतल्या आठवणीदेखील नीट सांगता आल्या नाहीत. दुय्यम नट म्हणून ही माणसे दुर्दैवाने अत्यंत बोथटपणाने जगली. टाळ्यांचे आणि हारतुऱ्यांचे धनी ज्यांच्या नावावर तिकिटें खपतात ते मालक. असल्या उपेक्षितांनी आपले अंतरंग उघडे केले असते तर मराठी रंगभूमीचा इतिहास वास्तवाच्या अधिक जवळ गेला असता. कदाचित् निराशेच्या सुराने अधिक कडवटही झाला असता. वास्तविक सतत बदलणाऱ्या लोकाभिरुचीशी टकरा घेणारा व्यवसाय असल्यामुळे अनिश्चिततेचे भय सगळ्यांच्या मनात. पण त्यातूनच तर सतत नवीन करून दाखविण्याची जिद्द तयार होते. नाटकधंदा हा अनेक हमखास यशस्वी होणाऱ्या युक्त्यांनी तरता ठेवण्यात आलेला आहे. त्यातली सफाई ज्याला साधली नाही तो फसला. प्रेक्षकांना चुचकारीत राहण्याची नाटकवाल्यांची पद्धत ही 'गिऱ्हाईकाचे नेहमी बरोबरच असते,' ह्या विक्रीच्या सूत्राला धरूनच होती. त्यातून 'कला' ही माणसाची प्राथमिक गरज नाही. नुसत्या जगण्याला कलेची आवश्यकता नाही.

नाटक पाहिले नाही किंवा गाणे ऐकले नाही म्हणून माणूस मरत नाही. पण लोकांनी जर नाटक पाहिले नाही किंवा गाणे ऐकले नाही तर कलावंत मात्र उपाशी मरेल. त्यामुळे ज्या गोष्टीची जगण्याला गरज नाही असे नाटक किंवा गाणे ऐकायला माणसे येतात हे आपल्यावर केवढे उपकार आहेत अशी भावना कलावंतांच्या मनात कुठेतरी घर करून बसलेली असावी. उपेक्षेला सगळेच भितात. पण कलावंत फारच भितो. बाहेरून दाखवत नसला तरी आतून तो भ्यालेला असतोच.

ह्या पत्रसंग्रहात नाट्यविषयक जी काही थोडीफार चर्चा आहे ती नाटककार किंवा साहित्यिक यांनीच लिहिलेल्या पत्रात आहे. गडकरी, देवल, वरेरकर, यांच्यासारखे मराठी रंगभूमीवर नाट्यलेखन एवढाच व्यवसाय करणारे नाटककार फार थोडे. बाकीचे कोणी वकील, संपादक, प्राध्यापक अशा व्यवसायातले आहेत. प्रपंचाला लागणाऱ्या पैशाची त्यांची दुसरी सोय आहे. पण रंगभूमीवरचे त्यांचे प्रेम उत्कट होते. किंबहुना ते स्वतःच्या मूळ व्यवसायापेक्षा नाटकात अधिक रमलेले होते. वार्षिक सुट्टया सुरू झाल्या की त्यांचा तळ नाटकमंडळयांच्या बिऱ्हाडी असायचा. सुस्थित नाटकमंडळयातुन विद्वानांची सरबराई खूप असे. व्यवसाय आणि कला ह्या दोन्ही बाबतीत कंपन्यांचे मालक—नट त्यांचा सल्ला घेत. गप्पागोष्टींच्या बैठकीतून नटमंडळी बहुश्रुत होत. जुनी नाटक मंडळी हे एक फिरते लॉजिंग बोर्डिंग हाऊस असे. सदैव गावोगाव फिरणाऱ्या ह्या कंपन्यांतल्या नाटकमंडळींना विद्वानांचे साहचर्य मोलाचे वाटे. बाहेरच्या जगातल्या घडामोडींच्या वार्ता ह्या सुशिक्षित पाहुण्यांकडून ऐकायला मिळत. इतरांची करमणूक करणाऱ्या नटांची ह्या थोरामोठ्यांच्या सहवासामुळे करमणूक होत असे. अभिरुचीला चांगले वळण लागे. केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर यांच्यासारखे नट असल्या सुशिक्षित नाट्यप्रेमी मंडळींच्या सहवासामुळेच बहुश्रुत झाले. नकळत त्यांची एक सुसंस्कृत घडण होत गेली. असल्या सहवासाचा आलेख चिंतामणरावांच्या ' बहुरूपी 'त फार सुरेख काढला गेला आहे.

सुशिक्षित समाज, आणि रंगभूमीवरचा प्रकाश गेल्यानंतर उरलेला वेळ बहुधा निद्रा—कलह किंवा व्यसनात घालवणारी नटमंडळी ह्यांच्यात हा प्रतिष्ठित अशा स्नेह्यांचा राबता मराठी रंगभूमीच्या भाग्याने दुव्यासारखा ठरला. त्यामुळे नाटक ही मध्यमवर्गीय मंडळींची सहकुटुंब जाऊन पहाण्याची करमणूक झाली. भारतातल्या कितीतरी प्रांतांत नाटक ही गोष्ट मध्यमवर्गीयांच्या जीवनात अशा रीतीने शिरलीच नाही. बालगंधर्वासारखा कलावंत हा समाजाने केवळ करमणूक करणारा म्हणून नव्हे तर एखाद्या चांगल्या साहित्यिकासारखा किंवा विद्वानासारखा आदराने स्वीकारला. बालगंधर्व लाडके होतेच. पण त्यांच्या गुणांची प्रत फार वरच्या दर्जाची आहे याची जाणीव लोकांना होती. ती ह्या सुशिक्षित नाट्यप्रेमी मंडळींनी आपल्या गुणगौरवाच्या लेखातून समाजाला करून दिली होती. कलावंतांच्या स्वभावातला

लहरीपणा त्यांच्यात होता. हौस अमर्याद होती. पण सगळीकडून आपल्यावर स्तुतिसुमने उधळली जात असताना सुशिक्षित समीक्षकांना आपली वैगुण्ये दाखवणारे लेख लिहायला संधी द्यावी म्हणणारे 'बालगंधर्व' असल्या कलाविषयक समीक्षेचे मोल जाणू लागले, कारण कंपनीच्या बिऱ्हाडी येणारी विद्वान मंडळी असे मतभेद व्यक्त करून सर्वांगीण चर्चा करताना त्यांनी पाहिली होती. त्यांच्या एका पत्रांतला (पत्रक्रमांक ४२) शेवटला परिच्छेद पहाण्यासारखा आहे. त्यांनी 'रत्नाकर' मासिकाच्या संपादकांना सांगितले की 'विरुद्ध टीकेची जी माहिती येईल तीसुद्धा आपण मासिकामधून द्यावी. म्हणजे पक्षपात केल्यासारखा होणार नाही.' एवढ्यानेच बालगंधर्व थांबले नाहीत. त्यांनी पुन्हा वसंतरावांना आग्रह केला आहे की, 'आपणही त्यांना माझी इच्छा अशी मनापासून आहे असे ल्याहावे. म्हणजेच त्या अंकाला सुंदरपणा येईल आणि तो खपेलही. लोकांना पक्षपात केल्यासारखा वाटणार नाही. आणि यामुळे पब्लिकला चांगले वाटेल.' 'सुंदरपणा' हा शब्द या ठिकाणी अतिशय सुंदर वाटतो. या संग्रहातली नारायणरावांची सगळी पत्रे वाचताना त्यांच्या संगीतासारखी त्यांच्या लिहिण्यातदेखील कशी सुरेख लयबद्धता होती याचे प्रत्यंतर येते. बोलल्यासारखे त्यांचे लिहिणे. शब्दयोजनेत तेच आर्जव. बोलताना त्यांचे 'अ' कार 'आ' काराजवळ यायचे. लिहिताना तसेच येतात. आजून, आंदाज, आनेक, आसल्या हे शब्द मोठ्याने उच्चारून पाहिले की, बालगंधर्वांच्या त्या ढंगाच्या बोलण्याची खूप आठवण होते. बालगंधर्वांची या संग्रहातली सगळीच पत्रे १९३१ आणि त्या नंतरची आहेत. इथून उतरणीचा घाट सुरू झाला होता. 'मी आता म्हातारा झालो' हे पालुपद सर्व पत्रांतून प्रत्यक्षअप्रत्यक्ष रीतीने उमटले आहे. कर्जाची त्यांना तत्पूर्वी आणि त्यानंतरही सोबत होतीच. राजयोग आणि दारिद्र्ययोग आयुष्यभर त्यांच्या हातात हात घालून चालत होते. त्यातून त्यांच्या मित्रांना अस्वस्थ करणारा, क्वचित प्रसंगी जराशी चीडही आणणारा दैन्यभाव त्यांच्या व्यक्तिमत्वातच भिनला होता. 'प्रभूची कृपा' हा आत्मविश्वासाचा उद्गार न राहता त्यांचा उदास निःश्वास झाला होता. पण नाटक उभे करताना ते खूप देखणे करावे ही हौस मात्र मावळली नव्हती. ती जित्याची खोड होती. वसंतरावांना लिहिलेल्या पत्रांतला शालूच्या काठाचा, पोताचा आणि बुंदक्याचा तपशील एखाद्या गर्भश्रीमंत गृहिणीने लिहावा तसा आहे. 'कान्होपात्रे'तला विठ्ठलमंदिराचा देखावा हादेखील तपशीलाशी तडजोड करणे न मानवणाऱ्या जिद्दी कलावंताचाच हट्ट. रंगभूमीवर तो 'सीन' मी प्रत्यक्ष पाहिला आहे. पंढरीच्या विठूरायाला हेवा वाटावा असा तो सेट् होता. 'टॉकी' आल्यामुळे एकंदरीत सध्या कोणत्याच कंपनीचे बरे नाही' हे त्यांना कळत होते. नाटकातले कर्ज फेडण्यासाठी बालगंधर्व टॉकीत गेले. पण वसंतराव देसायांनी म्हटल्याप्रमाणे त्यांना 'चित्रभूमीशी एकरूप न होता आल्यामुळे' त्यांनी पुन्हा रंगभूमीकडे धाव घेतली. कर्जफेड, आणि रंग-

भूमीला पडता काळ आला आहे हे कळूनही तिथे धाव घेणारे मन, अशा घालमेलीची ही अवस्था त्यांच्या ह्या पत्रांतून दिसते. चिंतामणराव कोल्हटकरही अशाच दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडलेले. तेही वसंतरावांनाच हाक मारतात. ह्या नटमंडळींत गणपतराव बोडस मात्र 'नाटकधंदा हा सर्वस्वी बहुविध माणसांच्या बळावरच असल्यामुळे आळवावरच्या पाण्याप्रमाणे त्याची स्थिती आहे' हे सत्य ओळखून वागत असलेले त्यांच्या पत्रातून दिसते. तसे मा. कृष्णरावही व्यवहार सांभाळून वागताना आढळतात. गोविंदराव टेंबे, मास्तर कृष्णराव, गणपतराव बोडस ही गंधर्व नाटक मंडळीतली फार महत्त्वाची नटमंडळी. बालगंधर्वांची आणि त्यांची ताटातुट मुख्यतः पैशांच्या व्यवहारातील मतभेदामुळे झाली. बोडस शेती करू लागले. टेंबे आणि मास्तर कृष्णराव यांना चित्रपटात संगीतदिग्दर्शक म्हणून यश मिळाले. गोविंदरावांची 'अयोध्येचा राजा'तली हरिश्चंद्राची भूमिकाही प्रेक्षकांना खूप आवडली. किंबहुना 'अयोध्येचा राजा' ह्या चित्रपटाच्या यशात पटकथालेखक, गीत आणि संगीतरचना, अभिनय अशा तीन्ही अंगांनी गोविंदराव चमकले. मूकपटाला वाचा फुटली होती. पण असले 'अद्भुत' पहायला मिळेल अशी त्यावेळच्या प्रेक्षकाला कल्पनाही नव्हती. दुर्गाबाई खोट्यांसारखी देखणी तारामती पाहिल्यावर नाटकातल्या स्त्रीपार्टचि दर्शन असह्य व्हायला लागले. तोपर्यंत नामवंत स्त्रीपार्टी हिडीस दिसायला लागले होते. खाडिलकरांची नाटचप्रतिभाही क्षीण होऊ लागली होती. 'सावित्री' वगैरे नाटके मुळातच इतकी सामान्य होती की गंगाधरपंत लोंढ्यांची सुरेख आवाजी, आणि मास्तरांच्या आकर्षक चालीदेखील त्या नाटकाला तारू शकल्या नाहीत. खुद्द बालगंधर्वांचे 'सावित्री'चे सोंग बधवत नव्हते. आता चित्रपटाच्या पड्यावर एकापरीस एक देखण्या नटचा तारामती, अनसूया, सावित्री-देवयानी होऊन येत होत्या. अशावेळी गिरगावातल्या एखाद्या मुलींच्या शाळेतल्या, थोडीफार पयाशन करणाऱ्या उतार वयातल्या हेडमास्तरणीसारखी दिसणारी रंगभूमीवरची सावित्री बालगंधर्वांविषयी अतोनात प्रेम, श्रद्धा, आदर, सर्व काही बाळगणाऱ्या जुन्या प्रेक्षकांनाही पटेना; तिथे नव्यांचे काय? 'मानापमाना'च्या ऐन जमान्यातली भामिनी, 'स्वयंवरा'तली रुक्मिणी, 'एकच प्याला'मधली सिंधू- या भूमिकांतले बालगंधर्वांचे देखणेपण, त्यांचा आवाज, त्यांचे ते सहजपणाने येणारे आर्जवी बोलणे हे वयपरत्वे नष्ट झाले होते. सावित्री, कान्होपात्रा, अमृतसिद्धी ह्या नाटकांच्या वेळी उतरत्या वयाचे बालगंधर्व तरुण बालगंधर्वांची नक्कल करायला लागले होते. जाणकारांना त्यांच्या फक्त गायकीत त्यांचे श्रेष्ठत्व दिसत होते. कारण मुळातली ती लयकारी, शब्दांची फेक, तानांचा तो डौल हे कायम होते. पण सामान्यांनाही त्यात नकळत गुंतवणारा तो 'आवाज' आता थकला होता. ह्या साऱ्या घसरणीची खुद्द नारायणरावांनाही जाणीव होती याचा पुरावा ह्या पत्रातून मिळतो. 'अमृतसिद्धी' या नाटकाची फिल्म करायला आणि त्यात मीराबाईच्या स्त्रीवेषात काम करायला ते

ूर पैशाने अगदी नडले होते म्हणून तयार झाले. 'आपली फजिती होण्याचे दृश्य पाहण्याची संधी आम्हीच लोकांना जाणून बुजून आणि आग्रहाने दिली आहे' हे त्यांना कळत होते. यापुढे नाटकातून पुरुषपार्ट करायला पाहिजे आणि 'मला शोभेशी हिरॉईन बघितली पाहिजे;' त्यासाठी 'लोकांना जिची पुण्याई भासणार अशी व्यक्ती आणलीच पाहिजे' असेही ते म्हणत होते. इथेही फासा सुलट पडला नाही. गौहर कर्नाटकी ह्या नटीची 'पुण्याई' लोकांना भासेल असे त्यांना वाटले. बालगंधर्वांच्या गायनाविषयी तिला अतिशय ओढ होती. पण दुर्दैवाने बालगंधर्वांच्या ज्या स्त्रीभूमिकांत ती उभी राहिली त्याचे 'दर्शन' प्रथमदर्शनी घडवावे ह्या दर्जाची रूपगुणसंपदा त्या नटीत नव्हती. त्या भूमिका समजाव्या असा वकूबच तिच्यात नव्हता. पदाच्या जागी पद म्हणता येई पण तीही बालगंधर्वांची एका स्त्रीने केलेली नक्कल होती. जणू काय एवढ्याने भागले नाही म्हणून गोहरबाई आणि बालगंधर्व यांचे व्यक्तिगत प्रेमाचे संबंध जुळून आले. गंधर्व कंपनीची राजवटच बदलली. जुनी माणसे दूर गेली. नवी गुणसंपन्न माणसे जवळ केली गेली नाहीत. तिकिटे काढून येणाऱ्या प्रेक्षकांना दयामाया नसते. दाम रोख देणाराला माल चोख हवा असतो. चोख मालाच्या ज्याच्या त्याच्या कल्पना असतात. त्या कल्पनांशी गणित जुळले नाही की तो दुसऱ्या दुकानात जातो. बालगंधर्वांची पुण्याई आता कामाला येत नव्हती. गोहरबाईंना ती कधी नव्हतीच. त्यांचे मराठी बोलणेदेखील निर्दोष नव्हते. पण बालगंधर्वांचा त्यांच्या ठायी जीव जडला होता. त्यामुळे नाटचव्यवसायाच्या दृष्टीने गोहरबाईंची निवड चुकीची आहे हे त्यांना पटतच नव्हते. त्यांच्या स्नेह्यांना त्यांचे घरी आणि रंगभूमीच्या दारी झालेले हाल पाहवत नव्हते. पण बालगंधर्वांचा 'स्वभाव' हे त्यांच्या निकटवर्तीयांनासुद्धा न सुटलेले कोडे होते. डॉ. भडकमकरांसारख्या धन्वंतरीलाही बालगंधर्वांच्या स्वभावावर औषध सापडले नाही. गोविंदराव टेंब्यांसारखे त्यांचे गुरुतुल्य सहकारी, गुणांचे लोभी कलावंतदेखील 'Nobody can instill any sober sense in Narayanrao' असे म्हणत असताना 'But to watch him dragging a miserable existance would be simply cruel' म्हणत गंधर्व नाटक मंडळीचा संपूर्णपणाने मोडलेला रथ नारायणरावांच्या हट्टासाठी तरी ओढत ठेवला पाहिजे असे सांगताना दिसतात. गोहरबाई ही गोविंदरावांना 'अशिष्ट, उद्धट आणि गर्विष्ठ' बाई वाटत होती. शिवाय त्यांच्या मते ती 'महामूर्ख' ही होती. पण बालगंधर्वांना ती सर्वतोपरी प्रिय होती. त्याला कोण काय करणार? बालगंधर्वांची ही परवड त्यांच्या ऐश्वर्याचे दिवस पाहिलेल्या स्नेह्यांना बघवत नव्हती. स्वत: एक प्रकारचे उपेक्षित आयुष्य काढणाऱ्या शिल्पकार फडक्यांच्या पत्रात (५८/९८) त्यांनीच 'शिल्पकाराला (उतरत्या आयुष्यात) अदृश्य तरी राहता येते पण नटाला वार्धक्य झाकून प्रेक्षकांपुढे उसन्या तारुण्याने यावे लागते ही विटंबनाच नाही का?' असे म्हटले आहे ते

खरे आहे. ह्या संग्रहात आलेल्या अण्णासाहेबांच्या पत्रात त्यांच्या स्वभावातली कठोर चिकित्सक बुद्धी, सहृदयता आणि खटचाळपणा ही तीन्ही अंगे दिसून येतात. वृद्धापकाळी बालगंधर्वांना 'शारदा' होण्याची लहर आली होती. त्यावेळी त्या वयोवृद्ध शारदेचा 'कोदंड' कोणी व्हायचे, या प्रश्नाला अण्णासाहेब फडक्यांनी काकासाहेब खाडिलकरांचे नाव सुचवले होते. पण साठी उलटलेल्या बालगंधर्वांना तेरा चौदा वर्षांच्या शारदेचे काम आपण पुन्हा एकदा करावे असे वाटणे ही केवळ हास्यास्पद गोष्ट नाही. वार्धक्याला इंग्रजीत दुसरे बालपण म्हणतात. नट-नर्तकाच्या आयुष्यातले हे दुसरे बाळपण अत्यंत करुण असते. जुन्या भूमिका तितक्याच ताजे-पणाने मनात नांदत असतात. देह साथ देत नसतो. टिपेचा षड्ज डोळ्यांना दिसतो गळ्याला पेलत नाही. अंतरीची ऊर्मी अस्वस्थ करीत असते. ही यातना 'जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे' हेच खरे. बोडसांसारखा इतका व्यवहारदक्ष कलावंतदेखील उत्तरायुष्यात आपल्या त्या खेड्यातल्या घरकुलाच्या ओसरीवर आप्तस्वकीयांपुढे जिथे एकटे बसून अखंड नाटकेच्या नाटके म्हणून दाखवीत असे, तिथे नारायण-रावांसारख्या केवळ रंगभूमीच्या रंगाने अंतर्बाह्य न्हाऊन निघालेल्या कलावंताची काय कथा ? त्यांना त्या जुन्या असामान्य स्त्रीभूमिकाही खुणवीत होत्या आणि अभिजात भारतीय संगीताच्या मुशीतल्या अग्निदिव्यातून तावून सुलाखून काढलेली मराठी नाटकातली गाणीही त्या वार्धक्याने थकलेल्या गळ्याशी रुंजी घालत होती. बालगंधर्वांच्या अंतर्यामाचे जास्तीत जास्त आकलन फार तर एकाच माणसाला झाले असेल. तो म्हणजे 'बालगंधर्व' होऊन जगलेला नारायण श्रीपाद राजहंस नावाचा माणूस. जगात सुखाच्या परी सामान्यतः सारख्या असतात, दुःखाची जात मात्र दरमाणशी स्वतंत्र. आणि इथे तर हजारांतुनी एखादा म्हणावा असा माणूस. त्याचा शहाणपणा आणि वेडेपणा मोजायला कुठलेही 'स्टॅण्डर्ड' लावणे ही आपली चूक आहे.

ह्या संग्रहातली सुरुवातीची पत्रे वगळली तर बाकीच्यांतून मराठी रंगभूमीच्या उतरत्या काळातलीच धडपड अधिक दिसते 'आंधळ्यांच्या शाळे'च्या प्रयोगासारखी एखादी सुखद झुळुक येते; नाही असे नाही. पण उत्तरकाळात जुन्या ढंगाची नाटक कंपनी काही काळ यशस्वी रीतीने चालविणारे गंगाधरपंत लोंढेदेखील 'मालक मी, मॅनेजर मी, ॲक्टर मी, लोकांचे जोडे खाणारा मी' म्हणत जिकीरीला आलेले दिसतात. याच काळात 'कुलवधू' नाटक आले. पुन्हा एकदा ओस पडणारी थिएटरे गजबजू लागली. रांगणेकरांच्या ह्या नाटकाने पुन्हा एकदा मराठी मध्यमवर्गीय समा-जात 'नाटक' या विषयाची चर्चा सुरू झाली. चित्रपटाच्या यशात दोन अडीच तासात होणारी करमणूक हा एक घटक महत्त्वाचा होता. वास्तविक तीस-एकतीस साली अनंत हरि गद्र्यांनी 'नाटिका' ह्या नावाने रंगभूमीवर असाच दोन अडीच तासांचा खेळ सुरू केला होता. त्याला प्रेक्षकही लाभत होता. अत्र्यांची नाटके तुफान

चालत होतो. पण प्रभात फिल्म कंपनीचे कुंकू, माणूस, तुकाराम, ज्ञानेश्वर, शेजारी, किंवा मा. विनायकांचे प्रेमवीर, ब्रह्मचारी, धर्मवीर, ब्रॅण्डीची बाटली यासारखे बोलपट ही तत्कालीन तरुणवर्गाची मुख्य करमणूक होती. बालगंधर्व, दीनानाथ, कोल्हटकर, बापूसाहेब पेंढारकर यांच्यासारख्या रंगभूमीवरच्या लोकप्रिय नटांनी चित्रपटव्यवसायात स्वतःला संपूर्णपणे पोळून घेतले होते. चित्रपट काढणे हे ह्या लोकांचे काम नव्हे असेच लोकांना वाटत होते. केशवराव दाते प्रभात कंपनीत नट म्हणून राहिले आणि आपल्या अभिनयगुणाने चित्रपटातही लोकप्रिय झाले. कालांतराने चिंतामणराव कोल्हटकरांनी चित्रपटात नट म्हणून लौकिक मिळवला. परंतु एकोणिसशे तीस सालापर्यंत 'नाटक' नावाची गोष्ट मध्यमवर्गीय मराठी घरातून एखाद्या धार्मिक कुलाचारासारखी जी येऊन बसली होती ती मात्र गेली; करमणुकीच्या बाबतीतली तत्कालीन नव्या आणि जुन्या पिढीतली पहिली 'जनरेशन गॅप' पडली. बालगंधर्व, पेंढारकर, दीनानाथ, मा. कृष्णराव ह्यांच्या गायनाने दिपलेले जुने लोक आणि सायगल आणि पंकज मलिकच्या गाण्याने आकर्षित झालेली नवी पिढी. गाण्याच्या आवडीत फरक पडायचा म्हणजे किती पडायचा ? ज्या घराघरातून फोनोवर बालगंधर्वांची, दीनानाथांची, पेंढारकरांची पदे सतत वाजायची त्या प्लेटी आता धूळ खात पडल्या आणि कालगती कशी विलक्षण असते पहा; सत्तर सालानंतर त्या जुन्या नाट्यसंगीताचे न भूतो न भविष्यती असे पुनरुज्जीवन झाले. जुन्या नाटकांचे तितकेसे झाले नाही पण नव्या संगीतप्रेमी पिढीला एकाएकी त्या जुन्या गाण्याचे मोल इतके समजू लागले की, कुमार गंधर्व, वसंत देशपांडे, भीमसेन जोशी, माणिक वर्मा, छोटा गंधर्व, जितेन्द्र अभिषेकी, प्रभाकर कारेकर, रामदास कामत, प्रसाद सावकार ह्यांसारखे आजचे लोकप्रिय गायक आपल्या मैफलीत त्या गाण्यांनी अधिक रंग भरू लागले.

पण १९३१ ते ४७ पर्यंतचा हा काळ मात्र 'कुलवधू'चा किंवा नाट्यनिकेतनच्या आणखी काही नाटकांचा अपवाद वगळला तर मराठी रंगभूमीच्या विकलावस्थेचा काळ आहे. तिला पुन्हा एकदा चालतीबोलती करायचे प्रयत्न होत नव्हते असे नाही. चिंतामणराव कोल्हाटकरांच्या डोक्यात 'नवीनतेची फाजील कल्पना' शिरली होती. मुंबई मराठी साहित्य संघात डॉ. भालेरावांनी तर मराठी रंगभूमी पुन्हा जुन्या दिमाखाने उभी करीन अशी प्रतिज्ञा करून जणू यज्ञीय कंकण बांधल्यासारखे कार्य सुरू केले होते. त्यांनी दहा ठिकाणी पांगलेल्या वृद्ध जखमी नटांना एकत्र आणले. व्यवसायातली मंदी, वार्धक्य, उपेक्षा, बदलत्या अभिरुचीशी न जुळलेला सांधा ह्यामुळे जुने नट फार हाळवे झाले होते. एक प्रकारचा कडवटपणाही आला होता. हा हाळवेपणा नानासाहेब फाटकांच्या रोजनिशीतल्या काही वाक्यातून दिसतो. रोजनिशी जरी 'पत्र' या सदरात मोडत नसली तरी विश्रब्ध शारदेचाच तो एक अवतार असतो. पत्र हा दोघांतला संवाद तर रोजनिशी हे स्वगतासारखे

असते. काहीसे खाजगी जमाखर्चाच्या वहीसारखे. पण पत्रासारखेच चटकन् अंतः-करण उलगडून दाखवणारे एखादे वाक्य रोजनिशीतही सापडते. डॉ. भालेरावांची ह्या संग्रहातील पत्रे त्यांच्या ह्या नाटकाचे पुनरुज्जीवन करण्याच्या कार्यातल्या सह-कारी मित्रांना लिहिलेली असली तरी त्यात व्यक्त झालेले अनुभव निःस्वार्थीपणाने काम करणाऱ्या कुठल्याही सामाजिक क्षेत्रातल्या कार्यकर्त्यांच्या अनुभवाशी जुळणा-रेच आहेत. त्या कार्याच्या ओझ्याने, ' मी मात्र आयुष्याच्या अखेरीला येऊन ठेपलो आहे ' हे त्यांना फार लवकर म्हणायला लावले. त्यांच्या पत्रातले ते वाक्य मनावर आघात करून जाते.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर परिस्थिती बदलायला लागली. सध्या कलेक्टरपुढे जायला लटपटणारा आमचा नाटकवाला आता थेट आमच्या स्वतंत्र भारताच्या पंतप्रधानांना आमच्या नृत्य, नाट्य, संगीत यांच्या परंपरा जतन करून वाढीस लावण्याच्या तुमच्या काय योजना आहेत ते सांगा असे विचारू लागला. आता सरकारी अनुदानामुळे नाट्यमहोत्सव साजरे होऊ लागले. सरकारचे लक्ष या कार्या-कडे वेधण्यात खासदार झालेल्या मामा वरेरकरांनी कायकाय परिश्रम (खुद्द मामांना उचापती हा शब्द अधिक आवडला असता ! ) —केले त्याची झलक हचा संग्रहा-तल्या पुरवणीत आलेल्या पत्रातून मिळते. नाट्यकलेच्या विकासासंबंधी किंवा आकाशवाणीवरून संगीताच्या बाबतीत काय व्हायला हवे यासंबंधीची श्री. रामदास भटकळांनी संपादित केलेली पत्रे ह्या नव्या कालखंडातल्या सुरुवातीच्या प्रयत्नांची उभारनी कशी होत होती याची कल्पना आणून देणारी आहेत.

सांगलीतल्या भिक्षुकांच्या दहाबारा मुलांशी करार करून विष्णुदासांनी हा नाटकधंदा सुरू केला. १८४३ ते १९४७ ह्या एकशेचार वर्षात अनेक चढउतार करीत हा गाडा चालला आहे. मला ही पत्रे वाचताना एका गोष्टीची मौज वाटली. प्रयोगाचे स्वरूप बदलले असेल, अभिनय, संगीत, नेपथ्य, कथावस्तू, संवादाची धाटणी, भाषेचा वापर, लेखनस्वातंत्र्याबद्दलच्या कल्पना ह्यात जमीन अस्मानाचा फरक पडला आहे. हे सारे शतकच मुळी साऱ्या मानवी संस्कृतीला आणि सांस्कृ-तिक आविष्कारांना धक्के देत गेलेले आहे. सिनेमा बोलू लागला हे कळल्यावर माणसे विश्वास ठेवीत नव्हती; आता तर मुंबईच्या रंगमंदिरात चाललेले नाटक पुण्यात घरबसल्या पाह्यायची टेलिव्हिजनने किमया केली. पण हचा सगळ्या बद-लात नाट्य व्यवसायात जर विष्णुदास भाव्यांपासून ते आजतागायत काही टिकून असेल तर व्यवसायातील अस्थिरता ! पूर्वी सावकाराकडे जाणारे नाटकवाले आता अनुदानासाठी सरकारी आणि निमसरकारी संस्थांकडे धाव घेतात. बोडसांनी उल्लेखलेले ' अळवावरचे पाणी ' कुणाला रुचो न रुचो; जनसमुदयापुढे करून दाखवायच्या कलेच्या बाबतीतले ते एक कटू सत्य आहे. फार मोठे पैशाचे भांडवल लागते. सरकारकडून घेतले तर त्यात सरकारमान्य धोरणाचा शिरकाव झाल्या-

शिवाय राहात नाही. पैसा जिथून येतो तिथून तो स्वतःचे चारित्र्य घेऊन येतो. चित्रपटाच्या धंद्यात आलेल्या काळ्या पैशाने रूपेरी पडद्यावर आपले काळे डाग उमटवले आहेत. जुगारी आणि तस्कर यांच्याकडून भांडवल म्हणून येणारा पैसा समाजहिताची चिन्ता करीत नाही. तिथे जुगाराचाच कायदा लागतो आणि तस्कर-शहांचेच नीतिनियम लागतात. भांडवलशाही देशात आर्थिक नफा हे प्रमुख ध्येय राहते. 'काम आणि हिंसाचार' खपतात तर ते खपवा हे सूत्र तिथे सध्या चालू आहे. साम्यवादी देशातले सत्ताधीश त्यांना पसंत असलेल्या तत्त्वज्ञानाचे निकष कले-लाही लावणार. 'नाटक' हा असा चित्रपटाइतका नसला तरी प्रत्येक प्रयोगाला किमान दोन अडीच हजार रुपयांचा बोजा आणि त्याआधी पाचपंचवीस हजाराचे भांडवल लागणारा धंदा आहे. त्यातून ते उभे करायचे म्हणजे निरनिराळ्या कला आणि कारागिरी साधलेल्या माणसांचा गट सतत सांभाळावा लागतो. प्रत्येक प्रयो-गाशी अनेकांचे नशीब गुंतलेले असते. इतकेच नव्हे तर लोकप्रिय नटाला झेपत नसले तरी प्रयोग करीत राहावेच लागते. कारण त्याची इच्छा असो वा नसो, तो नकळत दहा जणांचा पोशिंदा होतो. कारण गल्ला त्याच्या नावावर जमत असतो. तो केवळ व्यावसायिकच नव्हे तर निराळ्याच नैतिक बंधनात गुरफटत जातो. असा हा जीवघेणा व्यवसाय. विलक्षण धुंदी आणणारा. पण धुंदी जितकी मोठी तितकीच ती उतरल्यावर येणारी मानसिक थकावट आणि निराशाही मोठी.

ह्या पत्रांतून कलाविषयक चर्चेपेक्षा व्यवहारविषयक हकीकतीच अधिक आढ-ळतात. याला कारण नाटकातले हे व्यवसायाचे ओझे. नटांनादेखील पैशाचे सोंग आणता येत नाही. सतत प्रकाशाच्या झोतात राहू इच्छिणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या सहकार्याने करावयाचा हा व्यवसाय. नाटकधंद्यात शिरणाऱ्या प्रत्येकाला हीरो किंवा हिरॉइन व्हायचे असते; प्रत्यक्षात वाट्याला कोणती भूमिका येईल हे सांगता येत नाही. पात्रयोजनेच्या वेळी तर लॉटरी फुटण्यासारखाच प्रसंग असतो. लोकांच्या डोळ्यात भरण्यासारखी भूमिका मिळणे, ती योग्य रीतीने वठणे हाही एक योगा-योग असतो. कुणीतरी थट्टेने नाटकात काम करण्याच्या ह्या हौसेला 'अण्णासाहेब किर्लोस्करांची भुकटी' म्हटले होते. नाटककंपनीच्या जेवणात ती भुकटी एकदा डाळीतून पोटात गेली की मग नाटककंपनीतून सुटका नाही. मग पडेल ती भूमिका करीत राहायचे. आणि अत्यंत पडेल मनाने आयुष्य काढायचे. जुन्या नाटक-कंपन्यातले दोन चार नट वगळले तर बाकीच्या नटांच्या जीवनातली कळाहीनता भयानक होती. मग कुणी स्वतःला व्यसनात बुडवून घेई, कुणी 'देवदेव' करीत बसे-त्या लोकात एक विचित्र सिनिसिझम् निर्माण झालेला आढळे. 'आपले आयुष्य हे असेच जायचे' असे मानणारा माणूस वैचारिक देवाणघेवाण करायला नाकबूलच असतो. त्यातूनच जुन्या नाटकमंडळ्यातल्या नटांचे ते संवेदनाहीन बोथट-पणे जगणे आले.

संगीताच्या क्षेत्रात सुदैवाने निराळी परिस्थिती आहे. त्यामुळे ह्या संग्रहात जी गायिकांची किंवा गायकांची पत्रे आहेत, त्यात धंद्याच्या जोखमीची चिंता कमी आढळते. गायनाच्या व्यवसायात 'गायन' हेच मुख्य भांडवल. ते जमवताना विद्यार्थीदशेत आर्थिक ओढाताण सोसावी लागेल तेवढीच. अर्थात वार्धक्याची भीती तिथेही आहेच. पण चांगले शिष्य लाभले तर तो काळही चांगला जाण्याची शक्यता तिथे असते. शिवाय नटाच्या तुलनेने गायकाला आपल्या समाजात अधिक मान-मान्यता होती. नटाचे मुख दिवसा पाहू नये असा प्राचीन दंडक. पण देवालयाधिष्ठित भारतीय संस्कृतीत गायक हा पुरोहिताइतकाच देवाचा सन्माननीय सेवेकरी होता. 'गायन' हा दरबाराइतकाच देवळात मान्यता असलेला कलाप्रकार होता. त्या कलेतल्या स्त्रियांना सामाजिक मान्यता नव्हती. पण 'बुवा' मंडळींविषयी आदर असे. दक्षिणेत तर त्यांची गणना विद्वानात होई. मराठी शब्दप्रयोगातदेखील 'नाटकाची विद्या' म्हणण्याची पद्धत नाही. तिथे कसब. पण गाण्याची मात्र विद्या. 'नाटक्या' ह्या शब्दाभोवती 'तुच्छते'ची सूचना होती. 'गाणाऱ्या'च्या बाबतीत नव्हती. गाणारणीला मात्र गाणिकेसारखेच लेखले जात होते. इतके असूनही प्रतिष्ठेच्या उच्चतम स्तरावर गायनकलेतल्या स्त्रीपुरुषांना मान्यता नव्हती. ह्याही बाबतीत पाश्चात्य समाजात ह्या कलावंतांना मिळणाऱ्या मानाचे दर्शन इंग्रजी राजवटीत घडायला लागले. ह्याच सुमाराला पं. विष्णुदिगंबर पलुस्करांच्या कार्याला आरंभ झाला. देऊळ आणि दरबार यापेक्षा निराळे एक पीठ तयार करून तिथे गायकाची स्थापना झाली पाहिजे हा फार मोठा विचार त्यांनी आणला. ह्या कलेच्या उपसकांना सामाजिक प्रतिष्ठा लाभावी म्हणून त्यांनी सारे आयुष्य वेचले. स्वत: गायकांचे आचार-व्यवहार चांगले राहिले पाहिजेत याविषयी कटाक्ष बाळगला. ही एक सांस्कृतिक चळवळ होती. त्यांची श्रद्धा असलेल्या श्रीरामाचे अधिष्ठान ठेवून त्यांनी ती चालवली.

त्यामुळे संगीतविषयक पत्रांची सुरुवात पं विष्णु दिगंबरांच्या एका लहानशा पत्राने होण्यात औचित्य आहे. वास्तविक १९१३ साली लिहिलेले हे पत्र (१/१७३) नागपूरला गांधर्व महाविद्यालयाची शाखा उघडली होती त्या वृत्तांतासोबत पाठवलेले जोडपत्र आहे. त्या वृत्तांतात जलशाला आलेल्या 'ऑनरेबल' श्रीमंतराव, रावबहादुर अशा बिरुदांच्या मानकऱ्यांची नावे विष्णु दिगंबरांनी आवर्जुन लिहिली आहेत.

गायकगायिकांची ही पत्रे संगितविषयक असली तरी त्यातून त्यांचे वैयक्तिक रागलोभही तंबोऱ्यातल्या गांधारासारखे आपोआप प्रकटले आहेत. उस्ताद फैजमहंमदखां भाऊराव कोल्हटकरांचे नाटकी गाणे ऐकताना 'ये आवाज नही बलके बिजली मालूम होती है' अशी त्या बिजलीसारखीच कडाडून दाद देताना दिसतात. फैजमहमदखां म्हणजे अभिजात संगीताचे निस्सीम उपासक. त्या काळात भलत्या ढंगाच्या गायनाने आपले कान अपवित्र करायचे नाहीत अशी व्रते बाळगून ही माणसे

वागत. पण नाटकी गाण्याचा सूर हा काही निराळा असतो. अस्सल सूर दिसल्यावर त्यांचे अंत:करण हलले. अस्सल सुरलयीचा लोभ हाच शेवटी त्या गानवेदाचा अर्थ असतो. तो उमजलेले थोडे. येर फक्त चीजांचा भार माथा वहात असतात. १९२३ साली म्हणजे आजपासून बावन वर्षांपूर्वी इंदूरच्या श्रीमंत महाराजसाहेबांस ' संगीताच्या उद्धारार्थ काहीतरी कायमची संस्था अस्तित्वात येवो ' ही तळमळीने प्रार्थना करणारे विष्णू नारायण भातखंडे. त्या उद्गारात केवळ गाण्याची तालीम एवढाच भाग न राहता संगीतशास्त्राची पायाशुद्ध चिकित्सा आणि संशोधन हाही विचार होता. इकडे विष्णू नारायण भातखंडे, हें कार्य ' संस्था ' स्थापून करावे, निरनिराळ्या विद्वानांना एकत्र आणावे, व्यक्तिमहात्म्यापेक्षा कार्यमहात्म्य मोठे मानावे, असे सुचवताना दिसतात. त्या उलट ' भय्या भास्करराव हे फक्त माझ्या वडिलांचीच गायकी गात असत ' हा फक्त स्वत:च्या घराण्याचा अभिमान विलायत हुसैनखां यांच्या पत्रातून व्यक्त होतो. भास्करबुवा बखल्यांविषयी गोविंदराव टेंब्यांनी ' गेल्या शंभर वर्षांत असा गायक झाला नाही ' अशा स्वरूपाचे विधान केल्यावर अब्दुलकरीमखां साहेब आणि विलायतखांसाहेब–दोघेही काव खवळून उठले आहेत. टीपा-लेखक डॉ. गोखले म्हणतात त्याप्रमाणे ह्या ' स्फोटाचे मूळ तामसी नाही, सत्वरजोमय आहे.' अब्दुलकरीमखांसाहेबांनी तर गोविंदराव टेंब्यांच्या पेटीचा ' बारा सुरांचे खोके ' असा उल्लेख केला आहे. ते खोके ते आपल्या गायनाच्या साथीला घेत असत याचा त्या सात्त्विक संतापाच्या क्षणी त्यांना विसर पडला आहे. त्याबरोबरच अिलायतखांसाहेबांनी तर गोविंदरावांना ' हिंदुस्थानभरची गवईमंडळींची क्षमा मागितली पाहिजे ' असे त्यांच्या गुरूच्या गुरुबंधूच्या म्हणजे ' चुलतगुरू ' च्या अधिकारात बजावले आहे. ह्या साऱ्या संतापामागे केवळ गुरूभक्ती, घराण्याचा अभिमान, क्वचित प्रसंगी हिंदु–मुसलमान हा विचार एवढच होते असे मानता कामा नये. शास्त्रपूत गायन ही ह्या कलावंतांची धार्मिक श्रद्धेच्या तोडीची श्रद्धा होती. पठण करणाऱ्या पंडिताला उदात्त–अनुदात्ताची चूक ही मनुष्यहत्येच्या पापासारखी वाटत असे म्हणतात. ह्या गायकांना त्यांच्या परंपरेतून मिळालेल्या विद्येच्या बाबतीत काही सरमिसळ झालेली त्या वेदपाठी लोकांप्रमाणेच खपत नसे. विद्येचा गाभा शाबूत ठेवण्याच्या दृष्टीने हे धोरण बरोबर होते पण क्वचितप्रसंगी परंपरेचा आंधळेपणाने स्वीकार करण्याची सवय झाल्यामुळे कलेचीही डबकी भाजली. नवा विचार थांबला. इतकेच नव्हे तर तशा प्रकारच्या शिस्तीच्या मर्यादा कुठपर्यंत होत्या हेदेखील शिकवणाऱ्या आणि शिकणाऱ्या लोकांनी ध्यानात घेतले नाही. तो अंदाज अब्दुलकरीमखांसाहेबांना कसा पक्का होता ह्याचे उत्तम दर्शन त्यांनी बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी ह्या आपल्या शिष्याला खंबावती रागिणीविषयी लिहिलेल्या पत्रातून घडते. ' आमचे येथे त्या रागिणीला स्वर येणेप्रमाणे लागतात.' या वाक्याबरोबरच आधी त्या अंगाने तो राग अंकित

करून घ्या आणि मग 'ग्रहणशक्ती वाढली तर तुम्ही स्वत: दहा तऱ्हेची खंबावती गाऊ शकता.' हा उपदेश फार मोलाचा आहे. विद्यार्थीदशेत कल्पनेचा वारू भडकून देण्याला फार महत्त्व असतें. 'तालीम' या शब्दात लगाम अभिप्रेत आहे. एकदा रागावरची मांड घट्ट झाली की घोडा हवा तसा दौडावा. उत्तम ग्रहणशक्ती असलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनांचा रंग भरून स्वत:चे गायन परंपरेच्या शिस्तीत राहूनही अधिक श्रीमंत केले आहे.

ह्या संग्रहातल्या अब्दुलकरीमखांसाहेबांच्या आणखी एका पत्रातला (१५/२०५) ताजा कलम वाचण्यासारखा आहे. संगीताचे शिक्षण, संशोधन इत्यादी कार्यासाठी मुंबईला १९३७ मध्ये 'भारतीय संगीत समिती' स्थापन झाली.ह्यात संगीतकलेच्या विकासाइतकाच तिला नवी प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा विचार होता. खरे म्हणजे ह्या असल्या दिवसा मिळणाऱ्या प्रतिष्ठेशी आपल्या मैफिलीत धुंद होऊन गाणाऱ्या गवयांना रस नव्हता. तुम्हाला जे काही म्हणायचे ते दोन तंबोऱ्यांच्या मधे बसून म्हणा हा त्यांचा खाक्या होता. हे बरे की वाईट हा प्रश्न निराळा. पण त्यामागे कलेतले, विशेषत: गायनकलेतले एक फार मोठे सूत्र दडलेले होते. काही वर्षांपूर्वी दिल्लीच्या संगीत नाटक अ‍ॅकॅडमीतर्फे एका फार मोठ्या तबलावादकाचा पं. नेहरूंच्या हस्ते पदक वगैरे देऊन गौरव झाला. त्यांची आणि माझी काही दिवसांनी भेट झाल्यावर मी त्यांचे अभिनंदन केले. वादकमहाशय काही खुलले नाहीत. काही वेळाने ते मला हळूच म्हणाले– 'गौरव वगैरे ठीक आहे–पण नेहरूजींना तबला कळत नाही.' अब्दुलकरीमखां जेव्हा, 'ते लोक शास्त्राप्रमाणे गातात आणि आमचे लोक अशिक्षित परंपरेने गातात. परंतु प्रत्येकाने आपली परंपरा अद्याप राखलेली आहे.' असे म्हणतात तेव्हा त्यामागे एक सूक्ष्म बोच आहे हे ध्यानात घ्यायला हवे. मैफिलीतले गायन म्हणजे गायनशास्त्राबरहुकूम केलेले पठण नव्हे हे त्यांना सुचवायचे होते. 'कागदी लिहिता नामाची साखर, चाटिता मधुर गोडी नेदि' असे वेदाभ्यासजड पढिक पंडितांना उद्देशून तुकोबा म्हणतात ते याच अर्थाने! घराणे कुठले का असेना, त्यातले रागाचे आणि चीजेचे चलन काही का असेना, ही 'अशिक्षित' (?) गवयी मंडळी त्यात घुसून गायची. खुद्द अब्दुलकरीमखांसाहेबांचे ते सुरांच्या दुनियेतले हरवणे त्यांच्या गायनाइतकेच सुखद असायचे. ह्या विद्वानांना ती अनुभूती नाही हे ते पक्के जाणत होते आणि म्हणूनच त्यांनी सूचना केली होती की 'मीटिंगमध्य असे पंच नेमले पाहिजेत की ज्यांना सूर व लय यांची राईराईएवढी माहिती असली पाहिजे व त्याप्रमाणे अध्यक्षही पाहिजेत.' ह्या कमिटीला डॉ. देशमुख, जमनादास मेहता, भुलाभाई देसाई वगैरेंचा आश्रय होता. ही प्रतिष्ठित माणसे. पण सुरलयीच्या दुनियेला ह्या प्रतिष्ठेचे मोल का वाटावे? संगीतातल्या प्रतिष्ठेची प्रतिष्ठापनाच मुळी चुकलेली होती. भलती प्रतिष्ठित माणसे या रानात शिरल्यावर काय घोटाळा होतो त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे तात्यासाहेब केळकरांच्या अध्य-

तेव्हाच्ची १९२७ च्या जून महिन्यात गांधर्व महाविद्यालयाच्या विद्यमाने भरलेली संगीतपरिषद आणि तिथे झालेला संगीताच्या मराठीकरणाचा ठराव. ह्या प्रतिष्ठितांनी भारतीय संगीतात कारण आणि अधिकार नसताना धुमाकूळ घातला. संगीतात आपले सामाजिक स्थान विसरून घुसता यावे लागते ही सगळी परीटघडीची प्रतिष्ठित माणसे. सुदैवाने आपल्या कविता गाताना 'म्याड्' होऊ शकणारे भा. रा. तांबे हे कवी निघाले आणि त्यांनी आपली भारतीय संगीताची जाणकारी 'सदारंग निर्माण झाला की, त्याच्या भाषेचे संगीत आपोआप तयार होईल' ह्या क्षका वाक्यात हा मराठीकरणाचा केवळ संगीतविषयक अज्ञानाखेरीज इतर काहीही न दाखवणारा वाद निपटून काढला. तांब्यांचे हे पत्र (१९/२१६) संगीताच्या अभ्यासकाने मनन करण्यासारखे आहे. त्या उलट तात्यासाहेबांच्या श्री. वामनराव देशपांडे यांना लिहिलेल्या पत्रावरून (२१/२२०) ख्यालगायनाविषयीचे त्यांचे ज्ञान जवळजवळ नसल्यापैकीच. त्यांचा उत्साह मोठा, हे मात्र मानायला हवे. हिंदीचा उल्लेख ते सतत 'परभाषा' म्हणून करतात हेही पहाण्यासारखे आहे. ते स्वत: गाण्याच्या बैठकीला हजर राहात. परंतु सुरलयीचा खेळ पहाण्याऐवजी शब्द लावण्याकडेच त्यांची साहित्यिक प्रवृत्ती दिसते, महाराष्ट्रात सैय्या हा गुंय्याचा बाप की भाऊ हे ठाऊक नसूनही रागप्रधान ख्यालगायकीतला कैवल्यात्मक आनंद देणारी आणि घेणारी माणसे ह्या संगीतकलेवर जीव ओवाळीत बसत आलेली त्यांना कशी दिसत नव्हती ? कविता आणि बंदीष यातला फरकच त्यांना कळला नाही. कारण सुरलयीच्या राईराईत काय वैभव दडले आहे हे त्यांना कळले नव्हते. ह्या दुनियेत ते मायभाषेचा अभिमान वगैरे सर्वस्वी विसंवादीच नव्हे तर वर्ज्य गोष्टी आणीत होते. त्यांच्यासारख्यांच्या हजेरीने गायनाला प्रतिष्ठा आली हे विधान फार मर्यादित अर्थानेच स्वीकारायला हवे. तीच गत महात्मा गांधींच्या (६/१८६) आणि सुभाषचंद्र बोसांच्या पत्रांची (९/१९२). त्या पत्रांतून संगीतापेक्षा त्यांच्या स्वभावधर्मावर सुंदर प्रकाश पडतो. गांधींना संगीत हे क्रोध जिंकायचे साधन वाटते. त्यांना त्यातून मन:शांती मिळते.गांधींच्या जीवनसाधनेत षड्रिपूवर मात ही एक नित्य चाललेली साधना होती. संगीत हे चरखा, प्रार्थना, मौन, इत्यादी साधनांपैकी साधन होते. बोसांनी देवधरांना १९३३ साली लिहिलेल्या पत्रातून 'Try to compose marching tunes for our vollenteers' असे सुचवले आहे. त्यानंतर किती तरी वर्षांनी बोस हे आझाद हिंद ह्या लष्करी सेनेचे सेनापती झाले. पण त्यांच्य डोळ्यापुढे marching tunes च्या तालात रपरप करणारे सैनिक १९३३ सालीही होते हे त्या एका वाक्यातून व्यक्त होऊन गेले आहे.

गायनक्षेत्रातल्या लोकांच्या पत्रांत विविधता पुष्कळ आहे. मास्तर कृष्णराव वंदेमातरमची चाल राष्ट्रीय करण्याच्या धडपडीत कसे होते हे दाखवणारी पत्रे इथे आहेत. फैयाझखांसाहेबांसारख्यांचे झोकदार सर्टिफिकेटही त्यांनी घेतले होते. तेही

इथ आहे. महाराष्ट्रातल्या गुणी विद्वान लोकांच्या डोक्यावर कसले ना कसले तरी भूत सतत सवार होत आले आहे. गाण्याच्या दुनियेत विष्णु दिगंबर, विष्णु नारायण भातखंडे, आबासाहेब मुझुमदार ही अशीच झपाटलेली माणसे. विद्वत्तेतले डावेउजवेपण काहीही असो, त्यांचा ध्यास अगदी बावनकशी. मास्तरांच्या डोक्याने वंदेमातरमची झिंझोटी रागातली चाल घेऊन त्याना अस्वस्थ केले होते. (टीपा – लेखक डॉ. गोखले त्या रागाला झिंजूटी म्हणतात. मास्तर झिंझोटी म्हणायचे, कुणी झिंजोटीही म्हणतात. मला स्वतःला गीतातल्या अक्षरागणिक एक स्वर ह्या हिशेबात परवचा म्हणता येणाराला ते गीत म्हणता यावे अशा अंदाजाने केलेली ती एक सुरावट वाटते.) मास्तरांनी ही राष्ट्रगीताची चाल म्हणून मान्य व्हावी यासाठी आटोकाट प्रयत्न केले. ब्रिटिशांच्या जमान्यात एकदा मुंबई रेडियोवरून त्यांनी रात्रीची स्वतःची मैफिल मिनिटभर आधी संपवून हळूच 'वंदे...' सुरू केले पण अनाउन्सरने मातरम्‌देखील ध्वनिक्षेपित होऊ दिले नाही. मास्तरांचे हे साहस आणि त्यांची एकूण धडपड पाहून त्यांनाच 'वंदे मातरम्' म्हणावेसे वाटे. नेहरूंच्या नापसंतीने वंदेमातरम् नाकारले गेले, पण महाराष्ट्रात मात्र मास्तरांचीच ही अटकर बांधणीची चाल गायली जाते. विष्णु दिगंबरांच्या काफीतल्या चालीचा आटोप फार मोठा आहे. गर्दीला आवाज मिसळवायला अवघड आहे.

गोविंदरावांच्या इंग्रजी पत्राचा डौलही त्यांच्या त्या डौलदार दर्शनासारखाच आहे. गोविंदराव हे तत्कालीन इतर गवयांच्या प्रमाणे चटकन् सद्‌गदित वगैरे होणारे नव्हेत. पण पं. अल्लादियाखां हे त्यांचे मर्मस्थान. त्यांच्या सत्कारात त्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या पत्रातले 'माझ्या अंतःकरणाचे शेवटचे समाधान मला मिळावे असा ईश्वरी योग होता.' हे वाक्य ज्यांना गोविंदराव ही 'चीज' ठाऊक होती अशा लोकांना चटका लावून जाणारे आहे. विशेषतः ज्या अण्णासाहेब फडक्यांना त्यांनी हे पत्र (२९/२३४) लिहिले आहे ते देखील अंतःकरण मोकळे करण्याऐवजी झाकून ठेवून प्रेम करण्याची किमया साधलेले कलावंत होते. त्या जमान्यातले दुसरे एक अभ्यासू कलावंत म्हणजे कृष्णराव मुळे. स्वतः रसिक पण संगीतातल्या घटपटाची खटपट करण्यातही कोणाला हार न जाणारे. दुर्दैवाने त्यांचे नाव अत्यंत मर्यादित क्षेत्रातच राहिले. गिरणीत नोकरी करून दादरला ते 'वीणावादन संगीत विद्यालय' चालवीत. त्यांच्या पत्राच्या निमित्ताने ह्या संग्रहात डॉ. गोखल्यांनी त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण केले आहे. मुळ्यांना रसभावयुक्त गायनाचा आग्रह धरावासा वाटला याचे कारण भारतीय संगीताच्या विद्यालयीन शिक्षणात इतर शालेय शिक्षणासारखी अर्थेवीण पाठांतराची पद्धत सुरू झाली होती हे आहे.

ज्यांना सूर आणि लय झोंबलेच नाही असे प्रमाणपत्रधारक लोक गायनमास्तर होऊन हा व्यवसाय प्रतिष्ठितपणाने करीत होते. ह्या असल्या शिक्षणपद्धतीत गायनातला ओलावा जाईल, फुलत जाणाऱ्या सौंदर्याची जागा ठराविक आडाखे आणि

कृष्णराव मुळे म्हणतात त्याप्रमाणे 'स्वराच्या रेघोट्या' घेतील ही भीती होती. विषय कळलेला असला की सोप्या भाषेतूनही किती समर्पकपणाने लिहिता येते याचे उदाहरण श्री. कृष्णराव मुळ्यांच्या पत्रातून दिसून येते. 'परमचिंताजनक' आर्थिक परिस्थितीत जगताना संगीताच्या दृष्टीने 'नागवियांच्या गावकन्यांना' धोत्रे नेसवण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुळ्यांसारख्या माणसाची फार मोठी बूज व्हायला हवी होती. हा व्यासंगी माणूस उपेक्षितच राहिला.

'उपेक्षा' ही कलावंताच्या आयुष्यात अटळपणाने येणारी साडेसाती आहे. ज्योतिषीबुवा साडेसातीच्या आगमन-निर्गमनाची वर्षे तरी सांगू शकतात. ह्या उपेक्षेची साडेसाती वार्धक्यात निश्चितपणे येतेच, पण अधूनमधूनही केव्हा उपटेल सांगता येत नाही. त्या उपेक्षेच्या वनवासात गेलेल्या सुंदराबाईंचे पत्र (३३/२४९) तर दुःखाचा कढ आवरत आवरत गायलेल्या करुण ओवीसारखे आहे : बाईंनी अगदी ह्या हृदयीचे त्या हृदयी ओतले आहे. त्यांच्या 'परवा दादा गंधर्व रेडियुत भेटले. मला फारच आनंद झाला जसा माझा पाठसखा भाऊच भेटला' ही ओळ तर त्यातल्या त्या 'रेडियु' व 'पाठसखा' यामुळे एखाद्या व्याकुळ गाण्याच्या चरणासारखी घोळवत राहावी असे मला वाटले. सुंदराबाई आणि 'दादा' गंधर्व हा जिव्हाळा तर दुनियेआगळा होता. ह्या संग्रहात कलावंतांच्या व्यक्तिमत्त्वातले गाण्याइतके सुरेल असणारे स्वभावाचे पैलू दाखवणारी अशीच काही सुंदर पत्रे आहेत. शिल्पकार र. कृ. फडके आणि नाटककार वसंत शांताराम देसाई यांनी महाराष्ट्रातल्या नाट्य आणि संगीतक्षेत्रातल्या कलावंतांचा स्नेह आणि आदर संपादन केला होता. ह्या संग्रहातली कितीतरी पत्रे निरनिराळ्या कलावंतांकडून दोघांना आलेली आहेत. त्यांनी त्या स्नेहभावाइतकीच ती जपूनही ठेवली. 'कानफ्रंस'-मध्ये आपण बाजी कशी मारली यापेक्षा 'चांगले चांगले गुणी लोक ऐकायला मिळाले' ह्या आनंदात राहणाऱ्या हिराबाई इथे भेटतात. मोगूबाई कुर्डीकरांचे अण्णासाहेबांना गेलेले पत्र (५८/३०) तर त्यांच्या गायनाविषयी वाटणाऱ्या आदराबरोबर व्यक्तिमत्त्वाविषयीचा आदर शतगुणित करणारे आहे. अल्लादियाखांसाहेबांचा पुतळा उभा करण्याचे कार्य चालू होते त्यावेळी 'खांसाहेबांचे स्मारक गुरुभिमानी केशरबाई आहेत तोवर त्याच थोडेबहुत स्मारक दिसत आहे. त्यांनीच आपले स्मारक मागे ठेवले नाही असे खेदाने म्हणावे लागते.' असे मोगूबाईंनी लिहिले आहे. मोगूबाईंनी त्यांत ज्या आदराने आपल्या गुरुभगिनीचा उल्लेख केला आहे ती तर हृद्य आहेच पण त्याबरोबर गुरूने दिलेली विद्या पुढिलांना देण्याचे कर्तव्य हेही महत्त्वाचे आहे हे सूत्र त्यांनी किती सहजपणाने सुचवले आहे तेही ध्यानात घेण्यासारखे आहे.

ह्या संग्रहातली अशी ही साधी साधी पत्रें. काही त्या कलावंतांची तर काही त्यांच्या जाणकार स्नेह्यांची. संगीतविषयक निरनिराळी तत्त्वे नकळत प्रकट करून

जातात. कुमार गंधर्वांच्या स्नेह्यांची पत्रेंही त्यांच्या संगीत क्षेत्रात अस्वस्थता निर्माण करून गेलेल्या गायकीविषयी निराळाच प्रकाश पाडून जातात. 'तुझे गाणे मात्र सारखे डोक्यात भिनत आहे. तुझी चीजेला व गायकीला नटवण्याची पद्धत तर अजब आहे यात शंका नाही. तसेच गाण्यात अंत:करण कसे ओतावे हे महत्त्वाचे आहे' म्हणणारे कृष्णराव मुझुमदार (४०/२६३) स्वत: रजबलीखासाहेबांची तालीम मिळालेले गायक आहेत. स्थापत्यविशारद असलेल्या कृष्णरावांची गायनाची पायाभरणी बेतशुद्ध झालेली आहे. व्यवसाय निराळा असला तरी संगीताच्या उपासनेत खंड पडलेला नाही. कुमारजींच्या गायकीबद्दलचा त्यांचा भावच इतर जाणत्या स्नेह्यांच्या पत्रातून प्रकटला आहे. श्री. वामनराव देशपांडे 'त्या गाण्याचे वर्णन काय करायचे? शब्द अपुरे पडतात.' असे म्हणतात. (४३/२६७) 'कुमारांचे संगीतातील स्थान इतके चतुरस्त्री, अलौकिक आणि सर्वसाधारण अपेक्षांना धक्का देणारे आहे की त्यांचे यथार्थ वर्णन करणे अशक्य होऊन बसते व अपरिचितांना मात्र वाटावे कीं, ही भावनावश स्तुती असावी म्हणून' हे कोल्हापूरच्या बाबूराव जोशांसारख्या चिकित्सकाचे उद्‌गार. ही सारी पत्रे वीस वर्षांपूर्वीची आहेत. लौकिकाचे निकष थिटे वाटावे असे काहीतरी कुमारजींच्या गाण्यात आहे असे गोविंदराव टेंब्यांपासून अनेकांना वाटत आले आहे. वयाच्या पंचविसाव्या वर्षी क्षयासारख्या महाभयंकर व्याधीशी मुकाबला करीत असताना कुमार आपला बालमित्र चंदशेखर रेळें ह्याला एका पत्रात लिहितात (४२/२६७), 'कुमारको संगीत छोड नही सकता। यह ध्यानमे रखखो। जैसा स्वर और लय अलग नही हो सकते। जब कुमार मिलेगा तब वोही कुमार मिलेगा जो था।'

त्या दुर्धर रोगाने ज्याच्या गळ्यातले गाणेच थांबवले होतें, अशा कलावंताचे हे उद्‌गार माझ्या मताने तरी 'आम्ही वैकुंठवासी, आलो याची कारणासी. बोलिले जे ऋषी, साच भावें वर्ताया।' म्हणणाऱ्या तुकोबाचेच स्मरण करून देतात. लहानपणापासून अत्यंत कुशाग्र बुद्धीने आणि देवधरांसारख्या मार्गदर्शकाच्या कृपेने ज्याने नाना तऱ्हेचे गाणे चांगले जोखून टिपले त्याच्या रागविस्तारांच्या कल्पनांकडे केवळ 'बाज' ह्या बहुतांशी ठोकळेबाज दृष्टीने पाहणे सयुक्तिक होणार नाही. कुमारचे गाणे ऐकून मोकळ्या मनाने आणि पूर्वग्रहाने कानांना कृत्रिम बधिरत्व येऊ न दिलेली माणसे भारावली. त्यातून स्तुतीची चार अक्षरे अधिक गेली असतील. पण डॉ. शरद गोखले कुमारवरची टीप लिहिताना जेव्हा कुमारजींच्या पन्नासाव्या वर्षीही 'नवा बाज व्हावयाचा आहे; अजून फार दूर आहे, सध्या आहेत ते तुकडे आहेत, त्यांची जडणघडण सारासारविवेक हे व्हावयाला अजून अवकाश आहे.' हे एखाद्या होतकरू गवयाला लावण्यायोग्य सर्टिफिकीट जोडतात तेव्हा नवल वाटते. स्तुतीचा अतिरेक होऊ नये हे खरे. पण मूल्यमापन हे सतत अवमूल्यनाकडे झुकणारे असले तरच ते प्रामाणिक, असेही मानण्याचे कारण नाही. शेवटी 'गायकीचे तंत्र'

प्रतिभावान कलावंतच निर्माण करतात.

ह्या संग्रहात संगीतविषयक तात्त्विक चर्चा करणारी पत्रे आहेत. त्यातल्या गुलाबराव महाराजांच्या दुर्मिळ पत्रांतून ह्या वयाच्या नवव्या महिन्यात अंध झालेल्या –म्हणजे जवळजवळ जन्मांध–विद्वानाची ज्ञानपिपासा आणि व्यासंग पाहून मन थक्क होते. संगीताच्या कितीतरी ज्ञानपिपासू, व्यासंगी पंडितांची आणि कलावंतांची ह्या पत्रमैफिलीत हजेरी लागायला हवी होती. पण पत्रे सांभाळून ठेवायची आस्था इथे आहेच कोणाला ? जिथे साक्षात शिवाजीमहारांच्या हातची दोन अक्षरे हाती लागत नाहीत तिथे आमचे गायकगायिका म्हणजे किस पेडकी पत्ती ! जुन्या जमान्यांतल्या भास्करबुवा, वझेबुवा, राजाभय्या पूछवाले, मंजीखां, एकनाथ पंडित, यांच्यासारख्या दिग्गजांच्या हातच्या चार ओळी पहायला मिळायला हव्या होत्या अशी मनाला ओढ वाटते. तीच गत नाटचक्षेत्रातल्या व्यक्तींची. तरीही हरिभाऊ मोटचांच्या ह्या छंदातून काही मोलाची पत्रे आता लोकांपुढे आली. त्यातून अनेक स्मृती जागृत होतात. ही माणसे क्षणभर आपल्याशी बोलताहेत असा भास निर्माण होतो. त्याचे समाधान फार मोठे आहे.

ह्या संग्रहातल्या नाटचविभागातल्या पत्रांच्या संदर्भात टीपा लिहिणारे श्री. वसंत शांताराम देसाई हे नाटककार आणि नाटचविमर्शक म्हणून मराठी वाचकांना परिचित आहेतच. ह्या संग्रहातली कितीतरी पत्रे त्यांना आलेली आहेत. मराठी नाटच सृष्टीतल्या लोकांचे वसंतराव देसाई हे मित्र, मार्गदर्शक आणि हितेच्छु. गेल्या पन्नास साठ वर्षांतल्या मराठी रंगभूमीवरच्या अनेक घटनांशी, कलावंतांशी ते स्वत: निरनिराळ्या कारणांनी संबंधित आहेत. अतिशय साक्षेपाने लिहिलेल्या त्यांच्या टीपा हे ह्या ग्रंथाचे वैशिष्टच ठरावे. संगीतविषयक टीपा लिहिणारे डॉ. शरद गोखले हा ह्या निमित्ताने मराठी संगीतप्रेमी लोकांना झालेला विद्याधनलाभ आहे. त्यांच्या विस्तृत टीपांतून गेल्या शंभर वर्षांतला संगीताचा इतिहासच वाचायला मिळतो. दुर्मिळ असे काही तरी हुडकून काढण्याच्या हरिभाऊंच्या छंदामुळे डॉ. गोखले ही एक आजवर अप्रकाशित राहिलेली व्यक्ती वाचकांना लाभली आहे. त्यांच्या मतांच्या बाबतीत सर्वांचीच एकवाक्यता व्हावी अशी त्यांचीही अपेक्षा नाही. विचाराच्या क्षेत्रात असल्या एकवाक्यतेला थारा नसतो; परंतु ह्या टीपांच्या निमित्ताने त्यांच्या विद्वत्तेचा आणि चौफेर व्यासंगाचा जो प्रत्यय येतो तो मात्र त्यांच्याविषयीचा आदर वाढवणारा आहे. ते स्वत: उत्तम सारंगीवादक आहेत. तालशास्त्रज्ञ आहेत आणि विज्ञानपंडित आहेत. ह्या संग्रहाच्या निमित्ताने ह्या चतुरस्र–पंडिताचा परिचय, त्याने ह्या विषयावर आणखी लिहायला हवे अशी त्यांना विनंती करावी, असेच सुचवणारा आहे.

श्री. वामनराव देशपांडे हे संगीतक्षेत्रांतले आणखी एक अधिकारी. त्यांचा हातभार ह्या पत्रांच्या निवडीला लागलेला आहे. असल्या ह्या अधिकारी मंडळींनी

उत्तम रीतीने रचलेल्या ह्या ग्रंथात प्रस्तावना–लेखक म्हणून माझी हजेरी मी हरिभाऊंच्या स्नेहाने, पण अत्यंत संकोचाने लावली आहे. नाट्य, संगीत, साहित्य वगैरे क्षेत्रांत मी जत्रेत फिरणाऱ्या पोराच्या भावनेने फिरतो. वयपरत्वे प्रस्तावना-लेखन, अध्यक्षपदे वगैरे सन्मान लाभत असले तरी माझी ती मूळ भूमिका सुटलेली नाही. जत्रेत एखादे पोर जिथे मन रमेल तिथे रेंगाळते. कधी साखरेच्या चित्रांपुढे तर कधी आकाशातून पाताळात नेणाऱ्या त्या पाळण्यांच्या प्रचंड चक्रापुढे. ह्या संग्रहात ज्यांची पत्रे आहेत अशा अनेक कलावंतांच्या गुणांचा आस्वाद घेण्याची मला संधी लाभली आहे. कायम स्मरणात राहावे असे अनेक क्षण त्यांनी मला दिले आहेत. त्यांच्या हातचे प्रत्यक्ष पत्र कधी माझ्या हाती आलेच तर मी आधी माझ्या कपाळाला आदराने लावून मगच मी उघडीन.

त्यांची ही पत्रे वाचताना मला काय वाटले याचे उत्तर अण्णासाहेब किर्लो-स्करांनी शंकरराव मुझुमदारांना लिहिलेल्या एका पत्रातच (१८/३८) मला साप-डले. शाकुंतलाचे चार अंक आणि सौभद्राचे तीन अंक असे दोन प्रयोग झाल्यावर, शंकरराव मुझुमदारांना अण्णासाहेबांनी लिहिले आहे... ‘ मजा फार उत्तम झाली. संगीत, नाट्य, नृत्य या साऱ्या कलाप्रपंचाचे प्रयोजन अण्णांनी किती थोडक्यात सांगितले : ‘ मजा फार उत्तम झाली.’ अशी ‘ उत्तम मजा ’ (कसली तरी फालतू मजा नव्हे–) करणारी ही माणसे. ती साधण्यासाठी जीवाचे रान करणारी. जे सांगायचे ते गायन–अभिनयातून सांगणारी. लिहून वगैरे नव्हे. मैफिल डोक्यात घेऊन घरी जाताना ‘ मझा आला ’ असेच पालुपदासारखे वारंवार म्हणत जाणारी ही माणसे. ही काळावर मात करून आजही मजा देऊ शकणारी नाटके, कोणे एके काळी ध्वनिमुद्रित केलेल्या पण आजही सुरांचा ताजेपणा दाखवणाऱ्या तबकड्या–असले धन मागे ठेवून गेली. त्यांच्या हातच्या पत्रांचा हा संग्रह वाचल्यावरदेखील ‘ मजा फार उत्तम झाली ’ –असेच म्हणायला लावतात. दूर देशीच्या जीवलगाचे पत्र आले की किती उदंड वाटते. त्यातली कितीतरी माणसे काळाने फार दूर नेली. ह्या पत्रांच्या निमित्ताने त्यांच्या कीर्तिरूप अस्तित्वाची जाणीव झाली. हरिभाऊंनी आमच्यासारख्या ह्या ‘ उत्तम मजा ’ करणाऱ्यांच्या जगात राहण्याची धडपड कर-णाऱ्या लोकांची हौस फेडली. मात्र त्यांच्या ह्या ऋणाची फेड अवघड, नव्हे, अशक्यच आहे.

**पु. ल. देशपांडे**

# चतुर्भाणी बावन्नखणी

लेखक

**आनंद साधले**

प्रस्तावना

**नरहर कुरुंदकर**

प्रथमावृत्ती
मार्च १९८२

प्रकाशक
रविराज प्रकाशन,
४५८/२ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

मूळ प्रस्तावना पृष्ठे
क्राऊन ३२

' चतुर्भाणी ' हा मूळ संस्कृत ग्रंथ आहे. त्याचे दुसरे उपनाम 'शृंगार हाट ' असे आहे. शृंगारहाट म्हणजे शृंगाराचा बाजार. मराठीत भाषानुवाद करताना, आनंद साधले यांनी बावन्नखणी हे उपपद जोडले आहे. ' भाण ' म्हणजे एकपात्री, एकप्रवेशी नाटक. गणिकांचे जीवन हा भाणाचा विषय असतो. त्याचबरोबर या भाणांतून समाजाने उरी–शिरी धरलेल्या गोष्टीसभोवती निर्माण झालेल्या सामाजिक दंभावर टीकाही असते. ज्या चार भाणांचा अनुवाद श्री. साधले यांनी केला आहे त्यांची रचना सम्राट गुप्ताच्या काळात म्हणजे इ. स. च्या चौथ्या–पाचव्या शतकात झालेली आहे. मूळ लेखकांची नावे, वररुचि, दत्त, श्यामिलक आणि शूद्रक अशी आहेत. प्रा. नरहर कुरुंदकर यांनीच या दुर्मिळ ग्रंथाचा अनुवाद करण्याचा आग्रह धरला व त्याला विवेचक प्रस्तावनाही लिहिली. गणिका, त्यांचे विट आणि त्यांची सामाजिक स्थिती यांत गेल्या सुमारे दोन हजार वर्षांत काहीही फरक पडलेला नाही हे या प्रस्तावनेवरून सहज ध्यानी येईल.

भरत नाट्यशास्त्राचा माझा अभ्यास अधूनमधून चालू असतो. हा अभ्यास करताना एक दिवस अनपेक्षितपणे एक गोष्ट माझ्या ध्यानी आली. यापूर्वी इतर कोणाच्या ध्यानी ती आली नसेल असे नाही. पण जर ती आली असेल तर त्यावर कुणी लिहिले नाही. नाट्यछटाकार दिवाकर हे माझे आवडते लेखक आहेत. दिवाकरांची नाट्यछटा ही मराठी सारस्वताचे एक भूषण आहे. ही दिवाकरांनी हाताळलेली नाट्यछटा एक नाट्यप्रकार म्हणून संस्कृतमधील 'भाण' या नाट्य-प्रकाराशी मिळती-जुळती आहे. दिवाकरांना या घटनेची जाण दिसत नाही. आपण हाताळीत असलेल्या नाट्यप्रकाराचा भारतीय परंपरेत एक इतिहास आहे याची जाणीव दिवाकरांना असणे अपेक्षितच नाही. पण जर अशी जाणीव त्यांना झाली असती तर केवळ साहित्य म्हणून, एक वाङ्मयप्रकार म्हणून दिवाकरांनी जी नाट्यछटा हाताळली ती, प्रयोगक्षम नाट्यप्रकार म्हणून त्यांनी हाताळली असती. मला असे वाटते की, जर ही घटना घडली असती तर आज आहे त्यापेक्षा दिवा-करांची नाट्यछटा अधिक वैचित्र्यपूर्ण व समृद्ध झाली असती. हा माझ्या ध्यानी आलेला मुद्दा इ. स. १९७१ साली एका लेखात मी मांडलेला आहे, त्याच वेळी मी 'उभयाभिसारिका' या भाणाचा अनुवादही प्रकाशित केलेला आहे.

ललित वाङ्मय लिहिण्याची सवय नसणाऱ्या माझ्यासारख्या रुक्ष लेखकाने केलेला अनुवाद आणि ती सवय असणाऱ्या साधले यांच्यासारख्या अनुवादात खुल-णाऱ्या लेखकाने, केलेला अनुवाद दोन्हीही आता वाचकांसमोर आहेत. माझा दहा वर्षे शिळा असणारा अनुवाद 'पायवाट' या संग्रहात आहे. साधले यांचा अनुवाद या संग्रहात आहे. संस्कृत काव्य-नाटकांचा मराठी सैल भावानुवाद करण्याच्या उद्योगात माझे मित्र आनंद साधले गेली कित्येक वर्षे आहेत. साधले यांनी त्यांचा स्वतःचा वाचकवर्ग निर्माण केलेला आहे. गेली दहा वर्षे मी मधूनमधून भाणांच्या मराठी अनुवादाची साधल्यांना आठवण देत होतो. शेवटी हा सैल भावानुवाद प्रकाशित होत आहे. साधले यांची शृंगारानुकूल वृत्ती व रसाळ भाषाशैली दोन्हीं-चेही नमुने वाचकांना या अनुवादात सापडतील.

दिवाकरांची नाट्यछटा हा एकपात्री प्रयोग आहे. समोर नाट्यांतर्गत एकच व्यक्ती असते. प्राचीन संस्कृत परंपरेप्रमाणे ही एक प्रकृतिरचना आहे. इतर पात्रे गृहीत धरावयाची. आता एकपात्री नाट्यप्रयोग आपल्या अंगवळणी पडला आहे. पंचवीस वर्षांपूर्वी ही अवस्था नव्हती. एकपात्री प्रयोगांना असणारे नाट्यमूल्य, त्यांची रंजकता, त्यांचे प्रयोगमूल्य आपण विसरूनच गेलो होतो. इ. स.च्या सतराव्या शतकानंतर जवळ असणाऱ्या अनेक बाबींच्या आठवणी आपण विसरलो. अनेक भरजरी पैठण्या आणि मखमलीची ठाणे आपण विसरलो. त्यापैकी एक भाण होय.

विसाव्या शतकातील मराठी वाचकांना तर भाणांच्या बाबतीत पुष्कळच बाबी

नव्याने सांगणे भाग आहे. त्याविना भाणाचे अनुवाद समोर असले तरी सगळेच त्यामुळे चटकन कळेल असे नाही. म्हणून अगदी प्राथमिक अशा काही बाबी इथे नोंदविण्याचा माझा विचार आहे. अर्थातच या नोंदी विद्वान अभ्यासकांच्यासाठी नाहीत.

भारतीय साहित्यशास्त्राच्या सर्व अभ्यासकांना प्राचीन काळापासून नाटकाचे दहा प्रकार मानण्यात येत हे माहीतच होते. दशरूपक प्रकार, त्यांची नावे आणि वैशिष्टचे यांचा परिचय सर्वांना होता. पण इंग्रजी अमदानीत संस्कृत ललित साहित्याचा जो अभ्यास सुरू झाला त्यात काव्य आणि नाटके यांनीच सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मृच्छकटिकाकडेसुद्धा सर्वांनी प्रायः नाटक म्हणूनच पाहिले. या वाङमयाच्या दर्शनामुळे इतर वाङमयाकडे थोडेसे दुर्लक्षच झाले. प्रथमतः जे भाण क्रमाक्रमाने उपलब्ध झाले त्यांची संख्या ११ च्या आसपास आहे. हे उत्तरकाळातील भाण मानले जातात. यांपैकी एक तेराव्या शतकातील, एक चौदाव्या शतकातील आणि इतर त्याही नंतरचे म्हणजे सतराव्या शतकापर्यन्तचे आहेत. या उत्तरकालीन भाणांचेही प्रयोग झाले, पण यांना फारशी लोकप्रियता अगर मान्यता मिळालेली दिसत नाही.

इ. स. १००० नंतर संस्कृत वाङ्मयाचा प्रचंड वेगाने ऱ्हास झाला. देशी भाषांच्यामधील वाङ्मय वैभवाने बहरू लागले. भक्तिमार्गही नवीन फुलोरा आल्याप्रमाणे डौलात दिसत होता. या कालखंडात शजारी संस्कृतमध्ये जे भाण लिहिले गेले त्यांचे स्वरूप सांकेतिक आणि थोडे उत्तान असेच होते. वाङ्मय म्हणून हे भाण बरेच सामान्य दर्जाचे आहेत. सामान्य प्रतीच्या या वाङमयाचे फारसे कौतुक कुणाला न वाटले तर ते स्वाभाविकच म्हटले पाहिजे. या उत्तरकालीन भाणांमध्ये विट स्वतःची कहाणी सांगत असतो. ही कहाणीसुद्धा सांकेतिकच असते.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात एम्. रामकृष्ण कवी या नावाचे एक विलक्षण संस्कृत वाङ्मयाचे संशोधक होऊन गेले. लुप्त असणारे अनेक महत्त्वाचे संस्कृत ग्रंथ या कवींच्या हाती लागत गेले. विवेचक विद्वान म्हणून कवींची फारशी ख्याती नाही. पण सर्व भारतीय संस्कृतीच्या अभ्यासकांनी कायम त्यांच्या ऋणात राहावे असे कार्य त्यांनी केले. भरत नाटचशास्त्राची प्रसिद्ध अभिनवभारती टीका रामकृष्ण कवींनीच उजेडात आणली. त्यांनीच प्राचीन चार भाण उजेडात आणले व चतुर्भाणी या नावाने प्रकाशित केले. वेगवेगळ्या लेखकांनी लिहिलेले हे चार भाण. प्रत्येकाची नावे निराळी. चतुर्भाणी हे त्यांना एकत्र करणाऱ्या संकलनकाराने दिलेले नाव. कवीने हे मूल्यवान धन इ. स. १९२२ साली उजेडात आणले आणि सर्वांच्यावर एक उपकाराचे ओझे लादले. भाणाचे सर्व अभ्यासक रामकृष्ण कवींचे कर्जदार आहेत.

या चारही भाणांचा अतिशय रेखीव आणि मर्मग्राही असा अभ्यास कै. डॉ. वासुदेवशरण अग्रवाल व डॉ. मोतीचंद्र यांनी ‘ शृंगारहाट ’ ह्या हिंदी ग्रंथाच्या रूपाने

समोर ठेवलेला आहे. हा ग्रंथ इ. स. १९६० सालचा आहे. वासुदेवशरण अग्रवाल यांची विवेचक प्रस्तावना आणि डॉ. मोतीचंद्रांचा खास बनारसी ढंगाच्या हिंदीतील अनुवाद व टीपा हे या ग्रंथाचे वैशिष्टच आहे. सामान्य वाचकांनी आनंद साधले यांच्या भावानुवादावर तृप्त व्हावे. पण खोलात शिरण्याची जिज्ञासा असणाऱ्यांनी 'शृंगारहाटा' कडे वळावे. ह्या ग्रंथात रमणाऱ्यांना हा अनुवाद थोडा मचूळ वाटणारच. डॉ. मोतीचंद्र यांची बरोबरी साधले यांना करता येणार नाही असे म्हटल्यामुळे साधले हेही रागवणार नाहीत. प्राचीन भारतीय संस्कृतीच्या अभ्यासकात डॉ. प. कृ. गोड, डॉ. मोतीचंद्र आणि डॉ. अग्रवाल हे आपापल्या गटातील दिग्गज आहेत. वाङ्मयाचा सांस्कृतिक अभ्यास कसा करावा याचे जे आदर्श वासुदेवशरण अग्रवाल यांनी आपल्यासमोर ठेवलेले आहेत ते खरोखरच थक्क करणारे आहेत. मराठीत या तोलामोलाची वाङ्मयाचा सांस्कृतिक अभ्यास करणारी ग्रंथसंपदा नाही. मराठीचा वृथा अभिमान बाजूला ठेवून हे आपण मान्य केले पाहिजे. ज्ञानाच्या क्षेत्रात खोटे अभिमान उपयोगी ठरणारे नाहीत.

कवींनी उजेडात आणलेले हे चारही भाण इ. स. च्या पाचव्या शतकाच्या अखेरीस लिहिले गेलेले आहेत. डॉ. थॉमस यांनी या भाणांचा काळ. इ. स. चे सातवे शतक म्हटले, तरी तो काळ संस्कृत काव्यनाटकांच्या वैभवाचाच काळ आहे. कनोजच्या वैभवाचा, बाणभट्ट आणि हर्षाचा असा हा काळ भवभूतीच्या पूर्वीचा आहे. पण भाणांच्यामधील वैभवशाली नगरे पाटलीपुत्र व उज्जैन आहेत. मला डॉ. थॉमस यांच्यापेक्षा कै. अग्रवाल यांची भूमिकाच पुराव्याशी अधिक सुसंगत वाटते. मलाही असे वाटते की, हे भाण गुप्तकाळातील आहेत. विक्रमादित्याच्यानंतर पण नजिकच्या काळात गुप्त साम्राज्य वैभवात असताना, संस्कृत वाङ्मयाच्या वैभवकाळात लिहिले गेलेले असे हे भाण आहेत. वैभवशाली संस्कृत काव्य नाटकांच्यामध्ये जो भाषेचा जिवंतपणा दिसतो, त्या गटात आपल्या स्वतंत्र तेजाने दीप्तिमान झालेली अशी भाणांची संस्कृती आहे हे चार भाण प्राचीन भाण म्हणून ओळखले जातात. ह्या प्राचीन भाणांमध्ये विट प्रायः इतरांची कहाणी सांगताना दिसतात.

भाण हा अतिशय प्राचीन व मान्यताप्राप्त असा नाटयप्रकार आहे. भरताचे नाटयशास्त्र केव्हा निर्माण झाले याबाबत विद्वानांच्यामध्ये मतभेद आहेत. बहुसंख्य विद्वान पॉन रेनॉऊला अनुसरून इ, स. पू. २०० ते इ. स. २०० हा नाटयशास्त्राचा काळ मानतात. मी इ. स. चे तिसरे शतक हा काळ नाटयशास्त्राच्या बाबत अधिक प्रशस्त मानतो. पण इ. स. चे तिसरे शतक म्हटले तरीसुद्धा उपलब्ध प्राचीन भाणांच्यापेक्षा आपण दोनशे वर्षे मागे व गुप्त साम्राज्याच्या उदयापूर्वीच्या काळात वावरतो आहो आणि नाटयशास्त्रात जेवढे नाटयप्रकार उल्लेखिलेले आहेत तेवढेच त्याकाळी उपलब्ध नव्हते. नाटयशास्त्राने नोंद न घेतलेले पण त्याकाळी उपलब्ध असणारे नाटयप्रकार इतर पुराव्यांच्या आधारे नोंदविता येतात. 'सट्टक' हा असा

प्राचीन नाटयप्रकार आहे. काही नाटयप्रकार उपरूपक प्रकार म्हणून पुढच्या मंडळींनी नोंदविले, पण ते प्रकार आहेत मात्र प्राचीन. भरताचे नाटयशास्त्र नाटकांचे दहा प्रकार नोंदविते. याचा अर्थ हे दहा प्रकारच त्याकाळी उपलब्ध होते असा करावयाचा नाही. दहा नाटक प्रकार इ. स. च्या दुसऱ्या तिसऱ्या शतकात प्रतिष्ठित व शास्त्रमान्य होते, असा याचा अर्थ आहे. भाण जर नाटयशास्त्रात प्रतिष्ठित असतील तर इ. स. च्या आरंभापासून भाण हा नाटयप्रकार अस्तित्वात आहे असे म्हणण्यास हरकत नसावी.

सुमारे दोन हजार वर्षांची भाणांची ही परंपरा आहे. नाटयशास्त्राच्या विसाव्या अध्यायात दहा रूपकप्रकारांचे वर्णन आलेले आहे. या अध्यायात तीन श्लोकात भाणांचे वर्णन येते. नाटयशास्त्राने असे म्हटले आहे की, भाण दोन प्रकारचे असतात. स्वतःचे वर्णन करणारे, स्वतःची कहाणी सांगणारे भाण हा एक प्रकार. या प्रकारातील नाटयशास्त्रापूर्वीचे अगर नंतरच्या वैभवकाळातले सर्व भाण आज लुप्त आहेत. या गटातील उपलब्ध भाण सर्व उत्तर कालातले आणि सामान्य दर्जाचे आहेत, ही एक फार मोठी हानी मानली पाहिजे. भाणाचा दुसरा प्रकार हा की ज्यात इतरांची कहाणी सांगितली जाते. या दुसऱ्या प्रकारात मोडणारे भाण इ. स. च्या पहिल्या आठशे वर्षांत लिहिले गेले असतील. त्यांपैकी निदान शंभर भाण तरी अव्वल दर्जाचे असतील. शतकाला बारा–तेरा कलाकृती श्रेष्ठ दर्जाच्या असाव्यात हे काही अतिशयोक्तीचे गणित नव्हे. पण आज या प्राचीन भाणांच्यापैकी फक्त चार उपलब्ध आहेत. ज्या भाणांनी या वाङमयप्रकाराला प्रथम प्रतिष्ठा मिळवून दिली व ज्या कलाकृतींच्यामुळे हा नाटयप्रकार शास्त्राने मान्यता द्यावी इतका वजनदार ठरला त्या लुप्त आहेत. उपलब्ध भाण नाटयशास्त्रानंतरचे आहेत. घोर हानीतून एवढे तरी हाती उरले हे आपले भाग्य म्हणावयाचे. एखादा धर्मपिसाट नालंदा विद्यापीठ जाळतो व लाखो ग्रंथ नष्ट होतात, हे खरे आहे. पण शेकडो वर्षांची सर्वांचीच अनास्था ज्या लाखो ग्रंथांची माती करते त्या हानीचा दोष आपणच आपल्या माथ्यावर घेतला पाहिजे.

नाटयशास्त्राने भाणांचे वर्णन करताना त्यात एक प्रकृती असते ती धूर्त अगर विट असते असा उल्लेख केलेला आहे. प्राचीन व अर्वाचीन भाणांच्यामध्ये रंगभूमीवर असणारी व्यक्ती विट हीच आहे. सामान्य व्यवहारात धूर्त याचा अर्थ वेगळा होतो. पण या संदर्भात धूर्त हा विटाचा पर्यायच मानला पाहिजे. याच संग्रहातील 'चांदणी चौकातील ती चांगली' या नावाने ज्या भाणाचा अनुवाद आहे तो या दृष्टीने पाहण्याजोगा आहे. मुळात या भाणाचे नाव 'धूर्त विट संवाद' आहे. या भाणातील विश्वलक हा धूर्त म्हणायचा. पण या धूर्ताचे वर्णन जर नीट वाचले तर तेही एका विटाचेच वर्णन आहे हे चटकन पटेल. म्हणून भाणांच्या संदर्भात विट व धूर्त हे दोन्ही परस्पर पर्याय मानले पाहिजेत. सर्व भाण एकांकी आहेत. रंगभूमी-

वर एकच व्यक्ती असणार. या व्यक्तीने बहुचेष्टा व अनेक अभिनय केले तरी त्याला मर्यादा आहे.

भाणांचे बहुतेक प्रयोग तासाभरात आटोपणारे आहेत. आधुनिक काळात आपण असे मानतो की प्रत्येक प्रवेश हा एका स्थळाला बांधलेला आहे. एका प्रवेशाचे एक स्थळ आणि एक प्रवेशी अंक असेल तर मग प्रवेश एक म्हणून सर्व अंकाचे स्थळ एक. माणसे जातात–येतात, स्थळ बदलत नाही. प्राचीन भारतीय रंगभूमी अशी नाही. प्राचीन भारतीय रंगभूमीचा एक संकेत असा की, नटाने परिक्रमा करावयाची म्हणजे फिरावयाचे. परिक्रमेने स्थळ बदलते. 'हे माझे घर, चला आता बाजारात जाऊ' असे म्हणून रंगभूमीवर फिरायचे 'हा पहा आला बाजार' असे म्हटले की बाजार आला. त्यामुळे भाण ही एक प्रकृती आहे. एकांकिका आहे. पण स्थळ क्रमाने बदलत जाते. एका स्थळी नाटकीय व्यक्ती उभ्या करायच्या आणि नाना निमित्ते निर्माण करून इतर व्यक्तींना या स्थळी आणायचे यापेक्षा रंगभूमीवरील स्थळच क्रमाने बदलावयाचे ही पद्धत अशा प्रयोगांना अधिक सोयीची आहे. भारतीय लोकरंगभूमीवर परिक्रमेने स्थळ बदलते हा नाट्यधर्मी संकेत सर्वमान्य आहे. साधले लघुकथा सांगितल्याप्रमाणे भाणांचा हा भावानुवाद सादर करीत आहेत. मुळात ते नाटक आहे. हे नाटक एकांगी असून इतक्या स्थळी कसे फिरते असे विचारायचे नाही. तो भारतीय परंपरेचा संकेत आहे.

भाणांच्यामध्ये सर्वत्र आकाशपुरुष व त्यांच्याशी संभाषण आहे. हे आकाशपुरुष म्हणजे आकाशातील कुणी देवदेवता नाहीत. समोर न दिसणारा माणूस आहे असे गृहीत धरून बोलायचे. तो माणूस काय बोलतो ते आपणच बोलायचे. ही समोर नसणारी व्यक्ती गृहीत धरून बोलणे म्हणजेच आकाशपुरुषाचे अस्तित्व मानायचे. नाट्यशास्त्राच्या मते भाणाची वृत्ती भारती आहे. म्हणजे हा नाट्यप्रयोग संपूर्णतः शब्दांच्या आधारे चालणारा आहे. विट हे एक पात्र समोर आहे. यामुळे वेगवेगळ्या पात्रांचा अभिनय भाणात दिसणार नाही. गीत–नृत्याची रेलचेल नाही. शब्दांची फेक हाच भाणांचा प्रमुख आधार. या शब्दप्राधान्याला भारतीवृत्ती असे म्हणायचे भाणांच्यामध्ये नाट्य कथानक रचनेतील मुख व निर्वहण असे दोनच संधी असतात. फार मोठे कथानक नाही म्हणून संधीची संख्याही मर्यादित आणि किमान इतकीच आहे.

भाणाचा प्रमुख रस कोणता ह्याचा निर्देश नाट्यशास्त्रात नाही. दशरूपकार धनंजय हा दहाव्या शतकातील लेखक. त्याने भाणांच्यामध्ये शृंगार व वीर असे दोन रस असतात हे मत दिले आहे. अभिनवगुप्तांनी भाणाच्यामध्ये करुण व अद्भुत रस असतो असा उल्लेख केला आहे. आपण जर या उल्लेखांच्यामुळे भाणाचे रूप दर शतकात बदलत होते असे मानले तर ती चूक ठरेल. नाट्यशास्त्राच्या समोर भाणाचे जे रूप होते तेच प्रायः राहिले आहे. मतभेद असेल तर या रूपाचे वर्णन

करावयाचे कसे या मुद्द्यावर आहे. विट मधूनमधून स्वत: केलेल्या मारामाऱ्यांचे वर्णन करणार, इतरांच्या मारामाऱ्यांचे वर्णन करणार, म्हणून भाणात वीररस मानायचा. मधूनमधून फसवणाऱ्या गणिका व फसवणारी गिऱ्हाईके यांच्याही कथा येणार म्हणून तिथे करुणरसही मानायचा. परस्परांशी भांडलेली मंडळी अनपेक्षितपणे एकत्र येणार म्हणून अद्‌भुतही तिथे आहे. तसे पाहिले तर भाणाच्या मध्ये बीभत्सरसही कधीकधी येतो असे इतर कुणी न म्हटले तर आपण म्हणू शकतो. याच संग्रहातील चौथ्या भाणाच्या पृ. २२ वर बीभत्साचा उल्लेख आहे. भाणातील रसांच्या या याद्या खरे म्हणजे निरर्थक आहेत. भाणाच्यामधील मुख्य रस एकच आणि तो म्हणजे शृंगार. हा शृंगार खुलविण्यासाठी छटा व पूरक म्हणून इतर कोणत्याही रसाची सावली भाणात वर्ज्य नाही. वीर, करूण, आदि सारे रस भाणांच्यामध्ये केवळ मुख्य शृंगाराची चव अधिक रोचक करण्यापुरते असतात. विट हे एकमेव पात्र भाणात आहे असे म्हटल्यावर शृंगार हा प्रधान सर्वव्यापी रस असणार हे उघडच आहे.

हे भाण व्यवस्थितपणे समजून घ्यावयाचे असतील तर प्राचीन भारतीय समाज़रचनेतील 'वेश' ही कल्पना नीटपणे समजून घेतली पाहिजे, ही पहिली बाब आहे. ह्या कल्पनेच्या पोटातच विट ही कल्पना समाविष्ट होते. आणि दुसरी बाब म्हणजे 'शृंगार' 'वास्तववाद' या बाबी समजून घेतल्या पाहिजेत. वासुदेवशरण अग्रवाल, डॉ. मोतीचंद्र सालेटोर, चकलादार इत्यादी प्राचीन भारतीय समाजाचे वर्णन करणारे जे अभ्यासक आहेत त्यांच्याशी या ठिकाणी माझा फार मोठा मतभेद आहे. वाङ्मयाचा अभ्यास करणारे अनेक रसिक विवेचक आहेत की त्यांना मृच्छकटिकातील वास्तववाद अतिशय मोहक वाटतो.संस्कृत नाटकाच्या मध्ये आपण ज्याला वास्तववाद म्हणतो तो नसतो. आपण बाल्झाक वाचताना वास्तववादाबाबत जी समजूत मनाशी दृढ धरून असतो ती निराळी समोर असणारा समाज शक्य तो जसाच्या तसा वाङ्मयातून साकार करणे ही प्रवृत्ती प्राचीन जगातच दुर्मिळ आहे. वेगवेगळ्या प्रकारचा स्वप्नविलास हीच या वाङ्मयाची वास्तवता आहे. अतिशयोक्तीची भर घालून वास्तवाच्या पैकी जो रोचकभाग तेवढाच सांगायचा हा स्वप्नरंजनाचाच एक भाग आहे. हे स्वप्नरंजन मृच्छकटिकातही आहे. भाणांच्यामध्ये आहे. 'नाटक' या नावाने प्राचीन भारतात जे नाटक ओळखले जाई (उदा. 'शाकुंतल', 'उत्तररामचरित' इ.) त्यापेक्षा 'प्रकरण' या नावाने जे नाटक ओळखले जाई (उदा. मालतीमाधव, प्रतिज्ञायौगंधरायण, मृच्छकटिक) त्यात वास्तवाची ओळख तुलनेने अधिक दिसे. भाणाच्यामध्येही सारे स्वप्नरंजन आहेच, पण संस्कृत नाट्यसृष्टीत आपण 'भाण' पहाताना वास्तवाच्या जितके जवळ असतो, तितके इतर नाट्यप्रकार पहाताना नसतो.

प्राचीन भारतीय समाज हा विषम समाजरचनेने भरलेला समाज आहे. या

विषम समाजरचनेत एक तर वर्णनिहाय विषमता आहे. दुसरे म्हणजे परंपरागत मोठेपणाच्याही काही बाबी आहेत. राजे, सरदार, व्यापारी, आणि त्यांचे पुरोहित मिळून म्हणजे ब्राह्मण–क्षत्रिय–वैश्य या तीन गटांचे मिळून सुमारे १५ टक्के लोकांच्या वैभवाचे हे जग आहे. या जगात उरलेल्या ८५ टक्के लोकांना प्रतिष्ठा नाही, तसे वैभवही नाही. आज विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आपण उभे आहोत. आजही भारताचा तीन चतुर्थांश भाग ग्रामीण आहे. जुन्या काळी औद्योगिक संस्कृतीच्या उदयापूर्वी मोठी शहरे आजच्यापेक्षाही कमी होती. जंगलात राहणारे आदिवासी आजच्यापेक्षा अधिक. छोटचा छोटचा वस्त्यांची खेडीही आजच्या मानाने अधिक. जंगले अधिक. लोकसंख्या आजच्यापेक्षा फार कमी. शहरांची संख्या फार मोजकी. म्हणून ज्या गुप्त काळातील हे भाण आहेत त्याकाळी भारताची लोकसंख्या ६–७ कोटीच्या आसपास आहे. नागरी लोकसंख्या जास्तीत जास्त १५ टक्के असणार. ८५ टक्के भारत हा त्या काळी प्रामुख्याने शेती व संलग्न व्यवसाय करणाऱ्या शूद्रांचा व आदिवासींच्या समूहाचा बनलेला आहे. ज्या वैभवशाली नागरी संस्कृतीचे दर्शन आपण या भाणांच्या मधून घेऊ तिचा परीघ १५ टक्के समाजाचा आहे.

या महानगरांच्या वैभवाचे मूळ उरलेल्या जनतेच्या शोषणात असते. ह्या उरलेल्यांना फक्त उत्पादक श्रम व सेवादास्याचे कर्तव्य आहे, बाकी कोणतेही ‘ हक्क ’ नाहीत. हे ध्यानात ठेवून आपण वैभवसमृद्ध शहरांच्याकडे वळले पाहिजे. प्रामुख्याने ही शहरे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य ह्या वरिष्ठ वर्णांची ३०–३५ टक्के लोकसंख्या आणि मग निरनिराळ्या प्रकारचे सेवक, दास, मजूर ह्या शूद्रांची ६५–७० टक्के लोकसंख्या अशी आहेत. अर्थात ही टक्केवारी स्थूलमानाने समजावयाची. ती नेमकी व काटेकोर नाही. राज्यामधील सर्वांत मोठा जमीनदार स्वतः राजाच असे. या राजाचे विविध अधिकारी, मंत्री, सरदार यांच्या जमीनदाऱ्या असत. वैभवशाली शहरांमध्ये असणाऱ्या सत्तावान श्रीमंतांचा हा वर्ग म्हणायचा. मोठ्या प्रमाणात हा वर्ग ब्राह्मण व क्षत्रियांच्या मधून असे. देशभर फिरणारे व्यापारी तांडे परदेशव्यापार आणि त्यासाठी लागणारा कच्चा व पक्का माल हाताळणारे मोठमोठाले व्यापारी हा फारशी सत्ता हाती नसणारा पण फार मोठी अप्रत्यक्ष सत्ता असणारा व्यापारी वर्ग होता. ह्या ब्राह्मण–क्षत्रिय–वैश्यांचे वैभवशाली जीवन मोठमोठ्या नगरांच्यामधून दिसे. गुप्तकालातील पाटलीपुत्र आणि उज्जैन ही अशी महानगरे आहेत. प्राचीन चारही भाण ह्या महानगरांच्यामध्ये घडलेले कथानक सांगतात.

ह्या महानगरीचा एक भाग वेश असे. वेश्या हा शब्द ह्या ‘ वेश ’ शब्दावरून बनलेला आहे. वेश वसतीत राहणाऱ्या वेश्या, गणिका, रूपाजीवा, वेश्या अशा अनेक नावांनी ओळखल्या जाणाऱ्या स्त्रियांची एक वेगळी वसती शहरांमध्ये असे. ही वसती म्हणजे वेश. त्या समाजरचनेने समाजाचा एक भागच या वसतीसाठी राखीव ठेवलेला असे. ह्या समाजातील स्त्रिया वंशपरंपरागत शरीरविक्रयाचा प्रमुख

धंदा करीत. ह्या समाजात आई आणि तिची मुलगी या मातृपरंपरेला सर्वांत मोठे महत्त्व होते, पुरुषांना फारसे महत्त्व नसे. वाद्यवादन आणि छोटयाछोटया नोकऱ्या यापेक्षा पुरुषांना इथे जास्त महत्त्व नाही. आपण हा सगळा समाज गणिका या नावाने गृहीत धरू. या समाजात देशोदेशी खरेदी करून आणून सोडलेल्या स्त्रियांपासून पिढयान पिढया हा व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्यापर्यंत अनेकजण होते. तरुण देखण्या स्त्रिया नृत्य–गायन–नाटय या क्षेत्रात असत. या तरुण व कलावती स्त्रियांना मागणी जास्त असे. त्यांचे उत्पन्नही जास्त असे. त्यांच्या घरी त्यांचा एक मोठा नोकरपरिवार व सेवकवर्ग असे. गणिका म्हणून प्रतिष्ठेने ज्यांचा उल्लेख केला जातो तो हा वर्ग आहे. ज्या तरुण आणि देखण्या आहेत पण ज्यांच्या अंगी इतर कोणतीही कला नाही त्यांची प्राप्ती त्या मानाने कमी असे. रूपाजीवा म्हणून त्या ओळखल्या जात. फार मोठा वर्ग अशा स्त्रियांचा असे. ज्यांच्याजवळ फारशी कलाही नव्हती, फारसे सौंदर्य नव्हते, पण शरीरविक्रय हाच ज्यांचा व्यवसाय होता त्या सामान्य स्त्रिया. ऐपतीनुसार घरी नोकरचाकर असत, तेही हा व्यवसाय करीत. तारुण्य उतारात पडलेल्या स्त्रिया आपल्या मुलींना व्यवसायात पुढे आणण्याचा प्रयत्न करीत. ज्यांना तारुण्यातही फारशी कमाई झाली नाही त्या स्त्रिया उतारवयात कुणाला तरी गाठून त्याच्यासह राहत. या वेश वसतीच्या शेजारी दरिद्री व कमी पैशात जगणाऱ्या पताका वेश्यांची वसती असे.

वेश हा असा विविध वयाच्या आणि विविध उत्पन्न असणाऱ्या गणिकांचा समूह होता. या समूहात सर्व जीवन वैभवात आणि निरामय काढणे हा योग फार थोडया जणींच्या नशिबी होती. तारुण्यात बऱ्यापैकी कमाई आणि रोगग्रस्त दारिद्रयात हालअपेष्टात मरण हाच बहुतेक जणींचा योग असे. पायाशी लोळणारी संपत्ती व शब्दावर झुलणारे सरदार व व्यापारी असा वैभवशाली आरंभ असणारी वासवदत्ता ही रोगग्रस्त होऊन सडकेच्या काठी दीन होऊन पडते व भगवान उपगुप्त तिला आसरा देतात, तारतात ही कहाणी आपण नेहमी ध्यानात ठेवली पाहिजे. वास्तवाचे हे चित्र आपणास माहीत असले म्हणजे स्वप्न आणि सत्य यांतील अंतर ओळखणे जड जात नाही.

दशकुमार-चरिताचा लेखक दंडी आणि कौटिल्याचे अर्थशास्त्र या ग्रंथांचा विचार करताना असे दिसते की, गणिकेला बालपण जवळजवळ नसेच. नाटके व भाण पाहिले म्हणजे असे वाटते की, जीवनाचा फार मोठा भाग स्त्रियांच्या बाबतीत हसण्या खेळण्याचा असे. हे वाटणे खोटे आहे. पाचवे सहावे वर्षापासूनच धंद्याच्या दृष्टीने या मुलींची तयारी केली जात असे. त्या फार रोड नसाव्या फार स्थूल नसाव्या. देखण्या दिसाव्या, गोऱ्या दिसाव्या, म्हणून नृत्य, गीताचे शिक्षण, व्यायाम, तेलहळदीची उटी अशा अनेक बाबींनी या स्त्रियांचे जीवन बांधलेले असे. पंधराव्या वर्षाच्या सुमारास या मुली धंद्याला लावल्या जात. फार तर पुढचे तारुण्याचे

१५–२० वर्षांचे जीवन. यानंतरचे जीवन भेसूर असते. तारुण्यात स्वतःची कमाई आणि उतारवयात मुलीची कमाई, पण रोगग्रस्तता नाही असे जीवन वाटचाला येणे म्हणजे भाग्यच. फार थोडद्या स्त्रियांच्या वाटचाला हे जीवन येत असे.

कोणत्याही राज्यातील सर्व गणिका राजाच्या दासी मानल्या जात. त्या केव्हाही राजाच्या भोगासाठी उपलब्ध होत्या. त्यांच्यातूनच राजनर्तिका, गायिका, नट्या यांची निवड होई. पण त्याखेरीज राजाची सेवा करणाऱ्या निरनिराळ्या परिचारिकांचीसुद्धा निवड होई. तारुण्य उतारात पडल्यावर ह्या स्त्रियांना दासी, दाई, स्वयंपाकिनी, सूतकाम यावर नेमले जाई. राजवाड्यातील रसोईघर उतारात पडलेल्या गणिकांनी भरलेले असे. राजाचा सर्व गणिकांच्यावर अधिकारच असल्यामुळे कोणत्याही नाटकात राजा आणि गणिका यांची प्रीती दाखवलेली नसते. एक तर अशी प्रीती दाखविणे राजाच्या प्रतिष्ठेसाठी योग्य नाही. समाजाला हे चित्र गर्हणीय वाटणार, निदान वाटावे अशी अपेक्षा आहे. दुसरे म्हणजे गणिका इच्छा करताच व इच्छा असेल तोवर राजाची असते. अनुनय, मन जिंकणे, रुसणे, रुसवा काढणे ह्या क्रिया तिथे संभवत नाहीत.

राजा, राजाचे नातेवाईक, सरदार यांच्या आश्रयाखाली जाण्याची धडपड हा गणिकांचा एक कायम उद्योग असे. इतरांच्या आक्रमणापासून रक्षण, खूप कमाई व जीवनाला स्थैर्य या जागीरदारांच्या आश्रयामुळे येई. शिवाय असा आश्रय प्रतिष्ठितपणाचा मानला जाई. त्या खालोखाल महत्त्व एखाद्या श्रीमंताच्याकडे स्थिरावण्यास असे. या दोन्ही गोष्टी जमल्या नाहीत तर येईल त्या श्रीमंताची सेवा हा गौणपक्ष असे. येणाऱ्या जाणाऱ्या गिऱ्हाईकांनी हजार पाचशे रुपये रात्रीच्यासाठी देणे हे सुद्धा दूरदृष्टीने पाहणाऱ्यांना गौण वाटे. आणि त्यावेळच्या समाजात याला मोठा अर्थ होता. कायमची एखाद्या सरदाराची, जमीनदाराची अगर व्यापाऱ्याची असणे सुखाचे व सुरक्षिततेचे असे. कारण अशा रक्षित स्त्रीला जे मिळेल ते उत्पन्न बचत ठेवता येई आणि जे बचतधन असेल ते कुणी लुटील या भीतीपासून दूर राहता येई हे तर होतेच, पण एकचारिणीला विश्रांतीही खूप असे. आजाराची भीती कमी असे. वात्सायनाने एकचारिणी होणे हेच ध्येय गणिकांनी आपल्यासमोर ठेवावे असा सल्ला दिला आहे तो नैतिकदृष्टी समोर ठेवून नव्हे, तर दीर्घजीवी सुख ही कल्पना डोळ्यासमोर ठेवून.

'वेश' हे गणिकांचे जग आहे. या जगात वेश्यांना आपली जाहिरात करणारे व संपन्न गिऱ्हाईके गाठून देणारे दलाल हवे असतात. साधले यांनी रासवटपणे सर्वत्र 'भडवा' असा शब्दप्रयोग केलेला आहे. या विटाचे उल्लेख नाटचशास्त्रात आणि वात्सायन कामसूत्रात तर आहेतच पण नाटक काव्यात आणि राजतरंगिणीसारख्या इतिहासग्रंथातही आहेत. विट चतुर, बोलका आणि ऊहापोहक्षम असतो. नटणारा आणि शृंगारात रमणारा असतो. ज्ञानी व शहाणा असतो. पण भोगविलासात

संपत्ती उडविलेला असतो. अशा प्रकारची जी विटाची वर्णने आहेत, यावरून विट म्हणजे नक्की कोण याचा पत्ता लागत नाही. विट हा संधिविग्रहिक असतो हे त्याचे खरे लक्षण. तो गिऱ्हाइके गाठणारा असतो. विटांचा चरितार्थ या उद्योगावर चाले. संपन्न गिऱ्हाइकांच्याकडून व अशी गिऱ्हाईके आणून दिल्याबद्दल वेश्यांच्या कडून जी बिदागी मिळे त्यावर विटांचा चरितार्थ चाले. काही विट वेश्यांनी आपल्या नोकरीत ठेवलेले असत. या विटांना पैसे तर द्यावे लागतच पण मोफत भोगही द्यावा लागे. विट हा दलाल होता, तसा गुंडही होता. गिऱ्हाइकासाठी वेश्या पळवणे, दुसऱ्या विटाशी मारामाऱ्या करणे वेश्येच्या विळख्यातून आपले गिऱ्हाईक सोडवून आणणे ही कामेही करावयाची तयारी असणे ह्या धंद्याला जरुरीचे असे. अत्तरे, कल्प, चांगले कपडे, फुले, दारू यांच्या उपभोगाची आवड असणारा व दलालीवर जगणारा असा हा विट नाटकांचा एक भाग नाही. तो नाट्यसंकेत नव्हे विट हा त्या वेशवसतीशी संलग्न वास्तव समाजाचा भाग आहे. विट हा नेहमी उतारवयाचाच दाखविणे हा मात्र नाट्यसंकेत आहे. वास्तवातील विट कोणत्याही वयाचा असे आणि मोठ्या प्रमाणात हे विट गणिक संघातील पुरुष म्हणून जन्मलेले लोक असत. नाटकात मात्र ते गणिकांशी नात्यांनी जोडलेले दिसत नाहीत.

गिऱ्हाइके गाठणे या कल्पनेतच इतरांची गिऱ्हाइके फोडणे समाविष्ट आहे. एका गणिकेचा प्रचार करण्यातच इतरांची निंदा येते. गणिकेजवळ आपल्या गिऱ्हाइकाची स्तुती करताना इतर गिऱ्हाइकांची निंदा करावी लागणारच म्हणून सफाईने खोटे बोलणे विटासाठी फार आवश्यक असते. सर्व गणिकांशी ओळखी असणे, त्या टिकविणे, वाढविणे विटांना भागच आहे. फराळ, जेवण, दारू, कपडे, फुकट भोग आणि बिदागी यासाठी सर्व गणिकांशी विनोद करणे, हसून बोलणे हे त्याचे काम आहे गणिकांनाही विटाची गरज असते. विट म्हणजे फुकट भोग हे जाणूनही विटांशी मैत्री करणे गणिकांना दोन कारणांच्यासाठी भाग असते. प्रथम म्हणजे इतरांच्या गुंडगिरीपासून रक्षण, विटांच्या गुंडगिरीपासून रक्षण, दुसरे म्हणजे गिऱ्हाइकांचा शोध, म्हणून विटांची गणिका मैत्री व गणिका विटमैत्री हा दोघांच्याही गरजेचा भाग आहे. ही मैत्री नव्हे, हा धंदा आहे. धंद्याची गरज ही वेशवसतीत मैत्रीचा आधार असते.

या भाणांच्या मध्येच मूलदेव हा नायक मिळविण्यासाठी विपुलेचा विट आणि दुसरा विट यांच्यामध्ये चालू असणारा संघर्ष पाहता येईल. देवदत्ता ही मूलदेवाकडे आहेच. तिची लहान बहीण देवसेना आणि मूलदेव यांचे संधान जुळविण्याचा प्रयत्न चालू आहे. दुसऱ्या बाजूने हा मूलदेव विपूलेसाठी मिळविण्याचे यत्न चालू आहेत. गिऱ्हाइकांच्या वतीने गणिका मिळवतानाही फसवणूक फोडाफोडी होणारच. हास्य, विनोद, नृत्य, गीत, सजणे या वरवर दिसणाऱ्या बाबींच्या मागे स्पर्धा, निंदा, हेवे–दावे यांचा वावर सतत असतो. हे चालू असताना फसवणूक हा एक मोठाच भाग आहे.

गिऱ्हाइके वेश्यांची विविध प्रकारे फसवणूक करतात, विटही करतात. वेश्या तर फसवणूक करतातच. परस्परांना फसवण्याचे सारे प्रयत्न, रंजनाचे प्रयत्न आणि खोटे अभिनय यांनी भरलेले हे जग आहे. या जगात गुंडगिरी आणि मारामाऱ्या असणारच. गरुड पुराणात असे म्हटले आहे की, वेश्या ही नित्य पराधीन असते. झोपेच्या बाबतसुद्धा ती स्वतंत्र नसते. गिऱ्हाइकाला दारूच्या नशेत ठेवणे व स्वतः बेसावध न होता दारू पिणे हे काम करणारे ते हसणारे यंत्र आहे. शरीराच्या आणि मनाच्या वेदना व व्याधी झाकून ठेवून तिला हसणे भाग आहे. जन्मभर हे शरीर भोगण्यासाठी भाड्याने ती देत असते. सामान्यपणे वेश्यांचा शेवट व अंत हिंसाचारात होतो. जुन्या मध्ययुगीन युगात गुलामांची हत्या ही नित्य बाब होती. वेश्यांची विविध प्रकारची हत्या ही सुद्धा नेहमीची बाब होती.

गणिका आणि गिऱ्हाईक यांना जोडणारा दुवा हा या जगाचा एक भाग आहे. पण याखेरीज नव्याने तारुण्यात येऊन धंद्याला लागणाऱ्या मुलींची जाहिरात हाही एक भाग आहे. नटून थटून रस्त्याने मिरविणे, नाट्य–संगीतात काम करणे, घरासमोर कंदूकक्रीडा करणे हे सारे आपला ' माल ' प्रदर्शनात आकर्षकपणे ठेवण्याचे प्रकार आहेत. या मुद्द्याबाबत गैरसमज झाला म्हणजे गणिकांचे जग वैभव, विलास आणि हास्य यांनी भरलेले वाटते. खरे म्हणजे ते जग असुरक्षितता- वेदना- फसवणूक अत्याचार यांनी भरलेले जग आहे.

या वेशवसतीच्या गरजा त्या वसतीला आकार देतात. वेशवसतीचा मद्यपानाशी निकट संबंध असतो. त्यामुळे आसवांची पुष्कळशी दुकाने या वसतीत असतात. हे जुने दारूचे अड्डे. या मद्यपान गृहाजवळच द्यूत खेळण्याची म्हणजेच जुव्वा खेळण्याची सोय असते. फुलांच्या माळा तयार करणे, सुगंधी द्रव्ये, अंगाला लावण्याची उटणी आणि पौरुष वाढवणारी औषधे, या क्षेत्रातले वैद्य, तमासगीर, कोल्हाटी, कसरतीचे व जादूचे प्रयोग करणारे असाही एक पसारा असतो. बकऱ्यांच्या आणि कोंबड्यांच्या झुंजी लावून त्या पाहणे हा त्या काळच्या करमणुकीचा एक प्रमुख भाग आहे. मद्य, मदिराक्षी, द्यूत, शृंगार आणि शक्तिवर्धके यांनी वेढलेले अनेक व्यवसाय वेशवसतीत नांदत असतात. नपूंसक आणि त्यांचे विविध प्रकार हा या जगाचा कायम भाग आहे. वासनेला एक विकृतीचा पदर असतो. नपूंसक हे या विकृत वासनेच्या पूर्तीचे साधन असते. या साऱ्या संमिश्र जगाचे चित्र या भाणांच्या मधून आपण पाहू शकतो.

या साऱ्या चित्रात अजून दोघांचा उल्लेख केला पाहिजे. त्यापैकी एक नाव विदूषकाचे आहे. विदूषक हा राजे असणाऱ्या नाटकातून राजाचा मित्र म्हणून दिसतो. त्यामुळे तो एक नाटकीय संकेत आहे अशी काही जणांनी समजूत करून घेतली आहे. मृच्छकटिकातील चारुदत्त राजा नाही, पण त्याच्याजवळ विदूषक आहे. नाट्यशास्त्रात राजे-सरदार-व्यापारी यांच्यासह ऋषी व तपस्वी यांच्याही-

सह विदूषक असतो याची नोंद केली आहे. नाटकाच्या बाहेर अनेक ठिकाणी विदूषकांचे उल्लेख आहेत. मनोरंजन करणारे, हास्य निर्माण करणारे खुशमस्करे हा राजदरबाराचा व सरदाराच्या परिवाराचा भाग असे. कुठे कुहक म्हणून तर कुठे नर्मसचिव म्हणून विदूषक आपणासमोर येतो. राजे–सरदार–व्यापारी या प्रतिष्ठित वर्तुळात वावरणारा आणि आपल्या नेत्याचे शृंगारविलास सांभाळणारा विदूषक असतो. वात्सायनाने एक व्यवसाय म्हणूनच विदूषकाकडे पाहिले आहे. तो वास्तव जीवनाचा भाग आहे. प्रतिष्ठितांची प्रेमप्रकरणे हाताळणे व प्रसंगी त्यांना कुलीन कन्या पत्नी म्हणून गाठून देणे, क्वचित गणिकांच्याकडे दौत्य करणे हे विदूषकाचे काम. आणि हेच काम करताना वेश्यावसतीत वावरणे हे विटाचे काम आहे.

गणिका व्यवसायात गणिकामाता हिलाही महत्त्वाचे स्थान आहे. गणिका शरीर देते. त्याचा मोबदला घेते. हा नागडा व्यवहार सुसंस्कृत पद्धतीने व्हावा यासाठीच गणिकामाता असते. प्रत्यक्ष गणिका ही फक्त प्रेमात पडते. तिला व्यवहाराच्या गोष्टी नको असतात. गणिकेने फक्त प्रेम बोलावे असा आदेश आहे. गणिकामाता सतत पैसा मागते, द्रव्यलोभी असते. या द्रव्यलोभी आईच्या आज्ञेत गणिका वावरत असते. वास्तविक चित्र असे आहे की, गिऱ्हाईक गाठण्याची यंत्रणा म्हणून विट आहे. मोबदला वसूल करण्याची यंत्रणा माता असते. दरिद्री गिऱ्हाइके हाकून देणे, सधन गिऱ्हाइकांकडून पैसा वसूल करणे ही कामे जर चोखपणे माता करीत असेल तरच प्रेमात पडणे गणिकेला परवडत असते. परिस्थितीवर खरा ताबा गणिकेचा असतो. म्हणूनच गणिका कितीही अभिनय करो ती आईच्या आज्ञेबाहेर जात नाही. आईने निवारण केलेल्या प्रियकराला चोरून भेटणे, आईने आणलेल्या सधनाला नाइलाजाने शय्यासुख देणे या साऱ्या बाबी प्राय: अभिनयाचा व योजनेचा भाग असतात. गणिका हीसुद्धा माणूस आहे. खरे प्रेम आणि खरा तिटकारा तिच्याजवळ नसतो असे मानण्याचे कारण नाही. पण हा प्रकार असतो तेव्हा व्यवसायाची हानी होते. व्यवसायहिताच्या दृष्टीने गणिकेला एक माता असणेच आवश्यक आहे. असा आदेशच या क्षेत्रातील तज्ज्ञांनी दिलेला आहे. खरी माता नसेल तर खोटी माता निर्माण करावी अशी सूचना आहे.

प्राचीन भारतातील या गणिका जगाचे चित्र काही वास्तविक व काही कल्पित असे अनेक ग्रंथांच्यामधून विखुरलेले आहे. गुणाढ्याची आज लुप्त असणारी 'बृहत्कथा' हे या जीवनाच्या चित्रणाचे मोठे भांडार होते. बृहत्कथेतील चित्रण बुधस्वामीच्या बृहत्कथा श्लोकसंग्रहात, कथा-सरित्सागरात आणि बृहत्कथा मंजिरीत पाझरलेले आहे. वसुदेव हिंडीसुद्धा याच प्रमुखकथांची जैन आवृत्ती म्हणून पाहता येतो. दंडींचे दशकुमारचरित, दामोदराचे कुट्टनीमतम् हे काव्य, क्षेमेंद्राचे समयमातृका हे काव्य या जीवनाचेच चित्रण करते. वात्सायन कामसूत्र, कौटिलीय अर्थ-

शास्त्र आणि राजतरंगिणी यातही खूप माहिती आहे. प्रकरण, भाण, पुराणे व इतर काव्ये यातील माहिती मी कामसूत्र व अर्थशास्त्राच्या प्रकाशात समजून घेतली आहे. तिचाच स्थूल आराखडा म्हणजे वरील विवेचन होय.

भाणाच्यामधील प्रेम हा शब्द या संदर्भात पाहिला पाहिजे. गणिकांना तरुण, देखणा, श्रीमंत व उदार असा नायक, गिऱ्हाईक म्हणून हवा असतो. उदार आणि श्रीमंत असेल तर तरुण आणि देखणा हे दोन मुद्दे गौण असतात. अशा उचित गिऱ्हाइकांची माहिती करून घेणे व त्यांच्या प्रेमात पडणे हे गणिकेचे काम. हे गिऱ्हाईक गाठण्यासाठी गरजेनुसार दूतीचा, विटाचा वापर होतो. माता व्यवहार सांभाळते. या वातावरणात प्रेम या शब्दाला जो अर्थ असू शकतो तेवढाच येथे खरा असतो. सर्वांचे व्यवसाय वंशपरंपरेने चालत आलेले, जन्मभर चालणारे, त्यामुळे एका मर्यादेत सगळी चर्चा उघड असते. आपली मुलगी अमुक प्रतिष्ठिताकडे अगर सधनाकडे सुखभोग घेते आहे हे सांगताना मातेला संकोच नाही. मी अमक्याकडे रात्र घालवून येते हे सांगताना गणिकेला संकोच नाही. पुरेसा उत्तान पणा या वसतीतील संभाषणात असणारच. आपली बहीण ज्याच्याकडे आहे तोच माणूस गाठणे यातही संकोच नाही. कारण गिऱ्हाईक दहा ठिकाणी जाणार आणि ते सधन आहे. मग दोन्ही मुलींनी त्याला दोन बाजूंनी गाठणे हा व्यवहार आहे. पद्मप्राभृतक भाणात हा व्यवहार दिसेल. गिऱ्हाइकाला प्रियकर मानणे, त्याच्याशी प्रीतिकलह करणे हे तर आवश्यकच असते, पण तुटेपर्यंत ताणावयाचे नाही. म्हणून गणिकांना सदैव अभिसाराचे, आपण होऊन नटूनथटून प्रियकराकडे जाण्याचे सल्ले आहेत. धंदा रुसण्याची संधीच देणार नाही. मध्यस्थी करणारे विट व मूळ गणिकाच, भांडण फारसे वाढू नये यासाठी दक्ष असतात. आपल्या मनात असणाऱ्या निष्ठा या जगात परवडणाऱ्या नाहीत. कुलीन स्त्री-पुरुषांच्या बाबतीत असणाऱ्या अपेक्षा गणिका वसतीत घेऊन जाणेच बरोबर नाही.

या ठिकाणी आनंद साधले यांच्या प्रास्ताविकातील एक दोन मुद्यांचा थोडा विचार केला पाहिजे. भाणांच्यामध्ये वात्सायन कामसूत्राचा उल्लेख नाही पण दत्तकाच्या कामशास्त्राचा मात्र उल्लेख आहे आणि दत्तक हा या शास्त्रातील वात्सायनापूर्वीचा शास्त्रज्ञ. तेव्हा सौम्यपणे सूचना ही की, भाण वात्सायनापूर्वीचे असावेत. सौम्यपणे सांगायचे तर ही सूचना मान्य करता येत नाही. वात्सायन कामसूत्र कुलीन सांसारिकांनी अभ्यासावे यासाठी आहे. परंपरेत वात्सायनाचा दर्जा ऋषीचा आहे. दत्तकाचे कामशास्त्र गणिकांच्या गरजेसाठी म्हणून होते. यामुळे वाङमयीन संकेत असा की, भाणांच्यामध्ये असणाऱ्या या गणिकांच्या जगात सर्वत्र दत्तकाचा उल्लेख करावयाचा. ऋषितुल्य पूज्य वात्सायन हा गणिकांच्या अभ्यासात उल्लेखावयाचा नाही. या संकेतामुळे भाणात वात्सायनाचा उल्लेख नसतो. एरवी वात्सायन हा भाणांच्यापेक्षा जुना आहे, हे पुराव्याने सिद्ध करता येते. वात्सायन

गुप्तकाळापूर्वीचा आहे.

साधले सांगतात, मालविकाग्निमित्रातील विदूषक हा विटाचेच काम करतो. हे खरे आहे. विट आणि विदूषक यांच्यातील पडदा फार विरविरीत आहे. पण राजासाठी कुलीन राजकन्या गाठण्याचे काम करतो म्हणून एकाला विदूषक म्हणायचे. गणिका गाठण्याचे काम करणारा विट जगतो वेश्येकडून होणाऱ्या कमाईवर. गिऱ्हाइकाकडून होणारी कमाई त्यामानाने गौण. विट कुणाही एकाचा आश्रित नव्हे. विदूषक हा कुलीनाचा आश्रित असतो. साधले सांगतात, गोमंतकातील गणिकांची संतती पित्याचे नाव लावते हे खरे नाही. या संततीला परवा परवापर्यन्त पित्याचे नाव लावण्याची परवानगी नव्हती. साधले यांनी कालिदासपूर्व 'सौमिल्लक' आणि भाणातील 'श्यामिलक' हे एकच असावेत असाही कयास केलेला आहे. सौमिल्लक हा कालिदासापूर्वीचा मान्यवर नाटककार. भाणांच्या लेखकांना कालिदास गौरविणार नाही हेही उघड आहे आणि हे प्राचीन भाण कालिदासाला थोडे उत्तरकालीन आहेत हेही उघड आहे. साधले यांना हे सारे माहीत आहे पण खोडकरपणाचा एक भाग म्हणून साधले यांनी हे मुद्दे मांडलेले आहेत. हा खोडकरपणा आहे इतकेच मला सांगणे भाग आहे.

संस्कृत नाटकांच्यामधील उपहास आणि उपरोध यांचे सर्वांत समृद्ध दर्शन हा या भाणांचा विशेष आहे. संस्कृत परंपरेप्रमाणे हास्य हा शृंगारातून जन्मणारा, त्याच्यासह असणारा रस आहे. नाटकांच्यामध्ये असणारा हास्यरस प्रामुख्याने विदूषकासह असणारा आहे. भोळेपणा, भित्रेपणा, खादाडपणा, बुद्धीने मंद असणे, मूर्ख असणे इ. प्रकार ह्या विनोदात नेहमीचे आहेत. भाणांच्यामध्ये चतुर आणि लबाड असणारा विट विनोदाचा आधार आहे. विटाचा विनोद उपहास आणि उपरोध यांनी भरलेला आहे. सफाईने खोटे बोलणे, दंभ उघडा करणे हे विटाचे कामच आहे. भाणांच्यामध्ये असणारे काव्यही उत्तान, शृंगाराचे बोलणे अनेकदा चावटपणाचे, उपरोध मर्मावर जाऊन पोचणारा असा आहे ही एक शक्यता आहे की नकळत या उपहासातून काही समकालीनांच्यावरही टीका असेल.

भाणांचे जग हे वास्तव जग नव्हे. वास्तवाशी फारकत असणारे हे कल्पित आहे. आधुनिक वाचकाला वास्तव नसूनही मृच्छकटिक वास्तव वाटते. वास्तवात गणिकांच्या नादी लागणारे राजे आहेत. 'राजकारणात गोंधळ घालणाऱ्या गणिका आहेत. त्यांचे थोडेसे चित्र 'राजतरंगिणी'त सापडेल. पण हे नाटकात दाखवायचे नसते. नाटकाचे काही नियम आहेत. ते नियम पाळूनच भाणाची रचना झालेली आहे. म्हणून या चित्रणाला वास्तववाद समजायचे नाही. पण समाजाच्या एका भागाचे वास्तवाशी खूप जवळ असणारे हे चित्रण आहे, हे समजूनच या वाङमयाकडे पाहिले पाहिजे.

पहिला भाण कल्पनेपासूनच आरंभ पावतो. घरी जाताच पत्नी तुमच्याशी भांडेल,

तुम्हाला शिव्या देईल, असा आशीर्वाद देतो. हा आशीर्वाद नीट समजावून घेतला पाहिजे. तुम्हाला घर असेल, संसार असेल, पत्नी असेल, हे नसले तर मग भांडणार कोण ? बरे, पत्नी सत्शील नसेल तर ती भांडणार नाही. तिने त्याग केला तरी भांडण होणार नाही. सत्शील, सांभाळून घेणारी पण भांडणारी पत्नी हा घटकही जीवनात कायम राहील आणि नित्य नवा आनंद देणारा बाहेरख्यालीपणाही चालू राहील असा हा आशीर्वाद आहे. माझ्यासारखे सुखी निर्लज्ज व्हा, माझ्यापेक्षा सांपत्तिक स्थिती चांगली राहो, असा याचा अर्थ आहे. या भाणातील विट एक भांडण मिटविण्यासाठी बाहेर पडलेला आहे. भांडणाचे कारण काय ? तर कुबेर-दत्त याची 'प्रेयसी' नारायणदत्ता नावाची गणिका आहे. ही जोडी जुळवून देणारा मध्यस्थ हाच विट होता. कुबेरदत्ताने मदनसेना या गणिकेचे कौतुक केले म्हणून नारायणदत्ता भांडलेली आहे. नारायणदत्तेला भांडण करणेच भाग आहे. नाही तर हातचे गिऱ्हाईक जाईल. मदनसेना तर हे नवे गिऱ्हाईक गाठण्यास उत्सुक आहेच. नृत्य-संगीताचे प्रयोग पाहण्यास येणारे रसिक केवळ कला पाहण्यासाठी येत नसत. नवी पात्रे शोधणे हाही एक उद्देश असे. आणि गणिकासुद्धा या कार्यक्रमातून प्रसिद्धी व प्रदर्शन या आधारे अधिक पैसा देणारे 'प्रियकर' गाठण्याची धडपड करीत. भांडणाचे कारण ही नित्य असणारी स्पर्धा आहे. नाटकाच्या प्रारंभी असणारी भांड-णाची सूचना आणि हे भांडण याचा असा संबंध आहे.

या भांडणाचा शेवट ठरलेला आहे. नारायणदत्ता रागारागाने निघून गेली. पण हा रुसवा फार काळ टिकवणे तिला परवडणार नाही. कुणीही मनधरणी न केली तरी अभिसार करून नारायणदत्ता आपल्या प्रियकराकडे येणारच. इतक्या साध्या बाबीसाठी ती गिऱ्हाईक गमावणार नाही. आणि विट तत्परतेने रुसवा काढणार. तो जोडी फुटू देणार नाही. जमवलेल्या जोडचा फुटू देणे हे त्यालाही हानिकारक आहे. कुबेरदत्ताला मदनसेना मिळाली असती तर प्रश्न वेगळा होता. मदनसेना उपलब्ध होती पण अजून सारे व्यवहार ठरायला हवे. या जगात डोळा भिडवून आमंत्रण तर प्रत्येक गणिकाच देणार. कुबेरदत्त नारायणदत्ता आताच गमवायला तयार नाही. त्यालाही आताच भांडण नको आहे. बरे, उद्या आवश्यकच असेल तर नारायणदत्ता सोडणे कठीण नाही. तिलाही नवा प्रियकर गाठणे कठीण नाही. जोडी फुटली तर आकाश कोसळणार नाही. जोडी टकविणे धंदा म्हणून गरजेचे आहे. अशा कथा-नकात विटाला करण्याजोगे कामच काय ? विट तरी नारायणदत्तेकडे जाऊन अभि-साराचाच सल्ला देणार. नारायणदत्तेने तो मार्ग आधीच पत्करला व भांडण मिट-वून टाकले. अशा साध्या कथानकाच्या निमित्ताने नाटककार अनेकांची थट्टा, अनेकांचा दंभस्फोट करतो आहे. मूळ भाणात उपहासच प्रमुख असतो. मर्मभेद प्रमुख असतो. कथानक हे फार महत्त्वाचे नसते. कथानकाचे महत्त्व बेताचे असते.

या भाणातच वेशात असणाऱ्या विष्णुनारायणाच्या मंदिराचा उल्लेख आहे. या

वस्तीत काही देवळे असणार. गणिकांच्या धार्मिकतेमुळेही आणि नृत्य, गीत, नाट्य यांच्या कार्यक्रमासाठीही. आपल्या परंपरेत साऱ्या विलासयंत्रणेला धर्माची झालर लावलेली असते, त्यातील हा प्रकार आहे. नव्याने तारुण्यात आलेल्या मुली यांना 'दारिका' म्हणतात. व्यवसायाला वाहिलेल्या गणिका, माता इ. च्या व्यवहार व धर्माच्या सोयींच्यामुळे हे देऊळ गजबजलेले असे. देवीमंदिर, शिवाची मंदिरे यांचा वेशवस्तीतील उल्लेख या भाणांच्यामधून तुरळकपणेसुद्धा आढळत नाही. महाकालाचा जो एक उल्लेख आहे ती वसती वेशाबाहेरची आहे विटाची भेट अनंगदत्तेशी होते. विट तिलाही दिलासा देतो. खरे म्हणजे तो आपल्या चरितार्थाला बांधलेला आहे. फुकटची समाजसेवा करण्यात त्याला रस नाही पण उद्या काम कुणाशी पडणार ह्याचा नेम नाही म्हणून सर्वांशी गोड बोलणे हे कर्तव्य विट निभावीत असतो. विटाच्यासाठी सर्व वेश्या आणि कामुक ही गिऱ्हाइके आहेत व तो कुणाला असंतुष्ट करू इच्छित नाही.

या वसतीतून वावरणाऱ्या मंडळीत व्यभिचाराला चटावलेली वैशेषिक तत्त्वज्ञानाची अनुयायी विलासकौंडिनी आहे, बौद्ध भिक्षू व भिक्षुणी आहेत. स्वतःला अतिशय धार्मिक मानणारा एक भागवत आहे. या साऱ्यांची भेट इथे होते. याचे कारण वैशेषिक–बुद्ध दर्शन अगर भागवत संप्रदाय हे नाही. कोणत्याही धर्मात, धर्मगटात काही लबाड व लुच्चे शिरलेले असतातच. त्याचे हे चित्र आहे. ही टीका त्या त्या धर्मगटावरील नाही तर कुठेही ठाण मांडून बसणाऱ्या लबाडांच्यावर आहे. गौतमाच्या न्यायदर्शनापेक्षा निराळा असा वैशषिकांचा गट अस्तित्वात आहे. असा काळ भाणांच्याबाबत विचारात घ्यावा लागतो. अजून बौद्धधर्म सर्वांच्या आदराचा विषय आहे. तांत्रिकांचें प्राबल्य अजून समाजात सार्वत्रिक नाही. ही अवस्था भवभूतीपूर्वीची आहे. या धार्मिकांच्या बाजूला सुकुमारिका ही नपुंसिकासुद्धा समजून घेतली पाहिजे. राजाचा मेहुणा रामसेन याने ही सुकुमारिका ठेवलेली आहे. या रामसेनाला पत्नी असणारच. नृत्यप्रयोगात नव्या गणिकांशी तो मैत्री करतो. अनेक गणिकांशी संबंध ठेवणारा हा एक उडाणटप्पू आहे. पण त्याला कायमचे एक पात्र हवे. रतिलतिका, पियंगुसेना असे अनेक संबंध हा राजशालक ठेवतो. तेव्हा या नपुंसकेला आपल्याला अस्तित्वासाठी कलहशील व मत्सरी असणे भागच आहे.

विट सुकुमारिकेला सांगतो, स्तनाचा अडथळा नसल्यामुळे तिचे आलिंगन अधिक गाढ आहे. ऋतुची अडचण नसल्यामुळे भोग नित्य आहे. आणि गर्भसंभव नसल्यामुळे म्हातारपण नाही. कोणत्याही गणिकेपेक्षा नपुंसिका याप्रमाणे श्रेष्ठ ठरेल. हे विटाचे प्रामाणिक मत मानण्याची गरज नाही. त्याला या गटाचा तिटकारा आहे. पण हे सोयीस्कर असत्य बोलणे विट पत्करतो. या पुढे विट धनमित्राला भेटतो. माजलेला आणि लबाड असणारा हा व्यापारी गणिकांनी प्रेमात फसवून देशोधडीला लावला आहे. या धनमित्राविषयी विटाला तिरस्कार आहे पण त्याच्याशीही समोरा-

समोर लबाडीने मधुर भाषण तो करतो. सर्वांशी गोड बोलायचे, आपल्या व्यवसायातील स्वतःची फायदेशीर कामे तेवढी करायची, उरलेली खोटी आश्वासने. विट या पद्धतीने जगतो. त्याच्याशी मधुर भाषण करणाऱ्या गणिकासुद्धा त्याच्यावर फार विश्वास ठेवून बोलत असतील असे मानण्याचे कारण नाही. खोटेपणा हे या जगाचे सर्वव्यापी चित्र आहे.

प्रेमाच्या नाटकामुळे फसलेले मूर्ख मातेला दोष देतात आणि 'प्रेयसी'साठी मात्र झुरतात. विटाचे म्हणणे असे आहे की, सर्व क्रूर कामे स्वतः करून जबाबदारी ढकलणाऱ्या राजांच्याप्रमाणे ह्या गणिका आहेत. गणिकांच्या द्रव्यलोभीपणाबाबत, त्यांच्या खोटेपणाबाबत विट नेहमी बोलतात. पण हे त्यांचे स्वगत बोलणे आहे. या लबाड जगात लबाडी करीतच आपण जगतो ह्याचे भान विटांना आहे. वासनेची ऊर्मी असणारे सधन विलासी कामुक आणि तारुण्य व धंद्याची गरज असणाऱ्या गणिका यांच्यात आपण केवळ निमित्त आहोत, हे आपले स्थान जाणणे व त्याचा जगण्यासाठी वापर करणे हे जमावे लागते. हे कार्य नीट साधावे यासाठी आवश्यक असणारा लोचटपणा, निर्लज्जपणा व धूर्तपणा हे विटाचे भांडवल असते. कलह झालेल्या जोडीत मध्यस्थी करताना, एकाच गिऱ्हाइकाला दोन्ही बहिणी गाठून देताना विट सारे श्रेय ऋतूला, कामदेवाला, तारुण्याला देतो. तो स्वतःविषयी भ्रमात नसतो.

साधले यांच्या अनुवादातील प्रथम भाण मुळात 'उभयाभिसारिका' या नावाचा आहे. दुसऱ्या भाणाचे नाव 'पद्म प्राभृतक' असे आहे. यातील एक कल्पना मला थोडी लक्षणीय वाटली. व्यवसायात रुळलेली भर तारुण्यातील देवदत्ता ही तूपमधात घोळलेल्या मिष्टान्नासारखी व नवतरुण दारिका धंद्याच्या उबऱ्यावर असणारी देवसेना ही कोवळ्या आंबट कैरीच्या लोणच्यासारखी आहे. सर्व रतिरहस्य जाणणारी अनुभवी तरुणी आणि नवतरुणी असा हा भेद आहे. हे ठिकाण वाचताना माझ्यासारख्याला जर शाकुंतलाची आठवण झाली तर ती क्षम्य मानली पाहिजे. विदूषकाच्या तोंडून कालिदास दुष्यंताला हे ऐकवतो की, पूर्वपत्नी ह्या पेंडखजुरीसारख्या आहेत व शकुंतला चिंचेसारखी आहे. हे भाण मी अभ्यासिले नव्हते तेव्हा सर्वांप्रमाणे मलाही असे वाटत आले की, राजवाड्यातील राजकन्या म्हणजे पेंडखजूर आणि जंगलातील ऋषिकन्या म्हणजे चिंच. या भाणाचा माझा परिचय झाल्यावर मला हे जाणवू लागले की, अनुभवी पत्नी हिच्यापेक्षा नवतारुण्यवती अननुभवी शकुंतला ही वेगळी कशी आहे हे सांगणेही कालिदासाला अभिप्रेत असू शकेल. कालिदासाचा विदूषक दुसऱ्या अंकात ज्या पद्धतीने बोलतो आहे ती भाषा विदूकाच्या हास्यापेक्षा विटांच्या उपहासाची आठवण अधिक करून देते.

विट पाथरवट दगड घडवितो त्याप्रमाणे कविता घडविणाऱ्या कवीची थट्टाही करतो. जुन्या जोड्यातील फाटके तुटके घेऊन नवा जोडा शिवणारा चांभार आणि

हे कवी सारखेच आहेत. फार तर हे तुकडे जुन्या जोडयाचे तुकडे नाहीत असे कवी म्हणेल, पण ही कविता फुलासारखी नव्हे पादत्राणासारखी इतके तर ठरेल. ह्या कवींच्या सारखेच वेशात जमून व्याकरणावर चर्चा करणारे पंडित आहेत. वेशवसतीत राहूनही वेळेवर होमहवन करणारे धार्मिक आहेत. या दांभिकांना रात्री गणिका हवी. दिवसा पर्वकाळ म्हणून तिच्याच घरी होमहवन हवे. मात्र हवन चालेतो सोवळे पाळलेच पाहिजे. ते संपले की भोग आहेच. दंभाच्या विविध रूपाची कठोर विडंबना करण्यात विटाला फार आनंद होतो. स्वतःच्या पौरुषाचा ढंका वाजवीत फिरणारे वयस्क, स्वतःच्या धार्मिकतेचा तोरा मिरविणारे वेश्यागामी, गणिकांच्या गराडयात रमणारे न्यायाधीश आणि राजाचे मंत्री या साऱ्यांच्या पेक्षा विट स्वतःला वरचढ मानतो कारण तो गुंड आहे, धूर्त आहे, पण दांभिक नाही. लोकांनी आपल्याला सज्जन व पुण्यवान समजावे अशी त्याची इच्छाही नाही.

भांडणे निर्माण करणे यात त्याला संकोच नाही. मूलदेव हे बडे गिऱ्हाईक त्याने गाठलेले आहे. देवदत्ता आणि सहदेवसेनाही तो गिऱ्हाइकांच्या पदरात बांधणार. दोघींचाही मध्यस्थ तोच. तितकेच उत्पन्न वाढले. पण या मूलदेवाला गाठण्यासाठी इतरही स्पर्धक आहेत. हे तो जाणतो. खोटे बोलून मूलदेवाकडे वळणाऱ्या एका गणिकेचे तिच्या विटाशी भांडण लावून आपण मौज पाहात बसणे यात रंजनही आहे, आपल्या व्यवसायाचा सुरक्षितपणाही आहे हे विट जाणतो.

विटांना वर्ज्य काहीही नाही. गणिका चालेल, दूती व दासी चालेल. भिक्षूणी चालेल, मात्र बलात्कार त्यांना मान्य नाही. विटांना अध्यात्मातील कल्पना चावट अर्थ सांगण्यासाठी चालतात. तो वैशेषिक, बौद्ध दर्शनातील कल्पना वापरतो. भगवद्गीतेतील कल्पनाही वापरतो. गीतेत उपभोगातून कासवाप्रमाणे आपली इंद्रिये बाहेर ओढून घेणाऱ्या स्थितप्रज्ञाचे वर्णन आहे. विट ही कासवाची उपमा वेश्यावस्तीत रमलेल्या पण घाबरल्यामुळे उदासीन भासणाऱ्या एखाद्या गिऱ्हाइकाचे वर्णन करताना वापरणार. पण बलात्कार त्याला मान्य नाही. बलात्कार त्याच्या धंद्याला न परवडणारा आचार आहे. कामुकांना खर्च नाही, गणिकेला कमाई नाही म्हणजे विटाचा धंदा बुडाला. लफंगेपणा क्षम्य आहे. पण अत्याचार मात्र निंदनीयच मानला पाहिजे हे त्याचे नीतिशास्त्र आहे. विट नेहमी उपहासच करतो असे नाही. तो परिहासाचाही पंडित आहे.

आशीर्वाद म्हणून तो गणिकेला सांगणार की, तुझ्या दारातील गिऱ्हाईकांची गर्दी कमी होणार नाही. कुणाही एकाच्याकडे नांदण्यातील सुरक्षितता मिळणार नाही असा ध्वनी इथे कुणाला जाणवला तर विटाचा नाईलाज आहे. आपला कजूष व फुकटचा मित्र दोन हात जोडून नमस्कार करू लागला तर हा सांगणार, अरे एका हाताने नमस्कार पुरे. दोन हात म्हणजे उधळपट्टी झाली. वेश्यागामित्व हा राजरस्ता आहे. लग्न करून संसार मांडणे म्हणजे गल्लीबोळात शिरणे असे तो

सांगणार. परशुरामाप्रमाणे हातात कुऱ्हाड घेऊन सारे बाप मारून टाकावे आणि सर्व मुलांना वेश वसती बिनधोक करावी असाही त्याचा मनोदय आहे. नको नको, सोड सोड म्हणून दर्शनी कांगावा करणाऱ्या दूतीचा भोग घेणे म्हणजे मृदंगवादनाविना नाटक आरंभिणे आहे असे तो म्हणते. असे परिहासाचे क्षण विटांनी जागोजाग शब्दबद्ध केलेले दिसतात.

एका भाणात एका गणिकेला डोक्यावरून पदर घेण्याचा अधिकार मिळो असा उल्लेख आहे,हा योग म्हणजे गणिकेच्या जीवनातील परमभाग्याचा योग मानला जाई. वसंतसेनेच्या वाटचाला शेवटी हा योग आलेला आहे. हा मुद्दा नीट समजून घेतला पाहिजे. गणिका या राजाच्या दासी आहेत. धंद्याला बांधलेल्या आहेत. त्यांच्यावर राजाचा कर आहे. कुणीतरी एकाने आपली म्हणून तिला ठेवून घ्यावे. ती एकाच्या आश्रयाखाली आहे तोवर तिला संरक्षण आहे, पण त्याने तिला सोडले की, ती सर्वांना पुन्हा मोकळी आहे. व्याधी आणि वेडेपणा सांगून ती नकार देऊ शकते, किंमत सांगून ती नकार देऊ शकते. पण तिचा दर देण्यास तयार असणाऱ्या गिऱ्हाईकाला ती नावड, वार्धक्य, कुरूपता, मागचे भांडण, तिरस्कार सांगून नकार देऊ शकत नाही. या गणिकेला कुणी प्रेमाचे पोटी आपल्या पत्नीत्त्वाचा दर्जा देऊन ठेवून घेतो. तो राजाकडे किंमत भरतो व गणिकेला दास्यमुक्त स्त्रीचा, अवगुंठनांचा अधिकार मिळतो. तिचा वधू म्हणून उल्लेख केला जातो. डोक्यावरून पदर घेण्याचा अधिकार म्हणजे हा कुलीन स्त्रियांचा दर्जा. हा दर्जा सौंदर्य, कलागुण यामुळे मिळत नाहीं, तर द्रव्यलालसा नसणाऱ्या खऱ्या प्रेमाची खात्री जगाला व प्रियकराला पटवून तो मिळतो. हा अधिकार मिळणे म्हणजे सेवादास्यातून मुक्तता. गणिकेला हा प्रतिष्ठेच्या दृष्टीने सर्वात मोठा सन्मान आहे. अशी व्यवसाय विसरून खरे प्रेम करणारी दुर्मिळ; पण ती आढळेल तेव्हा व्यवसायाचे स्वार्थ विसरून तिचे गुणगान करण्याइतका विटही हळवा पूजक झालेला असतो. गुणलुब्ध गणिकांच्या निरपेक्ष प्रीतीच्या काही कहाण्या संस्कृत साहित्यात आहेत. वसंतसेनेची कहाणी ही त्यापैकी एक. [भाणात झालेली कुमुद्वती त्या दिशेने प्रवास करते आहे.]

विरहदुःख ही कल्पनाही गणिका जगात नीट समजून घेतली पाहिजे. चेहरा आजारी माणसासारखा ओढवलेला, शरीर पांढरे व कृश झालेले असे सारे वर्णन करावयाचे असते. सत्य यापेक्षा निराळे समजायचे. गिऱ्हाईक मिळणार ही खात्री झाली की, विरहामुळे आलेली क्षीणता घटकेत ओसरते आणि मीलनासाठी शृंगार करून निघताना तर सारे यौवन उसळत असते. तारुण्य खरे, उन्माद हाही अभिनय. विरह कृशताही अभिनय. मूळ गणिका प्रेमात पडते हाच अभिनय असतो. उभयाभिसारिका आणि पद्मप्राभृतक हे दोन भाग म्हणजे विटांचा खरा व्यवसाय करणारे भाण आहेत.

विट हा मूळचा सधन असतो. त्याने आपली सर्व संपत्ती उपभोगात समाप्त

केलेली असते आणि उतारवयात कफल्लक झालेला असतो अशी भूमिका देण्यात आलेली आहे. यापैकी तो धनवान नसतो इतकेच वास्तव आहे. उतारवयात तो असू शकतो, पण मुळात धनवान असतोच असा संकेत आहे. विट आपला व्यवसाय सांभाळत असताना एखाद्या गणिकेशी अधिक परिचित होतात. या व्यक्तीशी जन्म-भरासाठी जोडले जातात. गणिकेच्या तारुण्यात तिला गिऱ्हाईके गाठून देताना व आपण भोग आणि पैसा वसूल करताना आलेले संबंध बलवान होतात. मग ती व्यवसायातून क्रमाने निवृत्त झालेली गणिका मूलबाळ नाही म्हणून गणिकामाता होऊ शकत नाही. निवृत्त गणिकेने दूतीचे काम करावे. विटाने दुसऱ्या कुणाचे मध्यस्थ व्हावे आणि म्हातारा-म्हातारीने एकत्र राहून जगावे असा उद्योग सुरू होतो. विटांची शाळा नसते. त्यांचे शास्त्र नसते. त्यांची संघटना नसते, शास्त्रचर्चा, वादविवाद आणि त्यात जय यात विटांना रस असण्याचे कारण नसते. पण विट शास्त्रचर्चा करीत आहेत असा प्रसंग कल्पून कवी आपल्या माहितगारीची नोंद करतो. विटांची पंचायत एखादा वाद सोडविते असा प्रसंग कल्पून कवी एखादा चावट भाग लिहितो व उपहास करतो. नाटकाच्या सोयीपुरतीच खरी असणारी ही रचना असते. धूर्त विट संवादात गणिकाजीवनाविषयी बरीच चर्चा दोन विटांनी केलेली आहे. गणिका द्रव्यलोभी असतात हे मान्य करून गणिकाप्रीतीचे समर्थन व त्या निमित्ताने सर्व नीतीचा उपदेश करणाऱ्या धार्मिकांची चेष्टा या भाणात आहे. धर्मावर अश्रद्धा असणाऱ्यांनी धर्माची टिंगल करावी हे स्वाभाविक आहे, पण अशा अश्रद्धांच्या मनात थट्टेसाठी जे विचार येतील ते सारे श्रद्धावानाच्या डोक्यातही येऊन गेलेले असतात हे पाहणे मौजेचे आहे. ऐतिहासिक अडचण ही आहे की, धर्मावर अश्रद्धा निर्माण होण्यास लागणारे सर्व युक्तिवाद थट्टा म्हणून सुचतात, पण त्यामुळे श्रद्धा कधी हादरत नाहीत.

'पादताडितकम्' या भाणाची सगळी मौज प्रेयसीने डोक्यावर पाय देणे या कल्पनेतील सूचनेवर आधारलेली आहे. रसिक ही घटना भाग्याची म्हणून तिची वाट पहाणार. श्रीमंत मूर्ख हा आपला अपमान मानणार. केवळ मूर्ख असल्यामुळे हे श्रीमंत गिऱ्हाईक जमवावे लागणार ही चिंता चतुर गणिकेला आहे. विलासी पण मूर्ख अशा गिऱ्हाईकांच्या कहाण्या म्हणजे गणिका जगातील चविष्टपणे चघळण्याच्या बाबी असतात. आततायी, अत्याचारी हा गणिकेच्या भीतीचा विषय असतो. कोकणचा राजा इंद्रस्वामी हा अशा विकृत अत्याचाराचा नमुना आहे. मोफत मौज लुटणारे विट हा या जगात कौतुकाचा विषय आहे. श्रीमंत पण नबळे आणि श्रीमंत व तरुण पण मूर्ख कामूक हा गणिकांच्या प्राप्ती आणि विश्रांतीचा विषय आहे. या भाणात राधिकेचा उल्लेख आहे. निरपेक्ष बुद्धभिक्षूशी बोलताना राधिकेचा संदर्भ आलेला आहे. राधेसह कृष्णाचा उल्लेख मुळात नाही. तो साधले यांचा कल्पना-विलास समजावयाचा. त्यांना राधा म्हटले की, कृष्ण आठवतो. कृष्णाची राधा इ.

स.च्या नवव्या शतकापूर्वी नाही. ही राधिका बौद्ध तंत्रातील आहे, बौद्ध तंत्रमार्गातील साधिका हीच राधिकाही असते. निरपेक्ष बौद्ध असला तरीही हरकत नाही, त्याने जुन्या गणिका मैत्रिणीला राधिका समजून साधना करावी असा विटांचा सल्ला आहे.

भाणाचा हा सर्व जिवंत संस्कृतमधील अस्सल काव्याचा खजिना एकदम उघडा असा नाही. संस्कृत नाटकांनी कितीही उत्तान शृंगार सांगितला तरी काव्य आणि सूचकता हे दोन धागे तिथे दृढपणे सांभाळलेले असतात. शब्दाशब्दांच्यामध्ये अर्थाच्या सूचना असतात. मागचे संपादक अशा सर्व सूचना समजून घेण्यासाठी झटले. त्यांनी शब्दाशब्दांतील खोचकपणा उघडून दाखविला म्हणून आपण इतका तरी आस्वाद घेऊ शकतो.

संस्कृत भाषेसंबंधी आपण काही गैरसमज करून घेतलेला आहे. एक तर ती ब्राह्मणाची भाषा असे आपण समजतो, दुसरे म्हणजे ती धर्माची भाषा असे आपण मानतो. दोन्ही बाबी खऱ्या आहेत, पण त्यात सत्याचा केवळ अंश आहे. ब्राह्मणांची भाषा संस्कृत होती, पण क्षत्रियांची आणि साऱ्या त्रैवर्णिकांचीच भाषा संस्कृत होती. सर्वांचाच सामान्य जीवन व्यवहार प्राकृतातून चाले. आणि शास्त्र-कला-धर्म-तत्त्वज्ञानाचा व्यवहार त्रैवर्णिकांपुरता मर्यादित होता, तो संस्कृतमधून होता. धर्म तत्त्वज्ञान संस्कृतमध्ये होतेच; पण राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, धातुविद्या, वैद्यक, घरे बांधणे, दारू बनवणे हे ज्ञान संस्कृतमध्येच लिहिले जाई. पुराणे व कथा-सरित्-सागर शृंगाराची नाटके व भगवद्गीता, कामशास्त्र आणि वनस्पतिशास्त्र सारेच लिखाण संस्कृतमध्ये आहे. गणिका वसती हे जिथे कायम स्थळ, विट हे जिथे कायम वक्ते आणि यश म्हणजे वेश्या मिळणे असे जिथे स्वरूप आहे ते भाणही संस्कृत-मध्येच आहेत. संस्कृत नाटकाच्यामधील शृंगार फडक्यांच्या कादंबऱ्यांसारखा असतो. भाणातील उत्तानशृंगार प्रभाकर आणि होनाजीच्या लावणीसारखा आहे.

ही प्रस्तावना विद्वानांच्यासाठी नाही. सर्वसामान्य जिज्ञासू रसिकांना पार्श्वभूमी कळावी यासाठी आहे. एक विचार असा येतो की, हे विवेचन व्यर्थ आहे. भाण वाचून ज्यांना कळणार नाही, त्यांना प्रस्तावना वाचून कळेल हे गृहीतच चुकले आहे. भाणाचा अनुवादच मराठीत नको असे वाटेल त्यांनी दोष मला द्यावा, ही प्रस्तावना नको वाटेल त्यांनी दोष साधले यांना द्यावा; पण खाजगीत मिटक्या मारून भाण वाचणाऱ्यांनी जाहीर मात्र नाक मुरडावे हा दंभ बरा नाही.

• • •

3330
२५९२२
निबंध ३०।१०।८

REFBK-0025922

# गाजलेल्या प्रस्तावना

ग्रंथांचे स्वरूप व लेखनामागील हेतू, वाचकांना विषय प्रवेशापूर्वीच कळावा, यासाठी बहुधा प्रास्ताविके लिहिली जातात. परंतु मराठी साहित्यांत अनेकदा असे घडले आहे की मूलगामी असे विचार व्यक्त करणारी ग्रंथाची प्रस्तावनाच अतिशय प्रभावी व महत्वपूर्ण ठरलेली आहे. प्रस्तावना लेखक हा, स्वतः ग्रंथकर्ताच नसेल, तर तो सामान्यतः विद्वत्तेने म्हणा, व्यासंगाने म्हणा किंवा साहित्यिक कर्तृत्वाने म्हणा, जेष्ठ असतो. यामुळे काहीवेळा अशांची प्रस्तावना हीच त्या पुस्तकाचा एक बहुमोल अलंकार ठरते. स्वतःच संशोधित केलेल्या 'राधामाधवविलासचंपू' या शहाजीराजांच्या चरित्र पोथीला इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांनी लिहिलेली विस्तृत प्रस्तावना, हीच महत्वपूर्ण ठरली यात नवल नाही. मॅझिनी चरित्राला स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांनी जोडलेली प्रस्तावना, ही तर एक अमर स्वातंत्र्यसूक्तच आहे. या दोन्ही प्रस्तावनांबरोबर, वासुदेवशास्त्री खरे, इतिहाससंशोधक शेजवलकर, न.चिं. केळकर, श्री.म. माटे, आचार्य अत्रे, पु.ल. देशपांडे, नरहर कुरुंदकर व डॉ. स.गं. मालशे या मान्यवरांनी विविध विषयांवरील लेखनाला लिहिलेल्या व महत्वपूर्ण ठरून गाजलेल्या प्रस्तावना, या पुस्तकात प्रथमच एकत्र समाविष्ट आहेत. मराठी साहित्याच्या अभ्यासकांच्या व ग्रंथप्रेमींच्या संग्रही असायलाच हवे असे हे पुस्तक आहे.

उन्मेष प्रकाशन